साम्राज्य



श्रीमंत महाराज राजराजेश्वर सवाई तुकोजीराव महाराज साहेब.
संस्थान इंदूर.

The Bombay Art Printing Works, Fort.

अर्पणपत्रिका.

हा ग्रंथ

श्रीमंत राजराजेश्वर

सवाई तुकोजीराव महाराज,

होळकर सरकार, संस्थान इंदूर,

यांच्या सेवेसी,

श्रीमंतांच्या अंगीं वसत असलेल्या अनेक सद्गुणांचें

स्मारक ह्मणून, त्यांचे परवानगीनें,

अत्यंत आदरानें अर्पण

केला आहे.

द. बा. करकरे.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा उदय आणि त्याची वाढ.

सर आलफ्रेड लायल, पी. सी., के. सी. बी., डी. सी. एल्,

यांच्या

ब्रिटिश डोमीनियन इन इंडिया

या पुस्तकाचें भाषांतर.

लेखकः दत्तात्रय बाळकृष्ण करकरे.

आवृत्ति पहिली.

सन १९१६.

किंमत तीन रुपये.

इंग्लंड ही तर वाढती सत्ता.

हेनरी मार्टिन.

फ्रान्सचा इतिहास.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश

सामाज्याचा उदय

आणि

त्याची वाढ.

Printed by Shivaram Mahadev Paranjape,

and

Published by Dattatraya Balkrishna Karkare,

at Govardhan Press, 6 Shukrawar, Poona City.

प्रस्तावना.

(१९०७).

ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश, हिंदुस्थानांतील ब्रिटिश राष्ट्राचा उत्कर्ष कसकसा होत गेला, याची थोडक्यांत माहिती द्यावी, व इ. सन १८५८ पर्यंत, ह्मणजे ईस्ट इंडिया कंपनीपासून राणीसरकारनें राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें प्रत्यक्ष आपल्या ताब्यांत घेतलीं तोंपर्यंत, ब्रिटिश राष्ट्राची क्रमाक्रमानें वाढ होत जाण्याला कशी कशी परिस्थिति कारणीभूत झाली, याबद्दलची हकीकत सांगावी, हा आहे. हिंदुस्थानांतील स्वतंत्र एतद्देशीय संस्थानें इंग्लिशांच्या सार्वभौम सत्तेच्या दिमतीखालीं संरक्षक पद्धतीनें ठेवण्यांत आलीं आहेत, व हिंदुस्थानच्या सरहद्दीलगत असलेलीं परकीय संस्थानें अथवा सरहद्दीपलीकडील प्रदेश हीं ब्रिटिश सरकारच्या राजकीय वर्चस्वाच्या कक्षेमध्यें याच पद्धतीनें आणण्यांत आलीं आहेत; यामुळें ह्या संरक्षक पद्धतीचें स्वरूप आणि तिची अंमलबजावणी यांबद्दल थोडेंसें विवेचन करणें योग्य वाटल्यानें तेंही या पुस्तकाच्या शेवटीं केलेलें आहे. परंतु ह्या पुस्तकाचा प्रधान उद्देश, युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांमधील घडून आलेल्या ऐतिहासिक गोष्टी व त्यांचा परस्परांमधील संबंध, यांची संगतवार हकीकत देणें हा आहे; कारण, ह्याच गोष्टींमुळें इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील साम्राज्याचा पाया वाढीस लागला, व त्याचा झपाट्यानें विस्तार झाला. तथापि ह्या गोष्टींबद्दल समाजांत बहुतेक अज्ञान आहे, व त्यांच्याकडे कोणाचेंही फारसें लक्ष वेधलेलें नाहीं; ह्मणून या बाबतींचें वर्णन पुढील राज्यविस्ताराच्या स्थित्यंतरासंबंधींच्या हकीकतीहून अधिक विस्तृत रीतीनें दिलेलें आहे. शिवाय, कांहीं ठळक ठळक गोष्टी (उदाहरणार्थ, बंगालमधील नंदकुमार याची इतिहासप्रसिद्ध चौकशी)

गाळल्या आहेत, अगर त्यांचा तात्पुरताच उल्लेख केलेला आहे; याचें कारण, या पुस्तकांत नमूद केलेल्या अधिक महत्त्वाच्या राजकीय बाबींशीं ह्या गोष्टींचा फारच थोडा संबंध आहे; शिवाय, अशा गोष्टींबद्दलची साग्र हकीकत ब्रिटिश रियासदीच्या कोणत्याही इतिहासांत मिळण्यासारखी आहे.

या ग्रंथांत पुरवणी म्हणून हल्लीं जो एक भाग जोडला आहे, त्यांत इंग्लंडच्या सरकारानें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतल्या वेळेपासून आज तागाईत पावेतों हिंदुस्थानांत व त्याबाहेर घडलेल्या राजकीय गोष्टींचें थोडक्यांत पर्यालोचन केलें आहे; आणि या अवधींत ब्रिटिश सरकारनें परराष्ट्रांशीं ठेविलेलें राजकीय धोरण, त्याचें स्वरूप, व त्यापासून घडून आलेले महत्त्वाचे परिणाम, यांचेंही विवरण केलें आहे. शिवाय, गेल्या पन्नास वर्षांमध्यें ब्रिटिश सरकारानें भरतभूमींतील अंतःस्थ राज्यव्यवस्था सुधारण्याकरितां आणि हिंदुस्थानांतील आपल्या हिंदी देश-बांधवांच्या कल्याणाकरितां राज्यपद्धतींत व कायदेकानूंत जे जे फेरफार केले, त्यांचेंही थोडेंसें समालोचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

हल्लीं प्रसिद्ध केलेल्या पांचव्या आवृत्तीमध्यें (१९१०) या ग्रंथांतील कांहीं कांहीं भागांत थोड्याश्या अधिक मजकुराची भर घातलेली आहे.

ग्रंथकर्ता.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा उदय आणि त्याची वाढ.

विषयोपन्यास.

ब्रिटिश राष्ट्राच्या इतिहासांत, हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राष्ट्रसंस्थापनेच्या हकीकतीला एखाद्या उपकथेहून अधिक महत्त्व दिलेलें नसतें. त्यामुळें निव्वळ युरोपांतील राजकारस्थानावरच भिस्त ठेवणाऱ्या इतिहासकारांनीं, एका इंग्रज व्यापारी मंडळीनें पूर्वेकडील एका मोठ्या साम्राज्याचा पाया घातला, ही गोष्ट त्या राष्ट्राच्या अनुकूल दैवविलासाचा एक अद्भुत आणि अगम्य खेळ आहे, असें समजून त्यांतच समाधान मानावें, हें अगदीं स्वाभाविक आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि हा अपूर्व योगायोग जुळून येण्याला एकामागून एक कोणकोणतीं कारणें कसकशीं घडून आलीं, आणि त्यांचा एकमेकांशीं कसकसा संबंध होता, ह्याचें बारीक रीतीनें निरीक्षण केलें असतां, आणि दर्यावर्दी राष्ट्राचें जीवित्व सर्वस्वी परदेशीय व्यापारावरच अवलंबून असतें, व निदान दोन शतकेंपर्यंत इंग्लंडनें आपलें सर्व धोरण समुद्रावरील वर्चस्व व परदेशाबरोबरील व्यापार —सर एच. पारनेल ह्याच्या म्हणण्याप्रमाणें, इंग्लंडच्या अठराव्या शतकांतील बहुतेक सर्व लढाया ज्या व्यापाराकरितांच करण्यांत आल्या होत्या, तो व्यापार—हीं वाढविण्याकडेच ठेविलें होतें, हें ध्यानांत ठेविलें असतां, समुद्रावरील लढायांत व व्यापारी साहसाच्या कृत्यांत एकामागून एक सारख्या मिळविलेल्या विजयांबद्दल हिंदुस्थान हें मौल्यवान बक्षिस इंग्लंडला

मिळालें, याबद्दल कोणासही आश्चर्य वाटणार नाहीं; निदान, हें न उलगडणारें कोडें आहे, असा तरी त्यांचा समज खात्रीनें होणार नाहीं. या ग्रंथाचा उद्देश, हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या उत्कर्षाची निव्वळ तांत्रिक माहितीच देण्याचा नाहीं, तर हा अवर्णनीय उत्कर्ष होण्याला ज्या गोष्टी व केंद्रीभूत झालेली जी इतर अपरिहार्य परिस्थिति कारणीभूत झाली, त्यांचें थोडक्यांत विवेचन करून त्यामुळें राष्ट्रसंस्थापनेचें कार्य कसें सुगम रीतीनें घडून आलें, याचें विशद रीतीनें विवेचन करणें, हा आहे.

हिंदुस्थान ब्रिटिश सरकारचे ताब्यांत गेल्यानंतरचा इतिहास जर सविस्तर लिहिलेला असेल, तर तो कंटाळवाणा आणि भ्रांतिमूलक असतो, असा सर्वसाधारण समज आहे. याचें कारण, अंशतः परदेशीय नांवें व स्थळें यांचा परिचय कमी हें असून, मुख्यतः त्या इतिहासाचें वैशिष्ट्य, हें आहे. पूर्वेकडील सर्व राष्ट्रांप्रमाणेंच, कांहीं वर्षांपूर्वींच्या हिंदुस्थानच्या इतिहासाची ही मर्यादा अव्यवस्थित लढाया व लष्करी उलाढाली यांचे पलीकडे गेलेली नसून, त्यांत बंडें, कट, गादीच्या हक्कासाठीं आपआपसांतील तंटेबखेडे, आणि निरनिराळ्या जुलमी राज्यकर्त्यांनीं आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां केलेलीं कारस्थानें व उलाढाल्या, यांचा समावेश होतो. राजकीय संस्थांचा उत्कर्ष, स्थानिक स्वराज्याची वाढ, किंवा स्वतंत्र राष्ट्राची उभारणी करण्यास लागणारें राष्ट्रतेज, ह्या गोष्टी आशियांतील राज्यांत आढळून येण्याचा फारसा संभव नाहीं. प्रख्यातीस आलेले सर्व पुरुष (ग्रीक लोकांच्या भाषार्थाप्रमाणें ह्मणावयाचें ह्मणजे) एक तर अतिशय जुलमी सत्ताधिकारी तरी होते, अगर फक्त लढायांमध्यें यश मिळविणें हेंच आपलें इतिकर्तव्य आहे, असें तरी मानणारे होते. सर्वांची राज्य करण्याची पद्धत अगदीं एकसारखी व परंपरागत असून तिची वाढ फारशी झालेली नव्हती; ज्या ठिकाणीं राष्ट्रतेज दृष्टीस पडतें, तेथें तें अगदींच बाल्यावस्थेंत असल्याचें दिसतें; आशिया खंडांतील इतिहासप्रसिद्ध असलेलीं मोठमोठीं राष्ट्रें ह्मणजे, निरनिराळ्या आचारविचारांचे, अनेक धर्मांचे आणि

जातींचे, यदृच्छेनें अगर जुलमानें, कोणा एकाच्या तरी सत्तेखालीं आलेले जनसमुदाय होत. प्रस्तुत काळीं आशिया खंडांतील सर्व मोठमोठ्या देशांच्या परिस्थितीकडे पाहिलें, तर तेथील राज्यकर्ते परदेशांतून पूर्वीं त्या देशांत विजय संपादून राज्य स्थापन केलेल्या एखाद्या परक्या जातीचे आहेत, किंवा परदेशांतून आलेल्या एखाद्या घराण्याचे वंशज आहेत, असें आढळून येतें. राज्यकर्ते व त्यांची प्रजा यांची भाषा व धर्म हीं बहुतेक भिन्न आहेत. ह्मणून प्रजेला राजघराण्यांत उलथापालथ झाली, तर त्याबद्दल कांहींही वाईट वाटत नाहीं. परकीय सत्तेचा केव्हांही ते मनापासून तिटकारा करीत नसत; इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थानांत ब्रिटिश राजसत्ता प्रस्थापित करण्याला तेथील लोकांनीं अडथळा न करितां उलट त्याची वाढ होण्यालाच मदत केलेली आहे.

तथापि इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील जडलेला संबंध, ही जगाच्या इतिहासांत घडून आलेली एक अपूर्व राजकीय परिस्थिति आहे. दोन्हीही देश एकमेकांपासून अतिशय लांबीच्या पल्ल्यावर असून ते निरनिराळ्या खंडांमध्यें आहेत; दोन्हीही देशांमधील धर्म आणि वर्ण ह्यांमध्यें जमीनअस्मानाइतका फरक आहे. राजकीय सत्तेच्या केंद्रस्थानापासून दूरच्या अंतरावर असलेल्या इतक्या मोठ्या प्रदेशावर आणि जनसमूहावर आपली सत्ता प्रस्थापित करून सुनियंत्रित राज्यकारभार चालविल्याचें यासारखें दुसरें एकही उदाहरण आजपर्यंत घडलेलें नाहीं. जो देश युद्धकलाकौशल्य आणि सुनियंत्रित राज्यव्यवस्था, ह्या दोन गुणांनीं आपल्या आसपासच्या देशांपेक्षां अधिक श्रेष्ठ असतो, त्याचें हटकून मोठें राष्ट्र बनतें. मॅसिडोनिया येथील बादशहा शिकंदर यानें विजय संपादून आशियामध्यें आपलें राज्य स्थापन केलें; त्यानंतर त्याच्या वंशजांच्या सत्तेखालीं भूमध्य समुद्राच्या पूर्वकिनाऱ्यापासून तों तहत बहुतेक हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत ग्रीक लोकांच्या मतांचा आणि संस्थांचा पुष्कळ प्रसार झाला; आणि त्या काळच्या ग्रीक राज्यकर्त्यांनीं तें राज्य आपल्या श्रेष्ठ बुद्धिवैभवानें आणि

राजकीय तेजानें, तेथें असंख्य लोकवस्ती असतांनाही, पुष्कळ काळपर्यंत कायम ठेविलें. जेव्हां रोमन लोकांनीं ग्रीक लोकांपासून युफ्रेतीस नदीच्या पश्चिमेकडील प्रांत आपल्या स्वाधीन करून घेतले, तेव्हां त्यांनीं परराज्यें जिंकल्यावर तेथील राज्यकारभार सुव्यवस्थित रीतीनें चालविण्याच्या पद्धतीचा अंगीकार केला; व त्यामुळें आपल्या विस्तृत राज्यछत्राखालीं, आणि त्याहूनही व्यापक अशा आपल्या सार्वभौमत्वाखालीं, आशिया आणि युरोप यांमधील पुष्कळसे प्रांत, मांडलिक संस्थानें, संरक्षणाची हमी घेतलेले दोस्त सरकार, व निरनिराळ्या जाती आणि वर्ग, यांचा एकत्र मिलाफ केला; आणि या त्यांच्या राज्यपद्धतीवरूनच इंग्लिशांना हिंदुस्थानांतील राज्यकारभार चालविण्याची पद्धत पुष्कळशा महत्त्वाच्या बाबतींत तरी सुचलेली आहे. परंतु रोमन लोकांच्या ताब्यांत असलेले प्रदेश आटोपसर असून अबाधित दळणवळणानें ते एकजीव झालेले होते. भूमध्य समुद्रावर रोमन लोकांची पूर्ण सत्ता होती; आणि रोम अगर कान्स्टान्टिनोपल या दोहोंपैकीं कोणत्याही मध्यवर्ती ठिकाणीं राजधानी असली, तरी सर्व प्रदेशावर त्यांना आपला अंमल अनियंत्रित रीतीनें चालवितां येत असे; त्याचप्रमाणें हल्लींही असें दिसून येईल कीं, रशियानें एक बाजूनें युरोपच्या उत्तरेकडील प्रदेशांत आपला एक पाय मजबूत रोंविलेला असून दुसरा पाय मध्य आशियांतील प्रदेश व्यापून बसला आहे. युरोप आणि आशिया हीं दोन्हीं खंडें आजपर्यंत परस्पर अलग राहिलीं होतीं; परंतु त्यांमधील आडकाठी पूर्णपणें नाहींशी करून दोन्हीही खंडांमध्यें लांबवर पसरलेलें एक मोठें राष्ट्र स्थापन करण्यामध्यें प्रथम जर कोणास यश मिळालें असेल, तर तें रशिया या राष्ट्रासच होय. परंतु रोमन, रशियन, अगर अशाच दुसऱ्या ऐतिहासिक राष्ट्रांनीं आपली राजधानी हाच मध्यबिंदु कल्पून आसपासच्या विस्तीर्ण प्रदेशांत आपला राज्यविस्तार हळू हळू केला; ह्मणजे एक प्रदेश पूर्णपणें जिंकल्यावर दुसरा प्रदेश जिंकणें, व पहिल

पाय मजबुत केल्यावर दुसरा पुढें टाकणें, अशा रीतीनें करीत आणला. त्यांनीं राजधानी व आपल्या ताब्यांत असलेला अगदीं दूरचा प्रदेश यांमध्यें असलेल्या भागांत परकीय सत्तेखालीं एकत्र झालेल्या प्रांताचा अडथळा बिलकुल ठेविला नव्हता; परंतु हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची तशी स्थिति नव्हती. ज्या वेळीं हिंदुस्थानांत इंग्लिश लोक आपलें राष्ट्र स्थापन करीत होते, त्या वेळीं आणि त्यानंतरही पुष्कळ वर्षेंपर्यंत इंग्लंड आणि हिंदुस्थान यांचेमध्यें हजारों मैल लांबीचें अंतर असून अटलांटिक व हिंदी महासागर यांसारखे अफाट समुद्र हे ह्या दोन्ही देशांच्या दरम्यान होते; ह्मणून त्यांनीं समुद्रांत आपला तळ ठेविला, व तेथून आपली सत्ता क्रमाक्रमानें दूरवर वाढवीत नेली. अशा रीतीनें एका दूरच्या अफाट देशांत असंख्य परकीय जनसमूहावर आपलें राज्य स्थापन केल्याचें "हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य" हें एक अश्रुतपूर्व उदाहरण आहे.

गेल्या दीडशें वर्षांमध्यें आशियाखंडांत युरोपस्थ लोकांचा अतिशय भरणा झाला, व त्यामुळें या खंडांत पुष्कळ राजकीय फेरफार घडून आले; परंतु त्या सर्वांमध्यें इंग्लिशांनीं हिंदुस्थान व ब्रह्मदेश मिळविला, हा एक विशेष व अत्यंत महत्त्वाचा फेरफार होय. लष्करी सत्तेच्या जोरावर मध्य आशियामध्यें रशिया हळू हळू आपला चंचुप्रवेश करीत होता, व त्याचा परिणाम आशिया खंडाच्या भविष्यकालीन स्थितीवरही झाल्यावांचून रहात नव्हता; परंतु ज्या वेळीं रशिया खुष्कीच्या प्रसिद्ध व धोपट मार्गानें मोठे अविश्रांत परिश्रम करून आपलें राज्य मध्य आशियांतील माळजमिनीवर उभें करीत होता, त्याच वेळीं इंग्लिश लोकही खुल्या जलमार्गानें त्वरित आणि निर्भयपणें येऊन दक्षिण आशियामध्यें आपलें राज्य स्थापन करीत होते; त्यामुळें असें घडून आलें कीं, उत्तरेकडून स्वाऱ्या करणाऱ्या लोकांप्रमाणें हिंदुस्थानावरील इंग्लिशांचा दिग्विजय उत्तरेकडील पर्वतांपासून दक्षिणेकडील समुद्रापर्यंत पसरत न जातां त्यांचा हिंदुस्थानांतील राज्यविस्तार दक्षिण समुद्रापासून उत्तरेकडील पर्वतांकडे होत गेला. समुद्रा-

वरील वर्चस्व व आरमारी बळ या जोडगोळीनेंच इंग्लिशांना हें यश मिळालें आहे, हें सांगण्याची फारशी अवश्यकता नाहीं.

युरोपांतील दर्यावर्दी राष्ट्रें हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां प्रारंभीं चढाओढ करूं लागण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या, आणि त्या वेळीं हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति कशी होती, याचें थोडेंसें दिग्दर्शन पुढील पानांत केलेलें आहे; तसेंच अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत ब्रिटिश लोकांना राष्ट्रसंस्थापनेमध्यें यशस्वी होण्याला किती श्रम करावे लागले, व त्याबरोबरच तत्कालीन वस्तुस्थितीचा त्यांना कसा फायदा मिळाला, याचीही तांत्रिक हकीकत त्यांत दिलेली आहे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

सदरहू ग्रंथ सर आलफ्रेड लायल याच्या " ब्रिटिश डोमीनियन इन इंडिया " या पुस्तकाचें भाषांतर असून मूळ इंग्लिश पुस्तकांत त्या ग्रंथकर्त्यानें विस्तृत प्रस्तावना लिहिलेली आहे; त्यामुळें ह्या मराठी ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचें बहुतेक कार्य अगोदरच होऊन गेलेलें आहे. तथापि ह्या ठिकाणीं कांहीं गोष्टींचा उल्लेख केल्यास तो अस्थानीं होणार नाहीं, असें वाटत असल्यानें थोडक्यांत करीत आहें.

सदरहु पुस्तकाबद्दल ग्रंथकर्त्यास सहविचारणी सभेकडून बक्षीस मिळालेलें असल्यामुळें आणि बऱ्याच विद्वान लोकांच्या मदतीनें त्यांनीं तें तयार केलेलें असल्यामुळें भाषांतराच्या अत्युत्कृष्टपणाबद्दल अधिक लिहिण्याचें कारणच रहात नाहीं. मूळ इंग्लिश ग्रंथांतील भाषा पुष्कळच कठिण असूनही, सदरहू मराठी ग्रंथांतील कांहीं कांहीं भाग मी वाचले, त्यावरून प्रस्तुतच्या भाषांतरकारांनीं तें प्रगल्भ मराठी भाषेंत आणि अर्थ-विपर्यास न होऊं देतां, शक्य त्या ठिकाणीं लहान लहान वाक्यें करून लिहिण्यांत पुष्कळच परिश्रम घेतले असल्यानें मराठी वाचकांना हें पुस्तक वाचतांना पुष्कळच सुलभ जाईल, आणि त्यामुळें बऱ्याच नव्या गोष्टींचीही त्यांना माहिती होईल, असें माझें मत आहे.

हिंदुस्थानांतील नांवाजलेल्या सनदी नोकरांपैकीं सर आलफ्रेड लायल हे एक असून ते अगदीं लहान हुद्यापासून वाढत वाढत लेफ्टेनंट गव्हर्नर-च्या हुद्यापर्यंत गेलेले होते; यामुळें अशा अनुभवी अधिकाऱ्यांनीं केलेलें सदरहू पुस्तक ह्मणजे इंग्लिश वाङ्मयांतील एक अत्युत्तम ग्रंथ ह्मणून गणला गेलेला आहे; अशा पुस्तकाच्या भाषांतराची मराठी भाषेच्या

वाङ्मयांत उणीव असल्यानें ती भरून निघणें अत्यंत अवश्यक होतें; ही उणीव या पुस्तकानें भरून निघेल, अशी मला आशा आहे.

ब्रिटिश सरकारशीं राजनिष्ठपणें वागणें आणि त्या साम्राज्याची आपणाकडून शक्य ती सेवा करणें हें हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याचें आद्य कर्तव्य असल्यानें तशा दृष्टीनेंही ह्या पुस्तकाचें अत्यंत महत्त्व आहे. या पुस्तकामुळें ब्रिटिश साम्राज्याचें शौर्य, सचोटी आणि शक्ति यांची पूर्ण ओळख पटून साम्राज्याशीं राजनिष्ठ राहण्याचें शिक्षण मिळण्याचा अत्यंत मौल्यवान फायदा होणार असल्यानें सहविचारिणी सभेनें योग्य पुस्तकाची निवड करून व प्रस्तुतच्या भाषांतरकर्त्यांनीं योग्य प्रकारें भाषांतर करण्याची कामगिरी बजावून एक प्रकारची राष्ट्रीय सेवा करण्याचें श्रेय घेतलें, याबद्दल त्यांचें अभिनंदन करून मी ही प्रस्तावना पुरी करितों.

मुक्काम मुंबई,
ता. १३ जानेवारी,
सन १९१५.

भालचंद्र कृष्ण भाटवडेकर.

विषयोपन्यास.

" With awe around these silent walks I tread;
These are the lasting mansions of the dead:
'The dead!' methinks a thousand tongues reply,
These are the tombs of such as cannot die.
Crowned with eternal fame, they sit sublime,
And laugh at all the little strife of time. "

The Library.
By George Crabbe.

" The animate spirit has even consented to shut itself up in that inanimate thing–a book–and there retains its ancient prerogative of befriending and teaching, encouraging and delighting, its fellow–spirits. "

Culture and Self-culture.
By Samual Neil. *Page 51.*

प्रस्तुतच्या ग्रंथांत " हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा उदय आणि त्याची वाढ " क्रमाक्रमानें कसकशी होत गेली, याबद्दल विशद रीतीनें विवेचन केलेलें असून समुद्रतीरस्थ युरोपियन राष्ट्रांच्या व्यापार व वसाहती-विषयक चिकाटीच्या चढाओढींत इंग्लंड यशस्वी कां झालें, आणि फ्रान्सला प्रत्येक ठिकाणीं अपयश कां आलें, याची मीमांसा केली आहे;—दुसऱ्या शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे, ग्रेट ब्रिटनची अप्रतिहत सागरी सत्ता व आरमारी वर्चस्व ह्या जोडगोळीपुढें फ्रान्सचा टिकाव न लागल्यामुळेंच फ्रेंचांना " हिंदुस्थानांतील आपल्या भावी राष्ट्राला " कायमचें कसें मुकावें लागलें, ही गोष्ट सिद्ध करून दाखविली आहे; शिवाय, हिंदुस्थानांत ' दिग्वि-

जथाच्या बेतांच्या पाठीमागें " लागावें कीं नाहीं, याबद्दल बरीच भवति न भवति होऊन साम्राज्यसंस्थापनेचें महत्कार्य ब्रिटिश लोकांनीं आपल्या अंगावर घेतल्यानंतर त्यांना साम्राज्यविस्तार करणें ओघाओघानेंच कसें भाग पडत गेलें, आणि साम्राज्यसंरक्षण व स्वास्थ्य यांकरितां आपल्या प्रदेशाच्या लगतच्या प्रदेशांतील राज्यकर्त्यांना संरक्षित दोस्त अथवा मांडलिक सरकार ह्मणून तहानें बांधून घेऊन आपल्या व आपल्या आसपासच्या प्रदेशांत शांतता व सुसंबद्ध राज्यव्यवस्था हीं क्रमाक्रमानें कसकशीं प्रस्थापित करावीं लागलीं, तैनाती तहानें राज्यपद्धतींत कोणकोणता महत्त्वाचा फरक घडवून आणला, दिग्विजयानें आणि स्वामित्व-हक्कत्यागानें त्यांच्या ताब्यांत प्रदेश कसकसा येत गेला, युरोपांतील राजकारणाचा आशियांतील राजकारणावर कसकसा परिणाम घडत गेला, तत्कालीन एतद्देशीय राजेरजवाड्यांची, व त्यांचें सैन्य, शस्त्रास्त्रें, शिस्त, वगैरेची स्थिति कशी होती, आणि संरक्षक राज्यपद्धति व आघातसंरक्षक राज्यपद्धति ह्मणजे काय, आणि तिच्यामुळें साम्राज्यसंरक्षणाला किती दांडगी मदत मिळते, वगैरे गोष्टींचें या ग्रंथांत विशद रीतीनें विवेचन केलेलें असून राज्यपद्धतीची दिशा व स्वरूप हींही थोडक्यांत प्रसंगानुसार दर्शित केलेलीं आहेत.

सागरी सत्तेचा इतिहास, ह्मणजे राष्ट्राराष्ट्रांमधील एक प्रकारच्या युद्धाचाच इतिहास होय; सागरी सत्ता हातीं आणण्याला आणि ती टिकविण्याला आरमार बाळगावें लगतें, आणि आरमाराचा खर्च भागविण्याकरितां परदेशांतील व्यापार आपल्या हातीं आणावा लागतो;— ह्मणजे समुद्रावरील सत्ता ही गोष्ट राष्ट्रीय प्रगतीला जितकी महत्त्वाची आहे, तितकाच समुद्रावरील व्यापार हाही राष्ट्रीय प्रगतीची वाढ करण्याला महत्त्वाचा आहे. व्यापारी नफ्यापासून मिळणारा फायदा, व्यापारी हक्कासंबंधानें उद्भवणाऱ्या भानगडी, अथवा राष्ट्रीय हितसंबंधास विघातक असणाऱ्या वसाहतीविषयक अथवा इतर बाबती, यांमुळें समुद्रावरील लढाया

होतात, आणि त्यावरच बहुतेक प्रसंगीं राष्ट्रीय भवितव्य अवलंबून असतें; इतकेंच नाहीं, तर सागरी सत्ता राष्ट्रीय भवितव्य कसें नियमित करतें, सागरी सत्तेच्या अभावीं कित्येक वेळां राष्ट्रीय प्रगतीची वाढ कशी खुंटते, व त्यामुळें राष्ट्रीय हितसंबंधास विघातक अशा गोष्टी कशा घडून येतात, हें या ग्रंथांत स्पष्टपणें आणि साधनिक विवेचनानें निदर्शित केलेलें आहे;—ह्मणजे, ग्रेट ब्रिटनच्या सागरी सत्तेचें श्रेष्ठत्व आणि फ्रान्सच्या आरमाराचा कमकुवतपणा ह्यांची प्रस्तुतच्या ग्रंथांत सप्रमाण, व साधक बाधक रीतीनें, उदाहरणांसह तुलना करून दाखविलेली आहे.

पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देशांचा परस्परांशीं फार पूर्वीपासून संबंध आहे. मानुजकोटिशास्त्रवेत्त्यांच्या मताप्रमाणें मानवी प्राण्यांचे पांच वर्ग कल्पिलेले असून त्यांपैकीं संख्येनें सर्वांत मोठा वर्ग ह्मणून आर्य लोकांची गणना केलेली आहे. आर्य लोकांचें मूळ वसतिस्थान मध्य आशियांत असून तेथून ते पुढें चोहोंकडे पसरलेले आहेत. यांपैकीं पहिली जी टोळी युरोपमध्यें जाऊन स्थाइक झाली, तिला "आर्यन" अथवा "इंडो-युरोपियन" वर्गापैकीं केल्टिक शाखा असें ह्मणतात. त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं अशाच रीतीनें आर्य लोकांच्या दोन टोळ्या दोन दिशांनीं पुन्हां युरोपांत शिरलेल्या आहेत;—त्यांपैकीं एक इराण व आशिया मायनर या देशांमधून गेलेले इतालियन, ग्रीक आणि टयूटन या लोकांचे पूर्वज ही असून, दुसरी ह्मणजे कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडून युरोपांत शिरलेली स्लावोनिक ही शाखा होय. केल्टिक लोकांनीं पश्चिम युरोपमधील मूळच्या अनार्य रहिवाश्यांचा उच्छेद करून त्यांतील बहुतेक सर्व भागांत आपली वस्ती करून साम्राज्यें स्थापन केलीं. त्यांचे नंतर आलेल्या ग्रेको-रोमन लोकांनीं ग्रीस व इतालींतील कांहीं भाग, आणि भूमध्यसमुद्रांतील बेटें, व त्यांचे किनाऱ्यावरील प्रदेश, यांमध्यें वस्ती करून त्यांनींही त्या ठिकाणीं आपलीं साम्राज्यें स्थापन केलीं. या वेळीं पाश्चात्य सुधारणेचें जनकत्व ग्रीसकडे आलें; परंतु वाढत्या सत्तेच्या अभावीं तें लवकरच इताली-

कडे गेलें. रोमन लोकांनीं प्रथम इतालींत; व नंतर उत्तर जर्मनी व रशिया हे देश खेरीजकरून बाकीच्या युरोप खंडांत आणि आशिया मायनरमध्यें, आपलें विस्तृत साम्राज्य स्थापन केलें; आणि त्याचप्रमाणें उत्तर जर्मनींत टयुटानिक लोकांनीं व रशिया आणि तुर्कस्थानांतील बऱ्याच भागांत स्लाव्होनिक लोकांनीं वस्ती करून त्या ठिकाणीं आपाआपलीं साम्राज्यें स्थापन केलीं. शिवाय, "खिस्तीधर्मप्रसारक सेंट थामस ह्यानेंच अगदीं पहिल्यानें दक्षिण हिंदुस्थानांत धर्मोपदेश केला, व अखेरीस मद्रासजवळच्या 'सेंट थामसच्या टेकडीवर' स्वधर्मासाठीं त्याला आपला देहत्याग करावा लागला," या दंतकथेस खरें मानण्यास जरी इतिहासाचा आधार नाहीं, तथापि इराण व मेसापोटेमिया येथील नेस्टोरियन व खाल्डियन धर्मोपदेशकांनीं तिबेट, तार्तरी, इत्यादि देशांसुद्धां सर्व आशियाखंडभर धर्मप्रसार केल्यावर दक्षिण हिंदुस्थानांत येऊन तेथें त्याचें बीजारोपण केलें, अशाबद्दल सबळ पुरावा आढळतो. त्याचप्रमाणें इंग्लंडचा राजा, आलफ्रेड, यानें इ. सन ८८३ मध्यें सेंट थामस व सेंट बार्थलोम्यू यांच्याकरितां हिंदुस्थानांत कांहीं धर्मादाय रक्कम पाठविली होती, असें साक्सन बखरींवरून आढळून येतें. शिवाय, आगस्टस बादशहाच्या दरबारीं हिंदुस्थानांतून एक वकील त्यास नजराणा घेऊन गेला होता, अशाबद्दल आधार सांपडतो. त्याचप्रमाणें कारोमांडल किनाऱ्यावरील लहान लहान खिस्ती समूहाशिवाय मलबार किनाऱ्यावर त्या काळीं भरभराटीस आलेले खिस्ती लोकांचे दोन समाज होते आणि याच ठिकाणीं "सीरियन चर्च" चे ह्मणून आपणास ह्मणवून घेणारे खिस्ती लोक अद्यापिही आपला धर्म सांभाळून राहिलेले आहेत;—ह्मणजे पश्चिमेकडील देशांशीं पौर्वात्य देशांचें—आणि विशेषतः हिंदुस्थानचें—दळणवळण बऱ्याच पूर्व काळापासून आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

आरमारी सत्ता आणि व्यापारी मक्ता ह्या दोन्हीही गोष्टींचें महत्त्व बऱ्याच पूर्व काळापासून प्रस्थापित झालेलें आहे; तथापि व्यापार हातीं

येण्याला आरमारी सत्ता हातीं आली पाहिजे असते, आणि आरमाराचें मूर्तिमंत अस्तित्व भासविण्याकरितां व तत्प्रीत्यर्थ होणारा प्रचंड खर्च भागविण्याकरितां परदेशाशीं बिनधोक व्यापारी दळणवळण जारीनें सुरू असावें लागतें, ही गोष्टही निर्विवादपणें निश्चित झाल्यासारखीच आहे. तथापि, उदाहरणादाखल, व्यापारामुळें हातीं येणारी सत्ता, संपत्ति व साधनें, यांविषयींची बऱ्याच पूर्व काळची खालील गोष्ट विशेष महत्त्वाची व मनन करण्यासारखी असल्यानें तिचा या ठिकाणीं उल्लेख केला आहे.

इ. सन १२४१ या वर्षीं अंदाधुंदीच्या काळास कंटाळून हॅंबर्ग आणि ल्यूबेक या दोन शहरांनीं एकत्र होऊन आपापल्या प्रदेशासभोंवती बंदोबस्त ठेवण्याचें ठरविलें. त्यानंतर ब्रन्सविक व ब्रेमेन हीं शहरें त्यांना येऊन मिळालीं. व अशा रीतीनें सुमारें शंभर शहरांची मिळून एक जूट निर्माण झाली. तिला "हन्सा" असें म्हणतात. धर्मयुद्धामुळें आशियांतील व्यापारी माल युरोपांत जारीनें जाऊं लागल्यानें व्यापाराला फार तेजी आली होती, आणि उत्तरेकडील कोणत्याही राज्याच्या मानानें त्या वेळीं ही "हन्सा" इतकी बलाढ्य होती कीं, तिनें फ्रान्सचा राजा चवथा फिलिफ याला इंग्लिशांचा फ्रान्सच्या किनाऱ्यावरील व्यापार बंद करण्यास भाग पाडिलें होतें; इतकेंच नाही, तर इ. सन १३६९ मध्यें हिनें कोपनहेगन हें शहर घेतलें, व डेनमार्कचें राज्यही विक्रीस काढलें होतें. या संस्थेचीं मुख्य शहरें ल्यूबेक, कलोन, ब्रन्स्विक, आणि डांझिक, हीं होतीं.

इ. सनापूर्वीं ४९ व्या वर्षीं ब्रिटन हें सीझरनें पादाक्रांत केलें, व तेव्हांपासून सुमारें दोन अडीचशें वर्षें तें रोमन साम्राज्याच्या ताब्यांतील प्रदेश ह्मणून अस्तित्वांत होतें. इंग्लंडवर अखेरची स्वारी नार्मंडीचा ड्यूक विल्यम यानें इ. सन १०६६ मध्यें केली; परंतु त्यानंतर मात्र त्या देशावर स्वारी न झाल्यानें कित्येक शतकांपासून क्रमाक्रमानें वाढत गेलेला व्यापार आणि आरमारी सत्ता यांमुळें ग्रेट ब्रिटनचें राष्ट्र आज सर्व जगांत

संपत्तिमान, आणि वैभवसंपन्न बनलेलें आहे. स्पेनच्या अजिंक्य आरमारावरील असामान्य विजय आणि ट्राफलगारच्या पाण्याखालीं फ्रेंच आरमाराला जलसमाधि देऊन केलेली अद्वितीय मर्दुमकी, ह्या गोष्टींमुळें ग्रेट ब्रिटनच्या आरमाराची कर्तबगारी जगाच्या निदर्शनास आली, आणि ब्रिटिश लोकांच्या दर्यावर्दी नैपुण्यामुळें मिळालेल्या अशा विजयानें त्यांच्या कीर्तींत भर पडून त्यांचाही स्वत:बद्दलचा आत्मविश्वास दृढ झाला. क्रामवेलचा प्रसिद्ध " नॅव्हिगेशन लॉ " अथवा त्यानंतर सुमारें १२५ वर्षांनीं नेल्सन यानें वेस्ट इंडीजमध्यें अशाच प्रकारचा सुरू केलेला नौकानयनाचा कायदा, यांच्या मुळाशीं व्यापाराचा आणि परंपरेनें आरमारी श्रेष्ठत्व वाढीस लावण्याचा उद्देश होता. शिवाय इंग्लिश लोक प्रथमारंभीं व्यापारी ह्मणून इकडे आल्यानंतर, त्या वेळीं सुद्धां त्यांच्या आरमारी श्रेष्ठत्वाचा लौकिक असून तशाबद्दल इतिहासांत बरेच आधार आहेत. उदाहरणार्थ,राजश्री संभाजी आंग्रे यानें ता. १० फेब्रुवारी इ. सन १७३४ रोजीं शाहू महाराजांस एक पत्र पाठविलें, त्यांत खालील मजकूर आहे:—

" इंग्रज व फिरंगी यांचा बंद करावा, ह्मणजे अंजनवेलीचे खाडींत आरमार जाऊन सामान पावेल, आणि खुष्की व जलमार्गें दोहींकडून पायबंद जाहलियानें काम होईल........"

इ. सन १७४० च्या एप्रिल महिन्यामध्यें चिमणाजी बल्लाळ यांनीं ब्रह्मेंद्रस्वामींस लिहिलेल्या पत्रांपैकीं एकांत खालील आशय आहे:—

"........इंग्रजही अगोदर कुलाबियास येऊन पाणी सामान जें पाहिजे तें कुलाबियास पोंचविलें, व सांप्रत तो आरमारानिशीं कुलाब्याजवळ आहे....गुरबा व थोरली गलबतें इंग्रजांचे भयानें सुवर्णदुर्गाकडे लावून दिलीं आहेत... इग्रजांस मार्ग देऊन जाऊं द्या, ह्मणून संभाजीनें सांगून पाठविलें होतें; परंतु इंग्रेजानें मान्य केलें नाहीं. "

छत्रपति शाहू महाराजांचें कुटुंब राणी सखवारबाई हिच्याही पत्रांत पुढील हकीकत आहे.

"....वरकड इंग्रज, फिरंगी व सांवत आरमारसुद्धां आम्हांस सामील आहेत. तरी गोवलकोट व अंजनवेली आमचे स्वाधीन करणें. घेऊन देऊं ह्मणून लिहिलें, तर उत्तम गोष्ट आहे. इंग्रज व फिरंगी व सांवत यांसी पत्रें पाठवून बोलल्याप्रमाणें सामील होऊन खामखा घेऊन देतील, ऐसा करार असेल, तर त्यांचे वकील हुजूर मातबर असतील, ते आणून हुजूर पाठवून द्यावे."

दुसऱ्या एका पत्रांत सखवारबाईस स्वामींनीं "इंग्रज बंद करावयास आपण ममईस जावें कीं काय," ह्मणून प्रश्न विचारला आहे, आणि त्याचें उत्तर राणीनें "स्वतःच जाण्याचें प्रयोजन नाहीं, परंतु कार्य होईल असा विचार करावा, आणि जेणेंकरून इंग्रेज बंद होऊन शामलास मदत न करी, आपणास सद्धख राखे तें करावें;" असें लिहिलें आहे. शिवाय आणखी एका पत्रांत "इंग्रजांची व स्वामीची मैत्री" असल्याबद्दलचा उल्लेख असून "मैत्रिकीमुळें इंग्रजास सांगून शामलाची मदत न करीत तो अर्थ केला पाहिजे," ह्मणजे स्वामीस गांव देऊं, असें अभिवचन देण्यांत आलें होतें.

वरील उताऱ्यावरून इ. सन १७५७ च्या पूर्वीही इंग्लिशांच्या आरमारी श्रेष्ठत्वाबद्दल किती प्रसिद्धि झालेली होती, आणि त्यांच्याशीं सख्य ठेवण्यांत मराठ्यांना सुद्धां किती महत्त्व वाटत असे, हें स्पष्टपणें दृग्गोचर होतें.

युरोपांतील पूर्वकालीन परिस्थितीकडे पाहिलें, तर त्या काळीं रोमन साम्राज्य हें सर्व जगांत अत्यंत बलाढ्य, विस्तृत व सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेलें होतें; परंतु टयूटन लोकांनीं ख्रिस्ती शकापूर्वी ११३ वे वर्षा-पासून त्या साम्राज्यावर सारखे हल्ले करून शेवटीं इ. सन ४७६ मध्यें त्याचा बहुतेक नाश केला. त्यानंतर पांचव्या शतकापासून त्या लोकांवर हूण लोकांच्या पूर्वेकडून स्वाऱ्या होऊं लागल्या. त्यामुळें त्यांच्या मुख्य चार जमावांपैकीं व्हॅंडाल लोक स्पेन व पोर्तुगाल या देशांत, गाथ लोक आस्ट्रिया, पोलंड व स्वीडन या देशांत, आणि अँगल्स व साक्सन लोक

इंग्लंडांत जाऊन राहिले. तथापि फ्रांक व अलमनी लोक मात्र आपल्या पूर्वस्थानांतच राहून तेथें त्यांनीं आपलीं राज्यें स्थापन केलीं. रोमन साम्राज्य नष्ट झाल्यापासून तों शार्लमेन बादशहाच्या कारकीर्दीपर्यंतच्या काळास "तमोयुग" आणि त्या वेळेपासूनच्या काळास "मध्ययुग" असें मानण्याचा प्रवात आहे; तथापि वास्तविक रीत्या म्याक्सिमिलियन (इ. सन १४९३ ते १५१८) हाच अर्वाचीन काल आणि मध्यकाल यांचेमधील बादशहा होय, असें ह्मणतां येईल. या कालांत संस्थानिक-राज्यपद्धति आणि सरदारी राज्यपद्धति सुरू झाली. सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं मध्ययुगाचा शेवट झाला. त्यामुळें तत्कालीन उपरिनिर्दिष्ट दोन्ही पद्धति, धर्मयुद्धें व धर्मगुरूचें महत्त्व, यांना आळा बसला; आणि संक्रमणस्थितीला सुरवात होऊन नवीन युगांतील जनतेमध्यें विद्या, कला, विचारशक्ति आणि ज्ञान यांचें बीजारोपण झालें.

सोळाव्या शतकांत युरोपांत आणि आशियांत कित्येक सर्वोत्कृष्ट व सर्वमान्य अशा राज्यकर्त्यांचा —म्हणजे शार्लमेनच्या बरोबरीनें राज्य मिळविणारा पांचवा चार्लस, फ्रान्सचा राजा पहिला फ्रान्सिस, इंग्लंडचा प्रख्यात राजा आठवा हेनरी, दहाव्या लुईसारखा माननीय पोप, पोलंडचा राजा सिजिस्मंड, इराणचा शहा इस्मायल, हिंदुस्थानांतील मोगल बादशहा अकबर, आणि तुर्कस्थानचा सुलतान सुलेमान, यांचा—जन्म झालेला आहे; कित्येक महत्त्वाचे शोध लागलेले आहेत; आणि ख्रिस्ती लोकांची मुसलमान लोकांवर सरशी झालेली आहे. त्याचप्रमाणें मध्य युगांत इंग्लंडच्या व युरोपच्या दृष्टीनें विचार केल्यास बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी घडलेल्या आहेत. इ. सन १२१५ मध्यें रनमिड येथील मैदानावर सरदार, बडे लोक, व धर्माधिकारी, यांचे समक्ष जान राजाला इंग्लंडच्या प्रजेला "म्याग्ना चार्टा" द्यावा लागला, आणि या बड्या सनदेअन्वयें इंग्लंडच्या प्रजेला विशिष्ट स्वातंत्र्य हक्क मिळून राज्यकर्त्यांच्या अनियंत्रित व अप्रतिहत सत्तेवर दाब बसला. बायझेन्शम येथील गादी-

वर दिवसेंदिवस निर्बळ बादशहा येत गेल्यानें त्या राष्ट्राच्या वैभवास सारखी ओहोटी लागलेली होती; आणि इतक्यांतच आयरिन या नांवाची स्त्री तेथील बादशाहीण झाली; या स्त्रीनें गादीवर बसण्यापूर्वी आपल्या मुलाचे डोळे काढून व त्याचे हाल हाल करून त्यास ठार मारलें; परंतु इतकें करूनही तिला राज्यपद न लाभतां तें पोपच्या अनुमतीनें अखेर चार्लस दी ग्रेट याचेकडे गेलें. इ. सन १४३६ मध्यें तुर्क लोकांनीं पूर्व रोमन साम्राज्याची राजधानी कान्स्टांटिनोपल सर केलें. त्यामुळें तेथील विद्वान लोकांनीं आपल्या सर्व ज्ञानसंग्रहासह आसपासच्या ख्रिस्ती राष्ट्राचा आश्रय घेतला. आणि रोमन व ग्रीक सुधारणा उजेडांत येऊन तेथील विद्येचें पुनरुज्जीवन झालें. शिवाय याच सुमारास छापण्याची कला प्रथम अवगत झाली, व्यापाराची वाढ झाली, आणि हस, मार्टिन ल्यूथर, यांसारखे धर्मसंस्थापकही निर्माण झाले आहेत.

नवीन युगाचे प्रारंभानंतर इ. सन १६४८ मधील वेस्टफालिया-च्या तहानें आधींच बदलत चाललेल्या परिस्थितीस हातभार लाविला, व हळुहळु संक्रमणस्थितीचें रूपांतर होत जाऊन तिला सुधारणेचें स्थाइक स्वरूप येत गेलें. जरूसलेम आणि बेथलेहेम येथील पवित्र भूमि सारासिन लोकांपासून आपल्या हातीं मिळविण्याकरितां दोनशें वर्षें-पर्यंत सतत सारखीं धर्मयुद्धें चालत असून त्यांत युरोपांतील साठ लक्ष लोकांची आहुति पडली. तथापि तें पवित्र क्षेत्र अखेर तुर्क लोकांच्याच हातीं राहिलें. पण या धर्मयुद्धामुळेंच युरोपखंडाला व्यापारविषयक दृष्टीनें अत्यंत फायदेशीर असा एक मार्गही सांपडला, असें ह्मणणें अति-शयोक्तीचें होणार नाहीं. कारण, त्यामुळें भूगोलविषयक, ऐतिहासिक व पदार्थविज्ञानशास्त्रीय बाबतींची प्रगति झाली;—इतकेंच नव्हे, तर आशियांतील समृद्ध भूमीचा योग्य परिचय होऊन युरोप खंडांत माहीत नसलेल्या रेशीम, साखर, मसाले, आणि रंग, असल्या प्रकारच्या व्यापाराचें युरोपखंडाबरोबर जारीनें दळवळण सुरू झालें.

व्यापारविषयक बाबतींत ह्मणावयाचें ह्मणजे, पहिल्यनें डच लोक हेच इतर सर्व युरोपियन राष्ट्रांच्या मानानें पुढें सरसावलेले होते. त्यांनीं कित्येक काळपर्यंत पोर्तुगीज, इंग्लिश व फ्रेंच, यांना मागें टाकलेलें होतें. आणि एके काळीं तर हालंडचा व्यापार पूर्वेकडील देशांशिवाय अमेरिका, स्पेन, उत्तरेकडील देश, ब्रांडेगबर्ग, डेनमार्क, स्वीडन, वगैरे बऱ्याच देशांबरोबर जारीनें चालत असून त्यांचेजवळ दहा हजार जहाजें व १,६८,००० खलाशी होते. या एकाच गोष्टीवरून व्यापारानें कशी संपत्ति ओढून घेतां येते, व राष्ट्राचें कसें पोषण करतां येतें,- आणि त्या संपत्तीच्या जोरावर एखादें राष्ट्र दर्यावर्दी साधनें वाढवून किती प्रबळ बनूं शकतें,—याची कांहींशी कल्पना होईल. ता ३ जून इ. सन १६५२ रोजीं इंग्लंड व हालंड यांचेमधील ज्या जलयुद्धांत व्हान ट्राम्प हा मारला जाऊन इंग्लंड विजयी झालें, त्या युद्धानंतरही डच लोकांचा व्यापार जोरांत असल्यानें कित्येक काळपर्यंत हालंड हा इंग्लंडला आरमारी व व्यापारी बाबतींतील एक जबरदस्त प्रतिस्पर्धी बनून राहिला होता. ग्रेट ब्रिटनचें साम्राज्य आज सर्व जगभर पसरलेलें आहे; पण हें एवढें जगड्व्याळ साम्राज्य बनविण्यांत ब्रिटिश लोकांना हालअपेष्टाही तशाच खडतर भोगाव्या लागल्या आहेत. यूरोपांतील प्रत्येक जंगी लढाईंत, जिब्राल्टरचा एक लहानसा तुकडाच फक्त त्या खंडामध्यें त्यांच्या ताब्यांत असूनही, त्यांना नेहमीं भाग घ्यावा लागला आहे. प्रत्येक ठिकाणीं त्यांना नवीन शत्रु उत्पन्न होऊन त्याचेबरोबर त्यांना दोन हात करावे लागले आहेत. आणि त्यांचें नेहमीचें पाठीराखें असलेलें सुदैव, त्यांचा दांडगा उद्योग, त्यांची चिकाटी आणि हिकमत, वगैरे गोष्टींमुळें त्यांना बहुधा प्रत्येक ठिकाणीं —उत्तर अमेरिकेंतील वसाहतवाल्यांबरोबरील युद्धाशिवाय—यशच येत गेलेलें आहे. तथापि विशेषत: हीही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, जगांतील प्रत्येक भागांत तद्देशीय प्रतिस्पर्ध्यांच्या मानानें युरोपियन लोकांच्या प्रतिस्पर्धेबरोबरच त्यांना अधिक प्रमाणानें

तोंड द्यावें लागलें असून, आशिया खंडांत तर पहिल्यानें डच, नंतर पोर्तुगीज, व त्यांच्यामागून फ्रेंच, अशा तीन युरोपियन प्रतिस्पर्ध्यांशीं झगडून इंग्लंडला आपलें वर्चस्व प्रस्थापित करावें लागलेलें आहे. डच लोकांनीं मसाल्याच्या बेटाकडे आपलें व्यापाराचें क्षेत्र ठेविलेलें असून, इंग्लिशांचीही याच भागांत व्यापारी चळवळ असल्यामुळें प्रतिस्पर्धा उत्पन्न झाली; आणि त्यानंतर इंग्लिशांना त्या प्रदेशांत डच लोकांकडून असह्य त्रास होऊं लागला; व त्यामुळें त्यांनीं हिंदुस्थानाकडे आपलें व्यापारी क्षेत्र बदललें. पण इकडेही त्यांना लागलीच पोर्तुगीज लोकांच्या स्पर्धेस तोंड देऊन झगडणें भाग पडलें. त्यानंतर पोर्तुगाल देश स्पेनच्या ताब्यांत गेल्यानें आणि त्याच्या आरमारी सत्तेचा ऱ्हास झाल्यानें या युरोपियन प्रतिस्पर्ध्याच्या त्रासांतून इंग्लंड मुक्त होतें न होतें, तोंच कारोमांडल किनाऱ्यावर फ्रान्स हा इंग्लिशांना दुसरा आणि पोर्तुगालहूनही जबरदस्त असा युरोपियन प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला. तथापि हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या चंद्रनगर येथील वसाहतीचा डुप्ले हा सूत्रचालक होऊन येईपर्यंत जरी इंग्लिश व फ्रेंच कंपनींची उभयतांत निकटची स्पर्धा सुरू होती, तरी तिचा उद्देश व्यापारी वर्चस्व मिळविण्यापलीकडे गेलेला नव्हता. परंतु त्यानंतर मात्र तिला सशस्त्र प्रतिकाराचें स्वरूप आलें;--युरोपांतील लष्करी शिक्षण मिळालेल्या युरोपियन सैन्यापुढें हिंदुस्थानांतील अव्यवस्थित बाजरबुणग्या सैन्याचा निभाव लागत नाहीं, ही गोष्ट अनुभवास आल्यानें युरोपियन शस्त्रास्त्रें, शिस्त आणि शिक्षण, यांचें महत्त्व वाढलें; कवायती खड्या सैन्याला किती परिणामावह कामगिरी बजावतां येते, याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला; आणि एतद्देशीय सैन्यालाही युरोपियन सैन्यासारखें शिक्षण देऊन तयार व तरबेज करतां येतें, व तें युरोपियन सैन्याच्या तोडीचें बनूं शकतें, असा “ नवा शोध ” लागला.

इंग्लंडच्या आरमाराचें मूर्तिमंत अस्तित्व बिनधोकपणें प्रस्थापित झाल्यामुळें आणि उलट पक्षीं फ्रान्सचे समुद्रावरील दळणवळणाचे मार्गही

सुरक्षित न राहिल्यामुळें हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या व्यापाराला ज्याप्रमाणें तेजी आली, त्याचप्रमाणें स्वदेशांतून नेहमीं ताज्या दमाची कुमक आणणें शक्य असल्यानें त्यांच्या शक्तींतही नेहमीं भर पडत गेली. आरमारी सत्ता, व्यापारी संपत्ति व लढाऊ साधनें, ह्या तीन महत्त्वाच्या बाबती इंग्लंडला सुसाध्य असल्यानें ब्रिटिश लोकांच्या प्रत्येक अंगीकृत प्रयत्नास यश येत गेलें. इंग्लंड आणि फ्रान्स यांचेमधील स्पर्धा पोर्तुगाल किंवा डच लोकांपेक्षां डुप्लेच्या कारकीर्दीपासून निराळ्या प्रकारची बनली. " फ्रान्सच्या ह्या बुद्धिमान पुरुषानें " एक नवा मार्ग प्रचारांत आणला, आणि राष्ट्रसंस्थापनेचें कार्य अंगावर घेतलें; पण त्याच्या अंगांत धमक व करामत असूनही साह्य, साधनें व संपत्ति, यांच्या अभावीं त्याच्या कोणत्याही प्रयत्नास यश आलें नाहीं. राष्ट्रसंस्थापना, अगर राष्ट्रीयमहत्त्वप्रस्थापना, ह्यासारख्या अचाट गोष्टी साध्य होण्याला नुसता बुद्धिवान पुरुष असून भागत नाहीं, तर इष्टसाध्यतेप्रीत्यर्थ अवश्य असणाऱ्या गोष्टींचा मुबलक पुरवठाही हातीं असावा लागतो. आणि अशी अनुकूल परिस्थिति असेल, तरच तशा पुरुषाच्या डोक्यांतून निघालेल्या अचाट कल्पनांना मूर्त स्वरूप येण्याचा संभव असतो, आणि तें बऱ्याच प्रसंगीं येतेंही. " दिग्विजय मिळविण्यास निघालेल्या एखाद्या राष्ट्रावर आपलें वर्चस्व पूर्णपणें प्रस्थापित करणें, ही एकट्याच एखाद्या व्यक्तीस अत्यंत अशक्य असलेल्या गोष्टींपैकींच एक गोष्ट आहे," हें इतिहासांतील अनेक उदाहरणांवरून आजपर्यंत पुष्कळदां सिद्ध झालेलें आहे. शिवाय, अरनोल्ड यानें आपल्या रोमच्या इतिहासांतही असें लिहिलें आहे कीं, "जगाच्या इतिहासांत दोन बलाढ्य आणि संपन्न राष्ट्रांबरोबर दोन अत्युच्च बुद्धिवैभवाच्या व्यक्तींनीं टक्कर दिली; ह्या दोन व्यक्ति म्हणजे हानिबाल आणि नेपोलियन ह्या होत; हानिबाल सतत सतरा वर्षें रोमन राष्ट्राबरोबर झगडत होता, आणि नेपोलियन हा सतत सोळा वर्षें ब्रिटनच्या राष्ट्राबरोबर झगडत होता; परंतु अखेरीस पहिल्याच्या

प्रयत्नाचा शेवट झामा येथें व दुसऱ्याच्या प्रयत्नाचा शेवट वाटर्लू येथें झाला." --त्याचप्रमाणें आणखी असेंही ह्मणतां येईल कीं, डुप्ले हीही एक वरीलसारखीच अचाट बुद्धिवैभवाची व कर्तबगारीची व्यक्ति असून तिचा शेवटही त्यांच्याप्रमाणें व तशाच प्रकारच्या कारणांनीं दुःखद झालेला आहे.

ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रानें साध्य करून घेतलेली सागरी सत्ता ही जरी त्यांचें साम्राज्य सर्व जगभर पसरविण्याला, व्यापारी वर्चस्व संपादन करून तें कायम ठेवण्याला, आणि ब्रिटिश राष्ट्र संपत्तिमान व सत्ताधीश बनविण्याला, कारणीभूत झाली असली, तरी ब्रिटिश लोकांचें न्यायी व दिलदार आचरण यामुळें त्यांना परिस्थितीचा अत्यंत योग्य असा फायदाही मिळवितां आला आहे. पोर्तुगीज लोकांनीं हिंदुस्थानांत बराच प्रदेश मिळविला; पण राज्यकर्ते अगर सत्ताधारी या नात्यानें त्यांचें त्यांच्या प्रजेशीं असलेलें वर्तन ब्रिटिश लोकांसारखें आदरणीय नव्हतें. आणि धर्मच्छल व मूर्तिपूजकांना बाटवून आपल्या धर्माची दीक्षा घ्यावयास भाग पाडण्या इतक्या थराला पोंचलेली सक्ती, यांमुळें पोर्तुगीज सत्तेविषयीं जनतेमध्यें अप्रियता उत्पन्न झाली; व त्याचे परिणामही त्या सत्तेस भोगावे लागल्याशिवाय राहिले नाहींत. उलट, ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानांत धार्मिक बाबतींत केव्हांही यत्किंचित् सुद्धां सक्ती केलेली नाहीं; इतकेंच नव्हे, तर राणी सरकारच्या लार्ड डर्बी यानें लिहिलेल्या जाहिरनाम्यांतही याबद्दल स्पष्ट हमी असून ब्रिटिश सरकारचें धार्मिक बाबतींतील वर्तन अत्यंत आदरणीय आहे;—आणि ही गोष्टही हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य लोकप्रिय होण्याला जीं कित्येक प्रमुख कारणें झालेलीं आहेत, त्यांपैकींच एक आहे, असें ह्मणण्यास कांहींही हरकत नाहीं.

धार्मिक सहिष्णुत्व व मानसिक औदार्य या दोन बाबतींशिवाय सुव्यवस्थित राज्यपद्धति व संस्थास्वातंत्र्यपद्धति, या गोष्टीही ब्रिटिश राष्ट्रपुरुष बाल्यावस्थेंत असतांना त्याची जोपासना व वाढ करण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत झालेल्या आहेत. डच ईस्ट इंडिया कंपनी आणि त्यांचें सर-

कार यांचा संबंध "शरीर आणि अवयव" ह्यासारख्या एकवटलेल्या एक जीवाचा होता. फ्रेंच कंपनी, व्हाल्टेयरच्या शब्दांतच ह्मणावयाचें ह्मणजे, "निव्वळ आपल्या राष्ट्राच्या नशिबावरच जगत होती." पण ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचें धोरण अगदीं पहिल्यापासूनच निराळें असून सत्ताधाऱ्यांच्या लहरीवर तिचें अस्तित्व अथवा जीवित्व केव्हांही अवलंबून नव्हतें. कंपनीचा सरकारशीं वास्तविक रीत्या कोणताही गुंतागुंतीचा संबंध नसून ती स्वतंत्र होती, आणि त्यामुळेंच तिच्या प्रथमावस्थेंत राजकीय वातावरणांत होणाऱ्या फरकाचे अथवा निरनिराळ्या स्थित्यंतराचे परिणाम तिला फारसे भोंवले नाहींत. फ्रान्सच्या राज्यपद्धतिसंबंधानें ह्मणावयाचें ह्मणजे, तेथील राज्यपद्धति तर खरोखर अत्यंत शोचनीय अशीच होती. चौदाव्या लुईसारखी राक्षसी महत्त्वाकांक्षेची, अनियंत्रित व अप्रतिहत सत्ताधारी व्यक्ति फ्रान्सच्या गादीवर विराजमान झालेली असल्या वेळीं, आजूबाजूस असलेलीं म्याडम दी पंपादूर सारखीं सौंदर्यसंपन्न प्रियपात्रें आणि आवतींभोवतीं असलेले मानशियर लव्हा सारखे युद्धप्रवर्तक व रुधिरप्रिय सूत्रधार, यांनीं घेरलेल्या कुटिलराजनीतिपूर्ण थाटामाटाच्या दरबारांत डोळे दिपविण्यासारखा भपका आणि आपल्या वैभवाच्या भाराखालीं दुर्बल राज्यांना चिरडून टाकणाऱ्या अरेरावी सत्तेचें अवडंबरी प्रदर्शन, ह्याच गोष्टींना अग्रस्थान प्राप्त होणें,—आणि प्रजेच्या सुखाची, समृद्धीची व शांततेची काडी इतकीही दरकार न बाळगतां उलट तिला पिळून काढवेल तितकी संपत्ति काढण्याचे प्रयत्न होणें,— स्वाभाविक असल्यामुळें त्याचे परिणाम राज्यकर्ता व प्रजाजन ह्या उभयतांनाही नडणें ही गोष्ट अगदीं उघड उघड आणि ओघानेंच येत असून त्याप्रमाणें ते नडलेही आहेत. तथापि ग्रेट ब्रिटनच्या युरोपियन शत्रूंपैकीं फ्रान्स हाच त्यांना आजपर्यंत विशेषत: जेथें तेथें नडलेला आहे. हिंदुस्थानांत प्रत्येक ठिकाणीं फ्रेंचांचा उत्साह भग्न झाल्यामुळें—आणि त्यांचा प्रत्येक बेत व प्रयत्न इंग्लिशांनीं हाणून पाडल्यानें झालेल्या नुकसानाच्या व मानहानीच्या क्षोभामुळें—" मलाही

नाहीं तर तुलाही नको " ह्या मानवी संतापाच्या निराशेनेंच निव्वळ उत्पन्न होणाऱ्या—दुसऱ्याचें नुकसान करण्याच्या अथवा करविण्याच्या--प्रवृत्तीमुळें, किंवा फ्रान्सच्याच प्रधानाच्या ह्मणण्याप्रमाणें, "इंग्लंडचा नकशा उतरण्याकरितांच परमेश्वरानें हा प्रसंग योजून आणला असल्यामुळें," त्यांत आपलीही वेळ साधून घेण्याच्या अनावर इच्छेनें फ्रान्सनें उत्तर अमेरिकें-तील वसाहतवाल्यांना गुप्त रीतीनें, परंतु मोठ्या नेटानें, मदत केली; आणि त्यांत त्यांना यश आल्यामुळें त्यांचा निदान मनाला समाधान वाटण्या इतपत तरी डाव साधून वसाहतवाल्यांचें स्वातंत्र्य इंग्लंडला मान्य करावें लागलें बोस्टनच्या बंदरांत वसाहतवाल्यांनीं इंग्लंडचा चहा समु-द्रांत फेंकून दिला, त्या वेळेपासून अमेरिकेंतील वसाहतीविषयक युद्धाचा प्रथमांक सुरू झाला, आणि अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतर तें नाटक संपलेंहि; पण अमेरिकेला केलेली मदत फलद्रूप झाल्यामुळें आनंदाच्या भरांत वसाहतवाल्यांचें राजरोस अभिनंदन करून, व या गोष्टीचें स्मारक ह्मणून न्यूयार्क बेमध्यें किनाऱ्याजवळ बसविलेला १९१ फूट उंचीचा स्वातंत्र्य-सूचक पुतळा आपल्या देशांत मुद्दाम तयार करवून, तो अमेरिकेला नजर करूनसुद्धां फ्रेंचांची कायमची तृप्ति झाली नाहीं, अथवा इंग्लंड-बरोबरील त्यांच्या स्पर्धेंत तिळभरही कमतरता झाली नाहीं; इतकेंच नाहीं, पण त्यानंतर उलट उभयतांमधील स्पर्धा आणि वैर सारखें सुरू असून वाढत्या प्रमाणावर होतें; आणि ट्राफलगार येथील विध्वंसक अपजयानंतरही बेलजममध्यें ब्रसेल्सच्या आग्नेयेस २८ मैलांवर रामिलीस येथें नेपोलियन पालथा घातला गेला, तेव्हांच काय तें तें बंद पडलें, असें ह्मणतां येईल.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासांत, त्यांच्याशीं त्या काळीं ज्या ज्या युरोपियन राष्ट्रांचा संबंध आला, त्या त्या राष्ट्रांची—ह्मणजे स्पेन-पोर्तुगाल, हालंड आणि फ्रान्स, या राष्ट्रांची—तत्कालीन परिस्थिति, त्यांच्या कंपन्यांची स्थापना, व त्यासंबंधाची थोडक्यांत हकीकत, इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या हकीकतीसह या

ठिकाणीं देणें अत्यवश्यक आहे; कारण, त्यामुळें व्यापार, वसाहती, व साम्राज्यस्थापना, या गोष्टींमध्यें इंग्लिशांना ठिकठिकाणीं कसे अडथळे येत गेले, व त्यांना तोंड देऊन त्यांनीं आपलें वर्चस्व कसें स्थापन केलें, वगैरे गोष्टींचें ज्ञान होऊन पुढील इतिहास वाचतांनाही अंशतः मदत होईल.

आशिया आणि युरोप या दोन्हीही खंडांत रशियाचें साम्राज्य पसरलेलें असून पूर्व आणि पश्चिम देशाची एक सळंग साम्राज्यसांखळी जुळविल्याचें श्रेय जसें हल्लींच्या काळीं रशियन राष्ट्रास देण्यांत येतें, तसेंच अज्ञात प्रदेशाचा शोध लावण्यांत पूर्व काळीं दाखविलेल्या अपूर्व साहसाबद्दल स्पेन-पोर्तुगालच्या राष्ट्रासही श्रेय देणें अवश्यक आहे. कोलंबसाला आपल्या जन्मभूमींत आश्रय न मिळाल्यामुळें तो प्रथम पोर्तुगालच्या व नंतर स्पेनच्या राजदरबारीं गेला; तेथील राणी इसाबेला हिच्या मदतीनें नवीन देशांचा शोध लावण्याला त्यानें दुसरें जलपर्यटण केलें; व 'हिस्पानिओला' चा शोध लाविला. सहावा पोप, अलेक्झांडर राड्रिग्स बोरजिया, यानें अज्ञात व नवीन पिळालेल्या आणि मिळणाऱ्या देशाबद्दल आज्ञापत्र काढलें. याचे पूर्वी इ. सन १४५४ मध्यें पांचव्या निकोलस पोपनें "आफ्रिकेच्या दक्षिणेकडील प्रदेशावर पोर्तुगालची मालकी आहे" असें आज्ञापत्र काढलें असल्यामुळें या वेळीं स्पेनच्या राणीनें आपल्या तर्फे आज्ञापत्र काढण्याबद्दल पोपला विनंति केली; त्यावरून एका आज्ञापत्राअन्वयें "स्पेनला मागें झालेले व पुढें होणारे पश्चिमेकडील शोध लागलेले व लागणाऱ्या देशांची मालकी" देण्यांत आली, व दुसऱ्या आज्ञापत्राअन्वयें शोधलेल्या आणि शोधल्या जाणाऱ्या देशांची ओझर्स व केप व्हर्ड ह्या बेटांच्या पश्चिमेस शंभर लीग (३५० मैल) वर एक दक्षिणोत्तर रेषा आंखून त्याचे पश्चिमेकडील भाग स्पेनला व पूर्वेकडील भाग पोर्तुगालला, अशी वांटणी केली (१४९३). कोलंबसाप्रमाणेंच बार्थोलोमोडिआझ यानें इ. सन १४८६ च्या आगस्टमध्यें लिसबनहून निघून केप ऑफ गुड होपला वळसा घातला, व १४८७च्या डिजेंबरमध्यें तो परत आला; आणि त्यानें "हिंदीमहासागरा-

कडे जाण्याला समुद्रांतून मार्ग आहे," असें सिद्ध केलें. इ. सन १४९२ मध्यें कोलंबसानें वेस्ट इंडीज बेटाचा शोध लावल्यानंतर स्पेन आणि पोर्तुगाल यांच्यामध्यें नवीन देशांचे शोध करण्याकरितां पृथ्वीची विभागणी 'टारडेसलाज' च्या तहाअन्वयें ता. ७ जून इ. सन १४९४ रोजीं करण्यांत आली, आणि त्यामुळें ता. ४ मे १४९३ रोजीं पोप अलेक्झांडर यानें काढलेल्या आज्ञापत्राप्रमाणें झालेल्या विभागणींत थोडासा फरक झाला;—ह्मणजे केप व्हर्डच्या पश्चिमेला ३१०लीगवर उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंतच्या कल्पिलेल्या रेषेच्या पूर्वेकडील शोध लागलेले व पुढें लागणारे खितीधर्मेतर देश पोर्तुगालला मिळाले, व पश्चिमेकडील स्पेन देशास मिळाले. त्यानंतर इ. सन १४९५ मध्यें पोर्तुगालचा राजा, जान, हा मृत्यु पावल्यामुळें त्याच्या जागीं त्याचा मुलगा इमान्युअल हा गादीवर बसला, आणि याच्याच कारकीर्दींत वास्को दि गामा व त्याचा भाऊ, पोलो दि गामा, हे दोघे बरोबर अजमासें २०० माणसें घेऊन तीन गलबतांसह ता. ८ जुलई.१४९७ रोजीं लिसबन येथून निघाले, आणि इ. सन १४९८ च्या आगष्ट महिन्याच्या २५ व्या तारखेस कालीकोट बंदरांत येऊन पोंचले. हीच पोर्तुगीज लोकांची—ह्मणजे युरोपियन लोकांची—हिंदुस्थानांत मलबार किनाऱ्यावर पहिली सफर होय. त्यानंतर पोर्तुगालच्या व्यापाराला व आरमारी सत्तेला पुष्कळ तेजी आली. परंतु तेथील राजा हेनरी मृत्यू पावल्यावर (इ. सन १५८०) स्पेनचा एक भाग ह्मणून पोर्तुगाल देश स्पेन देशास दुसऱ्या फिलिपच्या कारकीर्दींत जोडला गेला; त्यामुळें, आणि विशेषतः डच व इंग्लिश लोकांच्या प्रतिस्पर्धेपुढें त्यांचा टिकाव न लागल्यामुळें, पोर्तुगाल नामशेष झालें; व इ. सन १६०६ मध्यें तर खुद्द लिसबनशहरावरही डच लोकांनीं तोफांचा मारा केला होता. तथापि पोर्तुगालच्या सद्दीचा जोर असतांना त्याच्या ताब्यांत जगांत त्या वेळीं खालील प्रदेश होता:—आफ्रिकेच्या किनाऱ्यावर सोफला, मोंबासा, मोझंबीक्यू, हे किल्ले आणि सोकोत्राचीं बेटें, अरेबियांत मस्कत, इराणांत ओर्मझ, मकराण-

मध्यें ग्यूडेल येथें एक किल्ला अथवा वखार, हिंदुस्थानच्या पूर्वेकडील देशांत मलाका आणि म्याक्यो हीं दोन तटबंदीचीं शहरें, शिवाय तिडोर, अंबोयना, मनीला, आणि पूर्वेकडील बेटांपैकीं कांहीं इतर ठाणीं—शिवाय इतर ठिकाणीं कांहीं वखारी—व हिंदुस्थानांत गोवा आणि आसपासचा प्रदेश, वसई, मुंबई व दमण, गुजराथेंत दीवचा मजबूत किल्ला व बेट, शिवाय डहाणू, सेंट जान्स, वसईचा प्रदेश व गोवा याचे दरम्यान चौल, गोव्याचे दक्षिणेस ओन्नार, बर्सिलोर, मंगलोर, कान्नोर, कोचीन व किलोन (कोलम) येथील किल्ले, आणि कारोमांडल किनाऱ्यावर नागापट्टण, मेलियापूर (सेंट थामे) आणि पुढें उत्तरेकडे मच्छलीपट्टण.

परंतु युरोपियन राष्ट्रांच्या परस्पर वैरांत पोर्तुगालची सत्ता नामशेष झाली; हिंदीमहासागरांतील त्यांचें वर्चस्व नामशेष झालें; आणि हिंदुस्थानांत तर इतका प्रदेश त्यांच्या ताब्यांत असूनही शेवटीं दीव, दमण, आणि गोवें, ऐवढींच काय तीं फक्त तीन ठाणीं त्यांच्या ताब्यांत राहिलीं. तथापि तुर्कस्थानचा सुलतान, सुलेमान, याची सत्ता वाढत्या प्रमाणावर असतांना हिंदीमहासागरांतील पोर्तुगालचें वर्चस्व नष्ट करण्याचे त्यानें केलेले सर्व प्रयत्न पोर्तुगीज लोकांनीं हाणून पाडून ख्रिस्ती राष्ट्रांना पूर्वेकडे राज्यविस्तार करण्यांत असणारा अडथळा अथवा धोका नाहींसा करून टाकला, ही गोष्टही अत्यंत महत्त्वाची असून तिच्यामुळेंच आशियांत युरोपियन राष्ट्रांचा प्रवेश होणें सुगम झालेलें आहे, असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

डच लोकसत्तात्मक राज्य आणि त्यांची कंपनी, याविषयीं अगदीं थोडक्यांत माहिती द्यावयाची ह्मणजे, तो देश स्पेनचा राजा, दुसरा फिलिप, याच्या ताब्यांत असतांना इ. सन १५७७ च्या जानेवारीमध्यें 'यूनियन ऑफ ब्रूसेल्स' या नांवाचा एक संघ तयार झाला, आणि ता १२ फेब्रुवारी रोजीं डॉड जान ह्यानें 'परपेच्युअल ईडिक्ट' वर सही केली. डच लोकांनीं आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याची धडपड करण्यास प्रारंभ केल्यामुळें फिलिप राजास काळजी उत्पन्न झाली, आणि त्यानें डचेस

ऑफ पारमाई हिचा मुलगा, अलेक्झांडर फरनासी, याचेबरोबर वीस हजार कसलेलें सैन्य देऊन त्याला आपला काका, डॉन जान, याच्या मदतीस पाठविलें; त्यानंतर ता. ३१ जानेवारी १५७८ रोजीं नामूरजवळ ग्यांब्लार्स येथें उभयतांच्या सैन्यामध्यें पहिली चकमक उडाली; ह्याच वेळीं ड्यूक आफ अंजू यानें "नेदरलंडचा स्वातंत्र्यसंरक्षक" ही पदवी धारण करून कोणी सर्व संयुक्त प्रांत मिळून जर दहा हजार पायदळ सैन्य व दोन हजार घोडेस्वार जमवील, तर आपणही तितकेंच आणखी सैन्य तयार करून नेदरलंडच्या नशिबाचा फांसा टाकूं, असें जाहीर केलें; ह्याच वेळीं जान काश्मीर राणी इलिजाबेथ आणि हेनरी ऑफ नॅव्हारो, यांच्याशीं चाललेल्या सलोख्याच्या व दोस्तीच्या वाटाघाटींना यश येऊन या राष्ट्रीय कृत्याला त्यांची मदत मिळाली; आणि इ. सन १५७९ पासून नेदरलंडचे उत्तर व दक्षिण नेदरलंड असे दोन भाग झाले. तथापि पूर्वी हालंड व बेलजम मिळूनच्या प्रांतास नेदरलंड ह्मणत असत. दक्षिणेकडील स्वतंत्र भाग नेपोलियनच्या वेळेपासून स्पेनच्या सत्तेखालीं होता. परंतु वाटर्ल्ट येथील लढाईनंतर (ता. १८ जून १८१५) हालंड आणि बेलजम हें एक राज्य करण्यांत आलें. परंतु दोन्ही मिळूनची एकत्र शांततेनें व्यवस्था न राहूं लागल्यामुळें बेल्जियन लोकांनीं इ. सन १८३१ मध्यें सेक्सकोबर्गचा लिओपोल्ड याच्या धुरीणत्वाखालीं आपलें स्वतंत्र्य राज्य स्थापन केलें.

इ. सन १४९४ ते १४९६ ह्या तीन वर्षांत विल्यम ब्यारेट ह्या नांवाच्या मनुष्यानें आशिया खंडांतील समुद्रांत येण्याचे उत्तरेच्या बाजूनें तीन प्रयत्न केले; परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. कार्नेलियस हौटमन ह्या नांवाच्या एका डच व्यापाऱ्याच्या धुरीणत्वाखालीं हालंडमधून पहिली मोहीम चार गलबतांसह केप ऑफ गुड होपच्या रस्त्यानें येण्याला ता. २ एप्रिल १५९५ मध्यें निघाली;—मिस्तर जान एच. लिन्सकाटेन ह्या नांवाचा एक मनुष्य पूर्वी गोवें येथें येऊन अजमासें तेरा वर्षें

राहिला असून त्यानें युरोपांत परत गेल्यावर भूगोलविषयक व व्यापारी माहितीचें एक पुस्तक तयार केलेलें होतें; तें हिंदुस्थानासंबंधींच्या माहिती-बाबत उपयुक्त असल्यामुळें त्याच्याबरोबर देण्यांत आलें होतें;---आणि हिंदुस्थानांत येऊन इ. सन १५९७ च्या प्रारंभींच्या सुमारास परत फिरली; व इ. सन १६०१ पर्यंत डच लोकांनीं पूर्वेकडेस एकंदर पंधरा सफरी केल्या, आणि आपलें व्यापारी वर्चस्व परमावधीस पोंचविलें. डच लोक भरभराटींत असतांना त्यांनीं खालील ठिकाणीं आपलें महत्त्व स्थापन करून हुकमतही चालविलेली आहे.

अंबोयना, जावा, जकात्रा, बटेव्हिआ, मोल्यूकस, फोर्मोसा, सिलोन, मलाका व सामुद्रधुनी, केप आफ गुड होप, मलबार किनाऱ्यावर कोलम, कोचीन, कान्नूर आणि क्रांगनूर, मसाल्याचीं बेटें, मलाया द्वीप-कल्प, बंटाम, सुमात्रा; शिवाय बंगाल, कारोमांडल किनारा, सुरत, बंदर अब्बास, आणि सयाम, यांमधील ठाण्यांवर त्यांचा "कामिशनर" रहात असे. या वेळीं कंपनीजवळ १५० व्यापारी जहाजें, ४० लढाऊ जहाजें, आणि दहा हजार सैन्य तयार असून तीं शेंकडा चाळीस टक्क्याप्रमाणें भागाचा भाव देत होतीं. इ. सन १६०८ मध्यें पिटर बोथ हा त्यांचा पहिला गव्हर्नर पूर्वेकडे आला; त्या वेळीं त्याला मुद्दाम "दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या हातीं व्यापार न जाऊं देण्याची पूर्ण खबर-दारी घेण्याबद्दल" बजाविलेलें होतें; परंतु इ. सन १६६९ पासून त्यांच्या अपकर्षास प्रारंभ होऊन इ. सन १६९८ मध्यें तर डच लोकांचें वर्चस्व केवळ नामशेष असेंच होऊन गेलें. तथापि त्यांच्या ताब्यांत हल्लीं जावा, बोर्निओ, सुमात्रा, बांका, सेलबीज, मोलाकस, तिमोर आणि न्यू गिनी, हीं ठिकाणें राहिलीं आहेत;—हिंदुस्थानांत मात्र त्यांच्या ताब्यांत आतां एकही ठिकाण नसून मलबार किनाऱ्यावर डच लोकांच्या वखारी असल्याचीं शेषचिन्हेंच काय तीं आतां दृग्गोचर होत आहेत.

फ्रान्स देशासंबंधानें ह्मणावयाचें ह्मणजे, ज्याच्या राज्यविशारदतेमुळेंच चवदाव्या लुईला नाशकारक लढायांचें सत्र सारखें चालू ठेवितां आलें, त्या बुद्धिवान, मुत्सद्दी व राजकार्यनिपुण, अशा प्रधानाच्या —ह्मणजे कालबर्टच्या—कारकीर्दींत फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचा जन्म झाला. कालबर्ट याची कारकीर्द (जन्म इ. सन १६१९ मृत्यु १६८३) फ्रान्सच्या इतिहासाच्या दृष्टीचें अत्यंत महत्त्वाची गणली गेलेली असून त्याच्याच अमदानींत शेती, कलाकौशल्य व व्यापार, यांना उत्तेजन मिळालेलें आहे. परंतु त्याच्या मतांना एकदम व जोरानें वळण दिलें गेल्यामुळें हिंदुस्थानांतील फ्रेंच कंपनीच्या वर्मी घाव बसला; आणि जरी तिला—पन्नास वर्षांचा व्यापारी कुळमक्ता, पहिल्या दहा वर्षांत सरकारदेण्याची माफी, त्या मुदतींत नुकसान झाल्यास भरपाई होण्याची हमी, कंपनीच्या साठ लक्षांच्या भांडवलाचा पांचवा हिस्सा दिल्याचें अभिवचन,—हीं मिळालेलीं होतीं, तरी त्यामुळें कोणत्याही प्रकारचा उपयोग न होतां उलट तीच मदत या "जग्या" कंपनीच्या नाशास कारणीभूत होऊन बसली. तथापि हिंदुस्थानांत एके काळीं फ्रान्सनें मद्रास इलाख्यांत व निझामच्या आणि शिंद्याच्या दरबारांत आपलें राजकीय वर्चस्व परमावधीस नेलें होतें. परंतु दळणवळणाच्या साधनांचा अभाव, सैन्यसामग्रीचा तुटवडा, आपसांतील दुफळी, अव्यवस्थित व अनियंत्रित राज्यकारभार, सांपत्तिक ओढाताण, व राष्ट्रीय हितसंबंधाची अनास्था, वगैरे कारणांमुळें फ्रान्सचें हिंदुस्थानांतील वर्चस्व नाहींसें होऊन हल्लीं त्यांच्या ताब्यांत चंद्रनगर, माहे, यानान, कारीकल, आणि पांदेचरी, एवढींच काय तीं फक्त पांच ठिकाणें राहिलेलीं आहेत.

ब्रिटिश राष्ट्राच्या इतिहासांत इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीचा काळ (इ. सन १५५८—१६०३) हा पुष्कळ दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असून त्या काळांतच ब्रिटिश राष्ट्रीय व्यापाराची, आरमाराची व वाङ्मयाची संस्मरणीय अशी वाढ झालेली आहे; व्यापार, वसाहती व

विदेशगमन, यांसंबंधीं धाडशी कृत्यें करण्याच्या इच्छेबरोबरच कष्टमय जलपर्यटणें करून लांब लांबच्या देशांत जाऊन आपलें नशीब काढण्याच्या प्रयत्नांनाही याच वेळीं जोराची अशी चेतना मिळालेली आहे; याच राणीच्या कारकीर्दीत एका इंग्लिश मनुष्यानें — ह्मणजे सर फ्रान्सिस ड्रेक यानें —अगदीं पहिल्यानें सर्व जगासभोंवती जलपर्यटण केलें आहे;—हिंदुस्थानाकडे जाण्याच्या जवळच्या मार्गाचा शोध लावण्याकरितां इंग्लिश लोकांनींही पोर्तुगीज लोकांप्रमाणें प्रयत्न केला आहे; इ. सन १४९६ मध्यें सातव्या हेनरीनें जान कॉबेट यास हिंदुस्थानाकडे जाण्याच्या मार्गाचा शोध लावण्याकरितां दोन जहाजांनिशीं जलपर्यटण करण्याचा राजकीय परवाना दिला, आणि त्याप्रमाणें त्यानें जलपर्यटणही केलें. परंतु हिंदुस्थानाकडे जाण्याच्या नव्या मार्गाचा शोध लागण्या ऐवजीं त्यास न्यू फाउंडलंड या बेटाचा शोध लागलेला आहे. —स्पेनच्या आरमाराचा धुव्वा उडविण्यांत आला (१५८८), आणि " ईस्ट इंडीजकडे व्यापार करणारी लंडनमधील व्यापाऱ्यांची कंपनी आणि तिचा गव्हर्नर " या नांवाची मंडळी स्थापन होऊन तिनें राणीपासून परवाना मिळविला, व पूर्वेकडील देशांबरोबर व्यापार सुरू केला. सदरहू इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीविषयीं प्रारंभींचा थोडक्यांत इतिहास असा आहे कीं, इ. सन १५७१ मध्यें आशियाकडील माल तुर्कस्थानच्या किनाऱ्यावरून खुष्कीच्या मार्गानें भूमध्य समुद्रांतून इंग्लंडमध्यें आणण्याकरितां " लीव्हंट कंपनी " स्थापन झाली, आणि तिनें इ. सन १५९९ च्या एप्रिलमध्यें मिल्डन हॉल या नांवाच्या एका मनुष्यास हिंदुस्थानांत पाठविलें. इकडे आल्यावर तो आग्रा येथें जाऊन अकबर बादशहास भेटला, आणि त्यानें आपल्या कंपनीकरितां कांहीं विशिष्ट सवलती मिळविल्या. मध्यंतरीं ता. २२ व ता २४ सप्टेंबर १५९९ रोजीं लंडन येथें फाऊंडर्स हॉलमध्यें लार्ड मेयर, सर स्टीफन सोम, याच्या अध्यक्षतेखालीं एक सभा भरली. तींत लंडनमधील अजमासें शंभर प्रमुख व्यापारी हजर असून हिंदुस्थानांत व्यापार करण्या-

करितां एक व्यापारी कंपनी स्थापन करण्याचें ठरलें, व जागच्या जागीं ३०,००० पौंड रक्कम गोळा झाली, व राणी आणि प्रिव्ही कौंसिल यांचेकडे व्यापाराची सनद मिळविण्याबद्दल खटपट करण्याचें काम सुरू झालें. त्यांनीं पाठविलेल्या विनंतिपत्रांत खालील मजकूर आहे:——

*   *   *   *   *

" डच लोकांनीं ईस्ट इंडीजमध्यें केलेल्या सफरींत त्यांना मिळालेल्या यशानें आपणही तिकडे सफरी कराव्या, असें आह्मांस उत्तेजन मिळालें आहे. डच लोक हे हल्लींही पुन्हां ईस्ट इंडीज बेटांमध्यें सफर करण्याच्या तयारींत असून ते हल्लीं इंग्लंडमध्यें आलेले आहेत. आम्ही सर्व एकत्र झालेल्या व्यापारी मंडळानेंही तसेंच धाडशी जलपर्यटण करण्याचा निश्चय केला असून राणीनें कृपावंत होऊन आह्मांस सनद देण्याची मेहेरबानी करावी."

*   *   *   *   *

शिवाय ता. १० एप्रिल १५९१ रोजीं, ह्मणजे फिच परत आला त्या सुमारास, लंडन येथील टर्की कंपनीमधील साहसी व्यापाऱ्यांनीं क्याप्टन रेमंड याच्या हाताखालीं तीन गलबतें हिंदुस्थानांत येण्यासाठीं प्लेमौथहून हांकारलीं होतीं

ता. ३१ दिजंबर इ. सन १६०० रोजीं इलिझाबेथ राणीनें सनदेवर सही केली; कंपनीनें पांच जहाजें विकत घेतलीं; २४ डायरेक्टर्स व एक गव्हर्नर नेमण्यांत आले; आणि ता. १६ फेब्रुवारी १६०१ रोजीं (जहाजावरील मुख्य अधिकारी) सर जेम्स ल्याकेस्टर, ४०० मनुष्यें, व ३२ कारकून, यांसह लंडनहून जहाजें हांकारण्यांत आलीं. या कंपनीला कांहीं सवलती व हक्क देण्यांत आलेले होते. मागलेनची सामुद्रधुनी आणि केप ऑफ गुड होप यांचे दरम्यान आशियाखंडांतील सर्व भागांत व आफ्रिकेंत कोणत्याही बंदरांत व्यापार करण्याची परवानगी देण्यांत आली होती,

आणि आपल्या कामाकाजाच्या बाबतींत व व्यवस्थेंत नियमन करण्याचाही पूर्ण अधिकार दिलेला होता. शिवाय खुद्द राणीनें इकडील राज्यकर्त्यांना देण्यासाठीं पहिल्या सफरीच्या मुख्यापाशीं एक पत्र दिलें होतें; तें विशेष महत्त्वाचें असल्यानें याखालीं दिलेलें आहे.

फेब्रुवारी १६००.

"परमेश्वरकृपेंकरून इंग्लंड, फ्रान्स व ऐर्लंडची राणी, इलिझाबेथ, हिजकडून............चे थोर व पराक्रमी राज्यकर्ते.........यांस.

सर्वशक्तिमान प्रभूनें आपल्या अपरिमित व अगाध शहाणपणानें व कृपादृष्टीनें ह्या जगांत मनुष्याच्या उपभोगाकरितां अनेक उत्तम वस्तु उत्पन्न करून त्यांची सर्वत्र सुव्यवस्था करून ठेविली आहे. ते जिन्नस कोठेंही व कसेही मूळ पैदा झालेले असले, व कांहीं ह्या देशांत व कांहीं त्या देशांत तयार झालेले असले, तरी ते ह्या प्रभूच्या हुकमानें पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांस पोंचले जावे, व त्याचें अपरिमित औदार्य सर्व जनांस सारखें प्राप्त व्हावें, असा त्या प्रभूचा उद्देश दिसतो. ज्या प्रदेशांत तो जिन्नस पिकेल, तेथच्या लोकांनीं मात्र तो वापरावा, इतर देशांतील लोकांस तो मिळूं नये, असा त्याचा हेतु दिसत नाहीं. एका देशानें दुसऱ्या देशाच्या उपयोगीं पडावें, व एका देशांत जो जिन्नस विपुल पिकतो, त्यानें दुसऱ्या देशाची गरज भागावी, असा ईश्वरी उद्देश असल्यामुळेंच दूरदूरच्या अनक देशांमध्यें व्यापाराची घडामोड चालते, व मालाची देवघेव चालल्यानें त्यांजमध्यें स्नेहभाव व प्रेम वाढत जातें."

"महाराज, ह्या वर सांगितलेल्या हेतूशिवाय आणखी आह्मांस असें समजलें आहे कीं, कोणीही परराष्ट्राचे लोक व्यापाराचा उद्देश मनांत धरून स्नेहभावानें व सौम्य वृत्तीनें आपल्या देशांत गेले असतां आपण त्यांचा उत्तम प्रकारें आदर करितां; यावरून आमच्या कित्येक व्यापाऱ्यांस आपल्या देशांत जाण्याची परवानगी देण्यास आह्मांस उमेद आली

आहे. आपल्या देशांत व्यापारी मालाचा सौदा फार उत्तम होतो, असें इकडे खातीलायक कळल्यावरून जलमार्गाचीं अनेक दुर्धर संकटें सहन करूनही हे व्यापारी तिकडे जात आहेत. तेथें आपल्या लोकांशीं व्यापारी धोरणानें सौदा करावा, ह्मणजे इकडचे जिन्नस त्यांस विकून तिकडचे इकडे विकत आणावे, असा त्यांचा उद्देश आहे. एवढीं संकटें सोसून आपल्या देशांत प्रवेश करण्याची ज्या अर्थी त्यास स्फूर्ति झाली आहे, त्या अर्थीं आपणही त्यांचा योग्य परामर्ष घेतला असतां बोलण्या-चालण्यांत व व्यवहारांत ते चोख व सभ्य आहेत, असें आपणांस दिसून येईल, व ते आपल्या देशांत आल्याबद्दल आपणास वाईट वाटण्याचें कारण राहणार नाहीं. तसेंच त्यांनीं आपल्या गलबतांतून नेलेला इकडचा माल आपणास देण्यांत व आपणाकडचा माल इकडे आणण्यांत एक-मेकांचा निकट सहवास व व्यवहार घडल्यावर त्यांनीं पुनरपि असाच माल घेऊन आपल्या देशांत यावें, असें आपणास वाटेल. आजपर्यंत फक्त स्पॅनिश व पोर्तुगीज व्यापारीच काय ते इकडचा माल आपल्या देशांत नेत आहेत; पण ते लोक व्यापाराच्या कामांत आमच्या व्यापाऱ्यांस व इतर लोकांस नाहक जाच करितात. वास्तविक पाहिलें तर ते आपल्या देशांत व्यापाराच्या उद्देशानें गेले आहेत, असें नाहीं; तिकडच्या सर्व देशाचे मालक व बादशहा आपणच आहों, असें ते लोक समजतात; व तिकडचे सर्व लोक आपल्या केवळ प्रजा आहेत, असें ते इकडे लोकांस सांगत सुटले आहेत, व लिहिण्यांतही ते तसा व्यवहार उघडपणें करीत आहेत."

"आमचे जे लोक केवळ व्यापाराच्या सौम्य उद्देशानें आपल्याकडे आज जात आहेत, त्यांस आपण मेहेरबानी करून आपल्या देशांत येऊं द्याल, व आजच्या ह्या पहिल्या प्रसंगाची ओळख पुढें चालू ठेवून आपल्या व आमच्या प्रजेमध्यें हें व्यापाराचें व स्नेहाचें दळणवळण वृद्धिंगत कराल, अशी आह्मांस आशा आहे. आपली आज्ञा असेल, तर आमचे कांहीं व्यापारी

इकडे परत येऊन पुन्हां इकडचा माल भरून तिकडे नेत तोंपर्यंत बाकीची मंडळी आपल्या कृपाछत्राखालीं तेथेंच राहून तेथची भाषा वगैरे शिकतील, कीं जेणेंकरून एकमेकांचे विचार व रीतरिवाज एकमेकांस कळल्यानें स्नेह वृद्धिंगत होऊन उभयतांचा उद्देश पार पडेल.''

"आपला आमचा स्नेह वृद्धिंगत होऊन दळणवळण वाढावें, यासाठीं उभयतांमध्यें कांहीं करार किंवा ठराव होण्याची जरूरी आहे त्यासाठीं हें पत्र आपणाकडे घेऊन जाणारे इसमास आमच्या तर्फे बोलण्यास व ठराव करण्यास आह्मी संपूर्ण अधिकार दिला आहे. ते गृहस्थ आपल्याशीं जे ठराव करतील, ते आह्मी इमानानें पाळूं, व आपण आमच्या ह्या लोकांवर जी मेहेरबानी किंवा उपकार कराल, त्यांची फेड आह्मी मोठ्या आनंदानें करूं. अखेरीस एवढेंच मागणें आहे कीं, आमचा हा उद्देश आपणास पसंत पडल्याचें निदर्शक ह्मणून आपला या पत्राचा जबाब गेलेल्या मंडळीजवळ द्यावा. आपण जबाब पाठविल्यानें आमच्यावर मोठी मेहेरबानी होईल, व आम्हांस अतिशय संतोष वाटेल.''

त्यानंतर इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला, आणि साम्राज्याची हल्लीं असणारी टोलेजंग इमारत क्रमाक्रमानें उभारली गेली; युरोपियन पद्धतीनें शिकविलेल्या कवायती सैन्याच्या मदतीनें डुप्ले यानें कर्नाटकच्या नबाबाच्या बिनशिकलेल्या व बिनशिस्तीच्या सैन्याचा हिंमतीनें एका आणि पहिल्याच खटक्यासरशीं धुव्वा उडविल्यानंतर—आणि पुढें फ्रेंचांनीं पाठबळ दिलेले मुजफरजंग व चंदासाहेब यांचे विरुद्ध नासिरजंग व महमद अल्ली यांना अनुक्रमें हैद्राबादच्या निझामाची व कर्नाटकच्या नबाबाची गादी मिळवून देण्यांत मदत करण्याचें इंग्लिशांनीं आपल्या अंगावर घेतल्यानंतर—फ्रान्स आणि इंग्लंड या दोन युरोपियन राष्ट्रांमधील हिंदुस्थानांतील उग्र व चिवट राजकीय प्रतिस्पर्धेला खरा रंग आला; व उभयतां कंपन्यांची वाढती शक्ति, हिंदुस्थानांतील राज्यांचा कमकुवतपणा, परस्परांमधील परमावधीस

पोंचलेली स्पर्धा, आणि उभयतां राष्ट्रांची युरोपांतील चालू असलेली कडाक्याची चुरस, यांमुळें व्यापारी प्रतिस्पर्धेचें–राजकीय वर्चस्व मिळविण्याकरितां कराव्या लागणाऱ्या सशस्त्र लढायांमध्यें–रूपांतर झालें. अशा रीतीनें चाललेली ही प्रतिस्पर्धा हिंदुस्थानच्या भूमीवर राहून राहून सुमारें वीस वर्षेपर्यंत सारखी चालू होती. इ. सन १७८१ मध्यें फ्रेंच लोक शेवटचे हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर आले, त्या वेळीं इंग्लिशांना समुद्रांत पुष्कळ गोष्टी प्रतिकूळ होत्या. युरोपमधील इतर समुद्रतीरस्थ राष्ट्रांबरोबर - फ्रान्स, स्पेन, व हालंड - शिवाय खुद्द इंग्लंडच्या ताब्यांतील अमेरिकेंतील वसाहतींबरोबर, इंग्लंड एकटेंच झगडत होतें. शिवाय, इकडे हिंदुस्थानामध्येंही म्हैसूरचा हैदरअली व दक्षिणेचे मराठे यांचेबरोबरील युद्धप्रसंगांत ते ओढले गेले होते. अशा स्थितींत अत्यंत पराकाष्ठा करूनही फ्रान्सला हिंदुस्थानांत आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करतां आलें नाहीं, आणि फ्रान्सविरुद्ध प्रत्येक ठिकाणीं सरशी करून इंग्लंडनें आपलें ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानांत स्थापन केलें आहे.

वरील एकंदर विवेचनावरून युरोपियन राष्ट्रांच्या तत्कालीन परिस्थितीची आणि अंतःस्थ व बाह्य राजकारणाची वाचकांस बरीच माहिती होईल, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

आशिया खंडांतील पूर्वकालीन राजकीय स्थितीसंबंधीं प्रस्तुतच्य पुस्तकांत बरीच हकीकत आलेली असल्यानें त्या हकीकतीस उपांग ह्मणून त्या खंडांतील त्या काळच्या परिस्थितीसंबंधीं थोडीशी हकीकत देणें अवश्यक आहे.

आशिया खंडांतील पूर्वकालीन परिस्थितीकडे पाहिलें, तर त्या वेळचीं राज्यें हीं निव्वळ राजकीय प्रवृत्तिबद्ध असून "बळी तो कान पिळी" अशी स्थिति होती. " ज्यांचा राजगादीवर उत्तम हक्क ह्मणजे तीं लुबाडून घेण्याची आणि ताब्यांत ठेवण्याची अंगांत असलेली धमक हाच होता, ज्यांचें जीवित्व आणि त्यांच्या राज्याचें अस्तित्व हीं निव्वळ एखाद्या

लढाईच्या परिणामावरच नेहमीं अवलंबून असत, कांहींही हक्क नसतांना मनगटाच्या जोरावर दुसऱ्याचें राज्य स्वतःच्या वशाखालीं उतरवूं पहाणारे कर्तबगार लोक, कायदेशीर हक्कदार असूनही अंगांत करामत नसलेले वारसदार, थोडासा मुलूख अंगाखालीं दाबून बसलेले लष्करी पुढारी, कांहीं हजार घोडेस्वारांचे मराठे शिलेदार, अगर अफगाण जातीचे धाडशी सेनानायक, आणि आपलीं राज्यें वंशपरंपरेनें प्रतिष्ठापित करण्याचा प्रयत्न करीत असलेले प्रांतानिहाय सुभेदार, " अशा लोकांचा हिंदुस्थानभर बुजबुजाट झाला होता. त्यामुळें कोणत्याही राज्यकर्त्याच्या ताब्यांतील प्रजा एकाच जातीची, वर्णाची अथवा भाषेची असणें केव्हांही फारसें शक्य अथवा संभवनीय नव्हतें. राज्यकर्ते बंधरहित असून त्यांची सत्ता अमर्याद असे. त्यामुळें सुराज्यघटनेचा अभाव असून स्वतःकरितां मिळविलेलें राज्य टिकविण्याची, आणि तसा प्रयत्न करूनही तें टिकेल कीं नाहीं याबद्दलची, अशाश्वती असल्यानें प्रजापालन व प्रजासुखसमृद्धि ह्या महत्त्वाच्या अंतर्गत बाबतींकडे पाहण्याची राज्यकर्त्यांना बहुधा प्रवृत्तिच होत नसे. आणि कदाचित् एखाद्यास झाल्यास त्यास त्या बाबतींत मन घालण्याला अवसरही सांपडत नसे. राज्यकर्त्यांचा राज्याशीं, ह्मणजे त्यांच्या प्रजेशीं, फक्त सरकारसाऱ्यापुरताच संबंध असल्यामुळें तो वसूल होतो कीं नाहीं, एवढ्याबद्दलच काय ती त्यांना काळजी वाटत असे. उलट पक्षीं " ठराविक सरकारदेणें दिलें ह्मणजे झालें," अशी प्रजेची भावना असल्यानें राज्यक्रांतीच्या अदलाबदलीबद्दल प्रजेस महत्त्व वाटत नसे; इतकेंच नाहीं, पण राज्यकर्त्यांत बदल झाला, ही जाणीव—नव्या राज्यकर्त्याला धर्मवेड अथवा जुलूम यासारख्या त्याच्या प्रवृत्तीमुळें ठराविक सरकारदेण्यापेक्षां अधिक रक्कम द्यावी लागली, तरच—होत असे. युरोप खंडांतील सरदारी अगर संस्थानिक राज्यपद्धतीप्रमाणेंच या काळीं हिंदुस्थानांत वतनदारीपद्धति व अशोक, चंद्रगुप्त वगैरे राज्यकर्त्यांच्या वेळेपासून सुरू असलेली ग्रामपंचायतपद्धति, ह्या जोरांत आल्या; आणि

स्थानिक वसुलीचीं गांवकामगारांचीं कामें इनामदार वर्गाकडून, आणि स्थानिक कारभाराचीं कामें गांवपंचायतीकडून, होत असल्यामुळें, जबाबदारीबरोबर उभयतां संस्थांचें महत्त्वही पुष्कळच वाढलें. परंतु ही व्यवस्था प्रत्येक गांवापुरती निरनिराळी असल्यानें राजकीय ऐक्य अथवा राष्ट्रीय भावना याची नुसती कल्पना होणें सुद्धां संभवनीय नव्हतें. राज्यकर्त्यांना प्रजेच्या मताची अथवा शब्दाची किंमत न वाटण्या इतपत त्यांची सत्ता निर्बंधरहित होती; आणि प्रजेसंबंधीं आपलें कर्तव्य काय आहे, याचीही त्यांना फारशी ओळख नव्हती. उलट पक्षीं प्रजेलाही राष्ट्रीयत्वाची जाणीव नसून त्यामुळें जनतेच्या उन्नतावस्थेला अत्यवश्यक असलेल्या उच्च भावनांचा अभाव होता. मानवजातीच्या उन्नतीला निरनिराळ्या समाजांत पृथक् पृथक् उत्क्रांति होत जावी लागते, आणि समाजाच्या उत्क्रांतीचीं फळें ह्मणजेच समाजाची योग्य संस्कृति होणें होय;—ह्मणजे व्यक्ति, समाज किंवा राष्ट्र उन्नतावस्थेस पोंचण्याच्या पूर्वीं तशी मानसिक तयारी होण्यास अत्यवश्यक असलेली परिस्थिति प्रजेंत उत्पन्न होण्याला राष्ट्रीयत्वाची जाणीव हीच विशेषतः प्रधान गोष्ट आहे. राज्यकर्त्याला प्रजेसंबंधीं आपलें कर्तव्य कळूं लागण्याला शाश्वती आणि संस्कृति, या गोष्टींची अवश्यकता असते परंतु ह्या गोष्टी साध्य होण्याला शांततेचीही तितकीच अवश्यकता असते. आणि शांततेच्या काळाच्या अभावीं इच्छा असूनही राज्यकर्त्याला प्रजेच्या सुखसमृद्धीकडे फारसें लक्ष देतां येणें शक्य नसतें. हिंदुस्थानांत मराठे अथवा मोंगल राज्यकर्त्यांच्या मानानें ब्रिटिश अमलाखालीं मानवजातिसमूहाची प्रत्येक बाजूनें जी सुधारणा झाली आहे, त्याला त्या सरकारची आपल्या प्रजेसंबंधीची खरी कळकळ, स्वयंस्फूर्तिजन्य औदार्य, आणि स्वकर्तव्यनिष्ठा, हीं जरी कारणें असलीं, तरी मुख्यतः " शांततेच्या काळाचा लाभ " हेंच प्रधान कारण आहे,—आणि तशी शांतता प्रस्थापित करण्याकरितां त्यांनीं सतत आणि मनापासून अत्यंत नेटानें प्रयत्न केले असल्यामुळेंच तो लाभ झालेला आहे,—असें ह्मणण्यास कांहींही हरकत नाहीं.

एकाच जातीचे अथवा एकाच समाजाचे लोक भिन्न भिन्न राजकीय परिस्थितींत व निरनिराळ्या शासनपद्धतींखालीं असल्यास त्यांच्या आचारविचारांत, व्यवहार-वागणुकींत आणि मतमतांतरांत एक विशिष्टत्व राहणें शक्य नसल्यामुळें संस्कृतीच्या उत्क्रांतींत राष्ट्रघटनेच्या बाबतीमध्येंही त्या त्या समाजांत कमी अधिक प्रमाणानें भिन्नत्व असणें स्वाभाविक रीत्याच अपरिहार्य आहे. कोणत्याही जातीचें, समाजाचें अथवा राष्ट्राचें अस्तित्व कायम राहण्यास त्यांची संघटित शक्ति नेहमी जिवंत रहावी लागते, आणि ती तशी जिवंत राहण्यास सुव्यवस्थित राज्यघटना अत्यवश्यक असते. सुसंबद्ध राष्ट्रघटना आणि सनदशीर राज्यव्यवस्था ह्यांमुळें ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रीय तेजाची वाढ होत गेली, आणि तें "दिग्विजयी राष्ट्र" बनून त्याचे ताब्यांतील प्रदेशाचा विस्तारही झपाट्यानें होत गेला. तथापि प्रदेशाचा विस्तार आणि त्यांत ब्रिटिश लोकांनीं केलेल्या वसाहती, यांमुळें त्यांचें मातृभूमीबरोबरील दळणवळण बंद झालें नाहीं; इतकेंच नव्हे, तर इंग्लंडमधील केंद्रस्थानीं असलेल्या सत्तेच्या सूत्रचालकत्वाखालींच तेथील राष्ट्रघटना व राज्यव्यवस्थाही अद्यापपर्यंत चालू आहे. मराठा साम्राज्यांत केंद्रस्थानची सत्ता पहिल्यानें सातारा व नंतर पुणें येथें आली; मध्यंतरीं शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, वगैरे मराठा सरदारांनीं जरी आपापले "सवते सुभे" निर्माण केले, तरी जोंपर्यंत मुख्य केंद्रस्थानीं असलेल्या सत्तेच्या अनुरोधनानें, ह्मणजे एक मतानें, राष्ट्रीय कार्यसिद्धीचे प्रयत्न होत होते, तोंपर्यंत मराठी साम्राज्याची संघशक्ति जिवंत प्रतिकार करण्याइतकी सतेज होती. परंतु साम्राज्याचा प्रत्येक आधार-अवयव वेगळा होऊन "जुटीचें बळ" फुटल्यानें एकराष्ट्रीयत्वाची भावना नाहींशी होऊन मराठा साम्राज्य नामशेष झालें. ग्रेटब्रिटनचें साम्राज्य आणि त्याच्या ताब्यांतील वसाहती यांचा संबंध " आई आणि मुलें " असा निकटचा असून त्या योगानें एकराष्ट्रीयत्वाची भावना नेहमीं जिवंत असल्यामुळें——आणि वसाहतीं-

तील स्वातंत्र्य उपभोगीत असतांनाही मातृभूमीसंबंधाचें कर्तव्य, प्रेम आणि ओढा, यांची ओळख नेहमीं ताजी रहात असल्यामुळें—परस्पर एकमेकांच्या सुखदुःखाचे नेहमीं तत्परतेनें वांटेकरी असतात; परस्परांच्या हिताहिताची उभयतांना जाणीव असते; आणि इष्टसाध्यतेप्रीत्यर्थ होणारे प्रयत्न एक जुटीनें होत असल्यामुळें " जुटीच्या बळाचे फायदे" ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रास नेहमीं मिळत राहतात. तथापि एकराष्ट्रीयत्वाची भावना ही एक जात, एक देश, अथवा एक वर्ण असला, तरच फक्त उत्पन्न होते, असें मात्र बिलकूल ह्मणतां यावयाचें नाहीं; इतकेंच नाहीं, पण समजातीय, समवर्णाच्या, एकधर्मीय अथवा एकाच राष्ट्रांतील लोकांमध्यें कित्येक वेळां राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव असल्याचें आढळून येतें. आणि त्याचप्रमाणें उलट पक्षीं भिन्न जात, भिन्न वर्ण, भिन्न धर्म, अथवा भिन्न राष्ट्र असूनही एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत राहिल्याचें आढळून येतें. परंतु अशी भावना उत्पन्न होण्यास अथवा नष्ट पावण्यास राजकीय परिस्थिति कारणीभूत होते; आणि हिंदुस्थानच्या उदाहरणावरून आपणास असेंही ह्मणतां येईल कीं, राज्यकर्ते जरी भिन्न देशाचे, धर्माचे व वर्णाचे आहेत, तरी स्वकर्तव्यनिष्ठेची चाड व ताब्यांतील प्रदेशांतील प्रजेच्या सुखसमृद्धिविषयींची काळजी, यांमुळें उदार अंतःकरणानें प्रजेला दिलेल्या विद्यादानानें मानसिक संस्कृति होऊन त्या योगानें एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होऊन वाढीस लागलेली आहे. हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्य स्थापन झाल्यानंतर ब्रिटिश लोकांची न्यायी व उदार राज्यपद्धति, त्यांची सनदशीर राज्यघटना व सरळ व्यवहार, वगैरे अनेक सद्गुणांमुळें जसजसा सहवास वाढत गेला, तसतसें " ब्रिटिश सरकार हें आपलेंच सरकार आहे, " अशी भावना वाढत गेली;—आणि अगदीं थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे, ज्या सांप्रतच्या महायुद्धांत ग्रेट ब्रिटननें न्यायानें भाग घेतला आहे, त्यांत आपल्या साम्राज्य सरकाराला विजयश्रीनें माळ घालावी, ह्मणून सर्व हिंदुस्थान देश राजनिष्ठा व राजप्रेम यांनीं प्रेरित होऊन शरी-

रानें, मनानें, व धनानें मदत करीत आहे---केली आहे--आणि पुढेंही तो नेहमीं अशीच आनंदानें व तत्परतेनें मदत करीत राहील, अशी आह्मां सर्वांची व साम्राज्यसरकारचीही खात्री आहे.

तथापि भिन्न भिन्न जातीचे अथवा समाजाचे लोक एकाच राजकीय परिस्थितींत असल्यास त्यांच्या हितसंबंधांत कित्येक वेळीं परस्पर विरोध उत्पन्न होतो, आणि अशा वेळीं सरकारला कोणत्याही विवक्षितजातीचें अथवा समाजाचें मन मुद्दाम न दुखविण्याची अथवा कोणत्याही एखाद्या विवक्षित जातीला किंवा समाजाला मुद्दाम विशिष्ट हक्क न देण्याची अंतःकरणापासून इच्छा असल्यानें सार्वत्रिक कायदा करणेंही पुष्कळ वेळां अडचणीचें होतें, ह्या गोष्टीचा हिंदुस्थानांत नेहमीं अनुभव येतो. परंतु राज्यकर्त्यांची न्यायी वागणूक आणि सनदशीर व नियंत्रित राज्यकारभार, यांबद्दल जनतेचा विश्वास बसून त्या योगानें उत्पन्न, व क्रमाक्रमानें दृढ, झालेली राजभक्ति, यामुळें अशा अडचणीच्या प्रसंगांतून ब्रिटिश सरकार नेहमीं यशस्वी रीतीनें निभावून बाहेर आलेलें आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा हा काळ ह्मणजे युरोपप्रमाणेंच हिंदुस्थानांतील नव्या किंवा "सुवर्णयुगाचा" काळ होय; ह्या काळांत आशिया खंडाचें, व विशेषतः हिंदुस्थानचें, युरोप खंडाबरोबर जारीनें दळणवळण सुरू झालें; पाश्चात्य संस्कृति, आधिभौतिक ज्ञान व सुधारणा, ह्यांमुळें जनसमाजाच्या आचारविचारांत, व्यवहार—वागणुकींत, न्यायान्यायाच्या, राज्यकर्त्यांचें कर्तव्य व प्रजेचे हक्क, या बाबतींच्या, व्यापारी व सांपत्तिक घडामोडीच्या, आणि देशांतील अंतःस्थ राज्यकारभार, व परदेशांतील राजकारण व बाह्य राजधोरण, ह्यांसंबंधींच्या कल्पनेंत व विचारांत अननुभूत अशी जोराची क्रांति झाली; आणि एका प्रख्यात इंग्लिश लेखकाच्या शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे, "शिवाय एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभीं अशा कित्येक गोष्टी घडल्या कीं, तेणेंकरून युरोपच्या वर्चस्वाबद्दलच्या आशियांतील लोकांच्या कल्पनांत मोठा फरक पडला. निदान तीनशें वर्षांत आशिया

खंडांत राहणाऱ्या लोकांनीं युरोपियन लष्करावर उघड्या मैदानांत मिळविलेला पहिला विजय इ. सन १८९६ सालीं इतालीच्या लोकांस जिंकून अबिसीनियन लोकांनीं संपादन केला. "—अबिसिनियांत इतालीच्या सैन्याचा जो मोड झाला, त्यानें हिंदी लोकांच्या मनावर घडलेल्या परिणामांचा बाबू शरत्कुमार घोष यांनीं "नशिबाचा राजा" या कादंबरींत उल्लेख केलेला असल्याचें दुसऱ्या एका प्रख्यात ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत नमूद केलेलें आहे.—"जमिनीवरीलच नव्हे, तर समुद्रावरच्या लढायांत सुद्धां जपाननें रशियावर जे जय मिळविले, त्यांवरून आशियांत जाऊन सहज जय मिळविण्याचे दिवस गेले, असें स्पष्ट दिसून आलें; कारण, पूर्वीं कधींही आशियाच्या आरमारानें युरोपच्या आरमाराशीं युद्ध करून जय मिळविल्याचें इतिहासांत नमूद नाहीं." वर दर्शविलेल्या व अशा किंवा दुसऱ्या प्रकारच्या अनेक कारणांनीं "हिंदी लोकांच्या मागण्या व्यापक स्वरूपाच्या होणें स्वाभाविक असून आपल्या देशाच्या राज्यव्यवस्थेंत आपलाही वाढता भाग असावा, असें त्यांना वाटूं लागलें आहे, आणि अशा प्रकारच्या प्रवृत्तीमुळें दिवसेंदिवस राज्यकारभार चालविण्याचें कार्यही ओघाओघानेंच अवघड होत चाललेलें आहे."—तथापि राजनीतीचें प्रत्येक उदार तत्त्व ब्रिटिश राज्यकर्ते अमलांत आणण्यास नेहमीं तयार असल्यानें हें कोडेंही लवकरच उलगडलें जाईल, अशी आशा बाळगण्यास जागा आहे.

ग्रेट ब्रिटनचा आपल्या आरमाराप्रीत्यर्थ होणारा खर्च किती मोठा आहे, आणि इतर राष्ट्रांच्या मानानें इंग्लंडच्या आगबोटी, जहाजें वगैरे सर्व जगांतील समुद्रभर किती अधिक प्रमाणानें संचार करीत आहेत, याची खालील त्रोटक हकीकतीवरून कांहींशी कल्पना होईल.

राष्ट्राचें नांव.	आगबोटी.	वाऱ्यानें चालणारीं जहाजें.	एकंदर वजन टन.	शेरा
ब्रिटिश साम्राज्य	९२६१	२१५०	१७६११०९६	
अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें	१४९१	२०९९	४२४१५८९	हे आंकडे इ. सन १९१०–११ या वर्षाचे आहेत.
आस्ट्रिया-हंगेरी	२९६	१६	६३०४७७	
फ्रान्स	७८०	७२८	१७४११९५	
जर्मनी	१६२८	३९९	३८१०३५३	
इताली	३७७	८०४	१२०४४२८	
जपान	७७५	७	१०००९३	
नार्वे	१११४	१०७६	१८३७८७९	
रशिया	६६६	६८९	९१३१३३	
स्पेन	४६१	११८	७२२५१७	
स्वीडन	८६५	६९३	८५६६९८	

ता. ३१ मार्च इ. सन १९१३ रोजीं संपणाऱ्या तेरा वर्षांत ग्रेट ब्रिटननें आरमाराप्रीत्यर्थ ४५,७०,००,००० पौंड (६,८५,५०,००,००० रुपये) खर्च केला; ह्मणजे या तेरा वर्षांत प्रत्येक मनुष्यामागें आरमाराकरितां दहा पौंडाची रक्कम खर्चीं पडलेली आहे. तथापि ह्या बाबतींत एक इंग्लिश लेखक असें लिहितो कीं, " इंग्लंडच्या आरमारी वर्चस्वासाठीं द्यावी लागणारी किंमत फारशी मोठी नाहीं; ब्रिटिश साम्राज्याची एकंदर लोकसंख्या सुमारें ४१,००,००,००० आहे, व त्यापैकीं प्रत्येक मनुष्यास आरमार खर्चासाठीं फक्त दोन शिलिंग, तीन पेन्स, (१ रुपया ११ आणे) द्यावे लागले, आणि ब्रिटिश राज्यसत्तेखालील अस्तित्वांचा उपभोग घेण्यासाठीं द्यावी लागणारी ही रक्कम बेसुमार आहे, असें दिसत नाहीं. "

स्वराज्याच्या हक्काचा पूर्ण उपभोग घेणाऱ्या वसाहती व ब्रिटिश साम्राज्यावर अवलंबून असलेले देश, यांच्यासुद्धां ब्रिटिश साम्राज्यांतील सार्वजनिक कामाचा कमाल खर्च ३५,००,००,००० पौंड (५,२५,००,००,००० रुपये) आहे, आणि त्यांतील आरमारी खर्चाचें प्रमाण दर पौंडास (१५ रुपये) दोन शिलिंग सात पेन्स (१ रुपया १५ आणे) आहे;—ह्मणजे एकंदर खर्चाच्या रकमेचा $\frac{१}{८}$ भाग आरमाराकडे खर्च होत आहे.

क्षेत्रफळाच्या दृष्टीनें आरमारी खर्चाचें प्रमाण पाहिल्यास, ब्रिटिश साम्राज्याचें क्षेत्रफळ १,१५,००,००० चौरस मैल आहे; इ. सन १९१२—१३ सालीं आरमाराचा अंदाजी खर्च ४४,५०,००,००० पौंड (६७,५०,००,००० रुपये) ठरविण्यांत आला होता; यावरून असें दिसून येईल कीं, ''यूनियन जॅक'' चें निशाण फडकणारा प्रत्येक चौरस मैल प्रदेश—तो प्रदेश नेहमीं ब्रिटिश साम्राज्याच्याच ताब्यांत रहावा ह्मणून—चार पौंड रकमेचा एक प्रकारें विमाच उतरलेला आहे.

इ. सन १९१२ सालीं ब्रिटिश साम्राज्याच्या समुद्रावरील व्यापाराची आयात व निर्गत मिळून किंमत २,१०,००,००,००० पौंड (२१,५०,००,००,००० रुपये) होती, व या वर्षांत साम्राज्यांतील सर्व बंदरांत आलेल्या व बंदरांतून बाहेर गेलेल्या आगबोटींचें वजन ३०,००,००,००० टन होतें;आणि या आगबोटींच्या सुरक्षिततेबद्दलच्या हमीसाठीं दर टनामागें तीन शिलिंग (२ रुपये ४ आणे) ग्रेट ब्रिटनला आरमारी खर्च करावा लागला आहे.

ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रानें आपला दीर्घ उद्योग, चिकाटी, आरमारी वर्चस्व, व कर्तबगारी, वगैरे गुणांनीं सर्व जगभर मिळून आपलें केवढें भव्य साम्राज्य स्थापन केलें आहे, आणि ग्रेट ब्रिटनचा सर्व जगभर पसरलेला व्यापार आणि त्याची प्रचंड व जिवंत असलेली अजिंक्य आरमारी सत्ता, यांमुळें तें साम्राज्य अप्रतिहत रीतीनें किती वैभवशाली

बनलेलें आहे, या संबंधीची माहिती थोडक्यांत खालीं दिलेली आहे;— दुसऱ्या शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे, राष्ट्रीय भवितव्यतेचें नियमन करून व राष्ट्रीय वैभव वाढवीत नेऊन आपलें राष्ट्र जगांत पहिल्या प्रतीचें श्रेष्ट, सुधारलेलें व मार्गदर्शक बनविण्याची जबाबदारी असलेल्या कर्त्या पुढाऱ्यांच्या "जुटीच्या बळाला" जगांत रोमन लोकांच्या धर्तीवर साम्राज्याची किती टोलेजंग इमारत उभारतां येते, याची पूर्ण जाणीव होऊन, विशेषतः एवढ्या सर्व जगभर पसरलेल्या अफाट साम्राज्याचा राज्यशकट ब्रिटिश लोकांकडून किती व्यवस्थित व सनदशीर पद्धतीनें हांकला जात आहे, याचें बारीक रीतीनें मनन केल्यास, त्यांच्या शिस्तीच्या राज्यपद्धतीबद्दल कोणासही खरोखर आदर व अभिमान वाटल्याशिवाय रहावयाचा नाहीं.

ब्रिटिश साम्राज्य सर्व जगभर पसरलेलें असून त्याचा विस्तार १,३१,२३,७१२ चौरस मैल आहे, आणि एकंदर लोकवस्ती सुमारें ४३¾ कोटि आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या ताब्यांतील सर्व जगामधील प्रदेश, लोकसंख्या, आणि आयात व निर्गत मालाचा व्यापार, यांचे इ. सन १९१२-१३ सालचे आंकडे, खंडवार, खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

देशाचें नांव.	क्षेत्र फळ चौरस मैल	लोकसंख्या.	आयात मालाची किंमत पौंड.	निर्गत मालाची किंमत पौंड.
ग्रेट ब्रिटन व आयर्लंड	१२१६३३	४६०३५५७७	८४३०६२५५७	६९७२५९१७२
युरोपखंड				
जिब्राल्टर	२	१८४८६	०	०
माल्टा	११८	२१६६१७	२६६१०९६	१०९२५९८
आशियाखंड				
हिंदुस्थान (संस्थानांसुद्धा	१८०२६५७	३१५१५६३९६	१५९२०८७०४	१७५५६९१४५
सैप्रस	३५८४	२८२३८८	७७०३७	७९९४१५
एडन पेरीम सोकोट्रा	१०३८७	५८१६५	४६१०७३९	४५६०६०
सिलोन	२५३३१	४१८९२४६	११३३३१२	१३२६.६६०

स्ट्रेटस सेटलमटस	१६३०	७४०३६२	५२५०४५५१	४३७६५०२०
फयुडेटरी मलाया स्टेटस	२७५०६	११७२५००	८५९६६२९	१८०२२५२८
इतर मलाया स्टेटस	२४६००	९५००००	४४१४६८	३८०२१४
बोर्निओ, सारावाक	७३१०६	७०८०००	१४४६४४७	१६७५६५९
हांगकांग व टेर	४०५	४५६७३९	०	०
वै-है-वै	२८५	१४७११३	०	
आस्ट्रेलिया आणि पासिफिकमधील				
आस्ट्रेलिया	२९७४५८१	४८०२१७४	७३७१२०००	७५११३०००
पापुआ	९०५४०	२७१०००	२१८३२३	१२८०१६
न्यूझीलंड	१०३८६१	११२८१६०	२०९७६५७४	२१७७०५८१
फिजा	७४३५	१४९१७९	९४००४४	१०५८९६०
टोंगा, सालोमन व जिलबर्ट बेटें	१५३५६	२०१०००	४०२५४८	६१३४९५
आफ्रिका खंड				
अॅसेन्शन	३४	४००	०	०
सेंट हेलेना	४७	३५१९	४१७४९	६१५०
उत्तर नायगेरिया	२५६२००	९६१२०००	७९९२७५	९७४२४१
दक्षिण नायगेरिया व प्रॉट	७९८८०	७८६००००	६४३·९०१	६०८९७०६
सेरालियान आणि प्रॉट	३१०००	१४०३१३२	१४२४८६४	१५४०७५४
गोल्ड कोस्ट आणि प्रांट	८००००	१५०३३८९	४०२३३२२	४३०७८०२
गॅंबीयान व प्रांट	४५००	१३८४००	७५६८५३	७३५१७२
मारिशस	८००	३७८४२७	२१७५०८०	२५०७३१०
सिचेलीस	१५६	२३५०७	७८४३४	११७१३६
सोमालीलँड	६८०००	३५७०००	२·९५२९	२२९४४८
ईस्ट आफ्रिका प्रोटेक्टरेट	२४६८२२	४०३८०००	१८०८३४३	१२०३२०१
युगांडा	१२१४३७	२८९३४९४	७७९९४६	४५७०५०
झांझिबार व पेंबा	१०१०	९९७२००	१०३०९९६	१०३६१२७
न्यासालँड	२१३१५	१००००००	१२२३९२	२७४५४३
दक्षिण आफ्रिका यूनियन	४७३१००	६·११९००	३९८४५२१०	६३२७२७४३
ऱ्होडेशिया	४३८५७५	१७५००००	३१८२२८६	३२७८०५४

इ. सन १९११ सालच्या एप्रिल महिन्यांत केलेल्या खानेसुमारी-प्रमाणें ग्रेट ब्रिटनमधील निरनिराळ्या देशांत खालील कोष्टकांत दर्शविल्याप्रमाणें लोकसंख्या होती.

देशाचें नांव.	क्षेत्रफळ चौरस मैल.	लोकसंख्या.
इंग्लंड	५०८७४	३४०४५२९०
वेल्स	७४६६	२०२५२०२
स्काटलंड	३०४०५	४७६०९०४
आयर्लंड	३२५८६	४३९०२१९
आइल ऑफ मॅन	२२७	५२०१६
चानल आयलंडस.	७५	९६८९९

सर्व जगांत ग्रेट ब्रिटनच्या तोडीचें आरमार कोणत्याही राष्ट्राचें नाहीं; ग्रेट ब्रिटनच्या आरमाराची संख्या सर्व राष्ट्रांहून मोठी असून त्याची सागरी सत्ता आणि आरमारी वर्चस्व हें तर सर्व जगाला जाहीरच आहे. तथापि यासंबंधींही वाचकांस थोडीशी विस्तृत प्रमाणानें माहिती व्हावी, ह्मणून खालील हकीकत दिली आहे.

ग्रेट ब्रिटनच्या साम्राज्याचीं निरनिराळ्या सर्व जातींचीं मिळून लढाई-च्या कामास उपयोगी अशीं एकंदर ७२८ जहाजें असून याशिवाय आणखी नवीन व प्रचंड जहाजें बांधण्याचें काम चालू आहे. त्यांपैकीं मोठ्या जहाजांची वर्गवारी खालीं दर्शविल्याप्रमाणें आहे.

खाझ्झाल्यँाड	६५३६	१००००	०	०
बासूटोल्यँाड	११७१६	४ ४५०७	०	०
बॅचुआनालँड	२७५०००	१२५३५०	०	०
अमेरिका खंड				
कानडा	३७२९६६५	७७५८ ००	१४२२५११०३	८०८३१०३४
न्यूफौंडलंड व लाब्राडोर	१६२७३४	२४५१३७	३२९१४३०	३०१६०९४
हंडूरास	८५९८	४१०००	७१८८०९	५८७०९६
ग्वायना	९०२७७	२९९०४४	११०३३५६	१७९८५९७
बर्मूडा	१९	१९१५२	६३७१७८	११६५८६
बाहामा	४४०४	५६३१८	३५८१११	२७६११५
तुर्क व कोको बेटें	१६६	५६१५	२७६६२	१५९४७
जमेका	४२०७	८५५६८२	३०१०४७९	२७०९२८३
कायमन बेटें	८९	५५६०	२८४४४	१३३२३
विंडवार्ड बेटें	६७२	३३४८७२	२१८९८०९	१५१४२३२
लीवार्ड बेटें	७१५	१२७७८४	६४०७२७	७६३३४२
ट्रिनिदाद व टोबागो	१८६८	३४५३९७	४६८२३२५	४४०२५७७
फॉकलंड बेटें	७५००	३२९८	९३२६०	१०५७०००

ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान यांत व त्याशिवाय निरनिराळ्या खंडांत ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार केवढा आहे, याचा आंकडा खालील कोष्टकांत दिलेला आहे.

देशाचें नांव	क्षेत्रफळ चौरस मैल.	लोकसंख्या.	आयात मालाची किंमत पौंड.	निर्गत मालाचा किंमत पौंड
ग्रेट ब्रिटन व आयर्लंड	१२१६३३	४६०३५५७०	८४३०६२५५७	६९७२५९१७२
यूरोप	१२०	२३५०६३	२६६१०९६	१०९२५९८
हिंदुस्थान (संस्थानांसह)	१८०२६५७	३१५११६३१६	१५९२०८७०४	१७७५६९३४५
आशिया (हिंदुस्थानवर्जा)	१६६८३४	८७ ९५३३	८०४५०३०३	८२४४३२२६
अस्ट्रेलिया व पासिफिक बेटें	३१९१७७३	६५५१५१३	१०३२४९४८१	९८६८४०५२
आफ्रिका	२१३५१४७	३७९९०२२२	६२१४९९६७	८५०५४७४२
अमेरिका	४०१०९१४	१००९६८६३	१५९६७२६९७	१६९८०५२८

वर्ग.	तयार.	बांधणें सुरू असलेलीं.
लढाऊ जहाजें (बॅटलशिप)	५५	११
बॅटल क्रूझर	७	३
कवच चढविलेली क्रूझर	३४	०
संरक्षित क्रूझर नंबर १	१७	०
संरक्षित क्रूझर लाइट	८	०
संरक्षित क्रूझर नंबर २	४०	७
संरक्षित क्रूझर नंबर ३	१६	०
साधीं	५	२
स्काऊट	८	०
टार्पेडो जहाजें	२८	१
डिस्ट्रॉयर	१९१	३८
टार्पेडो बोटी	१०९	०
सबमरीन्स	६४	२२
	५८२	८४

याशिवाय समुद्रांत सुरुंग घालणारीं, सुरुंग फोडणारीं, दुरस्तीचीं कामें करणारीं, वगैरे लहान लहान जहाजें पुष्कळ आहेत.

नवीन जहाजें बांधण्याचें काम चालू असलेल्या जहाजांपैकीं क्वीन इलिझाबेथ, बऱ्हाम, व्हॅलियंट व वारस्पाईट, हीं चारी जहाजें २७,५०० टनाचीं असून त्यावर १५ इंची ८ व ६ इंची सोळा तोफा राहतात; यांपैकीं प्रत्येकावर ९०० खलाशी असून या जहाजांची गति २५ (नाट) आहे. या नवीन बांधल्या जाणाऱ्या जहाजांस "सुपरड्रेडनाट" असें नांव देण्यांत आलें असून त्यांचे वर्गास "क्वीन इलिझाबेथ" असें नांव देण्यांत आलें आहे. या जहाजांवरील १५ इंची तोफा १९५० रतलाचा गोळा सोडणाऱ्या घडविल्या आहेत; लढाईस तयार असलेल्या जहाजांपैकीं मुख्य जहाजांची ठोकळ माहिती खालीं दिल्याप्रमाणें आहे.

ड्रेडनाटस्.

नांव.	वजन	तोफा	खलाशी	गति दर तासास नाटस्
आयर्न ड्यूक वर्ग				
आयर्न ड्यूक	२५०००	१३,५ इंची १०+६इंची१६	९००	२२-५
बेनबो	,,	,,	,,	,,
एम्परर ऑफ इंडिया	,,	,,	,,	,,
मार्लबरो	,,	,,	,,	,,
किंग जार्ज दी फिफ्थ वर्ग				
किंग जार्ज दी फिफ्थ	२४०००	१३-५इंची १०+४इंची१६	९००	२१
सेंचुरियन	,,	,,	,,	,,
अजॅक्स	,,	,,	,,	,,
आडोशिअस	,,	,,	,,	,,
ओरायन वर्ग				
ओरायन	२२५००	१३-५ इंची १०+४इंची१६	८००	२१
थंडरर	,,	,,	,,	,,
मॉनर्क	,,	,,	,,	,,
कॉकरर	,,	,,	,,	,,
इतर				
कलोसस	२००००	१२ इंची १०+४इंची१६	८००	,,
हर्क्युलिस	,,	,,	,,	,,
नेपचून	१९९००	,,	,,	,,

सेंटव्हिन्सेंट	१९२५०	१२ इंची १०+४इंची१८	७२४	२२
कालिंगवुड्	,,	,,	,,	,,
व्हानगार्ड	,,	,,	,,	,,
बेलेरोफोन	१८६००	१२ इंची १०+४इंची१६	८७०	२१
टेमेरेर	,,	,,	,,	,,
सूपर्ब	,,	,,	,,	,,
ड्रेडनॉट	१७९००	,,	,,	,,
ब्याटलशिप्स				
लार्ड नेल्सन	१६५००	१२ इंची ४+९,२इंची१०	७४७	१८$\frac{1}{2}$
अॅगमेमनन	,,	,,	,,	,,
किंग एडवर्ड धी सेवन्थ	१६३५०	१२ इंची ४+९, २इंची ४+६इंची १०	७८०	,,
डोमीनियन	,,	,,	,,	
कॉमनवेल्थ	,,	,,	,,	
झीलँडिया	,,	,,	,,	
हिंदुस्थान	,,	,,	,,	
हिबर्बिव्ह	,,	,,	,,	
ब्रिटानिया	,,	,,	,,	
आफ्रिका	,,	,,	,,	
फार्मिडेबल	१५०००	१२ इंची ४+६इंची१२	७६०	१८
इंप्लिकेबल	,,	,,	,,	,,
इरेझिस्टेबल	,,	,,	,,	,,
बुलवर्क	,,	,,	,,	,,

लंडन	,,	,,	,,	,,
व्हनरपल	,,	,,	,,	,,
कीन	,,	,,	,,	,,
प्रिन्स ऑफ वेल्स	,,	,,	,,	,,
मॅजेस्टिक	१४९००	१२ इंची	७५०	१७
		४+६ इंची १२		
मॅग्निफिसंट	,,	,,	,,	,,
प्रिन्स जार्ज	,,	,,	,,	,,
व्हिक्टोरियस	,,	,,	,,	,,
ज्युपिटर	,,	,,	,,	,,
मास	,,	,,	,,	,,
हॅनिबाल	,,	,,	,,	,,
सीझर	,,	,,	,,	,,
इलस्ट्रियस	,,	,,	,,	,,
डंकन	१४०००	१२ इंची	७५०	१९
		४+६ इंची १२		,,
आल्बे मार्ल	,,	,,	,,	,,
रसेल	,,	,,	,,	,,
एक्समौथ	,,	,,	,,	,,
कार्नवालिस	,,	,,	,,	,,
कॅनोपस	१२९५०	१२ इंची	७००	१८½
		४+६ इंची १२		
गोलिॲथ	,,	,,	,,	,,
ओशन	,,	,,	,,	,,
आल्बियन	,,	,,	,,	,,
व्हेंजन्स	,,	,,	,,	,,
ग्लोरी	,,	,,	,,	,,
स्विफ्ट शुअर	११८००	१० इंची	७००	१९½
		४+७-९ इंची १४		

ट्रायम्फ	११९८५	,,	,,	,,
बॅटल क्रूझर्स				
कीन मेरी	२७०००	१३-५ इंची ८+४इंची१६	१०००	३५-७
टायगर	,,	,,	,,	,,
लायन	२६३५०	१३-५ इंची ८+४इंची१६	९८०	३१½
प्रिन्सेस रॉयल	,,	,,	,,	,,
आस्ट्रेलिया	१८८००	१२इंची ८+४इंची१६	७८०	२८
न्यूझीलांड	,,	,,	,,	,,
इंडिफटिगेबल	१७७५०	,,	७५०	२९
इंडॉमिटेबल	१७२५०	,,	,,	२८-७
इन्फ्लेक्सिबल	,,	,,	,,	२७
इनव्हिन्सिबल	,,	,,	,,	,,

टीप—या आरमारास एक वर्षास २५ लक्ष पौंडाचा कोळसा लागतो.

एकंदर ब्रिटिश आरमारावरील लोकांची संख्या १,५१,००० असून त्याशिवाय १०,००० नेव्हल रिझरव्हिस्ट आहेत. ब्रिटिश आरमारास १९१३-१४ सालीं ४,३३,३२,४०० पौंड खर्च झाला असून शिवाय याच खात्यापैकीं पेन्शन वगैरे बाबतींत २९,७६,००० पौंड खर्च झालेला आहे.

ग्रेट ब्रिटनच्या साम्राज्याचें सर्व जगांत ज्याप्रमाणें आरमारी वर्चस्व प्रस्थापित झालेलें आहे, त्याचप्रमाणें त्यांचें व्यापारी वर्चस्वही प्रस्थापित झालेलें असून एकंदर जगांत व्यापाराची नेआण करणारीं जेवढीं जहाजें आहेत, त्यांपैकीं सुमारें एकतृतीयांश जहाजें ग्रेट ब्रिटनचीं आहेत. १०० टनाहून जास्त टन वजनाचीं कोणत्या देशाचीं किती जहाजें आहेत, हें खालील कोष्टकावरून ध्यानीं येईल.

राष्ट्राचें नांव.	वाफेनें चालणारीं जहाजें.	इतर जहाजें.	एकूण टन.
ग्रेट ब्रिटन	१०००९	१२७८	२०४३१९४३
आस्ट्रिया हंगेरी	४१९	८	१०११४१४
बेलज्यम	१३४	८	३०४३८६
डेन्मार्क	५९२	२९९	७६२०९४
हालंड	६६२	९७	१३०९८४९
फ्रान्स	९८७	५६९	२२०११६४
जर्मनी	२०१९	३०२	५०८२०६१
ग्रीस	३६५	७७	७२२७८२
इताली	५९१	५२३	१५२१९४२
जपान	१०३७	०	१५०००१४
नार्वे	१५९७	५९४	२४५७८९०
पोर्तुगाल	१०५	१०३	१२०५७९
रशिया	७१६	५००	९७४१७८
स्पेन	५४७	६०	८४०९९५
स्वीडन	१०४३	३९३	१०४७२७०
टर्की	१३५	१३७	१५७२९८
युनायटेड स्टेटस	१८११	१५२९	५४२७६३६

आकार, गति आणि वजन या बाबतींत ग्रेट ब्रिटनचीं जीं मोठीं जहाजें आहेत, त्यांचीं नांवें:—

जहाजाचें नांव.	गति नॉट.	वजन टन.	शेरा.
एक्विटेनिया	२३	४७०००	इ. सन १९१३ मध्यें वीस नॉट पेक्षां जास्त गतीचीं जहाजें ग्रे ब्रिटनचीं ८ व फ्रान्स आ ण इतर देशांचीं ४ याप्रमाणें होतीं.
ब्रिटनी	२३	५४०००	
लुसिटेनिया	२६॥	३१५५०	
मॉरिटेनिया	२६॥	३१९३८	
आलिंपिक	२२	४५३२४	

ग्रेट ब्रिटनचें आरमारी वर्चस्व व व्यापारी श्रेष्ठत्व यांविषयीं ज्या-प्रमाणें वर थोडीशी माहिती दिली आहे, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील ब्रिटिश अमलाखालीं हिंदुस्थानवासीयांची राष्ट्रीय व सामाजिक उन्नति किती झाली आहे,—हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याची स्थापना झाल्या-नंतर ब्रिटिश लोकांनीं आपल्या भारतवासी बंधुजनांकरितां अत्यंत श्रमानें व कळकळीनें किती महत्त्वाच्या गोष्टी व सुधारणा घडवून आणल्या आहेत,—यासंबंधीची त्रोटक हकीकत देणें या ठिकाणीं इष्ट वाटल्या-वरून ती खालीं दिली आहे.

(१) बालहत्या करण्याची, नरबलि देण्याची, व सती जाण्याची चाल बंद करण्यांत आली. (इ. सन १८२९)

(२) इ.सन १८४३ मध्यें गुलामांचा व्यापार बंद करण्यांत आला.

(३) इ. सन १८५० मध्यें "एखाद्या मनुष्यानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला, तरी त्याचा मिळकतीवरील हक्क जात नाहीं, अथवा सामाजिक हक्कालाही तो मुकत नाहीं," असा कायदा करण्यांत आला.

(४) इ. सन १८६० मध्यें पुनर्विवाहाबद्दल कायदा होऊन तो सशास्त्र—कायदेशीर—आहे, असें ठरविण्यांत आलें.

(५) प्राचीन स्मरणीय आणि ऐतिहासिक वस्तूंची जतणूक करण्याबद्दल कायदा करण्यांत आला.

(६) सर्वांना सामाजिक स्वातंत्र्य देण्यांत येऊन सर्व जाती एका कायद्यानें वागविण्याचें ठरलें. हिंदू लोकांकरितां "हिंदुधर्मशास्त्र" व मुसल-मान लोकांकरितां "शिरीन" घडविण्यांत आलें; आणि सर्वांना समान हक्क देण्यांत येऊन मनूच्या धर्मशास्त्रांतील "ब्राह्मणानें कितीही मोठा गुन्हा केला असला, तरी सुद्धां त्यास देहांतशिक्षा न देण्याच्या" बाबतीपुरता नियम इ. सन १८१७ मध्यें रद्द करण्यांत आला.

(७) हिंदुस्थानांत पूर्वीं हल्लींप्रमाणें सडका नव्हत्या; इ. सन १८३९ मध्यें पहिल्यानें सडक बांधण्यास प्रारंभ झाला; आणि इ. सन

१८५४ मध्यें सार्वजनिक कामाचें खातें स्थापन करण्यांत आलें. हल्लीं सडकांप्रीत्यर्थ पांच कोटि रुपयेपर्यंत खर्च होत आहे.

(८) इ. सन १८९३ मध्यें मुंबई व ठाणें यांचे दरम्यान वीस मैल लांबीचा रेलवे रस्ता तयार करण्यांत आला; त्यानंतर इ. सन १८९४ मध्यें बंगाल्यांत ३८ मैल कलकत्यापासून हुगळीपर्यंत व इ. सन १८५६ मध्यें मद्रासहून अर्काटपर्यंत ६९ मैल रेलवे रस्ता तयार होऊन आगगाडी चालू झाली; हल्लीं सर्व हिंदुस्थानभर आगगाडी चालू असून आणखी कांहीं फांटेही सुरू करण्याचें काम नेहमीं चालूच आहे.

(९) पूर्वींचे कालवे दुरुस्त करून नवेही तयार करण्यांत आले, व येत आहेत. इ. सन १८५८ पासून ह्या बाबतींत अधिक लक्ष घालण्यास सुरवात झाली; हल्लीं सिंध, पंजाब, दक्षिणेचा कांहीं भाग, वायव्येकडील प्रांत, वगैरे प्रांतांत कालव्याच्या पाण्यानें दांडगें उत्पन्न होत असून पंजाबसारखें कालव्यांचें प्रचंड जाळें—आणि त्यावर होणारी भयंकर पैदास—तर सर्व जगांत कोठेंही आढळून येणार नाहीं.

(१०) इ. सन १८३७ मध्यें पहिल्या प्रथम एक सार्वजनिक पोष्ट ऑफिस उघडण्यांत आलें; परंतु त्या वेळीं तिकिटें नसल्यानें त्या ऐवजीं आगाऊ रोख किंमत घेण्यांत येत असून ती अंतराच्या मानानें कमी अधिक प्रमाणांत असे. आणि कलकत्त्याहून मुंबई येथें जाणाऱ्या पत्राला दर तोळ्यामागें एक रुपया द्यावा लागत असे. त्यानंतर इ. सन १८९४ मध्यें स्वतंत्र टपालखातें निर्माण करण्यांत आलें, तिकिटें काढण्यांत आलीं, सरसगट तिकिटाचा सारखा दर ठरविण्यांत आला, आणि आतां तर त्याचा सर्व हिंदुस्थानभर विस्तार झाला आहे. शिवाय, हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें राणी सरकारानें आपल्या हातांत घेतल्यानंतर पोष्ट आफिसास जोडूनच "मनीआर्डर" व "सेव्हिंग्स ब्यांक" ह्या दोन पोटशाखा काढण्यांत आल्या आहेत.

(११) हिंदुस्थानांत पहिलें तारायंत्र कलकत्ता मेडिकल कालेज-मधील डॉक्टर ओशौघ्नेशी यानें ८२ मैल लांबीचें तयार केलें; त्यानंतर इ. सन १८५५ मध्यें लार्ड डलहौसी यानें त्याचा विस्तार केला; हल्लीं बहुतेक सर्व हिंदुस्थानभर तारआफिसें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत.

(१२) शेतकीखातें निर्माण करण्यांत येऊन प्रयोगादाखल, व शेतकरी वर्गास माहिती मिळून वळण लागावें, व त्यांनींही आपल्या शेती-ची तशीच मशागत करून मालाची मुबलक पैदास करावी, ह्मणून " ॲग्रिकल्चरल फार्म " तयार करण्यांत आले आहेत.

(१३) हिंदुस्थानांत पहिला दवाखाना सैन्यांतील शिपायांच्या उपयोगाकरितां इ. सन १६६४ मध्यें मद्रास येथें बांधण्यांत आला, आणि इ. सन १७७२ मध्यें त्याच शहरीं सार्वजनिक उपयोगाकरितां एक दवाखाना बांधण्यांत आला. व त्यानंतर सर्व हिंदुस्थानांत ठिक-ठिकाणीं माणसांकरितां व नंतर जनावरांकरितां दवाखाने स्थापन करण्यांत आले आहेत. शिवाय स्त्रियांकरितां मुद्दाम स्वतंत्र " लेडी डफरीन हास्पिटल " या नांवानें ओळखले जाणारे दवाखाने बहुतेक हिंदुस्थानभर दर मोठ्या शहारांत स्थापन करण्यांत आले आहेत. व त्याचप्रमाणें देवीच्या सांथीच्या भयंकर रोगावर डॉक्टर गोस्तन यानें शोधून काढलेल्या लसीनें देवी टोंचण्याचा प्रघात सर्व हिंदुस्थानभर सुरू असून त्यामुळें मृत्यु आणि व्यंग वगैरे पासून हिंदुस्थानांतील जनतेचा पुष्कळ प्रमाणानें बचाव झालेला आहे.

ORIGIN OF HOSPITALS IN INDIA.

TINNEVELLY, February 9.

In the course of an interesting address delivered on the occasion of the opening of the hospital at Tinnevelly on Tuesday, the Hon. Surgeon-General Bannerman explained the origin of hospitals in India and their development. He said that

in the very old days of Emperor Asoka there were a few hospitals under his auspices, but with the overthrow of his kingdom the hospitals disappeared from that time since the advent of the English. There were no hospitals at all when the English arrived and began to maintain soldiers and an army. They built a hospital to treat soldiers in 1664, and that was the first institution of the kind in India. Madras even in those old days showed the way for the rest of India. This hospital was merely intended for soldiers, and as hospitals for soldiers multiplied in the cantonment of India, the civil population also wished to avail itself of the treatment accorded therein, and the nucleus of the Madras General Hospital was built in 1772, and since then hospitals have spread throughout the length and breadth of the Presidency and in India. Hospitals rose out of the necessity of the military in England. They arose out of the charity of the people, who thought that the relief of suffering and pain was the best form of charity in India. Charity took the form of temples and rest-houses for pilgrims and the feeding of the Brahmins. The speaker did not wish to make any contrast between both. Each was good in its own way, but he appealed to the Indians to divert the stream of charity from the traditional methods and apply to it the modern principles.

Times of India.

10th February 1916.

(१४) दुष्काळ पडल्यास रयतेस बचावण्यासाठीं "रिलीफ वर्क्स" ठिकाठिकाणीं काढण्यांत येऊन लहान मुलें व पंगू माणसें यांनाही पोसण्याची त्या ठिकाणीं तजवीज करण्यांत येते. गुरांचे जीव वांचावे, ह्मणूनही चाऱ्यासंबंधी सवलत मिळून प्रजेला निरनिराळ्या मार्गानें मदत करण्यांत येते.

(१५) शेतकऱ्यांची स्थिति सुधारावी, ह्मणून अनेक तऱ्हेच्या तजविजी व प्रयत्न करण्यांत आले असून इ. सन १९०४ सालापासून शेतकी पेढ्या स्थापन करण्यांत आल्या आहेत.

(१६) व्यापार धंदे व कला यांना उत्तेजन देण्यांत येत असून त्याकरितां परदेशांत जाणाऱ्या लोकांपैकीं बहुतेकांस कोणत्याना कोणत्या प्रकारें सरकाराकडून आश्रय मिळतो; इतकेंच नाहीं, पण ब्रिटिश सरकारही " स्कालर्शिप " देऊन परदेशांत नेहमीं लोक पाठवीत असून त्यांनीं या देशाच्या व्यापारधंद्यास व कलाकौशल्यास आजपर्यंत नेहमीं शक्य त्या ठिकाणीं सहानुभूति दाखवून हातभारही लाविलेला आहे. त्याचप्रमाणें व्यापारीखातें, जकातखातें व नोंदणीखातें काढून रयतेच्या गरजा भागविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

(१७) निरनिराळया प्रकारानें मोजणी व मापणी होत असून हिंदुस्थानच्या आसमंत भागांतील प्रदेश शोधून काढण्यांत, वसविण्यांत व लागवड करण्यांत येत आहे.

(१८)बंगाल, हैद्राबाद संस्थान, व मध्यप्रांत, येथें कोळशाच्या, म्हैसूर प्रांतांत कोलार येथें सोन्याच्या, ब्रह्मदेश व आसाममध्यें रॉक आईलच्या, मध्यप्रांत, म्हैसूर, मद्रास व बंगालमध्यें मँगनीज धातूच्या, आणि ब्रह्मदेशांत रत्नाच्या खाणी असून, त्या बाबतींतील व्यापार वाढत्या प्रमाणावर आहे. शिवाय मध्यप्रांत व ओरिसा यांमध्यें मुंबईचे धनाढ्य पारशी टाटा ब्रदर्स यांनीं लोखंडाच्या खाणीजवळच बऱ्याच व्यापक प्रमाणावर एक कारखाना काढला असून त्यास सरकारानें उदार आश्रय दिलेला आहे.

(१९) इमारती लाकडांकरितां व दुष्काळ वगैरेचे प्रसंगीं जनावरांचे जीव वांचावे ह्मणून जंगलाचे संरक्षणार्थ फारेष्ट खातें निर्माण करण्यांत आलें असून योग्य सवलतीनें प्रजेस " फारेष्टचा फायदा " मिळावा अशी तजवीज करण्यांत आली आहे.

(२०) हिंदुस्थानांतील व्यापारधंद्याची अभिवृद्धि व्हावी ह्मणून बंदरांची सुधारणा करण्यांत आली असून त्यामुळें आयात व निर्गत व्यापाराची पहिल्याहून पुष्कळच प्रमाणानें अधिक वाढ झाली आहे.

(२१) आरोग्यसंरक्षणार्थ एक स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलें;—इ. सन १६७९ मध्यें पहिल्यानें मद्रास येथें व नंतर इ. सन १७९९ मध्यें कलकत्ता येथें सार्वजनिक दवाखाना उघडण्यांत आला.

(२२) इ. सन १७८२ मध्यें हेस्टिंग्स यानें मुसलमान लोकांकरितां कलकत्ता येथें एक "मद्रेसा" स्थापन केली, व इ. सन १७९१ मध्यें लार्ड कार्नवालिस यानें हिंदू लोकांकरितां काशी येथें एक पाठशाळा स्थापन केली; पुढें इ. सन १८१३ मध्यें मार्क्विस ऑफ हेस्टिंग्स यानें सर्व जातींकरितां शाळा उघडल्या; पण त्या वेळीं त्या शाळांमधून इंग्रजी भाषेचें शिक्षण मिळत नसे. त्यानंतर लार्ड विल्यम बेंटिंकच्या कारकीर्दीपासून इंग्लिश शिकविण्याची सुरवात होऊन इ. सन १८५४ पासून शिक्षणाची पुष्कळच झपाट्यानें वाढ होत गेलेली आहे.

(२३) देशी आणि इंग्रजी शिक्षणाच्या द्वारें वाङ्मयाचा झपाट्यानें फैलाव झाला; इ. सन १७८० मध्यें हिंदुस्थानांत कलकत्ता येथें "हिकेज ग्याझिट" ह्या नांवाचें पहिलें इंग्लिश वर्तमानपत्र प्रसिद्ध झालें, व इ. सन १८१८ मध्यें सरामपूर येथें ख्रिस्ती मंडळानें पाहिल्यानें तद्देशीय बंगाली भाषेंत एक वर्तमानपत्र काढलें; इ. सन १८३५ मध्यें सर चार्लस मेटकाफ यानें मुद्रणस्वातंत्र्य दिल्यावर सहा एतद्देशीय वर्तमानपत्रें सुरू झालीं. हल्लीं सर्व हिंदुस्थानभर छापखाने झालेले असून निरनिराळ्या भाषेंत चोहोंकडे वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, व इतर सर्व विषयांवरील ग्रंथ नेहमीं प्रसिद्ध होत आहेत.

(२४) शांतता व संरक्षण यांकरितां पोलिसखातें स्थापन करण्यांत आलें आहे; न्याय देण्याची व्यवस्था करून तुरुंग खात्याचीही सुधारणा करण्यांत आली आहे; आणि त्यांतच अल्पवयी मुलांना व तरुण मनुष्यांना सुधारण्याचे उपाय योजण्यांत येत आहेत.

(२५) स्थानिक स्वराज्याची व्यवस्था "इंडियन" लोकांकडे अधिक अधिक प्रमाणांत सोंपविण्यांत येत आहे, व वरिष्ठ दर्ज्यांच्या जागां-

मध्येंही त्यांचा शिरकाव होत चालला आहे;—शिवाय सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कार्यकारी मंडळामध्यें दोन व गव्हर्नर जनरल आणि मुंबई, मद्रास व बंगाल, या तिन्हीही प्रांतांच्या गव्हर्नरांच्या कार्यकारी मंडळांमध्यें एक एक हिंदी सभासद नेमण्यांत आला असून दरेक प्रांतानिहाय लेफ्टे-नंट गव्हर्नराच्या कार्यकारी मंडळामध्येंही एक एक हिंदी सभासद पुढें मागें नेमला जाईल, अशी आशा बाळगण्यास जागा आहे.

वरील विवेचनावरून हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याची स्थापना झाल्यानंतर त्यांनीं हिंदी प्रजेच्या सुखवृद्धीकरितां किती तजविजी केल्या आहेत, आणि हें कार्य घडवून आणण्याला किती अश्रांत श्रम त्यांना करावे लागले असावेत, याची कांहींशी तरी कल्पना वाचकांस झाल्या-शिवाय राहणार नाहीं. आयर्लंड देशाच्या इतिहासाचा प्रश्न बाजूला ठेवूनही विचार केला असतां असें आढळून येईल कीं, ब्रिटिश सरकार—सहवासानें आपलेपणा उत्पन्न झाला तरी—वास्तविक रीत्या परकें असून सुद्धां, त्यांनीं हिंदुस्थानची राज्यव्यवस्था अत्यंत नमुनेदार धर्तीवर केलेली आहे, आणि प्रजापालन व प्रजासुखसमृद्धि हेंच ध्येय नेहमीं आपल्यापुढें कायम ठेवून तदनुरोधानें राज्यकारभार चालविलेला आहे. कोणत्याही देशाच्या राज्यकारभाराचें उदाहरण घ्या, मग राज्यकर्ते परदेशीय असोत अथवा स्वदेशीय असोत, त्यांत कांहींना कांहीं तरी दोष व अपूर्तता ही असावयाचीच;—ह्मणजे त्या दृष्टीनें विचार केल्यास हिंदुस्थानच्या राज्य-कारभारांतही कांहीं बाबतींत दोष अथवा अपूर्तता आहे, असें ह्मणतां येईल. तथापि आजपर्यंतच्या अनुभवानें आणि एकंदर परिस्थितीचा विचार करतां ब्रिटिश सरकार उदार अंतःकरणानें हिंदुस्थानांतील जनतेस दिवसेंदिवस अधिक अधिक सवलती आणि हक्क देत असल्यानें कित्येक बाबतींत राहिलेले दोष अथवा अपूर्तता लवकरच नाहींशी होईल, असें मानण्यास हरकत नाहीं.—शिवाय, राज्यकारभारविषयक बाबतींत हिंदु-स्थानांतील कर्त्या व अग्रगण्य पुढाऱ्यांमध्यें कितीही मतभेद होवो—

आणि राज्यविषयक सुधारणांच्या बाबतींत हिंदुस्थानांतील प्रसिद्ध व प्रमुख नेत्यांच्या आशा-आकांक्षांमध्यें कितीही फरक असो,—पण ब्रिटिश साम्राज्यसत्तेशीं राजनिष्ठ रहावें, हें तत्त्व अबाधितपणें सर्वमान्य ठरलेलें असून हिंदी जनता साम्राज्य सरकाराशीं सदोदित राजनिष्ठेनें वागत आहे, आणि पुढेंही ती तशीच आपल्या आंग्ल साम्राटाशीं राजनिष्ठपणें वागत राहील, ही गोष्टही या ठिकाणीं नमूद करणें इष्ट आहे. त्याचप्रमाणें हीही गोष्ट ह्या ठिकाणीं दर्शित केली पाहिजे कीं, राज्यकर्ते या नात्यानें आपलें कर्तव्य काय आहे आणि आपण आपल्या प्रजेशीं कसें वर्तन ठेविलें पाहिजे, राजनीतीचीं उदार तत्त्वें कोणतीं आहेत आणि राज्यकारभार चालवितांना प्रजेला संतुष्ट ठेवणें किती अगत्याचें आहे—आणि प्रजेच्या संतुष्टपणावर राष्ट्राचें चिरायुत्व किती अवलंबून असतें-वगैरे गोष्टींची ब्रिटिश सरकारास पूर्णपणें ओळख असल्यामुळें ते स्वत: नेहमीं राजधर्माला अनुसरून वागण्याचा प्रयत्न करीत असतात; इतकेंच नाहीं, पण प्रसंगीं इतर राज्यकर्त्यांसही या बाबतींची आठवण करून देऊन त्यासंबंधीं आपलें स्पष्ट मत कळविल्याशिवाय रहात नाहींत. उदाहरणार्थ, यूरोपमध्यें पोर्तुगाल देशांत तेथील राज्यकर्त्या राणीच्या पक्षपातामुळें त्या देशांत अव्यवस्था माजली, त्या वेळीं लार्ड पामर्स्टन यानें लिसबन येथील आपला मंत्री, सर एच. सयमूर, याचे मार्फत इ. सन १८४७ मध्यें जो एक अगत्याचा खलिता पाठवून या बाबतीसंबंधीं आपलें स्पष्ट मत जाहीर केलें, तो खलिता खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. (ता. ५ माहे फेब्रुवारी इ. सन १८४७).

Lord Palmerston's despatch to Sir H. Seymour, the English Minister at Lisbon, dated 5th February 1847.

" The Queen should remember that unless she shows herself to be the Soverign of the whole nation, she cannot expect the whole nation to regard and love her as their Soverign; and that a throne, whose stability rests on the point of the bayonet, has a very ticklish and uncertain basis. Pray

preach all these things and such others as may occur to you in the same spirit.

Life of the Prince Consort, People's Edition, Part I, Page 70.

इतकेंच नाहीं, पण वरील खलिता लिहिण्याच्या बारा वर्षें अगोदर हिंदुस्थानांत लार्ड मेकाले यानें इ. सन १८३५ मध्यें लार्ड विल्यम बेंटिंक याच्या स्मरणलेखांत खालीलप्रमाणें उल्लेख केलेला आहे.

" Who never forgot, that the end of Government is the happiness of the Governed.

*　　*　　*　　*

Who effaced humiliating distinctions.

*　　*　　*　　*

Whose constant study it was to elevate the intellectual
And moral character of
The Nations, committed to his charge."

(*Macaulay's Writings and Speeches. Page 469.*)

शिवाय ता. १ माहे नोव्हेंबर इ. सन १८५८ रोजीं प्रसिद्ध झालेल्या राणीच्या जाहिरनाम्यांत —ह्मणजे राणी सरकारनें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें कंपनी सरकाराकडून काढून आपल्या हातीं घेतलीं, त्या प्रसंगीं लार्ड स्टॅन्ले याच्या अनुमतीनें प्रसिद्ध केलेल्या, राणी सरकारच्या हुकुमावरून सर्व हिंदुस्थानांत प्रांतोप्रांतीं राणीच्या प्रतिनिधींनीं सर्वांस इंग्लिश भाषेंत व सर्व देशी भाषेंत वाचून दाखविलेल्या, हिंदुस्थानांतील सर्व राजेरजवाडे, संस्थानिक, सरदार, यांस पाठविण्यांत आलेल्या, आणि अलाहाबाद येथें मुद्दाम एक वडा स्वतंत्र दरबार भरवून त्यांत हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल व पहिला व्हाइसराय, लार्ड कॅनिंग, यानें वाचून दाखविलेल्या, राणीच्या राजनीतिदर्शक प्रसिद्धिपत्रांत—या बाबतींत खालीलप्रमाणें स्पष्ट उल्लेख केलेला आहेच.

*　　*　　*　　*　　*　　*

" आमच्या रयतेची अबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती, व त्यांची कृतज्ञता तेंच आम्हांस उत्तम फळ, असें आम्ही समजतों.................................. "

त्याचप्रमाणें ग्रेट ब्रिटनची — ह्मणजे इंग्लिश लोकांची—प्रामाणिकपणाबद्दलही अत्यंत उज्ज्वल कीर्ति असून आपला लौकिक कायम रहावा ह्मणून—आणि प्रजेमध्यें आपणाविषयीं असलेला आदरभाव यत्किंचित्‌ही ढळूं नये ह्मणून—ते किती काळजी घेत असतात, याबद्दल बऱ्याच जुन्या वेळच्या आर्थर वेलस्ली यानें मालकम यास लिहिलेल्या खालील उताऱ्यावरून बरेंच अनुमान करतां येण्यासारखें आहे.

Arthur Wellesley writes to Malcom that I would sacrifice Gwaliar or every other frontier of India ten times over, in order to preserve our credit for scrupulous good faith...... What brought me through many difficulties in the war and the negociations of peace? The British good faith and nothing else.

Life of John Malcom by the late Hon. Mr. A. K. Forbs.

वरील एकंदर विवेचनावरून ब्रिटिश सरकार व त्यांचे प्रतिनिधि हिंदी प्रजेच्या सुखसमृद्धीची किती काळजी घेत आहेत, हिंदी प्रजा संतुष्ट ठेवण्याबद्दल किती खबरदारी घेत असतात,——आणि प्रजेमध्यें आपणाविषयींचा असलेला आदरभाव, विश्वास व श्रद्धा, हीं कायम ठेवण्याचा–प्रसंगीं झीज सोसूनही–ते नेहमीं किती प्रयत्न करीत असतात,— ह्या गोष्टींची वाचकांस बरीच कल्पना होईल, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.——त्याचप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यछत्राखालीं हिंदुस्थान देशाची दिवसेंदिवस राजकीय, व्यापारविषयक आणि इतर बाबतींमध्यें सारखी प्रगति होत जाईल, अशी खात्री बाळगण्याससुद्धां कांहींही हरकत नाहीं.

मूळ इंग्लिश पुस्तकाचा कर्ता, धि राइट ऑनरेबल सर आलफ्रेड कामिन लायल, पी. सी., के. सी. बी., डी. सी. आय., इ. डी. सी. एल., एल. एल. डी., इंडियन सिव्हिल सर्व्हंट, हा एक हुषार अधिकारी, प्रतिभासंपन्न कवि, आणि नांवाजलेला लेखक व ग्रंथकार असून त्यानें केलेल्या बऱ्याच महत्त्वाच्या पुस्तकांत ह्या ग्रंथास कांहींसें अग्रस्थान मिळालेलें आहे; त्यामुळें ह्या नामांकित मनुष्याचें त्रोटक चरित्र या ठिकाणीं देणें अप्रासंगिक होणार नाहीं.

सर लायल याचा जन्म इ. सन १८३९ सालीं ता. ४ जानेवारी रोजीं सरे प्रांतांतील कोल्सडन या गांवीं झाला, आणि त्याचा बाप धर्मोपदेशक असून त्याची बदली गॉडमर्शाम येथें, तो चार वर्षांचा असतां, झाल्यानें तेथें त्यानें आपल्या बाळपणाचे दिवस घालविले, इ. सन १८४९ मध्यें तो ईटन येथील शाळेंत गेला, आणि इ. सन १८५२ मध्यें त्यानें ती शाळा सोडली, इ. सन १८५३ च्या एप्रिल महिन्यांत त्यानें आपल्या वडिलाबरोबर फ्रान्स व स्पेन या देशांत प्रवास केला; आणि परत आल्यावर तो हेलीबरी येथील कालेजमध्यें दाखल झाला;—एकूणिसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत हेलीबरी येथील कालेजमध्यें कंपनी सरकाराला हिंदुस्थानांत लागणारे मुलकी अंमलदार शिक्षण देऊन तयार केले जात असून ही संस्था इ. सन १८०९ मध्यें स्थापन करण्यांत आली होती, व इ. सन १८५७ मध्यें ती बंद करण्यांत आली;—तथापि ह्या कालेजसंबंधीं त्याचें अनुकूल मत नसून तो त्यास " सुव्यवस्थित ढोंग " असें ह्मणत असे.

हेलिबरी येथील कालेजसंबंधीं आपल्या एका स्नेह्याशीं बोलतांना पुढें त्यानें एके वेळीं "हेलिबरी येथील कालेज चांगलें नाहीं," असें ह्मणून खालील मौजेची गोष्ट उदाहरणादाखल सांगितली:—

" एका इंग्रजी कवितेचें कांहीं प्रसिद्ध विद्वानांनीं लॅटिन भाषेंत केलेलें भाषांतर माझ्या पाहण्यांत आलें होतें, व मला तें उत्तम वाटल्यावरून मी तें तोंडपाठही करून टाकलें होतें; त्यानंतर योगायोग असा आला कीं, मी हेलिबरी कालेजमध्यें असतांना लॅटिन भाषेमध्यें भाषांतर करण्याकरितां हीच कविता देण्यांत आली होती, आणि आळसामुळें स्वतंत्र असें भाषांतर न करितां मी पाठ केलेल्या ह्याच ओळी कागदावर लिहून टाकल्या, आणि स्वतःची सोडवणूक ह्मणून त्या ओळींच्या सुरवातीच्या व शेवटच्या अशा दोन्ही बाजूंला बारिक अवतरण चिन्ह घातलें. परंतु ही गोष्ट कोणाच्याही लक्षांत आली नाहीं, आणि ' पहिलें

बक्षीस मिळविण्या इतकें भाषांतर चांगलें झालें नाहीं, ' असा शेरा ठोकण्यांत आला "

येथील कॉलेजमध्यें असतांनाच पुष्कळ मासिक पुस्तकांत नाना विषयांवर लेख लिहून लायल हा बराच प्रसिद्धीस आलेला होता. इ. सन १८५५ सालीं त्यानें या कालेजमधील आपलें शिक्षण पुरें केलें, आणि आपल्या वयाचें विसावें वर्ष संपण्याच्या अगोदरच हिंदुस्थानामध्यें आपल्या नोकरीवर येऊन दाखल होण्याकरितां त्यानें आपल्या मायभूमीचा किनारा सोडला.

इ. सन १८५६ च्या जानेवारी महिन्यांत कलकत्ता येथें आल्यावर त्यास त्याच्या इच्छेप्रमाणें लोअर बंगालमध्यें न नेमतां वायव्येकडील प्रांतांत नेमण्यांत आलें; मार्च महिन्यांत पर्शियन भाषेची परीक्षा उत्तीर्ण होऊन सप्टेंबरमध्यें त्यास बुलंदशहर येथें असिस्टंट मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें; इ. सन १८५७ च्या धामधुमींत स्वयंसेवकांच्या तुकडींत दाखल होऊन त्यानें बंडवाल्या विरुद्धच्या मोहिमींत बराच भाग घेतला; त्यानंतर इ. सन १८५८ च्या मे महिन्यांत त्यास त्याच्या अर्जावरून रोहिलखंडांत शहाजहानपूर येथें नेमण्यांत आलें; इ. सन १८६० च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यास पिलभिट येथें ' असिस्टंट मॅजिस्ट्रेट ' नेमण्यांत आलें; आणि इ. सन १८६१ च्या एप्रिल महिन्यामध्यें डाक्टरी सर्टिफिकिटावरून रजा मिळवून तो स्वदेशीं परत गेला.

इंग्लंडमध्यें जवळ जवळ तो दोन वर्षें राहिला; या अवधींत त्यानें फ्रान्समध्यें प्रवास केला, आणि इ. सन १८६२ सालीं नोव्हेंबरच्या १२ व्या तारखेस कोरा क्लोएट ह्या नांवाच्या कुमारिकेबरोबर क्याव्हेंडिश येथें त्याचें लग्न झालें. त्यानंतर इ. सन १८६३ च्या फेब्रुवारी महिन्यांत तो इकडे आल्यावर त्याची आग्रा येथें नेमणूक झाली.—याच वेळेच्या सुमारास ट्रेव्हिलियन यानें नुकतेंच "कांपिटिशनवाला" ह्या नांवाचें एक पुस्तक तयार केलें होतें, आणि त्यामुळें हिंदुस्थानांतील मुलकी खात्यांत सनदी

उमेदवार घेण्यासंबंधींच्या नव्या पद्धतिविद्दल बरीच खळबळ उडून गेली होती;—आणि इ. सन १८६४ च्या उन्हाळ्यामध्यें मध्य प्रांतांत हुशंगाबाद येथें त्यास 'डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट' नेमण्यांत आलें; याच वेळीं त्यानें "दी ओल्ड पेंढारी" ह्या नांवाच्या कविता पहिल्यानें तयार केल्या.

त्यानंतर इ. सन १८६५ मध्यें नागपूर येथें त्यास ऑक्टिंग कमिशनर नेमण्यांत आलें. त्यानंतर रजेवरून परत आल्यावर कांहीं दिवस सेक्रेटरीचें व इ. सन १८६६ च्या सप्टेंबरमध्यें पुन्हां ॲक्टिंग कमिशनरचें, व जबलपूर येथें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटचें काम केल्यानंतर त्यास पश्चिम वऱ्हाडचा कमिशनर नेमण्यांत आलें, व त्या जागेवर तो इ. सन १८६७ च्या सप्टेंबरमध्यें कायम झाला.

अकोलें येथें असतांना त्यानें वऱ्हाडच्या खानेसुमारीचा रिपोर्ट तयार केला, आणि त्यानंतर पुन्हां अर्धपगारी रजेवर तो इंग्लंडमध्यें परत गेला; तेथें असतांना त्यानें "थिआलजी इन एक्स्ट्रीम्स" ही कविता कार्नहिल मासिक पुस्तकांत प्रसिद्ध केली, आणि त्यामुळें त्याची विशेष प्रसिद्धि झाली;—याच वेळेपासून त्यानें इंग्लंडमधील वर्तमानपत्रांतून आणि मासिक पुस्तकांतून लेख लिहिण्यास सुरवात केली, आणि हा क्रम पुढें मरेपर्यंत ४३ वर्षें अव्याहतपणें चालू होता.

वऱ्हाडमध्यें असतांना त्यानें "बरार ग्याझीटियर" काढलें; इ. सन १७७२ च्या फेब्रुवारी महिन्याच्या फॉर्टनाइटलीमध्यें "अवर रिलिजस पॉलिसी इन इंडिया" ह्या विषयावर, एप्रिल महिन्याच्या अंकांत "दी रिलिजन आफ एन इंडियन प्राव्हिन्स" या विषयावर, आणि पुढील आगष्टच्या अंकांत "दी रिलिजस सिच्युएशन इन इंडिया" हे लेख त्यानें प्रसिद्ध केले. त्यानंतर त्यास हिंदुस्थान सरकारच्या "होम सेक्रेटरी" च्या जागीं नेमण्यांत आलें, आणि इ. सन १८७३ च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यानें कलकत्ता येथें जाऊन नवीन हुद्याचीं अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. इ. सन १८७४ सालीं फॉर्टनाइटलीमध्यें त्यानें "मिश-

नरी रिलिजन्स " ह्या बाबतींत—मॅक्स मुलर याच्या विचारावर टीका ह्मणून—एक लेख लिहिला. याच सालीं आक्टोबरमध्यें त्यास राजपुतान्यांत 'एजंट टु दी गव्हर्नर जनरल' नेमण्यांत आलें. तेथें असतांना मॅक्स मुलरच्या कांहीं पुस्तकांवर त्यानें टीका केली, आणि फार्टनाइटलीमध्यें " ऑरजिन आफ डिव्हाईन मिथ्स इन इंडिया " या विषयावर एक लेख प्रसिद्ध केला. त्यानंतर इ. सन १८७५–७६ च्या हिवाळ्यामध्यें राणीचा मुलगा प्रिन्स ऑफ वेल्स–मागाहून एडवर्ड दि सेव्हंथ—हा हिंदुस्थानांत आला, त्या वेळीं हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांची व प्रजेची राजघराण्यांतील मंडळीबद्दल अत्यंत पूज्य भाव आणि राजनिष्ठा असून त्यांचें अत्यंत माननीय आगतस्वागत करण्यांत आलें, असें त्यानें एका पत्रांत लिहिलेलें आहे

इ. सन १८७६ च्या हिवाळ्यामध्यें लार्ड लिटन यानें बोलावल्यावरून अलाहाबाद येथें जाऊन त्याची भेट घेतल्यानंतर त्यानें " एडिंबरो रिव्हयू " करितां " राजपुताना " या विषयावर एक लेख लिहिला, व त्यानंतर रजेवर गेल्यावर इंग्लंडमध्यें असतांना "फॉर्मेशन ऑफ इंडियन क्लॅन्स अँड कास्टस्" या विषयावरील त्याचा लेख इ. सन १८७७ च्या " फार्टनाइटली " मध्यें प्रसिद्ध झाला; पुढें एप्रिलमध्यें तो रजेवरून परत आल्यावर "मेडिटेशन्स ऑफ ए हिंदू प्रिन्स अँड सेप्टिक" आणि जोधपूर पाहिल्यावर "ए रजपूत चीफ ऑफ दी ओल्ड स्कूल" ह्या नांवाच्या कविता त्यानें लिहिल्या, व त्या अनुक्रमें "कार्नहिल" व "फार्टनाइटली रिव्ह्यू" मध्यें छापण्यांत आल्या; त्यानंतर इ. सन १८७८ मध्यें त्यास हिंदुस्थान सरकारच्या " फारेन सेक्रेटरी " च्या जागीं नेमण्यांत आलें; त्या जागेवर असतांना अफगाणिस्थानासंबंधींच्या राजकारणांत त्यानें महत्त्वाची कामगिरी बजावल्यामुळें त्यास के. सी. बी. चा किताब देण्यांत आला; त्यानंतर इंग्लंडमध्यें रजेवर गेल्यावर "फार्टनाइटली" मध्यें "रिलेशन्स ऑफ रिलिजन टु एशियाटिक स्टेटस " या विषयावर त्यानें एक लेख लिहिला;

रजेवरून परत आल्यानंतर सर लायल यास वायव्येकडील प्रांताचा लेफ्टे-नंट गव्हर्नर नेमण्यांत आलें, आणि ता. १७ एप्रिल इ. सन १७८२ रोजीं त्यानें त्या हुद्द्याचीं अधिकारसूत्रें आपल्या हातीं सोंपवून घेतलीं.

लेफ्टेनेंट गव्हर्नर झाल्यावर लायल यानें एका इंडियन मनुष्यास अलाहाबाद येथील हायकोर्टांत जज्जाच्या जागेवर नेमविलें;—तेथील हाय कोर्टांत नेमला गेलेला हा पहिलाच इंडियन होय. इंडियन लोकांस राज्यकारभारांतील मोठमोठ्या जागांवर नेमण्यासंबंधीं एका पत्रांत त्यानें असें लिहिलें आहे कीं, " जेव्हां जेव्हां संधि सांपडेल, तेव्हां तेव्हां इंडि-यन लोकांना पुढें आणण्याची माझी फार इच्छा आहे; कारण, आपलें राज्य हिंदुस्थानांत व्यापक व चिरस्थायी करण्याचा हा एवढाच मार्ग आहे. " शिवाय, त्यानें आपल्या बहिणीस लिहिलेल्या पत्रांतही असेंच मत प्रदर्शित केलें असून "इंडियन लायक माणसें राज्यकारभाराच्या मोठमोठ्या जागां-वर नेमून त्यांना आपल्या बरोबरीचें करून सोडणें हेंच एक राजनीतीचें उत्तम धोरण आहे, " अशी त्याची खात्री होती.

इ. सन १८८२ सालीं सर लायल यानें आपल्या " एशियाटिक स्टडीज " ह्या नांवाच्या पुस्तकाचा पहिला भाग प्रसिद्ध केला;—यांत " फार्टनाइटली " मध्यें छापल्या गेलेल्या सर्व लेखांचा समावेश केलेला आहे. याच वर्षी इलबर्ट बिलासंबंधीं त्याचें मत विचारण्यांत आलें, त्या वेळीं इंडियन डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटच्या अधिकारव्याप्तीबद्दल त्यानें आपलें असें स्पष्ट मत दिलें कीं, " डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटच्या हुद्द्याचे लोक एकं-दर राज्यांत फार थोडे आहेत; त्यांच्यावर कांहीं मर्यादित प्रदेशावरील अंमलबजावणीसंबंधींची पुष्कळच जबाबदारीची कामगिरी असते; त्यांच्या हाताखालीं पुष्कळ लोक काम करीत असतात; आणि खरें ह्मणा-वयाचें ह्मणजे, राज्यांतील व्यवस्थेचे खरे आणि मुख्य आधारस्तंभही तेच होत. अशा अधिकाऱ्यांला तुम्ही सर्व हक्क पूर्णपणें दिले पाहिजेत. एखाद्या मनुष्याला डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटच्या हुद्द्यावर नेमावें, आणि त्यानें "कोणत्याही

युरोपियन मनुष्याच्या केंसासही धक्का लावतां कामा नये, " असें त्यास सांगून त्याची सत्ता मर्यादित करावी, हें असंबद्ध व असमंजसपणाचें आहे. ताब्यांत असलेल्या प्रदेशांत शांतता राखण्याची जबाबदारी त्याच्यावर असते; त्यामुळें कोणत्याही जातीच्या व कसल्याही स्थितीच्या मनुष्याशीं योग्य मार्गानें वागण्याची त्यास पूर्ण मुभा ही असलीच पाहिजे."

इ. सन १८८३ च्या जून महिन्यांत " रिट्रॉस्पेक्शन " ह्या नांवाची त्यानें एक कविता लिहिली, व त्याचा माऊंटस्टूअर्ट एलफिन्स्टन याच्या आयुष्यक्रमावरील लेख एडिंबरो रिव्हयूमध्यें (जानेवारी १८८४), " आर्मिज मेसेज " ह्या नांवाच्या कविता " नॅशनल रिव्ह्यू " मध्यें, व " ईस्ट अँड वेस्ट " ह्यावरील एक लेख त्यानें प्रसिद्ध केला. शिवाय इ. सन १८८९ च्या दिजंबर महिन्यामध्यें " आशियाटिक स्टडीज " या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाची लेखमाला " वामदेव शास्त्री " या सहीनें छापण्यास सुरवात केली, व पुढें " शिव " या नांवाच्या कविता छापून प्रसिद्ध केल्या. (१८८७). सर लायल याच्याच लेफ्टेनेंट गव्हर्नर या नात्याच्या वायव्य--प्रांतांतील कारकीर्दींत स्थानिक स्वराज्य अमलांत आलें, आणि डिस्ट्रिक्ट व म्युनिसिपल बोर्डास मोठ्या प्रमाणावर सत्ता देण्यांत आली; रयतेवरील कर कमी करण्याचा प्रयत्न करण्यांत आला; " ओध रेंट लॉ " मध्यें सुधारणा करण्यांत आली; लेजिस्लेटिव्ह कौन्सिल देण्यांत आलें; व अलाहाबाद येथें युनिव्हर्सिटी स्थापन करण्यांत आली;—सर लायल यासच तिचा पहिला चॅन्सेलर नेमण्यांत आलें होतें;--इ. सन १८८८ च्या जून महिन्यांत त्यानें पेनशन घेतलें; व हिंदुस्थानांतील नौकरीस कायमचा राम राम ठोकून तो स्वदेशीं परत गेला. इंग्लंडांत परत गेल्यावर त्यास " इंडिया ऑफिस " मध्यें नेमण्यांत आलें; — व पुढें " लिटररी सोसायटी " व " ब्रेकफास्ट क्लब " च्या सभासदांत त्याची नेमणूक झाली. अशा रीतीनें लायल साहेबाचा बस बसतो न बसतो, तोंच त्यास केपच्या गव्हर्नराची जागा स्वीकारण्या-

विषयीं विचारण्यांत आलें; पण त्यानें ती नाकारली; इ. सन १८८९ मध्यें त्यानें " वारन हेस्टिंग्स " चें चरित्र छापून प्रसिद्ध केलें; इ. सन १८९० मध्यें हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील राजकारणामध्यें तो वेधला जाऊन शिवाय त्यानें "एडिंबरो रिव्ह्यू" मध्यें "पॉलिथिइझम "या नांवाचा एक लेख लिहिला; इ. सन १८९१ मध्यें लार्ड कर्झनच्या "इराण" या पुस्तकाचीं प्रुफें तपासण्याचें काम योग्य प्रकारें बजावलें; व आक्सफर्ड युनि-व्हर्सिटीपुढें हिंदुस्थानच्या सरहद्दीसंबंधीं दोन, व केंब्रिज येथील " रीड लेक्चर" ह्मणून "न्याचरल रिलिजन्स इन इंडिया" या विषयावर एक व्याख्यान दिलें; इ. सन १८९२ च्या जानेवारींत त्यास न्यूझीलंडच्या गव्हर्नरच्या जागेबद्दल विचारण्यांत आलें; परंतु त्यानें तीही जागा नाकारली; याच वेळेच्या सुमारास त्यानें " ब्रिटिश डोमीनियन इन इंडिया"—प्रस्तुतचें मराठी पुस्तक ज्याचें भाषांतर आहे तें —हें पुस्तक—ह्मणजे " युनिव्हर्सिटी एक्स्टेन्शन " च्या मालेंतील लेख—छापून प्रसिद्ध केले (इ. सन १८९३). एप्रिल महिन्याच्या क्वार्टर्लीमध्यें "सर हेनरी सम्नर मेन याचा जीवनक्रम व त्याचीं व्याख्यानें " या विषयावर आणि " कॉलोनियल पॉलिसी ऑफ फ्रान्स " ह्यासंबंधीं एडिंबरो रिव्हयूमध्यें त्याचा एक लेख प्रसिद्ध झाला; व त्यास "किंग्स कॉलेज"चा आनररी फेलो नेमण्यांत आलें; इ. सन १८९४ सालीं क्वार्टर्ली-मध्यें " हिस्टरी ऑफ फेबल " आणि " नाव्हेल्स ऑफ ॲडव्हेंचर ॲंड मॅनर्स " या दोन विषयांवर आणि एडिंबरो रिव्हयूमध्यें " ट्वेल्व्ह इयर्स ऑफ इंडियन गव्हर्मेंट " आणि " दि लाइफ ऑफ सर बार्टल फ्रेअर " हे त्याचे लेख छापून प्रसिद्ध झाले. इ. सन १९०० सालीं " अँग्लो-साक्सन" रिव्हयूमध्यें " हिरॉइक पोइट्री " या विषयावर, नार्थ अमे-रिकन रिव्हयूमध्यें " ब्रह्मयानिझम " यासंबंधीं, व एडिंबरो रिव्ह्यूमध्यें बायरनच्या बाबतींतील त्याचे लेख प्रसिद्ध झाले; " इंग्लिश मेन ऑफ लेटर्स" ह्या ग्रंथमालेमधील टेनिसनचें चरित्र त्यानें लिहिलें (१९०२), व

पुढें लवकरच त्यास रोम येथें भरणाऱ्या " कांग्रेस ऑफ हिस्टॉरिक साय-न्सेस " मध्यें हजर राहण्यास हिंदुस्थान सरकारतर्फे प्रतिनिधि ह्मणून तिकडे पाठविण्यांत आलें. याच वर्षाच्या (१९०२) जून महिन्यांत त्यास प्रिव्ही कौन्सिलचा मेंबर नेमण्यांत आलें, लार्ड डफरिनचें चरित्र लिहिण्याचें कार्य त्यानें आपल्या अंगावर घेतलें, आणि एडिंबरो रिव्ह्यूमध्यें " इंग्लंड व रशिया यांचे परस्पर संबंध " या विषयावर, आणि दिजंबरच्या फार्टनाइटलीमध्यें "रेस अँड रिलिजन" या विषयावर, त्याचा एक लेख प्रसिद्ध झाला.

इ. सन १९०३ मध्यें सर लायल यानें प्रिव्ही कौन्सिलमधील आपलें काम सोडलें;--इ. सन १९०४ मध्यें रशिया व जपान यांमधील युद्धांत जपानचें राष्ट्र विजयी झाल्यानंतर त्यासंबंधींचें त्याचें मत तर प्रसिद्धच आहे;—इ. सन १९०५ सालीं लार्ड डफरिनचें चरित्र त्यानें पुरें केलें, आणि " एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका " मध्यें अफगाणि-स्थानावर, व इंडिबरो रिव्ह्यूमध्यें "नेटिव्ह स्टेटस इन इंडिया" या विषया-वर, आणि लंडन टाईम्समध्यें लार्ड कर्झन-किशनर यांचेमधील मत-भेदाबद्दल त्यानें लेख लिहिले; इ. सन १९०६ च्या आगष्टमध्यें "एस्टा-ब्लिशमेंट आफ दी ब्रिटिश एंपायर इन इंडिया " या विषयावर युनि-व्हर्सिटी एक्स्टेन्शनच्या विद्यार्थ्यांसमोर त्यानें एक व्याख्यान दिलें; एडिं-बरो रि० मध्यें "दि पोलिटिकल सिच्युएशन इन इंडिया" या विषयावर एक लेख लिहिला (जून), आणि एल्डरशाट येथील एका सम्मेलना-पुढें त्यानें " युरोपियन डोमीनियन्स इन आशिया " या विषयावर व्याख्यान दिलें. इ सन१९०७ सालीं "ब्रिटिश डोमीनियन इन इंडिया" या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढली; याच वर्षाच्या एप्रिल महिन्यामध्यें त्यास बोर्ड ऑफ डलविच गव्हर्नर्सच्या चेअरमनच्या जागीं नेमण्यांत आलें; इ. सन १९०९ मध्यें मोर्ले-मिंटो सुधारणांच्या बाबतींत लार्ड मोर्ले यास उपयुक्त सूचना देऊन मदत केली; इ. सन १९१० मध्यें "दि इंडि-

यन अनरेस्ट" या पुस्तकास प्रस्तावना लिहिली; व एडिंबरो रिव्ह्यूमध्यें "युरोपियन डोमीनियन्स इन आशिया" या विषयावर एक लेख लिहिला.

इ. सन १९११ च्या एप्रिल महिन्यामध्यें ता. ८ रोजीं सर लायल हा लंडनहून फ्यारिंगफर्ड येथें लार्ड टेनिसन याच्याकडे राहण्यास गेला. ता. १० रोजीं सकाळीं तो नेहमींप्रमाणें उठून वाचीत बसला होता; परंतु त्यानें "मी आजारी आहें, आणि मला लंडन येथें परत जावेंसें वाटतें," असें सांगितलें होतें. नंतर तो इकडे तिकडे फिरत होता, इतक्यांत कांहीं थबकन पडल्याचा आवाज झाला, आणि जाऊन पहातात तों सर लायल हा जीवितनिर्विशेष होऊन जमिनीवर पडलेला आहे, असें आढळून आलें ! !

इ. सन १९१० च्या रोजनिशीमध्यें त्यानें असें लिहिलें आहे कीं, "माझ्यापासूनच्या पुढील चार पिढ्या हिंदुस्थानांत सारख्या नौकरीकरितां गेलेल्या आहेत, आणि माझा चुलता हिंदुस्थानांत नौकरींत असतांनाच मृत्यु पावलेला असल्यामुळें माझ्या पांच पिढ्यांचा हिंदुस्थानाशीं सतत संबंध जडलेला आहे."

सर लायल यानें हिंदुस्थानांत असतांना लिहिलेल्या एका पत्रांत "आपल्या वडिलाप्रमाणेंच आपणासही मृत्यु यावा," असें ह्मटलें असून "क्यांटरबरीच्या वरील बाजूस असलेल्या टेकड्यांवरील जुन्या चर्चच्या आंगणांतच आपणासही ठेवण्यांत यावें," अशी इच्छा प्रदर्शित केली असल्यामुळें सर लायल यास त्याच्या इच्छित ठिकाणीं ठेवण्यांत येऊन अशा रीतीनें हिंदुस्थानांतील अत्यंत नामांकित, व अखेरपर्यंत वाङ्मयास वाहून घेतलेल्या एका ब्रिटिश सिव्हिलियन, कवि व ग्रंथकर्त्याची इहलोकींची जीवनयात्रा समाप्त झाली ! ! !

सर लायल यानें इंग्लिश वाङ्मयांत किती भर घातलेली आहे, ह्याचें या ठिकाणीं क्रमवार दिग्दर्शन करणें अवश्यक असल्यानें ती हकीकत याखालीं देऊन हें त्रोटक चरित्र पूर्ण केलें आहे.

सर आलफ्रेड लायल यानें एकंदर पांच पुस्तकें लिहिलेलीं आहेत तीं:-

(१) एशियाटिक स्टडीज (भाग दोन)
(२) वारन हेस्टिंग्स याचें चरित्र
(३) आलफ्रेड टेनिसन याचें चरित्र
(४) मार्क्विस आफ डफरिन अँड आवा याचें चरित्र (भाग दोन)
(५) ब्रिटिश डोमीनियन इन इंडिया.

सर लायल याचे खालील लेख छापून प्रसिद्ध झालेले आहेत:—

(१) " फार्टनाइटली रिव्ह्यू " मध्यें.

(१) अवर रिलिजस पॉलिसी इन इंडिया (फेब्रुवारी १८७२)
(२) रिलिजन ऑफ ॲन इंडियन प्राव्हिन्स (एप्रिल १८७२)
(३) दि रिलिजस सिच्युएशन इन इंडिया (आगष्ट १८७२)
(४) विचक्राफ्ट अँड नानाख्रिश्चन रिलिजन (एप्रिल १८७३)
(५) मिशनरी रिलिजन्स (जुलई १८७४)
(६) ओरिजिन ऑफ डिव्हाइन मिथ्स इन इंडिया (स. १८७५)
(७) फार्मेशन ऑफ इंडियन क्लॅन्स अँड कास्टस (जा. १८७७)
(८) रिलिजस बिलीफ्स अँड मोरॅलिटी (एप्रिल १८७८)
(९) ए रजपूत चीफ ऑफ दि ओल्ड स्कूल (कविता) (अ. १८७८)
(१०) रिलेशन्स ऑफ रिलिजन टु एशियाटिक स्टेटस (फे. १८८२)
(११) रेस एँड रिलिजन (दिजंबर १९०२)
(१२) दि स्टेट इन इट्स रिलेशन्स टु ईस्टर्न एँड वेस्टर्न रिलिजन्स. (नोव्हेंबर १९०८)

(२) " वामदेव शास्त्री " या नांवाखालीं.

(१) मॉरल अँड मटीरियल प्रोग्रेस इन इंडिया (दिजेंबर १८८५)
(२) ब्रह्मयानिझम अँड दि फाऊंडेशन्स ऑफ बिलीफ (नो. १८९५)
(३) दि थिआलजिकल सिच्युएशन इन इंडिया (नोव्हें. १८९८)

(३) " कार्टर्ली रिव्ह्यू " मध्यें.

(१) लाईफ अँड स्पीचेस ऑफ सर हेनरी मेन (एप्रिल १८९३)
(२) हिस्टरी अँड फेबल (जानेवारी १८९४)
(३) नाव्हेल्स ऑफ ऍडव्हेंचर अँड मॅनर्स (अक्टोबर १८९४)
(४) दि सेकंड अफगाण वार (जुलई १९०३)

(४) " एडिंबरो रिव्ह्यू " मध्यें.

(१) दि रजपूत स्टेटस इन इंडिया (जुलई १८७६)
(२) गव्हर्मेंट ऑफ दि इंडियन एंपायर (जानेवारी १८८४)
(३) लाइफ ऑफ माउंटस्टूअर्ट एलफिन्स्टन (जुलई १८८४)
(४) इंग्लंड, अफगाणिस्थान अँड रशिया (जानेवारी १८८६)
(५) इंडिया इन दि ज्युबिली इयर (१८८७) हा लेख अजारीपणामुळें लांबणीवर पडला होता.
(६) कर्झन्स रशिया इन सेंट्रल एशिया (जानेवारी १८९०)
(७) दि गोल्डन बो (आक्टोबर १८९०)
(८) दि कलोनियल पॉलिसी ऑफ फ्रान्स (एप्रिल १८९३)
(९) ट्रेव्हल्व्ह इयर्स ऑफ इंडियन गव्हर्मेंट (जानेवारी १८९५)
(१०) लाइफ ऍंड कोरेस्पान्डन्स ऑफ सर बार्टल फ्रेअर (जु. १८९५)
(११) फॉर्टी-वन इयर्स इन इंडिया (जानेवारी १८९७)
(१२) ऑरिजिन्स अँड इंटरप्रिटेशन्स ऑफ प्रिमिटिव्ह रिलिजन्स (जुलई १८९७)
(१३) आलफ्रेड, लार्ड टेनिसन (आक्टोबर १८९७)
(१४) थ्यॉकरे (आक्टोबर १८९८)
(१५) दि अँग्लो-इंडियन नॉव्हेलिस्ट (आक्टोबर १८९९)
(१६) दि वर्क्स ऑफ लार्ड बायरन (आक्टोबर १९००)
(१७) दि इंग्लिश युटिलिटेरियन्स (एप्रिल १९०१)

(१८) इंग्लंड अँड रशिया डयूरिंग दि नाइंटींथ सेंचरी — हा लेख रिव्ह्यूच्या शतवार्षिकोत्सवाच्या अंकांत प्रसिद्ध झालेला होता.

(१९) दि पोलिटिकल सिच्युएशन इन आशिया (जुलई १९०६)

(२०) कॅरेक्टरिस्टिक ऑफ स्विनबर्नस पोइट्री (आक्टो. १९०६)

(२१) दि पोलिटिकल सिच्युएशन इन यूरोप (जा० १९०९)

(२२) फ्रंटियर्स एनशंट अँड मॉडर्न (जुलई १९०९)

(२३) दि लिबरल एपांयर (ऑलिव्हर) (जानेवारी १९१०)

(२४) युरोपियन डोमीनियन इन एशिया (जानेवारी १९११)

(२५) दि कान्फ्लिक्ट ऑफ कलर (एप्रिल १९११)

वरील यादीवरून लायल साहेबाच्या विद्वत्तेची पूर्ण साक्ष पटत आहे, असें बिनदिक्कत म्हणण्यास कांहींही बाध नाहीं.

वरील बाबतींप्रमाणेंच प्रस्तुतच्या मराठी पुस्तकासंबंधानेंही खालील हकीकत या ठिकाणीं नमूद करणें अत्यवश्यक आहे.

मूळ इंग्लिश पुस्तकाच्या भाषांतरास सुरवात केल्यापासून प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंत—जरी मला अजमासें चार वर्षं सतत परिश्रम, दूरवरचे प्रवास, व बराचसा खर्च करावा लागला, आणि जरी शक्तीबाहेरच्या यातायातीमुळें क्षयाची भावना होऊन पंधरा महिन्यांच्या रजेनंतर नौकरीचा राजीनामाही द्यावा लागला, तरी—मला माझ्या स्नेही, हितचिंतक व इतर सन्मान्य मंडळींकडून आणि मान्य व पूज्य अशा सहविचारिणी सभेकडून वेळोवेळीं जी अत्यंत श्रेष्ठ मदत झाली, आणि या पुस्तकासंबंधींच्या माझ्या प्रत्येक प्रयत्नाला जसें सारखें यश येत गेलें, तशी मदत अथवा यश खरोखर फारच थोड्यांच्या वांट्यास येत असेल. मूळ इंग्लिश पुस्तक ज्यांनीं वाचलेलें असेल, त्यांना—तें किती कठिण आहे, आणि त्यांतील वाक्यरचना किती अवघड व व्यापक आहे, याची—ह्मणजे या पुस्तकाचें मराठींत भाषांतर करण्याचें काम किती

बिकट आहे, याची––बरीचशी कल्पना झाल्याशिवाय राहणार नाहीं; तथापि होतां होईल तों या पुस्तकांत इंग्लिश वाक्यरचनेची फारशी छटा न पडावी म्हणून मी शक्य तितकी काळजी घेऊन अर्थविपर्यास न होऊं देतां भाषांतर सुबोध, आणि लहान लहान वाक्यांत करण्याचाही प्रयत्न केला आहे.

सदरहु पुस्तक तयार करतांना मला —

एफ. लडलो एस्क्वायर, बी. ए. (कँटर्बरी), व्हाइसप्रिन्सिपाल, डी. जे. सिंध कालेज, कराची.

रावबहादुर विष्णु मोरेश्वर महाजनी, एम. ए., एज्यु. इनस्पेक्टर (रिटायर्ड), वऱ्हाड. अकोलें.

प्रिन्सिपाल जी. व्ही. अंबरडेकर, बी ए , माधव कालेज, उज्जन.

प्रोफेसर ए. धोपेश्वरकर, एम. ए , एल. एल्बी., डी. जे. सिंध कालेज, कराची.

,, एच. एल. लागू, बी ए., डी. जे. सिंध कालेज, कराची.

,, एन. एन. गोडबोले, एम ए., बी. एससी., सरदार दयाळसिंग कालेज, लाहोर.

रा. रा. जी. के. भिडे, बी. ए., एल. एलबी., वकील, जळगांव.

,, के. ए. प्रभुदेसाई, बी. ए., एल. एलबी., वकील, जळगांव.

,, ए. आर. रानडे, बी, ए., एल. एलबी., वकील, जळगांव.

,, व्ही. जी. गुर्जर, बी. एससी., वऱ्हाड एज्यु. सर्व्हिस, उमरावती.

,, जी. एम. गोरे, बी. ए., वऱ्हाड एज्यु. सर्व्हिस, खामगांव.

,, एस. व्ही. गोरे, एल. सी. ई., पी. डब्ल्यू. डी. (सातारा जिल्हा).

,, आर. एस. लिमये, एल. सी. ई., पी. डब्ल्यू. डी ; कराची(सिंध).

,, एस. डी. सातवळेकर (मराठी स्कालर), अनारकली, लाहोर.

या विद्वान मंडळीकडून अत्यंत मदत झाली,––विशेषतः लडलो साहेबांनीं फ्रेंच व लॅटिन भाषांतर इंग्रजीमध्यें करून देऊन शिवाय कित्येक

गूढ इंग्लिश वाक्यांच्या व शब्दांच्या बाबतींतही मला वेळोवेळीं, आपला अमूल्य वेळ खर्च करून, मदत केली,—याबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें; परंतु, असें जरी आहे तरी, प्रस्तुतच्या पुस्तकांतील चुकांबद्दल, न्यूनतेबद्दल अथवा अपूर्ततेबद्दलची सर्व जबाबदारी माझ्यावर असून त्याबद्दलच्या सर्व दोषास फक्त मी एकटाच पात्र आहें; इतकेंच नाहीं,पण प्रस्तुतचे पुस्तक सर्व बाजूंनीं परिपूर्ण आहे, आणि त्यांत कांहींही चुका नसतीलच, असेंही माझें ह्मणणें नाहीं. सरळ आणि साधार टीका किंवा सूचना करणाऱ्यांचे आभार मानण्यास आणि शक्य त्या ठिकाणीं पुढील वेळेस दुरुस्ती करण्यास मी केव्हांही तयार असून अशा चुकांबद्दल वाचक वर्गही मला क्षमा करतील, अशी मला पूर्ण खात्री आहे. या पुस्तकांतील बऱ्याच इंग्लिश शब्दांला मराठींत तंतोतंत अर्थबोध होण्यासारखे रूढींत शब्द नसल्यामुळें ते मुद्दाम तयार केले असून अशा व इतर सर्व दुर्बोध शब्दांची यादी इंग्लिश शब्दांसह प्रस्तुतच्या पुस्तकास जोडली आहे, आणि त्यामुळें वाचक वर्गास अर्थबोध होण्यास अधिक सुलभ जाईल; आणि मूळ इंग्लिश पुस्तकांतील दोन तीन चुका या पुस्तकांत दुरुस्त करून घेतल्या असून शिवाय इंग्लिश पुस्तकाप्रमाणेंच प्रस्तुतच्या ग्रंथांत पांच रंगीत नकाशे दाखल केलेले असल्यानें हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याची वाढ क्रमाक्रमानें कसकशी होत गेली, हें वाचकांस सहज समजून पुस्तक वाचतांना त्यांचाही उपयोग होईल, अशी मला आशा आहे.

सहविचारिणी सभेकडून पुस्तक प्रसिद्ध करण्याची परवानगी मिळाल्यानंतर " कॉपीराइट " बद्दल लंडन येथील "जॉन मरे कंपनी" कडे पत्रव्यवहार केला, आणि सदरहू कंपनीनें उदार मनानें " नांवाचा मोबदला " घेऊन मला तो हक्क दिला, याबद्दल मी सदरहू कंपनीचा अत्यंत आभारी आहें.

तथापि " मरे कंपनी " नें मला दिलेल्या हक्काला सर आल्फ्रेड लायल यांचे चिरंजीव, क्याप्टन आर. ए. लायल, पोलिटिकल एजंट,

कुर्रम व्हॅली, पाराचिनार, नार्थ वेस्टर्न फ्रंटियर प्राव्हिन्स, यांची संमति मिळणें अवश्यक असल्यानें साहेबबहादुरांस पत्र पाठवून कराचीहून लाहोर, रावळपिंडी, कोहत, व थल, येथपर्यंत आगगाडीनें, व पुढें पाराचिनार-पर्यंत ६६ मैल मेल—तांग्यानें प्रवास करून साहेबबहादुरांची भेट घेतली. लायल साहेबांनीं माझी राहण्याची व्यवस्था आपल्या बंगल्यांतच स्वतंत्र रीतीनें करून ठेविली असून मला दोन दिवस अत्यंत आग्रहानें व आदरानें ठेवून घेऊन माझ्या कल्पनेबाहेर पाहुणचार केला, व मरे कंपनीनें मला दिलेल्या हक्काला थोर मनानें आपली संमति दिली, याबद्दल मी लायल साहेबांचाही अत्यंत आभारी आहें

त्याचप्रमाणें मुंबईस जाऊन सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांना भेटून प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली, आणि त्यांनींही मेहेरबानीनें ती मान्य करून प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

त्यानंतर, इंदूर संस्थानचे उत्साही, उमेदी व उदार अधिपति श्रीमंत महाराज राजराजेश्वर सवाई तुकोजीराव होळकर सरकार यांना प्रस्तुतचें पुस्तक अर्पण करावें, अशा हेतूनें इंदूरास गेलों. श्रीमंतांनीं दोन वेळां माझी भेट घेऊन मला अत्यंत गौरवानें वागविलें, आणि पुस्तक अर्पण करण्याची परवानगी देऊन माझा बहुमान केला, याबद्दल श्री-मंतांचाही मी अत्यंत ऋणी आहें.

आतां फक्त " सहविचारिणी " सभेचे आभार मानावयाचे आहेत, पण ते दोन शब्दांत न मानतां त्यांनीं माझ्यावर केलेल्या अपवादकारक उपकारांतून अंशतः तरी मुक्त होण्याच्या इच्छेनें माझें कर्तव्य म्हणून मानावयाचे असल्यानें या बाबतींतही थोडेंसें स्पष्टीकरण करणें अत्य-वश्यक व अगत्याचें आहे. विद्याविलासी व विद्वद्रत्नसंग्रही श्रीमंत महा-राज सयाजीराव गायकवाड यांचे आश्रयाखालील ही सभा किती थोर मनाची व उदार अंतःकरणाची आहे, आणि तिनें मराठी वाङ्मयांत नेहमीं

भर चालीत राहण्याची केवढी महत्त्वाची कामगिरी बजाविलेली आहे, ही गोष्ट तर मराठी लेखक व वाचक वर्गास माहीत आहेच; तथापि या सभेसंबंधीं मला आलेला अनुभव तर खरोखर चिरस्मरणीय असाच आहे. सभेनें पुस्तकाचें भाषांतर करण्याच्या वेळेपासून आजपर्यंत मला मी मागितलेली प्रत्येक सवलत अत्यंत थोर मनानें देऊन वेळोवेळीं तिनें आपला महत्त्वाचा सल्लाही मला दिलेला आहे. शिवाय प्रत्येक गोष्ट सभेनें माझ्या सवडीवर ठेवून कोणत्याही बाबतींत यत्किंचित् सुद्धां निकड लावली नाहीं, स्वतःच्याच इच्छेनें या पुस्तकास भरपूर उत्तेजन दिलें, पुस्तक छापण्याची परवानगी दिली, या पुस्तकाच्या रूपानें मला प्रसिद्धीस आणलें, इतकेंच नव्हे, तर या पुस्तकासंबंधींचे सर्व हक्कही माझ्या हवालीं करून सभेनें मला "जन्माची भाकर" दिली, याबद्दल मी सभेचा अत्यंत आभारीच नव्हे, पण कायमचा ऋणी आहें, असें ह्मणणेंही अतिशयोक्तीचें होणार नाहीं. तथापि कदाचित् सभेला सुद्धां, मी तिचें इतकें "स्तुतिस्तोत्र" गाण्याचें कारण नव्हतें, असें वाटण्याचा जरी कांहींसा संभव असला—आणि कित्येकांच्या मनाला, हा कर्तव्याचा हक्क आहे का हक्काचें कर्तव्य आहे, याबद्दलही कदाचित् शंका येण्याचा जरी थोडासा सुमार दिसत असला—तरी स्तुतिपाठकांच्या पंक्तींत न ढकलला जाण्याची व वाजवी आणि मर्यादित स्तुतिनियमांचें उल्लंघन न करण्याची पूर्ण खबरदारी घेऊन उपकारकर्त्यांसंबंधींची आपली कृतज्ञताबुद्धि प्रकट करण्याचा सोपा, सरळ, व शिष्टसंमत असा मला वाटणारा एकटाच मार्ग—ह्मणजे जाहीर रीतीनें सभेचे अत्यंत आभार मानण्याचा मार्ग—मी स्वीकारला असून याबद्दल "सहविचारिणी" सभाही क्षमा करील, अशी मला पूर्ण आशा आहे.

प्रस्तुतच्या पुस्तकाची हल्लींची ही पहिली आवृत्ति पांच हजार प्रतींची काढावी, असा माझा बेत ठरलेला असून त्याप्रमाणें पुस्तक छापण्यास सुरवात केली, व साधारण जवळ जवळ अर्धें पुस्तक -अठ्ठावीस फार्मे अथवा दोनशें

चौवीस पानें -पांच हजार प्रतींचें छापणेंही झालें. परंतु सांप्रतच्या युरोपियन महायुद्धामुळें सर्वच परिस्थितींत ढोबळ फरक झालेला आहे; इतर बाबतींप्रमाणेंच कागदाचे भावही जबर वाढलेले असून ते अजूनही वाढत्या प्रमाणावरच आहेत; इतकेंच नाहीं, पण दिवसेंदिवस कागद मिळण्याचीही पंचाईत पडत चालली आहे. सांपत्तिक ओढाताण आणि महाग कागदाचे आणखी वाढते दर, यांमुळें प्रस्तुतचें पुस्तक तूर्त छापणेंच वास्तविक रीत्या बंद ठेवणें जरी मला सुखाच्या, सवडीच्या व सोईच्या दृष्टीनें फायदेशीर झालें असतें, तरी पुस्तकप्रसिद्धीनंतरची एकदा जाहिरात दिली गेल्यानंतर आणि इतर सर्व व्यवस्था पूर्णपणें ठरून चुकल्यानंतर—स्वतःच्या सोई-सवडीचा आणि सुखसगवडीचा प्रश्न बाजूस ठेवून प्रस्तुतचें काम अर्धवट पडून न राहतां, कसें कां होईना, पुस्तक हें तर प्रसिद्ध झालेंच पाहिजे, या हेतूनें, प्रत्येक आपत्तीस तोंड देऊन, तूर्त एक हजार प्रतीच काढून घेतल्या आहेत तथापि अशा परिस्थितींतही पुस्तकाची पूर्वी प्रसिद्ध केलेली किंमतच कायम ठेविली आहे. आणि प्रस्तुतचा ग्रंथ वाचकांच्या हातीं होईल तितका लवकर पडावा, अशाबद्दलही शक्य ती काळजी घेतली आहे.

प्रस्तुतच्या पुस्तकासंबंधीं निरनिराळ्या प्रकारांनीं मला खरोखर पुष्कळच सद्गृहस्थांची मदत झालेली असून त्यांपैकीं बऱ्याच जणांचे मला नाइलाजानें जाहीर रीतीनें आभार मानतां येत नाहींत. तथापि प्रस्तुतचें पुस्तक लवकर प्रसिद्ध होण्यास, बऱ्याच अंशानें, गुरुवर्य रा रा. चिंतामण गंगाधर भानू, बी ए., माझे मित्र रा. रा. दत्तोपंत पुसाळकर, वकील एरंडोल, श्रीमंत रा. रा. प्रतापशेट, अमळनेर, व श्रीमंत बाबासाहेब देशमुख, इलिचपूर, वगैरे मंडळी कारणीभूत असल्यानें त्यांचेही या ठिकाणीं आभार मानणें इष्ट आहे.

प्रस्तुतच्या पुस्तकांतील श्रीमंत होळकर सरकारच्या फोटोचें काम रा. रा. डी काशीनाथ, मु. मुंबई, (धी बांबे आर्ट प्रिंटिंग वर्क्स, मुंबई,) यांनीं, व नकाशाचें काम रा. रा. गणेश रामचंद्र गुर्जर, रामवाडी, (पुणें),

यांनीं अत्यंत काळजीनें व नियमित वेळांत करून दिलें, याबद्दल त्यांचा, आणि रा. रा. शिवराम महादेव परांजपे, गोवर्धन प्रेसचे मालक, यांनीं आपल्या छापखान्यांत प्रस्तुतचें पुस्तक अत्यंत काळजीनें बरीच अडचण व झीज सोसून शक्य तितकें लवकर छापून दिलें, याबद्दल त्यांचा, आणि वर ऐतिहासिक विवेचनामध्यें दर्शित केलेल्या कित्येक बाबतींसंबंधीं घेतलेल्या आधारांबद्दल त्या त्या लेखकांचा, मी अत्यंत आभारी आहें.

सरते शेवटीं ज्या दयाघनाच्या कृपेनेंच हें महत्कार्य तडीस गेलें, त्या परम दयाळू परमेश्वराचें अनन्यभावानें स्मरण करून—आणि प्रस्तुतच्या महायुद्धांत आपल्या ब्रिटिश साम्राज्य सरकारालाच यशःप्राप्ति होवो, व हिंदुस्थानावर ब्रिटिश साम्राज्यानें "युनियन जॅक" अखंड फडकत राहून ब्रिटिश अमलाखालींच हिंदुस्थानची दिवसेंदिवस भरभराट होत जावो, अशी त्या जगच्चालक प्रभूजवळ करुणा भाकून—मी हा विषयोपन्यास पुरा करतों.

रंगीत नकाशे.

हिंदुस्थानचा ऐतिहासिक भूगोल दाखविणारे.

*** हिंदुस्थानांत निरनिराळ्या काळीं ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील अगर संरक्षणाखालील प्रदेशाचा विस्तार कसकसा होत गेला, हें ढोबळ मानानें दाखविण्याच्या उद्देशानें हे नकाशे दिलेले आहेत; प्रांत किंवा स्थळें यांचें विशिष्ट वर्णन देण्याच्या उद्देशानें ते दिलेले नाहींत.

इंग्रजी कठिण शब्दांचे अर्थ.

Act of war लढाईचा उपक्रम.
Balance of Power राष्ट्राराष्ट्रांमधील परस्परविषयक सत्तेचा समतोलपणा.
Barrier Treaty प्रतिबंधक तह.
Base of Operation रणभूमीचा पाया.
Buffer आघातप्रतिबंधक पोलादी कमान.
Buffer State आघातप्रतिबंधक राज्य.
Coalition Ministry संयुक्तप्रधानमंडळ.
Confederacy जुटीचें बळ.
Defensive निग्रहात्मक, आत्मरक्षक.
Deplomatic Representative राजकीय हितसंबंध पाहणारे प्रतिनिधि.
Essential character वैशिष्ट्य.
Extra-Territorial liability जादा-राष्ट्रीय-जबाबदारी.
Field Deputy सैन्याच्या हालचालींवर नजर ठेवण्याकरितां नेमिलेला रणक्षेत्रप्रतिनिधि.
Field of Operation रणक्षेत्र.
Flying Column शीघ्रगामी फौजेची कतार.
Guerilla Warfare ...

कित्येक अपरिहार्य कारणांमुळें पांचवा नकाशा—"बुकमार्क" सह— अजूनही तयार झाला नाहीं, म्हणून सदरहू पुस्तक नाइलाजानें तसेंच प्रसिद्ध करावें लागलें आहे. सदरहू शेवटचा नकाशा व बुकमार्क "येत्या पहिले तारखेस देण्याचें करीन" असें रा. गुर्जर यांनीं आम्हांस कळविलें असून ते मिळाल्यावर आमच्या खर्चानें वर्गणीदारांकडे पाठविण्यांत येतील.-**ग्रंथकर्ता.**

...ांत ठरलेला कायदा.

...पलटण.

...ति.

...जकीय धोरणाच्या
...ष्टीनें योजावयाचे तातडीचे इलाज, किंवा अवश्यक तजविजी.

Political Gravitation राजकीय गुरुत्वाकर्षण.
Political System राजकारणपद्धति.
Protectorate संरक्षित राज्य.
Protectorate Ally संरक्षित दोस्त सरकार.
Regular army शिस्तीचें सैन्य, खडें सैन्य.
Regulating Act अनुशासनपद्धतीचा कायदा.
Resident राजकीय प्रतिनिधि.
Sleeping Partner सुप्त कार्यसभासद (सुप्त कार्यसभासद).
Sphere of Deplomacy राजकारणाचें क्षेत्र.
Sphere of Influence वर्चस्वाचें क्षेत्र.
Sphere of Operation रणक्षेत्र, सैन्याच्या हालचालींची जागा.
Standing Army जय्यत सैन्य, तयार फौज.
Strategical Frontier युद्धशास्त्रदृष्ट्या अगर व्यूहरचनेच्या दृष्टीनें ठरलेली मर्यादा.
Subsidiary alliance तैनाती दोस्ती, तैनाती सैन्याच्या कुमकेची दोस्ती.
Subsidiary Treaty तैनाती तह, सहकारी कुमकेदाखल तैनाती फौजेचा तह, सहकारी कुमकेचा तह.
System of Protectorate संरक्षक राज्यपद्धति.
Trade Monopoly व्यापारी कुलमक्ता, व्यापारी विशिष्ट मक्ता.
Triple alliance त्रिकुट दोस्त मंडळ, त्रिकुटी तह, त्रिवर्गांची जूट.
Water—Shed जलोत्सर्ग पठार.

कालानुक्रमाप्रमाणें या ग्रंथांतील विषयांची अनुक्रमणिका.

भाग पहिला.

हिंदुस्थानाशीं चालणाऱ्या व्यापाराबद्दल प्रारंभींची चढाओढ.

भाग दुसरा.

युरोप आणि आशिया यांमधील राजकारणाचें वजन आणि त्यांच्यामधील परस्परसंबंध.

भाग तिसरा.

ईस्ट इंडिया कंपनीचें दृढीकरण.

भाग चवथा.

फ्रेंच व इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी.

भाग पांचवा.

हिंदुस्थानांतील फ्रेंचांची डुप्ले याच्या अमलाखालील कारकीर्द.

भाग सहावा.

हिंदुस्थानांत फ्रेंचांबरोबरील इंग्लिशांचें दुसरें युद्ध.

भाग सातवा.

बंगालमधील दिग्विजय.

भाग आठवा.

बंगालमधील परिस्थिति.

भाग नववा.

मराठे आणि म्हैसूर.

भाग दहावा.

राज्यव्यवस्थेची घटना.

भाग अकरावा.

वारन हेस्टिंग्स या गव्हर्नर जनरलाची कारकीर्द.

भाग बारावा.

वारन हेस्टिंग्स आणि लार्ड कार्नवालिस या दोन गव्हर्नर जनरलांच्या कारकीर्दींच्या दरम्यानचा काळ आणि इंग्लंडमधील कामकाज.

भाग तेरावा.

लार्ड कार्नवालिस आणि सर जान शोअर ह्या गव्हर्नर जनरलांची कारकीर्द.

१७९१ इंग्लिशांनीं बंगलोर शहर घेतलें

१७९२ टिपूनें स्वामित्व-हक्क-त्यागानें आपल्या राज्यापैकीं कांहीं प्रदेश देऊन शांततेच्या तहावर सही केली २९४

१७९३ फ्रान्सबरोबरील स्नेहभंग व युरोपमधील जंगी लढाईची सुरवात (पांडेचरी इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतली) २९४

बंगालमध्यें कायम धाऱ्याची पद्धत सुरू करण्यांत आली २९०

लार्ड कार्नवालिस यानें हिंदुस्थान सोडलें ३०९

हिंदुस्थानांतील लढायांना आळा घालण्याकरितां पार्लमेंटमधून एक कायदा मंजूर झाला ३०४

१७९३–९८ सर जान शोअर (लार्ड टेनमौथ) या गव्हर्नर जनरलाची कारकीर्द ३०९

१७९४ महादजी शिंद्याचा मृत्यु २९६

१७९५ खरडे येथील लढाईंत निझाम मराठ्यांना शरण आला ३०९

१७९५--९६ डच लोकांपासून सिलोन घेण्यांत आलें ३०८

१७९७ अफगाणिस्थानचा राजा झेमनशहा यानें पंजाबवर स्वारी केली ३१०

१७९७–९८ फ्रेंच आणि अफगाण लोकांबरोबर टिपू यानें पत्रव्यवहार केला ३११–१२

१७९८ बोनापार्ट यानें ईजिप्तवर स्वारी केली ३११–१२

टिपू यानें मारीशस येथें आपलें एक प्रतिनिधिमंडळ पाठविलें ३११

१७९९ कायरो मुक्कामाहून नेपोलियन बोनापार्ट यानें टिपू सुलतानास पत्र पाठविलें ३१२

भाग चौदावा.

लार्ड वेल्स्ली ह्या गव्हर्नर जनरलची कारकीर्द.

भाग पंधरावा.

स्थाइक काळ.

भाग सोळावा.

लार्ड हेस्टिंग्स या गव्हर्नर जनरलाची कारकीर्द.

भाग सतरावा.

ब्रिटिश साम्राज्याची पूर्तता.

* मूळ इंग्लिश ग्रंथांत " प्रेसिडेन्सी " असें चुकून पडलेलें आहे.

भाग अठरावा.

भाग एकोणिसावा.

राणी सरकारच्या अमलाखालील हिंदुस्थान.

परिच्छेद पहिला—बाह्य राजकारण.

(इ. सन १८५८ पासून १९०७ पर्यंत.)

परिच्छेद दुसरा – अंतःस्थ राज्यव्यवस्था.

(१८५८–१९०७)

१—मूळ ग्रंथांत लार्ड डलहौसी असें चुकून पडलें आहे.
२—मूळ ग्रंथांत १८९७ असें चुकून पडलें आहे.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य

भाग पहिला.

हिंदुस्थानाशीं चालणाऱ्या व्यापाराबद्दल प्रारंभींची चढाओढ.

परिच्छेद पहिला—इताली, स्पेन व पोर्तुगाल.

अति प्राचीनकाळापासून युरोपखंडाचा आशियाखंडाच्या आग्नेय भागांतील संपत्तिमान व समृद्ध देशांशीं-विशेषतः हिंदुस्थान व मलाया द्वीप-समुच्चयांतील बेटांशीं--होत असलेला व्यापार हा जगांतील चालणाऱ्या सर्व व्यापाराचा एक अत्यंत किफायतशीर भाग आहे. ह्या व्यापाराकरितांच युरोपमधील अधिक धाडशी व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें जमिनीवर व समुद्रावर तीव्र आणि चिकाटीची चढाओढ चाललेली असून जसजशी त्या राष्ट्रांची साहसी कृत्यें करण्याची हिंमत आणि द्रव्यलालसा हीं वाढत गेलीं, तसतशी त्यांची चढाओढही बळावत चालली; आणि या व्यापाराचा सर्वांत मोठा भाग पुष्कळ काळपर्यंत ज्या प्रत्येक शहराच्या किंवा राष्ट्राच्या हातीं राहिला, तीं सर्व त्यामुळें फार सधन झालीं. जवळ जवळ अठरांशें वर्षेंपर्यंत, ह्मणजे टालेमीच्या काळापासून तों बहुतेक पोर्तुगीज

---

१ राबर्टसनकृत *Disquisition concerning Ancient India* या ग्रंथाच्या आधारें.

लोकांनीं आफ्रिकेंतील " केप ऑफ गुड होप " ला वळसा घालीपर्यंत, अलेक्झँड्रिया हें व्यापाराचें मुख्य ठिकाण असून जलमार्गाच्या व्यापाराचें मध्यस्थान होतें. रोमन बादशहांना इजिप्तची एकसारखी भरभराट वाढत जावी अशी अतिशय कळकळ वाटत होती; त्यामुळें त्यांनीं तांबड्या समुद्रांतील व्यापारी दळणवळण सर्वस्वी आपल्या ताब्यांत ठेवण्यासाठीं जिवापाड मेहनत केली. त्यांनीं हिंदुस्थानचा व्यापार अरब लोकांपासून आपल्या हातीं हिसकावून घेण्यासाठीं आणि एडन (हें हल्लींप्रमाणेंच पूर्वीही अतिशय महत्त्वाचें नाकें होतें) काबीज करून घेण्यासाठीं अरबस्थानच्या नैर्ऋत्य किनाऱ्यावर अनेक वेळां आरमार पाठवून स्वाऱ्या केल्या; आणि वास्तविक पाहतां त्यांच्या ह्या प्रयत्नाला जरी यश मिळालें नाहीं, तरी त्यानंतर सोळाशें वर्षांनीं इंग्लिश लोकांनीं अखेरीस आपलें वर्चस्व तांबड्या समुद्रांत जसें प्रस्थापित केलें, तसेंच वर्चस्व स्थापन करण्याचा त्यांचा उद्देश होता. जरी रोमन लोकांचें आरमार अरब लोकांना हुसकून लावण्या इतकें सामर्थ्यवान् नव्हतें, तरीही युरोपिअन लोकांचा फ्लेव्हियन बादशहांच्या वेळीं असलेला समुद्रावरील थेट पूर्वेकडील देशांशीं चालणारा व्यापार कांहीं पल्ल्याच्या फेरफारानंतर जो मार्ग शेवटीं पुनः कायम ठरला गेला त्याच मार्गानें बहुतेक चालत होता, असें दिसतें. ह्या मार्गानें इजिप्त, सुवेज, एडन, यावरून हिंदी महासागरांतून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या बंदरांकडे जातां येत असे; परंतु जलमार्गानें होत असलेला हा पूर्वेकडील व्यापार पाल्मिरा शहरांतील सधन आणि धाडशी व्यापारी खुष्कीच्या मार्गानें इराणी आखातांतून युफ्रेतीस नदीच्या मुखांतून वर सीरियापर्यंत नेण्याचा प्रयत्न करीत होते, व त्यांच्या ह्या कृत्यामुळें रोममध्यें उत्पन्न झालेला मत्सर हें त्या भरभराटीस आलेल्या शहराचा नाश होण्याला जीं अनेक कारणें झालीं त्यांपैकीं एक असावें, असें ह्मणतात. याप्रमाणें रोमन राष्ट्रसत्ता ज्या वेळीं कळसास जाऊन पोहोंचली, त्या वेळीं रोमन लोकांनीं आशिया-

खंडांतील व्यापाराच्या मुख्य मार्गावर इंग्लंड खेरीजकरून इतर कोणत्याही युरोपांतील राष्ट्रांपेक्षां अधिक अशी आपली फार मोठी सत्ता चालविली होती; फरक इतकाच कीं, ह्या दळणवळणाचे मार्गावर इंग्लंडचें पूर्ण वर्चस्व असून हिंदुस्थानांत त्यांचें राज्य असल्यानें या बलाढ्य व्यापारी प्रवाहाच्या उगमाचा सर्वांत मोठा भाग त्यांच्या ताब्यांत आहे, आणि हीच गोष्ट त्यांना विशेष फायदेशीर झालेली आहे.

ह्या वेळीं ब्याझेंटाईन राष्ट्र सुधारलेलें असून त्यामुळें तांबडा समुद्र आणि इराणी आखात यांमधील व्यापाराचे मार्ग निर्भय होते; परंतु महंमदाच्या मागून गादीवर बसलेल्या राजांच्या हाताखालील अरब लोकांच्या टोळ्यांनीं वारंवार केलेल्या स्वाऱ्यांमुळें त्या राष्ट्राचा नाश झाला. इजिप्त आणि सीरिया या देशांमध्यें जेव्हां महंमदी धर्मतत्त्वांनीं अतिशय हुतूतू माजविला, तेव्हां कांहीं काळपर्यंत कान्स्टांटिनोपल हें शहर भूमध्यसमुद्राच्या पूर्वेकडील भागांतील व्यापाराची मुख्य उतारपेठ बनलें; त्या वेळीं हिंदुस्थान व चीन ह्या देशांशीं असलेला व्यापाराचा मुख्य ओघ मुसलमान लोकांनीं नुकत्याच उद्ध्वस्त केलेल्या देशांना टाळून मध्य आशियांतून काळ्या समुद्राच्या मार्गाकडे वळला होता. "आठव्या आणि नवव्या शतकांत कान्स्टांटिनोपल हें युरोपस्थ व्यापाराचें मुख्य ठिकाण झालें होतें, आणि त्या वेळीं युरोपांतील व्यापार ह्या शहराबरोबर जितका पूर्णपणें चालत असे, तितका आजपर्यंत पुढें एकाही शहरांत चालला नाहीं." त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या आरमारांपैकीं ग्रीक लोकांचें आरमार सर्वांत मोठें होतें; परंतु अव्यवस्थित राज्यकारभार, कर वसूल करण्यांत जुलूम, आणि परकीय लोकांच्या स्वाऱ्या, यांनीं ब्याझेंटाईन राष्ट्राचा नाश झाला. कान्स्टांटिनोपल येथील व्यापाराला ज्या वेळीं उतरती कळा लागली, त्या वेळीं आशियाखंडांतील मुसलमान लोकांनीं

---

१ फिनलेकृत *Byzantine Empire* हें पुस्तक पहा, पान २४८.

स्वाऱ्या करून जे प्रदेश उद्ध्वस्त केले होते, त्या प्रदेशांच्या कक्षेबाहेर असलेल्या व्हेनिस व जिनोवा ह्या दोन शहरांच्या व्यापाराचा अतिशय उत्कर्ष झाला. व्हेनीशियन लोकांनीं भूमध्यसमुद्राच्या पलीकडे इजिप्त-मध्यें चवथ्या धर्मयुद्धाकरितां तयार केलेलें सैन्य नेण्याचा करार केल्यानंतर ल्याटीन लोकांनीं इ. सन १२०४ मध्यें काबीज करून घेतलेल्या कान्स्टांटिनोपाल शहरावर फार अदूर दृष्टीनें व्यापारी चढाओढीस बळी पडून स्वारी करण्याचा आग्रह धरिला; परंतु त्या स्वारींत बसलेल्या धक्यानें ग्रीक लोकांची पूर्वेकडील सत्ता खिळखिळी होऊन लय होण्याच्या पंथास लागली, आणि त्यामुळें त्यांच्याकडून स्वाऱ्या करणाऱ्या तुर्क लोकांच्या टोळ्यांना तेव्हांपासून कमी कमी प्रति-बंध होत गेला. या अवधींत आशिया खंडांतील मौल्यवान व्यापारी जिन्नस युरोपमध्यें नेण्याच्या बाबतींत इतालींतील शहरें हीं दलालवजा मुख्य स्थानें बनलीं होतीं; आणि तींही इतकीं कीं, पंधराव्या शतकामध्यें व्हेनीशियन लोक "पूर्वेकडील सधन प्रांत आपल्या कामगिरीचा मोब-दला या नात्यानें आपल्या ताब्यांत ठेवीत" असें दिसत होतें; कारण त्यांनीं हा बराच किफायतशीर व्यापार बहुतेक सर्व आपल्याच हातांत ठेविलेला होता.

त्या शतकाच्या अखेरीस जगांतील व्यापारी इतिहासांत अकल्पित आणि बहुतेक एकाच वेळीं दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्यांपैकीं पहिली अमेरिका खंडाचा शोध व दुसरी केप आफ गुड होपला वळसा घालून जातां येतां येण्याच्या रस्त्याची माहिती ही होय. ह्या दोन महत्त्वाच्या शोधांमुळें आशियाखंडाशीं जलमार्गानें चाललेला व्यापार अति-शय वाढला; आशिया खंडाच्या दक्षिणेकडील आणि अटलांटिक महा-सागराच्या किनाऱ्यावरील देशांत जलमार्गानें सरळ दळणवळण चाल-ण्याचे नवे रस्ते शोधून काढल्यामुळें व्यापाराचा मुख्य ओघ तिकडे वळला, आणि आशिया खंडांत उत्पन्न झालेल्या जिनसांच्या ऐवजीं सोनें

व रुपें देतां यावें म्हणून त्यांचा अतिशय पुरवठा वाढत गेला. पृथ्वीचे पूर्वेकडील व पश्चिमेकडील देशांचे नवीन शोध लागल्यामुळें जलपर्यटणाचें काम मोठ्या प्रमाणावर वाढलें. आणि त्या वेळेपासून युरोपस्थ लोकांनीं आपलें श्रेष्ट प्रकारचें कौशल्य, धाडशी स्वभाव, व भांडवल, यांच्या योगानें मोठमोठ्या समुद्रांवरील व्यापाराचा मक्ता आपल्या हातीं ठेविला आहे. या नवीन धाडसाच्या कामामध्यें वर्चस्व मिळविण्याकरितां युरोपियन राष्ट्रांची आपसांत लवकरच मोठी निकराची स्पर्धा सुरू झाली. पोप अलेक्झँडर बोरजिया यानें आज्ञापत्र काढून स्पेन व पोर्तुगाल ह्या देशांमध्यें ख्रिस्तीधर्मेतर सर्व अज्ञात देश वांटून दिले. त्यांत हिंदुस्थान देश पोर्तुगालला दिला; त्यामुळें आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर दक्षिणेकडेस आपला राज्यविस्तार सर्व पंधराव्या शतकभर रेटीत नेणाऱ्या पोर्तुगीज लोकांनीं तो झपाट्यानें वाढविण्याची सुरवात केली. त्यांनीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर किल्ले बांधून वसाहती करण्याला, हिंदी महासागरांतील महत्त्वाचीं ठाणीं आपल्या ताब्यांत घेण्याला, आणि अलेक्झँड्रिया व कान्स्टांटिनोपल येथील मुसलमान बादशहांनीं हिंदी महासागरामधील युरोपियन लोकांचें वर्चस्व कमी करण्याचा केलेला सर्व प्रयत्न हाणून पाडण्याला आपल्या जिवाकडे न पाहतां मोठ्या आवेशानें सुरवात केली. आपल्या वैभवाच्या शिखरावर असतांना युरोपांतील तुर्कस्थानचा सुलतान, सुलेमान धि म्याग्निफिशंट, यानें हिंदी महासागरामधून पोर्तुगीज लोकांना घालवून देण्याचे जे प्रयत्न केले, तेही सर्व निष्फळ झाले, ही मोठ्या सुदैवाचीच गोष्ट समजली पाहिजे; आणि जर हा तुर्कस्थानचा वैभवशाली सुलतान यशस्वी झाला असता, तर ख्रिस्ती राष्ट्रांना पूर्वेकडे राज्यविस्तार करण्याला मोठा धोका आला असता. कारण, त्याची सत्ता सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं तांबडा समुद्र आणि इराणी आखात ह्यांमध्यें अबाधित होती, त्याचें आरमार भूमध्यसमुद्रामध्यें निर्भयपणें संचार करीत होतें, आणि इजिप्त व सीरिया ह्या देशांमधून हिंदुस्थानशीं व्यापार करण्याचा जुना व

सरळ मार्ग जर तुर्कस्थानला आपल्या हातीं ठेवितां आला असता, तर यावर मिळविलेल्या संपत्तीच्या योगानें त्याचें सैन्यबळ व आरमारी सत्ता हीं प्रचंड वाढलीं असतीं. तुर्की राष्ट्रानेंच नव्हे, पण बास्फरसच्या सामुद्रधुनीमधील इतर कोणत्याही अबाढव्य लष्करी राष्ट्रानें आशिया खंडांतील व्यापाराचे मार्ग आपल्या ताब्यांत ठेवून हल्लींच्या या आमदानींत मुद्धां अर्ध्या युरोपखंडावर आपला दरारा बसविला असता, व तीनशें वर्षांपूर्वीं तर तें अजिंक्यच झालें असतें. तथापि समुद्रमार्गानें व्यापार चालू झाल्यास आपल्या व्यापाराला फार मोठा धक्का बसेल, हें भविष्य जेव्हां व्हेनीशियन लोकांना स्पष्टपणें कळून चुकलें, तेव्हां त्यांनीं तुर्कस्थानच्या सुलतानाला मोठ्या नेटानें मदत केली, पण ती निष्फळ झाली. हिंदुस्थानांतील मालानें भरलेलीं जहाजें आशियाकडून लिसबन येथील बंदरांत परत आलेलीं पाहिल्याचें तेथील व्हेनीशियन वकिलानें जेव्हां आपल्या सरकाराला कळविलें, तेव्हां त्यांना समजून आलें कीं, आपल्या व्यापाराचा एक अतिशय मोठा महत्त्वाचा भाग आपल्या हातांतून समूळ नाहींसा होण्याची फार भीति आहे. त्यानंतर सोळाव्या शतकाच्या शेवटीं युरोपांतील समुद्रांत पूर्वेकडील व्यापारावरील मुख्य सत्ता म्हणजे एक अतिशय अमोल्य हक्क इतालियन शहरांच्या हातून कायमचा नाहींसा झाला; आणि त्या वेळेपासून त्यांच्या व्यापाराचा जो हळू हळू ऱ्हास होत गेला, त्यावरून त्यांच्या भरभराटीचें आणि राज्यविस्ताराचें उगम-

---

१ ज्या मोठ्या उत्पन्नानें तें शहर श्रीमान झालें असतें, त्या उत्पन्नाची हिंदुस्थानांतील व्यापार बहुतेक सर्व जगभर पसरल्यामुळें सरकारला कमतरता पडूं लागली, अशी बातमी समजली, तेव्हां सेनेटमधील सभासदांच्या मनावर तिचा पुष्कळच प्रमाणानें परिणाम झाला.

स्थान कोठें होतें, हें स्पष्टपणें दिसून आलें. या वेळीं भूमध्यसमुद्र व काळा समुद्र यांवरील किनारा, अलेक्झँड्रिया, कान्स्टांटिनोपल, व्हेनिस, आणि जिनोवा, ह्या सर्व ठिकाणांपासून हिंदुस्थानचा युरोपखंडाशीं असलेला फायदेशीर व्यापार त्या खंडाच्या पश्चिम भागांतील दर्यावर्दी राष्ट्राच्या हातीं गेला. पोर्तुगीज लोकांनीं हिंदी समुद्रावरील इतरांचा व्यापार बंद पाडून बहुतेक सर्व व्यापारी सत्ता कांहीं काळपर्यंत आपल्याच हातांत ठेविली होती; कारण त्यांच्या राजांनीं इराणी आखातापासून सिलोनपर्यंत आशियाखंडाच्या सर्व दक्षिण किनाऱ्यावर पाहरा करण्याकरितां आपल्या आरमाराची कुमक पाठवून ह्या आलेल्या संधीचा फायदा घेण्याला क्षणाचाही विलंब लाविला नाहीं. त्यांनीं इराणी आखातांतील आरमारी ठाणीं आपल्या ताब्यांत घेतलीं, आणि तांबड्या समुद्रामध्यें आपलें आरमारी वर्चस्व स्थापन करण्याकरितां नेटाचा प्रयत्न केला. परंतु इ. सन १५१७ मध्यें सुलतान उस्मानअली यानें इजिप्त देश आपल्या राज्याला जोडल्यामुळें पोर्तुगीज लोकांना तुर्क लोकांचें आरमार फार भारी झालें. इ. सन १५८०मध्यें पोर्तुगाल देश स्पेन देशास जोडला गेला, आणि त्यामुळें त्या देशांतील लोकांचीं मोठमोठीं साहसी कृत्यें करण्याची हिंमत आणि तडफ हीं पार चिरडलीं गेलीं, व अशा रीतीनें पोर्तुगाल देशाची अतिशय भरभराटीची स्थिति अल्पावधींतच नष्ट झाली. स्पॅनिश लोकांनीं ह्या मिळालेल्या संधीचा फायदा करून घेतला नाहीं. हिंदुस्थानामध्यें लांबच्या सफरी करण्यापेक्षां अमेरिकेंत मौल्यवान धातु मिळविण्याकरितां खाणी खणणें हें त्यांना अधिक सोपें

---

१ "केप आफ गुड होप"च्या व मागाहून कांहीं दिवसांनीं केलेल्या इतर प्रदेशांच्या शोधानंतर इताली देश व्यापारी जगाच्या केंद्रामधून एकीकडेस घसरला; स्पष्ट म्हणावयाचें म्हणजे तो जगाच्या एका कोपऱ्यांत पडला, आणि तेथेंच अजूनहीं तो पडलेला आहे.

मांतेस्कां—इस्पि देल्वा, भाग २१.

वाटलें, आणि आपल्या संपत्तीचा सदुपयोग करण्या ऐवजीं ते तिचा संग्रह करण्याचा प्रयत्न करूं लागले. स्पेन देशाचा सर्व व्यापार हा मुख्यत्वेंकरून तेथील सरकारच्या मालकीचा असे, आणि त्यांचा उद्देश प्राधान्येंकरून सोनें व रुपें ह्यांच्या खाणी मिळविण्याचा असल्यानें त्यांची प्रवृत्ति व्यापारापेक्षां देश जिंकण्याकडेच अधिक होती. त्यामुळें रोमन लोकांच्या वेळेपासून आजपर्यंत हिंदुस्थानच्या व्यापारानें युरोपखंडांतील सोनें आणि रुपें हीं धुवून नेलीं असून इतर देशांशीं व्यापार करणें म्हणजे देशांतील संपत्ति गमविणें. असा युरोपखंडांतील इतर देशांप्रमाणेंच स्पेन देशांतील लोकांचाही भ्रामक समज होता, आणि ह्या समजुतीनें परदेशांत सोनें व रुपें पाठविण्याची त्यांनीं सक्त मनाई केली असल्यामुळें आशियाखंडाशीं त्यांचा असलेला व्यापार नामशेष झाला होता. व्यापाराच्या बाबतींतील ह्या खोट्या कल्पनेमुळें युरोपखंडाचा परदेशाशीं असलेला व्यापार न वाढतां त्याची वाढ बऱ्याच प्रमाणानें खुंटली गेली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण सोनें आणि रुपें यांचा निर्गत व्यापार करून तुम्ही इंग्लंडला भिकारी करीत आहांत, असा ईस्ट इंडिया कंपनीवर सतराव्या शतकामध्यें नेहमीं दोषारोप केल्याचें आपल्या पाहण्यांत येतें; परंतु समुद्रावर व्यापार करणाऱ्या लोकांना दूरच्या देशाशीं व्यापार करण्याच्या संवईनें आणि त्याला लागणाऱ्या अवश्य गोष्टींच्या ज्ञानानें खरा अनुभव मिळालेला असल्यामुळें असें खास समजून आलें होतें कीं, वायुभारमापक यंत्रांतील पाऱ्याचा पृष्ठभाग कांहीं विवक्षित उंचीच्या मर्यादेपर्यंतच ज्याप्रमाणें जातो, त्याचप्रमाणें मौल्यवान धातूंना देखील त्यांच्या किंमतीच्या बाबतींत एक ठरीव स्वाभाविक उंचीची मर्यादा असून तेथपर्यंतच त्यांची वाढ होऊं शकते, व त्यांचें प्रमाण अधिक झाल्यास त्यांना उलट खावी लागते; पण हीच गोष्ट इतर लोकांना कळण्याला खरोखर फारच अवधि लागली.

या कारणामुळें सोळावें शतक संपण्याच्या सुमारास आशियाखंडाचा युरोप खंडाशीं असलेला समुद्रावरील व्यापार भूमध्यसमुद्रांतील शहरें, अलेक्झँड्रिया, कान्स्टांटिनोपल, व्हेनिस व जिनोवा, येथील व्यापारी लोकांच्या हातून नाहींसा होऊन तो अटलांटिक महासागर व उत्तर समुद्र यांच्या आसपास असलेल्या दर्यावर्दी लोकांच्या हातांत झपाट्यानें जात चालला होता. जलमार्गानें व्यापार करण्याच्या सरळ मार्गाचा शोध लागला होता; पश्चिमेकडील राष्ट्रांमध्यें व्यापारी चढाओढ सुरू होत होती; आणि समुद्रांतील दळणवळणाचा हा नवीन मार्ग उपलब्ध झाल्यामुळें युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांमधील संबंध दृढ होण्याला आणखी नवीं कारणें उत्पन्न झालीं होतीं. हा संबंध हळुहळु, परंतु बिनधोक, वाढत जाऊन त्याचा परिणाम दोन्हीही खंडांच्या भावी इतिहासावर आणि दर्यावर्दी राष्ट्रांच्या राजकारणावर पुष्कळ अंशीं झालेला आहे, आणि त्यामुळेंच हिंदुस्थानचें सर्व भवितव्यही निश्चित झालेलें आहे. जेव्हां इलिझाबेथ राणीनें (इ. सन १५७८ मध्यें जाहीर झालेलें) डच लोकांच्या लोकसत्तात्मक राज्याचें स्वातंत्र्य कबूल केलें, आणि त्यामुळें स्पेन देशाशीं लढाई करणें भाग पडलें, तेव्हां वर लिहिल्याप्रमाणें स्पेन देशाच्या ताब्यांत असलेल्या आशिया खंडांतील पोर्तुगीज लोकांच्या वसाहतींवर इंग्लंड व हालंड ह्या दोन्हीही देशांचीं आरमारें स्वारी करण्याकरितां पाठविण्यांत आलीं. हालंड देशांतील संयुक्त प्रांताची दुसऱ्या फिलिप बरोबर निकराची लढाई सुरू झाली होती, त्यामुळें पूर्व समुद्रांतील प्राटेस्टंट व्यापाऱ्यांच्या खुनशीपणाच्या हाडवैराला स्पॅनिश लोकांचीं जहाजें बळी पडलीं; आणि स्पेनच्या आरमारावर (इ. सन १५८८) मिळविलेल्या प्रसिद्ध विजयानें इंग्लिश लोकांत आत्मविश्वास उत्पन्न झाला. इ. सन १५८९ मध्यें इंग्लिश व्यापाऱ्यांनीं इलिजाबेथ राणीला जें एक विनंतिपत्र पाठविलें, त्यांत ईस्ट इंडीज बेटांमधील आपल्या साहसाच्या व्यापारी कृत्यांच्या बेतांना जोरानें पुढें ढकलण्याबद्दल

परवाना मागितला असून त्या कृत्याला प्रोत्साहन देण्याबद्दल त्यांनीं मागणी केली होती. त्या विनंतिपत्रामध्यें त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, "अशा व्यापाराच्या योगानें पोर्तुगीज लोकांच्या आरमाराप्रमाणें आपल्या देशांतही जलपर्यटणाचीं साधनें वाढत जाऊन चांगले खलाशी निर्माण होतील आणि त्याचप्रमाणें आरमारी बळही निःसंशय वाढल्यावांचून राहणार नाहीं." तथापि ईस्ट इंडीज बेटांमध्यें स्पॅनिश लोकांच्या असलेल्या व्यापारी हक्कांत ढवळाढवळ करण्याची इंग्लंडनें जी तयारी केली, तिच्या योगानें ते इतके नाखुष झाले कीं, त्या वेळीं त्या देशाबरोबर तह करण्याच्या खटपटींत असलेल्या इलिजाबेथ राणीच्या प्रधान मंडळाला इ. सन १५९९ मध्यें इंग्लिश कंपनीला तेथील व्यापाराची सनद देण्याचा आपला विचार अठरा महिने लांबणीवर टाकावा लागला. तथापि ईस्ट इंडियाकडे सफरी करणाऱ्या धाडशी व्यापारी लोकांनीं वारंवार केलेल्या विनवण्यांवरुन लंडन कंपनीला इ. सन १६०० मध्यें इलिजाबेथ राणीनें पंधरा वर्षांची व्यापार करण्याची सनद दिली. अशा रीतीनें ह्या लंडन कंपनीला कायदेशीर मूर्त स्वरूप देणारी ही "सनद" हें एका मोठ्या धाडशी व्यापारी व्यवसायाचें प्रारंभसूचक, ऐतिहासिक दृष्ट्या स्मारक असून ज्या पुढील तीन शतकांमध्यें उत्तरोत्तर वाढत गेलेल्या आशियांतील व्यापारामुळें ब्रिटिश राष्ट्र संपत्तिमान होऊन बलाढ्य बनलें, त्या व्यापाराच्या ओघाची दिशा दाखवून त्याचें उगमस्थान कोठें आहे, हेंही हीच "सनद" निदर्शनास आणीत आहे.

शिवाय, या वेळीं आशिया खंडाशीं स्वतंत्रतेनें आणि शांततेनें सर्व राष्ट्रांनीं व्यापार करण्याचा समान हक्क डच लोकांनीं स्पेन देशाच्या अबाधित वर्चस्वाविरुद्ध प्रस्थापित केला होता; तथापि वसाहती करणें किंवा नवीन जमीन लागवडीस आणणें याबद्दल राष्ट्रांराष्ट्रांमध्यें समानत्वानें असणाऱ्या हक्का इतकेंच याही समानतेच्या व्यापारी हक्काला

खरोखर महत्त्व दिलें जात असे. प्रत्येक राष्ट्र ह्या फायदेशीर व्यापाराचा शक्य तितका अधिक भाग आपल्या ताब्यांत घेण्याचा आणि इतर परवानगी शिवाय व्यापार करणाऱ्या लोकांना जबरदस्तीनें प्रतिरोध करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतें; व्यापारावर पूर्ण आणि स्वामित्वाचा ताबा मिळविण्याकरितां सर्वजण आपआपसांत झगडत होते; जमिनीवरील लढायांप्रमाणेंच ते आतां समुद्रांतीलही लढाया मारीत असत, आणि कोणी आगंतुक व्यापारी त्यांच्या व्यापारी क्षेत्रांत व्यापार करूं लागला, तर जणूं काय तो आपल्या देशावरच चढाई करून आला आहे, असें समजून त्याच्यावर ते त्वेषानें चाल करुनही जात असत. सोळाव्या शतकाच्या शेवटीं स्पॅनिश लोक ईस्ट इंडियाशीं असलेल्या व्यापारावर आपला पूर्ण हक्क असून तो आपल्या स्वामित्वाचा एक भाग आहे, असें जाहीर रीतीनें प्रतिपादन करूं लागले. हिंदी समुद्रावर आपलें एखाद्या प्रांताप्रमाणें स्वामित्व आहे, असें ते म्हणत; त्यांनीं स्वत:खेरीज दुसऱ्या कोणत्याही युरोपस्थ राष्ट्राला तेथील समुद्र किनाऱ्यावर बंदर बांधण्याची परवानगी दिली नव्हती; त्यांनीं असें जाहीर केलें होतें कीं, "ईस्ट आणि वेस्ट इंडीज हीं बेटें आमच्या मालकीचें घर असून शंभराहून अधिक वर्षें तीं आमच्या खाजगी ताब्यांत आहेत, आणि आमच्या परवानगीशिवाय दुसऱ्या कोणालाही या बेटांमध्यें शिरण्याचा हक्क नाहीं." ह्मणजे हल्लीं ग्रेटब्रिटन हें जसें हिंदुस्थान देशावर आपला साम्राज्याचा हक्क सांगत आहे, त्याप्रमाणेंच तेही त्या अफाट प्रदेशावर आमचीच सत्ता आहे, असें जोरानें प्रतिपादन करीत असत. ईस्ट इंडीज बेटांमधील स्पेनच्या सल्लागार मंडळीच्या अध्यक्षानें इंग्लंडच्या वकिलाजवळ असें स्पष्ट बोलून दाखविलें होतें कीं, "दुसऱ्या देशांतील लोकांना ईस्ट इंडीज बेटांमध्यें येण्याला अतिशय कडक प्रतिबंध राखण्याकरितां केलेल्या सक्तींत अगर शिक्षेंत दया दाखविण्यापेक्षां त्यांचा छळ करण्याकडेसच आमच्या मनाची अधिक प्रवृत्ति आहे, आणि येथील व्यापार खुला न ठेवण्याचीं

कारणें इतर देशांतील कारणांहून भिन्न आहेत; कारण, हा प्रदेश राष्ट्रनीतीप्रमाणें स्पॅनिश लोकांचा आहे." इ. सन १६०९ मध्यें स्पॅनिश लोकांनीं ईस्ट इंडीज बेटांमध्यें व्यापार करण्याकरितां साहस करणाऱ्या हालंडमधील कोणत्याही रहिवाशाला अत्यंत कडक शिक्षा दिली जाईल, अशी भीति घातली; परंतु स्पेन व त्यांतील बंडाचें निशाण उभारलेले प्रांत यांच्यामध्यें युरोपखंडाप्रमाणेंच आशिया खंडांतही कडाक्याचीं युद्धें सुरू झालीं, आणि हीं युद्धें हिंदी महासागराच्या किनाऱ्यावरील पोर्तुगीज लोकांचें पुष्कळ दिवसांपासून असलेलें आधिपत्य फार झपाट्यानें रसातळास नेण्यास कारणीभूत झालीं. मलाकाची सामुद्रधुनी व चिनी समुद्र ह्या दोन्हीही ठिकाणीं निर्वाणीच्या चकमकी उडाल्या, आणि त्यांत पोर्तुगीज लोकांचा पराभव होऊन त्यांची निर्दयपणानें कत्तल उडविण्यांत आली. त्यानंतर स्पेन आणि हालंड यांचेमध्यें तह झाला, आणि त्या अन्वयें स्पेननें हालंड देशाचें स्वातंत्र्य कबूल केलें; परंतु त्यामध्येंही पूर्वेकडील व्यापाराचा प्रश्न हा अतिशय कठिण आणि दुराग्रहाचा मुद्दा होता. डच लोकांनीं ईस्ट इंडीज बेटांशीं असलेला आपला समुद्रावरील संबंध जर आपल्या तर्फे सोडून दिला, तर आपणही नेदरलंडच्या संयुक्त प्रांतावरील आपला हक्क सोडून देऊं, असें इ. सन १६०७ मध्यें स्पेनच्या राजानें कबूल केलें. परंतु डच लोकांना ईस्ट इंडीज बेटांशीं त्यांचा असलेला समुद्रावरील व्यापार ही आपल्या राज्यांतील एक अतिशय मौल्यवान मालमत्ता आहे, असें वाटत असे. दोन्हीही देशांच्या आरमारी सत्तेचें अस्तित्व आणि जीवित्व ईस्ट इंडीज बेटांशीं असलेल्या व्यापारावरच सर्वस्वी अवलंबून आहे, हें ते जाणून होते; युरोपखंडामध्यें स्पॅनिश लोकांनीं केलेले जुलूम व अपकार यांची फेड आशियाखंडांत करण्याला

---

१ एका पोर्तुगीज जहाजाचा अगदीं किनाऱ्यापर्यंत पाठलाग करण्यांत आला, आणि दोन किंवा तीन मनुष्यां खेरीज बाकी सर्वांना समुद्रांत बुडवून मारण्यांत आलें. (इ. स. १६०७ मधील दप्तरी दाखला).

ईस्ट इंडीज बेटें आपल्या ताब्यांत राहणें फार उपयोगाचें होईल, आणि त्यावरील हक्क आपण सोडला तर आपला नाश होईल, ही गोष्ट डच लोक समजून चुकलेले होते; त्यामुळें ईस्ट इंडीज बेटांमध्यें मोकळेपणानें व्यापार करण्याच्या आपल्या असलेल्या हक्काबद्दल ते इतके नेटानें हट्टाला पेटले कीं, स्पॅनिश लोकांनीं जरी उघड उघड अनुकूलता दर्शविली नाहीं, तरीही त्यांना तो नाद सरते शेवटीं सोडून द्यावा लागला.

परिच्छेद दुसरा—हालंड, इंग्लंड व फ्रान्स.

परंतु डच लोकांनीं जरी स्पेन देशाविरुद्ध खुल्या व्यापाराचें तत्त्व प्रस्थापित केलें, तरी असें करण्यांत त्यांचा अंतस्थ हेतु व्यापारांत आपलें पूर्ण वर्चस्व असावें, हा होता. इ. सन १५९७ ते १६०० यांचे दरम्यान डच लोकांच्या जहाजांनीं प्रथमच केप आफ गुड होपला वळसा घालून आशिया खंडांतील समुद्रांत प्रवेश केला, आणि त्या ठिकाणीं स्पॅनिश सैन्यानें त्यांना अतिशय क्रूरपणानें वागविलें. इ. सन १६०२ ह्या वर्षी हालंडमध्यें "युनिव्हर्सल ईस्ट इंडिया कंपनी" ह्या नांवाची एक व्यापारी मंडळी स्थापन झाली; तींत सर्व प्रांतांतील लोकांचें भांडवल होतें, व तिला एकटीलाच केप आफ गुड होपच्या पूर्वेकडे व म्यागलेन सामुद्रधुनीच्या पश्चिमेकडे व्यापार करण्याचा, हालंडच्या संयुक्त प्रांतातर्फे लढाया व तह करण्याचा, सैन्य ठेवण्याचा, आणि सैन्याधिकारी नेमण्याचा पूर्ण अधिकार दिलेला होता. त्यांनीं मसाल्याच्या बेटांतून आणि हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून स्पेनच्या राजसत्तेखालीं असलेल्या पोर्तुगीज लोकांना हांकलून लावण्याविषयीं, तिकडे वसाहत करण्याविषयीं, आणि शत्रूचा प्रांत आपल्या स्वामित्वाखालीं आणण्याप्रमाणें सर्व पूर्वेकडील व्यापार सर्वस्वी आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याविषयीं हुकूम देऊन मोठमोठ्या बलिष्ठ आरमाराच्या तुकड्या तिकडे पाठविल्या होत्या. त्यांनीं ह्या कामांत पहिल्यानें इंग्लिश लोकांची मदत घेतलेली असून

आशिया खंडांतील व्यापारी क्षेत्रावर कंपनीच्या नांवाखालीं अगदीं प्रथमच ते आतां राजरोस पुढें आलेले होते. परंतु युरोपमध्यें जरी त्यांनीं इंग्लंडबरोबर सख्य राखिलेलें होतें, तरी आशियाखंडांत या दोन्ही राष्ट्रांतील कंपन्यांचीं लवकरच आपसांत भांडणें सुरू झालीं. "ईस्ट इंडीज बेटांतील व्यापारी क्षेत्रांतून हालंडचे व्यापारी आपणाला हाकलून लावीत आहेत, करितां आमची दाद घेऊन रक्षण करण्याबद्दल" लंडनच्या व्यापाऱ्यांनीं इ. सन १६११ मध्यें आपल्या सरकाराला विनंति केली, आणि ह्या बाबतीचा निकाल लावण्याकरितां जेव्हां ह्या दोन्ही राष्ट्रांतील लोकांचें मिळून एक पंचमंडळ नेमलें गेलें, तेव्हां डच लोकांनीं "मसाल्याचा सर्व व्यापार आमचा आहे," असें निक्षून सांगितल्यामुळें, मध्यस्थ या नात्यानें कोणतीही तडजोड होणें अशक्य झालें. इ. सन १६१९ मध्यें डच लोकांचीं ईस्ट इंडीज बेटांत ९१ जहाजें होतीं, आणि त्यांचें स्वतःचें भांडवल नऊ लक्ष पौंडांचें (१,३९,००,००० रुपये) असून शिवाय चार लाख पौंड (६०,००,००० रुपये) त्यांनीं व्याजी घेतले होते, असें म्हणतात. ही गोष्ट त्या वेळींही व्यापाराला किती महत्त्व होतें याची दर्शक असल्यामुळें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. इंग्लिश कंपनीनें इ. सन १६१९ मध्यें दोन जहाजांवरील मालाबद्दल चौदा हजार पौंड (२,१०,००० रुपये) जकात भरली, आणि इ. सन १६१६ मध्यें फक्त एका जहाजावरील मालाची किंमत जवळ जवळ एक लाख चौदा हजार पौंडाहून (१७,१०,००० रुपये) पुष्कळच अधिक होती. डच व इंग्लिश लोकांनीं मिळून एक जाइंट स्टॉक कंपनी (सामायिक भांडवलाची मंडळी) काढावी, व्यापार करण्याचें क्षेत्र उभयतांनीं वांटून घ्यावें, आणि ईस्ट इंडीज बेटांमधून स्पॅनिश लोकांना पूर्णपणें हांकलून देण्याकरितां दोघांनींही आपापलीं सैन्यें एकत्र करावीं, अशी सूचना हालंडनें केली होती; परंतु कांहीं अंशीं पहिल्या जेम्सचा स्पेन देशाशीं दोस्ती करण्याकडे त्या वेळीं कल असल्यामुळें ती सूचना फेटाळली गेली.

याप्रमाणें इंग्लंड व हालंड यांचेंमधील ह्या अतिशय फायदेशीर व्यापाराच्या वाटणीसंबंधाचीं व मर्यादेविषयींचीं प्रारंभींचीं भांडणें थांबविण्याचे किंवा मिटविण्याचे सर्व प्रयत्न सहजच निष्फळ झाले, आणि याचा परिणाम फक्त इतकाच झाला कीं, या होऊं घातलेल्या भांडणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होऊन गेला.

परंतु एका बाबतींत मात्र ह्या दोन प्रॉटेस्टंट राष्ट्रांचें अंतःकरणपूर्वक एक मत झालें; ती बाबत म्हणजे स्पेन व पोर्तुगाल या देशांतील लोकांशीं कडव्या दुष्मनगिरीनें वागणें ही होय. त्यांनीं पोर्तुगीज लोकांचा पराभव करून त्यांना हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून हांकलून लावण्याच्या कामीं जिवापाड मेहनत घेतली. याच वेळीं पोर्तुगीज लोकांनीं एक मोठें जहाज लुटलें, आणि त्या जहाजावरील मालाच्या भागांत बादशहाची आई ही एक प्रमुखत्वानें भागीदार असल्यामुळें बादशहाचीही पोर्तुगीज लोकांवर (इ. सन १६१३ ते १६१९) अतिशय खप्पा मर्जी झालेली होती. त्या वेळचा इंग्लिश कंपनीचा पत्रव्यवहार पोर्तुगीज लोकांशीं झालेल्या भयंकर लढायांच्या वर्णनांनीं भरलेला आहे, आणि त्यांमधील एका पत्रांत–सुरत येथील उदाहरण घेतलें, तर तेथें झालेल्या लढाईमध्यें चारशेंपासून पांचशेंपर्यंत पोर्तुगीज लोक ठार मारण्यांत, जाळण्यांत आणि बुडविण्यांत आले–असें लिहिलेलें आहे. एका साधारण पत्रांतही या कांहींशा रुधिरप्रचुर व्यापाराच्या हकीकतीचा उल्लेख केलेला असून भाषेंत कांहींही फरक न करितां त्याच्या खालींच कंपनीच्या व्यवहारविषयक व्यापारी जिनसांचे भाव आणि हिंदुस्थानच्या हवेंत उडून जाणाऱ्या रंगांची यादी दिलेली आहे. असें म्हणतात कीं, इ. सन १६१९च्या सुमारास पोर्तुगालच्या व्यापाराला बेसुमार उतरती कळा लागली होती, व पोर्तुगाल देशही झपाट्यानें दारिद्र्यावस्थेंत येऊं लागला होता, पण त्या गोष्टीकडे स्पॅनिश सरकारनें मुळींही लक्ष दिलें नाहीं. याचे उलट हालंडमधील लोकसत्तात्मक राष्ट्र हिंदुस्थानशीं असलेला व्यापार

ही आपल्या राज्यांतील एक महत्त्वाची बाब आहे, असें समजून आपल्या व्यापारी कंपनीला मोठमोठ्या रकमांची मदत करीत असे. परंतु जगांतील ह्या भागांत पोर्तुगीज लोकांच्या ऐवजीं डच लोक प्रतिस्पर्धी झाले, म्हणून इंग्लिश कंपनीला त्यांत कांहीं फायदा झाला, असें मात्र बिलकुल म्हणतां येत नाहीं. पहिल्या दोन स्टुअर्ट राजांच्या मनाचा कल प्रथम कांहीं काळपर्यंत स्पेन देशाकडे होता, व नंतर फ्रान्स देशाकडे त्यांचा ओघ वळला. या त्यांच्या धरसोडीच्या वर्तनानें डच लोकांचें इंग्लिश लोकांवरून प्रथमच मन उडालेलें होतें, आणि त्यांतून वाढत्या व्यापाराच्या चढाओढीची त्यांत भर पडून त्याला पुष्टि आली होती, असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं. त्या वेळेपासून सर्व सतराव्या शतकभर डच व इंग्लिश यांच्यामध्यें हिंदुस्थानांतील व्यापारांत वर्चस्व मिळविण्याकरितां आणि तें कायम राखण्याकरितां अवश्य असलेल्या वसाहती आपल्या ताब्यांत ठेवण्यासाठीं परस्परांत सतत आणि नेटानें युद्धकलह सुरू असून या सर्वांचा निर्देश ईस्ट इंडिया कंपनीच्या त्या काळच्या इतिहासांत केलेला आढळतो. डच लोकांनीं हळुहळु पोर्तुगीज लोकांच्या बहुतेक मुख्य वसाहती खालसा केल्या होत्या; ते या सर्व समुद्रांवर व बेटांवर युरोपस्थ लोकांपैकीं आमचीच मुख्य सत्ता आहे असें प्रतिपादन करीत; आणि त्यामुळें त्यांचा नेहमीं इंग्लिश लोकांबरोबर कडाक्याचा खटका उडत असे. तथापि या वेळीं इंग्लिश लोक ह्या भागामध्यें अगदीं कमजोर होते, व पहिला जेम्स आणि त्याचा मुलगा चार्लस यांच्या अस्थिर व अप्रिय राज्यव्यवस्थेमुळें त्यांच्या व्यापारी साहसाला दुजोरा मिळालेला नव्हता.

हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, त्या दिवसांच्या " ईस्ट इंडीज " ह्या पारिभाषिक शब्दांमध्यें वस्तुतः फक्त हिंदुस्थानचाच समावेश होत नव्हता, तर बंगालच्या उपसागराच्या पूर्व बाजूचे देश, मलाकाची सामुद्रधुनी, जावा, सयाम व पुढें पूर्वेकडील जावा आणि चिनी समुद्रां-

तील सेलबीज व मोलाक्कससारखीं मसाल्याचीं सर्व बेटें यांचाही त्यांत समावेश होत असे. इंग्लिश कंपनीनें चीन आणि जपान ह्या देशांशीं देखील जोरानें व्यापारी दळणवळण सुरू केलें होतें, आणि व्यापारांत व्यापारी जिनसांवर "जवळ जवळ दामदुप्पट नफा ठेवून विकणें" हा त्या वेळीं त्यांचा योग्य दर आहे, असें समजलें जात होतें. सतराव्या शतकाच्या पहिल्या अर्ध भागांत मसाल्याच्या बेटांतील व्यापार हा सर्वांत पुष्कळच महत्त्वाचा आणि फायदेशीर होता.[1] ईस्ट इंडीजमधील व्यापाराच्या ह्या मुख्य भागांतून डच लोकांनीं इंग्लिश लोकांना बाहेर घालवून लावण्याचा निश्चय केला होता; कारण, खरोखर त्या व्यापारावरच त्यांच्या सरकारची आणि लोकांची बहुतांशीं भरभराट अवलंबून होती. डच लोकांनीं इंग्लिश कंपनीच्या मलाका सामुद्रधुनीच्या पलीकडे पूर्व आशियांतील समुद्रांमधील व्यापारी दळणवळणाला वास्तविक रीत्या इतके अडथळे आणले व इतक्या भानगडी उपस्थित केल्या कीं, त्या प्रदेशांतील पुष्कळ ठाणीं इंग्लिश कंपनीनें हळु हळु सोडून दिलीं, आणि दिवसानुदिवस हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर व लगतच्या प्रदेशामध्यें त्यांनीं आपल्या व्यापाराचा ओघ अधिक अधिक वळवीत आणला. इंग्लिशांचीं हिंदुस्थानच्या मुख्य टापूवरील बंदरें आणि वखारी, यांमध्यें व्यापाराचें मुख्य केंद्र करण्याची असलेली प्रवृत्ति आणि मोंगल बादशहाबरोबर सख्य वाढविण्याकडे त्यांचा असलेला कल, यांपासूनच त्यानंतर त्यांच्या झालेल्या वाढीची दिशा आणि स्वरूप यांसंबंधानें कित्येक फार महत्त्वाचे व दूरवरचे परिणाम घडून आले, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

अशा रीतीनें समृद्ध व्यापारी पेठांच्या बाबतींत जें भांडण सुरू झालें, त्यामुळें "सनदशीर मंडळी" स्थापन करण्याची त्या वेळीं विशेष

१ इ. सन १६०६ ह्या वर्षी क्लोव्ह बेटामध्यें एका इंग्लिश जहाजानें व्यापारी मालासह जलपर्यटण केलें, आणि त्यांत त्याला मूळ मुदलावर शेकडा दोनशेंचौतीस टक्के नफा झाला. (ब्रूसकृत "*Annals of the East India Company*" या पुस्तकाच्या आधारें).

जोरानें प्रेरणा झाली; कारण आशियांतील समुद्रामध्यें आरंभीं व्यापार करणाऱ्या लोकांना स्वतःच धडपड करुन व्यापाराला मार्ग करावा लागत असून शिवाय साध्य झालेली स्थितिही हातांतून न गमविण्याबद्दल त्यांनाच काळजी घ्यावी लागत होती. त्यांना स्वतःच्या सरकाराकडून मदत मिळणें शक्य नसे, अगर मिळाल्यास ती फारच थोडी मिळेल असें वाटत असे; पण उलट युरोपियन प्रतिस्पर्धी व्यापाऱ्यांच्या कड्या हाडवैराशीं टक्कर देणें मात्र त्यांना भाग पडत असे. समुद्र किनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांना एखाद्या प्रांतापेक्षां व्यापाराची किंमत अधिक वाटत असून मोठमोठे जय मिळविण्यापेक्षां मोठ्या प्रमाणावर व्यापार करणें हेंच त्यांना अधिक महत्त्वाचें वाटत असतें; परंतु राष्ट्रांराष्ट्रांतील असलेले नियमित राजकीय संबंध कांहीं ठरीव विवक्षित मर्यादेपलीकडे एकमेकांस वस्तुतः बांधूं शकत नाहींत, असा युरोपांत त्या वेळीं समज होता; त्यामुळें आरमार आणि माऱ्याच्या जागा हातीं असल्याशिवाय दूरच्या देशांशीं असलेला व्यापार बिनधोकपणें चालणें कधींही शक्य नव्हतें. एखादें एकटेंच जहाज सांपडलें, तर तें पकडून नेहमीं बुडविलें जात असे; समुद्रांतील एखाद्या बंदरांत एकटीच लहान व्यापारी वसाहत असली, तर तिचा तद्देशीय राज्यकर्त्याकडून अगर सुभेदाराकडून छळ होण्याचा किंवा ती लुटली जाण्याचा संभव असे; शिवाय युरोपियन प्रतिस्पर्धी व्यापारीही तिचा धंदा बुडविण्याकरितां झटून जिवापाड खटपट करीत असत. इ. सन १५९८ मध्यें फ्रान्स आणि स्पेन या उभयतांत तह झाला, आणि त्यांत ठरल्याप्रमाणें कॅनरी बेटाच्या पश्चिमेकडील प्रदेशांत "प्रत्येक गोष्टींत बळी तो कान पिळी" हें तत्त्व पूर्णपणें अमलांत आणलें गेलें. स्पेन व पोर्तुगाल हे पूर्वेकडे आशियांत राजकीय आणि धार्मिक बाबतींत आमचा अधिकार अमर्याद आहे, असें म्हणत; तरी हें त्यांचें म्हणणें इतकें भ्रामक आणि अनिश्चित स्वरूपाचें होतें कीं, तें राष्ट्रांराष्ट्रांमधील कायद्याला कधींही स्पष्टपणें मान्य झालें

नसतें. एखाद्या सरकारला त्याच्या प्रजेनें केलेल्या कृत्याबद्दल जाब देण्याची प्रत्यक्ष हमी घेण्याचा प्रसंग न आणतां किंवा दोन हात करण्याला तयार असलेल्या व्यापारी लोकांच्या दांडगाईबद्दल अगर त्यांच्या स्वैर वर्तनाबद्दल त्यांच्या सरकारच्या अंगावर जबाबदारी पडूं न देतां आपला व्यापार वाढविणें व प्रांत काबीज करून घेऊन त्याला कायमपणा आणणें याकरितां या परिस्थितीला साजेल अशी शोधून काढलेली "सनदशीर व्यापारी मंडळ्यांची स्थापना" ही एक उत्तम तोडीस तोड होती; कारण, सनद देणें ह्याचाच अर्थ कांहीं विवक्षित कार्याकरितां कांहीं विशिष्ट राजकीय हक्क देणें हा होता; म्हणजे, एका दृष्टीनें त्यांना खाजगी रीतीनें लढाया करण्याला सरसकट मुभाच देण्यांत आली होती. ह्या पद्धतीचा त्या वेळेपासून एक बराच लांबलचक, उलाढालीचा, व आश्चर्यजनक इतिहास बनलेला असून त्याचा अजून देखील कोणत्याही प्रकारें शेवट झालेला नाहीं.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा पाया यदृच्छेनें घडून आलेल्या धाडशी कृत्यानेंच उभारला गेला, अशी साधारण लोकांची समजूत आहे. परंतु ती खरी नसून वर लिहिलेल्या सनदशीर पद्धतीवरच तो उभारला गेला आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे; इतकेंच नव्हे, तर उलट वसाहती आणि व्यापार वाढविण्याला स्वतंत्र आणि श्रीमान लोकांना ही "सनदशीर पद्धत" हें एक जबरदस्त हत्यार झालें. पश्चिम युरोप आणि आशिया खंडांतील तांबड्या समुद्रापासून चीन आणि जपान-पर्यंतचीं सर्व बंदरें यांमधील व्यापारांत हिस्सा अगर जमल्यास अनियंत्रित स्वामित्व हें या भांडणाबद्दल मिळणारें बक्षीस होतें. ईस्ट इंडिया कंपनीच्या फार पूर्वीच्या दफ्तरांत असा दाखला आढळतो कीं, आशिया खंडांतील गलबतें जातां येतां येण्यासारख्या सर्व समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशांत, अरबी समुद्रांत, इराणच्या आखातांत, आणि हिंदुस्थानच्या पश्चिमेपासून तों तहत चीनच्या ईशान्य दिशेपर्यंत लागणाऱ्या

प्रत्येक बेटाशीं ज्या ज्या ठिकाणीं व्यापार करणें शक्य होतें, त्या त्या प्रत्येक ठिकाणीं युरोपियन राष्ट्रें व्यापारी नफा आणि विशिष्ट हक्क ह्यांकरितां या वेळीं नेटानें झगडत होतीं. ज्या बक्षिसाकरितां त्यांची चढाओढ लागलेली होती, त्याचें महत्त्व किती आहे, हें त्यांना त्या वेळीं सुद्धां पूर्णपणें माहीत होतें, आणि त्यानंतरच्या इतिहासावरून असें सिद्ध झालेलें आहे कीं, त्या झगडणाऱ्या राष्ट्रांची युरोपांतील संपत्ति, स्वातंत्र्य आणि राजकीय वर्चस्व, हीं त्यांच्या हिंदुस्थानांतील जयापजयावरच विशेषत: अवलंबून होतीं. स्पेनचें मोठें आरमार आणि सैन्य हीं परदेशांतून आणलेल्या मालाच्या नफ्याच्या पैदाशीवरच पोसलीं जात असत; डच लोकसत्तात्मक राष्ट्रानें प्रतिरोध करण्यांत दाखविलेल्या भयंकर चिकाटीच्या मुळाशीं त्या लोकांचा समुद्रावरील असलेला व्यापार हेंच कारण होतें; आणि इंग्लंडचा मोठेपणाही त्याच्या जगभर पसरलेल्या व्यापारामुळेंच उघड उघड प्रस्थापित झालेला आहे. सतराव्या शतकामध्यें समुद्रांतील व्यापाराची फार महत्त्वाची शाखा आशिया खंडाशीं मालाची अदलाबदल करणें ही होती, आणि प्रत्येक राष्ट्राच्या सरकाराचें तो व्यापार आपल्या ताब्यांत घेण्याकरितां चालू असलेल्या भांडणांत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें अंग होतें. स्पेन व पोर्तुगाल येथील जुलमी राजसत्तेखालीं असलेल्या समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशाचा शोध लावणाऱ्या पहिल्या लोकांनीं आपल्या राजाच्या नांवानें प्रदेश काबीज केले आणि नौकानयनाचे हक्कही प्रस्थापित केले; व त्यांच्या सरकारानेंही लागलीच त्या सर्व जिंकून मिळविलेल्या प्रदेशांना व हक्कांना आपल्या राज्याचा एक पूर्ण स्वामित्वाचा भाग ह्मणून आपल्या राज्यांत

---

१ खरोखर या वेळीं आम्हां युरोपस्थ लोकांना समुद्रावरील सत्तेचा फायदा पुष्कळच आहे, आणि विशेषत: ग्रेट ब्रिटनच्या राज्याला तर ही सत्ता ही एक मुख्य देणगीपैकींच आहे. कारण एक तर युरोपांतील बहुतेक राष्ट्रें समुद्रवेष्टित आहेत, आणि दुसरें, दोन्हीही इंडीजमधील संपत्ति पुष्कळ अंशीं ज्याची समुद्रावर अधिक सत्ता असेल त्याला सुलभ रीतीनें मिळण्यासारखी आहे.

बेकन, *Of the true Greatness of Kingdoms* मधील उतारा.

सामील केलें. डच लोकसत्तात्मक राष्ट्र आणि त्याची ईस्ट इंडिया कंपनी, या उभयतांमध्यें जरी औपचारिक रीत्या भेद असल्याचें नेहमीं दाखविलें जात असे, तरी वास्तविक रीत्या त्यांचा परस्पर अतिशय निकट संबंध होता. एका इंग्रजी माहितीपत्रकावरून असें कळतें कीं, इ. सन १६१८ मध्यें या कंपनीचे भागीदार बहुतेक प्रिव्ही कौन्सिलचे सभासद सरदार, न्यायाधीश व मध्यम वर्गांतील मोठे लोक हे असून तिला सोळा लक्ष पौंडांचें (२,४०,००,००० रुपये) खात्रीचें भांडवल मिळालेलें होतें. इ. सन १६१७ मध्यें इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें आपलें दुसरें सामायिक भांडवल उभारलें, तेव्हां लंडनमध्यें १६,२०,०४० पौंडांची (२,४३,००,६०० रुपये) रकम एकदम गोळा झाली, आणि इ. सन १६२२ च्या दफ्तरांत असा दाखला मिळतो कीं, हिंदुस्थानामध्यें जो माल ३,५६,२८८ पौंडांला (४८,९४,३२० रुपये) विकत घेतला होता, त्याचें उत्पन्न इंग्लंडमध्यें १९,१४,६००पौंड(२,८७,१९,०००रु.) झालें. या वेळीं ह्या दोन बलाढ्य व्यापारी कंपन्या ह्मणजे सत्ता आणि साधनें यांनीं लहानशा दोन संस्थानांच्या तोडीच्या होत्या. हालंडचें राष्ट्र आणि त्याची ईस्ट इंडिया कंपनी यांचा शरीर आणि अवयव ह्यासारखा एकवटलेल्या एक जिवाचा संबंध होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं; परंतु इंग्लिश कंपनीनें पहिल्यापासून अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत निराळाच मार्ग स्वीकारला होता. त्या योगानें इंग्लिश सरकारचा कंपनीशीं एखाद्या " सुप्तकार्य सभासदा " पेक्षां अधिक कांहींही संबंध नव्हता. त्यानें कोणत्याही तऱ्हेची जोखीम घेतलेली नव्हती; फारच स्वल्प जबाबदारी घेतलेली असून कधीं नफ्यांतील अधिक भाग मागणें किंवा सनद नवी करून देते वेळीं जबर दंड घेणें ह्यापलीकडे त्यानें संबंध ठेविलेला नव्हता. परंतु जेव्हां आपल्या राज्याच्या सर्वसाधारण हितसंबंधांत तडजोड होण्याचा संभव असे, तेव्हांच फक्त तें जागें होऊन मदत करी. अशा अमोल्य वर्चस्वाचें पाठबळ आणि

स्वावलंबनानें पाहिजे तें करण्याची मुभा, यांमुळें इंग्लिश कंपनी आपल्या राष्ट्राच्या मदतीच्या अपेक्षेवरच अवलंबून नसून आपल्या स्वतःची संपत्ति व उत्साह ह्यांवर अवलंबून असे. कंपनीवर कांहीं जिवावरील संकटेंही आलीं, आणि तिनें कांहीं नांव घेण्यासारखीं धाडशी महत्कृत्येंही केलीं.

सोळाव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत व्यापाराकरितां देशोदेशीं भटकत फिरणाऱ्या युरोपिअन लोकांनीं खाजगी रीतीनें केलेल्या लढायांच्या मर्यादेची व्याप्ति राष्ट्रनियामक कायद्याच्या आणि सर्वगामी राजनीतिपटुत्वाच्या या हल्लींच्या युगांत कदाचित् क्वचित्‌च समजून येण्यासारखी आहे. जर हिंदुस्थानांतील अगर इराणी आखातांतील इंग्लिश व्यापाऱ्यांनीं आपलीं गाऱ्हाणीं दूर करण्याच्या कामीं अगर डच, फ्रेंच किंवा पोर्तुगीज यांच्याशीं असलेलीं भांडणें मिटविण्याच्या बाबतींत आपल्या सरकाराला भाग ह्मणून नाइलाजानें कळविलें असतें, तर त्यांचा कधींच नायनाट उडून गेला असता. पण त्यांनीं तसें कांहीं एक केलें नाहीं. ते आपल्या हत्यारांचा स्वतःच उपयोग करीत, आणि त्यामुळें त्यांचे लष्करी कारभारही नेहमीं मोठ्याच प्रमाणावर असत. इ. सन १६२२ मध्यें इंग्लंड आणि पोर्तुगाल (हा त्या वेळीं स्पेनच्या ताब्यांत होता) यांच्यामध्यें एक शिष्टाचाराचा तह झाला, तरी पण पोर्तुगीज लोकांशीं इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीची हिंदी महासागरामध्यें निकराची लढाई सुरू झाली होती; कारण, त्यांनीं नामदार कंपनीच्या व्यापाराला अडथळा

---

१ हिंदुस्थानांत नग्न स्थितींत असलेल्या विधर्मी लोकांमध्यें, इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष ख्रिस्तधर्मीय प्रदेशांतील लोकांमध्यें देखील एकदम आणि निश्चयानें धाडशी कृत्यें केलीं असतां काय विलक्षण परिणाम घडून येतात, हें जो ध्यानांत आणील, तो पोर्तुगीज अगर फ्लेमिंग लोकांना केवळ सौजन्यानें अगर सात्त्विकपणानेंच ह्या प्रदेशांत थारा मिळालेला होता, असें कधींही अनुमान करणार नाहीं. त्यांनीं तो कसा मिळविला, हें तर सर्व जगाला पुरतेपणीं ठाऊक आहेच.—इ. स. १६२० मध्यें जावा येथून लँड कॅप्टन थाम्स ब्याटन यानें पाठविलेलें पत्र.

आणला होता, आणि जहाजांचीही नासाडी केली होती. ह्मणून इंग्लिश कंपनीनें सुरत येथें एक लहानसें आरमार तयार केलें, आणि पोर्तुगीज लोकांना आर्मझ बेटांतून हांकलून देण्याला इराणचा राजा शहा अब्बास याला मदत करावी, असा त्यास हुकूम देऊन तें इराणी आखातांत पाठवून दिलें. कारण हें बेट एक शतकभर पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत असल्यानें त्यांना सर्व आखातभर आपली अबाधित सत्ता ठेवितां आली होती. हें कृत्य इराणी लोकांच्या मदतीनें अगदीं पूर्णपणें तडीस नेतां आलें. त्या योगानें किल्लयावर कुलपी गोळ्यांचा एकसारखा भडिमार चालू ठेवितां आला; पोर्तुगीज लोकांच्या सरकारी आरमाराबरोबर समुद्रावरील लढाईही करण्यांत आली, आणि शेवटीं त्याचा असा परिणाम झाला कीं, तें बेट हस्तगत झालें, तेथील तटबंदी जमीनदोस्त करण्यांत आली, आणि पोर्तुगीज लोकांचें किल्लयाच्या संरक्षणाकरितां असलेलें लष्कर हद्दपार करून गोवें येथें पाठविण्यांत आलें.

इंग्लिशांनीं केलल्या ह्या वरील कृत्यांबद्दल पोर्तुगीज लोकांनीं जोराची तक्रार केल्याचें ऐकिवांत नाहीं, तरी त्यामुळें हल्लींचे राजनीतिकुशल मंत्रिजनही खात्रीनें भयचकित होतील, अशा स्वरूपाचीं तीं कृत्यें होतीं. तथापि असा दफ्तरीं दाखला आहे कीं, पहिला जेम्स व लॉर्ड हाय ॲडमिरल (दि ड्यूक ऑफ बकिंगह्याम) यांनीं कंपनीपासून अधिकाराच्या जोरावर तिला मिळालेल्या किफायतींतून राजभाग ह्मणून मोठमोठ्या रकमा वसूल केल्या होत्या, त्याप्रमाणेंच पोर्तुगीज लोकांच्या अन्यायी प्रत्यापहारापासून आपल्या व्यापाराचें संरक्षण करण्याकरितां कंपनीला आरमार पाठविण्याची परवानगी देण्यापूर्वीं तिच्यापासून बकिंगह्याम यानें जबर दंडाची रक्कम हक्काच्या नांवाखालीं पुन्हांही मागितली होती. कदाचित् इंग्लिशांनाही आर्मझ येथें केलेल्या कृत्याविरुद्ध पोतुगीज लोकांनींही अशाच प्रकारचीं अन्यायी कृत्यें केलेलीं आहेत असें हक्काच्या जोरानें प्रतिपादन करतां आलें असतें; कारण

ईस्ट इंडियामध्यें त्या वेळीं जीं राष्ट्रें व्यापार करीत होतीं, त्यांना आपल्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर वागतांना वाटेल त्या मार्गांचा आणि साधनांचा उपयोग करण्याला बिलकुल दिक्कत वाटत नसे.

परंतु जरी डच लोकांची व इंग्लिश लोकांची औपचारिक रीत्या दोस्ती आणि सख्य होतें, तरीही ते लवकरच आशिया खंडांत इंग्लिशांचे पोर्तुगीज लोकांहूनही अधिक कट्टे शत्रु बनले. ते या सुमारास ईस्ट इंडियामधील इंग्लिश कंपनीच्या व्यापाराचें जबरदस्त नुकसान करीत होते, पण तें नुकसान सहन करण्याला कंपनी बिलकुल तयार नव्हती. या दोन्ही कंपन्यांमध्यें लवकरच राष्ट्राराष्ट्रांमधील नियमास न जुमानणारी व लष्करी कायद्याला धाब्यावर बसविणारी अशी कांहींशी भयंकर लढाई सुरू झाली. अशा लढाईंत फार थोडी दया दाखविली जात असून शत्रूचा विध्वंस करण्याला पाहिजे तसे उपाय योजिले जात असत. दोघांच्याही ताब्यांत लढाऊ जहाजें आणि तटबंदी केलेलीं ठिकाणें होतीं; परंतु जरी डच लोकांच्या ताब्यांत इंग्लिश लोकांपेक्षां पुष्कळ अधिक किल्ले आणि बराच विस्तीर्ण प्रदेश होता, तरी फायदेशीर असलेलीं सर्व ठिकाणें बळकावून आपल्या ताब्यांत घेण्याची त्यांची पद्धत होती; त्यामुळें हिंदुस्थानांतील राजे रजवाड्यांशीं झगडणें त्यांना स्वाभाविकपणेंच भाग पडत असे, आणि अवाढव्य लष्करी खर्च ठेवावा लागून त्याचा बाधक परिणाम त्यांच्या व्यापारांत घातलेल्या भांडवलावरही होत असे, हें त्यांत एक व्यंग्य होतें. तथापि पुष्कळ काळपर्यंत वाटाघाट झाल्यानंतर शेवटीं इ. सन १६१९ मध्यें एकमेकांनीं एकमेकांचे काबीज केलेले मुलूख परस्परांना परत द्यावे, आणि झालेल्या नुकसानीची परस्परांनीं भरपाई करावी, अशा अटीवर इंग्लड व हालंड यांचेमध्यें तह होण्याचें ठरलें. ही तहाची बातमी हिंदुस्थानांत अगदीं वेळेवर येऊन पोहोंचली; कारण, त्या वेळच्या पत्रव्यवहारावरून असें कळतें कीं, या बातमीमुळें " इंग्लिशांच्या उत्तम जहाजांपैकीं ११ आणि डच लोकांचीं १७ यांचेमधील लढाई व

तिजमुळें होणारा रक्तपात टाळतां आला." हा तह वीस वर्षांच्या करारानें केलेला होता, पण तो नक्की वीस महिन्यांहूनही कमी मुदतीपर्यंत पाळला गेला, आणि ईस्ट इंडीज बेटांमध्यें तर ह्या तहाकडे कोणी बिलकुल लक्षही दिलें नाहीं, असें दिसतें. कारण ह्या बेटांमध्यें व्यापारी चढाओढीकरितां अवश्यक असलेल्या गोष्टींमुळें एकमेकांमधील भांडणामध्यें आणि जुलमी कृत्यांमध्यें एकसारखी भर पडत चालली होती, व शेवटीं एक अंगावर शहारे येण्यासारख्या विलक्षण अघोर कृत्यानें तर ह्या गोष्टींचा कळसच केला. इ. सन १६२३ मध्यें डच लोकांनीं अंबोयना (मोल्यूकसमधील) बेटामध्यें असलेल्या बहुतेक सर्व इंग्लिश लोकांची जी कत्तल केली, ती निष्ठुरतेची व अनीतीची असून त्यामुळें त्या पिढींतील इंग्लिश व्यापारी व दर्यावर्दी लोक यांच्या मनांत पुष्कळ दिवसपर्यंत हालंड देशाविषयीं भयंकर आढी बसली, वैरभाव दुणावला, आणि पुढें लवकरच या दोन राष्ट्रांमध्यें युरोपांत कडाक्याचे युद्धकलह सुरू झाले.

मसाल्याच्या बेटांत डच लोकांचें असलेलें वर्चस्व आणि इंग्लिश लोकांविषयीं त्यांच्या हाडीं मासीं खिळलेला वैरभाव ह्यांमुळें इंग्लिश व्यापार निःसंशय आशियांतील प्रदेशांकडे वळला; त्यामुळेंच हिंदुस्थानच्या समुद्र किनाऱ्यावर वखारी बांधण्याकडे मुख्यत्वेंकरून त्यांचें लक्ष वेधलें; आणि त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर सुरत येथें इ. सन १६१२ मध्यें मोगल दरबारच्या फर्मानाअन्वयें त्यांनीं आपली पहिली वखार स्थापन केली. त्यानंतर इंग्लंडचा राजा पहिला जेम्स ह्याचेकडून जहांगीर बादशहाच्या दरबारीं सर थामस रो ह्या नांवाचा एक वकील[1] आला, व त्यानें व्यापाराकरितां कांहीं विशिष्ट सवलती मिळविल्या. इ. सन १६३० मध्यें ह्या बंदराजवळच युरोपमधील एकमेकांच्या राष्ट्रीय इज्जतीच्या हितसंबंधाला धक्का न लावितां इंग्लिश आणि पोर्तुगीज या उभयतांच्या आरमारामध्यें एक नांवाजण्यासारखी लढाई झाली; शिवाय

[1] इ. सन १६१५ ते १६१८.

याच वेळीं डच लोक हे हिंदुस्थान आणि सिलोन ह्यांमधील पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील ठाण्यांवर निकराचे हल्ले करीत असल्यामुळें त्यांच्या सत्तेचा झपाट्यानें ऱ्हास होत चालला होता. इ. सन १६४० मध्यें जेव्हां पोर्तुगालनें आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य पुन्हां मिळविलें, तेव्हां आशियामध्यें आपल्या सत्तेचें संरक्षण करून तग धरण्याकरितां त्यानें कांहीं दुबळे प्रयत्न केले; परंतु मन्स्टरच्या तहानें (इ. सन १६४८) पोर्तुगालचीं हिंदुस्थानांतील ठाणीं मर्यादित झालीं, आणि त्यामुळें तें राष्ट्र कायमचें मागें पडलें. इ. सन १६३८ मध्यें सुरत हें इंग्लिश कंपनीचें मुख्य ठाणें झालें, आणि इ. सन १६४३ च्या सुमारास पूर्व किनाऱ्यावर मच्छलीपट्टण व मद्रास येथें त्यांच्या व्यापाराचा चांगल्या रीतीनें बस बसून बंगालमधील व्यापाराकरितां हुगळी नदीच्या वरील भागावर त्यांनीं एक वखार स्थापन केली. याच सुमारास मिस्तर बाऊटन ह्या नांवाच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या नौकरींतील एका शस्त्रवैद्याला मोंगल बादशहाच्या दरबारीं आग्रा येथें बादशहाला औषधोपचार करण्याकरितां पाठविण्यांत आल्यामुळें मोंगल दरबारामध्यें इंग्लिशांचें वजन बऱ्याच प्रमाणानें वाढलें, आणि नंतर त्यालाच बादशहानें राजवैद्य ह्मणून ठेवून घेतलें. सतरावें शतक अर्धें लोटून जाईपर्यंत आशियाखंडाच्या दक्षिणेकडील सर्व समुद्रकिनाऱ्यावर इराणी आखातापासून तों तहत पूर्वेकडे चीनच्या हद्दीपर्यंत इंग्लिश कंपनीचा व्यापार चालत होता. डच लोकांची व्यापारी चळवळही ह्याच प्रदेशाच्या टापूंत होती, आणि त्यामुळें ह्या दोन्ही राष्ट्रांतील कंपन्यांमध्यें मोठी व्यापारी चढाओढ सुरू असून ह्या सर्व विस्तीर्ण प्रदेशभर उभयतांमध्यें निकटची स्पर्धा सुरू झाली होती, व सतत चकमकीही उडत होत्या. परंतु राजा आणि पार्लमेंट यांच्यामध्यें इंग्लडांत भांडण सुरू असल्यामुळें इंग्लिश लोकांच्या व्यापारविषयक धाडशी कृत्यांना मुळाशींच आळा बसला होता. कारण, त्यामुळें त्या वेळीं परकीय प्रतिस्पर्ध्यांशीं होणाऱ्या भांडणांत इंग्लंडच्या सरकाराला

फारच थोडा व धरसोडीचा पाठिंबा देण्यापलीकडे अधिक कांहींही करतां येणें शक्य नव्हतें; उलट पक्षीं हालंड देशाच्याच फक्त नव्हे, पण पोर्तुगीज देशाच्या व्यापाऱ्यांना सुद्धां त्यांचें त्यांचें सरकार पूर्वेकडील देशांत मोहिमा करण्याला आणि नवे नवे प्रांत आपल्या ताब्यांत घेण्याला आपापल्या राष्ट्रीय सत्तेचा प्रत्यक्ष दुजोरा देऊन त्यांना प्रमुखत्वानें मदत करीत असत. याप्रमाणें वास्तविक पाहतां निव्वळ एखाद्या " खाजगी मंडळी " सारखीच ह्या वेळीं इंग्लिश कंपनीची स्थिति असून तिला दोन सत्ताधारी राष्ट्रांशीं झगडावें लागत होतें; त्यामुळें या खानगी लढायांचा शेवट होण्याच्या सुमारास ह्या कंपनीची स्थिति फार खालावली असल्यास त्यांत विशेषसें आश्चर्य नव्हतें. उलट ह्याच वेळीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर डच लोक इंग्लिश लोकांपेक्षां आपलें वर्चस्व अधिक स्थापन करून मसाल्यांच्या बेटांतील त्यांचा व्यापार हाणून पाडीत होते, व प्रत्येक ठिकाणीं त्यांच्याशीं अत्यंत ताठ्यानें वागत असत. ईस्ट इंडीज बेटांमध्यें डच लोकांकडून होणारा " असह्य उपद्रव, निर्दयपणा, उद्धटपणाची वागणूक, आणि कावेबाजपणाचे व फसवेगिरीचे त्यांचे डावपेंच " यांबद्दल इंग्लिश कंपनीनें वारंवार तक्रारी केल्या असून त्यांचा त्या वेळेच्या सरकारी दफ्तरांत दाखला आहे. शिवाय ते स्वतःला फायदेशीर असेल तेव्हां परदेशांतील व्यापाऱ्यांना पकडण्याकरितां अगर हाकलून देण्याकरितां आणि त्यांचीं ठाणीं बळकविण्याकरितां बेधडक पुष्कळ सैन्यानिशीं आरमार पाठविण्यालाही मागें पुढें पहात नसत.

याशिवाय आपल्या मर्यादेचें अतिक्रमण करून परवानगीशिवाय व्यापार करणाऱ्या लोकांपासून, अगर खाजगी रीतीनें व्यापार करणाऱ्या स्वतंत्र व्यापाऱ्यांपैकीं चांचे लोकांपेक्षां फारशा अधिक योग्यतेच्या नसलेल्या कांहीं व्यापाऱ्यांकडूनही इंग्लिश कंपनीला फार त्रास भोगावा लागत असे. तथापि अशा स्थितींतही आशिया खंडांतील समुद्रांत त्यांनीं केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल स्थानिक अधिकारी कंपनीलाच जबाबदार

धरून वारंवार विचारणा करीत असत. या काळीं युरोप आणि आशिया या दोन खंडांतील राष्ट्रांचे एकमेकांशी राजकीय अगर प्रतिनिधीमार्फत संबंध जडलेले नव्हते, त्यामुळें मोंगल बादशहा अथवा त्याचे सुभेदार यांचेकडून नियमित रीतीनें परवाने आणि देणग्या मिळविणाऱ्या एखाद्या व्यापारी मंडळीला ती ज्या राष्ट्रांतील असेल, त्या राष्ट्रातर्फे प्रतिनिधि आहे, असें स्वाभाविकपणेंच मानलें जात असे; व त्यामुळें तिला आपल्या राष्ट्रबांधवांनीं केलेल्या नुकसानीचा परिणाम भोगावा लागत असे, अथवा त्यांनीं केलेल्या दुष्कृत्याबद्दल नुकसानीची भरपाईही करून द्यावी लागत असे. डच किंवा पोर्तुगीज लोकांचा जर एखाद्या स्वतंत्र इंग्लिश व्यापाऱ्यानें गुन्हा केला, तर याहूनही भयंकर परिणाम घडून येत असत; कारण, त्यांना एखादें परवान्याशिवायचें जहाज बुडविणें, आंतील सर्व खलाशी लोकांना जाणूनबुजून जलसमाधि देणें, किंवा एखादी आपल्याला अहितकारक असलेली वखार जमिनदोस्त करणें, यांचा कांहींही विधिनिषेध वाटत नसे. ज्या कंपनीला सर्वतोपरी व्यापार करण्याची सनद असून राजाश्रय असे, तिलाच फक्त भांडवल जमवितां येऊन मनुष्यबळ आणि त्या वेळीं अवश्य असलेली पद्धतशीर व्यवस्था कायमची ठेवतां येणें शक्य होतें; परंतु इंग्लिश व्यापाऱ्यांना आपल्या व्यापाराकरितां स्वतःच आपल्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध लढावें लागे; व ते तसे लढले नसते, तर पूर्वेकडील मोठाल्या व्यापारी पेठांच्या क्षेत्रांतून ते कधींच पार हांकलून दिले गेले असते. व्यापारांत यश मिळविण्याला अवश्य असलेलीं हीं सर्व साधनें डच लोकांजवळ इतर राष्ट्रांपेक्षां अधिक होतीं, त्यामुळें बहुतेक सर्व सतराव्या शतकभर त्यांनीं इतर सर्व राष्ट्रांतील व्यापाऱ्यांना मागें टाकिलें होतें. एका तत्कालीन इंग्लिश लेखकाच्या ह्मणण्याप्रमाणें डच लोकसत्तात्मक राष्ट्र हीं वास्तविक नौकानयन आणि व्यापार करणारी एक मंडळी होती, आणि स्टेट जनरल व डच कंपन्या यांचा शरीर आणि अवयव यांच्यासारख्या एकवटलेल्या एक जिवाचा संबंध होता. साधारणतः हालंडमधील प्रजाजन हे

व्यापारी आणि दर्यावर्दी पेशाचे असल्यामुळें त्यांचें व्यापारी धोरण जोरदार, अधिक चिकाटीचें आणि पूर्ण निश्चयी बाण्याचें होतें; त्यामुळें त्यांचा पाठिंबा, ज्यांचे उद्देश व हितसंबंध परस्परविरोधी व गुंतागुंतीचे होते आणि ज्यांचा कारभार राजा व जमीनदार वर्ग यांच्या तंत्रानेंच चालत असे, अशा राष्ट्रांतील, ह्मणजे इंग्लंडसारख्या राष्ट्रांतील, राजधोरणापेक्षां, त्याला स्वाभाविकपणें पुष्कळच अधिक मिळत होता.

ईस्ट इंडियामधील सतराव्या शतकाच्या पहिल्या अर्ध भागांतील व्यापाराच्या इतिहासाची संपूर्ण हकीकत खुलासेवार लिहिणें योग्य वाटल्यावरून ती ह्या ठिकाणीं दिलेली आहे. कारण, कंपनीच्या ह्या सुरवातीच्या वेळेला तींत जे सार्वजनिक हितसंबंध गुरफटलेले होते, त्यांचें महत्त्व आणि व्याप्ति यांचें ज्ञान साधारणतः फार थोड्या लोकांनाच आहे. ह्या घडलेल्या हकीकतीवरून आपणाला असेंही समजून येईल कीं, युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांचे राजकीय संबंध एकमेकांत मिसळण्याचीं भावी चिन्हें हीं ह्या "घडलेल्या हकीकती" च होत; आणि हाच संबंध गेल्या तीनशें वर्षांमध्यें निकट होत गेलेला असून त्याचें प्रमाणही वाढलेलें आहे. जर आशिया खंडांतील जलमार्गानें चाललेला सर्व व्यापार एखाद्या मोठ्या दर्यावर्दी राष्ट्राच्याच हातांत राहणें शक्य असतें – ज्याप्रमाणें फिनिशियन लोकांनीं भूमध्यसमुद्रांतील बहुतेक सर्व व्यापार आपलें वर्चस्व स्थापन करून एके काळीं आपले हातांत ठेविला होता, असें दिसतें, त्याप्रमाणें–तर तो व्यापार पुष्कळ काळपर्यंत शांततेनें चालला असता, आणि खुष्कीच्या मार्गानें चालणारा व्यापार ज्या देशांमधून होत असे त्या देशांना त्यापासून जितका त्रास होत होता, त्यापेक्षां पुष्कळच कमी त्रास ह्या व्यापारापासून झाला असता. कारण, खुष्कीच्या व्यापाराचे मार्ग निरनिराळ्या राष्ट्रांच्या ताब्यांतील प्रदेशाच्या सर्वसंमत सरहद्दींमधून असत; परंतु समुद्रांतील व्यापाराचे मार्ग सर्वांना मोकळे होते; आणि जेव्हां आशिया खंडांतील बंदरांमध्यें निरनिराळ्या राष्ट्रांचे व्यापारी एकमेकांना

मागें टाकण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां साहजिकच डच, इंग्लिश व पोर्तुगीज, यांचें आपापसांत पूर्वसमुद्रांत भांडण जुंपलें. याप्रमाणें आणि अशाच कारणांवरून दोन शतकांपूर्वी ग्रीक, इतालियन व अरब, यांचें भूमध्यसमुद्रामध्यें भांडण जुंपलें होतें. युरोपमध्यें ज्या वेळीं सतत लढाया चालू असत, त्या वेळीं अशा भांडणाचा परिणाम तेथील एकसारख्या बदलत जाणाऱ्या राज्यकारभारावर होत असे, आणि उलट युरोपमधील राज्यकारभाराचा परिणाम ह्या भांडणावरही होत असे. कारण, ज्याप्रमाणें नेहमीं खजिन्यांत भर पडत असल्यामुळें राज्यकर्ते व त्यांचें प्रधानमंडळ यांचे मनावर व्यापारापासून होणाऱ्या नफ्याचा परिणाम झालेला होता, त्याचप्रमाणें युरोपांतील राज्यकर्त्यांचीं कृत्यें आणि त्यांचे संबंध ह्यांचा परिणाम आतांप्रमाणेंच त्या वेळींही प्रत्यक्ष रीतीनें त्यांच्या परदेशांतील व्यापारावर होत होता. हालंडमधील सुधारणावादी लोकांचा स्पेननें जो छळ मांडला, त्या छळापासूनच डच ईस्ट इंडिया कंपनीचा जन्म झाला; आणि ह्या डच कंपनीला मिळालेल्या विजयामुळें इंग्लिश लोकांच्या साहसाला प्रोत्साहन मिळालें; कारण, इस्ट इंडीज बेटांमधील या दोन प्राटेस्टंट राष्ट्रांच्या आपसांतील चाललेल्या फार दिवसांच्या भांडणानें एकमेकांमधील नैसर्गिक संबंध कमी कमी होत जाऊन कांहीं काळपर्यंत ते अजिबात तुटले होते—इतकेंच नाहीं, तर त्यामुळेंच आशियांतील इंग्लिश लोकांच्या धाडशी कृत्यांना मर्दुमकीचें स्वरूप आलें होतें. हत्याराच्या जोरावर आपलें स्वातंत्र्य कायम करण्याची त्यांच्यांत अभिरुचि उत्पन्न झाली, आणि शेवटीं त्यामुळेंच त्यांना प्रांत काबीज करण्याची (डच लोकांच्या उदाहरणावरून) गोडी लागली. वसाहती स्थापन करण्याची गोष्ट बाजूला ठेवून विचार केला असतां असें दिसून येईल कीं, जगाच्या इतिहासामध्यें व्यापारासंबंधानें झाला इतका रक्तपात त्याचे पूर्वीं अगर नंतर कधींही झालेला नाहीं. कारण, ईस्ट इंडियामध्यें साहसी कृत्यें करतांना आलेल्या संकटाच्या फार ज़ुजबी अनुभवानेंच इंग्लिश लोकांची अशी

खात्री झालेली दिसते कीं, जगाच्या ह्या भागामध्यें शांततेनें व्यापार करण्याची आशा सोडून दिल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. तथापि सर्व सतराव्या शतकभर व्यापारालाच चिकटून राहण्याकरितां त्यांनीं आपली शिकस्त केली, याबद्दल न्यायदृष्टीनें पाहतां ते खरोखर प्रशंसेस पात्र आहेत. उलट पोर्तुगीज आणि डच यांनीं एकदम मुलूख काबीज करण्यालाच सुरवात केली; परंतु ह्या युरोपस्थ राष्ट्रांतील अनियंत्रित व स्वावलंबी चढाओढीचा साहजिकपणेंच असा परिणाम झाला कीं, या त्यांच्या सर्व ईस्ट इंडियन व्यापारी कंपन्यांचें हत्यारबंद कंपन्यांमध्यें रूपांतर झालें, आणि नंतर ह्याच हत्यारबंद कंपन्यांचें पुढें सत्ताधारी सरकारामध्यें कसकसें रूपांतर होत गेलें, हें पुढें पाहण्यांत येईल.

मध्यंतरीं या शतकाच्या आरंभापासून तिकडे युरोपमध्यें डच लोकांच्या प्रजासत्तात्मक राष्ट्राचें सामर्थ्य आणि स्थैर्य हीं जसजशीं वाढत चाललीं, तसतशीं इकडे आशिया खंडांतील त्यांचीं साहसी कृत्येंही अधिक अधिक धाडसाचीं व अरेरावीपणाचीं झालीं. त्या वेळीं युरोपांत आस्ट्रिया आणि स्पेन हीं दोन जुलमी आणि हेकेखोर राष्ट्रें होतीं, व त्यांचा सर्व युरोपला दरारा वाटत होता. या दोन राष्ट्रांविरुद्ध युरोपांत तीस वर्षेंपर्यंत युद्ध चाललें होतें, आणि त्यांत जर्मनींतील प्राटेस्टंट संस्थानें व फ्रान्स यांनीं हालंडला आश्रय दिला होता. अशा प्रकारच्या दोस्तीच्या जुटीचें बळ खुष्कीच्या बाजूनें हालंडच्या सुरक्षितपणाला विशेष फायदेशीर होतें, त्यामुळें इंग्लिशांना हालंड हा समुद्रांत एक जबरदस्त प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला. डच लोक इंग्लिशांना मागें टाकीत चालले होते; त्यांनीं आपलें ईस्ट इंडिया कंपनीचें राज्य स्थापन केलें; ब्राझिलमध्यें आपला पाय मजबूत रोंविला; मेक्सिकोहून हाव्हाना येथें जाणारीं मौल्यवान जिनसांनीं भरलेलीं स्पेनचीं जहाजें पश्चिम हिंदुस्थानांतील समुद्रांत हस्तगत केलीं; आणि इनफंटा इसाबेलाच्या आरमाराचा त्यांनीं धुव्वा उडवून दिला. डच लोक आपल्या देशाजवळील अरुंद समुद्राचे धनी बनत चालले होते; फ्रान्सच्या मदतीनें

स्पेनच्या ताब्यांतील नेदरलंडला शह देत होते; व त्यामुळें हालंड व फ्रान्स ही जोडगोळी बनून आपल्याविरुद्ध इंग्लिश खाडीच्या बाजूचा सर्व किनारा स्वतःच्या ताब्यांत घेईल कीं काय, अशी इंग्लंडला फार भीति पडली होती[1].

अशा प्रकारच्या अनुकूल परिस्थितीमुळें सतराव्या शतकांत बराच काळपर्यंत आशियांतील व्यापारामध्यें हालंडला आपलें वर्चस्व प्रस्थापित करितां आलें. त्यानें पोर्तुगालच्या ताब्यांतील पूर्वेकडील अतिशय महत्त्वाच्या ठिकाणांमधून कांहीं ठिकाणें लुबाडून घेतलीं, आणि आपलीं व्यापारी ठाणीं चांगल्या जागा पाहून तेथें मजबुत रीतीनें वसविलीं. तथापि क्रामवेलच्या जोमदार कारकीर्दींत इंग्लिश लोकांनीं ईस्ट इंडीजमध्यें आपलें महत्त्व प्रस्थापित करण्याला पुन्हां सुरवात केली, आणि या दोन प्रजासत्तात्मक राष्ट्रांमधील राजकीय आणि व्यापारी हेव्यादाव्याचा कळस इ. सन १६५१ ते १६५४ मध्यें झालेल्या युद्धांत झाला. हें युद्ध सुरू होण्याला जीं कांहीं महत्त्वाचीं कारणें झालीं, त्यांमध्यें ईस्ट इंडीजमधील व्यापाऱ्यांनीं केलेल्या तक्रारी हें एक मुख्य असून त्यांनीं त्या वेळीं आशियांतील डच लोकांच्या विरुद्ध हत्यारी आरमार तयार करण्याची परवानगीही मागितली होती. कारण, ते हिंदुस्थानच्या समुद्रांतून जाणाऱ्या येणाऱ्या इंग्लिशांच्या व्यापारी मालाची लुटालूट करीत असत. इ. सन १६५४ मध्यें, झालेल्या नुकसानीची आणि " मुख्यत्वेंकरून अंबोयना बेटांत केलेल्या रक्तपाती व्यवसायाची " भरपाई करावी, आणि हिंदुस्थानच्या समुद्र किनाऱ्यावरील इंग्लिश सत्तेची मर्यादा ठरवून टाकावी, अशा अटीवर तहाचें ठिगळ जोडून उभयतांमधील भांडण मिटविण्यांत आलें. तथापि, जरी डच लोकांचा वैरभाव व त्यांची आशियामधील दुसऱ्यांचे

---

१ फ्रान्सच्या राज्यकर्त्यांबरोबर झालेल्या ह्या राष्ट्रांच्या जुटीमुळें त्यांना फार वैषम्य वाटूं लागलें.

लंडन येथील फ्रेंच वकिलानें आपल्या दरबारीं पाठविलेलें पत्र (ता. २८ ए. १६३५).

प्रांत अपहार करण्याची क्रिया कोणत्याही प्रकारें बंद झाली नव्हती, तरी कंपनीची मक्तयाची सनद रद्द करा, आणि आशियांतील व्यापार सर्वांना मोकळा ठेवा, अशी सूचना जेव्हां क्रामवेलला करण्यांत आली, तेव्हां नगदी नाण्याच्या अतिशय निकडींत असलेल्या ह्या राज्यकर्त्याला या अटी इतक्या मोहक वाटल्या कीं, लंडन कंपनीनें त्या विरुद्ध दाखविलेलीं सप्रमाण कारणें व सढळ हातानें देऊं केलेली रक्कम, ह्या दोन्ही गोष्टी देखील त्याचें मन ह्यापासून परावृत्त करण्याला समर्थ झाल्या नाहींत. परंतु हेंही स्पष्ट होतें कीं, आशियामध्यें स्वतंत्र रीतीनें व्यापार करणाऱ्या लोकांचा ह्या सर्वसाधारण शत्रु असलेल्या डच लोकांच्या तडाक्यांत सहज चुराडा उडाला असता. कारण, डच लोकांची सत्ता ह्या वेळीं पुन्हांही वाढत्या प्रमाणावर होती. त्यांनीं आतां ईस्ट इंडीजमध्यें मोठ्या प्रमाणावर सैन्य आणि आरमार ठेविलें होतें; ते इंग्लिशांच्या व्यापाराला अडथळे आणीत, आणि त्यांच्या व्यापारी अडतींचीही छळणूक करीत. त्यांनीं तहाच्या अटींना धाब्यावर बसविलें; इंग्लिश लोकांना पूर्व आशियाच्या किनाऱ्यावरून पार हांकलून दिलें; सिलोन ताब्यांत घेतलें; बंटामची–ह्मणजे जावाबेटामधील कंपनीच्या मुख्य ठाण्याची–नाकेबंदी केली; आणि मसाल्याच्या बेटांतील इंग्लिश वखारी जमिनदोस्त करण्याचा त्यांनीं पुन्हां एकदा प्रयत्न केला.

मध्यंतरीं इ. सन १६५८ मध्यें हिंदुस्थानांत शहाजहान बादशहा जिवंत असतांनाच त्याच्या मुलांमध्यें आपसांत लढाई सुरू झाली, त्यामुळें व्यापाराला फार धक्का बसून कंपनीच्या वसाहतीवरही प्राणसंकट ओढवलें. तथापि इ. सन १६६० मध्यें भावाभावांच्या लढाईंत अवरंगजेब यशस्वी झाल्यामुळें पुन्हां शांतता झाली. अवरंगझेबाची पुष्कळ दिवसांची कारकीर्द ही हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची असून तिच्या सुरवातीच्या वेळेसच इंग्लंडांत दुसऱ्या चार्लस राजाला पुन्हां गादीवर स्थापन करण्यांत आलें. या गोष्टीमुळें इंग्लंडच्या इतर देशांशीं असलेल्या राजकीय संबंधांत पुष्कळच स्थित्यंतर झालें, व

इंग्लिश लोकांच्या व्यापारी पद्धतीवरही त्याचा बराच महत्त्वाचा परिणाम झाला. कंपनीला अधिक व्यापक हक्क हवे होते, आणि दुसऱ्या चार्लसला कंपनीजवळ त्या वेळीं असलेल्या सनदेंतून क्रामवेलचें नांव काढून टाकावयाचें होतें; ह्मणून त्यानें कंपनीला ख्रिस्ती लोकांशिवाय इतरांबरोबर लढाई आणि तह करण्याचा अधिकार देऊन नवीन सनद करून दिली. पण वस्तुतः कंपनीचे खरे हितशत्रु ख्रिस्तीधर्मानुयायी लोकच होते. या वेळीं स्पेन देशाचें जूं मानेवर असतांना पूर्वेकडील गमावलेल्या ठाण्यांपैकीं कांहीं परत मिळविण्याच्या आशेनें, अगर निदान जीं बचावलीं होतीं त्यांचें डच लोकांपासून संरक्षण व्हावें या इराद्यानें, पोर्तुगीज लोकांनीं इंग्लिश लोकांशीं दोस्ती करण्याकरितां प्रयत्न चालविले होते. या दोस्तीच्या तहामुळेंच इंग्लिश लोकांना मुंबई बेटाचा मौल्यवान लाभ झाला. हें बेट पोर्तुगीज लोकांनीं इ. सन १६६१ मध्यें इंग्लिशांच्या हवालीं केलें, व त्याचे मोबदल्याबद्दल आशियामध्यें पोर्तुगीज लोकांना डच लोकांचे विरुद्ध स्वतःचें संरक्षण करण्याच्या कामीं मदत करण्याची हमी घेतल्याचें इंग्लिशांनीं आश्वासन दिलें. परंतु पोर्तुगीज लोकांना डच लोकांची जशी भीति वाटत होती, तसाच इंग्लिश लोकांबद्दल मत्सरही वाटत होता, यामुळें कित्येक वर्षेंपर्यंत इंग्लिश लोकांना त्या बेटावरील आपला ताबा शांत रीतीनें ठेवितां आला नाहीं; आणि इ. सन १६६९ पर्यंत लंडन कंपनीला मुंबई आणि सेंट हेलेना ह्या बेटांची पुरी मालकीही देण्यांत आली नव्हती.

इ. सन १६६१ मध्यें दुसरा चार्लस यानें या कंपनीला ईस्ट इंडीजमधील एकंदर इंग्लिश व्यापाराची सनद देऊन नाणीं पाडण्याची, न्याय देण्याची आणि परवानगीशिवाय व्यापार करणाऱ्या लोकांना शिक्षा करण्याची कुलमुखत्यारी दिली, व त्या भागांतील ख्रिस्तीधर्मेतर राष्ट्रांशीं लढाया व तह करण्याचा त्यांचा असलेला अधिकार पुन्हां कायम केला. त्यानें क्रामवेलचा प्रसिद्ध “ नेव्हिगेशन लॉ ” देखील अमलांत आणला.

या कायद्याअन्वयें इंग्लंडच्या खलाशांना व जहाजांनाच फक्त इंग्लंडबरोबर व्यापारी मालाची नेआण करण्याचा कुलमक्ता दिलेला होता; आणि युरोपांत जलमार्गानें व्यापार करणाऱ्यांमध्यें डच लोक हेच त्या वेळीं प्रमुखत्वानें पुढें असल्यामुळें ह्या कायद्याचा मुख्यत्वेंकरून त्यांच्यावरच रोख होता.

अशा रीतीनें इंग्लिश लोकांनीं व्यापारी साधनांची जमवाजमव केली, त्यांना व्यवस्थित रूप दिलें, आणि आपल्या कट्ट्या दुष्मानाबरोबर जशास तशी लढाई चालविण्याकडे त्यांचा उपयोग केला. कारण, आशियांतील इंग्लिशांच्या व्यापारी वसाहतींचें अस्तित्व कायम राखण्याला व्यापारांतील कुलमुखत्यारीचे हक्क त्या दिवसांत अवश्यक होते, यांत कांहींही संशय नाहीं. त्या वेळीं ख्रिस्तीधर्मेतर राष्ट्रांमध्यें इंग्लंडचे राजकीय हितसंबंध पाहणारे प्रतिनिधि नव्हते; तसेंच कोणत्याही निव्वळ एखाद्या व्यापाऱ्यानें अगर गलबतावरील मुख्य नाखव्यानें केलेल्या गाऱ्हाण्याकडे ब्रिटिश सरकार लक्ष देत नव्हतें; आणि दूरच्या देशांत व्यापारी प्रतिस्पर्ध्यांमध्यें एकमेकांविरुद्ध बेजबाबदार रीतीनें वागण्याच्या प्रचलित असलेल्या मार्गासंबंधीं घडलेल्या अनेक उदाहरणांपैकीं अंबोयना बेटांतील कत्तल ह्मणजे हें केवळ मासल्याकरितां एकच उदाहरण होय. थोडक्यांत असें ह्मणतां येईल कीं, मोठें भांडवल, लढाईचीं साधनें, त्यांना उपयोगांत आणण्याचा अधिकार आणि लांबच्या वसाहतींतील आपल्या देशबांधवांवर एक प्रकारची ढोबळ सत्ता, या सर्वांच्या अभावीं कोणत्याही व्यापारी मंडळीला आपल्या राष्ट्रांत पुरेसें वजन ठेवतां आलें नसतें, अगर समुद्रांतील आपलीं जहाजें आणि परदेशांतील आपलीं ठाणीं यांचेंही संरक्षण करितां आलें नसतें.

ईस्ट इंडियामधील व्यापाराला बळकटी आणण्याकरितां इंग्लिश लोकांनीं योजिलेल्या ह्या सर्व उपायांनीं डच लोकांना राग आला; शिवाय डंकर्क हें फ्रान्सला विकल्यामुळें त्यांना अरुंद समुद्रांत जाण्यायेण्याला मोकळीक झाली; त्याचप्रमाणें फ्रान्स व हालंड यांचे दरम्यान असलेल्या नेदरलंडमधील स्पेनची आडकाठीही कमजोर झाली. या दोन गोष्टींनीं त्यांना

विशेष चेव आला, आणि त्यामुळें पूर्वेकडील कामकाजासंबंधानें इंग्लंड-बरोबर चाललेलें भांडण अधिकच जोरांत व चुरशींत आलें. कारण, डच लोकांच्या आशियांतील व्यापारांत इंग्लिश लोकांनीं चंचुप्रवेश केलेला असल्यामुळें त्यांना अडथळा करण्याचा आणि त्यांची पिछेहाट करण्याचा डच लोकांनीं निश्चय केला होता; उलट डच लोकांनींही इंग्लिशांच्या पूर्वेकडील व्यापाराविरुद्ध जुलमी व अरेरावी कृत्यें केलीं असल्यामुळें इंग्लिशांनाही डच लोकांबद्दल नेहमीं चेव येत होता. इ. सन १६६४ मध्यें फ्रेंच वकिलानें लंडनहून आपल्या सरकारास असें लिहून पाठविलें कीं, "इंग्लंड हालंडबरोबर दोन हात करण्यास तयार आहे;" (प्रतिस्पर्धेमुळें त्यांच्यावर हल्ला करण्याकरितां ते आपलीं मनगटें चावीत आहेत.) परंतु काल्बर्ट यानें चवदाव्या लुईचें मन फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी उभी करण्याकडे नुकतेंच वळविलेलें असून त्याची त्या वेळची राज्यपद्धति शांतता राखण्याची होती; कारण, लढाई सुरू झाली, तर जें राष्ट्र विजयी होईल, त्या राष्ट्राचें आरमारी वर्चस्व अजिंक्य होण्यामध्यें तिचा शेवट होईल, अशी त्याला भीति वाटत होती[1]. आणि त्याचें आरमार तयार नसल्यामुळें फ्रेंच किनाऱ्यावर आरमारी शक्ति समतोल राखण्याची त्याची उत्कट इच्छाही होती. तरी सुद्धां हा कलह शेवटीं इतका विकोपास गेला कीं, इ. सन १६६९ मध्यें खरोखर लढाईला सुरवात झाली, आणि फ्रान्सच्या राजाला स्वतःच्या इच्छेविरुद्ध नाइलाजानें डच लोकांना मिळणें भाग पडलें; कारण, तसें वागण्याला तो तहानें बांधला गेला होता.

---

१ यानंतर इतर राष्ट्रांना इंग्लंडशीं समुद्रावरील वर्चस्वाबद्दल लढाया करणें फार कठिण जाईल. त्यांनीं जें वर्चस्व मिळविण्याकरितां नेहमीं धडपड केली आहे, व अजूनही अत्यंत आस्था दाखवीत आहेत, त्यावरून कोणीही असें ह्मणूं शकेल कीं, हा हेतु आणि जगांतील सर्व व्यापार आपल्या ताब्यांत आणण्याचा हेतु, हे दोन्हीही वर नमूद केलेल्या राष्ट्रांराष्ट्रांमधील निमित्ताला टेकलेल्या भांडणाला मूळ कारणीभूत आहेत.

चवदाव्या लुईचें आपल्या वकिलांना पत्र (एप्रिल १६६५).

थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे सतराव्या शतकाच्या प्रारंभीं स्पेन आणि पोर्तुगाल यांचीं ठाणीं व व्यापार यांचा नाश करण्याच्या इच्छेनें डच आणि इंग्लिश हे ईस्ट इंडीजमध्यें एक झाले; त्यानंतर स्पेनच्या राजसत्तेचा ऱ्हास झाल्यावर या उत्तरेकडील दोन्हीही राष्ट्रांना आशियांतील क्षेत्र कांहीं काळ मोकळें सांपडल्यामुळें शेवटीं तीं रानटी मनुष्यांसारखीं एकमेकांवरच उलटून पडलीं. परंतु डच आणि इंग्लिश यांच्यामध्यें समुद्रांत जें भयंकर युद्ध सुरू झालें, त्यामुळें हीं दोन्हीही राष्ट्रें कमजोर झालीं व उभयतांनाही लवकरच फ्रेंच लोकांच्या फक्त युरोपांतीलच नव्हे, पण आशियांतीलही काविबाजपणाबद्दल सारखाच अविश्वास उत्पन्न झाला. कारण, फ्रान्सही आतां हळुहळु या रंगभूमीवर प्रवेश करीत होतें. तथापि हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील त्यांच्या संस्थापनेला मूर्त स्वरूप येण्याला अजून पुष्कळ वर्षें मध्यें जावयाचीं होतीं.

तात्पर्य, थोडक्यांत असें ह्मणतां येईल कीं, व्यापार हा शांततेचा धंदा आहे, ही कल्पना आधुनिक मताप्रमाणें चुकीची असून गतकालीन ऐतिहासिक गोष्टींनाही ती विसंगत आहे. जेव्हां व्यापारी लोकांना आत्मसंरक्षणाकरितां स्वतःलाच काळजी घ्यावी लागली, तेव्हां फौजेच्या व आरमाराच्या साह्यानें ते स्वतःच्या हिंमतीवर आणि आपले जीव धोक्यांत घालूनही लढले, आणि नंतर ज्या वेळीं आपापल्या कंपन्यांना मदत करण्याकरितां ज्यांचें त्यांचें सरकार पुढें सरसावलें त्या वेळीं ह्याच लढायांना राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें.

भाग दुसरा.

युरोप आणि आशिया यांमधील राजकारणाचें वजन आणि त्यांच्यामधील परस्परसंबंध.

(इ. स. १६६० ते इ. स. १७०० पर्यंत.)

परिच्छेद पहिला--युरोपमधील परिस्थिति.

सतराव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थपादांत पश्चिमेकडील मुख्य तीन दर्यावर्दी राष्ट्रें--ह्मणजे इंग्लंड, हालंड आणि फ्रान्स हीं राष्ट्रें--हीं आशियांतील समुद्रांमध्यें व्यापारी वर्चस्व मिळविण्याकरितां उघड उघड एकमेकांशीं चढाओढ करूं लागलीं होतीं, आणि त्याच वेळीं स्पेन व पोर्तुगाल हीं राष्ट्रें पुष्कळच मागें पडलेलीं होतीं. त्यांची समुद्रावरील सत्ता ढांसळली होती, आणि जरी त्यांनीं आपल्या वसाहती स्वतःच्या ताब्यांत ठेविल्या होत्या, तरी तेथील त्यांचा व्यापार अगदीं नामशेष झालेला होता. या वेळीं ईस्ट इंडीजमधील इंग्लिश कंपनीच्या वसाहतींत बंटाम इलाखा, मकासर आणि हिंदुस्थानच्या द्वीपकल्पांतील इतर कांहीं ठिकाणें, फोर्ट सेंट जार्ज, आणि त्यावर अवलंबून असलेल्या कारोमांडल किनाऱ्यावरील व बंगालच्या उपसागरांमधील वखारी, आणि मुंबईच्या पश्चिम किनाऱ्यावरील सुरत व हिंदुस्थानच्या त्या बाजूकडील इतर लहान लहान ठिकाणें, यांचा समावेश होत असे.[१]

ह्या ठिकाणीं या शतकाच्या उत्तर भागांतील युरोपखंडाच्या राजकारणांतील घडामोडींचें थोडक्यांत दिग्दर्शन करणें अवश्यक आहे; कारण, त्यामुळें ब्रिटिश राष्ट्राचा प्रारंभापासून कसकसा उत्कर्ष होत गेला, याची स्पष्ट

१ याशिवाय इराणी आखातामध्येंही इंग्लिश कंपनीचीं कांहीं ठिकाणें होतीं. (बर्डवुडचें जुन्या दफ्तरावरील माहितीपत्रक पहा.)

कल्पना येईल, आणि या पुष्कळ दिवस चाललेल्या महत्त्वाच्या शर्यती-मध्यें इंग्लिश लोकांनीं आपल्या इतर प्रतिस्पर्ध्यांना अखेरीस मागें कां टाकिलें, या गोष्टीचें स्पष्टीकरण होईल. शिवाय पुष्कळ अंशीं फ्रान्सनें केलेल्या चुका आणि हालंडला पश्चिमेकडे दुर्दैवानें आलेलें अपयश हींच इंग्लिशांना पूर्वेकडे विजय मिळविण्याला कारणीभूत झालेलीं आहेत. या शतकाच्या प्रारंभापासून परराष्ट्रांशीं असलेलें इंग्लिशांचें राजकीय धोरण ठरविण्यामध्यें पूर्वेकडील व्यापाराचें बरेंचसें वजन असून त्यांचेंच त्यांत मुख्यत्वेंकरून अंग असे. कारण, लंडन येथील व्यापाऱ्यांजवळ पार्लमेंट किंवा सरकार यांच्यावर वजन पाडण्याचीं कांहीं ना कांहीं तरी साधनें नेहमीं तयार असत. परंतु युरोपमधील सर्वसाधारण प्रचलित असलेल्या परिस्थितींत निरनिराळ्या अडचणी येत असल्यामुळें हें महत्त्वाचें राष्ट्रीय हितसंबंधाचें व्यापारी धोरण तदनुरूप बदलणें ही गोष्ट त्या वेळच्या सुमारास तरी विशेषतः अडचणीची झालेली होती. दुसऱ्या चार्लस राजाची गादीवर पुनः स्थापना (इ. स. १६६०) आणि राज्यक्रांति (इ. सन १६८८) यांच्या दरम्यान ज्या वेळीं इंग्लिशांचा व्यापार वाढला, आणि त्याची अतिशय भरभराट झाली, त्या वेळीं इंग्लंडला आशियामध्यें अगदीं पाण्यांत पाहणारे असे त्यांचे प्रतिस्पर्धी डच लोक हे असून त्यांच्याशीं झगडूनच त्यांना वर डोकें काढावयाचें होतें; तथापि उलटपक्षीं युरोपमध्यें आपलेंच घोडें पुढें ढकलणाऱ्या स्वेच्छाचारी फ्रान्सच्या विरुद्ध हेच डच लोक इंग्लिशांचे नैसर्गिक साह्यकारी दोस्त होते. पूर्वेकडे हालंड-ची असलेली सत्ता कमजोर करणें हें इंग्लिशांना व्यापारी दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें होतें, आणि पश्चिमेकडे डच लोकांच्या सत्तेला साह्याचा पाठिंबा देण्यांतच त्यांचा विशेष फायदा होता. म्हणजे आशियांतील व्यापार आणि युरोपांतील राजकारण हीं परस्पर अगदीं विरोधी होतीं. त्या काळांतील एका राजनीतिकुशल मुत्सद्यानें असें विधान केलेलें आहे कीं, आपला ईस्ट इंडियामधील व्यापार न गमावितां हालंडशीं शांततेनें कसें नांदावें,

हाच इंग्लिशांना एक मोठा प्रश्न पडलेला होता. कारण, जर त्यांनीं फ्रान्सच्या विरुद्ध डच लोकांना मदत केली, तर त्यांना स्वतःलाच अर्धचंद्र मिळून आशियाबाहेर जाण्याचा प्रसंग यावयाचा; आणि उलट पक्षीं हालंडच्या विरुद्ध जर फ्रान्सला सामील व्हावें, तर त्यामुळें एका दर्यावर्दी राष्ट्राचा नाश करून त्याचे जागीं पुढें मागें कदाचित् अतिशय प्रबळ होणाऱ्या दुसऱ्या राष्ट्राची स्थापना करण्यासारखें व्हावयाचें. फ्रान्सनें आपल्या आरमाराला व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रश्न नेटानें हातीं घेतला होता. इ. सन १६६४ मध्यें फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली, आणि तिनें इ. सन १६६९ मध्यें एक लहानसें आरमार ईस्ट इंडीजमध्यें पाठविण्याकरितां तयार केलें. इ. सन १६७२ मध्यें हालंडचे विरुद्ध इंग्लंड व फ्रान्स यांची दोस्ती झाली, तेव्हां फ्रान्समधून दी लॉ ऑई ह्या नांवाच्या एका फ्रेंच सरदाराच्या हाताखालीं सैन्याची एक तुकडी देऊन त्यास हिंदुस्थानाकडे पाठविण्यांत आलें. त्यानें सिलोनमधील त्रिकोमाली हें उत्तम बंदर हस्तगत केलें, आणि मद्रासजवळील सेंट थामे हेंही आपल्या ताब्यांत घेतलें. कारोमांडल किनाऱ्यावर—ह्मणजे ज्या ठिकाणीं पुढील शतकांत इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें भालेराई उडून तींत इंग्लंड विजयी होऊन बाहेर पडलें त्या किनाऱ्यावर—फ्रेंच लोकांच्या ह्या प्रथमच्या आगमनानेंच जरी इंग्लिशांच्या मनांत अतिशय अस्वस्थता उत्पन्न झाली, तरीही त्यांना आपल्या दोस्त असलेल्या फ्रेंच राष्ट्राच्या ह्या गुप्त हेराचा औपचारिक रीत्या सुद्धां प्रतिरोध करणें शक्य नव्हतें; शिवाय त्यानंतर डच लोकांनीं फ्रेंच लोकांपासून हीं दोन्हीही ठिकाणें परत काबीज करून घेतलीं, तरीही इंग्लिशांना ह्या स्थित्यंतरापासून फारसा फायदा झाला नाहीं.

ह्या वेळीं इंग्लंडचे परराष्ट्रीय संबंध अनिश्चित आणि विलक्षण गुंतागुंतीचे झालेले होते. इ. सन १६६९ मध्यें इंग्लंडची हालंडबरोबर लढाई सुरू झाली, आणि इ. सन १६६६ मध्यें फ्रान्स इंग्लंडविरुद्ध हालंडला जाऊन मिळालें. परंतु इ. सन १६६८ मध्यें इंग्लंड, हालंड

व स्वीडन या राष्ट्रत्रयांची फ्रान्सविरुद्ध दोस्ती झाली. उलट इ. सन १६७२ मध्यें तर हालंडवर हल्ला करण्याकरितां फ्रान्स व इंग्लंड ही जोडगोळी एक झाली, परंतु इ. सन १६७८ मध्यें फ्रान्सविरुद्ध इंग्लंडनें हालंडशीं परस्पर संरक्षणाच्या अटीवर पुन्हां तह केला. ह्मणजे, अशा रीतीनें परराष्ट्रांशीं असलेलीं राजकीय धोरणें इतक्या झपाट्यानें बदलत जाण्याचें कारण पुष्कळ अंशीं आशियांतील व्यापार हेंच होतें.

सतराव्या शतकामध्यें (इ. सन १६५२ ते १६७२या दरम्यान) हालंडच्या विरुद्ध ज्या तीन लढायांत इंग्लंड ओढलें गेलें, त्या सर्वांना व्यापारमूलक आणि वसाहतींसंबंधींच्या वैरभावामुळेंच कमी अधिक प्रमाणानें प्रोत्साहन मिळालेलें होतें. कारण, डच लोकांच्या विरुद्ध आशियांतील इंग्लिशांनीं केलेल्या गाऱ्हाण्यांनींच क्रामवेलच्या वेळीं प्रत्यक्ष भांडण उपस्थित झालें होतें; आणि आपण असेंही वाचलेलें आहे कीं, ईस्ट इंडीजमधील इंग्लिश व्यापाराच्या वाढीला अडथळे करण्याचा आणि त्याची पिछेहाट करण्याचा त्यांनीं निग्रहाचा प्रयत्न केल्यामुळेंच इ. सन १६६५ मध्यें या दोन राष्ट्रांमध्यें चकमक उडाली होती. इ. सन १६६६ मध्यें फ्रान्स हालंडला जाऊन मिळालें, आणि चवदाव्या लुईनें स्पॅनिश फ्लँडर्सवर स्वारी करीपर्यंत समुद्रावर कांहीं निकराच्या चकमकी उडाल्या. परंतु ह्या स्वारीमुळें डच लोकांना इतकी भीति वाटली कीं, त्यांनीं इंग्लिशांच्या समेटाच्या बोलण्याला रुकार दिला; आणि हल्लीं ज्याच्या ज्याच्या ताब्यांत जो जो मुलूख असेल तो तो मुलूख त्याच्या त्याच्याच ताब्यांत रहावा, आणि व्यापारी मतभेदाच्या भांडणाची सलोख्यानें तडजोड करावी, अशा अटीवर ब्रेडा येथील[2] तहावर

१ हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, त्या इतक्या पूर्वींच्या काळीं देखील इंग्लंडमधील सरकारानें कंपनीला मुंबईचें संरक्षण करण्याकरितां बऱ्याच माणसांची फौज पाठविणें भाग पाडलेलें होतें, ही गोष्ट कंपनीच्या शक्तीची द्योतक असून या वेळीं अज मासें पस्तीस जहाजांचें हत्यारी आरमारही कंपनीनें आपल्या नोकरीस ठेविलेलें होतें.

२ इ. सन १६६७.

त्यांनीं सही केली. इंग्लंडनें फ्रान्स बरोबरही तह केला; परंतु त्यास न जुमानतां चवदाव्या लुईनें स्पॅनिश फ्लँडर्स वरील आपली स्वारी तशीच पुढें रेटींत नेल्यामुळें ती बंद पाडण्याकरितां व फ्रान्स आणि स्पेन यांनीं अपसांत कशी तरी समजूत करून घ्यावी ह्मणून त्यांना भाग पाडण्याकरितां एक त्रिकुटी तह घडविण्यांत आला. त्यानंतर पुन्हां " नवी पिसणी नवा डाव " सुरू झाला. इ. सन १६७० मध्यें फ्रान्स व इंग्लंड येथील राज्यकर्त्यांचा, उभयतांनीं मिळून डच लोकांवर स्वारी करावी, असा डोव्हर येथें एक परस्पर गुप्त तह झाला. इ. सन १६७२ मध्यें दुसरा चार्लस हा, फ्रेंच लोकांनीं त्याला लांच दिली, आणि रोमन क्याथालिक धर्माकडे त्याचा ओढा होता, ह्मणूनच फ्रान्सला मिळाला, असा जो सर्वसाधारण समज आहे, तो चुकीचा असून इंग्लंडमध्यें असलेल्या सामाजिक आणि राजकीय बाबतींतील स्वातंत्र्याला आळा घालण्याचा त्याचा निःसंशय रोख असल्यामुळेंच त्यानें फ्रान्सशीं दोस्ती केली. परंतु परराष्ट्रांच्या बाबतींतील असलेल्या उद्देशांपैकीं, हालंडची आरमारी व व्यापारी वाढ कायमची खुडून काढावी, हाही त्याचा एक प्रधान उद्देश होता. कारण, अमेरिका आणि आशिया या दोन्हीही खंडांमध्यें हालंडबरोबर इंग्लंडचीं याच वेळेस पुष्कळ अनिर्णयात्मक भांडणें सुरू होतीं. इ. सन १६७४ मध्यें फ्रान्स, इंग्लंड आणि पोर्तुगाल यांचेमध्यें एक गुप्त तह झाला, आणि त्या अन्वयें तिघांनीं मिळून आशियांतील डच लोकांच्या ठाण्यांवर आरमार पाठवावें, आणि तीं हस्तगत करून घेऊन सर्वांनीं मिळून आपापसांत त्यांची वांटणी करून घ्यावी, असें ठरलें होतें. यावरून हेंही उघडच आहे कीं, आशियांतील कारभारांत निकट संबंध असलेल्या ह्या दोन राष्ट्रांमध्यें वैमनस्य उत्पन्न होण्याला कांहीं जबरदस्त व पुन्हां पुन्हां उद्भवणारीं अशींच कारणें झालेलीं होतीं[१].

१ आमच्यावर त्यांचा भरवसा नाहीं; स्पेनचा ते तिटकारा करितात; आणि हालंडशीं त्यांचा द्वेष आहे.

(इंग्लंडच्या दरबारांतील फ्रेंच वकील मार्क्वीस दी रुव्हेग्नी यानें इ. सन १७७२ या वर्षी आपल्या सरकारास लिहिलेल्या पत्रांतील उतारा.)

या त्रिकुटी तहामध्यें इंग्लंडच्या बाजूनें बोलणें करणारा सर विल्यम टेंपल यानें देखील आपल्या एका लेखांत, हालंडच्या नाशापासून फ्रान्सच्या नाशापेक्षां आपणाला अधिक फायदे होतील किंवा काय, ह्या प्रश्नाचा ऊहापोह केलेला असून, हालंडचा जरी नाश झाला, तरी इंग्लंडला डच लोकांचा व्यापार आणि आपल्या गलबतांतून इतर देशांचा माल नेआण करण्याचा हक्क आपल्याकडे ओढून घेतां येईल कीं काय, या संबंधानें त्यास संशय होता. उलट पक्षीं, इंग्लंडनें हालंडविरुद्ध फ्रान्सशीं सख्य केलें नाहीं, तर कदाचित् तीं दोन्हीही युरोपियन राष्ट्रें इंग्लंडविरुद्ध एक होतील कीं काय, अशी त्यास भीतिही वाटत होती. इ. सन १६७१ मध्यें त्याप्रमाणें इंग्लंड फ्रान्सला हालंडच्या विरुद्ध लढाईंत खरोखर सामील झालें, आणि इंग्लिशांच्या पुरतेंच ह्मणावयाचें ह्मणजे इ. सन १६७४ मध्यें अरुंद समुद्रांत इंग्लिश निशाणास मान देण्याला आणि सर्व व्यापारी मतभेद पंचांपुढें मांडण्याला डच लोक कबूल होऊन लढाईची समाप्ति झाली. इकडे चवदावा लुई हा फ्लेमिश सरहद्दीवरील शहरें एकामागून एक काबीज करीत चालला होता; त्याचीं मोठमोठीं सैन्यें हालंड देशाची धूळधाण उडवीत चाललीं होतीं. आणि प्रिन्स ऑफ ऑरेंज यानें, मी जिवंत जीव आहे तोंपर्यंत लढेन, असें उघड उघड जाहीर केलेलें होतें. सरते शेवटीं हालंडला नाशापासून वांचविण्याकरितां इंग्लंडनें डच लोकांबरोबर संरक्षक तह केला, तेव्हां निमेगेन येथें इ. सन १६७८ मध्यें एक सर्वसाधारण तह कायम करण्यांत आला, आणि या तहांतील कलमें फ्रेंचांना फार अनुकूल होऊन त्यामुळें चवदाव्या लुईस नेदरलंडच्या सरहद्दीवरील पुष्कळशीं शहरें आपल्या ताब्यांत ठेवितां आलीं.

ह्या दीर्घ काळ चाललेल्या युरोपांतील लढायांचें पर्यवसान उघड उघड इंग्लंडचें सामर्थ्य वाढविण्यांत आणि हालंडचें कमजोर करण्यांत झालें. इ. सन १६७७ मध्यें फ्रान्सच्या स्वारीमुळें डच लोक संकटांत आणि अडचणींत आले, त्या वेळीं इंग्लिशांच्या व्यापाराची विलक्षण रीतीनें भर-

भराट होत चालली होती[1]. शिवाय इ. सन १६७८ चा मुदती तह नवीन वितुष्ट उत्पन्न होऊन मोडला गेला होता. त्या वेळेपासून सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत फ्रान्सचा राजा वाटेल तसा खर्च करून आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याकरितां इरेच्या लढायांत अगदीं निमग्न झालेला होता. उलट डच लोक हे आपलें अस्तित्व कायम ठेवण्याकरितां मोठ्या निकरानें झगडण्यांत गढून गेलेले होते. ह्मणजे, ज्या दोन—फ्रान्स व हालंड—दर्यावर्दी राष्ट्रांपासून इंग्लंडला पूर्वेकडे कांहींसें भय होतें, तींच राष्ट्रें युरोपांत एकमेकांशीं झगडण्यांत अगदीं चूर होऊन गेलेलीं होतीं. ह्या युद्धकलहांतून रिस्विकच्या तहानें (इ. सन १६९७ या वर्षीं) हालंड एकदाचें बाहेर पडलें; पण त्यामुळें त्याच्या शक्तीचा फार ऱ्हास झालेला होता. व्यापाराला जबर ठोकर बसलेली होती; आणि लांबवर मोहिमी करण्याचीं साधनेंही वस्तुतः पुष्कळच प्रमाणानें कमी झालेलीं होतीं. परंतु डच लोकांनीं ईस्ट इंडीजमधील कोलबर्टच्या आश्रयाखालीं स्थापन झालेल्या फ्रेंचांच्या प्राचीन वसाहतींचें पुष्कळ नुकसान केलेलें होतें. फ्रान्स जमिनीवरील लढायांत गुंतलेलें होतें; आणि विशेषतः लढाईची बाजू जेव्हां अंगावर येऊं लागली, तेव्हां तर तें त्यांत इतकें गुरफटून गेलें कीं, व्यापार व वसाहती वाढविण्याच्या कोलबर्टच्या शहाणपणाच्या व दूरदर्शी योजनांचें अवलंबन करण्याला तें अगदींच असमर्थ झालेलें होतें; त्याच्या आरमारी सत्तेच्या वाढीला आळा बसलेला होता, आणि युट्रेक्टचा[2] तह झाल्यावर बराच काळ जाईपर्यंत त्यामध्यें धाडशी

१ अर्ल ऑफ डॅन्बी यांस ब्रिसबेन यानें पाठविलेल्या पत्रामध्यें तो असें ह्मणतो कीं:- " सतरा वर्षांच्या मागें या बाबतींत बोलणाऱ्या लोकांनीं बांधलेल्या अटकळीहूनहीं अधिक प्रमाणानें आपला व्यापार आणि नौकानयन यांची सुधारणा करण्यांत राजाला यश आलें आहे....आणि आतां तर इंग्लंडच्या व्यापाराचा इतका कळस झाला आहे कीं, तो इतका वाढेल यावर भरवसा ठेवणें हें जितकें एके काळीं कठिण होतें, तितकेंच तो असाच पुढेंही चालू राहील असें मानणेंही कठिण आहे."

ता. २५ जून १६७७. डान्बीचीं पत्रें, पान ३१५.

२ इ. सन १७१३.

कृत्यें करण्याइतका जोमही राहिला नव्हता. थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे फ्रेंच आणि डच ह्या उभयतांनीं परस्परांना पूर्णपणें निर्बल केलें, आणि हीच गोष्ट समुद्राच्या पलीकडील इंग्लिशांच्या हालचालींना फार फायदेशीर झाली. कारण, ह्याच वेळेपासून इंग्लंड हळुहळु पण एकसारखें विजय आणि व्यापार ह्या दोहींतही आशियाखंडामध्यें वर्चस्व मिळवूं लागलें.

युरोपखंडांतील मोठमोठ्या युद्धाच्या ह्या काळापासून इंग्लिशांच्या पूर्वेकडील व्यापाराला कायमचें भरभराटीचें स्वरूप येण्याला सुरवात झाली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण, ह्याच वेळीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर इंग्लिश लोकांनीं आपला पाय मजबूत रोविला. मेकालेच्या इतिहासावरून आपणाला असें कळून येतें कीं, दुसऱ्या चार्लसची गादीवर पुनःस्थापना झाल्यानंतरच्या वीस वर्षांमध्यें फक्त बंगालमधीलच वार्षिक आयातीचें उत्पन्न आठ हजार पौंडांपासून (१,२०,००० रुपये) तीन लक्ष पौंडांपर्यंत (४५,००,००० रुपये) वाढलें. आणि कंपनीला ईस्ट इंडियामध्यें उत्पन्न झालेल्या जिनसांच्या आयातीच्या मक्त्यापासून झालेले फायदे तर अगदींच अविश्वसनीय वाटण्यासारखे होते. इ. सन १६८९ मध्यें इंग्लिशांच्या पश्चिम भागाकडील व्यापाराचें मुख्य ठिकाण सुरत शहराऐवजीं मुंबई करण्यांत आलें; इ. सन १६८७ मध्यें बंगालमधील मुख्य अडत हुगळीहून कलकत्ता येथें नेण्यांत आली; आणि हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या पूर्व किनाऱ्यावर मद्रास हें त्यांचें केंद्रस्थान झालें. शेवटच्या दोन स्टूअर्ट राजांच्या कारकीर्दींत कंपनीला सढळ हातानें प्रोत्साहन व पुष्कळ सनदा मिळालेल्या होत्या; आणि त्यांनीं कंपनीच्या वसाहतींत कुमकेदाखल सेनासामग्रीही पाठविली होती. अशा रीतीनें वर लिहिलेलीं मुंबई, कलकत्ता व मद्रास हीं मुख्य तीन ठाणीं—जीं पुढें इलाख्याच्या मुख्य राजधान्यांचीं शहरें झालीं, ज्या तीन ठिकाणीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा पाया पहिल्या प्रथम बसविण्यांत आला, आणि ज्या ठिकाणांपासूनच त्यांचा विस्तार पुढें दश दिशा पसरत गेला, तीं मुख्य तीन ठाणीं—

स्थापन करण्यांत आल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीनें इ. सन १६८७ मध्यें आपल्या वसाहतींत स्वतंत्रपणें अधिकार चालविण्याचा, तटबंदी करण्याचा, नाणीं पाडण्याचा, जकात वसूल करण्याचा, किंबहुना थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे आपल्या हद्दींत स्वतंत्र रीतीनें राज्यकारभार चालविण्याचा निश्चय केला. त्यांनीं आतां सनदेनें मिळविलेल्या हक्काअन्वयें आपणावर कोणी प्रत्यक्ष हल्ला अगर जुलूम केला असतां त्याचा प्रतिकार करून आपलें संरक्षण करण्याकरितां, आणि लहान लहान संस्थानिक अगर प्रांतांचे सुभेदार यांच्याशीं भांडणें उपस्थित झाल्यास आपल्या स्वतःला आपल्या बाजूनें आणि आपल्याकरितां लढतां यावें, ह्मणून हिंदुस्थानांतील एतद्देशीय सैन्य नोकरीस ठेवण्याची सुरवात केली; आणि या तुटक तुटक असलेल्या व्यापारी वसाहतींचा शेवटीं जो अफाट राज्यवृक्षामध्यें विस्तार झाला, त्याचा अंकुर ह्या वर सांगितलेल्या नवीन सुरू केलेल्या पद्धतीमध्येंच असून मोंगल राष्ट्रामध्यें हळु हळु येत असलेल्या कमकुवतपणानेंच असें स्थित्यंतर घडून येण्याला कल्पना आणि संधि हीं मिळवून दिलीं.

परिच्छेद दुसरा—हिंदुस्थानांतील तत्कालीन राजकीय परिस्थिति.

जोंपर्यंत बादशाही सत्तेचा जोर हिंदुस्थानांतील अगदीं दूरच्या प्रांताच्या हद्दीपर्यंत पूर्ण अबाधितपणें चालू होता, आणि जोंपर्यंत दोन्ही समुद्र किनाऱ्यांवर त्या सत्तेचें अस्तित्व मूर्तिमंत भासत होतें, तोंपर्यंत इंग्लिश व्यापारी निर्गत मालावरील कराची तडजोड करण्याकरितां मिळालेले परवाने, आपल्या वखारी बांधण्याकरितां मिळालेल्या इनाम जमिनी, आणि रोख ठोक पैसे मोजून मोजलेल्या पैशाची पूर्ण रीतीनें भरपाई करून देणारे मिळविलेले कांहीं हक्क, यांवरच संतुष्ट असत. परंतु आतां लांबच्या सरहद्दीवरील ताब्यांतील ठिकाणें शांततेनें बादशाही अमलाखालीं राहतां येणें शक्य नव्हतें. मराठ्यांचा

सरदार शिवाजी हा दक्षिण[1] प्रांताच्या आसपास धिरट्या घालीत होता; त्यानें कर्नाटकावर स्वारी केली होती; आणि युरोपियन लोकांच्या वसाहती व बंदरें यांसुद्धां पश्चिम किनाऱ्यावरील सर्व प्रदेशभर त्यानें आपला अंमल बसविला होता. इ. सन १६६४ मध्यें त्यानें सुरत शहर लुटलें, त्या वेळीं तेथें असलेल्या इंग्लिश वखारींचें सर जार्ज आक्झेंडन यानें मोठ्या शौर्यानें संरक्षण करण्याचा प्रयत्न केला, आणि त्यांत त्याला यशही आलें. इ. सन १६७१ मध्यें शिवाजीनें सुरत येथून व पोर्तुगीज वसाहतींमधून जबर खंडणी वसूल केली. अवरंगझेब बादशहाचें लक्ष ह्या वेळीं अफगाणिस्थानच्या बंडाकडे वेधलेलें होतें, त्यामुळें मोंगलांच्या सुभेदारांना कोणालाही आह्मी तुमचें खात्रीलायक संरक्षण करूं, असें सांगतां येत नव्हतें. अफगाणिस्थानांतील हें बंड मोडण्याकरितां अतिशय कष्ट सोसून आणि पुष्कळ काळपर्यंत तळ देऊनही त्याच्यानें तें बिलकुल दाबून टाकवलें गेलें नाहीं. आणि जेव्हां तो दक्षिणेंत परत आला, तेव्हां आपले शत्रु रणक्षेत्रामध्यें उतरण्याला पूर्वींहूनही अधिक प्रबळ झाले आहेत, असें त्यास आढळून आलें. इ. सन १६८० मध्यें शिवाजी मृत्यु पावला, आणि त्याच्या मागें त्याचा मुलगा संभाजी यानेंही तें बंड तसेंच पुढें चालू ठेविलें. एकसारख्या लढाया, प्रत्यक्ष समोरासमोर न येतां गनीमी काव्यानें लढणाऱ्या शत्रूचा निरर्थक पाठलाग, आणि बादशहा राजधानीपासून दूरवरच्या मोहिमींत गुंतल्यामुळें राजसत्तेचें केंद्र जें दिल्ली शहर तेथील राज्यव्यवस्थेंत झालेली अंदाधुंदी, यांमुळें बादशाही सैन्य हळु हळु अगदींच जेरीस येऊन गेलेलें होतें. अवरंगझेबानें दक्षिण हिंदुस्थानांतील गोवळकोंडें आणि विजापूर येथील मुसलमानी राज्यें जर बुडविलीं नसतीं, तर त्यांचा मराठ्यांच्या ह्या वाढत्या

१ दक्षिण प्रांत हा हिंदुस्थान देशाच्या मध्यभागीं एक मोठा प्रांत असून विंध्याद्रि पर्वताची ओळ आणि नर्मदा नदी ही त्याची उत्तरेकडील ढोबळ मर्यादा आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

बंडाळीच्या लाटांना थांबवून धरण्यास एखाद्या बांधाप्रमाणें निदान उपयोग तरी झाला असता. एखाद्या सांथीच्या रोगाप्रमाणें लढाई ह्या वेळीं पसरत चालली होती, आणि एतद्देशीय राज्यव्यवस्थेची घडी अशा रीतीनें विस्कळित झालेली असल्यामुळें परदेशीय वसाहतींना आपला पाय मजबूत करावा लागला होता. कारण, त्यांना आत्मसंरक्षणाकरितां या आलेल्या संधीचा फायदा घेऊन हिंदुस्थानांत अधिक स्वतंत्रपणाची स्थिति मिळविणें भाग पडलें होतें. कायद्यानें प्रस्थापित झालेली श्रेष्ठ सत्ता खिळखिळी झाल्यामुळें लांबच्या प्रांतिक सरकारांवरील तिचा दाब ढिला पडला होता; स्थानिक अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणाबरोबरच स्थानिक जोरजुलुमालाही सुरवात झाली होती; इच्छेस येईल त्याप्रमाणें पैसा उकळणें व लहर फिरेल त्याप्रमाणें दंड गोळा करणें, वगैरे जुलूम व्यापारी वर्गावर लहान लहान अधिकाऱ्यांकडून होऊं लागले होते; आणि या अधिकाऱ्यांना तर त्या व्यापाऱ्यांना खात्रीची हमी अगर नियमित आश्रय देतां येत नसून उलट तेच अधिकारी त्यांनीं बादशहाच्या प्रधानमंडळाकडून खुद्द राजदरबारीं मिळविलेली सूट व हक्क यांचेकडे अनेकदां बिनधोकपणें बंदरामध्यें कानाडोळाही करीत होते.

अशा परिस्थितीमध्यें पुष्कळ विचारपूर्वक साधक बाधक वादविवाद केल्यानंतर इंग्लिश कंपनीची अशी खात्री झाली कीं, पूर्वींच्या पोर्तुगीज लोकांप्रमाणें डच लोकांनीं मिळविलेलें यश आणि तितकाच सुरक्षितपणा हीं बादशाही मर्जीस न जुमानतां जेथें स्वातंत्र्यानें राहतां येईल, व ज्यामुळें सभोंवती असलेले राजेरजवाडे व सरकारी अधिकारी यांच्या जुलमी मागण्या धाब्यावर बसविण्यास सोइस्कर पडेल, अशा मजबुत जागा बळकविणें, आणि त्यांना राजरोस तटबंदी करणें, ह्यावरच अवलंबून होतीं. तथापि त्यांनीं अंगिकारिलेल्या स्वतंत्रतेचें क्षेत्र समुद्र किनाऱ्यापुरतेंच ह्या वेळीं रहावयाचें होतें, आणि तिचा उद्देश स्वतःच्या व्यापाराच्या सुरक्षितपणापेक्षां अधिक कांहींही नव्हता. परंतु इंग्लिश लोकांना

लवकरच असें कळून आलें कीं, हिंदुस्थानच्या भूमीवर परदेशीयांचें निशाण बिनधोकपणें उभारण्याची वेळ अजून आली नाहीं. मुसलमानी राज्याचा विस्तार पश्चिम किनाऱ्यावर होण्याच्या पूर्वीच पोर्तुगीज लोक गोवें येथें स्थायिक झाले होते; डच लोकांनींही आपल्या बहुतेक स्वतंत्र वसाहती बऱ्याच भागांत स्थापन केलेल्या होत्या; आणि सतराव्या शतकामध्यें मोंगल बादशहाची सत्ता जरी कमी झाली होती, तरीही त्याच्याच समुद्र किनाऱ्यावर आणि प्रत्यक्ष त्यालाच न जुमानतां बिनधोकपणें राहतां येईल इतकी त्याची सत्ता नष्ट झालेली नव्हती. त्यामुळें जेव्हां इ. सन १६८७ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीनें अवरंगझेबाविरुद्ध लढाई जाहीर करण्याचें धाडस केलें, तेव्हां ह्या अविचाराच्या कृत्यामुळें आपण फार संकटांत आलों आहोंत, असें सर्व इंग्लिश वसाहतींना आढळून आलें. परंतु ह्या परकीय लोकांच्या सुदैवानें मराठ्यांचा पुढारी संभाजी याला पकडून त्याचा अवरंगझेबानें वध केल्यामुळें नैऋत्येकडील हिंदू लोकांना चेव आला; ते ह्या धर्मवेड्या मुसलमान बादशहाचे विरुद्ध जोराचें बंड करण्यास एकत्र झाले; आणि त्यामुळें गनिमी काव्याच्या लढाया व वणव्यासारखीं पेटणारीं बंडें, यांच्या जाळ्यांत तो इतका पूर्णपणें गुरफटून गेला कीं, त्याला इतर शत्रूंच्या मानानें अगदींच क:पदार्थ असलेल्या ह्या व्यापारी अगांतुकांचा योग्य समाचार घेण्याला पुरेसा अवसर मिळाला नाहीं. शिवाय मोंगली सैन्याचें कायमचें आरमार नव्हतें; त्यामुळें बंदरांची व नद्यांच्या खाड्यांची नाकेबंदी करणें अथवा परदेशांतून येणाऱ्या जहाजांना अडथळा करणें त्याला शक्य नव्हतें; उलट त्यांच्याशीं केलेल्या वैरभावामुळें बादशाही कराच्या वसुलीचें मात्र फार नुकसान होत होतें.

सोळाव्या शतकांतील हिंदुस्थानच्या इतिहासांत दोन मुख्य मुद्दे आहेत, आणि त्यांवरून पुढें तीन शतकेंपर्यंत चाललेल्या कार्यकारणभावाचा विचार केला असतां त्यांचा परमावधीचा शेवट ब्रिटिश साम्राज्याच्या संस्थापनेंत झाला आहे, असें आढळून येतें. ह्यांपैकीं पहिला मुद्दा हा आहे कीं, युरोपां-

तील एका राष्ट्रानें, ह्मणजे पोर्तुगीज लोकांनीं, जगाच्या इतिहासांत अगदीं पहिल्यानेंच हिंदुस्थानच्या मुख्य भूमीवरील प्रदेश ताब्यांत मिळवून तेथें आपला पाय मजबूत केला; आणि दुसरा हा आहे कीं, आक्सस नदीच्या पलीकडे राहणाऱ्या तार्तार जातीच्या एका सरदारानें हिंदुस्थानांत मोंगली राष्ट्राची संस्थापना केली. मोंगल लोकांनीं खुष्कीच्या बाजूनें आपली शेवटची आणि यशस्वी स्वारी करण्याच्या फक्त कांहीं थोडींच वर्षें अगोदर युरोपस्थ लोकांनीं समुद्राच्या मार्गानें हिंदुस्थानांत जोरानें आपला शिरकाव केला. कारण, अलबुकर्क यानें इ. सन १५१० मध्यें गोवें आपल्या ताब्यांत घेतलें, आणि इ. सन १५२५ मध्यें बाबर ह्या नांवाच्या एका विलक्षण साहसी आणि युद्धकलानिपुण छगताई तार्तरानें आपल्या बरोबरील बारा हजार सैन्यानिशीं दिल्ली येथील पठाण राज्यकर्त्यांचें राज्य उलथून पाडिलें; हिंदुस्थानचे उत्तरेकडील प्रांत आपल्या कबजांत घेतले; आणि मोंगली राष्ट्राची संस्थापना केली. सोळाव्या शतकाच्या मध्यकालापासून ज्या मोंगली घराण्यानें हिंदुस्थान देश जिंकून तेथें आपली हुकमत चालविली, त्या घराण्यांतील अवरंगझेब (अलमगीर ह्या किताबानें हिंदुस्थानांत अधिक प्रसिद्ध असलेला) हा शेवटचा कर्तृत्ववान बादशहा होऊन गेला. इंग्लंडच्या इलिजाबेथ राणीचा समकालीन ह्या घराण्यांतील बादशहा अकबर यानें त्याचा पाया भक्कम केला आणि मोंगली राज्य वैभवाच्या व सत्तेच्या कळसास नेऊन पोंचविलें. इ. सन १५५६ मध्यें अकबर गादीवर बसला, तेव्हांपासून तों इ. सन १७०७ मध्यें अवरंगझेब मृत्यु पावला, तोंपर्यंतच्या या एकशेंएकावन वर्षांच्या अवधींत एकामागून एक अशा या घराण्यांतील चार बादशहांनीं राज्य केलें; आणि ज्या अर्थीं आशियामध्यें पुष्कळ वर्षें चालणारें राज्य नेहमीं बळकट असतें, त्या अर्थीं मोंगल हे हिंदुस्थानचे दीड शतकपर्यंत वास्तविक पाहतां पूर्णपणें अधिपति होते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हें घराणें जातीनें परकीय असून त्यांच्या चालीरीतीही परदेशीय होत्या.

नेहमीं ताज्या रक्ताचे तरुण बांड बाहेरून आणून राज्याची बळकटी कायम ठेविली जात होती; आणि आपल्या जातीच्या व आपल्या धर्माच्या हिंदुस्थानच्या बादशहाच्या हाताखालीं नोकरी करण्याकरितां मध्य आशियांतून जे बळकट व जोमदार तरुण येत असत, त्यांतूनच मुखत्वेंकरून लष्करी आणि दिवाणी खात्यांतील मुख्य मुख्य अधिकारी निवडले जात. अकबर व त्याच्या मागून गादीवर बसलेले दोन बादशहा हे मुत्सद्दी राज्यकर्ते असून त्यांनीं हिंदू राजघराण्यांबरोबर शरीरसंबंधही केलेले होते. ते विवक्षित मर्यादेपर्यंत जनसमाजाच्या बाधक कल्पनांना मान देत, आणि सामाजिक व धार्मिक बाबतींतील जुलूमही योग्य सीमेच्या आंतच करीत. जहांगीर आणि शहाजहान हे दोन्हीही बादशहा हिंदू आईपासून झालेले मुलगे होते; परंतु शहाजहानचा मुलगा व अकबराचा चवथा वंशज अवरंगझेब ह्याची आई समजातीय असून तो इस्लाम धर्माचा कट्टा अभिमानी होता. शहाजहान बादशहाच्या मुलांमध्यें आपआपसांत जोराची यादवी सुरू झाली, त्यांत अवरंगझेब विजयी झाला; व त्यानंतर त्यानें धर्मवेडेपणानें लोकांना छळण्याला आणि महत्त्वाकांक्षेनें आपल्या प्रदेशाची वाढ करण्याला सुरवात केली. अवरंगझेबाच्या पुष्कळ वर्षांच्या कारकीर्दीच्या आरंभाच्या सुमारास फ्रान्सिस बर्नियर ह्या नांवाचा एक फ्रेंच मनुष्य मोंगल बादशहाच्या दरबारामध्यें राजवैद्य ह्मणून राहिलेला होता. त्यानें लिहिलेल्या लेखांत त्या वेळीं मोंगली राष्ट्राची स्थिति कोणत्या प्रकारची होती, याचें हुबेहुब चित्र रेखाटलेलें आहे. त्याच्या पुस्तकांत तत्कालीन इतिहासाचें मनोवेधक वर्णन केलेलें आहे; राज्य चालविण्याची पद्धत, फौजेची घटना, आणि हिंदुस्थानांतील समाजाचीं व राज्यकारभाराचीं अगदीं ठळक रीतीनें दिसून येणारीं लक्षणें, यांसंबंधीं त्यांत मार्मिक टीका केलेली आहे; आणि त्यांतल्या त्यांत त्यानें फ्रान्समध्यें परत गेल्यावर चवदाव्या लुईचा प्रख्यात कारभारी कोलबर्ट यास “ हिंदुस्थानासंबंधीं ” लिहिलेलें पत्र तर अतिशयच महत्त्वाचें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोलबर्ट यानें फ्रेंच ईस्ट इंडिया

कंपनीची नुकतीच स्थापना केली होती, आणि हीच अठराव्या शतकांत इंग्लिश कंपनीला भयंकर प्रतिस्पर्धी झाली. फौजेचें व इतर अधिकारी वर्गाविषयींचें बर्नियरनें केलेलें वर्णन बोधप्रद आहे. तो म्हणतोः—

" दिल्लीचा बादशहा हा हिंदुस्थानांत परका आहे; म्हणून ज्या देशांत हजारों हिंदू लोकांत एखादा मोंगल अगर एखादाच मुसलमान आढळून येईल, अशा शत्रूच्या मुलखांत किंवा जवळ जवळ तशाच प्रकारच्या मुलखांत आपण आहोंत, असें त्यास वाटतें."

" खुद्द बादशहाच्या दरबारीं पूर्वीप्रमाणें आतां अस्सल मोंगल सरदार नाहींत; परंतु युझबेग, इराणी, अरब, तुर्क, अथवा या सर्व लोकांचे वंशज यांची खिचडी झालेली आहे."

त्यानें दुसऱ्या एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं:—" फ्रान्स मधील आमच्या अमीरउमरावांप्रमाणें मोंगल दरबारांतील उमराव अगर सरदार हेही पुरातन घराण्यांतीलच आहेत, असें समजतां कामा नये. .... त्यांपैकीं बहुतेक निरनिराळ्या राष्ट्रांतील धाडशी लोक आहेत; त्यांनीं एकमेकांना लालूच दाखवून दरबारांत आणलेलें आहे; ते बहुतेक हलक्या कुळांतील आहेत; आणि त्यांपैकीं कांहीं तर पूर्वीं निव्वळ गुलाम असून त्यांना बादशहा आपल्या इच्छेप्रमाणें आणि लहर येईल तेव्हां अधिकारावर चढवितो अगर निर्माल्यवत् करून टाकतो."

बर्नियर हा पुढें आणखी असेंही लिहितो कीं:—" सर्व प्रकारच्या खाजगी मालमत्तेविषयीं पूर्ण असुरक्षितपणा, सारावसुलीचा जुलूम, राज्याचा डळमळीतपणा, न्यायाचा अभाव, बादशहा व त्याचे दुय्यम अधिकारी यांची छळणूक व द्रव्यतृष्णा,—आणि ती छळणूकही इतकी भयंकर कीं, त्याच्या योगानें शेतकरी व कामकरी लोकांच्या जीवनाचीं अवश्य साधनें हींही हिरावून घेतलीं जात, जमिनीची मशागत करणाऱ्या शेतकरी वर्गाला आपल्या भिकार झोंपड्याही सोडून द्याव्या लागत, व

शेतीचीही नासाडी होऊन जाई,–ह्या गोष्टी आशियांतील सर्व राज्यांचा झपाट्यानें ऱ्हास होण्यास बऱ्याच अंशानें कारणीभूत झालेल्या आहेत."

तो पुढें म्हणतो कीं:—"ह्या तापदायक पद्धतीमुळेंच हिंदुस्थानांतील बहुतेक शहरें चिखलामातीचीं आणि अशाच दुसऱ्या भिकार सामग्रीचीं बांधलेलीं आहेत. पुष्कळ शहरांचा नाश झालेला असून बरींच ओसाड पडलेलीं आहेत, आणि अशांतूनही जर कांहीं राहिलेलीं असलीं, तर तेथें देखील त्यांचा लवकरच ऱ्हास होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत."

अशा रीतीनें त्यानें मोंगल राष्ट्राच्या राजकीय आणि सांपत्तिक ऱ्हासाच्या कारणांबद्दल मीमांसा केलेली असून ती बारकाईनें पाहणाराला अगोदरच कळून चुकली असती.

बर्नियर यानें हें लिहिल्यानंतर लवकरच अवरंगझेब हा दक्षिण हिंदुस्थानांत कधींही न संपणाऱ्या लढायांमध्यें गुंतला गेला, आणि हळुहळु पेचांत व संकटांत येऊन त्याच्या कारकीर्दीचीं अखेरअखेरचीं वर्षें फारच विपन्नावस्थेंत गेलीं. हिंदू प्रजेला दाबांत ठेवण्याला पूर्णपणें समर्थ असलेल्या लहान लहान मुसलमानी राज्यांचा नायनाट उडविण्यांत त्याला यश आलें; परंतु वास्तविक पाहतां त्यानें आपल्या राज्याचा विस्तार करून तें कमकुवत मात्र केलें. कारण, राजधानीपासून फार दूरवर असलेले व नवीन मिळविलेले दक्षिणेकडील प्रांत त्याला पूर्णपणें आपल्या दाबांत ठेवितां येईनात; आणि त्याच्या धर्मवेडेपणामुळें हिंदू लोक फक्त चिडूनच गेले होते, असें नाहीं, तर त्यांच्यावर दाब ठेवण्याला तो असमर्थ झाल्यामुळें

१ दरबारांतील अनेक अमीरउमरावांचा थाटमाट चालू राहण्याकरितां अवश्य असणारा, आणि लोकांना आपल्या दाबांत ठेवण्याच्या उद्देशानें बाळगलेल्या मोठ्या सैन्याच्या पगाराकरितां अगत्य लागणारा, अवाढव्य खर्च भागवावा लागत असल्यामुळें देशाची दुर्दशा झालेली आहे, आणि त्यामुळें प्रजाजनांचे किती भयंकर हाल होत आहेत, याबद्दल योग्य कल्पना करून देणेंही अशक्य आहे. बर्नियर.

उलट त्यांना अधिक प्रोत्साहनही मिळालेलें होतें. शिवाय, वायव्येकडली अफगाणिस्थानच्या खिंडीशिवाय इतर मार्गानें दुसरा कोणी परदेशीय शत्रु येऊन आपल्या राज्यांत ढवळाढवळ करील, असें बादशहाच्या ध्यानीं मनींही नसल्यामुळें त्यानें आपल्या समुद्राच्या सरहद्दीच्या बाबतींत कधींही फारसें मन घातलेलें नव्हतें. हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर ह्या वेळीं फक्त अॅबिसिनियामधून येऊन स्वतंत्र रीतीनें वसाहत केलेल्या शिद्दी लोकांचेंच काय तें आरमार होतें, आणि त्यांचे सरदार हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडील भागावर जरूर लागेल तेव्हां आपलें आरमार उपयोगांत आणण्याकरितां अवरंगझेबाच्या हवालीं करीत असत.

वर लिहिलेलीं कारणें व तदनुकूल परिस्थिति, बादशाहतीच्या मुख्य राज्यकारभारांत हळुहळु होत चाललेला ऱ्हास, राज्याच्या सरहद्दीवरील प्रदेशांत ढिली पडत चाललेली बादशाही सत्ता, आणि मुख्यत्वेंकरून बाणेदार मराठे पुढाऱ्यांच्या धुरीणत्वाखालीं हिंदु लोकांनीं केलेल्या बंडाच्या वणव्यापासून उत्पन्न झालेली चळवळ, या कारणांमुळें सतरावें शतक संपण्याच्या सुमारास हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर इंग्लिशांना आपला पाय मजबुत करणें सुसाध्य झालें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

ह्याशिवाय आणखीही एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, जेव्हां मोंगल बादशहाच्या चुका आणि त्यावर आलेलीं संकटें यांमुळें हिंदुस्थानचे दरवाजे समुद्राच्या बाजूनें परदेशस्थ लोकांना आंत येण्याला खुले झाले, त्याच वेळीं युरोपमध्येंही लढाईच्या काळास प्रारंभ झाला, आणि त्यामुळें पुष्कळ वर्षेपर्यंत इंग्लडचे समुद्रांतील दोन प्रतिस्पर्धी जे फ्रान्स आणि हालंड यांचीं साधनें कमजोर झालीं, अगर दुसऱ्या दिशेकडे वळविलीं गेलीं. सतराव्या शतकाच्या दुसऱ्या अर्ध भागामध्यें ज्या दोन सुलतानी राज्यकर्त्यांनीं—ह्मणजे अवरंगझेब आणि चवदावा लुई यांनीं—हिंदुस्थान आणि फ्रान्स ह्या दोन देशांमध्यें आपला अंमल गाजविला, त्या दोघांच्याही कारकीर्दीचा काळ बहुतेक एकच होता; कारण, त्या उभयतांची

गादीवर बसून प्रत्यक्ष राज्य चालविण्याची वेळ साधारणतः अगदीं जवळ जवळ होती. अठराव्या शतकांत फार थोड्या वर्षांच्या अंतरानेंच ते उभयतां मृत्यु पावलेले आहेत, आणि ज्या पद्धतीनें हे दोन्हीही नामांकित राज्यकर्ते स्वतः राज्य चालवीत, ती पद्धत व तिजमुळें घडून आलेले अनिष्ट परिणाम यांमध्येंही काल्पनिक साम्यापेक्षां पुष्कळच अधिक साम्य आहे. ज्या वेळीं अवरंगझेब व चवदावा लुई हे गादीवर बसले, त्या वेळीं त्यांच्या घराण्याचें वैभव व कीर्ति हीं अमर्याद वाढलेलीं होतीं, आणि त्या उभयतांनींही देश जिंकणें व आसपासच्या निर्बल राज्यांवर बेधडक हल्ले करणें, असा वर्तनक्रम सुरू केलेला असून पहिल्यापहिल्यानें त्यांत त्यांना यशही आलें. पण अविचाराच्या आणि बहुतेक निरर्थक लढायांमुळें त्यांनीं आपल्या राज्याचें वैभव आणि आपल्या घराण्याचा चिरस्थायीपणा ह्यांचा हळुहळु नाश करून घेतला. धर्मवेडेपणामुळें आपल्या स्वतःच्या प्रजेची गांजणूक, स्थानिक संस्थांचा नायनाट करून अवजड अधिकारी सत्तेचें एकीकरण, अनीतीचा सुळसुळाट, धर्मवेडे खिजमतगार आणि नीच सल्लामसलतगार यांनीं घेरलेला थाटामाटाचा दरबार, हीं मोंगल आणि बोर्बोन घराण्याच्या राज्यकारभाराचीं ठळक लक्षणें होतीं. प्रत्येकाच्या बाबतींत परदेशांतील लोकांशीं दुर्दैवानें कराव्या लागणाऱ्या लढाया, निरनिराळ्या पंथांतील लोकांचीं बंडें, आणि पैसे उकळण्याकरितांच प्रजेवर केलेले जुलूम, यांनीं गुंतागुंत झालेल्या अर्ध शतकाच्या झोटिंगपादशाहीनें प्रजा फार विपन्नावस्थेंत आणली, आणि त्यामुळें राज्यसत्तेच्या वर्मी घाव बसून तीही कमजोर झाली. सतराव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास ढग गोळा होण्याला सुरवात झाली. आणि अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून दोन्हीही राष्ट्रांच्या भाग्याला उघड उघड उतरती कळा लागली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, ह्या दोन्हीहीं राष्ट्रांचा ऱ्हास अगर त्यांना हें लागलेलें ग्रहण ब्रिटिश राष्ट्राच्या वाढत्या व्यापारी वर्चस्वाला अत्यंत फायदेशीर झालें. इ. सन १६९१ मध्यें विल्यम राजानें जर्मनींतील संस्थानें, आणि दर्यावर्दी

राष्ट्रांपैकीं इंग्लंड, हालंड व स्पेन यांच्याशीं गट्टी करून फ्रान्सविरुद्ध एक मोठा कट उभा केला; त्यामुळें फ्रेंचांच्या वाढत्या वजनाला आळा बसला. आणि त्यांचे व्यापार व वसाहती वाढविण्याचे बेत एका बाजूला भिरकावले गेले, अगर युरोपमध्यें सुरू झालेल्या जंगी लढाईंत पायाखालीं तुडविले गेले. कारण, जरी रिस्विकच्या तहामुळें कांहीं वर्षें वैरभाव बंद झाला, तरी असें ह्मणतां येईल कीं, इ. सन १६९० पासून इ. सन १७१३ पर्यंत बहुतेक सर्व काळ फ्रेंचांची राजसत्ता युरोपांतील आपल्या आसपासच्या सर्व राष्ट्रांबरोबर अतिशय खर्चाच्या व मोठमोठ्या प्रमाणाच्या लढायांत पूर्णपणें गुंतून गेलेली होती.

मोंगल राष्ट्राची स्थिति तर याहूनही अधिक शोचनीय झालेली होती. सतराव्या शतकामध्यें जोंपर्यंत मुसलमानी बादशाहींत जोम होता, तोंपर्यंत कोणत्याही परकीय साहसी मनुष्याला हिंदुस्थानामध्यें निवळ मेहेरबानी-नेंही अनिश्चित असाच थारा मिळत असे, हें आपण पूर्वीं वाचलेलेंच आहे. परंतु जेव्हां आठरावें शतक सुरू झालें, तेव्हां बादशाही राज्याच्या अव्यवस्थे-चा स्पष्ट रीतीनें जवळ जवळ कळसच झालेला होता. अवरंगझेबाचें उतार वय, त्याच्या जुलमाविरुद्ध हिंदू लोकांनीं नेटानें केलेलें आणि स्पर्श-जन्य रोगासारखें फैलावत गेलेलें बंड, त्याचा मृत्यु हीच इशारत असें सम-जून त्याच्या मुलांमध्यें आपआपसांत होणाऱ्या भावी यादवीचा निश्चित-पणा, लढाईच्या परिणामावरच निवळ अवलंबून असलेलें बादशाही तख्त, सांपत्तिक अडचणी आणि चहूंकडे स्पष्ट दिसून येणारी राज्यकारभाराची झालेली विस्कळित घडी—हीं सर्व पूर्वेकडील देशांतील मोंगली राजघराण्याच्या दौर्बल्याचीं, ऱ्हासाचीं आणि जवळ जवळ नामशेष होण्याचीं साधारणतः चिन्हें होतीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वायव्येकडील इराणी आणि बंडखोर अफगाण टोळ्यांनीं अवरंगझेबापासून त्याचे सरहद्दीवरील किल्ले ह्या वेळीं हिसकावून घेतलेले होते; त्या सर्व दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या सरहद्दीवरील त्याचा ताबा असुरक्षित झालेला होता; मध्य आशियांतून

स्वाऱ्या करणाऱ्यांना हे रहदारीचे मार्ग पुन्हां मोकळे झाले होते, आणि नैऋत्येकडे विजापूर व गोवळकोंडें ह्या राज्यांचा अवरंगझेब यानें नाश केल्यानंतर त्याच्याच गैरमुत्सद्दीपणाच्या विध्वंसक पद्धतींमुळें मोकळे सुटलेल्या दंगेखोर लोकांना दाबांत ठेवण्याला पूर्ण समर्थ होईल, अशी राज्यव्यवस्थेची घडी पुन्हां बसविण्याला तो अगदींच असमर्थ झालेला होता. पांगलेले सैनिक, नागवलेले शेतकरी व असंतुष्ट हिंदू जमीनदार, हे सर्व मराठे सरदारांच्या निशाणासभोंवती गोळा झाले; मराठा सेनानायकांनीं बादशाही सरदारांना कधीं लांच देऊन, तर कधीं दहशत बसवून, मुलूख उद्ध्वस्त केले; जमाबंदीवसुलाचा रस्त्यांतच फन्ना उडविला; व बादशाही सैन्याचा पूर्णपणें पराभवही केला. अवरंगझेबाच्या ह्या पुष्कळ वर्षांच्या कारकीर्दींतील शेवटचीं चौवीस वर्षें (इ. सन १६८३ ते १७०७) तो आपल्या राज्याच्या नैऋत्य दिशेच्या सरहद्दीवर अहमदनगर येथें आपल्या वयाच्या ८९ व्या वर्षीं मरेपर्यंत स्वतः सेनानायकाचें काम करीत होता. दिल्लीचा बादशहा अवरंगझेब आणि रोमचा बादशहा मार्कस ऑरेलियस ह्या दोन राज्यकर्त्यांप्रमाणें वर्तनानें तंतोतंत जुळणारे दुसरे दोन राज्यकर्ते क्वचितच सांपडतील. त्यामुळें चौदा वर्षेंपर्यंत सतत सरहद्दीवर लढाया केल्यानंतर पार्थियन लोक पूर्वेकडील प्रांतांत शिरण्याची भीति घालीत असतांना आणि रानटी लोकांच्या टोळ्या ड्यानूब नदीवर सैन्याला त्रास देत असतांना प्यानोनियामधील आपल्या छावणींत मरत पडलेल्या या रोमन बादशहाची ह्या प्रसंगीं आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. वर दर्शविलेले हे सर्व अंतःस्थ घोटाळे, ह्मणजे मोंगली राष्ट्राच्या होऊं घातलेल्या वाताहतीचीं आणि राजकीय वातावरणांत मोठें स्थित्यंतर घडून येण्याचीं उघड उघड पूर्व चिन्हेंच होतीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

भाग तिसरा.

इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचें दृढीकरण.

(इ. सन १६९० ते १७०२).

परिच्छेद पाहिला—ईस्ट इंडियामधील व्यापाराची स्थिति आणि त्याचें महत्त्व.

हिंदुस्थानांत सतराव्या शतकाच्या शेवटचीं कांहीं वर्षें म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचें निव्वळ व्यापारी पेशामधून एका प्रकारच्या लहानशा स्थानिक स्वराज्यांत रूपांतर होण्यास लागणारें एक कालांतरच होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं, व तेंही त्यांना त्रास भोगावा लागल्याशिवाय गेलेलें नाहीं. मोंगल बादशाहीच्या वाढत्या कमकुवतपणामुळें व्यापारासंबंधीं धोके व अशाश्वतपणा हीं दुप्पट वाढलीं; वसाहतीशेजारींच चालू असलेल्या लढायांमुळें वारंवार धोक्याचे प्रसंग उत्पन्न होत; लुटलें जाण्याचे व जुलमानें खंडणी देण्याचे वारंवार प्रसंग येण्याची भीति वाटे; अधिकार नसतांना व्यापार करणाऱ्या अगांतुक लोकांपासून त्यांच्या कामांत ढवळाढवळ होण्याचे प्रसंग येत; आणि त्यांच्या युरोपस्थ प्रतिस्पर्ध्यांकडून हल्ल्यांचें आणि आक्रमण होण्याचें भय बाळगावें लागे. ह्मणून त्यांनीं आतां जाणूनबुजून स्थानिक अधिकाऱ्यांच्या पारतंत्र्यामधून आपली सुटका करून घेण्याचा प्रयत्न करण्याकरितां एक युक्ति योजिली, आणि आपल्या प्रतिनिधींना आपला वसूल वाढविण्याकरितां जितके श्रम वेचवतील तितके घेण्याचा सक्त हुकूम सोडिला. इ. सन १६९० मध्यें त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, "आम्हांला आमच्या व्यापारासंबंधानें जितकी काळजी आहे, तितकीच आमच्या वसुलाच्या वाढीसंबंधानेंही आहे. कारण, ह्याच वसुलामुळें आमच्या व्यापाराला जरी

पन्नास धक्के बसले, तरी आम्हांला आमचें सैन्य सुरक्षित राखतां येईल; ह्याच वसुलामुळें आम्हांला हिंदुस्थानामध्यें आमचें राष्ट्र बनवितां येईल; .... आणि ह्याच कारणामुळें डच लोकांचीं जितकीं सर्वसाधारण सल्लामसलतीचीं पत्रें आम्हांस पहावयास मिळालीं त्यांवरून असें दिसतें कीं, व्यापारासंबंधानें जर ह्या सर्व धूर्त लोकांनीं एक कलम लिहिलें असेल, तर त्यांची राज्यव्यवस्था, त्यांचें दिवाणी व लष्करी धोरण, लढाया आणि त्यांच्या वसुलाची वाढ, ह्यांच्या संबंधानें त्यांनीं दहा कलमें लिहिलेलीं असत." ह्या वेळीं इंग्लिशांचा हेतु (त्यांच्या शब्दांनींच ह्मणावयाचें ह्मणजे) "डच लोकांप्रमाणेंच दिवाणी व लष्करी सत्ता आपणही स्थापन करावी, व अशा तऱ्हेनें आपल्या उत्पन्नाच्या वसुलीची बाब वाढवावी कीं, त्यामुळें पुढें आपणास खात्रीनें एक मोठें व मजबुत पायावर उभारलेलें ब्रिटिश राष्ट्र हिंदुस्थानामध्यें स्थापन करितां येईल," असा होता. ह्या त्यांच्या लेखांवरून असें दिसतें कीं, पौर्वात्य ह्मणीप्रमाणें ह्मणावयाचें ह्मणजे, ईस्ट इंडिया कंपनीच्या नाकांत शिकारी चित्त्याप्रमाणें राज्याचा वास अगोदरच भिनलेला होता, व्यापाराच्या नफ्यापेक्षां अधिक फायदेशीर अशा शिकारीचा पाठलाग ते ह्या वेळीं करूं लागले होते, आणि ह्या कारणामुळें हलके हलके हिंदुस्थानच्या मुख्य टापूंत आपलीं कारस्थानें एकवटविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला होता. मद्रास व मुंबई येथील त्यांचें सैन्य कांहीं थोड्या युरोपियन लोकांशिवाय बहुतेक अरब, अर्मानियन, निग्रो आणि अर्धवट शिक्षण मिळालेले पोर्तुगीज, अशा बाजारबुणग्या लोकांचेंच होतें. तरी पण तेथील तटबंदी मात्र बऱ्याच चांगल्या स्थितींत होती. बंगालमध्यें बादशहाचा सुभेदार हा स्वतःच अतिशय अडचणींत आलेला असल्यामुळें त्यानें कंपनीच्या प्रतिनिधीला कलकत्त्याची तटबंदी करण्याला परवानगी दिली होती; आणि इंग्लंडांत त्या वेळीं राज्य करीत असलेला राजा विल्यम ह्याच्या नांवावरून

१ फोर्ट सेन्ट जार्ज येथें पाठविलेल्या पत्रांतील उतारा.
ता. १२ डिजबर १६८७

तेथील किल्ल्यास "फोर्ट विल्यम" हें नांव देण्यांत आलें होतें. इ. सन १६८७ मध्यें कंपनीनें आपल्या सर्व वसाहतींमध्यें कायदेशीर राज्यव्यवस्था स्थापण्याचा निश्चय करून हिंदुस्थानांत पाठविण्याकरितां स्वदेशांत एक मोठें सैन्यही सज्ज करून ठेविलें; हिंदुस्थानामध्यें आपल्या गव्हर्नरास तह व लढाई करण्याचा अधिकार असावा, असा जेम्स राजाकडून हुकूम मिळविला; आणि एतद्देशीय अधिकाऱ्यांकडून सोसावे लागलेले अपमान व भोगावें लागलेलें नुकसान भरून काढण्याकरितां सैन्य जमवून मोंगल बादशहाशीं लढाई करावी, असा हुकूम देऊन सर जॉन चाइल्ड याला त्यांनीं हिंदुस्थानांत पाठविलें. मोंगल राष्ट्र हें त्या वेळीं विपन्नावस्थेंत आलेलें होतें, तरी अशा रीतीनें हल्ला करणाऱ्यांवर मोठ्या आवेशानें उलट तुटून पडण्याइतकी शक्ति व अभिमान त्यांत अजून जिवंत होता. पश्चिम हिंदुस्थानामध्यें बादशाही हुकमत धाब्यावर बसविण्याचा कंपनीनें प्रयत्न केला, परंतु त्यापासून उलट त्यांचीच फार त्रेधा उडाली. कारण, अवरंगझेब हा आपल्या मुख्य सैन्यासह तेथून नजदीकच तळ देऊन राहिलेला होता. मुंबई येथें या वेळीं फक्त पंधरा युरोपियन शिपाई व थोडीशी अशिक्षित एतद्देशीय शिबंदी इतकेंच काय तें सैन्य होतें, असें ह्मणतात. अशा स्थितींत तेथील गव्हर्नर प्रत्यक्ष त्याच्याच गांवांत आणि किल्ल्यांत कोंडला गेला, व अबिसिनिया येथील सिद्दयांच्या आरमारानें त्या शहराची विलक्षण दुर्दशा उडविली. बंगाल आणि ईशान्य किनाऱ्यांवरील स्वारींत इंग्लिशांना पूर्ण माघार घ्यावी लागली, त्यांच्या वखारींवर हल्ले करण्यांत आले, आणि कांहीं काळपर्यंत तर त्या त्यांना सोडाव्याही लागल्या. मद्रास येथून इंग्लिश लोकांना हांकलून देण्याविषयीं बादशहानें हुकूम सोडले, व तेथील प्रेसिडेंटाजवळ किल्ल्याच्या बंदोबस्ताकरितां ठेवलेले थोडेसे इंग्लिश शिपाई व कांहीं बाटलेले पोर्तुगीज एवढेच काय ते फक्त लोक असल्यानें मोंगलांचें सैन्य दक्षिणेकडे चाल करून येत आहे, असें जेव्हां त्यानें ऐकिलें, तेव्हां त्याची तर गाळणच उडून गेली. कंपनींतील लढाईच्या

धोरणाचा उत्पादक सर जान चाइल्ड हा इ. सन १६९०मध्यें मृत्यु पावला. त्याच वेळीं अवरंगझेबानें एक अरेरावीपणाचा असा जाहीर हुकूम प्रसिद्ध केला कीं, इंग्लिश लोकांकडून नम्रतापूर्वक शरण आल्याबद्दलचा विनंति अर्ज सादर झाल्यावरून आमचें बादशाही सरकार कृपावंत होऊन त्यांनीं केलेल्या अधिक प्रसंगाबद्दल त्यांना या वेळीं माफी देण्यांत आली आहे. अशा रीतीनें ह्या भानगडीचा बहुतेक अपमानकारक असा शेवट झाला. ही बातमी कंपनीच्या इंग्लंडमधील व्यवस्थापकांना कळल्यावर त्यांच्या मनोवृत्ति फार क्षुब्ध झाल्या. कारण, तसा विनंति अर्ज करण्यांत आलेला नव्हता; परंतु भांडण चालू ठेवण्याला ती वेळ योग्य नव्हती.

तथापि पुढील दहा वर्षांमध्यें मोंगल राष्ट्रावर येणारीं संकटें आणि त्याचा होणारा ऱ्हास, हीं खात्रीनें उघड उघड वाढत्या प्रमाणावर होतीं. अवरंगझेबाच्या मुलांपैकीं एकानें इराणमधून परदेशांतील सैन्यासह हिंदुस्थानावर स्वारी केली होती, आणि दक्षिण हिंदुस्थानांत त्याचें मोठें सैन्य असूनही महत्त्वाचे प्रांत अथवा राज्यें—महाराष्ट्र, म्हैसूर व कर्नाटक, यांच्यासारखीं—हीं त्यास आपल्या दाबांत ठेवतां येणें फार कठिण झालें होतें. कारण, अवरंगझेबाच्या उतार वयामुळें सर्व हिंदुस्थानभर भीति पसरलेली असून लवकरच मोठी घडामोड होणार, अशी खात्री झालेली होती, व अशा डळमळीत स्थितीमुळेंच जुलमी कामगार, बंडखोरांचे नाईक, पुंडाई करणारे लुटारू आणि शिवाय इतर प्रतिस्पर्धी वसाहतवाले यांचेकडून होणाऱ्या त्रासापासून आपलें संरक्षण करण्याकरितां स्वतःच्या पायावर अधिक अधिक उभें राहणें ह्या परदेशस्थ वसाहतवाल्यांना भाग पडलें होतें. इ. सन १६९० ते १६९७ पर्यंत युरोपांत सारखें युद्ध सुरू होतें; इंग्लंडांत जाण्या-करितां निघालेल्या इंग्लिश जहाजांना फ्रेंच लोक पुष्कळ नुकसान पोंचवीत असून एका वेळेला तर त्यांनीं व्यापारी लोकांच्या सर्व जहाजांचा तांडाच्या तांडाच पकडला होता; त्याचप्रमाणें डच लोकांची व इंग्लिशां-

ची युरोपांत पक्की दोस्ती असूनही त्यांच्या आशियांतील भरभराटीनें डच लोकांच्या हाडीं मासीं भरलेला इंग्लिशांविषयींचा द्वेष तिळभरही कमी झाला नव्हता.

आपल्या पूर्वेकडील व्यापाराचें महत्त्व किती आहे, हें सतराव्या शतकाच्या शेवटीं इंग्लिश लोकांस पूर्णपणें कळून चुकलें होतें, यांत कांहींही संशय नाहीं. कारण, त्या वेळच्या व्यापारविषयक बाबतींतील पूर्ण निष्णात सर चार्लस डॅव्हेनंट[१] याच्या लेखांतही पुष्कळ ठिकाणीं याबद्दलचा उल्लेख आलेला आहे. तो ह्मणतो कीं, "ट्यूडर घराण्याच्या अमदानींत शंभर वर्षेंपर्यंत इंग्लंडची अंतःस्थ भराभराट पुष्कळ झाली; डच लोकांना आपल्या लोकसत्तात्मक संस्थानाच्या टीचभर प्रदेशाच्या मानानें आपली लोकसंख्या जास्त आहे, असें लवकरच आढळून आलें; आणि त्यामुळें ह्या दोन्हीही राष्ट्रांना वाढत्या लोकसंख्येकरितां परदेशाशीं व्यापार करणें भाग झालें." तो आणखी ह्मणतो, "उलट पक्षीं सोळाव्या शतकामध्यें दीर्घ कालपर्यंत धार्मिक युद्धें चालल्यामुळें फ्रान्सची लोकसंख्या कमी झाली. व म्हणूनच ह्या दोन प्राटेस्टंट राष्ट्रांना समुद्रापलीकडील व्यापारामध्यें वर्चस्व मिळविण्याकरितां नेटानें अघाडी मारण्यास सवड सांपडली." "ईस्ट इंडियामधील व्यापार" ह्या विषयावर लिहिलेल्या निबंधांत त्यानें "इंग्लंडला ईस्ट इंडियामध्यें असलेल्या त्याच्या स्थितीमुळें झालेला मोठा नफा व मिळालेल्या राजकीय सवलती" यांसंबंधीं विवेचन केलें आहे; तसेंच, त्या भागांत असलेलें हालंडचें सामर्थ्य आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यांना सहज दाबांत ठेवतां येईल इतकें वर्चस्व त्यांना मिळवूं देण्यांत इंग्लंडनें दाखविलेला पराकाष्ठेचा अदूरदर्शीपणा यांसंबंधानेंही त्यांत आणखी बरीच चर्चा केलेली आहे. ईस्ट इंडियामधील व्यापारासंबंधानें तो लिहितो कीं, "तेथील व्यापारावर ज्याचा पूर्ण ताबा असेल, तोच देश सर्व व्यापारी जगावर आपली हुकमत चालवील." त्यानें पुढें असें म्हटलें

---

१ जन्म इ. सन १६५६, मृत्यु इ. सन १७१४.

आहे कीं, "जर इंग्लंडनें हिंदुस्थानावरील आपला ताबा गमविला, तर त्यास परदेशांतील आपला अर्धा व्यापार सोडून द्यावा लागेल." तो पुढें असें निक्षुन बजावतो कीं "इंग्लंडनें जर अशा रीतीनें आपला व्यापार गमविला, तर समुद्रावरील वर्चस्वासही त्यास मुकावें लागेल; कारण, परदेशाशीं जर व्यापार असेल, तरच मोठें आरमार पोसतां येणें शक्य आहे." हालंडची ईस्ट इंडीजमधील अजिंक्य सत्ता, ती वाढविण्याकरितां व तिला बळकटी आणण्याकरितां त्यांनीं खर्चीं घातलेलें अमर्याद भांडवल, दारूगोळा, अन्नसामग्री व फौजफाटा, यांनीं सर्व प्रकारें जय्यत ठेविलेले मोठमोठे किल्ले आणि गढया, त्यांचें मोठें आरमार आणि त्यांचीं चांगलीं बंदरें, यांसंबंधीं त्यानें वर्णन केलें आहे; तसेंच, जी कंपनी हालंडच्या सात प्रांतांमधील सात व्यापारी मंडळ्या एकत्र होऊन झालेली होती, आणि जिचा जन्म बहुतेक डच लोकसत्तात्मक राष्ट्राबरोबरच झालेला असून जिच्या सभासदांमध्यें त्या देशांतील सर्व कर्तबगार आणि उत्तम डोक्याच्या माणसांचा समावेश झालेला होता, त्या डच कंपनीचा उत्साह, संपत्ति व ऐक्य यांबद्दलही त्यानें पुढें बराच ऊहापोह केलेला आहे. त्यानें पुढें आणखी असेंही प्रतिपादन केलें आहे कीं, जर इंग्लंडनें तेथील व्यापार सोडला, तर डच लोक तो सर्व खात्रीनें बळकावितील, आणि त्यानंतर इंग्लंडला त्यांच्या संरक्षणाखालीं व निशाणाखालींच व्यापार करण्यांत समाधान मानून राहणें भाग पडेल. त्यानंतर त्यानें असाही अंदाज केला आहे कीं, "असें झालें, तर ईस्ट इंडियामधील ह्या पूर्ण व्यापारी वर्चस्वामुळें डच लोकांना सबंद पेरु आणि मेक्सिको येथून जितकें द्रव्य मिळवून हालंडमध्यें पाठवितां येईल, त्याहूनही अधिक दरवर्षी त्यांना हालंड देशांत पाठवितां येईल; कदाचित् ते साठ लक्षांचें रोख उत्पन्नही पैदा करूं शकतील. संपत्तीच्या ह्या मोठ्या वाढीमुळें त्यांचें आरमारी वर्चस्व इंग्लंडहून पुष्कळच अधिक वाढेल, आणि जर डच लोकांचा मुलूख फ्रेंच लोकांच्या सत्तेखालीं गेला, (ही गोष्ट घडून येणें

त्या वेळीं अशक्य नव्हतें) तर त्यामुळें इंग्लिशांचा खात्रीनें नाश होईल. उलट पक्षीं जर इंग्लिश लोक स्वतः हात पाय हलवितील, व हालंडवर प्राबल्य ठेवून आपल्या परदेशीय व्यापाराची वाढ जितक्या परमावधीस नेणें शक्य आहे तितक्या परमावधीस नेतील, तर त्या योगानें त्यांस इतकी सत्ता व संपत्ति मिळवितां येईल कीं, मग त्यांच्या जय्यत फौजेच्या व आरमाराच्या बळामुळें कोणत्याही राष्ट्राबरोबर दोन हात करण्याचें सामर्थ्य त्यांस येईल; कदाचित् इंग्लंड हें एका अफाट राष्ट्राचें मालक, कायद्याचें उत्पत्तिस्थान, व मानमरातब, सत्ता, आणि विस्तीर्ण प्रदेशभर राज्यकारभाराच्या कचेऱ्या, यांचा वाहता झरा, असें रोमप्रमाणें होऊं शकेल, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. "

आतां आपण ह्यापेक्षांही पुष्कळच अधिक नांवाजलेला त्या काळचा दुसरा निष्णात लेखक, लिब्निट्झ, याचें काय ह्मणणें आहे, तें पाहूं. त्यानें इ. सन १६७२ मध्यें "इजिप्तचें राजकारण" ह्यासंबंधीचा तयार केलला आपला मसुदा चवदाव्या लुईपुढें मांडला होता. हा राजकीय कागद बऱ्याच विस्तारानें लिहिलेला असून त्यांत त्यानें लुईला इजिप्त देश स्वाधीन करून घेऊन खालसा करण्याबद्दल आग्रहाची सल्ला दिली होती. त्यानें त्यांत मुख्यत्वेंकरून असें प्रतिपादन केलें होतें कीं, इजिप्त देश फ्रान्सच्या ताब्यांत राहिल्यानें अतिशय महत्त्वाचा पूर्वेकडील व्यापार त्यास आपल्या ताब्यांत ठेवितां येईल; त्यामुळें हालंडची संपत्ति व आरमारी सत्ता यांचे उगमावरच कुऱ्हाड घालून त्याचा सहज नाश उडवितां येईल; आणि स्वतःचें एक मोठें दर्यावर्दी राष्ट्रही बनवितां येईल. चवदावा लुई हा त्या वेळीं डच लोकांवर हल्ला करण्याची तयारी करीत होता, त्या बाबतींत लिब्निट्झ यानें असें दाखविलें आहे कीं, हालंडवर स्वारी करण्यापेक्षां डच लोकांचें ईस्ट इंडियामधील वर्चस्व नाहीसें करणें हाच त्यांना शरण आणण्याला अधिक खात्रीचा मार्ग आहे. शिवाय आशियामध्यें एक मोठें राष्ट्र स्थापन करण्यालाही ज्या रीतीनें आपणाला

सुलभ जाईल, अशाबद्दलच्या कांहीं विशेष महत्त्वाच्या सूचनाही त्यानें त्यास केलेल्या आहेत. तो म्हणतो कीं, पोर्तुगीज लोकांनीं अगदीं पहिल्यानें ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांमध्यें जर अधिक सैन्य उपयोगांत आणलें असतें, तर सर्व हिंदुस्थान देश त्यांना आपल्या सत्तेखालीं आणतां आला असता, याबद्दल कोणालाही संशय वाटणार नाहीं. कारण, जर्मनी जिंकण्यापेक्षांही सर्व आशिया खंड जिंकणें हें अधिक सुलभ आहे; आणि फ्रान्सच्या राजाला युरोपांतील राजकारणांत प्रमुखत्वानें मध्यस्थ ह्मणून पुढें येणें असेल, तर त्यास आशियांतील व्यापारापासून मिळवितां येणारी सत्ता आणि संपत्ति यांचीच काय ती फक्त जरूरी आहे[१].

जगांतील दर्यावर्दी राष्ट्रें ज्याकरितां इतके दिवस झगडत होतीं, व ज्याकरितां इंग्लिश लोकही नुकतेच या चढाओढीच्या क्षेत्रांत शिरलेले होते, तें बक्षीस कोणत्या प्रकारचें आहे, हें दाखविण्याला व्यापार आणि राजनीति ह्या बाबतींत अत्यंत नामांकित आणि अनुभवी लोकांनीं वर प्रकट केलेलीं आपलीं मतें आणि मुद्दे हीं पुरेशीं आहेत. त्यांचें खात्रीचें असें ह्मणणें आहे कीं, हें बक्षीस अमोल्य आहे, आणि विशेष गोष्ट ही आहे कीं, जें एखादें युरोपियन राष्ट्र आशिया खंडांत राज्य मिळविण्याकरितां हिमतीनें आणि करामतीनें पुढें सरसावेल, त्यालाच तें मिळवितां येईल. हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याची वाढ हाताबोटांवर मोजतां येण्याइतक्या थोड्या व पांगलेल्या व्यापारी बंदरांमधूनच झालेली आहे, व हा एक अगदींच अतर्क्य, अवर्णनीय व अपूर्व चमत्कार आहे, असा इंग्लिश इतिहासकारांचाही पक्का समज होऊन गेलेला आहे. परंतु तो किती चुकीचा आहे, हें डाव्हेनंट आणि लिब्निट्झ यांच्या लेखांवरून वाचकांस समजून आल्यावांचून राहणार

---

१ युरोपांतील राजकारणाच्या बाबतींत मध्यस्थ ह्मणून पुढें येण्याला फ्रान्सच्या राजाला समुद्राच्या मार्गानें येणारी संपत्ति आणि तिच्यावर ताबा ठेवण्याकरितां लागणारी आरमारी सत्ता, एवढ्यांचीच काय ती फक्त जरूरी आहे.

लिब्निट्झ, व्हा. ५ पान २७५, फुसेद करेई.

नाहीं. अशा वेळीं हा सर्वसाधारण समज किती फोल आहे, हें दाखविणें इष्ट आहे; तसेंच इंग्लिशांना मिळालेल्या विजयाचीं कारणें किती स्वाभाविक होतीं, आणि पुष्कळ अंशीं त्यांचें भविष्यही करतां येणें खरोखर कसें शक्य होतें, हें सिद्ध करून दाखविण्याला मिळण्याजोगा साध्य तो पुरावा जोरानें पुढें मांडणें हेंच योग्य आहे. इंग्लिशांचें हिंदुस्थानांतील साम्राज्य स्थापन होण्याला नेहमीं समजण्यांत येतें त्याहूनही अधिक बळकट, व ज्यांचीं पाळेंमुळें खोल रोविलीं गेलीं, अशाच गोष्टी कारणीभूत झालेल्या आहेत. या राज्यसंस्थापनेचीं खरीं कारणें समजण्याकरितां ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हिंदुस्थानच्या मुख्य टापूंमधील इंग्लिशांच्या वसाहती ह्या फक्त हिंदुस्थान आणि युरोप यांमध्यें मालाची अदलाबदल करण्यांत होत असलेल्या अतिशय फायदेशीर व्यापाराकरितां उतारपेठांच्या उपयोगीं होत्या, इतकेंच नाहीं, तर इंग्लंडचा दक्षिण आशियाशीं ह्मणजे इराणी आखातापासून पूर्वेकडे सुमात्रा, जावा आणि चिनीसमुद्रापर्यंतचीं असलेलीं मसाल्याचीं सर्व बेटें, येथपर्यंत जो व्यापार चालत असे, तोही सर्व घड्याळाच्या कांट्याप्रमाणें या वसाहतरूपी स्थिर बिंदूवरच अवलंबून होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या वसाहतींमुळेंच जगांतील त्या काळच्या समुद्रांतील अत्यंत भरभराटीच्या व्यापारी मार्गांवरील दळणवळण खुलें राखण्यांत आलें, इतकेंच नाहीं, तर खरोखर तसें दळणवळण चालू ठेवण्याकरितां त्यांची अत्यंत अवश्यकताही होती. कारण, जें राष्ट्र हा व्यापार सर्वस्वी आपल्या ताब्यांत राखूं शकत असे, त्याच्याच स्वाधीन आशिया आणि पश्चिम युरोप यांमधील चालणारा सर्व व्यापार असून तेंच आसपासच्या सर्व युरोपियन देशांना मालाचा पुरवठा करीत असे. इंग्लिशांनीं या अफाट क्षेत्रावर आपलें वजन हळु हळु वाढवीत नेल्यामुळें प्राप्त झालेली संपत्ति व वाढती फौज, तसेंच, आपली छाप ठेवण्याला अत्यंत अनुकूल अशी माऱ्याची परिस्थिति प्राप्त होण्याला लागणाऱ्या पायाचा इंग्लिश लोकांकडून क्रमाक्रमानें झालेला भक्कमपणा, यांवरच पूर्वेकडील ब्रिटिश वर्चस्वाच्या इमारती-

चा पहिला भाग उभारला गेलेला आहे. ह्या मोठ्या व्यापारी मंडळीची घटना पुष्कळ बाबतींत उत्तर अमेरिकेमधील मेरील्यांड आणि पेन्सिलव्हानियासारख्या संस्थानांची स्थापना करणाऱ्या जमिनदारी वसाहतींप्रमाणेंच होती[1]. या जमिनदारी हक्क असलेल्या मंडळ्याच तेथील गव्हर्नर आणि त्यांचे सल्लागार मंडळ यांची नेमणूक करीत असत, आणि त्यांना सार्वभौमत्वाच्या श्रेष्ठ हुकमतीखालीं एक तऱ्हेचे स्वराज्याचे हक्क मिळालेले असत. त्या मंडळ्यांचें स्वरूप पुष्कळ अंशीं मांडलिक संस्थानांसारखें असे; परंतु त्यांच्या इतकी जबाबदारी मात्र ह्या मंडळ्यांवर नसे. आशिया खंडांत इंग्लिश दरबारचे राजकीय प्रतिनिधि नव्हते, आणि त्यांच्याशीं चढाओढ करण्यास पुष्कळ प्रतिस्पर्धी होते; त्यामुळें आपला व्यापार कायम रहावा ह्मणून थोड्या फार प्रमाणांत उत्पन्नाचीं साधनें असून राज्यकारभार चालविण्याविषयीं पूर्वापार प्रख्यात, इष्ट हेतूप्रीत्यर्थ योग्य उपायांची योजना करण्याविषयीं चांगली माहितगार, आणि त्या ठिकाणीं बरेच हितसंबंध गुंतलेले असून स्थानिक स्वराज्य चालविण्याची जबाबदारी किती असते हें जी पूर्णपणें ओळखून आहे—अशा एका सनदशीर कंपनीची स्थापना, तिला अंतर्व्यवस्थेचे व स्वसंरक्षणाचे अधिकार देऊन, करणें अत्यंत अवश्यक आहे, असें ह्या वेळीं स्पष्टपणें दिसून आलें होतें. सर्व सतराव्या

१ राज्य करणारें, संरक्षक व प्रधान वर्चस्व असलेलें असें ग्रेट ब्रिटनचें संस्थान, हें जें त्याचें त्या वेळीं स्वरूप होतें, त्याच्या स्थानिक अगर विस्तृत राष्ट्रीय हितसंबंधाच्या मानानें पाहिलें असतां बंगाल्यांतील जमिनीवरील त्याचा एकवटलेला मालकीचा व प्रतिनिधितर्फें चालणारा पूर्ण अधिकार हा खरोखर हक्क, ताबा, वस्तुस्थिति आणि परिस्थिति, या बाबतींत बहुतेक उत्तर अमेरिकेंतील कांहीं भागांत खाजगी मालकीचे जे प्रांत असत त्याबरहुकूमच होता. परंतु भेद इतकाच कीं, हा त्यांचा अंमल बादशाही थाटावर असे, व त्यामुळें त्यांच्या नांवांत मात्र फरक असे. तो असा कीं, एकास जिंकलेलीं संस्थानें व दुसऱ्यास वसाहती केलेलीं संरक्षित स्थळें या नांवानें तीं निर्दिष्ट केलेलीं होतीं.

ग्रांट्स् ॲनालिसिस.

शतकभर ईस्ट इंडीजमध्यें इंग्लंड व हालंड यांचें पुष्कळ दिवसांपासून भांडण जुंपलेलें असून त्याचा निकाल ह्या अफाट व्यापारी प्रदेशाची विभागणी झाल्यावांचून लागावयाचा नाहीं, हें ठरल्यासारखेंच होतें. आणि १९ व्या शतकापर्यंत उभयतांमधील राजकीय भानगडी पूर्णपणें मिटल्याही नव्हत्या. तथापि ज्या वेळीं इंग्लिश लोकांचा कल वर लिहिल्याप्रमाणें हिंदुस्थान देश हेंच आपलें साहसी कृत्यांचें क्षेत्र करण्याकडे दिसूं लागला, आणि डच लोक उघडपणें हिंदुस्थानचा किनारा सोडून आपली सर्व शक्ति जावा आणि सुमात्रा ह्या बेटांकडे एकत्र करूं लागले, तेव्हांपासूनच वरील प्रकारचा शेवट होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. मलाकाच्या सामुद्रधुनीपलीकडे अजूनही त्यांचें वर्चस्व जोरांत होतें, त्यांच्या राज्यकारभाराचें मुख्य ठिकाण बटेव्हिया हें होतें, आणि इ. सन १६८३ मध्यें त्यांनीं जावा बेटामधील बंटाम हें महत्त्वाचें ठिकाण आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें त्या देशांतील अतिशय महत्त्वाचा पदार्थ जो मिरीं, त्यांच्या व्यापाराचा मक्ता त्यांना आयताच मिळाला होता. डच लोकांनीं तटबंदी करून व मजबूत शिबंदी ठेवून स्वत:चें संरक्षण करूं शकतील अशा प्रकारच्या आपल्या वसाहती करण्याची, मुलूख मिळविण्याची, आणि ते मुलूख पूर्वेकडील नजीकच्या एतद्देशीय राज्यकर्त्यांकडून व्यापाऱ्यांनीं त्याच्या निव्वळ मेहेरबानीनें मिळविलेले नसून युरोपांतील आपल्या राजसत्तेखालील प्रत्यक्ष अगर अधिकार देऊन पाठविलेल्या प्रतिनिधींमार्फत ताब्यांत ठेविलेल्या ठिकाणांप्रमाणें मिळालेले आहेत असें मानून चालण्याची, पद्धत पोर्तुगीज लोकांपासूनच उचललेली होती. व इंग्लिश लोकांच्या डोळ्यांपुढेंही त्यांचेंच उदाहरण होतें. या उदाहरणाचें अनुकरण केल्याशिवाय हिंदुस्थानांत आपला पाय मजबुत रोंविला जाणार नाहीं, असें त्यांना दिसून आलें, आणि त्यानंतर त्यांच्या वसाहतींची घटना व व्यवस्थाही अधिक अधिक प्रमाणानें त्याच नमुन्याबरहुकूम करण्यांत आली.

परिच्छेद दुसरा-दी युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी.

परंतु कंपनीला होत असलेल्या अतिशय फायद्यानें लंडन येथें मत्सरभाव उत्पन्न होऊन ह्या वैभवशाली कुबेरगृहामध्यें एकदम घुसतां येण्याकरितां नेटानें व उत्साहानें प्रयत्न सुरू झाले. सर जोसिया चाइल्ड हा इंग्लिश कंपनीचा त्या वेळीं कुलमुखत्यार सूत्रचालक होता, आणि त्यानें दुसऱ्या जेम्सला व व्हाइट हालमध्यें ज्या लोकांचें वजन होतें त्या सर्वांना नजराणे देऊन दरबारची कृपा व पाठबळ हीं मिळविलीं होतीं; परंतु दुर्दैवानें नुकतेंच " इंडिया हाउस " नें आपलें शीड टोरी-पक्षरूपी खिळयाला अडकविलें असतां प्राटेस्टंट-पक्षरूपी वावटळ सुटली, आणि तिनें तिसऱ्या विल्यमला राजपदावर आणलें. इ. सन १६८८ च्या राज्यक्रांतीनंतर पुन्हां सुधारलेल्या पद्धतीवर नवी सनद मिळविण्याकरितां चढाओढ करण्यासाठीं एक नवीन मंडळी स्थापन करण्यांत आली. इ. सन १६९३ मध्यें पहिल्या कंपनीची सनद रद्द केल्याचें सरकाराकडून जाहीर करण्यांत आलें; कारण, तिच्या मुख्य भांडवलावर शेंकडा पांच टक्केप्रमाणें ठेविलेला कर तिनें भरला नव्हता. तथापि सूचना दिल्यापासून तीन वर्षांनंतर सनद रद्द होईल, या अटीवरच फक्त तिला पुन्हां नवीन सनद करून देण्यांत आली. त्यानंतर इ. सन १६९८ मध्यें इंग्लंडचा फडणीस मॉंटेग यानें तिजोरींत पैशाचा पुष्कळच तुटवडा आल्यामुळें पार्लमेंटकडून एक कायदा मंजूर करविला, आणि त्या अन्वयें दुसऱ्या नव्या कंपनीला तिनें वीस लक्षांची रक्कम शेंकडा आठ या व्याजानें कर्जाऊ देण्याचें कबूल केल्यावरून राजाच्या सहीशिक्क्यानिशीं नवी सनद करून दिली[1]. लोकांनीं ह्या

---

१ जान इव्हेलिन हा आपल्या रोजनिशींत (ता. ७ मार्च १६९८) असें लिहितो कीं:-" व्यापाराची सनद जुन्या कंपनीस न मिळतां नव्या कंपनीस मिळाली, याचें कारण तिच्या मित्रांपैकीं कांहींजण कुत्र्यांकडून चवताळविलेल्या एका वाघाची

कंपनीचे भाग भराभर उत्सुकतेनें खरेदी केले, यावरून देशाची सांपत्तिक स्थिति आणि राष्ट्रीय व्यापाराच्या ह्या मोठ्या शाखेची मजबुती व विस्तारशक्ति यांविषयीं जनतेला किती भरवंसा वाटत होता, हें स्पष्ट दिसून आलें.

हिंदुस्थानामध्यें दुसरी आणि प्रतिस्पर्धी कंपनी आल्यानें अतिशय अंतःस्थ भानगडी उत्पन्न झाल्या. प्रत्येकीनें दुसरीचा नाश करण्याकरितां आपली पराकाष्ठा केली, व दरएकीनें इंग्लिश निशाण उभारून आपणाला आश्रय मिळावा, ह्मणून आपल्या वकिलाला मोंगल बादशहाच्या दरबारीं झगडण्याकरितां पाठविलें. इकडे स्थानिक मोंगल सुभेदार एकमेकांमध्येंच कलागती लावीत, आलटून पालटून त्यांच्यावर मेहेरनजर करीत, आणि सरसकट दोघांकडूनही निःपक्षपातीपणानें लाचलुचपत घेत. हें अश्लाघ्य आणि नाशकारक भांडण सरते शेवटीं ह्या दोन्ही कंपन्या जेव्हां एकत्र झाल्या, तेव्हांच बंद पडलें. ही गोष्ट इ. सन १७०२ मध्यें—ह्मणजे स्पेनमधील गादी–वारसाईपणाबद्दलच्या मोठ्या लढाईला प्रारंभ होण्यापूर्वीं थोडी

गंमत पाहण्यास गेलेले असल्यानें पार्लमेंटमध्यें गैरहजर होते, त्यामुळें नव्या कंपनीस दहा मतें अधिक मिळालीं." पण ही हकीकत पूर्वींच्या कोणत्या तरी एखाद्या वेळच्या कामाकाजासंबंधानें असली पाहिजे. कारण, मेकाले हा असें ह्मणतो कीं:—"कामन्स सभेमध्यें जूनच्या २६ व्या तारखेस ११५ विरुद्ध ७८ मतांनीं व लार्ड लोकांच्या सभेंत त्याच वर्षीं जुलई महिन्याच्या ५ व्या तारखेस तें बिल मंजूर झालेलें आहे."

१ तिसऱ्या विल्यमचा मृत्यु मार्च १७०२. दोन्ही कंपन्यांचें एकीकरण एप्रिल १७०२. फ्रान्सविरुद्ध जाहीर केलेली लढाई मे १७०२. त्या वेळचा एक लेखक, मार्क्विस दी फॉकरास, हा असें ह्मणतो कीं, इंग्लंड व हालंड हीं दोन्हीही राष्ट्रें व्यापारी हेतूनेंच प्रेरित झाल्यामुळें इ. सन १७०२ मध्यें फ्रान्स आणि स्पेन विरुद्ध आस्ट्रियाला मिळालीं; कारण, या उभयतांना असें भय वाटलें कीं, जर स्पेनमधील फ्रेंचांचें वर्चस्व परमावधीस पोंचलें, तर अगोदरच त्यांचें आरमार प्रबळ असल्यामुळें आणि वसाहतीच्या वाढीचे मोठमोठे बेत ते रचीत असल्यामुळें पूर्व व पश्चिम इंडीजमधील इंग्लिश आणि डच यांचा व्यापार बुडविण्याला ते पूर्णपणें समर्थ होतील.

मेम्वा, भाग १ पान १६.

अगोदर, आणि राणी ॲन हिच्या राज्यारोहणानंतर थोडी मागून–गाडल-फीनच्या मध्यस्थीनें घडून आली. ह्या योजनेचा असा परिणाम झाला कीं, त्या एक झालेल्या बलिष्ठ कंपनीला आपलीं आशियांतील ठाणीं मजबूत करण्याकरितां आपलें सर्व साहस, सर्व संपत्ति व आजपर्यंत मिळविलेला आपला सर्व दर्यावर्दी अनुभव, यांचें एकीकरण करतां आलें. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें पुढील १९९ वर्षें हिंदुस्थानांत राज्यकारभार चालविला. या कंपनीवर आतां इंग्लंडमधील सरकारची मेहेर नजर होती; कारण, तिनें सढळ हातानें दिलेल्या अनामत रकमांचा त्यांनीं स्वीकार केला होता. शिवाय व्यापारी वर्गांचेंही देशांतील राजकीय बाबतींत वाढतें वजन होतें, त्यामुळें तिला एका अतिशय संपत्तिमान अशा शहराचा आणि जगांतील सर्वांत मोठ्या दर्यावर्दी राष्ट्राचा दुजोरा मिळालेला होता. वर लिहिलेली अनुकूल परिस्थिति, इंग्लंडमध्यें कंपनीची असलेली मुख्य कचेरी आणि मिळालेला खात्रीचा आधार, तटबंदी केलेल्या वसाहती व बाह्य प्रदेशांत सशस्त्र नौकानयन, हिंदुस्थानामध्यें सैन्य ठेवणें व लढाई आणि तह करणें याबद्दल परवाना देणारी सनद, यांमुळें स्वतःचें संरक्षण करण्याला या वेळीं कंपनीला सामर्थ्य आलें होतें, इतकेंच नव्हे, तर पूर्वेकडील एका अव्यवस्थित राष्ट्राच्या सुभेदाराकडून शक्य त्या होणाऱ्या अडथळ्याविरुद्ध आपलीं बाह्य ठाणीं पुढें ढकण्यालाही ही कंपनी या वेळीं अगदीं समर्थ झालेली होती.

आपल्या आसपासच्या समाजांपेक्षां संपत्ति आणि सुधारणा यांनीं श्रेष्ठ असलेल्या लहानशा समाजांना तरवारीच्या जोरावर व्यापार आपल्या ताब्यांत ठेवून किती फायदे करून घेतां येतात, हें व्हेनिस आणि जिनोवा या शहरांच्या इतिहासावरून पूर्णपणें कळून चुकलेलें होतें. युरोपखंडांतील समुद्रामध्यें आशियाखंडांतील व्यापारी मक्ता या दोन शहरांकडेच असल्यामुळें त्यांचीं पुढें दोन स्वतंत्र संस्थानें झालीं. सतराव्या शतकामध्यें सनदी ईस्ट इंडिया कंपनी जितकी बळकट होती, तितकींच

हींही पण प्रारंभाला होतीं; परंतु ब्याझेंटाईन राष्ट्राचा ऱ्हास झाल्यामुळें भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेशांतील ग्रीक लोकांची जागा बळकविण्याला, त्या किनाऱ्यावरील बेटें आणि इतर माऱ्याचीं नाकीं मिळविण्याला व तटबंदी करण्याला, आणि अशा रीतीनें ज्याप्रमाणें इंग्लिश व डच यांनीं हिंदी महासागरामध्यें आपलें वर्चस्व स्थापन केलें त्याचप्रमाणें भूमध्यसमुद्रावरील व्यापार आणि प्रदेश आपल्या ताब्यांत घेऊन आपलें वर्चस्व स्थापन करण्याला, हीं इतालियन शहरें पूर्ण समर्थ झालीं होतीं. चिआस हें " जिनिवा कंपनी "च्या पूर्ण मालकीचें असून ग्रीकमधील बेटसमुच्चयांपैकीं कांहीं बेटांवर सुमारें २२० वर्षेंपर्यंत त्यांनीं हुकमत चालविली. अशा रीतीनें चालविलेल्या राजकीय सत्तेचें इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें विस्तीर्ण प्रदेशभर चालविलेल्या हुकमतीशीं अल्प प्रमाणावर, पण विलक्षण रीतीचें, साम्य दिसून येतें. ज्याप्रमाणें डच व पोर्तुगीज ह्या दोन्ही देशांच्या वसाहतींचे कांहीं अवशिष्ट राहिलेले भाग अजूनही हिंदी महासागर आणि इराणी आखात ह्यांच्या किनाऱ्यावर दृग्गोचर होतात, त्याचप्रमाणें मोडके तोडके किल्ले आणि नामशेष झालेल्या इतालियन राजसत्तेच्या आणखी कांहीं खुणा ग्रीस आणि आशियामायनर ह्या देशांच्या सर्व किनाऱ्यांवर दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु पूर्वेकडून महंमदी दिग्विजयाचा लोंढा जेव्हां धोधो करीत जवळ येऊन ठेपला, तेव्हां ग्रीक आणि इताली ह्यांपैकीं एकही राष्ट्र त्याचा प्रतिकार करण्याला समर्थ झालें नाहीं. तुर्की राष्ट्राचें आरमार आणि सैन्य ह्यांचेपासून आपल्या चोहोंकडे पांगलेल्या ठाण्यांचें संरक्षण करण्याला इतालियन लोकसत्तात्मक राज्यापाशीं पुरेसे लोक, भांडवल, अगर प्रांतिक उत्पन्नाचीं साधनें नव्हतीं. इतालीला मुख्य टापूंमधील आपल्या प्रदेशावर आसपासच्या बलाढ्य राष्ट्रांकडून हल्ला होईल अशी नेहमीं भीति वाटत होती, आणि आशियांतील व्यापाराची दिशा बदललेली असल्यामुळें त्यांच्या भरभराटीचा झराही आटत चालला होता. तथापि ह्या लहानशा व्यापारी संस्थानांना युरोपखंडाच्या मुख्य

भूमीवर आपल्या पूर्ण जोमांत असलेल्या तुर्की राजसत्तेशीं झगडावें लागत असतांही व्यापारी क्षेत्र मोकळें होतें, तोंपर्यंत त्यापासून त्यांनीं स्वतःचे किती फायदे करून घेतले, हें लक्षांत आणलें ह्मणजे ज्या वेळीं इंग्लिश आरमाराचें वर्चस्व हळुहळु वृद्धिंगत होत चाललें होतें, आणि मोंगल राष्ट्र मोठ्या झपाट्यानें रसातळास जात चाललें होतें, अशा वेळीं एका इंग्लिश व्यापारी कंपनीनें हिंदुस्थानांत एका बलाढ्य राष्ट्राचा पाया घातला, या गोष्टीबद्दल वाटणारें आश्चर्य आपणास बरेंचसें कमी करितां येईल. आतां हें खरें आहे कीं, भूमध्यसमुद्राच्या पूर्वेकडील प्रदेश आणि ग्रीस हीं व्हेनिस व जिनोवा यांना जवळ होतीं; उलट इंग्लंडमधून हिंदुस्थानांत जाण्याला त्या वेळीं सहा महिन्यांचें जलपर्यटन करावें लागत होतें. परंतु ह्या लांबीच्या पल्ल्यामुळेंच सुरवातीस हिंदुस्थानांतील राजकीय घडामोडी युरोपांतील राजकारणाच्या मर्यादेच्या बाहेर समजल्या जात होत्या. त्यामुळें इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील राज्यसंस्थापनेला मूर्त स्वरूप येण्याला त्याचा फार उपयोग झाला; शिवाय यानंतर त्यामुळेंच आणखी एक विशेष फायदा हा झाला कीं, इंग्लंडला आपल्या व्यापारी वसाहतींना स्वदेशीं सुरक्षित आधार देतां आला, आणि सर्व प्रतिस्पर्ध्यांना समुद्रामध्यें थोपवून धरितां येईल असें सामर्थ्य आलें.

मोंगल राष्ट्राचा सर्व बाजूंनीं सारखा ऱ्हास होत चाललेला असून तें नष्ट होण्याच्या बेतांत आलेलें होतें; त्यामुळें हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर असलेल्या जोमदार युरोपियन वसाहती आपल्या हद्दीची वाढ करतील, आणि आपलें स्वातंत्र्यही प्रस्थापित करतील, असें अनुमान अशा स्थितींत कोणालाही सहज करतां येण्यासारखें होतें. इ. सन १६७२ मध्यें लिब्निट्झ यानें चवदाव्या लुईला हालंडवर स्वारी न करितां आशियाखंडांत एक मोठें राष्ट्र स्थापन करण्यासाठीं पहिली पायरी ह्मणून इजिप्त देश आपल्या ताब्यांत घेण्याची मसलत दिली, त्या वेळींच "पौर्वात्यांचा पराकाष्ठेचा दुबळेपणा आतां सर्व जगभर जाहीर झालेला आहे" असें त्यानें त्यांत

दर्शित केलेलें होतें. आणि तें अगदीं खरेंही होतें. हिंदुस्थान देश हा इतर देशांच्या मानानें ह्या वेळीं अगदींच दुबळा झालेला होता, तरीही सर्व आशियाखंडांत त्याच्या इतका सुसंपन्न देश एकही नव्हता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. स्थानिक सुभेदारांना आपआपसांतील भांडणें आणि भानगडी ह्यांमुळें व्यापारी वसाहतींकडे फारसें लक्ष देण्याला मुळींच अवसर सांपडत नसे; पण जर कधीं संपत्तीची अवश्यकता अगर सैन्याच्या मदतीची अपेक्षा लागली, तर मात्र त्यांचें लक्ष ह्या कंपन्यांकडे जात असे. त्याचप्रमाणें उदयोन्मुख वाढत्या सत्तेचे एतद्देशीय परराज्यापहरण करणारे पुरुष आणि धाडशी लोक हे ह्या व्यापारी कंपन्यांजवळ मदत मागतील, हें जितकें शक्य होतें, तितकेंच त्या त्यांना मदत देतील, अगर आपल्या ताब्याखालीं आणतील, हेंही शक्य होतें; ह्मणजे, अशा रीतीनें परकीय लोकांना हिंदुस्थानचे दरवाजे बंद न करितां ते ते उलट उघडेच टाकतील, असा अधिक संभव होता. ह्या परिस्थितीपासून आपणाला दोन अनुमानें सहज काढतां येण्यासारखीं आहेत. त्यांपैकीं पहिलें हें आहे कीं, जोंपर्यंत पाश्चिमात्यांना युरोपशीं असलेल्या आपल्या दळणवळणावर अवलंबून राहतां येणें शक्य आहे, तोंपर्यंत त्यांची सत्ता हळुहळु वृद्धिंगतच होत जाईल; आणि दुसरें हें आहे कीं, आशियांतील व्यापारी मत्सरामुळें आणि युरोपांतील राष्ट्रीय द्वेषामुळें ह्या वाढत चाललेल्या कंपन्यांची लवकरच आपआपसांत एकमेकांशीं टक्कर होईल; आणि सरते शेवटीं असेंही भविष्य करतां येण्यासारखें आहे कीं, ह्या उडालेल्या टकरींत जी कंपनी आपल्या इतर युरोपियन प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करील, तिला एतद्देशीय शत्रूंची फारच थोडी भीति बाळगावी लागेल, आणि हिंदुस्थानच्या आसमंतांतील प्रदेशांत तिलाच आपलें वर्चस्व निर्विवादपणें प्रस्थापित करतां येईल.

या कारणामुळें अठराव्या शतकाच्या प्रारंभींच्या स्थितीचें थोडक्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन करण्यास हरकत नाहीं. डच कंपनी अजून श्रीमंत आणि व्यापारी बाबतींत भरभराटींत असून तिच्या ताब्यांत सिलोन

व हिंदुस्थानांतील कांहीं ठिकाणें होतीं; परंतु त्यांच्या कार्यक्षमतेच्या क्षेत्राचें केंद्र हळुहळु पूर्वेकडे स्थलांतर करीत चाललें असून या शतकाचीं वर्षें जसजशीं जात चाललीं, तसतसा त्यांचा आरमारी सत्तेचा ऱ्हासही झपाट्यानें होत गेला. फ्रेंच कंपनीचें युरोपमध्यें नुकत्याच झालेल्या लढाईमुळें फार नुकसान झालेलें होतें. या लढाईंत त्याच्या ताब्यांतून पांदेचरी गेली, आणि ती त्यांनीं पुढें इ. स. १६९७ मध्येंच काय ती परत मिळविली. फ्रेंच कंपनी कर्जांत बुडालेली होती, आणि आशियांत धाडशी कृत्यें करण्याला वर डोकें काढतां येण्यासारखी तिची स्थिति नव्हती. इंग्लिश कंपनीची भरभराट होत चालली होती, आणि हिंदुस्थानच्या मुख्य टापूंत तिचा पाय मजबूत रोंविला गेला होता. परंतु मोंगल बादशाही अजूनही अवरंगझेबाच्या अमलाखालीं जीव धरून राहिलेली होती; त्यामुळें त्याला दुसऱ्यांनीं आपल्या राज्यांतील प्रदेश बळकविण्याकरितां केलेले प्रयत्न कधींहि सहन झाले नसते.

वर लिहिलेल्या कारणांमुळें ह्या वेळेपर्यंत फ्रेंच आणि इंग्लिश कंपन्यांचें धोरण फक्त व्यापारविषयकच होतें, व हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर स्थायिक होण्यासंबंधींचे त्यांचे सर्व बेत आणि घाटाघाटी ह्याही व्यापारी तत्त्वाच्या हितसंबंधावरच उभारलेल्या होत्या. परंतु ह्या कंपन्यांची वाढती शक्ति, हिंदुस्थानांतील राज्यांचा कमकुवतपणा, परस्परांत स्पर्धेची वाढती तीव्रता आणि तिला फुटणारी उकळी, व मुख्यत्वेंकरून फ्रान्स आणि इंग्लंड यांचीं युरोपांतील कडाक्याचीं भांडणें, ह्या सर्व गोष्टींमुळें व्यापारी चुरशीचें रूपांतर ज्या काळीं राजकीय वर्चस्व मिळविण्याकरितां कराव्या लागणाऱ्या सशस्त्र लढायांमध्यें झालें, त्या काळाच्या आतां आपण जवळ जवळ येत चाललों आहोंत. सुमारें वीस वर्षेंपर्यंत दक्षिण हिंदुस्थान हें

[1] इ. सन १६७१ मध्यें डच सरकाराजवळ १५१ लढाऊ जहाजें होतीं. परंतु इ. सन १७४० मध्यें त्यांपैकीं फक्त ४२सच काय तीं शिल्लक राहिलीं होतीं. ' कॉस्तानें फ्रांस, ड्युप्ले व लाबूर्डोनें यांची चुरस' हें पुस्तक, पान १४ पहा.

अति लांबीच्या पल्ल्यावरील दोन युरोपियन राष्ट्रांचें एक रणक्षेत्रच बनून राहिलें होतें. हैद्राबाद येथील निझामाच्या गादीसंबंधीं वारसाईच्या भांडणामध्यें भाग घेतां यावे, म्हणून आस्ट्रियामधील गादीच्या वारसाईची लढाई हा एक पुढें केलेला बाहणा होता, आणि वसाहती व आरमार ह्या बाबतींत आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां इंग्लंड व फ्रान्स ह्यांमध्यें पुष्कळ काळपर्यंत जें एकसारखें युद्ध चाललें होतें, त्यांत हिंदुस्थानांतील राजकीय विषयांचा बराच संबंध गुंतलेला होता. ह्या लढायांच्या शेवटीं जेव्हां इंग्लिश लोक विजयी होऊन बाहेर पडले, तेव्हां आपणापुढें अवाढव्य प्रदेशाचें स्वामित्व मिळविण्याचे आणि आशियांतील आपलें राष्ट्र चिरस्थायी करण्याचे मार्ग खुले आहेत, असें त्यांना आढळून आलें. अठराव्या शतकांतील इंग्लिशांच्या पूर्वजांकडून वडिलोपार्जित अशा ज्या कांहीं देणग्या त्यांच्या हवालीं करण्यांत आल्या, त्यांमधील "आशियांतील साम्राज्य" ही एक अत्यंत महत्त्वाची आणि मौल्यवान देणगी आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

भाग चवथा.

फ्रेंच व इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी.

परिच्छेद–हिंदुस्थानची तत्कालीन राजकीय परिस्थिति.

इ. सन १७०२ मध्यें स्पेनचा राजा मृत्यु पावला, आणि त्यामुळें सुरू झालेल्या लढाईचा शेवट ज्याप्रमाणें स्पेनच्या राजसत्तेची विभागणी आणि युरोपमधील सर्वसाधारण राजकीय बाबतींची पुनर्घटना करण्यांत झाला, त्याचप्रमाणें इ. सन १७०७ मध्यें अवरंगझेब बादशहा मृत्यु पावल्याबरोबरच मोंगल राष्ट्राचेही तुकडे होण्याला सुरवात झाली; व त्यामुळें पुढें आशियांतील राजकारणपद्धतींत महत्त्वाचे घोटाळे माजले. मध्य आशियांतील प्रांतांमधून ह्या काळीं जी अस्वस्थता आणि मुलकी अव्यवस्था पसरत चालली होती, ती सोळाव्या शतकाच्या मध्यापासून इराण आणि हिंदुस्थान ह्या दोन देशांवर ज्या दोन मोठ्या राजघराण्यांचा अंमल असे, त्यांचा डळमळीतपणा व त्यांना येऊं लागलेली उतरती कळा, या दोहोंचीं स्पष्ट पूर्व चिन्हें होतीं. पुष्कळ अवधीपर्यंत चालू असलेला शांततेचा काळ आतां संपत आला होता, आणि मोठमोठ्या दिग्विजयाच्या कालाचा उदय होण्यास पुन्हां सुरवात झाली होती. ह्मणून मध्य आशियामध्यें या वेळीं जो गोंधळ माजून राहिला होता, त्याचा संबंध आशिया खंडाच्या अगदीं बाहेरच्या बाजूवरील गोष्टींशीं, ह्मणजे हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या किनाऱ्यावर घडून येण्याच्या बेतांत असलेल्या गोष्टींशीं, लावण्यास आपणाला खात्रीनें कांहींही हरकत नाहीं, असें ह्मटल्यास चालेल.

अठराव्या शतकाच्या मध्याचे सुमारास मोंगल राजसत्तेचा पूर्ण ऱ्हास झाला, ही त्या काळच्या इतिहासांत घडून आलेली अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. आशियांतील इतर मोठमोठ्या जुलमी राजसत्तांप्रमाणेंच ह्याही सत्तेचा

शेवट झाला. बाहेरून परदेशांतील स्वाऱ्या करणाऱ्या लोकांनीं हल्ले केल्यामुळें, आणि राज्यांतील अंतःस्थ बंडांनीं गोंधळ उडविल्यामुळें, त्या राष्ट्राची इमारत कडाडून एकदम धाडकन ढांसळून पडली, आणि परराज्यापहरण करणारे तोतये, यशस्वी बंडखोर व धाडशी शूर पुरुष, यांनीं त्याचे तुकडे तुकडे उडविले. मोंगली राजसत्तेमध्यें जे कांहीं दोष होते, त्यांतील विशेषच अपायकारक दोष ह्मटला ह्मणजे वाजवीपेक्षां फाजील सत्तेचें एकीकरण हा होय. हा दोष सर्व अनियंत्रित राजसत्तांमध्यें विशिष्ट रीतीनें दिसून येतो, आणि यामुळेंच जेव्हां अनियंत्रित राजसत्ता एखाद्या कर्तृत्वहीन पुरुषाच्या हातीं जाते, तेव्हां तिचा ऱ्हास झाल्यावांचून रहात नाहीं.

मोंगल बादशहाच्या मृत्यूमुळें त्याच्या मुलांमध्यें आपआपसांत राजगादीबद्दल सुरू झालेली यादवी ही नेहमींच्या प्रचाराप्रमाणेंच होती. कारण, हिंदुस्थानांत रिकाम्या झालेल्या तख्तावर बसण्याचा हक्क तरवारीच्या जोरावरच नेहमीं ठरवावा लागत असल्यामुळें ह्या राजघराण्यांतील प्रत्येक राज्यकर्त्याला आपला हक्क शाबीद करण्याकरितां गादीवर बसण्यापूर्वी लढावें लागलें होतें; आणि वास्तविक रीत्या ह्या राजघराण्यांतील प्रत्येक पुरुषाला आपण राज्यकर्ता होण्याला योग्य आहोंत हें सिद्ध करण्याला जें चढाओढीचें " भयंकर दिव्य " करावें लागत असे, त्या दिव्यामुळेंच त्या घराण्याला इतकें सामर्थ्य आलेलें होतें. परंतु अवरंगझेब वृद्धावस्थेंत मृत्यु पावल्यामुळें त्यानंतर राजगादीकरितां पुढें यादवी माजणार, अशीं स्वप्नें पुष्कळ दिवस अगोदरच पडलेलीं होतीं, आणि जाणून बुजून त्याची तयारीहि झालेली होती. तो मृत्यु पावला त्या वेळीं त्याच्या राज्यांत सर्वत्र गोंधळ झालेला होता; " दख्खन " च्या मराठे लोकांमध्यें बंडाची भयंकर लाट उसळलेली होती; त्याचें राज्य अवजड व अवाढव्य झालेलें होतें; आणि त्याच्या मुलांमुलींतील सुरू झालेल्या यादवीमध्यें विजयी होऊन बाहेर पडलेल्या पुरुषाला राष्ट्रांतील विस्कळितपणानें एकत्र संघटित केलेले प्रांत व आपआपसांत वैमनस्य असलेल्या जाती यांना एकत्र ताब्यांत

ठेवण्याचें सामर्थ्य नव्हतें. मराठे सरदारांच्या राजरोस लुटालूट करणाऱ्या टोळ्यांची वाढ होऊं लागून तीं भटकणारीं सैन्यें बनलीं होतीं, आणि त्यांनीं पश्चिम व मध्य प्रदेशांत शिरून फार नासधूस केली होती. दक्षिण प्रांताच्या मुख्य सुभेदारीचें पर्यवसान निझामाच्या अमलाखालील एक स्वतंत्र मांडलिक राज्यामध्यें झालें होतें; हिंदुस्थानांतील अत्यंत सधन असलेला बंगाल प्रांत एका धाडशी अफगाण मनुष्यानें बळकाविला होता; पंजाबमध्यें शीख लोकांच्या उदयकालास सुरवात झाली होती; एक प्रबळ हुद्देदार औधमध्यें आपलें राज्य स्थापन करण्यांत गुंतला होता; आणि पुष्कळ परसत्तापहरण करणारे धाडशी लोक लांबलांबच्या प्रदेशांत अन्यायानें आणि जबरदस्तीनें सत्ता बळकावून स्थानापन्न होऊं पहात होते. सोळाव्या शतकामध्यें आक्सस नदीकडून आलेले बाबर आणि त्याचे भालाइत शिलेदार यांनीं ज्या मोंगली राष्ट्राची स्थापना मोठ्या जोमानें व धाडसानें केली होती, तेंच राष्ट्र आतां निर्जीव होऊन मृत्युपंथास लागलेलें होतें. मोंगल राष्ट्र हें ज्या वेळीं भरभराटींत होतें, त्या वेळीं त्या राष्ट्राचीं दूरवरचीं लष्करी ठाणीं काबूल व कंदाहार येथें होतीं; परंतु अवरंगझेबाच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं त्याची त्या ठाण्यांवरील शिबंदी अफगाणिस्थानाबाहेर हांकलून लावण्यांत आली होती. हिंदुस्थानच्या सुरक्षितपणाकरितां वायव्येकडील सरहद्दीवर नेहमीं कडक बंदोबस्त ठेवणें अतिशय अगत्याचें असल्यामुळें हिंदुस्थानच्या सपाट प्रदेशावरील राजसत्तेच्या कक्षेबाहेर जर अफगाणिस्थान देश राहिला, तर पूर्वीप्रमाणें नेहमीं मध्य आशियामधून स्वाऱ्या होतील, हें त्या काळींही निश्चयात्मक ठरल्यासारखेंच होतें; आणि त्याप्रमाणें अवरंगझेब मृत्यु पावल्यावर तीस वर्षांनीं इराणांतील राजघराणें धुळीस मिळविणारा नादीरशहा ह्या नांवाचा एक दैववान इराणी शूर पुरुष आपल्या मोठ्या सैन्यासह अफगाणिस्थानच्या खिंडीमधून हिंदुस्थानावर चाल करून आला. मोंगल बादशहानें त्याचा केलेला प्रतिकार हा फक्त नांवा-

चाच मात्र होता. नादीरशहानें दिल्ली शहर लुटलें[1], आणि त्या दुर्दैवी शहराच्या रक्तमलिन चरित्रामध्यें आणखी एक अधिक कत्तलीची भर पाडली. त्यानें सिंधूनदाच्या पश्चिमेकडील बादशाही अमलाखालीं असलेलीं सर्व ठाणीं हिसकावून घेतलीं, आणि ह्या धक्क्यानें मरणोन्मुख झालेल्या मोंगल बादशाहीला शेवटच्या शक्तिपातानें आलेल्या अखेरच्या क्षीण स्थितींत टाकून तो तसाच स्वदेशीं परत गेला. अशा रीतीनें आडकाठी नाहींशी झाल्यामुळें अफगाण लोकांच्या अबदल्ली जातींतील अहमदशहा यानें पुढें दोन वर्षांनीं त्याच्यामागून हिंदुस्थानावर स्वारी केली. अहमदशहा हा नादीरशहाच्या सैन्यांतील एका रिसाल्यावरील मुख्य सेनापती असून जेव्हां नादिरशहाचा इराणी लोकांनीं खोरासान येथें त्याच्या छावणींत खून केला, तेव्हां तो पूर्वेकडे अफगाणिस्थान जिंकण्याकरितां निघाला, आणि तेथें आपला मुख्य तळ ठेवून इ. सन १७४८ ते १७५१ पर्यंत त्यानें सर्व पंजाब प्रांत आपल्या हस्तगत करून घेतला. मध्यंतरीं नैऋत्येकडून मराठे लोक एखाद्या उद्ध्वस्त करणाऱ्या पुराप्रमाणें मध्य हिंदुस्थानभर सारखे पसरत चालले होते; आणि जेथें जेथें अमर्याद सत्तारूपी वाफेच्या रुळाखालीं सर्व प्रदेश एकसारखा सपाट करून टाकला गेला होता, आणि जेथें जेथें मोंगल बादशाहीनें छोटेखानी स्वतंत्र राज्यें आणि लहान लहान संस्थानें यांना चिरडून टाकलें होतें, तेथें तेथें आतां सर्व प्रदेश उद्ध्वस्त होऊन पूर्ण बेबंदशाही माजून राहिली होती. निरनिराळे प्रांत आणि सुभेदाऱ्या ह्या आपापल्या स्वाभाविक जुन्या वळणावर गेल्या होत्या, आणि राजद्रोही सुभेदार, बंडखोर सरदार, सरकाराविरुद्ध उठलेल्या निरनिराळ्या जाती अगर पंथ यांचे पुढारी, धर्मजागृति करणारे लोक अगर भाडोत्री सैन्याच्या टोळ्यांचे नायक, यांच्यामधील झटापटींनीं त्यांची विभागणी झाली होती. हिंदुस्थानच्या जनसमूहाची कोणीही अग्रणी नाहीं अशी स्थिति होत चालली होती; तो राजकीय

१ मार्च इ. सन १७३९.

वादळामध्यें इकडे तिकडे हेलकावे खात होता; व जी मानवी अगर दैवी सत्ता आपलें संरक्षण करील असें त्यास वाटे, तिलाच मात्र तो चिटकून राहिला होता. जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण करणें हें सरकारचें असलेलें जें आद्य कर्तव्य तें जो कोणी आपल्या हातीं अधिकारसूत्रें घेऊन योग्य रीतीनें बजाविण्याला आपण लायक आहों असें दाखवील, त्याची हुकमत कबूल करण्यास जनसमाज तयार झालेला होता. थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे जनसमाजाची "ना धनी, ना त्राता" अशी भणंग स्थिति झालेली होती, आणि ज्या राजकीय पद्धतीखालीं त्यांनीं पुष्कळ दिवस घालविले, ती पद्धतही हळुहळु नष्ट होत जाऊन तिच्या जागीं पूर्ण बेबंदशाही माजत चाललेली होती.

परिच्छेद दुसरा—दक्षिण हिंदुस्थानांतील फ्रेंच व इंग्लिश.

(इ. सन १७१५ ते १७४९)

ह्या अंदाधुंदीच्या व घोटाळ्याच्या वेळींच फ्रेंच आणि इंग्लिश लोक हे प्रथमतः प्रतिस्पर्धी ह्मणून हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवर पुढें आले. या दोन राष्ट्रांच्या अठराव्या शतकांतील इतिहासांत प्रमुखत्वानें दृग्गोचर होणाऱ्या गोष्टींपैकीं विशेष महत्त्वाची गोष्ट ह्मणजे समुद्रापलीकडे होणाऱ्या कडाक्याच्या भांडणाचा उगम, स्वरूप व त्याचे आनुषंगिक परिणाम ही आहे; त्यामुळें त्यासंबंधीं अधिक ज्ञान होण्याकरितां फ्रान्समधील व्यापार व वसाहती यांविषयींच्या पद्धतीची प्रारंभीं कशी कशी वाढ होत गेली, याबद्दल त्रोटक हकीकत देणें या ठिकाणीं अयोग्य होणार नाहीं, असें वाटतें. अशा प्रकारचीं धाडशी कृत्यें करण्याला हीं राष्ट्रें जात्याच अपात्र आहेत, असे बारंवार चांगल्या चांगल्या लोकांच्या तोंडून उद्गार निघतात; पण ते कितपत खरे आहेत, याचा स्पष्टपणें व साधार निर्णय करण्याला वाचकांना ह्यापासून निदान थोडीशी तरी मदत होईल, आणि लांब समुद्रापलीकडील इंग्लिश आणि फ्रेंच यांच्या साहसी कृत्यांच्या हकीकतीवरून

त्यांच्या विचारांत व आचारांत किती जमीनअस्मानचें अंतर होतें हें वाचकांचे निदर्शनास आणून देण्यासही त्याचा बराचसा उपयोग होईल, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आपणाला असें सांगण्यांत येतें कीं, फ्रेंचांच्या वसाहतीविषयक इतिहासाचे कालमानानें तीन भाग झालेले आहेत. त्यांपैकीं पहिला म्हणजे इ. सन १६०९ मध्यें झालेल्या चवथ्या हेनरीच्या मृत्यूपर्यंतचा मोठमोठ्या शोधांचा काळ हा होय; दुसरा ह्मणजे सतराव्या शतकामधील वसाहतींच्या भयंकर वाढीचा काळ हा होय; आणि तिसरा ह्मणजे इ. सन १७१३ मधील युट्रेच्टचा तह आणि इ. सन १८१५ मधील फ्रेंचांच्या मोठ्या लढायांचा शेवट, यांच्यामधील उतरती कळा लागत गेलेला शंभर वर्षांचा काळ हा होय. आपण असें वाचलेलें आहे कीं, ज्या वेळीं स्पेन आणि पोर्तुगाल यांचीं अलौकिक कृत्यें आणि दिग्विजय यांनीं सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांचे डोळे दिपवून टाकले, त्या वेळींच खरोखर समुद्रतीरस्थ राष्ट्रांमध्यें नेटाची स्पर्धा सुरू झाली. आणि परदेशांतील जनसमूह, लांबच्या प्रदेशांतील जलपर्यटण, आणि आशियांतील काल्पनिक संपत्ति, यांविषयींची फ्रान्समधील वाढती जिज्ञासा त्या काळच्या लेखांवरून आणि रॅब्लीझ व मांटग्ने ह्यांसारख्या ग्रंथकर्त्यांनीं ठिकठिकाणीं याबद्दलच्या केलेल्या उल्लेखांवरून स्पष्ट होत आहे. तथापि सतराव्या शतकाच्या प्रारंभीं जरी फ्रान्सचा उद्योगी व दूरदर्शी राज्यकर्ता चवथा हेनरी याचे व्यापार आणि वसाहती यांसंबंधानें बेत चालले होते, व एक फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करण्याचीही सर्व व्यवस्था झाली होती, तरी सुद्धां फ्रान्समध्यें या कंपनीची स्थापना होण्याच्या पूर्वींच इंग्लंड व हॉलंड या दोन राष्ट्रांनीं आपापल्या ईस्ट इंडिया कंपन्यांची स्थापना करून ह्या महत्त्वाच्या गोष्टींत आपलें पाऊल पुढें टाकिलें होतें, आणि ह्याच दोन कंपन्या पुढें दीर्घायुषी आणि चिरस्मरणीय व्हाव्या असा ईश्वरी संकेत होता. तथापि इ. सन १६२४ मध्यें रिचेल्यू याच्या प्रधानकीची पुष्कळ दिवसांची कारकीर्द सुरू झाली. रिचेल्यू हा मनाचा मोठा निग्रही असल्या-

मुळें त्याच्या डोक्यांत फ्रान्स देशाचें समुद्रापलीकडे एखादें मोठें विस्तृत राज्य असावें ही कल्पना परिपक्क होऊन त्याचा असा परिणाम झाला कीं, पश्चिमेकडील कानडा देशापासून तों तहत मादागास्कर आणि ईस्ट इंडीज-पर्यंत जगांतील निरनिराळ्या भागांत क्रमाक्रमानें वसाहत करणाऱ्या मंडळ्यांच्या स्थापना व वाढ करणाऱ्या सनदा एकामागून एक देण्यांत आल्या.

येथें हीही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, जुन्या राजसत्तेखालीं जितक्या म्हणून फ्रेंच वसाहती स्थापन झाल्या, त्या एकसारख्या ज्या तत्त्वांना व हेतूंना धरून होत्या, तीं सर्व मूळचीं तत्त्वें आणि हेतू ह्या कंपन्यांच्या सनदेमध्यें स्पष्ट रीतीनें ग्रथित केलेलीं होतीं, असें आढळून येतें. परंतु इंग्लंड आणि हालंड यांच्या व्यापारी दफ्तरांमध्यें मात्र त्यांचा माग-मूस सुद्धां सांपडणार नाहीं. त्या वेळीं रोमन क्याथलिक धर्माची स्थापना झालेली होती, आणि इतर सर्व धर्मांना कडक बहिष्कार घालण्यांत आलेला होता. परंतु उलट पक्षीं धर्मांतर केलेल्या विधर्मीयालाही फ्रेंच नागरिकाचे सर्व हक्क मिळत असत. ह्या स्वाऱ्यांचा मुख्य उद्देश वसाहती स्थापन करण्याचा होता; तरी त्याला धर्मप्रसार हीही एक तितकीच महत्त्वाची पुरवणी जोडलेली होती. तथापि त्यांचा मुख्य उद्देश सांपत्तिक अगर धार्मिक नसून राजकीय होता. त्या काळचा फ्रान्सचा अतिशय भयंकर प्रतिस्पर्धी जो स्पेन हा समुद्रापलीकडील विस्तीर्ण प्रदेश एकसारखा बळकावीत चालला होता, आणि सर्व जगांतील ख्रिस्तेतर लोकांवर त्याला आपला हक्क सांगतां येऊं नये ह्मणून प्रतिक्रियेच्या नांवाखालीं क्याथलिक धर्मांतील मुख्य धर्मगुरूच्या हस्तें कंपन्यांची घटना करण्यांत आली होती. परंतु वास्तविक पाहतां या पद्धतींत इंग्लंड व हालंड यांच्याच युक्तिकौशल्याचें रिचेल्यू यानें अनुकरण केलेलें होतें. स्पेनचें राष्ट्र ह्या वेळीं अवजड झालेलें होतें, व त्याच्या सरहद्दीवर इंग्लंड व हालंड या दोन्हीही राष्ट्रांनीं घाव घालण्यास अगोदरपासूनच सुरवात केलेली होती. ते स्पेनच्या सोन्यानें भरलेल्या जहाजांचा मध्येंच फन्ना उडवीत; त्याचीं बेटें व किनाऱ्यावरील प्रदेश

यांना त्रास देत; खासगी लढाऊ जहाजें अरुंद समुद्रांत पाळतीवर ठेवीत; आणि साधारणतः अनियमितपणानें एकदम गपचुप छापाही घालीत. वर लिहिलेलीं हीं त्यांचीं कृत्यें स्पेनच्या समुद्रांतील अद्भुत दंतकथा या रूपानें पुष्कळ दिवसपर्यंत तेथील खलाश्यांच्या आठवणींत राहिलेलीं होतीं. ह्या रानवटपणाच्या धाडशी कृत्यांमध्यें फ्रेंच लोकांनीं फार थोडा भाग घेतला होता; परंतु त्यांनीं आपल्या ह्या शेजाऱ्यांच्या सनदशीर व्यापारी मंडळ्या काढण्याच्या पद्धतीचा कित्ता गिरविला होता; आणि रिचेल्यूप्रमाणेंच माझारीनच्याही कारकीर्दींत समुद्रापलीकडील देशांत फ्रेंच क्याथलिक लोकांकडून "प्रभूच्या नांवावर" आणि स्पेनला "तोंडीस तोड" ह्मणून वसाहती स्थापन करविणें हेंच सतराव्या शतकाच्या पहिल्या अर्ध भागांत फ्रान्स देशाचें वसाहतीविषयक बाबतीचें मुख्य तत्त्व ठरून गेलेलें होतें.

या वेळीं फ्रान्समध्यें धार्मिक कल्पनांचें फारच स्तोम माजलेलें होतें; व मूर्तिपूजक लोकांमध्यें आपल्या सात्त्विक "शुभ वर्तमानाचा" प्रसार करण्यासाठीं राजदरबार आणि सर्व श्रीमान् लोक वर्गणी गोळा करण्यांत अतिशय गढून गेलेले होते. धर्मसंस्थापक मंडळ्या बाह्य प्रदेशांत रवाना करण्यांत आल्या होत्या; धर्माधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यांत आलेल्या होत्या; आणि उत्तर अमेरिकेमधील सर्व नव्या वसाहतींत जेसुइट लोक हळूहळू अधिक अधिक सत्ता बळकावीत चालले होते. फ्रान्सचें राज्य आणि धर्म यांचा विस्तार करण्याकरितां ज्या या तजविजी योजल्या जात, त्यांवर देखरेख आणि अंमलबजावणी करण्यामध्यें सरकारी अधिकारीही धर्माधिकाऱ्यांप्रमाणेंच पुष्कळच प्रमुखत्वानें झटत असत. परंतु धर्माधिकारी आणि सरकार यांच्या आश्रयाखालीं कंपन्या स्थापन करण्याची पद्धत धंदेदार व्यापारी लोकांना आवडत नसे. आपणाला पूर्ण व्यापारी स्वातंत्र्य असावें, आणि परदेशीय शत्रूपासून आपल्या संरक्षणाशिवायच्या इतर बाबतींत सरकारानें ढवळाढवळ करूं नये, असें त्यांचें ह्मणणें असे. परंतु नेहमींप्रमाणेंच त्या वेळींही फ्रान्सच्या अधिकारी वर्गाचे विचार पूर्वपरंपरेसच

धरून होते. इंग्लिश सरकार ज्याप्रमाणें अग्रेसर मंडळींना अगर धाडशी व्यापाऱ्यांना सनद देऊन त्यांना आपल्या स्वतःच्या सामग्रीनेंच नवीन वसाहती अगर व्यापाराच्या पेढ्या स्थापन करण्यास परवानगी देत असे, त्याप्रमाणें ते देत नसून उलट त्या पद्धतीचे विरुद्ध होते. फ्रेंच सरकार आपल्या कंपन्यांना स्वाऱ्या करण्यालाच फक्त अधिकार देत असे असें नाहीं, पण त्यांना विशेष नेटानें प्रोत्साहनही देत असे. याचा परिणाम असा झाला कीं, इहलोकीं व परलोकीं होणाऱ्या फायद्याच्या आश्वासनावर लक्ष ठेवून अधिकारी वर्ग कंपनीस लागणाऱ्या भांडवलामध्यें अगर त्यांनीं केलेल्या व्यापारी सट्टयामध्यें आपला हात असावा, असें ह्मणूं लागला. या कंपन्यांची अंतःस्थ व्यवस्था व सेनानायकत्व सरदार लोकांकडेच असे; आणि "दी न्यू फ्रान्स कंपनी" च्या शंभर सभासदांमध्यें दरबारांतील तीस बडे लोक, शिवाय कांहीं थोडेसे धर्माधिकारी व कांहीं श्रीमान् व वजनदार गृहस्थांचे खानगी कारभारी, त्यांचे प्रतिनिधि ह्मणून नेमिलेले होते, असें आपणांस आढळून येतें.

फक्त व्यापाराच्याच उद्देशानें स्थापन झालेल्या इंग्लिश आणि डच ईस्ट इंडिया कंपनीसारखी सनदी कंपनी रिचेल्यू यानें काढलेली नव्हती; अगर आतांच वर वर्णन केलेल्या पद्धतीवर एखादी कंपनी काढणें शक्यही नव्हतें. फ्रेंच व्यापारी वर्ग हा, ज्याच्या योगानें व्यापारी कंपन्या, मोठमोठे अधिकारी, अमीर उमराव आणि धर्माधिकारी यांच्या देखरेखीखालीं एखाद्या पालकाप्रमाणें जातील अशा शर्ती कबूल करण्यास मागें पुढें करीत होता, व धार्मिक व धर्मप्रसारक मंडळींबद्दल तो तिरस्कारानें अविश्वासही दाखवीत होता. व्यापारी देवघेवीची किल्ली धर्माधिकाऱ्यांच्या हातीं रहावी, आणि व्यापारी देखरेखीची चावी अधिकारी वर्गाच्या हातीं असावी, हें हितावह नाहीं, अशी मोठ्या सावधगिरीची सूचना ते एक-सारखे करीत होते; आणि कोणत्याही सबबीवर व कांहीं झालें तरी राजानें आमच्या जहाजांचे कप्तान नेमूं नयेत, अशी रुअेन आणि मार्सेल्स

येथील व्यापारी सभेनें शिफारसही केलेली होती. बाहेरच्या प्रदेशांतील व्यापारी बाबतीकरितां सरकारानें नेमिलेले वकील व स्वदेशांतील मुलकी अधिकारी या दोघांचेंही सारखेंच अरेरावी वर्तन आहे, अशी त्यांची कुरकूर असे. धार्मिक हितसंबंधाचा व्यापारी बाबतींत वरपगडा असूं नये, परंतु सरकारी आरमाराकडून समुद्रांतील आपल्या व्यापाराचें संरक्षण व्हावें, व व्यापारी वखारींनाच आपापल्या कामाची व्यवस्था ठेवण्याला परवानगी असावी, अशी त्यांची मागणी होती. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे रिचेल्यू याच्या वसाहतीविषयक धोरणाचे एक दोन गोष्टींपलीकडे विशेष लक्षांत ठेवण्यासारखे महत्त्वाचे असे कांहींही परिणाम झाल्याचें आढळून येत नाहीं. त्या गोष्टी म्हटल्या म्हणजे एक तर ज्यामुळें त्यांना पुढें झालेल्या वसाहती करण्याला अतिशय हुरुप आला, अशीं कांहीं नवीन प्रदेशाचा शोध लावण्याकरितां केलेलीं नामांकित जलपर्यटणें ही होय; व दुसरी म्हणजे नव्या कंपन्यांच्या हवालीं केलेल्या देशांत रोमन क्याथलिक धर्माचा झालेला प्रसार दाखविणाऱ्या धार्मिक वाङ्मयाचा करण्यांत आलेला प्रचंड विस्तार ही होय.

फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या वसाहती करण्याच्या पद्धतीचा उगम, स्वरूप, आणि प्रचारांत आणलेली रीति, यांच्यामध्यें सुरवातीला सुद्धां किती महत्त्वाचा आणि स्पष्टपणें दिसून येणारा परस्परविरोध होता, याची नोंद यावरून आपणास सहज करतां येईल. फ्रेंच कंपन्यांचा मूळ उपक्रम राजाश्रयापासून झालेला होता; त्यांची रचना सरकारच्या कडक नियमांखालीं झालेली होती; आणि त्यांच्या रचनेमध्यें जुन्या उच्च धर्मांचेंच प्राधान्येंकरून वर्चस्व होतें. परंतु पहिल्या इंग्लिश वसाहतींचा पाया, ज्यांनीं स्वदेशांतील राजे आणि धर्मगुरु यांचा जुलूम टाळण्याकरितां आपली जन्मभूमि सोडली होती, किंवा ज्या सुखवस्तू पण साहसी लोकांना समुद्रावर भटकत फिरण्याची आणि नवीन प्रांतांत मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची आवड असे, अशा लोकांनीं घातलेला होता;

व जोंपर्यंत त्यांना देश मिळविण्याकरितां वाटेल ते उपाय व पाहिजे तीं साधनें यांचा उपयोग करण्याची मुभा असे, तोंपर्यंत ते प्रदेश राष्ट्रीय मिळकत म्हणून आपल्या ताब्यांत ठेवण्यास हे लोक नेहमीं तयार असत.

तथापि फ्रान्सच्या व्यापाराला चांगले दिवस येऊं लागले होते, व ज्या वेळीं चवदाव्या लुईचा प्रख्यात प्रधान कालबर्ट यानें इ. स. १६६४ मध्यें पूर्व आणि पश्चिम इंडीजमध्यें आपल्या एक एक कंपनीची स्थापना केली, त्या वेळीं फ्रेंच इतिहासकारांच्या मताप्रमाणें अतिशय विस्तृत प्रमाणावरील वसाहतींच्या वाढीचा काळ सुरू झालेला होता. त्या काळच्या "इंडीज" या शब्दाच्या व्याख्येमध्यें दोन्हीही गोलार्धांतील अतिशय विस्तीर्ण प्रदेशाचा समावेश होत असे, ही गोष्ट पूर्वींच लिहिण्यांत आली आहे. "ईस्ट इंडीज" ह्या सर्वसाधारण नांवाखालीं इराणी आखातापासून चीनदेशापर्यंत दक्षिण-आशियांतील सर्व किनारे, मलाका, बोर्निओ, जावा आणि चिनी समुद्रामधील सर्व सुपीक मसाल्याचीं बेटें, ह्यांचा समावेश होत असे; आणि वेस्ट इंडीज ह्या सर्वसाधारण नांवाखालीं हल्लीं समावेश होत असलेलीं बेटेंच फक्त नव्हत, तर सर्व पूर्वकिनाऱ्यावरील प्रदेश आणि उत्तर व मध्य अमेरिकेमधील त्या काळीं शोध लागलेला सर्व प्रदेश यांचाही समावेश होत असे. ईस्ट इंडिया कंपन्यांच्या व्यापारी वर्चस्वाच्या मर्यादेखालीं आल्यावांचून कोणत्याही जहाजाला केप ऑफ गुड होपला वळसा घालतां येत नसे, आणि वेस्ट इंडीजच्या सर्वस्वी ताब्यांत असलेल्या कांहीं भागाचें अतिक्रमण केल्याशिवाय अटलांटिक महासागर ओलांडून जातां येत नसे. डच कंपनीला (इ. सन १६००) मध्यें मिळालेल्या सनदेअन्वयें त्यांना पूर्वेकडील समुद्रामध्यें नौकानयनाचे व आपल्या ताब्यांतील प्रदेशांत आक्रमण करणाऱ्या जहाजांना पकडण्याचे आणि जप्त करण्याचे विशिष्ट अधिकार पूर्णपणें देण्यांत आले होते. कालबर्ट यानें काढलेल्या ईस्ट इंडिया कंपनीला जी सनद देण्यांत आली होती, त्या अन्वयें तिलाही केप ऑफ गुड होप पलीकडील सर्व समुद्रांत व प्रदेशांत

पन्नास वर्षेंपर्यंत अशाच तऱ्हेचा व्यापारी विशिष्ट हक्क मिळालेला होता. सतराव्या शतकांतील ह्या मोठमोठ्या कंपन्या सर्व खिस्तीधर्मेतर देशांमध्यें राज्यविस्तार आणि व्यापार यांकरितां चाललेल्या चढाओढींत आपापल्या राष्ट्रांतर्फे नेमलेले प्रतिनिधि आणि पुरस्कर्ते होते, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं; आणि ही मुख्य गोष्ट ध्यानांत घेतली, तर सुव्यवस्थित वसाहतीविषयक धोरणाचें महत्त्व किती असतें, हें सहज समजून येण्यास हरकत पडणार नाहीं. फ्रेंच वेस्ट इंडिया कंपनीची रचना रिचेल्यू यानें काढलेल्या नमुन्यावर होती, आणि तिला मूर्तिपूजकांना जिंकण्याचा व बाटविण्याचा अधिकार दिलेला होता. परंतु कालबर्ट यानें काढलेल्या ईस्ट इंडिया कंपनीचा पाया निराळ्या पद्धतीवर घातलेला होता, आणि त्यामुळें ती सुधारणेमध्यें एखादें पाऊल तरी खात्रीनें पुढेंच होती, असें ह्मटल्यास हरकत नाहीं. ही कंपनी डच आणि इंग्लिश यांच्या सनदी कंपन्यांच्या धर्तीवर कांहीं विशिष्ट हक्क व मुबलक भांडवल देऊन स्थापन करण्यांत आली होती, आणि आशियांतील मालाच्या ज्या फायदेशीर व्यापारामुळें युरोपांतील समुद्रतीरस्थ राष्ट्रें सधन झालीं, त्या व्यापाराचा पुष्कळसा भाग ती फ्रान्सकरितां मिळवील, असेंही खात्रीनें ठरल्यासारखेंच होतें.

या अनीतीच्या आणि दपटशाहीच्या दिवसांमध्यें अधिकाऱ्यांची देखरेख हें एक निव्वळ भलें भक्कमसें लोढणेंच झालेलें होतें; आणि फ्रेंच कंपन्यांना तर याहूनही कांहींसा अधिकच भार सहन करावा लागत होता. राजा, राजघराण्यांतील पुरुष आणि मुख्य मुख्य दरबारी लोक, हे ह्या कंपन्या स्थापन करण्यांत प्रत्यक्ष भाग घेत असत; कंपनीचें भांडवल उभारण्याकरितां मोठमोठ्या रकमा मोठ्या खुषीनें देत; बडेबडे धर्माधिकारीही आपापला मोठेपणा एकीकडे ठेवून कंपन्यांना प्रोत्साहन देत असत; ह्या कंपन्यांचा उद्देश आणि त्यांचें कार्यक्षेत्र यांबद्दलचीं हस्तपत्रकें देवालयांमधून जाहीर रीतीनें त्या वेळीं वांटण्यांत आलीं होतीं; व्यासपीठावरून

तिच्या थोरवीचे गोडवेही गाण्यांत आले होते; इतकेंच नाहीं, तर फ्रान्सच्या राजानें जाहिरनामा काढून " जे खरे देशभक्त असतील, त्यांनीं आपलें नशीब काढण्याची व आपल्या देशाच्या भरभराटीला हातभार लावण्याची ही सोन्यासारखी संधि वाया घालवूं नये, " असा आग्रहाचा उपदेशही केला होता. तथापि आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, देशभक्ति आणि धर्मश्रद्धा ह्यासारख्या उच्च मनोवृत्तींना उद्देशून केलेल्या कळकळीच्या विनंतीनेंही व्यापारी लोकांमध्यें चोहोंकडे विशेषशी जागृति झाली नाहीं. मोठमोठ्या शहरांमध्यें अधिकारी वर्गानें अतिशय भीड खर्च केली, तरी सुद्धां जितक्या लवकर लोकांच्या वर्गणीनें भांडवल जमा होईल अशी अटकळ होती, तितक्या लवकर तें न जमतां फार सावकाश रीतीनें जमत गेलें. कारण, व्यापारी लोकांना त्या जुलमी राजसत्तेच्या इमानाबद्दल आणि त्याच्या सुसंबद्ध वर्तनाबद्दल भरंवसा वाटत नसे. परदेशांतून येणाऱ्या मालावरील जबर जकात कमी करावी, आणि व्यापारधंद्याची व्यवस्था खाजगी लोकांच्या हातीं असूं द्यावी, अशी त्यांनीं अधिकारी मंडळाला कळकळीची विनवणी केली होती, पण तिचा कांहींही उपयोग झाला नाहीं. वेस्ट इंडिया कंपनीविषयीं ह्मणावयाचें म्हणजे ती इ. सन १६७४ च्या सुमारास बुडाली, व त्यामुळें तिची सनद रद्द करण्यांत आली, असें दिसतें. त्या वेळेपासून कालबर्ट यानें वसाहती करण्याकरितां प्रतिनिधि ह्मणून कंपनी पाठविण्याची पद्धत बंद केली, आणि सरकारतर्फे प्रतिनिधि पाठविण्याचा निश्चय केला.

तथापि ईस्ट इंडीज संबंधानें सनदी कंपनीची पूर्वींचीच व्यवस्था कायम ठेवण्यांत येऊन तिला सरकारच्या बारीक नजरेखालीं ठेवण्यांत आलें. परंतु मादागास्कर येथें वसाहत करण्याकरितां रवाना केलेली मोहीमही त्यांचे बरोबरच पाठविण्यांत आली असल्यामुळें तिच्या खरो-खरीच्या व्यापारविषयक धंद्यास सुरवातीलाच बराच धक्का बसला. कारण, फ्रेंच त्यांना या मोहिमेंत पूर्ण नाशकारक रीतीनें माघार घ्यावी लागली.

लोकांनीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर आपला पाय शिरकविण्याकरितां पहिल्यानें केलेले प्रयत्न डच लोकांनीं निष्फळ केले, आणि ह्मणूनच ही कंपनी स्थापन झाल्यापासून सहा वर्षांतच अगदीं निकृष्ट अवस्थेस येऊन पोहोंचली. तथापि चवदावा लुई आणि त्याचा प्रख्यात प्रधान यांना जर अत्यंत उदार आश्रय व प्रोत्साहन देऊन ही कंपनी यशस्वी करतां आली असती—आणि राज्याच्या सर्वसाधारण धोरणाला कालबर्ट व त्याचीं व्यापारी मतें यांच्या विरुद्ध जर एकदम जोराचें वळण मिळालें नसतें—तर कदाचित् सतरावें शतक संपण्याच्या पूर्वींच फ्रेंचांना हिंदुस्थानांत आपला शिरकाव चांगल्या रीतीनें करून घेतां आला असता. त्यांची मूळ अडचण हालंडनें हें क्षेत्र बळकाविलें आहे ही होती; व असें सांगतात कीं, चवदाव्या लुईनें इ. सन १६७४ मध्यें हालंडविरुद्ध लढाई सुरू केली, त्याचें कारण फ्रेंच लोक हिंदुस्थानांतील त्यांच्या व्यापारांत ढवळाढवळ करीत असतांना तिला डच लोकांनीं जोरानें अडथळा आणला हेंच अंशतः होतें. परंतु थोडक्याच वर्षांनंतर फ्रान्सचा लष्करी खात्याचा प्रधान लुव्हा यानें आपला धनी जो चवदावा लुई याला युरोपांतील इतर देशांशीं सतत चालणाऱ्या लढायांमध्यें ओढलें, त्यामुळें कालबर्टच्या शांतताप्रिय मुत्सद्दीगिरीच्या तेजोरवीला खग्रास ग्रहण लागलें, आणि वसाहतींची वाढ व व्यापाराचा विस्तार करण्याचे त्याचे बेत बाजूला ठेवून त्यांना स्वाऱ्यांचे बेत करावे लागले.

या कारणामुळें पोर्तुगीज लोक जरी पहिल्यानें जगांतील नवीन प्रदेशाचा शोध लावण्याच्या हेतूनें निघाले होते, तरीही अठराव्या शतकाच्या प्रारंभीं ते फार मागें पडले होते, व त्यांची चळवळही शिथिल झालेली होती. पोर्तुगीज लोकांच्या मागून डच लोक आले, व त्यांनीं पोर्तुगीज लोकांपासून त्यांचा बहुतेक व्यापार व मुलूख हिसकावून घेतला; परंतु फ्रान्सच्या वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळें हालंडही कमजोर झालें. त्यामुळें इंग्लंडचा समुद्रांतील अतिशय बलाढ्य प्रतिस्पर्धी जो हालंड याची अशा

रीतीनें अनायासानें परभारें नांगी मोडली गेली, व इंग्लंडचें आयतेंच काम साधलें. अठराव्या शतकाच्या सुरवातीपासून हिंदुस्थानच्या किनाऱ्या-वरील डच लोकांच्या ताब्यांत असलेलीं नाक्याचीं ठिकाणें हळुहळु कमी कमी होत चाललीं होतीं, त्या प्रदेशांत वर्चस्व मिळविण्याकरितां सुरू असलेल्या कलहांतून त्यांनीं आपलें अंग काढून घेतलें होतें, आणि आग्नेयकडील सिलोन, जावा, बोर्निओ आणि मसाल्याचीं बेटें, हीं त्यांनीं आपल्या व्यापाराचीं मुख्य ठिकाणें केलीं होतीं. इ. सन १७२८ मध्यें "डॅनिश ईस्ट इंडिया कंपनी" रसातळास गेली. इ. सन १७२२ मध्यें आस्ट्रियाच्या बादशहानें आस्ट्रियांतील नेदरलंडच्या व्यापारी लोकांना एक सनद दिली, व त्याअन्वयें स्थापन झालेल्या कंपनीचें नांव "दी आस्टंड ईस्ट इंडिया कंपनी" असें ठेवण्यांत आलें. या सनदेमुळें त्या कंपनीला व्यापार करण्याचा, सशस्त्र जहाजें तयार करण्याचा, किल्ले बांधण्याचा व हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांबरोबर तह करण्याचा अधि-कार मिळाला. परंतु आपल्या व्यापाराच्या बाबतींतील ह्या ढवळाढवळी-मुळें युरोपांतील इतर दर्यावर्दी राष्ट्रांना भीति उत्पन्न झाली. इंग्लंड, फ्रान्स आणि हालंड हे एक झाले. त्यांनीं ईस्ट इंडीजमध्यें ह्या कंपनीच्या स्थापनेबद्दल राजकीय रीत्या निषेध प्रदर्शित केला, सशस्त्र प्रतिकार करण्याची धमकीही दिली, आणि शेवटीं आस्ट्रियाचा बादशहा "आस्टंड कंपनी" कायमची मोडून तह करण्यास कबूल झाला. उलट पक्षीं फ्रेंच लोक हिंदुस्थानांत आपला पाय हळुहळु पुढें सरक-वीत व बळकट करीत चालले होते; कारण, युरोपमधील इ. सन. १७१३ मध्यें संपलेल्या नाशकारक लढायांमुळें फ्रेंच राष्ट्र जरी अतिशय खालावलें होतें, तरीही पुढील तीस वर्षांच्या शांततेच्या अवधींत त्यांचीं साधनें आणि धाडशी कृत्यांचा जोम यांना पुन्हां अंकुर फुटूं लागले होते.

ह्या वर लिहिलेल्या पुष्कळ दिवसांच्या शांततेच्या काळाच्या आरंभीं फ्रेंच लोकांना सट्टयाचें वेड लागलेलें होतें, व त्यामुळें त्यांची ईस्ट

इंडिया कंपनी अतिशय अडचणींत आलेली होती. तरीही फ्लेरी व वालपोल ह्या दोन्हीही शांतताप्रिय प्रधानांच्या कारकीर्दींत इंग्लिश खाडीच्या दोन्ही बाजूंला व्यापार आणि नौकानयन हीं बळावत चाललेलीं होतीं. इंडीजमध्यें आपण अतिशय व्यापक प्रमाणावर एक कंपनी स्थापन करावी, आणि तिला आफ्रिकेच्या किनाऱ्यावर आणि त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या व पासिफिक महासागराच्या किनाऱ्यावर व्यापाराचे कांहीं विशिष्ट हक्क द्यावे, ह्या विचारांत फ्रेंच लोक या वेळीं (इ. सन १७१९) मग्न झालेले होते. आणि या पहिल्यानेंच विशिष्ट हक्क व पूर्ण सत्ता मिळालेल्या कंपनीला प्रसिद्ध " ल्यांड ब्यांक " ह्या नांवाच्या पेढीच्या ताब्यांत ठेवून सर्व व्यापारी व सांपत्तिक बाबतींत सर्वांत वरिष्ठ कामगार ह्मणून लॉ ह्या नांवाच्या मनुष्यास नेमावयाचें, ही त्याच्या पुढची पायरी होती. ह्याचा अपरिहार्य परिणाम हा झाला कीं, भागीदारांची संख्या आणि कामाकाजाचें प्रमाण हीं वाजवीहून फाजील वाढलीं, आणि त्यामुळें ती जोरानें नष्टप्राय होऊन ढांसळून खालीं कोसळली. फ्रान्सनें सरकारी वटहुकूम सोडून कंपनीचें सर्व कर्ज दपटशाही करून निवारण केलें; पण तोंपर्यंत तिला आपल्या पायावर पुन्हां उभें राहतां आलें नाहीं. हें कर्ज निवारण झाल्यानंतर पुढें ती पुन्हां ईस्ट इंडियामधील व्यापारालाच चिकटून राहिली. हिंदुस्थानच्या समुद्रामध्यें आतां तिची स्थिति झपाट्यानें सुधारत चालली होती. इ. सन १७१५ मध्यें त्यांनीं मारीशस ह्या नांवाचें (डच लोकांनीं सोडलेलें) महत्त्वाचें बेट आपल्या ताब्यांत घेतलें, आणि हळुहळु इंग्लिश लोकांबरोबरच आग्नेयेकडे ह्मणजे कारोमांडल किनाऱ्यावर ते आपला पाय मजबूत करूं लागले. ह्याच किनाऱ्यावर पांडेचरी हें फ्रेंचांच्या सर्व वसाहतींच्या गव्हर्नर जनरलच्या राजधानीचें ठिकाण असून तें या वेळीं मोठें टुमदार शहर बनत चाललें होतें, व त्याची लोकवस्ती ७०,००० झाली होती. इ. सन १६७४मध्यें फ्रॉंकाईस मार्टिन ह्या नांवाच्या एका मनुष्यानें ही वसाहत स्थापन केली,

शहर वसविलें, आसपासच्या जमिनी मिळविल्या, आणि आपल्या पंचवीस वर्षांच्या कारकीर्दींत शहाणपणानें व धिमेपणानें पांडेचरी शहर इतक्या कायमच्या भरभराटीला आणून सोडलें कीं, कांहीं फ्रेंच लेखक, फ्रेंच लोकांच्या हिंदुस्थानांतील फ्रेंच वसाहतींचा पाया वास्तविक रीत्या यानेंच घातला, असें मानितात. इ. सन १७३९ ते १७४० पर्यंत कंपनीचें मुद्दल आणि नफा यांमध्यें बरीच वाढ झालेली दिसत होती. ते मसाल्याच्या बेटांत अगर मलायाच्या बेटसमुच्चयामध्यें कधींही स्थायिक झाल्याचें आढळण्यांत येत नाहीं. तरीही त्यांचीं हिंदुस्थानांत पांच मुख्य ठिकाणें असून ते चीन देशाशीं व्यापार करीत असत. प्रथमतः आलेल्या लॅनोअर आणि डयूमास ह्या दोघांही गव्हर्नरांनीं आपलें कामकाज दूरदर्शीपणानें आणि चातुर्यानें केलें; परंतु त्यांच्यामागून आलेला गव्हर्नर डुप्ले हा असाधारण बुद्धिवैभवाचा मनुष्य असून त्याच्या अंगांत उत्साह आणि महत्त्वाकांक्षा हीं पराकाष्टेचीं भरलेलीं होतीं. हुगळी नदीवरील चंद्रनगर येथील फ्रेंचांच्या वसाहतीचा तो मुख्य अधिकारी असतांना प्रसिद्धीस आलेला होता. त्यानंतर इ. सन १७४१ मध्यें ह्मणजे जेव्हां त्याला डयूमासच्या मागें पांडेचरी येथील वसाहतीवर गव्हर्नराच्या जागीं मुलकी आणि लष्करी पूर्ण अधिकार देऊन नेमण्यांत आलें, तेव्हां त्यानें आपल्या कंपनीचा हितसंबंध वाढविण्याकरितां योजलेले आपले धाडशी व अत्यंत महत्त्वाकांक्षी बेत हळुहळु पूर्णतेस नेण्याला लागलीच सुरवात केली.

याचा परिणाम असा झाला कीं, युट्रेच्टच्या तहानें युरोपांतील विशिष्ट राजकीय भानगडी मिटल्या गेल्या न गेल्या, तोंच फ्रान्स आणि इंग्लंड ह्या दोन्हीही राष्ट्रांनीं आपल्या इतर प्रतिस्पर्ध्यांना चढाओढीच्या क्षेत्रांत फार मागें टाकलें, अगर त्यांना कमकुवत केलें; आणि हिंदुस्थानांतील व्यापाराचें बक्षीस मिळविण्याकरितां भयंकर प्रतिस्पर्धी ह्मणून हीं दोन्ही राष्ट्रें

१ इ. सन १६८१ ते १७०६ परतु इ. सन १६९३ ते १६९७ पर्यंत हें ठिकाण डच लोकांच्या ताब्यांत होतें.

एकमेकांसमोर दंड ठोकून उभीं राहिलीं. अठराव्या शतकाच्या मध्याचे सुमारास पश्चिमेकडेसच फक्त नव्हे, तर पूर्वेकडेसही व्यापार आणि वसाहती यांसंबंधानें युरोपांतील अग्रेसर समुद्रतीरस्थ राष्ट्रांमधील चढाओढ कळसास जाऊन पोहोंचली होती. समुद्रावरील धाडशी कृत्यांच्या स्वरूपाची एक प्रचंड उधान भरती मोठ्या जोरानें नीट युरोपखंडाकडून थेट हिंदुस्थानच्या उघड्या पडलेल्या किनाऱ्याकडे येत होती; आणि तिच्या त्या एकसारख्या उंच उसळणाऱ्या लाटांनींच इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन बलाढ्य व परोत्कर्षा-सहिष्णु राष्ट्रांचीं जहाजें हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर येऊन धडकत होतीं. या वेळेचे पुष्कळच पूर्वीं म्हणजे इ. सन १७४० च्या सुमारास या दोन्ही राष्ट्रांमध्यें लढाई जुंपली नव्हती, तरी ती लवकरच जुंपेल असा रंग दिसत होता, आणि फ्रेंच सरकारचे मनांत ईस्ट इंडीजमधील इंग्लिश वखारींचा नाश करण्याचे लाबूर्डोने यानें केलेले बेत घोळत होते. त्यानंतर थोड्याच वर्षांनीं इंग्लिशांना कारोमांडल किनाऱ्यावरून हांकलून देण्याच्या डुप्ले याच्या प्रचंड कल्पनेस पूर्ण पाठबळ देण्यांत आलें. याच वेळीं फ्रेंच लोकांची उत्तर अमेरिकेंत बरीच प्रगति झालेली असून शिवाय समुद्रकिनाऱ्यावर इंग्लिश वसाहतींचे मागचे बाजूस हल्लीं "हिंटरल्यॉंड" ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला प्रांत बळकविण्याकरितां ओहिओ नदीच्या बाजूनें जोरानें खालीं उतरण्याचा त्यांचा विचार बहुतेक कायम झाल्यासारखाच होता. या कारणामुळें या शतकाच्या मध्याच्या सुमारास अमेरिका आणि आशिया यांमधील फ्रान्सची राष्ट्रीय स्थिति निःसंशयच सुधारलेली असून भावि आशेचीं सुचिन्हेंही वाढलीं होतीं, यांत बिलकुल संदेह नाहीं. युरोपमधील राष्ट्राराष्ट्रांच्या परस्परविरुद्ध राजकीय नफानुकसानीच्या बाबतींमुळें सुरू झालेलीं भांडणें वाढत्या प्रमाणावर होतीं, आणि त्या आगींत समुद्रापली-कडील व्यापार व वसाहतीविषयक भांडणें ह्या तेलाची भर पडलेली होती. वसाहतीविषयक भांडणांचें पर्यवसान उत्तर अमेरिकेंत लढाई होण्यामध्यें झालें, हें आपणास माहीत आहेच. शिवाय आतां त्या काळीं जगांतील

समुद्रावरील अत्यंत महत्त्वाचा व्यापार आपल्या हातीं मिळविण्याकरितां हीं दोन्ही राष्ट्रें हिंदुस्थानच्या रणक्षेत्रावर दंड थोपटून सामन्याला उभीं राहिलीं होतीं. ह्याच वेळेपासून पुढें युरोपियन राष्ट्रांची राजकीय चढाओढ व अतिशय वाढतें वर्चस्व हींच त्यांच्या आशियांतील राजकारणाचीं वास्तविक रीत्या मुख्य तत्त्वें झालीं. हींच तत्त्वें परिस्थिति बदलण्यास कारणीभूत झालेलीं आहेत, व पुढेंही तीं तशीच बदलत जाण्यास कारणीभूत होतील, असाच पुष्कळ संभव आहे.

व्यापारासंबंधानें चुरशीचीं पण तडजोडीचीं भांडणें सुरू झालीं होतीं; हिंदुस्थानामध्यें प्रत्येक राष्ट्रानें खंबीर व सर्वतोपरी सज्ज असलेली एक एक कंपनी आपल्या तर्फे प्रतिनिधि म्हणून पाठविलेली होती; ह्या कंपन्या वखारी बांधीत, अडती स्थापन करीत, आपल्या व्यापारालाच फक्त चिकटून असत, आणि ज्या राज्याच्या अगर प्रदेशाच्या हद्दींत त्या स्थायिक झालेल्या होत्या, त्यांतील अंतःस्थ राज्यव्यवस्थेमध्यें त्या फारच थोडा संबंध ठेवीत. परंतु ह्या दोन्ही कंपन्यांची युरोपमधील परिस्थिति आणि घटना यांवरून त्या दोन राष्ट्रांची राजकीय परिस्थिति व राष्ट्रीय शील यांमधील असलेला फरक पूर्णपणें निदर्शनास येत होता. त्या वेळीं फ्रेंच व इंग्लिश कंपन्यांचे आपापल्या सरकाराबरोबरील सांपत्तिक व्यवहार कशा प्रकारचे होते, याचें मनन करणें, आणि या तुलनेवरून परिस्थिति, पद्धति आणि राजकीय कारभाराचीं तत्त्वें, यांमध्यें दिसून येत असलेला परस्परविरुद्ध महत्त्वाचा फरक लक्षांत घेणें अत्यंत बोधप्रद आहे. फ्रान्समधील ईस्ट इंडिया कंपनीचा तेथील सरकाराशीं अगदीं निकट संबंध होता; तिला वाटतील ते विशिष्ट हक्क सहज मिळत होते; सरकारी गंगाजळींतून इनामें व सांपत्तिक मदत मिळत असे; ती व्याजबट्ट्याचा आणि सोडतीचा धंदा करीत असे; व नेहमीं सरकारच्या कर्जांत बुडालेली असल्यामुळें निव्वळ राजाश्रयावरच शेवटीं तिला जीव धरून रहावें लागत असे. इ. सन १७२३ पासून तिच्या व्यवस्थापकांची नेमणूक राजाकडून होत असे.

हे अधिकारी कंपनीच्या व्यवस्थेवर नेहमीं अतिशय कडक दाब ठेवीत; आणि तोही इतका कीं, सरकाराकडून अंतर्व्यवस्थेंत झालेली ढवळाढवळ हेंच आमच्यावरील सर्व आपत्तींचें कारण आहे, असें कंपनीनें त्यानंतर मागाहून उघड उघड बोलूनही दाखविलें होतें. इ. सन १७४७ पासून ही कंपनी नेहमीं आपले विशिष्ट हक्क किंवा उत्पन्नाच्या इतर बाबी तारण म्हणून गहाण ठेवून कर्ज काढीत असे, आणि अशा रीतीनें उभारलेल्या पैशांतून ठेवीचें व्याज देण्यांत येत असून कृत्रिम रीतीनें भांडवलाची रक्कम दाखविली जात असे. एखाद्या कर्तृत्ववान राजमंत्र्यानें कंपनीच्या हिंदुस्थानांतील कारभाराकडे जर विशेष बारिक रीतीनें लक्ष पुरविलें असतें, तर त्याला एखाद्या खाजगी व्यापारी मंडळीपेक्षां अधिक नेटानें व चिकाटीनें एकच योग्य व विशिष्ट ध्येय पुढें ठेवून कंपनीचा कारभार अधिक उच्च राजकीय तत्त्वावर पुष्कळ अंशीं चालवितां आला असता; परंतु पंधराव्या लुईच्या कारकीर्दींत राजसत्ता नालायक लोकांच्या हातांत गेल्यामुळें राज्यांत नाना प्रकारचे घोटाळे माजून गेले, व त्याच्या अंगच्या दुर्गुणामुळें अनेक तऱ्हेचे अनर्थही ओढवले. ह्या कारणामुळें राज्यास जसजशी उतरती कळा लागूं लागली, तसतशी सरकारी अधिकाऱ्यांकडून मिळणारी मदत हीच हळुहळू कंपनीच्या नाशास कारणीभूत झाली. उलट पक्षीं इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें सरकारापासून कर्ज तर घेतलें नव्हतेंच, पण सरकारी खजिन्यांत कर्ज व देणग्या म्हणून तिनें मोठमोठ्या रकमा भरलेल्या होत्या; आणि त्या रकमेचा आंकडा इ. सन १७५० मध्यें ४२,००,००० पौंड (६,३०,००,००० रुपये) पर्यंत फुगला होता. ही कंपनी ह्मणजे एक स्वतंत्र व विशिष्ट कर्तृत्ववान असें एक मंडळ होतें. सरकाराबरोबर व्यवहार करतांना अधिकाऱ्यांच्या कृपाकटाक्षावर त्यांचा भरंवसा नसून पार्लमेंटमधील त्यांच्या वजनावर ते अवलंबून असत; आणि त्यांना स्वतःचें कामकाज स्वतंत्र रीतीनें चालविण्याची परवानगी असल्यामुळें तिच्या मुख्य मुख्य अधिकाऱ्यांवर मोठमोठीं जबाबदारीचीं कामें येऊन पडत; त्यामुळें

या सर्वांचा शेवटीं असा परिणाम झाला कीं, त्यांचें एक लायक व अनुभव-शीर असें व्यवस्थापक मंडळ तयार झालें. या मंडळाला मोठ्या व्यापारी वर्गाकडून लागेल तितक्या भांडवलाचा पुरवठा होत असे; परदेशांतील व्यापाराची पूर्ण माहिती असे; आणि पूर्वानुभवाची परंपरा पुढील कारभार चालविण्यास मार्गदर्शकही होत असे.

हिंदुस्थानामध्यें ह्या दोन कंपन्यांचीं साधनें आणि भांडवल हीं आरंभीं अगदीं सारख्या प्रमाणावर होतीं. कारोमांडल किनाऱ्यावरील वसाहती ह्या हिंदुस्थानांतील अंतर्गत व्यापार बाहेर खेंचण्याचीं मुख्य ठिकाणें ह्मणूनच फक्त महत्त्वाच्या नव्हत्या, तर बंगालच्या उपसागरामधील दोन्ही बाजूंच्या सर्वसाधारण व्यापाराच्याही त्या मौल्यवान उतारपेठा होत्या. शिवाय मलाकाची सामुद्रधुनी व पूर्व आशिया यांच्याशीं असलेल्या भर-भराटीच्या व्यापाराच्या संरक्षणाकरितां लागणाऱ्या आरमाराचींही हींच मुख्य ठाणीं होतीं. सिलोन हें त्या वेळीं डच लोकांच्या ताब्यांत होतें. मोंगली राष्ट्राच्या मुळाशींच लागलेल्या किडीचे परिणाम बादशाहतीच्या सरहद्दीवर लवकरच भासूं लागले होते, आणि दूरच्या प्रदेशांत अंदाधुंदी-माजून ते विलग होण्यास सुरवात झालेली होती. हिंदुस्थानच्या दक्षिणे-कडील प्रदेशांत असलेल्या दूरवरच्या वसाहती बंगालमधील वखारींपेक्षां बादशाही सत्तेखालून हळूहळू अधिक स्वतंत्र होत चालल्या होत्या. ह्या बंगालमधील वखारी हुगळी नदीच्या खाडीच्या अगदीं वरपर्यंत होत्या; त्यांच्या संरक्षणाकरितां बांधलेले किल्ले हे खालीं समुद्राकडच्या बाजूस होते; आणि तो प्रदेशही अजून परिणामावह अशाच अमलाखालीं पूर्णपणें राहिलेला होता. हिंदुस्थानच्या पश्चिम बाजूला मराठे लोकांच्या ताब्यांत समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशापैकीं बहुतेक बराच प्रदेश होता, व या वेळीं परदेशीय व्यापारी लोकांना आपल्या कह्यांत ठेवण्यास ते पूर्णपणें समर्थ होते. परंतु आग्नेय दिशेकडे ह्मणजे कारोमांडल किनाऱ्यावर मद्रास आणि पांडेचरी हीं सर्व जहाजांना येण्याजाण्याला मोकळीं असलेलीं मुख्य ठाणीं

अनुक्रमें इंग्लिश व फ्रेंच यांच्या ताब्यांत होतीं; आणि त्या ठिकाणीं तटबंदी केलेली असून साधारण दारूगोळाही तयार ठेविलेला होता. हीं दोन्हीही ठाणीं कर्नाटकच्या नबाबाच्या हद्दींत होतीं. त्या वेळीं कर्नाटक हें एका मोठ्या प्रांताचें नांव असून तो प्रांत दक्षिणेकडील ह्मणजे दक्षिण हिंदुस्थानच्या सुभेदारी अमलाखालीं होता. ह्या दक्षिणेच्या सुभेदारीवर मोंगल बादशहानें आसफजहा ह्या नांवाच्या एका मनुष्याला निझाम उल्मुल्ख हा किताब देऊन नेमिलेलें होतें. परंतु तो पुढें लवकरच इतका प्रबळ झाला कीं, त्यामुळें खुद्द बादशाही दरबारांत त्याच्याविषयीं मत्सर व भीति उत्पन्न झाली. निझाम उल्मुल्ख यास दिल्ली येथें परत बोलावण्यांत आलें; पण आपणास सुभेदारीवरून काढून टाकण्याचा प्रयत्न चालू आहे, असें त्यास कळतांच तो आपल्या सैन्यासह पुन्हां दक्षिणेंत परत आला; आपल्या जागीं पाठविलेल्या अधिकाऱ्याचा त्यानें पराभव केला; आणि दक्षिणेंत बादशाही अमलाखालील एक बलिष्ट मांडलिक ह्मणून त्यानें आपला अधिकार स्थापन केला. पुढें थोडयाच वर्षांनंतर नादीरशहाच्या स्वारीमुळें उत्तर हिंदुस्थानांत जी अव्यवस्था झाली होती, तिचा फायदा घेऊन कर्नाटकांत व नर्मदेच्या दक्षिणेकडील आपल्या ताब्यांतील मोठमोठ्या प्रांतांत त्यानें आपलें पूर्ण स्वामित्व प्रस्थापित केलें; ह्मणजे वास्तविक रीत्या पूर्ण स्वतंत्र, पण औपचारिक रीत्या बादशहाचें मांडलिक सरकार, अशा धर्तीवर त्यानें आपलें वंशपरंपरेचें राज्य स्थापन केलें.

कर्नाटक हा प्रांत एका नबाबाच्या ताब्यांत असून तो दक्षिणेच्या सुभेदाराचा मांडलिक होता. तेथील राजगादी सादतउल्ला ह्या नांवाच्या एका मनुष्यानें स्थापन केलेली होती; परंतु त्याच्या मृत्यूनंतर गादीवर बसण्यासंबंधानें तंटे सुरू झाले, व चोहोंकडे अतिशय बेबंदशाही माजली. ही बेबंदशाही निजामानें तात्पुरती दाबून टाकिली; तरीही त्यामुळें फ्रेंच व इंग्लिश यांच्या वसाहतींसभोंवतालच्या मुलखांतील स्थानिक सरकारची सत्ता साहजिकपणेंच कमजोर झाली. इ. सन १७४९ मध्यें युरोपांत इंग्लंड

व फ्रान्स या उभय राष्ट्रांमध्यें लढाई सुरू झाल्याची बातमी हिंदुस्थानांत येऊन पोंचल्याबरोबर इंग्लिश व फ्रेंच हे आपसांत हातघाईवर आले, तेही याच ठिकाणीं होय. अशा रीतीनें सुरू झालेली हातघाई ही हिंदुस्थानच्या भूमीवर पुढें राहून राहून सतत अठरा वर्षेपर्यंत एकसारख्या चालत असलेल्या राष्ट्रीय द्वंद्वयुद्धाची पहिली चकमक असून या युद्धाचा शेवट अखेरीस एका प्रतिस्पर्ध्याला—ह्मणजे फ्रान्सला—निःशस्त्र करून रणांगणांतून हांकलून देण्यांत झालेला आहे.

इ. सन १७४१ मध्यें डुप्ले हा फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानांतील कामकाजाचा मुख्य व्यवस्थापक म्हणून नेमला गेला. ज्या अधिकारावर आतां त्याची नेमणूक झाली होती, त्या जागीं पूर्वीं काम केलेले दोन्हीही पुरुष नेकीचे असून कर्तृत्ववान होते, आणि एतद्देशीय राजेरजवाड्यांबरोबरील त्यांची वागणूकही विशेष हिकमतीची आणि सारासार विचाराची होती. माही व कारीकल हीं ठाणीं त्यांनीं फ्रान्सला शांतपणानें मिळवून दिलीं होतीं; आणि इ. सन १७४० मध्यें मराठ्यांच्या स्वारीमुळें ज्या वेळीं सर्व कर्नाटकामध्यें अव्यवस्था उत्पन्न झाली, त्या वेळीं मुसलमान राजेरजवाड्यांनीं आपल्या मुलामाणसांचें आणि जडजवाहिराचें संरक्षण करण्याकरितां पांडेचरी येथें फ्रेंचांच्या वसाहतीचा आश्रय घेतला होता. परंतु जात्याच चळवळ्या व महत्त्वाकांक्षी स्वभावाचा डुप्ले हा स्थानापन्न होईपर्यंत फ्रेंच लोकांचे बेत आणि उद्दिष्ट हेतु आपल्या व्यापाराचें संरक्षण आणि वाढ करण्यापलीकडे गेलेले नव्हते. फ्रेंच लोकांच्या प्रकृतीला व्यापारापेक्षां विजयच अधिक मानवतो, असें तो उघड उघड ह्मणूं लागला, आणि त्यानेंच आपल्या कंपनीला धाडशी कृत्यांच्या व्यापक क्षेत्रामध्यें ओढून आणलें. युरोपांत इंग्लिशांशीं फ्रान्सची लढाई जुंपलीच, तर हिंदुस्थानांतही ह्या दोन कंपन्यांच्या वाढत्या प्रतिस्पर्धेमुळें धुमसत असलेला वैरभाव एकदम पेट घेईल, अशी त्यानें पूर्वींच अटकळ बांधून ठेविली होती. हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या राजकारणाच्या घडामोडींत आपल्या

कंपनीचें महत्त्व वाढविण्याचा मार्ग तयार करण्याचा त्याचा हेतु होता. त्या धोरणानें तो आसपासच्या राजेरजवाड्यांशीं तह वगैरेचीं बोलणीं करूं लागला; बादशाही सनदेच्या आधारें मिळालेले किताब धारण करूं लागला; हिंदुस्थानांतील अमीरउमरावांप्रमाणें दुसऱ्यावर छाप पाडण्यासारखा डामडौल व भपका करून आपलें अवडंबर माजविण्यास त्यानें सुरवात केली; समुद्राच्या बाजूनें होणाऱ्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्याकरितां त्यानें आपल्या लष्करी ठाण्यांची सुधारणा केली; व पांडेचरी येथें मजबुत तटबंदी करण्याकरितां त्यानें जिवापाड परिश्रम घेतले. पारीस येथील कंपनीच्या व्यवस्थापकांकडून " तुह्मी स्वसंरक्षणाकरितां होत असलेल्या कामासंबंधींचा खर्च कमी करून कंपनीचें कर्ज फेडावें, आणि आपल्या व्यापाराकडेच लक्ष ठेवावें, " असा त्यास हुकूम आला; तथापि तो आपल्या हातीं घेतलेल्या कार्यापासून यत्किंचित् सुद्धां पराङ्मुख झाला नाहीं.

इ. सन १७४४ मध्यें युरोपांत लढाई जाहीर करण्यांत आली, आणि त्याचा फायदा घेऊन दक्षिण आशियामध्यें फ्रान्स अगर इंग्लंड यांपैकीं कोणी एक मोठें विस्तृत राष्ट्र संपादन करावयाचें, या प्रश्नाचा निर्णय लावणाऱ्या युद्धरूपी नाटकाच्या पहिल्या अंकाच्या नांदीस हिंदुस्थानच्या रणक्षेत्रावर सुरवात झाली. आपणाला हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, कांहीं लेखक लिहितात त्याप्रमाणें, कारोमांडल किनाऱ्यावर सुरू असलेल्या बारिक सारिक चकमकींवर अगर पूर्वेकडील राजेरजवाड्यांशीं एकमेकांविरुद्ध केलेले स्नेहसंबंध आणि खलबतें यांतील जयापजयावर ह्या युद्धाचा निर्णयात्मक निकाल अवलंबून नव्हता; तर तो सर्व समुद्रावर वर्चस्व मिळविण्याकरितां इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन राष्ट्रांची जी धडपड चालली होती, तिच्या परिणामावरच वास्तविक रीत्या लागणारा होता. अशा रीतीनें आशियांतील सर्व व्यापाररूपी एका मोठ्या इमारतीचा पाया हिंदुस्थानच्या मुख्य भूमीवर बसविला गेला, आणि त्या ठिकाणींच फक्त त्याला भक्कम आधार मिळण्यासारखा होता. ह्या व्यापाराचा सुरक्षितपणा आरमारी सत्तेवर

अवलंबून होता, त्यामुळें ती सत्ताही व्यापाराच्या वाढीबरोबरच खात्रीनें वृद्धि पावणारी होती. पुढील पन्नास वर्षांत युरोपस्थ राष्ट्रांराष्ट्रांमधील एक जंगी युद्धरूपी नाटक रंगभूमीवर आलें. त्यांत नाना तऱ्हेचे देखावे आणि निरनिराळ्या प्रकारचीं पात्रें होतीं; आणि हिंदुस्थानांतील भांडण हें जरी त्यांतील एक निव्वळ उपाख्यान होतें, तरीही तें मनोरंजक व बोधप्रद असून ज्या कारणांनीं आणि प्रसंगांनीं हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या वर्चस्वाचा मार्ग मोकळा झाला, व जीं त्यांच्या यशाला मूळ कारणीभूत झालीं, त्या सर्वांचें यथायोग्य ज्ञान करून घेण्यालाही तेंच उपाख्यान अत्यंत महत्त्वाचें आहे.

भाग पांचवा.

हिंदुस्थानांतील फ्रेंचांची डुप्ले याच्या अमला-खालील कारकीर्द.

परिच्छेद पहिला—फ्रान्स व इंग्लंड यांचेमधील लढाई.

इ. सन १७३९ मध्यें इंग्लंड आणि स्पेन यांची व्यापार व समुद्रावरील वर्चस्व या बाबतींतील भांडणामुळें लढाई सुरू झाली, आणि तिजमध्यें आतां फ्रान्सही इंग्लंडविरुद्ध उघड उघड ओढलें जाऊन हळुहळु त्यांचा वैरभावही वाढत चालला. परंतु इंग्लिशांचें आरमार अधिक मोठें व पुष्कळच बळकट होतें, त्यामुळें या दोन राष्ट्रांमधील कलहाचा असा परिणाम झाला कीं, समुद्रापलीकडील आपलीं ठाणीं आणि त्यांतील हितसंबंध हीं पूर्णपणें ताब्यांत ठेवणें, दळणवळणाचे मार्ग सुरक्षित नसल्यानें, फ्रान्सला मोठें धोक्याचें झालें होतें. अमेरिका आणि वेस्ट इंडीज यांमध्यें फ्रान्सचें वसाहतीचें राज्य इंग्लंडपेक्षां पुष्कळच अधिक मोठें होतें; परंतु हिंदुस्थानामध्यें उभयतांचें बळ व वसाहती यांच्या प्रमाणांत फारसा फरक नव्हता. तथापि मादागास्करच्या किनाऱ्यावरील एक ठाणें, आणि बोर्बोन व मारीशस हीं लांबीच्या पल्ल्यावर असलीं तरीही बरींच महत्त्वाचीं व लढाईच्या प्रसंगीं हालचाली सुरू करण्या योग्य अशीं बेटें फ्रेंचांच्या ताब्यांत होतीं; आणि ही गोष्ट त्यांना बरीच फायदेशीर झालेली होती.

इ. सन १७४० पासून लाबूर्डोने हा मारीशस येथें गव्हर्नर असून तो आपलें आरमारी साहित्य जमा करीत होता, व फ्रेंच सरकारच्या मदतीनें व अनुमोदनानें इंग्लिश व्यापाऱ्यांच्या जहाजांवर तुटून पडण्याची अगर हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या वसाहतींवर हल्ला करण्याची तयारी करीत होता. तथापि इ. सन १७४३ मध्यें फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवस्था-

पकांची, ईस्ट इंडीजमधील कोणत्याही भानगडीपासून अलिप्त रहावें, अशी उत्कट इच्छा असल्यानें त्यांनीं तशा आशयाचा हुकूम मिळविला होता. त्यामुळें लाबुर्डोनेयाला स्वस्थ बसावें लागलें होतें. इ. सन १७४४ मध्यें प्रत्यक्ष लढाई जाहीर झाली, तेव्हां त्याला हल्ला करण्याचा हुकूम मिळाला होता, तरी इ. सन १७४६ पर्यंत त्याची तशी तयारी झाली नव्हती. नंतर त्याच वर्षीं त्यानें आपलें आरमार मादागास्कर येथें जमा केलें, आणि जूनमध्यें तो कारोमांडल किनाऱ्यावर जाण्याकरितां निघाला. मध्यंतरीं इंग्लंडमधून पाठविलेली एक आरमाराची तुकडी पांडेचरीपासून कांहीं अंतरावर इ. सन १७४५ मध्यें आली. त्या वेळीं पांडेचरी येथील शिबंदी कमजोर आणि तटबंदी अपुरी होती. त्यामुळें डुप्ले यानें आपणाला तयारी करण्याला वेळ मिळावा ह्मणून कर्नाटकच्या नबाबाचें मन वळविलें, व त्याजकडून, आमच्या प्रदेशाच्या हद्दींत कोणासही लढाई करण्याची मनाई आहे, असा हुकूम काढवून मध्यें अडथळा उत्पन्न केला. या मनाई हुकमाला मान देऊन मद्रास येथील अधिकाऱ्यांनीं इंग्लिश जहाजांच्या तुकडीवरील अधिपतीचें मन वळवून होणारा हल्ला तहकूब करविला. तुफानाचे दिवस असल्यामुळें त्या आरमाराला किनारा सोडणें भाग झालें; परंतु त्यानंतर पुढील वर्षीं इंग्लिशांचें आरमार पुन्हां परत कारोमांडल किनाऱ्यावर आलें, तेव्हां त्याची आणि मारीशसकडून येत असलेल्या फ्रेंच आरमाराच्या तुकडीची रस्त्यांतच गांठ पडली. त्यामुळें या वेळीं इंग्लिश कंपनीनें आपल्या वतीनें कर्नाटकच्या नबाबाकडे या बाबतींत योग्य तजवीज करण्याबद्दल विनंति केली; परंतु कंपनीला असें आढळून आलें कीं, तो ह्या बाबतींत उदासीन असून त्याला योग्य प्रकारें लाचलुचपत मिळाली नाहीं, त्याची स्वतःचीच स्थिति असुरक्षित झालेली आहे, आणि या दोन परस्परवैरी आरमारांना समुद्रकिनाऱ्यावरील एकमेकांच्या वसाहतीवर कुलपी गोळ्यांचा भडिमार करण्याविषयीं अगर लढाई करण्याविषयीं मनाई हुकूम काढणें कांहींही झालें तरी त्याला शक्य नाहीं. एक अनिर्णयात्मक

आरमारी चकमक झडून इंग्लिश जहाजें सिलोन येथें परत गेलीं. त्यानंतर लाबूर्डोने यानें मद्रासच्या किनाऱ्यावर आपले दोन हजार लोक उतरविले, मद्रास शहराला जमीन व समुद्र या दोन्ही बाजूंनीं वेढा घातला, आणि तें शहर इंग्लिशांनीं खंडणी दिल्यानंतर परत देण्याच्या अटीवर हस्तगत करून घेतलें[1]. परंतु ह्या झालेल्या तडजोडीचा डुप्ले यानें जोरानें निषेध केला. त्यानें उघड उघड असें पाहिलें कीं, हिंदुस्थानांत फ्रेंचांचें राष्ट्र भक्कम पायावर उभारलें जाण्याला रस्त्यांत असलेला इंग्लिशांचा कांटा पार उखडून टाकिला पाहिजे. ह्मणून मद्रासची तटबंदी पाडून जमिनदोस्त करावी, असा त्यानें आग्रह धरिला. कर्नाटकच्या नबाबानेंही आपल्या तर्फे आपल्या राज्याच्या हद्दींत ही खाजगी लढाई सुरू केल्याबद्दल अतिशय संताप व्यक्त केला; तें शहर आपल्या ताब्यांत द्यावें, अशी त्यानें हक्कानें मागणी केली; आणि तिला कबूल होऊन डुप्ले यानें तसें करण्याचें वचनही दिलें. ह्या प्रश्नाच्या बाबतींत डुप्ले व लाबूर्डोने यांचेमध्यें चांगलाच कडाक्याचा वादविवाद झाला. त्यानंतर लाबुर्डोने हा भयंकर तुफानाच्या योगानें आपल्या आरमाचा बराच धुव्वा उडाल्यामुळें बाकी राहिलेल्या जहाजांसह मारीशस येथें परत गेला. त्यानें परत जाण्याच्या वेळीं इंग्लिशांनीं खंडणी दिल्यास मद्रास शहर त्यांना तीन महिन्यांच्या आंत परत करावें असा करार केला, आणि तें शहर तात्पुरतें फ्रेंचांच्या ताब्याखालीं ठेवून घेतलें.

दुसरी घडून आलेली गोष्टही महत्त्वाचीच होती. डुप्लेजवळ ह्या वेळीं तीन हजार फ्रेंच सैन्य होतें; त्याला त्याच्या फ्रान्समधील सरकारानें एक गुप्त खलिता पाठवून, कांहीं झालें तरी मद्रास शहर परत देऊं नये, असा सक्त हुकूम दिलेला होता, आणि तें आपल्या तावडींतून निसटून नबाब अगर इंग्लिश कंपनी यांपैकीं कोणालाही मिळावें, असा त्याचा स्वतःचाही बिलकुल इरादा नव्हता. ह्मणून जेव्हां नबाबानें त्या शहराला वेढा दिला, तेव्हां तेथील एतद्देशीय सैन्याला डुप्ले यानें पूर्णपणें पिटाळून लाविलें,

[1] इ. सन १७४६ सप्टेंबर.

आणि त्यामुळें फ्रेंच लोकांच्या लढवय्येपणाची ख्याति या एका खटक्यानेंच कर्नाटकमध्यें पुष्कळशी प्रस्थापित झाली. युरोपांतील लष्करी शिक्षण देऊन कायमचें नोकरींत ठेविलेलें शिस्तीचें सैन्य आणि हिंदुस्थानांतील अव्यवस्थित बाजारबुणग्यांचें सैन्य यांच्यामधील ही अगदीं पहिलीच झटापट होय. ह्या झटापटींत नबाबाच्या सैन्याचा सहजगत्या आणि क्षणार्धांत पूर्णपणें पराजय झाला. त्यामुळें युरोपियन शस्त्रास्त्रें आणि शिस्त यांची लढाईच्या कामीं असलेली अत्यंत उपयुक्तता तत्काळ सिद्ध झाली, आणि डुप्ले यानें ह्या फायद्याचा शक्य तितका व धीटपणानें पूर्ण उपयोगही करून घेतला. त्यानें इंग्लिशांबरोबर झालेला करार रद्द आहे असें जाहीर केलें; कंपनीची सर्व मालमिळकत जप्त केली; मद्रास येथील गव्हर्नर व त्याच्या हाताखालील अधिकारी यांना पांडेचरी येथें कैद करून नेऊन या मिळालेल्या यशाबद्दल जी मिरवणूक काढली, तींत हे लोक कैदी ह्मणून ओळखतां येतील, अशा रीतीनें तिजबरोबर चालवीत नेले; आणि पांडेचरीच्या दक्षिणेस अजमासें बारा मैलांवर इंग्लिशांच्या ताब्यांत अद्यापपर्यंत असलेल्या फक्त एकट्याच तटबंदीच्या फोर्ट सेंट डेव्हिड या नांवाच्या किल्ल्यावर एक मोठें सैन्य पाठविलें. परंतु डुप्ले यानें पाठविलेलें हें सैन्य कुच करीत असतांनाच त्याच्यावर इंग्लिश सैन्यानें छापा घातला, आणि त्यामुळें फ्रेंचांच्या ह्या मोहिमेला इतका जोराचा आळा बसला कीं, त्यानंतर तें सैन्य त्या किल्ल्याच्या आसपास आळशासारखें विसावा घेत राहून त्या किल्ल्याला वेढा घालण्याला मुळींच समर्थ झालें नाहीं. मध्यंतरीं जेव्हां इंग्लिशांची एक तुकडी सैन्यसामग्रीसह सिलोन येथून परत येत होती, तेव्हां डुप्ले यानें मार्गांत असलेलीं आपलीं चार जहाजें पश्चिम किनाऱ्यावर पाठवून दिलीं, त्यामुळें आतां इंग्लिश जहाजांना पूर्वेकडील समुद्रांत कांहींही प्रतिबंध राहिला नव्हता. इ. सन १७४७ मध्यें फ्रेंचांचा सेनापति पॅरडीस हा फोर्ट सेंट डेव्हिडच्या किल्ल्यावर चाल करून जाण्याच्या विचारांत होता, तेव्हां इंग्लिशांच्या सैन्याची एक तुकडी दिसल्यामुळें

त्याला तेथेंच थबकावें लागलें. ह्या इंग्लिश तुकडीनें किल्ल्यामध्यें सामान व सैन्य हीं पोंचविलीं, आणि पांडेचरीचें संरक्षण करण्याकरितां त्याला परत जाणें भाग पाडलें. ह्याच वेळेपासून फ्रेंचांचे ग्रह पालटण्यास सुरवात झाली. एकदम हल्ला करून तडकाफडकी कडलूर घेण्याचा फ्रेंचांनीं प्रयत्न केला, पण त्यांत लॉरेन्स यानें त्यांना युक्तीनें फसवून तोंडघशीं पाडलें; नुकसानींत आणून मागें पिटाळून लाविलें; आणि ॲडमिरल बोस्कवेन त्यानें एक भयंकर आरमार व पंधराशें लढवय्ये लोक यांसह येऊन इ. सन १७४८ मध्यें समुद्र व जमीन ह्या दोन्हीही बाजूंनीं पांडेचरीस वेढा दिला. परंतु फोर्ट सेंट डेव्हिड घेण्याचा फ्रेंचांचा प्रयत्न जसा निष्फळ झाला, तशीच या वेळीं पांडेचरी सर करण्याची इंग्लिशांची खटपटही निरर्थक झाली. कारण, इंग्लिश लोकांनीं घातलेला वेढा इतका अव्यवस्थित होता, आणि फ्रेंच लोक तेथील किल्ल्याच्या संरक्षणाकरितां इतक्या शौर्यानें लढले कीं, सरते शेवटीं इंग्लिशांचा पुष्कळसा नाश होऊन त्यांना मागें हटावें लागलें.

इ. सन १७४९ मध्यें ए-ला-शापेल्ल येथें तह झाला, आणि त्या तहाच्या बातमीमुळें हिंदुस्थानांतील ह्या उभय कंपन्यांमधील युद्धकलह बंद पडून उत्तर अमेरिकेमधील ल्युईसबर्ग हें फ्रेंचांना परत देण्यांत आलें, व त्याच्या ऐवजीं मद्रास हें इंग्लिशांनीं परत मिळविलें. समुद्रकिनाऱ्यावरील अरुंद पट्टीवर जवळ जवळ असलेल्या ह्या दोन कंपन्यांचा जो चुरशीचा सामना उडाला, त्याचा मुख्य परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानांत फ्रेंचांचें वर्चस्व अतिशय वाढलें, आणि ज्या एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या हितसंबंधाची बाजू आपण घ्यावी, असें डुप्ले यास वाटेल, त्या राजेरजवाड्यांना—प्रतिकार करण्याला कठिण अशी मदत ह्मणून—आपलें सैन्य उपयोगांत आणण्याला देण्याच्या त्याच्या बेतांना पूर्ण प्रोत्साहन मिळालें. सर्व कर्नाटकभर जी राज्यासंबंधीं आपसांत नुकतीच सुरू झालेली लढाई फैलावत चाललेली होती, तिच्या प्रवर्तकांपैकीं एकाबरोबर त्याचा पत्र-

व्यवहार जारीनें सुरू होता; ज्या शिस्तीच्या सैन्याची किंमत आतां पूर्णपणें प्रस्थापित झालेली होती, तें आपलें शिस्तीचें सैन्य नेहमीं तयारींत ठेवण्याची त्यानें पूर्ण खबरदारी घेतली होती; आसपासच्या संस्थानिकांवर आपला दाब बसविला होता; इंग्लिशांचें वजन कमी केलें होतें; आणि स्वतःच्या अंगीं असलेलें धाडस व राजकारणांतील कुशाग्रबुद्धि यांचा उपयोग करून हिंदुस्थानांत फ्रेंच राष्ट्र स्थापन करण्याचा एक धोपट मार्गही त्यानें रेखाटून काढला आहे, असें दिसत होतें.

कारोमांडल किनाऱ्यावरील वस्तुस्थिति आणि परिस्थिति यांच्याकडेच लक्ष देऊन विचार केला, तर डुप्ले यानें तेथील परिस्थितीविषयीं बांधलेलें धोरण बरोबर होतें, असें ह्मणतां येईल. सुसंधि प्राप्त झालेली होती. आणि तिचा फायदा करून घेण्याचा बरोबर मार्गही त्यानें अगोदरपासूनच योजून ठेविला होता. दक्षिणेकडील सर्व प्रांतांवरील मोंगल राष्ट्राची सत्ता पूर्णपणें नष्ट झालेली होती; त्या सर्व प्रदेशभर आपआपसांत तंटे बखेडे माजलेले होते; त्यामुळें तो सर्व प्रदेश गांजला गेलेला होता; मराठे लोक सर्व मुसलमानी राज्यांत नासधूस व जाळपोळ करीत फिरत होते; आणि अशा उद्योगानें ते जणूं काय परकीय सत्तेच्या स्थापनेला एक प्रकारें मार्गच तयार करून ठेवीत होते. मराठ्यांनीं सर्व देशभर लूटफाट आरंभिली होती, आणि सर्व देश पिळूनही काढला होता. दक्षिणेंतील एतद्देशीय सैन्य भाडोत्री लोकांच्या जमावाप्रमाणें अव्यवस्थित होतें; त्यांच्या जवळची शस्त्रसामग्री तुटपुंजी होती; समुद्रकिनारे उघडे असून त्या ठिकाणीं संरक्षणाच्या कांहींही तजविजी केलेल्या नव्हत्या; आणि कोणत्याही युरोपस्थ राष्ट्राच्या फायद्याकरितां एकटा डुप्ले हाच नव्हे, पण दुसरेही कित्येक (पुढें दाखविण्यांत येईल त्याप्रमाणें), या स्थितीचा फायदा घेऊन हिंदुस्थानांत युरोपियन राष्ट्राची सत्ता कशी वाढवितां येईल, याचा विचार करूं लागले होते. परंतु डुप्ले यानें कांहीं विशिष्ट व व्यापक बाबतींची अगोदरच अटकळ न बांधून ठेविल्यामुळें अगर त्यांचेकडेच योग्य लक्ष न

पुरविल्यामुळें त्याच्या महत्त्वाकांक्षी मसलतींना अपरिहार्यपणें आळा बसला, आणि कर्नाटकांत मिळविलेल्या विजयापासून त्याला वास्तविक रीत्या जितका फायदा मिळावयास पाहिजे होता, तितका मिळाला नाहीं. जोंपर्यंत कोणत्याही समुद्रतीरस्थ युरोपियन राष्ट्राचे समुद्रावरील त्याच्या दळणवळणाचे मार्ग सुरक्षित नाहींत, तोंपर्यंत त्या राष्ट्रानें हिंदुस्थानांत आपलें राज्य स्थापन करण्याच्या उद्देशानें केलेल्या कोणत्याही तजविजी मुळांतच दोषी राहतील, आणि राजसत्तेंतील भयंकर कमकुवतपणामुळें होणारे परिणामही त्या राष्ट्राला निःसंशयपणें भोगावे लागतील. राज्यसंस्थापनेला कायमचें मूर्त स्वरूप येण्याला अवश्य असणारी ही प्रधान बाबत जोंपर्यंत साध्य झालेली नाहीं, तोंपर्यंत परक्या देशांत राज्यविस्तार करण्याच्या हावऱ्या स्वभावामुळें पूर्वीच कमकुवत असलेल्या राजसत्तेवर अवजड व धोक्याच्या जबाबदारीचें ओझें येऊन पडतें, आणि मुळांत घातलेला एकच घाव सर्व इमारत एकदम कोलमडून खालीं आणण्यास पुरेसा होतो.

लाबूर्डोने याचेवर, " त्यानें खंडणी घेऊन मद्रास शहर परत देण्याचा करार केला, इंग्लिश लोकांच्या वसाहतींचा समूळ नायनाट उडविण्याच्या कार्यांत तो उत्सुकतेनें सामील झाला नाहीं, मारीशसकडे परत निघून गेल्यामुळें शत्रूला तो किनारा मोकळा सांपडला, आणि अशा रीतीच्या त्याच्या धरसोडपणाच्या वर्तनामुळें डुप्ले ह्याच्या परिपक्व झालेल्या योजना त्यानें हाणून पाडल्या, " असा दोषारोप असून त्याच्या ह्या कृत्यांच्या बाबतींत कोणत्याही फ्रेंच लेखकानें त्याचें थोडेंसेंही समर्थन केलेलें नाहीं. तो फ्रान्समध्यें परत गेल्यावर त्याला बॅस्टीलच्या किल्ल्यांतील तुरुंगामध्यें ठेवण्यांत आलें, आणि तेथें तो तीन वर्षें राहिल्यानंतर सरते शेवटीं त्याला सन्मानपूर्वक निर्दोषी ठरवून सोडून देण्यांत आलें. डुप्ले हा जात्याच अरेरावी व कधींही हार न घेणाऱ्या हेकड स्वभावाचा असून त्याच्याशीं लाबूर्डोने याचें झालेलें भांडणच तो हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून जलदीनें परत निघून गेला याचे मुळाशीं असावें, असा साधारण-

पणें तर्क आहे. परंतु जरी लाबूर्डोनें ह्यानें आपलें मोडकें तोडकें आरमार कारोमांडल किनाऱ्यावरून हालविलें नसतें, तरीही समुद्रावर अबाधित सत्ता त्यास प्रस्थापित करतां आली असती कीं काय, याबद्दल बराच संशय आहे. पण अशी अबाधित सागरी सत्ता स्थापन झाल्याशिवाय डुप्ले यानें किनाऱ्यावरील वाटतील तितके लहान सहान किल्ले जरी सर केले असते, अगर हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या अव्यवस्थित सैन्यावर पाहिजे तितके जय मिळविले असते, तरी त्यांच्यापासून काडी इतका सुद्धां फायदा झाला नसता, ह्याबद्दल मात्र बिलकुल संदेह नाहीं.

हें कसेंही असो; पण समुद्रावर पूर्ण वर्चस्व असेल, तरच जमिनीवरही भरभराट होईल, ही गोष्ट लवकरच कळून चुकली. लाबूर्डोनें हा परत गेल्यावर इंग्लिशांचें एक मजबूत आरमार कारोमांडल किनाऱ्यावर दिसल्याबरोबर फ्रेंच जहाजांना तो किनारा सोडणें भाग झालें, जमिनीवरील त्यांची हालचाल एकदम बंद पडली, आणि सहज रीत्याच ते पांडेचरी येथें परत हांकलले गेले, असें आपण पूर्वी वाचलेलेंच आहे. त्याचप्रमाणें उत्तर अमेरिकेमधील ल्युइसबर्ग आणि हिंदुस्थानांतील मद्रास यांच्या अदलाबदलीबद्दलही वर उल्लेख केलेला असून त्यावरून असें सिद्ध झालें आहे कीं, एखादा निवळ स्थानिक फायदा हा बुद्धिबळाच्या व्यापक पटावरील प्यादें एक घर पुढें सरकविण्या इतक्याच किंमतीचा आहे, आणि चार मोहऱ्यांचें संरक्षण करण्याकरितां असलें एखादें प्यादें एकदम तोंडीं देण्याला कोणत्याही प्रकारची बिलकुल हरकत नाहीं. हे सर्व शकुन व हीं सर्व चिन्हें डुप्ले याला, आपली स्थिति सुरक्षित नाहीं, असें सारखीं सुचवीत होतीं, आणि त्याचे हिंदुस्थानांतील राज्यसंस्थापनेचे बेत जरी वरून आशाजनक असल्याचे दिसत होते, तरी त्यांच्या आंत असलेला पोकळपणाही तींच व्यक्त करीत होतीं. परंतु समुद्रावर वर्चस्व असणें किती महत्त्वाचें आहे, ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाहीं; अगर जमिनीवर आंत आंत आपली सत्ता वाढवीत

गेलें, तर समुद्रावरील हल्ल्यापासून आपलें संरक्षण करतां येईल, असें मानण्यांत त्याची चूक झाली. कोणत्याही युरोपस्थ राष्ट्राच्या आशियांतील राज्याचीं पाळेंमुळें नेहमीं आपल्या स्वदेशामध्येंच खोल रोंविलेलीं असलीं पाहिजेत, हें मूलतत्त्व तो विसरला; आणि ह्या झालेल्या पहिल्या लढाईच्या अनुभवानेंही त्याला आपली चुकी न उमगतां उलट प्रोत्साहनच मिळालें. कारण, युरोपांत फ्रान्स व इंग्लंड यांचा तह झाल्याचें जाहीर झाल्याबरोबर आपले बेत मोठ्या प्रमाणावर चालू करण्यास त्यानें लागलीच सुरवात केली.

हें कसेंही असलें, तरी आपणाला हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, समुद्रतीरस्थ राष्ट्रांचें परस्पर असलेलें बळ, अगर आस्ट्रियांतील गादीच्या वारसाईसंबंधींच्या लढाईमुळें फ्रेंचांच्या आरमाराची झालेली शोचनीय स्थिति, यांची डुप्ले याला माहिती होती, असें मानतां येत नाहीं. इंग्लिश लोकांनीं आपल्या आरमाराप्रीत्यर्थ पाण्यासारखा पैसा खर्च केला होता, तरी त्यांनीं त्याबरोबरच स्वतःच्या आरमाराचें बळ आणि कुवत हींही पुष्कळ प्रमाणानें वाढविलीं होतीं. फ्रेंच लोकांच्या आरमारावर प्रत्येक ठिकाणीं त्या सत्तेनें आपलें वर्चस्व उघड उघड प्रस्थापित केलें होतें. आणि जरी कांहीं ठिकाणीं त्यांचा पराभव झालेला होता, तरी सुद्धां कोणत्याही शत्रूला हिंदुस्थानांतील लगतच्या समुद्रामध्यें ते पुरून उरण्यासारखे होते. हालंडचें द्रव्यबळ अगदीं नाहींसें झालेलें असून त्यावर लवकरच स्वारी होण्याचा रंग दिसत होता; परंतु त्याचे सुदैवानें तितक्यांतच ए-ला-शापेल्ल येथें तह झाला. फ्रान्सविषयीं ह्मटलें, तर जरी त्यानें हालंडवर जय मिळविले होते, तरी त्यापासून कांहींही विशेष फायदा न होतां उलट त्याला पुष्कळ नुकसानींतच मात्र यावें लागलें होतें. कारण, ह्या लढाईनें हालंडचें जें नुकसान झालें, त्यामुळें इंग्लिशांच्या व्यापाराला पूर्णपणें वर्चस्व मिळालें. उलट फ्रान्सचा व्यापार आणि आरमार या उभयतांनाही जबर ठोकर बसली, आणि देशांतील आरमारी साहित्याचा तर इतका फडशा उडाला

कीं, त्यामुळें व्हाल्टेयरच्या ह्मणण्याप्रमाणें त्यांच्याजवळ एकही लढाऊ जहाज शेवटीं शिल्लक राहिलें नव्हतें. अशा रीतीनें राष्ट्राला आलेल्या दारिद्र्यावस्थेचा परिणाम कोणत्याही मोठ्या व्यापारी साहसाच्या कृत्यावर चांगलाच झाला पाहिजे, हें उघड आहे. आणि हा परिणाम विशेषत: निव्वळ राष्ट्राच्या नशिबावरच जगत असलेल्या फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीला तर पुष्कळच भोंवला आहे. लढाईचा शेवट झाला तेव्हां कंपनीला, आपण कर्जांत रुतून गेलों आहों, असें आढळून आलें. राजाकडून नेमल्या गेलेल्या तिच्या सर्व व्यवस्थापकांनीं उधळेपणानें पुष्कळ खर्च केला; कंपनीची वास्तविक असलेली सांपत्तिक स्थिति लोकांच्या निदर्शनास आणली नाहीं; आणि बाहेरून आम्ही मोठा व्याजबट्टा देतों असें सांगून व अंत:स्थ सर्व लबाडी करून कृत्रिम रीतीनें त्यांनीं आपली पत ठेवून घेण्याचा प्रयत्न केला. अशी स्थिति इ. सन १७४६ पर्यंत चालली. पण या वेळीं विशेषच घोटाळे माजले. त्यामुळें त्यांना एकदम आणि चकित करून टाकण्यासारखी, भांडवलाच्या भागाची मिळणारी वांटणी यापुढें कमी मिळत जाईल, ही गोष्ट जाहीर करणें भाग पडलें.

वर लिहिलेल्या प्रकारासारखा कंपनीच्या कामाकाजांत घोटाळा झाल्याचें जेव्हां जेव्हां फ्रान्सच्या प्रधानमंडळाच्या निदर्शनास येत असे, तेव्हां तेव्हां ते सरकारांतून तिच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवण्याकरितां एक स्वतंत्र अधिकार दिलेलें पंचमंडळ नेमीत; आणि सरकाराकडून होणाऱ्या ह्या फाजील ढवळाढवळीमुळेंच आमच्यावर संकटें ओढवतात, अशी जरी कंपनीची नेहमीं तक्रार असे, तरीही तिजकडे ते लक्ष देत नसत. उलट, इंग्लंड-मधील ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवस्थेचीं सूत्रें एका मोठ्या व्यापारी मंडळाकडेच स्वतंत्र रीतीनें होतीं; ते आशियांतील पुष्कळ दिवसांच्या व्यापाराच्या अनुभवानें कसलेले असून त्यांचें पार्लमेंटमध्येंही दांडगें वजन होतें; सर्व आशियाभर अतिशय व्यापक प्रमाणावर त्यांचा व्यापार फैलावलेला होता; व त्यांच्याजवळ मोठ्या भांडवलाचा सांठाही पुष्कळच होता.

इंग्लिश खाडीच्याच पलीकडे असलेली फ्रेंच कंपनी आणि अलीकडे असलेली इंग्लिश कंपनी, ह्या दोघांच्या कामकाज करण्याच्या पद्धतीची तुलना केली, तर फ्रेंच कंपनीस, सोडत काढण्याच्या विशिष्ट हक्काचा आधार, तंबाकूच्या व्यापारांतील विशेष प्रकारचा मक्ता, आणि सरकारी तिजोरींतून तिच्या अस्तित्वाकरितां मिळत असलेली देणगी, यांचेवरच जीव धरून रहावें लागे; उलट, इंग्लिश कंपनी हें एक सनदशीर श्रीमंत मंडळ असून तें लढाईच्या खर्चाला मदत म्हणून सरकारालाच दरवर्षी व्याजी रक्कम देत असे; अति थोड्या व्याजावर लाखो रुपये कर्ज मिळवून ह्या सांपत्तिक स्थितीच्या जोरावर प्रधानमंडळाकडून विशिष्ट हक्क मिळवीत असे; आणि आपल्या सनदेचीही मुदत वाढवून घेत असे. इंग्लंडमधील उत्तम सांपत्तिक स्थिति आणि राष्ट्राची उपजत दर्यावर्दीपणाची आवड, ह्या दोहोंला स्वतंत्र संस्थांकडून मोठ्या कळकळीनें आणि जोरानें योग्य वळण दिलें गेलें; पण फ्रान्समध्यें तेथील धाडशी व समयसूचक लोकांमध्यें साहजिकपणेंच असलेली योग्यता आणि साहस हीं, जुलमी राजसत्ता, वाढते सांपत्तिक घोंटाळे, आणि निष्काळजीपणाच्या राज्यव्यवस्थेपासून होणारे सर्व वाईट परिणाम, यांमुळें उलट पायाखालीं तुडाविलीं जाऊन नामशेष झालीं.

परिच्छेद दुसरा—इंग्लिश व फ्रेंच या दोन कंपन्यांमधील लढाई.

हिंदुस्थानांत ह्या गोष्टी डुप्ले याच्या लक्षांत येणें शक्य नव्हतें; त्याला असें दिसलें कीं, आपली सुधारलेली स्थिति आणि वाढलेलें सैन्य ह्यांमुळें आपल्या देशभक्तीच्या महत्त्वाकांक्षेला इतस्ततः वावरण्याला पुष्कळच क्षेत्र मिळालेलें आहे; आणि ह्मणूनच त्यानें आतां हिंदुस्थानांतील खवळलेल्या व आजपर्यंत थांग न लागलेल्या राजकीय समुद्रामध्यें आपलें जहाज नेटानें पुढें ढकललें. शेवटच्या लढाईनें या दोन कंपन्यांमधील पूर्वींची असलेली परिस्थिति बदलली नव्हती; तरी पण त्यामुळें उभयतांच्या वर्तनक्रमांत

बदल झाला होता, आणि पूर्वीची स्पर्धाही अधिक दुणावली होती. पूर्वेकडील लढाया आणि कारस्थानें यांची चटक दोन्हीही कंपन्यांना या वेळीं लागलेली होती; प्रत्येकीनें आपआपलें सैन्यबळ वाढविलें होतें; आणि तें पोसण्याला जरी पुष्कळ खर्च येत होता, तरी परस्परांतील स्पर्धेमुळें तें कमीही करतां येण्यासारखें नव्हतें. वसुलांतील एक कवडीही खर्ची न पाडतां कायमचें सैन्य ठेवण्याचें हें कोडें एखादें दरिद्री संस्थान आपल्या शेजाऱ्याच्या संपत्तीनें कधीं कधीं सोडवीत असतें; परंतु हिंदुस्थानांतील इतिहासांत अतिशय प्रसिद्ध असलेला दुसरा मार्ग ह्मणजे दुसऱ्यास आपलें सैन्य कांहीं मोबदल्याऐवजीं उसनें देणें हा होय. युरोपमध्यें जोंपर्यंत तह कायम होता, तोंपर्यंत हिंदुस्थानांत फ्रेंच अगर इंग्लिश यांपैकीं कोणाही कंपनीला प्रत्यक्ष एकमेकांशीं लढाई करतां येणें शक्य नव्हतें; परंतु धूर्तपणानें एकमेकांविरुद्ध डावपेंच लढवून, आपलीं सैन्यें जय्यत ठेवून, आपल्या वर्चस्वाचें क्षेत्र वाढवून, आणि आपल्या आसपासच्या प्रदेशामध्यें त्या वेळीं सुरू असलेल्या धामधुमींत एकमेकांवर आडून गोळ्या सोडून, पुढील भांडणाची तयारी करणें त्यांना साध्य होतें. यामुळें राजेरजवाडे आणि संस्थानिक सरदार यांचेमधील स्वतंत्र होण्याकरितां अगर प्रांत काबीज करण्याकरितां होत असलेल्या नेहमींच्या लढायांत भाग घेण्याविषयींची प्रत्येक गोष्ट उभयतांनाही अनुकूळ असून कोणतीही गोष्ट प्रतिकूळ नव्हती. कारण, या राजेरजवाड्यांना अगर संस्थानिक सरदारांना रणक्षेत्रांत युरोपियन शस्त्रास्त्रांचें किती महत्त्व आहे, हें कळून चुकलें होतें. ह्मणून ते मनसोक्त रक्कम देऊन हें सैन्य तात्पुरतें आपल्या उपयोगांत आणण्याला नेहमीं एका पायावर तयार असत. ज्यांचा राजगादीला उत्तम हक्क ह्मणजे ती लुबाडून घेण्याची आणि ताब्यांत ठेवण्याची अंगांत असलेली धमक हाच होता, ज्यांचें जीवित्व आणि त्यांच्या राज्याचें अस्तित्व हीं निव्वळ एखाद्या लढाईच्या परिणामावरच नेहमीं अवलंबून असत, कांहींही हक्क नसतांना मनगटाच्या जोरावर दुसऱ्याचें राज्य स्वतःच्या घशाखालीं

उतरवूं पाहणारे कर्तबगार लोक, कायदेशीर हक्कदार असूनही अंगांत करामत नसलेले वारसदार, थोडासा मुलूख अंगाखालीं दाबून बसलेले लष्करी पुढारी, कांहीं हजार घोडेस्वारांचे मराठे शिलेदार अगर अफगाण जातीचे धाडशी सेनानायक, आणि आपलीं राज्यें वंशपरंपरेनें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असलेले प्रांतानिहाय सुभेदार, या लोकांबरोबर सौदा ठरविण्यास उभयतांही कंपन्यांना वास्तविक रीत्या कांहींही अडचण पडली नाहीं. त्याचप्रमाणें आणीबाणीचे प्रसंग पुढें येऊन पडल्यामुळें या प्रतिस्पर्ध्यांपैकीं कोणालाही दूरवरचा विचार करण्याला अगर आपापसांत तडजोड करण्याला व सशस्त्र युरोपियन सैन्य मध्यें मदतीस बोलावल्या-पासून घडून येणाऱ्या अपरिहार्य परिणामाकडे लक्ष पोंचविण्याला सवड मिळाली नाहीं.

उलट पक्षीं ज्या अर्थीं ह्या दोन्हीही कंपन्यांना आपआपलीं सैन्यें उघड-पणें एकमेकांविरुद्ध अजून उपयोगांत आणतां येणें शक्य नव्हतें, त्याअर्थीं मोहिमेच्या मोठ्या फायद्याच्या आशेनें व्यापाराचे विशिष्ट हक्क अगर मुलूख हीं मिळविण्याच्या हेतूनें आणि संधि साधल्यास आपल्या प्रतिस्पर्ध्याचें कांहींसें जबर नुकसान करण्याच्या इराद्यानें आपापल्या फौजा त्यांचा तनखा भागवून एतद्देशीय राजेरजवाड्यांनीं आपल्या नौकरीस ठेवाव्या, अशा अटी करण्यास ह्या दोन्हीही कंपन्यांना अनिवार मोह पडूं लागला. आणि हेंही कबूल केलें पाहिजे कीं, ह्या मोहांत जर कोणी पहिल्यानें बळी पडलें असेल, तर तीही इंग्लिश कंपनीच होय. कारण, त्याच वेळेस तंजावरच्या मराठा राजघराण्यांतील राज्यकर्त्याला त्याच्या भावानें राज्यावरून पदच्युत करून आपण राजगादी बळकाविली होती, व त्याच राजाचा पक्ष पहिल्या प्रथम इंग्लिशांनीं घेतला होता. परंतु त्याला पुन्हां गादीवर बसविण्याकरितां जी मोहीम पाठविण्यांत आली होती, तिनें तें काम इतक्या अव्यवस्थित रीतीनें केलें कीं, लढाईच्या बाबतींत झालेला खर्च आणि जमिनीचा एक लहानसा तुकडा एवढ्यावरच इंग्लिश कंपनीला संतुष्ट होऊन आपली

फौज परत आणविणें भाग झालें. हें फक्त लष्करी अपयशच नव्हे, तर राजकारणांतीलही ही एक घोडचूक होती. कारण, ह्या तंजावर प्रकरणांतील मध्यस्थीनें डुप्ले याला एतद्देशीय राजेरजवाडयांच्या भांडणांत भाग घेण्याला एक उत्तम दाखलाच मिळाला; आणि तोही अशा वेळीं कीं, जेव्हां तो अशाच प्रकारचे अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदर्शी स्वरूपाचे डावपेंच शोधून काढण्यांत गर्क झालेला होता. व दक्षिण हिंदुस्थानामध्यें राजतख्त मिळविण्याचा राजरोस प्रश्न तरवारीनें सोडविण्याकरितां जे पदाभिलाषी लोक तयार झालेले होते, त्यांमध्यें मनगटाच्या जोरावर मध्यस्थी करून फ्रान्सचें वर्चस्व कायमचें प्रस्थापित करण्याचे बेत वाढीस लावण्याची त्याची ह्या वेळीं पूर्ण तयारी झालेली होती.

हल्लींही एका मोठ्या प्रदेशावर जें राज्य पसरलें आहे, त्या हैद्राबाद येथील निजामाच्या राज्याचा प्रस्थापक आसफजहां ह्याच्या मृत्यूनें[1] त्याला हा बेत सिद्धीस नेण्याला योग्य संधि प्राप्त झाली. आसफजहांच्या मागून त्याचा मुलगा नासीरजंग आणि नातू मुजफरजंग या उभयतांमध्यें गादीविषयीं तंटे लागले, आणि दोघांनींही एकेरीवर येऊन आपापल्या तरवारी उपसल्या. जोंपर्यंत आसफजहां जिवंत होता, तोंपर्यंत त्याच्या दराऱ्यामुळें कर्नाटकमध्यें शांतता नांदत होती; परंतु त्याच्या मृत्यूनंतर लागलीच तेथील मांडलिक गादीकरितां प्रतिस्पर्धी हक्कदारांत जोराचे तंटे लागून कर्नाटक हें एक जणूं काय रणक्षेत्रच बनून गेलें. गादीवर बसण्यासंबंधींच्या ह्या दोन लढायांच्या गुंतागुंतीमुळें सर्व दक्षिण हिंदुस्थानांत घोटाळे उत्पन्न झाले, आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, एकामागून एक भानगडीचीं कारस्थानें सुरू झालीं, आणि फंदफितुरी, खून, लढाया, वेढे व अव्यवस्थित चकमकी यांना प्रारंभ झाला. हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या इतिहासांत ही गोष्ट "कर्नाटकांतील लढाई" ह्मणून प्रसिद्ध आहे. आणि ओर्मेच्या इतिहासांत ही सर्व हकीकत "कारोमांडल किनाऱ्यावरील लढाई" या

१ इ. सन १७४८ एप्रील.

नांवाखालीं सप्रमाण आणि सविस्तर खुलाशानें दिलेली आहे. त्यांत क्लाइव्ह, लॉरेन्स, व पुष्कळ अडचणी आणि फारच थोडीं साधनें असूनही धोक्याच्या अगर जिवावर बेतलेल्या प्रसंगांत मोठ्या चातुर्यानें, शौर्यानें व असामान्य हिमतीनें आपल्या देशाचें नांव राखणाऱ्या परंतु हल्लीं पूर्ण विस्मृतिपथांत गेलेल्या दुसऱ्या कांहीं निधड्या छातीच्या पुरुषांच्या अद्वितीय गुणांचें वर्णन केलेलें आहे.

ह्या घोटाळ्याच्या धालमेलींत डुप्ले यानें हिमतीनें आणि तडफेनें उडी घातली. फ्रेंचांच्या वशिल्यावर अवलंबून असणारी व्यक्ति कर्नाटकच्या गादीवर बसवावी, हा त्याचा अगदीं पहिला हेतु होता; कारण, ह्याच प्रांताच्या हद्दींत मद्रास व पांडेचरी हीं दोन्हीही ठिकाणें होतीं. आणि त्याचा दूरवरचा हेतू असा होता कीं, कर्नाटक हा प्रांत अजूनही नांवापुरता निझामाच्या ताब्यांत असल्यानें फ्रेंच पक्षाचें त्याच्या दरबारांत वर्चस्व स्थापन करावें. आणि याच दोन उपायांनीं आपण हिंदुस्थानामध्यें फ्रेंचांचें भक्कम राष्ट्र स्थापन करूं, अशी त्याला आशा वाटली. हिंदुस्थानामध्यें आपसांतील होणाऱ्या भांडणांत भाग घेतल्याबद्दल मागाहून त्याची चौकशी झाली, त्या वेळीं त्यानें आपल्या बचावामध्यें असें योग्य रीतीनें समर्थन केलें कीं, तटस्थ राहतां येणें ही गोष्ट अगदीं अशक्य होती. कारण, भांडत असलेल्या राजेरजवाड्यांकडून, आह्मांस मदत द्या, अशी आलेली मागणी फ्रेंच कंपनीच्या तर्फे नाकारून जर मी मदत दिली नसती, तर ती त्यांना इंग्लिश कंपनीकडून खात्रीनें मिळाली असती, आणि त्यामुळें अशा रीतीनें त्या कंपनीला अपरिहार्य वर्चस्व मिळवितां आलें असतें. हें कसेंही असो; परंतु ह्या त्याच्या धोरणाचा असा परिणाम झाला कीं, इ. सन १७४८ च्या तहामुळें, आपला फ्रेंच कंपनीशीं असलेला वैरभाव नाहींसा होईल, अशी इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें बांधलेली अटकळ खोटी ठरली, आणि आपण पूर्वींहूनही अधिक धोक्यांत आलेले आहोंत, असें तिला लवकरच आढळून आलें. कारण, ह्या तहामुळें डुप्ले याला

कर्नाटकची गादी मिळविण्याच्या बाबतींत चाललेल्या भांडणांतील एक बाजूचा प्रतिस्पर्धी जो चंदासाहेब त्याला आपल्या जोरदार सैन्याची मदत देतां आली, व त्याजकडून राज्यकर्ता नवाब अलिवर्दीखान याच्यावर ताबडतोब हल्ला करवितां आला. ह्या हल्ल्यांत नवाबाचा पराजय झाला आणि तो ठार मारला गेला. त्यानंतर विजयी चंदासाहेब आपल्या सैन्यासह निझामाच्या गादीकरितां भांडत असलेल्या मुजफरजंगाला जाऊन मिळाला, आणि ते उभयतांही पांडेचरी येथें गेले. तेथें फ्रेंच लोकांनीं त्यांचा अतिशय थाटामाटानें आदरसत्कार केला; मुजफरजंग व चंदासाहेब यांनीं फ्रेंचांना पुष्कळ प्रदेश देणगीदाखल दिला; मानशियर डुप्ले व त्याची बायको मॅडम डुप्ले यांनाही त्यांनीं शिवाय स्वतंत्र प्रदेश तोडून दिला; आणि फ्रेंच लोक आतां मुजफरजंगाला दक्षिणेंतील निझामाच्या गादीवर आणि चंदासाहेब याला कर्नाटकच्या गादीवर बसण्याकरितां उघडउघडपणें मदत करूं लागले.

ह्या सर्व गोष्टींनीं इंग्लिशांना बरीच भीति उत्पन्न झाली, आणि जरी तंजावर प्रकरणांतील त्यांच्या स्वतःच्या वागणुकीमुळें निषेध प्रदर्शित करणें अडचणीचें झालें होतें, तरीही त्यांना फ्रेंचांबरोबर झणझणीत पत्रव्यवहार करणें भाग पडलें, व त्यामुळें उघडउघड बेबनाव सुरू झाला. इंग्लिशांची स्वतःची स्थिति ह्या वेळीं फार धोक्याची झाली होती, आणि फ्रेंच लोकांनीं ज्याचा पक्ष घेतला होता, त्याच्या विरुद्ध असलेल्या पक्षाची बाजू ह्या वारसदारीच्या चाललेल्या जोडलढाईंत घेतल्यावांचून त्यांना आतां दुसरा इलाजच राहिला नव्हता. जेव्हां डुप्ले यानें मुझफरजंगाच्या मदतीकरितां आपल्या सैन्याची एक जोरदार तुकडी पाठविली, तेव्हां त्याचा प्रतिस्पर्धी नासीरजंग यानें आपणास मदत करण्याविषयीं इंग्लिशांना विनंति केली, व त्यांनीं थोडीशी होय नाहीं केल्यानंतर त्याला सहाशें माणसांची कुमक दिली; शिवाय चंदासाहेबाच्या विरुद्ध कर्नाटकचा नबाब ह्मणून भांडण्याकरितां नासीरजंगानें ज्याला नेमिलें होतें, तो चंदासाहेबाचा पतिस्पर्धी महमदअल्ली

यालाही त्यांनीं कांहीं माणसांची मदत दिली. ह्मणजे, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें फ्रेंचांचें पाठबळ असलेले मुजफरजंग व चंदासाहेब यांचे विरुद्ध नासीरजंग व महमदअल्ली यांना अनुक्रमें निझामाची व कर्नाटकची गादी मिळवून देण्याकरितां इंग्लिशांनीं पाठबळ दिलें.

इंग्लिश कंपनीनें इंग्लंडमध्येंही मदत पाठविण्याविषयीं निकडीची मागणी केली. तिनें आपल्या व्यवस्थापकांना असें लिहिलें कीं, "फ्रेंच लोकांनीं आपल्या वसाहतींच्या मुळाशीं घाव घातला आहे; त्यांनीं पुष्कळ मोठमोठे प्रांत आपल्या ताब्यांत घेतले आहेत; त्यांनीं आपले बाहुटे आमच्या वसाहतींच्या हद्दीवर आणून रोंविले आहेत; आणि अन्नसामग्री अगर व्यापारी जिन्नस मिळविण्यालाही आह्मांला प्रतिबंध व्हावा, अशा रीतीनें आपल्या वसाहतींचा कोंडमारा करण्याचे ते प्रयत्न करीत आहेत." नासीरजंग याचा त्याच्याच भाडोत्री सैन्यानें खून केला, त्यामुळें फ्रेंच पक्षाचा विजय होण्याची खरोखरच खात्री वाटूं लागली. कारण, त्यामुळें डुप्ले यानें हाताशीं घेतलेल्या मुजफरजंगाला तात्पुरता निझामाच्या गादीवर हक्क सांगण्याला कोणीही प्रतिस्पर्धी राहिला नाहीं. शिवाय, फ्रेंचांचें सैन्य कुमकेदाखल चंदासाहेबाला मिळालेलें असल्यामुळें तोही कर्नाटकांत प्रबळ झाला होता, व फक्त त्रिचनापल्लीचा एकटा बळकट किल्लाच काय तो त्याच्या हातीं यावयाचा बाकी राहिला होता.

यानंतर झालेल्या गुंतागुंतीच्या व झटापटीच्या मोहिमांमध्यें फ्रेंच व इंग्लिश यांनीं घेतलेल्या परस्परविरुद्ध पक्षांत उभयतांनीं प्रमुखत्वानें काय काय गोष्टी केल्या, याबद्दलची थोडक्यांत पण मुद्देसूद हकीकत देणें फार कठिण आहे; कारण, त्या वेळीं ज्या ज्या महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या, त्यांचे त्यांचे परिणाम लढाईमध्यें उपयोगांत आणलेल्या युरोपियन सैन्यावरच फक्त अवलंबून होते; रणमैदानामध्यें उभयतां कंपन्यांचीं सैन्यें एकमेकांवर गोळ्यांचा वर्षाव करीत होतीं; आणि इकडे ह्या दोन्हीही कंपन्या मद्रास आणि पांडेचरी येथून राष्ट्राराष्ट्रांत ठरलेला तह मोडल्याचें खापर

एकमेकांवर फोडीत होत्या, परस्परांच्या डावपेंचांच्या वागणुकीबद्दल एकमेकांना दोष देत होत्या, आणि राजनीतींतील अत्यंत सामान्य तत्त्वांकडेही परस्परांनीं पूर्ण कानाडोळा केल्याबद्दल मध्यस्थी करण्याकरितां उभयतांही आपआपल्या सरकारांला युरोपमध्यें विनंति करीत होत्या. आपल्या आश्रयाखालीं घेतलेल्या चंदासाहेबाच्या वतीनें फ्रेंच सैन्यानें कर्नाटक सर करून आपल्या ताब्यांत घेतलें; मुजफरजंगाची हैद्राबाद येथें निझामाच्या गादीवर स्थापना करावी, ह्मणून बुशी याला तिकडे पाठविण्यांत आलें; आणि सर्व बाबतींत फ्रेंचांना यश येईल असा रंग दिसूं लागला. चंदासाहेबाविरुद्ध महंमदअल्ली हा त्रिचनापल्लीचा किल्ला मोठ्या निश्चयानें धरून बसलेला असल्यानें त्याच्या संरक्षणाकरितां इंग्लिश लोकांनीं कुमक पाठविली. परंतु वेढा दिलेलें सैन्य फार मोठें असून त्याच्याबरोबर फ्रेंचांची एक जोरदार तुकडीही होती; त्यामुळें ज्या वेळीं क्लाइव्ह यानें शह लागेल अशा रीतीनें आपलें मोहरें फिरवून कर्नाटकची राजधानी अर्काट हें शहर जिवावर उदार होऊन काबीज केलें, तेव्हांच फक्त त्या किल्ल्याचा बचाव झाला. ह्या वेळेपासून लढाईचा रंग पालटण्यास सुरवात झाली. त्रिचनापल्ली येथून वेढा दिलेल्या सैन्यांतील बरेंच मोठें सैन्य अर्काट पुन्हां परत मिळविण्याकरितां पाठविण्यांत आलें; परंतु त्या सैन्यानें जे निकराचे हल्ले केले, ते सर्व क्लाइव्ह याच्या लहानशा फौजेनें जिवावर उदार होऊन मोठ्या पराक्रमानें परत फिरविले, आणि आत्मसंरक्षणाचीं साधनें अतिशय कमकुवत असूनही त्यानें लढाईला इतक्या नेटानें तोंड दिलें कीं, त्यांना तो प्रयत्न सोडणें भाग झालें. नंतर क्लाइव्ह व लरेन्स यांच्या धुरीणत्वाखालीं इंग्लिश व त्यांचे साह्यकारी दोस्त उघड उघड आपल्या शत्रूंशीं सामना देण्याला पुढें आले. त्यांनीं फ्रेंचांचें दळणवळण बंद पाडलें; चंदासाहेबाच्या फौजेची दाणादाण उडविली; फ्रेंच अधिकाऱ्यांना कैद केलें; आणि त्रिचनापल्लीचा वेढा पूर्णपणें उठविला. महंमदअल्ली याला जे मराठे लोक मिळाले होते, त्यांनीं

चंदासाहेबाचा खून केला, आणि मुजफरजंग हा हैद्राबाद येथें जात असतांना रस्त्यांत एका चकमकींत मारला गेला.

मध्यंतरीं बुशी यानें हैद्राबाद येथें जाऊन तळ दिला; निझामाच्या गादीवर एका मनुष्याला बसविलें; आपल्या स्वतःच्या देखरेखीखालीं एक सैन्याची तुकडी तयार व तरबेज केली; आणि त्यामुळें तो त्या एतद्देशीय दरबारांत इतका डोईजड बनला कीं, त्याच्या विषयीं पुष्कळच स्पर्धा आणि शत्रुत्व उत्पन्न होउन त्याच्याविरुद्ध कटही उभारले गेले. तथापि आपलें वर्चस्व मोठ्या दक्षतेनें आणि निश्चयानें कायम ठेवून घेण्याच्या कामीं त्याला पूर्ण यश आलें. त्यानें "उत्तर सरकार" या नांवानें अजूनही प्रसिद्ध असलेल्या कर्नाटकच्या वरील बाजूच्या पूर्व किनाऱ्यावरील चार सुपिक जिल्हे निजामापासून तैनातखर्च ह्मणून मिळविले. ह्या चार जिल्हयांमधून त्याला आपल्या सैन्याचे पगार देण्याला सहज पुरेल इतका वसूल उत्पन्न होत असे. हैद्राबाद हें समुद्रकिनाऱ्यापासून अतिशय आंत असल्यानें आपलें तेथें रहाणें अगदीं एका बाजूस व जिवावरचेंच आहे, शिवाय आपल्या जवळील सैन्य जवळजवळ बंडखोर असून त्यावर फार थोडे फ्रेंच अधिकारी आहेत, व या सैन्यावरच आपण सर्वस्वी अवलंबून आहोंत, हें तो पूर्णपणें जाणून होता. या कारणामुळें, इंग्लिशांबरोबर तह करा, असा तो डुप्ले याला एकसारखा सल्ला देत होता, आणि आतां तर कर्नाटकची मोहीम उघड उघड डुप्लेविरुद्धच उलटलेली असून क्लाइव्ह व लारेन्स यांच्याशीं सामन्याकरितां पुढें करण्याला त्याच्या जवळ कोणीही योग्य लष्करी योद्धा नव्हता.

डुप्ले यालाही आतां हळु हळु समजूं लागलें होतें कीं, आपण खेळतांना आपल्या बाजूनें पहिल्यानें जो फांसा टाकण्याला सुरवात केली, तसाच फांसा सवईनें टाकण्यांत इंग्लिश लोकही त्यांच्या परीनें कमी नाहींत. त्रिचनापल्ली सर करून घेण्याच्या कामीं फ्रेंचांनीं आपली होती नव्हती तेवढी पराकाष्ठा केली, पण त्यापासून त्यांचा कांहींही फायदा न

होतां उलट हानि मात्र झाली. डुप्ले याचे हिंदुस्थानांतील फक्त दोस्त
सरकारच नव्हेत, तर खुद्द फ्रान्समधील त्याचे सरकार, यांचाही त्याच्या-
वर असलेला भरंवसा उडत चालला होता; फ्रेंचांनीं हातीं धरलेले
हैद्राबाद व कर्नाटक येथील गादीचे हक्कदार अनुक्रमें मुजफरजंग व
चंदासाहेब यांचा जेव्हां निकाल लागला, आणि या बेकायदेशीर लढाईंत
कित्येक वर्षेपर्यंत लाखो रुपये खर्च करूनही त्यानें बांधलेल्या अटकळी-
च्या मानानें फारच क्षुल्लक परिणाम झाले असें जेव्हां दिसून आलें,
तेव्हांच डुप्ले याच्या राजकारणाची सर्व इमारत ढांसळून खालीं आली,
असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इ. सन १७५३ च्या अखेरीचे सुमारास
डुप्ले यानें इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लाविलें; परंतु कर्नाटकचा नबाब
स्वतःच होण्याचा त्याचा इरादा आहे, असें ज्या वेळीं इंग्लिशांना कळून
आलें, त्या वेळीं त्यांनीं सलोखा करण्याचें साफ नाकारलें. अशा रीतीनें
त्याच्या राजकारणाची फटफजिती झाल्यामुळें त्यास कंपनीची खरी सांप-
त्तिक स्थिति स्वाभाविकपणेंच लपवून ठेवणें भाग पडलें; ह्मणून जेव्हां
पांडेचरीहून पारीस येथील कंपनीच्या व्यवस्थापकांना अकल्पित रीतीनें
कळविण्यांत आलें कीं, कंपनीला वीस लाख फ्रांकचें कर्ज झालें आहे,
तेव्हां त्यांनीं डुप्ले याला ताबडतोब परत बोलावण्याचा निश्चय केला.
इंग्लिश कंपनीही इंग्लंडमध्यें आपल्या सरकाराला राजनीतीच्या धोरणास
अनुसरून या खाजगी लढाईच्या गैरकायदेशीर पद्धतीबद्दल आणि डुप्ले
यानें हिंदुस्थानांत केलेल्या सर्व कृत्यांच्या बाबतींत फ्रेंच दरबारीं तक्रार
करण्याबद्दल सारखा आग्रह करीत होती. इंग्लिश कंपनीनें, डुप्ले याचा
उघड उघड उद्देश आमच्या वसाहतींचा समूळ उच्छेद करावा हा आहे,
असें जाहीर केलें होतें. ईस्ट इंडीजमध्यें कंपनी जो व्यापार करीत आहे,
तो तिचा एकटीचाच नसून सर्व इंग्लिश राष्ट्राचा आहे, म्हणजे या
बाबतीपुरता तरी निदान हा प्रश्न राष्ट्रीय हितसंबंधाचा आहे; आणि
फ्रेंचाची सत्ता वाढत चाललेली असून कन्याकुमारीपासून कृष्णा नदी-

पर्यंतच्या सर्व आग्नेय किनाऱ्यावर डुप्ले हा फ्रेंचांचा हक्क असल्याचें दर्शवीत आहे; असेंही जोरानें निक्षून कळविणें सुरू करण्यांत आलें होतें.

उलट पक्षीं इंग्लिशांची समुद्रावरील सत्ता फ्रेंचांच्या सर्व वसाहतींना भीतिदायक होती; त्यामुळें हिंदुस्थानांतील ह्या उघड उघड सतत चालू असलेल्या भांडणाच्या बाबतींवरून इंग्लिशांबरोबर वितुष्ट पाडण्याची फ्रेंच प्रधानमंडळाची मुळींच इच्छा नव्हती. त्यांच्या जवळ शिल्लक थोडी होती. व या दोन कंपन्यांमध्यें असलेल्या उभ्या दाव्याचा संबंध जाऊन त्यांची बेकीची एकी व्हावी, एतद्देशीय राजेरजवाड्यांना कुमक ह्मणून आपापलीं सैन्यें भाड्यानें उसनीं देण्याची चाल त्यांनीं बंद करावी, आणि परस्परांनीं आपापल्या व्यापाराकडेच पूर्वींप्रमाणें लक्ष पुरवावें, अशी अंतःकरणपूर्वक इच्छा करण्याला त्यांना योग्य कारणेंही होतीं. ह्मणून इ. सन १७५४ मध्यें त्यांनीं इंग्लिश सरकाराबरोबर वर लिहिलेल्या अटींवर ह्या भानगडीच्या प्रश्नाची तडजोड लाविली, व मानशियर गोदेहू या नांवाच्या एका मनुष्यास डुप्ले याच्या जागीं पांडेचरी येथें पाठविलें. त्यानें इंग्लिश गव्हर्नर सॉंडर्स याचे बरोबर पहिल्यानें लढाई बंद करून नंतर एक तात्पुरता तह केला. त्या तहांत दोन्हीही कंपन्यांनीं यापुढें अधिक प्रांत काबीज करून आपली सत्ता वाढविण्याचे पुन्हां पूर्वींप्रमाणें प्रयत्न करूं नयेत, स्थानिक लढायांत भाग घेऊं नयेत, आणि तहांत नमूद केलेलीं थोडीशीं ठाणीं व प्रांत एवढींच फक्त आपणाकडे ठेवावींत, असें ठरलें; व हाच तह पुढें कायम करण्यांत आला. लढाई संपेपर्यंत इंग्लिश लोक ज्याला मदत करीत होते, तो महंमदअल्ली शेवटीं "कर्नाटकचा नबाब" ह्मणून कबूल करावा लागला, आणि ज्या कमानीवर डुप्ले यानें आपलीं मोठमोठीं कारस्थानें उभारलीं होतीं, त्या कमानीच्या मधील चावीचा दगड अशा रीतीनें एकदम ढांसळून खालीं पडला ! ! त्यानंतर डुप्ले हा लवकरच स्वदेशीं परत गेला; आणि न्यायाची दाद मागण्याकरितां पुष्कळसे निष्फळ प्रयत्न केल्यानंतर

हालअपेष्टा, दारिद्र्य, आणि अनपेक्षित दुर्लौकिक, यांनीं गांजला जाऊन त्यांतच अखेरीस त्याचा शेवट झाला ! ! !

परिच्छेद तिसरा–डुप्ले याच्या राजधोरणाचें निरीक्षण.

हिंदुस्थानांत असलेल्या ह्या दोन कंपन्यांमध्यें तहाचा करार होऊन बेकायदेशीर रीतीनें चालणाऱ्या लढाईचा शेवट झाला. आणि ह्याच वेळे-पासून ईस्ट इंडीजमध्यें फ्रान्सच्या नशिबाचा फांसा उलटा फिरण्यास सुरवात झाली, असा सर्वसाधारण समज आहे. डुप्ले यानें अंगीकारिलेली राज-कारणाची पध्दत बंद करण्यांत आली, ही अदूरदृष्टीची व नामर्दपणाची गोष्ट झाली, असा विशेषतः अर्वाचीन फ्रेंच लेखकांनीं ताशेरा झाडलेला आहे; आणि फ्रेंच सरकारावर असा दोषारोप करण्यांत आलेला आहे कीं, डावांत जवळ जवळ सरशी होण्याची वेळ आली असतांना त्यांनीं तो सोडून दिला, व ज्यानें आपल्या बुध्दिवैभवानें हिंदुस्थानांत युरोपियन साम्राज्य स्थापन करण्याची कल्पना प्रथम काढली, इतकेंच नाहीं, तर ह्या महत्कार्या-मध्यें यश येणें शक्य आहे एवढेंच नुसतें न दाखवितां तें मिळविण्याचा योग्य मार्गही ज्यानें दाखवून दिला, त्या विभूतीला, ह्मणजे डुप्ले याला, त्यांनीं ऐन आणीबाणीच्या वेळीं अंगाबाहेर टाकलें. आपणाला आणखी असें ही सांगण्यांत येतें कीं, फ्रान्सच्या ह्या बुद्धिमान पुरुषानें जो मार्ग खुला करून दिला, त्याच मार्गाचें अवलंबन इंग्लिशांना हिंदुस्थान जिंक-तांना करावें लागलेलें आहे[1]. हिंदुस्थान मिळविण्यांत इंग्लंड यशस्वी कां झालें, यासंबंधींच्या कारणांचें त्रोटक विवेचन करीत असतांना जेम्स मिल यानें असें ह्मटलें आहे कीं, हिंदुस्थान जिंकण्याला अवश्य असलेल्या ज्या दोन महत्त्वाच्या गोष्टी पहिल्यानें कळून आल्या, त्यांपैकीं पहिली ही आहे कीं; युरोपांतील शिस्तीच्या सैन्यापुढें एतद्देशीय सैन्य टिकाव धरूं शकत नाहीं; आणि दुसरी ही आहे कीं, युरोपियन राष्ट्रांच्या नोकरींत

१ झेविअर रेमंड.

असलेल्या एतद्देशीयांना तीच शिस्त सहज लावतां येते. त्यानें पुढें असें लिहिलें आहे कीं, ह्या दोन्हीही गोष्टींचा पहिल्यानें फ्रेंचांनींच शोध लाविला, व हिंदुस्थानचा इतिहास लिहिणाऱ्या बहुतेक सर्व लेखकांनींही त्याच्या मागून तोच कित्ता गिरविला आहे. त्यांचें असें खात्रीचें ह्मणणें आहे कीं, डुप्ले याला त्याच्या बेतांत फ्रेंच आरमारी अधिकारी पूर्णपणें अनुकूल नव्हते; त्याच्या जवळ लढवय्या सेनानायकांचा अभाव होता; त्याच्यावर आगंतुक संकटें ओढवलीं होतीं; रणक्षेत्रांत ऐन आणीबाणीच्या वेळीं त्याच्या नशिबानें उलट घेतली; आणि या सर्वांवर कळस म्हणजे फ्रेंच प्रधानमंडळानें आपली वागणूक धरसोडपणाची ठेविली;—म्हणजे वर लिहिलेल्या कारणांमुळेंच डुप्ले याची सर्व मसलत पार ढांसळून खालीं आली.

आतां हीही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, डुप्ले हा बुद्धिवैभवाचा आणि राजकीय दूरदृष्टीचा पुरुष होता, आणि त्यानें आपल्या विरुद्ध उत्पन्न झालेल्या ह्या प्रत्येक अडथळ्याला मोठ्या हिमतीनें तोंड दिलें होतें. पण उलट पक्षीं हेंही तितकेंच खरें आहे कीं, इंग्लिशांच्या नेहमींच्याच भाग्यवान नशिबानें क्लाइव्ह व लॉरेन्स यांच्या तोडीचे फ्रेंच सैन्यांत डुप्ले जवळ एकट्या बुशी-शिवाय दुसरे कोणीही श्रेष्ठ लष्करी अधिकारी नव्हते. बुशी हा अतिशय कर्तृत्ववान पुरुष असून त्याचा गौरव करण्यांत फ्रेंच इतिहासकारांना आनंद वाटतो. परंतु कर्नाटकामध्यें फ्रेंच व इंग्लिश कंपन्यांमधील चालत असलेल्या आपसांतील नुकसानकारक चुरशीच्या भांडणांमध्यें पडण्यापेक्षां हैद्राबाद येथें लष्करी सूत्रचालक बनून आपलें नशीब काढावें, असा त्यानें पहिल्यानें डुप्लेच्या व नंतर लालीच्या हाताखालीं असतांना उघड उघड बेत केलेला होता. आणि जेव्हां डुप्ले व लाली यांना संकटांनीं घेरलें, तेव्हां तो त्या उभयतांशींही अनुदारपणानें वागला. डुप्ले यानेंच “ अगदीं पहिल्या प्रथम शिस्तीच्या एतद्देशीय शिपायांचा पुष्कळ उपयोग केला, समुद्रकिनाऱ्यावरील बंदरें सोडून हिंदुस्थानांतील अंतःप्रदेशांत त्यानेंच पहिल्यानें आपलें सैन्य

पाठविलें, आणि मोंगलांच्या वैभवाचा असलेला 'भ्रमाचा भोपळा'ही त्यानेंच
अगदीं पहिल्यानें फोडला, " हें एल्फिन्स्टनचें ह्मणणें "आम्हांस "ही पूर्ण
संमत आहे. तथापि आशियांतील युद्धशास्त्र व राजनीति यांचा मूळ संशोधक
डुप्ले हाच होता, असें मात्र कदापिही ह्मणतां येणार नाहीं. डुप्लेसारख्या
अत्यंत कर्तबगार पण तितक्याच दुर्दैवी पुरुषाच्या पाठीमागें त्याच्या
नांवाची बदनामी करण्याकरितां मत्सरबुद्धीनेंच हें लिहिलें आहे, असें
वाटणें जरी साहजिक आहे, तरी पण सभोंवतालच्या परिस्थितीचा विचार
केला असतां असें आढळून येईल कीं, त्या वेळीं कोणासही ते उपाय सहज
सुचले असते; आणि ह्मणूनच त्यानें ते शोधून काढले, असें ह्मणण्यापेक्षां
त्यानें ते जास्त वाढीला लाविले, असेंच ह्मणणें अधिक सयुक्तिक होईल.

आशिया खंडांतील सर्व राज्यें आणि त्यांचीं सैन्यें यांचा कमकुवत-
पणा पुष्कळ दिवसांपासून जगजाहीर झालेला होता. आणि कांहीं
स्वाभाविक कारणांमुळें हिंदुस्थान हा तर पूर्वीपासूनच परकीयांच्या
स्वाऱ्यांशीं तोंड देण्याला आशियांतील इतर मोठमोठ्या राष्ट्रांच्या मानानें
अगदींच कमकुवत झालेला होता. हिंदुस्थानांतील मूळच्या रहिवाश्यांजवळ
मध्य आशियांतून हिंदुस्थानवर चाल करून येणाऱ्या टोळ्यांशीं सामना
देण्यासारखें सैन्य क्वचितच तयार असे; आणि दक्षिण हिंदुस्थानांतील
राजेरजवाडे ज्या सैन्यावरच नेहमीं अवलंबून असत, तें सैन्य साधारणतः

१ पूर्वेकडील लोकांचा कमकुवतपणा हा आतां अगदीं जगजाहीर झालेला आहे.
(लिव्हिनटझ, मेमरीज ऑफ लुई दी फोर्टीथ, इ. सन १६७२).
शिवाय फोर्ट सेंट डेव्हिड येथून कंपनीच्या तेथील प्रेसिडेंटानें आपल्या इंग्लंडमधील
व्यवस्थापकांना इ. सन १७५१ च्या आगष्ट महिन्यांत लिहिलेल्या पत्रांतील खालील
उताराही तुलनेदाखल पहा.

" मुसलमान लोकांचा कमकुवतपणा आतां पूर्णपणें निदर्शनास आलेला आहे,
आणि इतकें नक्की आहे कीं, कोणत्याही युरोपियन राष्ट्रानें साधारण जुजबी सैन्यासह
त्यांच्याशीं लढण्याचा बेत केल्यास त्यांना त्यांचा देश सहज पादाक्रांत करतां येईल,
असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

उत्तर हिंदुस्थानांतील भाडोत्री लोकांचें असे. तरी देखील सतराव्या शतकाच्या शेवटीं मोंगल बादशहाचें सैन्य हें बहुतेक अंशीं हिंदुस्थानांतील इतर सैन्यांपेक्षां श्रेष्ठच होतें; परंतु बर्नियर हा असें ह्मणतो कीं, मश्यू दी तूरेन याच्या लोकांची एक तुकडीही या सर्व मोंगल सैन्याला सहज पुरून उरली असती; अगर लष्करी अनुभव असलेला कोणीही युरोपियन मनुष्य आपल्या अनुभवज्ञानानें असें बिनदिक्कत सांगूं शकला असता कीं, कर्नाटकांतील ह्या अव्यवस्थित सैन्याची थोड्याशा चांगल्या सशस्त्र आणि शिकलेल्या तुकड्यांनीं सहज दाणादाण उडवून दिली असती. फ्रेंच लोकांनीं ज्या थोड्याशा एतद्देशीय सैन्याच्या तुकड्या आपल्या नोकरींत ठेविल्या होत्या, त्यांना डुप्ले यानें शिस्तीची कवाईत शिकविण्याची पद्धत सुरू केली, याबद्दल वास्तविक रीत्या विशेष नवें असें त्यांत कांहीं एक नव्हतें. मोंगलांच्या सैन्यांत नेहमीं थोडेसे युरोपियन अधिकारी असत; डुप्ले परत गेल्यानंतर थोड्याच वर्षांनीं मराठे सरदारही आपल्या सैन्याला शिस्तीची कवायत शिकवूं लागले होते; आणि हिंदुस्थानांतील लढायांत ह्या दोन्हीही कंपन्या आपआपलीं सैन्यें गुंतवूं लागल्या, तेव्हांपासून तर त्यांच्या गोटांत असलेल्या भाडोत्री जमावाला शिस्तीची पद्धत लावणें उघड उघड इतकें जरूरीचें भासूं लागलें कीं, त्यांत कांहींही नवा शोध आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. शिस्तीच्या व शिकलेल्या सैन्याची खरी किंमत काय आहे, याचा खरा शोध, ज्यांना पूर्वींपासूनच ही पद्धत माहीत होती, त्या युरोपियन लोकांनीं करावयाचा नसून, ज्यांनीं पूर्वीं कधींही अशा सैन्यरचनेच्या युक्तीचा अनुभव घेतलेला नव्हता, व अशा सैन्याशीं समरांगणावर दोन हात करण्याचा प्रसंग ज्यांना पूर्वीं कधींहीं आलेला नव्हता, त्या हिंदुस्थानांतील एतद्देशीय लोकांनींच तो करावयाचा होता.

परंतु हिंदुस्थानांत युरोपियन दिग्विजयाच्या खऱ्या मार्गाकडे जाण्याला डुप्ले हाच प्रथम निघाला, याबद्दल त्याला वास्तविक रीत्या जें विशिष्ट श्रेय देणें अवश्यक आहे, तें न देतां उलट त्याची कोणत्याही प्रकारें मान-

हानि करण्याचा प्रयत्न करण्याची अवश्यकता नाहीं. परंतु असाही एक विशेष मौजेचा प्रश्न उत्पन्न होतो कीं, डुप्ले याच्या अंगांत इतकी धमक, इतकी कर्तबगारी, आणि इतका जाज्वल्य देशाभिमान असूनही त्याची भरभराट कां झाली नाहीं. पुष्कळांचें असें ह्मणणें आहे कीं, डुप्ले यानें केलेल्या योजनांकडे जर फ्रेंच सरकारनें दुर्लक्ष केलें नसतें, त्याच्या बरोबरीच्या अगर त्याच्या हाता खालच्या लोकांनीं जर ढोबळ चुका केल्या नसत्या, आणि डुप्ले याला जर कायमचें परत बोलावून घेण्यांत आलें नसतें, तर इंग्लिशांना हांकलून देऊन फ्रान्सनें हिंदुस्थानांत आपली सत्ता प्रस्थापित केली असती. परंतु असें म्हणणारांला वास्तविक रीत्या असें उत्तर देतां येईल कीं, त्यांना निरनिराळ्या ऐतिहासिक गोष्टींचें महत्त्व किती व काय प्रमाणांत असतें, या गोष्टीचें पूर्ण अज्ञान असून त्यांनीं एकंदर परिस्थितीचाही पूर्ण विचार केलेला नाहीं. शिवाय, अशा लोकांचीं धोरणेंहीं, एखाद्या लहानशा लढाईच्या परिणामावर, अगर एखाद्या प्रांतिक सेनापतीनें किंवा सुभेदारानें एखाद्या आणीबाणीच्या वेळीं केलेल्या वागणुकीवर, अतिशय मोठमोठ्या राजकीय घडामोडी अवलंबून असतात, अशा आकुंचित कल्पनांवरच बांधलेलीं असतात. परंतु इंग्लंड आणि फ्रान्स यांच्या मोठमोठीं राष्ट्रें स्थापन करण्याकरितां झालेल्या भांडणांत उभयतांची परस्पर शक्ति व साधनें यांची अशा तऱ्हेनें मोजदाद करावयाची नाहीं, अगर अशा सोनेरी कांट्यानें त्यांची तुलनाही करावयाची नाहीं. या दोन कंपन्यांमध्यें हिंदुस्थानांत चालत असलेल्या घोटाळ्याचा आणि अनियमित युद्धकलहाचा परिणाम अखेरच्या भवितव्यतेवर चांगला अगर वाईट, पण कायमचा, झाला आहे कीं काय, असाही एक प्रश्न उत्पन्न होतो. कर्नाटकमधील लढाई ही कायदेशीर नसल्यानें तिच्या परिणामांवर कोणतीही अटकळ बांधतां येण्यासारखी नव्हती; कारण, इंग्लिश आणि फ्रेंच या उभयतांनाही प्रत्यक्ष उघडपणें परस्परांच्या वसाहतींवर घाव घालतां येणें शक्य नव्हतें; उलट पक्षीं एतद्देशीय लष्करामार्फत जर त्यांनीं घाव घालविण्याचें कार्य साधलें असतें, तर युरोपमधील उभयतांचेंही सरकार

खात्रीनें लागलेंच मध्यें पडलें असतें. खाजगी रीतीनें अगर आपलें सैन्य दुसऱ्यास तात्पुरतें मदतीदाखल देऊन होणाऱ्या लढायांच्या पद्धतीमुळें डुप्ले याला इंग्लिशांविरुद्ध तात्पुरता फायदा झाला; कारण, त्या लढाया नेहमीं जमिनीवरच होत असून त्यांत तो कसलेला होता, आणि ह्या वेळीं दोन्हीही राष्ट्रांत तह झालेला असल्यामुळें उभयतांच्याही आरमारांना त्या लढायांत भाग घेतां येत नव्हता. तथापि पुढें तीन वर्षांनंतर ज्या वेळीं फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यामध्यें लढाई सुरू झाली, त्या वेळीं इंग्लंडच्या आरमारानें फ्रान्सविरुद्ध आपलें वर्चस्व कायमचें प्रस्थापित केलें.

डुप्ले हा स्वभावसिद्ध आणि उत्साहपूर्ण अशा उपजत राजकीय बुद्धि-वैभवाचा असून बादशाही मिजासीचा आणि नीतिदृष्ट्या निधड्या छातीचा पुरुष होता. त्यानें आशिया खंडांत फ्रेंचांचें राष्ट्र स्थापन करण्याकरितां फार मोठ्या व बऱ्याच साहसाच्या योजना आपल्या हातांत घेतल्या. पण एक-सारखी कुमक व पाठबळ न मिळाल्यामुळेंच त्याच्या अंगांत करामत असूनही त्यांत त्याला हार खावी लागली. त्यानें असें पाहिलें कीं, जोंपर्यंत युरोपियन कंपन्यांच्या ताब्यांत असलेलीं ठिकाणें अगर त्यांनीं चालविलेला व्यापार हीं हिंदुस्थानांतील लहरी व औट घटकेच्या राजेरजवाड्यांच्या मर्जीगैरमर्जीवरच अवलंबून आहेत, तोंपर्यंत त्यांची स्थिति नेहमीं पुष्कळच अंशानें डळमळीत राहील. आणि याला योग्य उपाय ह्मटला ह्मणजे, आपण आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करणें, वर्चस्व मिळविण्या-करितां संधि मिळेल तेथें एकदम हात घालणें, आणि आपल्या मार्गांत जो कोणी युरोपियन प्रतिस्पर्धी आडवा येईल त्याला जमिनदोस्त करणें, हाच आहे, असें तो प्रतिपादन करीत असे. व जर इंग्लिश लोक त्याला पुरून उरण्यासारखे नसते, तर आपल्या प्रतिपाद्य गोष्टींत त्याला कदाचित् यशही आलें असतें. वास्तविक रीत्या कोणत्याही युरोपियन मनुष्यानें आशियांतील मनुष्यांशीं व्यवहार करतांना त्यांच्या चालीरीतींचें अनुकरण न करितां आपल्याच चालीरीती कायम ठेविल्या पाहिजेत; परंतु डुप्ले यानें

उलट भपका करून आपलें अवडंबर माजविलें, आणि हिंदुस्थानांतील लोकांशीं केलेल्या व्यवहारांत धूर्तपणानें आपलीं कारस्थानें करण्याचा क्रम चालू ठेविला, ही त्यानें ढोबळ चूक केली; शिवाय, ज्या सनदेच्या खरेपणा-बद्दलही संशय आहे, त्याच सनदेच्या जोरावर "मी कर्नाटकचा नबाब आहें असें लोकांनीं कबूल करावें," असा हक्क सांगण्यांत तर त्याची विशेषच ढोबळ अशी राजकीय घोडचूक झाली. इंग्लिशांनीं तर ह्या गोष्टीला केव्हांही अनुमोदन दिलें नसतें; कारण, त्यामुळें त्यांच्या वसाहती नेहमीं धोक्यांत राहिल्या असत्या. इ. सन १७५४ च्या जानेवारी महिन्यांत त्रिचनापल्लीजवळ मेजर लारेन्स यानें तळ दिला होता; त्या वेळीं ह्या होऊं घातलेल्या तहाच्या अटींबद्दल त्यानें असें लिहिलें आहे कीं, "हिंदुस्थानांत जोंपर्यंत डुप्ले आहे, तोंपर्यंत ह्या प्रांतांत केव्हांही शांतता व्हावयाची नाहीं, असें माझें मत आहे. त्याला माणसाची अगर पैशाची, इतकेंच नाहीं, तर आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याशिवायच्या इतर कोण-त्याही गोष्टीची बिलकुल किंमत वाटत नाहीं. आजपर्यंत आपल्या सैन्याच्या होत असलेल्या सारख्या अपजयानें डुप्लेशिवायच्या इतर कोणत्याही मनुष्याला पुढें मांडलेल्या तहाच्या अटींचें मनन करून आनंदच वाटला असता; परंतु डुप्ले याचें बोलणें मात्र पांडेचरीच्या गव्हर्नरला साजेल अशा रीतीचें नसून तें फक्त त्या प्रांताच्या राज्यकर्त्यालाच शोभेल अशा थाटाचें आहे."

वर लिहिलेली हकीकत एका प्रतिपक्षीयाच्या लेखणींतून आलेली असल्या कारणानें जरी त्यांतील कांहीं भाग वजा केला पाहिजे, तरीही डुप्ले याचें वर्तन आणि वागणुकीची तऱ्हा यांविषयीं वर जें मत प्रदर्शित केलेलें आहे, त्यांत पुष्कळच तथ्यांश आहे. जरी हिंदुस्थानांत उभयतां राष्ट्रांच्या नशिबांत लिहिलेलीं निदानीचीं अक्षरें फिरविणें डुप्ले याच्या आटोक्या बाहेरचें होतें, आणि जरी त्याच्या योजनांचा परिणाम, "फ्रेंच लोकांचा आमचेविरुद्ध त्यांचेकरितां जें जें मिळविण्याचा बेत होता, तें तें

सर्व तंतोतंत त्यांचेविरुद्ध आमचेकरितां आह्मी मिळविलेलें आहे," हा झाला, तरीही अठराव्या शतकांत इंग्लंड व फ्रान्स यांचेमध्यें समुद्रापलीकडील प्रदेश मिळविण्याकरितां जी पुष्कळ दिवस आणि कडाक्याची झुंज लागलेली होती, व जींत अखेरीस इंग्लंड विजयी झालें, त्यांतल्या हिंदुस्थानच्या एका लहानशा उपकथेंतील डुप्ले ही एक अतिशय चकित करून टाकणारी व्यक्ति होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शिवाय हेंही खात्रीनें सांगतां येईल कीं, हिंदुस्थानांत राज्य स्थापन करण्याची कल्पना डुप्लेशिवाय इतरांच्याही डोक्यांत आलेली होती; आणि हिंदुस्थानच्या तत्कालीन स्थितीचें पूर्ण निरीक्षण केलेल्या एकाहून अधिक विचारी मनुष्यांना, कोणत्याही युरोपस्थ सत्तेला हा सर्व देश सहज पादाक्रांत करून टाकतां येईल, हेंही आधींच कळून चुकलेलें होतें.

इ. सन १७५३ मध्यें फ्रान्स व इंग्लंड ह्या दोन्हींही राष्ट्रांनीं हिंदुस्थानांतील त्यांच्या या दोन कंपन्यांमध्यें चाललेल्या लढाया बंद करण्याचा निश्चय केला; त्या वेळीं उभयतां राष्ट्रांचा युरोपांत सलोखा असल्यामुळें हिंदुस्थानांतील त्यांच्या प्रतिनिधी कंपन्यांमध्यें चाललेली पुष्कळ दिवसांची लढाई बंद करावी, आणि आपल्या राज्यविस्ताराच्या कल्पना सोडून देऊन व्यापाराकडेच लक्ष देण्यास त्यांना भाग पाडावें, अशी उघड उघड जरुरी भासली, ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे. हिंदुस्थानामध्यें ह्या लढायांपासून उभयतां कंपन्यांपैकीं कोणालाही अजूनपर्यंत ह्मणण्यासारखा फायदा झालेला नव्हता. इ.सन १७५४ मध्यें फ्रेंच आणि इंग्लिश या दोन्हीही कंपन्यांना युरोपांतील आपआपल्या राष्ट्रांमधून दोन दोन हजारपर्यंत सैन्य पाठविण्यांत आलेलें होतें. परंतु ओर्मे ह्याच्या ह्मणण्याप्रमाणें योग्यतेच्या मानानें पाहतां इंग्लिश सैन्य फ्रेंच सैन्याहून इतकें सरस होतें कीं, जर लढाया चालू राहिल्या असत्या, तर इंग्लिशांचीच खात्रीनें सरशी झाली असती. तो ह्मणतो कीं, इंग्लिशांबरोबर शांततेनें रहावें,

१ लार्ड क्लाइव्ह यानें लार्ड ब्यूट याला पाठविलेल्या पत्रांतील उतारा. इ. सन १७६२.

असा गोदेहू याचा विचार होण्याला जीं अनेक कारणें झालीं, त्यांपैकींच कारोमांडल किनाऱ्यावर इंग्लिश आरमाराच्या तुकडीचें आगमन हेंही एक होतें. उलट पक्षीं फ्रेंचांच्या ताब्यांत इंग्लिशांच्याहून पुष्कळच अधिक मुलूख होता, आणि एतद्देशीय राजेरजवाड्यांशीं तर त्यांचें पुष्कळच राजकीय दळणवळण होतें. इ. सन १७९४ मध्यें मद्रास येथील गव्हर्नरनें गोदेहू-बरोबर केलेला मुदती तह आपल्या लंडन येथील व्यवस्थापकांच्या सभेकडे पाठविला, त्या वेळीं त्यानें असें निक्षून कळविलें होतें कीं, " फ्रेंच लोकांची हल्लींची स्थिति त्यांना पुढें लढाई चालू ठेवण्याला फायदेशीर आहे. " आणि तो पुढें ह्मणतो, " त्यांचेजवळ आपल्यापेक्षां जास्त मजबूत लष्करी सैन्य— आणि विशेषतः आपल्या प्रदेशावर छापे घालून आपणाला जेरीस आणूं शकतील अशा घोडेस्वारांच्या पलटणी—असून एतद्देशीय राजेरजवाड्यां-जवळ त्यांचें वजनही आमच्याहून पुष्कळच अधिक प्रमाणांत आहे. "

तथापि फ्रान्सच्या प्रधानमंडळानें या परिस्थितीकडे दुसऱ्या दृष्टीनें पाहण्याचीं कारणें आणि हेतु यांतही पुष्कळच तथ्य आहे. त्यांनीं डुप्ले याचें राजकारण, चार वर्षें चाललेल्या अव्यवस्थित युद्धाचा परिणाम झालेला अवाढव्य लष्करी खर्च भरून काढण्याइतकाही यशस्वी झाला नाहीं, या मुद्द्यावर फेटाळून दिलें. उलट पक्षीं इंग्लिश कंपनी जरी बरीच अडचणींत होती, तरीही ती मुळींच डबघाईस आलेली नव्हती; तिचें सैन्य मजबूत होतें; त्याचेवरील सेनानायक कसलेले होते; आणि त्यांची सांपत्तिक स्थितिही बरीच चांगली होती. फार फार झालें असतें, तर डुप्ले यानें तद्देशीय राजेरजवाड्यांमध्यें आपला पाय डळमळीत व निसटता असा शिरकविला असता. परंतु युरोपमध्यें ब्रिटिश सरकार या बाबतींत जोरानें तक्रार करीत होतें; आणि जर इंग्लंडच्या जनतेला असें कळून आलें असतें कीं, त्यांचा हिंदुस्थानांतील व्यापार व ताब्यांतील ठिकाणें हीं अतिशय धोक्यांत आलेलीं आहेत, तर ते तक्रारीपलीकडेही खात्रीनें गेले असते. ह्या दोन्हीही प्रतिस्पर्धी कंपन्यांचीं मुख्य ठिकाणें मद्रास व

पांडेचरी हीं सर्वांना खुल्या असलेल्या रस्त्यावर होतीं, व त्यांचेवर समुद्राच्या बाजूनें हल्ला होण्याची नेहमीं भीति होती. ॲडमिरल वाटसन याच्या हाताखालीं असलेलें इंग्लिश आरमार नुकतेंच कारोमांडल किनाऱ्यावर येऊन दाखल झालें होतें; आणि फ्रेंच सरकार जाणून असलें पाहिजे होतें कीं, आपलें आरमार इंग्लिश आरमाराहून कनिष्ठ प्रकारचें आहे. इ. सन १७५४ च्या तहाअन्वयें[1] कारोमांडल किनाऱ्यावर इंग्लिशांना जो मुलूख मिळालेला होता त्याहूनही पुष्कळच अधिक प्रदेश जरी फ्रेंचांस मिळालेला होता, आणि जरी बुशी हा आपल्या पांच हजार चांगल्या शिकलेल्या फौजेच्या तुकडीसह अद्याप हैद्राबाद येथें स्थानापन्न होता, तरीही ज्या दोन बाबतींसंबंधीं गोदेहूनें केलेल्या तहामुळें फ्रेंच सरकार निखालस नुकसानींत टाकलें गेलें, असें आपणांस म्हणतां येईल, त्या बाबती म्हणजे प्रत्यक्ष डुप्ले याला हिंदुस्थानांतून परत जावें लागणें, आणि महमदअल्ली हा कर्नाटकचा कायदेशीर नबाब आहे असें कबूल करावें लागणें, ह्याच होत.

फ्रेंच प्रधानमंडळाला आपली खालावलेली सांपत्तिक स्थिति सुधारण्याची अपरिहार्य व अतिशय महत्त्वाची अवश्यकता भासली, त्यामुळें त्यांना ह्या बाबतींत मन घालणेंच भाग झालें; आणि जी फ्रेंच व्यापारी कंपनी हिंदुस्थानांतील लढायांच्या निसरत्या वाळूमध्यें बुडून गेलेली आहे, त्या कंपनीला मदत करण्याची घातुक व उधळेपणाची पध्दत पुढेंही चालू ठेवण्याचा हेका आधींच करांच्या भाराखालीं वांकलेल्या आपल्या प्रजेच्या हितसंबंधाच्या दृष्टीनें त्यांना धरितां येईना. इ. सन १७५४ मध्यें फ्रेंच कंपनीचें दिवाळें निघण्याची अगदीं वेळ आली होती; त्यांनीं केलेल्या घोटाळ्याबद्दल सरकारांतून चौकशी चाललेली होती; ते सरकारी तिजोरींतून मदतीदाखल मोठमोठ्या रकमा मागत होते; आणि कंपनीचें दिवाळें वाजूं दिलें, तर राष्ट्राच्या इज्जतीवर त्याचा अतिशय दांडगा परि-

१ इ. सन. १७५५ च्या जानेवारी महिन्यांत मद्रास येथें हा तह प्रसिद्ध झाला.

णाम होईल, हेंही उघड उघड ठरल्यासारखेंच होतें. आपला नेहमींचा तैनात खर्च भागविण्याकरितां ठरीव रक्कम वसूल होण्या इतक्या उत्पन्नाचा एखादा प्रांत आपल्या ताब्यांत असल्याशिवाय हिंदुस्थानांत कोणतीही कंपनी चिरायू होणार नाहीं, असें डुप्ले याचें स्वतःचें मत होतें. आणि तेंच मत फ्रेंच सरकारच्या मनांत बिंबवून देण्याचा तो प्रयत्न करीत होता. परंतु त्याच वेळीं फ्रान्समध्यें व इंग्लंडमध्येंदेखील असा सिद्धांत ठरून गेला होता कीं, व्यापार आणि विजय या दोन गोष्टी एकाच वेळीं होणें शक्य नाहीं. फ्रेंच व्यापारी मंडळ व राजमंत्री सभा या दोघांचेंही मत, व्यापारी कंपनीला मोठमोठे प्रांत काबीज करून राजकीय सत्ता वाढविण्याची परवानगी देऊं नये, असें होतें; आणि हेंच मत पुष्कळ वर्षेंपर्यंत सतत परिश्रमानें डुप्ले याच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. परंतु त्याचा कांहीं सुद्धां उपयोग झाला नाहीं. त्यानें अंगीकारिलेलें तत्त्व बरोबर होतें कीं चुकीचें होतें, यासंबंधीं वादविवाद करण्याची जरुरी नाहीं; कारण, वास्तविक मुद्दा हा आहे कीं, त्या वेळीं तें प्रचारांत आणणें ही गोष्ट शक्य होती कीं अगदीं अशक्य होती. कंपनीच्या सांपत्तिक स्थितीला क्षय लागलेला होता; फ्रान्सच्या तिजोरीची दैना उडालेली होती; आणि आरमार कमकुवत झालेलें होतें. त्यामुळें डुप्ले याच्या अनिवार्य सबबींविरुद्धही तेथील सरकाराला त्याला आपलें राजकारण बंद करण्यास सांगणें भाग पडलें असावें, असा तर्क आहे. या दोन राष्ट्रांच्या हिंदुस्थानांतील कंपन्यांच्यामधील भांडणाची खरी स्थिति व त्याबद्दल असलेला अपरिहार्य कल, यांबद्दल इसवी सन १७४९ ते इसवी सन १७५४ पर्यंत फ्रान्सच्या जमाबंदीच्या इतिहासाचें एम. मारिआँ यानें जें निरीक्षण केलेलें आहे, त्यांतही हीच स्थिति आणि हाच कल असल्याची योग्य कबूली त्यानें दिलेली आहे[1].

---

१ दिग्विजय मिळविण्यास निघालेल्या एखाद्या राष्ट्रावर आपलें वर्चस्व पूर्णपणें प्रस्थापित करणें, ही एकट्याच एखाद्या व्यक्तीस अत्यंत अशक्य असलेल्या गोष्टींपैकींचें

फ्रान्समधील त्या वेळचा नगदी खात्याचा मुख्य अधिकारी माशोल्थ दार्नुविल याजवर असा दोषारोप करण्यांत आला होता कीं, त्यानें डुप्ले याला परत बोलावून घेऊन आशियाखंडांतील आपल्या भावी राष्ट्राला तिलांजली दिली. परंतु ह्या दोषारोपाचें खंडन करतांना मारिऑ यानें असें लिहिलें आहे कीं, जरी फ्रेंच सरकारानें त्याला नौकरींत ठेवून घेतलें असतें, आणि त्यानें अंगीकारलेल्या पद्धतीला पाठबळ दिलें असतें, तरीही अखेरच्या परिणामांत फारसा फरक झाला नसता. हिंदुस्थानांत फ्रेंचांच्या राज्यसंस्थापनेची जी इमारत डुप्ले हा अत्यंत परिश्रमानें उभारीत होता, तिच्यामधील गिलाव्याचा कांकरी चुना इतक्या उतावळीनें आणि पोकळ रीतीनें भरला गेला होता कीं, त्याचे सांधेही जुळणें शक्य नव्हतें. तिचा सर्व आधार लहानशा भाडोत्री सैन्याच्या वर्चस्वावर, पूर्वेकडील राजेरजवाडयांच्या धोक्याच्या दोस्तीवर, आणि हिंदुस्थानांत असलेल्या सेनानायकांच्या योग्यतेवरच फक्त अवलंबून होता, आणि याच कारणामुळें तिचा पाया डळमळीत असून केवळ नशिबावरच तिचा हवाला टाकण्यांत आलेला होता.

हिंदुस्थानांत फ्रेंचांनीं आपल्या राज्याचा भक्कम पाया घालण्याला आरंभ करण्यापूर्वी " समुद्रांत असलेल्या इंग्लंडच्या सत्तेचा नायनाट करून

एक गोष्ट आहे, हें इतिहासांतील अनेक उदाहरणांवरून आजपर्यंत पुष्कळदां सिद्ध झालेलें आहे. आणि हीच गोष्ट डुप्ले व इंग्लिश यांच्या झालेल्या लढायांमध्यें पुन्हांही प्रस्थापित झालेली आहे. डुप्ले याला फ्रान्समध्यें तेथील सरकारानें परत बोलावून घेतलें, ही त्यांची खरी चूक झालेली नाहीं. ज्या धोरणानें डुप्ले याला आपल्या राजकारणांत यश येईल असें वाटत होतें, त्याच धोरणानें आपल्या आरमाराची अपूर्तता, त्याला लागलेली उतरती कळा, आणि त्याचा चाललेला क्षय, या कारणांमुळें त्याला यश येणें अशक्य झालें. फ्रान्समधील नगदी खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यानें या गोष्टींपासून घडून येणाऱ्या अनिष्ट परिणामांना टाळण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं; एवढ्याच सबबीवर तो दोषी आहे, असें ठरविणें केव्हांही न्यायाचें होणार नाहीं.

माशोल्थ दार्नुविल बाय मारिऑ. (पान ४४२)–१८९१.

युरोपशीं चालणारें आपलें दळणवळण बिनधोक करणें " ही गोष्ट त्यांनीं अगदीं पहिल्यानें करावयास पाहिजे होती; परंतु इ. सन १७५४ मध्यें असा घाव घालणें फ्रान्सच्या आटोक्याबाहेरचें होतें. व्हाल्टेअरच्या ह्मणण्याप्रमाणें शेवटच्या लढाईंत फ्रान्सच्या आरमाराचा सर्वस्वी धुव्वा उडालेला होता, आणि जरी इ. सन १७४८ च्या तहापासून फ्रान्स हळु हळु आपलें आरमारी बळ पुन्हां पूर्व स्थितीवर आणूं लागलें होतें, तरीही इ. सन १७५५ मध्यें इंग्लिशांचीं १३१ मोठालीं लढाऊ जहाजें आणि ८१ लहान युद्धोपयोगी गलबतें, यांविरुद्ध तोंड देण्याला फ्रान्स-जवळ ६७ मोठालीं लढाऊ जहाजें आणि ३१ लहान युद्धोपयोगी गलबतें एवढींच काय तीं फक्त शिल्लक होतीं, असें ह्मणतात. इ. सन १७५६ मध्यें, ह्मणजे जेव्हां युरोपांत " सप्तवार्षिक युद्ध " सुरू झालें त्या वेळीं, समुद्र मार्गांवरील आपली सत्ता पुन्हां प्रस्थापित करण्याचा फ्रान्सनें नेटानें प्रयत्न केला; आणि हेंही उघड उघड दिसून येईल कीं, डुप्ले यानें अंगीकारिलेलें राजधोरण टाकून दिलें ह्मणून नव्हे, तर आरमारी सत्ता पुन्हां मिळविण्याकरितां फ्रान्सनें केलेल्या प्रत्यक्ष निर्वाणीच्या धडपडींतही त्याला अपयश आलें ह्मणूनच, हिंदुस्थानांत आपलें टिकाऊ वर्चस्व स्थापन करण्याच्या फ्रेंचांच्या भावी आशेवर कायमचा पडदा पडला ! !

भाग सहावा.

फ्रेंचांबरोबरील इंग्लिशाचें दुसरें युद्ध.

परिच्छेद पहिला—लाली.

इ. सन १७५६ मध्यें अमेरिकेंतील वसाहतींसंबंधींची फ्रान्सबरोबरील खडाजंगी लवकरच सुरू होण्याचा रंग दिसूं लागला, तेव्हां हॅनोव्हरचें संरक्षण करण्याकरितां इंग्लंडचा राजा दुसरा जार्ज यानें प्रुसियाचा राजा फ्रेडरिक याचेबरोबर एक मित्रत्वाचा तह केला. त्याच वेळीं आस्ट्रियाची राणी, मेरिया थेरेसा, हिनेंही त्याचेविरुद्ध लढण्याकरितां एक प्रबळ कट तयार केला होता. या वेळीं फ्रेंच सरकार हें पंधराव्या लुईचें असाधारण-सौंदर्यसंपन्न प्रिय पात्र, म्याडम दी पँपादूर, हिच्या कुटिल तंत्रानें चालत होतें. इंग्लंडच्या सुदैवानें फ्रेंच सरकारानें गैरमुत्सद्दीपणानें व अविचारानें आस्ट्रियाशीं दोस्तीची जूट केली, त्यामुळें लढाई चालत असतांना जमिनीवर प्रुसियाचें भयंकर सैन्य आणि समुद्रांत इंग्लिशांचें प्रबळ आरमार, ह्या अतिशय रुद्रस्वरूपी व मिश्र अशा जोडगोळीविरुद्ध फ्रेंचांना तोंड देणें भाग पडलें होतें. इ. सन १७५६ च्या प्रारंभापासून हिंदुस्थानांत इंग्लिश व फ्रेंच ह्या दोन्हीही कंपन्यांना लवकरच लढाई सुरू होईल, असा अंदाज वाटत होता; आणि दोन्हीही कंपन्या गोदेहूचा तह मोडल्याबद्दल परस्परांसंबंधीं निषेध प्रदर्शित करीत होत्या. याच वर्षाच्या अखेरीच्या सुमारास युरोपमध्यें या दोन्हीही राष्ट्रांत राजरोस लढाई सुरू झाली, हें वर्तमान जेव्हां हिंदुस्थानांत ह्या दोन्हीही कंपन्यांना समजलें, तेव्हां त्या उभयतां कंपन्यांमध्यें कर्नाटकांत ज्या अप्रत्यक्ष चकमकी झडत होत्या, व जे भीतिदायक डावपेच लढविले जात होते, त्यांच्या ऐवजीं आतां उघड उघड वैरभाव सुरू झाला. परंतु बरेंचसें इंग्लिश सैन्य क्लाइव्ह-

बरोबर बंगालमध्यें पाठविण्यांत आलेलें होतें, आणि फ्रेंच लोक लवकरच आपणाला दांडगी कुमक येण्याची वाट पहात होते, त्यामुळें कारो-मांडल किनाऱ्यावर उभयतांमध्यें लागलीच चकमकी झडूं लागण्यास सुरवात झाली नाहीं.

फ्रेंच सरकारानें इंग्लिशांच्या ताब्यांत असलेल्या पूर्वेकडील ठिकाणां-वर हल्ला करण्याचा निश्चय केला; व्यवस्थित स्वारी करण्याच्या तत्त्वास अनुसरून दूरदर्शीपणानें त्यांनीं हा बेत कायम केला; काउंट लाली याच्या ताब्यांत स्वारी करण्यालायक एक बलाढ्य सैन्य सोंपविलें; आणि त्याला, हिंदुस्थानचा समुद्र किनारा सोडून अंतर्प्रदेशांत जाण्याचा केव्हांही प्रयत्न करूं नये, एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या चाललेल्या भांडणांत हात घाल-ण्याचें टाळावें, आणि किनाऱ्यावरील इंग्लिशांचीं तटबंदीचीं सर्व ठाणीं पाडाव करण्यांत व त्यांच्या व्यापाराचा समूळ उच्छेद करण्यांतच आपल्या सर्व प्रयत्नांचें एकीकरण करावें, अशा सूचना दिल्या होत्या. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे, डुप्ले व बुशी यांच्या मार्गाचें अनुकरण न करण्या-विषयीं त्याला बजावून सांगितलें होतें. मुलूख वाढविण्याचे डुप्ले याचे बेत पुन्हां सुरू करावे, अशी फ्रेंच कंपनीच्या व्यवस्थापकांचीं बिलकुल इच्छा नव्हती; परंतु कारोमांडल किनाऱ्यावरून इंग्लिशांना कायमचें हांकलून देऊन तेथें आपलें व्यापारी वर्चस्व बिनधोक स्थापन करावें, आणि आपली गंगाजळीही पूर्व स्थितीवर आणावी, एवढीच मुख्यत्वें-करून त्यांची इच्छा होती.

लाली याच्या एका अगदीं अलीकडील चरित्रलेखकानें[1] फ्रान्समधील व्यवस्थापक मंडळाच्या ह्या विचाराबद्दल कांहींशी उतावीळपणानें टीका केली आहे. तो म्हणतो कीं, " राष्ट्रीय प्रगतीचीं कोडीं समजण्यापेक्षां हिंग जिरें तोलण्याचें काम करण्यालाच फ्रेंच व्यवस्थापक मंडळ अधिक लायक होतें; " आणि बुशीनें दक्षिणेंत संपादन केलेले विजय व हैद्रा-

१ तिब्यूल आमाँत.

बाद येथें प्रस्थापित केलेलें आपलें अतिशय दांडगें वजन, यांच्या तिखट मीठ लावून केलेल्या वर्णनाला तर त्यानें पुष्कळच महत्त्व दिलेलें आहे. मागें लिहिल्याप्रमाणें त्या वेळीं राज्य करीत असलेला निझाम सलाबत जंग याला बुशीनें आपल्या हाताखालीं असलेल्या फ्रेंचांच्या नौकरींतील भाडोत्री लष्कराच्या मदतीनें हैद्राबाद येथें गादीवर बसविलें होतें; फ्रेंच अधिकाऱ्यांच्या हाताखालीं असलेल्या शिस्तीच्या लहानशा सैन्याचा तो सेनापति होता; त्या सैन्याच्या खर्चाकरितां " उत्तर सरकार " ह्या नांवाचा सुपीक प्रदेश फ्रेंचांना तोडून दिलेला असून तोही त्याच्या ताब्यांत होता; आणि वरील सर्व कारणांमुळेंच त्या वेळेपासून त्या संस्थानांत त्यानें हळु हळु आपलें वजन वाढवीत परमावधीस नेलें होतें. इ. सन १७५३ च्या तहानंतर डुप्ले याचा पडता काळ आला, तरी पण त्यामुळें बुशीच्या ऐश्वर्याला कांहींही धक्का बसला नसून तो दक्षिणेमध्यें आपलें वजन एकसारखें वाढवीत चालला होता. परंतु एखाद्या परदेशस्थ धाडशी मनुष्याच्या हातीं अशा संस्थानांत लष्करी सत्तेचें सूत्रचालकत्व असलें, ह्मणजे त्या मनुष्याच्या उत्कर्षाविषयीं मत्सर व हालचालींविषयीं संशय हीं उत्पन्न झाल्याशिवाय कधींही रहात नाहींत; त्यामुळें निझामाचें प्रधानमंडळ अगर अमीर उमराव यांनींच फक्त नव्हे, पण प्रत्यक्ष निझामानेंही मराठ्यांबरोबर आणि इंग्लिशांबरोबरसुद्धां त्याचेविरुद्ध कारस्थानें चालविलीं होतीं; परंतु त्याची चिकाटी आणि कर्तबगारी यांमुळें प्रसंगोपात्त रक्तपातानेंही त्याला आपलें पूर्वींचें असलेलें वर्चस्व तसेंच कायम राखतां आलें. इ. सन १७५८ मध्यें त्यानें आपल्याविरुद्ध झालेला एक भयंकर कट नुकताच चिरडून टाकला होता, आणि इतक्यांतच ताबडतोब पांडेचरी येथें निघून येण्याबद्दल त्याला लालीकडून हुकूम मिळाला. त्यामुळें, जर लाली याच्या हुकुमाप्रमाणें आपण हैद्राबाद सोडून गेलों, तर आपल्या शत्रूंना तेथें पाहिजे तसें नाचण्यास अकंटक मैदान सांपडेल,–आणि जर आपण हैद्राबाद सोडलें नाहीं, तर आपणांला हुक-

माची अमान्यता केल्यापासून होणारे परिणामच फक्त भोगावे लागतील, इतकेंच नाहीं, पण कारोमांडल किनाऱ्यावर जर लाली हा यशस्वी झाला नाहीं, तर हैद्राबाद येथें असलेला फ्रेंच पक्ष आज नाहीं उद्यां पण खात्रीनें आणि कायमचा कांहीं झालें तरी नष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं,—अशा दुहेरी धोक्याच्या पेचांत तो या वेळीं गुरफटल्यासारखा झाला. परंतु लाली यानें बरीच कानउघाडणी केल्यानंतर बुशी यानें अत्यंत कष्टानें हैद्राबाद सोडलें. तथापि, आपल्या लहानशा तुकडीसह कारोमांडल किनाऱ्यावर जाऊन लालीला मिळण्यामुळें होणाऱ्या मदतीपेक्षां जर आपण हैद्राबाद येथेंच राहिलों, तर दक्षिणेंतील आपल्या ताब्यांत असलेल्या मुलखांतून फ्रेंच सैन्याला लागणाऱ्या सामग्रीचा पुरवठा करून आपण जास्त मदत करूं शकूं, व तीच खरी मदत होईल, असें त्याला स्वतःला वाटत होतें; आणि सर्व गोष्टी विचारांत घेतल्या, तर तें बरोबरही असावें, असें वाटतें. परंतु हीही गोष्ट निश्चयात्मक नव्हती. कारण, हें मात्र उघड होतें कीं, लालीचा मुख्य मुद्दा "इंग्लिश लोकांना हिंदुस्थानांतून हांकलून लावावें" हा होता; आणि "तसें झालें नाहीं, तोंपर्यंत हिंदुस्थानांत फ्रान्सला केव्हांही शांति अगर सुरक्षितता हीं मिळावयाचीं नाहींत," असें त्याचें म्हणणेंही अगदीं बरोबर होतें; त्यामुळें लढाई सुरू झाल्या वेळीं हैद्राबादसारख्या लांबीच्या ठिकाणाहून बुशी याला लालीला योग्य मदत करणें अशक्य झालें असतें. इंग्लिशांशीं दक्षतेनें आणि धोपट मार्गानें युद्ध करून त्यांना हतवीर्य करणें ही प्रधान गोष्ट वास्तविक रीत्या फ्रेंचांनीं अगदीं पहिल्यानें करावयास पाहिजे होती; कारण, त्यामुळें राज्यविस्ताराच्या वाढीचीं कोडीं सहज सोडविणें सोपें झालें असतें, आणि मागाहून फावल्या वेळीं तीं तशीं सोडवूनही घेतां आलीं असतीं. परंतु फ्रेंच लोकांच्या दुर्दैवानें लाली हा जरी अतिशय शूर, स्वार्थत्यागी आणि योद्धा होता, तरीही तो या कामाला अगदींच नालायक होता. फ्रेंच कंपनीच्या फ्रान्समधील व्यवस्थापकांनीं जेव्हां तेथील सरकाराजवळ लाली यास हिंदुस्थानांत

नौकरीस पाठविण्याकरितां त्याची मागणी केली, तेव्हां फ्रेंच सरकाराच्या लष्करी खात्याचा प्रधान मश्यू दार्जांसा यानें त्यांना असें बजावून सांगितलें कीं, लाली हा अत्यंत तापट, हेकेखोर, व चौदाव्या लुईच्या हाताखालील मार्टिनेटप्रमाणें राक्षसी शिस्तीचा सुलतानी शास्ता आहे; त्याला कोणी अगदीं यत्किंचित्सुद्धां विरोध दाखविला, तर मेघगर्जनेप्रमाणें तो जितक्या जोरानें गडगडेल, तितकेंच एखाद्या घोडचुकीकरितांही तो आकाश पाताळ एक करून टाकील; त्यामुळें त्याच्याविषयीं इतका द्वेष उत्पन्न होईल कीं, त्याच्या हाताखालचेच अधिकारी त्याच्यावर उलटतील, त्याला तोंडघशीं पाडतील, आणि त्याच्या नाशामुळें होणाऱ्या समाधानाकरितां त्याचीं सर्व कृत्यें मोडून काढतील. मश्यू दार्जांसा यानें केलेलें वरील भविष्य पुढें लवकरच अक्षरशः खरें झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तथापि कंपनीच्या व्यवस्थापकांनीं अत्याग्रह धरल्यामुळें लालीस हिंदुस्थानांत पाठविण्यांत आलें, व त्याचेबरोबर पुरेसें सैन्य आणि त्यांत लायक व अनुभवी माणसें देण्यांत आलीं. तें सैन्य विशेषतः हिंदुस्थानांत येऊन पोचलें, त्यापूर्वीं जर बारा महिने अगोदर येऊन पोंचलें असतें, तर निदान तात्पुरता तरी कारोमांडल किनाऱ्यावर इंग्लिशांच्या वसाहतींचा त्यानें पाडाव केला असता. आणि इ. सन १७५५ मध्यें जी स्वारी फ्रान्समधून करण्याचें ठरलें होतें, ती निदान इ. सन १७५६ मध्यें म्हणजे लढाई जाहीर झाल्यानंतर लवकरच जरी फ्रान्समधून निघाली असती, तरीही ती ऐन आणीबाणीच्या वेळीं हिंदुस्थानांत कारोमांडल किनाऱ्यावर येऊन धडकली असती. कारण, इ. सन १७५६ च्या जून महिन्यामध्यें बंगालचा नबाब शिराजुद्दौला यानें इंग्लिशांच्या त्या प्रांतांतील सर्व वखारी व किल्ले जप्त करून त्यांना कलकत्ता शहराच्या बाहेर हांकलून दिलें होतें, आणि आक्टोबरमध्यें आपल्या आंग्ल देशबांधवांना संकटांतून सोडविण्याकरितां व कलकत्याचा किल्ला "फोर्ट विल्यम" हा

आपल्या ताब्यांत घेण्याकरितां क्लाइव्ह हा कंपनीच्या सर्व निवडक सैन्या-सह व आरमारासह उत्तरेकडेस जाण्यास मद्रास येथून निघाला होता. हीं सैन्यें जेव्हां मद्रास येथून कलकत्त्यास पाठविण्यांत आलीं, तेव्हां तेथील कंपनीचा प्रेसिडेंट आणि त्याचें कौन्सिल यांना तेथील परिस्थितीचें पूर्ण ज्ञान होतें; युरोपांत लढाई जाहीर झालेली आहे, फ्रेंचांचें एक बलाढ्य सैन्य हिंदुस्थानांत येण्याच्या तयारींत आहे, जेव्हां तें पांडेचरी येथें लाली-सह किनाऱ्यावर येऊन पोहोंचेल तेव्हां बुशी हाही हैद्राबाद येथून निघून लढाईंत मदत करण्याकरितां त्याला येऊन मिळेल, आणि आपलें बंगाल-मध्यें पाठविलेलें सैन्य परत येण्याच्या पूर्वींच जर दोघांनीं मिळून हल्ला केला तर सर्व दक्षिण इलाख्याची स्थिति फार भयप्रद होईल, ही गोष्ट ते पूर्णपणें जाणून होते. तथापि त्यांनीं असाधारण शिताफीनें आणि सारासार विचारानें धाडस केलें, आणि क्लाइव्हच्या आधिपत्याखालीं तात्बड-तोब मदतीकरितां बंगालमध्यें सैन्य पाठविलें. कारण, त्यांना अशी आशा होती कीं, हें सैन्य तेथील भानगडी मिटवून फ्रेंचांचें सैन्य युरोपांतून हिंदुस्थानांत कारोमांडल किनाऱ्यावर येऊन पोंचण्यापूर्वींच तेथें परत येऊन दाखल होईल. आणि त्याप्रमाणें त्यांच्या धाडसाला योग्य तें फळही मिळालें. कारण, फ्रान्समधून कुमकेदाखल येऊं घातलेल्या सैन्याची निघण्याची तयारी इतकी दिरंगाईची आणि निघाल्यावरही प्रवास इतका सुस्तीचा होता कीं, इ. सन १७५८ च्या एप्रिल महिन्यापर्यंत लाली हा पांडेचरी येथें किनाऱ्यावर उतरला नव्हता.

परंतु इंग्लिशांच्या विरुद्ध मिळणारी संधि ह्या वेळेपर्यंत कायमची निघून गेलेली होती. इंग्लिशांनीं शिराजउद्दौल्याला कलकत्ता शहराच्या बाहेर हांकलून दिलें, इतकेंच नाहीं, पण त्यांनीं प्लासी येथें त्याच्या सैन्याची दाणादाण उडवून दिली, त्याला गादीवरून पदभ्रष्ट केलें, नबाबाच्या राजगादीवर त्याच्या ऐवजीं दुसऱ्या नबाबाची स्थापना केली, हिंदुस्थानां-तील अत्यंत श्रीमान असलेल्या बंगाल प्रांताचे ते धनी झाले, आणि त्यांनीं

त्या सर्व प्रदेशामधून फ्रेंच लोकांनाही घालवून दिलें. यामुळें थोडक्याच दिवसांनंतर क्लाइव्हला " बंगालमध्यें शांततेचें पूर्ण साम्राज्य नांदत आहे, " असें कळवितां आलें; आणि मद्रास शहराचें शौर्यानें रक्षण करण्याच्या कामीं सैन्य व संपत्ति या उभयतांची त्याला अतिशय जोराची मदत करतां आली. याशिवाय त्यानें फ्रेंच लोकांना त्यांच्या ताब्यांतील "उत्तर सरकार" ह्या नांवाच्या महत्त्वाच्या प्रदेशांतून हांकलून देण्याकरितां कर्नल फोर्ड याला पाठवून परिणामकारक घुलकावणी दाखविली. कर्नल फोर्ड यानें तें काम अतिशय शिताफीनें आणि यशस्वीपणानें केलें. फ्रेंचांच्या कामकाजाचें मुख्य ठिकाण मच्छलीपट्टण त्यानें हल्ला करून घेतलें. बुशीच्या वजनामुळें, व त्याच्याच ताब्यांत " उत्तर सरकार " हा प्रदेश होता त्यामुळें, ही लढाई चालू असतां फ्रेंचांना " अगणित द्रव्यबळ " मिळवितां आलें; पण तोच प्रदेश आतां कर्नल फोर्ड यानें सर करून घेतल्या कारणानें फ्रेंच सैन्यास त्या दिवसापासून त्याला मुकावें लागलें. कारण, हेच जिल्हे निझामानें बुशीला त्याच्या सैन्याच्या पगाराबद्दल तैनात ह्मणून दिलेले असल्यामुळें ते हातांतून गेल्यानें हैद्राबादच्या दरबारांत असलेल्या बुशीच्या वजनाला जोराचा धक्का बसला; त्यानें तेथें स्थापन केलेलें महत्त्व किती डळमळीत आहे, याचें खरें स्वरूप बाहेर आलें; आणि त्यामुळें पुढें लवकरच एकदम इतकें स्थित्यंतर घडून आलें कीं, हैद्राबादच्या दरबारांत असलेलें फ्रेंचांचें सर्व वर्चस्व पार कायमचें नाहींसें झालें.

मध्यंतरीं लाली हा हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर आपल्या लोकांसह येऊन दाखल झाला; " फोर्ट सेंट डेव्हिड " हा किल्ला तेथील लोकांनीं विशेष प्रयत्नानें न लढविल्यामुळें त्यानें आपल्या ताब्यांत घेतला; आणि संपत्ति व सामग्री यांचा जर त्याला तुटवडा आला नसता, व फ्रेंच आरमाराधिपति काउंट डाशे यानें जर त्याच्या मतांना मिळतें होऊन मदत करण्याचें नाकारलें नसतें, तर त्यानें थेट मद्रासवरही चाल केली असती. परंतु त्याच्या अंगांत हिकमतीचा अभाव असून स्वभावांत समतोलपणाही नव्हता.

सर्व मुलकी अधिकारी लांचखाऊ आहेत, असा त्याला संशय होता; पूर्वेकडील लोकांच्या भावना अगर चालीरीति यांविषयींची त्याला बिलकुल माहिती नव्हती; स्थानिक अनुभव आणि तद्देशीय शिपाईपेशा यांबद्दल मनांत असलेल्या ज्या अविचारी तिटकाऱ्यामुळें दुय्यम प्रतीचे सेनानायक वसाहतींतील व आशियांतील लढायांमध्यें पुष्कळदां नाश पावलेले आहेत, तशाच प्रकारचा तंतोतंत तिटकारा लालीच्याही मनांत पूर्णपणें वसत होता; आणि आपणाला संपत्ति मिळावी ह्मणून त्यानें तंजावरावर केलेल्या हल्ल्यानें कांहींही फायदा न होतां उलट तो अधिक अप्रिय होऊन त्याची सांपत्तिक स्थितिही विशेषच अडचणीची झाली होती. इंग्लिशांचीं लढाऊ जहाजें आतां कारोमांडल किनाऱ्यावर येऊन पोंचलीं होतीं; त्यांनीं फ्रेंचांच्या आरमाराबरोबर कित्येक अनिर्णयात्मक परंतु जोराचे सामने केले; त्यामुळें फ्रेंच जहाजांचें इतकें नुकसान झालें आणि त्यांचा आरमाराधिपती डाशे याची इतकी हिंमत खचली कीं, इ. सन १७५८ च्या सप्टेंबर महिन्यामध्यें त्याच्या पूर्वींच्या लाबुर्डोनेप्रमाणेंच त्यानेंही माघार घेतली; आणि लाली याच्या विनवण्या, निषेध, अगर संताप, यांपैकीं कशानेंही त्याचें मन न वळतां तो "आइल ऑफ फ्रान्स" येथें परत निघून गेला. आपण असें वाचलेलें आहे कीं, सर्व परिस्थिति पाहिल्यावर लाली हा उघड उघड असें म्हणत असे कीं, "जोंपर्यंत इंग्लिश लोक हिंदुस्थानांतून हांकलून दिले जात नाहींत, तोंपर्यंत हिंदुस्थानांत फ्रेंच लोकांचा पाय मजबूत होणें केव्हांही शक्य नाहीं;"

---

१ "हिंदुस्थानांतून इंग्लिश लोकांना हांकलून देण्याकरितांच मला माझ्या राजानें आणि त्याच्या प्रजेनें पाठविलें आहे. आम्ही लढाई करीत आहोंत, ती फक्त इंग्लिश राष्ट्राशींच करीत आहोंत, आणि त्याशिवायचे इतर सर्व हितसंबंध मला अगदीं परके आहेत."

लाली यानें लिहिलें पत्र.

हें तत्त्व निःसंशय बरोबर होतें, परंतु तें अमलांत आणण्यांत लाली यानें पुष्कळच घोडचुक्या केल्या होत्या.

ग्रंथकार.

व ह्याच कारणामुळें त्यानें बुशी याला हैद्राबादेहून निघून आपणाला येऊन मिळण्याबद्दल कळविलें होतें. परंतु बुशीनें हैद्राबाद सोडल्याबरोबर फ्रेंच लोकांचें निझामाच्या दरबारीं असलेलें सर्व वर्चस्व नाहींसें झालें; आणि तें त्यांना पुन्हां कधींही मिळवितां आलें नाहीं; उलट त्यानंतर लवकरच त्यांच्या ऐवजीं इंग्लिश लोकांनीं तेथें आपलें वजन बसविलें. बुशी हा आतां लाली याला हैद्राबादेहून येऊन मिळाला होता. त्यानें सर्व प्रकारच्या सबबी पुढें करून आणि कांहींशी लाचाची लालूचही दाखवून आपणाला हैद्राबाद येथें परत जाऊं देण्याबद्दल त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. उलट हाडवैर उत्पन्न होण्यासारखें उभयतांमध्यें कडाक्याचें भांडण झालें. त्यांत बुशीला भान न राहून तो लालीपासून फटकून राहिला. आणि त्यानंतर त्यानें या आपल्या दुर्दैवी सेनापतीची होणारी वाताहत टाळण्याचा काडी-इतकाही प्रयत्न केला नाहीं.

चोहोंकडून संकटांचा घेरा, उद्दिष्ट हेतु साध्य करण्याच्या साधनांचा अभाव, मुलकी अधिकाऱ्यांकडून होत असलेला द्वेष, आणि सैन्याचा त्याचेवरील अविश्वास, अशा स्थितींत वादळाच्या हंगामामुळें बाहेर गेलेलें इंग्लिश आरमार किनाऱ्यावर परत येण्याच्या पूर्वींच मद्रास काबीज करण्याच्या आशेनें लाली यानें जिवावर उदार होऊन त्या शहरावर चाल केली; परंतु तेथें इंग्लिशांनीं चांगला बंदोबस्त ठेविला असून अन्नसामग्री-चाही बराचसा सांठा करून ठेविला होता; उलट, लाली हा संपत्ति आणि सैन्य या दोन्हीही बाबतींत अतिशयच अडचणींत असून त्याला कुमक मिळण्याची कांहींही आशा नव्हती. त्याच्या सैन्यानें कच घेतली होती. आणि पांडेचरी येथें त्याला मदत करण्याच्या ऐवजीं त्याच्या विषयीं द्वेष मात्र अधिक वाढलेला होता. पांडेचरी येथील एका मोठ्या अधिकाऱ्यानें मश्यू कान्फ्लान्स याला पाठविलेलें जें एक पत्र इंग्लिशांनीं रस्त्यांतच पकडलें (ता. ४ सप्टेंबर १७५८), त्यावरून त्या वेळीं पांडेचरी

येथें निराशा कोणत्या थरास जाऊन पोहोंचलेली होती, याची कांहींशी कल्पना होते. लालीनें संतापून बुशीवर असा दोषारोप केला कीं, त्यानें पैशाची व प्रत्यक्ष मदत करण्याची टाळाटाळ करून तो आपल्या राजाला निमकहराम झाला. तथापि हीही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं कीं, बुशी हा लालीपेक्षां युद्धकौशल्यांत पुष्कळच अधिक निष्णात होता, व पूर्वेकडील लोकांकडून आपलें काम करून घेण्याची हातोटीही त्याला चांगल्याच प्रमाणानें साधलेली होती; परंतु उलट पक्षीं लाली हा नेहमींच संशयी व हट्टी असून त्याचा लवकरच नाश होण्याचीं चिन्हें उघड उघड दिसत होतीं. त्यामुळें अशा अधिकाऱ्याच्या हाताखालीं इंग्लिशांविरुद्ध लढाईंत सामील होण्यापेक्षां हैद्राबाद येथें स्वतंत्र रीतीनें आणि श्रीमंतींत राहणें त्याला पुष्कळच अधिक पसंत वाटत होतें.

पुढील बारा महिन्यांच्या अवधींत तर लालीची स्थिति फारच झपाट्यानें वाईट होत गेली. त्याची छावणी मद्रासजवळ पडली असतांना तेथून पांडेचरी येथील गव्हर्नरला त्यानें लिहिलेल्या पत्रावरून तो दुर्दैवी सेनापति हालअपेष्टेंत संतापानें कसे दांतओठ चावीत होता, हें समजून येतें. त्याच्याजवळील द्रव्य व दारूगोळा संपत चालला होता, आणि आसपासच्या प्रदेशांतून त्याला सामग्रीचा अधिक पुरवठा होणें शक्य नव्हतें. त्यानें शहराच्या तटाला असलेल्या एका भगदाडांतून मद्रासवर हल्ला करण्याची योजना आपल्या अधिकाऱ्यांपुढें मांडली; परंतु अशा रीतीनें हल्ला करून आपले जीव धोक्यांत घालण्याचें त्यांनीं नाकारलें, आणि त्याच्या युरोपियन सैन्यामध्येंही भयंकर बंडाळी माजली. तथापि तो तेथेंच टिकाव धरून राहिला होता; परंतु इतक्यांतच इ. सन १७५९ च्या फेब्रुवारी महिन्यामध्यें इंग्लिशांचें आरमार कारोमांडल किनाऱ्यावर परत आल्याचें जेव्हां त्याच्या सैन्याला कळलें, तेव्हां तर तें इतकें गर्भगळित झालें कीं, त्यामुळें त्यानें तांतडीनें आपला वेढा उठविला; परंतु या गोष्टीमुळें लढाईच्या परिणामाकडे डोळे उघडून पहात असलेल्या एतद्देशीय राजेरजवाड्यांमध्यें

फ्रेंचांच्या असलेल्या इभ्रतीला मोठाच धक्का बसला. ॲडमिरल डाशे हा आपल्या लढाऊ जहाजांसह मारीशस येथून परत आला, पांडेचरी येथें त्यानें कांहीं थोडीशी सामग्री पोंचती केली, आणि हिंदुस्थानांतील भावी फ्रेंच राष्ट्राला त्याच्याच नशिबाच्या हवाल्यावर सोंपवून तो कायमचा परत निघून गेला. इंग्लिशांची या वेळीं फ्रेंचांच्या बाह्य नाक्यांच्या ठिकाणांवर हल्ला करतां येण्यासारखी तयारी झालेली असल्यानें त्यांनीं हल्ला करून वांदीवाशचा महत्त्वाचा किल्ला सर केला होता. क्लाइव्ह यानें इ. सन १७५९ च्या जानेवारी महिन्यांत, ह्मणजे फ्रेंचांनीं मद्रास शहराचा वेढा उठविला त्या पूर्वीं, पिट याला इंग्लंडमध्यें एक पत्र पाठविलें होतें[१]. त्यावरून इंग्लि-

---

१ " जरी फ्रेंच लोकांनीं लालीबरोबर एक मोठें सैन्य देऊन त्याला गेल्या वर्षीं अत्यंत परिश्रमानें हिंदुस्थानांत पाठविलें आहे, तरीही फ्रेंचांचा फायदा होण्याला जर कांहीं खरोखरच अतिशय अकल्पित गोष्टी घडून आल्या नाहींत, तर हें वर्ष संपण्याच्या पूर्वींच कर्नाटकांतील त्यांच्या सत्तेचें प्राणोत्क्रमण होण्याची वेळ जवळ जवळ येईल, अशी मला खात्री आहे. आमच्या आरमाराचें श्रेष्ठत्व, संपत्तीची विपुलता, व ह्या प्रदेशांतून आमच्या किनाऱ्यावरील स्नेहीसोबत्यांना आमच्याकडून होत असलेला पुरवठा, यांविरुद्ध शत्रूंना यांपैकीं प्रत्येक गोष्टीची न्यूनता आणि त्या मिळविण्याकरितां अवश्य असणाऱ्या साधनांचा उघड उघड अभाव—अशा परिस्थितीचा जर आम्ही योग्य उपयोग करून घेतला, तर हिंदुस्थानांतिल त्या आणि इतर कोणत्याही प्रांतांत फेंचांचा सर्वस्वी नाश झाल्या शिवाय केव्हांही राहणार नाहीं."

वरील क्लाइव्हच्या पत्रांतील उतारा पांडेचरी येथील एका मोठ्या अधिकाऱ्यानें मानशियर कान्फलान्स याला ता. ४ सप्टेंबर इ. सन १७५८ रोजीं लिहिलेलें (आणि वर निर्दिष्ट केलेलें) जें पत्र इंग्लिशांनीं रस्त्यांतच पकडलें, त्या पत्रांतील खालील उताऱ्याशीं ताडून पाहण्यासारखा आहे.

"हर हर! काय ही आम्हां फ्रेंच लोकांची शोचनीय स्थिति !! आमच्या मनांत आह्मी किती तरी बेत योजून ठेविलेले आहेत !!! आणि फोर्ट सेंट डेव्हिडचा किल्लाही आम्ही जणूं काय सर करून घेतलाच आहे. ह्या आमच्या मनोराज्यांत दंग होऊन आह्मी किती तरी फसले गेलों आहोंत! मला माझ्या सेनापतीबद्दल कींव येते. त्याला कितीही बुद्धिवैभव असलें, तरीही अशा हीन स्थितींत त्याची खात्रीनें तारांबळ उडाली असेल! जवळ पैसा नाहीं, आरमार नाहीं, हाताखालील सैन्य असंतुष्ट, राष्ट्राची

शांची असलेली सागरी सत्ता आणि बंगाल ताब्यांत असल्यामुळें हातीं आलेलीं साधनें यांमुळें लालीची खात्रीनें पूर्ण धुळधाण उडवितां येईल, हें भविष्य त्याला खात्रीनें कळून चुकलें होतें, असें दिसतें, आणि त्याप्रमाणें एक वर्षाच्या आंतच तें खरेंही ठरलें. दोन्हीही सैन्यांनीं एकमेकांविरुद्ध कर्नाटकांत कांहीं महिने हालचाली केल्या; परंतु लालीनें बुशीच्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष करून वांदीवाश परत घेण्याचा आपलाच हेका चालविला. त्यामुळें कर्नल कूट यानें त्याच्यावर हल्ला केला. असा हल्ला करण्यांत त्यानें असा अंदाज बांधला कीं, फ्रेंच सैन्य वेढ्यामुळें एक ठिकाणींच खिळलें गेलें असल्यानें योग्य काळ वेळ पाहून पाहिजे तेव्हां त्याच्याशीं लढतां येण्यासारखी आपली स्थिति आहे; उलट, लाली याच्या मनांत जर आपल्याशीं लढाईला तोंड द्यावें असें आलें, तर थोडेंसें सैन्य खंदकाच्या संरक्षणाकरितां ठेवणें अवश्यक असल्यामुळें त्याला आपल्या सैन्याची विभागणी करणें भाग आहे. यानंतर झालेल्या लढाईमध्यें प्रत्येकाचें अजमासें दोन हजार युरोपियन बळकट सैन्य होतें. हें सैन्य लांब असतांना तोफांचा मारा करून व जवळ जवळ येत असतांना गोळ्यांचा वर्षाव करून आणि संगिनी भोंसकून एकमेकांशीं मोठ्या निकरानें आणि शौर्यानें लढलें. कूट व ड्रेपर यांच्या तुकड्यांशीं लारेन व लाली यांच्या तुकड्यांची गांठ पडून परस्परांनीं परस्परांवर निकराचा भडिमार केला; पण इतक्यांत फ्रेंच सैन्य घोटाळ्यांत पडतें न पडतें, तोंच इंग्लिश तोफखान्याचा अचुक भयंकर मारा सुरू झाला. त्यांच्या दारूगोळ्यांनीं भरलेल्या गाडीवर आग पडून तिचा भडका

इज्जत नाहींशी झालेली, स्वतःची अब्रू धोक्यांत आलेली, लढाईला प्रतिकूळ असे खडतर दिवस जवळ जवळ येत चाललेले, कसा तरी जीव जगविण्याकरितां आम्हांला पुष्कळ पैसे खर्च कर याची पडलेली अवश्यकता, आणि तो मिळविण्याकरितां तर कोणतीही हालचाल करणें अत्यंत अशक्य, अशा दुःखदायक संकटाच्या स्थितींत आमचें काय होणार! मी स्वतःबद्दल अगदीं बेफिकीर आहें; परंतु आमच्या कोणत्याही प्रयत्नाचें कांहीचेंही चीज होत नाहीं, याबद्दल मात्र मला खरोखर फारच खेद वाटतो.

(ता. ४ सप्टेंबर इ. सन १७५८.)

उडाला. कूट व ड्रेपर यांनीं आपल्या हाताखालील सैन्याची व्यवस्था ठेवण्यांत अतिशय कौशल्य दाखविलें, आणि बुशी याचा पाडाव होऊन वरील सर्व कारणांमुळें फ्रेंचांचा अगदीं पूर्णपणें पराजय झाला. दोन्हीही बाजूंचें एतद्देशीय सैन्य त्यांच्या सेनापतींनीं मागें ठेविलेलें होतें, आणि त्यांनीं ह्या लढाईंत फारच थोडा भाग घेतलेला होता. फ्रेंचांच्या नोकरींत असलेली मराठे लोकांची फौज बाहेरून बाहेरून घिरट्या घालीत होती, पण त्यांचा कांहींही उपयोग झाला नाहीं. लाली यानें नेटानें आणि त्याच्या नेहमींच्या निधड्या छातीनें फ्रेंच घोडेस्वारांची एक तुकडी घेऊन इंग्लिशांवर प्रत्यक्ष निकराचा हल्ला केला, परंतु तोही निष्फळ झाला. इंग्लिशांच्या उत्तम प्रकारच्या तोफखान्याच्या माऱ्यापुढें त्या घोडेस्वारांच्या पलटणीचा टिकाव लागेना. ह्मणून त्यानें आपलें वाताहत झालेलें सैन्य खंदकाच्या पाठीमागें एके ठिकाणीं जमविलें, आणि माघार घेऊन तो पांडेचरी येथें परत निघून गेला.

कांहींही झालें तरी फ्रेंचांच्या नशिबाला खावी लागलेली ही उलट त्यांना फारच घातक झाली. त्यांना आतां समोरासमोर लढाई करितां येणें शक्य नव्हतें; त्यांचीं सर्व मजबुतीचीं ठाणीं त्यांच्या हातांतून नाहींशीं झालेलीं होतीं; ज्या प्रांतांमधून त्यांना सामग्रीचा पुरवठा होत असे, तो प्रांतही हळूहळू शत्रूच्या हस्तगत झालेला होता; काऊंट डाशे यानें कारोमांडल किनाऱ्यावर पुनः आपलीं लढाऊ जहाजें आणण्याचें साफ नाकारलें होतें; त्यामुळें फ्रेंच आरमार पुनः केव्हांही त्या किनाऱ्यावर परत न येतां उलट इंग्लिशांचें समुद्रावर असलेलें आरमार जबरदस्त झालेलें होतें; आणि ताज्या रक्ताच्या नवीन नवीन तुकड्या इंग्लंडमधून येत चालल्या होत्या. अशा निराशाजनक स्थितीमध्येंच पांडेचरी येथील मुलकी अधिकाऱ्यांनीं लालीवर आग पाखडली व त्याला नाना प्रकारें दोष दिला. पांडेचरी येथें या वेळीं पुरेसें सैन्य व दारूगोळा नव्हता, आणि अशा

१ वांदिवाश येथील लढाई. इ. सन १७६० जानेवारी.

स्थितींतच सरते शेवटीं इंग्लिशांनीं जमीन व समुद्र ह्या दोन्हीही बाजूंनीं त्यांचें दळणवळण बंद केलें होतें[1]. फ्रेंचाना ह्या गोष्टीचा फारसा प्रतिकार करितां येणें शक्य नव्हतें. त्यांना चोहोंकडून शत्रूंनीं घेरलेलें होतें, त्यांची उपासमार होत चालली होती, आणि अशा स्थितींतच इ. सन १७६१ च्या जानेवारी महिन्यांत इंग्लिश ह्मणतील त्या अटींवर त्यांना इंग्लिशांच्या स्वाधीन होणें भाग झालें.

परिच्छेद दुसरा—लढाईचे परिणाम.

इंग्लिश व फ्रेंच यांचेमधील हिंदुस्थानांत चाललेल्या या युद्धकलहाचा इंग्लिशांनीं ज्या दिवशीं पांडेचरी सर करून घेतली, त्याच दिवशीं पूर्णपणें आणि अखेरचा निकाल लागला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. व्हाल्टेयरच्या ह्मणण्याप्रमाणें[2] पृथ्वीवरील ह्या भागांत फ्रेंचांचें ह्मणून जर कांहीं राहिलें असेल, तर त्यांनीं आपल्या कंपनीला जगविण्याकरितां चाळीस वर्षांहूनही अधिक काळपर्यंत मोठमोठ्या रकमा खर्ची घातल्याबद्दल वाटणारा खेद हाच फक्त होय. कारण, ही कंपनी व्यापार आणि लढाया या दोन्हीही बाबतींत सारखीच नालायक ठरली होती; तिनें कधींही फायदा मिळविला नव्हता; आणि आपले सावकार अगर भागीदार यांना खरें व्याज केव्हांही दिलें नव्हतें. ॲबे मोरले याला फ्रेंच सरकारानें कंपनीचे हिशोब तपासण्याकरितां नेमिलें होतें; त्यानें काढलेल्या आंकड्यांवरून असें सिद्ध करण्यांत आलें आहे कीं, इ. सन १७२५ आणि १७६९

१ "सैन्याला देण्याला जवळ पैसा नाहीं, आणि खाण्याला देण्याला जवळ अन्नही नाहीं, अशा स्थितींत आठशें फ्रेंच शिपाई आणि सातशें एतद्देशीय शिपाई यांचा बारा महिने समुद्रप्रवास आणि सतत तीस महिनेपर्यंत सारखे युद्धप्रसंग, या कारणांमुळें जी आपत्ति या वसाहतीवर येऊन पडेल म्हणून मी गेलीं दोन वर्षें अटकळ करीत होतों, ती आपत्ति शेवटीं एकदांची आतां खरोखरच येऊन कोसळली."—लाली यानें पांडेचरी येथील गव्हर्नरला पाठविलेलें पत्र. ता. ७ आक्टोबर १७६०.

२ ती गुप्त रीतीनें प्रजेच्या पैशाचा अपहार करूनच निव्वळ जगलेली होती. व्हाल्टेयर, पंधराव्या लुईचें चरित्र.

या दरम्यान १६,९०,००,००० फ्रांक इतकी कंपनीच्या मूळ भांडवलांतच तूट आली, आणि या कारणामुळेंच इ. सन १७७० मध्यें ही कंपनी मोडून टाकण्यांत आली. त्यानें आणखी असाही अंदाज काढला होता कीं, ह्या ४४ वर्षांत फ्रान्सच्या एकामागून एक झालेल्या प्रधानमंडळाकडून कंपनीनें आगाऊ म्हणून मागून घेतलेल्या सर्व रकमांची बेरीज केली, तर ती ३७,६०,००,००० फ्रांक होईल. परंतु हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ही कंपनी संपुष्टांत कशी आणतां येईल, याकडेच त्याचें सर्व लक्ष होतें, असें दिसतें. डुप्ले यानें राज्यविस्ताराच्या धोरणाचें अवलंबन करण्यापूर्वी जीं ठिकाणें फ्रेंचांच्या ताब्यांत होतीं, तीं सर्व त्यांना इ. सन १७६३ च्या तहानें खरोखरच परत मिळालीं होतीं; तथापि त्यांनीं त्या ठिकाणांना तटबंदी करूं नये, अगर बंगालमध्यें आपलें सैन्य ठेवूं नये, असा करार करून घेतला होता; म्हणजे त्यामुळें त्यांच्या युद्धशक्तीच्या नाडया जेथल्या तेथें दाबून टाकल्या जाऊन फ्रेंचांना उत्तर हिंदुस्थानांत कायमचा मज्जाव झाला, आणि समुद्र किनाऱ्यावरील कांहीं तटबंदीशिवायच्या मर्यादित ठिकाणांतच त्यांना राहणें भाग झालें. हिंदुस्थानांत व्यापारी अगर लष्करी वर्चस्व मिळविण्याला त्या वेळीं अत्यवश्यक असलेल्या अशा मुख्य दोन गोष्टी होत्या; त्या म्हणजे समुद्र किनाऱ्यावर वेळेला उपयोग होईल अशीं मजबूत व नाक्याचीं ठिकाणें स्थापन करणें, आणि युरोपशीं राजरोस दळणवळण ठेवतां येण्याला पुरेसें आरमार जवळ असणें, ह्याच होत. परंतु इंग्लिशांनीं सागरी सत्ता आपल्या हातची करून घेतलेली होती; उलट फ्रेंचांना तर जमिनीवर सुद्धां धड थारा राहिलेला नव्हता. तथापि फ्रेंचांच्या अपयशाचीं कारणें कांहीं व्यक्तींचें दुर्दैव अगर नालायकी (कारण तीं भरून काढतां आली असती) यांचे मुळाशीं सांपडणारीं नाहींत, तर इंग्लंड व फ्रान्स यांच्या त्या वेळीं झालेल्या कडाक्याच्या युद्धकलहाचा ज्या परिस्थितीच्या व्यापक एकीकरणानें निकाल लागला, त्यांतच तीं सांपडणारीं आहेत.

एका अर्वाचीन फ्रेंच ग्रंथकारानें[1] तर असेंही लिहिण्याचें धाडस केलें आहे कीं, जर लाली यानें त्याला फ्रान्समध्यें मिळालेल्या सूचना एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून दिल्या असत्या, डुप्ले याच्या पध्दतीचें अनुकरण केलें असतें, आणि बुशीचा कानमंत्र घेऊन वागला असता, तर हल्लीं इंग्लंडच्या राणीला "हिंदुस्थानची बादशाहीण" ह्मणून जो राजमुकुट आपल्या डोक्यावर चढवितां येत आहे, तो तिला तसा केव्हांही चढवितां आला नसता. परंतु लालीनें जरी डुप्ले याची पध्दत अंगीकारिली असती, अगर बुशीसारख्या धूर्त मनुष्याच्या सल्ल्यानें तो वागला असता, तरीही त्याला कांहीं फायदा झाला असता कीं नाहीं, याबद्दल बरीच शंका घेण्याला जागा आहे. कारण, हे उभयतांही कर्तृत्ववान् व शूर फ्रेंच सरदार, एतद्देशीय राजेरजवाड्यांत आपलें स्थापन केलेलें वजन आणि त्यांच्या संरक्षणाच्या हमीकरितां त्यांचे जवळ ठेविलेले लष्करी अधिकारी यांचा आधार, हाच हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व प्रस्थापित होण्याला भरभक्कम पाया आहे, असें मानीत असल्यामुळें त्यावरच ते विसंबून असत. परंतु एखाद्या लोखंडी पहारीनें भरभक्कम धोंडा उचलणें सुसाध्य होण्याला ज्याप्रमाणें अत्यंत मदत होते, त्याचप्रमाणें आशियाखंडामध्यें राज्यविस्तार करणें हें वर लिहिलेल्या दोन गोष्टींमुळें जरी सुसाध्य होण्याला अत्यंत मदत ह्मणून असलें, तरीही राज्याचा पाया घालण्याच्या कामीं मात्र त्याचा कांहींही उपयोग होणार नाहीं. कारण, त्याचा खरा पाया स्वदेशांतून ऐन निकडीच्या वेळीं खात्रीनें आणि जलदीनें मिळणाऱ्या पाठबळावरच नेहमीं अवलंबून असला पाहिजे. पण लाली याला याप्रमाणें पाठबळ नसल्यामुळें युरोपांत " सप्तवार्षिक युद्ध" सुरू असतां हिंदुस्थानांतून इंग्लिशांना हाकलून देणें ही गोष्ट त्याच्या शक्तीच्या अगर कर्तबगारीच्या बाहेरची झाली होती. डुप्ले याला परत बोलावून नेलें, लाबूर्डोने आणि डाशे हे दोघेही ऐन प्रसंगीं कारो-

---

१ तिब्यूल ॲमांत लाले तोलेंदल.

मांडल किनारा सोडून गेले, अगर लाली हा हेकेखोर आणि हट्टी होता, हीं कारणें फ्रेंचांना हिंदुस्थानला मुकावें लागण्याला झालेलीं नाहींत. दूरच्या प्रदेशांतील जोखमीच्या आणि धाडसाच्या कृत्यांत फ्रान्सनें नेहमीं आपलें आतिशय नैपुण्य जगाच्या निदर्शनास आणून दिलेलें आहे, आणि त्या गुणांचा अभाव हें फ्रेंचाच्या हातून हिंदुस्थान जाण्याला कारण झालें असें ह्मणणें तर केव्हांही अधिकच अप्रयोजक होईल. सतराव्या व अठराव्या शतकामध्यें अमेरिका आणि आशिया ह्या दोन्हीही खंडांत त्यांनीं केलेले शोध आणि धाडशी कृत्यें हीं त्यांच्या साहसी व दीर्घोद्योगी स्वभावाची पूर्ण साक्ष देत आहेत. सभोंवती असलेलें नालायक प्रधानमंडळ आणि आजूबाजूला असलेलीं सौंदर्यसंपन्न प्रिय पात्रें, यांच्या कुटिलतंत्रानें वागून आडमार्गानें जाणाऱ्या पंधराव्या लुईची आकुंचित आणि अव्यवस्थित युरोपियन राज्यपद्धति हीच गोष्ट युरोपांतील सतवार्षिक युद्धामध्यें हिंदुस्थानांतील वसाहती फ्रेंच लोकांच्या हातून नाहींशा होण्याला प्रमुखत्वानें कारणीभूत झालेली आहे. ह्याच राज्यपध्दतीमुळें ही लढाई संपण्याच्या पूर्वींच उत्तर अमेरिकेंतील वसाहती, आफ्रिकेंतील सर्व ठाणीं आणि वेस्ट इंडीजमधील कांही अत्युत्तम बेटें, हींही फ्रान्सच्या हातून नाहींशीं झालेलीं आहेत; जर्मनीवर पाठविलेल्या मोहिमेंत अपयश आलेलें आहे; आणि समुद्रांतही भयंकर नाश झालेला आहे. आणि म्हणूनच या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या, ह्मणजे लालीहूनही अधिक कर्तृत्ववान मनुष्य कारोमांडल किनाऱ्यावर त्या वेळीं असता, तरी त्याच्याही कपाळीं असेंच अपयशाचें खापर फुटलें असतें, हेंही अगदीं निःसंशय ठरल्यासारखेंच आहे.

सारांश, इंग्लंड यशस्वी होण्याला हिंदुस्थानांत जीं कांहीं प्रत्यक्ष स्थानिक कारणें झालीं, त्यांतील अगदीं पहिलें ह्मणजे बंगालमध्यें त्यांनीं मिळविलेला विजय हें असून त्यामुळें लढाईला अवश्य लागणारीं सर्व उपकरणें आणि हिंदुस्थानच्या अंतर्भागांत राज्यविस्तार व लढाया यांच्या

हालचाली करण्यास एक मजबूत आधारस्थान त्यांना मिळालें. उलट, फ्रेंचांची तिजोरी लवकरच रिकामी पडली, आणि मारीशस एवढेंच काय तें त्यांना आश्रयाला निर्भय स्थान राहिलें. दुसरें कारण ह्मणजे हें आहे कीं, इंग्लंडच्या सुदैवानें त्याला लष्करी बुद्धिवैभवाचा आणि हिंदुस्थानांतील राजकारणांत निरढवलेला असा सेनापति मिळाला होता. उलट, फ्रेंचांचा सेनापति इकडील परिस्थितीशीं अगदींच अपरिचित असून फ्रेंच लोकांच्या नेहमींच्या व्यवहारांत दिसून येणारें पौर्वात्य रीतरिवाजांचें पूर्ण अज्ञानही त्याच्या ठिकाणीं वास करीत होतें. त्यांच्या ईस्ट इंडिया कंपनीचें निघालेलें दिवाळें, फ्रान्समध्यें व बाह्य प्रदेशीं त्यांच्या कामकाजाच्या व्यवस्थेमध्यें माजलेले घोटाळे, युरोपांतील घातुक लढायांच्या पद्धतीमुळें वसाहती व व्यापार यांच्या हितसंबंधाची सतत होत चाललेली हानि, आणि ज्याच्या योगानें इंग्लिशांच्या जबरदस्त वर्चस्वापुढें समुद्रापलीकडील फ्रेंचाचीं सर्व ठाणीं असुरक्षित राहिलीं गेलीं तो त्यांच्या आरमारी सत्तेचा ऱ्हास--हा या सर्वांवरील कळस, यांमध्येंच, हिंदुस्थान फ्रेंच लोकांना आपल्या ताब्यांत कां ठेवितां आलें नाहीं, याबद्दलच्या मुळाशीं असलेल्या महत्त्वाच्या गोष्टी आणि प्रधान कारणें यांची मीमांसा पाहण्यास मिळते[१] इंग्लंडचें ह्या चाललेल्या धडपडीकडे कळकळीनें आणि पूर्णपणें लक्ष वेधलेलें होतें. व त्यांचें नेतृत्व आणि चालकत्व अत्यंत कर्तृत्ववान अशाच मनुष्याच्या हातीं होतें. उलट, इकडे फ्रान्समध्यें पंधराव्या लुईच्या अनियंत्रित राजसत्तेखालीं वाढलेल्या दरबारी मंडळाच्या अंगास बेदरकारीची कर्तव्यहीनता चिकटलेली होती, आणि एक दोन

१ इ. सन १७५५ आणि १७६२ या दरम्यान फ्रान्सनें एकंदर ३,८८० तोफा वाहून नेणारीं ९४ लढाऊ आरमारी जहाजें गमाविलीं, आणि इ. स. १७६२ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस फ्रान्सजवळ फक्त एकजात ८४ लढाऊ जहाजेंच काय तीं शिल्लक राहिलीं होतीं.

एसे आन ध हिस्ट्री ऑफ नेव्हल ॲडमिनिस्ट्रेशन. लेखक, लॅबर्ट, दी सेंट क्रोई. १८९२.

अधिकारी जरी कर्तृत्ववान होते, तरी ते बेजबाबदार असून शिवाय त्यांच्या प्रयत्नांना राजाचें पाठबळही चांगलेंसें मिळत नसे. पण इंग्लंडमध्यें अत्यंत अपूर्व होऊन गेलेला लढाईखात्याचा कर्तृत्ववान प्रधान विल्यम पिट यानें तेथील स्वतंत्र हवेंत वाढलेल्या जोमदार लोकांच्या अप्रतिहत उत्साहाचा ओघ वळवून तो योग्य मार्गाकडे लाविला होता. वर निर्दिष्ट केलेल्या कारणांमुळें, फ्रान्स व इंग्लंड या उभयतां सरकारांच्या वागणुकींत हा ढोबळ फरक असल्यानेंच इंग्लंडला हिंदुस्थानांत आणि इतर ठिकाणीं ह्या काळांत जय मिळाले, असें कांही फ्रेंच लेखकांनीं जें लिहिलें[2] आहे, तें बरोबर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अशा रीतीनें इतकी विपत्ति भोगल्यावर आणि इतकी निराशा झाल्या-वर दूरवरच्या प्रदेशांत वसाहती अगर आशियांत दिग्विजय मिळवून काय फायदे होणार आहेत, याबद्दल फ्रान्समध्यें तेथील जनतेला संशय येऊं लागणें स्वाभाविकच होतें. मांटेस्क्यूसारख्या करडया प्रधानाच्या हुकमानें थोडक्याच वर्षांपूर्वी फ्रान्समधून समुद्रापलीकडे जाण्याला तेथील लोकांना बंदी करण्यांत आली होती; आणि व्यापार व जलपर्यटण यां-पासून पुष्कळ प्रकारचे फायदे होतात, हें जरी त्याला माहीत होतें, तरीही त्यामुळें फ्रान्सची लोकवस्ती कमी होते, हें कारण त्यानें पुढें केलें होतें. वसाहती स्थापन करण्याच्या विरुद्ध अस्तित्वांत असलेल्या पक्षाचा व्हाल्टेयर हा आतां प्रमुख होता. त्यानें फ्रान्सच्या हातून कानडा गेला, हा फ्रान्सचा फायदाच झाला, असें उघड उघड बोलून दाख-विलें; थोडयाशा कमी अधिक बर्फाच्छादित जमिनीच्या तुकडया-

१ जेव्हां डयूक ऑफ स्वेझाई यानें पंधराव्या लुईला त्या वेळच्या फ्रेंच आरमाराच्या स्थिती-बद्दल आग्रहानें विनंति केली, त्या वेळीं पंधराव्या लुईनें त्याला खालील उत्तर दिलें. "माझ्या प्रिय मित्रा, तुझ्या जागीं पूर्वीं असलेल्या अधिकाऱ्यांइतकाच तूंही मूर्ख आहेस. तेही सर्व अधि-कारी तुझ्याप्रमाणेंच फ्रान्सला आरमार पाहिजे, असें मला सांगत असत; परंतु पेंटर व्हारनेट याच्या आरमाराशिवाय दुसरें आरमार फ्रान्सला कधींही मिळणार नाहीं."

लॉ हार्प.

२ इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या इंग्लंडमधील सरकारची राज्यव्यवस्था उत्तम असल्यामुळेंच ती यशस्वी झाली. हेनरी मार्टिन, फ्रान्सचा इतिहास.

करितां लढाया करण्याच्या मूर्खपणाबद्दल त्यानें तेथील सरकारचा उपहास केला; आणि पारीस व लंडन येथील रहिवाश्यांकरितां बुंद, तपकीर आणि मसाला, हीं मिळविण्यासाठीं केलेल्या रक्तपाताबद्दल त्यानें दुःखही प्रदर्शित केलें. त्यानंतर त्या शतकाच्या उत्तरार्धांत फ्रान्समधील मुत्सद्दी लोकांच्या आणि लेखकांच्या मनावर तात्त्विक राजकीय विचारांचा अधिक परिणाम झाला, तेव्हां रुसो यानें ऐषआराम व अर्वाचीन सुधारणा यांपासून भ्रष्टतेला नेणारे परिणाम उत्पन्न होतात, असें म्हणून व मोठमोठे दांडगे लेख लिहून त्याच बाजूचें समर्थन केलें. ह्या लेखकांच्या वर लिहिलेल्या गोष्टींकडे पाहण्याच्या दिशा भिन्न भिन्न असत, तरीही धार्मिक अधिकाऱ्यांची महत्त्वाकांक्षा आणि त्यांनीं आपल्या मतांचा अगर तत्त्वांचा विस्तार करण्याकरितां अनियंत्रित मार्गानें माजविलेले ढोंगधतुरे, यांवर कधीं तेजोभंग करणारे उपरोधिक वाक्प्रहार करण्यांत, तर कधीं निराशेमुळें आपली निव्वळ नापसंती दाखविण्यांत, त्या सर्वांचें एकमत असे. कानडा देशांत नाना प्रकारच्या धार्मिक पंथांची सत्ता पुष्कळच जोरांत होती, त्यामुळें धार्मिक हितसंबंधाचा राजकीय हितसंबंधावर अतिशयच पगडा असून त्यामुळें तेथील फ्रेंच गव्हर्नरची सत्ताही पुष्कळ वेळां दाबली जात असे. त्याचप्रमाणें इकडे हिंदुस्थानांतसुद्धां जेसुइट लाव्हूर यानें रचलेलीं दुर्दैवी लालीविरुद्धचीं कारस्थानें हींच त्याचा बदलौकिक आणि नाश घातुक रीतीनें जवळ जवळ ओढून आणण्याला कारणीभूत झालीं होतीं, ही गोष्टही आपण विसरतां कामा नये.

परंतु ज्या वेळीं फ्रान्समध्यें परदेशांतील व्यापार आणि दूरवरच्या वसाहती हातांतून गेल्यामुळें झालेल्या नुकसानीबद्दल तेथील लोक भूतदयेच्या वेदांततत्त्वाच्या नवीन उत्पन्न झालेल्या कल्पनांनीं आपलें शांतवन करून घेत होते, त्याच वेळीं इंग्लंडमध्यें अठराव्या शतकांत प्रचलित असलेल्या उदार विचारस्वातंत्र्याचा व उदात्त प्रगतिपर कल्पनांचा परिणाम आशियांतील इंग्लिशांच्या राज्यविस्तारावर उलट न होतां कांहींसा फायदेशीरच

होत होता. व्यापारापासून ज्याप्रमाणें धार्मिक आणि राजकीय बाबतींत सर्व जगभर स्वतंत्र विचार उत्पन्न झाले, त्याप्रमाणेंच त्यामुळें उत्पन्न झालेलीं उदार मतें आणि कार्यकारणभाव पाहून वागण्याची पद्धति यांनींही आपल्या परीनें व्यापाराला बरीच मदत केली; कारण ज्या चुकांनीं व दुराग्रहांनीं स्पेन, पोर्तुगाल व अंशतः फ्रान्स, यांच्या व्यापाराच्या साहसी व्यवसायाला धक्का बसला होता, त्या चुका होण्यापासून त्यामुळें इंग्लंडचें राष्ट्र अलिप्त राहिलें. अठराव्या शतकाच्या मध्यार्धाच्या सुमारास इंग्लंडच्या हिंदुस्थानांतील दिग्विजयांना सुरवात झाली होती; आणि त्या शतकाच्या अगदीं शेवटीं शेवटीं झालेला अत्युत्तम इतिहासकार जो लेके[1] त्याच्या म्हणण्याप्रमाणें, त्या वेळीं सुशिक्षित समाजामध्यें चोहोंकडे व्यापक प्रमाणावर तटस्थ वृत्ति पसरलेली असून त्यांत नास्तिकपणाचीही थोडीथोडी छटा दृग्गोचर होत होती. स्वधर्मांतील मतमतांतरें समान दृष्टीनें पाहण्याची संवय झाली, म्हणजे परधर्मीयांना आपल्या धर्मपंथाची दीक्षा देण्याचा प्रयत्न करण्याच्या भानगडींत कोणीही पडत नाहीं; आणि त्याप्रमाणेंच मूर्तिपूजक समाजाशीं व्यवहार करतांना धार्मिक आणि ऐहिक हितसंबंधाचा घोटाळा उडण्याला कांहींही जागा रहात नाहीं. हिंदुस्थानच्या ह्या धार्मिक वातावरणामध्यें युरोपियन लोकांना यापेक्षां अधिक योग्य अशी मानसिक तयारी मिळणें शक्य नव्हतें; आणि धार्मिक वर्चस्वाला बळी पडून केलेलें एखादें कृत्य अगर राजकीय दृष्ट्या गैर असलेलें एखाद्याचें सक्तीनें धर्मांतर करविल्याचें उदाहरण इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या कट्ट्या हाडवैऱ्यांनाही आजपर्यंत दाखवितां आलें नाहीं. म्हणजे, सर्व बाजूंनीं विचार केला असतां हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां झगडत असतांना इंग्लिश कंपनीला जीं कांहीं नैतिक स्थित्यंतरें फायदेशीर झालीं, त्यांपैकींच त्या काळच्या इंग्लिश लोकांची शांत आणि दिलदार वृत्ति हेंही एक होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१ लेकेकृत "हिस्ट्री ऑफ इंग्लंड इन दी एटींथ सेंचरी" हें पुस्तक पहा.

हिंदुस्थानच्या भूमीवर अशा रीतीनें फ्रेंच व इंग्लिश यांचेमध्यें तीन वेळां चकमकी उडाल्या, हें आपण पूर्वी वाचलेलेंच आहे. पहिल्या चकमकी-नंतर झालेल्या इ. सन १७४८ च्या ए-ला-शापेलच्या तहाच्या वेळीं भांडणें सुरू झालीं, त्या वेळीं ज्या स्थितींत दोन्हीही पक्ष होते, तीच स्थिति बहु-तेक कायम असून जर कांहीं थोडासा फायदा झालेला असला, तर तो इंग्लिशांनाच झालेला होता. दुसरी वेळ ह्मटली, ह्मणजे डुप्ले यानें जेव्हां आपले अवाढव्य राजकीय बेत सिद्धीस नेण्याची सुरवात केली, ती असून ह्या वेळेस इ. सन १७५४ सालीं चाललेली खाजगी लढाई ज्या अटींवर बंद केली होती, त्या अटी उभय पक्षांना बहुतेक सारख्याच फायद्या-गैरफायद्याच्या असून कदाचित् फ्रेंच लोकांचें स्थानिक वजन व स्थिति इंग्लिश लोकांहून अधिक प्रमाणांत वाढलेली होती. आणि तिसरा व शेवटचा प्रसंग ह्मटला, ह्मणजे युरोपांत राष्ट्राराष्ट्रांमधील चाललेलें युद्ध हा असून त्याचा इ. सन १७६१ सालीं झालेला शेवट हा कायमचा व कधींही न भरून येणारा असा फ्रेंच लोकांचे विरुद्ध झाला, तो होय. आणि हीच गोष्ट पुढें वीस वर्षांनीं सिद्धही झालेली आहे. इ. सन १७८१ मध्यें जेव्हां फ्रेंच लोक शेवटचे हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर आले, तेव्हां इंग्लिशांना कांहीं काळपर्यंत समुद्रामध्यें पुष्कळ गोष्टी प्रतिकूळ होत्या; युरोपमधील इतर समुद्रतीरस्थ राष्ट्रांबरोबर—ह्मणजे फ्रान्स, स्पेन, हालंड, यांचेबरोबर आणि शिवाय खुद्द इंग्लंडच्याच ताब्यांतील अमेरिकेंतील वसाहतींबरोबर—इंग्लंड एकटेंच झगडत होतें; आणि त्याच वेळीं इकडे हिंदुस्थानामध्येंही ह्मैसूरचा हैदरअली आणि दक्षिणचे मराठे यांचेबरोबर भानगडीच्या आणि अव्यवस्थित युद्धप्रसंगांत ते ओढले गेलेले होते. या उभयतांही सत्ताधाऱ्यांच्या ताब्यांत समुद्रपट्टीवरील बराच भाग होता, आणि ते दोघेही इंग्लंडचा शत्रू असलेला फ्रान्स याजबरोबर कारस्थानें करीत होते. संफ्रा याच्या तोडीचा कोणीही आरमाराधिपति फ्रान्समध्यें आजपर्यंत निर्माण झालेला नसून त्याच्याच हातीं या वेळीं फ्रेंच आरमाराचीं सूत्रें होतीं, आणि

मोहिमेमधील लष्करी सैन्य बुशीच्या हाताखालीं होतें. इंग्लिश सेनापतीच्या मानानें संफ्रा हा आरमारी कसबामध्यें पुष्कळच अधिक योग्यतेचा होता. परंतु त्याला असें आढळून आलें कीं, आपणाला हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर स्नेहभावाचें असें एखादें बंदर, अगर नांगरवाडा, आणि सामान सामग्रीचा पुरवठा होण्याला व वेळ पडल्यास जहाजांची डागडुजी करण्याला अनुकूळ असें एकही कायमचें ठाणें शिल्लक राहिलेलें नाहीं[1]. इ. सन १७७९ पर्यंत फ्रेंचांच्या सर्व वसाहती त्यांच्या हातून गेल्या होत्या, आणि सिलोनमधील त्रिकोमाळीचें अमूल्य बंदर एकच महिन्यापूर्वीं इंग्लिशांनीं डच लोकांपासून घेतलेलें होतें. इ. सन १७८२ मध्यें संफ्रा यानें तें इंग्लिशांपासून परत मिळवून घेतलें; परंतु त्या वेळीं त्यांचा मराठ्यांबरोबर तह झालेला होता; आणि कोणत्याही दृष्टीनें विचार केला, तरी बंगाल व अलाहाबाद पर्यंतचा वायव्येकडील सर्व सुपीक प्रदेश इंग्लिशांनीं ह्या वेळेपर्यंत मिळविलेला असल्यामुळें त्यावेळीं हिंदुस्थानांतील त्यांच्या राज्याचा पाया बराच भक्कम झाला होता; त्यामुळें एखाद्या लहानशा सैन्यानें हिंदुस्थानच्या आग्नेय दिशेकडील समुद्रकिनाऱ्यावर उतरून त्यांच्या राज्याचा पाया खिळखिळा करणें तर राहोच, परंतु तेथील स्थानिक नासधूस आणि तात्पुरता राजकीय घोटाळा याहून अधिक कांहींही परिणाम घडवून आणणें हें केव्हांही शक्य नव्हतें. तथापि संफ्रा याचा खरा उद्देश हा असावा कीं, अमेरिकेच्या वसाहतींतील बंडामध्यें जोंपर्यंत इंग्लंडचें सैन्य गुंतलेलें आहे, तोंपर्यंत पूर्वेकडील त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाला शह द्यावा, ह्मणजे त्यामुळें अनायासें आणि आपोआपच त्यांचें मोहरें दुसरीकडे फिरेल; परंतु इ. सन १७८३ मध्यें व्हर्सेल्स येथें इंग्लिश व फ्रेंच यांचेमध्यें तह झाला, ही बातमी संफ्रा यास कळल्यामुळें त्यानंतर त्याच्या हालचाली बंद पडल्या.

या कारणांमुळें, इ. सन १७६३ मध्यें पारिस येथें तह झाला, त्या दिवसापासूनच वास्तविक रीत्या इंग्लंडबरोबर हिंदुस्थानांतील व्यापार अगर

१ महानकृत "इनफ्ल्युअन्स ऑफ दी सी पावर इन हिस्ट्री" ह्या पुस्तकांतील पान ४२८ पहा.

विजय, या बाबतींत युरोपांतील समुद्रतीरस्थ राष्ट्रांची चालणारी चुरशीची स्पर्धा बंद पडली, असें आपणास खात्रीनें म्हणतां येईल. इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन राष्ट्रांमधील लढाईच्या परिणामावरून परिस्थितीचा अत्यंत बारकाईनें विचार करणाऱ्या मनुष्याला ही गोष्ट सहज कळून येण्यासारखी आहे कीं, जेथें पुष्कळ दिवस समुद्रप्रवास केल्यानंतरच जातां येतें, अशा एखाद्या दूरच्या प्रदेशांत जर दोन मोठ्या राष्ट्रांत परस्पर युद्धप्रसंग चालू असले, तर ज्या राष्ट्राचें आरमार बलिष्ठ असेल, तें राष्ट्र आपल्या प्रतिपक्ष्याचें दळणवळण बंद पाडूं शकतें, व त्याला होणारा पुरवठा आणि मिळणारी कुमक यांची रस्त्यांतच बोळवण करून प्रत्यक्ष त्याची उपासमारही करूं शकतें. युरोपांतील सप्तवार्षिक युद्धामध्यें इंग्लंडचें आरमार फ्रान्सहून पुष्कळच बलाढ्य होतें; त्यांनीं फ्रेंचांच्या आरमाराला सर्व समुद्रकिनाऱ्यावरून हांकलून दिलें होतें; हिंदुस्थानचा किनारासुद्धां त्यांना बंद करून टाकला होता; आणि त्यामुळें त्यांच्या किल्ल्यांतील लोक व संरक्षणाकरितां ठेविलेलें सैन्य हीं हळूहळू कमजोर होत जाऊन एकामागून एक इंग्लिशांच्या स्वाधीन झालीं होतीं, ही गोष्ट आपण पूर्वीं वाचलेलीच आहे. इ. सन १७६३ मध्यें हिंदुस्थानांत फ्रेंच राष्ट्राचा मागमूसही राहिला नाहीं. इ. सन १७७० च्या सुमारास त्यांच्या कंपनीचें दिवाळें वाजलें, यामुळें इंग्लंडच्या ईस्ट इंडिया कंपनीला कोणताही युरोपस्थ कांटा रस्त्यांत राहिला नाहीं, आणि तिनें हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला. ब्रिटिश राजसत्तेच्या उत्कर्षाच्या इतिहासांतील हा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे; कारण, त्यानंतर हिंदुस्थानांत वर्चस्व मिळविण्याकरितां इंग्लिशांना फक्त एतद्देशीय राजे महाराजे यांचेबरोबरच झगडावें लागलें आहे,—आणि या झगडण्याचा परिणाम इतका खात्रीचा, उघड उघड, व साहजिक दिसत असून कोणालाही त्याबद्दल अटकळ करतां आली असती, असाच वस्तुतः तो होता; कित्येकांनीं ती अगोदरच केलेली होती, आणि कांहींनीं तर मुद्दाम पूर्वींच भविष्यही वर्तवून ठेविलें होतें.

भाग सातवा.

बंगालमधील दिग्विजय.

परिच्छेद पहिला—क्लाइव्हची मोहीम.

(इ. सन १७५७)

हिंदुस्थानांत फ्रेंच व इंग्लिश यांचा संबंध कसा होता, हें संगतवार दाखविण्याच्या हेतूनें गेल्या भागामध्यें हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावरील हकीकतीची त्रोटक माहिती देऊन ती संफ्रा याच्या मोहिमेपर्यंत आणलेली आहे; त्यामुळें आतां बंगालमधील गोष्टींचें वर्णन करण्याकरितां कांहीं वर्षें पुन्हां मागें जाणें अवश्यक आहे.

ब्रिटिश सत्तेचा हिंदुस्थानांत उदय व तिचा प्रांतिक विस्तार या कालाचे सोइस्कर असे दोन भाग करतां येण्यासारखे आहेत; आणि जरी त्यांतील कांहीं काळ दोन्हीकडेही घेतां येण्यासारखा आहे, तरीही सर्व साधारणतः हे दोन्हीही भाग इंग्लिश राज्यसंस्थापनेमध्यें दोनच उघड उघड दिसणारीं व लागोपाठ घडलेलीं स्थित्यंतरें दाखवितात. व्यापारी नफा मिळविण्याच्या चुरशीनें युरोपियन राष्ट्रांराष्ट्रांमध्यें सुरू झालेल्या ज्या भांडणाचा शेवट हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर राजकीय वर्चस्व मिळविण्याकरितां कराव्या लागलेल्या युद्धांत झाला, तो पहिला काळ होय. सर्व सतराव्या शतकभर व्यापारी चुरस सारखी चालू होती; परंतु फ्रान्सबरोबर चाललेल्या ज्या कलहामुळें इंग्लंडला हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचा पाया घालतां आला, तो कलह वीस वर्षांच्या आंतच संपला; ह्मणजे इ. सन १७४९ मध्यें तो सुरू झाला, व इ. सन १७६३ मध्यें

वस्तुतः त्याचा निकाल लागला. ज्या वेळीं हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाडे यांचेबरोबर इंग्लिशांना कराव्या लागलेल्या लढाया ह्या व्यापारी वर्चस्व मिळविण्याकरितां, एखाद्या प्रदेशाचा तुकडा हातीं यावा ह्मणून, अगर समुद्र किनाऱ्याच्या कक्षेंत आपलें वर्चस्व ठेवतां यावें ह्या उद्देशानें, केलेल्या नसून हिंदुस्थानांत आपली सार्वभौम सत्ता प्रस्थापित व्हावी याच उद्देशानें फक्त त्या करण्यांत आल्या होत्या, तो दुसरा काळ होय; आणि ह्याच काळांतील हकीकतीचें आपण आतां पर्यालोचन करणार आहोंत. इ. सन १७५६ मध्यें, ह्मणजे ज्या वेळीं क्लाइव्ह आणि ॲडमिरल वाटसन हे बंगालच्या नबाबापासून कलकत्ता शहर परत घेण्याकरितां मद्रासहून निघाले, त्या वेळेपासून भांडणाची सुरवात धरली, तर पुढील पन्नास वर्षांतच ह्या भांडणाचा बहुतेक पूर्णपणें निकाल लागला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि सिंध व पंजाब काबीज होऊन हिंदुस्थानच्या नैसर्गिक सीमा ताब्यांत येईपर्यंत हें राज्यविस्ताराचें कार्य, जरी मधून मधून कांहीं काळपर्यंत त्यांत खंड पडत असे तरी, पुढील पन्नास वर्षांत मोठ्या झपाट्यानें चाललें होतें, असें मानणें चुकीचें होणार नाहीं.

इ० सन १७५७पासून इ० सन१८५७ पर्यंत, म्हणजे ज्या गेल्या शंभर वर्षांच्या अवधींत ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानांतील आपलें राज्य कमाविलें, त्या काळाचा इतिहास वाचणाऱ्या सामान्य वाचकवर्गाच्या एकदम लक्षांत येण्यासारख्या अशा दोन गोष्टी आहेत. त्यांपैकीं पहिली म्हटली म्हणजे त्यांनीं केलेले अचाट पराक्रम ही असून दुसरी ह्मणजे जिच्या योगानें ते पराक्रम सिद्धीस गेले ती विलक्षण सुलभता ही होय. हल्लीं जेव्हां इंग्लिश लोक आपल्या पश्चिमेकडील चिमुकल्या बेटांतून त्यांच्या हिंदुस्थानांतील समुद्रकिनाऱ्यावरील लहानशा व्यापारी वसाहतीमधून वाढीला लागून त्यांतून पूर्वेकडील एक मोठें भव्य राष्ट्र बनलेलें पाहतात, तेव्हां त्यांना आपल्या लहानशा उद्योगाचें एवढें मोठें बीज झाल्याबद्दल आश्चर्य आणि एक प्रकारचा विस्मय वाटणें स्वाभाविक आहे. नेहमींच्याच पद्धतीला

अनुसरून ह्मणावयाचें ह्मणजे ही गोष्ट इतिहासांत केवळ अपूर्व असून विशेषतः आधुनिक राजकारणविचारांना तर ती इतकी अपरिचित आहे —रोमन लोकांच्या विस्तृत प्रमाणाच्या पद्धतीवर मोठमोठीं टोलेजंग राष्ट्रें उभारणें ही गोष्ट पाश्चिमात्य लोकांच्या तर इतकी बिनसवईची झालेली आहे—कीं, ज्यांनीं हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याच्या प्रारंभींच्या गोष्टींचें मनन केलें आहे, त्या लोकांचाही, हें कांहीं तरी मानवी कल्पनेबाहेरचें अघटित कृत्य घडून आलें, असें मानण्याकडेसच कल असतो. केवळ सुदैवानें ज्याप्रमाणें एखाद्याला सोडतीमध्यें बक्षीस मिळावें, त्याचप्रमाणें इंग्लडलाही हे एवढे मोठमोठे प्रांत मिळाले, असेंच साधारणतः मानण्यांत येतें; आणि तेही सुद्धां अकल्पित योगायोगामुळेंच त्यांना जिंकतां आले, अशी समजूत करून घेण्यांत येते. इंग्लंड डोळे बांधून आंधळ्यासारखें चालत असतां राज्य मिळविण्याच्या मार्गाला तें चुकून ठेंचाळलें. त्या मार्गाचा शेवट अशा रीतीनें होईल, याची कल्पनाही नसतांना ब्रिटिश लोकांना सहजासहजीं हिंदुस्थानांतील राष्ट्राचा गड्डा सांपडला, आणि घडलेल्या गोष्टींच्या अनुरोधानेंच ते वागले असून प्रवाहांत घडघडत जाणाऱ्या एखाद्या गरगरीत गोट्याहून त्यांना भावी स्थितीचें अधिक कांहींही ज्ञान नव्हतें, असा त्यांना संशय येतो[1].

---

१ उदाहरणार्थः—"*The Expansion of England*" या पुस्तकाच्या कर्त्यानें आपल्या लिहिलेल्या पुस्तकांतील दोन स्वतंत्र परिच्छेदांत हिंदुस्थानच्या राष्ट्रासंबंधानें एक अत्यंत बोधप्रद असा प्रबंध लिहिलेला आहे, आणि त्यांत त्यानें ह्या सर्वसाधारण प्रचलित समजुतींवर आपलाही विश्वास असल्याचें दर्शविलें आहे. तो ह्मणतोः—

"इंग्लंडनें कमाविलेलें हें हिंदुस्थानचें राष्ट्र आंधळ्याच्या चुकून पडलेल्या हाताप्रमाणें यदृच्छेनें त्यांना मिळालेलें आहे. इंग्लिश लोकांनीं आजपर्यंत जीं जीं महत्कृत्यें केलीं, त्यांपैकीं एकही कृत्य हिंदुस्थानांत मिळविलेल्या दिग्विजयाइतकें साहजिक किंवा अकल्पित रीतीनें झालेलें नाहीं."

तो पुढें आणखी असेंही म्हणतो कीं:—"अशासारखी एकही गोष्ट पूर्वीं घडून आलेली नसल्यामुळें हिंदुस्थानांतील दिग्विजय ही एक आश्चर्यकारक गोष्ट आहे, ह्मणून

परंतु ह्या बाबतींत वर लिहिलेला जो सर्वसाधारण गैरसमज आहे, तो खऱ्या गोष्टी पुढें मांडून बदलतां येणें शक्य आहे, असें आपणास न्यायानें ह्मणतां येईल. जी जात लष्करी सामर्थ्य अगर सुधारणा यांमध्यें वरचढ असेल, त्या जातीला अगदीं लहानशा सैन्याच्या जोरावर हिंदुस्थान देश सहज जिंकून ताब्यांत ठेवितां येईल, ही गोष्ट अगदीं जुनीच असून एकदा तर ती प्रत्यक्ष घडूनही आलेली आहे. सोळाव्या शतकामध्यें मध्य आशियांतून बाबर बादशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली होती. त्यानें आपलें स्वतः-चें चरित्र मागें ठेविलें आहे, आणि तें विश्वसनीय व ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाचें असून आशियांतील कोणत्याही राज्यकर्त्यानें यापेक्षां अधिक मनोरंजक आत्मचरित्र लिहून ठेविलेलें नाहीं. तो ह्मणतोः—“ जेव्हां मी हिंदुस्थानावर पांचव्यानें स्वारी करून सुलतान इब्राहीम याचा नाश केला, व तेथील राज्य जिंकिलें, त्या वेळीं माझे नोकर, व्यापारी लोक आणि त्यांचे नोकर[1] व माझ्या बरोबर छावणींत असलेल्या माझ्या सर्व इष्टमित्रांचा लवाजमा मिळून सर्व लोकांची केलेली गणती बारा हजार होती. ”

तो पुढें लिहितोः—“ मी निश्चयाच्या रिकाबींत माझा पाय ठेविला; ईश्वरावरील भरंवसा हा लगाम हातीं घेतला; आणि दिल्लीचें तख्त व हिंदुस्थानचें राज्य हीं मिळविण्याकरितां निघालों; त्या वेळीं दिल्लीच्या सुलतानाचें पायदळ सैन्य एक लाख असून हत्ती एक हजाराहून अधिक होते, असें म्हणतात. ”

तो आणखी पुढें लिहितोः—“ अत्यंत श्रेष्ठ अशा परमेश्वरानें मी ज्या हालअपेष्टा भोगिल्या त्या फुकट न जाऊं देतां त्यांत मला यशस्वी करून

हिंदुस्थानांतील ईस्ट इंडिया कंपनीचें पुढील दीड शतकपर्यंत जे लोक सुकाणू फिरवीत होते, त्यांच्या मनांत अशासारखी एकही गोष्ट पुन्हां घडून येईल, अशी नुसती कल्पना येणें सुद्धां शक्य नव्हतें. ”

१ ह्मणजे मोदीखाना हा त्याच्या ह्मणण्याचा भावार्थ.

माझ्या हातून माझ्या प्रबळ शत्रूचा पराभव करविला, आणि हा धनसंपन्न देश जिंकवून मला त्याचें धनी बनविलें."

ही गोष्ट इ. सन १५२६ ह्या वर्षी घडली. बाबर याला पानिपत येथें मिळालेल्या जयामुळें सर्व उत्तर हिंदुस्थान त्याच्या ताब्यांत आलें, व त्यानें मोंगल राष्ट्राची संस्थापना केली. इंग्लिशांनीं जेव्हां बंगाल प्रांत, समुद्र हा रणभूमीचा पाया करून, आपल्या हस्तगत करून घेतला, तेव्हां त्यांच्या जवळ जीं साधनें व सामग्री होती, त्याहूनही कमींत त्यानें वास्तविक रीत्या हें महत्कृत्य तडीस नेलें आहे. त्याच्या मोहिमेच्या सुरवातीलाच पानिपत येथें त्यानें ज्या एका मोठ्या सैन्याची धूळधाण उडवून दिली, तें सैन्य, हिंदुस्थानांत इंग्लिशांना एक शतकाच्या युद्धकलेच्या अनुभवानंतर ज्या शीख सैन्याशीं दोन हात करावे लागले, त्याशिवायच्या इतर कोणत्याही सैन्याहून पुष्कळच अधिक प्रबळ होतें. जें पूर्वी झालेलें आहे, तेंच पुन्हाही करतां येण्यासारखें असून पुन्हा खरोखर होण्यासारखेंही होतें. कारण, परदेशांतून होणाऱ्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्याला सर्व हिंदुस्थान देश अगदींच असमर्थ होता. म्हणून जेव्हां अठराव्या शतकाच्या सुरवातीला मोंगल राष्ट्राचा ऱ्हास होत चाललेला स्पष्टपणें दिसूं लागला, आणि पुढें काय घडामोडी होतील म्हणून लोक तर्क वितर्क करूं लागले, त्या वेळीं शांत रीतीनें विचार करणाऱ्या मनुष्याच्या मनांत आतां हिंदुस्थानांत युरोपियन लोकच कदाचित् दिग्विजय मिळवितील, असे विचार घोळत असल्याचें आपणास आढळून येतें.

सतराव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास अवरंगझेब बादशहाच्या दरबारीं बर्नियर ह्या नांवाचा एक फ्रेंच वैद्य होता, त्याला ह्या गुरुकिल्लीचें पूर्वीच ज्ञान झालेलें असून, मश्यू दी कोंडे अगर मश्यू दी तुरेन यांना आपल्या वीस हजार सैन्यानिशीं सर्व हिंदुस्थान देश जिंकतां येईल, असें त्यानें आपल्या पुस्तकांत लिहिलेलें आहे; आणि फ्रान्सचा प्रधान कोलबर्ट याला त्यानें जें पत्र लिहिलें, त्यांत तर पहिल्यानें हिंदुस्थानांतील सुसंपन्नता आणि

दुसऱ्यानें बंगालचा कमकुवतपणा ह्या गोष्टींना त्यानें विशेषच महत्त्व दिलेलें आहे. याशिवाय इ. सन १७४६ मध्यें हिंदुस्थानांत वीस वर्षें राहिलेल्या कर्नल जेम्स मिल्ल ह्या नांवाच्या एका मनुष्यानें बंगाल प्रांत सर करून घेण्याची अतिशय सुसाध्य व पुष्कळ फायदेशीर अशी कल्पना आस्ट्रिया-च्या बादशहापुढें मांडली होती. तो ह्मणतो कीं, "सर्व हिंदुस्थान देश अगर मोंगल राष्ट्र हें इतकें कमकुवत आणि स्वसंरक्षण करण्याला इतकें असमर्थ होतें व आहे कीं, युरोपांतील ज्या राष्ट्राच्या हातीं समुद्रावरील सत्ता आहे, अशा एखाद्या राष्ट्राच्या राज्यकर्त्याच्या मनांत एका झटक्यानें आपल्या आणि आपल्या प्रजेच्या हातीं विपुल संपत्ति येईल अशा हिंदु-स्थानांतील प्रदेशावर अजूनही हात मारण्याचें कां येत नाहीं, हा एक विशेष चमत्कार आहे."...."मोंगलांची राज्यपद्धति वाईट आहे, लष्कर तर त्याहूनही वाईट आहे, आणि आरमारी सामर्थ्याविषयीं ह्मटलें तर हिंदुस्थानचे किनारे ताब्यांत ठेवून त्यांचें संरक्षण करण्याला त्यांच्याजवळ मुळींही आरमार नाहीं."...."बंगाल प्रांत हा हल्लीं बादशहाच्या बंडखोर प्रजेपैकीं एकाच्या ताब्यांतील राज्यांत असून त्याचें उत्पन्न अजमासें वीस लाखपर्यंत आहे. आणि तो जरी बादशाही सत्तेला काबीज करून घेतां येण्यासारखा नसला, तरी समुद्राच्या बाजूला असलेल्या हिंदुस्थानांतील इतर प्रदेशाप्रमाणेंच तेथेंही आत्मसंरक्षणाचीं कांहींसुद्धां साधनें नाहींत; त्यामुळें, खरें सुद्धां वाटणार नाहीं, एवढ्या मोठ्या संपत्तीसह तो प्रांत तेथील बंडखोर राज्यकर्त्याच्या हातून सहज हिसकावून घेतां येईल." इ. सन १७४६ मध्यें एखाद्या इंग्लिश मनुष्याला हिंदुस्थानाविषयीं इतकी बारिक माहिती असणें किती अशक्य होतें, हें आपण लक्षांत घेतलें, ह्मणजे कर्नल मिल्ल यानें तेथील परिस्थितीच्या प्रधान व वास्तविक गोष्टींबद्दल दाखवि-लेली दूरदृष्टि आणि परिस्थितीच्या मुळाशीं असलेल्या खऱ्या कारणांचें कुशाग्र बुद्धीनें केलेलें निरीक्षण, यांबद्दल त्याला श्रेय दिलें पाहिजे. त्यानें मुख्य मुख्य बाबतींचें मर्मज्ञपणें विवेचन केलें आहे. हिंदुस्थानच्या कायम-

च्या कमकुवतपणाचीं मूळ कारणें, त्यांतील डळमळीत अंत:स्थ राज्यस्थिति, आत्मसंरक्षण आणि बाह्य प्रतिकार यांच्या कांहींही तजविजी नसलेला समुद्रकिनारा, ह्या गोष्टी त्यानें अगदीं अचुक दाखविल्या आहेत. कर्नल मिल्लनें काढलेल्या ह्या कल्पना दहा बारा वर्षांच्या आंतच इंग्लिश लोकांनीं अमलांत आणल्या. यानंतर असें दाखविण्यांत येईल कीं, जेव्हां इंग्लिशांनीं बंगाल प्रांत काबीज केला, तेव्हां त्यांच्या राज्याची आणखी पुढेंही वाढ होत जाईल हें अगदीं स्पष्टपणें आगाऊच दिसत होतें, आणि त्या ठिकाणीं जे प्रत्यक्ष हजर होते, त्यांना ही गोष्ट अकल्पित तर वाटली नाहींच, पण उलट अपरिहार्य आहे अशी मात्र वाटत होती.

बंगाल प्रांतामध्यें पूर्वीं इंग्लिश लोकांच्या पुष्कळ दिवसांपासून व्यापाराच्या वखारी स्थापन झालेल्या असून त्यांनीं इ. सन १७१६ मध्यें मोंगल बादशहाकडून एक महत्त्वाचें फरमान अगर बादशाही हुकूम मिळविला, त्या अन्वयें आयात व निर्गत मालावर कायमची जकात ठरविली गेली, आणि बादशहाच्या हाताखालील मांडलिक नबाबांकडून त्यांच्या लहरीप्रमाणें व मनसोक्त उकळल्या जाणाऱ्या जबर करापासून त्यांचें संरक्षण झालें. बंगाल प्रांत हा एका सुभेदाराच्या ताब्यांत असून त्याला सर्वसाधारणत: "नबाब नाझीम" ही पदवी असे. तेथें नेमल्या जाणाऱ्या मनुष्याची सुभेदारी बादशहाच्या मर्जीवर अवलंबून असे, आणि तो आपणाला प्रबळ होऊं नये ह्मणून मोंगल राष्ट्रांत कुवत होती तोंपर्यंत बादशहा नेहमीं त्याला बदलीत असे. परंतु मोंगल सत्तेचा जसजसा ऱ्हास होत चालला, तसतसें दूरच्या प्रांतांवरील सुभेदारांचें स्वातंत्र्य अठराव्या शतकापर्यंत अधिक अधिक प्रमाणानें वाढत गेलें, आणि मराठ्यांनीं माजविलेली बंडाळी व मध्य आशियांतून उतरणाऱ्या टोळधाडी यांनीं जेव्हां मोंगल राष्ट्राची धांदलींत धांदल उडवून दिली, तेव्हां तर ते बादशाही सत्तेला अगदींच थोडा मान देऊं लागले, व दिल्ली येथें वसुलीच्या पाठविल्या जाणाऱ्या रकमाही अगदींच कमी कमी होत गेल्या. मुर्शिद-

कुलीखान ह्या नांवाच्या एका अतिशय कर्तबगार मनुष्याच्या कारकीर्दींत बंगालच्या सुभेदाराचें रूपांतर नेहमींच्या पद्धतीप्रमाणें वंशपरंपरेच्या नबाबींत झालें. परंतु इ. सन १७४२ मध्यें अलिवर्दीखान ह्या नांवाच्या एका मनुष्यानें त्याच्या नातवाला गादीवरून काढून त्याचा खून केला. अलिवर्दीखान हा अफगाण जातीचा एक धाडशी मनुष्य असून तो अगदीं हलक्या स्थितींतून बहार येथील नायबसुभेदाराच्या दरज्यापर्यंत वाढलेला होता, व वर लिहिल्याप्रमाणें त्यानें तरवारीच्या जोरावर "बंगालची नबाबी" मिळविलेली होती. त्याच्या चवदा वर्षांच्या करड्या अमलाखालीं परकीय व्यापाऱ्यांना कुरकूर करण्याला फारशी जागा नव्हती; कारण, जरी तो इंग्लिश, फ्रेंच आणि डच, यांच्या वखारींमधून मोठमोठ्या रकमा उकळीत असे, तरीही सर्व भांडणें जेथल्या तेथें दाबून टाकून आणि कोणीही केलेल्या अतिक्रमणाचा जागच्या जागींच प्रतिकार करून त्यानें त्यांचें संरक्षण केलेलें होतें, व चांगला बंदोबस्तही ठेविला होता. इ. सन १७५६ मध्यें अलिवर्दीखान हा मृत्यु पावला, आणि इंग्लिशांच्या इतिहासांत सिराजउद्दवला[१] या नांवानें ओळखला जाणारा त्याचा दत्तकपुत्र त्याच्या मागून गादीवर बसला. परंतु हा नबाब तरुण असून त्याच्या क्रूरकर्मी आणि संशयी स्वभावाला अनुभव अगर राज्यकर्त्यांच्या अंगांत अवश्य असणारें जन्मसिद्ध कर्तृत्व यांनीं आळा बसलेला नव्हता. इंग्लिश लोक हे आपल्या विरुद्ध प्रतिस्पर्धी होणें शक्य असलेल्या एका मनुष्याबरोबर त्याला गादीवर बसविण्यासंबंधानें पत्रव्यवहार करीत आहेत, असा त्याला संशय होता, आणि त्यामुळें तो इंग्लिशांचा पुष्कळ दिवसांपासून द्वेष करूं लागला होता.

फ्रान्सबरोबर लढाई होण्याचा रंग दिसत असल्यानें, आपली वसाहत आपलें संरक्षण करूं शकेल अशी तुह्मी तयारी ठेवावी, असें ज्या वेळीं इंग्लंडमधून कलकत्ता येथील इंग्लिश प्रेसिडेंटाला कळविण्यांत आलें,

१ ह्याचें खरें नांव चिरागउद्दौला हें असावें, असें ह्मणतात.

त्याच वेळीं नव्या नबाबाच्या नांवानें नुकतीच द्वाही फिरविण्यांत आलेली होती. अशा रीतीनें सूचना मिळाल्यामुळें इंग्लिश प्रेसिडेंटानें आपल्या बसाहतीची तटबंदी मजबूत करण्यास सुरवात केली. परंतु इंग्लिश लोकांना आपल्या ठिकाणची तटबंदी करण्याचा हक्क बंगालमध्यें मिळालेला नव्हता. शिवाय, त्यांनीं नुकतेंच नबाबाच्या एका जासुदाला बेधडक हांकलून लाविलें असल्यामुळें तोही चिडून गेलेला होता. ह्मणून नबाबानें तटबंदी करण्याचें काम एकदम बंद करा, असा सक्तीचा हुकूम सोडला. इंग्लिश प्रेसिडेंट ड्रेक याला भावी संकटाची कल्पना झाली नाहीं. त्यानें नबाबाला असा खुलासेवार जबाब पाठविला कीं, ही चाललेली तटबंदी फ्रेंचांच्या विरुद्ध आहे; कारण त्यांनीं शेवटच्या लढाईंत मद्रास शहर घेऊन मोंगल राष्ट्रासंबंधीं ठेवावयाच्या तटस्थ वृत्तीचा अनादर केलेला असून या वेळीं ते कदाचित् कलकत्ता शहरावरही हल्ला करतील. या जबाबाचा अर्थ सिराजउद्दवला यानें असा केला कीं, आपला आश्रय आणि श्रेष्ठ हुकमत यांबद्दल परदेशस्थ लोकांना अतिशय थोडा आदर वाटतो. त्यानें इंग्लिशांच्या कासीमबझार येथें आपल्या राजधानीजवळच असलेल्या वखारीवर अतिशय संतापानें हल्ला करून ती ताब्यांत घेतली, आणि आपल्या मोठ्या सैन्यासह तो कलकत्ता शहरावर चाल करून गेला. इंग्लिशांनीं थोडा वेळ आपलें संरक्षण केलें, परंतु शहराला तटबंदी नसल्यामुळें तेथील गव्हर्नर आणि दुसरे पुष्कळ इंग्लिश लोक जहाजांत बसून नदीच्या मुखाकडे पळून गेले, व बाकी राहिलेले माननीय वागणुकीच्या अटीवर त्याच्या स्वाधीन झाले. परंतु नबाबानें किल्ला सर करतांना त्यामध्यें जे लोक पकडले, त्यांना त्यानें एक तऱ्हेच्या "कैदी-कोठडी" मध्यें कोंडून ठेविलें. हिलाच कलकत्त्याचें "ब्लॅक होल" असें ह्मणतात. ह्या ठिकाणीं एक रात्र भयंकर हाल अपेष्टा भोगल्यानंतर १४६ माणसांपैकीं फक्त २३ मनुष्येंच काय तीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं जिवंत बाहेर पडलीं.

१ इ. सन १७५६.

मद्रास येथील इंग्लिश कंपनीच्या प्रेसिडेंटला ह्या उद्वेगजनक आणि भयंकर अनर्थाची बातमी समजल्याबरोबर त्यानें ॲडमिरल वाटसन याचे बरोबर आरमार आणि कर्नल क्लाइव्ह याचेबरोबर सैन्य देऊन त्यांना ताबडतोब बंगालमध्यें रवाना केलें. कलकत्ता शहर परत घेण्यालाच फक्त नव्हे, पण हुगळी शहराची तटबंदी पाडून तें हस्तगत करून घेण्याला, फ्रेंचांना चंद्रनगर येथून हांकलून देण्याला, आणि प्रसंगीं नबाबाची राजधानी मुर्शिदाबाद येथेंही चाल करून जाण्याला, हें सैन्य पुरेसें असल्याचा अंदाज करण्यांत आला होता. यासंबंधीं क्लाइव्ह यानें "कंपनीची त्या भागांत असलेली मिळकत आजपर्यंत कधींही झालेली नाहीं इतकी चांगली आणि अधिक चिरस्थायी करण्याच्या हेतूनेंच" मी निघालेला होतों, असें लिहिलेलें आहे. तो आणखी असेंही लिहितो कीं, "तो देश आणि तेथील हवापाणी यांचें मला जितकें भय वाटतें, तितकें नबाबाच्या सैन्याचेंही वाटत नाहीं." शिवाय मद्रास येथील सरकारच्या मनालाही या मोहिमेच्या परिणामाबद्दल फारशी धास्ती वाटल्याचें खरोखर दिसत नाहीं; परंतु लाली हा आपल्या फ्रेंच आरमारासह कारोमांडल किनाऱ्यावर येऊन पोंचण्यापूर्वींच बंगालमधील भानगडीचा निकाल लागावा, एवढ्याबद्दलच काय ती त्यांना आतुरता वाटत होती. क्लाइव्ह यानें कलकत्ता व हुगळी येथील किल्ल्यांच्या संरक्षणार्थ ठेविलेलें शत्रूचें सैन्य तेथून हांकलून लावण्यांत क्षणाचीही दिरंगाई केली नाहीं. नबाब त्याचेबरोबर सामना देण्याकरितां पुष्कळ मोठ्या सैन्यानिशीं चालून आला; उभयतांमध्यें थोडेंसें तडजोडीचें बोलणें झालें; पण त्याचा कांहींही उपयोग न झाल्यामुळें इंग्लिशांनीं कलकत्ता शहराजवळ नबाबावर हल्ला केला; ह्या हल्ल्याचा परिणाम अनिर्णयात्मक होता, तरीही त्यामुळें नबाबाचें इतकें धैर्य खचलें कीं, त्यानें इंग्लिशांबरोबरील तहावर सही केली. या तहाअन्वयें, बंगालमधील कंपनीचीं ठाणीं पूर्वींप्रमाणें त्यांच्याकडेसच रहावीं, असें ठरलें; शिवाय, नबाबानें त्यांच्या झालेल्या नुकसानीची आपण भरपाई करून देऊं असें वचन दिलें.

तथापि हा जुजबी तह अगदीं लवकरच मोडला. इंग्लिश सैन्याला मद्रास येथें तांतडीनें परत जाण्याला जरी अत्यंत बलवत्तर अशीं कारणें होतीं, तरीही फ्रान्स आणि इंग्लंड यांची आतां राजरोस लढाई सुरू झालेली असल्यामुळें कलकत्त्यापासून थोड्याशा मैलांवर असलेलें फ्रेंचांचें तटबंदीचें चंद्रनगर हें ठाणें त्यांच्या हातीं राहूं देऊन परत जाणें, हें इंग्लिशांना फारच धोक्याचें होतें, ह्मणून वाटसन आणि क्लाइव्ह यांनीं हल्ला करून तें सर केलें. नबाबानें पहिल्यानें ह्या गोष्टीला आपलें अनुमोदन दिलें. परंतु अगदीं अखेरच्या क्षणाला त्यानें तें परत घेतलें. बुशी याला आपलें संरक्षण करण्याकरितां हैद्राबादेहून येण्याविषयीं तो गुप्त रीतीनें पत्रव्यवहार करीत होता; नबाब हा अगदीं पहिली संधि मिळाल्याबरोबरच पुन्हां इंग्लिशांशीं सामना करण्यास सुरवात करील, याबद्दलही विशेषसा संशय नव्हता; आणि इकडे लाली हा तर आपल्या सैन्यासह कारोमांडल किनाऱ्यावर लवकरच येऊन धडकेल, असा रंग दिसत होता; ह्मणून वरील परिस्थितीमुळें मद्रास येथील गव्हर्नर बंगालमधून सैन्य परत आणण्याचा नेटानें आग्रह करीत होता.

कलकत्ता शहर कोणत्याही रीतीनें नबाबाकडून होणाऱ्या धोक्यापासून निर्भय केल्याशिवाय मद्रास येथें सैन्य पाठविणें शक्य नसल्यामुळें बंगालमधील इंग्लिश लोक दोहोंकडूनही भयंकर पेचांत येऊन पडल्यासारखे झाले. ह्मणून जेव्हां नबाबाच्याच दरबारांतील कांहीं असंतुष्ट सरदारांनीं ह्या बाबतींत बोलणें सुरू केलें, तेव्हां सिराजउद्दवला याला पदभ्रष्ट करण्याच्या आणि त्याच्या जागीं कटांतील अग्रणींपैकीं मिरजाफर या नांवाच्या एका मनुष्यास गादीवर बसविण्याच्या कटांत क्लाइव्ह हा सामील झाला. नंतर तो थेट नबाबाच्या प्रदेशावर चाल करून गेला. नबाब सिराजउद्दवला हा त्या वेळीं प्लासी येथें मोर्चेबंदी करून राहिलेला होता. त्याचे जवळ अजमासें १५ हजार घोडेस्वार, ३० हजार पायदळ, आणि ४० तोफा असल्याचें त्यांस आढळून आलें. थोड्याशा तोफांच्या सरबत्तीनें

लढाईस सुरवात झाली; फ्रेंच लोकांच्या हुकमतीखालीं असलेल्या एका तोफखान्याच्या तुकडीनें इंग्लिशांना पुष्कळ त्रास दिला. दुपार होते न होते तोंच नबाबानें समरांगणांतून पळ काढला, आणि त्याचें सैन्यही माघार घेऊं लागलें. परंतु तोफखाना मात्र जागच्या जागींच टिकाव धरून असल्यानें इंग्लिशांनीं त्याच्याकडे लगट केली; फ्रेंच लोकांना ते उभे असलेल्या ठिकाणाहून हांकलून देण्यांत आलें; आणि लागलीच शत्रूच्या मोर्चेबंदी छावणींतील अंतःस्थ रचना जेथून दिसत होती, ती उंचवट्याची जागा सर करून घेण्यांत आली. नंतर क्लाइव्ह यानें एका कोपऱ्यावर हल्ला केला, त्यामुळें नबाबाच्या सर्व सैन्याची दाणादाण होऊन तें सैरावैरा पळूं लागलें, आणि छावणीची सामग्री, तोफखाना व अजमासें पांचशें मनुष्यें तशींच तळावर मागें पडून राहिलीं. क्लाइव्ह यानें पाठविलेल्या खलित्यावरून असें कळतें कीं, "या लढाईंत इंग्लिशांच्या बाजूचीं चोवीस मनुष्यें ठार झालीं व ९० जखमी झालीं." लढाईच्या वेळीं मिरजाफर हा आपल्या पुष्कळशा घोडेस्वारांसह युद्धभूमीच्या आसपास घिरट्या घालीत होता, तो आतां ह्मणजे लढाईच्या दुसऱ्या दिवशीं क्लाइव्ह याला येऊन भेटला; "बंगालचा नबाब" ह्मणून त्याचा मानसन्मान करण्यांत आला; नंतर तो तांतडीनें बंगालची राजधानी मुर्शिदाबाद येथें ती ताब्यांत घेण्याकरितां निघून गेला; आणि त्यानंतर लवकरच त्यानें सुराजउद्दवला यास ठार मारविलें. सर्व बंगाल प्रांत शांततेनें नव्या नबाबाच्या आधीन झाला. दिल्लीच्या बादशाही सरकाराचें तख्त या वेळीं नुकतेंच अहमदशहा यानें आपल्या अफगाण सैन्यांच्या जोरावर आपलेंसें करून घेतलें होतें, त्यामुळें मोंगल दरबार बंगालच्या घडामोडींत हात घालण्याला अगदींच असमर्थ झालेलें होतें. अशा रीतीनें अकल्पित आणि जोराची राज्यक्रांति झाल्यामुळें बंगालमध्यें इंग्लिशांचें वर्चस्व तत्काळ स्थापन झालें.

परिच्छेद दुसरा—तत्कालीन एतद्देशीय सैन्यें.

प्लासी येथें इंग्लिशांनीं नबाबाच्या सैन्याची उडविलेली दाणादाण—कारण, हिला लढाई असें नांव क्वचित्‌च देतां येईल—ही, एका मोठ्या प्रांताच्या राज्यकर्त्याच्या धुरीणत्वाखालीं त्याच्या पुष्कळ संख्येच्या एतद्देशीय सैन्याविरुद्ध इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें आपलें सैन्य दुसऱ्यास तात्पुरतें उसनें देऊन उभें राहण्याचा ह्मणून नव्हे, तर निव्वळ शत्रु ह्मणून स्वतः-करितां उघड उघड सामन्याला उभें करण्याचा हा अगदीं पहिलाच प्रसंग असल्यानें विशेष महत्त्वाची आहे. हिंदुस्थानांतील इंग्लिश लोक आणि एतद्देशीय राजेरजवाडे अगर लष्करी सेनानायक यांचेमध्यें पुष्कळ दिवस आणि सतत ज्या लढाया चाललेल्या होत्या, त्यांतील वास्तविक रीत्या ही पहिलीच लढाई होय; आणि त्यामुळें अठराव्या शतकाच्या मध्यार्धांत स्वतः इंग्लिश लोकांना ज्या एतद्देशीय राजेरजवाड्यांशीं आणि त्यांच्या सैन्याशीं दोन हात करण्याचा प्रसंग आला, त्यांच्यांत खिळलेल्या मूळच्याच कम-कुवतपणाचें ढोबळ उदाहरणही याच गोष्टीवरून दृग्गोचर झाल्याशिवाय रहात नाहीं. इंग्लिशांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या अंगांत उपजत असलेला हा कम-कुवतपणा आणि आपल्या ताब्यांतील प्रदेशावर राज्य चालविण्याची अगर त्याचें संरक्षण करण्याची त्यांच्या अंगांत असलेली जन्मसिद्ध अपात्रता, यांवरून ज्या इंग्लिश लोकांना ह्या दोन्हीही गोष्टी सुसाध्य होत्या, त्यांनीं ह्या हिंदुस्थानसारख्या संपन्न आणि भरवस्तीच्या गजबजलेल्या, पण वास्तविक रीत्या योग्य शास्ता नसलेल्या, देशामध्यें आपला पाय झपाट्यानें कसा शिरकवून घेतला, याच्या कारणांची मीमांसा उघड उघड सिद्ध होते. शिवाय हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, बंगाल आणि दुसऱ्या समुद्र-किनाऱ्यावरील ज्या प्रदेशांत इंग्लिशांनीं सुलभ रीतीनें विजय संपादन केले, त्यांत हिंदुस्थानांतील अंतर्प्रदेशाइतकीं प्रतिकार करण्याचीं साधनें नव्हतीं. याचीं कारणें अंशतः केंद्रस्थानीं असलेल्या सत्तेचा ऱ्हास, ह्या प्रदेशांतील

जनसमूहाचा स्वाभाविक रीत्याच इतर प्रदेशांहूनही लष्करी सामर्थ्यामध्यें असलेला अधिक कमकुवतपणा, आणि या वेळीं कर्मधर्मसंयोगानें राज्यसूत्रें चालविणाऱ्या राज्याधिपतींचा अत्यंत दुबळा राज्यकारभार, हीं आहेत. शेवटच्या शेवटच्या मोंगल बादशहांच्या कारकीर्दींत त्यांचें सैन्य नेहमींच वाईट स्थितींत असे; तथापि अवरंगझेबाच्या मृत्यूपर्यंत समुद्र-किनाऱ्यावर स्वारी करणाऱ्या एखाद्या लहानशा सैन्याला मागें हटविण्याला तें अगदीं पुरेसें मजबूत होतें; इतकेंच नव्हे, पण बंगालमध्येंही जर जोर-दार आणि कर्तृत्ववान नबाब असता, तर क्लाइव्ह यानें प्लासी येथें जो झपाटा मारला, तसा प्रयत्नही घस सोसल्याशिवाय इंग्लिशांना करतां येणें शक्य नव्हतें. कारण, थोडक्याच वर्षांनंतर इंग्लिशांनीं पहिल्यानें दक्षिणेकडे हैदरअल्ली याच्या विरुद्ध आणि पश्चिमेकडे मराठ्यांच्या विरुद्ध स्वाऱ्या केल्या, त्यांत कर्तबगार मनुष्याच्या धुरीणत्वाखालीं हिंदुस्थानांतील शेलकें शेलकें सैन्य भयंकर प्रतिरोध करूं शकतें, असा त्यांना अनुभव आलेला आहे.

यावरून आपणाला असें समजावयाचें आहे कीं, इंग्लिश लोकांनीं पहिल्यापहिल्यानें ज्या सैन्यावर विजय मिळविले, तें सैन्य भाडोत्री शिपायांच्या बाजारबुणग्याहून विशेषशा अधिक किमतीचें नव्हतें, आणि त्यांत शिस्त अगर राजनिष्ठा हीं नव्हतीं. त्या वेळचें हिंदुस्थानांतील सैन्य हें बहुतेक भाडोत्री शिपायांचें अठरा धान्याचें कडबोळें असून तें लहान लहान टोळ्यांच्या पुढाऱ्यांनीं जमविलेलें असे; जो कोणी पैसा देण्याला समर्थ असेल, त्याला ते अशा सैन्याचा त्याऐवजीं पुरवठा करीत असत; या सैन्यांत तरवारी व भाले यांचा उपयोग करीत भटकत फिरणाऱ्या ज्या आशियांतील परदेशस्थ लोकांच्या टोळ्यांनीं सर्व हिंदुस्थान देश त्रस्त करून सोडला होता, त्यांपैकीं धरबंदाशिवाय नोकरीस ठेविलेल्या लोकांचाच मुख्यत्वें करून भरणा असे; सोळाव्या शतकांतील इतालीमधील राज्य-विषयक युद्धांत भाग घेणाऱ्या भाडोत्री सैन्याच्या "कांडोट्टोरी" या नांवा-नें ओळखल्या जाणाऱ्या टोळ्यांप्रमाणेंच हिंदुस्थानांतील या टोळ्यांमध्येंही

निकरानें लढाई करण्याची कुवत नव्हती. युरोपियन बंदुकीचा लगटीचा होणारा गोळ्यांचा वर्षाव हा त्यांना अगदींच अपरिचित होता; आणि योग्य रीतीनें जर तोफांचा मारा केला, तर त्याच्याशीं तोंड देण्याची त्यांच्यांत बिलकूलच ताकद नव्हती. शिवाय त्यांचे पुढारी बिनदिक्कत आपण घेतलेला पक्ष बदलीत; आणि ज्यांनीं त्यांना आपल्या कामाला लाविलें असेल, त्यांच्या विरुद्ध त्यांचाच विश्वासघात अगर पाडाव करण्याकरितां नेहमीं कटही करीत; त्यामुळें अशा प्रकारचीं सैन्यें हीं भित्रे अथवा मूर्ख राजे महाराजे, अगर नबाब सुभेदार, किंवा दुसऱ्यांचीं राज्यें बळकावून बसलेले लोक, यांच्या हातीं अत्यंत घातकी शस्त्राप्रमाणें असून या नोकरीस ठेविलेल्या आपल्या पटाईत सैन्यावरील असलेल्या अविश्वासानें लढाईवर जातांना त्यांचीं मनें बहुधा अस्वस्थ होत असल्यास त्यांत कांहींही आश्चर्य नाहीं. अठराव्या शतकामध्यें बादशाही सत्तेच्या बंडखोर प्रांतांपैकीं बहुतेक प्रांत अशा भाडोत्री सैन्याच्या पुढाऱ्यांनींच बळकाविलेले असून त्यांतील उत्तम लढवय्ये अफगाण लोक हे होते. त्यांचा नामांकित पुढारी अहमदशहा अबदल्ली हा अफगाण राष्ट्रांतील अतिशय बलिष्ठ योद्धा होता; आणि अठराव्या शतकामध्यें आशियांतील ह्या एकट्याच लढवय्या वीर पुरुषानें हिंदुस्थानावर स्वारी केली होती.

परंतु युरोपियन लोक हिंदुस्थानच्या रणक्षेत्रावर आले न आले, तोंच हे हिंदुस्थानांत नवीन आलेले लोक आजपर्यंत मध्य आशियामधून आलेल्या सर्व परकीय लोकांपेक्षां युद्धकौशल्यांत आणि त्याहूनही अधिक प्रमाणानें जूट, चिकाटी आणि शिस्तीची युद्धकला, यांत श्रेष्ठ आहेत, असें आढळून आलें; आणि वरील गुणांमुळें अशा एकवटलेल्या व सुधारलेल्या सैन्याला त्याच्या विसंगत आणि बेशिस्तीच्या प्रतिस्पर्ध्यांवर नेहमीं जय हा मिळालाच पाहिजे, असें सर्वसाधारणतः सिद्ध झालें. इंग्लिश अगर फ्रेंच यांचे विरुद्ध बंगाल व कर्नाटक येथील व्यसनी आणि खालावलेल्या नबाबांना रणक्षेत्रामध्यें बंडखोर शिपायांच्या घोळक्यापेक्षां अधिक कांहींही

आणतां येणें शक्य नसे; आणि हें त्यांचें सैन्य लढाईच्या पहिल्या धडाक्यालाच जिकडे तिकडे पांगलें जाऊन आपल्या पुढाऱ्याच्या पाठोपाठ मोठ्या धांदलीनें आपला जीव घेऊन पळत असे. याचा स्वाभाविक आणि तात्काळ परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानच्या लोकवस्तीपैकीं लष्करी पेशाचे असलेले लोक आपल्या पूर्वीच्या नोकऱ्या बदलून जे पुढारी त्यांना वक्तशीर पगार देत व हरहमेष लढायांत जय मिळवीत, जे नेहमीं लढाईच्या वेळीं अगदीं पुढच्या बाजूला उभे राहिलेले दिसत आणि जे आपल्या स्वदेशी निवडक सैन्यांसह शत्रूशीं मोठ्या निकरानें लढत, त्यांच्या निशाणाखालीं लवकरच येऊन मिळाले. इंग्लिशांचें स्वतःचें सैन्य हें, ज्या लोकांचा सैन्यांत भाडोत्री नोकरी करण्याचाच धंदा होता व जे त्या दिवसांमध्यें सर्व हिंदुस्थानभर भटकत फिरत होते, अशा असंख्य लोकांमधून (अशा लोकांची संख्या, त्या वेळच्या विश्वसनीय लोकांच्या गणतीवरून, जवळ जवळ वीस लाखपर्यंत होती, असें सिद्ध झालेलें आहे,) नोकरीस ठेविलेलें असून तें हळूहळू तरबेज केलेलें होतें. कागदोपत्रीं असा दाखला आहे कीं, पुष्कळ लांबवर कुच करावें लागण्याचा सुमार दिसल्यावर

---

१ ज्यांनीं आपल्या शौर्यानें हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या सुरवातीच्या सर्व लढाया जिंकल्या, तें "निवडक सैन्य" नाना प्रकारच्या लोकांच्या भेसळीचें बनविलेलें होतें. जनरल स्मिथ यानें एका कमिटीपुढें "ईस्ट इंडिया रिक्रूटिंग बिल" यावर साक्ष देत असतांना हाउस आफ कामन्सला असें सांगितलें कीं, "इ. सन १७६९ मध्यें जेव्हां मी हिंदुस्थानांतून निघालों, त्या वेळीं बंगालमधील आमचें युरोपियन सैन्य हें मुख्यत्वेंकरून लंडनच्या आसपास जमविलेलें असून त्यांतील बरेचसे लोक अगदीं अधोगतीस पोंचलेल्या वर्गांतील होते, व मुख्यत्वेंकरून १७ वर्षांच्या आंतील मुलें अगर ४० ते ६० वर्षांपर्यंतच्या उतार वयाचीं माणसें आणि सैन्यांत भरती करण्या ऐवजीं दवाखान्यांत पाठविण्याला अधिक योग्य असे लोक त्यांत होते, या गोष्टीचा विचार केला असतां तें पुष्कळच शिस्तीचें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं." तो पुढें असें ह्मणतो कीं, "एतद्देशीय शिपाईही बहुतेक पुष्कळच चांगले आहेत."

पार्लमेंटरी डीबेट, इ. सन १७७१ एप्रिल.

जरी पायदळ शिपायांच्या "झुंडीच्या झुंडी" सैन्यांतून फरारी होत, तरीही ते पाहिजे तितके नोकरी करण्यास मिळत, आणि हिंदुस्थानांतील उत्तम घोडेस्वारांच्या पलटणी, (अफगाण, तार्तर, इराणी अगर मराठे, या लोकांच्या) सहा आठवडे पहिल्यानें सूचना मिळाली कीं, हव्या तितक्या मिळूं शकत, आणि "त्यांतील पुष्कळ तर प्रत्यक्ष शत्रूच्या गोटांतूनही येत असत." तथापि ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याधिकाऱ्यांची मुख्यत्वें करून आपल्या पायदळ सैन्याकरितां हिंदुस्थानांतील एतद्देशीय लोकांवरच भिस्त असल्याचें दिसतें. कारण, ते लोक बहुधा आपल्या अन्नदात्याशीं इमानानें वागत, आणि मध्य आशियामधील आडदांड लोकांपेक्षां शिस्तीला अधिक मान देत. इंग्लिश सरकारनें गेल्या शंभर वर्षांच्या काळांत एतद्देशीय शिपायांचें धैर्य आणि राजनिष्ठा यांवर जो भरंवसा टाकला, त्याचें त्यांनीं योग्य चीज करून दाखविलें आहे. तोफांना भक्कमपणें चिकटून राहणाऱ्या लोकांचा तोफखाना, लाल डगल्याच्या थोड्याशा गोऱ्या पलटणी, उत्तम कवाइत शिकलेल्या काळ्या लोकांच्या पायदळ सैन्याची एक जोरदार तुकडी, आणि कांहीं शेलक्या एतद्देशीय शीघ्रगामी घोडेस्वारांची पलटण, एवढीच काय ती कंपनी सरकारची लढाईची मिश्र सामग्री असून दक्षिण हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रतिस्पर्ध्यांचा निकाल लावण्याला त्या सैन्याला फक्त योग्य सूत्रचालकाचीच काय ती जरूरी होती.

त्या काळच्या एतद्देशीय सैन्याबद्दल मागें जें निरीक्षण केलें आहे, त्यावरून हिंदुस्थानांतील आपल्या प्रतिपक्ष्याबरोबर अगदीं पहिल्यापहिल्यांदां लढाया करून त्यांत इंग्लिशांनीं जे जय मिळविले, आणि मुख्यत्वेंकरून बंगाल व समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या इतर प्रांतांत जो दिग्विजय केला, तो इतक्या जलदीनें कां झाला, याचा उलगडा होण्याला मदत होईल. ज्यांचा राजे होण्याला खरा हक्क ह्मणजे आपल्या बुद्धिवैभवानें दुसऱ्याचें बळकावून बसणें हाच असे, असे परदेशांतील वंशाचे हाताबोटावर मोजतां

१ ई. इं. रिकार्डस.

येण्याइतके औट घटकेचे राज्यकर्ते यांना पालथें घालणें, आणि ज्या भाडोत्री सैन्याच्या मोठ्या जमावाला नेहमीं आपणाला मिळणाऱ्या तनख्याहून लढाईमध्यें कांहींही अधिक रहस्य वाटत नसे, त्यांची आपल्या शिकलेल्या काळ्या व गोऱ्या सैन्याच्या तुकड्यांकडून वाताहत लावणें, एवढेंच काय तें इंग्लिशांना हिंदुस्थानांत करावयाचें होतें. पश्चिमेकडून सर्व प्रदेशभर मराठे लोक हिंदुस्थानांत वर पसरत चालले होते, आणि उत्तरेकडून अफगाण लोकही खालीं शिरत चालले होते. त्यांनीं चालविलेली लुटालूट आणि जोरजुलूम यांनीं सर्व अंतर्प्रदेशाची नासाडी झाली होती; व्यापार आणि शेती हीं निकृष्ट स्थितींत आलीं होतीं; आणि लष्करी कमकुवतपणा व सांपत्तिक अडचणी यांमुळें लहान लहान सत्ताधाऱ्यांची स्थिति तर इतकी डळमळीत झाली होती कीं, स्वारींतील-किंबहुना लढाईंतीलही-एखाद्या पराजयानें त्यांचा नाश होऊं शकला असता. तथापि हिंदुस्थानांतील बाहेरच्या बाहेरच्या प्रदेशांत सहज यश मिळविण्याचा हा सुकाळ फार दिवस टिकला नाहीं. कारण, यापुढें आपणाला असें आढळून येईल कीं, जसजसे ब्रिटिश लोक हिंदुस्थानच्या आंत आंत जाऊं लागले, तसतशी त्यांची गति अधिक अधिक शिथिल होत गेली, आणि कांहीं वेळ तर ती खरोखर अगदींच बंदही पडली. अंगांत कर्तबगारी नसलेल्या बंगाली नबाबाहून अतिशयच निराळ्या प्रकारचे प्रतिस्पर्धी—ह्मणजे मराठे—इंग्लिशांशीं पूर्वींच सामना देण्याला उभे राहिले होते; त्यांच्यामध्यें दांडगें राष्ट्रीय तेज चमकत होतें; कांहींसें राजकीय स्थैर्य वास करीत होतें; आणि त्यांची लष्करी घटनाही भयंकर स्वरूपाची जोरदार होती. त्या वेळीं बाळाजी बाजीराव ह्या प्रख्यात पेशव्याच्या कारकीर्दींत त्यांच्या वर्चस्वाचा कळस होत चालला होता; त्यांनीं पुष्कळ मोठमोठे प्रांत जिंकलेले होते; ते उत्तर हिंदुस्थानामध्यें आपला पाय रेटीत पुढें चालले होते; मध्यप्रांतावर त्यांनीं आपला अंमल पूर्णपणें बसविला होता; आणि ज्या वेळीं त्यांचें एक सैन्य निझामाच्या राज्याचे लचके तोडीत होतें, त्याच वेळीं त्यांचें दुसरें सैन्य कर्नाटक व

म्हैसूर येथून जबर खंडणी उकळीत फिरत होते. परंतु सर्व मुसलमान राज्यकर्त्यांना कमकुवत करून आणि विशेषतः हैद्राबाद येथील बुशीच्या लष्करी वर्चस्वावर दाब बसवून त्या वेळीं इंग्लिशांबरोबर नेहमीं सख्यत्वानें असणाऱ्या मराठ्यांनीं आजपर्यंत केलेलीं कृत्यें हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्यवृद्धीला फारच उपयोगी पडलीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर असें मत होण्याला पुष्कळ जागा आहे कीं, मोंगल राष्ट्राचा ऱ्हास होण्याच्या वेळीं जर हिंदुस्थान देश त्याच्या नशिबाच्याच हवाल्यावर सोडून दिला असता, आणि जर युरोपियन लोक त्या क्षेत्रांत लागलेच येऊन दाखल झाले नसते, तर सर्व दक्षिण आणि मध्य हिंदुस्थान मराठी राज्याच्या अमलाखालीं गेलें असतें.[१] इंग्लिशांना आपल्या स्वतःच्या शक्तीची योग्य वाढ होईपर्यंत अशा बलिष्ठ प्रतिस्पर्ध्या-बरोबर दोन हात करावे लागले नाहींत, हें त्यांचें मोठें सुदैवच होय; आणि आणि हेंही उघडच आहे कीं, इंग्लंड आणि हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाडे यांचेमध्यें हिंदुस्थानच्या वर्चस्वाचें बक्षीस मिळविण्याकरितां पुढील काळांत जे झटापटीचे सामने झाले, त्यांमध्यें इंग्लिशांना युद्धाला आव्हान करणारी इतरां सर्वांपेक्षां जास्त भीतिदायक अशी जर कोणती सत्ता असेल, तर ती ही ह्मणजे फक्त " मराठा " हीच होय.

---

१ "युरोपियन सत्ता जर मध्यें ढवळाढवळ करण्याला नसेल, तर 'मराठे' हे सर्व मोंगल राष्ट्राला पुरून उरण्यासारखे आहेत, अशी आमची समजूत आहे."

मद्रास येथील प्रेसिडेंट व त्याचें कौन्सिल यांचें पत्र. अक्टोबर इ. सन १७५६.

भाग आठवा.

बंगालमधील परिस्थिति.

परिच्छेद पहिला—त्या प्रांताचे नैसर्गिक गुणदोष.

इ. सन १७५७ मध्यें क्लाइव्ह याला प्लासी येथें जय मिळाल्यानंतर बंगालमध्यें इंग्लिशांनीं आपलें लष्करी वर्चस्व प्रस्थापित केलें, या गोष्टीचा हिंदुस्थानांतील त्यांच्या स्थितीवर अतिशय आणि दूरवरचा परिणाम झाला. इंग्लिशांचीं साधनें इतकीं वाढलीं कीं, हिंदुस्थानांत फ्रेंच लोक पराभूत होतील, हें यापुढें नक्की ठरलें; कारण, समुद्राच्या बाजूनें लालीचें दळण-वळण बंद पडल्यामुळें समुद्रकिनाऱ्याच्या चिंचोळ्या पट्टींतच आपला बचाव करण्याचे त्याचे ज्या वेळीं निष्फळ प्रयत्न चालले होते, त्याच वेळीं गंगा नदी-च्या मुखाजवळील त्रिकोणाकृति प्रदेशांत आणि तिच्या कांठीं असलेल्या खालच्या सुपीक मळईच्या जमिनीच्या प्रांतांत इंग्लिशांनीं आपला पाय मज-बूत केलेला होता. नबाब सिराजउद्दवला याच्या आतांपर्यंत ताब्यांत अस-लेल्या बंगाल, बहार, आणि ओरिसा, ह्या तीन प्रांतां मिळून झालेला मोठा प्रदेश याचा "बंगाल" या शब्दाच्या व्याख्येमध्यें समावेश होतो, असें ह्या ठिकाणीं आणि ह्यानंतर समजलें पाहिजे. बंगालचा नबाब इंग्लिशांच्या वर्चस्वाखालीं आल्याबरोबर वायव्य दिशेकडे काशी शहराच्या जवळील गंगानदीच्या तीरापर्यंत त्यांचें वर्चस्व वाढलें, आणि त्या वेळेपासून कलकत्ता ही ब्रिटिश सरकारच्या राजकीय वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशाची राजधानी झाली.

कंपनी सरकारच्या कामकाजाच्या राजधानीचा अशा रीतीनें कलकत्ता येथें झालेला बदल हें एक पुढें पाऊल पडल्याचें महत्त्वाचें दर्शक होय; कारण, बंगालमधूनच, मद्रास अगर मुंबई येथून नव्हे, इंग्लिशांची सत्ता प्रथम हिंदुस्थानांतील अंतर्प्रदेशाच्या आंत प्रस्थापित होत जाऊन त्यांना हिंदुस्थानांत वर्चस्व मिळविण्याचा खरा मार्गही सांपडला. बंगाल्यांत पुढें पाऊल टाकणें ह्मणजे हिंदुस्थानच्या मऊ आणि असुरक्षित बाजूनें त्यांत शिरकाव करून घेणें होय. कन्याकुमारीपासून उत्तरेकडे थेट वरपर्यंत पूर्व किनाऱ्यावर मोठमोठीं गलबतें नांगरतां येण्यासारखें असें एकही बंदर नाहीं, अगर गलबतें आंत येण्यासारखीं नद्यांचीं मुखेंही नाहींत. परंतु बंगालच्या उपसागराच्या उत्तरेकडील टोकाशीं आपणाला असें दिसून येईल कीं, तेथें त्रिकोणाकृति सखल प्रदेश असून त्यांत नौकानयन करतां येण्यासारखे नद्यांचे पुष्कळ फांटे आहेत. अंतःप्रदेशांतील मोठमोठ्या नद्यांचें पाणी हे फांटे अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरांत आणून सोडतात, आणि यांपैकीं कांहीं तर पाणथळ जमिनीचें पाणी वाहून नेणारे मोठाले पाटच असून कांहींतून हिमालयांतील बर्फ वितळून झालेलें पाणी खालीं वहात येत असतें. हिंदुस्थानांतील सर्व समुद्रकिनाऱ्यावरच्या ह्याच भागांतील नद्यांचीं पात्रें रुंद असून त्यांत गलबतें नांगरतां येतात, व अंतःप्रदेशांत पुष्कळ मैलपर्यंत तीं नेतांही येण्यासारखीं आहेत. शिवाय ह्या नद्यांच्या आसपास दूरवर बंगालचा सुपीक मळईचा विस्तीर्ण प्रदेश पसरलेला असून तद्देशीय लोक अतिशय उद्योगी पण भेकड आहेत, आणि ते पुष्कळ पीक उत्पन्न करणारे असूनही त्यांची उपजीविका अगदीं थोडक्यांत होते.

अठराव्या शतकांत हिंदुस्थानामध्यें बंगाल प्रांत हाच शेती आणि हुन्नर कला यांमध्यें इतर सर्व प्रांतांहून श्रेष्ठ होता, अशाबद्दल सर्व तज्ज्ञांचें एकमत आहे. कर्नल जेम्स मिल्ल यानें मागें निर्दिष्ट केलेल्या पुस्तकांत असें दर्शविलें आहे कीं, " बंगाल देशामध्यें अतिशय संपत्ति असून त्याच्या

समुद्राच्या बाजूला संरक्षणाची कांहींही तजवीज केलेली नाहीं." इ. सन १७६७ मध्यें व्हेरेल्स्ट हा असें लिहितो कीं, "बंगालचा अबाढव्य व्यापार हें हिंदुस्थानांतील सर्व संपत्ति आपणाकडे ओढून घेण्याचें केंद्रस्थान आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. आणि तेथील कारागिरीच्या जिनसांचा हिंदुस्थानांतील अगदीं दूरच्या प्रदेशांतही शिरकाव होत असतो." मध्य आशियामधून होणाऱ्या स्वाऱ्यांच्या धोपट मार्गाच्या बाहेर बंगाल प्रांत असून साम्राज्यांतील मोठालीं शहरें, अग्रा, दिल्ली व लाहोर, यांच्या सभोंवतीं जी यादवी माजून राहिली होती, तिच्या क्षेत्रापासूनदेखील हा प्रदेश फार दूर होता. कित्येक शतकेंपर्यंत हा प्रांत उत्तरेकडून आलेल्या परकीय लोकांच्या ताब्यांत होता, तरी देखील समुद्राच्या बाजूनें हल्ला होण्याचें ह्याच प्रांताला अधिक भय असून इंग्लिशांसारख्या दर्यावर्दी व व्यापारी राष्ट्राला तर तो सर्व बाजूंनीं अतिशयच महत्त्वाचा होता. शरीरांतील मुख्य रक्तवाहिन्या ज्याप्रमाणें काळजापर्यंत जातात, त्याचप्रमाणें ह्या नद्यांमुळें हिंदुस्थानच्या काळजापर्यंत जातां येतें. बंगालपासून वायव्येकडे मोकळें मैदान असून त्यांत असलेले थोडेसे उंचवट्याचे भाग सोडून तें बहुतेक सपाट आहे. हेंच मैदान पुढें मोठमोठें होत जाऊन त्याचें एक विस्तीर्ण मध्यवर्ती मैदान बनलेलें आहे. या मैदानाला आपण हल्लीं औध आणि वायव्येकडील प्रांत असें ह्मणतों, व हेंच पुढें पंजाबांत उत्तरेकडे पसरत जाऊन हिमालयाच्या भिंतीपर्यंत गेलेलें आहे. हिमालय पर्वतापासून आग्नेयेकडे बंगालच्या उपसागरापर्यंत पसरलेल्या ह्या मोठ्या अंतःप्रदेशाच्या मैदानावर ज्याचा ताबा असेल, त्याला बाकीच्या सर्व हिंदुस्थानावर सत्ता चालविण्याला हें केंद्रस्थान होतें. या कारणामुळें हेंही लक्षांत येईल कीं, हिंदुस्थान जिंकणाऱ्या एकामागून एक झालेल्या घराण्यांनीं आपल्या राजधान्यांचीं सर्व मोठमोठीं शहरें ह्याच प्रदेशामध्यें वसविलीं होतीं.

हिंदुस्थानच्या नकाशाकडे दृष्टि फेकली असतां आपणाला असें दिसून येईल कीं, उत्तर हिंदुस्थान किंवा भरतखंड (दक्षिण हिंदुस्थानापासून

निराळें मानलेलें) बाकीच्या आशियाखंडापासून अतिशय मजबूत आणि उंच अशा हिमालयाच्या भिंतींनीं वेगळें केलेलें आहे. सर्व हिंदुस्थान देशाच्या सरहद्दींना पर्वताच्या ओळींचें वेष्टण असून त्यामुळें तटबंदी झालेली आहे. आणि नैऋत्य दिशेला ह्मणजे समुद्राकडे ज्या ठिकाणीं पर्वत नाहींसे होऊन अगदीं सखल जमीन आहे, त्या ठिकाणीं बाहेरील सरहद्द आणि सुपीक मध्यवर्ती प्रदेश यांच्यामध्यें हिंदुस्थानांतील वाळूचें मैदान पसरलेलें आहे. हिंदुस्थानची "सुवर्णभूमि" आणि त्या मानानें त्यांतील लोकांचा दुबळेपणा हीं जाणूनच कीं काय, निसर्गदेवतेनें तिचें संरक्षण करण्याकरितां शक्य तितके पराकाष्ठेचे परिश्रम घेतलेले आहेत. कारण, हिंदुस्थानच्या वायव्येकडील आणि उत्तरेकडील सरहद्दीवर पर्वतांच्या भिंतींची ही जी मोठी ओळ पसरलेली आहे, त्या सर्व मिळून पलीकडे जाण्यास योग्य अशा हाताबोटावर मोजतां येण्याइतक्या देखील खिंडी नाहींत, आणि ज्या कांहीं दळणवळणायोग्य अशा आहेत, त्यांतून येण्याला अफगाणिस्थानांतूनच यावें लागतें. ह्याच खिंडींमधून बादशहा शिकंदर आणि त्याच्या मागून स्वाऱ्या करणारे सर्व सेनानीही हिंदुस्थानच्या सखल भूमीवर उतरलेले आहेत. अफगाणिस्थानांतील टेकड्या आणि खडकाळ दरीं खोरीं तुडवीत पर्वताच्या अगदीं शेवटच्या कड्यावरून जो समुद्रासारख्या लांबवर पसरलेल्या, अस्पष्ट धुक्यानें आच्छादित असलेल्या हिंदुस्थानच्या अफाट मैदानावर दृष्टि फेकील, त्याला — आशियांतील ह्या "उन्नतभूमी" च्या कड्यावर उभें राहून ज्या वेळीं त्या धाडशी पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या सखल प्रदेशाकडे पहिल्यानें पाहिलें असेल, त्या वेळीं तो प्रेक्षणीय देखावा पाहून त्यांच्या मनांत कशा प्रकारच्या विचारांचें काहूर माजलें असेल, — याची कदाचित् कल्पना करितां येईल. उत्तरेकडील सरहद्दीच्या बाजूनें हिमालय पर्वत पसरलेला असून त्यावरून पलीकडे जाणें तर अशक्यच आहे. कारण, या उन्नत गिरिशिखराच्या रांगेमागें एक उंच पठार जमीन पसरलेली असून त्याचा अत्युच्च भाग समुद्र सपाटीपासून १७,००० फूट उंची-

वर आहे, आणि हेंच पठार पुढें उत्तरेकडे आशियाच्या मध्यभागांत किल्ल्याला लागून असलेल्या अफाट उतरणीप्रमाणें पसरत गेलेलें आहे.

अशा रीतीनें हिंदुस्थानच्या जमिनीची बाजूनें नैसर्गिक तटबंदी झालेली आहे; परंतु समुद्रकिनाऱ्यावर उतरून स्वारी करणाऱ्याला हे सर्व प्रतिबंध निरर्थक ठरतात. मागें सांगितल्याप्रमाणें उघड्या व योग्य बंदोबस्त नसलेल्या समुद्राच्या रस्त्यानें त्याला हिंदुस्थानांत शिरतां येतें; हिंदुस्थानरूपी ह्या नैसर्गिक किल्ल्यामध्यें त्याला आपला शिरकाव करून घेतां येतो; हिमालयरूपी कोटापर्यंत अगदीं आंत त्याला आपलें सैन्य नेतां येतें; संरक्षणाचीं ठाणीं आपल्या कबजांत घेतां येतात; आणि ह्याच तटबंदीचा दुसऱ्याविरुद्ध उपयोगही करतां येतो. इ. सन १७५७ पासून इ. सन १८४९ यांच्या दरम्यान हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाडे यांचे बरोबर ज्या वेळीं इंग्लिशांच्या लढाया चाललेल्या होत्या, त्या वेळीं त्यांनीं जें केलें, तें हेंच होय; त्या काळाच्या प्रारंभीं बंगाल प्रांत इंग्लिशांनीं मिळविल्यामुळें त्यांच्या राजकीय सत्तेचें खरें केंद्र दक्षिण हिंदुस्थानांतून बंगालमध्यें गेलें; ह्मणून लढाया व राजकारण यांच्या अतिशय विस्तृत रंगभूमीकडे आपण आतां लवकरच वळूं.

परिच्छेद दुसरा—अंतःस्थ भानगडी आणि राज्यव्यवस्थेंतील घोटाळे.

प्लासी येथें जय मिळविल्यानंतर कांहीं सुरळीत राज्यव्यवस्था पुन्हां सुरू करणें हें इंग्लिशांच्या दृष्टीनें अत्यवश्यक आणि महत्त्वाचें काम होतें. मिरजाफर याला "बंगालचा नबाब" ह्मणून त्यांनीं गादीवर बसविलें, त्या वेळीं त्याचेबरोबर इंग्लिशांनीं तह केला होता; त्यांत असें ठरलें होतें कीं, कलकत्ता येथील आणि इतर वखारी जप्त केल्यामुळें इंग्लिशांचें झालेलें नुकसान आणि त्यांचा लढाईचा खर्च भरून येण्याकरितां त्यानें मोठाल्या रकमा कंपनीस द्याव्या, आणि त्याऐवजीं नबाबाला जरूर पडेल

त्या वेळीं त्याच्याच खर्चानें इंग्लिशांनीं त्याला सैन्य पुरवावें. याचा परिणाम असा झाला कीं, नबाबाची तिजोरी कोरडी पडली, आणि त्यास स्वतःची हुकमत चालविण्याकरितां आणि आपल्या तख्ताचें संरक्षण करण्याकरितां ज्यांनीं त्याच्या मुलखांत सैन्य ठेवून त्या सैन्यावर आधिपत्यही चालविलें होतें, अशा बेजबाबदार परदेशीय लोकांवरच अवलंबून राहणें भाग पडलें. हिंदुस्थानांत असा प्रकार घडून येणें ही कांहीं नवलपरीची गोष्ट नव्हती. कारण, त्या ठिकाणीं चांगल्या शिस्तीच्या सैन्याचे अधिपति हे प्रत्यक्ष स्वतःच्या सरकारला आणि शत्रूलाही नेहमीं सारखेच भीतिदायक असत. ह्या वेळीं हैद्राबाद येथें बुशी हा आपल्या फ्रेंच सैन्यासह ज्या स्थितींत होता, त्याच स्थितींत बंगालमध्यें क्लाइव्ह हाही आपल्या सैन्यासह होता. परंतु लाली यानें हैद्राबादेहून बुशीला जेव्हां परत बोलाविलें, तेव्हां दक्षिणेंतील फ्रेंचांची सत्ता नाहींशी झाली, आणि पुढें त्यांच्या झालेल्या वाताहतीनंतर तर तिचा कायमचाच शेवट झाला. उलट इंग्लिश लोक स्वतःच वास्तविक रीत्या जिंकून घेतलेल्या प्रदेशावर आपलें वर्चस्व ह्या वेळीं दृढ करीत होते.

आपली खरी स्थिति ह्या देशांत काय आहे, याबद्दल अनिश्चितता आणि गुंचवणूक, यांमुळें इंग्लिशांची आपलें वर्चस्व स्थापन करण्याची अडचण दुणावली. वास्तविक रीत्या जरी ते जेते होते, तरीही कायद्याच्या हक्कानें राज्यकर्ते ह्मणून त्यांना वागतां येईना, व तसें वागण्याची त्यांची इच्छाही नव्हती. वस्तुतः ते एका व्यापारी कंपनीचे प्रतिनिधि असून प्रांत काबीज करण्याबद्दल त्यांना त्यांच्या राष्ट्राकडून सनद मिळाली नव्हती; या कारणामुळें, वास्तविक रीत्या आपल्या हातांतील बाहुल्याप्रमाणें नाचवितां येणाऱ्या ह्या बंगाली नबाबाला योग्य मानमरातब देण्याचें बेगडी प्रदर्शन करणें त्यांना भाग पडलें होतें. आपल्याच राज्यांतील एखाद्या पक्षाच्या किंवा स्वैर वृत्तीनें वागणाऱ्या एखाद्या सत्ताधीशाच्या इच्छेनुरूप वागण्यानें मुलकी राज्यकारभाराची जी पायमल्ली होते, त्यापेक्षां इतर कोणत्याही गोष्टींनीं

राज्यव्यवस्था खात्रीनें अधिक बिघडत नाहीं; आणि बंगालमध्यें तर अनिश्चित आणि द्विधा झालेल्या सत्तेचे परिणाम तेथें असलेल्या विशेष कारणपरंपरेमुळें अधिकच विकोपास गेले होते. पहिली गोष्ट ही कीं, कंपनी आणि नबाब हे दोघेही सारखेच अतिशय सांपत्तिक अडचणींत आलेले होते. फ्रेंचांच्या बरोबर चाललेली लढाई तशीच चालू ठेवण्याकरितां कंपनी मद्रास येथें तांतडीनें मोठमोठ्या रकमा पाठवीत होती, आणि त्याच वेळीं बंगालमध्येंही तिला सहा हजारांहून अधिक सैन्य पोसावें लागत होतें. बंगालच्या नबाबाला परकीय लोकांच्याच ओंजळीनें सर्वस्वी पाणी पिऊन राहणें पसंत नसल्यामुळें त्यानें आपल्या सैन्यास फाटा दिला नव्हता, परंतु त्याच सैन्यांतील बंडखोर टोळ्यांनीं मागील बाकी चुकती करण्याबद्दल तगादे लावून पुष्कळ त्रास दिला असूनही नबाबाला त्या सैन्याचा पैसा चुकता करून देतां येणें शक्य नव्हतें. मध्यंतरीं आपल्या प्रदेशांतील अस्वस्थता दाबून टाकण्याकरितां आणि बाहेरून होणारे हल्ले परतवून लावण्याकरितां त्याला सैन्याची जरूरी लागली; कारण, कांहीं मोठमोठ्या जमीनदारांनीं त्याच्या विरुद्ध बंड केलें होतें. मराठे लोक पश्चिमेकडून बंगाल प्रांताला शह देत होते, आणि दिल्लीपतीचा मुलगा आपल्या वडिलांच्या राज्यांतील एखादा प्रांत परत घेण्याच्या मिषानें बंगालच्या वायव्येकडील प्रदेशांत आपल्या सैन्यासह येऊन दाखल झालेला होता. दुसरी गोष्ट ही कीं, कंपनी ह्मणजे वार्षिक खर्चाबद्दल नबाबाच्या वसुलांतील बराच भाग हक्कानें मागणारी त्याची "अत्यंत प्रबळ साह्यकारी;" च केवळ नव्हती, अथवा केवळ द्रव्यार्थी मराठे अगर अफगाण हे जसे एखादी मोठी रक्कम दिल्यावर आपलेसे करून घेतां येतात, त्याप्रमाणें लांचाच्या लालुचीनें लढणारें तिचें भाडोत्री सैन्यही नव्हतें. इंग्लिश लोक हे त्या वेळीं एका संस्थेचे प्रतिनिधि होते, आणि त्या संस्थेकरितां त्यांना युरोपमध्यें नियमित रकमा पाठवाव्या लागत होत्या. त्यांचे मुख्य हितसंबंध आणि उद्दिष्ट हेतु अजूनही व्यापारी तत्त्वाचेच होते, आणि आपणाला प्रतिकार होणें शक्य नाहीं,

असें त्यांना आढळून आल्याबरोबर देशांत उत्पन्न होणाऱ्या अतिशय मौल्यवान जिनसांपैकीं कांहीं जिनसांच्या सर्व व्यापाराचा मक्ता त्यांनीं आपणाकडे घेण्याला सुरवात केली होती. आपलें व्यापारी शील न सोडतां ते राजकीय बाबती आपल्या अंगावर घेऊं लागल्यामुळें हा एक अपूर्व योगायोग प्रथमच घडून आला, व त्यामुळें बंगालमध्यें असह्य अन्याय आणि घोटाळे माजून गेले.

ब्रिटिश-हिंदुस्थानच्या इतिहासांत इंग्लिशांच्या नांवाला अक्षम्य आणि अत्यंत कमीपणा आणणारा असा जर कोणता काळ असेल, तर तो हाच होय; इ. सन १७६० ते १७६५ या सहा वर्षांच्या दरम्यान जेव्हां खरोखरच नेटानें आणि मुत्सद्दीपणानें व्यवस्था ठेवण्याची विषेश जरूरी होती, त्या वेळीं क्लाइव्ह हा हिंदुस्थानांतून इंग्लंडमध्यें तात्पुरता परत गेला होता. त्यामुळें कंपनीच्या कामाकाजाची व्यवस्था अयोग्य आणि अननुभवी अशा पुढाऱ्यांच्या हातीं गेलेली होती. क्लाइव्ह यानें "या पद्धतीचा कांहींही उपयोग होणार नाहीं, व ती टिकणारही नाहीं," असें इंग्लंडचा मुख्य प्रधान पिट्ट याला पाठविलेल्या पत्रांत (इ. सन १७५९) पूर्वींच भविष्य केलेलें होतें; आणि त्यांत त्यानें अशीही सूचना केली होती कीं, "इंग्लिश राष्ट्रानें बंगाल प्रांत आपल्या ताब्यांत घेऊन तेथें आपली पूर्ण सत्ता स्थापन करावी, ह्मणजे त्यामुळें निव्वळ वीस लाख पौंड रोख वसूल खात्रीनें आपणास मिळेल." मध्यंतरीं अंतःस्थ व्यवस्थेची पुन्हां स्थिरस्थावर करण्याकरितां त्याला जें करणें शक्य होतें, तें सर्व त्यानें केलें, आणि दिल्लीच्या बादशाही युवराजाला बंगाल प्रांतामधून बाहेर निघून जाण्याला भाग पाडिलें. बंगालमध्यें असलेले डच लोक स्वाभाविक रीत्याच इंग्लिशांच्या हालचालींकडे अतिशय मत्सरबुद्धीनें आणि भीतीनें पहात होते. त्यांचा नबाबाशीं गुप्त रीतीनें पत्रव्यवहार चालू होता; त्यांनीं बटेव्हिया येथून सैन्याची एक मोठी तुकडी आणली होती; आणि त्यांच्या लढाऊ जहाजांना वर येण्याची इंग्लिशांनीं बंदी केल्यामुळें त्यांनीं लढाईही सुरू केली होती;

परंतु कर्नल फोर्ड यानें त्यांचा पूर्ण पराजय केला. ह्या लढाइस क्लाइव्ह यानें पाठविलेल्या खलित्यांत "लहानशी, रक्तपाताची व निर्णयात्मक" अशीं विशेषणें लाविलीं आहेत. परंतु इ. सन १७६० मध्यें क्लाइव्ह हा इंग्लंडांत परत गेल्यावर बंगाल प्रांतावर पुन्हां बाहेरून स्वाऱ्या होण्याची सुरवात झाली. आपण नामधारी नबाब आहों, ही गोष्ट नबाबास न आवडून त्यानें डच लोकांबरोबर गुप्त रीतीनें पत्रव्यवहार सुरू केला, व त्याचे आणि कंपनीच्या नोकरांचे निकराचे तंटे होऊन बंगालमधील सर्व राज्यकारभार सुरळीत चालविण्याचीही पंचाईत पडूं लागली. आपण आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करावें, अशी नबाबाची इच्छा असणें स्वाभाविक होतें. ह्मणून त्यानें कंपनीच्या कामाकाजांत अडथळे आणण्याचे आणि तिला त्राहि भगवान् करून सोडण्याचे डावपेंच सुरू केले; कंपनीच्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर कारस्थानें सुरू केलीं; आणि त्या वेळीं त्याच्या प्रदेशाची राखरांगोळी उडवीत असलेल्या मराठ्यांशीं इंग्लिश व डच हे ज्या जुटीच्या बळानें लढाया करीत असत, त्यांत फूट पाडण्याविषयीं त्यानें पराकाष्ठेचा प्रयत्न केला. कारण, इंग्लिशांचा एखादा पराजय झाल्यास निदान त्यांची सत्ता थोडीशी तरी हादरेल अशी त्याची कल्पना होती.

याचा परिणाम असा झाला कीं, दोघांपैकीं एकाही पक्षाला साधारण रीतीनें सुद्धां राज्यकारभार न चालवितां आल्यामुळें दोघेही सारखेच अप्रिय झाले. वास्तविक रीत्या ह्या काळांत बंगालवर धनीपणानें दाब बसविणारा कोणीही राज्यकर्ता नव्हता. कारण, इंग्लिश व्यापारी हे जरीं आपल्या चांगल्या शिस्तीच्या व भरपूर वेतन मिळणाऱ्या मोठ्या सैन्यानें बंगालचें संरक्षण करीत होते, तरीही त्या सैन्याचा सर्व खर्च भागविण्याचें व सुनियंत्रित राज्यकारभार चालविण्याचें काम नबाबावर पडलेलें होतें; आणि तो तर आपल्या अधिकाऱ्यांपैकीं कोणी आपला खून करील, अगर कंपनी सरकार आपणाला पदभ्रष्ट करील, अशा दुहेरी विवंचनेनें ग्रासून गेला होता. इंग्लिश व्यापारी हे बोलून चालून बंगालमध्यें " चार

पैसे " खिशांत टाकण्यास मिळावे, याच उघड उघड उद्देशानें आलेले असल्यामुळें " पुरेशी पुंजी " जमल्या बरोबर ते इंग्लंडमध्यें पुन्हां परत निघून गेले. मध्यंतरीं ह्या लोकांनीं – कोणतीही आडकाठी अगर जबाबदारी बिलकूल नसल्यामुळें आणि लोकमत अगर न्यायदंड यांचा कांहींही दाब नसल्यामुळें (कारण, बंगालमध्यें ह्या वेळीं कायदाच नव्हता,) अशा परिस्थितीमध्यें आणि अशा मायामोहाच्या पसाऱ्यामध्यें कोणत्याही काळचे अगर देशाचे लोक ज्याप्रमाणें वागतील, त्याप्रमाणेंच – स्वाभाविक रीत्या वर्तन केलें. त्यांपैकीं कांहीं जणांना तर अब्रूची, न्यायाची अगर सचोटीचीही चाड राहिली नाहीं; त्यांनीं मोंगल अगर मराठे यांच्या सारखीच, पण अधिक व्यवस्थित आणि धंदेवाईक पद्धतीनें, लूट केली. संपत्ति मिळविण्याची अतिशय हांव आणि ती मिळविण्याला अतिशय कमी सायास, यांमुळें त्यांची सदसद्विवेकबुद्धि पार नाहींशी झाली, आणि ते साधारणतः शिरजोर बनले. इ. सन १७६५ मध्यें क्लाइव्ह हा इंग्लंडमधून परत आल्यावर त्यानें पुढें कंपनीला लिहिलेल्या एका पत्रांत त्यास आढळून आलेल्या वस्तुस्थितीचें वर्णन करीत असतांना त्यानें असें लिहिलें आहे कीं, " ज्या देशांत संपत्ति विपुल आहे, जेथें भीति हेंच राज्यकारभाराचें तत्त्व आहे, आणि जेथें आपलीं हत्यारें हीं नेहमीं यशस्वी होतात, त्या ठिकाणीं आपल्या लोकांनीं आपली द्रव्यलालसा तृप्त करण्यास दृष्टीस पडेल त्या साधनाचें " अवलंबन केल्यास " त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं; अगर अप्रतिहत सत्ता अनियंत्रितपणें हातीं असलेल्या आपल्या लोकांवर लाचलुचपत अगर जोरजुल्म यांचा पगडा बसल्यास त्यांत कांहींही नवल नाहीं. अशा रीतीनें चोहोंकडे अनीति फैलावल्यामुळें त्याचा वसुलावर अवश्य तोच अनिष्ट परिणाम झाला, आणि कंपनी व मिरजाफर या दोन्हीही पक्षांतील वाढत्या सांपत्तिक अडचणीमुळें भांडणांत भर पडून तें विकोपास गेलें. कारण, ज्या सैन्याच्या जोरावर नबाबाला दाबांत ठेवण्याची कंपनीची सर्व शक्ति अवलंबून असे, त्या सैन्याचा खर्च पुरा

पाडण्याची त्यानें मुळींच आस्था दाखविली नाहीं, आणि त्याच्याकडे खर्चाची बाकी मात्र सारखी भयंकर रीतीनें फुगत चालली होती.

सरते शेवटीं प्रेसिडेंट आणि कौन्सिल यांनीं नबाबाला पदभ्रष्ट करून हीं सर्व भांडणें निकालांत आणण्याचा निश्चय केला. त्याचा दिवाण अगर वसुलीखात्याचा मुख्य प्रधान मिरकासीम याचे बरोबर, मला जर मिरजाफराचे ऐवजीं बंगालच्या गादीवर बसविलें तर कंपनीला जरूर असलेल्या रकमांचा मी तिला पुरवठा करीन, असें बोलणें ठरविलें; आणि त्याप्रमाणें मिरजाफर याला गादीवरून काढून टाकण्याची राज्यक्रांति रक्ताचा एक थेंबही न सांडतां घडवून आणण्यांत आली. परंतु मिरकासीम याला अधिक द्रव्य देण्याच्या कबुलीवरून कंपनीनें गादीवर बसविल्यानंतर या पैसा उकळणाऱ्या राज्यक्रांतीनें चाललेल्या भानगडी अमर्याद वाढल्या. मिरकासीम यानें दिलेल्या मोठमोठ्या वचनांच्या मानानें त्यानें कांहींही केलें नाहीं; भांडणांत अधिक अधिक चुरस वाढत गेली; आणि राज्यव्यवस्थेंतील माजलेले घोटाळे व कोरडी पडत चाललेली तिजोरी यांची स्थिरस्थावर करण्याची कांहींही तजवीज करण्यांत आली नाहीं. जमीनमहसुली कमी कमी होत चालली होती; व व्यापाराची सुरक्षितता नसल्यामुळें उत्तर हिंदुस्थानाबरोबर असलेलें व्यापारी दळणवळण कमी कमी होत गेलें होतें; उलट इकडे इंग्लिश कंपनीनें युरोपशीं निर्गत व्यापार करण्याच्या विशेष सवलतीनें मिळविलेल्या मक्त्याची अंमलबारी करण्याचा फक्त आग्रहच आपल्या राजकीय वर्चस्वाच्या जोरावर धरला होता, एवढेंच नव्हे, तर बंगाल्यांतील अंतर्गत व्यापारावर सर्व प्रकारच्या कराची विशिष्ट सूट मिळविण्याचा पूर्ण अन्यायमूलक व अमर्याद हक्क बळकविण्याच्या कामींही कंपनी आपल्या वर्चस्वाचा उपयोग करून घेऊं लागली होती. या बळकविलेल्या हक्काची दंडेलीनें अंमलबजावणी करण्यांत कंपनीच्या काळ्या व त्याचप्रमाणें गोऱ्या नोकरांनींही नबाबाचा अधिकार धाब्यावर बसविला होता, व त्याच्या मुलकी अधिकाऱ्यांविरुद्ध कंपनीच्या वखारींनीं आपआपलीं हत्यारें सज्ज करून ठेविलीं होतीं.

पाटणा येथील वखारीचा मुख्य, मिस्तर एलिस, ह्यानें नबाबाकडून आपल्या वखारीवर हल्ला होण्याच्या पूर्वींच आपण अघाडी मारावी, या उद्देशानें दूरवर विचार केल्याशिवाय पाटणा शहर हस्तगत करण्याचा प्रयत्न केला; त्यामुळें या कडाक्याच्या भांडणाचें पर्यवसान होऊन त्याचा लवकरच स्फोट झाला. एलिस यानें पाटणा शहर घेतलें, पण तें त्याला आपल्या ताब्यांत ठेवतां येईना; ह्मणून तो माघार घेऊन आपल्या सर्व लोकांसह पळून जात असतांना त्यांना नबाबानें कैद केलें; परंतु कंपनीच्या सैन्यानें नबाबावर चाल करून त्याचा पराभव केला. त्यामुळें त्वेषानें वैतागून नबाबानें पाडाव केलेल्या सर्व इंग्लिश कैद्यांची कत्तल उडविली, आणि सरहद्दीपलीकडील औध येथील वजिराच्या छावणीकडे तो पळून गेला. या अव्यवस्थित राज्यकारभाराच्या शोकपर्यवसायी परिणामामुळें कंपनीचाही उन्मादवायु थोडासा उतरून फारच कलंक लावणारे मक्ते पुढें चालू ठेवण्याचें तिनें सोडलें. इ. सन १७६३ मध्यें कंपनीनें पुन्हां मिरजाफर यास गादीवर बसविलें. त्यानंतर इ. सन १७६५ मध्यें तो मृत्यु पावला, आणि बंगाली नबाबाचें बाहुलें नाचविण्याची ही घातुक पद्धत त्या वेळेपासून वास्तविक रीत्या बंद पडली. कारण, लार्ड क्लाइव्ह हा त्याच वर्षीं हिंदुस्थानांत परत आल्यावर दिल्ली येथील बादशहापासून मिळविलेल्या सनदेअन्वयें बंगाल, बहार आणि ओरीसा, ह्या तिन्हीही प्रांतांच्या वसुलाची व्यवस्था प्रत्यक्ष त्यानें आपल्या हातांत घेतली. ह्याच अधिकाराला "बंगालची दिवाणी" असें ह्मणतात. "दिवाण" या शब्दाचा वास्तविक अर्थ बादशाही खजिन्यातर्फे प्रत्येक प्रांतांत असलेला मुख्य हिशेबी कामगार हा असून सर्व सार्वजनिक खर्चावरही त्याचाच मुख्य अधिकार चालत असे. अशा रीतीनें कंपनीला हा नवीन अधिकार मिळाल्यामुळें शस्त्राच्या बळाला संपत्तीचें पाठबळ मिळालें; आणि राज्यकारभाराच्या अतिशय महत्त्वाच्या खात्याची प्रत्यक्ष व कायदेशीर जबाबदारी कंपनीवर येऊन पडली.

परिच्छेद तिसरा—बाह्य राजकारण.

ईस्ट इंडिया कंपनीचे बंगालच्या बाहेर कसे संबंध होते, आणि हिंदुस्थानांतील राजकारणाचा वारा सर्वसाधारणतः कोणत्या दिशेनें वहात होता, हें समजण्याकरितां बंगालमधील ह्या अंतःस्थ भानगडींपासून आपणाला आतां दुसरीकडे वळलें पाहिजे. मिरकासीम यानें जेव्हां औधच्या वजिराचा आश्रय घेतला, तेव्हां दिल्लीचा नामधारी बादशहाही त्याच्याच छावणींत होता; त्यामुळें बादशही सत्तेचें पुनरुज्जीवन करण्याचा वरकांती आव आणून – परंतु जितका मुलूख बळकावितां येईल तितका बळकविण्याच्या वास्तविक उद्देशानें – बंगालमधील प्रदेशावर स्वारी करण्याला ही संधि सोन्यासारखी आहे, असा त्यानें विचार केला. गंगानदीच्या कांठीं असलेल्या बक्सार या गांवीं मेजर हेक्टर मनरो याच्या हाताखालीं असलेल्या कंपनीच्या सैन्याची आणि वजिराची गांठ पडून उभयतांमध्यें युद्ध झालें, त्यांत त्याचा पूर्ण पराजय झाला, आणि त्यामुळें जे अंतिम व दुय्यम परिणाम घडून आले, ते फार महत्त्वाचे होते[1]. इंग्लिशांना मिळालेल्या ह्या विजयामुळें दिल्लीचा बादशहा त्यांच्या आश्रयाखालीं आला; वजिराला दहशत बसली; कंपनीच्या सशस्त्र सैन्याचा गंगानदीच्या पलीकडे काशी व अलाहाबादपर्यंतच्या मुलखांत पाय शिरकला; बंगालच्या वायव्येकडील राजेरजवाड्यांवर आपली हुकमत चालवितां येण्यासारखी एक नवीन अनुकूल परिस्थिति त्यांना लाभली, आणि त्यांच्याशीं कंपनीचा प्रत्यक्ष संबंधही अगदीं प्रथमतः ह्याच वेळीं घडला. ह्याच लढाईमुळें इंग्लिशांचा उत्तर हिंदुस्थानाशीं संबंध जडला; नव्या नव्या राजकारणांत पडणें त्यांना भाग पडत गेलें; आणि हीं राजकारणें पुढें लवकरच झपाट्यानें वाढतही गेलीं.

---

१ बक्सार येथील लढाई. सप्टेंबर १७६४.

ह्या कारणांमुळें गेल्या शतकाच्या मध्य कालांतील ह्या उघड्या सपाट मैदानाच्या प्रांतांतील जो विस्तृत प्रदेश गंगा, यमुना आणि त्यांना मिळणाऱ्या नद्या, यांनीं भिजलेला आहे, आणि जो बंगालपासून वायव्येकडे हिमालय पर्वतापर्यंत पसरलेला असून हल्लीं ज्याचे औध, वायव्येकडील प्रांत व पंजाब, असे इंग्लिश सरकारच्या अमदानींतील तीन प्रांत झालेले आहेत, त्या प्रदेशाच्या तत्कालीन स्थितीचें वरवर ढोकळ रीतीनें ह्या ठिकाणीं निरीक्षण केल्यास तें उपयोगी पडण्यासारखें असल्यानें यापुढें थोडक्यांत तें केलेलें आहे. अवरंगझेब बादशहाच्या मृत्यूनंतर ह्या सर्व मोठ्या प्रदेशभर माजलेल्या बेबंदशाहीची ह्या वेळीं परमावधि झाली होती, आणि अध:पात झालेल्या ह्या बादशाही डोलाऱ्यासभोंवती चाललेला "हायदोस" इतर ठिकाणांपेक्षां बादशाही राजधानींत आणि सत्तेच्या प्रत्येक केंद्रस्थानांत अत्यंत चिकाटीनें चाललेला असून दिल्ली, आग्रा, लखनौ व बनारस, ह्या शहरांसभोंवतील प्रदेशांत तर तो हिंदुस्थानांतील इतर भागांपेक्षां अधिकच निकरानें चाललेला होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हाच सुपीक प्रदेश हिंदुस्थानावर राजरोस राजमार्गानें एकामागून एक स्वाऱ्या करणाऱ्यांकडून पायाखालीं तुडविला गेला होता, व दोन शतकेंपर्यंत पद्धतशीर जुलमी अनियंत्रित राजसत्तेचा सारखा वरवंटा फिरत असल्यामुळें ह्या सपाट आणि सुपीक प्रदेशांतील राजगाद्यांची स्वतंत्रता अगर जातींची जूट, हीं कधींच नष्ट होऊन त्यांचा नायनाट झालेला होता. या कारणांमुळें अठराव्या शतकांतील तुफानानें मोंगल राष्ट्राची इमारत जेव्हां कोलमडून जमिनीवर आदळली, तेव्हां अंदाधुंदीच्या लाटांना प्रतिरोध करण्यासारखे थोडे देखील स्थानिक सत्तारूपी खडक शिल्लक राहिले नव्हते. दक्षिणेकडून मराठे टोळधाडीसारखे वर येऊन धडकले होते, आणि उत्तरेकडून हिंदुकुशपर्वताच्या खिंडींतून अफगाण लोकांच्या झुंडीच्या झुंडी खालीं उतरत होत्या. ज्या अवरंगझेबाचा सर्व हिंदुस्थानभर निदान दरारा तरी वाटत असे, त्याच्याच निधनानंतर पन्नास वर्षांच्या आंतच "मोंगल

बादशहा" ही पूर्वींच्या बड्या नांवाची एक निव्वळ पडछायाच होऊन राहिली, आणि दगलबाज प्रधानमंडळाच्या अगर अधिकार बळकावूं पाहणाऱ्या महत्त्वाकांक्षी सरदारांच्या हातांतील तो निव्वळ एक हत्यार व कळसूत्री बाहुलेंच बनून गेला. बादशहाचे सर्व प्रतिनिधि व कारभारी आपापल्याकरितां स्वतंत्र संस्थानें निर्माण करीत होते, आणि एकमेकांना बुडवून आपापल्या सरहद्दी वाढविण्याचीही धडपड करीत होते.

आपणाला माहीतच आहे कीं, निझाम हा मूळचा दक्षिणेकडील प्रांताचा सुभेदार असून तो कधींच एका मोठ्या प्रदेशाचा स्वतंत्र राज्य-कर्ता झालेला होता. वायव्येकडे गंगानदीच्या पूर्वेला बादशहाचा वजीर हा आपला पाय दृढ करीत होता, आणि त्यानेंही पूर्वींच औध येथें राज्य स्थापन केलें होतें. ह्या राज्याच्या सरहद्दींत पुढें पुष्कळ फेरबदल होत गेले, तथापि तें एक शतकभर टिकलें. अफगाण दऱ्याखोऱ्यांतील रोहिले, (अगर पहाडी प्रदेशांतील लोक) या नांवाच्या कांहीं धाडशी लोकांनीं रोहिलखंड आपलासा करून घेतला होता. हिंदूंमधील जाट जातीचा एक धूर्त आणि दैवशाली पुरुष यमुना नदीच्या पलीकडे भरतपूर येथें आपलें राज्य स्थापन करीत होता नष्ट झालेल्या बादशाहीच्या एका मोठ्या अधि-काऱ्यानें आग्रा शहर आपल्या ताब्यांत ठेविलें होतें. बादशहाला आपल्या ताब्यांत घेऊन दिल्ली शहर दुसऱ्यानें बळकाविलें होतें. आणि दिल्लीहून पंजाबमध्यें पाठविलेल्या सुभेदारांना काबूल येथील अफगाण राज्य-कर्त्याच्या अधिकाऱ्यांबरोबर आणि धर्मवेड्या बंडखोर शीख लोकांबरो-बर त्यांवर ताबा ठेवण्याकरितां लढावें लागत होतें. राजसत्ता आणि राज्य-विस्तार ह्यांकरितां जोरानें झगडणारे प्रमुख आणि बलिष्ठ प्रतिस्पर्धी हेच होते, असें ढोबळ रीतीनें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु ह्यांपैकीं कोणां-तही (शीख लोकांशिवाय) भक्कम व्यवस्था, राजकीय धोरण, अगर पूर्व लौकिक हीं नव्हतीं. शिपाईगिरी करणाऱ्या लोकांचे नाईक आणि लुटा-लूट करणाऱ्या लोकांच्या झुंडी, ह्यांच्यापेक्षां कांहीं अधिक कर्तबगारी

करून नव्हे, तर आपला जीव धोक्यांत घालून, केलेल्या अनेक धाडशी कृत्यांनीं पुढें सरसावलेला पुढारी अगर सरदार याच्या व्यक्तिशः बलाबलावरच ह्यांपैकीं पुष्कळशा राजगाद्या अवलंबून होत्या. ज्याच्या जवळ पैसा अगर पत असे, त्यापैकीं कोणालाही शिरजोर झालेल्या कोणत्याही प्रदेशाचा वसूल गोळा करण्याचें फरमान बादशाही तिजोरींतून विकत घेतां येत असे. जर त्यानें तेथील जमीनदार लोकांचा पुंडावा मोडून टाकला, तर तो प्रांत शिरस्त्याप्रमाणें त्याचें राज्य बनत असे; आणि जसजशी त्याची सत्ता वाढत जाईल, तसतसा तो अधिकाधिक प्रदेशाचा सरदार बनत जात असे. जर त्या प्रदेशांतील शेतकरी लोकांनीं एखाद्या योग्य मनुष्याच्या धुरीणत्वाखालीं जमा होऊन त्याला त्या प्रदेशाच्या बाहेर हांकलून दिलें, तर तोच धुरीण आपल्या विशिष्ट जातींतील एक प्रबळ मनुष्य होऊन एखादें लहानसें राज्य स्थापन करी, अगर राज्यकर्त्या घराण्याचा संस्थापक बनत असे. जमिनीचा हक्क आणि कर-वसुलीची मालकी यांच्या अनिश्चयात्मक झटापटी व अकल्पित घोटाळे, यांचा अवशेष हा पुढें बरेच दिवसांनंतरही वहिवाटी हक्क, मालकी हक्क आणि मिरासी हक्क, अशा निरनिराळ्या प्रकारच्या रूपानें आढळून येत होता, आणि या कारणामुळें हिंदुस्थानांतील त्या भागांतल्या इंग्रजी कामगारांना स्थावर जिंदगीसंबंधाचे हक्क आणि त्या बाबतींतील हितसंबंध यांची नोंद करण्याची एक बरीच त्रासदायक कामगिरी होऊन बसली होती.

उत्तर हिंदुस्थानांत ह्या वेळीं किती बजबजपुरी माजून गेली होती, याची वरील हकीकतीवरून वाचकांस कांहींशी कल्पना होईल. याच सुमारास ह्मणजे इ. सन १७५८ मध्यें दक्षिणेंतील मराठ्यांनीं आपल्या मोठ्या सैन्यानिशीं अगोदर ठरलेल्या बेताप्रमाणें दिग्विजय मिळविण्याकरितां उत्तर हिंदुस्थानावर स्वारी केली. खडकावर जोरानें आदळणाऱ्या लाटांमध्यें एखाद्या विध्वंस झालेल्या जहाजाप्रमाणें मोंगल राष्ट्राची ह्या वेळीं स्थिति झालेली होती. पुष्कळ दिवस राजकीय कैदी ह्मणून असलेला बादशहा

अलमगीर ह्याचा खून झालेला होता, आणि राज्याचे लचके तोडण्याकरितां चाललेल्या झगड्यास व्यापक प्रमाणाच्या लढाईचें स्वरूप प्राप्त होऊन वाटेल त्यास त्या लढाईंत सामील होण्याची मुभा होती. परंतु अशा रीतीनें सुरू झालेला कलह जर टिकलाच, तर भिन्न भिन्न पक्षांतील मान्य झालेल्या धुरीणांच्या प्रमुखत्वाखालीं होणाऱ्या लढाईंत त्याचें पर्यवसान होतें. या कारणामुळें आपापसांत प्रदेशाची वांटणी करणारे मनगटाच्या जोरावर बनलेले राजेरजवाडे आणि लुटालूट करीत असलेले साहसी लोक, हे ज्यांची सत्ता झपाट्यानें वाढल्या प्रमाणावर होती ते नैर्ऋत्य दिशेकडून अचानक टोळधाडीसारखे उतरलेले मराठे आणि वायव्येकडून पुन्हांपुन्हां आपल्या अफगाण सैन्यासह हिंदुस्थानावर स्वारी करणारा अहमदशहा अबदल्ली या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका पक्षाला मिळालेले होते इ. सन १७५७ मध्यें अहमदशहा अबदल्ली यानें आपलें अफगाण सैन्य दिल्ली येथें आणलें, तेव्हां मुख्य वजिराच्या जागेवर नजीबउद्दवला यास नेमण्याला त्यानें बादशहास भाग पाडलें होतें मोंगल बादशहाच्या दरबारांत जे थोडेसे कर्तृत्ववान आणि मुत्सद्दी सरदार अजून राहिले होते, त्यांतील नजीबउद्दवला हा एक असून पुढें पुढें घडलेल्या गोष्टींत त्यानें अतिशय प्रमुखत्वानें भाग घेतलेला होता. शिवाय, अहमदशहा यानें पंजाबमधील राज्यकारभार चालविण्यासाठीं व आपलें दळणवळण बिनधोक ठेवण्यासाठीं लाहोर येथें आपल्या तर्फे एका सुभेदाराची नेमणूक केली होती.

अशा रीतीनें उत्तर हिंदुस्थानावर आपला ताबा ठेवण्याची तजवीज करून अहमदशहा हा आल्या वाटेनें स्वदेशीं परत निघून गेला. मराठ्यांनीं आपल्या अंगच्या असलेल्या नैसर्गिक धिटाईनें त्याच्या जाण्याचा फायदा घेतला. एखाद्या पुराच्या लाटेप्रमाणें सर्व हिंदुस्थानभर दिग्विजय करण्याकरितां व लुटफाट मिळविण्याकरितां ते या वेळीं पसरलेले होते. आणि ज्यांनीं आपल्या साताऱ्याच्या राजघराण्याला पुष्कळ दिवसांपासून राजकीय कैदी करून ठेविलें होतें, त्या वंशपरंपरेच्या "पेशवा" अगर "मुख्य

प्रधान" ह्या घराण्यांतील अत्यंत कर्तृत्ववान असलेल्या अशा बाळाजी बाजीराव ह्या पेशव्याच्या हातीं त्यांच्या "जुटीच्या बळाचें" चालकत्व होतें. ज्या वेळीं हा बलाढ्य आणि राजनीतिकुशल पेशवा मराठ्यांचें राज्य मध्य हिंदुस्थानांत वाढवीत चालला होता, त्याच वेळीं त्याचा भाऊ रघुनाथराव यानें पेशव्यांचें मोठें सैन्य आणि शिंदे, होळकर या दोघांचें मदतीस घेतलेलें सैन्य, यासह उत्तरेकडे चाल केली, दिल्ली शहर काबीज केलें, नजीबउद्दवला याला तेथून हांकलून दिलें, आपल्या शीघ्रगामी सैन्यासह तडफीनें लाहोरवर चाल करून जाऊन अहमदशहा अबदल्ली यानें तेथें ठेविलेल्या सुभेदाराला पंजाबच्या बाहेर पिटाळून लाविलें, आणि पंजाबमध्यें मराठ्यांच्या नांवानें राज्यकारभार सुरू केला.

ग्रांट डफ ह्याच्या ह्मणण्याप्रमाणें ही "मराठ्यांची मर्दुमकी" ह्मणजे त्यांच्या वर्चस्वाचा कळस होय! "दखनच्या घोड्यांनीं सिंधुनदाच्या पाण्यानें आपली तहान भागविली."[1] परंतु ज्याप्रमाणें हा मराठ्यांच्या वर्चस्वाचा पूर्ण कळस होता, त्याचप्रमाणें त्यांच्या नशिबाचा फांसा फिरून त्यांच्या वैभवाच्या ओहोटीसही प्रारंभ ह्याच वेळेपासून झाला!! मराठी सत्तेचें केंद्रस्थान उत्तर हिंदुस्थानापासून अतिशय लांब पडल्यामुळें मर्दुमकीच्या एका फटक्यानें तो आपल्या घशाखालीं उतरविण्याच्या प्रयत्नांत त्यांची फसगत झाली!!! उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचा भरणा पुष्कळ असून ते काटक होते, आणि आजपर्यंत मराठ्यांनीं ज्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर दोन हात केलेले होते, त्यांच्यापेक्षां जबरदस्त असलेल्या अहमदशहा अबदल्लीस त्यांनीं आतां डवचलें होतें. मराठ्यांनीं दिल्ली शहराचा कबजा घेतल्यामुळें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व मुसलमान राजेरजवाड्यांना दहशत बसली, आणि त्यांना असें दिसून आलें कीं, एखाद्या प्रबळ, युद्धविशारद व संरक्षणाची हमी घेणाऱ्या सरदाराच्या आश्रयाखालीं आपण

१ मराठ्यांची बखर.

राहिलों, तरच आपला तरणोपाय होईल. अहमदशहाच्या धुरीणत्वाखालीं अशा रीतीचा एक संघ निर्माण करण्याची नजीबउद्दवला यानें जिवापाड मेहनत घेतली, आणि अहमद शहानेंही हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या आमंत्रणाला मान देण्याकरितां, अगर मराठ्यांनीं चिडविल्यामुळें संतापून, ही पडत्या फळाची आज्ञा मान्य केली. इ. सन १७५९-६० च्या हिवाळ्यामध्यें अफगाणिस्थानांतील आपल्या सर्व लढाऊ सैन्यासह वायव्य दिशेकडील खिंडीच्या रस्त्यानें पंजाबवर जोरानें चाल करून येऊन त्यानें धडाक्यासरशीं लाहोर परत घेतलें; तेथें असलेल्या सर्व मराठ्यांच्या सरदारांना उत्तर हिंदुस्थानच्या बाहेर हांकलून लाविलें; दक्षिण बाजूच्या प्रदेशांत लुटालूट करीत असलेल्या शिंदेहोळकरांवर हल्ला करून एकामागून दुसऱ्याचा पराभव केला, आणि त्यांचा अतिशय नाशही उडविला; दिल्ली शहर हस्तगत केलें; आणि आग्नेय दिशेकडे चाल करीत जाऊन गंगा नदीच्या कांठीं तळ दिला. पेशव्यांनीं झालेल्या नुकसानीचा बदला घेण्याकरितां आणि गेलेला मुलूख परत मिळविण्याकरितां आपला वडील मुलगा विश्वासराव याजबरोबर अतिशय मोठें सैन्य देऊन त्यास पुण्याहून पाठविलें. मराठ्यांचे सर्व सेनानायक या सैन्यांत जमलेले होते, आणि उलट सर्व मुसलमान -- संघटित राजमंडळ अहमदशहा अबदल्ली यास जाऊन मिळालेलें होतें.

स्वाऱ्या करण्याचा हंगाम पुन्हां सुरू होऊन तहाची थोडीशी वाटाघाट आणि पुष्कळसे डावपेच झाल्यानंतर दिल्लीनजीक असलेल्या पानिपत येथें इ. सन १७६१ च्या ज्यानेवारी महिन्यांत उभयतांचीं सैन्यें समोरासमोर भिडलीं. हिंदु आणि मुसलमान ह्यांच्यामध्यें आजपर्यंत तळ देऊन जीं जीं युद्धें झाली, त्या सर्वांत एवढें मोठें युद्ध कित्येक शतकेंपर्यंत झालेलें नव्हतें. अबदल्लीच्या पक्षाला अठ्ठावीस हजार अफगाण घोडेस्वार असून त्यानें आपल्या राज्यांतून बरोबर आणलेलें मोठें पायदळ सैन्य आणि हिंदुस्थानांतील येऊन मिळालेलें मुसलमानी सैन्य

मिळून एकंदर अजमासें ऐशीं हजार सैन्य होतें. मराठयांच्या पक्षाला ७५ हजार घोडेस्वार व १५ हजार पायदळ असें त्यांचें कायमचें सैन्य असून शिवाय पंधरा हजार पेंढारी अगर आपली पोळी पिकविण्याकरितां राजरोस लुटालूट करणारे लोक त्यांच्या निशाणाखालीं गोळा झालेले असून असंख्य हत्यारी लुटारु बाजारबुणग्यांची त्यांच्या छावणींत गर्दी उसळलेली होती; आणि त्यांच्याजवळ दोनशें तोफाही होत्या. दोन्हीही पक्षांच्या तोफखान्यांत बाणांचा तोफखाना होता. मराठे लोक आपल्या आसपास खंदक खणलेल्या तळावरून पहाटेसच बाहेर पडून त्यांनीं प्रथम त्वेषानें हल्ला केला; जें जें समोर आलें, त्या सर्वांचा धुव्वा उडविला; इराणी बरकंदाज, उंटावरील गोलंदाज, आणि शीघ्रगामी घोडेस्वारांची तुकडी, ह्या सर्वांची फळी फोडून ते पलीकडे गेले; उजव्या बाजूस असलेल्या अफगाण सैन्याची दाणादाण उडाली; आणि मधोमध असलेलें सैन्य तोफांच्या असह्य माऱ्यामुळें मागें मागें कच खात हटूं लागलें. अहमदशहाच्या वजिराच्या ताब्यांत सैन्याचा हा मधील भाग होता. तो आपल्या घोड्यावरून खालीं उतरला, आणि आपला देश अतिशय लांब असल्यानें पळून जाणें निरर्थक आहे, असें आपल्या पायदळ सैन्याला मोठयानें ओरडून सांगून त्या सैन्याची पुन्हां जमवाजमव करण्यांत त्यानें आपली शिकस्त केली. परंतु आपण स्वतःच मराठयांच्या सैन्याच्या मोठ्या प्रवाहांत गडप झालेले आहोंत, असें पाहतांच त्याला संताप आला, आणि तो अगदीं निराशही झाला. अशा या आणीबाणीच्या वेळींही, ज्या निरुत्साही नबाबांची इंग्लिश लोक दक्षिणेंत दाणादाण उडवीत असत, त्यांच्याहून अगदींच निराळ्या प्रकारचा असलेला जो अहमदशहा त्याची निधडी छाती दुभंग झाली नाही, अगर त्याच्यांत असलेल्या अत्युच्च लष्करी चातुर्यानें त्यास ह्या वेळीं दगा दिला नाहीं. आपल्या सैन्याच्या उजव्या बाजूची दाणादाण झालेली असून मधल्या बाजूची फळीही फुटलेली आहे, असें पाहतांच त्यानें पळून जाणाऱ्या

सैन्याला अटकाव केला, अगर त्यांना कापूनही काढलें; शिल्लक म्हणून मागें ठेविलेलें झाडून एकूण एक सैन्य युद्धभूमीवर आणलें, आणि वजिराच्या मदतीला एक मजबूत सैन्याची तुकडी कुमक म्हणून पाठवून दिली. त्यानें त्या सैन्याला " हातांत नंगी समशेर ठेवा, एकमेकांना चिकटून असा, आणि एकदम दौड करा, " असें सांगून शत्रूवर एकदम तुटून पडण्याला हुकूम दिला. हा हुकूम ऐकतांच वजिरानें पुन्हां रिकावींत पाय ठेविला, आणि मराठ्यांच्या दारूच्या बाणांच्या वर्षावाला न जुमानतां तो थेट त्यांच्या सैन्याच्या मधल्या फळीवर तुटून पडला. मराठे लोकही थोडा वेळपर्यंत निकरानें लढले; परंतु त्यांचा पुढारी ठार मारला गेला, त्यांच्या सैन्याची फळी फुटली, आणि त्यांची वाताहत होऊन भयंकर कत्तल उडाली. कारण, एका सपाट मैदानांत अफगाण घोडेस्वारांच्या झुंडींनीं त्यांचा पाठलाग केला, आणि चिडलेल्या शेतकऱ्यांनीं त्यांची प्रत्येक ठिकाणीं कत्तलही उडविली[१] !

ही अनर्थाची बातमी पेशव्याला पोंचतांच त्याला धसका बसला ! त्यानें दक्षिणेकडून उत्तरेकडेस जाण्याला कूच केलें, आणि तो नर्मदेच्या किनाऱ्यापर्यंत येऊन पोंचला. तेथें त्याच्या हेरांनीं पानिपत येथील कांहीं सावकारांची पत्रें दक्षिणेंतील त्यांच्या गुमास्त्यांकडे घेऊन जात असलेल्या एका जासुदाला त्याच्यापुढें आणून उभें केलें. पेशव्यांनीं तें पत्र उघडलें, आणि त्यांतील " दोन मोतीं गळालीं[२], सत्तावीस मोहरा हरपल्या, आणि रुपये व खुर्दा किती नाहींसा झाला, याची तर गणतीच करितां येत नाहीं, " अशा संदिग्ध अर्थाचा मजकूर वाचल्यावर आपल्या

---

१ अहमदशहा याचे बरोबर प्रत्यक्ष रणक्षेत्रांत हजर असून डोळ्यांनीं पाहिलेल्या एका तद्देशीय मनुष्यानें ह्या प्रसिद्ध लढाईचें मनोवृत्ति खळवळून सोडणारें केलेलें वर्णन आह्मांजवळ आहे.

एशियाटिक रिसर्चेस.

२ त्याचा मुलगा आणि चुलतभाऊ.

घराण्यांतील माणसांची वाताहत झाली, आपल्या राजकारणाची मूठ आपल्यावरच उलटली, आणि आपल्या लष्कराचीही धूळधाण उडाली, असें त्यास समजून आलें. मराठ्यांनीं उत्तर हिंदुस्थानामध्यें डळमळीत पायावर उभारलेली राज्याची इमारत अशा रीतीनें कोलमडून एकदम खालीं आल्यानें पेशव्याच्या मनाला धक्का बसला, आणि शेवटीं त्यांतच त्याचा अंत झाला! मराठ्यांना शहरांची लूटफाट उडवितां येत असेल; ते खंडणी वसूल करूं शकत असतील; अगर तात्पुरता कांहीं प्रदेशही त्यांना आपल्या ताब्यांत ठेवितां येत असेल. पण तळ देऊन होणाऱ्या लढायांनीं राष्ट्राच्या भवितव्यतेचा कायमचा निकाल ठरतो. आणि वायव्येकडील कणखर जातींपुढें दक्षिणेकडील लुटारू लोकांचा अशा रीतीनें होणाऱ्या हातघाईच्या सामन्यांत केव्हांही निभाव लागणें शक्य नव्हतें.

अशा निर्णयात्मक जयानें आशियाखंडांत नवें घराणें उदयोन्मुख होऊन एका विस्तृत राज्याची संस्थापना होते,असा आजपर्यंतचा नेहमींचा अनुभव आहे. मराठ्यांचा उत्तर हिंदुस्थानांतून जरी कांहीं काळपर्यंत समूळ नायनाट झालेला होता, आणि आशिया खंडांतील ज्या दिग्विजय करणाऱ्या लोकांनीं त्या वेळेपर्यंत आपलीं बादशाही घराणीं दिल्ली अगर आग्रा येथें स्थापन केलेलीं होतीं, त्या लोकांच्या अगदीं सारख्याच प्रवृत्तीचा जरी अहमदशहा हा होता, तरीही पण ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, पानपतच्या लढाईंत त्यानें गाजविलेल्या शौर्याच्या मानानें त्यानें करून घेतलेले फायदे पुष्कळच कमी प्रमाणाचे होते. अहमदशहानें सिंधुनदाच्या पलीकडे अफगाणिस्थानास लागून असलेल्या आणि दक्षिणेकडे दिल्ली व गंगा नदीपर्यंत पसरलेल्या एका प्रबळ राज्याची जर पंजाबांत संस्थापना केली असती, तर हिंदुस्थानाचें आणि त्यांतील ब्रिटिश लोकांचें भवितव्य हल्लीं आहे, त्याहून पुष्कळच निराळें झालें असतें. परंतु खच्चून लूट मिळविलेल्या त्याच्या सैन्यानें आपल्या पहाडी प्रदेशांत परत जाण्याबद्दल हेका धरिला; इराणच्या सरहद्दीवर

असलेल्या त्याच्या पश्चिमेकडील प्रदेशावर स्वारी होण्याचा आणि बंडाळी माजण्याचा रंग दिसू लागला; आणि या कारणांमुळें उत्तर हिंदुस्थान हळु हळु त्याच्या तावडींतून निसटून गेलें. रणजितसिंह यानें तात्पुरतें राज्य स्थापन करीपर्यंत मध्यंतरींच्या चाळीस वर्षांत पंजाबमध्यें पुन्हां घोटाळे माजले. आणि अहमदशहा हा हिंदुस्थानांतून परत गेल्यानंतर अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानावर थोड्याशा स्वाऱ्याही करण्यांत आल्या. परंतु तो परत गेल्यानंतर मध्य आशियांतून हिंदुस्थानावर विजय संपादनार्थ स्वाऱ्या करण्याची पूर्वींची लांबलचक मालिका वास्तविक रीत्या बंद पडली, आणि जवळ जवळ याच वेळीं समुद्राच्या बाजूनें प्रथम दिग्विजय करणाऱ्या लोकांनीं हिंदुस्थानांत शिरून बंगालमध्यें आपले पाय भक्कम रोविले.

भाग नववा.

मराठे आणि म्हैसूर.

(इ. सन १७६९ – ७०).

परिच्छेद पहिला—लार्ड क्लाइव्ह याचें बंगालमधील राजकारण.

(१७६५ – १७६७).

ईस्ट इंडिया कंपनीच्या कामाकाजाकडे आतां पुन्हां आपण वळूं; पानपत येथें मराठयांचा अपजय झाला, तरी हिंदुस्थानांतील सर्व एतद्देशीय सत्तांमध्यें ते अजूनही अतिशय चळवळे आणि भीतिदायक होते; परंतु मुसलमानी राजसत्तेबरोबर त्यांचें कायमचें हाडवैर असून इतरांच्या प्रदेशांत नसती कळ काढून त्यांना उगाच त्रास देण्याच्या तत्त्वाचा त्यांनीं अंगीकार केलेला असल्यानें आणि त्यांच्या लूटफाट करण्याकरितां होणाऱ्या स्वाऱ्यांच्या सार्वत्रिक त्रासानें सर्व संस्थानिक, राजेरजवाडे आणि विशेषतः मुसलमान त्यांच्या विरुद्ध एकत्र झाले होते. याचा परिणाम इंग्लिशांना हितावह झाला. कारण, मराठयांपासून जे सत्ताधारी निराळे झाले, ते इंग्लिशांच्या बाजूला येऊन मिळाले. औध येथील वजिर हा उत्तर हिंदुस्थानांतील सर्व मुसलमान राजेरजवाड्यांत त्या वेळीं प्रमुख राज्यकर्ता म्हणून होता. इ. सन १७६५ मध्यें त्यानें बंगाल घशांत टाकण्याचा दुसऱ्यानें केलेला प्रयत्न पुन्हांही हाणून पाडण्यांत आलेला होता. आणि या कारणामुळें त्यानें आतां कंपनीबरोबर दोस्तीचा तह करण्याची आपली उत्कट

इच्छा प्रदर्शित केली होती. लार्ड क्लाइव्ह हा जितका रणक्षेत्रांतील योद्धा होता, तितकाच राजकारणांतील मुत्सद्दीही असून त्यानें पाठविलेल्या खलित्यावरून त्याची नांवाजण्यासारखी दूरदृष्टि आणि मुद्देसूद विचारसरणी हीं निदर्शनास येतात. तो इ. सन १७६५ मध्यें हिंदुस्थानांत परत आला, त्या वेळीं बंगालच्या अंतःस्थ व्यवस्थेंत सुधारणा करण्याचा आणि बंगाल बाहेर तह करण्याचा त्याला पूर्ण अधिकार मिळालेला होता. अव्यवस्था आणि पापबुद्धि यांची बंगालमधील राज्यकारभाराच्या मुळांतच कीड लागलेली आहे, असें त्यास आढळून आलें. त्यानें ढोबळ दुराचार निश्चयानें दाबून टाकले; आपल्या अलौकिक कर्तृत्वशक्तीनें राज्यव्यवहाराची पुन्हां नवी घडी बसविली; बाह्य राजकारणांत दोन महत्त्वाच्या गोष्टी करून त्यानें आपल्या प्रदेशाच्या हद्दींत मजबुत पायावर ब्रिटिश राष्ट्राची संस्थापना केली; आणि परराज्यांशीं असलेल्या संबंधांनाही व्यवस्थित मूर्त स्वरूप दिलें.

ह्या दोहोंपैकीं पहिलें कृत्य ह्मणजे मोंगल बादशहाला गंगानदी पलीकडील तैनातीदाखल दिलेली अलाहाबाद व कोरा ह्या दोन प्रांतांची नेमणूक आणि दरवर्षी बंगालच्या वसुलींतून सव्वीस लाख रुपयांचा बटवडा, ह्या अटींवर त्यानें मोठ्या आनंदानें दिलेली "बंगालची दिवाणी" हिचा क्लाइव्ह यानें कंपनीकरितां आदरानें स्वीकार केला, हें होय. बंगाल प्रांताच्या सर्व वसुलाचा ताबा अशा रीतीनें कंपनीच्या हातीं आल्यानें तिचें सशस्त्र व्यापारी मंडळीच्या बेजबाबदार व्यवस्थापकांमधून जबाबदार राज्यकर्त्यांमध्यें एकदम रूपांतर झालें, आणि त्यामुळें त्या प्रदेशांत प्रचलित असलेल्या सरकारी संपत्तीचा अपहार, कलंक आणणारी ठकबाजी, आणि दिमतींतील वस्तूंचा अपव्यय, यांचा बींमोड करण्याची कंपनीला प्रत्यक्ष आस्था वाटूं लागली; आणि याच सुधारणेमुळें बंगाली नबाबाच्या कळसूत्री बाहुल्याचें नामधारी सरकार व कंपनीचा प्रत्यक्ष अधिकार, यांच्यामधील वारंवार होणाऱ्या कलहाचाही कायमचा निकाल लागला. क्लाइव्ह यानें

असें लिहिलें आहे कीं, “एतद्देशीय राज्यकर्त्यांचा अधिकार, त्यांचेकडून होणारें आतिक्रमण आणि अपमान, हीं सोसूनही आम्ही व्यापारीच राहिलों, तर अधिक फायदे होतील, किंवा आपला हक्क आणि आपला ताबा यांना तरवारीचा दुजोरा दिल्यास अधिक फायदेशीर होईल, याचा निर्णय करण्याची वेळ आतां जवळ जवळ येत चालली आहे; – दुसऱ्या शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे, आमचा अधिकार स्वतंत्र आहे, अशा धाटीनें कंपनीनें राजरोस आपलें धोरण चालू करावें कीं काय?” त्यानें “या शिवाय दुसऱ्या कशानेंही आपली स्थिति बळकट अगर कायदेशीर होणार नाहीं,” असें ठरविलें असून तें त्याचें ठरविणेंही बरोबर होतें. एखाद्या एतद्देशीय राज्यव्यवस्थेचीं कळसूत्रें फिरवून अगर राज्यव्यवस्थेचें यंत्र एकदम मोडल्यास राज्यक्रांतिसारख्या गोष्टी करून आतां त्यांना राहतां येणें शक्य नव्हतें; आणि ज्या अर्थीं त्यांना आपल्या हातीं असलेली सत्ता सोडतां येईना, त्या अर्थीं तिच्या कारभाराची जबाबदारीही आपल्या अंगावर घेणें त्यांना भाग पडलेलें होतें.

क्लाइव्ह याचें दुसरें कृत्य म्हटलें म्हणजे, त्यानें औधच्या वजिराबरोबर मित्रत्वाचा तह घडवून आणला, हें होय. इ. सन १७६४–६५ मध्यें जी लढाई झाली, तिजमुळें वजिराचा फार नाश झाला होता; त्याचा अलाहाबाद येथील मजबुत किल्ला इंग्लिश सैन्यानें घेतला होता; त्याला आपली राजधानी लखनौ ही सोडून पळून जाणें भाग पाडिलें होतें; आणि या कारणामुळें त्यानें मराठ्यांचा आश्रय घेतला होता. वायव्येकडील सरहद्दीवर असलेले त्याचे कांहीं महत्त्वाचे प्रांत दिग्विजयाच्या हक्कानें खालसा करून घेणें, किंवा जो प्रदेश तो अगदीं अनिश्चित हक्कानें दडपून बसलेला होता, आणि ज्यांतून त्याला सहज हांकलूनही देतां येण्यासारखें होतें, त्या प्रदेशावर त्यालाच पुन्हां राजा करून आपल्या पक्षाला वळवून घेणें, ह्यांपैकीं कोणता मार्ग स्वीकारावा, हें या वेळीं कंपनीच्या खुषीवर अवलंबून होतें. लार्ड क्लाइव्ह यानें निःशंकपणानें दुसऱ्या मार्गाचें अवलंबन केलें.

राजनीतीचें प्रत्येक उदात्त तत्त्व कंपनीचा अधिक प्रदेशावर ताबा वाढविण्याच्या अगदीं विरुद्ध आहे, ह्या मुद्यावर त्यानें ते प्रांत औधच्या राज्यांतच पुन्हां कायम ठेविले. परंतु ह्या निर्णयानें त्याला असें आढळून आलें कीं, "ज्यांना दुसरें कांहीं नाहीं, पण बादशहासह दिल्लीवर चाल करून जावें एवढेंच फक्त वाटत होतें, त्या पुष्कळांच्या आशेचा विरस झाला; तथापि माझा असा निश्चय होता, व माझी अशीच इच्छा राहील कीं, आमची मदत, आमचा दिग्विजय आणि आमचा ताबा, हीं बंगाल, बहार व ओरिसा ह्या तीन प्रांतांच्या आंतच मर्यादित ठेवावीं; याच्या पलीकडे जाणें म्हणजे माझ्या मतें ही इतकी अतिशय महत्त्वाकांक्षेची आणि असमंजसपणाची कल्पना आहे कीं, कंपनीच्या हितसंबंधाची सर्व प्रचलित असलेली पद्धति बदलून तिची अगदीं पहिल्यापासून नवीन धर्तीवर घटना केल्याशिवाय कोणताही समंजस गव्हर्नर आणि त्याचें कौन्सिल ह्या कल्पना अमलांत आणणार नाहीं.[1]" या कारणामुळें त्यानें बंगाल आणि उत्तर हिंदुस्थान यांच्यामध्यें आडकाठी असलेलें औधचें राज्य दोस्त सरकार या नात्यानें कायम ठेवून त्याला बळकटी आणावी, असें ठरविलें. लार्ड क्लाइव्ह यानें या तत्त्वाअन्वयें घडविलेल्या प्रतिबंधक तहावरच[2] त्या शतकाच्या अखेरपर्यंत त्या सरहद्दीवरील इंग्लिशांच्या परराष्ट्रीय राजकीय धोरणाची उभारणी झालेली होती.

हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या कामकाजाचीं सूत्रें ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं ज्यांच्या हातीं होतीं, त्यांचा मुख्य उद्देश, कंपनीच्या ताब्यांतील प्रदेशाच्या वाढीला आळा घालावा, दिग्विजयांच्या बेतांवर कडक दाब ठेवावा, आणि ज्यामुळें आपणाला परराज्याशीं कदाचित् लढाया करण्यामध्यें गुंतणें भाग पडेल असे एतद्देशीय राजेरजवाड्यांबरोबरील सर्व संबंध टाळावे, हा होता. परंतु आपण

---

१ कमिटी रिपोर्ट, पान ३९३, भाग तिसरा.

२ आगष्ट १७६५.

कोणीकडे वाहवत चाललों आहोंत, हें कंपनीनें पाहिलें नाहीं, असें जें कांहीं लोकांना वाटतें, तें कारण मात्र ह्या उद्देशाच्या मुळाशीं नाहीं; तर त्यांच्या परिस्थितीचा झालेला परिणाम आणि अनिवार मोहप्रवृत्ति हीं अगदीं पूर्वींच उघड उघड दिसून आलेलीं होतीं, हें कारण त्याच्या मुळाशीं होतें. ज्यांनीं इंग्लिशांसमोर त्या वेळीं असलेल्या भावी आशाजनक परिस्थितीचें निरीक्षण केलें होतें, आणि ज्यांना कोणत्याही मजबुत आणि सुसंगत राज्यसत्तेच्या केंद्राकडे मुसलमानी राष्ट्राचे पांगलेले तुकडे राजकीय आकर्षणानें ओढून घेतां येतील असें दिसून आलें होतें, त्यांना या वेळेला — विजय मिळविण्याकरितां व्यापाराला फारकत देण्याला, आणि मोंगल राष्ट्र नष्ट झाल्यामुळें मोकळ्या असलेल्या विस्तृत प्रदेशावर दुसरें मोठें राष्ट्र स्थापन करण्याला, जर कंपनी तयार असेल, तर राजकीय क्षेत्र मोकळें पडलेलें आहे, आणि कर्तृत्ववान विभूतींना करण्याला पुरेसें कामही आहे, — ही गोष्टही उघड उघड दृग्गोचर झालेली होती. इ. सन १७६२ सालीं बक्सार येथें कंपनी सरकारला जय मिळण्यापूर्वीं दिल्लीच्या बादशहाला त्याच्या तख्तावर पुन्हां बसविण्याकरितां आणि सर्व उत्तर हिंदुस्थानभर आपलें राजकीय वजन वाढविण्याकरितां सैन्य पाठविण्याच्या बेताबद्दल कलकत्ता येथील कौन्सिलनें इंग्लंडांत कळविलें होतें; इ. सन १७६४ नंतर औधच्या वजिरावर इंग्लिशांना जय मिळाल्यामुळें त्यांच्या सैन्याचा बंगालच्या पलीकडे शिरकाव झाला, तेव्हां क्लाइव्ह याला उघड उघड असें समजून चुकलें कीं, “ याच्या पुढें आह्मी एक पाऊल टाकलें कीं, आह्मांला धाडशी कृत्यांत गुरफटावें लागेल, आणि त्यानंतर त्यांतून पुनः केव्हांही माघार घेतां येणें शक्य होणार नाहीं. ” इ. स. १७६९ मध्यें त्यानें असें लिहिलें आहे कीं:—

“ जी आणीबाणीची वेळ येईल ह्मणून मी पूर्वींच भविष्य केलें होतें, ती आणीबाणीची वेळ एकदाची येऊन धडकली. याच वेळीं आम्ही सर्व आमच्याकरितां घेणें शक्य आहे, अगर आम्ही खात्रीनें घेऊं कीं

काय, हें ठरविणें अगत्याचें आहे. जाफर अल्लीखान (बंगालचा नबाब) हा मृत्यु पावला असून त्याचा औरस पुत्र अज्ञान आहे. सुजाउद्दवला (औधचा नबाब) याला त्याच्या राज्यांतून हांकलून दिलेलें असून त्याचें राज्य आज आमच्या ताब्यांत आहे, आणि उद्यां तर सर्व मोंगल राष्ट्रही आमच्या हातांत आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. देशांतील रहिवाश्यांची कोणत्याही प्रकारच्या उपकारावर निष्ठा नाहीं; आमच्यासारखें त्यांचें सैन्य शिस्तीचें नाहीं; त्यावर योग्य अधिकारी नाहींत; अगर आमच्या सैन्याप्रमाणें त्यांना पगारही दिला जात नाहीं. अशा स्थितींत एका मोठ्या युरोपियन सैन्याच्या जोरावर एखाद्या एतद्देशीय राज्यकर्त्याचे प्रयत्न हाणून पाडून वस्तुतः आपणाला हिंदुस्थानांत कायमचें सार्वभौम सरकार या नात्यानेंच फक्त नांदतां येईल, इतकेंच नव्हे, तर त्याची इतकी मोठी दांडगी मदत होईल कीं, फ्रेंच, डच अगर आमचे दुसरे मोठे शत्रु, यांना आम्हांला त्रास देण्याचें मनांतही आणतां येणार नाहीं, याबद्दल अजूनही साशंक राहण्याला कांहीं जागा आहे कीं काय ? "

वर लिहिल्याप्रमाणें वाखाणण्यासारख्या दूर दृष्टीनें ज्या भावी उघड उघड दिसणाऱ्या संभाव्यतेला टाळण्याचा लार्ड क्लाइव्ह यानें आपल्या मालकांना कळकळीनें सल्ला दिला, तिच्याशीं – शांत आणि चाणाक्षपणानें अवलोकन करणाऱ्यांना भावी राज्यविस्ताराच्या शक्यतेचा अंदाज किती बरोबर रीतीनें करतां आला होता, हें दाखविण्याकरितां – तुलनेदाखल इ. सन १७७० मध्यें मिस्तर डाऊ ह्या नांवाच्या इतिहासकारानें लिहिलेल्या हिंदुस्थानच्या इतिहासांतील अगदीं शेवटच्या पानांतील खालील उताऱ्याचा उपयोग होईल. तो ह्मणतोः—

" ह्याप्रमाणें थोड्याशा शब्दांत हिंदुस्थानच्या सांप्रतच्या स्थितीची सर्वसाधारण कल्पना करून देण्याचा आह्मी प्रयत्न केलेला आहे. मागें लिहिलें आहे त्यावरून हें उघडच होतें कीं, शिस्तीच्या मूठभर सैन्यानें हा सर्व अतिशय विस्तृत प्रदेश जिंकतां येईल. कंपनीच्या नौकरींत असलेलें

दहा हजार युरोपियन पायदळ आणि एतद्देशीय शिपाई, हे सर्व हिंदुस्थान जिंकण्याला पुरेसे आहेत, इतकेंच नव्हे, तर इंग्लंडच्या राज्याचें उपांग ह्मणून योग्य राज्यव्यवस्थेनें अनंत काळपर्यंत तें तसेंच राखण्यालाही ते पुरेसे आहेत. हिंदुस्थानांतील रहिवाश्यांची स्वाभाविक प्रवृत्ति आणि बुद्धि-वैभव यांच्याशीं जे लोक अपरिचित आहेत, त्यांना प्रथम दर्शनीं ही स्थिति ह्मणजे निव्वळ असत्याभास आहे असें वाटेल; परंतु ज्यांनीं ह्या दोन्हीही गोष्टींचा लक्षपूर्वक विचार केला आहे, त्यांना ह्या गोष्टी प्रचारांत आणतां येतील, एवढेंच फक्त वाटत नाहीं, पण त्या तशा प्रचारांत आणणें सोपेंही आहे, असें वाटतें. "

आणि खरोखर अशीच स्थिति आहे, असें निदर्शनास आलें. कारण, दक्षिण हिंदुस्थान आणि बंगाल यांमधील लढायांच्या अनुभवावरून हिंदुस्थान जिंकण्याला अवश्य असलेल्या लष्करी बळाचा डाऊ यानें केलेला अंदाज जरी निःसंशय पुष्कळच कमी ठरला, तरी राजकारणां-तील गोष्टींच्या त्यानें बांधलेल्या अटकळी वास्तविक रीत्या आलेल्या अनु-भवावरून पाहतां अगदीं बरोबर होत्या. यावरून आपणाला हें उघड दिसून येतें कीं, राजकारणाच्या परिस्थितीचें उत्तम रीतीनें निरीक्षण कर-णाऱ्यांचें मननपूर्वक असें मत झालेलें होतें कीं, इंग्लिश लोक हे अगो-दरच इतके प्रबळ आहेत कीं, आपलें पूर्ण वर्चस्व प्रस्थापित करण्यांत त्यांना कोणतीही एतद्देशीय सत्ता अडथळा करूं शकली नसती; शिवाय कोणत्याही परकीय प्रतिस्पर्ध्यानें जर पुन्हां ढवळाढवळ केली नाहीं, तर हें धाडशी कृत्य त्यांच्या अटोक्यांतील होतें. इंग्लिश लोक हे अजूनही किनाऱ्याजवळ असल्यानें एखाद्या युरोपस्थ राष्ट्राला अगर मध्य आशियां-तून एखाद्या बलिष्ट स्वारी करणाऱ्याला हिंदुस्थानांतील क्षेत्रांत अद्यापही पुन्हां येऊन आत्मदर्शन देतां येणें शक्य होतें, आणि त्याला उत्तर हिंदु-स्थानांत आपली स्थापना करतां येईल, एवढाच काय तो त्यांना अति-शय भयंकर अडथळा होता. परंतु फ्रेंचांना अर्धचंद्र मिळाल्यापासून

समुद्राच्या बाजूनें होणाऱ्या आगंतुक अडथळ्याची भीति तात्पुरती बंद झालेली होती, आणि गेलीं दोन हजार वर्षें शिकंदर बादशहापासून अहमदशहा अबदल्लीपर्यंत हिंदुस्थानावर स्वारी करण्याकरितां अफगाणिस्थानामधून असलेला धोपट मार्गही आतां सरते शेवटीं झपाट्यानें बुजत चाललेला होता. अहमदशहानें या वेळीं अफगाणिस्थानामध्यें अमीराचें घराणें स्थापन केलें होतें, आणि हेंच घराणें अफगाणिस्थानांतील डोंगर व दरींखोरीं यांत कायमची वसाहत करून राहिलेल्या टोळ्यांच्या जमावावर अजमासें दीड शतक राज्य करीत आहे. आक्सस नदी व ईशान्य इराण ह्या भागांतून हिंदुस्थानांत येण्याचे सर्व रस्ते ह्याच उंच सखल पहाडी प्रदेशानें बंद केलेले आहेत. ह्या देशांतील सर्व जाति स्वतंत्र आणि लढवय्या आहेत, इतकेंच नव्हे, तर कोणत्याही मोठ्या सुधारलेल्या राष्ट्रानें त्यांच्यावर स्वारी करण्याच्या अगोदर त्याला पूर्ण विचार करावयास लावण्याइतक्या त्या बळकटही आहेत. परंतु भरपूर बंदोबस्त असलेल्या सरहद्दीवर प्रसंगविशेषीं होणाऱ्या उपद्रवाहून अधिक त्रास देण्याला ते अतिशय कमकुवत आणि गरीब आहेत.

हिंदुस्थानचे वायव्येकडील रस्ते बाहेरील प्रदेशांतून होणाऱ्या स्वाऱ्यांना लवकरच जोडकुलपानें बंद होऊं घातले होते, ही गोष्टही ह्या ठिकाणीं ध्वनित करण्यास हरकत नाहीं. कारण, ज्या वेळीं मध्य आशियांतून ह्या एवढ्याच अभिगम्य असलेल्या खुष्कीच्या मार्गांनीं सैन्यासह हिंदुस्थानावर होणाऱ्या स्वाऱ्यांचे प्रयत्न हाणून पाडण्याला या स्वतंत्र अफगाणिस्थानच्या राज्याची उत्तम आडकाठी झाली होती, त्याच वेळेच्या सुमारास प्रत्यक्ष अफगाणी लोकांनाही पंजाबमध्यें घुसतां येण्याला शीख लोकांनीं प्रतिबंध केला होता. शीख धर्म हा हिंदू धर्मांतील एक पंथ असून त्याची झपाट्यानें वाढत चाललेली सत्ता हें, – आशियाखंडांत ज्या नेहमींच्या बहुतेक ठरीव पद्धतीप्रमाणें प्रत्येक जातीच्या धर्मप्रसाराच्या मोठ्या चळवळीला राजकीय आणि लष्करी स्वरूप प्राप्त

होते, – त्याचेंच एक उदाहरण आहे. दोन्हीही प्रवृत्तींचा परस्परांवर निःसंशय असाच परिणाम घडतो; कारण, धर्माच्या पुनरुज्जीवनाकरितां उभारलेल्या निशाणाखालीं राजकीय असंतोष उत्पन्न झालेले बरेचसे लोक ज्याप्रमाणें खात्रीनें येऊन गोळा होतात, त्याचप्रमाणें उलट राजकीय चळवळीही आपलें एक निशाण उभें करून धार्मिक उत्साहाच्या आश्रयाची नेहमीं मदत घेत असतात. गेलें शतक संपण्याच्या सुमारास इस्लामी धर्माशीं कट्टा विरोध असलेल्या आणि आपल्या मुसलमान राज्यकर्त्यांविरुद्ध उघड उघड बंडखोर बनलेल्या शीखधर्मानुयायांची आतां एक जुटीची जमात बनत चालली होती, आणि त्यांचें चिकाटीचें युद्ध करण्याचें कसब व लष्करी धुरीणांच्या प्रमुखत्वाखालीं त्यांची झपाट्यानें झालेली राजकीय वाढ, ह्यांमुळें उत्तर हिंदुस्थानच्या पलीकडे सतलज नदीपासून सिंधुनदापर्यंत त्यांची सत्ता वाढत्या प्रमाणावर होती. अशा रीतीनें ते मध्य आशियांतून होणाऱ्या स्वाऱ्यांना प्रतिबंध करण्याकरितां एक आंतल्या बाजूनें आणि दुसरी कच्ची तटबंदी उभारीत होते. त्यामुळें हिंदुस्थानांतील इस्लामी धर्म व बाहेरील इतर मुसलमानी जग यांचेमधील परस्पर दळणवळण बंद झालें होतें.

पंजाबच्या वर लिहिलेल्या भागाशिवायच्या सतलज नदीच्या खालीं अगदीं आग्नेय दिशेला दिल्लीपासून लखनौच्या पलीकडेपर्यंत एक सुपीक मध्यवर्ती प्रदेशाची अरुंद व लांबोळी पट्टी पसरलेली आहे. ही पट्टी गंगा व यमुना ह्या नद्यांच्या लगत असून तो सर्व प्रदेश ह्या वेळीं मुसलमान राजेरजवाडयांच्या ताब्यांत होता. परंतु त्याला उत्तरेकडून शीख लोकांची आणि पश्चिमेकडून मराठयांची भीति असे. ह्या सर्व राजेरजवाड्यांमध्यें त्यांतल्या त्यांत औधचें राज्य अधिक मोठें व महत्त्वाचें होतें, आणि कंपनीच्या ताब्यांतील बंगालमधील मुलखाची वायव्य सरहद्दीची सर्व बाजू त्याच्या प्रदेशानें व्यापून टाकलेली होती. आपण पूर्वी वाचलेलेंच आहे कीं,

इ. सन १७६५ मध्यें लार्ड क्लाइव्ह यानें औधच्या वजिराबरोबर दोस्तीचा तह केला होता, आणि ज्या अर्थी याच वेळीं त्यानें भिकेला लागलेल्या मोंगल बादशहालाही भरपूर वसुलाची वांटणी देऊन संतुष्ट केलें होतें, त्या अर्थी इंग्लिशांना त्या वेळीं त्या बाजूकडून मुळींही भीति बाळगण्याचें कारण नव्हतें. वायव्य हिंदुस्थानांतील सर्व हिंदु आणि मुसलमान राजेरजवाड्यांमध्यें वर लिहिल्याप्रमाणें असलेला मत्सरभाव आणि धार्मिक वैरभाव यांनीं त्यांच्या आपसांतील एक प्रकारच्या सत्तेच्या पारड्याचा समतोलपणा राखिला; आणि त्यांत लार्ड क्लाइव्ह यानें शहाणपणानें औधच्या वजिराबरोबर केलेल्या दोस्तीच्या तहाची भर पडली. या गोष्टीवरून पुढील ४० वर्षांत बहुतेक शांततेनें इंग्लिशांच्या बंगालमधील त्या सरहद्दीवर असलेल्या प्रदेशाचा त्यांना आनंदानें कां उपभोग घेतां आला, याचें कारण उघड उघड दृग्गोचर होतें.

परिच्छेद दुसरा—दक्षिणेंतील मराठे व हैदरअल्ली.

(इ. सन १७६७-६९).

या कारणामुळें, जेव्हां इंग्लिश लोकांची अशा रीतीनें बंगालमध्यें स्थापना झाली, तेव्हां इ. सन १७६५ सालीं त्यांच्या राज्यविस्ताराचें पाऊल पुढें न पडतां तेथेंच थबकलें. "आपला ताबा आणि आपला दिग्विजय संपूर्ण रीतीनें बंगालमध्येंच जखडून ठेवावा,"[१] हा लार्ड क्लाइव्ह याचा असलेला बेत त्यानें अजून इतक्या यशस्वी रीतीनें सिद्धीस नेला होता कीं, त्या वेळीं इंग्लिशांच्या ज्या सरहद्दी त्यानें ठरविलेल्या होत्या, त्या सरहद्दी त्या शतकाच्या अखेरपर्यंत म्हणण्यासारख्या वाढल्या नाहींत; परंतु त्यानंतर मराठ्यांनीं उत्तर हिंदुस्थानांतील सपाट प्रदेशावर स्वाऱ्या केल्यामुळें ज्या समतोलपणानें इंग्लिशांचें उपद्रवापासून संरक्षण केलें

---

१ लार्ड क्लाइव्ह यानें इंग्लंडमध्यें कंपनीच्या व्यवस्थापकांना पाठविलेल्या पत्रांतील उतारा. इ. सन १७६५

होतें, तो समतोलपणा कायम राहिला नाहीं. तथापि त्या दरम्यानचा काळ हा हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांना शांततेचा आणि स्वस्थतेचा गेला, असें मात्र बिलकुल ह्मणतां यावयाचें नाहीं; उलट याच वेळीं सतत लढाया चालू असून त्यामुळें त्यांची सांपत्तिक स्थिति अतिशय ओढाताणीची झालेली होती, आणि त्यांचें राज्यही कधीं कधीं कांहींसें धोक्यांत आलें होतें. इ. सन १७६९ नंतर पुन्हा परिस्थितींत बदल झाला. एतद्देशीय राजेरजवाड्यांशीं असलेल्या भांडणांचें केंद्र मद्रास आणि मुंबईकडे खालीं आलें, आणि जरूरीच्या राजकीय निकडीचे मध्यबिंदु दक्षिणेकडे द्वीपकल्पाच्या बाजूला आणि पश्चिमेकडे समुद्रकिनाऱ्याजवळ थोड्या काळापर्यंत ओढले गेले. हिंदुस्थानच्या मध्यभागीं दक्षिणेच्या मराठ्यांबरोबर आणि ह्मैसूर येथील मुसलमान राज्यकर्त्यांबरोबर लढाया चालू झाल्या, आणि त्यामुळें इंग्लिशांच्या राज्यविस्ताराला आळा बसून तो कांहीं काळ मागें पडला.

हिंदुस्थानांतील रणक्षेत्रांत त्या वेळपर्यंत इंग्लिशांनीं सामना दिलेल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांमध्यें वर लिहिलेल्या मराठे व ह्मैसूरकर ह्या दोघांचीही राजसत्ता, त्यांची विशेष प्रकारची प्रवृत्ति आणि घटना यांमुळें, पुष्कळच अधिक खंबीर होती. गेलीं तीस वर्षें सर्व हिंदुस्थानभर सतत लढाया चालू होत्या, आणि तरवारीच्या जोरावर मोठमोठालीं बक्षिसें मिळवितां येण्यासारखीं होतीं; त्यामुळें राजकुलांतील जन्म अगर अकल्पित दैवयोग यांनीं मोंगल राष्ट्राचा नाश होण्याच्या सुरवातीला जे बहुतेक लोक पुढें सरसावले होते, त्यांहूनही अधिक श्रेष्ठ प्रतीच्या लढवय्ये लोकांचा एक वर्ग आतां रणक्षेत्राच्या रंगभूमीवर आलेला होता. या जोरदार प्रकारच्या लढवय्या वर्गापैकींच ह्मैसूरचा हैदरअल्ली हा एक असून त्याच्यांत जन्मसिद्धच अतिशय बुद्धिवैभव होतें, आणि आपलें अलौकिक धाडस, आपली लष्करी उपजत बुद्धि, आणि प्रसिद्ध व भाग्यशाली धुरीणांच्या निशाणाखालीं नेहमीं जमणाऱ्या भाडोत्री सैन्याच्या टोळ्यांना व्यवस्थित रीतीनें

चागविण्याची आपली हातोटी, या गुणांमुळें स्वतःच्या करामतीवर तो उच्च पदास चढलेला होता. याच वर्गापैकीं टोळ्यांचे, जमातींचे अगर लष्करी मंडळांचे सरदार अगर पुढारी, — दख्खनचे मराठे, भरतपूरच जाट, पंजाबमधील शीख, आणि रोहिलखंडांतील रोहिले, — यांच्या सारखे असून ते एक जात, एक धर्म अगर एक देश, ह्यांसारख्या, खऱ्या अगर काल्पनिक, बंधनानें एकत्र झालेले होते, आणि ह्या सर्वांचे एक प्रकारच्या राष्ट्रीय अगर प्रांतिक तत्त्वावर दुसऱ्यांवर हल्ले करण्याकरितां अगर स्वतःचें संरक्षण करण्याकरितां निरनिराळे बळकट संघ बनलेले होते. अशा तऱ्हेचे संघ अंतःस्थ कलह आणि फूट यांनीं कमकुवत होणें स्वाभाविक होतें. परंतु त्यांच्यांत आपापल्या भूमीबद्दल असलेल्या खऱ्या कळवळ्याचीं पाळेंमुळें जमिनींत कांहींशीं खोल रुजलेलीं असल्यामुळें आणि त्यांच्यांत सामाजिक जुटीचें खरें बंधनही असल्यामुळें ज्या म्हैसूरच्या हैदरअल्लीसारख्या कर्तबगार लष्करी सुलतानाबरोबर इंग्लिशांनीं दक्षिणेंत लढाईचें नवें सत्र ह्या वेळीं सुरू केलें होतें, त्याच्या सैन्याहूनही नेहमीं श्रेष्ठ प्रकारची चेतना आणि पुष्कळ जोरानें प्रतिकार करण्याची कुवत त्यांच्या ठिकाणीं वास करीत होती. भाडोत्री सैन्याच्या युद्धविशारद सेनानीचा एखाद्या एकव्याच लढाईंत पराजय करणें कदाचित् नेहमीं कठिण असेल, परंतु ढोबळ प्रमाणानें ह्मणावयाचें ह्मणजे, असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या सैन्यानें खऱ्या निकराचीं जीं सर्व युद्धें केलेलीं आहेत, तीं विवक्षित जातीचे संघ अगर कांहींशा प्रमाणानें राष्ट्रीय मंडळ्यांसारख्या दिसणाऱ्या मंडळ्या — ह्मणजे मराठे, शीख, जाट अगर अफगाण, — यांच्याशीं केलेलीं आहेत.

इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें बंगाल प्रांत संपादान केल्यानंतर राजकीय धाडस आणि लष्करी स्वाऱ्या यांच्या मार्गाचें तिनें पुन्हां अत्यंत कष्टानेंच अवलंबन केलें आहे. इ. सन १७६७ मध्यें लंडन येथील कंपनीच्या व्यवस्थापकांनीं आपल्या कलकत्ता येथील प्रेसिडेंटला असें लिहिलें आहे कीं:—

" बंगाल, बहार आणि ओरिसा येथील दिवाणी, कारोमांडल किनाऱ्यावर कर्नाटकच्या संरक्षणाची हमी, आणि उत्तर सरकार ह्या प्रदेशाचा ताबा,....आणि मुंबईच्या बाजूला मुंबई आणि त्यावर अवलंबून असलेलीं ठिकाणें, साष्टी, वसई आणि सुरतचा किल्ला, ह्याच आमच्या विचाराप्रमाणें हिंदुस्थानांतील त्या त्या बाजूच्या आपल्या प्रदेशाच्या अगदीं शेवटच्या मर्यादा आहेत. जर आह्मी या मर्यादांचें उल्लंघन केलें, तर आम्हांला एकामागून दुसरा याप्रमाणें प्रांत काबीज करावे लागतील, आणि अशा रीतीनें सर्व हिंदुस्थान आपल्या हातीं येईपर्यंत आपण सुरक्षित आहोंत, असें आपणाला केव्हांही वाटणार नाहीं. परंतु सर्व हिंदुस्थान मिळविण्याकरितां तुम्हांला तुमचें सैन्य विभागावें लागेल, आणि त्यामुळें आपणाला सर्व हिंदुस्थान मिळण्याऐवजीं आपल्या हातीं असलेलें सर्व नाहींसें होईल, आणि सरते शेवटीं त्याचा परिणाम हिंदुस्थानांतून आपलें ' समूळं च विनश्यति ' होणें हा होईल. "

ज्या बातमीमुळें कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाला भीति उत्पन्न झाली, व ते नाखूष झाले, ती बातमी मिळाल्यानंतर त्यांनीं हें वरील पत्र लिहिलेलें होतें. फ्रेंच लोकांना जरी इंग्लिशांनीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून हांकलून दिलें होतें. तरी आग्नेय किनाऱ्यावरील त्यांची स्थिति अजून फारशी सुरक्षित झालेली नव्हती. बंगालमध्यें इंग्लिश लोक हे एका सुपिक अंतर्प्रदेशाचे धनी म्हणून ओळखले जात असून त्यांना समुद्राच्या बाजूनें हल्ला होण्याची मुळींही भीति नव्हती. आणि औधच्या वजिराबरोबर त्यांचा दोस्तीचा तह झालेला असल्यामुळें त्यांच्या जमिनीच्या सरहद्दीच्या उघड्या बाजूला त्याच्या राज्याचा आश्रय झाला होता. परंतु मद्रासकडे कंपनीचा प्रदेश समुद्र किनाऱ्याच्या बाजूनें असून त्यांच्या जमिनीच्या सरहद्दीची बाजू अनिश्चित प्रकारच्या संरक्षणाची हमी घेतलेल्या कर्नाटकच्या नबाबाच्या प्रदेशानें व्यापिलेली होती. परंतु त्याचें इंग्लिशांबरोबरील वर्तन अविश्वसनीय होतें. हैदर अल्ली आणि मराठे हे इंग्लिशांचे

चळवळे आणि रणशूर शेजारी असून ते त्यांच्या सरहद्दीसभोंवती दुश्चिन्ह-सूचक घिरट्या घालीत होते; उलट इंलिशांचा एकुलता एक दोस्त असलेल्या हैद्राबादच्या निझामाची तारांबळ उडालेली असून तो कावेबाजपणानें धरसोडीचें वर्तन करीत होता.

हैदर अल्ली हा साधारण भाडोत्री सैन्याच्या समूहांतून वाढून लहानशा सत्ताधारी बनलेल्या एका शिपायाचा मुलगा होता. त्यानें नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपलें सैन्य पहिल्यानें एका एतद्देशीय राज्यकर्त्याच्या नौकरींत कामाला लाविलें; आणि त्यानंतर तें स्वतःच्या स्वतंत्र महत्त्वाकांक्षा तडीस नेण्याकरितां आपल्याच उपयोगांत आणून तो स्वतःच्या कर्तबगारीनें पुष्कळच पुढें आला. अशा रीतीनें लष्करी पुढारी म्हणून त्यानें प्रसिद्धि मिळविली; बेदनूरच्या लुटींत त्याला मोठा खजिना मिळाला; व त्यामुळें मद्रासच्या थेट पश्चिमेकडे असलेल्या ह्मैसूरच्या जुन्या हिंदू राज्याचा तो आपल्या मनगटाच्या जोरावर राजा झाला. ह्मैसूरपासून त्यानें आपला दिग्विजय अगदीं पश्चिमेकडे मलबारच्या समुद्र किनाऱ्यापर्यंत रेटीत आणला, आणि जेव्हां जेव्हां हात मारण्याची संधि मिळेल, तेव्हां तेव्हां तो आतां दक्षिण हिंदुस्थानांतील प्रदेशही बळकावीत चालला होता. त्यानें दाखविलेली धूर्तता आणि धैर्य यांनीं त्याच्या आसपासच्या राजेरजवाड्यांना भीति वाटूं लागली होती, पण त्यांपैकीं बरेचसे त्याच्यासारख्याच व्यवसायांत गुंतलेले होते. हैदरअल्लीच्या मुख्य शत्रूंपैकीं मराठे हे एक असून त्यांच्याबरोबर त्याच्या कांहीं जोराच्या चकमकी उडालेल्या होत्या, आणि हैद्राबादच्या निझामाच्या राज्यांतील मोठमोठ्या प्रदेशाचे तुकडे तो आपल्या घशाखालीं उतरवीत चालला होता. इकडे ह्मैसूरमधून कर्नाटकलाही तो भिववीत होता. आणि उलट पक्षीं मद्रास सरकारचा तर त्या प्रदेशाचें संरक्षण करण्यांत अत्यंत हितसंबंध गुंतलेला होता.

ह्याच वेळेच्या सुमारास लार्ड क्लाइव्ह हा बंगालच्या कामकाजाच्या बाबती मोंगल बादशहा शहाअलम याजबरोबर ठरवीत होता. त्या वेळीं त्यानें मद्रासच्या उत्तरेस असलेल्या " उत्तर सरकार " ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रांताबद्दल बादशहाकडून रीतसर परवाना मिळविला. हेच प्रांत निझामानें फ्रेंचांना तैनातीदाखल दिलेले असून त्यांतूनच इ. सन १७५९ सालीं इंग्लिशांनीं बुशीची शिबंदी हांकलून दिलेली होती. बादशाही सत्ताही या वेळीं निव्वळ नांवाचीच राहिली असल्यामुळें अशी सनद देण्यांत त्याला कांहींही घस सोसावी लागली नव्हती; परंतु हे प्रांत फ्रेंचांकडून घेतल्यापासून जरी इंग्लिशांच्या ताब्यांत होते, तरी निझामानें शिरस्त्याप्रमाणें ते इंग्लिशांना केव्हांही आपला स्वामित्व हक्क सोडून दिलेले नव्हते. त्यामुळें स्वाभाविक रीत्याच त्याला या तडजोडीबद्दल राग आला. तथापि सांपत्तिक अडचण आणि हैदरअल्लीची भीति यांमुळें मद्रास सरकारनें लढाईच्या प्रसंगीं मदत करण्याची कांहींशी संदिग्ध जबाबदारी स्वतःवर घेऊन त्याच्याबरोबर तह केला, त्यामुळें त्याचा राग लवकरच नाहींसा झाला. भोसले या नांवाचा नागपूर येथें एक मराठा सरदार असून तो या वेळीं लुटालूट करीत फिरत होता. त्यानें निझामाला आपले दहा हजार घोडेस्वार वेतनवार नोकरीस दिलेले होते, आणि त्याच्याबरोबरही इंग्लिशांनीं आतां दोस्ती केली होती. तहावर सह्या झाल्या न झाल्या, तोंच हैदरअल्ली हा आपल्या मोठ्या सैन्यानिशीं हैद्राबादच्या राज्यावर जोरानें चाल करून गेला, त्यामुळें निझामानें त्याच्याशीं झालेल्या तहाच्या आधारानें मद्रास सरकारकडे तात्काळ एक सैन्याची तुकडी मदतीदाखल मागितली, व ती त्याला त्या सरकाराकडून ताबडतोब देण्यांतही आली. मध्यंतरीं ह्या मराठा सरदारानें आपला फायदा करून घेण्याकरितां म्हैसूरच्या प्रदेशांत लुटालूट सुरू केली, त्यामुळें हैदरअल्ली यास त्याला पुष्कळ पैसे चारून परत पाठविणें भाग पडलें, आणि तोही मिळविलेल्या लुटींतील निझामाचा हक्क टाळण्याकरितां आपट

लुटीसह स्वदेशीं परत निघून गेला. नंतर मद्रास सरकारच्या तुकडीसह निझामानें म्हैसूरवर चाल केली, परंतु हैदरअल्लीबरोबर लढण्याऐवजीं उभयतांची आपसांत खाजगी रीतीनें समजूत होऊन त्यांत ठरल्याप्रमाणें ते दोघेही कंपनी सरकारावरच उलटून पडले. परस्परांमध्यें थोड्याशा निकराच्या चकमकी झडल्या, त्यांत इंग्लिशांनीं निझामाला इतकें जेरीस आणिलें कीं, त्यानें स्वतंत्र रीतीनें त्यांच्याबरोबर मोठ्या आनंदानें तह केला. यामुळें एकट्या हैदरअल्लीबरोबरच इंग्लिशांनीं नेटानें लढाई चालू ठेविली. परंतु हिंदुस्थानांतील ज्या इतर साधारण राजेरजवाडयांचा लष्करी अनुभव कंपनी सरकारला आजपर्यंत आलेला होता, त्या प्रतिस्पर्ध्यांहून हैदरअल्ली हा पुष्कळच अधिक पटाईत व चळवळ्या प्रतिस्पर्धी आहे, असें लवकरच त्यांच्या अनुभवास आलें.

मद्रासहून ह्या मोहिमेची तजवीज अत्यंत अव्यवस्थित रीतीनें करण्यांत आली होती. स्वारीच्या मुख्य सेनापतीच्या "हालचालींवर नजर ठेवण्याकरितां नेमिलेल्या रणक्षेत्रप्रतिनिधीकडून" आणि लबाड मक्तेदारांकडून त्याला पुष्कळच अडथळे करण्यांत आले, आणि मराठे लोकांनींही कर्नाटकांत लूट मिळविण्याकरितां स्वारी करण्याला ह्या संधीचा फायदा घेतला. म्हैसूरच्या घोडेस्वारांच्या पलटणींनें मद्रासच्या सीमेच्या अगदीं नजदीकपर्यंतचा प्रदेश उद्ध्वस्त केला, आणि कंपनीची सांपत्तिक स्थितिही बरीच खालावली, त्या वेळींच पुष्कळ दिवस चाललेल्या आणि इंग्लिशांना अयशस्कर झालेल्या ह्या लढाईचा हैदर अल्लीबरोबर इ. सन १७६९ मध्यें तह होऊन एकदाचा शेवट झाला. त्या वेळीं हैदर अल्ली हा इंग्लिश राजधानी जी मद्रास तेथपासून पांच मैलांवर असलेल्या सेंट थामस माऊंट येथें येऊन राहिला होता. ह्या स्वारीच्या वेळीं जर मद्रास येथें बंगालमधून सढळ हातानें संपत्तीचा पुरवठा झाला नसता, तर तेथील तिजोरी अगदीं कोरडी पडली असती. हिंदुस्थानच्या व्यापारी ठेवीची भिस्त असलेला, आणि इंग्लंडमधील सरकारच्या तिजोरीकरितां तेथील प्रधानमंडळाला

कर्जाऊ रकमेचा पुरवठा म्हणून द्यावयाचा असलेला, बंगालमधील पैसा आशियांतील राज्यकर्त्यांचा कावा आणि पूर्वेकडील राजेरजवाड्यांच्या दोस्तीची किंमत यांबद्दलचा व्यवहारोपयोगी धडा मिळण्याशिवाय अधिक कांहींही फायदा न झालेल्या अशा भिकार लढाईमध्यें उधळला गेलेला आहे, असें लंडन येथील डायरेक्टरांना आढळून आलें, तेव्हां ते फार नाखुष झाले. शिवाय लढाई सुरू करणें ही जर राजकीय दृष्ट्या घोडचूक होती, असें मानिलें, तर ती ज्या रीतीनें बंद करण्यांत आली, ती रीत तर दुसरी आणि त्याहूनही अत्यंत गर्हणीय अशी घोडचूक होती, असें मानिलें पाहिजे. या तहांत प्रमुखत्वानें इंग्लिश, हैदरअल्ली आणि मराठे हे असून त्यांत,—जर त्यांनीं आपसांत एकमेकांविरुद्ध आगळिक केली नाहीं, तर सर्व एकमेकांचे स्नेही आणि परस्परांचे दोस्त आहेत,—असें ठरलें; ह्मणजे ह्या तहामुळें, पुन्हां युद्धें सुरू झालीं, तर आगळिकीनें युद्ध सुरू करणाराविरुद्ध त्याशिवायच्या दोघांनीं एकमेकांना मदत करावी, अशा संदिग्ध आणि अनिश्चित शब्दांच्या कर्तव्याला प्रत्येक पक्ष बांधला गेला. शिवाय निझामाबरोबरही अशाच प्रकारचा करार झालेला होता, त्यामुळें मद्रास सरकारची अशी स्थिति झालेली होती कीं, ज्या वेळीं पुढें पुन्हां ह्या तिन्हींही भांडखोर सत्ताधाऱ्यांमध्यें आपसांत भांडण सुरू होईल, त्या वेळीं त्यांपैकीं कोणाच्याही मदतीला जाण्याला तें बांधलें गेलेलें होतें. त्याप्रमाणें पुढील वर्षीं मराठे आणि हैदरअल्ली हे जेव्हां हातघाईवर आले, त्या वेळीं तह झालेल्या मंडळींतील ह्या दोन्हीही पक्षांपैकीं प्रत्येकानें इंग्लिशांची मदत मागितली, आणि दरेकानें आपल्या शत्रूनेंच पहिल्यानें आगळिक केलेली आहे, असेंही निर्विवाद रीतीनें शाबित करून दाखविलें. कंपनीच्या डायरेक्टरांनीं शेवटच्या लढाईच्या बाबतीवरून मद्रास सरकारची झणझणित कानउघाडणी केलेले होती, त्यामुळें आणि कोणा तरी एकाचें नुकसान करून ह्या दोघांही अतिशय अप्रतिहार्य शेजाऱ्यांपैकीं एकालाही डोईजड करण्याची त्यांची बिलकुल इच्छा

नसल्यामुळें कोणत्याही रीतीनें आणि कांहींही ढवळाढवळ करण्याचें साफ नाकारून मद्रास सरकाराला या उभयतांनाही नाखुष करणें भाग पडलें. याचा परिणाम असा झाला कीं, मराठ्यांनीं हैदरअल्लीचे त्याची रग जिरण्यासारखे कांहीं पराभव केले; हैदरअल्ली यानें–इंग्लिशांनीं बैमानपणानें त्याग केल्यामुळेंच आपला पराभव झाला,–असा त्यांच्यावर दोषारोप लादला; त्या वेळेपासून तो इंग्लिशांचा कट्टा हाडवैरी बनला; त्यांचा सूड उगविण्याला संधि मिळण्याची तो वाट पहात राहिला; आणि त्याप्रमाणें आपल्या क्रोधाग्नीला संतुष्ट करण्याची त्याला लवकरच संधिही प्राप्त झाली.

भाग दहावा.

राज्यव्यवस्थेची घटना.

परिच्छेद पहिला—पार्लमेंटमधील चौकशी.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राजकीय इतिहासांतील इ. सन १७७२ ते १७८९ पर्यंतचा काळ हा वारन हेस्टिंग्स याच्या पुष्कळ वर्षांच्या कारकीर्दीचा असून त्या महत्त्वाच्या काळाच्या आरंभापर्यंत आतां आपण येऊन पोहोंचलों आहोंत. याच काळाच्या अवधींत इंग्लिश सत्ता आणि हिंदुस्थानांतील लष्करी सत्ता यांच्यामधील वर्चस्वाचें भांडण जोरांत आलें; हिंदुस्थानांतील कामकाजाकडे पार्लमेंटचें पूर्ण लक्ष वेधून गेलें; आणि हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याची सुनियंत्रित घटना करण्याचाही प्रयत्न ह्याच वेळीं अगदीं प्रथम विशेष आस्थेनें हातीं घेण्यांत आला.

इ. सन १७६७ मध्यें लार्ड क्लाइव्ह हा स्वदेशीं परत गेला, त्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनी ही बंगालची खरी मालकीण बनलेली होती. आणि जरी नामधारी नबाबीच्या सोंगाच्या नांवाखालीं त्यांना अजूनही बतावणी करावी लागत होती, तरीही तिला आतां बहुतेक खरेपणाचें स्वरूप आलेलें होतें. कलकत्ता व मद्रास येथें असलेलीं इलाखा कौन्सिलें त्या शहराच्या सीमेबाहेर कांहींसा प्रत्यक्ष अधिकार चालवीत असून सर्व बंगाल व कर्नाटकभर सैन्याचे शास्ते आणि वसुली करणारे नेते ह्मणून अप्रत्यक्ष

रीतीनें आपली सत्ता चालवीत असत. बंगालमध्यें सर्व रयतेकडून मिळालेल्या करभाराची भरपाई कंपनीलाच केली जात असे, तरीही बाकी राज्यव्यवस्थेच्या बाबतींत राजरोस ढवळाढवळीपासून ती अलिप्त असे; कारण, लंडनहून तिला तसा सक्त हुकूम मिळालेला होता. त्यांनीं बंगालच्या नायबनबाबाला (कारण, स्वतः नबाब हा त्या वेळीं निव्वळ नेमणूकदार बनलेला होता,) राज्यव्यवस्थेच्या खर्चाच्या रकमेचा बटवडा करून दिला होता, आणि अम्मलबजावणीचा आणि न्यायप्रकरणींचा सर्व अधिकारही नांवापुरता त्याच्याच हातांत राहूं दिला होता. क्लाइव्ह याच्या जागीं कलकत्ता येथें प्रेसिडेंट व गव्हर्नर ह्मणून त्याच्या मागून हॅरी व्हेरेल्स्ट हा आला. त्यानें असें लिहिलें आहे कीं, "लंडन येथील व्यवस्थापकांकडून, प्रेसिडेन्ट आणि कौन्सिल यांना, कोणताही राजकीय हक्क आमच्या नांवाखालीं एतद्देशीय अधिकाऱ्यांवर चालविण्याची वारंवार आणि निक्षून मनाई करण्यांत आलेली आहे, व आपल्या व्यापारी आद्य तत्त्वालाच नेहमीं चिकटून असावें, अशीही अत्यंत कळकळीनें सक्त ताकीद दिलेली आहे." याचे उघड उघड असे परिणाम झाले कीं, व्यापाराला उतरती कळा लागली, शेती निकृष्ट दशेला आली, नगदी नाण्याला क्षय लागला, आणि सर्व बाजूंनीं बंगालची स्थिति शोचनीय झाली. कारण, एतद्देशीय अधिकारी अनियंत्रित होते, आणि कंपनीला जरी अगणित वसुली मिळत असे, तरी कर देणाऱ्या जनसमूहाचें संरक्षण करण्याचीं तिच्या हातांत कांहींही साधनें नव्हतीं. ह्या पद्धतीचा व्हेरेल्स्ट यानें उदारपणानें निषेध केला, आणि एतद्देशीय कारभारी मंडळावर देखरेख ठेवण्याकरितां कंपनीच्या नौकरींतील थोड्याशा युरोपियन नोकरांची नेमणूक करून त्या वाईट परिणामांचें उपशमन करण्याचाही त्यानें प्रयत्न केला; पण त्यांत त्यास यश आलें नाहीं.

इ. सन १७७३ पर्यंत ही स्थिति अशीच चालली होती, परंतु त्या वर्षापासून पार्लमेंटच्या कायद्यानें देशांतील अंमलबजावणीचा आणि न्याय-

खात्याचा अपूर्ण परंतु व्यवस्थित पायावरील कारभार देशांत सुरू करण्यांत आला. ह्या वेळेपर्यंतच्या हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या इतिहासांत पहिल्यानें युरोपांतील व्यापारी मंडळ्यांबरोबर, दुसऱ्यानें समुद्रतीरस्थ राष्ट्रांबरोबर, आणि शेवटीं इंग्लंडच्या विजयी राष्ट्राचा प्रतिनिधी ह्या नात्यानें असलेली बलिष्ठ ईस्ट इंडिया कंपनी व हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाडे यांच्या बरोबर, झालेल्या युद्धकलहाच्या उलाढालीचा उल्लेख आहे. युद्धकलहाचा हा शेवटचा काळ ह्मणजे सर्वसाधारण अव्यवस्थित रीतीनें सर्व हिंदुस्थान-भर चालू असलेल्या अंदाधुंदीचा वास्तविक रीत्या एक भाग आहे. या भागांत विस्कळित झालेल्या मोंगल राष्ट्राच्या प्रदेशामधून अगदीं पहिल्यानें तुकड्यातुकडयांचीं बनलेलीं कमकुवत राज्यें आतां उलट शूर राज्य-कर्त्यांच्या पायाखालीं तुडविलीं जात होतीं, व इंग्लंडनें ह्या वेळेपर्यंत केलेला सर्व व्यवसाय हाही मुख्यत्वेंकरून विध्वंसकारक असाच होता; कारण, आत्मरक्षणाच्या अवश्यकतेनें त्यांना आपल्या प्रतिपक्ष्यांना हाणुन पाडणें भाग झालें होतें. परंतु आतां सुरू होत असलेला हा नवा काळ राज्य-व्यवस्थेची नवी घडी बसविण्याच्या पहिल्या प्रयत्नाचें द्योतक म्हणून आहे. कारण, बंगालमध्यें इंग्लिश लोकांनीं ह्या वेळपर्यंत आपल्या स्वतः-करितां एक चांगली राजकीय इमारत बांधण्यासाठीं जागा साफ करून ठेविली होती, आणि कधींही न संपणाऱ्या व कोठेंही सुरू होणाऱ्या लढायां-च्या इतिहासाचें ह्या वेळेपासूनच राज्यव्यवस्थेची पुनर्घटना करण्याच्या प्रयत्नांत रूपांतर व्हावयाचें होतें.

खाजगी धाडशी कृत्यांत सरकारानें ढवळाढवळ करणें हें जरी इंग्लंड-मध्यें लोकांना केव्हांही पसंत नव्हतें, तरीही ईस्ट इंडिया कंपनीचीं कृत्यें राष्ट्रीय अनुशासनाखालीं ठेवणें जरुरीचें झालें आहे, अशी खात्री आतां होत चालली होती. इंग्लिश लोकांना बहुतेक पूर्ण अशा राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या संस्थांमुळें ते या वेळीं प्रस्थापित झालेल्या सुधारणेच्या अत्युच्च पायरीला पोंचले होते. ज्या देशांत अनेक

शतकें परकीय व्यक्तिविषयक अमर्याद जुलमी राजसत्तेच्या प्रकाराशिवाय दुसऱ्या कोणत्याही राजशासनपद्धतीची मुळींच ओळखही नव्हती, त्या या भयंकर बखेडे माजलेल्या हिंदुस्थान देशाबद्दल आपण नाखुषीनें कां होईना पण प्रत्यक्ष जबाबदार आहोंत, असें त्यांना आढळून आलें होतें; आणि सुधारलेल्या राजनीतीचीं तत्त्वें अतिशय लांबीच्या पल्ल्यावरून त्यांना ह्या देशांत आणावयाचीं होतीं. या कारणामुळें बंगालच्या कामकाजाचें नियमन करण्याचा हा त्यांचा पहिला प्रयत्न म्हणजे एका विस्तृत राजनीतीच्या नव्या पद्धतीचा एक प्रकारचा "ओनामा" च होय, असें मानण्यास हरकत नाहीं. शिवाय हीच राजनीतीची नवी पध्दति — जरी त्यांत पुष्कळ चुका झाल्या व कांहीं अडथळे आले तरीही — सर्व हिंदुस्थानभर सरते शेवटीं नांवाजण्यासारखी यशस्वी झालेली आहे.

बंगालसारख्या अत्यंत सुपीक प्रांताचा कंपनीला झालेला आश्चर्यजनक लाभ आणि थोडयाशा व्यापारी प्रतिनिधींच्या हातांत एखाद्या राज्याला शोभेल अशी खेळत असलेली संपत्ति, ह्या अपरिचित देखाव्यामुळें इंग्लंडच्या पार्लमेंटचें या गोष्टीकडे लक्ष वेधलें, आणि हिंदुस्थानांतील कामकाजाच्या स्थितींत मन घालणें त्यांना अत्यंत अवश्यक झालें. इ. सन १७६९ मध्यें लार्ड क्लाइव्ह यानें असा अंदाज काढला होता कीं, सर्व बाजूनें उत्पन्न होणारा बंगालचा एकंदर वसूल चाळीस लाख पौंड रोख असून सर्व खर्चवेंच भागवून कंपनीला निव्वळ नक्त उत्पन्न १६,५०,००० पौंडांचें आहे. इतक्या विशाल संपत्तीचा हातीं ताबा आल्यामुळें कंपनीचें व्यवस्थापक मंडळ आपल्या भागीदारांना देण्याच्या नफ्याची रक्कम वाढवीत होतें; त्यांच्या शंभर रुपयाच्या प्रत्येक भागाची किंमत २६७ पर्यंत वाढलेली होती; त्यांनीं इ. सन १७६७ मध्यें आपल्या भागीदारांना शेकडा साडेबारा टक्के याप्रमाणें नफा दिलेला होता; व परगण्यांतील सभासदांची जागा व सभासद पाठविणाऱ्या गांवांतर्फे पार्लमेंटांतील सभासदाची जागा विकत मिळविण्याकरितां त्यांच्या नौकरांनीं इंग्लंडांत

पुष्कळ संपत्ति आणलेली होती. अल्डरमन ब्याकफर्ड यानें हाउस आफ कामन्समध्यें आपली अशी आशा प्रकट केली कीं, पूर्वेकडे कंपनीनें मिळविलेला धनसंपन्न प्रदेश हा इंग्लंडच्या लोकांवर असलेला भार कांहीं-सा हलका करण्याला साधनीभूत होईल. इंग्लंडच्या सरकारानेंही ह्या सूचनेच्या अनुरोधानें वागण्यांत बिलकुल कसर केली नाहीं. कारण, त्यांनीं कंपनीला थोडया थोडया मुदतीची नवी नवी सनद करून देण्याची पद्धत स्वीकारली, आणि तिला दिलेल्या सवलतींच्या बाजारभावाचा ताळमेळ घेऊन तिच्यापासून नवे नवे वायदे करून घेण्याची त्यांना उत्तम संधिही मिळत गेली.

इ. सन १७६६ मध्यें इंग्लंडच्या मुख्य प्रधानाकडून ईस्ट इंडिया कंपनीला अशी सूचना देण्यांत आली कीं, येत्या पार्लमेंटच्या बैठकींत कंपनीच्या कामाकाजाकडे पार्लमेंटचें बहुतकरून लक्ष वेधलें जाईल. त्यावरून इंग्लंडचें सरकार व कंपनी या उभयतांत सौदा ठरविण्याबद्दल

---

१ इ. सन १६९८ मध्यें इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीशीं नव्या कंपनीचा पार्लमेंटच्या कायद्यानें एक जीव करण्यांत आला. त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनी ही पहिल्या-नेंच कायदेशीर रीतीनें ओळखली जाऊं लागली. तिनें शेकडा आठ टक्केप्रमाणें त्याच वर्षीं उसनी ह्मणून सरकारास रक्कम दिली ती ... ...२०,००,००० पौंड

इ. सन १७०२ मध्यें वर लिहिलेल्या दोन्ही कंपन्या एकत्र झाल्यानंतर तिनें उसनी ह्मणून बिनव्याजी रक्कम दिली ती ... ... १०,००,००० पौंड

मागील बाकीसह घेणें निघत असलेली एकंदर रक्कम ... ३२,००,००० पौंड

इ. सन १७३० मध्यें कंपनीनें उसनी ह्मणून दिलेली रक्कम ४,००,००० पौंड

इ. सन १७४४ मध्यें सनदेची मुदत वाढविण्याकरितां शेकडा तीन टक्केप्रमाणें सरकारास दिलेली रक्कम ... ... १०,००,००० पौंड

इ. सन १७५० मध्यें सरकाराला कंपनीचें एकंदर कर्ज २,००,००० पौंडांचें असून त्या सर्व रकमेवर शेकडा तीन टक्केप्रमाणें व्याज ठरलेलें होतें. इ. सन १७९३ मध्यें ही सर्व रक्कम परत करण्यांत आली. त्याचप्रमाणें ४,००,००० पौंडांचा वार्षिक बटवडा हा ह्या व्याजी रकमेशिवायचा निराळा व्यवहार होता.

पुष्कळ भवति न भवति झाली, आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, ईस्ट इंडीजमध्यें कंपनीनें नुकताच मिळविलेला प्रदेशाचा ताबा व वसुलीचें उत्पन्न, ह्यासंबंधानें विवक्षित वर्षांच्या मुदतीपर्यंत दर वर्षी सरकाराला ४,००,००० पौंडांची रक्कम देण्याला कंपनी एका कायद्यानें बांधली गेली. मागाहून झालेल्या चौकशीवरून इ. सन १७७३ मध्यें असें आढळून आलें कीं, कंपनीचा वार्षिक खर्च इ. सन १७६९ मध्यें ७,००,००० पौंड असून तो वाढत वाढत १७,००,००० पौंडांच्या अतिशय मोठ्या रकमेपर्यंत ह्या वेळीं आलेला होता. याशिवाय आणखी असेंही आढळून आलें कीं, इ. सन १७६९ पासून निव्वळ जकातीच्या कराची रक्कम या नांवाखालीं चहाच्या व्यापारामध्यें तोटा न होण्याच्या हमीबद्दलची ह्मणून, आणि ४,००,००० पौंड वार्षिक बटवड्याची ह्मणून, जवळ जवळ वीस लाख पौंडांपर्यंतची रक्कम इंग्लंडच्या सरकाराला कंपनीकडून दर वर्षी मिळत होती; ह्मणजे कंपनीनें ही रक्कम कशाही रीतीनें मिळविलेली असली, तरीही सरकाराकडून उकळल्या जाणाऱ्या जबर करामध्येंच तिच्या नफ्याचा पुष्कळसा भाग गडप होऊन जात असे. हा वार्षिक बटवडा ह्मणजे लार्ड क्लाइव्ह यानें मिळविलेल्या विजयामुळें नुकत्याच हातीं आलेल्या प्रांतांतील मोठ्या वसुलाच्या रकमे-वर वास्तविक रीत्या खंडणी अगर नफ्यांतील हिस्सा देण्याबद्दलचा सर-कारानें लादलेला स्वामित्वाच्या हक्काबद्दलचा एक प्रकारचा करभारच होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु हा वसूल कंपनीच्या ताब्यांत आल्या-मुळें तिच्या व्यापारी पद्धतींत बदल झाला; कारण, इ. सन १७६७ मध्यें युरोपांत निर्गत करण्यासाठीं कच्ची पैदास आणि तयार माल यांची खरेदी करण्याकरितां बंगाल प्रांतामधून जमा झालेल्या सरकारी वसुलां-तून शिलकेचा मोठा भाग व्यापारी भांडवल ह्मणून उपयोगांत आण-ण्याची वहिवाट सुरू झाली. बर्कच्या ह्मणण्याप्रमाणें याचा परिणाम असा झाला कीं, “ इतर देशांमध्यें व्यापारामुळें वसुलाची वाढ

होत आहे, परंतु परदेशांतील समुद्रकांठच्या व्यापाराचा अप्रतिबंध हक्क असलेल्या या कंपनीचा व्यापार बंगालमधील वसुलांतून पोसला जात आहे. " देशांतील पैदाशीला अशा रीतीनें सततच्या लागलेल्या झिरपणीचा परिणाम लवकरच जाणवूं लागण्याला सुरवात झाली. शिवाय इ. सन १७६७ मध्यें लार्ड क्लाइव्ह यानें आपल्या निश्चयी आणि उज्ज्वल धुरीणत्वामधून आपलें अंग काढून घेऊन तो हिंदुस्थानांतून स्वदेशीं परत गेला, त्यामुळें तर राज्यव्यवस्थेच्या सर्व खात्यांमध्यें त्याची लवकरच उणीव भासूं लागली. अधिकारशासनपद्धतीचीं बंधनें पुन्हां शिथिल होऊन गेलीं, राज्याच्या वसुलीवर उधळपट्टीचा खर्च आणि अनीतीचें वर्तन यांचा पगडा बसून त्यांनीं पुन्हां उचल घेतली, आणि कंपनी सरकारचे प्रतिनिधि तर अजूनही खाजगी व्यापारांत ढवळाढवळ करीतच होते. पूर्वी वर्णन केलेल्या हैदर अल्लीबरोबरील नाशकारक लढाईंत मद्रास इलाख्याचें सरकार गुंग होऊन गेलें होतें; इ. सन १७७० च्या भयंकर दुष्काळामुळें बंगाल प्रांतही उजाड होऊन गेला होता; कंपनीच्या इंग्लंडमधील व्यवस्थापकांच्या प्रतिवार्षिक होणाऱ्या निवडणुकीची पद्धत पक्षभेदांमधील भांडणांमुळें आणि जोराच्या अंतःस्थ फाटाफुटीमुळें भ्रष्टतेला पोंचलेली होती; आणि अशा रीतीनें जरी एकदम व चोहोंकडून सारखीं संकटें व अडथळे आले होते, तरी आह्मी वार्षिक खंडणी म्हणून स्वामित्वाच्या हक्काबद्दलची ४,००,००० पौंडांची रक्कम देण्यालाच फक्त असमर्थ आहोंत असें नाहीं, तर आह्मी कर्जाच्या भारानेंही इतके वांकून गेलेले आहोंत कीं, इंग्लंडच्या तिजोरीमधूनच आह्मांला मोठी रक्कम कर्जाऊ म्हणून घेणें अत्यवश्यक झालेलें आहे, असें कंपनी स्वतः जाहीर करीपर्यंत तिच्या कामकाजासंबंधीं पार्लमेंटमध्यें विशेष लक्ष पुरवून बारकाईनें तपास करण्यांत आलेला नव्हता. सरकारला स्वामित्वहक्क ह्मणून खंडणीदाखल कांहींही रक्कम न देतां अगर थोड्याशा व्याजावर सरकाराला कर्जाऊ रक्कमही न देतां कंपनी-

नेंच उलट उसनी रक्कम देण्याबद्दल सरकाराकडे मागणी केली, ह्मणजे कंपनीनें आपलें दिवाळें निघालें अशी आपल्या नांवाला कमीपणा आणणारी कबुली आपण स्वतःच दिली; त्यामुळें स्वाभाविक रीत्याच लार्ड नार्थच्या प्रमुखत्वाखालीं असलेल्या प्रधानमंडळापुढें कंपनीचे अत्याचार पुष्कळ निराळ्या व तत्काळ डोळ्यांपुढें येणाऱ्या प्रकारानें मांडले जाऊन त्यांचें ह्या बाबतीकडे अत्यंत लक्ष वेधलें, आणि त्यांत मुळापासूनच सुधारणा करण्याची अत्यवश्यकता आहे, अशी त्यांची खात्री झाली.

त्या वेळची सर्वसाधारण परिस्थिति हीही आपले परीनें फेरबद्दल आणि सुधारणा घडवून आणीत होती. व ग्रेट ब्रिटनच्या ताब्यांत असलेल्या समुद्रापलीकडील अत्यंत विस्तृत प्रदेशभर त्या वेळीं पसरत असलेल्या सर्वसाधारण अंदाधुंदींतील ईस्ट इंडीजमधील कामकाज हाही एक वास्तविक रीत्या भाग आहे, असें लार्ड क्लाइव्ह यानें ह्मटलें, तेंही बरोबरच होतें; कारण, ते प्रांत इंग्लिशांनीं इतके नुकतेच व झपाट्यानें मिळविले होते कीं, त्यांना व्यवस्थित स्वरूप देण्यालाही त्यांना अवसर राहिला नव्हता. रयतेचें अगर भिन्न भिन्न जातींचें संरक्षण करण्याच्या, आणि उत्तर अमेरिकेंतील वसाहती व हिंदुस्थानांतील प्रांत, यांसारख्या उत्पत्ति, स्वभाव आणि परिस्थिति या सर्व बाबतींत अत्यंत परस्परविरुद्ध असलेल्या देशांची योग्य व्यवस्था ठेवण्याच्या, आपल्यावर असलेल्या जबाबदारीचें स्वरूप इंग्लिश लोकांना अजून कळावयाचें होतें. लांबीच्या पल्ल्यावरील भिन्न भिन्न जातींच्या जनसमूहामध्यें इतक्या व्यापक प्रमाणावर राज्यशकट चालविण्याला लागणाऱ्या अवघड व्यवसायाचा त्यांना अजूनपर्यंत अनुभव आलेला नव्हता. ताब्यांत असलेल्या दूरच्या प्रदेशांतील राज्यव्यवस्थेचे पूर्वीं झालेले सर्व प्रयोग, नीतिमत्तेचें आणि कार्यक्षमतेचें प्रमाण अगदीं नेमस्त धरलें तरीही, निष्फळ झालेले आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं, असें त्यांना आढळून आलें होतें; आणि सर्व अर्वाचीन इतिहासांचें निरीक्षण केलें असतां स्वतःला उपयोग करून

घेतां येण्यासारखें एकही उदाहरण त्यांना मिळणें शक्य नव्हतें. परंतु इ. सन १७६३ मध्यें सप्तवार्षिक युद्धाची समाप्ति झाली, त्यामुळें इंग्लंडच्या पुरतेंच निदान ह्मणावयाचें ह्मणजे साधारणपणें युरोपांत जो कांहीं दीर्घ काळ शांततेचा गेला, त्यामध्यें इंग्लिशांना आपल्या बाहेर पसरलेल्या मिळकतीच्या स्थितींत मन घालण्याला वेळ आणि संधि मिळाली. इंग्लंडच्या राष्ट्रानें आपल्या आरमारी व लष्करी विजयाच्या जोरावर जिंकलेल्या समुद्रापलीकडील अतिशय मोठ्या मिळकतीची आपल्या स्वतःच्या मिळकतींत भर ह्मणून संग्रह करण्याला आतां सुरवात केली होती. एका व्यापारी मंडळाला एका मोठ्या राज्याच्या वसुलाशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं, असें चोहोंकडे सर्वसाधारण मत झाल्याचें दिसून येत होतें. आणि हिंदुस्थानासंबंधीं त्यांच्या असलेल्या कर्तव्याच्या विलक्षण कल्पनांना निःसंशय ऊत आला होता.

या बाबतींत लक्ष घालण्याची भासलेली अवश्यकता आणि सामान्यतः जनसमाजामध्यें फैलावत चाललेल्या असंतोषाचीं कांहीं दिसून आलेलीं चिन्हें हीं एकवटल्यामुळें कंपनीच्या कामकाजांत प्रत्यक्ष हात घालणें सरकाराला भाग पडलें. कंपनी सांपत्तिक अडचणींत आलेली असल्यामुळें, सामान्य लोकांच्या सभेकडून तिच्या बाबतींत तपास करण्याच्या झालेल्या हुकमाचा प्रतिकार करतां येण्यासारखी, अगर कंपनीनें मिळविलेल्या प्रदेशाची आपल्या इच्छेप्रमाणें विल्हेवाट लावण्याच्या राष्ट्राच्या हक्काविरुद्ध कांहींही तक्रार करतां येण्यासारखी, ह्या वेळीं कंपनीची स्थिति नव्हती. पार्लमेंटकडून होणाऱ्या कामांतील ढवळाढवळीपासून आपलें संरक्षण व्हावें म्हणून, दिल्लीपतीपासूनच आम्हांला त्या प्रदेशाचा ताबा मिळालेला आहे, असा आव आणून बादशहाच्या नामधारी अधिकाराच्या सावलींत आश्रय घेण्याची त्या वेळीं आणि त्यानंतर कंपनीनें पुष्कळ धडपड केली, आणि ह्या सिद्धांताचें प्रतिपादन करण्याकरितां तिनें लार्ड क्लाइव्ह याच्या बुद्धिवादाचें अनुकरण केलें. तथापि

बंगालवरील कोणत्याही प्रकारचा कायदेशीर अधिकार अंगीकारणें हें टाळतां येण्यासारखें नसल्यामुळें जरी इ. सन १७६९ मध्यें लार्ड क्लाइव्ह यानें " बंगालची दिवाणी " स्वीकारली होती, तरी पण तो अजूनही निर्णयात्मक रीतीनें असेंच प्रतिपादन करीत असे कीं, आपण राजकीय दृष्ट्या स्वतंत्र आहोंत, असें कंपनीनें जाहीर करणें हें केव्हांही शहाणपणाचें होणार नाहीं. या कारणामुळें न्यायाच्या अदालती आणि बंदोबस्ताचें खातें हीं अजूनही एतद्देशीय अधिकाऱ्यांच्याच ताब्यांत होतीं; आणि कंपनीच्या प्रतिनिधींची त्यांच्यावर जरी कांहीं थोड्याशा प्रमाणानें देखरेख होती, तरीही तीं न्यायाच्या आणि अंमलबजावणीच्या निरनिराळ्या खात्यांच्या ताब्यांत असून त्यांची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी कंपनीनें आपल्या शिरावर घेतलेली नव्हती.

परंतु अंमलबजावणीच्या अधिकाराचें मूलतत्त्व हें नेहमीं एकच आणि अविभाज्य असलें पाहिजे, ह्मणजे, राज्यकारभाराच्या यंत्राला गति देणाऱ्या सर्व सत्तांचें एक मुख्य गति देणाऱ्या चालकाच्या धुरीणत्वाखालीं शेवटीं एकीकरण होऊन गति मिळाल्याशिवाय तें यंत्रच चालू होणार नाहीं; मग तें धुरीणत्व एखाद्या अनियंत्रित सत्ताधारी सुलतानाकडे असो, अगर एखाद्या लोकनियुक्त राज्याच्या मंडळीकडे असो. लार्ड क्लाइव्ह गेल्यानंतर बंगालमध्यें विभागलेल्या जबाबदारीचा परिणाम धन्याशिवाय होणाऱ्या बेबंदशाहींत झाला. न्याय देणारे शास्ते, बंदोबस्त ठेवणारे पालक, आणि वसूल गोळा करणारे अधिकारी, यांचीं निरनिराळीं खातीं असून ते निरनिराळ्या पद्धतीनें आणि परस्परविरुद्ध हितसंबंधानें कामकाज करीत असत. आणि या तिन्हीही खात्यांवर मिळून एक वरिष्ठ अधिकारी नसल्यामुळें तर अव्यवस्था करण्यांत जणूं काय त्यांची स्पर्धाच लागलेली असे. बंगाल्यांत त्या वेळीं वास्तविक रीत्या कायद्याचें नांवही नसून अतिशय थोडा न्याय होता. शिवाय तिन्हीही इलाख्यांच्या सरकारांनीं लढाया आणि दोस्तीचे तह परस्पर अगदीं स्वतंत्र रीतीनें

केलेले होते. कंपनीचें बंगालमधील कायम सैन्य ११,००० हून अधिक होतें, आणि मुलकी खात्याचा व लष्करी खात्याचा खर्च वाढवावा लागल्यामुळें त्याचा परिणाम, कंपनीच्या व्यापारी मुदलाला लागणाऱ्या रकमेला पुष्कळच हिसका बसणें, हा झालेला होता. सुदैवानें नामदार कंपनीच्या वसुलाला लागलेल्या ह्या क्षयामुळें तिच्या भागाच्या भावाची किंमतही उतरून गेली होती; त्यामुळें आपण खालावण्याच्या मार्गाला लागलेले असून आपणावर लवकरच भावी आपत्ति येऊन कोसळणार आहे, अशी तिची खात्री झाली होती. कंपनीनें आपणाला सांपत्तिक मदत देण्याबद्दल प्रधान मंडळाला विनंति केली; प्रधान मंडळानें पार्लमेंटकडे बोट दाखविलें; त्यानंतर इ. सन १७७२ च्या जानेवारी महिन्यांत इंग्लंडच्या राजानें आपल्या भाषणांत "कंपनीच्या कामाकाजाच्या बाबतींत बारकाईनें तपास करण्याचा आपला इरादा आहे," असें जाहीर केलें; आणि याचा शेवटीं असा परिणाम झाला कीं, ईस्टइंडीजमधील इंग्लिशांच्या कामकाजाजी आणि कंपनीची स्थिति, स्वरूप व परिस्थिति, यांबद्दलची चौकशी करण्याकरितां दोन निवडक पंचमंडळांच्या नेमणुका करण्यांत आल्या.

आतां हेंही खरें आहे कीं, हिंदुस्थानांत इंग्लंडच्या राजाचा हक्क प्रस्थापित करण्यापेक्षां आणि त्या अनुरोधानें आपलें वर्तन ठेवण्यापेक्षां भिन्न भिन्न ठराव मंजूर करण्याकडेच पार्लमेंटचा आतांपर्यंत अधिक कल असे. इ. सन १७६२ मध्यें फ्रेंचांच्या तर्फे शांततेच्या तहाची वाटाघाट करणाऱ्या प्रतिनिधींनीं, लढाईच्या दरम्यान आमचे घेतलेले सर्व प्रांत आह्मांला परत द्यावे, अशी मागणी केली, तेव्हां इंग्लंडच्या प्रतिनिधींनीं त्या बाबतींतील आपली कायदेशीर हरकत पुढें आणून, व सनदशीर मंडळाच्या कायदेशीर आणि इतर व्यावृत्त मिळकतींत ढवळाढवळ करण्याचा इंग्लंडच्या राजास कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं, असें प्रतिपादन करून, मागीतलेले सर्व प्रांत

परत मिळविण्याच्या कलमाची त्यांनीं बोळवण केली. त्या वेळीं बर्क हा कंपनीच्या विरुद्ध नसल्यामुळें त्यानेंहि आपलें असेंच मत दर्शविलें कीं, कंपनीच्या ताब्यांतील प्रदेश म्हणजे "दिल्लीपतीच्या सनदेच्या आधारानें मिळालेला हा ताबा असून कामाकाजाचें स्वरूप आणि अधिकाराची व्याप्ति या बाबतींत तो त्या बादशाही सत्तेवरच अवलंबून आहे, आणि त्यांच्या हातीं आलेल्या मिळकतीचा हा एक अतिशय विलक्षण प्रकार असून तो इंग्लंडच्या प्राचीन राजघटनेला अगदींच पूर्णपणें अपरिचित आहे." शिवाय त्याचें असेंहि म्हणणें होतें कीं, इंग्लंडच्या राजाच्या खाजगी खात्याचें कर्ज निवारण्याकरितां कंपनीपासून पैसे उकळण्याच्या मूळ उद्देशानें तेथील प्रधानानें (लार्ड नार्थ) तिच्या ताब्यांतील प्रदेशावर इंग्लंडच्या सरकाराचा हक्क आहे, असें प्रतिपादन करींपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीनें नेहमीं आपली सनद नवी करून घेण्याच्या बाबतींत सरकाराबरोबर समसमान हक्कांच्या तत्त्वावर आपली वागणूक ठेविली होती, आणि कंपनीला भिवविण्याकरितां या हक्काच्या प्रश्नाचा तपास करण्याचा आपणाला कायदेशीर हक्क आहे, असें पार्लमेंटनें प्रतिपादन केलें होतें.[१] त्या वेळीं बर्कचा असा समज होता कीं, इंग्लंडच्या गंगाजळीच्या फायद्याकरितां खंडणी उकळण्याच्या मुख्य उद्देशानें कंपनीच्या डोक्यावर पार्लमेंटच्या चौकशीची तरवार टांगून ठेविलेली होती, आणि त्याच्या ह्या म्हणण्यांत पुष्कळसें तथ्यही होतें. कंपनीपासून उकळलेल्या वरील रकमांची भरपाई करण्याकरितां तिला उत्तर अमेरिकेमध्यें तिच्यापासून कांहींही कर न घेतां चहाची निर्गत करण्याची सवलत दिली होती, आणि हाच कंपनीचा चहा पुढें तेथील उद्दाम वसाहतवाल्यांनीं बोस्टनच्या बंदरांत समुद्रांत भिरकावून दिला. या वेळीं लार्ड नार्थ याच्या बाजूचें अत्यंत पूर्णपणें बहुमत असल्यामुळें तो दोन्हीही सभांवर आपला अधिकार चालवीत असे. परंतु तो कंपनीच्या विरुद्ध होता. पंचमंडळांनीं दिलेल्या

१. *Observations on a Late State of the Nation*, हें पुस्तक पहा.

निवाड्यांत कंपनीवर पुष्कळ दोषारोप केले होते. आणि लोकप्रतिनिधि सभेनें ठराव मंजूर करून परदेशांतील राजेरजवाड्यांबरोबर केलेल्या तहामुळें अगर लष्करी सामर्थ्याच्या जोरावर कंपनीनें आजपर्यंत जें जें सर्व मिळविलेलें आहे, तें तें सर्व हक्कानें इंग्लंडच्या राष्ट्राचें आहे, असें जाहीर केलें होतें. लार्ड क्लाइव्ह यानें बंगालमध्यें केलेलीं कृत्यें इंग्लंडच्या राष्ट्राला कलंक लावणारीं व हानिकारक असून त्याला न्यायाच्या सभेपुढें खेंचावें अशीही एक सूचना करण्यांत आली होती. परंतु क्लाइव्ह यानें आपल्या बाजूच्या सर्व साधक बाधक गोष्टी पुढें मांडून आपल्या कृत्यांचें जोरानें समर्थन केलें, त्यामुळें ती सूचना सर्वानुमतें अमान्य झाली, आणि राबर्ट क्लाइव्ह यानें आपल्या देशाची श्रेष्ठ व श्रेयस्कर अशी सेवा बजावलेली आहे, असा ठराव मंजूर करण्यांत आला. त्यानंतर पुढील वर्षीं[१] तो मृत्यु पावला, त्यामुळें ह्या अतिशय उत्साही, धाडशी आणि अविश्रांत परिश्रम करणाऱ्या एका विभूतीच्या इहलोकींच्या जीवनयात्रेचा शेवट झाला! हिंदुस्थानामध्यें ब्रिटिश साम्राज्याचा पाया लार्ड क्लाइव्ह यानेंच घातला असल्यामुळें इंग्लिश लोक हे त्याचेच सर्वांहून अधिक ऋणी आहेत. ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्राची इतकी अमूल्य सेवा "ऐरिश पियरेज" सारख्या भिकार मोबदल्यावर बजावणारा त्याच्या पूर्वीं अगर त्याच्या नंतर आजपर्यंत एकही पुरुष निर्माण झाला नाहीं. त्याचें धाडस, त्याची दीर्घ दृष्टि, त्याची राजकारणांतील विलक्षण कुशाग्र बुद्धि व लष्करी बाबतींतील त्याचें बुद्धिवैभव, ह्या गुणांमुळें लार्ड क्लाइव्ह हा हिंदुस्थानांतील त्याच्या वेळीं असलेल्या परिस्थितीला तंतोतंत साजण्यासारख्या क्वचित्‌च एकवटणाऱ्या मर्दानी बाण्याच्या गुणांचा एक मूर्तिमंत पुतळाच निर्माण होऊन गेला, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

१ इ. सन १७७४ नोव्हेंबर.

परिच्छेद दुसरा–राज्यकारभाराची अगदीं प्रथमची घटना.

इ. सन १७७३ मध्यें अखेरीस पार्लमेंटमधून जे दोन कायदे मंजूर करण्यांत आले, त्यांपैकीं पहिल्या कायद्यानें इंग्लंडच्या प्रधानमंडळाला कंपनीनें केलेल्या उपकाराचें उतराई होण्याकरितां चौदा लक्ष पौंड (२,१०,००,००० रुपये) कर्ज देण्याची परवानगी मिळाली; आणि दुसऱ्या कायद्यानें कंपनीच्या घटनेंत बदल होऊन हिंदुस्थानांतील राज्य-व्यवस्था चालविण्याला पार्लमेंटकडून कंपनीला सनद देण्यांत आली. लार्ड नार्थ याचा " रेग्युलेटिंग ॲक्ट " (अनुशासन पद्धतीचा कायदा) हा या वरील बाबतींना, इंग्लंडमधील राज्य व्यवस्थापक मंडळाच्या पुनर्रचनेला, आणि परदेशांतील राज्यपद्धतींत सुधारणा करण्याला विशेष काळजीपूर्वक रीतीनें लागू करण्यांत आला. त्या अन्वयें, कंपनीनें ताब्यांत असलेला प्रदेश आणि जमा होत असलेला वसूल सनदेची मुदत पुरी होईपर्यंत आपल्याच ताब्यांत ठेवावा, असें ठरलें; आणि सरकारच्या हक्काच्या अनिश्चित मुद्द्याची टाळाटाळ करण्याकरितां, " प्रत्येक ब्रिटिश प्रजाजनावर हरएक बाबतींत इंग्लंडच्या पार्लमेंटचा पूर्ण हक्क आहे, " या तत्त्वावर एक कायदा घडविण्यांत आला. लंडनमधील कंपनीच्या व्यवस्थापक व मालक मंडळाची पैशाचें महत्त्व वाढवून व सभासदांची संख्या कमी करून पहिल्याहून अल्प-जनाधिपत्याच्या पद्धतीवर पुनर्घटना करण्यांत आली. हिंदुस्थानांत बंगाल इलाख्याकरितां गव्हर्नर जनरल इन-कौन्सिल याची स्थापना करून (पार्लमेंटकडून व्हावयाच्या असलेल्या ह्या पहिल्याच नेमणुका होत) तिन्हीही इलाख्यांवर त्याचा सर्वसाधारण अधिकार ठेवण्यांत आला. वादग्रस्त प्रश्नांचा निकाल कौन्सिलांतील मताधिक्याप्रमाणें निर्णयात्मक समजावा, असें नियमानें ठरलें. आणि अतिशय अनिश्चित अधिकार असलेली न्यायाची वरिष्ठ अदालतही कलकत्ता येथें गव्हर्नर जनरलच्या गादीशेजारींच स्थापन करण्यांत आली.

आतां हेंही सहज समजून येण्यासारखें आहे कीं, अगदीं पूर्वीचें आगगाडीचें एंजिन हें हल्लींच्या मोठया अवजड व अधिक चलनशक्तीच्या सुधारलेल्या गतिचालक यंत्रापुढें जसें दिसलें, त्याचप्रमाणें त्या काळच्या अव्यवस्थित रचनेचें राज्यकारभार चालविणारें यंत्र हल्लींच्या सुधारलेल्या राज्यकारभाराच्या पद्धतीच्या यंत्रापुढें दिसेल; आणि त्यांत राज्यकारभार चालविण्याच्या पद्धतीच्या यंत्राचीं कांहीं प्राथमिक तत्वें हल्लींच्या तत्त्वांना विरोधीही असूं शकतील. आशियांतील एखाद्या एतद्देशीय राज्यकर्त्याकडून, त्यानें आपल्या स्वामित्वहक्काच्या सत्तेचा त्याग करून दिल्यामुळें, अगर त्याच्यावर दिग्विजय मिळविल्यामुळें, हातीं आलेल्या एखाद्या प्रदेशामध्यें जेव्हां राज्यव्यवस्थेची नवी घटना करणें जरूरीचें असतें, तेव्हां एका मुख्य स्थानिक अधिकाऱ्याची स्थापना करून वरिष्ठ सरकारच्या सामान्य हुकमतीखालीं उपयोगांत आणण्याकरितां त्याला योग्य बंधारणाच्या पण भरपूर सत्तेचा दुजोरा देणें, ही पहिली अत्यंत अवश्यक गोष्ट आहे; मात्र असा सत्तेचा दुजोरा कितपत द्यावा हें त्या बाबतींतील परिस्थिति, तेथील जनसमाजाचे आचारविचार, तेथील लोकांची सामाजिक स्थिति, आणि नेहमीं सत्तेचें मुख्य केंद्र व मिळविलेला नवा प्रदेश यांच्यामधील अंतर, ह्या गोष्टींवर अवलंबून असतें. न्याय व अंमलबजावणी यांचीं खातीं अगदीं पूर्ण स्वतंत्र असोत, अगर दोन्हीही कमी अधिक प्रमाणानें एकाच वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखालीं असोत, परंतु कोणत्याही बाबतींत अधिकाराची मर्यादा, आणि समाजाला लागू करण्यासारखे कायदे अगर नियम, हे स्पष्टपणें रेखाटलेले आणि प्रसिद्ध केलेले असावेत, व जरुरीच्या वेळीं कोणत्याही बाबतीचा तत्काळ व प्रत्यक्ष स्वतःच्याच जबाबदारीवर तडकाफडकी निर्णय करतां येण्यासाठीं राज्यशकट चालविणाऱ्या मुख्य धुरीणाला अधिकार देण्याचीही योग्य तजवीज केलेली असावी; परंतु इ. सन १७७३ मध्यें कलकत्ता येथील राज्यकारभार चालविण्याची मुख्य सत्ता कौन्सिलमधील मताधिक्याच्या हातीं दिलेली

होती, – गव्हर्नर जनरल याला सम अगर विषम निकालाच्या वेळीं इच्छेप्रमाणें उपयोगांत आणण्याला फक्त एक मत अधिक देण्याचा अधिकार दिलेला होता, – त्यामुळें ज्या राज्यव्यवस्थेंत काम करण्यांत तडफ आणि जूट हीं प्राधान्येंकरून महत्त्वाचीं होतीं, तेथें प्रत्येक हुकमाबद्दल वादविवाद होत असत, आणि जेथें मतभेद होई, तेथें कोणतीही नवी गोष्ट जोराची खडेजंगी उडाल्याशिवाय मंजूर होत नसे. शिवाय अंमलबजावणीच्या आणि न्यायाच्या अधिकाराच्या मर्यादेचें क्षेत्र ठरविणें हें काम तर सतत तंटे करून मिटविण्याकरितां तसेंच ठेविलेलें होतें; त्यामुळें अधिकाराच्या क्षेत्राबद्दल हातघाई सुरू होऊन त्यांत परस्पर पक्षांनीं एकमेकांच्या अधिकारांत ढवळाढवळ केली होती, व परस्परांना पीडाही दिलेली होती. हे सर्व तंटेबखेडे अशा रीतीनें चालू असल्यामुळें राजसत्ता अनिश्चित होऊन जवळ जवळ तात्पुरती तहकूब झाली होती, आणि उभयतांनाही मान्य असलेला पार्लमेंटरूपी मध्यस्थ सहा महिन्यांच्या जलपर्यटणाच्या अंतरावर होता.

याप्रमाणें या पुनर्घटनेचें सुरळीत कामकाज चालण्याला जे मुख्य अडथळे होते, त्यांपैकीं पहिला, गव्हर्नर-जनरल याला कौन्सिलच्या मतावर पूर्णपणें अवलंबून रहावें लागत असे, हा होता. दुसरा ह्मणजे अधिकाराच्या मर्यादेबद्दल भांडणें हा असून शेवटचा अडथळा म्हणजे या भांडणांमध्यें तडजोड करणारा आणि न्याय व अंमलबजावणी या खात्यांच्या अधिकारांसंबंधींच्या व्याप्तीच्या योग्य मर्यादा रेखाटून देणारा मध्यस्थ इंग्लंडाहून जवळ कोठेंही नसणें हा होता. न्यायाधीशांनीं नजरेखालीं घेण्यासारखे कायदे करण्याची गव्हर्नर-जनरल याला सत्ता नव्हती; उलट पक्षीं, न्यायाधीश मंडळ कोणत्याना कोणत्या तरी मुद्द्यावर अंमलबजावणीच्या सरकारचे कायदे आणि त्या खात्याचे अधिकारी यांच्या विरुद्ध असलेल्या तक्रारी न्यायसभेपुढें घेण्याचा आणि राज्यव्यवस्थापक मंडळाला आपल्या हाताखालील कामगारांप्रमाणें

लेखून पाहिजे त्या वेळीं त्यांचें कामकाज तपासण्यासंबंधीं त्यांना हुकूम देण्याचा आम्हांला सर्वसाधारण हक्क आहे, असें प्रतिपादन करीत असे. राजसत्तेचा प्रधान प्रश्न दोघांपैकीं कोणत्याही पक्षाला आपले हितसंबंध अगर भांडणें यांना अनुकूल प्रतिकूल प्रमाणानें काल्पनिक रीत्या सोडवि-ण्याला पूर्ण मुभा होती. कंपनीच्या तर्फे तिचा पक्ष घेऊन असें प्रति-पादन करतां येईल कीं, दिल्लीच्या बादशहाकडून मिळालेल्या सनदांमुळें आणि एतद्देशीय राजेरजवाडयांबरोबर झालेल्या तहांमुळें तो प्रदेश कंपनीच्या हातीं आलेला होता, त्यामुळें इंग्लंडच्या राजानें नेमिलेल्या न्यायाधीशां-च्या अधिकाराच्या मर्यादेला अतिशय आळा बसलेला असून ती मुळांतच लंगडी झालेली होती. उलट पक्षीं असेंही म्हणतां येईल कीं, कंपनीच्या ताब्यांतील सर्व प्रदेश हा स्वाभाविक रीत्याच इंग्लंडच्या राजाच्या स्वामित्वाखालीं येत असल्यामुळें आनुषंगिक रीत्या हेंही उघड होतें कीं, कंपनीनें ज्या ज्या ठिकाणीं राजकीय अधिकार उपयोगांत आणिला, त्या त्या ठिकाणीं वरिष्ठ अदालतींचे हुकूम लागू होते; त्यामुळें कलकत्याच्या न्यायाधीशांना तद्देशीय न्यायाच्या अदालतींवर ताबा ठेव-ण्याचा अधिकार होता, व इंग्लंडांतील वेस्टमिनिस्टर हॉलमधील काम-काजाची वहिवाट प्रत्येक बंगाली जमिनदारास लागू करतां येण्यासारखी होती. कारण, ज्या अर्थी कायद्यानें कंपनीच्या सर्व नोकरांवर अधिकार चालविण्याची सत्ता मिळालेली होती, त्या अर्थी जमिनीची वसुली गोळा करीत असलेलें आणि सरकारच्या हिश्याची रक्कम कंपनीच्या हवालीं करणारें बंगालमधील सर्व जमीनदारमंडळ आपल्या अधिकाराच्या मर्यादेच्या कक्षेत गोंवितां येईल, असें न्यायाधीशमंडळ मानून चालत असे. व कांहींही झालें, आणि या हुकमतीविरुद्ध जरी कोणी तक्रार केली, तरी—आणि जरी लांबीच्या अंतर्प्रदेशांतील प्रांतांच्या तद्देशीय मनु-ष्याला आव्हानपत्राप्रमाणें कलकत्ता येथें जाण्यांत होणारा खर्च व भोगावा लागणारा त्रास न झेपण्यासारखा व न सोसण्यासारखा होता,

आणि जरी ह्या पारिभाषिक गोष्टींचें त्याला पूर्ण अज्ञान होतें,-तरी आपल्या हरकतीचें समर्थन करण्याकरितां तो न्यायाधीशमंडळापुढें हजर होण्याला बांधलेला आहे, असें मानण्यांत येत असे.

एखाद्या अतर्क्य महिमा असलेल्या देवतेप्रमाणें विलक्षण व गूढ शक्तीची आणि दीर्घ कालपर्यंत लांबणारी व अतिशय खर्चाच्या खड्डयांत ओढणारी जी ही काम करण्याची पद्धत, तिजमुळें ही न्यायदेवतेची अदालत म्हणजे अंमलबजावणीच्या खात्याकडून होणाऱ्या पीडेपासून आपलें संरक्षण करणारी "देवता" नसून जुलमानें पिळून काढणारा "परदेशीय चरक" आहे, असें तद्देशीय लोक लवकरच मानूं लागले. बर्क हा आपल्या माहितीपत्रकांत असें म्हणतो कीं, "तुमच्या पंचमंडळाला जी हकीकत कळलेली आहे, तिजवरून असें म्हणतां येईल कीं, तद्देशीय लोकांना ही न्यायाची अदालत म्हणजे एक 'मूर्तिमंत भीति' असून वस्तुतः अव्यवस्थेंत एकही सुधारणा केल्याशिवाय सरकारालाच मात्र तिनें अधिक घोटाळ्यांत पाडलेलें आहे." देशाचा स्वामित्वहक्क व सनदांचा मालकी हक्क, आणि न्याय व अंमलबजावणी या दोन मोठाल्या खात्यांच्या अधिकाराच्या व्याप्तीची मर्यादा, यांबद्दलच्या संशयाच्या वातावरणामुळें घोटाळे माजून गेले; कडाक्याची चुरस माजली; आणि प्रसंगीं चकमकीही उडूं लागल्या. कौन्सिल आणि न्यायसभा हीं दोन्हीही परस्पर विरुद्ध असून वादविवाद करण्यायोग्य अधिकाराच्या मर्यादेच्या व्याप्तीच्या किनाऱ्यावरील प्रदेशावर एकमेकांविरुद्ध देखरेख ठेवीत असत; बंगालच्या वसुलीच्या बाबतींत तेथील लोकांवर आमची अमर्यादित हुकमत आहे, असा कंपनीचे अधिकारी हक्क सांगत असत. उलट पक्षीं, सरकारी वसुलीच्या बाबतींत होणाऱ्या अन्यायांपासून लोकांचें संरक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें न्यायाधीशमंडळ प्रतिज्ञापूर्वक प्रतिपादन करीत असे. आणि यांपैकीं प्रत्येकाच्या म्हणण्याला पुष्कळ चांगल्या सबबीहि मिळण्यासारख्या असत. न्यायाधीशमंडळानें हिंदुस्थानांतील तद्देशीय लोकांचें

संरक्षण करण्याचा जितका निश्चय केला होता, तितकाच आपली सत्ता प्रस्थापित करण्याचाही केलेला होता; उलट, कौन्सिलला सरकारच्या वसुली-च्या कारभारावर कोणत्याही प्रकारचें नियंत्रण अगर दाब ठेवणें हें अतिशय अडचणीचें झालें होतें. खरें म्हणावयाचें म्हणजे, कलकत्त्याच्या बाहेर त्या काळीं कायद्याचें बिलकूल नांवही नव्हतें; कंपनीला कायदे-शीर अधिकार नव्हता; आणि तसा प्रस्थापित करण्याची तिची वासनाही नव्हती.

हीं सर्व कारणें व हे सर्व घोटाळे यांमधूनच वारन हेस्टिंग्स आणि त्याचें कौन्सिल यांचेमधील प्रख्यात भांडणें उपस्थित झालीं. आणि त्यामुळें गव्हर्नर जनरल व त्याचें सल्लागार मंडळ यांच्यामध्यें परस्पर तट पडून जोराची खडाजंगी माजली. तथापि जेव्हां जेव्हां न्यायाच्या वरिष्ठ अदालतीशीं तंटे उत्पन्न होत, तेव्हां तेव्हां मात्र ते सर्व तात्पुरते एक होत असत. आशियांतील ब्रिटिश राष्ट्राच्या ताब्यांत असलेल्या दूरच्या प्रदेशां-तील स्थितीला इंग्लिश पद्धतीच्या संस्था लागू करण्याच्या हेतूनें केलेल्या प्रयोगाच्या ह्या गोष्टी अगदीं प्रारंभीच्या काळाचें स्वरूप दाख-विणाऱ्या असल्यामुळें त्यांचा तेवढाच संबंध ह्या त्रोटक हकीकतीच्या कक्षेमध्यें आलेला आहे; कारण, नेहमीं सांगितलेल्या गोष्टी पुन्हां सांगणें म्हणजे त्यांची पुनरावृत्ति करणें होय. इ. सन १७७३ च्या कायद्यानें राज्यकारभाराची जी पद्धति स्थापन करण्यांत आली, त्या पद्धतीमुळें कंपनी-वर लादलेल्या मोघम आणि तडजोडीच्या आधिपत्याला कांहींसें निश्चित व ओळखतां येण्यासारखें स्वरूप देण्याच्या पहिल्या प्रयत्नाचा नामनिर्देश करण्यांत आला. त्यावेळेपासून पुढें हिंदुस्थानांती इंग्लिशांच्या राज्यकार-भाराला हळू हळू व्यवस्थित स्वरूप येत गेलें; राज्यकारभाराचें केंद्र आतां एकदाचें स्पष्टपणें कलकत्ता येथें स्थापन करण्यांत आलें; गव्हर्नर जनरल हा सर्व राज्यकारभारावरील मुख्य अधिकारी आहे असें ठरलें; तिन्हीही इलाख्यांच्या परराज्याशीं ठेवावयाच्या संबंधावर प्रमुखत्वानें नियंत्रण कर-

ण्याचा त्याला अधिकार देण्यांत आला; तो इंग्लंडमधील पार्लमेंटच्या सनदेच्या अन्वयें आपला अधिकार चालवूं लागला; आणि याप्रमाणें विस्तृत व कायमच्या ठरीव तत्त्वांवर हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यव्यवस्थेचा पाया घातला गेला. परंतु अंतःस्थ राज्यव्यवस्थेचें कार्य अजून सुरू झालेलें नव्हतें. आणि कौन्सिलमधील बेबनावानें होणारी ओढाताण, राजकारणांतील भानगडी, परदेशाशीं लढाया, व प्रत्येक जातीची सांपत्तिक अडचण, ह्या सर्वांना तोंड देऊन वारन हेस्टिंग्स याला ही राज्यव्यवस्थेची इमारत बांधून काढावयाला दीर्घ प्रयत्न करावयाचे होते.

भाग अकरावा.

वारन हेस्टिंग्स या गव्हर्नर जनरलची कारकीर्द.

(इ. सन १७७४–८५.)

परिच्छेद पहिला–रोहिले लोकांबरोबरील लढाई.

(इ. सन १७७४.)

इ. १७७४ पर्यंत वारन हेस्टिंग्स याची हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल या नात्यानें नेमणूक झाली नव्हती; परंतु इ. सन १७७२ मध्यें तो बंगाल इलाख्याचा गव्हर्नर या नात्यानें कलकत्ता येथें गेला, तेव्हांपासून इ. सन १७८५ च्या उन्हाळ्यामध्यें तो कायमचा इंग्लंडांत परत जाईपर्यंत हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या इतिहासाची सर्व दिशा आणि स्वरूप ह्यांवर त्याच्या कर्तृत्वाची छाप असून त्या सर्वांशीं त्याचा संबंध होता.

त्यानें ज्या वेळीं राज्यसूत्रें हातीं घेतली, त्या वेळीं शंभर वर्षांपासून एकसारखी वाढत्या प्रमाणावर असलेली मराठ्यांची सत्ता सतलज नदी-पासून अगदीं दक्षिणेस थेट कन्याकुमारीपर्यंत हिंदुस्थानांतील प्रत्येक राज्यकर्ता व राज्य यांना भिववीत होती. इ. सन १७६१ मध्यें पानिपत येथें त्यांच्या नशिबीं आलेल्या विध्वंसक अपजयामुळें पंजाबमधून त्यांची हकालपट्टी झाली होती; परंतु पश्चिम हिंदुस्थानामध्यें त्यांची सत्ता परमा-वधीस पोंचलेली असून मध्य हिंदुस्थानांत व राजपुतान्यामध्यें ते वाटेल त्या वेळीं लुटालूट करीत, खंडणी उकळीत, आणि औधच्या वजिराच्या प्रदेशांत, रोहिलखंडांतील प्रांतांत व दिल्ली, आग्रा, आणि अलाहाबाद, यांच्या आसपास असलेल्या मुसलमान राजेरजवाड्यांच्या

मुलखांत नासधूस करण्याकरितां अगदीं ईशान्य दिशेकडे गंगा आणि यमुना ह्या नद्यांनीं भिजल्या जाणाऱ्या सुपीक व सपाट प्रदेशांत लुटीच्या उद्देशानें एकसारख्या स्वाऱ्याही करीत. जरी मराठ्यांचें सैन्य स्वत: मिळविलेल्या लुटीवरच पोसलें जात असे, आणि जरी त्यांच्या पुढाऱ्यांचा खंडणी उकळणें आणि मुलूख लुबाडणें हाच धंदा असून ते फक्त कडवे अशिक्षित सेनानायकच असत, तरीही त्यांच्या मुलकी राज्यकारभाराची व्यवस्था आणि मुख्यत्वेंकरून जिंकलेल्या प्रदेशांतील जमाबंदीच्या सर्व वसुलाची तजवीज हिंदुस्थानांतील इतर सर्व अधिकारी वर्गाच्या मानानें त्या काळीं अत्यंत कर्तृत्ववान् असलेल्या ब्राह्मण वर्गाच्या अधिकाऱ्यांकडून होत असे. मराठ्यांच्या मोहिमेची पद्धत अशी होती कीं, ते सुटसुटीत घोडेस्वारांच्या झुंडींनीं एखादा प्रदेश व्यापून टाकीत; आपल्या शत्रूला शह देऊन त्याला जर्जर करून सोडीत; व जर त्यांनीं आपला मोर्चा परत फिरविला, तर तो जबर खंडणी घेऊनच ते फिरवीत, अथवा जर ते एखाद्या प्रदेशांत स्थाइक झाले, तर तेथें शास्त्रशुद्ध पद्धतीनें जबर जमीनधारा गोळा करीत. लढाईतील शिताफीचा बेशिस्तपणा व पद्धतशीर रीतीनें एखाद्या प्रदेशांतील संपत्तीचें शोषण करण्याची कला, यांमुळें मराठ्यांच्या धुरीणांना मोठें फिरतें सैन्य जय्यत तयार ठेवितां येत असे, आणि हिंदुस्थानांतील इतर प्रत्येक सत्तेला हें सैन्य ह्मणजे "मूर्तिमंत काळ" असें वाटत असे. हैद्राबादच्या राज्याचें धूड जरी आकारानें मोठें होतें, तरीही तें मराठ्यांच्या "तोंडीस तोंड" देण्यासारखें नव्हतें. मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या विद्येमध्यें पूर्ण निष्णात अशा म्हैसूरच्या हैदर अल्लीसही ते संख्येनें व चपळाईनें पुरून उरण्यासारखे होते. एखाद्या सांथीच्या रोगाप्रमाणें त्यांची दरसाल रोहिले लोकांवर आणि औधच्या वजिरावर धाड येऊन पडत होती; आणि मोंगल बादशाहीच्या कुत्तरओढींतून त्यांनीं लाटलेल्या मोठ्या प्रदेशाचें त्यांना मराठ्यांपासून क्वचित्‌च संरक्षण करतां येत होतें. राजकीय वर्चस्वाकरितां

होऊं घातलेल्या झटापटीच्या सामन्यांत इंग्लिशांचे प्रमुखत्वानें प्रतिस्पर्धी होण्याचें कार्य मराठ्यांच्याच नशिबीं आल्याचें सर्वत्र दिसून येत होतें, आणि वास्तविक रीत्या मराठ्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही एतद्देशीय सत्तेनें उत्तर हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्यविस्ताराला जोराचा प्रतिकार केला नाहीं. मात्र तसाच प्रतिकार पुढें पुष्कळ वर्षांनीं शीख लोकांनीं इ. सन १८४९ मध्यें सतलज नदी ओलांडून केलेला आहे.

इ. सन १७७२ सालीं, ह्मणजे वारन हेस्टिंग्स यानें बंगालचीं राज्यसूत्रें ज्या वेळीं आपल्या हातीं घेतलीं, त्या वेळीं निरनिराळे मराठे सरदार पेशव्यांच्या धुरीणत्वाखालील आपल्या जुटीच्या बळांतून न फुटतां स्वतःचे “ सवते सुभे ” स्थापन करण्यास नुकतीच सुरवात करीत होते; व इ. सन १७७४ पासून त्याच्या गव्हर्नर जनरल ह्या नात्याच्या सर्व कारकीर्दीत ईस्ट इंडिया कंपनीच्या परराज्याशीं वागण्याच्या धोरणाची स्थिति व गति मुख्यत्वेंकरून ह्या मराठा सरदार मंडळाशीं असलेल्य अस्थिर अशा संबंधावरच बहुतांशीं अवलंबून होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इ. १७६९ सालीं क्लाइव्ह यानें ठरवून दिलेल्या वसुलीवर मोंगल बादशहा शहाअलम हा अलाहाबाद येथें रहात असे; त्यानें बंगालच्या वायव्य दिशेकडील प्रांतांत मराठ्यांच्या एका सैन्याची वार्षिक वावटळ आली असतां आपली राजधानी परत मिळविण्यास मदत करण्याकरितां त्यांस विनंति केली, व ती मराठ्यांच्या सैन्यानें मान्यही केली, असें वारन हेस्टिंग्स यास आढळून आलें. इ.सन १७७१ सालीं मराठ्यांच्या आश्रयाखालींच त्याला पुन्हां दिल्लीच्या तख्तावर बसविण्यांत आलें होतें; परंतु अधिक प्रांत बळकविण्याकरितां त्याच्या नांवाचा उपयोग करून व आपल्या तळावर समृद्धि असतां त्याला जवळ जवळ कफल्लक करून सोडून मराठ्यांनीं त्याच्या राजवैभवाचें एक निव्वळ बेगडी सोंग बनविलें होतें. उत्तरेकडील प्रदेशासभोंवतीं ते आतां माश्यांच्या थव्याप्रमाणें जमत चालले होते, आणि सर्व मुसमान राजेरजवाड्यांवर

ते या वेळीं झपाट्यानें आपला पगडा बसवीत चालले होते; इ.सन १७६५ सालीं क्लाइव्ह यानें बादशहाला, त्यानें "बंगालची दिवाणी" कंपनीला दिली त्या वेळीं, अलाहाबाद आणि कोरा हे प्रांत दिलेले असून तेच त्याच्या नांवाखालीं आतां मराठे लोक मागूं लागले होते; परंतु हें त्यांचें कृत्य इंग्लिशांच्या जिव्हाळ्याला विशेष प्रकारें लागण्यासारखें होतें; कारण, हे प्रांत बंगाल व औध यांच्या सरहद्दीवर असल्यानें ते मराठ्यांच्या ताब्यांत जाणें ही गोष्ट त्या दोन्हीही प्रांतांच्या सुरक्षितपणाला सारखीच विघातक झाली असती.

औधच्या उत्तरेकडील सरहद्दीवर हिमालय पर्वताची ओळ आणि गंगानदीचा वरील भाग यांच्या कोनांत अफगाणिस्थानामधील रोहिले लोकांच्या ताब्यांत असलेला रोहिलखंड ह्या नांवाचा प्रदेश होता. तेथील राजगादी ही नांवाजलेल्या अफगाण कुळांतील एका धाडशी पुरुषानें अजमासें पंचवीस वर्षांपूर्वी स्थापन केली होती. आणि अहमदशहा अबदल्ली याच्या जुन्या हिंदुस्थानावरील स्वारीमुळें झालेल्या धामधुमींत तिनें आपणाला मोंगल बादशाहतीपासून स्वतंत्र म्हणवून घेतलें होतें. ह्या वेळीं त्या राज्यावर एकवटलेल्या सरदारांचा अंमल असून हफीज रहिमतखान ह्या नांवाचा पुरुष त्यांचा प्रमुख होता. मराठ्यांपासून आपला बचाव करून घेण्यास उपयोगी अशा मोठ्या संरक्षक कक्षेचा हा प्रदेश ह्मणजे एक महत्त्वाचाच भाग होता; परंतु इ. सन १७७१ सालीं मराठ्यांनीं ही कक्षा येथेंच फोडली, आणि आतां ह्मणजे इ. सन १७७२ सालींही ह्याच ठिकाणीं पुन्हां त्यांची चळवळ सुरू झाली. बंगालच्या उघड्या बाजूला ज्याप्रमाणें औधचा अडोसा होता, त्याचप्रमाणें औधच्या उघड्या सरहद्दीला रोहिलखंडाचा अडोसा होता; त्यामुळें रोहिले लोकांनीं औधच्या वजिराजवळ मदत मागितली, तेव्हां आपल्या अमलाखालील प्रदेशाबद्दल वजीरही फिकिरींत पडून त्यानें सर्वसाधारण दुष्मन असलेल्या मराठ्यांविरुद्ध एक होण्याबद्दल इंग्लिशांना विनंति केली.

कलकत्ता सरकारनें सर राबर्ट बारकर याच्या हाताखालीं एक सैन्याची तुकडी पाठविली; आणि त्यास, वजिरालाच पाठिंबा देण्यासाठीं आपल्या हालचाली कराव्या, आणि कोणत्याही वाटाघाटींत साधारणपणें त्याच्याच पक्षास चिकटून असावें, असा हुकूम दिला. त्यानंतर वजीर आणि रोहिले यांचेमध्यें तह घडवून आणण्यांत आला, आणि इंग्लिश सेनापतीची त्यावर साक्ष झाली. त्या तहाअन्वयें रोहिले लोकांनीं सैन्याकरितां ठरलेली पैशाची मदत दिल्यास मराठयांना हांकलून देण्याचें वजिरानें कबूल केलें. नंतर लवकरच मराठे लोक आपण होऊनच बरसातीकरितां तळ देण्यास मागें फिरले. परंतु इ. सन १७७३ च्या सुरवातीला त्यांनीं पुन्हां रोहिलखंडावर शह देण्याची भीति घातली; त्यामुळें त्या वेळीं औधचा वजीर, रोहिले, आणि इंग्लिश, हे तिघे मिळून त्यांच्यावर चाल करून गेले, व त्यांनीं मराठ्यांना माघार घेण्यास भाग पाडलें. त्यानंतर वजिरानें सैन्याच्या खर्चाच्या ठरलेल्या रकमेची रोहिले लोकांकडे मागणी केली, परंतु त्यांचा मुख्य पुढारी हफीज रहिमतखान यानें त्या मागणीला उडवाउडवीचे जबाब पाठविले; त्यामुळें स्वतः वजिरानें इंग्लिशांकडे गाऱ्हाणें केलें; कारण, त्यांच्या सेनापतीनें तहांत ठरलेल्या कराराबद्दल जरी कोणत्याही प्रकारची हमी घेतलेली नव्हती, तरीही त्यावर त्याची साक्षीची सही झालेली होती.

हेच व्यवहार रोहिले लोकांबरोबरील लढाईला कारणीभूत झाले. ह्याच लढाईमुळें पार्लमेंटमध्यें वारन हेस्टिंग्सवर जिभा खूप सैल सुटल्या, त्याची भयंकर मान खंडणा झाली, इतकेंच नाहीं, पण हें कृत्य ह्मणजे एक अगदीं काळिमा आणणारा राजकीय गुन्हा आहे, असा त्याच्यावर अजूनही नेहमीं दोषारोप करण्यांत येतो. त्या वेळची एकंदर राजकीय परिस्थिति ही उघड उघड अशा कावेबाज मसलतीच्या जाळ्यांत अगदीं गुरफटून गेलेली होती. औधच्या वजिराला असा संशय आला होता कीं, रोहिले सरदार हे बादशाही प्रदेशाचे निव्वळ लचके तोडणारे अफ-

गाण टोळीवाले असून ते निकडीच्या प्रसंगीं आपणाविरुद्ध मराठ्यांना जाऊन मिळतील. शिवाय त्यांनीं तसें न करण्याला वास्तविक रीतीनें पाहतां तसेंच एखादें विशेष कारणही नव्हतें. कारण, रोहिले लोकांवर हल्ला करून त्यांच्या राज्याची आपसांत विभागणी करण्याबद्दल वजिरानें आपणास सामील व्हावें, ह्मणून मराठ्यांनीं वजिराला पूर्वींच सुचविलें होतें, आणि तोही या बाबतींत काळजीपूर्वक विचार करण्यांत गढून गेलेला होता. परंतु आपल्या शेजाऱ्याचें घर लुटण्याकरितां एखाद्या दरवडेखोराच्या टोळीला सामील होणें, ह्मणजे तिला आपल्या स्वतःच्या घराचा दरवाजाही अधिक जवळ करण्यासारखें आहे, हें समजण्याइतकें त्याच्यांत शहाणपण होतें; आणि एकंदरीनें पाहतां इंग्लिशांशीं दोस्ती करणें हाच जास्त सुरक्षित मार्ग आहे, कारण इंग्लिशांशीं केलेल्या दोस्तीच्या तहामुळें त्यांचें सैन्य रणक्षेत्रांत आपणाला हटकून यशस्वी करील, आणि मराठ्यांच्या विरुद्ध मार्गांत "अडोशाची आडकाठी" ह्मणून आपली मजबुती करण्यांतच त्यांचे उघड उघड हितसंबंधही गुंतलेले आहेत, असा त्यानें विचार केला. या कारणामुळें इ. सन १७७३ सालीं औधच्या वजिराची गव्हर्नर जनरलबरोबर काशी येथें मुलाखत झाली, त्या वेळीं रोहिलखंड आपल्या ताब्यांत मिळवून देण्याकरितां आपणाला इंग्लिश सैन्याची मदत मिळावी, अशी इच्छा त्यानें प्रदर्शित केली. रोहिले लोकांनीं आपणाला सैन्याच्या खर्चाबद्दल द्यावयाची ठरलेली रक्कम न दिल्यामुळें त्यांनीं आपला तह मोडला, अशी सबब त्यानें पुढें आणली, आणि इंग्लिश लोक जर आपणाला मदत करतील, तर तिजबद्दल मी सढळ हातानें भरपाई करीन, असें त्यानें वचन दिलें. ह्या योजनेला हेस्टिंग्स यानें दोन्हीही पक्षांकडून थोडीशी भवति न भवति व होय ना झाल्यानंतर अखेरीस आपलें अनुमोदन दिलें. या बाबतीसंबंधीं त्यानें आपल्या कौन्सिलला असें लिहिलें कीं, "आपल्या दोस्ताच्या ताब्यांत हा प्रदेश जाण्यानें गंगानदीच्या अडोशामुळें परराष्ट्रीय स्वाऱ्यांपासून पूर्णपणें निर्धास्त असें त्याचें अगदीं

दुर्भेद्य राज्य होईल; उलट पक्षीं, त्याचें संरक्षण करण्याकरितां अगर त्याच्याशीं लढाई करण्याकरितां आपल्या सैन्यालाही तें सारखेंच सुगम होईल. त्यामुळें त्याला संपत्ति मिळेल, आणि आपणांस तिचें भागीदार होतां येईल. यामुळें तो निर्भय होईल, तथापि त्याची सत्ता मात्र भीतिदायक होण्यासारखी वाढणार नाहीं;....मराठ्यांशीं तोडीचा सामना देण्याची त्याची एकट्याची ताकद नाहीं; त्यामुळें त्याच्या राज्याची सरहद्द मराठ्यांच्या सरहद्दीजवळ नेऊन भिडविल्यानें तो आपणावर पहिल्याहूनही अधिक अवलंबून राहील, आणि उभयतांमधील दोस्तीचा संबंधही अधिकच दृढ होईल." पूर्वी ठरल्याप्रमाणें इ. सन. १७७४च्या वसंत ऋतूंत उभयतांचें सैन्य एकत्र होऊन त्यांनीं रोहिले लोकांवर स्वारी केली; त्यांचे सेनानायक कसलेले असून रोहिले लोक मोठ्या शौर्यानें लढले; आणि त्यांनीं एकट्या वजिराच्या सैन्याचा तर केव्हांच धुव्वा उडवून टाकिला असता; परंतु इंग्लिश सैन्यापुढें त्यांच्याच्यानें टिकाव निघेना; कांहीं निकराचे हल्ले चढविल्याबरोबर त्यांचा पराजय झाला; हफीज रहिमतखान हा आपल्या सैन्याच्या अग्रभागीं मोठ्या धैर्यानें लढत असतांनाच मारला गेला; आणि अशा रीतीनें अफगाण सरदारमंडळाची अल्पायुषी सत्ता पूर्णपणें नाहींशी झाली. रोहिलखंड खालसा करून वजिराच्या मुलखास जोडण्यांत आलें, आणि त्यामुळें पश्चिमेकडून होणाऱ्या हल्ल्यांच्या तोंडावर मजबुतीचा असा गंगानदीच्या वरील भागाच्या पूर्वेकडे थेट हिमालय पर्वतापर्यंतचा सर्व प्रदेश त्याच्या हुकमतीखालीं आला.

इंग्लिशांच्या राजकीय हितसंबंधाच्या दृष्टीनें विचार केला असतां, ह्याचा परिणाम असा झाला कीं, एका महत्त्वाच्या सरहद्दीवरील भागावर अविश्वासू शेजाऱ्याच्या ऐवजीं विश्वासू आणि मुठींत असलेल्या दोस्ताची योजना करून आपल्या वायव्येकडील स्वसंरक्षणाची पूर्ण व्यवस्था झाली. आणि हा डावही निःसंशय पूर्णपणें यशस्वी असाच झाला, असेंही खात्रीनें ह्मणतां येईल. या वेळेपासून पुढें पुष्कळ वर्षें

पर्यंत, म्हणजे १९व्या शतकाच्या प्रारंभीं इंग्लिशांनीं आपल्या वायव्य सरहद्दीपलीकडील प्रदेश स्वतःच्या ताब्यांत घेईपर्यंत, त्या सरहद्दीवर कोणत्याही प्रकारची भानगड उपस्थित झाली नाहीं. तथापि रोहिले लोकांशीं कारणाशिवाय केलेल्या वैरभावामुळेंच इंग्लिशांना हा फायदा मिळालेला होता. रोहिले लोकांची इंग्लिशांशीं भांडण उपस्थित करण्याची इच्छा नव्हती. आणि इंग्लिशांचाही त्यांच्याशीं अमित्रत्वाचा असा संबंध नव्हता. त्यामुळें, ज्या राजकारणाच्या लवचिक तत्त्वाच्या अनुरोधानें दूरच्या प्रदेशाच्या गव्हर्नरला इतर सर्व विचार बाजूस ठेवून फक्त जो प्रदेश त्याच्या ताब्यांत सोंपविलेला असेल, त्याचाच सुरक्षितपणा कायम ठेवण्याच्या विचाराला प्राधान्य द्यावें लागतें, त्या तत्त्वाच्या अनुरोधानेंही वारन हेस्टिंग्स ह्याच्या या बाबतींतील राजनीतीचें सहज समर्थन करतां येणें शक्य नाहीं.

परिच्छेद दुसरा-मराठ्यांबरोबरील लढाई (१७७६-८२), आणि म्हैसूरकराबरोबरील युद्ध (१७७८-८३).

इ. सन १७७६ पासून सुरू झालेल्या पुढील सात वर्षांच्या तुफानी काळामध्यें जरी वारन हेस्टिंग्स हा नेहमीं लष्करी हालचालींची तळी उचलण्यांत व देखरेख करण्यांत गढून गेलेला असे, तरीही त्यानें स्वतःच आंखून हातींघे तलेली अशी "रोहिले लोकांबरोबरील लढाई" एवढीच फक्त काय ती मोहिम होय. ह्या वेळेपासून पुढें सर्व शतकभर झालेल्या एकंदर लढायांचें क्षेत्र पश्चिम आणि दक्षिण हिंदुस्थान यांमध्यें होतें. बंगालमध्यें औधच्या वजिराबरोबर केलेली सहकारी कुमकेची तैनाती दोस्ती हें इंग्लिशांच्या स्वसंरक्षक पद्धतीचें मुख्य आधारस्थान बनलें होतें, आणि मराठ्यांची त्या प्रदेशावर स्वारी होईल अशी जरी वारंवार धास्ती असे, तरीही त्यांच्या सैन्यानें त्या प्रदेशावर केव्हांही स्वारी केली नव्हती. परंतु मुंबई येथील प्रेसिडेंट आणि त्याचें

कौन्सिल यांचा, आपल्या ताब्यांत अधिक प्रदेश–विशेषतः मुंबई-नजदीक असलेली साष्टी–मिळवून आपला स्वतःचा नांवलौकिक वाढविण्याचा हेतु होता; ह्मणून त्यांनीं पुणें येथील गादीवरून काढून टाकलेल्या रघुनाथराव ह्या नांवाच्या एका मराठे सरदाराबरोबर तह केला; त्या अन्वयें कंपनी सरकारनें दख्खनचीं राज्यसूत्रें पुन्हां रघुनाथरावास मिळवून द्यावीं, आणि त्याबद्दल मोबदला ह्मणून त्यानें कंपनीला कांहीं मुलूख तोडून द्यावा, असा उभयतांमध्यें करार ठरला. रघुनाथरावाबरोबर अशा रीतीनें करार करण्यांत, पुण्याच्या दरबारांत आपण राजकीय वर्चस्व मिळवावें, आणि जमिनीचा वसूल वाढवून आपल्या इलाख्याच्या खर्चाला लागणारा पैसा पैदा करावा, असा मुंबई येथील प्रेसिडेंटाचा हेतु होता. परंतु ह्या मोहिमेची आंखणी वाईट, आणि योजलेले उपाय तर साध्याच्या मानानें अगदींच अपुरे असे होते. रघुनाथरावाबरोबर केलेल्या तहाच्या कराराची नक्कल जेव्हां मुंबईहून कलकत्ता सरकारास मिळाली, तेव्हां त्यांनीं या अमलांत आणलेल्या योजनांना ताबडतोब सर्वस्वी दूषण दिलें, ही लढाई "अदूरदृष्टीची, धोक्याची, अधिकाराशिवाय अंगावर घेतलेली आणि अन्यायमूलक" आहे, असें स्पष्ट जाहीर केलें, आणि "जो मनुष्य हातीं घेतलेल्या कार्यांत कामास पडणारी अशी मदत देण्यास असमर्थ आहे, अशा रघुनाथरावासारख्या मनुष्याकरितां मराठ्यांचें सर्व राष्ट्र जिंकण्याची जबाबदारी मुंबई सरकारनें आपल्या अंगावर ओढून घेतल्याबद्दल निषेधहि प्रदर्शित केला." "ह्या धाडशी कृत्यामुळें अपार संकटसागरामध्यें आपली राज्यनौका सांपडेल," असें कलकत्ता सरकारानें अगदीं बरोबर भविष्य केलें होतें. आणि म्हणूनच त्यांनीं मुंबई सरकारला, जर आपलें सैन्य धोक्याशिवाय परत नेतां येण्यासारखी परिस्थिति असेल, तर तें परत न्या, असा सख्तीचा हुकूम पाठविला. परंतु हा हुकूम मुंबईला पोंचण्यापूर्वींच सैन्य मोहिमेवर रवाना होऊन चुकलें होतें. आणि त्या सैन्यानें साष्टी व वसई हीं दोन्हीही महत्त्वाचीं नाकीं आपल्या ताब्यांत

जबरदस्तीनें घेतल्यामुळें मुंबई सरकाराकडून लढाईचा संकल्प सुटून चुकला होता. इंग्लिश आणि मराठे यांचेमध्यें झालेल्या लढायांची जी लांबलचक परंपरा लागली होती, आणि ज्यांपैकीं बहुतेकांत मराठ्यांनीं इंग्लिशांबरोबर प्रशंसनीय आणि आपल्या नांवास साजेसा सामना दिला, त्या लढायांच्या मालिकेंतील पहिल्या लढाईची सलामी आरास येथें झडली. तींत मुंबई सरकारच्या सैन्याची पांगापांग होऊन त्यास माघार घेणें भाग पडलें, आणि त्यांत बऱ्याच इंग्लिश अधिकाऱ्यांनीं नेहमींप्रमाणें स्वतःच्या कर्तव्याला स्मरून आपल्या पांगलेल्या सैन्यास धीर देऊन पुन्हां जमवाजमव करित असतांना रणयज्ञांत आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या. मराठ्यांबरोबर अशा स्थितींत लवकर आणि आपल्या इज्जतीला धक्का न पोहोंचेल असा तह होणें अशक्य आहे, असें हेस्टिंग्स यास वाटलें, म्हणून आपण माघार न घेतां आलेल्या संकटास तसेंच तोंड देत राहिलें पाहिजे, असा त्यानें आग्रह धरिला; कलकत्याहून मुंबईकडे लष्कराची कुमक पाठविण्यांत आली; आणि मुंबई सरकारच्या ह्या कृत्यामुळें वाजवी रीतीनें चवताळलेल्या मराठ्यांबरोबर तहाच्या वाटाघाटीचाही प्रयत्न करण्यांत आला.

अशा रीतीनें कंपनी सरकार एका पुष्कळ दिवस चालणाऱ्या, अतिशय खर्चाच्या आणि बिनफायद्याच्या लढाईंत गुरफटलें गेलें. ज्या अनंत वैमनस्याच्या झटापटींत वारन हेस्टिंग्स हा पुढील सात वर्षें सारखा गढून गेलेला होता, व ज्यामुळें त्याची सांपत्तिक स्थिति अडचणीची झाली, त्याच्या इभ्रतीला धक्का पोहोंचला, त्याच्या राज्यकारभाराची घडी विस्कळित झाली, आणि मुंबई व मद्रास येथील सरकारांवर निरनिराळ्या प्रसंगीं भयंकर प्राणसंकटही ओढवलें, त्याचा मूळ उगम या लढाईंतच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या चोहोंकडे चालणाऱ्या आणि अनिर्णयात्मक अशा लढायांची थोडक्यांत आणि सुबोध हकीकत देण्याचा प्रयत्न करणें केव्हांही निरर्थकच ठरेल. तथापि ह्या सर्व हकीकतीचें सार

हें आहे कीं, मराठे हे त्या वेळीं इतक्या जोरांत होते, आणि त्यांच्या जुटीचें बळही इतकें मजबूत होतें कीं, इंग्लिशांकडून शक्य तितक्या पाठविल्या जाणाऱ्या सैन्याच्यानें त्या जुटीच्या बळाला हादरून सोडणें अगर त्याच्यावर दरारा बसविणें ही गोष्ट शक्य नव्हती. हिंदुस्थानच्या मध्य भागांतील त्यांची जागाच अशी होती कीं, त्यामुळें त्यांना इंग्लिशांच्या तिन्हीही निरनिराळ्या असलेल्या इलाख्यांना भिवावितां येत असे, हैद्राबाद आणि म्हैसूर या ठिकाणीं इंग्लिशांविरुद्ध कारस्थानें करण्यांत यश मिळवितां येत असे, आणि पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यावर त्यांच्या असलेल्या बंदरांमधून फ्रेंचांशीं त्यांना पत्रव्यवहारही करितां येत असे. मुंबई आणि मद्रास ह्या दोन लहान आणि म्हणूनच कमी महत्त्वाच्या इलाख्यांचीं राज्यसूत्रें दोघां नालायक आणि अविचारी गव्हर्नरांच्या हातीं होतीं; त्यांना गव्हर्नर जनरलच्या त्यांचेवर असलेल्या अधिकाराबद्दल अतिशय हेवा वाटत होता; त्यानें दिलेल्या सल्लामसलतीचा अगर हुकमाचा ते अनादर करीत; आणि त्यानें अंगीकारिलेल्या राजकारणपद्धतीविरुद्ध नाना प्रकारचे अडथळे उभे करून ती हाणूनही पाडीत. शिवाय अशा स्थितींतच हेस्टिंग्स याला खुद्द त्याच्या कौन्सिलकडून आणि लंडनमधील कंपनीच्या कामाकाजाच्या मुख्य ठिकाणीं त्याच्या असलेल्या शत्रूंकडून द्वेषभावानें प्रतिरोध होत असे. त्यामुळें तर राज्यसूत्रें व्यवस्थित रीतीनें चालविण्यालाही त्याला मार्गांत पुष्कळ विघ्नें उत्पन्न होत असत. ह्या लढाईंतून एकदम माघार घेणें आणि मराठ्यांबरोबर तह करण्याचा आग्रह धरणें हें जर त्याला शक्य असतें, तर मराठ्यांवर हल्ला करण्यांत पहिल्यानें झालेल्या घोडचूकीनंतर मागाहूनच्या वडलेल्या त्याहूनही भयंकर अशा घोटाळ्याच्या घालमेलीमधून तो कदाचित् सुटला असता; परंतु साष्टी आणि वसई हीं दोन्ही ठिकाणें अजूनही इंग्लिशांच्या ताब्यांत होतीं, आणि तीं तशींच आपल्या ताब्यांत ठेवण्याचा त्यांचा निश्चय होता. या बाबतींच्या वाटाघाटीकरितां हेस्टिंग्स यानें पुणें येथें एक वकील पाठविला,

तरी हीं दोन्हीही महत्त्वाचीं ठाणीं इंग्लिशांना देण्याचें मराठ्यांनीं साफ नाकारलें. त्यामुळें इ. सन १७७६ च्या अखेरीपर्यंत उभयतांमधील तहाचें घोंगडें तसेंच भिजत पडलें; परंतु त्यानंतर युरोपांतील राजकीय वातावरणाची परिस्थिति बदलली, व त्यामुळें हिंदुस्थानावरही तिचा महत्त्वाचा परिणाम घडून आला.

ह्या वेळेच्या सुमारास अमेरिकेंतील संयुक्त प्रांतानें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. त्यामुळें उत्तर अमेरिकेमध्यें झालेलें हें बंड दाबून टाकण्याच्या प्रयत्नांत इंग्लंड इतकें पूर्णपणें गढून गेलें होतें कीं, युरोपमध्यें झालेल्या सप्तवार्षिक युद्धांत फ्रान्सला इंग्लंडकडून जे अपकार भोगावे लागले, त्यांचें उसनें वाळून घेण्याकरितां ह्या आलेल्या उघड उघड वरून सोन्यासारख्या दिसणाऱ्या संधीचा फायदा घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. फ्रान्सच्या प्रधानानें एका सरकारी गुप्त खलित्यांत असें लिहिलें आहे कीं, "इंग्लंडचा नकशा उतरण्याकरितांच परमेश्वरानें हा प्रसंग योजून आणलेला आहे." आणि त्याप्रमाणें फ्रेंच लोकांनीं वसाहतवाल्यांना नेटानें पण गुप्त रीतीनें इतकी मदत केली कीं, त्यामुळें त्या राष्ट्राबरोबर युद्ध टाळणें इंग्लंडला अपरिहार्य झालें. इ. सन १७७७ सालीं फ्रान्सच्या तर्फेचा एक प्रतिनिधि मराठ्यांशीं कांहीं अटींवर दोस्तीचा तह करण्याकरितां हिंदुस्थानांत आला. त्या अटींमध्यें मराठ्यांनीं फ्रेंचांना पश्चिम किनाऱ्यावर एक बंदर द्यावें, अशीही एक अट होती. फ्रेंच प्रतिनिधीनें केलेल्या विनंतीला पेशव्यानें स्वाभाविक रीत्याच प्रोत्साहन दिलें; त्यामुळें इंग्लिशांनीं पुढें संकट ओढवणार म्हणून आपल्या मनांत पक्की खुणगांठ बांधली, व त्यांना अत्यंत रागही आला; कारण, यूरोप, हिंदुस्थान व अमेरिका, यांमधील तत्कालीन परिस्थितीचा विचार केला असतां अशा प्रकारची जूट होण्याचा संभव ही गोष्टच मूळ इंग्लिशांना आतिशय झोंबणारी होती. त्याच वर्षी वारन हेस्टिंग्स याला पारीस येथील इंग्लंडच्या वकिलाकडून गुप्त रीतीनें अशी बातमी समजली कीं, फ्रेंच लोक इंग्लिशांच्या

शत्रूंना मदत करण्याकरितां हिंदुस्थानावर मोहिम करण्याचा बेत करीत आहेत. इ. सन १७७८ मध्यें जनरल बर्गाईन हा साराटोगा येथें अमेरिकन लोकांच्या स्वाधीन झाला. आणि फ्रान्स व बहुतकरून स्पेन सुद्धां इंग्लंडला युद्धाचें आव्हान करण्याच्या तयारींत आहेत, अशी खबर आली. शिवाय तितक्यांतच इकडे हैदर अल्ली यास मदत करण्याकरितां हिंदुस्थानच्या दक्षिण किनाऱ्यावर फ्रेंच लोकांचें एक जहाज बोर्बोन बेटांतून येऊन त्यानें खरोखरच फ्रेंच अधिकारी व लष्करी सामग्री हीं त्या ठिकाणीं आणून पोंचतीं केलीं.

ह्या वेळीं वारन हेस्टिंग्स आणि फिलिप फ्रान्सिस या उभयतांत कलकत्ता येथील कौन्सिलमध्यें चाललेलें भांडण जोराचें आणि विकोपास गेलेलें होतें, तरीही गव्हर्नर जनरल यानें ह्या संकटांना तोंड देण्याकरितां हिमतीचे इलाज योजिले, व ते मनगटाच्या जोरावर दडपून अमलांत आणले. हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या सर्व वसाहती ताब्यांत घेण्यांत आल्या, कुमक ह्मणून बंगालमधून मुंबईस सैन्य पाठविण्यांत आलें, आलेल्या संकटांनीं भाग पाडल्यामुळें मराठ्यांबरोबर नुकताच केलेला तह गुंडाळून ठेविला, व रघुनाथराव याला मदत करण्याकरितां पुन्हां पुण्यावर सैन्य पाठविण्याची परवानगी देण्याचा त्यानें निश्चय केला. हल्लींच्या काळीं एकमेकांमध्यें लढाई चालू असतांनासुद्धां शत्रूच्या गादीवर आपला हक्क सांगणाऱ्या तोतयांना मदत करण्याची पद्धत सुधारलेल्या राष्ट्रांतून मागें पडलेली आहे. ह्याचें अंशतः कारण, राष्ट्रांराष्ट्रांमध्यें ठरलेल्या कायद्यांनीं जरी ही कल्पना निषिद्ध ठरलेली नसली, तरीही ती गोष्ट त्या कायद्यांनीं अमान्य ठरलेली आहे, हें आहे; परंतु ह्याचें मुख्य कारण हें आहे कीं, अशा धाडसाच्या कृत्यांनीं आपल्या शत्रूला उलट अधिक चेव मात्र येतो; शिवाय विवक्षित राजकीय कार्य साधण्याकरितां अशा प्रकारचीं केलेलीं कृत्यें बहुतेक नेहमीं निष्फळच होणार, हेंही प्रारंभींच ठरून चुकल्यासारखें असतें, ही गोष्ट प्रत्यक्ष प्रमाणांच्या लांब-

लचक मालिकेवरून सिद्ध झालेली आहे. तथापि युरोपमध्यें एके काळीं शत्रूला जेरीस आणण्याला अगर कमकुवत करण्याला हा नेहमींचा ठरलेला मार्ग असे. आणि आशियामध्यें तर हल्लींही हा प्रयोग ह्मणजे एक लोकसंमत धाडशी कृत्य असें मानलें जात आहे. हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या इतिहासांतही अशीं बरींच शहाणपणा शिकण्यासारखीं उदाहरणें आहेत, आणि त्याचाच एक मासला ह्मणजे मराठ्यांच्या प्रधानकीच्या गादीवर रघुनाथरावाला बसविण्याकरितां इंग्लिशांनीं केलेली मदतीची मसलत घातुक ठरली, हा होय. कारण, ह्यादुसऱ्या स्वारींत तर त्यांना लांछनास्पद अपयश आलें; त्यांच्या मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांनीं ढोबळ घोडचुका केल्या; आणि अपमानकारक रीतीनें ते मागें परतले. तोतया रघुनाथराव देशत्याग करून पळून गेला, आणि इंग्लिशांना मराठ्यांकडून योग्य दीर्घ द्वेषाशिवाय कांहींही अधिक फलप्राप्ति झाली नाहीं. ग्रांड डफ हा असें ह्मणतो कीं, मुंबई सरकारानें निर्वाणीच्या निकरानें मुठभर मनुष्यें मराठ्यांच्या साम्राज्यावर पाठविलीं होतीं, आणि अशा धाडशी स्वारीचें धुरीणत्व त्या कामाला अगदीं नालायक असलेल्या व्यक्तींच्या हातीं सोंपविण्यांत आलेलें होतें. परंतु हें कसेंही असलें, तरी खरी गोष्ट ह्मणजे ही आहे कीं, मराठे हे या वेळीं आणि बहुतेक त्या शतकाच्या अखेरपर्यंत इंग्लिशांना निदान "तोडीस तोड" तरी होतेच होते, यांत काडीचाही संशय नाहीं.

अशा रीतीनें युद्धभूमींतून दुसऱ्या वेळींही माघार घ्यावी लागून झाल्यानंतर, आणि मराठ्यांच्या जुटीच्या बळांतील कांहीं प्रमुख सरदारांना त्यांतून फोडण्याचे कित्येक अतिशय राजकारणपटुत्वाचे केलेले प्रयत्न— ज्या प्रयत्नांमध्यें कावेबाजपणाच्या राजकारणांत मुरलेल्या ह्या पटाईत व्यक्तींनीं त्याला बरोबर चीत करून टाकलें, ते प्रयत्न -- निष्फळ झाल्यानंतर, एका स्वैर, चळवळ्या, प्रसंगीं तुरी देणाऱ्या, अश्रांत श्रम करणाऱ्या, आणि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत आपल्या विरुद्ध काहूर

उपस्थित करण्यामध्यें पटाईत, अशा एका शत्रूबरोबर पुष्कळ दिवस चालणाऱ्या लढाईच्या जाळ्यांत आपण अडकले गेलेले आहोंत, असें हेस्टिंग्स यास आढळून आलें. म्हैसूरचा हैदर अल्ली हा कांहीं वर्षांपासून आपल्या सैन्यसामग्रीच्या तयारींत असून तो इंग्लिशांच्या विरुद्ध योग्य संधीची वाट पहात टपून बसलेला होता, आणि इ. सन १७६९ मध्यें इंग्लिशांनीं त्याचा पक्ष घेण्याचें टाकून मराठ्यांविरुद्ध त्याला एकटा सोडल्या वेळेपासून त्याच्या दीर्घद्वेषी मनांत धुमसत असलेल्या खुनशी स्वभावाचीं दुश्चिन्हसूचक लक्षणें तो आतां उघड उघड दाखवूं लागला होता. जेव्हां कलकत्त्याच्या सरकारानें फ्रेंचांचीं ठाणीं आपल्या ताब्यांत घेण्याचा निश्चय केला, तेव्हां फ्रेंचांच्या मालकीचें माही हें ठिकाण विलंब न लावितां तुम्ही आपल्या ताब्यांत घ्यावें, असा मद्रास सरकारास हुकूम सुटला. कारण, हें बंदर – दाक्षिण हिंदुस्थानांत अगदीं नैर्ऋत्य दिशेकडेस असल्यामुळें – फ्रेंच व म्हैसूरकर यांचेमधील दळणवळणाचा महत्त्वाचा मार्ग झालें असतें; आणि हें ठाणें आपल्याच संरक्षणाखालीं राहिलें पाहिजे, असें हैदर अल्ली यास वाटण्यालाही बहुतेक तीच गोष्ट कारणीभूत झाली असावी, असें मानण्यास हरकत नाहीं. निदान एवढें तरी खरें कीं, मद्रास सरकारानें ह्या बाबतींत ढवळाढवळ करूं नये, अशी त्याची इच्छा होती; आणि माही हें आपल्या ताब्यांतील प्रदेशाच्या हद्दींत असून तेथील नागरिक जन ही आपली प्रजा असल्यामुळें त्यांच्यावर हल्ला करण्यांत आला, तर त्यांचें संरक्षण करणेंही आपणाला कदाचित् भाग पडेल, असें त्याचें म्हणणें होतें. तथापि इंग्लिश व मराठे यांच्यामध्यें चाललेल्या भांडणाचा फायदा स्वतःच्या ताब्यांतील प्रदेश वाढविण्याला साहजिकच घेऊन ज्या वेळीं हैदर अल्ली हा मराठ्यांच्या ताब्यांत असलेल्या दूरच्या प्रदेशांपैकीं कांहीं प्रदेश गिळंकृत करीत होता, त्याच वेळीं इंग्लिश फौजेच्या तुकडीनें इ. सन १७७९ मध्यें माही हें ठाणें आपल्या ताब्यांत घेतलें. म्हैसूर येथील राज्यकर्त्यानें प्रदर्शित केलेल्या इच्छेचा अशा रीतीनें

इंग्लिशांनीं अनादर केल्यामुळें त्याला अतिशय संताप आला. आणि परवानगीशिवाय त्याच्या प्रदेशांतील एका भागांतून पलीकडे जाण्याचा इंग्लिश सैन्याच्या एका पथकानें अदूरदृष्टीनें प्रयत्न केल्यामुळें तर आणखी आगींत तेल ओतल्यासारखेंच होऊन गेलें.

ह्या सर्व अवधींत—ह्मणजे अठराव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांच्या काळांत—हिंदुस्थानांतील राजसत्तेच्या पारड्याचा समतोलपणा हा इंग्लिश, मराठे, आणि ह्मैसूरकर, या तिघांच्या समसमान बलाबलाच्या त्रिकोनी तागडीवर अवलंबून होता. कारण, ह्यांपैकीं दोन सत्ताधाऱ्यांमध्यें भांडणें झालीं, तर तिसरा तात्पुरता प्रबळ होत असे, आणि त्यांपैकीं दोन सत्ता एक झाल्या, तर तिसरी डळमळूं लागे. इ.सन १७७८ मध्यें असाच प्रकार घडून आला. फ्रान्सबरोबर होणाऱ्या युद्धाच्या भयसूचक बातमीनें हिंदुस्थानांतील इंग्लिश सरकाराला जे तातडीचे इलाज योजावे लागले, त्यांमुळें ते पहिल्यानें मराठ्यांबरोबर आणि नंतर ह्मैसूरकराबरोबर लढाईंत गुरफटले जाऊन शेवटीं त्यांना मराठे व ह्मैसूरकर ह्या एक झालेल्या जोडगोळीला तोंड देणें भाग पडलें. इ. सन १७८० च्या उन्हाळ्याच्या सुमारास हिंदुस्थानांतील इंग्लिशांची सांपत्तिक स्थिति अत्यंत निकृष्ट दशेस आलेली होती. कलकत्ता येथें बंगालमधून होणारा वसूल पुष्कळ दिवस चालणाऱ्या व दूरच्या पल्ल्यावरील लढायांच्या खर्चामुळें धुपून गेलेला असून हेस्टिंग्सच्या ह्मणण्याप्रमाणें अत्यंत कमकुवतपणामुळें तो अडूनही पडला होता; कारण, गव्हर्नर जनरल हा अजूनही कौन्सिलांतील आपल्या कुटिल आणि विघ्नकारी जोडीदारांबरोबर झगडत असून त्यांपैकीं फ्रान्सिस ह्या नांवाच्या एकाला सरते शेवटीं पिस्तुलाच्या गोळीनें त्यानें गप्प बसविलें होतें[1]. मुंबई येथील तिजोरीला तर इतकी पुरी

---

१. ता. १७ आगष्ट इ० सन १७८० रोजीं वारन हेस्टिंग्स व फिलिफ फ्रान्सिस यांचेमध्यें कलकत्ता येथें द्वंद्वयुद्ध झालें; त्यांत फ्रान्सिसला भयंकर जखम झाली, परंतु त्यांतून तो बरा झाला.

ओहोटी लागली होती कीं, बाहेरच्या प्रदेशांत आपलें सैन्य प्रत्यक्ष गुंतवून ठेवण्याचें मुख्य कारण हेंच असून त्यांचा पगार स्वत: भागविण्याला आपण असमर्थ आहोंत, अशी कौन्सिलनें यादी पाठविली होती. दक्षिणेकडे हैदर अल्ली यानें मराठ्यांशीं संगनमत केलें, हैद्राबादचा निझाम मिळवून घेऊन इंग्लिशांविरुद्ध त्रिकूट दोस्तमंडळ बनविलें, समुद्रकिनाऱ्यावर फ्रेंचांनीं आपली साथ करावी, असें त्यांच्याकडून वचन मिळविलें, आणि इ. सन १७८० च्या जुलई महिन्यामध्यें आपल्या ८० हजार सैन्यासह म्हैसूरच्या डोंगरांतून कर्नाटकच्या सपाट प्रदेशावर तो चाल करून आला. मद्रास सरकारनें आपणावर येणाऱ्या भावी संकटाच्या पूर्वसूचक सर्व चिन्हांकडे दुर्लक्ष करून त्यांना कस्पटाप्रमाणें मानिलें. मद्रास येथील नीतिभ्रष्ट आणि नालायक गव्हर्नर, सर थामस रँबाल्ड, यानें बसंत ऋतूंत स्वदेशीं परत जाण्याच्या वेळीं आपल्या शेवटच्या खलित्यांत असें लिहून ठेविलें कीं, "दक्षिण इलाख्यांत पूर्ण शांतता नांदत असतांना मी तो सोडीत असल्याबद्दल मला समाधान वाटतें." तथापि थोडक्याच महिन्यांनंतर, पुष्कळ दिवसांपासून ज्याच्या युद्धाच्या तयारीचा डंका वाजलेला होता, तो हैदर अल्ली हा एखाद्या जंगी तुफानाप्रमाणें कर्नाटकच्या सखल प्रदेशावर येऊन कोसळला, व त्याच्या घोडेस्वारांच्या सैन्यानें थेट मद्रासच्या सीमेपर्यंत कर्नाटक प्रांत उद्ध्वस्त करून टाकला. त्याचा प्रतिकार करण्याकरितां पाठविलेलें इंग्लिश सैन्य घेरलें गेलें, आणि बहुतेक मारलेंही गेलें. मद्रासची तिजोरी कोरडी पडलेली होती, आणि शहरांत सामग्रीही नव्हती; त्यामुळें हैदर अल्ली यानें नेटानें हल्ला केला असता, तर तें शहरही त्याला सहज घेतां आलें असतें.

हेस्टिंग्स यानें सर आयर कूट याच्या धुरीणत्वाखालीं कलकत्त्याहून सैन्य आणि संपत्ति यांची मदत पाठविण्याला क्षणाचाही विलंब लाविला

---

१. ह्या टोळधाडीबद्दल बर्क यानें केलेलें वर्णन हा उत्कृष्ट वक्तृत्वाचा एक नमुनेदार असा मासला आहे. (अर्काट येथील नबाबाच्या कर्जासंबंधींचें त्याचें भाषण पहा)

नाहीं. सर आयर कूट यानें पोर्टोनोव्हो येथें हैदर अल्लीचा पराभव केला, आणि त्याला मद्रासपासून लांब हांकालून दिलें. परंतु ह्या अकल्पित आलेल्या धाडीमुळें गव्हर्नर जनरल यानें केलेले सर्व बेत अगदीं विस्कळित होऊन गेले. म्हैसूरकर व मराठे या दोघांबरोबर एकाच वेळीं त्याला आतां तोंड द्यावयाचें होतें; त्याची जमा संपुष्टांत आली होती; कामाच्या बोजाखालीं त्याचें लष्कर चुरडून गेलें होतें; मराठ्यांच्या जुटीचें बळ फोडण्याच्या त्याच्या प्रयत्नांना अपयश आलेलें होतें; त्यांच्यापैकीं एक, ह्मणजे शिंदे, याच्याशीं वायव्येकडे ग्वाल्हेरजवळ, आणि दुसरा, म्हणजे पेशवे, याच्याशीं दक्षिणेकडे मुंबईजवळ, त्याला लढाया करणें भाग पडलें होतें; आणि मराठ्यांना अत्यंत फायदेशीर अशा अटीवर तह करण्याबद्दल त्यानें केलेली विनंतिही त्यांनीं फेंटाळून दिलेली होती. इंग्लिशांच्या सैन्यानें शिकस्त केली, तरी पश्चिम किनाऱ्यावर मराठे अटोक्यांत येईनात! आणि इकडे मद्रास येथें तर जें सैन्य हैदरअल्लीबरोबर सामना देत होतें, त्या सैन्याच्या सामग्रीची अगदींच टंचाई झालेली असून इलाख्याची गंगाजळीही कोरडी पडलेली होती. मराठ्यांच्या जुटीच्या बळापैकीं शिंदे हा मोठ्या झपाट्यानें अत्यंत प्रबळ असा सरदार बनत चालला होता, आणि त्यानें ह्या वेळेच्या सुमारास मध्य हिंदुस्थानापासून उत्तरेकडे आग्रा आणि दिल्ली येथपर्यंतचा मुलूख काबीज करून आपला राज्यविस्तार केला होता. परंतु शिंद्याच्या ह्या पुरोगामी गतीमुळें बंगालच्या एका सरहद्दीवर इंग्लिशांना जशी त्याची भीति उत्पन्न झाली, तसाच तोही, त्यांना आपल्या सर्वांत मजबुत अशा ठिकाणाहून त्याच्या हाडीं घाव घालतां येईल, इतक्या आटोक्यांत आला. इंग्लिश सैन्याबरोबर कित्येक जोराच्या चकमकी झडल्यानंतर, आणि ग्वाल्हेरचा किल्ला शिड्या लावून सर केला गेल्यानंतर, (हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासांत नांवाजण्यासारखीं जिवावरील कृत्यें करून विस्मृतिपंथांत गेलेल्या विभूतीं-

---

१. इ. सन १७८१ जुलई.

पैकींच क्याप्टन पोफ्यार्म हा एक असून त्यानेंच हा किल्ला सर केला होता,) इंग्लिशांशीं दिलमिलाई करण्यांतच आपला फायदा आहे, असें शिंदे यास आढळून आलें, व मराठा सरकार आणि कंपनी सरकार यांचे-मध्यें मध्यस्थी करण्याच्या अटीवर, मोंगल बादशहाच्या ताब्यांत त्या वेळीं दिल्लीच्या आसपास जो थोडासा प्रदेश शिल्लक होता, त्या प्रदेशावर त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें हात मारावा, असें ठरविण्यांत आलें. याप्रमाणें पुष्कळ नुकसान सोसल्यानंतर इ. स. १७८२ च्या मे महिन्यांत मराठ्यांबरोबर चाललेली ही इंग्लिशांच्या नांवाला कमीपणा आणणारी व त्यांच्या हितसंबंधास फायदेशीर नसणारी लढाई सरते शेवटीं तह करून बंद करण्यांत वारन हेस्टिंग्स याला यश आलें. ह्याच लढाईमुळें निकडीचे प्रसंग उद्भवल्यानेंच त्यानें नाइलाज ह्मणून जीं कृत्यें केलीं, तींच पुढें त्याच्यावरील दोषारोपाच्या चौकशीच्या वेळीं मुख्य मुद्दे ह्मणून पुढें आलीं होतीं. त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, इ. स. १७८० मध्यें मुंबई व मद्रास ह्या दोन्हीही इलाख्यां-चें अस्तित्व आणि रक्षण याकरितां झालेल्या अवाढव्य खर्चानें आपली सांपत्तिक स्थिति अत्यंत भयंकर अडचणीची झाली होती. हे दोन्हीही इलाखे सांपत्तिक मदतीकरितां बंगालवरच बहुतेक सर्वस्वी अव-लंबून होते. आणि इ. स. १७८१ मध्यें सांपत्तिक स्थितीची तोंड-मिळवणी करण्याकरितां जरी हर तऱ्हेचे प्रयत्न करण्यांत आले, तरीही तिजोरीला पडलेली कोरड कायमच होती. ह्याच निकडीच्या सांपत्तिक

---

१. "जिकडे छानछोकीच्या गृहस्थाचें पाऊल घेणार नाहीं, अशा मार्गानेंच ज्या लढवय्यांनीं आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविला, त्यापेक्षां जास्त चांगले अधिकारी सैन्यास सेनानायक ह्मणून मिळणें शक्य नाहीं." असें तांजियरचा गव्हर्नर, लार्ड डार्ट-माथ, यानें आपल्या इंग्लिश सैन्यासंबंधानें इ. सन १६८४ मध्यें लिहिलें आहे. त्याचे हे वर निर्दिष्ट केलेले उद्गार हेस्टिंग्स आणि त्याचे अनुयायी यांस, अठराव्या शतकांत जे अधिकारी इंग्लंडकरितां हिंदुस्थानदेशांत लढत होते, त्यांच्याविषयीं चांगल्या रीतीनें उपयोगांत आणतां आले असते, असे ह्मणण्यास हरकत नाहीं.

अडचणीमुळें त्यानें काशीच्या राजाजवळ जबर खंडणी मागितली, आणि त्यामुळेंच एक प्रसिद्ध असलेलें बंड उद्भवलें. जेव्हां काशी येथील राजानें खंडणीची रक्कम देण्याची टाळाटाळी सुरू केली, तेव्हां हेस्टिंग्स हा स्वतः बनारस येथें गेला, दंडादाखल पहिल्याहूनही अधिक रक्कम त्यानें चेतसिंगावर लादली, आणि त्याला प्रतिबंधांत ठेविलें; त्यामुळें बंड उद्भवून गव्हरनर जनरल याची स्थिति तात्पुरती धोक्याची झाली; परंतु राजकीय परिस्थितीला कोणत्याही प्रकारें कायमचा धक्का न लागतां तें बंड नेटानें दाबून टाकण्यांत आलें. त्याचप्रमाणें लष्करी तिजोरीही रिकामी पडल्यामुळें अशाच प्रकारच्या अडचणीच्या सांपत्तिक स्थितीला ताळ्यावर आणण्याकरितां अधिकार नसतांना आंखडून ठेविलेल्या पैशाची रक्कम चुकती करणें भाग पाडण्यासाठीं वारन हेस्टिंग्स यानें अयोध्येच्या बेगमा आणि त्यांचे कंचुकीजन यांच्यावर जबरदस्तीचे इलाज योजिले. तथापि गव्हर्नर जनरल यानें ती रक्कम वसूल करण्याकरितां असले उपाय योजणें योग्य होतें कीं काय, याजविषयींही जबरदस्त शंका आहे. ह्या दोन्हीही गोष्टींची खुलासेवार हकीकत इतकी वारंवार आणि इतकी अलीकडे दिली गेलेली आहे कीं, त्यांचा ह्या ठिकाणीं नुसता उल्लेख करणेंच पुरेसें आहे.

मराठ्यांच्या सैन्याची व्याप्ति आणि चापल्य यांमुळें ते इंग्लिशांना अतिशय त्रासदायक असे शत्रु बनलेले होते. त्यांची मुख्य राजधानी पुणें हें शहर पश्चिम किनाऱ्याकडे जाण्याच्या मार्गाला वाट देणाऱ्या खिंडीच्या वरील बाजूस असल्यामुळें केव्हांही खिंडीच्या माथ्यावर उभें राहून त्यांना मुंबईला भीति घालतां येत असे. परंतु त्यांच्या सरदार मंडळामध्यें आपआपसांत एकमेकांविषयीं अविश्वास उत्पन्न झाल्यामुळें एकमतानें एखादें कृत्य करण्यास त्यांचें जुटीचें बळ कमकुवत होऊन तें असमर्थ झालें होतें, आणि पेशव्यांनीं ज्याप्रमाणें पूर्वीं शिवाजीच्या वंशजापासून राज्यसूत्रें हिसकावून आपल्या हातीं घेतलीं होतीं, त्याचप्रमाणें तेही आतां पेशव्या-

चा धनीपणा झुगारून देऊन स्वतंत्र होऊं पहात होते. उलट पक्षीं हैदर अल्ली याचें सैन्य एकाच राज्यकर्त्याच्या इच्छेप्रमाणें—म्हणजे जो हिंदी-द्वीपकल्पाच्या दक्षिण कोणांत असून ज्याला कसलेल्या सैन्याचा दांडगा आश्रय असे, आणि त्यामुळें ज्याला मद्रासच्या आसपास असलेल्या सपाट प्रदेशांत किंवा दोन्ही बाजूंच्या समुद्रकिनाऱ्यावर आपल्या सत्तेच्या जोरावर सहजच इतस्ततः संचार करतां येत असे, त्याच्या इच्छेप्रमाणें—वागत असे, आणि त्याची स्थिति, त्याची कर्तबगारी, आणि त्याची शिपाईबाण्याची तडफ, ह्यांमुळें कोणालाही एखाद्याच लढाईंत त्याच्या बरोबर तोंड देण्यास तो अत्यंत प्रबळ प्रतिस्पर्धी म्हणून गणला जात असे. हैदर अल्ली याला पुष्कळ दिवसांपासून कळून चुकलें होतें कीं, हिंदुस्थानचा कमकुवतपणा आणि इंग्लिशांची बळकटी, ह्या दोन्हीही गोष्टींच्या मुळाशीं हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्यावर आत्मसंरक्षणाच्या साधनाचा अभाव हें कारण आहे. ह्मणून त्यानें स्वतःही लढाऊ आरमार तयार करावें ह्मणून जिवापाड मेहनत घेतली होती; आणि इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील दळणवळण बंद पाडण्याच्या इराद्यानें, बोर्बोन बेटांत जी फ्रेंचांच्या आरमाराची तुकडी तयार होत आहे असें समजलें होतें, त्या आरमाराची तो ह्या वेळीं इंग्लिशांच्या विरुद्ध चाललेल्या लढाईंत मोठ्या भरंवशानें वाट पहात होता. त्यानंतर इसवी सन १७८१ मध्यें ही आरमाराची तुकडी कारोमांडल किनाऱ्यावर येऊन पोंचली, तेव्हां सर्वस्वी त्याच्याच आधीन असलेल्या कर्नाटकमधील इंग्लिशांच्या ठिकठिकाणीं पसरलेल्या ठाण्यांचा पाडाव करण्यांत तो गुंतला होता; आणि जर फ्रेंचांनीं त्याला येऊन मिळणें शक्य झालें असतें, तर इ. सन १७८२ सालीं त्याचा मुलगा टिपू सुलतान ह्याच्या खरोखरच स्वाधीन झालेलें महत्त्वाचें कडलूर हें शहरही त्यानें ह्याच वेळीं सर करून घेतलें असतें. परंतु फ्रेंच आरमाराचा अधिकारी आपल्या आरमारानिशीं बोर्बोन येथें परत गेला, सर आयर कूट यानें हैदर अल्ली

याचा सारखा पिच्छा पुरविला, आणि पोर्टो नोव्हो येथें त्याला तोंड देणें भाग पाडून त्या लढाईंत त्याचा पूर्ण पराजय केला; त्यामुळें तो अगदीं दुबळा होऊन गेला, व त्यानें बळकाविलेला तो सपाट प्रदेश इंग्लिशांना परत मिळाला. फ्रेंच आरमाराधिपति, संफ्रा, याहून अधिक उत्तम आरमारी अधिकारी फ्रान्सला आजपर्यंत कधींही मिळालेला नाहीं; परंतु तो जेव्हां इ. सन १७८२ सालीं पुन्हां पहिल्याहूनही अधिक आरमार घेऊन कारोमांडल किनाऱ्यावर परत आला, तेव्हां सर एडवर्ड ह्यूज याच्या धुरीणत्वाखालीं असलेल्या इंग्लिशांच्या बलिष्ठ, पण फ्रेंचांच्या मानानें कमी संख्येच्या, आरमारानें त्यास तोंड दिलें, आणि हैदर अल्ली हा आतां पूर्वीच्या मानानें कमकुवत झालेला आहे, असेंही त्यास आढळून आलें. फ्रेंच आणि डच यांचीं सर्व ठाणीं इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतलेलीं असल्यामुळें संफ्रा याला सामग्री मिळविण्याला अगर आरमाराची डागडुजी करण्याला हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्यावर निर्भय असें एकही आश्रयस्थान राहिलें नव्हतें. तथापि दोन हजार फ्रेंच सैन्य समुद्रकिनाऱ्यावर उतरविण्यांत त्याला यश आलें. त्यानंतर लवकरच त्या सैन्याला हैदर अल्लीचें सैन्य येऊन मिळालें; नंतर ४०० फ्रेंच सैनिक बरोबर असलेलें एक मोठें सैन्य घेऊन हैदर अल्लीचा मुलगा टिपू यानें कर्नल ब्रेथवेटच्या सैन्याच्या तुकडीवर छापा घातला; त्याचा ब्रेथवेटच्या सैन्यानें जोरानें आणि निकरानें प्रतिकार केला, तरीही टिपू यानें त्याचें बहुतेक सर्व सैन्य मारून टाकलें. मध्यंतरीं बंगालच्या उपसागरांत संफ्रा

---

१. क्याप्टन मेहॅान (अमेरिकेच्या आरमारांतील) ह्यानें संफ्रा व ह्यूज या उभयतांत समुद्रावर झालेल्या लढायांचें केलेलें वर्णन हें इंग्लिश लोकांना अत्यंत मनोवेधक आहे, ह्याचें मुख्यत्वेंकरून कारण हें आहे कीं, जरी तो ग्रंथकार इंग्लिशांचा कोणत्याही प्रकारें अभिमानी नाहीं, तरीही इंग्लिश जहाजांच्या अधिकाऱ्यांनीं ज्या चिकाटीनें आपलीं जहाजें लढविलीं, तिच्या वर्णनाच्या भरांत त्यानें नाइलाजानें त्यांची स्तुति केलेली आहे

मेहॅान याचें *Influence of Sea Power in History*, पान ४२८ पहा.

व ह्यूज यांच्यामध्यें पांच आरमारी लढाया झाल्या. त्यांमध्यें दोन्हीही सैन्यें मोठ्या चिकाटीनें लढलीं, व दयावर्दी विद्येंत प्रविण असलेल्या संफ्रा याला जर त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांकडून योग्य मदत मिळाली असती, तर त्यानें इंग्लिश आरमाराचा पराभवही केला असता. परंतु उलट पक्षीं ह्यूज आणि त्याचे लोक यांनीं आपलीं जहाजें इतक्या भयंकर चिकाटीनें लढविलीं कीं, सरते शेवटीं इंग्लिश खलाशांमध्यें असलेलें श्रेष्ठ आरमारी कौशल्य आणि दुर्जय कणखरपणा यांमुळें फ्रेंच आरमाराला जमिनीवरील सैन्याला ह्मणण्यासारखी मदत देतां आली नाहीं. इ. स. १७८३ मध्यें बुशी हा फ्रान्समधून फ्रेंच पायदळाच्या मोठ्या कुमकेसह हिंदुस्थानांत येऊन पोंचला. इ. स. १७८२ च्या दिसेंबरमध्यें हैदर अल्ली मृत्यु पावला, आणि त्यामुळें इंग्लिश लोक नुकतेच आपल्या एका कट्टया शत्रूपासून मोकळे झाले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपूसाहेब हा त्याचे मागून गादीवर बसला, आणि त्यानें फ्रेंच सैन्याच्या मदतीनें कडलूर शहराजवळ इंग्लिशांचा अतिशय नुकसानकारक पराभव केला; तथापि इ. सन १७८३ च्या जुलई महिन्यांत इंग्लंड व फ्रान्स यांचेमध्यें तह झाल्याची बातमी हिंदुस्थानांत येईपर्यंत त्याच्याच्यानें इंग्लिशांवर कोणताही हाडीं घाव घालविला गेला नाहीं. यानंतर संफ्रा हा युरोपमध्यें परत गेला, आणि ह्मैसूरचा टिपू याला, " आपण एकटे पडलों आहों, " असें आढळून आल्यानें आपल्या मर्जीविरुद्ध व कांहींशा उशिरानें त्यानें तहाचें बोलणें लाविलें. ज्या सात वर्षांच्या लढाईंत हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेवर जिवावरील गंडांतरें येऊन गेलीं, त्या लढाईचा अशा रीतीनें अखेरीस एकदाचा शेवट झाला; ज्या शत्रूच्या चक्रव्यूहांत हेस्टिंग्स हा घेरला गेला होता, तो चक्रव्यूहही सरते शेवटीं अशा रीतीनें फोडला गेला; आणि त्यामुळेंच इ. स. १७८५ च्या उन्हाळ्यामध्यें जेव्हां त्यानें हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलच्या जागेचा

राजीनामा दिला, त्या वेळीं हिंदुस्थानांतील सर्व एतद्देशीय सत्ताधाऱ्यां-बरोबर ब्रिटिश राजसत्ता शांततेनें नांदत राहिली होती.

यावरून हें लक्षांत येईल कीं, सर्व अठराव्या शतकभर इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें युरोपांत ज्या ज्या वेळीं भांडणें आणि सख्य होत असे, त्या त्या वेळीं इकडे हिंदुस्थानामध्येंही या उभयतांमध्यें लढाई अगर सलोखा ह्यासारखा महत्त्वाचा फेरफार घडून येत असे. जोंपर्यंत हिंदुस्थानांत फ्रान्स हें इंग्लंडला प्रतिस्पर्धी म्हणून होतें, तोंपर्यंत लढाई अगर तह या दोन्हींही बाबतींत उभयतांच्या कंपन्या आपापल्या राष्ट्रांचा हुकूम ओघानेंच पाळीत असत. पुढें ही स्पर्धा बंद झाल्यानंतर फ्रेंच हे आपल्या किनाऱ्यावरील वसाहतींनाच संभाळून असत. परंतु त्यांच्या आरमाराला हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या ताब्यांत असलेल्या समुद्र-किनाऱ्यावर नेहमीं भीति घालणें शक्य होतें; ह्मणून हिंदुस्थानाबरोबर इंग्लंडचें सर्व दळणवळण बिनधोक चालणें ही गोष्ट त्या दोन राष्ट्रां-मध्यें चाललेल्या समुद्रावरील लढायांच्या परिणामावरच सर्वस्वीं अवलंबून होती. या कारणामुळें हिंदुस्थानांतील इंग्लिश सरकार फ्रान्सबरोबरील लढाई-च्या भीतिसंबंधानें इतक्या विशेष सावधगिरीनें वागत असे कीं, फ्रेंच लोक हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्यावर उतरत आहेत, अशा नुसत्या लोकवार्तेनेंसुद्धां ते खडबडून प्रत्यक्ष लढाईसारखी तयारी करीत असत. एखादा एतद्देशीय राज्यकर्ता मारीशसबरोबर पत्रव्यवहार करतांना आढळून आला, तर तो आपला घातकी शत्रु आहे, आणि त्याच्यावर हल्ला करून शक्य तितक्या तांतडीनें त्याला हतवीर्य करणें अत्यंत जरूर आहे, असेंच खात्रीनें मानण्यांत येई; त्यामुळें याचा परिणाम असा झाला कीं, इ. सन १७८३ च्या व्हर्सेलस येथील तहानें जी लढाई समाप्त झाली, त्याखेरीजच्या हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याविरुद्ध फ्रान्सनें वारं-वार केलेल्या प्रत्येक धडपडीमुळें त्याचा विस्तार कमी न होतां तो उलट एकसारखा वाढत्या वाढीचाच होत गेला आहे. ह्या खडतर काळांतील

बहुतेक सर्व अवधींत न झेंपण्यासारख्या शत्रूंबरोबर इंग्लिशांना तोंड द्यावें लागलें होतें. जगांतील सर्व भागांत त्यांच्यावर जिकडून तिकडून संकटें ओढवलीं होतीं. आणि त्यामुळें हिंदुस्थानांत रोविलेला पाय जागच्या जागींच मजबूत ठेवून स्वसंरक्षणापेक्षां अधिक कांहींही करतां येणें त्यांना शक्य नव्हतें. इ. सन १७८१ मध्यें इंग्लंडला कोणीही दोस्त नव्हता. दैवाचा फांसा पूर्ण प्रतिकूळ झालेला होता. आणि अशा परिस्थितींतच युरोपमधील फ्रान्स, स्पेन, हालंड आणि उत्तर अमेरिकेंतील वसाहती, यांच्यासारख्या प्रबळ आरमारी सत्तांबरोबर त्याला तोंड देणें भाग पडलें होतें. त्याचप्रमाणें इकडे आशियाखंडांतही हिंदुस्थानांतील अत्यंत शूर आणि समरचतुर अशा मराठे व म्हैसूरकर ह्या दोन सत्ताधाऱ्यांबरोबर झगडण्यांत ते अडकून गेलेले होते. आणि ह्या दोन्हीही सत्ता फ्रेंच लोकांबरोबर संबंध ठेवीत होत्या. त्यामुळें फ्रेंच लोकांनींही आपल्या बाजूनें, ज्या कावेबाजपणामुळें ते इंग्लिशांविरुद्ध अमेरिकेमध्यें पूर्ण विजयी होत चालले होते, त्याचाच प्रयोग हिंदुस्थानांतही करण्यास आतां सुरवात केली होती. अमेरिकेंतील वसाहती इंग्लंडच्या हातांतून जाण्याचें कारण जमिनीवरील अडथळा हें नव्हतें; कारण, तसा प्रतिकार दूर करणें शक्य होतें, आणि तो दूर करण्यांतही आला असता. परंतु अटलांटिक महासागरापलीकडील त्यांच्या दळणवणळाच्या मार्गावर आरमारी शत्रूंनीं उपस्थित केलेल्या नाना प्रकारच्या अडथळ्यांमुळेंच त्या इंग्लंडच्या हातांतून गेलेल्या आहेत. युरोपपासून लांबीच्या पल्ल्यावर असलेल्या प्रदेशामध्यें समुद्रावरील आरमारी वर्चस्व हें जमिनीवर होणाऱ्या लढायांच्या परिणामांचें नियमन करूं शकतें, हें तत्त्व संफ्रा हा इंग्लिशांपासूनच शिकलेला असून पूर्वेकडील देशांत त्यांच्याविरुद्ध तेंच शस्त्र त्यानें उपयोगांत आणलें होतें[1]. इंग्लिशांचे समुद्रांतील रस्ते बंद पाडण्याकरितां, हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून त्यांचें आरमार हांकलून देण्या-

१ महॅनच्या *Influence of Sea Power in History*, या पुस्तकाचें पान ४२५ पहा.

करितां, आणि हिंदुस्थानांतील त्यांच्या शत्रूंच्या गोटांत सैन्यसामग्रीची मदत पोंचविण्याकरितां, फ्रेंचांनीं जिवापाड श्रम घेतले; हिंदुस्थानच्या सर्व द्वीपकल्पाला आपल्या आटोक्यांत ठेवण्यासारखें सिलोनमध्यें त्रिंकोमाली ह्या नांवाचें असलेलें फक्त एकटेंच बंदर त्यांनीं काबीज करून आपल्या ताब्याखालीं आणलें; आणि इंग्लिश आरमारी अधिकाऱ्यांची मगरमिठी सोडविणें जर संफ्रा याला शक्य झालें असतें, तर तो हैदर अल्ली याला मिळून त्यांनीं मद्रासही सर करून घेतलें असतें. अशा धडपडीच्या प्रसंगीं आणि त्यानंतरही कांहीं काळपर्यंत हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्याच्या सरहद्दी जशाच्या तशाच कायम राहिल्या, तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींही नाहीं. कारण, मद्रास व मुंबई यांचेवर आलेलीं अरिष्टें टाळण्याला सैन्य व संपत्ति हीं दोन्हींही साधनें जेमतेमच पुरेशीं होतीं. परंतु इंग्लिश सत्तेचें केंद्र आणि काळीज हीं बंगालमध्यें असून तेथपर्यंत लढाईची मजल केव्हांही गेलेली नव्हती. तेथील राज्यसूत्रें एका अलौकिक बुद्धीच्या आणि सुव्यवस्थित मांडणी करण्याची हातोटी साधलेल्या पुरुषाच्या हातीं होतीं. युरोपप्रमाणें हिंदुस्थानांतील कोणत्याही इंग्रजी इलाखासरकाराला लढाईकरितां कर्ज काढून मोहिम चालू ठेवणें शक्य नव्हतें; कारण, त्या सरकारांची सार्वजनिक पत व कर्ज देण्यासारखे धनिक लोक, ह्या दोघांचीहि व्याप्ति त्यांच्या इलाख्याच्या शहराबाहेर नव्हती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. झालेला पुष्कळसा खर्च वसुलींतून अगर एतद्देशीय दोस्त सरकारांकडून खंडणी घेऊन भागवावयाचा होता; आणि जेथून संपत्ति व सैन्य यांचाच फक्त पुरवठा झाला, इतकेंच नव्हे, तर आपली विशिष्ट राजकीय वर्तनाची दिशा आणि लष्करी धुरीणत्व यांचीही या पुरवठ्याला जेथून जोड मिळाली, आणि ज्यामुळें पश्चिम व दक्षिण इलाख्यांमध्यें इंग्लिशांचें संकटांतून वर डोकें निघालें, व आपत्तीचे दिवसही भरून आले, तो बंगाल इलाखाच होय. ज्या वेळीं अखेरीस मराठ्यांनीं तह केला, हैदर अल्ली मृत्यु पावला, आणि संफ्रा याला आपली सर्व

हिंमत व बुद्धिवैभव हीं खर्ची घालूनही बंगालच्या उपसागरामध्यें इंग्लिश आरमारावर जय मिळवितां आला नाहीं, त्या वेळींच हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोकांची स्थिति किती बळकट आहे, आणि त्यांच्या राज्याचा पाया किती भक्कम आहे, हें या लढाईनें सिद्ध झालें, असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाही. फ्रान्स आणि इंग्लंड यांचेमधील तहाची बातमी हिंदुस्थानांत इ. सन १७८३ मध्यें दक्षिण हिंदुस्थानांतील इंग्लिशांचें सैन्य अत्यंत अडचणींतून मोकळें करण्याला जरी अगदीं योग्य वेळीं येऊन पोहोंचली होती, आणि जरी समुद्रकिनाऱ्यावर फ्रेंचांचींच जहाजें अजूनही इंग्लिश जहाजांहून अधिक होतीं, तरीही संफ्रायाला हा खलिता मिळाल्यावर तो म्हणाला:-" हा तह झाल्याबद्दल ईश्वराचे धन्यवाद गाइले पाहिजेत; कारण, जरी आमच्या जवळ कायदा प्रस्थापित करण्याला दंडनीतीचीं साधनें आहेत, तरीही हिंदुस्थानांतील आमचें सर्व आमच्या हातांतून गेलें असतें, हें अगदीं उघड उघड दिसत आहे !"

इंग्लंड आणि हिंदुस्थानांतील एतद्देशीय राज्यकर्ते यांचेमध्यें पुष्कळ काळपर्यंत युद्धकलह सुरू होते; परंतु फक्त ज्या काळामध्येंच हिंदुस्थानांतील इंग्लिशांची स्थिति तात्पुरती धोक्यांत आली, त्या काळाचा ह्या लढाईच्या समाप्तीबरोबरच शेवट झाला. ह्या पुष्कळ दिवस चाललेल्या युद्धकलहामध्यें इंग्लंडचें हिंदुस्थानांतील राज्य जरी डळमळित झालें, तरीही त्यांतून तें सुरक्षितपणेंच बाहेर पडलें, या गोष्टीचें सर्व श्रेय आपल्या राजकारणपटुत्वामध्यें पूर्ण आत्मविश्वास असलेल्या वारन हेस्टिंग्स यासच दिलें पाहिजे. ह्या अलौकिक पुरुषाच्या हिंदुस्थानांतील कारकीर्दीसंबंधीं जो वादविवाद आतां एक शतकाहूनही अधिक काळपर्यंत चाललेला आहे, तोच येथेंही पुढें चालू ठेवणें अनवश्यक होईल, असें वाटतें; शिवाय आपणाला जें मुख्यत्वेंकरून समजून घ्यावयास पाहिजे आहे, तें हें आहे कीं, ज्या वेळीं युरोपमधील सर्व आरमारी सत्ता इंग्लंडविरुद्ध एक झाल्यानें

ग्रेटब्रिटनच्या ताब्यांतील समुद्रापडीकडील सर्व जगभर पसरलेलीं ठाणीं अतिशय धोक्यांत आलीं होतीं, त्या वेळीं – त्या ब्रिटिश सत्तेच्या राष्ट्रीय इतिहासांतील अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगाचे वेळीं – वारन हेस्टिंग्स यानें इंग्लिशांचा हिंदुस्थानांतील राज्यशकट सुरक्षितपणें हांकलून पार आणला. सप्तवार्षिक युद्ध चालू असतां उत्तर अमेरिका आणि हिंदुस्थान ह्या दोन्हीही ठिकाणीं इंग्लंडनें फ्रान्सवर विजय मिळविल्यामुळें ह्या एकच्याच बलाढ्य असलेल्या प्रतिस्पर्ध्यापासून जेव्हां तें मोकळें झालें, तेव्हां ग्रेटब्रिटनला, त्या मानानें शांततेचा कांहीं काळ आपणास आतां भोगावयास सांपडेल, असें वाटणें स्वाभाविक होतें; परंतु परकीयांची स्पर्धा संपते न संपते, तोंच दोन्हीही गोलार्धांत अंतःस्थ आपत्तींना सुरवात झाली. पश्चिमेकडे वसाहतवाल्यांनीं स्वातंत्र्य मिळविण्याकरितां संप केला, आणि पूर्वेकडे इंग्लंडचें वर्चस्व हाणून पाडण्याकरितां एतद्देशीय राज्यकर्त्यांनीं कट करून कमरा बांधल्या. फ्रान्स हें बहिष्कृत व उत्साहभग्न झालेलें असल्यामुळें त्यानें ह्या दोन्हीही चळवळींना साहजिकपणेंच उत्तेजन दिलें, आणि मदतही केली. वसाहतवाल्यांच्या बंडखोर लोकांनीं अमेरिकेमध्यें पुष्कळ नेटानें झगडल्यानंतर ग्रेटब्रिटनचें "यूनियन जॅक" फाडून टाकलें; आणि चिकाटीनें चाललेल्या झटापटीचा परिणाम असा झाला कीं, ग्रेटब्रिटनचें "यूनियन जॅक" चें निशाण हल्लींही हिंदुस्थानावर फक्त फडकत राहिलें आहे, इतकेंच नाहीं, तर पहिल्याहूनही अधिक मजबुत रीतीनें तें हिंदुस्थानच्या भूमींत रोविलें गेलेलें आहे. शिवाय, म्हैसूरकराचें खनशी शत्रुत्व अगर मराठ्यांचें अश्रांत चापल्य, यांपैकीं कोणीही हेस्टिंग्सच्या पकडींतून एक तसूभरही इंग्लिशांचा प्रदेश हिसकावून घेण्यांत यशस्वी झालें नाहीं, ही गोष्टही प्राधान्येंकरून लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

ह्या वेळीं इंग्लंडमध्यें बडे लोक आणि सामान्य लोकांची सभा यांच्या हातीं अमर्याद सत्ता होती. परंतु हेस्टिंग्स हा कोणत्याही बड्या-

लोकांचा नातलग नव्हता, अगर पार्लमेंटमधील सभासदांमध्यें त्याचें वजनही नव्हतें. त्याला आपल्या कलकत्त्याच्या कौन्सिलमध्यें शत्रूंनीं घेरलेलें होतें; त्याचे प्रत्यक्ष मालक जी ईस्ट इंडिया कंपनी तिच्याकडून त्याला अतिशय धरसोडीचा आश्रय मिळत होता; त्याच्या सहकारी मंडळाकडून त्याला जोरानें प्रतिकार करण्यांत येत होता; आणि त्याच्या हुकमतीखालील दोन्हीही इलाख्यांचे मुख्य अधिकारी त्याच्या हुकमाची योग्य अंमलबजावणी करीत नसत. अशा स्थितींत कंपनीच्या व्यापारांत घातलेल्या भांडवलाचें त्याला संरक्षण करावयाचें होतें; त्याच वेळीं मद्रास अगर मुंबई येथील अधिकाऱ्यांच्या घोडचुकीमुळें लांबच्या पल्ल्यावरील आणि अदूरदर्शीपणामुळें अंगावर ओढून घेतलेल्या लढाया चालू ठेवण्याकरितां त्याला पैसा पैदा करावयाचा होता; आणि कंपनीच्या इंग्लंडमधील भांडवलावरील नफा हिंदुस्थानांतून धाडलेल्या व्यापारी जिनसांवरच अवलंबून असल्यामुळें त्या विकत घेऊन व रवाना करून नंतर बाकी राहिलेल्या चालू वसुलींतून त्या रकमांचा त्याला पुरवठाही करावयाचा होता. कारण, इंग्लंडमध्यें नेहमीं उपयोगांत आणला जाणारा कर्ज काढण्याचा उपाय त्याला हिंदुस्थानांत योजतां येणें शक्य नव्हतें. लढाईप्रीत्यर्थ कराव्या लागलेल्या खर्चानें शांततेच्या काळांत राज्यव्यवस्थेस अवश्य लागणाऱ्या नेहमींच्या खर्चाचें प्रमाण वाढलें. त्यामुळें सार्वजनिक उत्पन्नाचा उधळेपणानें खर्च केल्याबद्दल त्याच्यावर दोषारोप करण्यांत आला. परंतु याच कारणामुळें निरुपायानें त्याला काशी व लखनौ येथील पैशाचे व्यवहार करणें अपरिहार्य झालें. तथापि ज्यांनीं त्याच्या कृत्यांना कठोरपणानें "भयंकर गुन्हे" ह्मणून नांव दिलें, त्यांनीं — त्या वेळीं राष्ट्रीय हितसंबंधांचें अवजड ओझें झेंपण्यास योग्य असा तो एकटाच पुरुष असून तें काम त्याच्यावर लादण्यांत आलें होतें, किंवा दूरच्या प्रदेशामध्यें त्याची स्थिति अत्यंत बिकट झालेली होती, ह्यांतील एकही गोष्ट लक्षांत घेऊन त्या दृष्टीनें — त्याचेकडे पाहिलें नाहीं. हिंदुस्थानावरील वादळ निघून गेल्यावर आणि


इंग्लिशांचें राज्यरूपी गलबत शांत पाण्यामध्यें त्यानें हांकारून नेल्यावर भग इंग्लंडांतील राजकीय पक्षांच्या चढाओढीमुळें उपस्थित झालेल्या हट्टी प्रसंगांत त्याचा बहुतेक किंवा पूर्ण निःशंकपणें बळी देण्यांत आला! प्रधानमंडळानें तर त्याला कधींच परतही बोलावून घेतलें असतें; त्यानें केलेल्या गुन्ह्यांच्या कृत्यांबद्दल त्याची चौकशी करण्याची त्यांनीं परवानगी दिली; आणि आपल्या प्रतिपक्षाच्या गळ्यांत अडकून कायद्याचा दीर्घ-सूत्रीपणा, बड्या लोकांच्या सभेपुढें सतत सात वर्षेपर्यंत चालू राहिलेल्या चौकशींतील प्रचारांतून गेलेले शिष्टाचार, आणि विश्वास न बसण्यासारखी चालढकल, यांच्या तोंडीं देऊन त्यांनीं त्याला रसातळाची वाट दाखविली! वारन हेस्टिंग्स ह्याची कारकीर्द, त्यानें आपल्या देशा-करितां बजावलेल्या कामगिरीचें महत्त्व, आणि त्याच्या बदल्यांत त्याच्या पदरीं पडलेला अन्याय, ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून इंग्लिश लोकांनीं आतांपर्यंत या बाबतींत पुष्कळच व्यापक तत्त्वा-वर आपलें मत बनविलें असेल; आणि ज्या वेळीं तो नंदकुमार अगर फ्रान्सिस यांच्यासारख्या खोड्या व खुनशी तोहमतदारांशीं दोन हात करून त्यांना दूर ठेवीत होता, अगर हैदर अल्ली व मराठामंडळ यां-सारख्या भारी शत्रूंच्या विरुद्ध — परिस्थिति अत्यंत अडचणीची असूनही — लढत होता, त्या वेळीं त्याच्यावर अविचारानें आणण्यांत आलेल्या किटाळांची पुन्हां छाननी केल्यानें त्यांत फारसा बदलही होणार नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वारन हेस्टिंग्स ह्यानें युरोपांत मिळविलेल्या लौकिकाचा विलक्षण पुरावा ह्मणून येथें इतकें लिहितां येईल कीं, इ. सन १७८५ सालीं, ह्मणजे जेव्हां वारन हेस्टिंग्स हा नुकताच बंगालमधून जात होता, त्या वेळीं, लंडन येथील फ्रान्सच्या वकिलानें, "हिंदी सैन्य आणि फ्रेंचांचें पाठबळ, या साधनांनीं वारन हेस्टिंग्स याला हिंदुस्थानांतील स्वतंत्र राज्य-कर्ता होण्याला गुप्तपणें उत्तेजन द्यावें," असें एक कल्पनेचें कारस्थान

आपल्या सरकाराला सुचविलें होतें. अमेरिकेंत वसाहतवाल्यांच्या बंडास फ्रान्सनें दिलेली चिथावणी यशस्वी झाली, ही गोष्ट उघड उघड त्या वकिलाच्या मनांत घोळत होती; आणि त्यामुळेंच – ज्या मनुष्याची हिंदुस्थानांत जवळ जवळ एखाद्या राज्यकर्त्याप्रमाणें हुकमत आहे, ज्याला अपमान करून परत बोलवण्यांत आलेलें आहे, आणि ज्याला दोषी ठरवून चौकशी करण्याचीही भीति घालण्यांत आलेली आहे, तो वारन हेस्टिंग्स असें सल्लोख्याचें बोलणें सहज मनावर घेईल, – असें त्यानें पूर्ण खात्रीनें प्रतिपादन केलें. परंतु त्यानें पुढें मांडलेली ही मोठ्या शहाणपणाची कृति फ्रेंच प्रधानानें साफ फेंटाळून दिल्यामुळें त्याची अत्यंत निराशा झाली[1].

---

१. टेन इयर्स आमां इन पांस, हें मार्क्विस दो ब्यारल मॅटफेरट कृत फ्रेंच पुस्तक (इ. सन १८९४) पान ५१–५२. पहा.



लिथो.- मनोबोधक चित्रकला कंपनी प्रेस. नगरस्ट्रीट रास्ताडी पुणें.   प्रिंटर.- गणेश रामचंद्र गुर्जर, रास्ताडी.   पब्लिशर.- ... बाळकृष्ण काळकरे. शुक्रवार ...

भाग बारावा.

वारन हेस्टिंग्स व लार्ड कार्नवालिस यांच्या दरम्यानचा काळ.

(इ. सन १७८५–१७८६)

परिच्छेद पहिला–हिंदुस्थानांतील तत्कालीन राजकीय स्थिति.

(इ. सन १७८५.)

सर जेम्स मॅकिंटॉश यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, एका पिढीच्या कालावधींत इंग्लंड्नें पश्चिमेकडील आपल्या हातांतील एक राष्ट्र गमाविलें, आणि पूर्वेकडे दुसरें मिळविलें. परंतु ह्या बाबतींत आणखी असेंही ह्मणतां येईल कीं, फक्त नुकसानच नव्हे, पण नुकसानीचा वचपाही भरून मिळवून दिल्याबद्दल इंग्लंड फ्रान्सच्या राजनीतीचें ऋणी आहे. ज्याप्रमाणें चिकाटीच्या धडपडींत एखाद्या मनुष्याच्या दंडावर सारख्या लागोपाठ दिलेल्या ठोश्यांनीं त्याला आपल्या पकडींत असलेल्या प्रतिस्पर्ध्याला सोडून देणें भाग पडतें, त्याचप्रमाणें या वेळीं शेवटास आलेल्या पुष्कळ दिवसांच्या लढाईंत फ्रेंचांच्या आरमारानें इंग्लंडचा उत्तर अमेरिकेंतील वसाहतींवरील अंमल उधळून लाविला. परंतु अमेरिकेला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां इंग्लंडबरोबर लढण्यांत केलेल्या जिवापाड खटपटीनें फ्रान्सनें आपल्या स्वतःलाही इतकें कमजोर करून घेतलें कीं, त्या वेळेपासून आशियामध्यें इंग्लंडच्या आड येण्याला अगर समुद्रांत त्यांनीं

चालविलेली स्पर्धा पुढें चालू ठेवण्याला त्यांच्यांत अवसान राहिलें नाहीं. इ. सन १७८३ पासून हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या कारभारास एक प्रकारची विश्रांति मिळण्यास सुरवात झाली होती, आणि तिचा भंग – हिंदुस्थानांत म्हैसूरच्या राजगादीबरोबर आपली शक्ति अजमावून पाहण्याकरितां केलेली सलामी, व इंग्लंडमध्यें हिंदुस्थानच्या प्रश्नावर दोन पक्षांमध्यें चाललेला कडाक्याचा वादविवाद, – यांनींच फक्त झालेला होता. फ्रान्सच्या दरबारीं असलेल्या इंग्लंडच्या परराष्ट्रीय वकिलाच्या खलित्यावरून असें समजतें कीं, फ्रेंच सरकार पुन्हांही हिंदुस्थानांत ढवळाढवळ करण्याला योग्य संधीची वाट पहात होतें. परंतु त्यांच्या अंतःस्थ घोटाळ्यामुळें त्यांचें परदेशीय राजकारण लुलें पडण्याचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं होतीं. या कारणामुळें इंग्लंडचा फ्रान्सबरोबर थोड्या मुदतीचा झालेला तह दहा वर्षेंपर्यंत टिकला, आणि त्यामुळें इंग्लंडला हिंदुस्थानांत पुष्कळ फायदे झाले. कारण, त्यानंतर अठराव्या शतकाच्या शेवटच्या दहा वर्षांत युरोपमध्यें एक नवें आणि इतकें जोराचें तुफान झालें कीं, त्याच्या लाटा हिंदुस्थानावर येऊन आदळल्या, आणि त्यांनीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार होण्याच्या रस्त्यांत शिल्लक राहिलेले बरेचसे अडथळे पार जमिनदोस्त करून टाकिले.

जर आपण इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील राजसत्तेच्या प्रसाराची मोजदाद त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाच्या वाढीच्या प्रमाणावरून केली, तर क्लाइव्ह यानें बंगालची दिवाणी पत्करली, तो काळ (१७६५), आणि इ. सन १७८५ मध्यें वारन हेस्टिंग्स यानें हिंदुस्थानांतून स्वदेशीं प्रयाण केलें, तो काळ, यांच्या दरम्यानच्या वीस वर्षांच्या अवधींत त्यांच्या सत्तेची वाढ झाली नाहीं, असें म्हणतां येईल. तथापि हें खरें आहे कीं, इ. सन १७७५ मध्यें औधच्या वजिरापासून इंग्लिशांनीं बंगालच्या वायव्येकडील काशी व गाझीपूर हे दोन प्रांत -- ह्या व्यवहारामुळें इंग्लिशांचा त्या प्रांतांवर निव्वळ ताबा मात्र नोंदला गेला, कारण, हे प्रांत

पुष्कळ वर्षांपासूनच इंग्लिशांच्या राजकीय नियंत्रणाखालीं आलेले होते, — आणि विस्तारानें जरी लहान, तरी मुंबई जवळील अत्यंत महत्त्वाचीं, वसई व साष्टी हीं दोन ठाणीं त्यांनीं मिळविलीं होतीं. परंतु हेस्टिंग्सच्या गव्हर्नर जनरल या नात्याच्या कारकीर्दींत राज्यविस्तार करणें तर लांबच राहिलें, पण प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या प्रदेशाचीही भयंकर ओढाताण झालेली होती. इंग्लिशांच्या ताब्यांतील प्रदेशावर स्वाऱ्या करण्यांत आल्या होत्या, त्यांच्या सैन्याला कांहीं ठिकाणीं माघार घ्यावी लागली होती, आणि त्यांच्या ताब्यांतील एका इलाख्याची राजधानी असलेलें मद्रास हें शहर फार धोक्यांत आलें होतें. आणि वास्तविक ह्मणावयाचें ह्मणजे हिंदुस्थानांत इंग्लिशांचें वर्चस्व त्या वेळीं कोणत्याही प्रकारें निर्विवाद रीतीनें प्रस्थापित झालेलें नव्हतें. कारण, गेल्या अर्ध शतकांतील अंदाधुंदीमधून त्या वेळीं डोकीं वर काढूं लागणाऱ्या सत्ताधाऱ्यांमध्यें आपण अधिक बळकट आहोंत, ही गोष्ट जरी इंग्लिश लोक निदर्शनास आणून देत होते, तरीही त्यांना आपला उत्कर्ष सहन न होणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर अजून सामना द्यावा लागत असून त्यांचें राज्यही इतरांच्या मानानें मोठें नव्हतें. तथापि इंग्लिश राष्ट्राच्या अंगावर येऊन पडलेल्या ह्या युद्धापासून दोन गोष्टी सिद्ध झाल्या. त्यांपैकीं पहिली गोष्ट ह्मणजे ही कीं, युरोपमधील सगळ्या आरमारी सत्ता एकत्र झाल्या, तरीही त्यांना इंग्लंडला समुद्रांतून हांकलून देववलें नाहीं, अगर युरोप आणि आशिया यांमधील दळणवळणाच्या समुद्रावरील लांबीच्या पल्ल्याच्या मार्गावर असलेली इंग्लंडची सत्ताही त्यांच्याच्यानें हिसकावून घेववली नाहीं. आणि दुसरी ह्मणजे ही कीं, जोंपर्यंत इंग्लिशांचें समुद्रा-वरून आपल्या मातृभूमीबरोबर असलेलें दळणवळण कायम राखणें शक्य होतें, आणि जोंपर्यंत त्यांच्या ताब्यांत असलेल्या बंगालसारख्या बिनमोल प्रांताला कोणत्याही प्रकारें धक्का लागलेला नव्हता, तोंपर्यंत इंग्लिशांना मराठे अगर म्हैसूरकर यांच्यापासून कायमचें अगर वर्मी नुकसान होण्याची कोणत्याही प्रकारें भीति बाळगण्याचें कारण नव्हतें.

मध्य व दक्षिण हिंदुस्थानांतील ह्या दोन प्रबळ लढवय्या सत्ताधाऱ्यांना इंग्लिश सत्ता अजून सुद्धां निःसंशय वचकून असे, आणि इंग्लिशांशीं शत्रुत्व बाळगणारें एखादें अत्यंत लष्करी पेशाचें राज्य जर त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत स्थापन झालें असतें, तर इंग्लिशांची स्थिति कांहींशी धोक्याची होण्याइतकें म्हैसूरकर व मराठे यांनीं त्यांचें सैन्य गुंतविलें असतें. शिवाय वायव्येकडील विस्तृत व सधन असलेला सपाट प्रदेश हें अत्यंत मोठ्या व बलिष्ठ अशा लष्करी राजगाद्यांचें आजपर्यंतचें नेहमींचेंच निवासस्थान असून जन्मस्थानही असल्यानें ही गोष्ट सहज घडूनही आली असती. परंतु हिंदुस्थानांत इंग्लिशांना त्यांच्या नेहमींच्या पाठीराख्या असलेल्या सुदैवानें असा योगायोग जुळवून आणला कीं, अठरावें शतक संपण्याच्या सुमारास, ह्मणजे जेव्हां मराठे आणि ह्मैसूरकर हीं दोन्हीही राजघराणीं बलिष्ठ आणि भीतिदायक होतीं, त्या वेळीं, इंग्लिशांना त्यांच्या वायव्येकडील सरहद्दीपलीकडून फारच थोडी अगर मुळींही भीति बाळण्याचें कारण नव्हतें. नष्ट ऐश्वर्याच्या अवशिष्ट वैभवामध्यें मोंगली बादशाहीचें मागें राहिलेलें भूत अभिषिक्त होऊन दिल्ली येथील राजतख्तावर वावरत होतें. आणि जरी बादशाही सत्ता नामशेष झाली, तरीही त्या बड्या घराची पडच्छाया भोंवतालच्या प्रदेशांवर इतकी दाट पसरलेली होती कीं, त्यांचा नव्या राज्यांत अंतर्भाव होण्याला त्या प्रतिबिंबानें अडथळा आणला होता.

तथापि मोंगल राष्ट्राचे कायमचे तुकडे होण्यानें आणि अफगाण लोकांच्या परत जाण्यानें थंडावलेलें राजकीय वातावरण—शीख लोकांचा झपाट्यानें झालेला उदय आणि त्यांची एकवटलेली घटना, यांमुळें—पंजाबमध्यें अगोदरपासूनच क्षुब्ध होत चाललें होतें. ह्या नवीन हिंदू जुटींत वंशसंबंध आणि सामान्य धर्मसमजुती ह्या दोहोंचीं बंधनें मराठ्यांहूनही अधिक घट्ट असल्यामुळें हिंदु लोकांनीं त्या वेळेपर्यंत कधींही न दाखविलेलें लष्करी तेज आणि जाज्वल्य उत्साह, यांनीं त्यांच्यांत संचार केला होता. शीख लोकांचा इतिहास हें आशियामध्यें प्रसिद्ध असलेल्या एका तत्त्वाचें उदा-

हरण आहे. तें तत्त्व म्हणजे हें होय कीं, आशियामध्यें जर एखाद्या बंडाच्या चळवळीनें धार्मिक स्वरूपाचा बुरखा घेतला, तर ती चळवळ नेहमीं विशेष धोक्याची होते; आणि जर धर्मगुरूच्या धुरीणत्वाखालीं धर्मवेड दबून व सांचून राहिलेलें असलें, तर अखेरीस राजकीय वातावरणामध्यें त्याचा एकदम सुरुंगाच्या दारूसारखा जोरानें धडाका उडाल्याशिवाय रहात नाहीं. शीख लोकांच्या आद्य गुरूनें धर्माकरितां केलेला प्राणत्याग आणि शेवटल्या मोंगल बादशहांनीं त्यांचा केलेला छळ, ह्यांमुळें या कणखर शेतकऱ्यांमध्यें इस्लामी धर्माविषयीं कट्टा द्वेष उत्पन्न झालेला होता. इ. सन १७६१ मध्यें अहमदशहा अबदल्लीच्या अफगाण सैन्यानें त्यांची धूळधाण करून भयंकर कत्तल उडविली होती; आणि त्यांना दाबून रानोमाळ भटकावयासही भाग पडलें होतें. परंतु इ. सन १७६२ मध्यें त्यांनीं सरहिंद येथील अहमदशहाच्या सुभेदाराचा पराभव केला आणि त्यास ठार मारलें. त्यानंतर इ. सन १७६४ मध्यें कंदाहार येथें झालेल्या बंडामुळें अहमदशहाला आपल्या पश्चिमेकडील प्रदेशांत परत जाणें भाग पडलें. तो इ. सन १७७३ मध्यें मृत्यु पावला. त्याच्यामागून गादीवर आलेल्या राज्यकर्त्यांचा पंजाबवरील ताबा ढिला पडला, आणि शीख लोकांची जूट घट्ट व अधिक जोरदार झाली. शीख लोकांचे पुष्कळ पोट विभाग होते; त्या प्रत्येकाला "मिसल" म्हणजे लष्करी संघ असें म्हणत; हे संघ एकेका सरदाराच्या धुरीणत्वाखालीं असून ते सरदार आपापसांत आणि मुसलमानांबरोबरही लढाया करीत. अशा स्थितींतच इ. सन १७८५च्या सुमारापर्यंत शीख लोक पंजाबच्या मध्यभागीं झेलम आणि सतलज ह्या दोन नद्यांमधील सर्व मुलखाचे धनी झाले, दिल्लीच्या आसपासच्या सर्व मुसलमान राजेरजवाड्यांना त्यांनीं शह दिला, आणि पूर्वेकडे गंगा नदीच्या पलीकडे रोहिलखंडांत लूट मिळविण्याकरितां त्यांनीं मोहिमाही केल्या.

बंगालमधील इंग्लिश लोकांना उत्तर हिंदुस्थानांत हिंदु राष्ट्रीयत्वाचें झालेलें हें पुनरुज्जीवन अत्यंत फायदेशीर आणि प्रसंगास अनुकूल असेंच होतें. कारण, मुख्यतः त्यांच्या वाढत्या उत्कर्षाला महत्त्वाचा अडथळा करण्यासारखें फक्त एकच वास्तविक मुख्य संकट हल्लींप्रमाणेंच त्या काळींही मध्य आशियांतील लढाऊ टोळ्यांच्या मुख्य नायकाच्या धुरीणत्वाखालील एखाद्या प्रतिस्पर्धी सत्तेच्या सैन्याकडून परदेशामधून होणाऱ्या स्वाऱ्यांच्या शक्याशक्यतेवरच अवलंबून होतें. परंतु हिंदु धर्मामध्यें सामान्यतः दिसून येणाऱ्या शांतताप्रिय स्वभावामध्यें न आढळणाऱ्या तेजानें जे शीख लोक आपला धर्म आणि आपला देश यांचें संरक्षण करण्याकरितां एकत्र झालेले होते, त्यांच्या जबरदस्त चिकाटीनें केलेल्या प्रतिकाराला तोंड दिल्याशिवाय आशियांतील अशा प्रकारच्या कोणत्याही सैन्याला पंजाबची सरहद्द ओलांडून आंत घुसणें ही गोष्ट ते शीख लोक अशक्य करीत चालले होते. अहमदशहानें स्थापन केलेलें राज्य अफगाणिस्थानच्या पर्वतां तील त्याच्या किल्ल्यापासून पश्चिमेकडे खोरासानपर्यंत आणि पूर्वेकडे उत्तर पंजाबच्या वरपर्यंत पसरलेलें होतें. ह्याप्रमाणें इराणच्या सरहद्दीवरील एक प्रांत आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील दुसरा प्रांत हिसकावून घेऊन ह्या राज्याची उभारणी करण्यांत आलेली होती; आणि ह्या अफगाण राज्यकर्त्यासंबंधीं दोन्हीही प्रदेशांत अत्यंत तिरस्कार असल्यामुळें जेव्हां तो आपल्या प्रदेशाच्या एका कडेला स्वारी अगर बंड झाल्यामुळें गुंतलेला असे, तेव्हां दुसऱ्या कडेला असलेले त्याचे शत्रु या संधीचा फायदा घेतल्याशिवाय कधींही रहात नसत. प्रत्यक्ष अहमदशहाला सुद्धां अशा स्थितींत अत्यंत परिश्रमानेंच टिकाव धरवला. परंतु त्याच्या मृत्यूनंतर ही स्थिति टिकणें अगदींच दुरापास्त झालें, आणि त्यानंतर वीस वर्षांनीं तर अफगाणिस्थानचा अतिशय कर्तृत्ववान असलेला राज्यकर्ता झेमनशहा यालाही लाहोरहून परत जाणें भाग पडलें. मुसलमान लोकांनीं सतत सातशें वर्षेंपर्यंत हिंदुस्थानच्या सपाट प्रदेशावर उत्तरेकडून मोहिमा केल्या,

हिंदुस्थानांत आपलीं घराणीं स्थापन केलीं, आणि पर्वतापलीकडील स्वदेशामधून नेहमीं ताज्या दमाचे लोक आणून तीं कायम राखिलीं. परंतु या यशस्वी लढवय्यांकडून झालेल्या धाडींच्या परंपरेंतील ही निष्फळ झालेली स्वारी शेवटचीच होय. त्या वेळेपासून शीख लोक हे नवीन स्वाऱ्या करणारांविरुद्ध सिंधुनदाचा किनाराच फक्त आपल्या ताब्यांत ठेवण्याला समर्थ होते, इतकेंच नाहीं, तर ह्या आपण होऊन चालून जाऊन इतरांच्या कारभारांत हात घालणाऱ्या हिंदू लोकांनीं सतलज नदीच्या दक्षिणेकडील मुसलमानी राजसत्तांचे मध्य आशियांतून येणाऱ्या कुमकेचे मार्गही अडवून टाकले होते, आणि त्यांच्या उत्तरेकडील सरहद्दीवर या लोकांपासून त्यांना नेहमीं भीतिही बाळगावी लागत होती. ह्याचा परिणाम असा झाला कीं, उत्तर हिंदुस्थानांतील लढवय्या सत्तांचें पारडें समतोल राहिलें; आणि ज्या वेळीं इंग्लिश लोक म्हैसूरकर व मराठे यांच्याबरोबरील खटपटींत पूर्ण गुंतलेले होते, त्या आणिबाणीच्या वेळीं, ह्मणजे अठराव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांत, त्यांच्या वायव्येकडील सरहद्दीचें निर्वेध रीतीनें संरक्षण झाल्यामुळें त्यांना तर तो समतोलपणा विशेषच फायदेशीर झाला. हेस्टिंग्स यानें उभी केलेली औधची आडकाठी ही जरी मराठ्यांच्या लुटारू टोळ्यांना दाबांत ठेवण्यास पूर्ण उपयोगी पडली, तरीही मध्य आशियांतील अधिक कणखर शत्रूंच्या हल्ल्यांना अटकविण्याला तिचा फारसा उपयोग झाला नसता; परंतु शीख लोकांच्या कट्ट्या शत्रुत्वानें परदेशीय मुसलमानांना हिंदुस्थानच्या बाहेरच ठेविलें, आणि दिल्ली व लाहोर येथील जुन्या नष्ट झालेल्या तख्तावर एखादें नवें मुसलमान राजघराणें स्थापन होण्यालाही त्या कट्ट्या शत्रुत्वानेंच अटकाव केला. एकुणिसाव्या शतकाच्या पहिल्या पहिल्या वर्षांत, ह्मणजे रणजितसिंहाच्या धुरीणत्वाखालीं शीख लोकांची सत्ता दृढ झाली, त्या सुमारास, इंग्लिश लोकांनीं आपल्या दक्षिणेकडील प्रतिस्पर्ध्यांबरोबर दोन हात करून त्यांना पराजित केलें होतें, आणि या वेळीं त्यांच्यावरील, बाजूंना अगर पिछाडीकडे, विशेष

निकडीनें वळावें लागेल, ही भीतिही नाहींशी झालेली असल्या कारणानें त्यांना आपल्या सैन्याचा मोर्चा उत्तरेकडे फिरवितां आला.

शीख लोकांची सत्ता सतलज नदीच्या दोन्ही बाजूंस असल्यामुळें ती शिंद्याच्या धुरीणत्वाखालीं उत्तरेकडे रेटीत चाललेल्या मराठ्यांकडून होणाऱ्या अतिक्रमणास आळा घालण्यालाही या वेळीं फार उपयोगीं पडली. हा महत्त्वाकांक्षी आणि कर्तृत्ववान मराठा सरदार उत्तरेकडील प्रांतामध्यें आपलें स्वतःचें स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या इच्छेनें प्रयत्न करीत होता; दिल्ली येथें बादशाही अधिकाराची सूत्रें आपल्या हातीं मिळविण्याकरितां जे पक्ष झगडत होते, त्यांपैकीं एकाला त्यानें आपला पाठिंबा दिला होता; आणि इ. सन १७८५ मध्यें मोंगल राष्ट्राचा प्रतिनिधि या नात्यानें आपली नेमणूक व्हावी, ह्मणून स्वतःच्या मोठ्या सैन्यानिशीं दिल्लीवर चाल करून जाऊन त्यानें आपला फायदाही करून घेतला होता. बादशहाच्या वडिल मुलानें मदत करण्याबद्दल इंग्लिशांना विनंति केली होती, आणि हेस्टिंग्स यास, हिंदुस्थान सोडून जाण्यापूर्वीं थोड्याशा अगोदर, दिल्ली येथें मोंगल बादशहाला पुन्हां आपल्या पायावर उभें करावें, व त्याच्या दरबारांत इंग्लिशांचें वजन सर्वांत जास्त पाडावें, ह्मणून मोहीम पाठविण्याचा मोह उत्पन्न झाला होता; परंतु ह्या नवीन दिशेनें मराठ्यांनीं डोळ्यांत भरण्यासारख्या रीतीनें बळकविलेल्या सत्तेमुळें इंग्लिश कंपनीला जरी भीति उत्पन्न झाली, तरीही शिंद्याच्या ह्या छातीठोक कृत्याला अटकाव करण्याचें त्यांना अजूनही धाडस होईना; त्यामुळें युरोपस्थ राष्ट्राच्या नियंत्रणाखालीं मरणोन्मुख स्थितींत असलेल्या मोंगल बादशाहीला पुन्हां सजीव करण्याचा बेत—जो डुप्ले, बुशी, व क्लाइव्ह यांच्या नजरेखालूनही गेलेला होता, तो बेत—अव्यवहार्य ह्मणून हेस्टिंग्स यानें नाखुषीनें पुन्हां एकदा रहित केला. तथापि वास्तविक पाहतां दिल्लीवर स्वारी करण्याची वेळ अजून आली नव्हती. कारण, पुढें वीस वर्षांनंतर लार्ड वेलस्ली याच्या हुकमतीखालीं दिल्लीवर स्वारी आणि

मराठयांची तेथून हकालपट्टी, या दोन्हीही गोष्टी खरोखरीच घडवून आणण्यांत आल्या आहेत. मध्यंतरीं हेस्टिंग्स गेल्यानंतर शिंदे यानें आग्रा व दिल्ली हीं दोन्हीही शहरें आपल्या हस्तगत करुन घेतलीं, आणि त्याला इतका आत्मविश्वास उत्पन्न झाला कीं, बंगालच्या बादशाही प्रदेशाची राज्यव्यवस्था हातीं ठेविल्याबद्दल त्यानें कंपनी सरकाराकडे खंडणी देण्याबद्दल बादशहाच्या नांवानें मागणीही केली होती.

या कारणांमुळें इ. सन १७८६ सालीं, ह्मणजे जेव्हां लार्ड कार्नवालिस हा हिंदुस्थानांत येऊन पोहोंचला, त्या वेळीं, इंग्लिश लोक हे अजूनही मराठयांबरोबर पश्चिमेकडे व वायव्येकडे, आणि हैसूरचा राज्यकर्ता टिपु सुलतान याचेबरोबर दक्षिणेकडे, सामना देत असून इंग्लिशांच्या विरुद्ध लष्करी अगर राजकीय क्षेत्रांत या दोन सत्तांशिवाय इतर कोणीही महत्त्वाचा प्रतिस्पर्धी नाहीं, असें त्यांस आढळून आलें.

परिच्छेद दुसरा–पार्लमेंटमधील हिंदुस्थानच्या कामकाजासंबंधींची चौकशी.

हिंदुस्थानामध्यें पहिल्यानें युरोपियन राष्ट्राचे महत्त्वाचे हितसंबंध उत्पन्न झाले, त्या वेळेपासून हिंदुस्थानांत घडणाऱ्या गोष्टींचा ओघ हळुहळू युरोपांतील राजकारणाच्या कक्षेखालीं अधिक अधिक प्रमाणानें कसकसा येत गेला, हें आपण पूर्वी वाचलेलेंच आहे. आशियामधील कमकुवत राज्यांचा मोठ्या आणि अधिक चळवळ्या राज्यसंस्थांकडे ओढा लागला. पश्चिमेकडील लढायांनीं पूर्वेकडील युद्धांना चेतना दिली. आणि हत्यारांच्या खणखण नादाचा प्रतिध्वनि एका खंडांतून दुसऱ्या खंडांत येऊन आदळला. मागें सांगितल्याप्रमाणें या कलहाचा शेवटीं परिणाम असा झाला कीं, ग्रेट ब्रिटनचें वर्चस्व हिंदुस्थानांतील इतर युरोपियन राष्ट्रांच्या मानानें हिंदुस्थानावर या वेळीं निर्विवादपणें स्थापिलें गेलें; नंतर जसजसें इंग्लंडचें राष्ट्र आणि त्याच्या ताब्यांतील हा मोठा

प्रदेश यांमधील संबंध अधिक अधिक निकट होत गेला, एकमेकांशीं संबंध येण्याचीं कारणें जसजशीं वाढत गेलीं, आणि मिळविलेल्या सोन्यासारख्या मुलखाची किंमत इंग्लंडला ज्या वेळीं कळून आली, त्या वेळेपासून राष्ट्रीय हक्क आणि कर्तव्यें यांची ओळख इंग्लिशांना जास्त स्पष्ट असल्यामुळें इंग्लंडच्या खास राजकारणाच्या ओघामध्यें हिंदुस्थानचा राज्यकारभार एकजीव होऊन गेला. परदेशाशीं चालणाऱ्या लढायांचाच फक्त नव्हे, पण इंग्लंडच्या पार्लमेंटांतील पक्षांमध्यें चाललेल्या भांडणाचाही हिंदुस्थानावर नुकताच परिणाम झालेला होता. इ. सन १७८०मध्यें लोकप्रतिनिधींच्या सभेपुढें लार्ड नार्थ यानें, " कायद्यानें ठरलेल्या तीन वर्षांच्या मुदतीची कंपनीची सनद रद्द करण्याचा इरादा असल्याची कंपनीला सूचना देण्याबद्दल हुकूम व्हावा," असा ठराव आणला. त्यावर फॉक्स यानें, " अमेरिका हातची घालविलीत, तरीही तुमचें अजून समाधान होत नाहीं काय? " असें प्रधानाला विचारून, व बर्क यानें " खजिन्याची भर करण्याच्या पाठी मागें पुन्हां लागून अमेरिकेच्या मागून हिंदुस्थान हातचें घालवूं नका, " असें लोकप्रतिनिधि सभेला बजावून, ह्या ठरावाला शिकस्तीचा विरोध केला; तरीही तो मंजूर झाला. तथापि इ. सन १७८३ च्या सुमारास, ह्मणजे कंपनीला दिलेल्या सूचनेची मुदत संपण्याच्या सुमारास, त्या वेळीं प्रधान मंडळामध्यें असलेले हे दोन्हीही मोठाले वक्ते ज्या धोरणानें त्या प्रश्नाकडे पहात होते, त्यांत पुष्कळच फरक झालेला होता. युरोप आणि अमेरिका ह्या दोन्हीही खंडांमध्यें (इ. सन १७८३) झालेल्या तहामुळें इंग्लिश लोकांना दहा वर्षांनंतर दुसऱ्यांदा त्यांच्या ताब्यांतील लांबच्या पल्ल्यावर असलेल्या प्रदेशाची स्थिति आणि व्यवस्था यांत मन घालण्याला संधि मिळाली होती; व पश्चिमेकडील वसाहती हातांतून गेल्यामुळें झालेल्या नुकसानीनें पूर्वेकडील मिळविलेल्या नव्या राज्याविषयीं ते अधिक काळजी घेऊं लागले होते. आणि इंग्लंडनें हिंदुस्थानासारख्या विस्तृत देशांत साम्राज्य-

पद मिळविलें, याबद्दल आतां कांहींही संशय राहिला नव्हता. कारण, जरी गेल्या सात वर्षांतील लढाया आणि सदोदित चालणारे तंटे बखेडे यांमुळें हिंदुस्थानांतील इंग्लिशांची स्थिति तात्पुरती धोक्याची झाली होती, तरीही त्याचा विशेषतः हा परिणाम झाला कीं, त्यांच्यावर अत्यंत संकटें आलीं असूनही त्यांची स्थिति किती बळकट आहे, हें सिद्ध होऊन त्यामुळेंच त्यांचें वर्चस्वही डळमळीत होण्याच्या ऐवजीं तें उलट पूर्णपणें प्रस्थापित झालें. वारन हेस्टिंग्स यानें गव्हर्नर जनरल या नात्याचीं अधिकारसूत्रें सोडलीं, तेव्हां बंगालच्या स्थितीचें पर्यालोचन करतांना त्यानें असें लिहिलें आहे कीं:—“ हिंदुस्थानांतील प्रमुख सत्ताधाऱ्यांना—आमचे कट्टे शत्रु असलेल्या फ्रेंचांच्या मदतीनें, त्यांची एकत्र झालेली शक्ति आणि राजकारण हीं इंग्लिशांच्या पूर्वेकडील सत्तेच्या मजबूत इमारतीचा नाश करण्याला अगर तिच्या ताब्यांतील प्रदेशांपैकीं कोणताही भाग हिसकावून घेण्याला समर्थ झालीं नाहींत,––हें शेवटच्या लढाईनें चांगलेंच निदर्शनास आणून दिलें आहे. ”

कंपनीच्या हातीं आतां हिंदुस्थानचा धनीपणा आला आहे, व्यापारी मंडळी या नात्यानें पाहतां तिच्या हातीं वाजवीपेक्षां जास्त सत्ता आलेली आहे,—आणि खरोखर ती इतकी बलाढ्य कीं, इंग्लंडच्या घटनेखालीं तिला कांहींही नांव देतां येणार नाहीं, अशासारखी, इतकेंच नाहीं, तर इंग्लंडला भीतिही घालण्यासारखी ती झालेली आहे––अशी खात्री, हीच महत्त्वाची गोष्ट—बर्क यानें कंपनीच्या कामकाजाच्या सर्व पद्धतीवर मोठ्या आवेशानें जो ताशेरा झाडला, त्यास वजन आणि गति देण्यास–––कारणीभूत झाली. फॉक्स यानें पार्लमेंटमध्यें आणलेल्या एका मसुद्याअन्वयें कंपनीचे अधिकार पार्लमेंटांतील पंच मंडळाच्या हातीं जावयाचे होते; त्या बिलावरील आपल्या भाषणांत बर्क यानें, कंपनीच्या ताब्यांतील प्रदेशाचा विस्तार आणि त्यांच्या एकतंत्री जुलमी अमलाचें विस्तीर्ण क्षेत्र, या बाबतींचा विस्तारानें ऊहापोह केलेला आहे. तो

ह्मणतो:—“ अतिशय थोड्या आणि ह्या जमेस न धरतां येण्यासारख्या कांहीं मधील काळाशिवाय कंपनीच्या नांवाखालीं अगर कंपनीवर सर्वस्वी अवलंबून असलेल्या राजेरजवाडयांच्या नांवाखालीं इंग्लिश राज्य तार्तरी व हिंदुस्थान यांचे सरहद्दीवर असलेल्या हिमालय पर्वतापासून तों कन्याकुमारीपर्यंत, ह्मणजे एकवीस अक्षांश, पसरलेलें आहे....जर त्या ठिकाणीं ताब्यांत असलेला सर्व प्रदेश लक्षांत घेतला, तर तुलनेनें बहुतेक बरोबर उतरणारें उदाहरण ह्मणून मी जर्मनीच्या राष्ट्राशीं त्याची तुलना करीन. सध्यां पूर्णपणें आपल्या ताब्यांत असलेल्या प्रदेशाची तुलना आस्ट्रियाच्या राज्याबरोबर मला करतां येण्यासारखी आहे. आणि त्या तुलनेंत तें खात्रीनें कमी पडणार नाहीं....जरी ह्या प्रदेशाची व्याप्ति एवढी अफाट आहे, तरी तेथें असा एकही मनुष्य नाहीं कीं, जो हिंदुस्थानांत कंपनीच्या परवानगीशिवाय घांसभर अन्न सुद्धां तोंडांत घालतो.”[१] वर दिलेल्या ह्या वर्णनांत पुष्कळ अतिशयोक्ति आहे. आणि तुलनेनें सादृश्य दर्शविण्यासाठीं जर्मनीचें म्हणून दिलेलें उदाहरण तर साफ चुकीचेंच आहे. तथापि हीही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, एक शतकापेक्षां जास्त काळ पूर्वीं, प्लासीच्या लढाईपासून पंचवीस वर्षांच्या आंतच कंपनीनें सर्व हिंदुस्थानभर अगदीं पूर्णपणें वर्चस्व मिळविलें, असें मानण्यांत येत असे. शिवाय, बर्क यानें परिस्थितीचें केलेलें निरीक्षण प्राधान्यत: खरें नव्हतें, अशीही शंका घेण्याचें प्रयोजन नाहीं. कारण, सर्व एतद्देशीय सत्ता कमकुवत असल्याचें कळून चुकलें होतें; साम्राज्याच्या पायाची उभारणी मजबूत रीतीनें करण्यांत आलेली होती; आणि “ राज्यकारभाराकडे चांगलें अवधान, संरक्षणाच्या योग्य तजविजी, व आत्मसंयमन, त्याचप्रमाणें चांगली जोमदार आणि ठरीव राज्यव्यवस्था, व हिंदुस्थानांतील भरपूर नैसर्गिक साधनांचा व सोईंचा मुबलक उपयोग, यांशिवाय—इंग्लंडच्या वर्चस्वाखालीं हिंदुस्थानची प्रगति कायमच्या

१. ईस्ट इंडिया बिलावरील बर्क यांचें भाषण, डिसेंबर १७८३.

उच्च स्थितीस नेऊन तिला राष्ट्रीय भरभराटीच्या स्वरूपास पोंचविण्यास—— इतर कोणत्याही गोष्टीची बिलकुल जरूरी नाहीं," असें वारन हेस्टिंग्स यानें पूर्वी अनुमानही करून ठेविलेलें होतें; हें त्याचें अनुमान मागाहून घडून आलेल्या गोष्टींनीं पुढें लवकरच प्रचितीस आलेलें आहे.

कांहीं वर्षेपर्यंत लोकप्रतिनिधि सभेमधील पोटमंडळापुढें ईस्ट इंडिया कंपनीची घटना आणि काम करण्याची पद्धत यांबद्दल कसोशीनें तपास चाललेला होता; त्यावरून कंपनीच्या कामाकाजांत पुष्कळ सुधारणा करण्याची जरुरी आहे, व हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशावर अधिक देखरेख ठेवण्याची अवश्यकता आहे, असें सर्वानुमतें मान्य करण्यांत आलें. इ. सन १७८२ सालीं, ह्मणजे ज्या वेळीं जुने मोडून नवे राजकीय पक्ष नव्या पुढाऱ्यांच्या अनुशासनाखालीं पुन्हां निर्माण होत होते, प्रसिद्ध संयुक्त प्रधानमंडळाची घटना चाललेली होती, आणि परस्परविरुद्ध पक्षांमधील चुरशीचीं भांडणें परमावधीस पोंचलेलीं होतीं, त्या वेळीं, पोटमंडळांनीं सादर केलेलीं माहितीपत्रकें व सुचविलेले ठराव पुढें मांडण्यांत आले. ह्या ठरावांमध्यें कंपनीच्या सर्व अलीकडील व्यवस्थेचा जोरानें निषेध केलेला होता; कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाला वारन हेस्टिंग्स यास परत बोलावून घेण्याला भाग पाडण्यांत आलें होतें; आणि गव्हर्नर जनरल व त्याचे सल्लागार यांना देण्यांत आलेल्या अधिकारांचाही अधिक स्पष्टपणें खुलासा करावा, असें ध्वनित करण्यांत आलें होतें. जेव्हां संयुक्त प्रधानमंडळानें राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातांत घेतलीं, तेव्हां फॉक्स यानें कंपनीच्या सर्व राज्यकारभाराची घटना बदलणारा कायद्याचा एक मसुदा लोकप्रतिनिधि सभेपुढें आणिला; त्या मसुद्याला बर्क यानें, हेस्टिंग्स आणि कंपनी यांचे विरुद्ध रागाचा ताशेरा झाडणारें भाषण करून आणि त्यांच्यावर अत्यंत तिरस्करणीय जुलूम व लाचलुचपत यांबद्दल दोषारोप करून, दुजोरा दिला. कंपनीच्या कांहीं नौकरांनीं खरोखर पुष्कळच दुष्कृत्यें व घोडचुका केल्या

होत्या; परंतु हेस्टिंग्स हा अत्यंत उदार शीलाचा असून मोठा कर्तृत्ववान पुरुष होता. शिवाय तो लाचलुचपत न घेणारा कारभारी असून त्यानें आपल्या देशाची वाखाणणी करण्यासारखी पुष्कळच सेवा बजावलेली होती; तथापि त्याच्या प्रामाणिकपणाला अत्यंत कलंक लावणाऱ्या आणि त्याच्या सर्व सार्वजनिक कृत्यांना वाटेल तसें हिडिस स्वरूप देणाऱ्या भाषणांनीं जागा, बैठी वृत्ति, आणि सुखवस्तु नौकऱ्या, ह्यासारख्या क्षुद्र भांडणामध्यें गुरफटलेल्या पक्षाभिमान्यांचा उगाच मनःक्षोभ करण्यांत आला. तरीही त्यांतल्या त्यांत ह्या ठिकाणीं इतकें मात्र विशेषतः ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, या पक्षकारांपैकीं एकावरही त्यांच्यांत असलेल्या धैर्याची व स्थैर्याची परीक्षा होण्याचा असा प्रसंग कधींही आलेला नव्हता, आणि फारच थोडे लोक अशा प्रकारच्या मायामोह पसाऱ्याच्या परिस्थितीला बळी न पडतां अलिप्त राहिले असते.

अशा रीतीनें अत्यंत जोराचा प्रतिकार असतांनाही हीं माहितीपत्रकें आणि ठराव यांचा पार्लमेंटमधून हा मसुदा मंजूर करून घेण्याला पक्षभेदाची भट्टी चेतविण्यास सर्पणाप्रमाणें उपयोग करण्यांत आला. तथापि लोकप्रतिनिधि सभेपुढें आणि राष्ट्रापुढें मुख्य प्रश्न कंपनी आणि तिचे अधिकारी यांनीं बहुतेक अविश्वसनीय अशीं दोष ठेवण्यासारखीं अनन्वित कृत्यें खरोखर केलीं आहेत कीं काय, हा नसून, ज्या मुत्सद्द्यांनीं एकमेकांनीं अंगीकारिलेलीं मतें आणि अमलांत आणलेले कायदे यांबद्दल मोठ्या जोरानें निषेध प्रदर्शित केला, व इंग्लिश राष्ट्राचें सुकाणू हातीं येण्याकरितां एक दूषणार्ह संयुक्त प्रधानमंडळ तयार केलें, त्यांचे हातीं हिंदुस्थानांतील मोठमोठ्या जागांच्या नेमणुका जाव्या कीं काय, हा होता. या मुद्द्यासंबंधीं राजा आणि त्याच्या पक्षाच्या अर्ध्या अधिक लोकांचें मत लार्ड नार्थ यानें फॉक्स आणि बर्क यांची मदत घेऊन ड्यूक आफ पोर्टलंडच्या प्रमुखत्वाखालीं उभारलेल्या प्रधानमंडळाच्या विरुद्ध होतें. त्यामुळें याचा परिणाम असा

झाला कीं, इ. सन १७८३–८४ सालीं पार्लमेंटच्या निवडणुकीसाठीं झालेल्या मोहिमेंतील निकराच्या प्रसिद्ध चढाओढींत " हिंदुस्थान " हाच मुख्य व निर्णायक विषय होऊन बसला. त्यांत फॉक्स व बर्क यांचा पराभव होऊन ते अधिकारच्युत झाले. " ईस्ट इंडिया बिल " नामंजूर झालें. आणि राजा तिसरा जार्ज व प्रधानकीच्या जागेवर लागलीच सत्तेच्या शिखरास जाऊन पोंचलेला पिट्ट यांनीं हें संयुक्त प्रधान मंडळ मोडून टाकिलें. इ. सन १७८४ मध्यें पिट्ट यानें पार्लमेंटमध्यें एक कायदा मंजूर करून घेतला; त्या अन्वयें राजानें नेमिलेल्या सहा कमिशनरांना कंपनीच्या दिवाणी, लष्करी आणि मुलकी कामकाजावर पूर्ण देखरेख ठेवण्याचा अधिकार देण्यांत आला. हिंदुस्थानचीं मुख्य राज्यसूत्रें गव्हर्नर जनरल आणि त्याचे तीन कौन्सिलर यांच्या हातांत ठेवण्यांत आलीं; आणि त्यांना लहान इलाख्यांवर राज्य चालविण्याचे सर्व प्रश्न, तह, लढाई, आणि वसुलीची योजना, इत्यादि बाबतींत पूर्ण अधिकार देण्यांत आला. त्यानंतर इ. सन १७८६ च्या कायद्यानें गव्हर्नर जनरल यास विशेष बाबतींत कौन्सिलरच्या संमतीशिवायही स्वतःच्या जबाबदारीवर वागण्याचा अधिकार देण्यांत आला.

पार्लमेंटला जबाबदार असलेल्या एका प्रधानाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालीं कंपनीकडून राज्यकारभार चालवविण्याची ही दुहाती पद्धत इ. सन १८५८ पर्यंत चालू होती; परंतु त्यानंतर इंग्लंडच्या राणीनें हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें प्रत्यक्ष आणि पूर्णपणें आपल्या हातांत घेतलीं. अशीच योजना घडवून आणण्याचा थोरल्या पिट्टचाही शंभर वर्षांपूर्वी विचार चालला होता. पिट्ट यानें मंजूर करून घेतलेल्या कायद्याचा तात्कालिक परिणाम असा झाला कीं, त्यामुळें हिंदुस्थानच्या राज्यकारभाररूपी यंत्रांत पुष्कळ आणि उघड उघड सुधारणा दिसून आली. ज्यामुळें वारन हेस्टिंग्सचा त्याचें कौन्सिल आणि त्याच्या ताब्यांतील दुय्यम सरकार यांचेबरोबर खटका उडत असे, तीं कारणें, ह्मणजे अव्यवस्थित

रीतीनें ठेवलेला दाब आणि अडथळे, या कायद्यानें नाहींसे झाले. त्यानें दाखविलेलीं सर्व व्यंगें नाहींशीं करण्यांत आलीं, आणि सुचविलेले उपायही योजण्यांत आले. या पूर्वींचे सर्व गव्हर्नर हे कंपनीचे नौकर असत. परंतु वारन हेस्टिंग्स हा कंपनीचा पहिला गव्हर्नर जनरल असून त्याला एका अडचणीच्या आणि अव्यवहार्य राज्यकारभाराच्या पद्धतीबद्दल विनाकारण भुर्दंड भरावा लागला होता; अधिकाराच्या विभागणीनें त्याची गति खुंटली होती; आणि कलकत्ता व लंडन येथील पक्षभेदाच्या भांडणानें त्याची ओढाताणही झालेली होती; परंतु त्या वेळेपासून हिंदुस्थानांत अंमलबजावणी करणाऱ्या मुख्य सत्तेची स्थिति आणि अधिकार यांची घटना अतिशय निराळ्या प्रकारानें करण्यांत आली, आणि ह्या नव्या यंत्राचा वाढता जोम झालेल्या परिणामांनीं लवकरच निदर्शनास आणला.

भाग तेरावा.

लार्ड कार्नवालिस ह्याची कारकीर्द.

(१७८६-१७९३).

परिच्छेद पहिला—हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलच्या अधिकाराची नवी व्याप्ति.

परंतु ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें सुरू केलेल्या राज्यकारभाराच्या नव्या पद्धतीच्या ह्या मूलतत्त्वांनीं सत्ता आणि जबाबदारी हींच फक्त साध्या आणि भरभक्कम पायावर उभारून अंमलबजावणीच्या खात्यांत जोम उत्पन्न केला, इतकेंच नाहीं, तर त्यामुळें इंग्लंडमधील प्रधानमंडळाबरोबर गव्हर्नर जनरल याचा राजकीय संबंधही अधिक निकट होत जाऊन त्याच्या सत्तेलाही पुष्कळच बळकटी आली. लार्ड कार्नवालिस हा पार्लमेंटनें हिंदुस्थानांत पाठविलेल्या गव्हर्नर जनरलांच्या नव्या घराण्यांतील पहिला गव्हर्नर जनरल असून, तो हिंदुस्थानांत आला, त्या वेळीं " तो राजकार्यधुरंधर आणि योद्धा आहे," अशी त्याची ख्याति होती; इंग्लंडमध्यें आजपर्यंत झालेल्या प्रधानमंडळांत अत्यंत जोरदार असलेल्या प्रधानमंडळाचें आपणास पाठबळ मिळेल, अशी त्याची पूर्ण खात्री होती. कायद्यानें स्थापन केलेल्या हुद्याला सर्व बाजूंनीं योग्य असे लष्करी आणि दिवाणी बाबतींत व्यवस्थित रीतीनें मर्यादित केलेले पूर्ण अधिकार त्याला देण्यांत आले होते. तो तिन्हीही इलाख्यांवरील — ह्मणजे मुंबई, मद्रास, व बंगाल, ह्या इलाख्यांवरील—गव्हर्नर जनरल ह्मणून हिंदु-

स्थानांत आलेला होता, आणि याशिवाय त्याला मुख्य सेनापतीचे अधिकारही देण्यांत आलेले होते. एकाच व्यक्तीमध्यें अशा प्रकारच्या सत्तेचें एकीकरण, त्याचा हुद्दा, त्याची कीर्ति, पिट्ट आणि डंडास यांचेबरोबर त्याचा असलेला स्नेह, हीं सर्व एकवटल्यामुळें होस्टिंग्स याला जे अडथळे आडवे आले होते, ते सर्व त्याच्यापुढें नाहींसे झाले, आणि हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या प्रतिनिधीच्या अंगावर अस्सल राज्यकर्त्याला साजेसा पेहराव अगदीं पाहिल्यानेंच चढविण्यांत आला. लार्ड कार्नवालिस याला दिलेल्या व्यापक अधिकाराच्या अंमलबजावणीच्या बाबतींत त्याला आशिया आणि युरोप यांमधील परिस्थितीची पुष्कळच मदत झाली. लार्ड नार्थ याच्या प्रमुखत्वाखालीं असलेल्या प्रधानमंडळाच्या कारकीर्दींत अपेशी आणि अव्यवस्थित रीतीनें चालविल्या गेलेल्या लढाया बंद झाल्या होत्या; आणि त्यांच्या समाप्तीनंतर इंग्लंडला पूर्वेकडे व पश्चिमेकडे शांततेचा काळ लाभला होता; परंतु हा काळ म्हणजे युरोपांत पुढें जोरानें कोसळलेल्या राज्यक्रांतीच्या जंगी तुफानाच्या पूर्वीच्या मेघमय शांततेचा काळ होय. तथापि इ. सन १७९३ पर्यंत त्याचा परिणाम हिंदुस्थानावर घडून आला नव्हता. थोडासा विसावा घेण्याला इंग्लंडला मिळालेला हा अवसर हिंदुस्थानामध्यें मोठमोठ्या अंतःस्थ सुधारणा घडवून आणण्याला, हिंदुस्थानांतील म्हैसूरच्या सर्वांत प्रबळ आणि कट्टया प्रतिस्पर्ध्याला तडाका देऊन आपला पाय मजबुत करण्याला, आणि दुसऱ्या एतद्देशीय सत्ताधाऱ्यांबरोबर शांततेचे व दोस्तीचे तह घडवून आणण्याची योजना करण्याला, अत्यंत अनुकूल होता; परंतु हे तह, राजकीय आकाश निरभ्र होतें, तोंपर्यंतच काय ते टिकले, आणि युरोपांतील त्या तुफानाची लाट हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर येऊन आदळते न आदळते, तोंच ते रद्द बातल होऊन गेले.

या कारणामुळें इ. सन १७८६ ह्या वर्षी हिंदुस्थानांत इंग्लिशांचें राज्य गव्हर्नर ज़नरल याच्या प्रमुखत्वाखालीं उघड उघड स्थापन झालेलें

असून ब्रिटिश राष्ट्राच्या प्रतिनिधींनीं त्याच्या हातीं पूर्ण सत्ता दिलेली होती, असें आपणांस आढळून येईल. एका सनदशीर व्यापारी मंडळाच्या गव्हर्नराच्या जागेवर राजसभेनें नेमिलेल्या गव्हर्नर जनरलची स्थापना करण्याचें कार्य वास्तविक रीत्या आतां पूर्णपणें झाल्यासारखेंच होतें, आणि लार्ड कार्नवालिस ह्यानें राज्यसूत्रें हातीं घेतल्यापासून झपाट्यानें सुधारणा होण्याचा काळ सुरू झालेला होता. बंगालमधील अव्यवस्थित राज्यपद्धतीचा बंदोबस्त पहिल्या प्रथम वारन हेस्टिंग्स यानें केला असून त्यानेंच अंमलबजावणीच्या बहुतेक सर्व खात्यांमध्यें नियमित आणि पद्धतशीर कामकाज करण्याचे मार्ग रेखाटून ठेविले होते. परंतु घरच्या भांडणांनीं आणि बाहेरच्या लढायांनीं त्याच्या राजकारभारामध्यें नेहमीं व्यत्यय येत असे. तथापि त्यानंतरच्या वेळेपासून राज्याची अंतर्व्यवस्था निर्विघ्नपणें एकसारखी चालू झाली; कायदे मंजूर करण्यांत येऊं लागले; आणि अनीतिही जोरानें दाबून टाकण्यांत आली. शिवाय बंगालमधील कायमच्या जमीनधाऱ्याची पद्धत हें लार्ड कार्नवालिस ह्याच्या कारकीर्दीतील एक अत्यंत महत्त्वाचें कृत्य असून त्यामुळेंच त्याच्या नांवाची अजूनही हिंदुस्थानांत आठवण होत आहे. बंगाल इलाख्याच्या कायदेशीर अधिकाराच्या मर्यादेंत त्या वेळीं येत असणाऱ्या प्रांतांतून जमिनीवरील कायम धाऱ्याची पद्धत ठरवितांना, इंग्लंडमधील जमीनभोगवट्याच्या पद्धतीचीच माहिती असलेल्या विशिष्ट मुत्सद्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचेंच त्यानें अनुकरण केलें. इंग्लंडमध्येंही या वेळीं जमीनदार वर्गाची भरती असलेली लोकप्रतिनिधि सभा आपल्या जमिनीच्या ठरीव किंमतीवर अशाच प्रकारच्या कायम जमीनधाऱ्याची पद्धत लागू करण्याचे प्रयत्न करीत होती. वर दर्शविलेल्या जमिनीवरील कायम धाऱ्याच्या कायद्यानें बंगालमध्यें पुढें लागवडीखालीं येणारी जमीन जरी पुष्कळच वाढली, आणि जरी त्या मानानें खंडाच्या उत्पन्नाचें मानही सारखें वाढत गेलें, तरीही त्यापासून ह्या कायद्यानें

तिजोरींत एक पैचीही भर पडली नाहीं; आणि जरी द्याव्या लागणाऱ्या चलनी नाण्याची किंमत कमी कमी होत गेली, तरीही या कायद्यामुळें त्या मानानें जमिनीवरील साऱ्याची रक्कम एक कवडीनेंही वाढूं दिली नाहीं; तथापि त्यामुळेंच बंगाल प्रांत हा सर्व साम्राज्यामध्यें धनसंपन्न ठेवण्यांत त्याचा फार उपयोग झाला. याच वेळेपासून पुढें हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्यामधील राजकीय बाबतींतील असुरक्षितपणा नाहींसा झाला, आणि त्या ऐवजीं त्या ठिकाणीं क्रमाक्रमानें कायमची आणि टिकाऊपणाची राजकीय वर्चस्वाची भावना उत्पन्न झाली. उद्योगाचें माहेरवर अशा या इंग्लिश राज्यकर्त्यांबद्दल जनतेमध्यें विश्वास उत्पन्न होऊं लागला; पाश्चिमात्य राज्यपद्धतीच्या ह्या नवीन परिस्थितीला अनुरूप असें इंग्लंडमधील जनसमाज वर्तन ठेवूं लागला; इकडे ह्याच वेळेपासून ब्रिटिश सरहद्दीवर क्वचित्च भीति उत्पन्न झाली; आणि एकाही जबरदस्त शत्रूनें त्यांची सरहद्द ओलांडण्याचा प्रयत्न केला नाहीं. इंग्लिश सरकार हें या वेळीं हिंदुस्थानांतील प्रमुख सत्ताधाऱ्यांपैकीं एक आहे, असें उघडपणें मानण्यांत येत होतें; तथापि अजूनपर्यंत त्यांचें वर्चस्व यथाविधि असें प्रतिपादित झालेलें नव्हतें. एतद्देशीय राजेरजवाडे हे अजूनही बरोबरीच्या अटीवरच इंग्लिशांबरोबर तह आणि लढाई करीत; परराष्ट्रांतून मुद्दाम आलेल्या प्रतिनिधि मंडळाची मुलाखत घेत; दोस्तीच्या वाटाघाटी करीत; आणि त्यांच्या अंतःस्थ राज्यकारभाराशीं इंग्लिशांचा कांहींही संबंध नसे.

परिच्छेद दुसरा—म्हैसूरच्या टिपूसुलतानाबरोबरील पहिलें युद्ध.
(१७९०—१७९२).

जेव्हां लार्ड कार्नवालिस ह्यानें हिंदुस्थानच्या गव्हर्नरजनरलीचीं सूत्रें आपल्या हातांत घेतलीं, त्या वेळीं म्हैसूर येथील राज्यकर्ता टिपू याचें धर्मवेड आणि उद्दाम वर्तन या कारणांनीं त्याच्या शेजारीं असलेल्या सर्व सत्ताधाऱ्यांमध्यें भीति उत्पन्न होऊन त्याजबद्दल द्वेषभाव सुरू झाल्या-

मुळें जरी त्याच्यावर स्वारी करण्याकरितां मराठे हे हैद्राबादच्या निझामाला जाऊन मिळालेले होते, तरीही इंग्लिश सत्ता आणि एतद्देशीय राजेरजवाडे यांचेमध्यें पूर्ण शांतता नांदत होती. ह्या स्वारीमध्यें सामील होण्याचें लार्ड कार्नवालिस ह्यानें नाकारलें; परंतु आपलें सैन्य लढाईला पुरे इतकें जय्यत ठेवण्याची त्यानें तयारी केली. उलट टिपूसाहेब हाही भविष्य काळीं इंग्लिशांपासून आपणावर संकटें ओढवतील, हें ओळखण्याइतका दूरदर्शी असल्यामुळें त्यानें सुद्धां आपणाकडून त्यांचे विरुद्ध आपली स्वतःची बाजू बळकट करण्याला अत्यंत परिश्रम घेतले. ह्या म्हैसूरच्या राज्यकर्त्यानें आपले दोस्त असलेल्या फ्रेंचांना गेल्या खेपेस हिंदुस्थानच्या किनाऱ्यांवर उतरलेलें पाहिलें होतें; त्याला समुद्रकिनाऱ्याशीं दळणवळण ठेवण्याचे मार्ग अजूनही मोकळे होते; फ्रेंचांच्या वसाहतीशीं अजूनही त्यानें आपला संबंध ठेविला होता; आणि इतर युरोपियन राष्ट्रांची मदत घेऊन इंग्लिशांच्या वर्चस्वाची वाढ दाबून टाकण्याचा प्रयत्न करण्याचें आपल्या वडिलांचें धोरण त्यानें कोणत्याही प्रकारें सोडून दिलेलें नव्हतें. परंतु युरोपस्थ लोकांच्या राजकारणाच्या बाबतींतील वस्तुस्थितीचें त्याला खरें ज्ञान नसल्यामुळें त्यानें केलेल्या सर्व बेतांचा कांहींही उपयोग झाला नाहीं; उलट आपल्या स्वतःचा आपणच झपाट्यानें नाश करून घेण्यास मात्र तेच बेत कारणीभूत होऊन बसले. इ. सन १७८७ मध्यें टिपू यानें कान्स्टांटिनोपल येथें आपला एक वकील पाठविला, आणि जरी त्यापासून कांहींही निष्पन्न झालें नाहीं, तरी तेथील सुलतानानें त्या वकिलाचें इतकें भपक्याचें आगतस्वागत केलें कीं, त्यामुळें म्हैसूरच्या ह्या दुर्दैवी राज्यकर्त्याला आपल्या सत्तेचा वाजवीहून अधिक अंदाज बांधण्यास आणि अशा राजकीय पोकळ आगतस्वागताची वास्तविक योग्यतेपेक्षां अधिक किंमत करण्यास भाग पडलें असावें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्याच वर्षी फ्रान्स व इंग्लंड यांचेमधील संबंधांची उघड उघड ओढाताण चाललेली असतांनाच पारिस येथें सोळाव्या लुईनें त्याच्या

वकिलाचें सन्मानपूर्वक आदरातिथ्य केलें, आणि ह्या अतिशय बेगडी राजकारणविषयक आदरातिथ्याच्या देवघेवीमुळें आपल्या स्थितीबद्दल अतिशय खोटा अंदाज बांधण्याला त्याला भ्रम उत्पन्न झाला. उलट, याच गोष्टींनीं इंग्लिशांना, आपण सावधगिरीनें वागावें, अशाबद्दल आलेला संशय कायम झाला, आणि अगदीं पहिली संधि मिळतांच हें धोक्याचें दळण-वळण बंद पाडण्याच्या त्यांच्या निश्चयाला त्यामुळेंच दुजोराही मिळाला.

अशा परस्पर अविश्वासाच्या परिस्थितीमध्यें हिंदुस्थानांतील काम-काजाचा स्वाभाविक ओघ पार्लमेंटच्या कायद्यानें थांबविण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा कांहींही उपयोग होणार नाहीं, आणि त्याप्रमाणेंच ओघानें व एकसमयावच्छेदेंकरून येणारे प्रसंगही टाळतां येणें शक्य नाहीं, असें लवकरच दृष्टोत्पत्तीस आलें. पिट्ट यानें मंजूर करून घेतलेल्या कायद्या-नें असें ठरून गेलें होतें कीं, " मुलखगिरी करण्याच्या बेतापाठीमागें लागणें ही गोष्ट ब्रिटिश राष्ट्राच्या इच्छेला, इज्जतीला आणि राजकारणाला विरुद्ध असून गव्हर्नर जनरल यानें आपल्या प्रदेशाचें संरक्षण, अगर आपल्या दोस्त सरकारांवर अगदीं नजदीक येऊन ठेपलेल्या स्वारीविरुद्ध त्यांचें संरक्षण, करण्याशिवायच्या इतर प्रसंगीं एखाद्या एतद्देशीय राज्याविरुद्ध शत्रुत्व जाहीर करूं नये, एतद्देशीय राज्यकर्त्याविरुद्ध लढाई करण्याच्या हेतूनें तहाच्या भानगडींत पडूं नये, अगर एखाद्या एतद्देशीय राज्यकर्त्याच्या शत्रूविरुद्ध त्याचें संरक्षण करण्यासाठीं लढाई करण्याचीही हमी देऊं नये. " परंतु लार्ड कार्नवालिस ह्यानें हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पाय ठेविला न ठेविला, तोंच निझामानें टिपूविरुद्ध आपलें संरक्षण करण्याची त्याचेकडे मागणी केली; परंतु त्या वेळीं लवकरच एखादी लढाई करावी लागेल, अशी भीति नसल्यामुळें, जरी निझामाशीं केलेल्या दोस्तीच्या संरक्षणात्मक तहामुळें टिपूच्या कारस्थानाला पुष्कळच आळा बसला असता, तरीही पिट्टनें केलेल्या कायद्याअन्वयें तो निझामाला आश्रय न देतां अलिप्त राहिला. तथापि त्यानें निझामाच्या वकिलाला जुन्या तहाअन्वयें असें

लेखी वचन दिलें कीं, " जरूर लागेल त्या वेळीं आपण आपलें सैन्य निझाम सरकाराला कुमकेदाखल देऊं, परंतु त्याचा उपयोग त्यानें कंपनी सरकारच्या कोणत्याही दोस्त सरकाराविरुद्ध मात्र करतां कामा नये. " गव्हर्नर जनरल यानें लेखी वचनाच्या दिलेल्या खलित्यांत त्या दोस्त सरकारांची नांवें तपशीलवार दिलेलीं होतीं; परंतु म्हैसूर हें त्यांपैकींचें नसल्यामुळें अस्तित्वांत असलेलें शत्रुत्व कमी करण्या ऐवजीं उलट तें वाढविण्यालाच ही योजना कारणीभूत झाली होती. आणि टिपू यानें, ही गोष्ट ह्मणजे प्रत्यक्ष आपल्या विरुद्ध होणाऱ्या भावी चळवळींचें पूर्व सूचक चिन्ह आहे, असा योग्य अंदाज बांधला होता.

हे सर्व द्वेषमूलक डावपेंच आणि ह्या आपापसांत चाललेल्या तयाऱ्या हीं म्हैसूरचा सुलतान आणि इंग्लिश सरकार यांचेमधील लढाई घडवून आणण्याची तयारी करीत होत्या; आणि इतक्यांत टिपू साहेबानें स्वतः लार्ड कार्नवालिस याला पिट्टच्या कायद्याच्या अर्थासंबंधीच्या सर्व संशयां-तून लवकरच मुक्त केलें. त्यानें औपचारिक रीतीनें केलेल्या सूचनांचा अनादर करून इंग्लिशांच्या संरक्षणाखालीं असलेल्या त्रावणकोरच्या राज्यकर्त्यावर केवळ अन्यायमूलक अशी स्वारी केली. परंतु तींत त्याला अपयश आलें. त्यावर लार्ड कार्नवालिस ह्यानें दक्षिणेचे मराठे व हैद्रा-बादचा निझाम यांचेबरोबर दोस्तीच्या जुटीचा तह केला. त्यानंतर या त्रिवर्गांचीं सैन्यें म्हैसूर येथील राज्यकर्त्याच्या प्रदेशावर चाल करून गेलीं. पहिल्या प्रथम केलेल्या लढायांनीं फारसा परिणाम झाला नाहीं. व इ. सन १७९१ मध्यें लार्ड कार्नवालिस ह्यानें स्वतःच्या सेनानायकत्वा-खालीं श्रीरंगपट्टणावर केलेल्या हल्ल्यांत त्यास यशप्राप्ति झाली नाहीं. परंतु पुढील वर्षीं केलेल्या मोहिमेंत टिपूचा पाडाव होऊन तो स्वतःच्या राजधानींत वेढला गेला (१७९२), आणि त्याला तहावर सही करणें भाग पाडण्यांत आलें. या तहाअन्वयें त्याची सांपत्तिक स्थिति कमकुवत झाली, आणि पश्चिमेकडील समुद्र किनाऱ्याच्या बाजूवरील मलबार व

कुर्ग या प्रांतांसुद्धा त्याच्या राज्याचा अर्धा भाग होण्याइतका प्रदेश त्याच्या ताब्यांतून काढून घेण्यांत आला. त्या वेळेपासून पुढें तो इंग्लिशांविरुद्ध त्यांचा सूड घेण्याचे मार्ग आणि साधनें शोधून काढण्याची खटपट करीत होता, आणि त्यांच्या विरुद्ध स्वतःला बळकटी आणण्याकरितां परराष्ट्रांशीं दोस्तीचे तहनामे करण्यावर तो मोठी आशा ठेवून राहिलेला होता; परंतु त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. त्यानें मराठ्यांबरोबर, अफगाणिस्थानचा राज्यकर्ता झेमनशहा याचेबरोबर, व फ्रेंचांबरोबरही तहाचें बोलणें लाविलें. फ्रेंचांनीं त्याची विनंति मान्य केली, आणि इंग्लिशांना चेव आणण्याला पुरेल इतकें टिपूला कबूल केलेल्या मदतीचें प्रदर्शन केलें; परंतु फ्रान्सबरोबर टिपू यानें ठेविलेल्या दळणवळणाचा शेवटीं फक्त इतकाच लक्षांत ठेवण्यासारखा परिणाम झाला कीं, इ. सन १७९३ मध्यें—ह्मणजे जेव्हां फ्रान्सच्या राज्यक्रांतीमुळें युरोपांत ह्या दोन्हीं राष्ट्रांमध्यें निकराचा बेबनाव सुरू झाला, त्या वेळीं—इंग्लंडच्या वैराला बळी पडण्यास म्हैसूर हें पूर्णपणें उघडें पडलें.

परिच्छेद तिसरा—मराठे व म्हैसूरकर यांचेबरोबरील भानगडी.

मध्यंतरीं मराठा सरदार महादजी शिंदे हा उत्तर हिंदुस्थानामध्यें फार बलाढ्य होत चालला होता; त्याला पूर्वीं मोंगल बादशाहीचा प्रतिनिधि ह्मणून किताब देण्याकरितां बादशहाचें मन वळविण्यांत आलें होतें; त्यानें उत्तरेकडे मोठा मुलूख दिग्विजयानें संपादन केलेला होता; आणि आपला प्रतिस्पर्धी होळकर याचाही त्यानें एका निकराच्या चकमकींत पराभव केला होता. महादजींचें मुख्य राजकीय ध्येय, मराठ्यांच्या जुटीचें बळ न फोडतां त्यापासून आपण आपलें स्वातंत्र्य कायम राखावें, असें होतें. हिंदुस्थानांत इंग्लिश लोकांचें झपाट्यानें वर्चस्व वाढत चाललें आहे, ही गोष्ट समजण्याइतका तो धोरणी होता. त्यामुळें एकाद्या प्रतिस्पर्ध्याला

चिरडून टाकण्याच्या कामीं, मग तो प्रतिस्पर्धी प्रत्यक्ष म्हैसूरचा मुसलमान राज्यकर्ता कां असेना, इंग्लिशांना मदत देण्याच्या हेतूनें कोणत्याही प्रकारचें त्यांच्याशीं सख्यत्व करण्याबद्दल त्याचें मन अत्यंत साशंक झालेलें होतें. त्या वेळीं टिपू (त्याचेबरोबर शिंद्यानें पत्रव्यवहार चालू ठेविला होता,) हा नरम आलेला होता. त्यामुळें सतलज नदीपासून समुद्रापर्यंत इंग्लिशांना प्रतिकार करण्याची भीति बाळगण्यासारखी जर एखादी लष्करी सत्ता अस्तित्वांत असेल, तर ती एकटी "मराठे" हीच होय, हेंही हळु हळु उघड रीतीनें दिसूं लागलें होतें. ते पुष्कळ प्रदेशाचे धनी बनलेले होते; त्यांच्या सरदारांजवळ कडेकोट रीतीनें सज्ज असलेलें प्रचंड सैन्य होतें; त्या सैन्यानें रजपूत घराण्यांच्या निःसत्त्व आणि विस्कळित प्रतिकाराला सहज हाणून पाडलेलें होतें; आणि हैद्राबाद व औंध येथील मुसलमानी राज्यांच्या भाडोत्री सैन्याची तर त्यांनीं थोड्याशा मेहनतीनेंच खात्रीनें दाणादाण उडवून दिली असती. परंतु मराठ्यांच्या निरनिराळ्या सैन्याच्या पुढारी सरदारांचा स्वाभाविक ओढा, आपल्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांतून स्वतःचीं स्वतंत्र राज्यें निर्माण करून आपल्या तळ देण्याच्या जागांना राजधान्यांचें स्वरूप द्यावें, ह्या गोष्टीकडे होता. त्यामुळें त्यांच्यांत परस्परांमध्यें अनिवार द्वेष उत्पन्न झाला, व जुटीच्या बळानें होणाऱ्या एक दिलाच्या कृत्यांत नेहमीं घोटाळे उत्पन्न होऊं लागले. इ. सन १७८६ मध्यें महादजी शिंदे याचें स्वातंत्र्य इंग्लिशांकडून मान्य करण्यांत आलेलें होतें; त्या वेळेपासून त्यानें आपल्या ताब्यांतील प्रदेश आणि हाताखालील सैन्यसामग्री हीं झपाट्यानें वाढवीत नेलीं होतीं; आणि या वेळीं त्याच्या जवळ योग्य अधिकाऱ्यांच्या हाताखालीं दिलेलें मोठें सैन्य असून तो दिल्लीच्या आसपासच्या प्रदेशाचा मालक बनलेला होता. या कारणामुळें इंग्लिशांबरोबर चकमक उडण्याची वेळ येण्यापूर्वीच शिंद्याच्या ह्या वाढत्या विस्तारावर कांहीं दाब ठेवणें अवश्यक असल्याचें गव्हर्नर जनरल याला त्याच्या राजकीय प्रतिनिधींनीं आग्रहानें

बजाविलें होतें. परंतु लढाई अगदीं नजीक येऊन ठेपलेली असल्याशिवाय कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ न करण्याबद्दल हिंदुस्थान सरकाराला इतर बाबतींप्रमाणेंच याही बाबतींत पिट्टच्या कायद्यानें सक्त रीतीनें बांधून टाकलेलें होतें; त्यामुळें याचा परिणाम असा झाला कीं, ज्यामुळें एखाद्या साहसी आणि महत्त्वाकांक्षी राज्यकर्त्याला शत्रुत्व टाळणें अशक्य होण्याच्या पायरीपर्यंत आपला पाय पुढें रेटींत नेण्याला उत्तेजन मिळतें, अशा सक्तीच्या अचल स्थितींत इंग्लिशांना राहणें भाग पडलें. शिंद्याच्या वागणुकीचा कल, हिंदुस्थान पादाक्रांत करण्याची भीति घालणाऱ्या एखाद्या परदेशीय शत्रूप्रमाणें इंग्लिशांना समजून त्यांचे विरुद्ध जूट करण्याचा, त्या वेळीं उघड उघड दिसत होता; परंतु त्याच्या वाढत्या वर्चस्वाची जितकी इंग्लिशांना भीति वाटली होती, तितकीच मराठे सरदारांनाही वाटूं लागली होती; त्यामुळें त्याच्या मताप्रमाणें चालण्याला अगर त्यानें केलेल्या बेतांमध्यें सामील होण्याला प्रत्यक्ष पेशवाही उत्सुक नव्हता.

तथापि इ. सन १७९४ मध्यें महादजी शिंदे हा पुण्याजवळ वानवडी येथें तळ पडलेला असतांनाच एकाएकीं मृत्यु पावला. हा पुरुष अतिशय महत्त्वाकांक्षी होता; तो मोठा राजनीतिकुशल असून युद्धकौशल्यामध्येंही पूर्ण निष्णात होता; आणि युरोपियन अधिकाऱ्यांच्या सेनानायकत्वाखालीं कवायती सैन्य तयार करण्याची, व परिणामकारक रीतीनें उपयोगी पडणाऱ्या तोफखान्याचा त्याला दुजोरा देण्याची, नवी पद्धत हिंदुस्थानांतील इतर एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या मानानें मोठ्या प्रमाणावर त्यानेंच प्रथम प्रचारांत आणली होती. परंतु मराठ्यांमधीलच अधिक दूरदृष्टि असलेल्या प्रमुख मंडळीच्या असें पाहण्यांत व म्हणण्यांतही येऊन चुकलें होतें कीं, लढाईच्या या नव्या पद्धतीमुळें जरी इतर सर्व एतद्देशीय प्रतिस्पर्ध्यांना, रजपुतांच्या विस्कळित लहानशा शिबंद्यांना, आणि मुसलमान राजेरजवाड्यांच्या कच्च्या बाजारबुणग्यांना, ते भारी

झाले होते, तरीही तीच पद्धत, जेव्हां ते आपल्या एकट्याच असलेल्या कट्टया प्रतिस्पर्धी इंग्लिशांबरोबर लढत असत, तेव्हां मात्र त्यांना फायदेशीर होण्याच्या ऐवजीं उलट नुकसानकारकच होत असे. त्यांना असें दिसून आलें कीं, युरोपियन पद्धतीनें लढाईचा डाव खेळण्याचा, आणि इंग्लिशांच्या हत्यारांनींच त्यांना माघार घेण्यास भाग पाडण्याचा, हा प्रयत्न आहे. परंतु ज्या कारणामुळें सतत शंभर वर्षेपर्यंत मराठ्यांना अवजड मुसलमानी सैन्यावर सारखे विजय मिळवितां आले, आणि पुष्कळ प्रसंगीं इंग्लिश सेनानायकांनाही घोटाळ्यांत घालून त्यांची धूळधाण उडवितां आली, त्या त्यांच्या जलद व धाडशी स्वाऱ्या, आणि शीघ्रगामी घोडेस्वारांच्या हालचाली,—त्यांची हल्ला करण्यामध्यें दाखविली जाणारी तडफ, आणि त्यांची माघार घेण्यामध्यें दिसून येणारी तडक,—यांना कवायती खडें सैन्य आणि तोफखाना यांच्या योगानें अडथळा आणला गेला. डुप्ले आणि क्लाइव्ह यांच्या वेळेला शिस्तीचें सैन्य ठेवणें ह्मणजे एक बरेंच परिणामकारक नवें लष्करी शस्त्र प्रचारांत आणण्यासारखेंच असून, तें फ्रेंच आणि इंग्लिश यांशिवाय इतर कोणालाही माहीत नव्हतें. आणि ज्या पक्षाजवळ अशा प्रकारच्या अकल्पित वर्चस्वाची किल्ली असेल, त्या पक्षास नेहमीं पहिल्यापाहिल्यानें विजयही संपादन करतां येतो. परंतु सुधारलेल्या राष्ट्रांतील लष्करी तयारी आणि त्यांची युद्धपद्धति यांना, लष्करी विद्येंतील पुष्कळशी प्रवीणता, किंमती सामानाचा मुबलक पुरवठा, आणि युद्धविद्येंत निष्णात असलेल्या अधिकाऱ्यांचा भरपूर सांठा, यांची अत्यंत जरूरी असते. परंतु आशियांतील एकाद्या राज्यकर्त्याचे प्रजाजन ह्या नव्या युक्त्यांना अगदींच पारखे असल्यामुळें त्याला ह्या सर्व गोष्टी घाईनें अमलांत आणणें मुळींच शक्य नसतें. अगदीं आजपर्यंतच्या लढायांच्या इतिहासावरून असें पाहण्यांत आलें आहे कीं, ज्यांना अनुभवाचा व साधनांचा अभाव आहे, परंतु जे लोक संख्येनें पुष्कळ आहेत, अशा एकाद्या आडदांड व सुधारणेंत मागें असलेल्या

लोकांच्या जमावाला–अनियमित व प्रत्यक्ष तोंडास तोंड न देतां टाळाटाळीनें गनिमी काव्याच्या लढायांनीं–चांगल्या शिकलेल्या लोकांच्या लहानशा शत्रुसैन्याशीं यशस्वीपणानें टक्कर देतां येण्याचा पुष्कळच संभव असतो. अमेरिका, आशिया आणि आफ्रिका, या तिन्हीही खंडांमध्यें––ओहिओ नदीवर झालेल्या ब्राड्डाकच्या पराभवापासून तों थेट अलीकडील अफगाणिस्थान व ट्रान्सव्हालमधील अनर्थांपर्यंत––कवायती इंग्लिश सैन्यावर जे कांहीं अत्यंत वाईट पराजयाचे प्रसंग येऊन गुदरले, ते सर्व आपल्याच पद्धतींनीं आणि आपल्याच शस्त्रास्त्रांनीं मोठ्या चपलतेनें आणि लढाईच्या नियमांनीं आपणास बांधून घेतल्याशिवाय झगडणाऱ्या लोकांबरोबर लढतांनाच आलेले आहेत. शिवाय, मराठे लोक जसजसे युरोपियन तऱ्हेनें लढण्याचीं शस्त्रास्त्रें आणि हातोटी उचलीत गेले, त्या त्या मानानें एक देश अगर एक परंपरा यांपासून व राष्ट्रीय, धार्मिक अथवा जातिविषयक भावनेपासून मिळणारा फायदा त्यांचे हातून जात गेला. ह्या नव्या पद्धतीला धंदेवाईक सैनिकांची जरुरी असून मिळतील तेथून त्यांची भरती करावयाची असते, आणि त्यांत विशेषत: परकीय अधिकारी असणें अवश्यकतेचें होऊन बसतें. अशा रीतीनें परकीय किंवा अपरिचित असें एक तत्त्व मराठ्यांच्या सैन्यव्यवस्थेंत शिरून तें मोठ्या झपाट्यानें वाढत गेलें, आणि तेंही इतकें कीं, पुढें पुढें तर "मराठ्यांचें लष्कर" ह्मणजे मुख्यत्वेंकरून नाना देशच्या व अनेक जातीच्या धाडशी लोकांच्या सेनानायकत्वाखालीं असलेलें कवायती पायदळ व तोफखाना आणि हिंदुस्थानच्या सर्व भागांतील नौकरीस ठेविलेला भाडोत्री अठरा पगड जातींचा एक जमाव, यांचेंच निव्वळ बनलेलें होतें.

ह्या वेळेपासून पुढें वास्तविक पाहतां मराठ्यांबरोबरील आणि त्यानंतर शीख लोकांबरोबरील इंग्लिशांच्या लढायांत एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, जरी त्या लढाया मोठ्या निकरानें होत असत, आणि जरी पुष्कळ नुकसान झाल्याशिवाय इंग्लिशांना

विजयप्राप्ति होत नसे, तरीही त्यांत त्यांना मिळालेले विजय हेही नेहमीं निर्णयात्मक असेच असत. इंग्लिश सैन्यानें मराठ्यांच्या अगर शीख लोकांच्या सैन्याच्या एकीकृत आणि सुव्यवस्थित तुकड्यांवर अगदीं जवळून केलेले मारे फारच अनर्थावह होत असत; आणि या तुकड्यांची एकदा पांगापांग झाली, अगर त्यांचा नाश करण्यांत आला, तर त्यांची जागा पुन्हां भरून येण्यासारखी नसे. शिवाय, हिंदुस्थानांतील ज्या ज्या राज्यकर्त्यांबरोबर अगर राजघराण्यांबरोबर इंग्लिशांना लढण्याचे प्रसंग आले, त्यांचें त्यांचें जीवित्व लढायांतील जयापजयावरच निव्वळ अवलंबून असल्यामुळें पराजय झाल्याबरोबर इंग्लिशांच्या मेहेर नजरेवरच त्यांना पूर्णपणें अवलंबून रहावें लागत असे. कारण, बहुधा प्रत्येक बाबतींत त्यांनीं मिळविलेला राज्याचा हक्क हा फक्त उपरीच असून त्यांच्या मालकीच्या हक्काला त्या प्रांतांतील लोकांची फारच थोडी, किंबहुना नाहीं म्हटली तरी चालेल इतकी, सहानुभूति असे. या कारणामुळें जिंकिलेल्याला पुन्हां गादीवर बसविणें जेत्याला योग्य न वाटल्यास, प्रजेला फक्त "मालकाची अदलाबदल झाली," एवढीच भावना होत असे. युरोपमधील लष्करी पद्धतीची नक्कल करण्याचा एतद्देशीय सत्ताधाऱ्यांचा सर्व प्रयत्न त्यांना भ्रमांत पाडून जाळ्यांत अडकविण्यास कारणीभूत झाला. ह्या पद्धतीनें, आपण इंग्लिशांच्या तोडीचे होऊं, असा त्यांचा समज झाला; परंतु वास्तविक पाहतां हीच पद्धत त्यांच्या वाटेंत आड आली, आणि त्यांना नसत्या संकटांत ओढण्यास कारणीभूत झाली; व आपल्या शक्तीबद्दल कांहीं तरी खोटा अंदाज बांधून परदेशीय अधिकाऱ्यांच्या धुरीणत्वाखालीं एक मोठें लष्करी खातें बाळगण्यासही ही पद्धत हेंच कारण झालें; आणि पुढें या रीतीनें बाळगण्यांत आलेलें लष्कर मोडून टाकणें अगर त्याचा नाश करणें, हेंच इंग्लिशांना एक मुख्य काम होऊन बसलें. हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व कायम राखण्याकरितां संपत्ति व साधनें हीं दोन्हीही हातीं खेळतीं असल्यामुळें कोणत्याही मर्यादेपर्यंत शिस्तीचें सैन्य

वाढविणें ही गोष्ट इंग्लिशांना फारच सोपी झालेली होती; पण याच्या उलट कोणत्याही एतद्देशीय राज्यकर्त्याला तोफा आणि तयार शिकलेलें सैन्य यांचा झालेला नाश भरून काढणें ही गोष्ट फारच कठिण झालेली होती. अशा रीतीनें लष्करी आणि राजकीय स्थिति समसमान नसल्या कारणानें गेल्या शंभर वर्षांतील एकामागून एक याप्रमाणें झालेल्या स्वाऱ्यांचा परिणाम ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार होण्यांतच झाला, हेंही समजण्यास फारसें कठिण नाहीं. वास्तविक म्हटलें असतां या वेळीं अशी स्थिति होती कीं, कवायती सैन्याच्या मदतीनें लढाई करण्याच्या कामांत ब्रिटिश सत्तेनें इतर सर्व प्रमुख सत्ताधाऱ्यांना मागें टाकिलें होतें; तिचें चिरस्थायित्व कोणत्याही प्रकारें एखाद्या राज्यकर्त्याच्या अगर सेनानायकाच्या जीवावर, किंवा नशिबावर किंवा एखाद्या लढाईच्या परिणामावर अवलंबून नव्हतें; आणि त्या सत्तेच्या ताब्यांत आतां हळुहळु सर्व प्रदेश जात चालला होता. कारण, या सत्तेला समुद्रापलीकडील सुधारलेल्या जोरदार व श्रीमंत राष्ट्राच्या संग्रहीं असलेल्या मुबलक ऐश्वर्यापासून सर्व साधनांचा भरपूर पुरवठा होत होता.

म्हैसूर येथील स्वारीनंतर लार्ड कार्नवालिस ह्याचा मुख्य हेतु असा होता कीं, लढाईच्या शेवटीं, ज्याच्या ज्याच्या ताब्यांत जो जो मुलूख असेल, तो तो मुलूख त्याच्या त्याच्या ताब्यांतच राहील, आणि त्यांत बिलकूल ढवळाढवळ होणार नाहीं, याबद्दल टिपूविरुद्ध कंपनी सरकार हमी घेईल, अशा अटीवर मराठे व निझाम यांचें मन वळवून त्यांचेबरोबर तह करावा, आणि दक्षिण हिंदुस्थानांत शांतता प्रस्थापित करावी. निझामाला मराठ्यांची फार भीति असल्यामुळें तो या बेताला मोठ्या खुषीनें कबूल झाला. परंतु मराठे हे निझामाला लुटण्याचा मनसुबा करून घाट घडवीत असल्यामुळें त्यांनीं ती गोष्ट नाकबूल केली. औंध व हैद्राबाद येथील मुसलमानी राज्यें---त्यांच्या राज्याचा विस्तार व वसूल यांच्या मानानें—फारच कमकुवत होतीं; राजकीय तागडींत त्यांचें

फारसें वजन नव्हतें; व योग्य वेळ येण्यापूर्वींच त्यांचा होणारा नाश थांबविणें ही गोष्ट इंग्लिशांच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची होती. औध हें या सुमारास पूर्णपणें इंग्लिश सरकारच्या संरक्षणाखालीं आलेलें होतें. या संरक्षक पद्धतीनें एखादें एतद्देशीय राज्य जरी जीव धरून राहतें, तरीही त्या राज्याच्या स्वातंत्र्याशीं ती पद्धत विसंगत आहे. कारण, सैन्याच्या साधनांनीं त्याच्या प्रदेशाचें संरक्षण करण्याची जबाबदारी संरक्षणाची हमी घेतलेल्या सत्तेवर असते; आणि जरी तेथील राज्यकर्ता तैनाती सैन्याचा सर्व खर्च भागविण्याला सहकारी कुमकेच्या तहानें आपणास बांधून घेतो, तरीही त्या सैन्यावर त्याला आपला बिलकुल अधिकार चालवितां येत नाहीं. शिवाय स्वतंत्र रीतीनें राज्य चालविण्याची धमक निदर्शनास आणून कसास उतरलेले आणि पसंत झालेले कर्तृत्ववान राज्यकर्ते पुरुष आशियाखंडांतील ज्या घराण्यांत लागोपाठ निर्माण होत नाहींत, तें घराणें चिरस्थायी होऊं शकत नाहीं. परंतु ह्या संरक्षक पद्धतीनें वंशपरंपरेचा हक्क कायम राहतो; दुसऱ्याचें राज्य आपल्या घशाखालीं घालूं पाहणाऱ्या चळवळ्या व्यक्तींपासून अंगीं कर्तृत्व नसलेल्या गादीच्या हक्कदार वारसाचें पदच्युत होण्यापासून संरक्षण होतें; आणि निसर्गतः हक्क पोंचत नसलेल्या राजपुत्राला त्यामुळेंच, लवकर अगर उशिरा, पण राजगादी मिळाल्याशिवाय रहात नाहीं. औधच्या राजघराण्यामधील राज्यसूत्रें चालविण्याचें सामर्थ्य उघड उघड कमी कमी होत चाललें होतें, आणि राज्यामध्यें अंतःस्थ घोटाळे व सांपत्तिक अडचणी यांनीं गोंधळ माजत चालला होता. अंतःस्थ बंड व परकीय हल्ले, यांबद्दलची कोणत्याही प्रकारची भीति बाळगण्याचें कारण नसल्यामुळें आळस आणि बेजबाबदारी उत्पन्न झाली होती; वसुलीच्या अव्यवस्थेमुळें तैनाती फौजेबद्दल द्यावयाच्या रकमेचा बोजा वाढत चालला होता; आणि या संरक्षक पद्धतीमुळें जो कांहींसा अव्यवस्थितपणा राज्यकारभारामध्यें सुरू झाला होता, तो तीच पद्धत तशींच पुढें चालू ठेवण्यालाही कारणीभूत झाला

होता. अशाच प्रकारचीं चिन्हें पुढें हैद्राबाद येथेंही दिसून आलीं; त्यामुळें तें राज्यही इंग्लिशांच्या संरक्षक पद्धतीखालीं लवकरच आलें.

ज्या ठिकाणीं तटस्थ राहण्याच्या व ढवळाढवळ न करण्याच्या पद्धतीमुळें भावी भांडणाच्या बियाण्याला परिपक्वता आली, आणि ज्या योगानें हीं पूर्वींच टाळतां येण्यासारखीं अरिष्टें नाहींशीं करण्याकरितां सरते शेवटीं इंग्लिशांना तटस्थ वृत्ति सोडून ढवळाढवळ करणें भाग पडलें, त्या घोटाळ्याच्या व उलाढालीच्या इतिहासावरून हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्यावर येणाऱ्या चमत्कारिक आणि वारंवार उत्पन्न होणाऱ्या अडचणी चांगल्या रीतीनें निदर्शनास येतात. देशांत शांतता नांदावी, अशाबद्दल दुसऱ्या कोणत्याही मोठ्या सत्तेला काळजी वाटत नव्हती; "बळी तो कान पिळी" अशी वास्तविक स्थिति झालेली होती; आणि जो लष्करी पुढारी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना पायाखालीं तुडविण्यांत यशस्वी होईल, तोच प्रतिस्पर्धी लवकरच इंग्लिशांच्या प्रदेशाविरुद्धही आपल्या सैन्याचा मोर्चा फिरवील, अशी भीति होती, इतकेंच नव्हे, पण बहुतेक खात्रीही होती. युरोपखंडांत जिब्राल्टर एवढाच काय तो जमिनीचा तुकडा इंग्लिशांच्या ताब्यांत होता, तरीही अठराव्या शतकांत इंग्लंडच्या आसपास असलेल्या युरोपांतील राष्ट्रांमध्यें सुरू झालेल्या प्रत्येक मोठ्या लढाईंत भाग घेण्याचें इंग्लंडला केव्हांही टाळतां आलें नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे. आणि ह्मणूनच जरी हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या ताब्यांत असलेले प्रांत चोहोंकडे पसरलेले असून एकमेकांपासून बरेच अलग होते, परकीय राज्यकर्त्यांच्या ताब्यांतील प्रदेशांत मिसळून गेलेले होते, आणि समुद्राच्या बाजूशिवाय प्रत्येक बाजूनें त्यांवर हल्ले होण्याची भीति होती,—आणि पुढें आर्थर वेलस्ली यानें म्हटल्याप्रमाणें जरी हिंदुस्थानांत सरहद्द अशी त्या वेळीं बिलकुल कोठेंही नव्हती,—तरीही अशा परिस्थितीमध्यें देशांतील स्वस्थता आणि राज्याराज्यांमधील सत्तेचा समतोलपणा हीं बिघडविणाऱ्या भांडणामध्यें आणि धडपडीमध्यें नेहमीं व

कित्येक वेळां तर इच्छेविरुद्ध सुद्धां ब्रिटिश सरकार ओढलें जात असे, याबद्दल आश्चर्य वाटण्याचें बिलकुल कारण नाहीं.

परिच्छेद चवथा–लार्ड कार्नवालिस ह्याच्या कारकीर्दीची अखेर. (१७९३).

याप्रमाणें असलेल्या स्थितींत इंग्लिशांना मूग गिळीत स्वस्थ राहणें, अगर सर्व हिंदुस्थानामध्यें त्यांच्या प्रदेशासभोंवतीं सुरू असलेल्या युद्ध-कलहाकडे तटस्थ वृत्तीनें पाहणें, ही गोष्ट किती कठिण झाली होती, हें लार्ड कार्नवालिस ह्याच्या कारकीर्दींतील कृत्यें आणि त्यांचे परिणाम यांवरून उघड उघड दिसत आहे. कंपनीच्या गव्हर्नरांनीं अन्यायाच्या आणि निरर्थक लढायांत आपण होऊन आपणाला गुंतवून घेतलें, आणि शेजारच्या प्रदेशाचा तुकडा आपल्या घशाखालीं उतरविण्याच्या अनावर लालसेनें त्यांनीं आपणावर संकटेंही ओढवून आणलीं, असा त्यांच्यावर इंग्लंडमध्यें सर्वसाधारण दोषारोप करण्यांत आला होता. परंतु इ. सन १७८६ मध्यें प्राणप्रतिष्ठा केलेल्या नव्या शिस्तीच्या राज्यपद्धतीमुळें प्रत्यक्ष प्रधानमंडळाच्या नियंत्रणाखालीं कामकाजाचा पुरस्कार गेला; त्यामुळें नेमस्तपणा व राजकीय आत्मसंयमन, सर्व महत्त्वाकांक्षी धाडशी बेतांचा परित्याग आणि शांततेची जोपासना, ह्या सर्व गोष्टी साध्य करून घेण्याचा खात्रीलायक फायदा होईल, असें मानण्यांत आलें होतें. हिंदु-स्थानांतील कोणत्याही गव्हर्नर जनरलला लार्ड कार्नवालिस इतकी, नेमस्त व कसाही प्रसंग आला तरी शांत धोरणाचा राहण्याबद्दल, अत्यंत कळ-कळीनें ताकीद दिलेली नव्हती; आणि युद्ध करण्याची उत्सुकता अथवा राज्याचा विस्तार करण्याचे बेत, यांना आळा घालण्याच्याच विशिष्ट उद्देशानें पार्लमेंटच्या विशेष कायद्यानें हे सर्वसाधारण हुकूम मंजूर करण्यांत आलेले होते. इ. सन १७८४च्या पिट्ट यानें केलेल्या कायद्यानें या बाबतीवर विशेषच जोर दिलेला असून इ. सन १७९३ मध्यें पुन्हां दुसरा कायदा करून तर असेंही जाहीर करण्यांत आलें होतें कीं:—

"ज्या अर्थी दिग्विजयांच्या बेतांच्या पाठीमागें लागणें आणि हिंदुस्थानांतील आपल्या राज्याचा विस्तार करणें, ह्या गोष्टी इंग्लंडच्या राष्ट्राची इच्छा, इज्जत आणि राजनीति, यांना विरोधी आहेत, त्या अर्थी लढाई जाहीर करणें, अगर लढाई करण्याकरितां एकाद्या तहांत सामील होणें, अथवा त्या देशांतील राजेरजवाडे किंवा राज्यें यांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशासंबंधीं हमी घेणें (ज्या वेळीं हिंदुस्थानांत ब्रिटिश राष्ट्राविरुद्ध प्रत्यक्ष युद्धकलह सुरू झाले असतील, अगर तशी सिद्धता झालेली असेल, त्याशिवायच्या प्रसंगीं), ह्या गोष्टी विलायत सरकारच्या प्रत्यक्ष हुकुमाशिवाय व परवानगीशिवाय गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांनीं करणें कायदेशीर होणार नाहीं."

तथापि लार्ड कार्नवालिस याचा नेमस्तपणा आणि सारासार विचार यांबद्दल केव्हांही कोणीसुद्धां संशय घेतला नाहीं; तरी पण त्याला कलकत्त्याला येऊन पोंचल्याबरोबर असें आढळून आलें कीं, लढाईची तयारी करणें भाग आहे; आणि भावी दुष्परिणाम टाळण्याकरितां आडकाठी ह्मणून जे कायदे घडविण्यांत आले, तेच उलट भावी दुष्परिणाम वृद्धिंगत करण्याला कारणीभूत झाले आहेत. या कायद्याच्या आडकाठीमुळें इंग्लिशांच्या गव्हर्नर जनरलला एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या जोराच्या आगळिकी आणि धोक्याची जूट यांचेकडे निव्वळ नाइलाजास्तव तटस्थपणें पहात स्वस्थ बसणें भाग पडलें; आणि आपल्या ताब्यांतील प्रदेशाच्या सुरक्षितपणाला प्रत्यक्ष आणि खात्रीनें धोका येण्या इतक्या थराला ह्या गोष्टी जाईपर्यंत त्याला त्यांत हात घालण्यापासूनही परावृत्त रहावें लागलें. म्हैसूरकराबरोबर केलेली लढाई आणि ब्रिटिशांच्या साम्राज्याची झालेली बरीचशी वाढ, ह्या दोन्हीही गोष्टी—शांतता राखण्याबद्दल सरसहा सुटलेले सर्व हुकूम आणि ती टिकविण्याकरितां इमानानें केलेले सर्व प्रयत्न यांना न जुमानतांच—झालेल्या आहेत. परंतु लार्ड कार्नवालिस याच्या चांगल्या हेतूबद्दल अत्यंत विश्वास असल्यामुळें इ. सन

१७९३ सालीं जेव्हां त्यानें हिंदुस्थान सोडिलें, त्या वेळीं सामोपचाराच्या आणि स्थायिक राजकारणाची सुरवात करण्याकरितां त्यानें निव्वळ अवश्य असलेलेच इलाज फक्त अमलांत आणलेले आहेत, असा इंग्लंडमध्यें सर्वसाधारण समज होता. परंतु वास्तविक पाहतां, इंग्लिश लोकांना पुढें लवकरच मोठ्या प्रमाणावर उत्पन्न झालेल्या शत्रूंबरोबर तोंड देण्याचे, आणि राज्येंच्या राज्यें आपल्या साम्राज्यांत सामील करण्याचे, प्रसंग आलेले असून त्या काळास नुकतीच कोठें आतां सुरवात होऊं लागलेली होती.

हिंदुस्थानांतील कामकाज प्रत्यक्ष पार्लमेंटच्या नियंत्रणाखालीं आल्यानें इंग्लिशांच्या प्रदेशाची वाढ शिथिल न होतां ती उलट उद्दीप्त होत गेली, ही गोष्ट, इंग्लिशांच्या राज्याची पुढें जाणारी हालचाल ज्या नैसर्गिक शक्तीच्या चिवटपणामुळें आणखी पुढें ढकलली गेली, त्या प्रयत्नांची दर्शक असून, याहून वास्तविक रीत्या कोणतीही गोष्ट खरोखर अधिक महत्त्वाची नाहीं. मिस्तर स्पेन्सर वालपोल यानें आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत असें लिहिलें आहे कीं, कंपनीच्या ताब्यांतील प्रदेशांत आणखी भर घालणें ही गोष्ट त्या काळच्या प्रत्येक मुत्सद्दयाला आवडत नसून त्यानें ती मनाही केलेली होती. शिवाय, आपण असेंही वाचलेलें आहे कीं, कंपनीच्या राज्यव्यवस्थेची घडी लढायांच्या अरिष्टकारक व्यसनामुळें विस्कळित झाली, असें मानण्यांत येत असून, त्याला दाबांत ठेवण्याकरितांच नवीन नवीन कायदे मंजूर करण्यांत आलेले होते. तथापि ऐतिहासिक दृष्ट्या ही गोष्ट मात्र नक्की आहे कीं, हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेच्या कारभाराचीं सूत्रें कंपनीच्या हातांतून इंग्लंडच्या राजाच्या हातीं प्रत्यक्ष गेल्यानंतरच अदृष्टपूर्व लढाया व यशस्वी मुलखगिऱ्या यांना सुरवात झालेली आहे. इंग्लिशांनीं मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानांत केलेल्या लढायांची सुरवात इ. सन १७८९ पासून झालेली आहे, आणि इ. सन १७८६ पासून इ. सन १८०५ पर्यंतच्या ज्या काळाचे दरम्यान (मधील थोड्याशा अवधीशिवाय) कार्नवालिस आणि वेलस्ली या

पार्लमेंट तर्फेच्या पहिल्या दोन गव्हर्नर जनरलांनीं—ह्मणजे पक्षविषयक कारणांमुळें पार्लमेंटला जबाबदार असलेल्या प्रधानमंडळांनींच ज्या गव्हर्नर जनरलांची नेमणूक केलेली होती, त्यांनीं--हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें चालविलीं, त्या काळांतच, इंग्लिशांच्या पुष्कळ दिवस चालणाऱ्या कांहीं लढायांचा, आणि दिग्विजयानें मिळविलेल्या, अगर स्वामित्वहक्काचा त्याग केल्यानें मिळालेल्या, पुष्कळ प्रदेशांचा, समावेश होतो. शिवाय, असा ही दप्तरीं दाखला आहे कीं, इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील राज्याची अत्युत्कृष्ट वाढ (लार्ड डलहौसी याच्या कारकीर्दीपर्यंत) ही या दोन गव्हर्नर जनरलांच्या कारकीर्दीशीं मिळती आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या इमारतीचा पाया व्यापारी लोकांनीं विस्कळित प्रयत्न करून रेखाटून काढला; पायाचा मुख्य दगड बंगालमध्यें लार्ड क्लाईव्ह यानें बसविला; वारन हेस्टिंग्स यानें त्याच्या पहिल्या पहिल्या अवस्थेचें दृढीकरण केलें; परंतु त्यावरील भव्य इमारत मात्र पार्लमेंट तर्फे नेमिले गेलेले प्रसिद्ध गव्हर्नर जनरल अगर सेनानायक यांचेकडूनच उभारली गेलेली आहे. आणि गेल्या शंभर वर्षांपासून हिंदुस्थानांतील कोणताही महत्त्वाचा प्रदेश खालसा करण्याचें काम इंग्लंडमधील राष्ट्रीय सरकारानें आपण होऊन मननपूर्वक हुकूम दिल्याशिवाय करण्यांत आलेलें नाहीं[1].

हिंदुस्थानाबरोबर इंग्लंडचा घडलेला निकटचा संबंध आणि त्यास धोका पोंचल्यास इंग्लिशांची होणारी मोठी हानि, यांनीं त्यांच्या ताब्यांतील आशियामधील प्रदेश युरोपस्थ राजकारणाच्या ओघांत इतका विशेष रीतीनें ओढला गेला कीं, त्यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांचेमधील युद्धकलहाच्या भरतीची लाट त्यावरून वाहून गेली, आणि तिनें भावी

---

१. इ. सन १८४३ मध्यें सिंधप्रांत खालसा करून ब्रिटिश साम्राज्यास जोडण्यांत आला, त्या बाबतींत गव्हर्नर जनरल, लार्ड एलिंबरो, याच्या वर्तनाला कंपनीनें रीतसर दोष दिला, आणि हें त्याचें कृत्य सर राबर्ट पीलच्या प्रधानमंडळानें पुष्कळ होय ना केल्यानंतरच बहाल राखिलेलें आहे.

कार्यपरंपराही आणखी पुढें वाहवून नेली. इ. सन १७९३ मध्यें क्रांतिकारक फ्रान्सबरोबर इंग्लंडची पुष्कळ दिवस चालणारी लढाई सुरू झाली, आणि त्याचा लवकरच आशियांतील इंग्लिश राजकारणाच्या धोरणावर परिणाम झाला. त्यानंतर थोडकेच दिवसांनीं नेपोलियन बोनापार्ट यानें,—सिंहासनें उलथींपालथीं करीत, सरहद्दींचा विध्वंस करीत, राष्ट्रीय परंपरा आणि वंशपरंपरेचे हक्क यांना पायाखालीं तुडवीत, तरवारीच्या तीक्ष्ण धारेनें नवीन नवीन राज्यें निर्माण करीत, आणि एकाद्या मोठ्या मालमिळकतीचे ज्याप्रमाणें सोइस्कर असे लहान लहान भाग अथवा वतनें तयार करितात, त्या प्रमाणेंच या नवीन राज्यांना सरहद्दी घालीत,—आशियांतील दिग्विजय करण्यास निघालेल्या एकाद्या अस्मानी धुंदीच्या वीराप्रमाणें, आपल्या लष्करी जोरावर अरेरावी सुलतानीस सुरुवात केली. अशा प्रकारच्या करमणुकीमध्यें आनंद मानणाऱ्या ह्या व्यक्तीच्या मनाचा आशियाकडे स्वाभाविक स्फूर्तीमुळें ओढा लागला; आणि अनंत युद्धकलह व सुलतानी राज्यव्यवस्था यांमध्यें रममाण होणाऱ्या असामान्य बुद्धिवैभवाला—आशियामधील जुन्या तऱ्हेच्या खिळखिळ्या झालेल्या राजसत्तांना उलथून पाडून त्यांच्या जागीं मनास वाटेल त्या वेळेस नवीन व डौलदार राज्यें स्थापन करण्यास—मुबलक क्षेत्र आहे, असें त्याला आढळून आलें. शिवाय, त्याच्या मनाचा हा असलेला कल त्याच्या हितसंबंधाशींही चांगलाच जुळता होता. कारण, समुद्रामध्यें इंग्लिश लोकांचें नेपोलियनकडून कांहींही वांकडें होत नसल्यामुळें जमिनीवर कोठें तरी त्यांना चांगलाच हात दाखवावा, अशी त्याची उत्कट इच्छा, आणि आशियामध्यें धाडशी कृत्यें करण्याची त्याची अभिरुचि, यांची जोड त्याला चांगल्या रीतीनें घालतां आली. इंग्लिशांच्या ताब्यांतील हिंदुस्थानांतील प्रदेशावर स्वारी करण्याचा बेत त्याच्या मनांत रात्रंदिवस एकसारखा घोळत होता; परंतु, इतर अनेक हेतूंबरोबर, इंग्लिशांना पूर्वेकडील त्यांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांतून हांकलून लावावें, आणि सुवेझच्या सामुद्रधुनीमधील त्यांच्या दळणवळणाचा

मार्ग बंद करावा, असा त्याचा दुहेरी हेतु होता; तथापि इ. सन १७९८ मध्यें सीरिया प्रांतावर त्यानें केलेली स्वारी, आणि ईजिप्त देशाचा त्यानें अयोग्य वेळीं घेतलेला ताबा, हाच आशियांत दिग्विजय करण्याकरितां नेपोलियन यानें केलेला पहिला आणि शेवटलाही प्रयत्न होय. शिवाय, त्यानें घातलेल्या भीतीचा परिणाम नेहमींप्रमाणें इंग्लिशांच्या प्रदेशाची वाढ इतर प्रदेश खालसा करून मोठ्या झपाट्यानें होण्यांतच झालेला आहे. कारण, एक पक्षीं, मराठे आणि म्हैसूरचा सुलतान यांचेबरोबर फ्रेंचांचीं चाललेलीं कारस्थानें आणि त्या राज्यांच्या सैन्यामध्यें फ्रेंच कामगारांची नवीन चाललेली भरती, यांवर इंग्लिश लोक अधिक भीतीनें व संतापानें नजर ठेवूं लागले; आणि दुसरे पक्षीं, इंग्लिश लोकांचें जारीनें वाढणारें वर्चस्व आणि फ्रेंच लोकांनीं सुरू केलेलीं सलोख्याचीं बोलणीं, यांनीं एतद्देशीय राजेरजवाड्यांची फसगत होऊन स्वसंरक्षणाकरितां ह्मणून जो मार्ग स्वीकारण्याचें त्यांनीं धाडस केलें, तोच मार्ग शेवटीं त्यांचा झपाट्यानें नाश घडवून आणण्यास कारणीभूत झाला. इंग्लंडला आतां, आपल्या ताब्यांत असलेल्या आशियांतील प्रदेशाची किंमत किती अपार आहे, याची कल्पना आलेली होती, आणि त्यामुळें हिंदुस्थानांत आपल्या वर्चस्वाशीं नेहमीं टक्कर देऊं पाहणाऱ्या युरोपांतील फ्रान्स ह्या एकट्याच राष्ट्राच्या ढवळाढवळीमुळें उत्पन्न होणारा, परंपरागत चालत आलेला, मत्सर त्या राष्ट्राशीं सुरू असलेल्या एका आणीबाणीच्या युद्धाच्या वेळीं साहजिकपणेंच अत्यंत विकोपास जाऊन पोहोंचला होता.

लार्ड कार्नवालिस हा इ. सन १७९३ मध्यें हिंदुस्थानांतून परत जाण्यापूर्वीं त्यानें केलेलें शेवटचें कृत्य, म्हणजे फ्रेंचांच्या सर्व वसाहती इंग्लिशांतर्फे आपल्या ताब्यांत घेणें, हें होय. इ. सन १७९६ मध्यें डच लोकांजवळून सिलोन घेण्यांत आलें. आणि फ्रान्सबरोबर असलेल्या संगनमताचें कोणतेंही चिन्ह, इतकेंच नाहीं, पण त्या बाजूचा नुसता झुकता कल हाही, विस्तवाच्या ठिणगीप्रमाणें धोक्याचा समजून, तो एक-

दम विझविलाच पाहिजे, असें इंग्लिश लोक ह्या वेळीं समजूं लागले होते. इ. सन १७९८ मध्यें लार्ड मार्निंगटन हा हिंदुस्थानांत येऊन पोहोंचे-पर्यंत सर जान शोअर (लार्ड टेनमौथ) हा गव्हर्नर जनरलाचें काम पहात होता. सर जान शोअर हा अतिशय सावध आणि दीर्घ चिकित्सक मुत्सद्दी होता. त्यामुळें आपणाला आंखून दिलेल्या मर्यादेबाहेर आपले असलेले संबंध अगर जबाबदारी वाढविण्याला, तो ठरीव तत्त्वाच्या अनु-रोधनानें, प्रतिकूळ होता; म्हणून त्यानें, मराठयांनीं जेव्हां निझामावर हल्ला केला, त्या वेळीं निझामाला मदत करण्याचें कांहींसें अनुदारपणानें नाका-रून, आपल्या एका मुख्य दोस्ताला अंगाबाहेर टाकिलें, व एका मुख्य प्रतिस्पर्ध्याला उत्तेजन दिलें. निझाम हा इंग्लिशांशीं सख्य ठेवण्याला अतिशय उत्सुक असून, परस्परांनीं परस्परांच्या मुलखाची हमी घ्यावी, ह्या तत्त्वावर त्यानें एक संरक्षक तह पुढें मांडला. परंतु टिपूबरोबर जूट करून मराठे कदाचित् आपणाशीं जशास तसें या न्यायानें वागतील, म्हणून मराठयांचें मन दुखविण्याची जोखीम अंगावर पतकरून हैद्राबाद-चें संरक्षण करण्याचें इंग्लिश सरकारनें नाकारलें. परंतु ह्या धरसोडीच्या वर्तनाचा परिणाम फार भयंकर झाला. कारण, मराठयांनीं हैद्राबादच्या प्रदेशावर स्वारी केली, निझामाच्या सैन्याची धूळधाण उडविली, आणि पुष्कळ पिळून काढणाऱ्या अटींवर अपमानकारक रीतीनें स्वाधीन होण्याला मराठयांनीं त्याला भाग पाडलें. या विजयामुळें मराठयांचें बळ आणि लौकिक यांतही पुष्कळच भर पडली; परंतु उलट पक्षीं इंग्लिशांनीं निझामा-ला अंगाबाहेर टाकल्यामुळें तो मात्र इतका चिडीस गेला कीं, त्यानें फ्रेंच अधिकाऱ्यांच्या दिमतीखालीं आपलें कवायती पायदळ सैन्य पुष्कळच वाढविलें. शिवाय, हेच फ्रेंच अधिकारी इंग्लिशांबरोबर त्याच्या झालेल्या वैमनस्यांत भर घालूं लागले, आणि तोही त्यांच्यावर आजपर्यंत कधींही नाहीं इतका विसंबून राहूं लागला. तथापि रेमंड आणि इतर फ्रेंच

---

१. खर्डे येथील लढाई इ. सन १७९५.

अधिकारी यांच्या प्रमुखत्वाखालीं निझामानें आपलें खडें सैन्य वाढविण्याला आणि सुधारण्याला सुरवात केली न केली, तोंच सर जान शोअर यानें मध्यस्थी करून त्याला अडथळा केला.

गव्हर्नर जनरल याला अशी भीति वाटली कीं, म्हैसूरकर आणि मराठे हे दोघेही आपणाविरुद्ध एक होतील, आणि त्याला अशी आशाही वाटली कीं, हे दोन्हीही परस्पर मत्सरी आणि संशयी सत्ताधारी लवकरच पुढें मागें एकमेकांविरुद्ध हातघाईस येतील. परंतु लढाई चालली असतांना थंड रीतीनें बाजूस उभें असलेल्या राष्ट्राचें वर्तन हें क्वचित्च शेजारच्या राज्याचे हितसंबंध अगर मोठेपणा यांना उपयोगी पडण्यासारखें असतें; आणि ह्या वेळीं तर उलट त्यामुळें इंग्लिशांच्या दोन्हीही प्रतिस्पर्ध्यांच्या उपजत लढवय्येपणाला उत्तेजनच दिल्यासारखें झालें. व तें इंग्लिशांनाच अधिक त्रासदायक व भीतिदायक होऊन बसलें. मराठ्यांच्या विरुद्ध निझामाला अंगाबाहेर टाकण्यांत झालेला गैरमुत्सद्दीपणा आतां निदर्शनास येत चालला होता; कारण, या विजयामुळें मराठ्यांना पुष्कळ संपत्ति मिळून त्यांचें वर्चस्व वाढलें; आणि इंग्लिशांसंबंधीं त्यांना असलेला आदरभाव जसजसा नाहींसा होत गेला, तसतशी त्यांची साहसी कृत्यें करण्याची धमकही वाढत गेली. शिवाय, म्हैसूर येथील टिपूसाहेबाचे मनांत इंग्लिशांचा सूड उगविण्याची आणि मागील लढाईंत झालेली नुकसानी भरून काढण्याची अनिवार इच्छा घोळत होती. इंग्लिश लोकांकडून होणाऱ्या अडथळ्याला जर आळा घालण्यांत येईल, तर आपणास सर्व हैद्राबादचें राज्य ताब्यांत घेतां येण्याइतकी निझामाची शक्ति आतां खिळखिळी झालेली आहे, अशी त्याला खात्री वाटत होती. आणि इंग्लिशांच्या सत्तेला प्रतिकार करण्याकरितां परदेशीय लोकांशीं दोस्तीचें बोलणें लावण्याचे आपले प्रयत्नही त्यानें चालू ठेविले होते. परंतु त्यांचा कांहींही उपयोग झाला नाहीं. त्यानें अफगाणिस्थानचा अमीर, शहा झेमन, याला हिंदुस्थानवर स्वारी करण्याचा आग्रह केला, आणि " सर्व

मूर्तिपूजकांचा व अनेकदेवमतवाद्यांचा नायनाट उडविण्याकरितां मी लवकरच हिंदुस्थानावर चाल करून येत आहें," असें त्याला उत्तरादाखल शहाकडून सहानुभूतीचें आश्वासन देण्यांत आलें. इ. सन १७९७ मध्यें त्याप्रमाणें शहा झेमन यानें खरोखरच पंजाबवर चाल करून येऊन लाहोर आपल्या ताब्यांत घेतलें. त्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारास फार भीति उत्पन्न झाली. कारण, सर्व उत्तर हिंदुस्थान त्याच्या आगमनानें खवळून गेलें होतें, व मुसलमान लोक त्याच्या निशाणाखालीं जमा होण्याची तयारी करीत होते. औधचा राज्यकर्ता त्याला कोणताही परिणामकारक प्रतिकार करण्याला अगदींच असमर्थ होता; आणि जर अफगाण लोक तसेच पुढें रेटीत दिल्ली येथें गेले असते, तर त्या बाजूस बंडाळी आणि धोक्याची चळवळ सुरू झाली असती. शिवाय, अशा जबरदस्त शत्रूच्या अकल्पित आगमनानें बंगालच्या सरहद्दीचें संरक्षण करण्याकरितां सर्व उपयोगी पडण्यासारख्या इंग्लिश पलटणी उत्तरेच्या बाजूस निःसंशय न्याव्या लागल्या असत्या. परंतु इराणी लोकांपासून आपल्या पश्चिमेकडील प्रदेशाचें संरक्षण करण्याकरितां शहा झेमन याला इ. सन १७९८ मध्यें जलदीनें परत जाणें भाग पडलें; त्यामुळें हें अरिष्ट सुदैवानें आपोआपच नाहींसें झालें.

मध्यंतरीं टिपू यानें आपलें एक वकीलमंडळ गुप्त रीतीनें हिंदी महासागरापलीकडे 'आइल आफ फ्रान्स' येथें पाठविलें. त्या वकिलांबरोबर पारिस येथील डिरेक्टरीला दिलेल्या पत्रांत त्यानें, "हिंदुस्थानांतील इंग्लिशांचा नाश करण्याच्या उद्देशानें फ्रान्सचें लोकसत्तात्मक राज्य व आपण ह्या उभयतांमध्यें एक आत्मरक्षक आणि अन्यमारक असा दोस्तीचा तह करावा, आणि त्यांचा प्रदेश उभयतांनीं वांटून घ्यावा," अशी सूचना केली होती. 'आइल आफ फ्रान्स' येथील गव्हर्नरानें त्याच्या वकिलांचें सार्वजनिक रीतीनें स्वागत केलें, आणि "जे स्वयंसेवक म्हैसूरच्या निशाणाखालीं उभयतांचेही शत्रु असलेल्या इंग्लिशांच्या विरुद्ध नौकरी

करण्यास तयार असतील, त्यांनीं पुढें यावें, " असा जाहिरनामा प्रसिद्ध केला. इ. सन १७९९ मध्यें बोनापार्ट यानें कायरो मुक्कामाहून त्याला एक पत्र पाठविलें, त्यांत " इंग्लिशांच्या लोखंडी बेडीपासून तुमची मुक्तता करण्याच्या उत्कट इच्छेनें असंख्य आणि अजिंक्य सैन्यासह मी तांबडया समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन पोहोंचल्याबद्दल आपणांस पूर्वीं कळविलेंच आहे, " असें लिहिलें असून आपला एक प्रतिनिधि पाठविण्याविषयींही त्याला कळविलें होतें. परंतु लवकरच ईजिप्तमध्यें स्वतः फ्रेंचांचेंच दळणवळण बंद पडून ते कोंडले गेले, आणि समुद्राच्या अगर जमिनीच्या बाजूनें होणाऱ्या परकीय मदतीच्या बातम्या नाहींशा झाल्या. तेव्हां इंग्लिशांना चांगलेंच भिववून जागें करणारा म्हैसूरचा सुलतान त्यांच्या शत्रुत्वाच्या तोंडीं सांपडला, आणि युरोपस्थ राष्ट्राराष्ट्रांमधील भांडणांत हात घालण्याची जोखीम अंगावर ओढून घेण्याचें धाडस करणाऱ्या पौर्वात्य राज्यकर्त्यांच्या नशिबीं जो परिणाम निःसंशय रीतीनें भोगावयाचें लिहिलेलें असतें, तोच परिणाम त्यालाही पुढें लवकरच भोगावा लागला.

---

१ ता. ३० जानेवारी १७९८.

भाग चौदावा.

लार्ड वेलस्ली ह्या गव्हर्नर जनरलची कारकीर्द.

(१७९८ ते १८०५).

हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचा पाया अठराव्या शतकामध्यें हळु हळु रचला जाऊन पुढील शतकाच्या पहिल्या पांच वर्षांत ही साम्राज्य-रूपी इमारत झपाट्यानें उभारली गेली, आणि तिचा पुष्कळ प्रमाणानें विस्तारही झाला. इंग्लिश राजसत्तेचा अशा रीतीनें अकल्पित विस्तार होण्याला जीं कारणें घडून आलीं, त्या कारणांची माहिती असणें उपयुक्त असल्यामुळें त्या वेळची हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थिति कशी होती, याचें थोडक्यांत ह्या भागाच्या प्रारंभीं दिग्दर्शन केलें आहे. अठरावें शतक संपण्याच्या सुमारास हिंदु व मुसलमान ह्या दोन्ही सत्ता वर्चस्व मिळविण्याकरितां झगडत होत्या, आणि हिंदू धर्माचे मराठे चोहोंकडे आपला पाय मजबूत रोंवीत चालले होते, हें आपण पूर्वीं वाचलेलेंच आहे. मुसलमान लोकांनीं पांच महत्त्वाच्या राजगाद्या स्थापन केलेल्या होत्या. परंतु त्यांपैकीं बंगाल आणि रोहिलखंड ह्या दोन राजगाद्या या वेळीं नाहींशा झाल्या होत्या. आणि बाकीच्या तीन, ह्मणजे औध, हैद्राबाद, व म्हैसूर, यांना मराठ्यांच्या जुटीचें बळ डुरकावण्या देत होतें. मराठ्यांच्या जुटीच्या बळापैकीं शिंद्याजवळ सर्वांत बलिष्ठ सैन्य होतें. दिल्ली व आग्रा या शहरांचा तो धनी बनलेला होता, आणि प्रदेश व सत्ता ह्या दोहोंसही आंचवलेला मोंगल बादशहा हा एकाद्या बाहुल्याप्रमाणें त्याच्या सर्वस्वी

हातांत होता. मराठे सरदारमंडळापैकीं दुसरा, ह्मणजे भोंसले, यानें मध्य प्रांतांत नागपूर हें आपलें राहण्याचें मुख्य ठिकाण केलें होतें. त्यानें विस्तृत प्रदेश काबीज करण्याचा धडाका सुरू केला होता, आणि तो सरसहा खंडणीही उकळीत फिरत होता. तिसरा सरदार, गायकवाड, हा पश्चिम किनाऱ्यावर मुंबईच्या उत्तरेस त्याच मार्गाचें अवलंबन करून बडोदें येथें आपली राजगादी स्थापन करीत होता. आणि चवथा सरदार, इंदूरचा होळकर, हा लुटारू टोळ्यांचा कर्तृत्ववान आणि धाडशी नायक म्हणून प्रख्यातीस आलेला असून त्यानें चोहोंकडे भेदभाव न करितां लूट-फाट चालविली होती. पुणें येथील पेशवा हा आतां ह्या जुटीच्या बळाचा निव्वळ नामधारी प्रमुख राहिला असून, ह्या बेफाम आणि अनियंत्रित सरदारांवरील त्याची सर्व हुकमत नाहींशी होत चालली होती; आणि त्या सरदारांचे दरबार अगर तळ यांच्या आसपासशिवायच्या सर्व हिंदुस्थानभर, इंग्लिशांच्या ताब्यांत अगर संरक्षणाखालीं असलेल्या प्रदेशांशिवायच्या इतर सर्व मुलुखांत, सर्वसाधारणतः बेबंदशाही माजली होती. सर्व देशभर भाडोत्री सैन्याच्या टोळ्यांचा सुळसुळाट माजला होता. हें सैन्य, जो कोणीही पैसा देईल, त्याच्या तर्फे नोकरी करण्यास तयार होतें, आणि या सैन्याचे मालक शक्य असेल तो प्रदेश अगर किल्ले बळकावून आपल्या ताब्यांत घेत होते. या वर्गांतील एक लक्षांत ठेवण्यासारखा व इंग्लिश लोकांना मनोरंजक वाटण्यासारखा मासला ह्मणजे टिपरारी येथील ऐरिश जातीचा जार्ज थामस ह्या नांवाचा एक मनुष्य होय. हा मनुष्य एका गलबतावर अधिकारी होता. त्या गलबतावरून मद्रास येथें उतरून तो थेट उत्तरेकडील प्रदेशापर्यंत गेला; आणि त्यानंतर आपणाला असें आढळून येतें कीं, इ. सन १७९० मध्यें त्याच्या हाताखालीं दहा हजार सैन्य—घोडदळ, पायदळ व तोफखाना मिळून—असून तो आपल्या स्वतःच्या महत्त्वस्थापनेकरितां असाधारण हिंमतीनें आणि लष्करी कौशल्यानें लढत होता, आणि त्यानें दिल्लीजवळच आपल्या स्वतः-

करितां एक लहानसें राज्य निर्माण केलें होतें. परंतु शीख आणि मराठे या दोघांनीं मिळून त्याला पूर्णपणें हतवीर्य केलें, आणि त्यानंतर तो स्वदेशीं परत जात असतांना रस्त्यांतच मृत्यु पावला. शेतकऱ्यांच्या मोठमोठ्या टोळ्या आपापले जमाव करून दंडुकेशाहीच्या कायद्यानें स्वतःच्या खेड्यापाड्यांचें संरक्षण करीत; सर्व कायदेशीर राज्यकारभाराला ते धाब्यावर बसवीत; आणि कित्येक वेळां तर ते मराठ्यांच्या सैन्यालाही भारी होऊन पडत. प्रदेश ओळखण्याच्या सर्व जुन्या निशाण्या नाहींशा झाल्या होत्या; लुटारू लोकांच्या लढायांच्या फिरत्या नशिबाप्रमाणें सर्व देशाचे तुकडे तुकडे होऊन तो विभागला जात होता; प्रमुख प्रमुख राज्यकर्ते हे राज्यावर नवीनच आलेले होते; आणि त्यांचीही शाश्वती नसून त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाची अगर अधिकाराची हद्द हीदेखील स्पष्टपणें ठरलेली नव्हती. मोठमोठ्या राज्यांना सुद्धां प्रदेशनिश्चयात्मक नांवें अगर सरहद्दीच्या निश्चित मर्यादा मुक्रर झालेल्या नव्हत्या; आणि त्या वेळीं कोणत्याही राज्यकर्त्याच्या राज्यव्यवस्थेच्या पूर्ण कक्षेंत येत असलेला प्रदेश नक्की किती आहे, हें निर्णयात्मक रीतीनें ठरविणेंही अशक्य झालें असतें; कारण, त्या प्रदेशाबद्दल नेहमीं भांडणें चालत, आणि त्यांची एकसारखी अदलाबदल चाललेली असे. शिवाय, यांपैकीं पुष्कळ राज्यें तेथील राज्यकर्त्यांच्या नांवावरूनच फक्त ओळखलीं जात असत; कारण, त्यालाच त्या प्रदेशाचा जमिनधारा दिला जात असे, आणि तोच वसुलीची रक्कम सक्तीनें गोळा करण्याकरितां लष्करही बाळगीत असे. आणि त्या वेळच्या प्रमाणें हल्लींही मराठी संस्थानांना राजकीय परिस्थितिदर्शक अशीं दुसरीं कोणतींही नांवें नाहींत. उपरिनिर्दिष्ट प्रदेशांखेरीज आणखी असेही कांहीं मोठाले प्रदेश असत कीं, त्यांतील वसुली मराठे व मुसलमान राज्यकर्ते मिळून वांटून घेत; आणि हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जातिभेद आणि धर्मभेद हे राजकीय विभागांचे दर्शक नसत; कारण, हिंदू लोक मुसलमानांवर आणि

मुसलमान लोक हिंदूंवर राज्य करीत, व सर्व भाडोत्री सैन्यांमध्येंही ते परस्पर मिसळलेले असत.

परिच्छेद पहिला—म्हैसूर (१७९९).

ज्या दिवशीं टिपू सुलतान यानें पाठविलेले वकील—आपल्याबरोबर आणलेल्या कांहींशा तुटपुंज्या जमावाच्या स्वयंसेवकांसह, आणि टिपूच्या स्नेहभावाच्या व सख्यत्वाच्या मागणीचा फ्रान्समधील लोकसत्तात्मक राज्य लवकरच मोठ्या आनंदानें योग्य परामर्ष घेईल, अशा फ्रेंच गव्हर्नरनें दिलेल्या अभिवचनासह—'आईल आफ फ्रान्स'[1] मधून परत येतांना मंगलोर येथें उतरले, त्याच दिवशीं, ह्मणजे इ. सन १७९८ च्या एप्रिल महिन्यामध्यें, लार्ड मार्निंगटन, ज्याला मागाहून मार्किस आफ वेलस्ली असें नामाभिधान प्राप्त झालें, तो कलकत्त्यास जाण्याकरितां मद्रास येथें येऊन उतरला. लार्ड मार्निंगटन हा हिंदुस्थानांत आल्यावर लागलीच त्याला अशी स्पष्ट सूचना देण्यांत आली होती कीं, म्हैसूरचें फ्रेंचांबरोबरील दळणवळण, ह्मणजे त्यानें प्रत्यक्ष लढाई करण्यासारखेंच हें कृत्य आहे, असें मानून चालावें. हेनरी डंडास[2] यानें त्याला, " सर्वसाधारण तत्त्व ह्मणून मी असें खात्रीनें ह्मणतों कीं, टिपूच्या सैन्यांत फ्रेंच सैनिकांची, मग ती थोडी असो अगर फार असो, भरती झाल्यामुळें तो प्रत्यक्ष आपला शत्रु झाला, असें मानण्यास हल्लींच्या परिस्थितींत आपणास हक्क पोंचतो, " असें लिहून पाठविलें होतें. आणि कलकत्ता येथें येऊन पोंचल्यानंतर थोडक्याच महिन्यांनीं लार्ड मार्निंगटन यानें, हिंदुस्थानांतील एतद्देशीय सत्ताधाऱ्यांच्या सैन्यांत आणि मंत्रिमंडळांत फ्रेंच पक्षाची वाढ हें एक भीतिदायक अरिष्ट असून त्याचें निर्मूलन करणें अत्यवश्यक आहे, असें बोलूनही दाखविलें होतें.

---

१. मारीशस हें फ्रेंचांच्या ताब्यांत होतें, तोंपर्यंत त्यास 'आइल आफ फ्रान्स' असें म्हणत असत.

२. हिंदुस्थानांतील कामकाजासंबंधानें मिळालेल्या पंचमंडळाचा अध्यक्ष.

या कारणामुळें, टिपूच्या वकिलानें 'आइल आफ फ्रान्स' मधून परत येतांना " हिंदुस्थानांतून इंग्लिशांच्या राज्याचा कांटा पार उखडून टाकण्याच्या विशिष्ट उद्देशानें" फ्रेंचांकडून संरक्षणात्मक आणि विग्रहात्मक अशा दोस्तीचेंच फक्त अभिवचन मिळविलें आहे, इतकेंच नाहीं, तर म्हैसूरच्या सैन्याकरितां कांहीं फ्रेंच अधिकारी व नवे शिपाईही त्यानें येतांना आपणाबरोबर आणले आहेत, ही गोष्ट जेव्हां लार्ड मार्निंगटन यास समजून आली, तेव्हां लढाई करण्याला आपणालाही योग्य सबब आहे, असें त्यानें ठरविलें. त्याच्या लष्करी उत्साहाला एकदम चेव आला; आणि आपली स्वतःची पूर्ण तयारी नाहीं, असें आढळून आल्यामुळेंच टिपूवर तडकाफडकी करावयाच्या हल्ल्यापासून त्याला परावृत्त व्हावें लागलें. उत्पन्नाच्या बाबतींत कायमचा तुटवडा पडलेला होता, नाण्याच्या बाजारांतील कंपनीची पत फारच खालावलेली होती, लढाईशीं तोंड देण्याला मद्रास येथील सैन्य कमकुवत होतें, आणि आपले दोस्त निझाम व मराठे यांचेकडून साह्य मिळण्याची तर त्याला इतकी जबरदस्त शंका होती कीं, त्यामुळें त्यांना या बाबतींत बोलावणें अशक्य आहे, असें त्यास वाटत होतें. निझामाचा कमकुवतपणा आणि त्याच्या मनांत इंग्लिशांविषयीं उत्पन्न झालेली अप्रीति, टिपूची अनिष्टसूचक तयारी, आणि मराठ्यांच्या सत्तेची वाढ, ह्या गोष्टी, तटस्थ राहण्याच्या परिणामाचीं फळें ह्मणून, आतां दृग्गोचर झाल्या होत्या. इंग्लिशांच्या तटस्थ वृत्तीच्या — इ. सन १७९२ ते १७९८ पर्यंतच्या — सहा वर्षांत, टिपू व मराठे यांनीं — आपली युद्धसामग्री वाढवून, आणि आसपासच्या कमकुवत राजांच्या ताब्यांतील हिसकावून घेतलेल्या प्रदेशानें आपल्या राज्याचा विस्तार करून, — स्वतःचा फायदा करून घेतला. खरडे येथें निझामाचा पराभव झाल्यानें मराठ्यांना शरण जाणें त्याला भाग पडलें. त्यामुळें हिंदुस्थानांतील एक मोठी आणि प्रमुख सत्ता ह्मणून राहण्याचे ऐवजीं निझामाला मराठ्यांना करभार देणारा एक मांडलिक व्हावें लागलें, आणि फ्रेंच अधिकाऱ्यांच्या धुरीणत्वाखालीं अस-

लेलें चौदा हजार सैन्य—एवढाच काय तो फक्त त्याच्या सत्तेला आधार राहिला. लार्ड मार्निंगटन यानें असें लिहिलें आहे कीं, हैद्राबाद येथील ह्या शिकलेल्या पलटणी हेंच निझामाच्या मनांत इंग्लिशांविषयीं अप्रीति असण्याचें मुख्य कारण आहे; आणि त्याला अशीही खात्री वाटत होती कीं, जर हें सैन्य टिपूविरुद्ध लढाई करण्याकरितां रणक्षेत्रावर आणलें गेलें, तर तें निझामाच्या तर्फेनें न लढतां उलट टिपूलाच बहुधा निःसंशय जाऊन मिळेल. मराठ्यांची राजधानी पुणें येथें दौलतराव शिंदे (महादजी शिंद्याच्या मागून गादीवर आलेला त्याचा दत्तक मुलगा) याचें वजन पूर्णत्वास पोंचलेलें होतें, त्यानें मध्य हिंदुस्थानांतील पुष्कळ प्रदेश आपल्या आधिपत्याखालीं आणलेला होता, आणि औंध व बंगाल यांमधील इंग्लिशांच्या ताब्यांतील प्रदेशाच्या सरहद्दीला लागून उत्तरेकडे थेट दिल्लीपर्यंत त्यानें आपल्या ताब्यांतील प्रदेश वाढवीत नेला होता. थोडक्यांत म्हणावयाचें ह्मणजे, तो उत्तर व मध्य हिंदुस्थानामध्यें एक प्रबळ राज्यकर्ता झालेला असून त्यानें आपलें वर्तनही दुटप्पी ठेविलेलें होतें. पेशवे व निझाम या दोन्हीही राज्यकर्त्यांना तो भिववीत होता, आणि म्हैसूरचा नाश करण्यांत मराठ्यांनीं इंग्लिशांना मदत केल्यामुळें त्यांच्या अदूरदर्शीपणाबद्दल तो त्यांना दोषही देत होता. शिवाय, ह्याच वेळेच्या सुमारास इकडे लार्ड मार्निंगटन याला अफगाणिस्थानचा राज्यकर्ता, शहा झेमन, याजकडून —हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा माझा इरादा आहे, आणि मराठ्यांच्या तावडींतून मोंगल बादशहा, शहा अलम, याची सुटका करण्यांत मला आपली मदत मिळावी,—अशा आशयाचें पत्र मिळालें होतें.

अशा परिस्थितीमध्यें गव्हर्नर जनरल यानें प्रसंग ओळखून आपला म्हैसूरकराबरोबरील पत्रव्यवहार फक्त समाधानकारक खुलासा मागण्यापुरताच चालू ठेवावा, असा निश्चय केला; आणि इकडे आपलें त्रिकूट दोस्तमंडळ—हैद्राबाद आणि पुणें येथील दरबारांत इंग्लिशांच्या त्या वेळीं असलेल्या डळमळीत संबंधामुळें त्यानें राजकारणांतील अत्यंत मुत्सद्देगिरी-

नें केलेल्या व्याख्येप्रमाणेंचें मंडळ—बळकट करण्याची, आपली तिजोरी पूर्व स्थितीवर आणण्याची, आणि मद्रासच्या सैन्याला कुमक पाठविण्याची त्यानें जारीनें सुरवात केली. त्यानें अगदीं पहिल्या प्रथम हैद्राबाद येथें असलेल्या फ्रेंच लष्कराला रजा देण्याबद्दल निझामाबरोबर तह घडवून आणला; त्यानंतर तें कृत्य विशेष कौशल्यानें आणि निश्चयानें तडीस नेण्यांत आलें; व त्या सैन्या ऐवजीं निझामाच्या प्रदेशांत कायमचें राहण्याकरितां इंग्लिश अधिकाऱ्यांच्या धुरीणत्वाखालील सैन्य त्यास देण्यांत आलें. पुणें येथील मराठा दरबारांतही अशाच प्रकारची सूचना करण्यांत आली. परंतु मराठे हे इंग्लिशांच्या वर्चस्वाविषयीं अत्यंत साशंक असून मदतीविषयीं तर अगदींच अनपेक्ष होते. शिवाय, अशा व्यवस्थेनें 'तैनाती सैन्याच्या कुमकेची दोस्ती' ह्या नांवाखालीं जें राज्य सैन्याच्या कुमकेबद्दल संपत्तीचा पुरवठा करतें, तें राज्य संपत्तीच्या बदल्यांत सैन्याच्या कुमकेचा पुरवठा करणाऱ्या राज्याच्या लष्करी नियंत्रणाखालीं जात असल्यामुळें, पेशव्यानें स्वाभाविक रीत्याच ह्या सूचनेकडे दुर्लक्ष केलें होतें.

तथापि निझाम आणि पेशवे हे दोघेही म्हैसूरकराविरुद्धच्या कटांत सामील होण्याला कबूल झाले; आणि म्हैसूरच्या सुलतानानें आपल्या नोकरींतील फ्रेंचांच्या हातांतून शस्त्रें काढून घ्यावींत, व त्यांचेबरोबर असलेली आपली दोस्ती सोडून द्यावी, असें त्यास योग्य रीतीनें निक्षून कळविण्यांत आलें. परंतु त्यानें ह्या मागण्यांसंबंधीं कानाडोळा अगर टाळाटाळी केली; त्यामुळें इ. सन १७९९ च्या प्रारंभीं त्रिवर्गाच्या एकत्र झालेल्या सैन्यानें त्याच्यावर चाल केली. टिपू यानें आपल्या शत्रुत्रयीपुढें टिकाव धरण्याचे कांहीं प्रयत्न केले, परंतु त्यांत त्याला यश न येऊन उलट तोच श्रीरंगपट्टण येथें हांकालला गेला. त्यानंतर मे महिन्यांत हल्ला करून तेथील किल्ला हस्तगत करून घेईपर्यंत तो तेथें तसाच अडकून राहिला होता. ह्या हल्ल्यांत टिपू हा मृत्यु पावला, (तो

किल्ल्यांतील दरवाजांपैकीं एका दरवाजावर हातघाईच्या चकमकींत मारला गेला,) त्यामुळें म्हैसूरच्या ह्या अल्पायुषी मुसलमान राजघराण्याचा अशा अकल्पित रीतीनें शेवट झाला! लार्ड मार्निंगटन यानें — इंग्लिश व त्यांचे उभयतां दोस्त सरकार यांचे मध्यें-त्या राज्यांतील कांहीं भागाची वांटणी करून, तें राज्य मोडून टाकलें; आणि बाकी राहिलेल्या प्रदेशाचें एक नवें राज्य निर्माण करून, तें म्हैसूरच्या जुन्या हिंदू राजघराण्याच्या हवालीं केलें. ह्याच जुन्या हिंदू राजघराण्यांतील राज्यकर्त्यास पूर्वी हैदर अल्ली यानें काढून लाविलें होतें. त्यानंतर मध्यंतरीं ब्रिटिश सरकार पुष्कळ काळपर्यंत ह्या राज्याचा कारभार " म्हैसूर कमिशन " मार्फत चालवीत होतें; शिवाय, हल्लीं ही म्हैसूरची राजगादी ह्याच घराण्याच्या वंशजाकडे असून तेथील राज्यकर्ता त्या संस्थानचा राज्यकारभार चांगल्या प्रकारानें व शांत रीतीनें चालवीत आहे.

ह्या लष्करी आणि राजकीय धाडशी कृत्यांचें यश विशेषतः कर्नल आर्थर वेलस्ली ह्यास असून तो या मोहिमेंत हजरही होता. योद्धा आणि मुत्सद्दी ह्मणून ह्याच ठिकाणीं त्याची उज्ज्वल कीर्ति व्हावयाची होती, आणि तेथेंच तो आतां अगदीं पहिल्यानेंच पुढें आलेला होता. शिवाय, जरी त्याचा लष्करी हुद्दा लहान होता, तरीही लार्ड मार्निंगटन याला — सर्व लष्करी खात्याची योग्य पुनर्घटना करण्याकरितां, आणि तडकाफडकीच्या निर्णयात्मक चकमकींनीं लढाईचा शेवट करण्याकरितां — त्यानें वेळोवेळीं दिलेल्या सल्लामसलतीवरूनच त्याच्यांत असलेली सर्वदर्शी आणि हुकमतीची बुद्धि व लढाईंतील त्याची उत्सुकता आणि चातुर्य, हीं दृग्गोचर झालीं होतीं. " फ्रेंचांचीं भयंकर कारस्थानें आणि बेत त्यांच्या इतक्याच तडफीनें व कर्तृत्वानें मोडून पाडल्याबद्दल, व मुख्यत्वेंकरून दक्षिणेंत असलेली त्यांची सत्ता व वजन हीं नाहींशीं केल्याबद्दल, " गव्हर्नर जनरल याचें—हाउस आफ कामन्समध्यें सर्वानुमतें आभार

मानून–अभिनंदन करण्यांत आलें. शिवाय, या ठरावांत आणखी " त्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश राष्ट्राचें स्वास्थ्य आणि भरभराट हीं त्यानें शाश्वत टिकणाऱ्या पायावर स्थापन केलीं, " असा उल्लेखही करण्यांत आला. या अधिकारयुक्त वाणींत, ह्मणजे सार्वजनिक खलित्यांत साधारणतः पहिल्यानेंच दिसून येणाऱ्या शब्दांत, आणि सुमारें वीस वर्षांपूर्वी इंग्लिशांची परिस्थिति, व त्यांच्या वरील जबाबदाऱ्यांची वाढ, यांची पार्लमेंट सभेपुढें चर्चा होत असतांना वापरलेल्या धरसोडीच्या–किंबहुना स्वसमर्थनपर–अशा भाषेंत, विलक्षण फरक दिसून येतो.

टिपू हा क्रूर, धर्मवेडा आणि अशिक्षित असा मुसलमान राज्यकर्ता होता, तरीही आशिया खंडांतील राज्यकर्त्यांना त्या वेळच्या हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांत आपलें स्वतःचें नांव गाजविण्याला अवश्य असलेले कांहीं खंबीर प्रकृतीचे गुण त्याच्या अंगीं वास करीत होते. परंतु त्याचें दैव फिरलें होतें, असेंच खरोखर म्हटलें तरी चालेल. त्याच्या अंगीं उच्च प्रकारचें राजकीय कर्तृत्व नव्हतें; आणि ज्या उपजत बुद्धीनें युरोपियन लोकांबरोबर होणारी टक्कर टाळण्यापासून आशियांतील अत्यंत कर्तृत्ववान व बलाढ्य अशा राज्यकर्त्यांनाही कित्येक वेळां परावृत्त केलें आहे, तिचा तर त्याच्या ठिकाणीं मुळींच गंध सुद्धां नव्हता. जो पाण्याचा लोंढा म्हैसूरपेक्षांही पुष्कळ मोठमोठ्या राज्यांना गडप करून टाकीत होता, जो जगाच्या एका लांबच्या भागांतून उत्पन्न झालेला असून ज्याचा उगम त्याच्या समजुतीच्या व शक्तीच्या अगदीं अटोक्यापलीकडील गोष्टींत होता, व जो एककेंद्राभिमुख घटनांच्या स्वाभाविक परिणामानें इंग्लिशांना हिंदुस्थानांतील श्रेष्ठ वर्चस्व देणाऱ्या नदाच्या पात्रांत पूर्ण जोरानें तुडुंब वहात होता, त्याच लोंढ्यानें म्हैसूरचा सुलतान टिपूसाहेब हा वहात जाऊन पार नामशेष झाला. ज्या वेळीं ब्रिटिश लोकांचें फ्रान्सबरोबर कट्टें व कधींही दिलमिलाई न होण्यासारखें निकराचें कडवें शत्रुत्व होतें, आणि ज्या वेळीं ते हिंदुस्थानांतील

१. अक्टोबर १७९९.

इंग्लिशांच्या ताब्यांतील प्रदेशावर शक्य असल्यास घाव घालण्याचा आपला इरादा जाहीर करीत होते, त्याच वेळीं टिपूच्या नशिबानें त्यांच्याशीं दोस्ती करण्याची धाव घेतली. युरोपस्थ लोकांच्या आपसांतील अशा भांडणांमध्यें जो कोणी इंग्लिशांच्या विरुद्ध अशा रीतीनें म्यानाबाहेर तरवार उपसण्याचा अगदीं यत्किंचित्‌ही आपला इरादा दाखवील, त्याच्या हातांतून ती एकदम हिसकावून घेण्यांत येईल, अशी त्याला स्पष्ट सूचना देण्यांत आली होती; आणि आपले दोस्त असलेले फ्रेंच हे फार लांबीच्या पल्लयावर असून आपण भिवविलेले—परंतु एतद्देशीय सत्ताधाऱ्यांचें पाठबळ असलेले—इंग्लिश हे आपल्या अगदीं सरहद्दीजवळ आहेत, ह्याही गोष्टीचा त्याला विचार करितां आला असता. परंतु इंग्लिशांच्या मागण्यांना कबूल होणें, ह्मणजे त्यांच्या सत्तेच्या आधीन होणें, स्वतःच्या हत्यारांना रजा देणें, आपल्या स्वातंत्र्याची फारकत करणें, व त्यानंतर—ज्याचे परराष्ट्रीय संबंध आणि लष्करी व्यवस्था, हीं तंतोतंत इंग्लिश राजकारणाच्या अनुरोधानेंच चालतात,-अशा खालावलेल्या राज्यकर्त्याच्या स्थितींत येऊन पडणें होय, ही गोष्ट तो पूर्णपणें जाणून होता. या कारणामुळेंच त्याच्या उद्दाम व उच्छृंखल स्वभावानें उचल घेतली; आणि आपण यशस्वी होऊं, अशी त्यास आशा नसूनही तो ह्या युद्धास प्रवृत्त झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

अशीच परिस्थिति, इतक्या विशिष्ट स्वरूपाची नसली तरी, त्यानंतरही पुष्कळ वेळां घडून आलेली आहे. इतर राज्यें आणि राज्यकर्ते ह्यांसही याचप्रमाणें इच्छेनुरूप मार्ग पसंत करण्यास सांगण्यांत आलें असून, हिंदुस्थानांतील—त्यांत असलेल्या मोठमोठ्या प्रदेशांसह व असंख्य मांडलिक संस्थानांसह—इंग्लिश राज्याचें हल्लींचें स्वरूप व घटना हीं, आपण होऊन अंकित झालेल्या, अगर अंकित होणें भाग पाडलें गेलेल्या, राज्यांचें एका मोठ्या राष्ट्रांत उत्तरोत्तर होत गेलेलें ऐतिहासिक दृष्ट्या एकीकरण दाखवितात. शिवाय, मोंगल राष्ट्रही अशाच पद्धतीनें क्रमा-

क्रमानें प्रदेश जिंकून उभारण्यांत आलें होतें. त्यामुळें ज्या वेळीं ही मोंगल राष्ट्राची इमारत कोसळून तिचे तुकडे तुकडे झाले, त्या वेळीं ज्याच्याकडून आपलें संरक्षण व्हावें ह्मणून कमकुवत राज्यें याचना करतील, आणि ज्याचें वर्चस्व साध्या अगर सक्तीच्या उपायांनीं खंबीर प्रतिस्पर्ध्यांनाही मान्य करणें भाग पडेल, अशा कोणत्याही केंद्रीभूत सत्तेच्या आकर्षणाकडे हे तुकडे लवकरच ओढले जातील, असें खात्रीनें ठरल्यासारखेंच होतें. इंग्लिशांना बंगाल प्रांताचा ताबा मिळाल्यानें त्यांच्या सत्तेला केंद्रस्थान व भक्कम मध्यबिंदुस्थान मिळालें, त्या वेळेपासूनच ही समीकरणपद्धति जोराच्या अडथळ्याविरुद्धही–हळु हळु, पण नेटानें–सुरू झाली होती; आणि तें शतक संपण्याच्या सुमारास तर त्याला पुष्कळच अंतःस्फूर्ति आणि वेग मिळाला होता. कारण, हिंदुस्थानांतील आपल्या ताब्यांत असलेल्या प्रदेशाच्या बंदोबस्ताकरितां गव्हर्नर जनरल याला आतां इंग्लंडच्या राष्ट्राचा प्रत्यक्ष दुजोरा आणि निश्चय यांचें पाठबळ मिळूं लागलें, आणि त्या धामधुमीच्या काळाच्या रागरंगाची छटा त्याच्या सर्व कृतींतही दृग्गोचर होऊं लागली. हेस्टिंग्सच्या कारकीर्दींत जें कृत्य अन्यायाचें ह्मणून ठरलें गेलें असतें, तेंच कृत्य लार्ड मार्निंगटन (आतां मार्किस आफ वेलस्ली) याच्या कारकीर्दींत सार्वजनिक अवश्यकतेनें केलेल्या तडकाफडकीच्या इलाजाहून अधिक कांहींही नाहीं, असें ठरलें गेलें. ह्या दोन्ही मुत्सद्यांचीं मतें व राजकारणाचें धोरण हींही वास्तविक रीत्या परस्पर सारखींच होतीं. परंतु उभयतांना लाभलेली परिस्थिति मात्र इतकी परस्परविरुद्ध होती कीं, हेस्टिंग्स हा आत्मरक्षणाकरितां सांपत्तिक अडचणींत मोठ्या कष्टानें सारखा झगडत होता, आणि त्याच्या उलट, वेलस्ली याला इंग्लंडमधील लढाई खात्याच्या प्रधानमंडळाचा पूर्ण दुजोरा असून त्यानें बेधडक भव्य प्रमाणावरील विग्रहात्मक लढायांचें सत्र सारखें धडकावून सुरू केलें होतें.

परिच्छेद दुसरा—सहकारी कुमकेदाखलचे तैनाती तह.

म्हैसूरचें मुसलमानी राज्य नष्ट होण्यानें दोन महत्त्वाच्या गोष्टींनीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याची प्रगति झाली. त्यांपैकीं पहिली ही कीं, त्यामुळें दक्षिण हिंदुस्थानामधील इंग्लिशांच्या प्रदेशाला सतत तीस वर्षेपर्यंत ज्या त्यांच्या कट्टया दुष्मनाच्या स्थितीमुळें धोका असे, त्या दुष्मनाचा कांटा आतां पार उखडून टाकण्यांत आला; आणि दुसरी ही कीं, हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या खालील भागाजवळील समुद्र किनारा त्यांच्या पूर्ण आधिपत्याखालीं येऊन त्यामुळें फ्रेंचांकडून होणाऱ्या उपद्रवाची भीति पुष्कळच प्रमाणानें नाहींशी झाली. शिवाय, "कर्नाटकच्या नबाबीवर कोणाची हुकमत?" या प्रश्नाच्या स्वरूपाच्या ज्या सत्तेबद्दल डुप्ले व क्लाइव्ह यांच्या वेळीं फ्रेंच व इंग्लिश यांचेमध्यें कडाक्याचे युद्धकलह झाले होते, ती कर्नाटकची नबाबी सत्ताही त्यामुळेंच वास्तविक रीत्या नाहींशी झाली. कर्नाटकच्या नबाबीवरील हुकमतीसंबंधाच्या ह्या चाललेल्या युद्धकलहांत इंग्लिश लोक विजयी झाल्यानंतर, त्या वेळेपासून संरक्षित दोस्त सरकार आणि मांडलिक राज्यकर्ता ह्या स्थितींतून तेथील नबाबाचें रूपांतर होत होत तो निव्वळ नामधारी सत्तेचें बाहुलें या स्थितींत येऊन पोंचलेला होता. कंपनी सरकाराकडून त्याचें संरक्षण होत असे; परंतु त्याबद्दल कुमकेदाखल मिळालेल्या तैनाती फौजेचा खर्च पुरा पाडण्यांत त्याच्या बहुतेक सर्व उत्पन्नावर टांच बसली होती, आणि तो अशा कष्टदायक स्थितींत आलेला असल्यामुळें त्यानें स्वाभाविक रीत्याच आपल्या सावकाराचा शत्रु असलेल्या म्हैसूरच्या सुलतानाबरोबर गुप्त रीतीनें पत्रव्यवहार सुरू ठेविलेला होता. म्हैसूर हस्तगत झाल्यावर इंग्लिशांना त्याचीं पत्रें सांपडलीं; त्यामुळें लार्ड वेलस्ली याला—बाह्य राजकीय कारस्थान आणि अंतःस्थ अव्यवस्थित राज्यकारभार ह्या जोड मुद्दयावर कर्नाटक सर्वस्वी इंग्लिशांच्या राज्यकारभाराखालीं आणण्याला आपणाला न्यायदृष्टीनें

पाहतां पूर्ण अधिकार पोंचतो,---असें आढळून आलें. शिवाय, दुहातीं विभागलेली सत्ता, ही पद्धत देशाला अत्यंत अनिष्टकारक आहे, असें त्याचें ह्मणणें असून याच निर्विवाद कारणाकरितां त्यानें तंजावर आणि सुरत येथील राज्येंही कर्नाटकप्रमाणेंच खालसा केलीं.

गव्हर्नर जनरल, लार्ड वेलस्ली, यानें या वेळीं, "ज्या घटनेच्या योगानें हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या सुरक्षितपणाला धोका आणण्यासारखें जुटीचें बळ उत्पन्न करण्याचीं अगर कोणतेही इलाज चालू ठेवण्याचीं एतद्देशीय राजेरजवाड्यांचीं साधनें हिरावून घेतलीं जातील,आणि आशियांतील प्रत्येक राज्यकर्त्याला ओळखण्याची विशिष्ट खूण ह्मणून असलेल्या जुलमाच्या आणि महत्त्वाकांक्षेच्या चळवळ्या स्वभावावर सर्वसाधारण दाब ठेवून हिंदुस्थानची शांतता कायम राखण्याला ज्या घटनेमुळें इंग्लिश सरकार समर्थ होईल," अशा घटनेचे तैनाती तह करून हिंदुस्थानांतील सर्व राजेरजवाड्यांमध्यें ब्रिटिश सत्तेचें वर्चस्व स्थापन करावें, असा आपला उद्देश आहे, असें जाहीर केलें होतें[1]. आणि हें सर्वसाधारण नियंत्रण---एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या हक्कांचें संरक्षण व हमी घेण्याच्या करारावर दोस्ती करून---घडवून आणावें, अशी त्याची इच्छा होती. स्पष्ट ह्मणावयाचें ह्मणजे, लार्ड वेलस्ली याला आशियांतील राजेरजवाड्यांमध्यें चळवळी महत्त्वाकांक्षा असणें ही गोष्ट अक्षम्य वाटली; ह्मणून त्यानें---प्रत्येक राज्यकर्त्यानें आपलें सैन्य कमी करावें, आणि बाह्य संरक्षण व अंतःस्थ स्वास्थ्य या बाबतींत इंग्लिश सार्वभौमत्वाच्या श्रेष्ठ सत्तेवर अवलंबून रहावें,---असा आग्रह धरिला; शिवाय, इंग्लिश सरकारचा त्या वेळीं ज्या ज्या राज्यकर्त्यांबरोबर संबंध जडलेला होता, त्या सर्वांना ब्रिटिश सत्तेच्या संरक्षणाखालीं आणण्याचा त्यानें पूर्वींच निश्चय करून ठेविला होता.

वर निर्दिष्ट केलेल्या तैनाती तहांच्या ह्या पद्धतीसंबंधानें थोडासा खुलासा करणें अवश्यक आहे. कारण, इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील राज्य-

---

१. लार्ड वेलस्ली यानें इंग्लंडमध्यें पाठविलेल्या खलित्यांतील उतारा.

विस्ताराच्या बाबतींत ह्या पद्धतीनेंच पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी घडवून आणलेल्या आहेत. ज्या वेळीं इंग्लिशांनीं आपलें सैन्य कांहीं एतद्देशीय राजेरजवाड्यांना मदतीदाखल देण्याची सुरवात केली, त्या वेळेपासूनच हिंदुस्थानांतील लढायांत त्यांच्या भाग घेण्याच्या " ओ, ना, म्या, " ला सुरवात झाली, ही गोष्ट आपण पूर्वी वाचलेलीच आहे. याच्या पुढील पायरी म्हणजे, इंग्लिशांना येऊन मिळालेल्या एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या प्रायः मदतीनें जेव्हां इंग्लिश लोक आपल्या स्वतःकरितां लढूं लागले, तेव्हां आली. परंतु ह्या एतद्देशीय सैन्याला शिस्त नव्हती, ते विश्वासपात्र नसत, आणि ते अतिशय अडाणी रीतीनें वहिवाटले जात असत. त्यामुळें इंग्लिश सेनापतीला रणक्षेत्रांत आपल्या मागें व पुढें पाहणें नेहमींच भाग पडत असे; कारण, त्याचे दोस्त आणीबाणीच्या वेळीं स्वतः निराळे राहून अयोग्य औदासीन्य दाखवीत, आणि दोन्हीहि लष्करी तळांवर निःशंकपणें लूटफाट मिळविण्याकरितां पुन्हां हजर होऊन त्यांतल्या त्यांत अपजयी पक्षाकडे अधिक आवडीनें तें आपला मोर्चा फिरवीत. विशिष्ट प्रकारच्या व्यवस्थित सैन्यरचनेस योग्य व सरबत्तीच्या माऱ्यापुढें आगींतही दृढ निश्चयानें टिकाव धरण्यास लायक असें सैन्य जवळ असणें, ही अवश्यक गोष्टींपैकींची एक गोष्ट होती. परंतु ती साध्य होण्याकरितां शिपाई लोकांना नियमित रीतीनें वेतन दिलें पाहिजे, आणि एकाच धन्याची हुकमत पाळण्याचेंहि त्यांना शिकविलें पाहिजे. त्यामुळें त्यांना फक्त युरोपियन अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालीं ठेविल्यापासून कांहींही उपयोग होण्यासारखा नव्हता. ह्मणून लवकरच या पद्धतीचें असें रूपांतर झालें कीं, एतद्देशीय दोस्त सरकारांनीं—सैन्याचा नव्हे, पण संपत्तीचा — पुरवठा करावा, आणि इंग्लिशांनीं त्याच्या बदल्यांत ठराविक सैन्य उभारावें, त्याला शिक्षण द्यावें, आणि त्याच्या खर्चाला पुरेशी खंडणी मिळाल्यावर त्या सैन्याला बटवडा करावा. ह्या कारणामुळें या बाबतींत इंग्लंडनें युरोपांतील राष्ट्रांबरोबर केलेले सहकारी कुमकेदाखलचे तह, आणि हिंदु-

स्थानांतील राजेरजवाड्यांबरोबर इंग्लिशांनीं केलेले तैनाती तह, या दोहोंत पुष्कळच फरक पडलेला आहे. कारण, आस्ट्रिया अगर रशिया ह्या युरोपांतील राष्ट्रानें – इंग्लंडनें पुरवठा केलेल्या संपत्तीवर – सैन्य उभारलें; उलट, हिंदुस्थानांत औध व हैद्राबाद यांनीं पुरवठा केलेल्या संपत्तीवर इंग्लिशांनीं सैन्यें उभारलीं. त्या वेळेपर्यंत एतद्देशीय राजेरजवाड्यांनीं अव्यवस्थित आणि अनियंत्रित सैन्य बाळगण्यांत व नेहमीं एकमेकांविरुद्ध लढण्यांत पुष्कळ पैसा खर्चीं घातलेला होता. परंतु आतां इंग्लिशांची निष्णात आणि बिनदिवाळखोर राज्यव्यवस्था ठरलेल्या खंडणीवर त्यांच्या सर्व लष्करी कामकाजाची जबाबदारी आपल्या अंगावर घेण्याला तयार होती. त्यामुळें त्या सत्तेबरोबर करार करून एतद्देशीय राजेरजवाड्यांना––आपल्या वसुलीची काटकसर करणें, बंडखोर सैन्याच्या त्रासांतून सुटणें, व आपल्या राज्यांत पुष्कळच शांतपणानें कालक्रमणा करणें,––ह्या गोष्टी शक्य होत्या.

परंतु सांपत्तिक व्यवहारांत नियमितपणा ह्या गुणाला आशियांतील राज्यकर्ते हे अगदींच पारखे असल्यामुळें, ही सांपत्तिक कुमक पुरी पाडण्यांत अनियामितपणा होणें, ही गोष्ट अगदीं स्वाभाविकच होती; म्हणून त्याच्या पुढील पायरी घेणें, म्हणजे त्याच खंडांत पुष्कळ दिवसांपासून प्रचलित असलेली–सैन्याच्या खर्चाकरितां प्रदेश सोंपवून घेण्याची-- पद्धत सुरू करणें, इंग्लिशांना भाग पडलें. हिंदुस्थानांत त्या वेळीं आकार आणि शक्ति यांमुळें इंग्लिशांना कदाचित् ज्यांची भीति बाळगावी लागली असती, अशीं फक्त तीनच राज्यें (पंजाबशिवाय, कारण, त्या वेळेपर्यंत इंग्लिशांचा त्या राज्याशीं कांहींही संबंध नव्हता,) होतीं. त्यांपैकीं पहिलें––म्हणजे मराठ्यांच्या जुटीचें बळ––हें असून तें अद्याप मजबूत व दोन पैसे बाळगून होतें. परंतु औध व हैद्राबाद हीं दोन्हीही मुसलमानी राज्यें लार्ड वेलस्ली याच्या योजनेला प्रतिकार करण्यासारख्या स्थितींत नव्हतीं; आणि इंग्लिशांच्या संरक्षणाशिवाय स्वतःच्या हिमतीवरच त्या उभयतांपैकीं एकालाही पुष्कळ दिवस तग धरतां येणें हेंही संभ-

वनीय नव्हतें. हैद्राबादच्या निझामाला म्हैसूरच्या विभागणींत पुष्कळ उदारपणानें वागविण्यांत आलें होतें, टिपूचा नाश होण्यानें तो आपल्या एका कट्ट्या दुष्मनाकडून होणाऱ्या त्रासापासून मोकळा झालेला होता, आणि त्यानें इ. सन १८०० मध्यें वाढलेल्या तैनाती फौजेबद्दल होणाऱ्या खर्चाचा नियमित बटवडा करतां येत जावा ह्मणून बराच प्रदेश इंग्लिशांच्या हवालीं केला होता. औधच्या वजिराची स्थिति तर याहूनही पुष्कळच अधिक महत्त्वाची होती. आपण पूर्वीं असें वाचलेलेंच आहे कीं, क्लाइव्ह आणि हेस्टिंग्स यांनीं तेथील राज्यकर्त्याला इंग्लिशांच्या वायव्येकडील सरहद्दीच्या सुरक्षिततेकरितांच आपल्या संरक्षणाखालीं ठेविलें होतें, आणि अजूनही ती सरहद्द त्याच्याच राज्यानें व्यापिलेली होती. परंतु अफगाणिस्थानचा राजा, झेमन शहा, हा आतां पंजाबावर आपली शेवटची दौड करीत होता, मराठ्यांचा सरदार शिंदे याच्या ताब्यांत दिल्ली शहर होतें, व इकडे औधच्या गादीवरील वजीर हा तर अगदींच कमकुवत राज्यकर्ता होता. त्याच्या राज्यांत घोटाळे सुरू झाले होते, त्याचें सैन्य बंडखोर बनलें होतें, इंग्लिशांना तैनाती फौजेच्या बदल्यांत द्यावयाच्या रकमेच्या जबर ताणानें त्याचीं सांपत्तिक साधनें विस्कळित झालीं होतीं, सख्तीच्या उपायाशिवाय आपला वसूल गोळा करणें त्याला अशक्य झालें होतें, त्याचें सैन्य दिवसेंदिवस अधिक तुफानी व उद्दाम होत चाललें होतें, आणि तिजोरी कोरडी पडलेली असल्यामुळें त्याला त्या सैन्याला पगारही बटवडा करतां येत नव्हता. अशा परिस्थितीमध्यें लार्ड वेलस्ली यांनें वजिराकडे हक्कानें अशी मागणी केली कीं, त्यानें आपल्या राज्याचें पूर्ण संरक्षण होण्याकरितां कुमकेदाखल मिळणाऱ्या अधिक तैनाती सैन्याची मदत घेऊन आपल्या अव्यवस्थित सैन्याला रजा द्यावी. औधचा वजीर हा अतिशय कष्टकारक आपत्तीखालीं चिरडला गेलेला असल्यामुळें, मी गादीचा राजीनामा देतों, असें त्यानें जाहीर केलें. परंतु मागाहून त्यानें तो राजीनामा परत घेतला. परंतु

औधचा राज्यकारभार आपल्या हातीं येऊं लागल्यास तो पूर्ण आनंदानें घ्यावा, अशी गव्हर्नर जनरल याची इच्छा होती. त्यामुळें वजिरानें राजीनामा परत घेतला, हें ऐकून त्याला " आश्चर्य वाटलें, वाईट वाटलें, आणि रागही आला. " तथापि हीही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, लार्ड वेलस्ली यानें आपल्या दोस्त सरकारची मनोवृत्ति आणि हितसंबंध यांहून ब्रिटिश राजकारणाच्या प्रधान विचाराला इतकें अधिक महत्त्व दिलें कीं, त्यांत सहनशीलता, आत्मसंयमन, अगर मनाचा थोरपणा, हीं मुळींसुद्धां दिसून आलीं नाहींत. असह्य व अव्यवस्थित राज्यकारभारामुळें होणाऱ्या औधच्या प्रजेच्या गांजणुकींतून तिला सोडविण्याच्या चिंतेनें व्यग्र होऊन तो नैतिक श्रेष्ठत्वाच्या व्यासपीठावरून आपल्या सर्व पत्रव्यवहारांत वजिराची एकसारखी कानउघाडणी करीत होता. तथापि त्याला या विचारांच्या योग्य महत्त्वाची पूर्ण जाणीव होती, हीही गोष्ट निःसंशय आहे. कारण, ब्रिटिश साम्राज्याची मौल्यवान आणि फलावह अशी वृद्धि घडवून आणण्याकरितां, आणि औधच्या वसुलीवर इंग्लिश सैन्याचें बिऱ्हाड टेकण्याकरितां, तें राज्य इंग्लिशांच्या पूर्ण वजनाखालीं व नियंत्रणाखालीं आणावें, हा त्याचा प्रधान हेतु होता; शिवाय, कसेंही असलें, तरी औधची राज्यव्यवस्था पुन्हां सुव्यवस्थित करणें, ही गोष्ट अत्यंत अवश्यक होती; त्यामुळें लार्ड वेलस्ली ह्याच्या कांहींशा हुकमी वाटाघाटीचा परिणाम—वजिरानें रोहिलखंडासह आपले सर्व सरहद्दीचे प्रांत आपला स्वामित्व हक्क सोडून इंग्लिशांच्या हवालीं करणें,—हा झाला. ह्याप्रमाणें अदलाबदल झालेल्या प्रांताचा वसूल सैन्याला बटवडा करण्याच्या रकमे ऐवजीं घेतला जाऊं लागला; आणि हेस्टिंग्स यानें ज्या उभ्या केलेल्या औधच्या आडकाठीच्या राजकारणानें आपली कामगिरी सतत तीस वर्षेंपर्यंत अगदीं योग्य रीतीनें बजाविली होती, तें राजकारणही ह्या व्यवस्थेनें कायमचें रद्द झालें. लार्ड वेलस्ली यानें या वेळीं मराठ्यांकडून होणारे हल्ले आणि वायव्येकडून होणाऱ्या स्वाऱ्या, यांना उघडया पड-

लेल्या प्रांताच्या बाह्य प्रदेशाची सर्व पट्टी औधच्या ताब्यांतून काढून, स्वामित्व-हक्क-त्यागानें, आपल्या ताब्यांत मिळविली, आणि त्या वेळेपासून फक्त नेपाळच्या पहाडी संस्थानानें मर्यादित झालेल्या उत्तरेकडील सरहद्दीशिवाय औधचें राज्य ब्रिटिश सरकारच्या साम्राज्यानें पूर्ण वेष्टिलें गेलें. अशा रीतीनें झालेल्या ह्या अतिशय महत्त्वाच्या वाढीमुळें हिंदुस्थानच्या अंत:प्रदेशांतील गंगानदी व तिला मिळणाऱ्या नद्या यांच्या कांठाला असलेल्या काशीपलीकडील थेट हिमालय पर्वताच्या ओळीपर्यंतच्या प्रांतापैकीं कांहीं अत्यंत श्रीमान आणि भर वस्तीचे प्रांत इंग्लिशांच्या ताब्याखालीं आले. त्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेचें व्यापक पायावर दृढीकरण झालें, वसुलाच्या उत्पन्नाची पुष्कळच वाढ झाली, आणि उत्तर हिंदुस्थानांत शिंद्याच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशाच्या सरहद्दीचा सर्व बाजूंनीं इंग्लिशांच्या सरहद्दीशीं मुकाबला झाला. ह्या झोंबणाऱ्या फरड्या राजकारणावर ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवस्थापक मंडळानें खरमरित टीका केली, परंतु उलट त्याच राजकारणाला इंग्लंडच्या प्रधान मंडळानें अंत:करणपूर्वक मान डोलविली.

परिच्छेद तिसरा—मराठ्यांबरोबरील राजकारण.

(इ. सन १८०२ ते १८०९).

फ्रेंचांनीं ईजिप्त खालीं करून दिल्यावर आणि अमीन येथील तह झाल्यावर लार्ड वेलस्ली ह्याच्या लष्करी व्यवसायरूपी यंत्राची मुख्य कमान कांहीं काळपर्यंत निखळून पडली. ह्या वेळेपर्यंत लार्ड वेलस्ली याला, आपण स्वीकारलेली पद्धत ही निव्वळ आत्मसंरक्षणाची आणि सामदामाची होती, असें ह्मणतां येत असून, फ्रेंचांचे बेत मोडून पाडण्याच्या अवश्यकतेमुळें इंग्लिशांच्या राज्याचा विस्तार करणें, आणि "जगांतील सर्व राजगाद्या हा आपल्या अमर्याद महत्त्वाकांक्षेचा आणि हावऱ्या

लूटफाटीचा एक खेळ आणि शिकार आहे[1], " असें समजणाऱ्या एका राष्ट्राविरुद्ध एतद्देशीय राजेरजवाड्यांचें संरक्षण करण्याकरितां त्यांनीं आपलें सैन्य कमी करावें, असा आग्रह धरणें, ह्या गोष्टी अत्यंत अवश्यक होत्या, असें त्याला प्रतिपादन करतां येत असे. परंतु म्हैसूर, हैद्राबाद आणि औंध, हीं राज्यें आतां फ्रेंचांच्या संपर्कापासून होणाऱ्या धोक्याबाहेर ठेविलीं गेलीं होतीं, त्यामुळें लार्ड वेलस्ली याला, इंग्लिश सत्तेच्या आश्रयाशिवाय स्वतंत्र अशा जर कोणत्याही महत्त्वाच्या एतद्देशीय सत्ता हिंदुस्थानांत अजून शिल्लक असतील, तर त्या फक्त—मराठ्यांच्या जुटीचें बळ—ह्याच होत, असा दप्तरी दाखला ठेवितां आला. फ्रान्सच्या कारस्थानाविरुद्ध त्यानें गंभीरपणानें मराठ्यांना दिलेल्या सूचनांचा त्यांनीं अव्हेर करून, आपणाला जर कोणत्याही एखाद्या सत्तेपासून अस्वास्थ्य असेल, तर ती सत्ता ह्मणजे हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य हेंच फक्त होय, असें त्यांच्या मनानें घेणें, हें विरोधी भावाच्या हेकडपणामुळेंच फक्त शक्य होतें. मराठ्यांचा चळवळ्या स्वभाव, फ्रान्सबरोबर आपलीं कारस्थानें चालू ठेवण्याला त्यांना स्थानिक स्थितीमुळें मिळत असलेले फायदे, आणि शिंद्याच्या नोकरींत असलेला फ्रेंच अधिकाऱ्यांचा भरणा, या सर्व गोष्टींमुळें मराठा राष्ट्राच्या दरबारामध्यें वर्चस्व संपादन करण्याचा उपाय योजणें, आणि ज्यामुळें त्यांना प्रबळ अशी प्रतिबंधक आडकाठी उत्पन्न होईल, अशी राजकीय संबंधाच्या परिस्थितीची घडी जमविणें, ह्या गोष्टी अत्यंत अवश्यक आहेत, अशी गव्हर्नर जनरल याची खात्री झाली होती; आणि मुसलमान राजेरजवाड्यांबरोबर केलेल्या तैनाती तहानें तो आतां उभारण्यांतही आलेली होती. शिवाय, राजकीय निकडीच्या धोरणानेंच जर ह्या गोष्टीचा विचार केला, तर लार्ड वेलस्ली यानें निझाम आणि औंधचा वजीर यांना करणें भाग पाडलेल्या ह्या महाग सौद्याचें अगदीं योग्य रीतीनें समर्थन

---

१. लार्ड वेलस्ली यानें टिपू सुलतानाला लिहिलेलें पत्र पहा (इ. सन १७९९) हें वर्णन केवळ फ्रेंचांनाच लागू पडणार नाहीं, असें त्याला बहुतकरून वाटलें असावें.

करतां येईल, हीही गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे. इंग्लिशांकडून होणाऱ्या संरक्षणाच्या बदल्यांत ह्या राज्यकर्त्यांना खरोखर पुष्कळच घस सोसावी लागली होती. परंतु त्याशिवाय त्यांचा टिकाव लागणें हेंही शक्य नव्हतें. कारण, मराठ्यांनीं त्यांना हळुहळु खाऊन टाकलें असतें, आणि त्यामुळें त्यांची वसुली व ताब्यांतील प्रांत यांत पुष्कळच भर पडून मराठ्यांची सत्ताही अतिशय वाढली असती. मराठ्यांच्या जुटीच्या बळांतील तिघे प्रमुख सरदार---ह्मणजे शिंदे, होळकर आणि भोसले, हे सरदार--वर्चस्व मिळविण्याकरितां आपआपसांत झगडत होते, त्यांचीं सैन्यें लुटालूट करीत व सर्व प्रदेशभर मनसोक्त हात मारीत फिरत होतीं, पुणें येथील पेशवा हा आतां त्यांच्या जुटीच्या बळाचा निव्वळ नामधारी प्रमुख म्हणून राहिला होता, आणि हे तिघेही सरदार त्यास भिववीत होते. त्यामुळें त्यास आपल्या आश्रयाखालीं येण्याबद्दल मागणी करण्याला इंग्लिशांना ही योग्य संधि मिळाली होती. शिवाय, पेशव्याला पालथा घालण्याला जर हीं सैन्यें एकत्र झालीं, तर कदाचित् सर्व मराठा राष्ट्राची हुकमतही त्यांच्या हातीं जाण्याचा संभव होता. आणि विशेष महत्त्वाची गोष्ट ह्मणजे ही कीं, इंग्लिशांच्या विरुद्ध जूट होणें ही त्याच्या पुढील पायरी असून तें घडून येण्याचाही बहुतेक सुमार दिसूं लागला होता.

" हिंदुस्थानांतील शांतता अत्यंत मजबूत पायावर स्थापन करण्याकरितां, आणि फ्रेंचांच्या आगंतुकीला प्रतिरोध करण्याकरितां, मराठा सत्तेला ब्रिटिश सरकारनें आपल्या संरक्षणाखालीं ओढावें, हीच गोष्ट अत्यंत अवश्यक आहे," ह्या लार्ड वेलस्ली याच्या शब्दांत इ. सन १८०३ मधील सर्व परिस्थिति रेखाटलेली आहे. त्याच्या ह्या दूरदर्शी राजकारणाच्या अनुरोधानें मुसलमान राज्यकर्त्यांबरोबर त्यानें केलेले व्यवहार ज्याप्रमाणें यशस्वी झाले, त्याचप्रमाणें मराठा राज्यकर्त्यांशींही व्यवहार करावा, ह्मणून त्यानें खटपट चालविली. बाजीराव पेशव्याबरोबर

तैनाती तह घडवून आणण्याबद्दल इंग्लिशांनीं बरेच वेळां बोलणें लाविलें होतें. तथापि त्यानें तें मनावर घेतलें नव्हतें. परंतु त्यानें यशवंतराव होळकराचा भाऊ विठोजी याला निर्दयपणें हत्तीच्या पायाशीं देऊन ठार मारविलें. त्यामुळें उभयतांमध्यें पूर्ण वैमनस्य माजून होळकर हा पुणें शहरावर चाल करून आला. याच्या उलट, शिंदे हाही पेशव्याच्या मदतीस धावून आला. आणि पुण्याच्या नजदीकच एक जंगी लढाई जुंपली. या लढाईंत होळकराचा बहुतेक पराजयच झाला होता. परंतु त्यानें आपल्या घोडेस्वारांच्या पलटणींचें धुरीणत्व स्वतःकडे घेऊन त्यांच्यावर इतक्या निर्वाणीच्या उत्साहानें चाल केली कीं, त्यांच्या तोफा व लष्करी सामग्री यांचें नुकसान करून त्यानें त्या उभयतांनाही रणक्षेत्रामधून पार हांकलून लाविलें. पेशवा हा एका किल्ल्यावर पळून गेला, आणि तेथून त्यानें – इंग्लिशांनीं आपणास मदत द्यावी – ह्मणून निरोप पाठविला. त्यानंतर लवकरच त्यानें मुंबईजवळील वसईचा आश्रय घेतला, आणि तेथेंच त्यानें इंग्लिशांबरोबरील एका सर्वसाधारण संरक्षक तहावर सही केली. ह्या तहाअन्वयें कायमचें मजबूत तैनाती सैन्य त्याच्या प्रदेशांत राहिलें, त्या सैन्याच्या खर्चाइतका मुलुख त्यानें इंग्लिशांच्या हवालीं केला, आणि ह्याच वेळेपासून पेशव्यांचे सर्व परराष्ट्रीय संबंध ब्रिटिश राजकारणाच्या नियंत्रणाखालीं चालावयाचे, असें ठरलें.

---

१. पुणें येथील इंग्लिश रेसिडेंटाची कचेरी ही बहुतेक रणक्षेत्रावरच होती. यशवंतराव होळकर हा या युद्धांत यशस्वी झाल्यावर दुसऱ्या दिवशीं त्यानें तेथील रेसिडेंटाला आपल्या भेटीस येण्याविषयीं कळविलें. रेसिडेंटानें लिहिलेल्या यादीप्रमाणें ह्मणावयाचें ह्मणजे, त्याला "आलेलें बोलावणें नाकारणें ही शहाणपणाची गोष्ट होईल, असें वाटलें नाहीं." म्हणून तो होळकराच्या भेटीस गेला. त्या वेळीं त्याला असें आढळून आलें कीं, हा यशस्वी सरदार एका लहानशा तंबूंत बसलेला आहे, त्याचे पाय घोट्यापर्यंत चिखलानें भरलेले आहेत, त्याला भाल्याची जखम लागलेली आहे, आणि त्यानें केलेल्या हल्ल्यांपैकीं एकांत त्याच्या डोक्यावर तरवारीचा घावही बसलेला आहे. आपल्या संभाषणामध्यें तो सभ्य आणि मोकळ्या मनाचा असून स्वतःला झालेल्या जखमांविषयीं तो फारच थोडें बोलला, आणि ब्रिटिश सरकाराविषयींचे त्याचे उद्गार तर विशेषच स्नेहभावाचे होते.

वसईच्या तहानें[1] लार्ड वेलस्ली याच्या राजकारणपद्धतीचा दुसरा एक प्रधान हेतु साध्य झाला. कारण, निझामाविरुद्ध मराठ्यांनीं निकड लाविलेल्या जबर मागण्यांच्या बाबतींत इंग्लिश सरकारानें मध्यस्थी करावी, आणि यापुढें अशा सर्व मागण्या त्यांचेकडेच कराव्या, असें ठरल्यामुळें हैद्राबादचें राज्य पूर्णपणें इंग्लिशांच्या संरक्षणाखालीं आलें. हा महत्त्वाचा करार तावडतोब अमलांत आणण्यांत आला; पेशव्याच्या संरक्षणाकरितां जनरल आर्थर वेलस्ली याच्या हाताखालीं एक सैन्याची तुकडी देऊन त्याला पुणें येथें परत रवाना करण्यांत आलें; आणि आपापसांत झगडणाऱ्या मराठा सरदारांना, त्यांच्या मुख्य सरकाराला ब्रिटिश संरक्षणाखालीं घेण्यांत आलें आहे, असें जाणविण्यांत आलें. परंतु ह्या नैपुण्यदर्शक कामकाजाच्या पद्धतीमुळें लार्ड क्यासलरे यालाही भीति वाटली, आणि "जी योजना उच्छृंखल मराठा राष्ट्राशीं कधींही न संपणाऱ्या गुंतागुंतीच्या घोटाळ्यामध्यें आपली गुरफटणा होणास कारणीभूत होण्याचा संभव आहे, तिचा अंगीकार केल्याबद्दल" त्यानें गव्हर्नर जनरल यास कांहींसें झणझणितपणानें लिहिलें. त्याचा जबाब लार्ड वेलस्ली यानें — मराठ्यांच्या दरबारीं फ्रेंचांचें वजन अजूनही भीतिप्रद आहे, — असा पाठविला; आणि त्याच्या ह्या प्रतिपादनाची इंग्लंडच्या प्रधानमंडळावर पूर्ण छाप बसली. कारण, ह्या वेळीं इंग्लंडला थोडासा विसावा मिळालेला होता, व नेपोलियनबरोबर पहिल्याहूनही अधिक चिकाटीनें दुसरा खटका उडावयाचा होता, आणि त्याकरितां प्रधानमंडळ राष्ट्रीय शक्तीचें दृढीकरण करण्यांत त्या वेळीं गढून गेलें होतें.

लार्ड वेस्लली ह्याच्या राजकारणपद्धतीचा आतां कळस होत चालला होता. इंग्लिशांचे राजकीय प्रतिस्पर्धी असलेल्या म्हैसूर, हैद्राबाद, लखनौ, आणि पुणें, ह्या हिंदुस्थानांतील मोठ्या सत्ताधाऱ्यांपैकीं प्रत्येकाच्या राजधानीमध्यें इंग्लिशांचें तैनाती सैन्य स्थानापन्न झालें होतें; ह्या सर्व राज्यां-

१. वसईचा तह, इ. सन १८०२ माहे डिसेंबर.

तील आपसांतील तंटाभांडणें मध्यस्थीकरितां त्यांच्याकडेसच पाठविण्याचें ठरलें होतें; आणि इतर कोणत्याही युरोपस्थ राष्ट्राच्या ढवळाढवळीला सक्त रीतीनें मना करण्यांत आली होती. ह्या आधारस्तंभावर विसंवादी व विषम राजगाद्यांऐवजीं एक टिकाऊ, सुधारलेल्या आणि व्यवस्थित राज्यकारभाराचें अपरिहार्य वर्चस्व तो मजबूत रीतीनें प्रस्थापित करीत होता. परंतु वसईच्या तहानें आपल्या ज्ञुटीच्या बळावर मुळांतच कुऱ्हाड बसली, पुणें येथें इंग्लिशांचें अत्युच्च महत्त्व स्थापन झालें, आणि त्यामुळें त्या शहराविरुद्धच्या आपल्या सर्व हालचालींची गतिच फक्त खुंटली, इतकेंच नाहीं, तर आपलें स्वतःचें स्वातंत्र्यही नष्ट होण्याची खात्रीनें वेळ आली, असें मराठ्यांच्या सरदारांनीं ताडलेलें असल्यानें—त्यांना केव्हांही तो तह आवडणार नाहीं, अशी अटकळ सहज बांधतां येण्यासारखी होती. मराठी राष्ट्राचा मुख्य पुढारी इंग्लिश सरकारच्या नियंत्रणाखालीं गेल्यानें, स्वाभाविक रीत्या क्रमाक्रमानें आपणालाही त्याचप्रमाणें त्यांच्या नियंत्रणाखालीं जावें लागेल, हीच मराठे सरदारांना खरी भीति वाटत होती, आणि त्याबद्दल प्रतिकार करण्याचाही त्यांनीं निश्चय केला होता. त्यांनीं तहाला मान्यता देण्यांत माघार घेतली, पेशव्याला आमच्या संमतीशिवाय असा तह करण्याला काय हक्क पोंचतो, असा प्रश्न केला, आपआपसांतील युद्धें बंद ठेविलीं, आणि त्या सर्वांनाच असलेल्या ह्या भीतीपासून आपलें संरक्षण करण्याकरितां जूट करण्याकडे त्यांचा कल आहे असें दिसून आलें.

लार्ड वेलस्ली यानें शिंद्याला असें कळविलें कीं, पेशव्याची कायदेशीर सत्ता पुन्हां प्रस्थापित करण्याकरितां तो आणि ब्रिटिश सरकार यांचेमध्यें संरक्षक दोस्तीचा तह झालेला आहे, आणि तुम्हीही त्यांत येऊन मिळावें. त्यावर शिंद्यानें त्याचा जबाब असा वळता केला कीं, गव्हर्नर जनरलच्या ह्या माननीय पत्रानें माझा गौरव करण्यांत आला आहे, असें मी समजत असून, मीही फक्त ह्याच उद्देशानें पुणें येथें येत

आहे, तथापि ह्या दोस्तीच्या कराराचा दूरवर विचार करण्याची अवश्यकता आहे. परंतु त्यानंतर लवकरच इंग्लिशांच्या विरुद्ध जूट करण्याच्या इराद्यानें तो इतर मराठा सरदारांबरोबर पत्रव्यवहार करीत आहे, असें आढळून आलें. नागपूरच्या भोसल्याचें (याला सर्वसाधारणतः वऱ्हाडचा राजा असें म्हणत,) इतर सर्व मराठ्यांच्या प्रमुख सरदार-मंडळावर पुष्कळच वजन असून शिंद्यानें आपल्या पक्षासच चिकटून राहण्याबद्दल त्याजकडून वचन मिळविलें होतें. परंतु होळकरानें शिंद्याशीं लढाई बंद करण्याबद्दल जरी मुदतीचा जुजबी तह केला होता, तरीही त्यानें ह्या जुटींत सामील होण्याचें नाकारलें; आणि बडोद्याचा गायकवाड तटस्थ राहिला. तथापि शिंदे हा नागपूरच्या राजाला जाऊन मिळाला. त्या-नंतर त्या उभयतां सरदारांनीं आपल्या इराद्याबद्दल इंग्लिशांच्या वकिला-च्या मागणीचा प्रत्यक्ष जबाब देण्याची टाळाटाळ सुरू केली, आणि थेट हैद्राबादच्या सरहद्दीपर्यंत ते चाल करून गेले. टाळाटाळी करून अवसर मिळाविणें, ही गोष्ट मराठ्यांच्या फायद्याची होती; कारण, ह्या जुटींत सामील होण्याला अजूनही होळकराचें मन वळवितां येईल, अशी त्यांना आशा होती; उलट, ह्याच कारणामुळें, त्या उभयतां सरदारांनीं समेट अगर संग्राम यांमधील कोणती तरी एक थड तडकाफडकी लावावी, ह्मणून त्यांना भाग पाडावें, ही गोष्ट इंग्लिशांनाही तितकीच महत्त्वाची होती. गव्हर्नर जनरल हा आतां पुन्हां आपल्या पूर्व पदावर आला होता. कारण, युरोपांत फ्रान्सशीं पुन्हां लवकरच लढाई होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. इंग्लंडमधील प्रधान मंडळानें त्याला—आमीन येथील तह भंग होण्याचा लवकरच संभव आहे, आणि ईस्ट इंडिजमध्यें जाण्याकारितां फ्रेंच लोकांची एक तुकडी ब्रेस्ट येथें तयार होत आहे,—अशी सूचना दिली होती; आमीन-च्या तहाअन्वयें फ्रेंचांचीं जीं ठाणीं त्यांना परत देण्याचें ठरलें होतें, तीं परत न देतां आपल्याच ताब्यांत राखून ठेवण्याबद्दल त्याला अधि-कार दिला होता. आणि आपलें सैन्य लढाईकरितां जय्यत तयार

ठेवावें, अशी आपली इच्छाही त्यांनीं प्रदर्शित केली होती. शिवाय, लष्करी खर्चाची वाढ, आणि कंपनीच्या व्यापारास सर्वस्वी आधारभूत असलेल्या रकमेचा दुसरीकडे अपव्यय, ह्या गोष्टींकडेही कांहींसें लक्ष देण्याबद्दल त्याला सूचना करण्यांत आली होती; परंतु ही सूचना या वेळीं अप्रासंगिक आहे, असें त्यास वाटलें होतें.

गव्हर्नर जनरल यानें आपला राजीनामा घेण्याविषयीं विनंति केली; आणि इंग्लंडमधील प्रधानमंडळाला, " ह्या दुसऱ्या बाबतीसंबंधानें कोर्ट आफ डायरेक्टर्स यांना आलेला विकल्प, असलेलें अज्ञान, आणि होणारा दुराग्रह, या तिन्हीही गोष्टींनीं त्यांच्या मनाच्या झालेल्या दुबळ्या स्थितीला एखादा शहाणा मनुष्य जितकी सवलत देईल तितकी देऊन त्यांनीं प्रदर्शित केलेली भीति व संताप यांबद्दल आपण विचार करावा, " असें नम्रपणानें सुचविलें; आणि इकडे मराठे सरदारांवर निरनिराळ्या ठिकाणीं एकाच वेळीं हल्ला करण्याची, आणि नजदीक येऊन ठेपलेली लढाई अत्यंत मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याची, त्यानें उत्सुकतेनें तयारी केली. हिंदुस्थानांतील सर्व लष्करी सत्ता एका मुख्य सत्तेच्या नियंत्रणाखालीं आणण्याचा त्याचा पूर्वीपासूनच विचार असून त्याला नेहमींप्रमाणें फ्रान्स-बरोबर होऊं घातलेल्या युद्धानें उद्दीपन मिळालें. कारण, आर्थर वेलस्ली याच्या म्हणण्याप्रमाणें, मराठ्यांच्या सैन्याला फ्रेंच लोक मिळूं शकण्याची जरी वास्तविक रीत्या फारच थोडी भीति बाळगण्यासारखी होती,—आणि जरी त्यांचें सैन्य कदाचित् जमिनीवर उतरूं शकलें असतें, तरीही त्यांना युद्ध-सामग्रीचा पुरवठा होऊं शकला नसता, व त्यांच्या सामग्री पुरविण्याच्या मुख्य ठिकाणापासून त्यांचें दळणवळणही बंद पाडतां येण्यासारखें होतें,—तरीही युरोपियन लोकांमध्यें होणाऱ्या आपसांतील कोणत्याही मोठ्या लढाईनें हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या धोक्याच्या स्थितींत नेहमीं निःसंशय-पणें भर ही पडलीच पाहिजे. लार्ड वेलस्ली याला—आपण जमिनीवर उभारीत असलेल्या राष्ट्राचा सुरक्षितपणा हा समुद्रावर आपलें वर्चस्व

कायम ठेवण्यावरच सर्वस्वी अवलंबून आहे,—ही गोष्ट पूर्णपणें कळून चुकलेली होती. आणि त्यानें इंग्लंडमधील प्रधानमंडळाला असेंही आग्रहानें कळविलें होतें कीं, जोंपर्यंत केप आफ गुड होप आणि मारीशस हीं फ्रेंचांच्या ताब्यांत आहेत (कारण, डच लोक हे त्या वेळीं सर्वस्वी फ्रेंचांच्या वजनाखालीं होते), तोंपर्यंत हिंदुस्थानच्या किनाऱ्यांना दखल पोंचण्याची नेहमीं भीति आहे, आणि हिंदुस्थानांत असलेल्या आपल्या शत्रूंना फ्रान्समधून मदत मिळण्याच्या आशेनें उत्तेजन मिळण्याचाही संभव आहे. थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे, "ज्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश राष्ट्राचें दृढीकरण आणि भरतभूमीची भावी शांतता, यांची पूर्ण भक्कम पायावर स्थापना करतां येईल," त्या – आशिया आणि युरोप यांमधील नवीन उद्भवलेल्या युद्धकलहाच्या – ह्या संधीचा फायदा करून घेण्याच्या इराद्यानें त्यानें अत्यंत जिवापाड मेहनत घेण्यांत अगर तयारी करण्यांत काडीचीही कसर केली नाहीं. लार्ड वेलस्ली यानें आपले हेतु तडीस नेण्याकरितां योजिलेल्या प्रासंगिक उपायांबद्दल कोणाला कांहींही वाटत असलें, तरी पण इतक्या मोठ्या व्यापक कल्पनेबद्दल, आणि इतक्या स्पष्ट व दूर दृष्टीनें राजकीय क्षितिजाचें निरीक्षण केल्याबद्दल, ब्रिटिश लोकांनीं त्याची स्तुति केल्याशिवाय राहणें, ही गोष्ट अगदीं अशक्य आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

ह्या विचारांनीं व इराद्यांनीं गव्हर्नर जनरल यानें जनरल लेक आणि जनरल वेलस्ली यांना हुकूम सोडले. त्या वेळीं जनरल वेलस्ली हा पश्चिम हिंदुस्थानांत शिंद्याशीं सामना देत होता, आणि जनरल लेक हा शिंद्याच्या ताब्यांत असलेल्या वायव्येकडील प्रदेशावर चाल करून जात होता. लार्ड वेलस्ली ह्याचा मुख्य उद्देश,—एक तर शिंद्याची सत्ता पूर्णपणें नाहींशी करावी, अगर जेणेंकरून त्याच्या ताब्यांतील पुरेसा मुलूख ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं येऊन तो मध्य हिंदुस्थानांत अडकला जाईल, त्याचें पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावरील दळणवळण बंद पाडलें जाईल, दिल्लीहून त्याची हकालपट्टी करितां येईल (कारण, त्या ठिकाणीं

अजूनही त्याच्याकडे मोंगल राष्ट्राची नायबगिरी होती), आणि त्या भागांतील त्याचा प्रदेश व उत्तरेकडील त्याचा प्रदेश ह्यांमध्यें एक प्रतिबंधक आडकाठी उभी करून त्याला पुन्हां मध्य हिंदुस्थानांतच मागें भिरकावून देतां येईल, असा तह करावा,—हा होता. मानशियर पेरन ह्या नांवाचा शिंद्याच्या फ्रेंच अधिकाऱ्यांपैकीं एक अत्यंत कर्तृत्ववान अधिकारी दिल्ली येथें रहात होता. त्याच्या हाताखालीं पुष्कळ मोठें, कवाईत शिकलेलें व कायमचें असें सैन्य होतें. त्यानें त्या सैन्याच्या जोरावर तेथील किल्ल्याचा कबजा आपणाकडे घेतला होता. बादशहा शहा अलम याला त्यानें आपल्या ताब्यांत ठेविलें होतें, व त्याच्या नांवानें तो अधिकार गाजवीत होता. या बलिष्ट व जय्यत अशा कायमच्या शिकलेल्या सैन्यांत पुष्कळ फ्रेंच अधिकाऱ्यांचा भरणा होता. ह्याच सैन्याची हकालपट्टी करावी, हा लार्ड वेलस्ली याचा मुख्य उद्देश होता;आणि मराठे व फ्रान्सचे प्रतिनिधि यांचेमध्यें नेहमीं चालणारे पत्रव्यवहार आणि कारस्थानें ह्यांबद्दलची त्याला माहिती असल्यामुळें शिंद्याबरोबर दोन हात करण्याची त्याची उत्सुकताही या वेळीं प्रदीप्त झालेली होती.

या वेळीं ब्रिटिश सत्तेचें नेतृत्व वास्तविक रीत्या कुलमुखत्यार असलेल्या एका चळवळ्या आणि उत्साही गव्हर्नर जनरलच्या हातीं होतें. त्याला आपल्या ताब्यांतील सुपीक आणि सुव्यवस्थित प्रदेशामधून वसुली मिळत होती. आणि वेलस्ली व लेक ह्या दोन अत्यंत कर्तृत्ववान सेनानायकांच्या धुरीणत्वाखालीं असलेल्या आटोपसर व अतिशय व्यवस्थित सैन्याचा त्याला दुजोरा होता. मराठ्यांचें सैन्यही संख्येनें अधिक होतें, आणि त्यांत फ्रेंच व इंग्लिश अधिकाऱ्यांच्या सुद्धां हाताखालीं शिक्षण घेतलेल्या सैन्याचा बराच मोठा भरणा असून, त्यांच्याजवळ चांगला व विशेष परिणामकारक असा तोफखानाही होता. परंतु ह्या जुटीच्या बळांतील धुरीणांमध्यें परस्पर मत्सरभाव असून ते एकमेकांबद्दल अत्यंत साशंक असत; ते दोस्त अगर दुष्मन ह्यांपैकीं कोणाशींही विश्वासानें वागत नसत; गेल्या पन्नास वर्षांत लूटफाटीच्या स्वाऱ्या आणि दुसऱ्यांच्या

प्रदेशाचा अपहार, ह्यावरच त्यांनीं आपल्या राज्यांची जोपासना व विस्तार केला होता; सार्वजनिक कायदेकानूंना ते गुडाळून ठेवीत; त्यांच्या प्रदेशाच्या क्षेत्राला धरबंद नसे; आणि त्यांच्या छावण्या ह्याच त्यांच्या राजधान्या असत. या कारणामुळें, अशा दोन प्रतिस्पर्ध्यांमध्यें हिंदुस्थानांतील वर्चस्व मिळविण्याकरितां चाललेल्या युद्धकलहाचा काय परिणाम होणार, याबद्दल शंका घेण्याला फारशी जागा नव्हती. जनरल वेलस्ली आणि लेक ह्या दोन सेनानायकांकडे ब्रिटिश सैन्याचें प्रमुखत्व होतें. आणि त्यांना परराष्ट्रीय राजकारणासंबंधीं पूर्ण अधिकार देण्यांत आला होता. त्यांचे नियंत्रणाखालीं मराठयांबरोबर चाललेली लढाई आतां पूर्ण यशस्वी झाली होती. आणि तिचे उद्देशही या वेळीं पूर्णपणें तडीस गेले होते. इ. सन १८०३ च्या जुलई महिन्यांत जनरल वेलस्ली यानें शिंदे आणि नागपूरचा राजा यांना असें सुचविलें कीं, तुम्ही निझामाच्या सरहद्दीवरील तळ दिलेल्या ठिकाणावरून आपलें सैन्य माघारें घ्यावें, नाहीं तर होणाऱ्या हल्ल्याला तयार असावें. त्यावर त्या उभयतांनीं, तुम्हींच पहिल्यानें आपलें सैन्य माघारें घ्यावें, अशी आमची इच्छा आहे, असें उत्तर पाठविलें. परंतु असें करण्यानें त्यांच्या हालचालींमुळें पहिल्यानेंच धोक्यांत आलेला प्रदेश अगदींच उघडा पडेल, असें वाटल्यानें ब्रिटिश सैन्यानें पुढें चाल केली, आणि यथापद्धतीनें लढाई जाहीर करण्यांत आली. यानंतर झालेल्या लढायांचें क्षेत्र मध्यहिंदुस्थानच्या एका भागांत, ह्मणजे ज्या ठिकाणीं हैद्राबाद संस्थानाची उत्तर सरहद्द ह्या दोन्हीही मराठा राज्यकर्त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाच्या सरहद्दीशीं भिडते, त्या ठिकाणीं, होतें. आसई येथें उभयतांची चकमक झडली; तींत शिंद्याचें सैन्य उत्तम आणि निकरानें लढलें; डिबॉईन याच्या कसलेल्या तुकडीनें मोठ्या निश्चयानें टिकाव धरला; तोफखान्यानें इंग्लिशांच्या तुकडीचा भयंकर धुव्वा उडवून दिला; आणि आपल्या तोफा डागीत मोठ्या धैर्यानें लढत असतांनाच गोलंदाजांनीं आपले प्राण सोडले. परंतु वेलस्ली याला हा मिळालेला जय

निर्णयात्मक होता. त्यानंतर तो तसाच पुढें वऱ्हाडमध्यें चाल करून गेला, अरगांव येथें भोसल्याचा त्यानें पूर्ण पराभव केला, गावलगडचा डोंगरी किल्ला छापा घालून आपल्या ताब्यांत घेतला, आणि तें वर्ष संपण्याच्या पूर्वींच ह्या दोन्ही मराठा लढवय्यांबरोबरील, ब्रिटिश सेनापतीनें घातलेल्या अटीं-वरील, तह पूर्ण करण्यांत आला.

जनरल लेक यानें वायव्येकडे मिळविलेले विजय हेही तितक्याच महत्त्वाचे होते. त्यानें हल्ला करून अलीगड घेतलें, शिंद्याच्या सैन्याची दिल्लीसमोर दाणादाण उडविली, तें शहर आपल्या ताब्यांत घेतलें, आणि खुद्द बादशहाचाही ताबा मिळविला. आग्रा शहराला वेढा देऊन त्यानें तें हस्तगत केलें; व त्यानंतर शेवटीं शिंद्याच्या कायमच्या नौकरींत असलेल्या खड्या सैन्यापैकीं शेवटच्या सैन्याची—ह्मणजे उत्तम तोफखान्यासह असणाऱ्या शिकलेल्या पायदळ सैन्याच्या सतरा तुकड्यांची—आणि इंग्लिश सैन्याची लासवारी येथें गांठ पडली. ही लढाई अत्यंत निकरानें लढली गेली; शिंद्याचे गोलंदाज आपल्या तोफांना इतक्या भक्कमपणें चिकटून राहिले कीं, अखेरीस संगिनी भोंसकूनच त्यांना ठार मारावें लागलें; आणि त्याचें सर्व सैन्य इतक्या शौर्यानें लढलें कीं, (लेक यानें लिहिल्याप्रमाणें) अजूनही फ्रेंच अधिकाऱ्यांचें जर त्यांना धुरीणत्व असतें, तर लढाईचा शेवट काय होतो, याबद्दल अत्यंत साशंक रहावें लागलें असतें. परंतु पेरन आणि इतर फ्रेंच अधिकारी यांनीं मराठ्यांच्या नौकरीला "राम राम" ठोकला होता. तथापि उत्तर हिंदुस्थानांतील लढवय्या लोकांनीं आज-पर्यंत नेहमीं प्रत्ययास आणून दिलेलें उच्च प्रकारचें लष्करी तेज त्यांनीं केलेल्या ह्या जोराच्या प्रतिकारानें सिद्ध झालें आहे. त्यांच्या सर्व तोफांचा नाश होईपर्यंत त्यांनीं आपला टिकाव धरला, आणि सरते शेवटीं त्यांचा झालेला पराजयही अभिनंदनीय असाच झालेला आहे[1].

---

१ आसई येथील लढाई, सप्टेंबर इ. सन १८०३; आणि अरगांव व लास-वारी येथील लढाया, नव्हेंबर इ. सन १८०३.

ह्या लढाया तोडीनें लढल्या गेल्या, आणि त्यांत इंग्लिशांना मिळालेला विजयही कष्टानेंच प्राप्त झाला; परंतु त्याचा परिणाम हा झाला कीं, ज्या लष्करी व्यवस्थेवर शिंद्यानें आपलें वर्चस्व उभारिलें होतें, तिचा चुराडा उडाला, उत्तरेकडील मोगल दरबारामध्यें त्याचा असलेला संबंध साफ तोडला गेला, आणि मराठयांच्या जुटीच्या बळांतील सर्वांत बळकट घटकावयव ह्मणून पुणें येथें त्याचें असलेलें वजन पार नाहींसें करण्यांत आलें. लढाई चालू होण्यापूर्वी शिंद्याच्या कायमच्या खड्या सैन्यांत अजमासें चाळीस हजार शिस्तीचें शिकलेलें सैन्य होतें. हें सैन्य व त्याचा दांडगा तोफखाना हीं दोन्हीही सर्वस्वी फ्रेंच सेनानायकांच्याच नियंत्रणाखालीं असून " हिंदुस्थानांतील सर्वांत उत्तम प्रदेशाच्या वसुलीवरच तीं पोसलीं जात होतीं[1]. " आणि ह्याच सैन्याची आतां इंग्लिशांनीं धूळधाण उडवून टाकिली होती. शिंदे व नागपूरचे राजे ह्या दोघांनाही—आपला सर्व प्रदेश आपल्या हातांतून नाहींसा होण्याची भीति नजदीक येऊन ठेपलेली आहे,—असें आढळून आलें; त्यामुळें ते उभयतांही आपापल्या सैन्याचा नाश झाल्यानंतर इंग्लिशांनीं सांगितलेल्या अटींवर तह करण्यास अत्यंत कष्टानें कबूल झाले. वसई येथील तहाला त्यांनीं आपली रीतसर संमति दिली, इंग्लिशांबरोबर संरक्षक दोस्तीचे तह केले, आणि पुष्कळ प्रदेश स्वामित्व-हक्क-त्यागानें त्यांच्या हवालीं केला. यमुना नदीच्या दोन्ही बाजूंला पसरलेले आपले सर्व उत्तरेकडील प्रांत शिंद्यानें ब्रिटिश सरकारास दिले, पश्चिम किनाऱ्यावरील जिंकून मिळविलेलीं ठिकाणें आणि बंदरें त्यानें त्यांच्या हवालीं केलीं, दिल्ली शहर आणि मोंगल बादशहाचा ताबा इंग्लिशांकडे सोंपविला, आपल्या सर्व फ्रेंच अधिकाऱ्यांना नोकरींतून काढून टाकलें, आणि स्वतःच्या खर्चानें आपल्या सरहद्दीनजदीक त्यांचें तैनाती सैन्य राहण्याची व्यवस्था त्यानें मान्य केली. नागपूरच्या राजानें वऱ्हाड प्रांत निझामाकडे सोंपविला, आणि मद्रासचे

१. माल्कमकृत *History of India*, भाग १ पान ३६८ पहा.

उत्तर प्रांत व बंगालचे नैऋत्येकडील प्रांत यांच्यामध्यें बंगालच्या उपसागरावर असलेला कटक प्रांत त्यानें ब्रिटिश सरकारच्या हवालीं केला.

परंतु यशवंतराव होळकर हा शिंद्याचा प्रतिस्पर्धी व शत्रु असल्यानें त्याच्या पराभवामुळें स्वतःचा फायदा करून घेण्याच्या आशेनें अगदीं तटस्थ राहिला होता. त्यानें मराठ्यांच्या मोठ्या जमावासह राजपुतान्याभर यथेच्छ हात मारण्याचा सपाटा चालविला होता, आणि आपल्या नौकरींत असलेल्या इंग्लिश अधिकाऱ्यांनाही त्यानें ठार मारिलें होतें. शिंद्याच्या निराश्रित स्थितीचा फायदा घेण्याचा आपला कांहींसा इरादा असल्याचें जेव्हां त्यानें दर्शविलें, तेव्हां लार्ड लेक यानें त्याला आपल्या हद्दींत परत जाण्याबद्दल हक्कानें बजाविलें, आणि तें त्यानें नाकारल्यामुळें ब्रिटिश सैन्यानें त्याच्यावर हल्ला केला. परंतु घोडेस्वारांच्या जलदीच्या हालचाली, शिस्तीची लुटफाट आणि अकल्पित त्रासदायक दौडी, ह्या मराठ्यांच्या आनुवंशिक गनिमी काव्याच्या कौशल्याला होळकर हा अजूनही नेहमीं चिकटून राहिलेला असल्यामुळें तो इंग्लिशांना एक अतिशय चपळ व त्रासदायक शत्रु असल्याचें अनुभवानें निदर्शनास आलें. कर्नल मानसन हा उत्तर हिंदुस्थानामध्यें त्याच्यावर जसजसा चाल करीत पुढें पुढें जाऊं लागला, त्या त्या मानानें स्वतः ढोंगानें माघार घेत घेत होळकरानें त्याला अशा ठिकाणीं आणलें कीं, आपल्या तळ असलेल्या ठिकाणापासून आपण पुष्कळच पुढें चालून आलेले आहोंत, फक्त दोन दिवस पुरेल एवढीच काय ती सामग्री आपणाजवळ आतां शिल्लक आहे, आणि शत्रूचें आपणासमोर असलेलें सैन्य तर संख्येनें पुष्कळच अधिक आहे, असें त्याला आढळून आलें. ह्मणून त्यानंतर त्यानें मागें फिरण्याचा प्रयत्न केला, तेव्हां होळकरानें त्याच्यावर एकदम उलट खाऊन, ज्या वेळीं इंग्लिशांचें सैन्य नद्यांनीं विभागिलेल्या कांहींशा अडचणीच्या प्रदेशांतून आग्रा शहराकडे माघार घेण्याच्या धांदलींत होतें, त्या वेळीं त्यापैकीं बहुतेक सैन्याचा त्यानें नाश केला. त्यानंतर कांहीं महिन्यांनीं होळकरानें ब्रिटिश सैन्याशीं एक निकराची

लढाई डीग येथें केली; आणि त्याचा दोस्त असलेल्या भरतपूरच्या राज्यकर्त्यानें तेथील मजबुत किल्ल्यावर तो सर करण्याच्या इराद्यानें तीन वेळां केलेला हल्ला परत फिरविल्यामुळें, लार्ड लेक याला पुष्कळ नुकसान सोसून माघार घेणें भाग पडलें. परंतु लार्ड लेक याच्या शीघ्रगामी फौजेच्या टोळीनें होळकराच्या सैन्यावर एकदम छापा घातला, त्याचा पाठलाग करण्यांत अत्यंत परिश्रम घेतले, आणि शेवटीं त्याच्या सैन्याची पांगापांग केली. होळकरानें त्यानंतर पंजाबचा आश्रय घेतला, आणि दुसऱ्या मराठा लढवय्या राज्यकर्त्यांबरोबर ज्या तहाच्या अटींवर सलोखा करण्यांत आला होता, तशाच प्रकारच्या अटींवरील तहावर त्याला पुन्हां परत आल्यावर सही करणें भाग पडलें.

परिच्छेद चवथा—लार्ड वेलस्ली ह्याच्या राजकारणाचें निरीक्षण.

लार्ड वेलस्ली ह्याच्या या सर्व खटपटींमुळें भावी प्रतिकाराच्या शक्यतेबाहेर सर्व हिंदुस्थानभर इंग्लिशांचें राजकीय आणि लष्करी वर्चस्व प्रस्थापित झालें. हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाड्यांनीं गेल्या वीस वर्षांत युरोपियन पद्धतीचें अनुकरण करून शिस्तीच्या सैन्याची उभारणी केली होती; परंतु त्यांतील अगदीं शेवटीं शिल्लक राहिलेल्या सैन्याचीही जनरल वेलस्ली आणि लेक यांनीं आतां धूळधाण उडवून टाकिली होती; आणि ज्या हत्याराच्या जोरावर रणक्षेत्रांत प्रतिकार करण्याचा मराठ्यांचा आधार अवलंबून होता, तें हत्यारही त्यांच्याच हातांतल्या हातांत अशा रीतीनें तोडून पाडण्यांत आलें होतें. प्रमुख मुसलमान आणि मराठे राज्यकर्त्यांकडून परदेशीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणा-खालीं हजारों सैनिक असलेल्या असंख्य सैन्याच्या मजबुत तुकड्या पूर्वीं बाळगण्यांत आलेल्या होत्या; परंतु आतां त्याऐवजीं हिंदु-स्थानांतील इंग्लिशांच्या सैन्याच्या सर्व मिळून बावीस हजार सैनिकां-

---

१. नोव्हेंबर १८०४.

पर्यंतच्या सैन्याच्या तुकड्या लार्ड वेलस्ली यानें केलेल्या तैनाती तहानें ह्याच राज्यकर्त्यांच्या सरहद्दीवर आणि त्यांच्याच वसुलीवर राखण्यांत आल्या. परराष्ट्रीय अधिकाऱ्यांचा नेमणुका परवानगीशिवाय होण्याला यापुढें मनाई करण्यांत आली. आणि उलट पक्षीं, या तहामुळें राज्याराज्यांमध्यें परस्पर युद्ध करण्यालाही मनाई झाली;—कारण, सर्व तंटाभांडणें इंग्लिशांच्या मध्यस्थीकरितां त्यांच्यापुढेंच मांडलीं पाहिजेत, असा निर्बंध ठरला होता. याच तहाअन्वयें प्रत्येक राज्यामधील राज्यकर्त्याला वरिष्ठ सरकारानें अधिकार दिलेल्या प्रदेशाच्या सीमेंत कायमचें स्थानापन्न करण्यांत आलें; ब्रिटिश सरकारच्या हितसंबंधाला घातुक होईल, अशा कोणत्याही उद्देशानें होणाऱ्या त्यांच्या भावी जुटीला प्रतिबंध करण्यांत आला; आणि याच तहाअन्वयें हीं सर्व राज्यें व परराष्ट्रीय सत्ता यांचेमधील दळणवळणाचे सर्व मार्गही कायमचे बंद करण्यांत आले.

ह्या वेळेपर्यंत मध्य हिंदुस्थानांतील मराठा राज्यकर्त्यांनीं निरनिराळ्या सत्ताधाऱ्यांपासून थोडा थोडा मुलूख वेळोवेळीं हस्तगत करून घेतला होता. परंतु त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाची निझाम, पेशवे, आणि रजपूत राजेरजवाडे यांच्या प्रदेशांत इतकी गुंतागुंत होऊन गेलेली होती कीं, त्यामुळें हद्दीच्या आणि वसुलीच्या हक्कांबद्दल भानगडी उपस्थित होऊन भांडणें करण्यास आणि दुसऱ्याच्या हद्दींत घुसण्यास सबब मिळत असे, व असें करण्यांत सबब मिळविण्याचाच हेतुही असे. लार्ड वेलस्ली ह्यानें ह्या बाबतींत पहिल्यानें केलेलें राजकारण, ह्मणजे त्या भागांतील प्रत्येक मराठा राज्यकर्त्याच्या हद्दीची स्पष्ट रेषा रेखाटली जाण्यासारखी मध्य हिंदुस्थानच्या राजकीय नकाशाची पुन्हां जुळणी करणें, हें होय. याशिवाय त्याचे दुसरे उद्देश असे होते कीं, त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाच्या परस्पर चिकटलेल्या सरहद्दीची सांखळी मध्येंच तोडून, त्या दरम्यान मराठेतर राज्यकर्त्यांचा प्रदेश ठेवावा; आणि इंग्लिशांच्या त्या बाजूच्या सरहद्दीवर असलेल्या लहान लहान संस्थानांचें स्वातंत्र्य कायम राखण्याचें

त्यांना अभिवचन देऊन, मराठे व इंग्लिश यांच्या उत्तर हिंदुस्थानांतील प्रदेशाच्या दरम्यान एक प्रतिबंधक आडकाठी निर्माण करावी. त्यानंतर सरते शेवटीं, त्याची अशीही इच्छा होती कीं, मद्रास इलाख्यामधील ब्रिटिश सरकारचा महत्त्वाचा प्रदेश आणि बंगालमधील त्यांच्या साम्राज्याचें केंद्रस्थान यांची सांखळी जोडली जाईल, अशा रीतीनें दक्षिण हिंदुस्थानचा नकाशा तयार करावा. ब्रिटिश साम्राज्याच्या दृढीकरणाचें व सुसंगत जुळणीचें हें कृत्य त्या पुढील बारा वर्षांनंतर लार्ड हेस्टिंग्स यानें आणखी पुढें रेटीत नेलें, आणि लार्ड डलहौसी यानें तें कायमचें पुरें केलें. परंतु लार्ड वेलस्ली यानें सर्व हिंदुस्थानांतील प्रांतिक वांटणीसंबंधानें केलेलें नियमन (पंजाब आणि सिंध शिवाय) ज्या सर्वसाधारण योजनेनें केलें होतें, तीच योजना पुढील चाळीस वर्षेंही एकसारखी चालत आलेली असून, मुख्यत: ढोबळ मानानें पाहतां हल्लींसुद्धां साधारणत: तीच कायम आहे. त्यानें यमुना नदीच्या दोन्ही बाजूंस असलेल्या लगतच्या प्रदेशाच्या पट्टीसह आग्रा आणि दिल्ली हीं बादशाही शहरें आपल्या ताब्यांत घेतलीं; आणि गंगा व यमुना या नद्यांमधील सर्व प्रदेश आपल्या हस्तगत करून घेऊन बंगालपासून वायव्येकडे हिमालय पर्वतापर्यंत त्यानें हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार केला, व यमुना नदीचा उत्तर प्रवाह ही त्याची सरहद्द झाली. याशिवाय कटक प्रांतही त्यानें इंग्लिशांच्या ताब्याखालीं आणल्यामुळें आग्नेय दिशेकडील समुद्र किनाऱ्याच्या बाजूनें ब्रिटिश प्रदेशाला संलग्नता आणली. बंगाल आणि मद्रास ह्या दोन्ही इलाख्यांच्या सरहद्दी एकमेकांना भिडवून टाकिल्या, आणि त्या उभयतांमध्यें निश्चित स्वरूपाचें दळणवळणही स्थापून टाकिलें. ह्मणजे, अशा रीतीनें हिमालय पर्वतापासून खालीं बंगालच्या उपसागरापर्यंत आणि थेट दक्षिणेकडे मद्रास इलाख्यांतील प्रदेशापर्यंत एक व्यापक व सलंग अशी पट्टी इंग्लिशांच्या राज्यविस्ताराची झाली; शिवाय, पश्चिम किनाऱ्यावर स्वामित्व-हक्क-त्यागानें हातीं आलेला

प्रदेश हिंदुस्थानांतील सर्व समुद्र किनाऱ्यावर ब्रिटिश सत्ता अगदीं पूर्णपणें प्रस्थापित करण्यास पुष्कळच अंशानें कारणीभूत झाला.

याशिवाय मुख्यत्वेंकरून जेव्हां लार्ड वेलस्ली यानें मराठ्यांना दिल्ली येथून हुसकाहून लाविलें, आणि स्वतः मोंगल बादशहा व त्याचा परिवार यांचा ताबा आपल्या हातीं घेतला, तेव्हां त्यानें राजकारणपद्धतीमध्यें महत्त्वाचा फेरफार करण्याचा उपक्रम केला. निदान सतत चाळीस वर्षेपर्यंत, जो राजधानीचा ताबा आपल्या हातीं मिळवूं शकेल, ज्याला निर्बल झालेल्या दरबारावर आपला दरारा बसवितां येईल, मोठ्या हृदयानें अगर बळकाविलेल्या प्रांताच्या देणगीनें ज्याला आपलें प्रभुत्व हक्कानें सांगतां येईल, अशा एखाद्या धाडशी अगर परक्याचें राज्य आपल्या घशाखालीं उतरविणाऱ्या व्यक्तीच्या हातींच बादशहाकडून होणारी सही निशाणी सर्वस्वी अवलंबून असे. शिवाय,याचे अगोदरच्या काळीं इंग्लिश व फ्रेंच ह्या युरोपस्थ व्यापारी मंडळ्यांनींही मोंगल बादशहाकडूनच सनद मिळविण्याची खबरदारी घेतलेली होती. आमीनच्या तहानें पांडेचरी ही फ्रेंचांना परत देण्यांत आली, त्या वेळीं बोनापार्ट यानें ह्या संधीचा फायदा घेऊन शिंद्याच्या नौकरींत असलेल्या फ्रेंच अधिकाऱ्यांमार्फत दिल्लीच्या बादशहाशीं दळणवळण बांधावें ह्मणून हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या वसाहतीमध्यें एक मोठें लष्करी कामगार मंडळ पाठविलें, असें कळलें होतें. आणि इ सन १८०३ मध्यें बादशाही घराण्याची त्याच्या शत्रूंपासून आणि छळ करणाऱ्यांपासून सुटका करण्याच्या वरपांगी इराद्यानें हिंदुस्थानावर खुष्कीच्या मार्गानें मोहीम पाठविण्यासंबंधीची जी एक असाध्य योजना नेपोलियनपुढें मांडण्यांत आली होती, तिचाच वस्तुतः हा भाग होता. लार्ड वेलस्ली याची, “ स्वतः मोंगल बादशहा शहा अलम, त्याचा परिवार, आणि त्याची नामधारी सत्ता, हीं इंग्लिशांच्या आश्रयाखालीं आणण्यांत क्षणाचाही विलंब न लावण्याला भाग पाडण्या इतक्या हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या वाढत्या सत्तेमुळें आपणाला

भीति उत्पन्न झालेली आहे, " अशी निदान खात्री झालेली होती. आणि लहान लहान राज्यांवरील वर्चस्वाचा इंग्लिश सरकारचा असलेला हक्क प्रस्थापित करण्याकरितां, अगर राजगादीची हुकमत चालविण्याकरितां, बादशहाच्या नांवाखालील हक्काचा उपयोग न करून घेण्याचा आपला उद्देश आहे, असें त्यानें उघड उघड बोलूनही दाखविलें होतें. त्यामुळें, पूर्वीच्या मूर्त स्वरूपाचें प्रतिबिंब ज्यांत अत्यंत कष्टानेंही दिसून येत नाहीं, आणि ज्याच्या प्रतिनिधीला अत्यंत अपमानास्पद आणि संकटप्रद स्थितींतून ब्रिटिश सरकारच्या हत्यारांनींच सोडविलेलें होतें, तें नामधारी सार्वभौमत्व नाहींसें करण्याच्या उघड उघड उद्देशानें, त्यानें शहा अलम याला राजकीय तहहयात नेमणूक करून देऊन बादशाही पदवी आणि भरपूर उत्पन्न देण्याचें अभिवचन दिलें; आणि इ. सन १८५७ मध्यें शिपायांच्या बंडानें उद्भवलेल्या वादळाच्या योगानें मोगल तख्ताचा व घराण्याचा शेवटचा अवशेषही पार वाहून जाईपर्यंतच्या पन्नास वर्षें ही व्यवस्था अमलांत राहिली.

लार्ड वेलस्ली यानें एखाद्या प्रदेशाची पूर्ण हुकमत असलेल्या यशस्वी प्रतिनिधीच्या डौली भाषेच्या धर्तीवर कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांना—इंग्लिशांच्या पूर्वेकडील राष्ट्राचें दृढीकरण, आणि सर्व हिंदुस्थानची शांतता, यांकरितां त्यानें केलेलीं युद्धें व तह यांच्या सर्वसाधारण परिणामाबद्दल—जो एक लांबलचक खलिता[1] पाठविला, त्यांतील शेवटच्या कलमामध्यें त्याच्या गव्हर्नर जनरल असल्या वेळच्या कारकीर्दींतील राजकारणाच्या परिणामांचा सविस्तर गोषवारा दिलेला आहे. तो ह्मणतो: —

" ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य राज्यें यांचेमध्यें विवक्षित ठरीव तत्त्वांवर एक सर्वसाधारण संबंधाचें बंधन स्थापन करण्यांत आलें आहे; या तत्त्वांमुळें प्रत्येक राज्यकर्त्याला त्याला स्थापित केलेल्या राज्याच्या हद्दींतच आपला अधिकार स्वतंत्रपणें चालवितां येणें

१. जुलई इ. सन १८०४.

बिनधोक झालें आहे; या तत्त्वांमुळें त्यांपैकीं कोणत्याही राज्यकर्त्याला दुसऱ्याचा ताबा अगर हक्क यांचें अपहरण करून आपल्या राज्याचा प्रदेश वाढविण्यास प्रतिबंध केला आहे; आणि याच तत्त्वांमुळें ब्रिटिश सत्तेच्या सामान्य संरक्षणाखालीं हिंदुस्थानांतील प्रत्येक राज्यकर्त्यानें इंग्लिश सरकाराशीं सख्यत्वानें राहणेंच त्यास हितावह झालेलें आहे. "

आणि वास्तविक रीत्या ह्याच वेळेपासून व लार्ड वेलस्ली ह्याच्या वरचष्म्याच्या आणि दूरदृष्टीच्या राजकारणामुळेंच इंग्लिशांच्या प्रदेशाची व्यापक वाढ झाली, व त्यामुळें हिंदुस्थानांतील तिन्हीही इलाख्यांना ह्मणण्यासारखें मूर्त स्वरूप आलें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इ. सन १७९२ पर्यंत दक्षिण किनाऱ्यावरील फार थोडे जिल्हे मद्रास इलाख्याच्या पूर्ण हुकमतीखालीं होते. परंतु इ. सन १७९९ आणि इ. सन १८०४ यांचे दरम्यान म्हैसूरची विभागणी, तंजावरची प्राप्ति, हैद्राबादकराकडून ताब्यांत आलेला प्रदेश, आणि कंपनी सरकारच्या हातीं आलेला कर्नाटक प्रांत, ह्या सर्व मिळून एका मोठ्या आणि सुपीक प्रांताची पट्टी मद्रास येथील राज्यकारभाराच्या कक्षेखालीं आली; आणि मद्रास हें दक्षिण हिंदुस्थानांतील एका मोठ्या इलाखा सरकारचें मुख्य राजधानीचें शहर बनलें; आणि त्याला यापुढें विशेष महत्त्वाचा असा मुलूख जोडला गेला नाहीं. पश्चिम हिंदुस्थानामध्यें मुंबई इलाखा आजपर्यंत बहुतेक सर्वस्वी समुद्रकिनाऱ्यालाच लागून होता, आणि त्याला तेथील बंदर व व्यापाराची उतार पेठ यांनींच मुख्यत: महत्त्व आलेलें होतें; परंतु त्यांत आतां गुजराथमधील महत्त्वाच्या प्रदेशाची भर पडली; आणि आसपासच्या सर्व एतद्देशीय राजेरजवाड्यांमध्यें, व मुख्यत: पुणें आणि बडोदें येथील मराठा राज्यकर्त्यांच्या दरबारामध्यें, तेथील सरकारचें वजन निःसंशयपणें अतिशयच वाढलें. उत्तर हिंदुस्थानामध्यें मराठयांची सर्व सत्ता नाहींशी झाली होती, आणि पुष्कळ लहान लहान संस्थानें असलेला बुंदेलखंड हा महत्त्वाचा प्रांतही आतां सर्वस्वी इंग्लिशांच्या वजनाखालीं व कांहींसा

त्यांच्या नियंत्रणाखालीं आला होता; शिवाय, औधचा वजीर आणि ग्वाल्हेरचे शिंदे यांचेकडून स्वामित्व-हक्क-त्यागानें मिळालेल्या आणि जिंकून मिळविलेल्या प्रदेशांत इंग्लिशांच्या कायदेशीर राज्यकारभारामुळें आतां स्थिरस्थावर होत चालली होती. कलकत्त्याच्या इलाख्याची, मागें लिहिल्याप्रमाणें, आतां बंगालच्या उपसागरापासून वायव्येकडे हिमालयापर्यंत व पंजाबच्या सरहद्दीपर्यंत वाढ झालेली होती; आणि हिंदुस्थानांतील अत्यंत श्रीमान व अतिशय गजबजलेल्या प्रदेशावर प्रत्यक्षपणें हुकमत गाजवीत असलेल्या, सतलज नदीच्या दक्षिणेकडील दुसऱ्या प्रत्येक राज्यावर अगर राजगाद्यांच्या जमावावर अप्रत्यक्षपणें प्रत्यक्ष हजर असल्याची जाणीव उत्पन्न करीत असलेल्या, त्यांना आपल्या कक्षेकडे खेंचून घेत असलेल्या, आणि त्या सर्वांना आपल्या सार्वभौमत्वाच्या बाह्य मर्यादेचें वेष्टण घालीत असलेल्या, अशा एका विस्तृत साम्राज्याचें तें या वेळेपासून केंद्र झालें, आणि मुख्य नियंत्रक सत्तेचें स्थानही बनलें. ह्या साम्राज्यसत्तेच्या पूर्ण कक्षेबाहेर असणाऱ्या अशा राजगाद्या--पंजाबांत (ह्या ठिकाणीं शीख लोकांची सत्ता वाढत्या प्रमाणांत होती), सिंधुनदाच्या तीरावरील सिंध या नांवाच्या प्रांतांत, आणि नेपाळच्या डोंगरी प्रदेशांत,-एवढ्याच काय त्या फक्त होत्या.

लार्ड वेलस्ली याच्या गव्हर्नर जनरलीच्या कारकीर्दीतील सप्तवार्षिक काळ[१] हा-क्लाइव्ह आणि हेस्टिंग्स यांनीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा जो पाया घातला, त्यावरील टोलेजंग इमारतीच्या बांधणींतील अत्यंत महत्त्वाचा आणि आणीबाणीचा असा होता. तो हिंदुस्थानांत आला त्या वेळीं ब्रिटिश सरकार हें मेघाच्छादित आणि अनिश्चित अशा क्षितिजापुढील दोन राजकीय मार्गांच्या मधोमध साशंकपणानें थबकलेलें होतें; एका बाजूला पार्लमेंटनें आंखून दिलेल्या मार्गाप्रमाणें एतद्देशीय सत्ता-

१. इ. सन १७९८ च्या मे महिन्यापासून इ. सन १८०५ च्या जुलई महिन्यापर्यंत.

धाऱ्यांमधील भांडणामध्यें न पडतां तटस्थ वृत्तीनें राहणें, आणि आपल्या स्वतःच्या सरहद्दींत आपलें संरक्षण करून अलग राहण्याची वृत्ति कायम ठेवणें, हा मार्ग इंग्लिशांना खुला होता; आणि दुसऱ्या बाजूला, संकटांना तोंड देण्याकरितां पुढें सरसावणें आणि प्रतिस्पर्ध्यांना निःशस्त्र करणें, झालेल्या पंचभेळींत अव्यवस्था अगर अप्रीति यांचा अधिक फैलाव होण्यापूर्वींच तींत हिमतीनें घुसणें, आणि आपल्या शेजाऱ्यांमध्यें शांतता आणि अंकितत्व हीं सक्तीनें प्रस्थापित करून आपल्या प्रदेशाचें स्वास्थ्य कायम करणें, हा दुसरा मार्ग इंग्लिशांना खुला होता. आणि त्याच्या पूर्वींचे गव्हर्नर जनरल, लार्ड कार्नवालिस व सर जान शोअर, यांनीं शक्य तितकें पहिल्याच मार्गाचें अवलंबन केलें होतें; परंतु लार्ड वेलस्ली याला प्रत्यक्ष हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच असें आढळून चुकलें होतें कीं, (लार्ड एलिंबरो याला त्यानें त्यानंतर पुष्कळ मागाहून लिहिलेल्या पत्राप्रमाणें) "गरीब बिचाऱ्या म्हाताऱ्या लार्ड कार्नवालिस ह्यानें टिपूच्या शुद्ध बुद्धीवर, आणि मराठे व निझाम यांच्या बरोबरील तहानें होणाऱ्या बळकटीवर, ठेविलेला भरंवसा हा किती तरी निरर्थक आणि निरुपयोगी होता." अशा पूर्व ग्रहांमुळेंच त्यानें निःसंशय दुसऱ्या मार्गाचें अवलंबन केलें; आणि हेंही कबूल केलें पाहिजे कीं, त्याच्या इच्छेला जयोत्सव करण्यासारखींच योग्य तीं फळेंही आलीं आहेत. त्यानें फक्त एका लहानशा मोहिमेंतच म्हैसूरच्या सुलतानाला चिरडून टाकिलें; निझामाकडून फ्रेंच अधिकाऱ्यांच्या धुरीणत्वाखालीं बाळगण्यांत आलेल्या चौदा हजार सैनिकांच्या कसलेल्या बलिष्ठ सेनेला त्यानें निःशस्त्र केलें, आणि तिला रजा देवविली; कर्नाटकचा ताबा मिळविला, औधच्या वजिराचें अर्धें राज्य खालसा केलें, मोठमोठ्या एतद्देशीय लष्करी सत्ताधाऱ्यांना ब्रिटिश सरकारचें अंकित होण्याला अगर त्यांच्या बरोबर तैनाती तहाची दोस्ती करण्याला भाग पाडलें, आणि मराठ्यांच्या जुटीच्या बळाच्या शक्तीचा पूर्ण विध्वंस करून ब्रिटिश सरकारच्या निर्विवाद

वर्चस्वाच्या पूर्णतेंत अडवा असलेला हा शेवटचा महत्त्वाचा अडथळाही त्यानें नाहींसा करून टाकला.

गव्हर्नर जनरल यानें आपल्या ह्या वैभवशाली कारकीर्दीत प्रकट केलेले अत्युच्च गुण, गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीचें त्याचें शीघ्र आकलन, व ज्यामुळें त्यानें लष्करी लढाया आणि राजनीतीचे डावपेंच हेंच फक्त साध्य केले, इतकेंच नव्हे, तर अंतःस्थ राज्यव्यवस्थेंत सुधारणा आणि स्वामित्व–हक्क–त्यागानें मिळालेल्या अगर विजयानें मिळविलेल्या प्रदेशांत राज्यव्यवस्थेची घटना हीही घडवून आणली, तो उत्साह व तें चातुर्य, या सर्वांबद्दल ब्रिटिश लोकांस कौतुक वाटल्यास, तें अयोग्य होईल, असें म्हणतां येत नाहीं. लार्ड वेलस्ली याहून अधिक स्तुति करण्या योग्य असा दुसरा मनुष्य आजपर्यंत कधींही निर्माण झाला नव्हता; आणि त्याच्या दीर्घोद्योगी गुणांमुळेंच इंग्लंडच्या राष्ट्राचा पुष्कळ फायदा झालेला असल्यामुळें अशा एका मोठ्या सरकारी अधिकाऱ्यामधील दोषांचें इतक्या कालावधीनंतर बारीक रीतीनें निरीक्षण करणें हेंही निरर्थकच होय. तथापि तत्कालीन परिस्थितीच्या असामान्यपणें जुळून आलेल्या योगायोगांना ऐतिहासिक कारणांकरितां महत्त्व देणें अगत्याचें आहे; कारण, त्यामुळेंच लार्ड वेलस्ली याच्या उत्सुक व उच्च प्रतीच्या राज्यकर्तृत्वाला अवसर आणि उत्तेजन मिळालें, आणि त्याला अडथळा करणाऱ्यांकडे अगर त्याच्यावर टीका करणाऱ्यांकडे–इंग्लंडमध्यें केलेल्या पत्रव्यवहारांत नेहमीं निःसंशय आढळून येणारा–अत्यंत तिरस्कार दाखविण्याला साधन मिळालें. ज्या वेळीं फ्रान्स आणि इंग्लंड यांचेमधील भयंकर युद्धकलहाची अत्यंत आणीबाणीची वेळ होती, ज्या वेळीं नेपोलियन बोनापार्टच्या नशिबाचे तारे त्याला अनुकूल होऊन युरोपमध्यें चमकूं लागले होते, ज्या वेळीं तो ईजिप्तवर स्वारी करीत असून आशियांत दिग्विजय करण्याचा बेत करीत होता, आणि ज्या वेळीं इंग्लंडमधील टोरी पक्षाचे बलिष्ठ प्रधान मंडळ हे, जे उपाय म्हणजे हल्लींच्या काळीं अत्यंत स्वेच्छाचारी व जोर-

जुलमी म्हणून ठरले असते, त्या उपायांनीं राज्यकारभार चालवीत होते, अशा वेळीं त्यानें इंग्लंड सोडलें, व तो हिंदुस्थानांत येऊन पोंचला होता. अशा सर्व जुळत्या योगायोगामुळें "फ्रेंचांचीं हिंदुस्थानांतील कारस्थानें, एतद्देशीय राज्य-कर्त्यांची अप्रीति व अकर्तृत्व, यांमुळें त्यांना पदच्युत अगर निःशस्त्र करण्यास भाग पाडण्याइतकी जरूरी, आणि आपलें राज्य बिनधोक होण्याला त्याला श्रेष्ठ पद मिळण्याची अत्यंत अवश्यकता, " या बाबतींत लार्ड वेलस्ली ह्यानें जाहीर केलेल्या गोष्टींकडे बारीक दृष्टीनें लक्ष पुरविण्याला फारच थोडी कालाची अवधि अगर मनाचा ओढा शिल्लक राहिला होता. खरी गोष्ट ह्मणजे ही आहे कीं, ज्या योजनेबद्दल वारन हेस्टिंग्स याजवर बारा वर्षांपूर्वीं दोषारोप करण्यांत आला होता, त्याहून लार्ड वेलस्ली यानें केलेली योजना ही दसपट अरेरावीपणाची व धनीपणा गाजिवणारी असूनसुद्धां त्याची प्रशंसाच होऊन त्याला पाठबळही देण्यांत येत होतें. आणि या अवधींत इंग्लंड-मधील पार्लमेंटच्या धोरणांत इतका पूर्णपणें बदल झालेला होता कीं, त्यामुळें त्याला हिंदुस्थानांतील सर्व अडथळ्यांची पर्वा न करतां ईस्ट इंडिया कंपनीच्या सामोपचाराच्या शिष्टाईचा उपदेश करणाऱ्या डायरेक्टरांना "कोत्या मनाच्या वृद्धा नारींची चौकडी" असें मानून चालतां येत होतें.

लार्ड वेलस्ली ह्याची ही उद्दाम भाषापद्धति हें फक्त त्याच्या स्वभावाचेंच द्योतक नव्हतें, तर तत्कालीन वातावरणाचेंही तें प्रतिबिंब होतें. हिंदुस्थानच्या राजकीय धोरणाच्या बाबतींतील ब्रिटिश लोकांच्या धोरणांत पुष्कळच फरक झालेला होता. लार्ड वेलस्ली यानें अनीति, अविश्वास, आणि अकर्तृत्व, ह्यां संबंधीं हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाड्यांवर जे दोषारोप केले होते, तेच फ्रान्सच्या राज्यक्रांतीपूर्वीं ब्रिटिश अधिकाऱ्यांवर करण्यांत येत असत. इ. सन १७८३ पासून पुढें आणि वारन हेस्टिंग्स याच्या चाललेल्या सर्व चौकशीभर बर्क हा गव्हर्नर जनरल व ईस्ट इंडिया कंपनी यांचेबद्दल आपल्या भाषणांत नापसंती दर्शवीत होता, आणि एतद्देशीय राजेरजवाडे हे उघड उघड सार्व-जनिक विश्वासाला बळी पडलेले आहेत, असें चित्र रेखाटीत होता. त्यानें

हाउस आफ कामन्सला असें बजावून सांगितलें कीं, "हिंदुस्थानांतील प्रत्येक राज्यामध्यें इंग्लिशांच्या चालू असलेल्या वागणुकीनें त्यांच्यासंबंधी सर्वव्यापक तिटकारा उत्पन्न झाल्यामुळें त्यांच्या विरुद्ध जें सर्वसाधारण जुटीचें बळ उत्पन्न करण्यांत आलें, त्याचाच–इ. सन १७८२ ची मराठ्यांबरोबरील लढाई–हा एक भाग आहे." आणि "औधचा वजीर हा तर दुखावला गेलेला राज्यकर्ता असून त्याचा प्रदेश गव्हर्नर जनरल याच्या जुलमी मागण्यांखालीं साफ भिकेला लागलेला आहे," असेंही त्यानें निक्षून प्रतिपादन केलें. परंतु वीस वर्षांच्या आंतच हें सर्व पारडें अजिबात फिरून गेलें; आणि मराठ्यांचें विश्वासघातकी वर्तन व नाशकारक लुटी, आणि औध व हैद्राबाद येथील निर्बल अव्यवस्थित राज्यकारभार, यांबद्दल उलट गव्हर्नर जनरल हाच आतां आपली नापसंती दर्शवूं लागला होता. इ. सन १७८३ सालीं झालेल्या लढाईमुळें ग्रेट ब्रिटनच्या हातांतून अमेरिकेंतील वसाहती नाहींशा झाल्या असून, तें राष्ट्र ह्या युद्धांतून आतां नुकतेंच बाहेर पडत होतें; अपजयामुळें जनसमाज उदास झालेला होता, शुद्धीवर आलेला होता; आणि खरोखर संकटानेंच मनुष्याच्या सदसद्विवेकबुद्धीची जशी खळबळ उडून जाते, तशी ती दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें उडून जात नाहीं. एकुणिसाव्या शतकाच्या सुरवातीच्या सुमारास युरोपमधील सर्व परिस्थिति बदललेली होती, आणि समुद्रापलीकडील एका दिवसाच्या प्रवासानें, जोराच्या स्वाऱ्या आणि दिग्विजय, सैन्याच्या पायाखालीं तुडविले जाणारे तह, लूटफाटीचें अपहरण आणि निर्बल राज्यांची निःशंक लूटमार, यांचा ब्रिटिश लोकांना प्रत्यक्ष अनुभव पहावयास मिळत होता; त्यामुळें बर्कच्या राजकीय पक्षकार असलेल्या मराठा अगर मुसलमान राज्यकर्त्यांचें गाऱ्हाणें इंग्लंडमध्यें अत्यंत शांतपणानें अगर काळजीपूर्वक ऐकून घेण्यांत येईल, किंवा हातांत हत्यार घेतलेल्या राष्ट्राच्या सल्लामसलतगारांमध्यें आपल्या गव्हर्नर जनरलच्या महत्त्वाकांक्षेविरुद्ध ईस्ट इंडिया कंपनीनें प्रदर्शित केलेल्या निषेधाला विशेषसें महत्त्व देण्यांत येईल, अशी आशा करणें अगदीं निरर्थक होतें.

लार्ड वेलस्ली याचा असा उघड उघड उद्देश होता कीं, "प्रत्येक एतद्देशीय राज्यावर ब्रिटिश सरकारच्या हुकमी श्रेष्ठत्वाचा शह द्यावा; त्या श्रेष्ठ सत्तेशीं, हाताखालील सत्ता या नात्याच्या संबंधानें, सक्तीनें अगर सख्यत्वानें त्यांना बांधून घ्यावें; आणि अशा प्रकारें साम्राज्यसत्तेच्या मध्यस्थीच्या अगर नियंत्रणाच्या अधिकाराला न जुमानण्याच्या कोणत्याही भावी प्रयत्नाला जागा न ठेवून, त्या सत्तेच्या ताब्यांतील प्रदेशाचा कायमचा सुरक्षितपणा स्थापन करावा, आणि सर्व हिंदुस्थानामध्यें सक्तीनें शांतता प्रस्थापित करावी." थोडक्यांत ह्मणजे, त्याच्या कारकीर्दीपर्यंत ब्रिटिश सरकार हें नेहमीं हिंदुस्थानांतील इतर राज्यांबरोबर निदान नामधारी राजकीय समानत्वाच्या स्थितींत जें वागत असे, त्या ऐवजीं लार्ड वेलस्ली यानें राजकीय श्रेष्ठत्वाच्या सार्वभौमिक तत्त्वाचें पुनरुज्जीवन करून तें जाहीरही करून टाकलें. त्याचीं सर्व मतें आणि योजना–हिंदुस्थानांत मोंगल राष्ट्राच्या नष्टतेवर दुसरें राष्ट्र निर्माण करावें,–या संबंधाच्या असून हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या असलेल्या स्थितीचा हा स्वाभाविक परिणाम आहे, आणि हेंच फक्त त्याच्या चिरकालच्या भक्कमपणाचें तारण आहे, अशी त्याची समजूत असून ती बरोबरही होती. शिवाय, हेंही कबूल केलें पाहिजे कीं, मोंगल साम्राज्याच्या नाशानंतर उत्पन्न झालेल्या एतद्देशीय राज्यांत बालिष्ठ व सुधारलेलें राष्ट्र स्थापन झाल्यानें जे खात्रीपूर्वक आणि अपरिहार्य परिणाम घडून यावयाचेच होते, ते लार्ड वेलस्ली ह्याच्या कठोर करणीनें फक्त जरासे लवकर घडून आले. कारण, सपाट्याच्या अगर सावकाशीच्या इलाजांनीं आणि साध्या अगर सक्तीच्या उपायांनीं ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार खात्रीनें होणार, आणि त्या साम्राज्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या सशस्त्र प्रतिकाराचा–उदयोन्मुख युरोपस्थ ब्रिटिश सत्तेबरोबर उडणाऱ्या लागोपाठच्या खटक्यानें–नायनाटही निःसंशय उडणार, हें अगोदरपासूनच ठरून चुकलेलें होतें.

भाग पंधरावा.

स्थाईक काळ

(इ. सन १८०६-१८१४)

परिच्छेद पहिला—हिंदुस्थानांतील प्रतिक्रिया.

परंतु लार्ड वेलस्ली यानें आपल्या कारकीर्दींत संपादिलेले लष्करी विजय आणि केलेला वैभवकारक राज्यविस्तार यांमुळें कंपनी सरकारच्या विलायतेमधील सूत्रचालक मंडळाचें धाबें दणाणून गेलें; त्यांनीं कर्ज वाढविल्याबद्दल नापसंती दर्शविली, आणि राज्याचा विस्तार केल्याबद्दल नाकही मुरडलें. उलट, गव्हर्नर जनरल, लार्ड वेलस्ली, यानेंही त्यांच्या मताबद्दल अत्यंत तिटकारा प्रदर्शित केला, व लार्ड क्यासलरे याला असें लिहिलें कीं, जोंपर्यंत हिंदुस्थानच्या सर्वसाधारण संरक्षणाकरितां माझ्या मदतीची अपेक्षा आहे, तोंपर्यंत "इंग्लंडमधील भारत कार्यालयांतील अत्यंत तिरस्करणीय अड्ड्यांतून" अधिक अपमानकारक व उपमर्दकारक भाषा वापरली जाऊन त्यामुळें माझें इंग्लंडकडे त्वरित प्रयाण होऊं नये. तथापि मानसनच्या अनर्थकारक अपयशानंतर त्याला असें आढळून आलें कीं, खुद्द प्रधानमंडळालाही—आपण फारच झपाट्यानें आणि पुष्कळच दूरवर जात आहोंत,—अशाबद्दल साशंक होण्याला वरील कारण मिळालें असून, प्रत्यक्ष लार्ड क्यासलरे याचीही आपणाविरुद्ध कुरकूर आहे. आणि हिंदुस्थानांतील लढाया, दिग्विजय व प्रदेशाची अमर्याद वाढ यांविषयींच्या आपण पाठविलेल्या बडेजावीच्या खलित्यांनीं चोहोंकडे सर्व राष्ट्रभर खळबळ उडून गेलेली आहे. लार्ड वेलस्ली यानें आपल्या मोहिमी

आणि प्रदेशाची वाढ ह्यां प्रीत्यर्थ मोठमोठ्या रकमा खर्ची घातल्या होत्या, आणि ह्या महत्त्वाच्या कृत्यांची खबर कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांना (हे त्याचे कायदेशीर दृष्ट्या वरिष्ठ अधिकारी होते) सर्व प्रकरण आटोपल्यानंतर पुष्कळ महिन्यांनीं पाठविली होती. होळकराविरुद्ध त्यानें इ. सन १८०५ च्या एप्रिल महिन्यामध्यें लढाई जाहीर केली असूनही त्याची खबर कलकत्ता येथून आगष्ट महिन्यांत पाठविलेल्या पत्रानें इंग्लंडमध्यें कळविण्यांत आली; परंतु ज्या जहाजामधून तें पत्र रवाना करण्यांत आलें होतें, तें जहाज फ्रेंचांनीं समुद्रांत काबीज केलें, त्यामुळें या लढाईबद्दलची सरकारमार्फत प्रसिद्ध होणारी पहिली बातमी कोर्ट आफ डायरेक्टर्स यांना पारिसमधील मॉनेटर ह्या नांवाच्या वर्तमानपत्रामध्यें "वेलस्लीचा पत्रव्यवहार" म्हणून जेव्हां प्रसिद्ध झाली, तेव्हांच काय ती समजली. सरते शेवटीं भारतकार्यव्यवस्थापक मंडळाचा अध्यक्ष, लार्ड क्यासलरे, यानें त्याला असें लिहिलें कीं, कोर्ट आफ डायरेक्टर्समध्यें आतां अव्यवस्था माजत चालली आहे, ह्याच धर्तीवर पुढें कामकाज चालू ठेवणें शक्य नाहीं, आणि पिट्ट, लार्ड मेलव्हिल आणि आपल्या स्वतःचेंही असें मत आहे कीं, गव्हर्नर जनरल यानें हिंदुस्थानांतून स्वदेशीं परत येणें इष्ट आहे. या कारणामुळें इ. सन १८०५ च्या आगष्ट महिन्यांत तो इंग्लंडमध्यें परत निघून गेला, आणि जातांना पूर्वीच्या गव्हर्नर जनरलकडून त्याच्या ताब्यांत जें राज्य आलें होतें, त्याहून अतिशय विस्तृत आणि मजबूत असें राज्य त्यानें आपल्या मागून होणाऱ्या गव्हर्नर जनरलच्या हवालीं सोंपविलें. लार्ड वेलस्ली ह्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं त्याच्या योजना पुष्कळच सौम्य झाल्या होत्या. इ. सन १८०५ मध्यें लार्ड कार्नवालिस हा हिंदुस्थानांत पुन्हां गव्हर्नर जनरल म्हणून परत आला, त्यामुळें ब्रिटिश सरकारच्या राज्यकारणपद्धतींत फेरबदल होऊन त्या योगानें सर्व हालचालींवर दाब बसला, व त्यांचे स्वरूपही पालटलें; कारण, जरी दुसऱ्या वेळची त्याची गव्हर्नर जनरल या नात्याची कारकीर्द अतिशय

अल्पकालीन होती, तरीही तेवढ्या अवधींत शांतता प्रस्थापित करण्यास अवश्यक अशीं तत्त्वें ठरवून टाकण्यास त्यास अवसर मिळाला, आणि त्याच तत्त्वांचें त्याच्या मागून होणाऱ्या गव्हर्नर जनरलांनीं अवलंबन केलें.

लार्ड कार्नवालिस हा जेव्हां कलकत्ता येथें येऊन पोंहोचला, तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं, खजिना रिकामा पडला आहे, कर्ज वाढत चाललें आहे, लष्करी खजिन्याची भर करण्याकरितां होणाऱ्या नाण्याच्या मागणीनें कंपनीचा निर्गत व्यापार बंद पडला आहे, आणि ब्रिटिश सरकारचें वर्चस्व राजरोसपणें जाहीर करण्यांत आलें असून तेंही अशा मार्गांनीं व साधनांनीं अमलांत आणलें जात आहे कीं, त्यामुळें तें सरकार नव्या नव्या राजकीय जबाबदारीच्या वाढत्या जाळ्यांत अधिक अधिक गुरफटून जाण्याचा संभव आहे. त्याचे स्वतःचे विचार, आणि तो हिंदुस्थानांत येतांना त्याला देण्यांत आलेल्या सूचना, ह्या वरील गोष्टींच्या अगदीं विरुद्ध प्रकारच्या होत्या. त्याला असें वाटलें कीं, दुढतर राज्यघटनेची स्वाभाविक वाढ खुंटवून आणि निर्बल किंवा शिरजोर राज्यकर्त्यांचें स्वातंत्र्य नष्ट करून त्यांचें संरक्षण करण्याची व मोठ्या खर्चानें आणि पुष्कळ श्रमानें त्यांचा पक्ष उचलून धरण्याची नसती जबाबदारी तैनाती फौजेच्या तहानें आपल्या अंगावर येऊन पडते. शिवाय, लुटालूट करणाऱ्या प्रबळ राज्यकर्त्यांनीं आपल्या सरहद्दीच्या शेजारच्या लहान लहान संस्थानिकांना गिळंकृत करूं नये, ह्मणून त्यांचें संरक्षण करण्याची हमी घेणें, हें आपल्या हितसंबंधाला अगदीं जरूरच आहे, असेंही त्याचें मत नव्हतें. उलट पक्षीं, त्याचें असें मत असल्याचें दिसतें कीं, आपलें संरक्षणक्षेत्र आपल्या ताब्यांतील प्रदेशाच्या विद्यमान व्याप्तीपलीकडे जाऊं नये;—हा राजकीय बंदोबस्ताचा एक नियम आहे, परंतु तो हिंदुस्थानांत कधींहि अमलांत आणला गेलेला नाहीं. पण ज्याप्रमाणें किल्ल्याच्या बाहेर उतरणीचा भाग सोडलेला असतो, त्याचप्रमाणें आपल्या प्रत्यक्ष ताब्यांतील मुलूख आणि एखाद्या बंडखोर किंवा बलाढ्य निकट-

वर्ती राज्यकर्त्यांच्या ताब्यांतील मुलूख, यांच्यामध्यें संरक्षित मांडलिक सरकारचीं राज्यें किंवा रानवट लोकांच्या ताब्यांतील प्रदेशाची पट्टी आघातप्रतिबंधनार्थ ठेवणें अगत्याचें आहे, असेंच हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारला नेहमीं आढळून आलेलें आहे.

हिंदुस्थानांतील प्रत्येक राज्यावर आपलें नियंत्रण आणि हुकमत प्रस्थापित करण्याचा ब्रिटिश सरकारनें बेत केला आहे, असा जनतेचा "प्रतिकूळ आणि घातक ग्रह" झाला असल्यामुळें, तो नाहींसा करण्याचा आपला उद्देश असल्याचें जाहीर करण्याला लार्ड कार्नवालिस यानें क्षणाचाही विलंब लाविला नाहीं. तथापि राजधोरणामध्यें आम्ही उपरिनिर्दिष्ट केलेला फेरफार करणार आहोंत, हें जाहीर करण्यापलीकडे त्याचे हातून अधिक कांहींही झालें नाहीं; कारण, तो हिंदुस्थानांत आल्यावर अवघ्या तीन महिन्यांच्या आंतच मृत्यु पावला[1]. परंतु त्या त्याच्या मतांना——म्हणजे लार्ड वेलस्ली याच्या फार खर्चाच्या, आणि वरचढपणाच्या, कृत्यांसंबंधानें इंग्लंडमधील लोकमतामध्यें झालेल्या एका प्रकारच्या क्रांतीचीं जीं द्योतक होतीं, त्या मतांना——इतकें प्राबल्य आलें होतें कीं, त्याच्या मृत्यूनंतर पुढील दहा वर्षेपर्यंत त्याच्याच मताप्रमाणें हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकाराकडून तटस्थ वृत्तीनें राहण्याचा प्रयोग प्रामाणिकपणानें करण्यांत आला. लार्ड कार्नवालिस ह्याच्या मृत्यूमुळें सर जार्ज बार्लो हा तात्पुरता गव्हर्नर जनरल झाला, आणि त्यानें तर असें तत्त्व आंखून टाकलें कीं, कांहीं संकोचित कक्षेंतील शांतता आणि स्वास्थ्य कायम ठेवण्याकरितां थोडासा राज्यविस्तार, स्थानिक सत्ता आणि वसुली, यांना फारकत देणें अधिक फायदेशीर आहे; म्हणून त्यानें ज्या राज्यांबरोबर तहामुळें ब्रिटिश सरकार विशेष रीतीनें बांधलें गेलें नव्हतें, अशा सर्व एतद्देशीय राज्यकर्त्यांबरोबर असलेले प्रत्येक प्रकारचे संबंध तोडून टाकले. आपणाला आणखी असेंही आढळून येईल कीं, जेव्हां जेव्हां गव्ह-

१ ता. ५ माहे अक्टोबर इ. सन १८०५.

नर जनरलीची जागा हिंदुस्थानांतीलच एखाद्या इंग्लिश अधिकाऱ्याला देण्यांत आली, तेव्हां तेव्हां त्याच्या अमदानींत ब्रिटिश साम्राज्यास फारच थोडा मुलूख जोडला गेला असून राज्यविस्ताराचीही मजल बरीच मंदावलेली आहे. परंतु सर जार्ज बार्लो यानें तर आणखीही एक एक पाऊल मागें मागेंच सरण्यास सुरवात केली. शिंदे सरकारशीं तैनाती फौज ठेवण्याबद्दल तह करण्याचा वेलस्ली यानें पूर्वीं घडवून ठेविलेला घाट त्यानें मोडून टाकिला; मराठ्यांच्या ताब्यांतील प्रदेशाच्या लगत अथवा त्यांच्या प्रदेशांत मिसळलेल्या लहान लहान संस्थानिकांना त्यानें त्यांच्या नशिबाच्या हवाल्यावर सोंपवून दिलें; आणि यापुढें एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या कलागतींपासून आम्ही अलग राहणार, एकंदर हिंदुस्थानासंबंधींच्या सर्वसाधारण बाबतींशीं आमचा असलेला संबंध आम्ही तोडून टाकणार, आणि आपल्या शेजाऱ्यांच्या भांडणांत न पडतां अगर त्यांचीं कोणतींही गाऱ्हाणीं न ऐकतां आम्ही आपल्या स्वतःच्याच प्रदेशाची काय ती सुधारणा करणार, असें त्यानें जाहीर केलें. सर जार्ज बार्लो यानें खरोखर जर इंग्लंडमधील अधिकाऱ्यांकडून त्या वेळीं त्याच्यावर लादण्यांत आलेल्या मतांचा पूर्णपणें अंगीकार केला असता, तर पुणें येथील पेशवा आणि हैद्राबाद येथील निझाम ह्या दोन मोठाल्या मराठी आणि मुसलमानी राजदरबारांत तैनाती फौजेच्या तहामुळें मिळालेलें सर्व वर्चस्व गमावून ब्रिटिश सरकाराला त्यांच्याशीं असलेला आपला सर्व संबंध साफ तोडून टाकावा लागला असता. परंतु एकदा प्राप्त झालेलें वर्चस्व आपखुषीनें गमविणें, व मध्य हिंदुस्थानांत ब्रिटिश लोक जितकी माघार घेतील तितकें तितकेंच पुढें पाऊल टाकण्यास अगदीं तत्पर असलेल्या मराठ्यांना धुमाकूळ घालण्यास तो प्रदेश पुन्हां मोकळा सोडून देणें,—म्हणजे लार्ड वेलस्ली याची सर्व महत्त्वाची कामगिरी निष्फळ करण्यासारखेंच होतें. परंतु हिंदुस्थानांतील परिस्थितीचें जे खरोखरच त्या वेळीं निरीक्षण करीत होते, त्यांना मात्र एवढें निःसंशय कळून चुकलें होतें कीं, ह्या सर्व गोष्टींचा परिणाम पुन्हां चोहोंकडे राज-

कीय बेबंदशाही माजणें, हा होईल;—त्यामुळें जनतेचा आपल्यावरील विश्वास उडून जाईल, आणि आपल्या शत्रूंना उत्तेजनही दिल्यासारखें होईल;—ह्मणून गव्हर्नर जनरल यानें—ज्या ज्या एतद्देशीय राज्यकर्त्यांबरोबर कंपनी सरकार तह करून चुकलें होतें, त्यांचे त्यांचे बरोबरील ते ते तह आपणास पाळलेच पाहिजेत,—असा आग्रह धरिला; एवढेंच नव्हे, पण हैद्राबादच्या दरबारांतील ब्रिटिश सरकारचें वर्चस्व व सत्ता कायम राखण्याकरितां, जरी प्रत्यक्ष आपल्या स्वतःचीं मतें वरील तत्त्वांच्या विरुद्ध होतीं तरीही, त्यास त्या संस्थानांत हात घालणें भाग पडलें. इ. सन १८०७ ह्या वर्षीं सर जार्ज बार्लो याच्या जागीं लार्ड मिंटो ह्याची गव्हर्नर जनरल ह्मणून नेमणूक झाली.

परिच्छेद दुसरा—परराष्ट्रीय स्वारीची अफवा.

मध्यंतरीं, फ्रेंच लोकांनीं जलमार्गानें हिंदुस्थानांत येऊं नये, ह्मणून जरी ब्रिटिश सरकाराकडून पूर्णपणें प्रतिबंध करण्यांत आला होता, आणि जरी इंग्लिशांच्या शत्रूस समुद्राच्या बाजूनें ज्या ज्या एतद्देशीय राज्यकर्त्यांशीं कारस्थान करतां येणें शक्य होतें, त्या त्या सर्वांना मित्रत्वाचा तह करून पूर्णपणें बांधून घेण्यांत आलें होतें, तरीही खळबळलेल्या राजकीय क्षितिजावर एका निराळ्याच ठिकाणीं संकटाचीं चिन्हें आणि सूचना हीं आतां पुन्हां दृग्गोचर होऊं लागलीं होतीं.

इ. सन १८०४--०५ मध्यें इराणच्या राज्यकर्त्याची रशियाबरोबर लढाई होऊन तींत त्याचें पुष्कळ नुकसान झालें, त्यामुळें त्यानें तिकडे युरोपांत फ्रान्सचा बादशहा नेपोलियन याला आपणास मदत करण्याबद्दल विनंति केली, आणि इकडे कलकत्ता सरकाराकडेही त्यानें तशीच मागणी घातली. हिंदुस्थानामधील त्या वेळचें ब्रिटिश सरकारचें राजकीय धोरण काटकसरीचें आणि मागें पाऊल घेण्याचें असल्यामुळें त्याला तिकडून कोणत्याही प्रकारें उत्तेजन मिळालें नाहीं; परंतु फ्रेंच लोकांची ह्या वेळीं

रशियाबरोबर निकराची लढाई चालू असल्यामुळें उभयतांचाही शत्रु असलेल्या रशियाविरुद्ध विग्रहहेतुक दोस्ती घडवून आणण्याकरितां त्यांनीं आपला एक वकील पाठवून इराणच्या विनंतीस मोठ्या तत्परतेनें रुकार दिला. नेपोलियन याची आयले येथें नुकत्याच झालेल्या अनिर्णीत युद्धांत मनस्वी हानि झाल्यामुळें आशियामध्यें रशियास जेरीस आणण्याची, व त्या खंडांत दिग्विजय करण्याच्या आपल्या आवडत्या योजनांचें पुनरुज्जीवन करण्याची, आलेली ही सोन्यासारखी संधि वांया न दवडण्याविषयीं तो अगदीं उत्कंठित झालेला होता. तेहरान येथें त्यानें पाठविलेल्या वकिलाला—हिंदुस्थानांत जाण्याला एक नवाच रस्ता काढण्याच्या इराद्यानें फ्रान्स, तुर्कस्थान आणि इराण, ह्या राष्ट्रांचें त्रिकूट बनविणें, हेंच त्याचें मुख्य ध्येय असावें,—अशी सूचना देण्यांत आली होती. आणि हिंदुस्थानांत फ्रेंच सैन्याचा शिरकाव झालाच, तर विशेषतः मराठ्यांकडून आणि त्या देशांतल्या देशांतच कोणाकडून कोणती मदत मिळण्यासारखी आहे, यासंबंधीं आणखी खात्रीलायक बातमी मिळविण्याबद्दलही त्याला फर्माविण्यांत आलें होतें.

त्यानंतर इ. सन १८०७ मध्यें फ्रेडलंड येथें लढाई होऊन तींत नेपोलियन याला मिळालेल्या विजयामुळें रशियाचा बादशहा फ्रान्सचा शत्रु न राहतां तो बोनापार्ट याचा दोस्त बनला. इराणबरोबरील विग्रहहेतुक जुटीचें रूप हळूच बदलून, तिला तें राज्य आणि रशिया यांच्यामधील "मध्यस्थीचें अभिवचन" असें स्वरूप देण्यांत आलें; आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध पहिल्या अलेक्झांडरबरोबर एक नवीन व पूर्वींहूनही पुष्कळच भयंकर अशी जूट निर्माण करण्याची नेपोलियन यानें सूचना केली. रशिया हें मूळचेंच आशियांतील एक राष्ट्र आहे, व त्याचा विशेष कल आणि गति हीहीपण पूर्वेकडेच आहे. या कारणामुळें, पश्चिम युरोपमध्यें त्या वेळीं श्रेष्ठ असलेल्या फ्रान्सचा, त्या राष्ट्राच्या हितसंबंधाचे बेत पुढें ढकलूं शकणाऱ्या एकट्याच रशिया या युरोपस्थ

राष्ट्राशीं, अशा रीतीनें अशुभसूचक संयोग होण्यामुळें ब्रिटिश सरकारच्या मनांत खुष्कीच्या बाजूनें स्वारी होईल, अशी भीति उत्पन्न झाल्यास, व ती सकारण आहे असें त्यांना वाटल्यास, त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. त्या वेळेपासून अशा प्रकारची भीति नियमित काळीं पुन्हां पुन्हां उद्भवण्याचें अजूनपर्यंत कधींहि बंद झालें नसून, ती भीति अमलांत येणें ही गोष्ट दिवसेंदिवस जितकी कमी कमी संभवनीय होत चालली आहे, तितकीच ती भीतिहि अधिक अधिक दृढ होऊं लागली आहे. ह्या एकसारखी काळजी उत्पन्न करणाऱ्या गोष्टीचा असा अपरिहार्य परिणाम झाला कीं, हल्लींच्या शतकाच्या अगदीं प्रारंभापासूनच हिंदुस्थान सरकार त्या देशाच्या वायव्य कोनाकडे आपलें लक्ष अधिक अधिक पुरवीत आहे. आणि ब्रिटिश सरकारच्या सर्व परराष्ट्रीय राजकारणाचें केंद्रस्थान, ही एकच गोष्ट असल्यामुळें त्या दिशेकडील त्यांचा राज्यविस्तार सुद्धां निःसंशय झपाट्यानेंच होत गेला आहे. कारण, जमिनीकडील सरहद्दीची हीच बाजू काय ती सुभेद्य असल्यानें तिचें संरक्षण करण्याच्या उत्सुकतेमुळें इंग्लिशांना साहजिकपणेंच पुढें पुढें पाऊल टाकीत जाणें भाग पडलें आहे. वास्तविक रीत्या ह्मणावयाचें ह्मणजे, असा योगायोग घडून आला कीं, ब्रिटिश सरकारच्या समुद्र किनाऱ्यासभोंवतीं घिरट्या घालीत फिरत असलेल्या फ्रेंच सैन्याच्या आरमाररूपी सैतानाला ट्राफलगार येथील पाण्याखालीं जलसमाधि दिली न दिली, तोंच कास्पियन समुद्रापासून आक्सस नदीपर्यंत वावरत असलेल्या रशिया ह्या दुसऱ्या युरोपस्थ सैन्याच्या सैतानानें ब्रिटिश मुत्सद्यांच्या भविष्यपूर्ण कल्पनासृष्टींत संचार करण्यास प्रारंभ केला.

१. मध्य आशियामधून हिंदुस्थानांत आपला शिरकाव करून घेणें, ही गोष्ट रशियन सैन्याला कधीं तरी शक्य आहे कीं काय? याबद्दल मिरॅबो यानें इ. सन १७८६ मध्यें बर्लिन येथून लिहिलेल्या महत्त्वाच्या पत्राचा लेके यानें उल्लेख केला आहे. (*History of England* भाग पांचवा, पान २८५ पहा.) मिरॅबो याच्या असें ऐकण्यांत आलें होतें कीं, हिंदुस्थानावर शेवटीं चाल करून जाण्याच्या उद्देशानें रशियन लोकांनीं इ. सन १७८३ मध्यें इराणांतील अस्त्राबाद आपल्या ताब्याखालीं आणण्याचा

ज्या दिवसापासून फ्रान्सचा बादशहा आणि रशियाचा झार या उभयतांनीं तिलशिट येथें परस्परांना एकमेकांच्या अढळ मैत्रीच्या अभिवचनानें बांधून घेतलें, त्या दिवसापासून हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारचे विरुद्ध त्यांचें साम्राज्य नष्ट करण्याच्या आणि त्यांच्या व्यापाराच्या भरभराटीचीं साधनें नाहींशीं करण्याच्या उद्देशानें तुर्कस्थान आणि इराण ह्या देशांतून जाऊन हिंदुस्थानावर समाइक मोहीम करण्याची एक व्यापक योजना नेपोलियन हा अलेक्झांडर याचेपुढें वारंवार आग्रहानें मांडीत होता. इ. सन १८०७ मध्यें फ्रान्सचें वर्चस्व सर्व युरोपखंडांत कळसास जाऊन पोंचलें होतें. नेपोलियनपुढें रणक्षेत्रांत आलेल्या प्रत्येक सैन्याचा त्यानें लागोपाठ पराभव केला होता; आपल्या विरुद्ध झालेली प्रत्येक जूट त्यानें फोडून टाकली होती; आणि आपापल्या बंदरांमधून ब्रिटिश व्यापाराला कडकडीत बहिष्कार घालण्याच्या इराद्यानें केलेल्या कटांत सामील होण्याबद्दल त्यानें प्रत्येक प्रमुख राष्ट्राला भागही पाडलेलें होतें. तथापि जेव्हां त्यास असें दिसून आलें कीं, इंग्लंडवर हल्ला करण्याचे हे द्राविडी प्राणायाम निष्फळ आहेत, आणि आपल्या या अविश्रांत शत्रूच्या प्रत्यक्ष वर्मी घाव घातल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपायानें तो निर्बल होणार नाहीं, तेव्हां युरोपमधून खुष्कीच्या बाजूनें स्वारी करण्याला ज्याची सरहद्द पूर्ण अगम्य नाहीं, अशा एकट्याच ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील आशियामधील महत्त्वाच्या हिंदुस्थानांतील प्रदेशावर फ्रान्सचा बादशहा

प्रयत्न केला, पण तो निष्फळ झाला. शिवाय, त्यानें असेंही भविष्य वर्तविलें कीं, एखाद्या दिवशीं रशियन लोक अशा रीतीनें हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या सत्तेला इतकें भिववूं शकतील कीं, त्यामुळें युरोपांतील राजकारणाच्या पद्धतींत पूर्ण फेरफार केला जाईल. हें "वर्तविलेलें भविष्य" खरोखरच महत्त्वाचें आहे; परंतु उडालेली अफवा मात्र अपरिपक्व होती. रशियन लोकांनीं जें कांहीं केलें, तें कास्पियन समुद्राच्या आग्नेयेकडील किनाऱ्यावर त्या भागांतील आपल्या व्यापाराचें संरक्षण करण्याकरितां सैन्य पाठविलें, हेंच फक्त होय.

Forstor's Journey (१७९८) हें पुस्तक, भाग दुसरा, पान २०१, पहा.

नेपोलियन यानें स्वाभाविक रीत्याच आपली दृष्टि फिरविली. आणि दिग्विजयी सैन्याच्या पायाखालीं आशिया खंड अनेक वेळां तुडविलें गेलेलें आहे, ह्या गोष्टीच्या स्मरणानें तर त्याची कल्पना अधिकच प्रदीप्त होऊन गेली. फ्रेंच किनाऱ्यापासून वीस मैलांच्या आंत असलेल्या ग्रेट ब्रिटन या नांवाच्या एका बेटाच्या ताब्यांतील पूर्वेकडील हिंदुस्थानांतील प्रदेशावर स्वारी करण्याकरितां नेपोलियन यानें सर्व युरोप आणि अर्धा आशिया ओलांडून कूच करीत जाण्याचा मोठ्या गंभीरतेनें बेत करणें—म्हणजे क्यालेहून डोव्हर येथें जलमार्गानें आपलें सैन्य उतरवितां येणें हें जितकें साधारणतः शक्य आहे, त्याहूनही डान्यूब अथवा कान्स्टांटिनोपल येथून दिल्ली येथें आपलें सैन्य पाठवितां येणें हें अधिक सोपें आहे, अशी त्याची भावना होणें—ह्या गोष्टीवरूनच ब्रिटिश राष्ट्राच्या संरक्षणाचें साधन जें आरमार तें खरोखर अगदीं सज्ज आणि अभेद्य असेंच निःसंशय असलें पाहिजे, हें पूर्णपणें सिद्ध होतें. परंतु आशियावर स्वारी करण्यांत येणाऱ्या अडचणींसंबंधानें रशियाला कांहींशी उपयुक्त माहिती असल्यामुळें, आणि ज्या सोबत्याबरोबर मोहिमेला निघण्याचें पाचारण करण्यांत आलें होतें, त्या फ्रेंचांच्या संबंधानें हितपरिणामी अविश्वास मनांत वागत असल्यामुळें रशियन लोकांनीं फ्रेंचांच्या योजनांना अत्यंत अनिश्चयात्मक असेंच उत्तर दिलें. त्या वेळीं फ्रान्सचीं सैन्यें रशियाच्या पश्चिमेकडील सरहद्दीवर घिरट्या घालीत होतीं, आणि अशा चळवळ्या व बलिष्ठ अरेरावी नेपोलियन बादशहाच्या फायद्याकरितां अगर त्याच्या सल्लामसतीवरून—लांबच्या पल्ल्याच्या पूर्वेकडील धाडशी मोहिमी करण्याला, अथवा आशियाच्या मध्यभागीं आपल्या सैन्याचा कोंडमारा करून घेण्याला,—रशियन लोक कोणत्याही प्रकारें उत्सुक नव्हते. एखाद्या समाइक भांडवलांतील प्रारंभींचा हिस्सा म्हणून, आणि पूर्वेकडे पुढें सरसावण्यासाठीं सैन्याच्या हालचालीस आधारभूत पाया ह्मणून, तुर्की राष्ट्राची विभागणी करण्याचा त्यांनीं आपसांत करार केला. तथापि ह्या शर्तीस आपला रुकार देण्याचें

नेपोलियन यानें नाकारून असें सयुक्तिक कारण पुढें केलें कीं, असा रुकार देणें म्हणजे आपण होऊनच आपली मान ब्रिटिश लोकांच्या हातीं देणें होय; कारण, जर रशियन लोकांनीं कान्स्टांटिनोपल घेतलें, तर इंग्लिश लोक ताबडतोब ईजिप्त घेऊन आपला वचपा काढून घेतील. तथापि फ्रान्सनें इरणामध्यें एक भपक्याचें प्रतिनिधिमंडळ पाठविलें, आणि तेहरान येथें व आशियांतील दुसऱ्या राजदरबारीं फ्रेंच वकिलांनीं केलेल्या उद्योगानें हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकार पुष्कळच भयचकित होऊन गेलें.

परिच्छेद तिसरा—परराष्ट्रीय संबंधांची अभिवृद्धि.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारचें परराष्ट्रीय राजकारण ह्याच वेळे-पासून बऱ्याच व्यापक कर्तृत्वशक्तीच्या पायावर उभारलें गेलें, असें बिन-दिक्कत म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रिटिश प्रधान मंडळाला नेपोलियन याच्या आशियावरील मोहिमेच्या सर्व योजना लवकरच कळून आल्या, आणि त्यानें गुप्त रीतीनें केलेले सर्व करारही त्यांना पूर्णपणें समजून आले. हिंदुस्थानच्या सरहद्दीकडे फ्रान्स आणि रशिया यांनीं जुटीनें स्वारी करण्याचा बेत करणें ही एक फारच भयप्रद गोष्ट आहे, असें त्यांना वाटलें; आणि हीही गोष्ट उघड होती कीं, ह्या अफवा चोहोंकडे पसर-लेल्या असतांना लार्ड कार्नवालिस याचें तटस्थ वृत्तीचें व आत्मसंरक्षण-पर राजकारण तसेंच पुढें चालू ठेवणें हें वास्तविक रीत्या केव्हांही शक्य नव्हतें. फ्रेंचांच्या खटाटोपाचा प्रतिकार करण्याकरितां, आणि काळ्या व कास्पियन समुद्रापासून होऊं घातलेल्या भयप्रद स्वारीला थेटपर्यंत एका-मागून एक आडकाठ्या उभ्या करण्याकरितां, हिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरल, लार्ड मिंटो, यानें ब्रिटिश साम्राज्याच्या वायव्य सरहद्दीवरील आणि त्यापलीकडील सर्व तद्देशीय राज्यकर्त्यांकडे---म्हणजे लाहोर येथें रण-

१ राष्ट्रांराष्ट्रांमधील राजकारणविषयक परिस्थिति आणि राष्ट्रीय अभिगम्य संबंध यांची प्रवृत्ति खालोनें पुनरावृत्ति होण्याकडेसच असल्यामुळें ह्या बाबतींतील नुकताच प्रसिद्ध झालेला पत्रव्यवहार मननपूर्वक वाचण्यासारखा आहे.

जितसिंहाकडे, अफगाणिस्थान व सिंध या देशांच्या अमिराकडे, आणि फ्रान्स व रशिया यांच्या एकवटलेल्या वर्चस्वाधिक्यानें नुकत्याच दबल्या गेलेल्या इराणच्या शहाकडे---आपलें प्रेषित मंडळ पाठविलें. नेपोलियन हा या वेळीं अलेक्झांडर याचा जिवलग स्नेही आणि दोस्त झालेला असल्यानें फ्रेंचांची मध्यस्थी कितपत फलद्रूप होण्यासारखी आहे, हें इराणच्या राजाला कळून चुकलें असल्यामुळें त्याची प्रवृत्ति इंग्लिशांचा आश्रय घेण्याकडे वळली. पुष्कळ वाटाघाटी आणि गैरसमजांनंतर (कारण, कलकत्ता येथून पाठविण्यांत आलेल्या ब्रिटिश वकिलास परत बोलावून त्याचे ऐवजीं लंडनहून दुसरा वकील पाठविण्यांत आलेला होता,) तेहरान येथें एक तह होऊन, त्यांत असें ठरलें कीं, इराणच्या आगळिकीशिवाय जर त्याच्यावर कोणी चढाई करून आलें, तर इंग्लिशांनीं त्याला कुमकेदाखल रक्कम देऊन मदत करावी. लाहोर येथें पाठविलेल्या प्रेषित मंडळाला, तहाच्या कांहीं वाटाघाटींनंतर, जेव्हां असें आढळून आलें कीं, रणजितसिंह हा सतलज नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशावर असलेलें आपलें सार्वभौमत्व ब्रिटिश सरकारांनीं मान्य करावें, असें म्हणत आहे, तेव्हां तें तेथून परत फिरलें. अफगाणिस्थानाशीं तहाच्या वाटाघाटींकरितां पाठविलेल्या वकिलाला (माउंटस्टूअर्ट एलफिन्स्टन) पेशावर येथें असें आढळून आलें कीं, आपसांतील लढाईनें सर्व प्रदेशभर गोंधळ उडून गेला आहे. तेथील राज्यकर्ता अमीर, शहा सुजा, हा आपल्या राज्याच्या सीमांवर अत्यंत कष्टानेंही नियंत्रण ठेवण्याला ह्या वेळीं असमर्थ झालेला होता. दुराणी लोकांच्या राज्यावर पश्चिमेकडून इराणनें हल्ला केलेला असून पूर्वेकडून शीख लोकांनीं त्या राज्यास पेचांत आणलें होतें. व अगोदरच मोडकळीस येत चाललेल्या ह्या राज्यांतून आतां लहान लहान स्वतंत्र संस्थानें स्थापन होत चाललीं होतीं. शहा सुजा याचा पराभव झाल्यामुळें तो देशत्याग करून पळून गेला, त्यामुळें एलफिन्स्टन याची तहाची वाटाघाट मध्येंच बंद पडली. याच शहा सुजाला त्यानंतर तीस वर्षांनीं परत आणून

पुन्हां गादीवर बसविण्याकरितां ब्रिटिश सरकारांनीं स्वारी केली होती. परंतु तींतही दुर्दैवानें त्यांना आपलें सर्व सैन्य खर्ची घालावें लागलें, आणि शहा सुजा यास आपल्या प्राणास मुकावें लागलें.

परंतु राजकीय घडामोडीचा ओघ पुन्हां युरोपकडे वळण्यास सुरवात झाली; त्यामुळें अफगाणिस्थान, पंजाब आणि सिंध, यांजबरोबरील दृढ दोस्ती व प्रतिबंधक तह करण्याच्या सर्व योजनांचा त्याग करण्यांत आला, अथवा त्या तहकूब ठेवण्यांत आल्या. स्पेनचें बंड आणि रशियावरील स्वारीची तयारी यांच्यामुळें युरोपमध्यें लवकरच नेपोलियन हा इतका गुंतून गेला कीं, आशियांत धाडशी कृत्यें करण्याच्या आपल्या योजना त्यानें टाकून दिल्या. फ्रान्सच्या विरुद्ध या वेळीं एक मोठी जूट झालेली असून तींत रशिया हा आतां इंग्लंडचा दोस्त बनला होता, आणि त्यानें इराण व तुर्कस्थान यांच्या बरोबर तह केला होता. त्यानंतर युरोपमध्यें पुष्कळ दिवस एक जंगी युद्ध माजून त्यांत नेपोलियन हा पालथा घातला गेला, व ब्रिटिश सरकारचा हिंदुस्थानावरील ताबा सुरक्षित होऊन आशिया पलीकडे चालून येणाऱ्या सैन्यापासून इंग्लिशांस वाटणाऱ्या संकटाची भीति तात्पुरती नाहींशी झाली. समुद्रावरील मार्ग अजिंक्य आरमारानें संरक्षिले गेलेले होते; आणि झपाट्यानें जमिनदोस्त झालेलें फ्रेंच राष्ट्र, युरोपांतील सर्व मोठमोठ्या राष्ट्रांना आलेला शीण भाग, आणि मध्य आशियाभर पसरत असलेलें अचैतन्य व त्याचा उघड उघड होत चाललेला ऱ्हास,—ह्या सर्व गोष्टी एकवटून आल्यानें खुष्कीच्या बाजूनें शत्रूच्या हालचाली व खटाटोप यांमुळें होणाऱ्या उपद्रवापासून ब्रिटिश राष्ट्राची पुढील चौदा वर्षेंपर्यंत कांहीं अंशीं मुक्तता झाली होती[१]. हिंदुस्थानांतून पाठविण्यांत आलेल्या ह्या सर्व प्रेषित मंडळाचा अप्रत्यक्षपणें एवढाच

---

१ इ. सन १८१२-१८२६ रशियानें इ. सन १८२६ मध्यें इराणवर हल्ला केला, आणि इ. सन १८२८मध्यें त्यानें आपलें पाऊल पूर्वेकडे लांबवर टाकिल्यामुळें ब्रिटिश सरकाराला पुन्हां काळजी उत्पन्न झाली होती.

परिणाम झाला कीं, रणजितसिंहाबरोबर इ. सन १८०९ मध्यें एक महत्त्वाचा सरहद्दीबद्दलचा ठराव कायम करण्यांत आला, आणि त्याच्याशीं झालेल्या तहाअन्वयें सतलज नदीच्या दक्षिणेकडील कांहीं शीख संस्थानांवरील आपला सार्वभौमत्वाचा हक्क दपटशाईमुळें त्यानें सोडून दिला. त्या वेळेपासून पुढें, त्याच्या आग्नेय दिशेकडे त्याचे आणि ब्रिटिश सरकारचे वाढते स्नेहसंबंध, व वायव्येकडे अफगाणिस्थानामध्यें आपापसांतील राज्यविषयक युद्धकलह, यांमुळें सिंधुनदाच्या पलीकडे आपलें राज्य वाढविण्याचीं, काश्मीर काबीज करण्याचीं आणि शीख सत्ता भक्कम पायावर उभारण्याचीं, त्याला साधनें आणि संधि मिळाली; शिवाय, त्याचप्रमाणें त्या सत्तेबरोबर अजमासें चाळीस वर्षेपर्यंत ब्रिटिश सरकारचें सख्य कायम राहिलें.

उलट पक्षीं, ह्या सर्व अपरिपक्व परराष्ट्रीय राजकारणविषयक वाटाघाटीचे आनुषंगिक परिणाम सर्व प्रकारें महत्त्वाचे आणि चिरकाल टिकणारे असेच घडून आले. फ्रेंचांच्या प्रतिस्पर्धेमुळें इंग्लिशांना अगदीं प्रथम प्रथम त्वरेनें कसे विजय मिळत गेले, आणि मागाहून मागाहून फ्रान्सबरोबरील एतद्देशीय राज्यकर्त्यांचा पत्रव्यहार अगर हिंदुस्थानांतील सैन्यामध्यें फ्रेंच अधिकाऱ्यांचें अस्तित्व, यामुळें ब्रिटिश सरकारच्या मनोवृत्तींत कशी चलबिचल झाली, हें आपण पूर्वीं वाचलेलेंच आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या अंतःप्रदेशांतील इंग्लिशांच्या अबाधित वर्चस्वाच्या मार्गांत अडवे येणाऱ्या प्रत्येक मुसलमान अगर मराठा राज्यकर्त्याला आपलें अंकित अगर नियंत्रणाखालील दोस्त सरकार बनविण्याचें आपलें धोरण पुढें ढकलण्याला उच्चालक ह्मणून वरील वस्तुस्थितीचा लार्ड वेलस्ली यानें कसा उपयोग करून घेतला, ह्याचेंही वर दिग्दर्शन करण्यांत आलेलेंच आहे. अशाच रीतीनें नेपोलियन यानें केलेल्या बेतांची बातमी इंग्लिशांना समजतांच, समुद्रकिनाऱ्याकडून खुष्कीच्या सरहद्दीकडे त्यांचें मन वळलें; पुष्कळ मोठाल्या व व्यापक प्रमाणावरील आशियांतील लढाया आणि पर-

राष्ट्रविषयक राजकारण, यांतही ह्या वेळीं पहिल्यानेंच त्यांना पडावें लागलें, व त्यांत अजूनही ते मधून मधून सतत गुंतून गेलेले असतात. गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राजकारणाचें क्षेत्र त्या देशांतील हद्दींच्या आंतच मर्यादित झालेलें होतें; कारण, आपल्या श्रेष्ठत्वाच्या स्वाभाविक व अवश्यक वाढीमुळें हिंदुस्थानांतील ज्या राज्यकर्त्यांवर त्यांनीं सहज वर्चस्व मिळविलें, त्यांच्याशींच काय ते त्यांचे संबंध मर्यादित झालेले होते. परंतु युरोपखंड आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील प्रदेश, यांच्यामध्यें प्रतिबंधक आडकाठ्या ह्मणून असलेले कान्स्टांटिनोपलपासून काबूलपर्यंतचे पश्चिम आशियांतील सर्व देश दृग्गोचर होतील इतक्या विस्तृत राजनीतीच्या दृक्पथांत ब्रिटिश सरकार हें या वेळीं पहिल्यानेंच शिरलें; आणि ह्या परकीय व कांहींशा दूरच्या राज्यांचें स्वातंत्र्य आणि संपूर्णत्व, हींच यापुढें—आशियांतील राष्ट्राराष्ट्रांमधील सत्तेचें पारडें समतोल राखण्यास, आणि ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील हिंदुस्थानची सरहद्द सुरक्षित राखण्यास,—अत्यंत अवश्यक झालेलीं आहेत. ह्या कालास प्रारंभ होण्यापूर्वीं युरोपस्थ राष्ट्राराष्ट्रांमधील कलहानें उपस्थित झालेल्या लढाया आणि उडालेले खटके, यांचा हिंदुस्थानच्या अंत:प्रदेशांतील सत्ताधाऱ्यांबरोबरील ब्रिटिश सरकारच्या व्यवहारावरच काय तो परिणाम झालेला होता, आणि त्यांनीं आपल्या युरोपस्थ शत्रूबरोबर दळणवळण ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक एतद्देशीय राज्यकर्त्याला त्यामुळें पालथें घातलें होतें, अथवा नि:शस्त्र केलें होतें. परंतु एकुणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून त्यांना हिंदुस्थानांतील प्रतिस्पर्ध्यासंबंधानें बिलकूल भीति बाळगण्याचें कारण राहिलें नव्हतें, किंवा असल्यास तें फारच थोडें होतें. आणि आतां तर आशिया खंडांतील पहिल्या प्रतीचे सार्वभौम सत्ताधारी हा मानही त्यांनीं क्रमाक्रमानें मिळविलेला आहे. ह्या वेळेपासून त्यांच्या हिंदुस्थानांतील हितसंबंधाचें अपरिमित महत्त्व केवळ सर्व आशिया खंडांतच नव्हे, तर युरोपखंडांत देखील, इतकें वाढलें आहे कीं, जर एखाद्या युरोपस्थ

राष्ट्राचीं मतें किंवा मनाची प्रवृत्ति हीं इंग्लिशांच्या पूर्वेकडील इभ्रतीला कोणत्याही प्रकारें कमीपणा आणण्यासारखीं किंवा बाधक असतील, तर त्या राष्ट्राशीं व्यवहार करतांना त्यांच्या हिंदुस्थानांतील हितसंबंधाचेंच पारडें अधिक जड झालेलें दिसून येतें. अशा रीतीनें आशिया खंडांतील प्रत्येक महत्त्वाच्या राज्याच्या राजकीय घडामोडींशीं ब्रिटिश सरकारचा अत्यंत निकट संबंध जडलेला आहे, आणि या वेळीं सुरू झालेल्या ह्या पुष्कळ दिवसांच्या मनाच्या अस्वास्थ्यापासूनच—कांहीं जोखमीच्या लष्करी योजना व परराष्ट्रविषयक राजकारणाचे अपरिपक्व बेत, अफगाणिस्थानांतील दोन मोहिमा, इराणबरोबरील एक लढाई, आणि हिंदुस्थान देशाच्या स्वाभाविक मर्यादेचें उल्लंघन करून ब्रिटिश सरकारचें पालकत्व नेहमीं पुष्कळच पुढें पुढें ढकलीत नेणारी राजनीतिपद्धति,—या सर्वांचा उगम झालेला आहे.

या कारणामुळें एकोणिसावें शतक सुरू झाल्यापासून हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारचें वर्चस्व निर्विवादपणें स्थापन झालें, असें मानण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत खुष्कीच्या बाजूनें येणें शक्य असलेल्या युरोपस्थ प्रतिस्पर्ध्यांविषयीं असहिष्णु चित्तवृत्तीचा पुनरुद्भवही याच वेळेपासून झाला आहे, आणि याच कारणामुळें इंग्लिशांच्या ताब्यांतील हिंदुस्थानच्या राज्याला भिडलेलीं किंवा हिंदुस्थानाकडे रोख असलेलीं अशीं परकीय राज्यें आणि इंग्लंड यांचेमध्यें पहिल्यानें सलोख्याचीं बोलणीं आणि तह करावे लागून शेवटीं लढायाही कराव्या लागल्या आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

परिच्छेद चवथा—अंतःस्थ दृढीकरण.

जोंपर्यंत युरोपांत युद्धें सुरू होतीं, तोंपर्यंत हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकार सर्व पश्चिम आशियाचें अत्यंत बारिक रीतीनें निरीक्षण करीत होतें; आणि आपल्या स्थितीला बाधक होईल अशा खुष्कीच्या बाजूवरील प्रत्येक हालचालीवर तें अत्यंत काळजीपूर्वक लक्ष ठेवीत होतें. मध्यंतरीं

त्यांच्या आरमारी वर्चस्वामुळें पूर्वेकडील आपल्या सर्व शत्रूंना समुद्राबाहेर हांकलून देण्याला, आणि शत्रूकडून उपद्रव पोंचेल असा समुद्रकिनारा अथवा व्यापाराचें कोणतेंही नाकें आपल्या हातीं घेण्याला, इंग्लंडमध्यें सामर्थ्य होतें. युरोप आणि आशिया यांमधील राजकारणविषयक व्यवहाराचा संबंध कसा असतो, त्यांचा एकमेकांवर परिणाम कसा घडतो, व ह्यामुळें ब्रिटिश सरकारच्या आशियांतील साम्राज्याच्या वाढीवर किती महत्त्वाचा परिणाम घडून आला, ही गोष्ट त्या काळीं घडलेल्या गोष्टींनीं पुन्हां सिद्ध होते. इ. सन १८०६ च्या सुमारास नेपोलियनचें वर्चस्व युरोपांतील सर्व देशभर (रशियाशिवाय) प्रस्थापित झालें होतें, परंतु इ. सन १८०५ मधील ट्राफलगारच्या जलयुद्धानें इंग्लंडला समुद्रावरील अबाधित वर्चस्व प्राप्त झालें होतें. जमिनीवरील सत्तेची आणि समुद्रावरील सत्तेची अशा रीतीची ही ठळक विभागणी—ह्मणजे इतिहाससृष्टींत इतक्या व्यापक प्रमाणावर पूर्वी कधींही न घडून आलेली विभागणी—हीच पूर्वेकडील ब्रिटिश सरकारच्या स्थितीला बळकटी आणण्याला आणि त्यांच्या साम्राज्याचा विस्तार करण्याला पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेली आहे. कारण, ज्या ज्या वेळीं युरोपांतील एखादें राज्य खालसा करून फ्रेंच राष्ट्राला जोडण्यांत येत असे, अथवा त्या राष्ट्राला नेपोलियन याच्याशीं दोस्ती करणें भाग पाडण्यांत येत असे, त्या त्या वेळीं फ्रान्सच्या ताब्यांतील समुद्रकिनाऱ्याचीं ठाणीं ग्रेट ब्रिटनचें राष्ट्र ताबडतोब काबीज करून घेई. हिंदुस्थानांत जाण्यायेण्याच्या जलमार्गाचें महत्त्वाचें ठिकाण जें केप आफ गुड होप तें इ. सन १८०६ मध्यें इंग्लिशांनीं कायमचेंच व्यापून टाकिलें, आणि इ. सन १८१० मध्यें लार्ड मिंटो यानें मोहीम पाठवून जावा व मोल्यूकस ह्या डच लोकांच्या वसाहतींतून फ्रेंचांना हांकलून दिलें. अबरक्राँबी यानें मारीशस आणि बोर्बोन हीं फ्रेंच लोकांचीं बेटें जिंकून आपल्या ताब्यांत घेतलीं, आणि त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील डच व फ्रेंच लोकांच्या सर्व वसाहतीही सहज रीत्या इंग्लिशांनीं हस्तगत करून घेतल्या;

ह्मणजे इंग्लंडविरुद्ध वर लिहिल्याप्रमाणें सर्व युरोपभर बहिष्कार घालण्यांत बोनापार्ट याला आलेल्या यशाचा महत्त्वाचा परिणाम हा झाला कीं, आशियांतील ब्रिटिश साम्राज्य नष्ट करण्याऐवजीं न कळतच त्यानें त्याची उभारणी आणि मजबुती केली. याशिवाय, फ्रान्सच्या बादशहानें जेव्हां इ. सन १८०७ मध्यें बर्लिन येथून हुकुमनामा प्रसिद्ध करून ब्रिटिश राष्ट्राच्या मालाविरुद्ध सर्व युरोपांतील बंदरांत बहिष्कार घातला, त्या वेळीं इंग्लिशांनीं त्याचा वचपा काढून घेण्याकरितां प्रधान मंडळाकडून, तिन्हाइत राष्ट्रांनीं बहिष्कार घातलेल्या बंदरांत व्यापार करूं नये, असा हुकूम काढविला; ह्मणजे, त्यामुळें असा परिणाम झाला कीं, समुद्रमार्गानें चालणाऱ्या व मुख्यत्वेंकरून आशियाबरोबरील अमूल्य व्यापाराचा मक्ता तात्पुरता ब्रिटिश राष्ट्राच्या हातीं आला होता. आणि समुद्रावरील दळणवळणाचे मार्ग, सामग्रीच्या पुरवठ्याची व आश्रयाची—त्याचप्रमाणें साधी व बचावाची—व्यवस्था असलेलीं सर्व बंदरेंही ह्या वेळीं ग्रेट ब्रिटनच्याच ताब्यांत होतीं.

इ. सन १८१५ च्या मोठ्या युद्धाच्या समाप्तीनंतर दीर्घ कालच्या शांततेला प्रारंभ झाला; त्यामुळें दक्षिणेकडील समुद्रांमध्यें ब्रिटिश राष्ट्रानें जिंकलेलीं, अतिशय महत्त्वाचीं ठाणीं—ह्मणजे केप ऑफ गुड होप, सिलोन, आणि मारीशस, हीं ठाणीं—निर्धास्तपणें त्या राष्ट्राला आपल्या ताब्यांत ठेवितां आलीं. हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील सर्व परराष्ट्रीय वसाहतींना निःशस्त्र करण्यांत आलें, आणि हिंदुस्थानांत तर, ब्रिटिश सरकारची सत्ता व साधनें यांच्याविरुद्ध आपली शक्ति अजमावून पाहील, असें या वेळीं एकही राज्य शिल्लक राहिलें नव्हतें. हिंदुस्थानांतील राज्यांपैकीं सहा मुख्य मुख्य राज्यांना तैनाती फौजेच्या तहानें ब्रिटिश सरकारच्या अनुशासनपद्धतींत बांधून टाकिलेलें होतें; पश्चिम व मध्य हिंदुस्थानांत बडोदें, पुणें, आणि हैद्राबाद, दक्षिण हिंदुस्थानांत म्हैसूर आणि त्रावणकोर, व वायव्येच्या बाजूला औध व इतर लहान लहान राज्यांचा मोठा जमाव—हीं सर्व


ब्रिटिश साम्राज्याच्या सार्वभौम सत्तेखालीं आणि संरक्षणाखालीं आलेलीं होतीं. त्यांच्या प्रदेशाच्या सरहद्दीपलीकडे पंजाबमध्यें रणजितसिंहाचें राज्य असून त्याचा विस्तार होत चालला होता, आणि हिमालयाच्या दक्षिणेकडील उताराच्या बाजूनें गुरखे लोकांचें नेपाळचें राज्य होतें. ब्रिटिश साम्राज्याच्या कक्षेखालीं अद्यापपर्यंत कायदेशीर रीत्या न आलेलीं, परंतु त्यांच्या ताब्यांतील प्रदेशानें वेष्टिलेलीं, अशीं फक्त तीनच संस्थानें मध्य हिंदुस्थानामध्यें शिल्लक राहिलेलीं होतीं. हीं तीन संस्थानें म्हटलीं, ह्मणजे लुटालूट आणि लढाया करण्याचें ब्रीद वंशपरंपरेनें पाळणाऱ्या मराठ्यांच्या जुटीच्या बळांतील ग्वाल्हेरचे शिंदे, इंदूरचे होळकर, आणि नागपूरचे भोंसले, ह्यांचींच होत; शिवाय, बडोदें येथील गायकवाडच्या राजघराण्याची परिस्थिति जरी निराळी होती, तरी त्याचीहि त्यांच्यांतच गणना करण्यास हरकत नाहीं.

हिंदुस्थानांत वर्चस्व मिळविण्याकरितां एतद्देशीय राजेरजवाड्यांबरोबर चाललेल्या मोठ्या लढाईचा निकाल इंग्लिशांना अनुकूल होऊन ती लढाई बंद झाल्यापासूनच त्यांच्या ताब्यांतील प्रदेशांत व्यवस्थित राज्यकारभार, त्यांच्या आसपासच्या राज्यकर्त्यांविषयीं पद्धतशीर राजकारण, आणि सार्वभौमनृपतीचीं वास्तविक कर्तव्यें व जबाबदारी यांची ओळख, ह्या गोष्टींस सुरुवात झाली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हैद्राबाद आणि औध येथील मुसलमानी राज्यें जीव धरून राहिलीं होतीं, पण तीं ब्रिटिश सरकारानें त्यांचें संरक्षण केलें ह्मणूनच तगलेलीं असून त्याबद्दल तीं त्यांचीं ऋणी होतीं; व जर त्यांनीं मध्यस्थी केली नसती, तर राज्य मिळविण्याकरितां चाललेल्या सर्वसाधारण झटापटींत त्यांच्याहून अधिक भयंकर व पुष्कळ चिकाटीच्या प्रतिस्पर्ध्यांकडून त्या राज्यांचा खास चुराडा उडाला असता. तथापि हेंही कबूल केलें पाहिजे कीं, आपला बचाव करून घेण्याकरितां त्यांना ब्रिटिश सरकारला द्यावा लागलेला मोबदलाही तसाच जबर होता. इंग्लिशांनीं त्यांच्याबरोबर केलेल्या पूर्वींच्या कांहीं

व्यवहारांत अंदाधुंदीच्या आणि फाटाफुटीच्या काळाला योग्य अशा पूर्ण उग्र मार्गांचें अवलंबन केलें होतें, आणि निकडीच्या वेळीं त्यांचा प्रदेश व वसुली ह्यांतूनही पुष्कळच जबर हिस्सा लष्करी खर्च भागविण्याकरितां त्यांना द्यावा लागला होता. परंतु आतां आपलें अस्तित्व कायम राखण्या-करितां ब्रिटिश सरकाराला असे तडकाफडकी उपाय योजण्याचें कांहींही प्रयोजन उरलें नव्हतें; कारण, त्यांना आपल्या स्वतःच्याच ताब्यांतील प्रदेशांतून भरपूर आणि अबाधित वसूली मिळत होती, त्यांना ठरलेल्या तहाअन्वयें संस्थानिक सरकारांशीं वागतांना सुधारलेल्या पद्धतीनें आपल्या व्यवहारांना नियमित स्वरूप देतां येणें शक्य झालें होतें, आणि मांडलिक एतद्देशीय राजेरजवाडयांबरोबरील त्यांचे सर्व व्यवहार त्यांना सरळ व नीतीच्या पायावर पुन्हां व्यवस्थित रीतीनें सुरू करण्यास कांहींही अडचण राहिली नव्हती.

त्याचप्रमाणें आपल्या ताब्याखालीं असलेल्या प्रदेशाच्या राज्यव्यव-स्थेची अंतःस्थ स्थिति पाहण्याला, आणि नुकत्याच त्यांनीं स्वतःच्या ताब्या-खालीं आणलेल्या मोठमोठ्या प्रदेशांत कांहींशी व्यवस्थित राज्यपद्धति सुरू करण्याला, ब्रिटिश सरकारास आतांच कांहींसा वेळ मिळाला होता. जमिनीच्या कबजा-हक्काबद्दल तपास, पोलीस खात्याची प्रथमच स्थापना, त्यांच्या सर्व प्रदेशभर चालू असलेल्या बंडाळीचा बींमोड करण्याचा पहिल्या-नेंच केलेला दीर्घ प्रयत्न, स्थानिक न्यायाच्या कचेऱ्यांची मांडणी आणि देखरेख, ह्या सर्व गोष्टींना याच शतकाच्या प्रारंभाला व्यापक स्वरूप मिळालें. ह्या व्यवस्थित राज्यकारभारच्या व्यापक पद्धतीची मूळ सुरवातही ह्याच तुलनात्मक दृष्ट्या शांततेच्या काळांत करण्यांत आली, आणि तिचाच आतां सर्व हिंदुस्थानभर फैलाव झालेला आहे. एकूणिसाव्या शतकाचीं पहिलीं पांच वर्षें ब्रिटिश सरकार—सतत चालणाऱ्या लढाया, मोठमोठे प्रांतिक फेरफार, हद्दींच्या निशाण्यांचें स्थानांतर, आणि संस्थानांची पुनर्रचना,—यांत गढून गेलेलें होतें; परंतु त्यानंतरच्या काळापासून

पुढें इंग्लिश सरकारच्या ताब्यांतील प्रदेशावर परदेशांतून स्वाऱ्या झाल्या नाहींत; त्यांच्या सरहद्दीच्या बाजूनें गंभीर स्वरूपाचे जोरजुलूम घडले नाहींत; आणि अंतःस्थ बंडेंही (इ. सन १८५७ शिवाय) झालीं नाहींत. त्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याला आजपर्यंत शांततेचा उपभोग घेण्यास मिळत असून, असाही प्रश्न करतां येण्यासारखा आहे कीं, आशियांतील अगर युरोपमधीलसुद्धां एखाद्या राष्ट्रानें ह्याच काळांत अशा रीतीचें पूर्ण राजकीय स्वास्थ्य उपभोगिलेलें आहे कीं काय ?



प्रिंटर.- मनोहर रामचंद्र गुर्जर, रामवाडी.
पब्लिशर.- दत्तात्रय बाळकृष्ण करकरे. शुक्रवार, पुणे.
लिथो.- मनोवेधक चित्रकला कंपनी प्रेस. नगरकरांचे रामवाडी. पुणे.

भाग सोळावा.

लार्ड हेस्टिंग्स ह्या गव्हर्नर जनरलची कारकीर्द.

(इ. सन १८१३-१८२३)

परिच्छेद पहिला—मध्य हिंदुस्थानांतील तत्कालीन परिस्थिति.

लार्ड वेलस्ली हा हिंदुस्थानांतून परत गेल्यानंतर, ब्रिटिश सरकारनें— आपल्या राज्याच्या सरहद्दींतील प्रदेशांतच आपला अंमल बसविण्याचा, यापुढें आपल्यावरील जबाबदारी नियमित करून त्याच तत्त्वावर स्वतः-च्या राज्यकारभार चालविण्याचा, व आपल्या शेजाऱ्यांचे कलह आणि विपत्ति यांच्याशीं स्वतःच्या प्रत्यक्ष कर्तव्याच्या पलीकडे संबंध न ठेवतां केवळ प्रेक्षकाप्रमाणें शांत वृत्तिच ठेवण्याचा,—निश्चय ज्या विचारांमुळें व परिस्थितीमुळें केला, त्यांचें विवरण करण्याचा कांहींसा प्रयत्न पूर्वींच केलेला आहे. अशिक्षित राज्यकर्ते अथवा रानटी जाति यांच्याशीं संबंध जडले-ल्या कोणत्याही बलिष्ठ युरोपियन राष्ट्रानें अतिप्राचीन काळापासून हेंच धोरण कायम राखण्याचा प्रयत्न केला; परंतु तो नेहमींच निष्फळ होत आलेला आहे. पहिल्यापहिल्यानें हें धोरण साधें व दूरदर्शीपणाचें असून सुज्ञपणाच्या स्वार्थामुळें व सार्वजनिक नीतिमत्तेमुळें प्रेरित झालेलें आहे, असें दिसतें. आणि अधिक चिरस्थायी संस्थांच्या अभावामुळें, किंवा अशा प्रकारच्या संस्था उत्पन्न होईपर्यंत, अमर्यादित राज्यपद्धति आणि कम-कुवत सुलतानी राजसत्ता ह्या उत्पन्न होऊन कांहीं काळपर्यंत टिकतातही;

परंतु, जीं राज्यें अव्यवस्थित व एकजातिवर्चस्वमूलक असतात, जीं एकतंत्री अमलाखालीं क्षणैक जीव धरून असतात, जीं त्यांच्यापेक्षां जास्त चिरस्थायी संस्थांच्या अभावामुळेंच केवळ उत्पन्न होतात, व अशा चिरस्थायी संस्था अस्तित्वांत येईपर्यंतच मात्र काय तीं टिकाव धरून राहतात, अशा रानटी राज्यांना, गिळंकृत जरी केलें नाहीं तरीही, पूर्णपणें दाबांत ठेवण्याची एखाद्या सुनियंत्रित व प्रबळ राष्ट्राची जी अनिवार्य प्रवृत्ति दृष्टोत्पतीस येते, तीस कांहीं काळपर्यंत प्रतिरोध करणें, किंवा आवरून धरणें, यापलीकडे वर निर्दिष्ट केलेल्या धोरणाचा केव्हांहि अधिक उपयोग झाला नाहीं, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. हा दाब वास्तविक रीत्या अगदीं क्षणिक असतो, इतकेंच नाहीं, तर अशा रीतीनें झालेला प्रतिरोध तितक्याच जोरानें उलट खाऊन प्रत्याघात उत्पन्न करील, असाही संभव असतो. थोडीशी विश्रांति घेतल्यानें जास्त वेगानें पुढें जातां येतें, आणि कांहीं पावलें माघार घेणें म्हणजेच लांबवर उडी मारण्याची पूर्व तयारी करण्यासारखेंच होय; म्हणून मुत्सद्दीगिरीची स्तब्धता दिसून आल्यास तिच्या मुळाशीं कावेबाजपणाचे विचार असतात, असें अनुमान करण्यास जागा मिळते; आणि आपल्या हातांत फळ आपोआप येऊन पडावें, म्हणूनच तें नासूं दिल्याबद्दल हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारवर अन्यायानें दोषारोप केला जातो. ह्या एकसारख्या विस्ताराबद्दलचा दोष बहुधा त्या सरहद्दीवरील अगर त्याबाहेरील प्रदेशांत राज्यकारभाराचीं सूत्रें चालवीत असतात, त्यांच्याच माथीं लादण्याचा नेहमीं परिपाठ आहे; परंतु राष्ट्राच्या मुख्य राजधानींतील द्रव्यसंचय अथवा राष्ट्रीय हिताची भावना —म्हणजे युरोपांतील लढाई किंवा परराष्ट्रीय राजकीय गुंतागुंती यांमुळें उत्पन्न होणारी भावना—हींच खरोखर—ज्या बाजूनें अतिशय थोडा प्रतिकार होण्यासारखा असेल, त्या बाजूनें—लढाई आणि धाडशी कृत्यें करण्यास भाग पाडतात. ही पुढें पुढें धांव घेणारी हालचाल पर्वत अथवा ओसाड व रुक्ष प्रदेश, ह्यांसारख्या नैसर्गिक अडथळ्यांमुळें तात्पुरती थांबते; परंतु

शेवटीं समान सामर्थ्याच्या शत्रूकडून जेव्हां तिच्या प्रगतीस अडथळा होतो, अथवा या गतीस प्रेरणा देणाऱ्या मध्यवर्ती शक्तीचा जेव्हां ऱ्हास होऊं लागतो,तेव्हांच काय ती ती कायमची बंद पडते.खरी गोष्ट म्हणजे ही आहे कीं, राज्यकारस्थानाच्या कलेमध्यें भक्कम रचना ही—उपलब्ध सामग्री, आणि निसर्गसिद्ध दाबाचा प्रतिकार करण्यासाठीं केलेल्या योग्य योजना, ह्यांवरच—अवलंबून असते. वाईट पाया रचून नदीला धरण घालणें हें जितकें अशक्य असतें, तितकेंच कडेकोट बंदोबस्त करणें दुरापास्त असतां सरहद्दीची रेषा आंखणेंही अशक्य असतें; आणि असा बंधारा ज्याप्रमाणें पहिल्याच पुराच्या धडाक्यासरशी वाहून जातो, त्याचप्रमाणें जी राज्य-पद्धति राजकीय चिरस्थायीपणाच्या स्वाभाविक पायावर उभारलेली नसते, अथवा जी राष्ट्रमर्यादा प्रांतिक चिरस्थायित्वाच्या नैसर्गिक पायावर आंख-लेली नसते, ती अत्यंत शहाणपणानें देखील पुष्कळ काळपर्यंत कायम राखणें अशक्य होतें.

या कारणामुळें, या शतकाच्या प्रारंभाला इंग्लिश सरकार हे जेव्हां लार्ड कार्नवालिस ह्याला वाटलेले मोठ्या पेंचांत गुरफटविणारे फांस आणि तडजोडीचीं आश्वासनें एतद्रूपी जाळ्यांपासून परावृत्त झाले, तेव्हां वर लिहिल्याप्रमाणें त्यांनीं कांहीं मोठालीं संस्थानें आपल्या दृष्टीच्या कक्षेखालीं ठेविलीं होतीं; परंतु राजपुतान्यासह बहुतेक सर्व मध्य हिंदु-स्थानांतील संस्थानांना मात्र त्यांनीं आपल्या स्वतःच्याच जबाबदारीवर वाटेल तसें वागण्याची मोकळीक ठेविली होती, आणि आपल्या प्रदेशा-च्या सभोंवती कडेकोट बंदोबस्त ठेविला होता. परंतु ह्या कक्षेबाहेरील, ह्मणजे मराठ्यांच्या घराण्यांचीं व पुरातन रजपूत राजघराण्यांचीं जेथें राज्यें होतीं, अशा मोठ्या प्रदेशभर त्यांनीं शिंदे, होळकर व इतर लुटारू पुढारी, यांना पाहिजे तसें वागण्याची मुभा दिली होती. मराठ्यांच्या मुलखांत पारतंत्र्याच्या निरनिराळ्या स्वरूपाच्या भूमिकेंत बरींच लहान लहान मांडलिक व विवक्षित जातींचीं संस्थानें पसरलेलीं होतीं; मराठ्यां-

च्या सरहद्दीपलीकडे, ह्मणजे पश्चिमेस मोठ्या रुक्ष प्रदेशाच्या बाजूस, रजपूत लोकांचीं संस्थानें पसरलेलीं होतीं; परंतु त्या संस्थानांत एकी नसल्यामुळें तीं इतकीं निर्बल झालीं होतीं कीं, लुटालूट करीत फिरणाऱ्या मोठमोठाल्या सैन्यांच्या विध्वंसकारक प्रयत्नांस आळा घालण्यास, किंवा त्यांच्या हक्काच्या नांवाखालील उकळण्यांत येणाऱ्या खंडण्यांना प्रतिकार करण्यास, त्यांच्यांत मुळींही सामर्थ्य नव्हतें. मध्यकालीन हिंदुस्थानांतील अगदीं शेवटचीं शिल्लक राहिलेलीं स्मारकें म्हणून असणारीं हीं अगदीं प्रारंभींचीं वित्रक्षित जातींचीं संस्थानें अफगाण आणि मोंगल यांच्या राज्यांची अखेर होईपर्यंत टिकलेलीं होतीं, आणि अठराव्या शतकांतील भयंकर युद्धाच्या धामधुमींतूनही पार पडलेलीं होतीं. परंतु आपापसांत झालेल्या अंतःकलहामुळें त्यांच्यांत अतिशय फूट पडलेली होती, आणि रजपूत वंशांतील शिबंदीही मराठ्यांच्या कसलेल्या टोळ्यांस अगर अमीरखानाच्या भाडोत्री सैन्यास प्रतिरोध करण्यास अगदींच असमर्थ झाली होती. या वेळीं ह्या संस्थानांपैकीं कांहीं—ब्रिटिश सरकारांनीं आपणास संरक्षणाखालीं घेण्याचें नाकारलें ह्मणून—मोठ्या कळकळीनें त्यांची कानउघाडणी करीत असून, "ब्रिटिश सरकारनें आपलें संरक्षण करणें" हा आपला हक्क आहे, असें तीं ह्मणूं लागलीं होतीं. आणि त्यांचें असेंही ह्मणणें होतें कीं, "अशी कोणती तरी एक श्रेष्ठ सत्ता हिंदुस्थानांत आजपर्यंत नेहमीं असे कीं, जिच्या आधीन शांतताप्रिय संस्थानें रहात असत; आणि त्या अंकितत्वाचा मोबदला ह्मणून ती सत्ता बलिष्ठ सरदारांच्या आणि बंडखोर लोकांच्या टोळधाडीपासून त्यांचें नेहमीं संरक्षण करीत असे. त्याप्रमाणें, या वेळीं संरक्षक सत्तेची जागा ब्रिटिश सरकाराला मिळालेली असून,—त्यांनीं संरक्षण करण्याचें नाकारलें ह्मणून दरवडेखोर व लुटारू यांच्या जुलमाला आणि निर्दयपणाला जीं निर्बल संस्थानें नेहमीं बळी पडत,—त्यांचीही स्वाभाविक रीत्या हीच सत्ता संरक्षक आहे."

१. इंग्लिशांतर्फें राजपुतान्यामध्यें असलेला रेसिडेंट, सर चार्लस मेटकाफ, यानें पाठविलेल्या पत्रांतील उतारा. जून इ. सन १८१६.

ज्या पद्धतीला "आत्मसंरक्षक धोरण" असें ह्मणतां येईल, ती पद्धत कायम राखण्याच्या इरादानें लार्ड मिंटो हा हिंदुस्थानांत आलेला होता. परंतु इ. सन १८१३ मध्यें लार्ड मोइरा, अगर मागाहून ज्याला मार्किस ऑफ हेस्टिंग्स असें ह्मणत, त्याच्या हातीं गव्हर्नर जनरलच्या जागेचीं अधिकारसूत्रें सोंपविण्यापूर्वींच वस्तुतः त्यानें आपले विचार बदलले; कारण, एका लुटारू टोळीच्या नायकापासून होळकर सरकारचें संरक्षण करण्या-साठीं लष्करी सैन्यानिशीं मध्यें पडणें, आणि नागपूरकडील प्रदेशांत लूट-मार करण्याच्या तयारींत असलेल्या लुटारू अमीरखानाला दाबांत ठेव-ण्याकरितां रणक्षेत्रांत सैन्य पाठविणें, त्याला भाग पडलें होतें. इ. सन १८११--१३ पर्यंत पेंढारी लोकांची संख्या फारच मोठ्या प्रमाणावर वाढली. गुप्त हेरांचें काम करणारे, जनावरांसाठीं दाणाचारा पुरवून हिंदू सैन्यास ऐन प्रसंगीं मदत करणारे, "कही" ह्मणून फौजेच्या अंगभूत असणारे, कांहीं एक पगार न घेतां काम करून लुटीवरच निर्वाह करणारे, परंतु मुख्य सेनानायकाचे हुकूम बरोबर पाळणारे, असे इतस्ततः संचार कर-णारे जे लोक होते, त्यांच्यामधूनच ह्या प्रसिद्ध टोळ्या निर्माण झालेल्या होत्या. एतद्देशीय संस्थानांतील कायमचीं सैन्यें कमी केल्यामुळें तीं संस्थानें निर्बल झालेलीं असल्यानें, ह्या टोळ्यांनीं स्वतःला लष्करी अगर जान-पदत्वाच्या पारतंत्र्यापासून सोडवून घेतलें, आणि "स्वतंत्र भालेवाले" असें नामाभिधान धारण करून स्वतःच्या पुढाऱ्यांच्या धुरीणत्वाखालीं त्यांनीं आपल्या स्वतंत्र टोळ्या निर्माण केल्या. त्यांनीं या वेळेच्या सुमारास इंग्लि-शांचे दोस्त असलेले पेशवे व निझाम यांचे प्रदेशांवर स्वारी केली, लुटा-लूट चालविली, खंडणी उकळिली, आणि इंग्लिशांच्याच ताब्यांतील सुसं-पन्न अशा बहार प्रांतांतही आगी लावण्याची व तरवारीच्या जोरावर धुमाकूळ उडविण्याची दहशत घातली. तथापि अशा स्थितींत सुद्धां वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें ब्रिटिश सरकारच्या तटस्थ वृत्तीच्या धोरणाचें फक्त एकाच मुद्द्यावर समर्थन करतां येण्यासारखें असून, तो मुद्दा ह्मणजे हा

होता कीं, युद्धें व गुंतागुंतीचीं प्रकरणें उपस्थित करून अव्यवस्था माजविणारीं कारणें हळहळू लयास जाऊन, त्यांच्या जागीं भरभक्कम पायावर उभारलेली जोरदार राज्यपद्धति हिंदुस्थानांतील संस्थानांतून सुरू होईल. परंतु लवकरच असें उघड उघड दिसून आलें कीं, एखाद्या दाट वस्तीच्या प्रदेशांतील मध्यभागांत सांथीचा रोग विवक्षित क्षेत्रांत मर्यादित करण्याचा प्रयत्न करणें हें जितकें असमंजसपणाचें आहे, तितकेंच हिंदुस्थानांतील मध्य टापूंत राजकीय अव्यवस्थेचा जन्म होऊं देणें, अथवा तिला वाढीला लागूं देणें, हेंही अदूर दृष्टीचेंच आहे. कारण, पहिली गोष्ट ही कीं, मराठा सरदार मंडळ हे असंतुष्ट व खिन्न असून त्यांचीं मनें ब्रिटिश सरकाराविषयीं, त्यांनीं त्यांचें वर्चस्व हाणून पाडल्यामुळें, स्वाभाविकपणेंच शुद्ध नव्हतीं; आणि त्या सरदारांनीं आपलें लष्करी बळ सुधारण्याचे व वाढविण्याचे प्रयत्नही जारीनें सुरू ठेविले होते. दुसरी गोष्ट ही आहे कीं, त्यांच्या राज्यांच्या सभोंवतालच्या प्रदेशांत सुव्यवस्थेचा झालेला प्रारंभ, आणि त्यांच्या ठरीव हद्दीच्या आंतच राहण्याविषयीं त्यांना घालण्यांत आलेला निर्बंध, ह्या दोन्ही गोष्टी—त्यांची सत्ता उत्पन्न होण्यास कारणीभूत झालेल्या, आणि त्यांच्या सत्तेच्या अस्तित्वाला अजूनही अवश्यक असलेल्या, अशा स्थितींशीं—अगदींच विसंगत होत्या. कारण, मराठे राज्यकर्त्यांना आपल्या शेजारच्या राजांपासून जुलमानें पैसा उकळून आणि लुटीकरितां नेहमीं स्वाऱ्या करूनच मोठमोठालीं सैन्यें पोसतां येत होतीं. शिवाय, तिसरी गोष्ट ह्मणजे ही आहे कीं, या देशांत चालणारीं अनीतिमूलक युद्धें बंद पडल्यामुळें, व बऱ्याच मोठ्या भागांत स्थायिक संरक्षक सत्ता प्रस्थापित झाल्यामुळें, ब्रिटिश सरकारच्या श्रेष्ठ व शांततोत्पादक सत्तेनें ज्या भागांत आपली हुकमत चालविण्याचें नाकारलें, आणि कायदेशीर रीतीनें आपला मध्यस्थी करण्याचा हक्कही सोडून दिला, तेथें युद्धें दुणावतील, आणि घोटाळेही वाढतील, हें स्पष्ट दिसत होतें. ब्रिटिश सरकार व त्यांचे दोस्त—संस्थानिक सरकार—यांनीं आपापल्या बऱ्याच मोठ्या

सैन्याला फांटा दिला होता. परंतु तरवार आणि भाले ह्यांवर निर्वाह करणाऱ्या टोळ्यांना—सुव्यवस्थित राज्यकारभाराच्या क्षेत्रामध्यें आपला धंदा आतां या पुढें चालणार नाहीं,—असें जेव्हां कळून चुकलें, तेव्हां एखाद्या सुपीक उंचवट्याच्या प्रदेशांतून ज्याप्रमाणें पाण्याचा झोत खालीं दलदलीच्या जागेकडे जोरानें येऊं लागतो, त्याचप्रमाणें ते शांततायुक्त प्रदेशांतून अव्यवस्थित राज्यकारभाराच्या प्रदेशांकडे जोरानें वळले.

ह्या वेळीं हिंदुस्थान देशांत नुकतीच कोठें शांतता आणि औद्योगिक उन्नति यांना सुरवात होऊं लागली होती, त्यामुळें त्यांत बंडवाले आणि फिरते लुटारू यांनीं बजबजलेल्या अलसेशिया प्रांताप्रमाणें राजकीय परिस्थिति पुष्कळ दिवस राहूं देणें ही गोष्ट खरोखरच अशक्य होती; तथापि तडकाफडकी पहिलें धोरण बदलून नवीन पद्धति सुरू केल्यामुळेंच अशी स्थिति उत्पन्न झाली होती. ब्रिटिश सरकारला आतां हिंदुस्थानांत शांतता प्रस्थापित करण्याचें कार्य अर्धवटच राहूं दिल्याशिवाय, आणि एका मोठ्या एकजातीय जनसमाजाला दोन निरनिराळ्या व परस्पर अगदीं विरुद्ध अशा राज्यपद्धतींखालीं राहूं दिल्याशिवाय, स्तब्ध व तटस्थ राहतां येणें शक्य नव्हतें; कारण, हिंदुस्थानांतील जनतेंत जातिभिन्नता व भाषावैचित्र्य यांमुळें जरी थोडासा तुटकपणा आलेला आहे, तरीही ज्याप्रमाणें त्यांचा देश पर्वत आणि समुद्र यांमुळें आशियांतील इतर भागांपासून पूर्णपणें ओळखतां येण्यासारखा आहे, त्याचप्रमाणें त्या देशांतील लोकांच्या कांहीं भौतिक आणि नैतिक गुणवैशिष्ट्यामुळें त्यांचीही पूर्ण ओळख पटण्यासारखी आहे. ह्या मोठ्या देशाचे घटकावयव हे राजकीय आणि नैसर्गिक दृष्ट्या एकमेकांस चिकटल्या सारखे आहेत; आणि इराण, चीन अथवा आशियांतील तुर्कस्थान, ह्या देशांप्रमाणें विरोधी अशा दोन राज्यपद्धतींस त्यांत मुळींही जागा नाहीं. ब्रिटिश साम्राज्याच्या बाल्यावस्थेच्या वेळीं—ह्मणजे जेव्हां एतद्देशीय राजेरजवाड्यांचीं सैन्यें चांगल्या रीतीनें विभागलेलीं असून परस्पर समतोल होतीं, आणि फेनीशियन अथवा व्हेनीशियन

लोकांनीं भूमध्यसमुद्रामध्यें जें धोरण ठेविलें होतें, त्याचप्रमाणें हिंदी आणि अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर एक प्रचंड आरमारी आणि व्यापारी सत्ता प्रस्थापित करण्याकडेच ब्रिटिश लोकांनीं आपलें सर्व साहस आणि आपले सर्व प्रयत्न हीं खर्च करणें ज्या वेळीं वास्तविक रीत्या योग्य झालें असतें, अशा वेळीं,—तटस्थ वृत्ति स्वीकारण्याचा त्यांचा कल विसंगत दिसला नसता. परंतु पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अठराव्या शतकाच्या दुसऱ्या अर्ध भागांत आपलें संरक्षण करण्याकरितां आणि फ्रेंचांच्या अगोदर अघाडी मारण्याकरितां स्थानिक युद्धांमध्यें लढत लढत व प्रदेश काबीज करीत करीत त्यांनीं हिंदुस्थानच्या अंतःप्रदेशांत आपला शिरकाव केला होता; त्यानंतर फ्रेंचांच्या प्रतिस्पर्धेची भीति पूर्ण नाहींशी होण्यापूर्वींच मराठ्यांशीं व म्हैसूर येथील राज्यकर्त्याशीं इंग्लिशांना तोंड देणें भाग पडलें होतें; ब्रिटिश लोकांच्या वाढत्या सत्तेमुळें त्यांचा स्वाभाविक मत्सराग्नि फ्रेंचांकडून भडकविण्यांत आला होता; व त्यांचीं सुनियंत्रित सैन्यें इंग्लिशांना सारखा शहही देत होतीं. या संकटांना तोंड देण्याकरितां, ब्रिटिश सरकारच्या राजकीय वर्चस्वाच्या आधीन होणाऱ्या सर्व संस्थानांचें सामान्यतः संरक्षण करण्याचें कार्य अंगावर घेऊन, आणि अलग राहणारास विवक्षित मर्यादेच्या आंतच अडकवून ठेवून, लार्ड वेलस्ली यानें व्यापक प्रमाणावर तैनाती सैन्याची घटना केली. आणि सरते शेवटीं, जेव्हां म्हैसूरकर आणि मराठ्यांच्या जुटीचें बळ यांपैकीं—ह्मणजे ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध ज्या दोन प्रबळ सत्तांनीं आपलें डोकें वर काढलें होतें, त्यांपैकीं—पहिल्याचा नायनाट उडविला गेला, आणि दुसऱ्याला हतवीर्य करून टाकण्यांत आलें, त्या वेळीं, ब्रिटिश साम्राज्याच्या वर्चस्वरूपी वृक्षाचा विस्तार इतका व्यापक झाला कीं, त्याच्या गर्द छायेखालीं या वेळीं हिंदुस्थानचा बहुतेक भाग आल्यासारखा असून त्यांनीं मिळविलेल्या श्रेष्ठ पदावरून खालील पायरीवर पाय ठेवण्याची अथवा सर्व हिंदुस्थानचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवण्याची सुसंधि आली असतां, मध्येंच एकदम थबकून राहण्याची वेळ केव्हांच

पार निघून गेलेली होती. ब्रिटिश सरकार म्हणजे आतां एक दिग्विजय मिळविणारें राष्ट्र बनलेलें होतें, त्यांनीं आतां आशियांतील एका देशाचें–म्हणजे हिंदुस्थान देशाचें–सामंतचक्राधिपति हें पद मिळविलें होतें, आणि हिंदुस्थानांत पूर्ण बंदोबस्त करण्याची जबाबदारीही उघड उघड त्यांच्यावरच येऊन पडली होती. जेव्हां ती जबाबदारी टाळण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, तेव्हां ती अंगावर घेण्याला दुसरा कोणीही समर्थ नव्हता; आणि ज्यांना आपला समूळ नाश झाला आहे, अगर आपण दुसऱ्याच्या भक्ष्यस्थानीं बळी पडलों आहोंत, असें कळून आलें, ते लहान लहान संस्थानिक ब्रिटिश सरकारास या वेळीं "त्यांनीं सार्वभौमत्वाचें पद अगोदरच पटकाविलेलें असूनही त्यास उचित असें कर्तव्य करण्यास मात्र ते माघार घेत आहेत," असें दूषण देत होते. लार्ड वेलस्ली यानें उभारलेल्या भव्य राजकीय इमारतीस आधारस्तंभ असलेल्या कमानीचा मुख्य दगड "ब्रिटिश सत्तेचें श्रेष्ठ वर्चस्व" हा असून तो अगदीं भक्कम बसविल्याशिवाय त्यावरील सर्व बांधकाम हें अवश्यमेव डळमळीत आणि धोक्याचेंच राहील, ही गोष्ट पहिल्यापासूनच उघड उघड दिसत होती. कारण, सार्वभौमत्व मिळविण्याच्या मार्गावर ब्रिटिश साम्राज्य सरकार या वेळीं इतकें पुढें गेलेलें होतें कीं, मध्यंतरींच तटस्थपणा स्वीकारतां येणें, ही गोष्ट त्यांना आतां पूर्णपणें अशक्य झालेली होती. ह्याच वेळेच्या सुमारास माउंटस्टुअर्ट एलफिन्स्टन यानें असें लिहिलें आहे कीं, "ज्या धोरणामुळें हिंदुस्थानांतील इतर राज्यकर्त्यांचा द्वेष आम्हांला कदाचित् टाळतां आला असता, तें धोरण तर आम्ही पुष्कळ दिवसांपासूनच सोडून दिलेलें आहे; आणि निर्भय अथवा सुसंबद्ध अशा—सर्व हिंदुस्थानभर आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या—दुसऱ्या एकट्याच मार्गाच्या मध्यावर आम्ही थोडेसे थबकलेले आहोंत. या कारणामुळें अजूनसुद्धां दिग्विजयी राष्ट्रास अवश्यक अशा धैर्याच्या अभावामुळें आम्ही दोषास मात्र पात्र झालेले

आहोंत, आणि त्यामुळें ह्या विस्तीर्ण देशांतील संपत्ति किंवा लष्करी सामर्थ्य यांचे फायदे आम्हांस न मिळतां उलट ह्या अफाट राष्ट्रासंबंधीं-ची जबाबदारी मात्र आम्हांवर येऊन पडलेली आहे. जर आम्हांला शांततेचें पाठबळ मिळालें असतें, तर अशा धोक्याच्या स्थितींतही राह-ण्याला कांहीं तरी योग्य कारण आहे, असें म्हणतां आलें असतें; परंतु ही गोष्ट तर आतां आम्हांला इतकी पारखी झालेली आहे कीं, आमचा आणि आमच्या दोस्त सरकारांचा प्रदेश स्वाऱ्या आणि लुटालूट यांच्या योगानें प्रत्यक्ष लढाईच्या वेळेहूनहीं अधिक प्रमाणानें उद्ध्वस्त होण्याचा संभव आहे."

मध्यंतरीं सर्व मध्य हिंदुस्थानांतील प्रदेशाची आधींच वाईट झालेली स्थिति अधिक अधिकच निकृष्ट होत चालली होती. आपण पूर्वीं असें वाचलेलेंच आहे कीं, अठराव्या शतकांत लढाईचा धंदा करणाऱ्या भाडोत्री शिपायांचा सर्व हिंदुस्थानभर सुळसुळाट झालेला होता. हा धंदा या काळीं अत्यंत भरभराटीचा असून कित्येक पिढ्यांपासून तो या देशांत अगदीं राजरोस चालू ठेवण्याची वहिवाट पडली होती; आणि खरें सुद्धां वाटणार नाहीं, इतका मोठा बहुजनसमाज ह्या लुटालुटीच्या धंद्यावरच आपली उप-जीविका चालवीत होता. लार्ड वेलस्ली यानें आपल्या कारकीर्दींत खालसा करून व दिग्विजय मिळवून बरेच प्रांत ब्रिटिश साम्राज्यास जोडले होते, व त्याची सरहद्द आणि त्यांच्या संरक्षणाखालीं आलेल्या संस्थानिकांचा प्रदेश यांचीही बरीच व्यापक वाढ झालेली होती; त्यामुळें पुष्कळ सैन्यास फांटा देण्यांत आला होता. एका लायक तज्ज्ञ मनुष्याच्या ठोकळ मोज-दादीवरून असें कळतें कीं, बहुतेक सर्व देशभर शांतता पसरलेली असल्या-मुळें शिपाईगिरीच्या धंद्याचे असे—अगदीं नेमस्तपणानें गणती केली, तरीही—पांच लाख लोक बेरोजगारी झाले होते. ह्यांपैकीं बहुतेक, आणि खाजगी धाडसाचें क्षेत्र आकुंचित झाल्याबरोबर ज्यांचे धंदे ठार बुडालेले होते, अशा लुटालूट करणाऱ्या वर्गापैकीं पुष्कळ, मध्य हिंदुस्थानांत जमा

झाले; आणि पूर्व अंदाजाप्रमाणें ते कमी अगर स्तब्ध न होतां त्यांची संख्या इतकी वाढली कीं, त्यांच्यापासून त्रास होण्याची भीति उत्पन्न झाली. त्यांना कांहीं एतद्देशीय संस्थानिकांकडून गुप्त रीतीनें प्रोत्साहन मिळालें होतें, ते बाकीच्यांना भिववीत असत, आणि त्यांचा बीमोड करण्याची धमक कोणत्याही सत्तेंत राहिली नव्हती. ह्या लुटारू टोळ्यांच्या झुंडीच्या झुंडी जेव्हां सर्व हिंदुस्थानभर मनसोक्त धुडगूस घालीत, त्या वेळीं त्यांचा त्रास एखाद्या विवक्षित प्रदेशास क्षणिक व मधून मधूनच काय तो होत असल्यामुळें फारसा जाणवत नसे; परंतु आधींच लूटफाटीनें उद्ध्वस्त झालेल्या मध्य प्रदेशांतच जेव्हां ह्या झुंडी कोंबल्या गेल्या, तेव्हां मात्र एखाद्या भयंकर प्राणघातक रोगाप्रमाणें त्या अत्यंत हानिकारक होऊन बसल्या. अशा रीतीनें लहान लहान मांडलिक राज्यकर्त्यांचा निःपात होत असतां, मोठमोठे लष्करी सरदार आपापल्या सैन्यांत लढाऊ लोकांची भरती करीत होते, खजिन्यांत भर घालीत होते, आपल्या हालचालींचें क्षेत्र वाढवीत चालले होते, व असें करण्यांत—पूर्वींच्या युद्धांत नष्ट झालेलें आपलें प्रचंड लष्करी महत्त्व साधल्यास पुन्हां प्राप्त करून घ्यावें,—हा त्यांचा मुख्यत्वेंकरून हेतु होता.

तैनाती तहाच्या पद्धतीमुळें, भाडोत्री शिपायांच्या सैन्याला फांटा मिळणें आणि राजरोस लूटफाट करणाऱ्या ह्या ग्रंथिक सन्निपाताला आळा घालणें, ह्याशिवाय आणखीही दुसरे परिणाम झालेले आहेत. कारण, ह्या तहाप्रमाणें वागण्याचा ज्या संस्थानिकांनीं करार केला, त्यांची लष्करी सत्ता ब्रिटिश सरकारच्या हातीं गेल्यामुळें, व आपल्य वर कोणी हल्ला केला अगर आपल्या विरुद्ध कोणी बंड केलें, तर आपलें संरक्षण होईल, अशी त्यांची खात्री असल्यामुळें, उत्तम आणि शिस्तीचा राज्यकारभार चालविण्याची त्यांच्यावरील जबाबदारी अर्थातच कमी झाली; पण त्याबरोबरच त्या एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या स्वतःच्या राज्यांत राज्यकारभार चालविण्याच्या अधिकारालाही बराचसा आळा बसला; कारण, आपला

सर्वस्वी नाश होण्याचा प्रसंग आला, तर तो टाळण्याकरितां ब्रिटिश सरकाराकडे केव्हांही आपणास मदतीची मागणी घालतां येईल, असें त्यांना माहीत होतें, आणि ब्रिटिश साम्राज्य-सरकारच्या बलिष्ठ सत्तेवर अवलंबून राहण्याच्या प्रवृत्तीमुळें त्यांचा उत्साहही निःसंशय नामशेष झालेला होता. तैनाती फौजेच्या तहाच्या पद्धतीमुळें ब्रिटिश सरकारचे दोस्त सरकार बनलेल्या संस्थानिकांच्या ह्या वर लिहिलेल्या तोट्याबरोबरच त्यांच्या फायद्याची हीही गोष्ट विचारांत घेतली पाहिजे कीं, त्या साम्राज्यसत्तेच्या आश्रयाशिवाय त्या दोस्त संस्थानिकांपैकीं पुष्कळांचा, सतत चालू असलेल्या युद्धकलहांत स्वसंरक्षणाचा बोजा जर त्यांच्या स्वतःच्याच अंगावर पडला असता तर, खात्रीनें नाश झाल्याशिवाय राहिला नसता. ह्या राजेरजवाड्यांपैकीं बहुतेकांचें तर ब्रिटिश सरकारशीं झालेल्या सख्यत्वामुळेंच साहाजिक रीतीनें होणाऱ्या नाशापासून संरक्षण झालेलें आहे; तथापि त्यांच्या अंतःस्थ सत्तेला मात्र त्यामुळें बिलकुल बळकटी आली नाहीं. अशा रीतीनें या दोस्त राजेरजवाड्यांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांतील अंतःस्थ अव्यवस्था दाबून टाकण्याच्या जबाबदारीमागोमागच बाह्य संरक्षणासंबंधीं जबाबदारीचा बोजाही ब्रिटिश सरकारवर येऊन पडला, आणि हळूहळू तेंच त्याचें " आश्रयस्थान " बनलें. ब्रिटिश साम्राज्य सरकारचें राजकीय धोरण कदाचित् पुढें मागें होत असेल; तथापि आपण आतां प्रत्येक तंट्याबखेड्यांत अखेरचे मध्यस्थी करणारे आहोंत, आणि सर्व हिंदुस्थानच्या शांततेच्या मुख्य पालकत्वाच्या श्रेष्ठ पदास हळूहळू पोहोंचत चाललेले आहोंत, असें त्यांना या वेळीं आढळून आलें.

वर नुकत्याच वर्णन केलेल्या परिस्थितीमुळें मध्यकालीन युरोपांतील लुटारू लोकांच्या " स्वतंत्र मंडळ्यां " प्रमाणें मध्य हिंदुस्थानांतील लुटारू लोकांच्या टोळ्या भरभराटीस आलेल्या होत्या, व त्यांची वाढही झालेली होती. इ. सन १८१४ पर्यंत अमीरखान या नांवाचा एक प्रसिद्ध लष्करी धाडसाचा मनुष्य कमींत कमी तीस हजार माणसांचें जय्यत सैन्य आणि जंगी

तोफखाना ह्यांसह राजपुतान्यांत लुटालूट करून आपला चरितार्थ चालवीत असे; कोणत्याही एखाद्या सर्वमान्य सरकाराशीं अथवा विशिष्ट प्रांताशीं संबंध नसलेलें, आणि कोणत्याही प्रकारच्या राजकीय अगर सामाजिक जबाबदारीला पारखें असलेलें, असें हें प्रबळ खडें सैन्य मध्य हिंदुस्थानासभोंवतीं स्वेच्छाचारानें संचार करीत फिरावें, ही एकच गोष्ट त्या काळच्या प्रचलित अव्यवस्थेची पूर्ण साक्ष पटवीत आहे. परंतु अमीरखानाच्या सैन्यांत कांहीं तरी शिस्त होती; हें सैन्य कांहीं अंशीं प्रत्यक्ष लढाईस योग्य अशा पद्धतीवरच ठेविलेलें होतें; आणि आपण स्वतःकरितां एक स्वतंत्र संस्थान निर्माण करावें, असा अमीरखानाचा उद्देश होता. परंतु खऱ्या पेंढाऱ्यांच्या टोळ्यांचा उद्देश सरसकट लूटफाट उडवावी, एवढाच फक्त काय तो होता. त्यांच्या लुटारू घोडेस्वारांच्या अशा बऱ्याच टोळ्या होत्या. छट्टू हा त्यांचा अत्यंत प्रिय पुढारी होता; त्याच्याजवळ दहा हजार घोडेस्वारांचें सैन्य होतें; तें सैन्य श्रीमंत आणि सुपीक प्रदेशांत घुसून लूटफाटीवर आपला उदरनिर्वाह चालवीत होतें; आणि त्यांची ब्रिटिश सरकारच्या अगर त्यांच्या दोस्त संस्थानिक सरकारच्या ताब्यांतील प्रदेशाला कायमची भीति होती. पुणें, नागपूर व ग्वाल्हेर, येथील स्वतंत्र मराठा राज्यकर्त्यांशीं त्यांचें गुप्त दळणवळण सुरू होतें, असें निर्विवादपणें ह्मणतां येईल; कारण, मराठे लोक ह्या हत्यारबंद टोळ्यांचा नायनाट करण्याच्या कामीं फारसे उत्सुक नव्हते; आणि उलट पक्षीं, पेंढारी लोकही मराठ्यांच्या प्रांताला कोणत्याही प्रकारें त्रास न पोंचवितां इंग्लिशांच्या व निझामाच्या मुलखाला मात्र नेहमीं दखल पोंचवीत होते. यावरून ब्रिटिश सरकारशीं दोन हात करण्याची पुढें मागें आपण तयारी केल्यास हे पेंढारी लोकच आपणास जबरदस्त मदतगार होतील, ही गोष्ट मराठ्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबली होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

परिच्छेद दुसरा—नेपाळचें युद्ध.

(इ. सन १८१४–१८१६.)

इ. सन १८१४ मध्यें नेपाळबरोबर ब्रिटिश सरकारचें युद्ध झाल्यामुळें त्यांच्याविरुद्ध उत्पन्न झालेल्या संकटांत आपली संधि साधण्याची आशा मराठ्यांच्या मनांत उत्पन्न झाली. इ. सन १७६८ च्या सुमारास गुरखाली अगर गुरखे लोकांच्या——म्हणजे ज्यांची उत्पत्ति सपाट प्रदेशांतील हिंदू व डोंगराळ प्रदेशांतील जाती, यांच्या मिश्रणानें झालेली आहे, त्या लोकांच्या——एका सरदारानें बंगालच्या उत्तर बाजूस असलेल्या हिमालयाच्या दक्षिणेकडील उतरणीवरील बाजूचे सर्व पठार आणि दऱ्याखोऱ्या आपल्या हस्तगत केल्या, आणि त्याच्या पाठीमागून गादीवर आलेल्या राज्यकर्त्यांनीं औंध, रोहिलखंड, आणि पंजाबच्या सरहद्दीस भिडलेला गंगा व यमुना या नद्यांनीं सुपीक झालेला प्रदेश, यांच्या उत्तरेकडील उंचवट्याच्या बाजूस असलेल्या मुलखांत आपली तरवार गाजविली. मोंगल राज्यकर्त्यांनीं ह्या दुर्गम, डोंगराळ आणि रानटी प्रदेशांत आपला शिरकाव व्हावा म्हणून केव्हांही आस्था दाखविली नाहीं. हा प्रदेश पूर्वीं लहान लहान हिंदू राज्यकर्त्यांच्या ताब्यांत होता, आणि ते खालील सपाट प्रदेशांतील लूटफाटीवरच बहुतांशीं आपला निर्वाह करीत असत. परंतु गुरख्यांच्या प्रमुख सरदारानें बंगालच्या परिस्थितीवरून धडा घेऊन एक शिस्तीचें सैन्य तयार केलें, आणि त्या सैन्याच्या मदतीनें त्यानें तेथील राज्यकर्त्यांना सहज पालथें घातलें. त्या सरदाराचे वंशज बराच काळपर्यंत राज्यशकट हांकलीत होते; प्रत्येक राज्यकर्त्याच्या राज्यारोहणाच्या प्रसंगीं नेहमींप्रमाणें बेबंदशाही माजत असे; आणि शेवटीं इ. सन १८०५ मध्यें कटवाल्यांनीं त्याच्या नातवाचा खून केला! त्यानंतर एकाच राज्यकर्त्याच्या ताब्यांत तें राज्य पुष्कळ काळपर्यंत असें कधींच राहिलें नाहीं, आणि प्रमुख जातीपैकीं

कांहीं उच्च दर्जाच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या हातांत तो प्रदेश गेला. हे
अधिकारी वंशपरंपरेच्या राज्यकर्त्यांना आपल्या नियंत्रणाखालीं ठेवितात,
व त्यांच्याच नांवानें राज्यकारभारही चालवीत असतात. ज्या अर्थी त्यांचें
सैन्य युरोपियन पद्धतीनें तयार केलेलें व सज्ज ठेविलेलें होतें,—कारण,
लष्करी बाबतींत इंग्लिश नमुन्याचें नेहमीं हुषारीनें अनुकरण करणारी
गुरखा ही जात आहे,—त्या अर्थी त्यांनीं पश्चिमेकडे लहान लहान
डोंगराळ संस्थानांपर्यंतच्या सर्व प्रांतांवर आपली विजयपताका फडकवीत
नेली होती, आणि इंग्लिशांच्या हद्दींतील हिंयालयाच्या खालच्या प्रदेशां-
मधील भागांतही अतिक्रमण करण्यास त्यांनीं सुरवात केली होती.
हिमालय पर्वताच्या सरहद्दीवरील लहान लहान राज्यकर्त्यांमध्यें आणि
बंगाल्यांतील मोठमोठ्या धनाढ्य जमीनदारांमध्यें फार प्राचीन काळा-
पासून हाडवैर चालत आलेलें होतें; कारण, नेपाळच्या सरहद्दीवरील सर्व
सरदारांनीं त्यांच्याजवळील खालच्या मैदानांतील जमिनीचा बराच भाग
काबीज केला होता. परंतु ह्या वेळीं गुरख्यांनीं वरील सर्व पहाडी मुलूख
आपल्या ताब्यांत घेतला असून खालील तळप्रदेश इंग्लिशांनीं आपल्या
सत्तेखालीं आणिला होता. ह्याचा परिणाम असा झाला कीं, तंट्याला
कारणीभूत असलेल्या ह्या सरहद्दीवरील सततच्या भांडणांमुळें लवकरच
ह्या दोन्हीही सरकारांमध्यें आपसांत बेबनाव उत्पन्न झाला. सरहद्दीवर
असणाऱ्या नेपाळी अधिकाऱ्यांनीं ब्रिटिश प्रजेच्या ताब्यांतील जमिनी-
वर बेधडक आक्रमण केलें, बंगालच्या ताब्याखालील प्रदेशाची पट्टी
आपल्या ताब्यांत घेतली, आणि मागें परत फिरण्याचें नाकारलें. सरते
शेवटीं इ. सन १८१४ मध्यें जेव्हां त्यांनीं इंग्लिशांचे दोन लहान प्रांत
बळकाविले, तेव्हां लार्ड हेस्टिंग्स यानें नेपाळ सरकाराकडे अशी स्पष्ट
मागणी केली कीं, त्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांना परत बोलावून घ्यावें,
आणि ब्रिटिश सरकारचा प्रदेश मोकळा करून द्यावा. परंतु त्या सरकारा-
कडून उडवाउडवीचें उत्तर आलें, त्यामुळें इंग्लिशांनीं आपल्या सैन्याच्या

एका तुकडीकडून हे प्रांत पुन्हां परत आपल्या ताब्यांत घेतले, आणि गुरखा सरदारांनींही त्या सैन्यासमोरून त्या वेळीं शांतपणानें माघार घेतली. परंतु ब्रिटिश सैन्य तेथून परत फिरतें न फिरतें, तोंच गुरख्यांनीं इंग्लिशांच्या एका बंदोबस्ताच्या ठाण्यावर हल्ला केला, आणि सुमारें वीस इसमांची कत्तल उडविली. त्यानंतर नेपाळ सरकारानें रीतीप्रमाणें आपल्या सल्लागार मंडळांत खलबत केलें, आणि इंग्लिशांशीं युद्ध करण्याचा निश्चय केला. कारण, ब्रिटिश सरकारला नेपाळच्या पहाडी प्रदेशांत कधींही आपला शिरकाव करून घेतां येणार नाहीं, असा तेथील सरकाराचा समज करून देण्यांत आला होता.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकार हे यानंतर नेहमीं त्या देशाच्या सभोंवतीं असलेल्या डोंगराळ प्रदेशाच्या अंत:प्रदेशांत मोहिमी करण्यांत मधून मधून आजपर्यंत गुंतलेले असून " नेपाळवरील मोहीम " ही त्यापैकीं पहिलीच होय. रणक्षेत्र होणारी सरहद्द जवळ जवळ सहाशें मैलपर्यंत पसरलेली होती, आणि थेट पहाडी मुलखांत शिरण्याचे सर्व मार्ग शत्रूच्या ताब्यांत होते. इंग्लिशांनीं तीन निरनिराळ्या बाजूंनीं नेपाळच्या प्रदेशावर हल्ला केला; त्यांपैकीं एकांत जनरल गिलेस्पी हा एका किल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असतां त्याला मागें हटावें लागून तो ठार मारला गेला; नेपाळी सैन्यानें मोठ्या शौर्यानें व चिकाटीनें प्रतिरोध केला, तथापि ब्रिटिश सरकारांनीं त्या पहाडी प्रदेशांत अखेरीस आपलें वर्चस्व स्थापन केलें; आणि पश्चिमेकडील गुरख्यांच्या ताब्यांतील सर्व प्रदेशांतून त्यांची हकालपट्टी झाली. नेपाळ सरकारानें त्यानंतर नाइलाजानें ब्रिटिश सरकाराशीं तह केला, आणि त्या तहाअन्वयें नेपाळ संस्थानच्या हद्दीच्या पश्चिम सरहद्दीपासून तों तहत सतलज नदीपर्यंत पसरणाऱ्या आसपासच्या अरण्यमय प्रदेशासुद्धां वायव्येकडील सर्व लांबलचक पट्टी इंग्लिशांच्या ताब्यांत आली; म्हणजे रोहिलखंड व वायव्येकडील प्रांत यांचेवरील बाजूस थेट यमुना नदीपर्यंत पसरलेला सर्व

डोंगराळ प्रदेश—हिंदुस्थानच्या अगदीं लगत असलेल्या हिमालय पर्वताच्या रांगांच्या पायथ्याशीं लागून असलेला निम्नदेशीय व मोल्यवान अरण्यभाग —ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत आला. हिमालय पर्वतांतील हे प्रदेश इंग्लिशांच्या ताब्यांत आल्यामुळें हिंदुस्थान सरकारच्या राष्ट्रप्रदेशाची सीमा हिंदुस्थान आणि तिबेट, अथवा क्याथे, हीं एकमेकांपासून अलग करणाऱ्या अत्युच्च पर्वताच्या जलोत्सर्गपठारापर्यंत आणि त्याच्याही पलीकडे जाऊन धडकली. चीनचें सरकार हें फार पूर्वीपासून ब्रिटिश सरकारच्या हालचालींचें अत्यंत बारकाईनें आणि कळकळीनें निरीक्षण करीत होतें, आणि ह्या वेळेपासूनच ब्रिटिश राष्ट्राची सरहद्द चीन राष्ट्राच्या सरहद्दीशीं जाऊन भिडलेली आहे. अशा रीतीनें नेपाळचे गुरखे सरदार ब्रिटिशसरकारच्या अत्यंत मौल्यवान प्रदेशाच्या वरच्या बाजूस असलेल्या डोंगराळ प्रदेशाच्या अरुंद पट्टीमध्येंच जरी या वेळेपासून खिळले गेले, आणि जरी त्या देशांत कित्येक अंतर्गत क्रांत्याही घडून आल्या, तरीही त्यांनीं लष्करी वर्चस्वाची आपली पद्धत आजपर्यंत तशीच कायम ठेविलेली आहे, व शिस्त ठेवून आणि बाहेरून शस्त्रास्त्रांचा पुरवठा करून घेऊन युरोपियन पद्धतीवर आपलीं सैन्यें तयार करण्याचें धोरणही त्यांनीं आतांपर्यंत त्याचप्रमाणें नेटानें चालू ठेविलेलें आहे. तथापि इ. सन १८१६ पासून, म्हणजे युद्ध समाप्त झालें त्या वेळेपासून, त्यांनीं ब्रिटिश सरकारला कधींहि त्रास दिला नाहीं, व इंग्लिशांनींही त्यांच्या संबंधांत आजपर्यंत केव्हांही ढवळाढवळ केली नाहीं. नेपाळचें लहानसें राज्य हें हिंदुस्थान आणि चीन ह्या दोन मोठाल्या राष्ट्रांमध्यें एखाद्या चिपेसारखें असून उभयतांपैकीं कोणालाही ही आडकाठी मोडून टाकण्याची कोणत्याही प्रकारें बिलकुल इच्छा नाहीं.

परिच्छेद तिसरा—पेशवे आणि पेंढारी यांचेबरोबरील युद्ध
(इ. सन १८१६ ते १८१८.)

मध्यंतरीं मध्य हिंदुस्थानांतील लुटालूट करणाऱ्या लोकांच्या टोळ्या संख्येनें वाढत चालल्या होत्या, आणि त्यांचे अत्याचारही अधिक अधिक

धाष्टर्याचे होत चालले होते. मराठे सरदार, उघड रीतीनें, पेंढाऱ्यांचा व आपला संबंध नाहीं असें दाखवीत, परंतु अंतःस्थ रीतीनें ते त्यांना प्रोत्साहन देत असत. पेंढारी लोकांनीं ह्या वेळीं मद्रास इलाख्यांतील कांहीं प्रदेशांवर हल्ले करून तेथून पुष्कळ लूट मिळविली होती, त्यांनीं बंगालच्या सरहद्दीवर लूटफाट उडविली होती, आणि त्यांचा पठाण जातीचा पुढारी अमीरखान हा जयपूरला वेढा देण्याच्या तयारींत होता, म्हणून तेथील राज्यकर्त्यानें ब्रिटिश सरकारची मदतही मागितली होती. या बाबतींत उभयतांमध्यें बरीच वाटाघाट झाल्यानंतर हेस्टिंग्स याला रजपुतांचें जयपूर हें संस्थान ब्रिटिश साम्राज्य सरकाराच्या संरक्षणाखालीं आणण्यांत यश आलें; त्याचप्रमाणें नागपूरच्या भोंसले राजाबरोबरही त्यानें एक तैनाती फौजेचा तह घडवून आणला; आणि त्यामुळें मराठ्यांच्या जुटीच्या बळांतील एक महत्त्वाचा सरदार त्यांतून फोडला गेला. पुणें येथील पेशवा हा या वेळीं, त्याच्या शेजारचीं राज्यें आणि इतर मांडलिक संस्थानें यांच्याशीं त्याच्या असलेल्या संबंधामध्यें ब्रिटिश सरकारानें हात घातल्यामुळें, अस्वस्थ,असंतुष्ट व अत्यंत अधीर असा झाला होता. ब्रिटिश सरकाराशीं केलेल्या तहामुळें नागपूरच्या भोंसले राजालाही आपल्या स्वातंत्र्यास पूर्ण धक्का बसल्याबद्दल लवकरच पश्चात्ताप वाटूं लागला होता, आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्याच्या राजधानींत असलेल्या एका पक्षाच्या वजनानें त्यानें पेशव्याशीं गुप्तपणें पत्रव्यवहारही सुरू ठेविला होता. नेपाळचें युद्ध हें फार दिवस चालणारें व त्रासदायक होणारें आहे असें दिसल्यामुळें, ब्रिटिश सरकारच्याविरुद्ध पुन्हां अखेरचा प्रयत्न करण्याच्या मराठ्यांच्या बेतांना उत्तेजन मिळालें, आणि पेशव्यानें आपलें सैन्य जमविण्यास व लष्करी सामग्री गोळा करण्यास सुरवात केली; उलट, ब्रिटिश रेसिडेंटानें तैनाती सैन्य आपल्या मदतीस घेतलें. पुण्यांतील अधिकारसंपन्न मंडळींनीं पहिल्यानेंच गपचूप चेतवून ठेविलेली बंडाळी पुन्हां देशांत सुरू झाली, आणि बडोद्याच्या गायक-

वाडाचा वकील, गंगाधरशास्त्री पटवर्धन, हा ब्रिटिश सरकारच्या हमीखालीं पुणें येथें मुद्दाम कामगिरीवर पाठविण्यांत आला असतां, पेशव्यानें कानाडोळा केल्यामुळें त्याच्या विश्वासांतील त्रिंबकजी डेंगळे या नांवाच्या एका आवडत्या इसमाकडून तो ठार मारला गेला, यामुळें तर ह्या सर्व भीतिदायक चिन्हांचा अतिरेकच झाला. इंग्लिशांच्या रेसिडेंटानें पेशव्याकडून खुनी मनुष्याचा ताबा मोठ्या कष्टानें व जुलमानें मिळविला; परंतु तो तुरुंगांतून निसटून फरारी झाला. त्याच्या संरक्षणाकरितां पेशवा हा हातांत शस्त्र धरण्यास उद्युक्त झाला; परंतु जेव्हां दोन हात होण्याची वेळ येऊन ठेपली, तेव्हां तो ऐन वेळीं धैर्यगळित झाला, त्यानें ब्रिटिश सरकारशीं सलोख्याचें बोलणें लाविलें, आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यानें वाढत्या तैनाती फौजेच्या खर्चाबद्दल कांहीं प्रदेश त्यांना तोडून दिला, आणि "मराठ्यांच्या जुटीच्या बळांतील प्रमुख" या नात्याचे सर्व हक्क सोडून देऊन इ. सन १८१७ मध्यें त्यांचेबरोबरील तहावर त्यानें सही केली.

लुटारू टोळयांचा नायनाट उडविण्याची आणि लूटफाटीची चाल नाहींशी करून मध्य हिंदुस्थानांतील स्थिति सर्वसाधारणतः सुधारण्याची हीच योग्य वेळ आहे, असें लार्ड हेस्टिंग्स यानें ठरविलें. कारण, तटस्थ वृत्तीचें धोरण ठेवण्याच्या पद्धतीचा कांहींही उपयोग झाला नाहीं, असें त्यास आढळून आलें. ह्या तटस्थ वृत्तीमुळें ब्रिटिश सरकारचे सरहद्दीपलीकडे गैरव्यवस्था आणि घोटाळे माजले होते, इतकेंच नाहीं, तर त्यांच्या वर्चस्वाला धक्का पोंचण्याचाही संभव दिसूं लागला होता. पेंढारी लोकांच्या टोळयांमध्यें अजमासें चाळीस हजार घोडेस्वार होते; शिवाय दोन धाडशी मुसलमान पुढारीही इतस्ततः संचार करीत असून त्यांचेजवळ जंगी तोफखाना व बरेंच मोठें पायदळ सैन्यही तयार होतें, व तें कोणत्याही सरकारच्या नियंत्रणाखालीं नव्हतें. उरवठ्याला पुरवठा ह्मणून मराठ्यांच्या सैन्यांत नांवाची नोकरी असलेल्या अशा अव्यवस्थित भाडोत्री

सैन्याच्या झुंडीही चोहोंकडे वावरत होत्या; ब्रिटिश सरकाराच्या प्रदेशाच्या मर्यादेबाहेर सर्व मुलूखभर लूटमार चाललेली होती; आणि देशभर फैलावलेल्या ह्या अंदाधुंदीबद्दल लहान लहान संस्थानें ब्रिटिश सरकारास जबाबदार धरीत होतीं. ह्या कारणामुळें मध्यस्थ व शांतताप्रस्थापक सत्ताधीश म्हणून ह्या लूटफाट करणाऱ्या टोळ्या नाहींशा करण्याच्या आणि एखाद्या जबाबदार सत्तेच्या कक्षेबाहेर एकही भाग न राहूं देण्याच्या इराद्यानें हा सर्व विस्तृत मध्यप्रदेश कांहीं लहान लहान संस्थानिकांच्या नियंत्रणाखालीं आणण्याचा लार्ड हेस्टिंग्स यानें निश्चय केला, आणि त्याप्रमाणें त्यानें ही गोष्ट घडवूनही आणली. त्यानंतर ज्यांच्या ज्यांच्याकडे जे जे निरनिराळे प्रदेश सोंपवून दिलेले होते, त्या त्या प्रदेशभर तेथील राज्यकर्त्यांमार्फत शांततेचा प्रसार करविण्याच्या कामीं, ब्रिटिश सरकारचें श्रेष्ठ वर्चस्व व बलवत्तर शस्त्रसामर्थ्य, यांवर त्यानें सर्वस्वी भरंवसा ठेविला होता. थोडक्यांत म्हणावयाचें ह्मणजे, हिंदुस्थानांतील प्रत्येक एतद्देशीय राज्याला आपल्या नियामक सत्तेखालीं आणून त्यावर ब्रिटिश साम्राज्य सत्तेचें वर्चस्व प्रस्थापित करावयाचें—हें जें लार्ड कार्नवालिस यानें हातीं घेतलेलें व लार्ड वेलस्ली यानें परिणतावस्थेस आणलेलें महत्कार्य, त्याची पूर्तता करण्याचा त्यानें संकल्प केला होता.

तथापि अशा कामांत मराठे राजेरजवाडे ब्रिटिश सरकारला मनापासून मदत करतील,अशी आशा बाळगणें सयुक्तिक नव्हतें. पठाण सरदार अमीरखान याचें, त्यानें आपल्या सैन्यास फाटा द्यावा आणि मर्यादित करून दिलेल्या प्रदेशांतच रहावें, अशाबद्दल मन वळविण्यांत आलें, अथवा त्यास तशी धमकी देण्यांत आली, असें म्हटलें तरी चालेल. परंतु शिंदे हा पेंढारी लोकांविरुद्ध होणाऱ्या मोहिमेंत स्वतः सामील होण्याला अत्यंत नाखुषीनें कबूल झाला; तथापि त्यानें भावी रागरंग पाहण्याच्या उघड उद्देशानें आपलें सैन्य पाठविण्यास दिरंगाई केली, आणि दपटशह बसल्यानंतरच मात्र त्यानें ब्रिटिश सरकाराला सामील होण्याच्या तहावर आपली सही केली.

पेशव्यानें इंग्लिशांबरोबर नुकत्याच केलेल्या तहाअन्वयें त्याच्या मानेवर नवीन "जूं" बसल्यानें तो जाचला गेला होता, त्यामुळें त्यानें आपलें सैन्य गोळा केलें, उघड उघड शत्रुभाव सुरू केला, आणि पुणें येथील इंग्लिशांच्या सैन्यावर हल्ला केला[1]. इकडे नागपुरास तेथील राज्यकर्त्या भोसल्यानें, आपण मराठा राष्ट्राचे धुरीण आहोंत, असें जाहीर करून तेथील ब्रिटिश रेसिडेंटाच्या छावणीवर आपलें सैन्य पाठविलें. नागपूर येथें उभयतांत दोन निकराच्या लढाया झाल्या; आणि त्यांत दोन्हीही वेळां मराठ्यांच्या सैन्यास रणक्षेत्रामधून माघार घ्यावी लागली. शिवाय, होळकराचें सैन्य पेशव्याच्या सैन्यास मिळण्याचा प्रयत्न करीत होतें; परंतु त्याचाही महिद-पूर येथें ब्रिटिश सैन्यानें पराभव केला[2]; त्यामुळें गव्हर्नर जनरलच्या शांतता-स्थापक धोरणाला आड येणारी मराठ्यांची सत्ता लवकरच नाहींशी झाली. इकडे ब्रिटिश सैन्यानें पेशव्याचाही पाठलाग करण्यास सुरवात केली, आणि उभयतांमध्यें दोन निकराच्या चकमकी उडाल्या; परंतु शेवटीं त्याच्या सैन्याची दाणादाण उडाली, त्याचे सर्व किल्ले सर करून घेण्यांत आले, आणि इंग्लिशांच्या शीघ्रगामी फौजेच्या तुकडीनें प्रत्यक्ष पेशव्याचाच इतका पाठलाग केला कीं, त्याच्या निर्वाहाच्या योग्य तरतुदीची हमी मिळाल्यावर तो शेवटीं ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन झाला[3]. पेशवे अगर त्याचे वंशज ह्यांपैकीं कोणालाही दक्षिणेकडील प्रभुत्व अथवा प्रदेश ह्यां-पैकीं एकाचाही भाग देऊं नये, असा लार्ड हेस्टिंग्स यानें निश्चय केला; त्याच्या अमलाखालील पुष्कळ भाग इंग्लिशांनीं आपल्या राज्याला जोडला; बाकीच्या पेशव्याच्या राज्यांतून सातारा संस्थानची पुनर्घटना केली; आणि तें राज्य, मराठी राष्ट्राचा मूळ संस्थापक जो शिवाजी, ह्याच्याच वंशजाच्या

१ इ. सन १८१७ नव्हेंबर. ग्रांट डफच्या *History of the Marathas* या पुस्तकापैकीं भाग तिसरा, उपभाग १८ वा, यामधील प्रत्यक्ष लढाईंत हजर असलेल्या एका मनुष्यानें ह्या लढाईबद्दलचें केलेलें अत्यंत मनोवेधक वर्णन पहा.

२ ता. २ डिसेंबर १८१६.

३ जून इ. सन १८१८.

हवालीं केलें. पेशवे हे ह्याच मराठा राज्याच्या मुख्य प्रधानपदाचा वंशपरंपरेनें उपभोग घेत होते, आणि त्यांनींच ह्या राजवंशाच्या डोक्यावरून हात फिरविलेला होता. शिवाय नागपूरच्या भोसले राजासही कित्येक महत्त्वाचे जिल्हे ब्रिटिश सरकारच्या हवालीं करावे लागले; आणि त्याची लष्करी व्यवस्थाही ह्या वेळेपासून त्यांच्या नियंत्रणाखालीं आली. त्याचप्रमाणें जुन्या रजपूत राजेरजवाड्यांचा जमाव व इतर लहान लहान संस्थानिक, यांना मराठयांकडून आणि अमीरखान याजकडून उपद्रव पोंचत असे, व त्यांना खंडणी देणेंही भाग पडत असे; परंतु ह्या सर्वांना आतां ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या संरक्षणाखालीं आणि हमीखालीं ठेवण्यांत आलें, व लहान लहान संस्थानिकांकडून मराठे राज्यकर्त्यांना खंडणी ह्मणून मिळणारी रक्कम ब्रिटिश सरकारच्या तिजोरीमार्फत आदा करावयाची या अटीवर कायमची मुक्रर व मंजूर करण्यांत आली.

या उपायांनीं पेशव्याच्या नांवाखालीं मोडत असलेल्या ह्या "मराठेशाही" चा कायमचा लोप झाला, आणि ब्रिटिश सरकारशीं नेहमीं विरोध करणाऱ्या—शिंदे, होळकर व भोंसले या—तीन प्रमुख राजघराण्यांपासून हिंदुस्थानांत शांतता राखण्याबद्दल हमी घेण्यांत आली. पेंढारी लोक हे एकाकाळीं भरभराटींत असणाऱ्या लुटारूंचे अवशेष म्हणून शिल्लक होते, आणि हिंदुस्थानांत एक शतकभर बेबंदशाई व लुटफाट करीत फिरणाऱ्या लुटारू टोळयांचा गाळ म्हणून बाकी होता. परंतु त्यांचीही आतां इंग्लिशांनीं धूळधाण उडविली, किंबहुना त्यांचा समूळ उच्छेदही केला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या भयंकर टोळयांचा आश्चर्य वाटण्यासारख्या जलदीनें धुव्वा उडाला. लार्ड हेस्टिंग्स यानें आपल्या रोजनिशींत असें लिहून ठेविलें आहे कीं, "वास्तविक मोहीम अशी फक्त तीन महिनेपर्यंत चालली होती;" त्याचप्रमाणें सर जान मालकम ह्यासही ह्या यशाचें बरेंचसें श्रेय असून त्यानें मध्य हिंदुस्थानामधून पांच वर्षांनंतर या बाबतींत अशी याद लिहून पाठविली कीं, "पेंढारी लोकांचा इतका

समूळ उच्छेद झालेला आहे कीं, आतां त्यांचें नांव सुद्धां कानीं ऐकूं येईनासें झालें आहे, आणि जीं हजारों खेडींपाडीं त्या वेळीं ओसाड व बेचिराख झालीं होतीं, तींच आतां पुन्हां लोकवस्तीनें गजबजून गेलेलीं आहेत." ह्या सर्व अफाट प्रदेशभर जवळ जवळ एक शतकपर्यंत असह्य अव्यवस्था व भिन्न भिन्न राज्यपद्धति सुरू होती; त्यामुळें तो प्रदेश इतका निःसत्त्व झाला होता कीं, बहुजनसमाजाला बलिष्ठ सरकारचीच मुख्यतः त्या ठिकाणीं अत्यंत अवश्यकता वाटत होती. मराठ्यांचीं संस्थानें आतां काळजीपूर्वक रेखाटून दिलेल्या मर्यादेंतच अडकविण्यांत आलीं, लुटीकरितां दिग्विजय संपादन करण्याचा धंदा आणि निव्वळ मोठ्या प्रमाणावर चालणारा लुटालुटीचा व्यापार आतां समूळ नाहींसा करण्यांत आला, आणि हे प्रकार प्रचारांत आणणारे राज्यकर्ते व मंडळ्या ह्यांच्या स्थितींत फेरबदल होण्याबरोबरच हे सर्व प्रकारही नाहींसे झाले. शिवाय, हिंदुस्थानच्या मध्यप्रदेशांत लूटफाट आणि जुलूम चालत, त्या वेळीं इंग्लिशांच्या प्रदेशावरही वारंवार दौडी आणि हल्ले होत; परंतु वरील प्रकार नाहींसे झाल्यामुळें त्या प्रदेशांची शत्रूच्या हल्ल्यांपासून अथवा लुटीपासून कायमची मुक्तता झाली.

परंतु त्यांचें पुनरुज्जीवन न होण्याबद्दल योग्य काळजी घेतली नसती, तर हीं भयंकर संकटें नाहींशीं करण्याचा केलेला खटाटोप व्यर्थ झाला असता; म्हणून इतःपर हिंदुस्थानांतील प्रत्येक संस्थानानें (सिंध आणि पंजाब खेरीजकरून) आपल्या परराष्ट्रीय संबंधांचें नियंत्रण ब्रिटिश सरकारच्या हवालीं करावें, बाहेरील सर्व तंटेबखेडे मध्यस्थीकरितां त्यांचेकडे सोंपवावे, आणि राज्यांतील अंतःस्थ अव्यवस्था मोडून व दूषणीय बेबंदशाहीचें निर्मूलन करून अंतर्व्यवस्थेंत शक्य ती सुधारणा घडवून आणण्याकरितां त्यांची सल्लामसलत घेत जावी, असें राजनीतीच्या धोरणाचें एक सर्वसाधारण तत्त्व ठरविण्यांत आलें. हीं महत्त्वाचीं कार्यें तडीस नेण्याकरितां ब्रिटिश सरकारतर्फे प्रतिनिधि म्हणून

प्रत्येक मोठमोठ्या राज्यकर्त्यांच्या दरबारीं एक एक रेसिडेंट नेमण्यांत आला; शिवाय, तैनाती सैन्य आणि ह्या संस्थानांकडून पुरवठा करण्यांत येत असलेलें मदतीचें सैन्य, ह्यांमुळें प्रत्येक ठिकाणची मुख्य लष्करी सत्ता साम्राज्य सरकारच्या नेतृत्वाखालीं आली.

मध्य हिंदुस्थानांतील ह्या मोठ्या राजकीय व्यवस्थेमुळें—ह्मणजे लष्करी सामर्थ्य असलेल्या संस्थानिकांना निःशस्त्र करणें, व त्यांच्याशीं दिलमिलाई करणें, आणि ब्रिटिश साम्राज्य सरकार व ते संस्थानिक सरकार यांच्यामध्यें असलेला श्रेष्ठ कनिष्ठ भाव कायमचा ठरवून टाकणें, या गोष्टींनीं मध्य हिंदुस्थानांत शांतता प्रस्थापित केल्यामुळें—ज्या मुख्य तत्त्वावर हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या इमारतीची उभारणी करण्यांत आली, तें विशिष्ट तत्त्व अबाधित रीतीनें सर्वमान्य झालें. ह्याच तत्त्वामुळें लार्ड वेलस्लीचें राजकारण पूर्णतेस गेलें, व त्याचें दृढीकरणही झालें. युरोपस्थ प्रतिस्पर्ध्यांकडून होणाऱ्या ढवळाढवळीचा शेवटचा आशातंतु ह्या वेळीं तात्पुरता नाहींसा झाला होता. एतद्देशीय राजेरजवाड्यांबरोबर वर्चस्व मिळविण्याकरितां चाललेल्या युद्धकलहाचाही आतां कायमचा निकाल लागला होता, आणि दक्षिण बाजूच्या दोन समुद्रांपासून उत्तरेकडे थेट सिंध आणि सतलज नदीपर्यंत हिंदुस्थानांतील लोकांचें संरक्षण करण्यासाठीं आणि शांतता राखण्यासाठीं "विशिष्ट हक्क" म्हणूनच केवळ नव्हे, तर " विशिष्ट कर्तव्य " म्हणून ही ब्रिटिश सरकाराकडून होणारी मध्यस्थी चोहोंकडे मान्य झाली होती. हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या पश्चिम किनाऱ्यावर सिंधु नदाच्या मुखांजवळील सिंधच्या सरहद्दीपासून तों थेट कन्याकुमारीपर्यंत आणि तेथून ईशान्य दिशेकडे बंगालच्या उपसागराच्या बाजूनें ब्रह्मदेशाच्या सरहद्दीपर्यंत हिंदुस्थानच्या सर्व समुद्रपट्टीच्या प्रदेशाची ओळ ब्रिटिश सरकारच्या अमलाखालीं आली होती. उत्तरेकडे हिमालय पर्वतांतील डोंगराळ प्रदेशाची एक मोठी पट्टी त्यांच्या ताब्याखालीं आली

असून त्यांची राजकीय हद्द उत्तर सिंध व पंजाब यांच्या सरहद्दीवरील मैदानाच्या पश्चिम कांठापर्यंत पसरलेली होती. ह्या प्रदेशापैकीं सर्वांत मोठा, महत्त्वाचा, आणि तितक्याच मानानें सुसंपन्न, असा भाग त्यांच्या निखालस सत्तेखालीं या वेळीं आलेला होता, आणि बाकीचा त्यांच्या सार्वभौमत्वाच्या महत्त्वाखालीं राहिलेला होता. समुद्र आणि पर्वत ह्याच हिंदुस्थान देशाच्या नैसर्गिक मर्यादा आहेत, असें गृहीत धरून असें ह्मणतां येईल कीं, ब्रिटिश साम्राज्याची हिंदुस्थानच्या समुद्रवलयाच्या सर्व वर्तुळावर हुकमत चालू होती, हिमालयांत निर्भय पायावर त्याची संस्थापना करण्यांत आली होती, आणि त्याची पश्चिमेकडील बाजू सिंधुनदाच्या अलीकडील कांठच्या वाळवंटानें पुष्कळ लांबपर्यंत मर्यादित झालेली होती. परंतु दोन, आणि फक्त दोनच, भागांवरील सरहद्द अजून डळमळित व अव्यवस्था होण्यासारखी होती,—ईशान्येकडे ब्रह्मी लोक आसामांत शिरकत होते, आणि वायव्येकडे सतलज नदीच्या पलीकडील शीख लोकांच्या राज्यानें रणजितसिंहाच्या धुरीणत्वाखालीं अजिंक्य लष्करी बळ संपादन केलें होतें.

भाग सतरावा.

ब्रिटिश साम्राज्याची पूर्तता.

(इ. सन १८२३ ते १८४९).

परिच्छेद पहिला--ब्रह्मी लोकांबरोबरील युद्ध.

ह्या कालापर्यंत ईस्ट इंडिया कंपनीनें जीं जीं युद्धें केलीं, त्या सर्वांचें रणक्षेत्र हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच होतें; गेल्या पंचावन वर्षांत[1]—ह्मणजे इ. सन १७६३ मध्यें फ्रेंचांनीं माघार घेतली, त्या वेळेपासून तों तहत इ. सन १८१८ मधील पेंढारी लोकांबरोबर झालेल्या युद्धाच्या अखेरपर्यंतच्या काळांत—हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाडे हेच फक्त इंग्लिशांचे प्रतिस्पर्धी होते. परंतु ब्रिटिश साम्राज्याच्या प्रदेशाचा विस्तार तहत आशियांतील इतर परराष्ट्रांपर्यंत होऊन खुद्द हिंदुस्थानच्या नैसर्गिक मर्यादेपर्यंत ते लवकरच येऊन भिडल्यामुळें त्यांच्या मार्गांत नवीनच अडचणी उपस्थित झाल्या; आणि दुसऱ्या नवीन जातीच्या लोकांबरोबर त्यांची लवकरच चकमक झडेल, असा पूर्ण रंगही दिसूं लागला. इंग्लिशांशीं आपण होऊन प्रत्यक्ष वैर संपादन करून त्यांना चेतविणारी पहिली हिंदुस्थानाबाहेरील सत्ता ह्मणजे " गुरखा " हीच होय; तथापि नेपाळ हा हिमालयाच्या दक्षिण बाजूच्या उतरणीवर असल्यामुळें तेथील जनसमाज हाडामासानें आणि धर्मानें बहुतांशीं हिंदूच आहे;

१. मूळ ग्रंथांत "पन्नास वर्षांत" असें नजरचुकीनें लिहिलें गेलें आहे, असें समजावें; कारण, इ. सन १७६३ पासून इ. सन १८१८ पर्यंत पंचावन वर्षें होतात.

परंतु हिंदुस्थानच्या सरहद्दीपलीकडून तद्व्यतिरिक्त ज्या दुसऱ्या राज्यानें ब्रिटिश सरकाराला युद्धास आव्हान केलें, तें राज्य ह्मणजे हिंदू लोकांशीं पूर्णपणें भिन्न असलेल्या ब्रह्मी लोकांचेंच होय.

हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या उत्कर्षाला जी पहिल्या पन्नास वर्षांची अवधि लागली, त्या अवधींतच एकसमयावच्छेदेंकरून त्यांच्या सभोंवती, आणि त्याच पद्धतीवर, इतर राजसत्ताही स्थापन होत होत्या; हा योगायोग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. ह्या कालावधींत (म्हणजे इ. सन १७५७ ते १८०५ पर्यंत) अफगाण लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या एकत्र होऊन त्या अहमदशहा अबदल्लीच्या घराण्यांतील राज्याच्या अमलाखालीं आल्या होत्या; रणजितसिंहानें आपल्या अतुल बाहुबलानें पंजाबमधील लहानसहान हिंदू मुसलमान सरदारांना पादाक्रांत करून तरवारीच्या जोरावर आपला सुलतानी अंमल सर्वत्र सुरू केला होता; हिमालयाच्या खालील पहाडी प्रदेशांतील राजेरजवाडे नेपाळी सत्तेच्या अंकित झाले होते; शिवाय, सरते शेवटीं, म्हणजे ज्या वेळीं लार्ड क्लाइव्ह हा बंगाल प्रांत काबीज करीत होता, त्या वेळेच्या सुमारास, एका ब्रह्मी वीरास विजयश्रीनें माळ घातल्यामुळें त्यानें ब्रह्मदेशामध्यें आपलें राज्य स्थापन केलें होतें, आणि त्याची राजधानी इरावती व तिला मिळणाऱ्या नद्या यांनीं आपल्या मूळ उगमापासून तों तहत समुद्रापर्यंत व्यापून टाकलेल्या प्रदेशामध्यें होती. इ सन १७५७मध्यें आलोंप्रा यानें पेगू प्रांत जिंकून स्थापन केलेल्या ब्रह्मदेशाच्या राज्यांत इरावती आणि सालवीन ह्या नद्यांच्या आसमंताच्या—ह्या नद्या ज्या डोंगरांतून उगम पावतात, तेथून तों तहत सखल समुद्र किनाऱ्याजवळील त्यांच्या मुखांपर्यंत पसरलेल्या—सपाट प्रदेशाचाच फक्त ह्या वेळीं समावेश होत असे, असें नाहीं, तर तें राज्य अगदीं दक्षिणेस बंगालच्या उपसागराच्या पूर्व किनाऱ्यापर्यंत पुष्कळ लांबवर पसरलेलें होतें. हिंदुस्थानच्या पूर्वेकडील जमिनीच्या सरहद्दीस लागून असलेल्या वरील सर्व डोंगराळ प्रदेशाचा यांत अंतर्भाव होत चालला होता, आणि ब्रह्मी सैन्यें पूर्व बंगालच्या अफाट

मळईच्या प्रदेशाकडे ब्रह्मपुत्रा नदाच्या जवळील माळ जमिनीच्या प्रदेशामधून ह्या डोंगराळ प्रदेशांतील जलोत्सर्ग पठाराच्या बाजूनें पश्चिमेकडे पुढें पुढें रेटीत चालली होतीं. त्यामुळें सरते शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानच्या ब्रिटिश सरकारचे अधिकारी आणि ब्रह्मदेशच्या ब्रह्मी सरकारचे अधिकारी यांचेमध्यें त्या सरहद्दीवर नेहमीं भांडणें होऊं लागलीं; कारण, सरहद्दीची मर्यादा अनिश्चित असून नेहमीं बदलणारी होती, आणि प्रत्येक पक्ष आपलेंच घोडें पुढें ढकलण्याच्या हेतूनें आपापल्या स्थलसीमा नाइलाजास्तव पुढें पुढें रेटीत चालला होता. परंतु सरते शेवटीं जेव्हां एक निमस्वतंत्र व विवक्षित जातीचा भूभाग आणि अधिकारक्षेत्र यांच्यापर्यंत दोन्ही पक्ष येऊन धडकले, तेव्हां मात्र या सीमेपासून प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाला वगळण्याची धडपड करूं लागला; शिवाय, हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आशियाखंडाच्या इतर भागांपासून हिंदुस्थानांतील सपाट प्रदेश ज्या पर्वताच्या ओळीनें विभक्त केलेला आहे, त्या ठिकाणीं उंचसखल पहाडी प्रदेशाची एक सळंग ओळ असून तेथें कमी अधिक प्रमाणानें शूर आणि स्वतंत्र असलेल्या मिश्र उत्पत्तीच्या लोकांची कायमची वस्ती आहे.

ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील प्रदेश अगर त्यांच्या संरक्षणाखालील प्रदेश आणि ब्रह्मी सरकारचें राज्य यांच्यामध्यें बंगालच्या ईशान्येकडे आसामचें राज्य होतें. हा प्रांत आतां ब्रिटिश राष्ट्राच्या ताब्यांतील प्रदेशांपैकींचा एक भाग असून हल्लींही तो त्याच नांवानें ओळखला जात आहे. आसामी राज्यकर्त्या घराण्यांतील पुरुषांमध्यें आणि त्यांच्या नांवाखालीं स्वतंत्रपणानें राज्यसूत्रें चालविण्याची हांव बाळगणाऱ्या एका बलिष्ठ प्रधान मंडळामध्यें सत्तेकरितां जोराचा कलह उत्पन्न होऊन रक्तपातही झाला; याचा ठराविक परिणाम हा झाला कीं, पराभूत झालेल्या पक्षानें पूर्वेकडील पर्वताच्या पलीकडून ब्रह्मी लोकांना आपल्या मदतीस आसामांत बोलाविलें. परंतु त्यामुळें पुन्हां नव्या संकटांना सुरवात झाली. कारण,

ब्रह्मी सैन्यानें तेथील राज्यकर्त्याला पुन्हां गादीवर बसविल्यानंतर नेहमीं-प्रमाणें त्याला असें आढळून आलें कीं, अंतःस्थ कलहांत परकीय सैन्य मदतीस बोलावणें नेहमीं धोक्याचेंच असतें. त्यामुळें त्यानें ब्रह्मी लोकां-शीं भांडण केलें; तथापि त्यांनीं आपल्या हातांतील कळसूत्री बाहुल्याप्रमाणें कित्येकांना गादीवर बसविलें, आणि पदभ्रष्ट केलें; आणि सरते शेवटीं त्याचा मामुली निकाल असा केला कीं, ब्रह्मी लोकांनीं आसामांत आपला एक सुभेदार नेमून टाकिला. परंतु ब्रिटिश साम्राज्याच्या सरहद्दीवरील निर्बल आणि विस्कळित अशा एका अर्धवट-हिंदू राज्यांचें, इंडो-चायनीज द्वीपकल्पांतील एका लढवय्या आणि कुरापती लोकांच्या राज्यामध्यें, रूपां-तर होणें, ही गोष्ट त्या साम्राज्य सरकाराला कोणत्याही प्रकारें फायदे-शीर नव्हती. कारण, त्यांच्या राजनीतीचें आद्य तत्त्व ह्मणजे, हिंदुस्थानावर धाड घालणाऱ्या सर्व परक्या आगंतुकांना पर्वत आणि समुद्र यांच्या-पलीकडेसच थोपवून धरणें, हें आहे. शिवाय, नौकागम्य नद ब्रह्मपुत्रा व आसामच्या डोंगराळ प्रदेशांत उगम पावून पूर्व बंगालमधून समुद्रास मिळणाऱ्या इतर नद्या, यांच्या वरील प्रवाहाचें आधिपत्य या वेळीं ब्रह्मी लोकांकडे होतें. आणि सखल प्रदेशांत जाणारे रस्ते ज्या डोंगरांच्या खिंडींमधून होते, त्या खिंडींच्या माथ्यांवरच ते रहात असून ब्रिटिश सर-कारच्या सरहद्दीजवळील सर्व लहान लहान संस्थानिकांना ते आपले आंकित करीत होते, अगर त्यांना गर्भगळित करूं लागले होते. परंतु या बाबतीसंबंधीं ज्यांचा रानटी लोकांशीं संबंध येतो, अशा इतर सुधार-लेल्या राष्ट्रांच्या ठराविक पद्धतीप्रमाणेंच, हिंदुस्थानांतील सरकारचीही अशी एक पद्धत ठरून चुकलेली आहे कीं, ते सरहद्दीवरील संस्थानिकांना व लहान लहान राज्यकर्त्यांना आपल्या संरक्षणाखालीं आणतात, आणि प्रत्यक्ष सरहद्दीवर चाल करणाऱ्यांना आंत येऊं न द्यावें याकरितां सरहद्दी-वरील भिन्नभिन्नजातीयांचीं संस्थानें व राज्यें हीं निवडुंगाच्या कुंपणा-प्रमाणें अथवा एखाद्या प्रतिबंधक आडकाठीप्रमाणें राखून ठेवितात.

तथापि ब्रह्मी लोक हे आतां ह्या संरक्षित राज्याचें मोठ्या अहंकारानें उल्लंघन करीत होते. हिंदुस्थानचा सर्व ईशान्य कोपरा जिंकून घेण्यांत ते दंग झालेले होते; त्यांनीं मणिपूर आपल्या हस्तगत करून घेतलें होतें; त्या वेळीं ब्रिटिश सरकारच्या संरक्षणाखालीं असलेल्या काचार प्रांतावर ते हल्ला करूं लागले होते; व त्यांच्या ताब्यांतील सिल्हट प्रांतावरही ते आपला हक्क असल्याचें सांगूं लागले होते. वास्तविक ह्मणावयाचें ह्मणजे पूर्व आशियाकडून जमिनीच्या बाजूनें असलेल्या नैसर्गिक प्रतिबंधाच्या आवरणाचें त्यांनीं उल्लंघन केलें होतें; पूर्व बंगालच्या सपाट प्रदेशावर मनास वाटेल तेव्हां व कोणत्याही स्थळीं एकदम उतरून छापा घालण्यास सोइस्कर पडावें, म्हणून ते जाण्यायेण्याचे रस्ते व चोरदरवाजे उघडपणें आपल्या हस्तगत करून घेत चालले होते; आणि ब्रिटिश सरकारचा प्रदेश व अराकान हीं ज्या खाडीनें विभक्त होतात, तिच्या ब्रिटिश प्रदेशाच्या बाजूकडील बेट त्यांनीं रक्तपात करून आपल्या हस्तगत करून घेतलें होतें.

अशा रीतीनें उघड उघड आपल्या सत्तेचा उपमर्द होणें व आपणावर हल्ला होणें, ही गोष्ट हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकाराला अननुभूत अशीच होती. परंतु गुरखे लोकांप्रमाणेंच ब्रह्मी लोकांनींही आतांपर्यंत सुधारलेल्या सैन्याविरुद्ध आपली शक्ति कधींही अजमावून पाहिली नव्हती; त्यामुळें आपल्या शेजाऱ्याच्या अंगांत आपणाला प्रतिकार करण्याची कितपत धमक आहे, याची स्पष्टपणें ओळख होईपर्यंत त्यांनीं आपल्या राज्याचा विस्तार कां करीत राहूं नये, याचें त्यांना सयुक्तिक कारण आढळून आलें नाहीं. त्यानंतर प्रत्यक्ष लढाईस सुरवात झाली, उभयतांमध्यें कांहीं चांगल्याच जोराच्या चकमकीही उडाल्या, आणि त्यांत ब्रिटिश सैन्याचा कित्येक वेळां पराजयही झाला; परंतु बंगालच्या उपसागराच्या पलीकडे रंगूनवर हल्ला करण्याकरितां पाठविलेल्या सैन्याच्या एका लहानशा तुकडीनें शत्रुपक्षास चांगलीच हूल दाखविली, आणि त्याचा परिणामही इष्ट असाच घडून आला. कारण, ब्रह्मी राज्याशीं समुद्रावरून लढाई

करणाऱ्या शत्रूला हीच बाजू फोडतां येण्यासारखी होती. त्या वेळीं हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल, लार्ड अमहर्स्ट, हा असून त्यानें पेगू प्रांतावर ही मोहीम पाठविली होती. ही मोहीम म्हणजे हिंदुस्थानाव्यतिरिक्त आशियाखंडांतील इतर प्रदेशावर हिंदुस्थानांतील ब्रिटिश सैन्यानें केलेली पहिलीच स्वारी होय. ब्रिटिश सैन्य, इरावती नदी ज्या उंचवट्याच्या प्रदेशामधून वहात जाते, त्यावर चाल करून गेलें, आणि ब्रह्मी लोकांनींही उलट त्याविरुद्ध मोठ्या नेटानें आपलें संरक्षण केलें; तथापि शेवटीं त्यांना ब्रिटिश सरकारच्या अटी मान्य करणें भाग पडलें. ह्या लढाईचे परिणाम महत्त्वाचे व बरेच दूरवर टिकणारे असे झाले; कारण, या युद्धामुळें ब्रिटिश सैन्य अगदीं पहिल्यानेंच हिंदुस्थानच्या सरहद्दीपलीकडे गेलें, एका अगदीं भिन्न देशांत त्यांच्या साम्राज्याचा विस्तार झाला, आणि त्यांच्या सार्वभौमत्वाखालीं आशियांतील नवीन जातीही अंकित झाल्या. अराकान आणि तेनासरीम हे प्रांत ब्रिटिश सरकारनें आपल्या साम्राज्याला जोडिले, आणि त्यामुळें बंगालच्या उपसागरापलीकडे हिंदुस्थानच्या समोर असलेल्या प्रदेशाचा पट्टा त्यांच्या हस्तगत होऊन येथून बरेच दूरवर समुद्राच्या किनाऱ्याला समांतर असणाऱ्या पर्वतपंक्तीच्या जलोत्सर्गपठाराजवळ ब्रह्मदेश मागें टाकण्यांत आला. या योगानेंच हिंदुस्थानवासी जनांहून वर्ण, रीतिरिवाज, भाषा आणि धर्म, यांनीं भिन्न असा प्रचंड जनसमूह ब्रिटिशहिंदी साम्राज्याच्या धुरीणत्वाखालीं आला; याच ठिकाणीं युरोपियन राष्ट्राच्या विध्वंसक आणि प्रगमनशील मूल शक्तीला नवीन दिशेनें व नव्या पद्धतीनें इतस्ततः संचार करण्यास सगवड मिळाली; आणि ह्याच ठिकाणीं इंग्लिशांना झालेल्या प्रतिरोधाचा पाडाव करण्याकरितां त्याला तोंड देऊन जितकी प्रगति करणें भाग होतें, तितकी त्यांना करावी

१ इरावती नदीचीं मुखें ज्यांत आहेत, असा समुद्रकिनाऱ्यावरील पेगू प्रांत मात्र या वेळीं ब्रिटिश सरकारच्या हातीं आला नसून तो इ. सन १८५२ च्या लढाईनंतरच ब्रिटिश साम्राज्यास जोडण्यांत आला आहे.

लागली आहे. याशिवाय ब्रह्मी लोकांच्या पराभवामुळें अंमळ कमी दर्जाचा, परंतु बराच महत्त्वाचा, असा दुसरा ब्रिटिश सरकाराला झालेला फायदा ह्मणजे बंगालच्या पलीकडील आणि ब्रह्मपुत्रा नदाच्या ईशान्य बाजूकडील उत्तर आसाम, काचार आणि मणिपूर, या प्रदेशांवरील त्यांचें सार्वभौमत्व ब्रह्मी सरकारनें कबूल केलें, हा होय. ह्या प्रदेशावर हल्लीं ब्रिटिश सरकारतर्फे "आसामचा चीफ कमिशनर" ह्या नांवाचा अधिकारी राज्यकारभार चालवीत असतो.

गुरखे लोकांबरोबरील युद्धानें ज्याप्रमाणें ईशान्य हिमालयाच्या बाजूनें ब्रिटिश सरकारला त्रास देऊं शकणाऱ्या नेपाळच्या एकट्याच संस्थानपासून त्यांना निर्धास्त केलें, त्याचप्रमाणें ब्रह्मी लोकांबरोबरील युद्धामुळें त्यांच्या हातीं आलेल्या प्रदेशानें त्यांची पूर्व सरहद्दही पूर्णपणें निर्धास्त व निश्चित झाली. इ. सन १८२६ मध्यें, ह्मणजे जेव्हां एका परराज्यापहरण करणाऱ्या तिऱ्हाइतानें भरतपुरची गादी बळकाविली, त्या वेळीं, भरतपुरचा बळकट किल्ला लार्ड कॉंबरमियर यानें हल्ला करून आपल्या हस्तगत करून घेतला; परंतु इ. सन १८०५ मध्यें ह्याच ठिकाणीं जनरल लेक याला अपयश आलें होतें. ह्या वेळीं सबंद हिंदुस्थानांत ब्रिटिश आणि शीख ह्या दोनच सार्वभौम सत्ता अस्तित्वांत होत्या; कारण, सिंधच्या अमिरांचा हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांच्या वर्गामध्यें क्वचित्‌च समावेश करतां येण्यासारखा होता. या शतकाच्या प्रारंभीं रणजितसिंहाच्या कारकीर्दींत पंजाबमधील शीख लोकांचें राष्ट्र पूर्णपणें वैभवशिखरास पोहोंचलें होतें, व रणजितसिंहानें बिटिश सरकाराशीं कांहीं दिवस शत्रुभावानें वागून नंतर त्यांचेबरोबर मित्रत्वाचें नातें ठेवण्याला आपली संमति दिली होती. इ. सन १८०९ मध्यें बऱ्याच वाटाघाटीनंतर सरतें शेवटीं रणजितसिंहानें इंग्लिशांबरोबर तह केला; त्या तहाअन्वयें सतलज नदीच्या पश्चिमेकडील आणि उत्तरेकडील त्याचा प्रदेश, दक्षिणकिनाऱ्यावरील प्रदेशाच्या पट्टी खेरीज, मर्यादित होऊन दक्षिणकिनाऱ्यावर आपलें सैन्य

न ठेवण्याबद्दल तो बांधला गेला; आणि अशा रीतीनें हा पट्टा वगळला गेल्यामुळें त्याचे परिणाम पुढें फार महत्त्वाचे झाले. परंतु ह्या दोन्हींही राष्ट्रांमधील हद्दीची ठळक मर्यादा ह्मणजे सतलज नदी ही असून, ह्या व्यवस्थेमुळेंच जवळ जवळ चाळीस वर्षेंपर्यंत हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या उत्तर सरहद्दीवर सतत शांतता राखिली गेली

परिच्छेद दुसरा—लार्ड विल्यम बेंटिंक या गव्हर्नर जनरलची कारकीर्द.

(इ सन १८२८-१८३५).

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्या राष्ट्रीय इतिहासांत लार्ड विल्यम बेंटिंक या गव्हर्नर जनरलची कारकीर्द अल्प काळ टिकणाऱ्या आणि क्वचित्‌च लाभणाऱ्या शांततेच्या काळाचें स्पष्टपणें दिग्दर्शन करणारी आहे. उदार आणि सुधारलेली राज्यव्यवस्था, शांतपणें होणारी भौतिक प्रगति, व कांहीं महत्त्वाच्या नैतिक व शिक्षणविषयक सुधारणा, ह्या गोष्टी ह्या काळांत घडलेल्या आहेत. लार्ड अम्हर्स्ट याच्यामागून लार्ड विल्यम बेंटिंक हा गव्हर्नर जनरल झाला. लार्ड अम्हर्स्ट यानें ब्रम्ही लोकांबरोबरील पुष्कळ खर्चाची आणि त्रासाची लढाई नुकतीच संपविली होती, आणि त्याच्या मागून आलेला गव्हर्नर जनरल, लार्ड आक्लंड, यानें अफगाणिस्थानावरील ब्रिटिश सरकारास पुढें अनर्थकारक झालेल्या मोहिमांच्या सत्रास सुरवात केली होती. लार्ड अम्हर्स्ट आणि लार्ड आक्लंड, या दोन गव्हर्नर जनरलांच्या कारकीर्दीच्या दरम्यानचा काळ, हा शांततेच्या राज्यकारभाराचा असून त्याचा उपयोग देशांतर्गत सुधारणा व अंतःस्थ सुव्यवस्था ह्या दोन कार्यांकडे चांगल्या रीतीनें करण्यांत आला; कारण, इंग्लंडमधील राजकीयविषयक चर्चा व लोकमत यांचा ओघ ह्या वेळीं ह्याच दोन प्रश्नांकडे वळला होता. इंग्लंडमध्यें तेथील उदारमतवाद्यांनीं त्या देशांतील रोमन क्याथलिक धर्माच्या लोकांना समान हक्क देण्याची पूर्ण खटपट केली होती,

प्रतिनिधिसभेंत सुधारणा व्हावी असा पूर्ण आग्रह धरिला होता, आणि त्यांनींच ह्या वेळीं इंग्लंडमधील लोकांचीं मतें हिंदुस्थानाकडे बऱ्याच अंशीं आकर्षण करून घेतलीं होतीं. ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेची मुदत भरल्यामुळें व पुन्हां नवीन करून देण्यासंबंधींच्या चाललेल्या वादविवादामुळें हिंदुस्थानांतील राज्यकारभाराकडे इंग्लंडचें लक्ष वेधलें; इ. सन १८३३ मध्यें सनद पुढें चालू ठेवण्याकरितां जो एक कायदा मंजूर झाला, त्या अन्वयें कंपनीच्या व्यापाराच्या मक्त्याचा शेवटचा मागमूसही नाहींसा झाला; आणि सरते शेवटीं ह्या जुन्या व्यापारी मंडळाचें, आशियांतील एका अफाट ताब्यांतील प्रदेशाचा राज्यकारभार चालविण्याच्या विशिष्ट उद्देशानें स्थापन केलेल्या संस्थेंत, रूपांतर झालें.

लार्ड विल्यम बेंटिंक याची गव्हर्नर जनरल या नात्याची कारकीर्द संपण्यापूर्वीं थोडे महिने अगोदर त्यानें असा ठराव केला कीं, "हिंदुस्थानांत सरकारी पत्रव्यवहाराच्या कामाकाजाची भाषा इंग्रजी असावी." हा महत्त्वाचा सरकारी खलिता मेकाले याच्या सुप्रसिद्ध लेखाचा आधार घेऊन तयार केलेला होता; आणि हिंदुस्थानांत शिक्षण व वाङ्मय यांचा प्रसार पौर्वात्य भाषांच्या द्वारेंच व्हावा, ह्या मताला त्या वेळीं अद्यापपर्यंत जे लोक अनुकूळ होते, त्यांना ह्या लेखांत पार धुडकावून लाविलें होतें. सरकारी तिजोरींतून शिक्षणाकरितां देणग्या द्याव्या कीं नाहीं, ह्याच प्रश्नामुळें हा वाद उपस्थित झाला होता; त्यांत मेकॉले यानें इंग्लिश भाषेच्या तर्फें असें यशस्वी रीतीनें प्रतिपादन केलें कीं, ती भाषा खऱ्या ज्ञानाची गुरुकिल्ली आहे, आणि उच्च प्रतीचें शिक्षण संपादण्याकरितांही हेंच एक फक्त योग्य साधन आहे. पौर्वात्य भाषांची "री" ओढणाऱ्यांवर त्यानें जोरदार आणि कडाक्याचा हल्ला केला, त्यामुळें त्यांचा सर्व विरोध पार नाहींसा झाला. त्यानें असें स्पष्ट सांगितलें कीं, युरोपांतील चांगल्या ग्रंथसंग्रहालयांमधील फक्त एकच कपाट हिंदुस्थान आणि अरेबिया ह्या देशांतील सर्व तद्देशीय वाङ्मयाच्या तोडीचें आहे, आणि हिंदुस्थानांतील तरुण पिढीला अशीं भयंकर चुकांनीं भरलेलीं

पुस्तकें वाचण्याची चटक लावून सार्वजनिक संपत्तीचा अशा रीतीनें विनियोग करणें ही गोष्ट केव्हांही योग्य होणार नाहीं. परंतु ह्या पुस्तकांमध्येंच प्राचीन वैदिक धर्म, तत्त्वज्ञान आणि हिंदुस्थानांतील काव्यग्रंथ, यांचाही समावेश होतो, ह्या गोष्टींचा त्यानें विचार केला नाहीं, असें दिसतें; आणि हेंही कबूल करतां येण्यासारखें आहे कीं, मेकाले हा जरी असामान्य बुद्धिवैभवाचा पुरुष होता, तरीही त्याच्या अंगीं राष्ट्रीय चैतन्याच्या खोलवर गेलेल्या कोमल तंतूंविषयीं सहानुभूति नव्हती. लार्ड विल्यम बेंटिक यानें मेकालेच्या मताप्रमाणें हुकूम सोडले, आणि ते इंग्लंडमध्यें पोंचून तेथील जनतेस समजल्यावर त्यांचीं मनें वरीच साशंक व तर्कवितर्कग्रस्त झालीं. त्या काळीं भारतकार्यालयांतील—म्हणजे इंडिया हाऊसमधील—एक वजनदार अधिकारी, जेम्स मिल्ल, यानेंच बहुधा बेंटिकच्या ह्या कृत्याबद्दल तिरस्कार व्यक्त करण्याकरितां एक निंदाव्यंजक ठराव पुढें आणला असावा. शिक्षणविषयक धोरणांत अकल्पित उलटापालट करून हिंदुस्थानवासी जनांवर आंग्लभाषाज्ञानाचा फाजील बोजा लादला, ह्याच गैरमुत्सद्दीपणाच्या मुद्यावर मिल्लसाहेबाचा विशेष जोर असून त्याचें असें म्हणणें होतें कीं, ह्या भाषाज्ञानाचा उपयोग वास्तविक ज्ञानप्राप्तीकरितां म्हणून न होतां केवळ सरकारी नोकरी मिळविण्याचा "परवाना" म्हणूनच होईल. मिल्ल आणि मेकाले हे उभयतां पुष्कळ दिवसांपासून परस्परांचे प्रतिस्पर्धी होते;

---

१. मॅथ्यू अर्नोल्ड यानें असें लिहिलें आहे कीं, इंग्लिश पदार्थसंग्रहालयांत ठेवण्याकरितां ऐर्लंडमधील कांहीं मौल्यवान हस्तलेख विकत घेण्याबद्दल जेव्हां इंग्लंडमध्यें योजना चालली होती, त्या वेळीं मेकाले यानें असें लिहिलें होतें कीं, "लार्ड मेलव्हिली याच्या अमेरिकेंतील लढाईसंबंधाच्या पत्रव्यवहाराशिवाय विकत घेण्यायोग्य असें दुसरें कांहींही त्या सर्व संग्रहामध्यें आपणाला आढळून आलें नाहीं." म्हणजे प्राचीन सेल्टिक—स्कॉच, ऐरिश, वेल्स, ब्रिटन्स, म्यांक्स कार्निश, व फ्रान्सच्या उत्तर भागांतील सेल्ट जातीचा मनुष्य वगैरेंचें—वाङ्मय हें सुद्धां जर त्याला इतकें भिकार वाटलें, तर संस्कृत अगर अरेबिक ग्रंथांला त्यानें फारसें महत्त्व दिलें असतें, ही गोष्ट केव्हांही संभवनीय नव्हती.

आणि मेकाले याचा तर धादांत असा समज झालेला होता कीं, पौर्वात्य लोक अत्यंत बाष्कळपणानें बोलत असतात. तथापि गत गोष्टींचें सिंहावलोकन केलें असतां मेकालेचा कोटिक्रम सर्वथैव बरोबरच होता, असें मात्र क्वचित्‌च ह्मणतां येईल. परंतु मिल्‌चा हा मसुदा अखेरपर्यंत गुलदस्तांतच राहिला, असें दिसतें. ह्या वेळेपासून उच्च प्रतीचें शिक्षण बहुतेक फक्त इंग्लिश भाषेच्या द्वारेंच देण्यास सुरवात झाली, आणि त्यानंतर छापखान्यासंबंधीं मुस्कटदाबीचे सर्व कायदेही लवकरच रद्द करण्यांत आले. बौद्धिक उन्नतीला मिळालेल्या ह्या दोन प्रबळ उद्दीपकांमधील निकट संबंध स्पष्टपणें दृग्गोचर होण्यासारखा आहे, आणि त्याचप्रमाणें या नव्या धोरणामुळें फार महत्त्वाचे व दूरवर टिकणारे परिणामही घडून आलेले आहेत.

परंतु ह्या गव्हर्नर जनरलाची कीर्ति त्याच्या मृत्यूनंतरही जिवंत राहण्याचें कारण म्हटलें म्हणजे, हिंदुस्थानांतील विधवांची सती जाण्याची चाल बंद करण्याकरितां त्यानें धैर्यानें एक कायदा मंजूर केला, हें होय. हल्लींच्या काळांत अशा प्रकारचा कायदा करणें हें कदाचित् न्यायाचें आणि अगत्याचें असूं शकेल; परंतु इ. सन १८२९ मध्यें हा कायदा पुष्कळ चिकित्सा झाल्यानंतर व शंकाकुशंका घेतल्यानंतरच पसार करण्यांत आला आहे. कारण, त्या वेळीं अशा प्रकारच्या विषयासंबंधानें भारतवासी जनतेच्या मताचें खरें स्वरूप पूर्णपणें बाहेर येत नव्हतें; शिवाय, मूढविश्वासमूलक चालीरीतींचा नायनाट करण्याकरितां स्वभावसिद्ध नीतिमत्तेची कायद्याला कोणत्या अंशापर्यंत अनुमति मिळेल, हें सांगणें नेहमींच कठिण असतें. परंतु आपणाला माहित आहे कीं, कायदा व नीतिशास्त्र यांची परस्पर सांगड आहे; त्यामुळें ज्या गोष्टी कायद्यानें स्पष्टपणें निषिद्ध मानिल्या आहेत, त्या गोष्टी नेहमींच अनीतिमूलक असतात, व ज्या गोष्टींना नीतिशास्त्र गर्हणीय समजतें, त्या गोष्टींबद्दल कायद्यालाही नेहमींच आपली नापसंती दर्शवावी लागते. अमानुष अगर निंद्य कृत्यें हीं खरोखर कधींही लोकप्रिय नसतात, अशी अटकळ

बांधण्यास हरकत नाहीं; तथापि ही गोष्टही निर्विवाद आहे कीं, जेव्हां जेव्हां एखाद्या सामाजिक कायद्याची उभारणी प्रमुख नीतितत्त्वाच्या भक्कम पायावर केलेली असते, तेव्हां तेव्हां मात्र तेथें धर्माला माघार घेणेंच भाग पडतें. ही क्रूर चाल मुख्यत्वेंकरून दक्षिण बंगालमधील गरीब व संवईनें आज्ञाधारक बनलेल्या जातींत सुरू होती; आणि तिचा तडकाफडकी नायनाट केला, तर त्यापासून कोणतेंही राजकीय संकट उद्भवणार नाहीं, एवढेंच नव्हे, तर लोकांना मनोधैर्याच्या अभावीं जें "जूं" झुगारून देतां आलें नाहीं, तें झुगारून देवविल्याचें श्रेय आपल्या पदरीं पडेल, असें गव्हर्नर जनरल याचें मत असून तें बरोबर होतें.

लार्ड विल्यम बेंटिंक याच्या परराष्ट्रीय राजकारणासंबंधीं फारसें कांहींही लिहिण्यासारखें नाहीं. इतकेंच नाहीं, पण म्हैसूर व कूर्गमधील स्थानिक बंडाळी मोडून टाकण्याकरितां त्यानें पाठविलेल्या सैन्यासंबंधीची हकीकत जर आपण वगळून टाकली, तर ज्याच्या कारकीर्दींत ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील हिंदुस्थानला सतत शांततेचा लाभ झाला, असा हा पहिलाच—आणि खरोखर शेवटलाही—गव्हर्नर जनरल होता. हैद्राबाद येथील निझामच्या संस्थानाच्या आणि राजपुतान्यामधील रजपूत संस्थानांच्या कांहीं त्रासदायक कामाकाजाची निरवानिरव करतांना तो सर चार्लस मेटकाफ याच्या चातुर्यावर आणि अनुभवावर अवलंबून होता; आणि पंजाबचा राज्यकर्ता रणजितसिंह याच्याबरोबरील राजकारणविषयक धोरणाच्या विशेष महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल त्यानें अगदीं यशस्वी रीतीनें लाविला होता. परंतु रणजितसिंहाबरोबर त्यानें केलेला व्यापारविषयक तह, आणि सिंधुनद व्यापाराकरितां इंग्लिशांना मोकळा करून द्यावा, ह्याविषयीं सिंधच्या अमिराबरोबर त्यानें केलेला तह, ह्या दोन्हीही गोष्टी वास्तविक रीत्या पुढें थोडक्याच वर्षांनंतर अफगाणिस्थानांत ओढवलेल्या भावी संकटाच्या प्रास्ताविक पायऱ्या होत्या, असें म्हणण्यास हरकत नाहीं; कारण, ह्या दोन गोष्टींमुळेंच ब्रिटिश सरकारला अफगाणिस्थानच्या

राजकारणरूपी विस्तृत व अनर्थकारक क्षेत्रावर प्रवेश करावा लागला आहे. हिंदुस्थानावर खुष्कीच्या बाजूनें स्वारी होण्याचा संभव आणि ब्रिटिश प्रदेशाच्या वायव्य सरहद्दीच्या संरक्षणार्थ अवश्यक उपायांची योजना, या दोन प्रश्नांनीं ह्या वेळीं ब्रिटिश-हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांचीं मनें व्यग्र होऊन गेलीं होतीं; शिवाय, ह्या प्रश्नाच्या वादाला तेव्हांपासूनच सुरवात झालेली असून अद्यापपर्यंतही त्याचा पूर्णपणें निकाल लागलेला नाहीं.

परिच्छेद तिसरा—अफगाणिस्थान.

पंजाबच्या पलीकडे अफगाण पर्वतांच्या पुढच्या बाजूस आतां नवीन चळवळी सुरू झाल्या होत्या, आणि ह्याच चळवळींच्या योगानें हिंदुस्थानच्या सुरक्षितपणाबद्दल नेहमीं सूक्ष्मत्वानें गोचर होणाऱ्या भीतीचें पुनरुज्जीवन होऊं लागलें होतें. नेपोलियन यानें माजविलेल्या धुमश्चक्रीमुळेंच आशियावरील रशियाची स्वारी तहकूब झाली होती; परंतु अलीकडे त्यानें पुन्हां ती करण्यास सुरवात केली होती. कास्पियन समुद्रापासून अमूदारिया नदीपर्यंतच्या सर्व मध्य प्रदेशभर रशियानें आपला दरारा बसविला होता, आणि तुर्कोमांचाय येथील तहामुळें (इ. सन १८२८) त्यानें विशेषेंकरून इराणवर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें होतें. ह्या वेळेपासून पुढें ब्रिटिश सरकारचें वायव्य सरहद्दीवरील सर्व राजकीय धोरण आणि सैन्यरचना, ह्यांचा कल रशियाचे भावी बेत अगर हालचाली काय असाव्यात, यांची कल्पना करून त्यांच्यासंबंधीं आधींच अटकळ बांधण्याकडे अगर त्यांना हाणून पाडण्याकडे असे. त्या काळच्या राजकार्यनिपुण मुत्सद्दयांना असें वाटलें कीं, जणूं काय ज्या सीमेपर्यंत आपल्या दोस्त सरकारांचें आम्ही संरक्षण करूं, अशी ब्रिटिश सरकारनें हमी घेतली आहे, ती सीमा बरीच विस्तृत रेखाटली गेली आहे; कारण, इराणची वाताहत उडाल्यामुळें रशिया चाल करून आला असतां इराणची इभ्रत कायम राखण्याकरितां आपल्याजवळ कांहींही

साधन नाहीं, असें त्यांना कळून चुकलें. म्हणून कोणत्याही परराष्ट्रानें जुलूम केला असतां त्याविरुद्ध आम्ही तुह्मांस मदत करूं, अशा अर्थाचा इंग्लिशांनीं इराणशीं तह केलेला असल्यामुळें त्या तहाच्या बंधनांपासून मुक्त होण्याकरितां इ. सन १८२८ मध्यें त्यांनीं इराणच्या शहाशीं बोलणें लाविलें; व अफगाणिस्थान हीच आपली संरक्षण करण्यास योग्य मर्यादा आहे, असें ठरवून ते तेथें परत आले. परंतु ह्याचा परिणाम ओघानेंच असा झाला कीं, इंग्लंडनें जशी माघार घेतली, तसाच रशिया हा पुढें सरसावला, आणि ब्रिटिश सरकारांनीं रिकाम्या केलेल्या परराष्ट्रीय राजकारणाचें क्षेत्र त्यानें आपल्या हस्तगत करून घेऊन इंग्लिशांव्यतिरिक्त आपले स्वतःचे हितसंबंध पार पाडण्याकरितां इराण हें एक साधन करून टाकलें. इराणनें वायव्येकडील आपले कांहीं प्रांत रशियास नुकतेच तोडून दिले होते, आणि त्यामुळें त्या प्रांतांबद्दल आपणास कांहीं तरी मोबदला मिळावा या हेतूनें इराणनें आपल्या ईशान्य सरहद्दीपलीकडल्या अफगाणिस्थानच्या ताब्यांतील प्रदेशावर आपला पुरातन हक्क आहे, असें सांगण्यास सुरवात केली होती, व या गोष्टीस रशियाचेंही त्याला स्वाभाविक रीत्याच पाठबळ मिळालें होतें. या कारणामुळें इराणचा शहा सार्वभौमत्वाचा हक्क म्हणून पश्चिम अफगाणिस्थानावर आपला ताबा सांगूं लागला, आणि त्यानें इ. सन १८३७ मध्यें इराणच्या लगत असलेल्या अफगाणिस्थानच्या सरहद्दीचें मुख्य ठिकाण आणि इराणांतून हिंदुस्थानाकडे येणाऱ्या सर्व मार्गांचें नाकें अशा हिरात शहरावर हल्ला करण्याची तयारी केली. कांहीं प्रमुख अफगाण सरदार इराणच्या राज्यकर्त्याशीं पत्रव्यवहार करीत होते; अफगाणिस्थानांतीलच एका नवीन राजघराण्यानें जुन्या राजवंशांतील राज्यकर्ता जो शहासुजा याचें तेथून उच्चाटण केल्यामुळें तो हद्दपार होऊन पंजाबांत येऊन राहिला होता; आणि त्यानें पंजाबमधून शीख व इंग्लिश या दोघांची मदत घेऊन आपलें राज्य परत मिळविण्याची खटपट चालविली होती; परंतु तिचा कांहींही उपयोग झाला नव्हता. अफगाणिस्थान-

च्या राज्याचा मूळ पुरुष जो अहमदशहा अबदल्ली याच्याच खास घराण्यांतील वंशज शहासुजा हा होता; परंतु ह्या काळापूर्वी थोडकींच वर्षे अगोदर राज्यांतील एका बलिष्ठ राजमंत्र्याच्या मुलांनीं मूळ राजघराण्यास पदच्युत करून तेथील गादी स्वतःच बळकाविली होती. अशा रीतीनें राजघराण्याची उलथापालथ होण्याची आशिया खंडामधील ही सुप्रसिद्ध तऱ्हा आहे; आणि ज्यांच्या अंगांत राजपद सांभाळण्याची ताकद नाहीं, त्यांच्या हातांतून तें निसटून, सांभाळण्याची ज्यांच्यांत धमक आहे, अशांच्या हातीं पडण्याची राज्यपदाची नैसर्गिक प्रवृत्ति असल्यामुळेंच, ही तऱ्हा उत्पन्न झालेली आहे. शिवाय हीही गोष्ट ध्यानांत येईलच कीं, अठराव्या शतकांत मराठा साम्राज्याच्या राजवंशाला त्याचें प्रधानपद धारण करणाऱ्या पेशव्याच्या घराण्यानें पदभ्रष्ट केलें होतें, आणि चालू शतकांतही तंतोतंत ह्यासारखीच राज्यक्रांति नेपाळांतही घडून आलेली आहे.

ह्या वेळीं आशिया खंडांतील सर्व प्रश्नांचें केंद्रस्थान अफगाणिस्थान हेंच बनत चाललें होतें; त्या देशाची परिस्थिति, तेथील नैसर्गिक बळकटी, आणि युद्धशास्त्रदृष्ट्या त्याचें उच्च महत्त्व, या कारणांमुळें तो प्रदेश हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें नेहमींच अत्यंत महत्त्वाचा आहे; शिवाय इराणनें त्यांतील प्रदेशावर आपला हक्क उपस्थित केल्यामुळें तर अफगाणिस्थानला राजकारणरूपी क्षेत्रावर या वेळीं विशेषच प्राधान्य प्राप्त झालें होतें. हिंदुस्थानच्या संरक्षणार्थ अफगाणिस्थानचें स्वातंत्र्य आणि अखंडत्व ह्या दोन गोष्टी अत्यवश्यक आहेत, असें परिणामीं अत्यंत महत्त्वाचें तत्त्व इंग्लंडमधील ब्रिटिश सरकारानें शोधून काढलें; व हिंदुस्थानांतून पाठविलेल्या वकीलमंडळानें यापूर्वीच सिंधु नदाची टेहळणी करून काबूल येथें तेथील अमीर, दोस्त महमद, याची मुलाखत घेतली होती. या कारणामुळें इ. सन १८३७ मध्यें इराणच्या शहानें स्वतः कांहीं रशियन अधिकाऱ्यांनिशीं हिरात शहरावर आपल्या सैन्यानिशीं चाल केली, आणि इंग्लिशांशीं सख्य करण्यांत आशेची निराशा झालेला अफ-

गाणिस्थानचा अमीर एका रशियन वकिलाबरोबर तहाची वाटाघाट करूं लागला, तेव्हां ब्रिटिश सरकारच्या मनांत स्वाभाविक रीत्याच भीति आणि अविश्वास यांची एकदम परमावधि झाली. इंग्लिशांनीं इराणी आखातामध्यें एक मोहीम पाठविली, तिनें करक हें बेट आपल्या ताब्यांत घेतलें, आणि त्यांनीं इराणविरुद्ध असा कांहीं आविर्भाव आणला कीं, इराण येथील शहाला हिरातहून माघार घेण्याला तेवढीच हालचाल अगदीं पुरेशी झाली. कारण, त्यानें हिरातवर केलेला हल्ला निष्फळ झाला होता, व त्याची सामग्रीही पुरेशी नव्हती; परंतु त्या वेळीं हिंदुस्थानच्या संरक्षणाची इंग्लिशांनीं आगाऊच सावधगिरी कशी ठेवावी, ह्याविषयीं इंग्लंड आणि हिंदुस्थान यांमधील मुत्सद्द्यांच्या मनांत विचार घोळत होते; त्यामुळें इराणच्या शहानें जरी हिरातवरून आपला मोर्चा परत फिरविला होता, तरीही तेवढ्यानें ब्रिटिश सरकारचें कोणत्याही प्रकारें समाधान झालें नव्हतें. लंडनमधील प्रधान मंडळांनीं असें जाहीर केलें कीं, "आमच्या पूर्वेकडील ताब्यांतील प्रदेशाच्या कल्याणार्थ पश्चिम सरहद्दीवर आह्मांस एका दोस्त सरकाराची अत्यंत जरूरी आहे; मात्र परकीयांच्या जुलमाला आडकाठी ह्मणून प्रतिकार करण्यांत त्या दोस्ताचाही हितसंबंध असला पाहिजे; आणि असें झालें असतां ब्रिटिश सरकारशीं शत्रुभावानें वागणाऱ्या राष्ट्राचें दासानुदास बनून राहणाऱ्या संस्थानिकांच्या पंक्तीऐवजीं एका दोस्त सरकारचा आह्मांस फार उपयोग होईल." ह्मणून त्यांनीं लार्ड आक्लंड याला अफगाणिस्थानामध्यें निकडीचे उपाय योजण्याबद्दल आग्रह केला. इंग्लंडमधील प्रधानमंडळाच्या पूर्ण संमतीनें गव्हर्नर जनरल यानें एक त्रिकुटी तह घडवून आणला, आणि त्याअन्वयें रणजितसिंह व ब्रिटिश सरकार यांनीं मिळून मनगटाच्या जोरावर शहा सुजा याला पुन्हां अफगाणिस्थानच्या तख्तावर बसवावें, असें ठरलें. लार्ड आक्लंड यानें असें जाहीर केलें कीं, " अफगाणिस्थानांत हल्लीं बेबंदशाही माजली असून तीही इतक्या शोचनीय थराला जाऊन पोहोंचली

आहे कीं, ब्रिटिश सरकारला त्या बाबतींत हात घालणें अत्यंत जरूरीचें झालेलें आहे. आणि शत्रुभावानें वागणाऱ्या राज्याऐवजीं मित्रत्वानें नांदणाऱ्या राज्याची पूर्व अफगाणिस्थानांत स्थापना करण्याकरितां व ' आमच्या वायव्य सरहद्दीवर होणाऱ्या परकीय जुलमाच्या योजनांविरुद्ध कायमची आडकाठी स्थापन करण्याकरितां ' आम्ही आपले प्रयत्न नेटानें सुरू ठेवणार आहोंत." त्यानंतर ठरल्याप्रमाणें इ. सन १८३८ मध्यें अफगाणिस्थानांत राज्य करीत असलेला अमीर, दोस्त महमद, याला पदच्युत करून त्याऐवजीं शहा सुजा याला पुन्हां राज्यपदारूढ करण्याच्या विशिष्ट उद्देशानें ब्रिटिश सैन्यानें सिंधमधून बलूच खिंडींतून कंदाहारकडे कूच केलें.

असो; महाराणी व्हिक्टोरिया हिच्या सुस्मरणीय कारकीर्दीला प्रारंभ होण्याच्या वेळीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याची स्थिति वर वर्णन केल्याप्रमाणें होती. इंग्लिशांच्या पूर्वीच्या दोस्त दुष्मनांचीं—हैद्राबादचा निझाम, औधचा नबाब, मराठा राजमंडळ, आणि म्हैसूरचा राज्यकर्ता यांचीं—नांवें नकाशावर अद्याप ठळक रीतीनें विराजमान होत होतीं; परंतु ब्रिटिश साम्राज्याच्या प्रगमनशीलत्वामुळें तीं पुष्कळच मागें रेंगाळत पडलेलीं होतीं; उलट पक्षीं, ब्रिटिश सरकारच्या आघाडीस रणजितसिंह आणि सिंधचे अमीर हेच फक्त असून त्यांपैकीं रणजितसिंह हा पंजाब व थेट अफगाण पर्वतापर्यंतच्या सर्व मुलखाचा राज्यकारभार पहात होता; आणि सिंधचे अमीर हे सिंधु नदाच्या आसमंतात असलेल्या डोंगराळ प्रदेशावर राज्य करीत होते. मध्य आशियांतील राजकारणरूपी दीर्घकालीन नाटकाच्या प्रथमांकाचा पडदा नुकताच आतां वर उचलत चालला होता, आणि आपल्या हयातींतच ह्याचा पुढचा सर्व कार्यक्रम पार पडण्याचा रंग दिसत नाहीं. ह्या नूतन प्रगमनशील धोरणाचा मथितार्थ काय असावा ? अफगाणिस्थानाशीं इंग्लिशांचें वैर होतें, अशांतला प्रकार तर बिलकुल नव्हताच; शिवाय, त्यांच्या ताब्यांतील प्रदेश व अफगाणिस्थान यांचे दरम्यान तर उभयतांच्या प्रदेशास विभागणाऱ्या सिंधु

नदास मिळत असलेल्या पांच नद्या आहेत. परंतु ह्यांतील गर्भितार्थ असा आहे कीं, सुमारें अर्ध शतकाचा कालावधि मध्यंतरीं लोटल्यानंतर आशिया खंडांत रशिया या दुसऱ्या एका युरोपियन प्रतिस्पर्ध्याच्या वर्चस्व-क्षेत्राचा संपर्क आपणास होतो कीं काय, अशी ब्रिटिश सरकारास पुन्हां भीति उत्पन्न झाली. शिवाय, गेल्या शतकांत अशा प्रतिस्पर्धेची भीति फक्त समुद्रकिनाऱ्याच्या बाजूनेंच काय ती होती; परंतु आतां उलट, ह्मणजे खुष्कीच्या बाजूनें, आक्सस नदी व पेरापामीसस पर्वताकडून ती हळु हळु, पण खात्रीनें, दृग्गोचर होऊं लागली होती.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारांनीं अफगाणिस्थानामध्यें पाठविलेल्या पहिल्या मोहिमेची हकीकत तर सर्वांस महशूर आहेच. शहा सुजा याला सहज रीतीनें पुन्हां तख्तनशीन करण्यांत आलें, आणि सुमारें दोन वर्षें-पर्यंत काबूल आणि कंदाहार सभोंवतालचा प्रदेश इंग्लिशांनीं आपल्या लष्करी दिमतीखालीं ठेविला. परंतु ही सर्व योजना राजनीतिदृष्ट्या अविचाराची असून युद्धशास्त्रदृष्ट्या तर ही मोहीम फारच धाडसाची व अनर्थकारक होती. अफगाणिस्थानावरील ह्या स्वारीच्या रणभूमीचा पाया सिंधमध्यें–ह्मणजे इंग्लिशांना बरेंचसें प्रतिकूळ असणाऱ्या एका परकीय राज्यामध्यें–होता, आणि इकडे त्यांच्या पार्श्व भागावर पंजाबमध्यें ह्मणजे हिंदुस्थानावरील सर्व दळणवळण रोखून धरणारें, प्रचंड सैन्यानें युक्त असणारें, आणि मत्सरभावामुळें डोळ्यांत तेल घालून इंग्लिशांच्या हालचालींवर बारिक रीतीनें पाळत ठेवणारें, असें दुसरें शीख लोकांचें परकीय राज्य होतें. या कारणामुळें कोणत्याही दृष्टीनें विचार केला; तरी प्रतिकूल परिस्थिति व प्रगमनाची अकालिक चळवळ ह्या दोन गोष्टींमुळें हिंदुस्थानच्या मर्यादेपलीकडे ब्रिटिश नियंत्रणाखालीं एक संरक्षित राज्य निर्माण करण्याचा हिंदुस्थान सरकारांनीं हा जो पहिलाच प्रयत्न केला, त्याचा असा शोकजनक रीतीनें शेवट झाला, याबद्दल कोणालाही स्वाभाविक रीत्याच फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

आपल्या प्रदेशांत एका परकीय सैन्याचा शिरकाव व्हावा, या गोष्टीचा स्वातंत्र्यप्रिय अफगाण लोकांना अत्यंत त्वेष आला; कारण, त्यांच्या अंगीं जितका स्वदेशाभिमान आहे, तितकेंच धर्मवेडही आहे; त्यामुळें आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य कायम राखण्याकरितां त्यांनीं आजपर्यंत नेहमीं निकरानें बऱ्याच लढाया मारलेल्या आहेत. शहा सुजा हा जेव्हां पहिल्यानेंच आपल्या देशबांधवांच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्यांनीं त्याचें बरेंचसें स्वागत केलें; परंतु " जन्मसिद्ध हक्कानें राज्यकर्ता " ह्या भावनेमुळें शहा सुजाविषयीं अफगाण लोकांत उत्पन्न झालेली प्रियता–तो ब्रिटिश सैन्याचा साह्यानें व आश्रयानें राज्यशकट हाकूं म्हणेल, तर मात्र–समूळ नष्ट होईल, ही गोष्ट नक्की ठरून चुकली होती; कारण, " संगिनींवर बसण्या खेरीजकरून तिच्या साह्यानें वाटेल त्या घडामोडी करितां येतात," ह्या वचनाची सत्यता आशिया खंडांतही बरीचशी दिसून येते. अफगाणिस्थानचें राज्यपद शहा सुजा याच्या हस्तगत झाल्यानंतर त्याला स्वतःच्या कर्तबगारीनें व त्याच्या संरक्षणार्थ उभारण्यांत आलेल्या स्थानिक कवायती खड्या फौजेच्या साह्यानें आपल्या पायावर उभें राहण्याची संधि देऊन इंग्लिशांनीं आपलें सैन्य माघारें परत बोलावून घेणें हाच बहुधा उत्कृष्ट मार्ग झाला असता; परंतु लार्ड आक्लंड यानें आपल्या मोहिमेचा मुख्य हेतु " अफगाणिस्थानचें अखंडत्व व स्वातंत्र्यस्थापना ह्या दोन गोष्टी घडवून आणणें " हा आहे, असें जाहीर केलें होतें; आणि हेंही उघडच होतें कीं, एकट्या शहा सुजाच्या हवाल्यावर अफगाणिस्थान देश सोडला असता, तर ह्या गोष्टी घडून येण्याची विशेषशी खात्री नव्हती. तथापि विजयप्राप्तीची ही संधि जरी अनिश्चित असली, तरीही ती अभूतपूर्व अशीच होती, यांत मात्र कांहींही संदेह नाहीं. कारण, अत्यंत कडक थंडी, पुरवठ्याची टंचाई, दळणवळण दुरापास्त, शिवाय गनिमी काव्याची लढाई ज्यांच्या हाडींमांसीं खिळलेली आहे, अशा अफगाण लोकांवर कोणत्याही ठिकाणाहून सर्व सैन्य एकत्र

करून हल्ला केला, तरी सुद्धां त्यास वारंवार होणारे अडथळे, अशा स्थितींत अफगाणिस्थानच्या डोंगराळ प्रदेशाचा लष्करी ताबा तसाच आपणाकडे राहूं देणें एवढाच काय तो फक्त एक मार्ग ब्रिटिश सरकारास उरलेला होता. आणि दुर्दैवानें हा दुसराच मार्ग स्वीकारण्यांत आला. इंग्लिशांचा अफगाणिस्थानांतील राजकीय खात्यांतील मुख्य अंमलदार, सर विल्यम मॅक्नॉटन, यानें असें ऐकिलें होतें कीं, अफगाणिस्थानांतील दूरच्या प्रदेशांतील लोक हे अजूनही अनियंत्रित असून रशियन लोक ओरेनबर्ग अगर खिवा येथून पुढें येत आहेत, आणि इंग्लिशांनीं हद्दपार केलेला अमीर, दोस्त महमद, हा उत्तरेकडील प्रदेशासभोंवतीं विरुद्ध चालींत आहे. म्हणून मॅक्नॉटन यानें परत जाण्यापूर्वी शहा सुजा याच्या राज्याचा पाया दृढ करण्याचा निश्चय केला. परंतु शहा सुजाकरितां एक प्रकारचें खडें सैन्य उभारण्याचा प्रयत्न करतांच अफगाण जमातींतील सर्व बलिष्ठ सरदारांच्या मनांत भयंकर मत्सराग्नीनें पेट घेतला; कारण, सर्व ठिकाणचा अंकित सरदारवर्ग आणि स्वातंत्र्यप्रिय जनसमाज यांच्याप्रमाणेंच तेही आपल्या राज्यकर्त्याचा योग्य मानमरातब ठेवितात, परंतु अरेरावीचा मनापासून तिटकारा करितात. अप्रीति दुणावत चालली, तिचा प्रसार होत गेला, आणि सरते शेवटीं इ. सन १८४१ मध्यें बारीक सारीक फंदफितुरी आणि स्थानिक धामधूम यांचें पर्यवसान होऊन सर्व अफगाणिस्थानभर सार्वजनिक बंडाळी माजण्याची सुरवात झाली. ब्रिटिश सैन्याच्या सामग्रींत तुटवडा आला, तें सतत चालणाऱ्या चकमकींमुळें थकून गेलें होतें, त्यांच्यावरील सेनानायक नालायक होते, त्यांच्या बाहेरच्या ठाण्यांना वेढा पडला होता, अगर त्यांचें बाह्य दळणवळण बंद पाडण्यांत आलें होतें, मॅक्नॉटन याला अजूनही दैवाचा फांसा सुलटा फिरेल, अशी निरर्थक आशा वाटत होती, व त्यामुळें हिंवाळ्याला प्रारंभ होईपर्यंत त्यानें काबूलमधून परत फिरण्याला दिरंगाई लाविली होती. परंतु त्यानंतर माघार घेणें अपरिहार्य झालें, त्या वेळीं जलालाबाद आणि

काबूल येथील डोंगराळ प्रदेशांमधून मार्गक्रमण करीत असतांना इंग्लिशां-कडून कांहीं विलक्षण ढोबळ घोडचुका झाल्या, त्यामुळें तर ब्रिटिश सैन्याचा सर्वथैव फन्नाच उडून गेला. तथापि जलालाबादच्या किल्ल्यामध्यें इंग्लिश सैन्य मोठ्या शौर्यानें टिकाव धरून राहिलें असतांनाच सरते शेवटीं इ. सन १८४२ च्या हिंवाळ्यांत जनरल पोलाक यानें त्यांतील सर्व सैन्याची मुक्तता केली, व थेट काबूलपर्यंत कूच करित जाऊन त्यानें तें शहरही पुन्हां आपल्या ताब्यांत घेतलें; शिवाय, इकडे कंदाहार येथें अफगाण लोकांनीं जनरल नॉट यास स्थानभ्रष्ट करण्याचे केलेले सर्व प्रयत्नही त्यानें हाणून पाडले.

परंतु इ. सन १८४१ मध्यें अफगाणिस्थानांतील मध्यस्थीच्या राज्य-पद्धतीचें उत्पादक असणारें व्हिग प्रधानमंडळ कामावरून दूर झालें, आणि इ. सन १८४२ च्या प्रारंभींच लार्ड आक्लंडच्या मागून लार्ड एलन्बरो हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होऊन इकडे आला. त्यानें कंदाहार आणि जलालाबाद येथील सर्व ब्रिटिश सैन्याला परत फिरण्याबद्दल ताबडतोब हुकूम सोडले, आणि जर अफगाणिस्थानमधील इंग्लिश सेनानायकांनीं आपल्या स्वत:च्या शिरावर सर्व जबाबदारी घेऊन धाडसाचे उपाय योजले नसते, तर हिंदुस्थान सरकारला अफगाणिस्थानमधून घाईघाईनें व कांहींशा अपमानकारक रीतीनें माघार घ्यावी लागून हा कलंक धुवून निघाला नसता. तथापि इ. सन १८४२ च्या अखेरीस इंग्लिशांनीं आपलीं सर्व सैन्यें मुकाट्यानें तेथून परत आणिलीं; दोस्त महमद यास काबूल येथें पुन्हां अधिकारपदारूढ करण्यांत आलें; त्याचा सर्व प्रदेश मोकळा करून देण्यांत आला; आणि अफगाणिस्थानचें राज्य ब्रिटिश साम्राज्यसरकारच्या वर्चस्वकक्षेंत आणण्यासंबंधींचें सर्व राजकीय धोरण त्या वेळीं इंग्लिशांनीं निश्चितपणें टाकून दिलें. तथापि सुमारें चाळीस वर्षे तें तसेंच सुप्तावस्थेंत राहिल्यानंतर अत्यंत भिन्न परिस्थितींत त्याचें पुनरुज्जीवन झालें, आणि त्यांत ब्रिटिश सरकारला यशप्राप्तिही झाली.

परिच्छेद चवथा--सिंध आणि पंजाब.

इ. सन १८३९ मध्यें लार्ड आक्लंड यानें सिंधु नदाच्या डोंगराळ प्रदेशांत राज्य करणाऱ्या सिंधच्या अमिराचा मुलूख राजनीतीस अनुसरून ब्रिटिश राजकीय नियंत्रणाखालीं आणिला; कारण, दक्षिण अफगाणिस्थानावर त्याला मोहिम पाठवावयाची असल्यामुळें त्या प्रांताची त्या मोहिमेचा मूळ पाया व आधारस्तंभ म्हणून त्यास अवश्यकता भासली. सिंधुनदाच्या मुखांजवळील कराची हें बंदर काबीज करण्यांत आलें, आणि सिंधूनद इंग्लिश व्यापाराला खुला करून देण्यांत आला. लार्ड एलन्बरो यानें जेव्हां अफगाणिस्थानामधून परत फिरण्याचें निश्चित ठरविलें, तेव्हां सिंधमधील ब्रिटिश सरकारांनीं मिळविलेला मौल्यवान प्रदेश सोडून देण्याचें त्याच्या फार जिवावर आलें; इतकेंच नव्हे, तर उलट पक्षीं ब्रिटिश सैन्यानें तात्पुरत्या कामाकरितां मिळविलेल्या प्रदेशावर त्या सरकारचा कायमचाच ताबा रहावा, अशी त्याची फार इच्छा होती. इतक्यांतच सिंधच्या अमिरांकडून खंडणी आदा होण्यास विलंब लागला, या गोष्टीचा फायदा घेऊन त्यानें त्यांच्याकडे अशी निकड लाविली कीं, त्यांनीं आपल्या स्वामित्वहक्काचा त्याग करून तो प्रदेश ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत द्यावा. ज्यामुळें खडाजंगी उडण्याचा संभव होता, त्या मागण्या मुद्देसूद रीतीनें पुढें मांडण्याकरितां सर चार्लस नेपियर यास सिंधमध्यें पाठविण्यांत आलें. त्यानंतर सर नेपियर यानें गव्हर्नर जनरल यास एक लांबलचक पत्र सादर करून त्यांत असा कोटिक्रम लढविला कीं, "तहाच्या अटी सख्त रीतीनें पाळण्यास आम्ही बांधले गेलों आहोंत; पण अशा सूक्ष्म गोष्टी तंतोतंत पाळल्या, तर त्या योगानें तहाअन्वयें आह्मांस जी जागा आंखून दिलेली आहे, तींतच कायमचें रहावें लागेल, व त्यामुळें सिंधमधील लोकांच्या सर्वसाधारण कल्याणाकरितां आपणास मध्यें पडणें दुरापास्त होईल." त्यानें आणखी असेंही विचारलें आहे कीं, "अशीच स्थिति पुढेंही पुष्कळ दिवस टिकणें शक्य आहे काय?" आणि "जर ही सबब योग्य असेल, तर हल्लीं जीं जीं

ठिकाणें तात्पुरतीं आपल्या ताब्यांत आहेत, तीं तीं सर्व कायमचीं आपल्या साम्राज्यास जोडून एकदम 'एक घाव दोन तुकडे' करणें श्रेयस्कर होणार नाहीं काय?" अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आपणास पुढें कशा रीतीनें काम करतां येईल याबद्दल त्यानें विचार करून, अमिरांनीं ज्या तहाच्या अटींकडे अगर धोरणाकडे दुर्लक्ष केल्यासारखें दिसलें, अशा पांच बाबतींचा एक मसुदा गव्हर्नर जनरलकडे पाठविला, आणि त्यांत अशी आग्रहाची विनंति केली कीं, "आपणाला अवश्य लागणारीं ठिकाणें सर्व मालकी हक्क सोडून ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत देण्याबद्दल सिंधच्या अमिरांवर सक्ती करणें हें कठोरपणाचें तर होणार नाहींच, पण उलट दयाळूपणाचेंच होईल." त्यावरून "खंडणीच्याऐवजीं प्रदेश द्यावा," ह्या अटीवर एक नवीन तह करण्याबद्दल सिंधच्या राज्यकर्त्यांना भाग पाडण्याकरितां लार्ड एलन्बरो यानें सर चार्लस नेपियर याला अधिकार दिला. त्यानंतर झालेल्या तहावर अमिरांनीं सह्या केल्या; परंतु त्यांनीं आपलीं सैन्यें जमवून त्यांच्या राजधानीच्या शहरांत असलेल्या ब्रिटिश सरकारच्या "रेसिडेन्सी" वर हल्ला केला, त्यामुळें सर चार्लस नेपियर हा त्यांच्या प्रदेशावर चाल करून गेला; आणि इ. स. १८४३ च्या फेब्रुवारी महिन्यांत मियाणी येथें झालेल्या लढाईंत अमिराच्या सैन्यावर त्यानें पूर्ण विजय मिळविला. त्यानंतर सिंधच्या अमिरांना पदभ्रष्ट करण्यांत आलें, आणि सिंधूनदाच्या खालील भागांतील सिंड ब्रिटिश प्रदेशाला जोडण्यांत येऊन त्यामुळें त्यांना कराची आणि सिंधूनदाची खाडी यांचा ताबा मिळाला; ह्मणजे, हिंदुस्थानच्या समुद्रकिनाऱ्याचा सबंध वर्तुलाकृति भाग त्यांच्या अमलाखालीं आला. तथापि इ. स. १८४४ मध्यें लार्ड एलन्बरो यास परत बोलावण्यांत आल्यामुळें त्याची कारकीर्द संपुष्टांत आली, आणि त्याच्या जागीं सर हेनरी हार्डिंज हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला.

मध्यंतरीं इ. स. १८३९ मध्यें रणजितसिंह याच्या निधनकालापासून फक्त तीस वर्षेंपर्यंतच टिकलेल्या शीख राष्ट्राचा आतां झपाट्यानें ऱ्हास

होत चालला होता. एकामागून दुसरा ह्याप्रमाणें कित्येक सरदार अधिकार-पदारूढ झाले, आणि पुन्हां पदभ्रष्ट झाले, अगर मारलेही गेले. ज्याला विजयोत्पादक सैन्य निर्माण करतां येईल, व त्यावर आपलें आधिपत्यही गाजवितां येईल, असा एखादा रणविद्याविशारद सेनानायक हाच बहुधा नेहमीं आशिया खंडांत नवीन राज्याची संस्थापना करतो, आणि तो त्या सैन्यबलानें आपल्या प्रतिपक्ष्यांचाच फक्त पाडाव करतो, एवढेंच नव्हे, तर त्याच सैन्याचा उपयोग तो—लहान लहान संस्थानिकांना चीत करून टाकणें, आपल्या मर्यादेच्या कक्षेंत येणारे सर्व अडथळे पार नाहींसें करून टाकणें, आणि वैयक्तिक अधिकाराला आळा घालूं पाहणाऱ्या प्रत्येक आडकाठीचा विशेषतः विध्वंस उडविणें, ह्या गोष्टी करण्या-करितांही—करीत असतो. परंतु अशा रीतीनें आपणाला अडथळा करणाऱ्या सर्व साधनांचा जो नायनाट उडवितो, त्याचा सर्व आश्रयही त्याबरोबरच नष्ट होऊन जातो; कारण, आश्रय ह्मणजेच प्रतिरोध करण्याची शक्ति होय; आणि त्यानेंच तयार केलेल्या लष्करी शस्त्राची तीव्रता व सामर्थ्य हीं त्याच्यामागून गादीवर येणाऱ्यांस दुप्पट भयाव्ह होतात. तदनंतरचा राज्यकर्ता जर निधडया छातीचा नसेल, आणि जर त्याचे बाहु हतवीर्य असतील, तर राजकीय तराजूच्या तागडींतील तरवारीचा भार कमी करण्याकरितां प्रतितोलाचें असें दुसरें कोणतेंही वजन शिल्लक रहात नाहीं; आणि त्यामुळें त्या राज्याची अगर घराण्याची उलथापालथ होते. महंमदीयांच्या जुलमाचा जोरानें प्रतिकार करण्याकरितां व आपल्यांत धार्मिक विश्वबंधुत्वाचा नवीन जोम उत्पन्न करण्याकरितां शीख राष्ट्राची संस्थापना झाली होती; त्यामुळें इतकीं लोकप्रिय व जवळ जवळ प्रजेच्याच तंत्रानें चालणारीं शीख सैन्यें एककेंद्रीभूत केलीं, ह्मणजे एखाद्या रणपंडित, पण सुलतानी, सत्ताधीशाच्या हातांतील हें जसें एक खात्रीचें सर्वदाहक अस्त्र होतें, त्याचप्रमाणें ह्या सैन्यरूपी यंत्राची कळ फिरविण्यांत यत्किंचित्ही कसूर झाली, अगर थोडासाही प्रमाद घडला,

तर तेंच अस्त्र अनावर होऊन त्याचा राजकीय वातावरणांत एकदम धडाका उडाल्यावांचून राहणार नाहीं, हीही गोष्ट निःसंशय होती. रणजितसिंहाच्या औरस, अगर मानिलेल्या, मुलांमध्यें त्याच्यासारखें एकाचेंही बुद्धिवैभव नव्हतें, अगर ज्या सैन्याच्या जोरावर त्यानें पंजाब सर केला, अफगाण लोकांना सिंधूनदापलीकडे थेट त्यांच्या अफगाण पर्वतांपर्यंत पिटाळून लाविलें, आणि काश्मीर प्रांत आपल्या ताब्याखालीं घेतला, त्या रुद्रस्वरूपी सैन्याला स्वतःच्या दाबांत ठेवील, अशी कर्तबगारी एकाच्याही अंगांत नव्हती. रणजितसिंहाचा वडील आणि औरस मुलगा, खरकसिंह, हा एक वर्षाच्या आंतच मृत्यु पावला. त्यानंतर त्याचा मानलेला मुलगा, जो शेरसिंह, यानें आपल्या वडिलाच्या पद्धतीचें अनुकरण करून ब्रिटिश सरकाराशीं सख्य संपादन करण्याचा प्रयत्न केला; परंतु अशा तऱ्हेनें इंग्लिशांबरोबर सख्य जोडण्याचा प्रयत्न करणारा असा हा शेवटलाच राज्यकर्ता असून तो, त्याचा मुलगा, आणि त्याचा मुख्य प्रधान, यांचा लवकरच कटवाल्यांनीं खून केला. शेरसिंहाच्या मृत्यूनंतर कांहीं राज्यकर्त्यांनीं अगर प्रधानांनीं राज्य चालविण्याचे प्रयत्न केले; परंतु ते सर्व परस्परविघातक झटापटी, बंडाळीचा उद्भव, आणि खुनाखुनी, यांमुळें पदभ्रष्ट झाले, व झोटिंग पादशाही सुरू झाल्यामुळें शीख राष्ट्र नामशेष होण्याच्य अगदीं बेतांत आलें. कारण, सर्व सत्ता लष्करी अंमलदार मंडळाच्या हातीं गेली होती; हें अधिकारमंडळ सैन्यांनीं नेमलेलें होतें, व तें सैन्य तर धर्मवेडानें अंध आणि बेफाम बनलेलें असून स्वतःच्याच सरकाराविषयीं साशंक होतें. राज्ञी-माता, म्हणजे रणजितसिंहाची विधवा, आणि तिचा अज्ञान पुत्र, धुलीपसिंग, यांना राज्यकर्त्या घराण्याचे नामधारी प्रतिनिधि म्हणून मानण्यांत आलें होतें; परंतु रुधिरवासनारूपी ज्वालेचा एकदम भडका उडून त्यांतच आपल्या स्वतःचाही स्वाहाकार होतो कीं काय, अशी त्यांना क्षणोक्षणीं भीति वाटत होती. हें अनियंत्रित सैन्य सर्व शीख प्रदेशांत जोराची बेबंदशाही माजवीत होतें, आणि त्याला कोठें

तरी लांबवर अडकवून टाकणें, एवढीच काय ती त्यांच्या जीवितसंर-क्षणाची एक आशा उरली होती. यास्तव या त्रासदायक सैन्याला सतलज नदीपलीकडे इंग्लिशांविरुद्ध सामना करण्यांत गुंतवून द्यावें, यांतच त्यांचें उघड उघड हित होतें. कारण, या सामन्यांत तें सैन्य खात्रीनें हतवीर्य होईल, आणि बहुधा त्याचा निकालही लागेल, असा संभव होता. ब्रिटिश सरहद्दीवर चाल करून जाण्यास त्या सैन्याला प्रोत्साहन देण्याच्या मुळाशीं कोणते हेतु आहेत, हें शीख सेनानायकांना माहीत नव्हतें, असें नाहीं. परंतु इंग्लिश सैन्य चाल करून येत आहे, ह्या अफवेमुळें त्यांचा देशा-भिमान प्रज्वलित झाला होता; कारण, गव्हर्नर जनरल (सर हेनरी हार्डिंज) याला एखादी अव्यवस्थित स्वारी होण्याची भीति वाटल्यामुळें आपलीं बाहेरील ठाणीं बळकट करण्याकरितां तो आपल्या सैन्याची कुमक आणीत होता; शिवाय, कांहीं मर्यादाविषयक अकालिक वाद-विवादानें लाहोर सरकारचें मन ब्रिटिश सरकाराविषयीं कलुषित झालें होतें, व तें कांहीं अंशीं योग्यही होतें. म्हणून जेव्हां शीख सैन्याला " तुम्ही मुकाट्यानें एका युरोपियन राष्ट्राच्या वर्चस्वाच्या आधीन होतां काय ? " असा मर्मभेदक प्रश्न करण्यांत आला,तेव्हां त्यांनीं युद्धशास्त्रदृष्ट्या ठरलेली मर्यादा, जी सतलज नदी, ती ओलांडून व तिच्या आग्नेय तीरावर तटबंदी करून ह्या प्रश्नाचें समर्पक उत्तर दिलें; कारण, जरी हा प्रदेश लाहोर सरकारच्या ताब्यांत होता, तरी बाजवीपेक्षां अधिक सैन्या-निशीं आम्ही ह्या प्रदेशांत प्रवेश करणार नाहीं, असा त्यांनीं ब्रिटिश सर-काराशीं तह केला होता. त्यामुळें हा लढाईचा उपक्रम आहे, असें मानण्यांत आलें, आणि इ. सन १८४५ च्या दिजंबर महिन्यांत या सैन्याचा ब्रिटिश सैन्याशीं मुकाबला झाला. इंग्लिशांच्या बाजूची तयारी अपूर्ण होती; त्यांनीं आपल्या शत्रुपक्षाचें सामर्थ्य आणि चापल्य यांची योग्य किंमत केली नव्हती; आणि अद्यापपावेतों हिंदुस्थानच्या सपाट मैदनावर सुगम रीतीनें जय मिळविणें हें इंग्लिशांच्या इतकें अंगवळणीं पडलें होतें कीं, त्यामुळें

ह्या वेळीं रणक्षेत्रावर शीख सैन्यानें आपल्या तटबंदीचा मोठ्या निकरानें केलेला बचाव आणि त्यांच्या तोफखान्यानें बजाविलेली परिणामकारक कामगिरी, ह्या गोष्टी पाहून ते अगदीं थक्क होऊन गेले. मुडकी येथें झालेल्या पहिल्या लढाईंत विजय मिळविण्याकरितां इंग्लिशांना अत्यंत कष्ट सोसावे लागले, आणि त्यानंतर तीनच दिवसांनीं फेरोजशहा येथील रणकंदनास सुरवात झाली. हिंदुस्थानांतील आंग्ल सैनिकांनीं इतकें निकराचें व तुमुळ युद्ध अद्यापपावेतों कधींही केलेलें नव्हतें; लढाईच्या सरते शेवटीं फक्त छावणीचीच जागाकाय ती इंग्लिशांच्या ताब्यांत राहिली, व आणीबाणीच्या प्रसंगाकरितां राखून ठेविलेलें शीख सैन्य घेऊन तेजसिंह चाल करून येत असल्यामुळें ब्रिटिश लोक भावी संकटाची वाट पहात राहिले; तथापि इंग्लिशांनीं या लढाईस मोठ्या धैर्यानें तोंड दिलें; तेजसिंह रणक्षेत्रामधून परत फिरला; त्यानंतर पुन्हां शीख सैन्याबरोबर ब्रिटिश सरकारच्या आणखी दोन लढाया (अलीवाल आणि सोब्रान येथें) झाल्या; आणि त्यांतही शीख सैन्य मोठ्या शौर्यानें व निकरानें लढलें. तथापि इंग्लिशांनीं त्यांना सतलज नदीच्या पलीकडे परत हांकलून दिलें, आणि रणांगणावर इतःपर तोंड देणें त्यांना नाइलाजानें सोडून द्यावें लागलें[1]. गव्हर्नर जनरल लार्ड हार्डिंज यानें वीस हजार सैन्यानिशीं इ. सन १८४६ च्या फेब्रुवारी महिन्यांत लाहोर आपल्या ताब्यांत घेतलें, रणजितसिंहाचा अज्ञान पुत्र धुलीपसिंह याची ब्रिटिश सरकारच्या देखरेखीखालीं गादीवर स्थापना केली, पंजाब सरकारचा कांहीं प्रदेश सक्तीनें आपल्या स्वाधीन करून घेतला, शीख सैन्याची संख्या कमी करण्यांत आली, व दोन वर्षेंपर्यंत पंजाबचा राज्यकारभार हिंदुस्थानसरकारच्या सर्वसाधारण देखरेखीखालील व संरक्षणाखालील संस्थान म्हणून चालविण्यांत आला.

१ फेरोजशहा येथील लढाई ता. २१ दिजंबर इ. सन १८४५; सोब्रानच्या लढाईनें ह्या मोहिमेचा शेवट झाला. ता. १० फेब्रुवारी इ. सन १८४६.

वर लिहिल्याप्रमाणें कोणत्याही एखाद्या एतद्देशीय सरकारचें राज्यकारभाररूपी यंत्र युरोपियन राष्ट्राच्या देखरेखीखालीं कांहीं काळपर्यंत ठेवावें, हा उपाय यशस्वी होतो खरा; पण तो यशस्वी होण्याला प्रभुत्व गाजविणाऱ्या राष्ट्राच्या अजिंक्य सत्तेची चोहोंकडे मूर्तिमंत जाणीव झालेली असली पाहिजे, आणि तिची सर्वत्र किंमतही कळलेली असली पाहिजे. कारण, ही पद्धत अल्पकाळ टिकणारी आहे; आणि चिरस्थायित्वाचें बेगडी प्रदर्शन तिला करतां येत नाहीं. शिवाय, या मिथ्याभासपद्धतींत सशस्त्र प्रतिकाराचे ज्वलत् घटकावयव दाबून टाकण्याकरितां अवश्य लागणारें जबरदस्त व यथातथ्य दडपण यांचा अभाव असतो. जरी शीख लोक हे संख्येनें पंजाबच्या एक षष्ठांशापेक्षां अधिक नव्हते, तरीही राज्यसंस्थापनेची भावना त्यांच्यांत उत्पन्न झाल्यामुळें ते एकत्र झालेले होते. ब्रिटिश सरकाराविरुद्ध "तोडीस तोड" असा आपण सामना दिला, याबद्दल शीख सैन्याला वाटणारा अभिमान न्यायदृष्टीनें पाहतां योग्य होता. या लढवय्या लोकांचा—स्वस्थपणें शेतकीचा धंदा करून पुन्हां स्थिरस्थावर व्हावें,—असा इरादा नव्हता; लाहोरच्या दरबारांत कारस्थानें आणि मत्सर यांचा सुळसुळाट झाला होता, व दूरच्या प्रदेशांत असंतोष माजण्यास अनेक कारणें एकवटलीं होती. इ. सन १७४८ च्या एप्रिल महिन्यांत मुलतान येथें दोन ब्रिटिश अंमलदारांचे झालेले खून ही बंडाळी माजण्याची पूर्व सूचना होती; आणि तीच—क्षात्रवृत्तीच्या जनसमूहांत जिकडे तिकडे खळबळ उडविण्यास, सर्व जुनें खालसा शीख सैन्य पुन्हां एकत्र जमा होण्यास, व ब्रिटिश सैन्याशीं आपलें सामर्थ्य अजमावून पाहण्याकरितां दुसरा प्रयत्न प्रादुर्भूत करण्यास,—कारणीभूत झाली होती. चिलियनवाला येथें (इ. सन १८४९ माहे जानेवारी) ब्रिटिश सेनानायकानें युद्धकौशल्य फारच थोडें दाखविलें, त्यामुळें विजय मिळण्यापूर्वींच इंग्लिशांनीं आपले २४०० लोक आणि अधिकारी गमविले; परंतु गुजराथ येथें (इ. सन १८४९ फेब्रुवारी) उभयतांमध्यें निकराची लढाई होऊन तींत शीख लोकांचा भयंकर पराजय

झाला, आणि सरते शेवटीं त्यांच्या सैन्याचा इतका विध्वंस उडाला कीं, ब्रिटिश सरकार त्या सर्व प्रदेशाचें निर्विवाद मालक ठरलें.

त्यानंतर कार्यकारणभावाच्या न्यायाला अनुसरून सर्व गोष्टी नैसर्गिक रीत्याच घडत गेल्या. संघट्टणानें चकमक उत्पन्न झाली, आणि चकमकीचा शेवट डळमळित व विस्कळित असलेल्या शीख राज्याचा नाश करण्यांत झाला. म्हणजे सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं शीख लोकांनीं मध्य आशियामधून होणाऱ्या स्वाऱ्यांपासून बचाव करण्याकरितां अत्यंत उपयोगी असा जो बुरुज ब्रिटिश सरकाराकरितां उत्तर हिंदुस्थानांत उभारला होता, तोच बुरुज इंग्लिशांना आपल्या स्वतःच्याच हातांनीं आतां अशा रीतीनें जमिनदोस्त करणें भाग पडलें. ब्रिटिश सरकारांनीं हा प्रदेश रिकामा सोडणें, आणि तो परराष्ट्रीय मुसलमानांच्या टोळधाडींना मोकळा करून देणें, ही गोष्ट अशक्य होती; आणि हिंदुस्थानचे दरवाजे आपल्या स्वतःच्याच ताब्यांत असावे, ही गोष्ट इंग्लिशांना अधिक महत्त्वाची वाटूं लागली होती; कारण, जरी आक्सस नदीकडे चाल करून जाण्याचा रशियाचा मार्ग बराच दूरवर होता, तरीही तो निश्चयात्मक रीतीनें ठरून चुकला होता, आणि शेवटल्या युद्धांत अफगाण लोक शीख लोकांचे साह्यकारी झाले होते. या कारणामुळें त्या वेळचा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल, लार्ड डलहौसी[१], यानें पोक्त विचार केल्यानंतर पंजाबांत संरक्षित असें एतद्देशीय राज्य पुन्हां निर्माण करण्याचा निष्फळ प्रयत्न करूं नये, असा निश्चय केला; व ही गोष्ट सुदैवानेंच घडून आली, असें म्हटलें पाहिजे; कारण, त्यानंतर आठ वर्षांनीं, म्हणजे जेव्हां ब्रिटिश सरकारच्या स्वतःच्याच एतद्देशीय सैन्यानें बंड केलें, तेव्हां जर सतलज नदीच्या पलीकडे एखादें मोठें स्वतंत्र राष्ट्र हयात असतें, तर शीख लोकांना अशी अमूल्य संधि प्राप्त झाली असती कीं, तिचा प्रतिकार करणेंही इंग्लिशांना दुरापास्त होऊन बसलें असतें. इ. सन

१. कारकीर्द इ. सन १८४८—१८५६.

१८४५ मध्यें, म्हणजे इंग्लिशांबरोबर शत्रुत्वाला प्रारंभ होण्यापूर्वी, शीख लोकांनीं त्यांच्या एतद्देशीय सैन्याची राजनिष्ठा ढळविण्याचे पुष्कळ प्रयत्न केले होते; आणि शीख सैन्य आपल्या सरकारला भयाभीत करीत आहे, व "आम्ही मागूं तो पगार द्या," असें दरडावीत आहे, ह्या देखाव्याचा ब्रिटिश सरकारच्या एतद्देशीय सैन्यावर कांहीं प्रमाणानें परिणाम झाल्याशिवाय राहिला नव्हता. गव्हर्नर जनरल लार्ड डलहौसी यानें इ. सन १८४९ मध्यें एक जाहिरनामा काढला, आणि त्या अन्वयें पंजाब प्रांत खालसा करून ब्रिटिश साम्राज्यास जोडण्यांत आला, व त्यामुळें त्यांच्या प्रदेशाची सरहद्द पूर्वेकडे सिंधूनदाच्या बाजूनें थेट अफगाण पर्वतांच्या पायथ्यापर्यंत जाऊन धडकली. हिंदुस्थानांतील एतद्देशीय सत्ताधारी आणि इंग्लिश सत्ता यांच्यामध्यें पुष्कळ दिवस लागून राहिलेली चुरस ह्या वेळेपासून कायमची नाहींशी झाली, आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या अटोक्याबाहेर राहिलेलें शेवटचें राज्य त्यांनीं आपल्या साम्राज्यांत सामील करून टाकलें.

या कारणामुळें, अशा रीतीनें आणि प्रनिनिधिसभेच्या द्वारें व्यक्त झालेल्या ब्रिटिश राष्ट्राच्या पूर्ण अनुमतीनें, हिंदुस्थानच्या एका पाठीमागून एक आलेल्या गव्हर्नर जनरलांनीं एकूणिसाव्या शतकांत अवश्यक तेवढीच प्रगति करून ब्रिटिश साम्राज्याची परिपूर्णता घडवून आणली; म्हणजे लार्ड क्लाइव्ह यानें केलेलें भविष्य खरें केलें, आणि त्यानें वर्तविलेलें अशुभ खोटें ठरविलें. ब्रिटिश सरकारच्या सर्वव्यापक वर्चस्वाला पुष्कळ दिवसांपासून प्रतिकार होत होता; परंतु शीख लोकांबरोबर झालेल्या रक्तपाताच्या, पण निर्णयात्मक, लढाईनें त्याचा कळस आणि शेवट झाला. इतःपर आशिया खंडांतील राष्ट्रांवर झालेल्या ब्रिटिश सरकारच्या सर्व मोहिमी हिंदुस्थानच्या आसमंतात आणि बाह्य प्रदेशींच असत; कारण, सागरापासून तों तहत पर्वतांपर्यंत पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्यास अत्यंत वैभवसंपन्न राष्ट्र बनविल्यामुळें त्याच्या दीर्घ कक्षेंत असलेल्या आसपासच्या सर्व

राज्यांत खळबळ उडाली होती, आणि त्या योगानें आशिया खंडांतील राज्यपद्धतिरूपी ग्रहमालेवर बराचसा परिणाम घडून आला होता.

परिच्छेद पांचवा—खालील ब्रह्मदेश.

लार्ड डलहौसी यानें पंजाब प्रांत खालसा करून पेशावर येथें ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा झेंडा रोंविला न रोंविला, तोंच ब्रह्मी राज्याबरोबरील भांडण उपस्थित झालें, व त्यामुळें हिंदुस्थानच्या आग्नेय दिशेकडील बराच महत्त्वाचा प्रदेश ब्रिटिश राष्ट्रास जोडला गेला. चिनी सरकार हें परराष्ट्राबरोबरील व्यवहारांत जितकें दूरदर्शी आणि कांहीं अंशीं नेमस्त आहे, तितकेंच ब्रह्मी सरकार हें नेहमीं अविचारी आणि हेकड होतें; ब्रिटिश प्रजाजनांशीं त्यांच्या अधिकाऱ्यांनीं अपायकारक वर्तन केलें, आणि त्याबद्दल माफी मागण्याचें अगर पुढें तसा त्रास न होऊं देण्याबद्दल हमी घेण्याचेंही त्या सरकारनें नाकारलें. तथापि इ. सन १८२६ च्या ब्रह्मी युद्धानें तेथील राज्यकर्त्यापेक्षां कमी बुद्धीच्या राज्यकर्त्याचीही अशी खात्री झाली असती कीं, बंगालच्या उपसागरावरील एका बलाढ्य सागरी सत्ताधीशाच्या, म्हणजे ब्रिटिश सरकारच्याच, केवळ मेहेरबानीवर आपण अवलंबून आहोंत; कारण, त्यांना आपला सर्व समुद्र किनारा वाटेल तेव्हां व्यापितां येईल, आपले बाहेर निघण्याचे एकटेच असलेले मार्ग बंद करतां येतील, आणि आपल्या इरावती नदीपर्यंतच्या थेट अंत:प्रदेशांत त्यांना आपला प्रवेशही करून घेतां येईल. आणि वास्तविक दृष्ट्या गव्हर्नर जनरल याला हे वर लिहिलेलेच उपाय अमलांत आणणें भाग पडलें. त्यानंतर याचा परिणाम हा झाला कीं, ब्रह्मी लोकांनीं जिंकलेल्या एका जातीची वस्ती असलेला पेगू हा प्रांत ब्रिटिश साम्राज्य सरकारच्या सहजासहजींच अमलाखालीं आला; ब्रह्मी सैन्याचा पराजय करून त्यांना तेथून हांकलून देण्यांत आलें; व तो प्रांत इंग्लिशांनीं आपल्याच ताब्याखालीं ठेविला. ह्या जयानें बंगालच्या उपसागराच्या पूर्व किनाऱ्याच्या बाजूचा सर्व सलग प्रदेश ब्रिटिश साम्राज्यसत्तेखालीं आला, आणि त्यामुळें

जी स्थिति प्रत्येक ठिकाणीं राज्यविस्ताराला विशेषतः उपयोगी असते, असें आढळून आलें आहे, तशा प्रकारच्या स्थितींत ब्रिटिश सरकार पुनः एकदां येऊन पडलें. आशियांत अगर आफ्रिकेंत एखाद्या मोठ्या नदीच्या प्रवाहाजवळील सपाट आणि सुपीक अशा दोन मुखांमधील प्रदेशाचा ताबा हा कोणत्याही समुद्रसत्ताक राष्ट्राला समुद्ररूपी पायावर अंतःप्रदेशांत बिनधोकपणें वस्ती करण्यास, व्यापाराच्या मोठ्या धमनीवर आपलें नियंत्रण ठेवण्यास, आणि अंतःप्रदेशांत जाण्याला सोपा जलमार्गही मिळवून देण्यास, कारणीभूत होतो. ह्या उपरिनिर्दिष्ट फायद्यामुळें आणि अशा प्रदेशांतील जनसमाज बहुधा उद्योगी, परंतु रणविमुख, असल्यामुळें एखादें धाडसी आगंतुक राष्ट्र कालक्रमानेंच नदीच्या उगमाकडे आपला मोर्चा फिरवितें, आणि या सर्वसाधारण नियमास "ब्रह्मदेशांतील इंग्लिशांची प्रगति" हीही वास्तविक पाहतां अपवादकारक नव्हती. कलकत्ता येथील गंगा नदीच्या खाडीवरील ब्रिटिश वसाहत ज्याप्रमाणें बंगालच्या दिग्विजयास कारणीभूत झाली, सिंधू नदाजवळील कराची बंदराचा ताबा इंग्लिशांना मिळाल्यानें जसा सिंध प्रांत पुढें त्यांच्या हस्तगत झाला, आणि कायरो येथील ब्रिटिश सरकारच्या परिस्थितीमुळें वरील ईजिप्तमध्यें त्यांना जशी सरहद्दीची अवश्यकता भासली,—त्याचप्रमाणें इरावती नदीच्या मुखाजवळील रंगून येथें इंग्लिश सरकारांनीं आपल्या नव्या राजधानीची स्थापना करणें, ही गोष्ट थेट त्या नदीच्या वरील बाजूनें कूच करून मंडाले येथें जाण्याची पहिली पायरी झाली[१].

परिच्छेद सहावा—हिंदुस्थानांतील खालसा केलेलीं राज्यें. शिपायांचें बंड.

लार्ड डलहौसी यानें, हिंदुस्थानच्या राष्ट्राच्या पूर्ण परस्परविरुद्ध असलेल्या सरहद्दीवरील दोन प्रांत जिंकून मिळविल्यानंतर, हिंदुस्थानांतील

१ पेगू प्रांत खालसा केल्याचें ता. २० दिजंबर सन १८५२ रोजीं जाहीर करण्यांत आलें.

अंत:प्रदेशाकडे आपलें लक्ष वळविलें. इ. सन १८१८ मध्यें–ह्मणजे जेव्हां मराठयांच्या पेशव्यांची सत्ता नष्ट करण्यांत आली, तेव्हां–शिवाजीचा वंशज असलेल्या मराठयांच्या नामधारी राजास त्याच्या राजकीय कैदेंतून मुक्त करण्यांत आलें होतें. व लार्ड हेस्टिंग्स यानें त्याला सातारा येथील राज्याचें आधिपत्यही दिलें होतें. परंतु त्याच्यामागून गादीवर आलेल्या राज्यकर्त्यास औरस पुत्रसंतति नसल्यामुळें इ. सन १८४८ मध्यें त्याच्या मृत्यूनंतर लार्ड डलहौसी यानें दत्तक घेण्यास मंजुरी देण्याचें नाकारलें. त्यानें असें तत्त्व आंखून टाकलें होतें कीं, " औरस वारसदाराच्या अभावामुळें जीं मांडलिक संस्थानें ब्रिटिश सार्वभौम सरकारास स्पष्ट आणि नि:संशय रीतीनें मिळालेलीं आहेत, त्या संस्थानांचा ताबा घेण्यास, कर्तव्य आणि राजनीति ह्या दोन्हीही गोष्टींचा विचार करतां, उलट पक्षीं कांहीं भरभक्कम कारण नसेल तर, तें सरकार बांधलें गेलेलें आहे. " ह्या तत्त्वाप्रमाणें इ. सन १८४८ मध्यें साताराचें राज्य खालसा करण्यांत आलें; झांशी संस्थानचाही इ सन १८५३ मध्यें तसाच निकाल लावण्यांत आला; आणि इ. सन १८५४ मध्यें नागपूर खालसा करण्याची वेळ आली, तेव्हां लार्ड डलहौसी यानें मोठ्या कळकळीनें असें प्रसिद्ध केलें कीं, "ब्रिटिश सत्तेखालीं तेथील प्रजाजनांस कायमचें आणण्यानें त्यांची भरभराट आणि सुखवृद्धि यांत भर पडेल, अशी माझी खात्री झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही फायद्याकडे लक्ष देऊन मला ही योजना अमलांत आणण्याची प्रवृत्ति होणार नाहीं." हिंदुस्थानांतील कोणतेंही संस्थान ब्रिटिश सार्वभौम सत्तेची मंजुरी आणि बहाली मिळाल्याशिवाय दत्तक वारशाकडे जाऊं शकत नाहीं, ही दीर्घकालीन वहिवाट व परंपरा असून यावर उभारलेल्या राजकीय धोरणाच्या सर्वमान्य तत्त्वाबद्दल कोणालाही तिळमात्र सुद्धां संशय नव्हता; आणि दत्तक वारसाच्या हातीं संस्थान जाऊं नये, असें खुद्द लार्ड डलहौसी याचें सुद्धां म्हणणें नव्हतें; परंतु जीं संस्थानें ब्रिटिश सरकारानेंच वस्तुत: उत्पन्न केलीं आहेत, अगर ज्या संस्थानांचा

पूर्व स्थितिवरून ब्रिटिश सरकारशीं मांडलिक अगर आश्रित संस्थानें ह्मणून संबंध आहे, त्या संस्थानांना "राजकीय धोरण" याच मुद्दयावर दत्तकाची मंजुरी देणें नाकारण्याचा आपणाला हक्क आहे, असें त्याचें म्हणणें असून त्यानें तो विशेष अधिकार तशा रीतीनें बजाविलाही होता. त्यामुळें त्यानें दत्तक घेण्याला रुकार देण्याचें नाकारलें, तर तें संस्थान खालसा होऊन ब्रिटिश साम्राज्यांत सामील केलें जात असे. शिवाय, राजकीय सुमृत्यूच्या ह्या प्रकाराहून एतद्देशीय राजघराण्याच्या प्रजेला दुसरी कोणतीही गोष्ट अधिक सुदैवाची वाटणें शक्य नाहीं, असें त्यास वाटत असे. तथापि त्यानंतर लार्ड क्यानिंग ह्या गव्हर्नर जनरलच्या कारकीर्दींत औरस संततीच्या अभावीं आपापला धर्म, जात अगर घराणें, यांतील निर्बंध अगर चालीरीति यांना अनुसरून जोंपर्यंत एतद्देशीय राज्यकर्ते ब्रिटिश सरकारच्या सार्वभौम सत्तेशीं राजनिष्ठपणें वागत आहेत, आणि त्यांच्याशीं केलेले करारमदार इमानें इतबारें पाळीत आहेत, तोंपर्यंत त्यांना दत्तक घेण्याचा हक्क असल्याचें कायदेशीर रीत्या मान्य करण्यांत आलें असून त्यामुळें लार्ड डलहौसी याचें हें राज्यें खालसा करण्याचें तत्त्व व्यवहारदृष्ट्या पूर्णपणें रद्द करण्यांत आलें, ह्या गोष्टीचाही या ठिकाणीं उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं. वर निर्दिष्ट केलेल्या ह्या राणी सरकारच्या जाहिरनाम्यामुळें एतद्देशीय राज्यकर्त्यांमध्यें पुनः कोणत्या मर्यादेपर्यंत विश्वास उत्पन्न झाला, हें पुत्रसंतानरहित राज्यकर्ता आपल्या हयातींत फारच क्वचित् दत्तक घेतो, ह्या आश्चर्यकारक गोष्टीवरूनच व्यक्त होत आहे. आपणच मागाहून गादीवर बसणार, हें ज्याला माहीत आहे, आणि जो आपलें गादीवर बसणें लांबलें तर कदाचित् उतावळा होण्याचाही संभव आहे, असा भावी वारस कांहीं गूढ कारणांकरितां कित्येक राजनीतिज्ञ संस्थानिकांकडून पसंत केला जात नाहीं; ह्या कारणामुळें भावी वारसाची निवडणूक करण्याचें कर्तव्य नेहमीं त्या राज्यकर्त्यांच्या विधवा स्त्रियांकडेसच सोंपविलें जातें; कारण, त्यांना आपल्या

पतींचें मानस माहित असतें, आणि तो दीर्घायू व्हावा, अशी इच्छा करण्यास त्यांना बलवत्तर कारणें असतात.

पंजाब आणि पेगू हे प्रांत दिग्विजयानें मिळविले होते; सातारा, झांसी, आणि नागपूर हीं संस्थानें औरस पुत्रसंततीच्या अभावीं खालसा केल्यामुळें हातीं आलीं होतीं; व असह्य अव्यवस्थित राज्यकारभाराच्या मुद्दयावर जर एखाद्या मोठ्या राज्याच्या एतद्देशीय राज्यकर्त्याला गादीवरून काढून टाकण्यांत आलें असेल, तर तें म्हणजे फक्त औध येथील वजिरालाच होय. ह्या शतकाच्या प्रारंभीं औधच्या वजिरानें लार्ड वेलस्ली याच्यावरोबर तह केला होता, व त्या अन्वयें आपल्या प्रजेच्या उत्कर्षास उपयुक्त होईल असा राज्यकारभार चालविण्याचें धोरण स्वीकारण्याबद्दल त्यानें आपणास बांधून घेतलें होतें; शिवाय, वजिरानें नेहमीं कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा, व त्यांच्या सल्ल्यासच अनुसरून नेहमीं वागत असावें, असें ठरलें होतें. परंतु हीं अभिवचनें इतक्या पूर्णपणें आणि सतत अवमानण्यांत आलीं कीं, सर्व औधच्या राज्यांत एकसारखी अंदाधुंदी वाढत चालली होती, आणि शेवटीं तर भयंकर अव्यवस्था, धामधुम व बंडाळी माजून अतिशय जुलमामुळें प्रजा अगदीं त्रस्त होऊन गेली होती. म्हणजे वास्तविक रीत्या अयोग्य राजकर्त्यांची परंपरा गादीवर बसली, तरी त्या राज्याच्या सभोंवतीं असलेल्या ब्रिटिश राज्याचा बाह्य दाब आणि राजधानींत तैनाती फौजेचें असलेलें अस्तित्व, ह्यांमुळेंच तें राज्य निव्वळ कृत्रिम रीतीनें तग धरून राहिलेलें होतें. गव्हर्नर जनरल यानें औधच्या सरकारला वेळोवेळीं पाठविलेल्या कायदेशीर आणि धमकीच्या सूचनांचा,—ज्याप्रमाणें एखाद्या दुबळ्या मनाच्या, अगर स्वतःचा फायदा करून घेण्याकडे प्रवृत्ति नसलेल्या दूधखुळ्या स्वभावाच्या, मनुष्यावर अशा प्रकारच्या सूचनांचा परिणाम होत नाहीं, त्याप्रमाणें—त्या सरकारावरही कांहीं इतकासुद्धां झाला नाहीं. अशाच रीतीचा राज्यकारभार पुढें चालू ठेवण्याला त्या प्रदेशांत स्थायिक ठेविलेल्या ब्रिटिश सैन्याची मदत तशीच

पुढें चालू ठेवणें ही गोष्ट अशक्य होती; उलट पक्षीं, ब्रिटिश सरकारांनीं आपलें सैन्य परत नेणें आणि सर्व जबाबदारी अंगाबाहेर टाकणें, ही गोष्ट ही झोटिंग पातशाही चालू ठेवण्यास मोकळीक देण्यासारखी होती. शिवाय राज्यकर्त्या वाजिराचे अधिकार तात्पुरते काढून घेण्याचा सुचविलेला एक उपाय, धोक्याचा व अर्धवट म्हणून, नामंजूर करण्यांत आला होता; त्यामुळें इंग्लंडच्या राणीसरकारनें औधचा राज्यकारभार आपल्या हातीं घेण्याचा आणि त्या सर्व प्रदेशाचें स्वामित्व ईस्ट इंडिया कंपनीस देण्याचा निश्चय केला होता. त्यानंतर इ. सन १८५६ च्या फेब्रुवारी महिन्यांत "औधचें राज्य खालसा करून ब्रिटिश साम्राज्यांत सामिल केलें आहे," ही गोष्ट जाहिरनामा काढून प्रसिद्ध करण्यांत आली, आणि तो महिना संपण्याच्या पूर्वींच लार्ड डलहौसी यानें गव्हर्नर जनरल या नात्याचीं अधिकारसूत्रें लार्ड क्यानिंग याच्या हवालीं केलीं.

ह्या वेळीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्यरूपी तारा शांतता, सत्ता आणि सुबत्ता, यांच्या नभोमंडळांत अत्यंत दैदिप्यमान दिसूं लागला होता; कारण, त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या प्रदेशांत बरीच भर पडली होती; त्यांच्या राज्याची मर्यादा वायव्येस सिंधूनदापलीकडे आणि ईशान्येस इरावती नदीपलीकडे जाऊन भिडली होती; व ह्या सर्व विस्तृत साम्राज्यभर सुनीति आणि सुव्यवस्था यांचा जयजयकार सुरू झाला होता. परंतु बरेच दिवस चालणारी लढाई बंद पडली, म्हणजे त्याचा नैसर्गिक परिणाम असा होतो कीं, शांतताभंगाचीं चमत्कारिक लक्षणें,—म्हणजे ज्यांला शेक्सपियर जगाच्या शांततेला लागलेली कीड असें म्हणतो, तीं—दृग्गोचर होऊं लागतात; व या नियमाला हल्लीं आशिया खंडही (पूर्वकालीन युरोप खंडाप्रमाणेंच) अपवाद नाहीं. कारण, अशा वेळीं सर्व धुमाकूळ नाहींसा होऊन जिकडे तिकडे शांतता नांदूं लागते; पण त्याबरोबरच भाडोत्री आणि शिरजोर सैन्यें मात्र निरुद्योगी व अस्वस्थ बनत जातात. इ. सन १८३८ ते १८४८ पर्यंत लढाया राहून राहून चालूच असत; परंतु त्यांची नेहमीं पुनरावृत्ति

होत असे. अफगाणिस्थानचे अफगाणी, सिंधचे बलुची, ग्वाल्हेरचे बंडवाले मराठे, आणि पंजाबचे शीख, यांचेबरोबर हिंदुस्थानांतील एतद्देशीय सैन्य रणक्षेत्रांत सामन्याला उभें राहिलें होतें; इ. सन १८५२ मध्यें ब्रह्मदेशावरील दुसऱ्या मोहिमेमध्येंही त्या सैन्यानें भाग घेतला होता; आणि इ. सन १८४१—४२ ह्या वर्षी अत्यंत घोर संकटांत काबूलहून ब्रिटिश सरकारचें सैन्य मागें परत फिरत असतां त्यांचें एक सबंद पथकच्या पथक रस्त्यांत गारद झालें. हा एकटाच प्रसंग खेरीजकरून हिंदुस्थानांतील ब्रिटिश सैन्याला जिकडे तिकडे नेहमीं विजयश्रीनें माळ घातलेली होती. परंतु पूर्वकालीन तुर्की पायदळ सैन्यांतील "ज्यानिझरी" नांवाच्या लढवय्या शिपायांच्या सैन्याप्रमाणें, अथवा ईजिप्तमधील प्राचीन काळच्या "मामेलुक" नांवाच्या चपळ घोडेस्वारांच्या सैन्याप्रमाणें, आशियांतील त्या तोडीचें विजयी सैन्यही स्थायिक होतें न होतें, तोंच नेहमीं बहुतेक शिरजोर बनत असतें. त्यामुळें बंगालच्या ब्रिटिश सैन्यांतील शिपायांची तर अशीच कल्पना झाली होती कीं, सर्व हिंदुस्थान आतां आपल्या पायापाशीं लोळत आहे. ह्या सैन्यांत अयोध्या प्रांतांतील उच्चवर्णीय लोकांचा विशेष भरणा झालेला होता, आणि इ. सन १८५६ मध्यें इंग्लिशांनीं औधचें राज्य खालसा केल्यानें तर त्यांचा स्वाभिमान विशेषच जागृत झालेला होता, व त्यांच्या हितसंबंधांवरही त्याचा बराचसा परिणाम झालेला होता. या कारणामुळें जेव्हां चरबी लाविलेल्या काडतुसांमुळें ते जात्यभिमानानें अंध झाले, तेव्हां एखाद्या रानटी जनावराप्रमाणें ते आपल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांवरच तुटून पडले, व त्यांनीं पुष्कळ रक्तपात करण्यास सुरवात करून ब्रिटिश सरकाराविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें.

इ. सन १८५७ सालीं धर्मवेडामुळें प्रादुर्भूत झालेली भयंकर बंडाळी मोडून टाकीत असतांना, हिंदुस्थानांत एके काळीं प्रचंड व प्रसिद्ध म्हणून दुमदुमत असलेल्या व्यक्तींचीं व विभूतींचीं सांप्रत निव्वळ

छायारूप असलेलीं आणि त्यांत या वेळीं तिळमात्रही त्राण नसलेलीं शेवटचीं चित्रें ब्रिटिश सरकाराला नामशेष करणें भाग पडलें. मोंगल साम्राटाचें छायाचित्र आणि त्याचा दरबार हीं या वेळेपासून दिल्लींतून अंतर्धान पावलीं; मराठा-पेशवाईचा मानमरातब बळकावूं पाहणारा शेवटचा तोतया कानपूरमधून अदृश्य झाला; हिंदुस्थानांतील कंपनी सरकारच्या ताब्यांतील सर्व प्रदेशाचा प्रत्यक्ष राज्यकारभार इ. सन १८५८ सालीं " मलिका माअझमा इंग्लिस्थान " हिचे हातांत गेला; आणि सर्व साम्राज्यभर वस्तुस्थितीला अनुसरून ब्रिटिश साम्राज्य सरकारचें वर्चस्व, मतभिन्नता व रुचिवैचित्र्य यांचा कांहीं एक अडथळा न येतां, अबाधित रीतीनें प्रस्थापित झालें. राष्ट्रजीविताला प्राप्त झालेल्या सांप्रतच्या स्वरूपाचा प्रारंभ करण्याकरितां व ब्रिटिश लोकांनीं स्थापिलेलें हिंदी साम्राज्य पूर्णपणें लोकविख्यात होण्याकरितां राजघराण्यांकडून वंशपरंपरा होणारा विरोध अगर आपसांत चाललेली चुरस यांचें हें शेवटलें डळमळीत निशाण कोसळून पडलें, हें सुचिन्हच होय, असें ह्मटलें पाहिजे. कारण, पक्षापक्षांचीं राजधोरणासंबंधींचीं मतें, महत्त्वाकांक्षा व मुख्य ध्येयें, हीं जरी भिन्न भिन्न असलीं, तरीही आंग्ल-साम्राटाशीं राजनिष्ठ असलें पाहिजे, हें तत्त्व मात्र सर्वमान्य ह्मणून खास ठरून चुकलेलें आहे.

भाग अठरावा.

आशिया खंडांतील ब्रिटिश साम्राज्य.

या कारणामुळें जरी सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार हल्लींच्या काळीं प्रत्यक्ष इंग्लिशांच्या ताब्यांत आहे, किंवा दोस्त संस्थानिक अगर सख्यत्वानें वागणारे राजेरजवाडे यांच्या हातीं आहे, तरी देखील महाराणी सरकार आपल्या छत्राखालीं एकत्र झालेल्या सर्व साम्राज्यावर देखरेख करीत असते. इ. सन १८८६ सालीं ब्रह्मदेश राणीसरकारच्या साम्राज्यसत्तेखालीं आल्यानें इरावती आणि सालवीन ह्या नद्यांच्या लगतचा अफाट प्रदेश तिच्या साम्राज्यांत सामील झाला, व त्यामुळें ब्रिटिश-हिंदी साम्राज्याच्या समांतर एक इंडोचिनी राज्य निर्माण झालें. हा अफाट प्रदेश कित्येक ठिकाणीं उत्तर मेक्यांग उर्फ कांबोडिया नदीच्या पश्चिम तीरास लागलेला असून हीच नदी फ्रेंचांनीं आग्नेय दिशेकडून उत्तर दिशेकडे केलेल्या प्रगमनाची सांप्रतची सीमा आहे.

तथापि ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारची राजकीय दृष्ट्या संरक्षित प्रांताची स्थलसीमा, आणि त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या प्रदेशाची मर्यादा, ह्या कधींही समसमान नव्हत्या; आणि कांहीं म्हटलें, तरी ह्या शतकाच्या प्रारंभापासून ब्रिटिश साम्राज्याची घटना अंशतः प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेश आणि संरक्षणाखालील प्रदेश अगर साम्राटाच्या आधिपत्याखालील संस्थानें मिळूनच झालेली आहे. अशा तऱ्हेनें संकलित घटना झाल्यामुळें साम्राज्याची स्थिति

१ ह्या भागाच्या शेवटीं दिलेली टीप पहा.

आणि गुणधर्म यांची अलीकडे फार विस्तृत व महत्त्वाची वाढ होत चालली आहे. परंतु हें विलक्षण स्थित्यंतर संरक्षित राज्यपद्धतीची संगतवार अंमलबजावणी केल्यामुळेंच घडून आलेलें आहे; त्यामुळें तिचा पूर्वेतिहास व परिणाम यांची माहिती दिली असतां त्यावरून हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य हें या विस्तारपद्धतीनें आशिया खंडांतील प्रमुख राष्ट्र कसें बनलें, हें सहज समजून येईल.

पराक्रमी दिग्विजयी मंडळ आणि व्यापारप्रिय मंडळ्या यांनीं संरक्षित राज्यें निर्माण करण्याच्या पद्धतीच्या नांवाखालीं स्वैर संचार करण्याला एक साधन म्हणून ही पद्धत अनादि काळापासून प्रचारांत आणली आहे, आणि मोठमोठ्या राष्ट्रांची लहानसहान राज्यांवर केंद्रीभूत झालेली आकर्षणशक्तिही त्यांनींच नियमित केलेली आहे. ही पद्धत रोमन लोकांत बरीच प्रचलित होती, व त्यांचे आशिया आणि आफ्रिका या खंडांशीं असलेले प्रथमचे संबंधही ब्रिटिश लोकांसारखेच होते[1]. उभयतांचे हेतु निरनिराळे,—कधीं कधीं राजकीय, कांहीं वेळां लष्करी, व कित्येक प्रसंगीं व्यापारविषयक,—परंतु त्यांचे परिणाम मात्र सतत एकसारखेच झालेले आहेत. विवक्षित प्रदेशावर आपलें स्वामित्व पूर्णपणें आहे, असें निश्चित रीतीनें न सांगतां बहुविध अधिकारमर्यादा वाढविण्याकरितां, व सार्वभौमत्वाचे विशिष्ट अधिकार गट्ट करण्याकरितां, एक अनुकूल असें साधन म्हणून, ह्या सोइस्कर पद्धतीचा राजकीय दृष्ट्या उपयोग करण्यांत येतो; आणि दुसऱ्यास मागें सारून आपलें वर्चस्व स्थापन करण्याकरितां, अगर शास्त्रशुद्ध मर्यादारेषा किंवा संरक्षणाच्या दृष्टीनें व व्यूहरचनेच्या नजरेनें अत्यंत महत्त्वाचा मध्यवर्ती प्रदेश मिळविण्याकरितां, एखादें बलाढ्य

---

१ रोमन साम्राज्य सरकारचें प्रधान तत्त्व हें होतें कीं, आपल्या सरहद्दीवरील कोणत्याही सत्तेचे समान हक्क केव्हांही मान्य करावयाचे नाहींत.

माम्सेन, *Provinces of the Roman Empire*, ह्या पुस्तकाचा भाग दुसरा, पान ५१ पहा.

राष्ट्र ह्या विशिष्ट कृतीचा उपयोग करीत असतें. शिवाय, जेव्हां एक राष्ट्र दुसऱ्या धाडशी प्रतिस्पर्धी राष्ट्राला मागें सारून अघाडी मारण्याची इच्छा करतें, तेव्हां दळणवळणाचे मार्ग, कोळसा पुरविण्याचीं स्थानें, अथवा व्यापारी ठाणीं, हीं आपल्या ताब्यांत आणण्याकडे तिचा उपयोग केला जातो. वर लिहिल्याप्रमाणें, ही पद्धत निरनिराळ्या प्रकारानें उपयोगांत आणली जात असल्यामुळेंच ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्राची सर्व जगांतील जादा-राष्ट्रीय जबाबदारी वाढत आहे, व त्यांच्या सरहद्दींचीही झपाट्यानें वाढ होत आहे.

ह्या वेळेपासून, आशिया खंडांतील प्रमुख प्रदेशावरील ब्रिटिश सरकारच्या संरक्षक राज्यपद्धतीचा उगम व विस्तार यांची स्पष्टपणें व बहुतेक एकसारखी वाढ होत गेलेली आहे. ज्याप्रमाणें एखाद्या किल्ल्याला अथवा खंदकाच्या ओळीला समोर अगर आसपास मोकळी जागा असणें अवश्यमेव आहे, त्याचप्रमाणें सरहद्दीच्या जवळ असलेल्या प्रदेशांत शांतता राखण्यासाठीं त्या लगतच्या परमुलुखाला बलाढ्य शेजाऱ्याच्या उपसर्गापासून व धक्क्यापासून अलग ठेवणें अगत्याचें आहे. पुंड व लुटारू लोकांसारखी एखादी फक्त त्रासदायक असलेली जात, अगर कित्येक प्रसंगीं वैरभावानें वागणारीं लहान लहान संस्थानें, हीं जर विशेष धोका पोंचेल इतकीं बलिष्ठ नसलीं, तर तीं शेजाराला असल्यास फारसा प्रत्यवाय नाहीं; तथापि अत्यंत सुधारलेलें, परंतु सारख्या शक्तीचें व प्रचंड युद्ध सामग्रीनें युक्त असें, एखादें राष्ट्र शेजाराला असण्यापेक्षां अत्यंत उच्छृंखल असलेले रानटी लोक शेजाराला असणें हें सर्व बाजूंनीं विचार केला असतां अधिक चांगलें आहे कीं काय, ह्याबद्दल अजूनही शंकाच आहे. स्वैर वृत्तीनें राहणाऱ्या जाती अथवा लहान लहान अनियंत्रित सत्ताधारी, यांच्याविषयीं पाहूं गेलें असतां, असें आढळून येतें कीं, त्यांच्यापासून सर्वसाधारण सरहद्दीवरील शांततेला जरी हानि पोहोंचण्याचा संभव असला, तरीही हळूहळू त्यांचे ठिकाणीं शांत वृत्ति आणतां येईल,

आणि त्यांना आपल्या बारीक नजरेखालींही ठेवितां येईल; परंतु सुधारलेल्या राष्ट्राविषयीं पाहूं गेलें असतां, असें आढळून येतें कीं, त्याची सरहद्द सुनिश्चित असून त्याच्या दोन्हीही बाजूंस उत्तम बंदोबस्तही ठेविलेला असतो, ही गोष्ट निःसंशय आहे; इतकेंच नाहीं, पण ती सरहद्दही अशाच प्रकारची बनते कीं, तिजवर डोळ्यांत तेल घालून टेहळणी करीत राहणें जरूरीचें असतें. आणि ज्या तंतोतंत सीमेनें संलग्न प्रदेश परस्परविभक्त झालेला असतो, त्या रेषेपलीकडील सर्व राजकार्यविषयक व लष्करी हालचालींवर नजर ठेवावी लागून शिवाय त्या सरहद्दीवरही मजबुत तटबंदी व लढाईस सज्ज असलेलें सैन्य ठेवण्याची नेहमीं अवश्यकता असते.

ब्रिटिश लोक हे वंशपरंपरा पाण्यानें वेष्टित असलेल्या प्रदेशांत रहात असल्यामुळें, जी सरहद्द म्हणजे एक निव्वळ भूगोलविषयक रेषा असून जी प्रत्येक मनुष्यास सहज ओलांडितांही येते, त्या सरहद्दीविषयीं सामान्यपणें उत्पन्न होणारा अविश्वास व भीति यांनीं ते आशियामध्यें नेहमीं अतिशय व्याप्त असतात; कारण, बहुतकरून जिब्राल्टरशिवाय युरोपमध्यें अशा प्रकारची सरहद्द त्यांना मुळींच नाहीं; त्यामुळें स्वाभाविक रीत्याच आशियांतील कोणत्याही बलिष्ठ प्रतिस्पर्ध्याबरोबर निकट सान्निध्य करण्यास ते नेहमीं नाखूष असतात. ह्याच तत्त्वावर ज्यांचा प्रदेश ब्रिटिश साम्राज्याच्या प्रत्यक्ष सरहद्दीस सारखा भिडलेला आहे, अशीं एतद्देशीय राज्यें, अगर लहान लहान संस्थानिक, किंवा रानटी जाती, यांना, त्यांच्या इच्छेनें अगर त्यांच्या इच्छेविरुद्ध, संरक्षक पद्धतीनें आपल्या आटोक्यांत आणावें, हें हिंदुस्थान सरकारचें पुष्कळ दिवसांपासून धोरण ठरलेलें असून परस्परांमध्यें असा करार ठरलेला असतो कीं, " इंग्लंडशिवाय इतर कोणत्याही परकीय सत्तेबरोबर आपण दळणवळण ठेवणार नाहीं, व ह्या अटीवर ब्रिटिश सरकारानें परकीय जुलमापासून त्यांचें संरक्षण करण्याची हमी घेतली आहे. " अशा रीतीनें इंग्लिश लोक हे कोठें विस्तृत तर कोठें संकुचित भूप्रदेशानें आवृत असल्यामुळें, त्या प्रदेशांत प्रतिस्पर्धी

सत्तेपासून कांहींही उपसर्ग होऊं नये म्हणून, तेथें केवळ राज्यकारस्थाना-साठींच ते आपल्या नांवाची द्वाही फिरवितात; कारण, ती प्रतिस्पर्धी सत्ता पुढें मागें भयंकर होण्याचा पुष्कळच संभव असतो; अशा रीतीनें ब्रिटिश सरकारचें राजकीय वर्चस्व त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेशाच्या हद्दी-बाहेरही प्रकाशित झालेलें असून त्याचें जाळें सर्व आसमंतांतील प्रदेशा-वर अनिर्बंधपणें पसरलेलें आहे. ब्रिटिश सरकारची आशियांतील खरी सरहद्द ह्मटली, ह्मणजे जिचें कमी अधिक प्रमाणानें संरक्षण करण्याविषयीं त्यांनीं आपणास बद्ध करून घेतलें आहे, आणि जिचें उल्लंघन करणारास त्यांनीं त्या सरहद्दीच्या बाहेरही घालवून दिलेलें आहे, ती असून ही सरहद्द ज्या ठिकाणीं सर्व लोक ब्रिटिश प्रजाजनच आहेत, व ज्यांच्याकरितां त्या ठिकाणीं ते कायदेकानू करितात, त्या बाह्य व व्यापक प्रदेशापासून अगदींच भिन्न आहे, आणि हाच मुद्दा ह्या ठिकाणीं स्पष्टपणें पुढें मांडावयाचा आहे. ब्रिटिश साम्राज्य सरकारच्या खऱ्या सरहद्दीमध्यें फक्त ह्याच प्रदेशा-चा समावेश होतो, असें नाहीं, तर ज्या मोठमोठ्या प्रदेशांवर कालपरत्वें व कालमानाप्रमाणें निरनिराळ्या उच्च नीच प्रकारची संरक्षक पद्धति ग्रेट ब्रिटननें स्थापन केलेली आहे, त्या प्रदेशांचाही समावेश होतो; मग ह्या "संरक्षक पद्धती" नें अंतःस्थ व्यवस्था राखिली जात असो, अथवा ती संदिग्ध सार्वभौमत्वाची द्योतक असो, किंवा अन्यायाशिवायच्या परकीय जुलमापासून संरक्षण करण्याच्या अनिश्चित आश्वासनावर अवलंबून असो. पण ही संरक्षक पद्धति कोणत्याही दरजाची असली, अगर त्या विवक्षित प्रदेशावर कितीही अंधुक अधिकार-छाया पाडण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार असला, तरीही प्रतिपक्षाच्या वर्चस्वाला फाटा देण्याचा आपला हक्क प्रस्थापित करणें, हेंच तिचें मुख्य ध्येय असून, त्याच्या अधिकाराला अर्ध-चंद्र देणें म्हणजेच त्याचेबरोबर उलट संरक्षणाची जबाबदारीही आपल्या अंगावर घेणें होय; ह्मणून ज्या प्रदेशाच्या बाह्य सरहद्दीचें संरक्षण करण्यास

ब्रिटिश सरकार तयार आहे, ती सरहद्द त्यांचीच आहे, असें ह्मटल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

आशिया खंडांतील सरहद्दींना हें तत्त्व लावण्याकरितां आणि त्यांचें इतकें स्थित्यंतर कां होत गेलें हें स्पष्टपणें दाखविण्याकरितां, या वेळीं ज्या रेषेनें त्या विभागल्या गेलेल्या आहेत, त्या रेषेकडे आतां आपणाला त्वरित वळलें पाहिजे. ईजिप्तच्या गुंतागुंतीचा प्रश्न बाजूस ठेविला, तर तांबड्या समुद्राच्या लगत्यास असलेल्या एडनपासून आशियांतलि ब्रिटिश साम्राज्य सरकारच्या संरक्षित प्रदेशाची सुरवात झाली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अनादि काळापासून हिंदुस्थान आणि ईजिप्त ह्यांमधील जलमार्गानें चालणारा व्यापार सर्वस्वी एडनवर अवलंबून असून आशियांतील समुद्राच्या पलीकडील इंग्लिशांच्या हिंदुस्थानच्या राष्ट्राकडे जाण्याला हीच आतां पहिली पायरी आहे. आशियांतील मुख्य टापूंत ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत असलेलें अगदीं पश्चिमेकडील नाकेंही हेंच आहे; व ज्या पद्धतीनें संरक्षित प्रदेशाची घटना करण्यांत आली आहे, तिचें सूक्ष्म स्वरूप दाखविण्यालाही हेंच एक उत्कृष्ट उदारहण आहे. तांबडया समुद्रांतील दळणवळणाच्या जलमार्गावर आपलें नियंत्रण असावें, ह्मणून इंग्लिशांनीं एडन आपल्या ताब्यांत घेतलें आहे, व त्याची तटबंदीही केलेली आहे. परंतु त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यांत जिब्राल्टरसारखा फक्त एक टोंकदार खडक असल्यामुळें त्यांनीं त्याच्या सभोंवतीं चोहों-कडून संरक्षित सरहद्द स्थापन केलेली आहे, आणि तींत आपलें राजकीय वर्चस्व कबूल राखण्यास आणि इतरांस आंत न येऊं देण्यास त्यांनीं अरब टोळ्यांना करारानें बांधून घेतलेलें आहे. एडनपासून जवळच असलेलें डायसकोरडीज ह्या जुन्या ग्रीक नांवानें आतां क्वचितच ओळख पटणारें—सोकोत्रा हें बेट इंग्लिशांच्या संरक्षणाखालीं आहे, आणि एडन-पासून पूर्वेकडे ओमान येथून अरेबियाच्या भोंवताढून मस्कत व इराणी आखातापर्यंतच्या समुद्र किनाऱ्याची सर्व ओळ ब्रिटिश सरकारच्या

संरक्षणाखालीं आलेली आहे; इंग्लिशांच्या जहाजांकडूनच तेथील समुद्राचें संरक्षण करण्यांत येतें; आणि त्या समुद्र किनाऱ्यावरील अरबी संस्थानें आपल्या अंतःस्थ कलहांत ब्रिटिश सरकारची मध्यस्थी कबूल करितात, व त्यांचें बाह्य प्रदेशावरील वर्चस्वही मान्य राखितात.

परंतु पश्चिम आशियांतील इतस्ततः पसरलेलीं संरक्षित ठाणीं हीं फक्त इंग्लिशांच्या वर्चस्वाखालीं पृथक् पृथक् स्थळें अथवा समुद्र किनाऱ्याची एक लांब पट्टी म्हणून असून, तेथील समुद्रावर इंग्लिशांच्या असलेल्या आरमारी वर्चस्वावरच तीं निव्वळ अवलंबून आहेत; आणि आशियामधील, म्हणजे स्वाभाविक रीत्या हिंदुस्थानांतील, ब्रिटिश सरकारच्या प्रधान पदाला तीं सर्व परिपोषक व पुरवणीदाखल आहेत. ह्याच ठिकाणीं इंग्लिश सरकारच्या बहुविध उदाहरणांवरून व मोठमोठ्या प्रमाणावरून दुहेरी सरहद्द सीमा राखण्याच्या पद्धतीनें कशी मासलेवाईक राजकीय परिस्थिति उत्पन्न होते, याचें आपणास परीक्षण करण्यास सांपडतें. वर लिहिलेल्या दुहेरी सरहद्दसीमांपैकीं अंतरसीमा ही ब्रिटिश सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेशाची मर्यादा दाखविते, व बाह्य सीमा ही कांहीं झालें तरी परकीय जुलमापासून नेहमीं बचाव करण्याकरितां संरक्षक पद्धतीनें हमी घेतलेल्या तिऱ्हाईतांचे ताब्यांतील प्रदेशाची मर्यादा दाखविते.

ज्या तत्त्वानें जलसीमेचें संरक्षण करतां येतें, त्या तत्त्वामध्यें आणि स्थलसीमेच्या संरक्षणार्थ उपयोगांत आणिलेल्या संरक्षक राज्यपद्धतीच्या तत्त्वामध्यें एक प्रकारें बरेंच साम्य आहे, असें लांबवर पसरलेल्या हिंदुस्थानच्या समुद्र किनाऱ्याच्या सरहद्दीवरून आपणास समजून येतें. दोन्हीही बाबतींतील मुख्य उद्देश, प्रत्यक्ष सरहद्दीच्या रेषेपलीकडे आणि पुढें अगदीं मोकळी जागा ठेवावी, असाच असतो. ब्रिटिश सरकारची स्थलसीमेच्या बाबतींत अशी पद्धत आहे कीं, ज्या सरहद्दीवर बंदोबस्त चांगला रहात नाहीं, त्या सरहद्दीच्या पलीकडे संरक्षित प्रदेशाची एक ओळच्या ओळ ते राखून ठेवितात, आणि त्याप्रमाणेंच त्यांच्या समुद्र किनाऱ्याच्या अगदीं

लगतच्या पट्ट्यामध्यें दुसऱ्यास न वावरूं देण्याचा हक्कही याच तत्त्वावर त्यांनीं प्रस्थापित केलेला आहे. ब्रिटिश लोकांना "आपण समुद्राच्या पालकत्वाखालीं बिनधोक आहोंत" असें मानण्याची संवय झालेली आहे; तथापि वास्तविक रीत्या तो सुरक्षितपणा मेखलाभूत नील-जल-प्रदेशावर अवलंबून नसून त्या पाण्यावर संचार करणाऱ्या ब्रिटिश आरमाराची कुवत आणि करामत ह्यांचेवरच तो अवलंबून आहे; आणि ज्या राष्ट्राला दर्यावर्दीपणाची यशस्वी कला अवगत नसेल, त्याला तर समुद्र किनाऱ्यासारखी, हल्ला होण्याला अधिक उघडी आणि संरक्षण करण्याला अधिक कठिण अशी, दुसरी कोणतीच धोक्याची सरहद्द नाहीं.

या कारणामुळें, जमिनीच्या व समुद्राच्या सरहद्दीचें संरक्षण करण्याचें तत्त्व हें आहे कीं, सुसंरक्षित प्रदेशाचा कटिबंध मध्यें ठेवून शत्रूची प्रगति कुंठित करावी. जर एखादा परकीय त्या प्रदेशांत शिरला, तर त्याला तात्काळ आव्हान करण्यांत येतें; आणि जर त्यानें आपला प्रयत्न तसाच चालू ठेविला, तर तें शत्रुत्वाचें द्योतक आहे, असें समजण्यांत येतें.

अशा रीतीनें विचार केला असतां, ज्या प्रदेशाचा ब्रिटिश लोक राज्यकारभार पाहतात, व पार्लमेंटनें केलेले कायदेकानू जेथें पूर्णपणें लागू पडतात, असे इंग्लिशांच्या प्रत्यक्ष ताब्यांत असलेले आशियांतील प्रदेश आणि त्यांतील त्यांची स्थलसीमा, ह्या दोन्ही एकच आहेत, असें मानणें चुकीचें होईल. इंग्लिशांच्या ताब्यांतील कानडा देशाची सरहद्द अथवा फ्रान्स आणि जर्मनी यांमधील सरहद्द, यांवरून कोणीही ब्रिटिश मनुष्य आपल्या देशांमधून दुसऱ्या सार्वभौम राज्याच्या सरहद्दीमध्यें ज्याप्रमाणें एकदम जाऊं शकतो, तशा प्रकारच्या सरहद्दीप्रमाणें ती एक निव्वळ भूगोलविषयक रेषा नाहीं. आशियांतील ब्रिटिश सरकारच्या राज्याची सरहद्द म्हटली, ह्मणजे त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाची वाढविलेली राजकीय

१ ॥ तो अब्धि गर्जुनि कथी निजद्वीप-वाळा ॥
॥ आहे अशिवेंच तुला जणुं शब्द आला ॥

बाह्य सीमा होय, अथवा प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेशाच्या पलीकडील भाग होय, असें म्हटलें असतांही चालेल. ह्या ठिकाणीं हेंही विशेषत: लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, उपरिनिर्दिष्ट मर्यादा ह्मणजे पराकाष्ठेची मर्यादा होय. कारण, ब्रिटिश हिंदुस्थानला—ह्मणजे हिंदुस्थान सरकारच्या प्रत्यक्ष ताब्या-खालील प्रदेशाला—सुद्धां आंतील आणि त्याचप्रमाणें बाहेरील अशा दोन मर्यादा आहेत. फ्रान्स, स्पेन आणि खरोखर बहुतेक सर्व अर्वाचीन राष्ट्रांत तेथील सरकार एकीकृत व सुसंहत अशा राष्ट्रीय मालमत्तेवर अधिकार चालवीत असून त्या देशांसभोंवती वर्तुळाकार कुंपणासारखी एक सळंग सरहद्द असते; परंतु इंग्लिशांच्या हिंदी साम्राज्यांत अंतर्भूत झालेल्या बहुविध प्रदेशांत त्या साम्राज्यानें आवृत झालेल्या आणि भूवेष्टित असलेल्या बऱ्याच एतद्देशीय संस्थानांचा समावेश झालेला आहे. शिवाय, आपण पूर्वीं असें-ही वाचलेलें आहे कीं, बंडखोर सरदार व शूर सेनानायक यांनीं मोंगल साम्राज्याच्या मोडकळीस आलेल्या भागांतून बरींचशीं संस्थानें निर्माण करून तेथील बादशाही प्रतिनिधि अगर नियुक्त अधिकारी ह्या नांवा-खालीं राज्यकारभार चालविण्यास सुरवात केली; त्या साम्राज्यास पक्ष-घाताचा झटका बसल्याबरोबर त्यांना आपला पडदा दूर सारण्यास चांगलीच संधि सांपडून त्यांनीं उघड उघड राजरोसपणें परतंत्रतेचें "जूं" आपल्या मानेवरून झुगारून दिलें, आणि अशा रीतीनें ह्या संस्थानांचीं स्वतंत्र राज्यें निर्माण होण्यांत त्यांचें पर्यवसान झालें. मोंगल राष्ट्राच्या नाशाबरोबरच ब्रिटिश राष्ट्राचा उदय झाला, आणि ब्रिटिश लोकांनीं एक शतकाच्या अवधींत कांहीं बादशाही प्रांत पुन्हां जिंकल्या कारणानें अथवा त्यांना स्वामित्व-हक्क-त्यागानें तोडून दिल्या कारणानें ते ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें सामील करण्यांत आले; बाकी राहिलेलीं राज्यें ब्रिटिश साम्राज्य सरकारच्या संरक्षणाखालीं स्वतंत्र रीतीनें राज्यकारभार चालविण्यास मोकळीं ठेवण्यांत आलीं आहेत; शिवाय, आंग्ल सामंतचक्रा-

धिपतीच्या आधिपत्याखालीं कांहीं महत्त्वाच्या रजपूत राज्यांचा समूह स्वातंत्र्याचा नेहमीं उपभोग घेत आहे.

ह्या सर्व संस्थानिकांना लढाई अगर तह करण्याची ब्रिटिश सार्वभौम सरकाराकडून सक्त मनाई करण्यांत आली आहे; परंतु ते आपल्या राज्यांत स्वतःचे कायदे करितात, आणि आपण स्वतःच करही बसवितात. त्याचप्रमाणें ब्रिटिश सरकार त्यांच्या ताब्यांतील प्रदेश परकीय प्रदेशाप्रमाणें मानितें; तरीही उभयतांच्या प्रदेशांना विभक्त करणाऱ्या रेषेला सरहद्द असें क्वचित्च ह्मणतां येईल; कारण, त्यांपैकीं बहुतेक संस्थानें हिंदी साम्राज्य सरकाराच्या प्रदेशानें पूर्णपणें व्यापिलेलीं आणि परिवेष्टित आहेत. तथापि त्यांचा इतिहास—म्हणजे वास्तविक पाहतां हिमाचलापासून तों थेट कन्याकुमारीपर्यंत आणि त्याच्याही पुष्कळच पलीकडे झालेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या विस्ताराचा सामान्य इतिहास—संरक्षित राज्यपद्धतीसंबंधींचें सरहद्दीवरील धोरण पदोपदीं स्पष्टपणें दृग्गोचर करीत आहे; आणि प्रारंभापासून चालत आलेल्याचाच उपक्रम हल्लींही मुख्यतः सुरू आहे. शिवाय, आपणास असेंही आढळून येईल कीं, हिंदुस्थानच्या प्रधान प्रदेशावर ब्रिटिश लोकांनीं ज्या वेळीं आपलें आधिपत्य प्रस्थापित केलें, त्या वेळेपासून, म्हणजे इ. सन १७६५ मध्यें त्यांनीं बंगाल प्रांत मिळविल्या वेळेपासून, ज्या ज्या बलिष्ठ शेजाऱ्याला आपणापासून लांब ठेवण्याचें त्यांच्या मनांत आलें, त्या त्या शेजाऱ्याच्या प्रदेशामध्यें आणि आपल्या प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेशामध्यें संरक्षित प्रदेशाची सरहद्द ठेवण्याची पद्धत त्यांनीं नेहमीं चालू ठेविलेली आहे. गेल्या शतकामध्यें मराठ्यांच्या विरुद्ध आडकाठी ह्मणून ब्रिटिश सरकारांनीं औधच्या राज्याला हातीं धरिलें, व त्याचें संरक्षण केलें; त्याचप्रमाणें ह्या शतकाच्या प्रारंभीं मध्य हिंदुस्थानामध्यें त्यांनीं रजपूत राज्येंही ह्याच कारणास्तव राखून ठेविलीं; तसेंच, सतलज नदीवरील मांडलिक संस्थानेंही त्यांनीं पंजाब घेण्यापूर्वीं शीख लोकांच्या बलिष्ठ सत्तेला आळा घालण्यास बाह्य

तटबंदी व मार्गप्रतिबंधक कोट ह्मणून प्रारंभीं राखून ठेविली, व त्यांना दुजोराही दिला. ह्या युक्तीची आघात-प्रतिबंधकाशीं तुलना करितात; कारण, आघात-प्रतिबंधक ही एक यांत्रिक योजना असून तिचा उपयोग—म्हणजे ज्याप्रमाणें आगगाडीचे डबे एकमेकांना जोडते वेळीं एकमेकांच्या आघातापासून परस्परांचें संरक्षण होण्याकरितां व त्यांच्या गतीला अवरोध होण्याकरितां त्यांमध्यें आघात-संरक्षक पोलादी कमान उपयोगांत आणितात, त्याप्रमाणें—दोन जड पदार्थांमधील आघाताचा वेग स्तंभित करण्याकरितां अथवा तो कमी करण्याकरितां करीत असतात; त्याचप्रमाणें, अशा रीतीनें राजकीय आघात-प्रतिबंधकाच्या योगानें राजकीय बाबतींत घडून येणाऱ्या झटापटींची तीव्रता, जरी पूर्णपणें नष्ट झाली नाहीं तरी, बऱ्याच अंशानें कमी होते. परंतु या पद्धतीनें ब्रिटिश सरकारच्या सरहद्दीच्या झपाट्यानें होणाऱ्या वाढीचा वेग कमी न होतां त्याला उलट अधिक गति मात्र मिळाली, असा संशय येण्यासारखा आहे; कारण, आपल्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर होणाऱ्या प्रत्येक युद्धांत ब्रिटिश लोकांनीं नवा नवा प्रदेश काबीज केला असल्यामुळें प्रत्यक्ष जिंकलेल्या प्रदेशाच्या हद्दीपलीकडे ते नेहमीं आपल्या संरक्षित प्रदेशाची हद्द ठेवित गेले आहेत. अशा रीतीनें ब्रिटिश सरकारच्या प्रत्यक्ष राज्यव्यवस्थेखालीं असलेल्या प्रदेशापुढें लढाईस सोइस्कर ह्मणून, अथवा राजकीय धोरण संभाळण्याच्या हेतूनें, ठेविलेली मर्यादा ते नीट रीतीनें संभाळून ठेवीत असल्यामुळें त्यांची दोन्ही बाजूनें प्रगति झालेली आहे. इंग्लिशांच्या पहिल्या अमदानींतील सरहद्दी आतां हिंदुस्थानांत फार मागें पडलेल्या आहेत; आणि बलिष्ट शेजाऱ्यांच्या तावडींतून सुटून जीं कांहीं लहानसहान संस्थानें हल्लीं जिवंत आहेत, त्या संस्थानांवरूनच काय त्या त्या सरहद्दी ओळखतां येण्यासारख्या आहेत; कारण, त्या संस्थानांचें संरक्षण करणें, हें तर प्रारंभींच ब्रिटिश सरकाराच्या राजनीतीचें मूलतत्त्व ठरून चुकलें होतें.

त्याचप्रमाणें, स्वसंरक्षणार्थ ठेविलेल्या बाहेरील कोटाच्या पलीकडे चाल करून जाण्याची ब्रिटिश सरकारची तयारी होईपर्यंत ते कोट संभाळून ठेवण्याच्या पद्धतीमुळें त्यांनीं हिंदुस्थानच्या पलीकडे नाकानीट बरेंच आक्रमण केलें आहे. परंतु हिंदुस्थानच्या भूगोलविषयक सीमेपर्यंत—ह्मणजे मध्य आशियामधून ज्या पर्वताच्या ओळीनें हिंदुस्थान विभक्त झालेलें आहे, आणि जी ओळ जगांतील कदाचित् सर्व नैसर्गिक प्रतिबंधांपेक्षांही अत्यंत मजबूत आहे, तेथपर्यंत—ब्रिटिश सरकार जाऊन पोंचलें न पोंचलें, तोंच एखाद्याला असें वाटेल कीं, त्यांच्या मोकळ्या सरहद्दीवर कृत्रिम तटबंदी ह्मणून जीं संरक्षित राज्यें राखण्यांत आलीं आहेत, त्यांची आतां अवश्यकता राहिली नाहीं; परंतु उलट पक्षीं त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, त्यांच्या साम्राज्याची वृद्धि आणि व्याप्ति यांच्या बरोबरच संरक्षित राज्यांचीही एकसारखी वाढ होत गेलेली आहे, व हिंदुस्थानासारख्या समृद्ध साम्राज्याला तर त्यांची पूर्वीपेक्षांही अधिक प्रमाणानें अवश्यकता भासूं लागली आहे. ब्रिटिश सरकारांनीं हिंदुस्थानच्या विस्तीर्ण मैदानाच्या शेवटास असलेल्या हिमालय पर्वताच्या उतरणीपर्यंत आपली राज्यकारभाराची सरहद्द नेऊन भिडविली आहे, परंतु वायव्येकडे असलेल्या पर्वतरूपी भिंतीचा त्यांना आश्रय असूनही त्यांचें समाधान झालेलें नाहीं; ह्मणून ते या भिंतीवर व तिच्या पलीकडे आक्सस नदीपर्यंत अत्यंत बारकाईनें निरीक्षण करीत आहेत, आणि त्यांच्याच हुबेहुब धोरणाप्रमाणें रशिया हाही मध्य आशियामधून पुढें चाल करून येत आहे, हें सुद्धां ते पहात आहेत. रशिया हा थेट अंतःस्थ हद्दीपर्यंत प्रदेश जिंकून त्याची स्थिरस्थावर करीत आहे; त्यानें कांहीं प्रांत गिळंकृत करून ते आपल्या साम्राज्यास जोडून टाकिले आहेत; आणि त्याच्या अंतःस्थ हद्दीच्या पलीकडे हिंदुस्थानच्या रोखानें त्यानें एक राज्यही आपल्या संरक्षणाखालीं ठेविलें आहे. बुखारा आणि अफगाणिस्थान, व रशियाच्या आणि ब्रिटिश सरकारच्या संरक्षणाखालील राज्यें, यांना विभागणारी रेषा म्हणजे आक्सस नदी होय. राजकीय क्षितिजा-

वर आपणास जे जे शत्रु उत्पन्न होतील, अशी ब्रिटिश सरकारांनीं आतांपर्यंत अटकळ केली होती, त्या सर्वांमध्यें भयंकर प्रतिस्पर्धी व पुढेंमागें जबरदस्त दुष्मन होण्याचा ज्याचा पूर्ण संभव आहे,तो रशिया हाही याच ठिकाणीं आहे. आणि याच कारणामुळें ब्रिटिश-संरक्षित सरहद्द ही पूर्वीपेक्षां बरीच अधिक विस्तृत झाली आहे. बलुचिस्थान व अफगाणिस्थान हे दोन देश भव्य विस्तार व नैसर्गिक रचना यांनीं युक्त असल्या कारणानें त्यांचा एक उत्तम प्रकारचा स्वभावसिद्ध जणूं काय कोटच बनलेला आहे. हे देश ब्रिटिश-पश्चिम सरहद्दीपलीकडे आहेत, आणि ते दोन्हीही देश पर्वत व वालुकामय प्रदेश यांनीं परिपूर्ण असल्याकारणानें ओलांडून जाण्यायेण्यास कठिण, पण संरक्षण करण्यास सोपे असे, आहेत; शिवाय, तेथील जनता स्वतंत्र वृत्तीची व युद्धप्रिय असून त्यांनाही ब्रिटिश लोकांप्रमाणेंच, "स्वातंत्र्य" हा एक सर्वांत उच्चतम ठेवा आहे, असें वाटतें. ब्रिटिश सरकारांनीं हे दोन्हीही देश आपल्या राजकीय वर्चस्वाच्या कक्षेंत आणिले आहेत, आणि अशा रीतीनें हिंदुस्थानच्या स्वाभाविक मर्यादेपासून तों तहत इराण व आक्सस नदी यांपर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशावरील संरक्षणाची हमी त्यांनीं स्वाभाविक रीत्याच आपणावर घेतलेली आहे. ज्या सरोवराची पर्वतप्राय तीरभूमि हें आक्सस नदाचें संगोपनस्थान बनलेलें आहे, तें व्हिक्टोरिया सरोवर जर आपण आपल्या प्रयाणाचें मूलस्थान कल्पिलें, तर ब्रिटिश व रशियन सरकार या परस्परांचीं अधिकारक्षेत्रें विभक्त करणारी रेषा पूर्वेस चीनच्या सरहद्दीपर्यंत, आणि पश्चिमेस आक्सस नदाच्या प्रवाहाच्या बाजूनें, पसरलेली आहे. त्याचप्रमाणें आक्सस नदापासून दक्षिणेच्या बाजूस हिंदी समुद्राकडे नजर फेंकली असतां, आपणाला असें आढळून येईल कीं, ज्या रेषेमुळें अफगाणिस्थान व बलुचिस्थान हे रशिया व इराण यांचेपासून विभक्त झालेले

१ ॥ विसरे गति अपुली नद, आक्सस जै पामिरामधें आला ॥
॥ गिरि-पाळण्यांत बसला, जणुं सगळा पूर्ववेग मावळला ॥

मॅथ्यू आर्नोल्ड.

आहेत, ती पश्चिमेकडील सरहद्दीची सर्व रेषा ब्रिटिश सरकारच्या देखरेखीखालीं ठरवून टाकण्यांत आलेली आहे, आणि तहानें अथवा करारनाम्यानें त्यांनीं ती आपल्या ताब्यांतही मिळविलेली आहे. परंतु जरी ह्या रेषेच्या आंतल्या बाजूस असलेल्या राज्यकर्त्यांनीं ह्या व्यवस्थेनुरूप घडून येणाऱ्या गोष्टीस आपलें अनुमोदन दिलें आहे, तरीही ह्या रेषेवर इंग्लिशांनीं केवळ औपचारिक अशा परस्परराष्ट्रांसंबंधींच्या नियमानुरोधानेंच ताबा मिळविला आहे, असें मात्र समजतां कामा नये. ह्या रेषेबाहेरील राज्यें, रशिया आणि इराण, यांचे बरोबर वाटाघाट करून ब्रिटिश सरकारांनीं ही बाह्य सरहद्द मुक्रर केलेली आहे, आणि त्यांनींही, तें रेषा-बंधन आम्ही पाळूं, व पाळण्यास बद्ध झालेले आहोंत, असें वचन दिलें आहे.

हिंदुस्थानच्या अगदीं वायव्य दिशेच्या पलीकडे ही संरक्षित राज्यपद्धति व्यापक प्रमाणावर चालू आहे, असें आपल्या निदर्शनास येतें. ब्रिटिश सरकार हें ज्या प्रदेशावर राज्यकारभार चालवीत आहे, त्याची सरहद्द ही खरी सरहद्द आहे, असें न मानतां, जो प्रदेश त्यांच्या संरक्षणाखालीं आहे, त्याची सरहद्द ही खरी सरहद्द आहे, असें मानावयाचें असून ह्या तत्त्वाचें सर्वांत उत्कृष्ट उदाहरणही ह्याच ठिकाणीं आढळून येतें. परंतु ह्या बाजूस लहान लहान संस्थानिकांची ओळ अथवा भिन्न भिन्न जाति यांचा जेथें अंमल चालतो, अशा प्रदेशाचा पट्टा आवरणादाखल आहे, तरीही ब्रिटिश सरकारचें समाधान झालेलें नाहीं; आणि म्हणूनच त्यांनीं मध्य आशियामधून हिंदुस्थानांत जाणाऱ्या मार्गांवर अफगाणिस्थान व बलुचिस्थान ह्या स्वतंत्रताप्रिय देशरूपी दोन शिला मध्यें ठेवून तो मार्ग कुंठित केला आहे. सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत इराणचें राज्य आणि हिंदुस्थानांतील मोंगल साम्राज्य हीं दोन्हीं केवळ बाह्यात्कारीच परस्परसंलग्न होतीं; कारण, काबूल आणि कंदाहार हीं मोंगलांच्या ताब्यांत होतीं; परंतु अठराव्या शतकांतील राज्यक्रांतीनें हिंदुस्थान व इराण यांचेमध्यें असलेला डोंगराळ प्रदेश छिन्नविच्छिन्न होऊन तेथें लहान लहान संस्थानें

निर्माण झालीं, आणि हींच एक प्रकारची प्रतिबंधक आडकाठी असल्या-मुळें ब्रिटिश सरकार त्यांचें संरक्षण करीत आहेत. हीं राज्यें प्रचंड खडक अथवा परस्परभिन्न संस्थानसमूह म्हणून असून तीं अगदीं अलीकडील प्रांतभंगाची साक्ष पटवीत आहेत. शिवाय आतां ज्या अर्थी रशिया आणि इंग्लंड हे दोघेही परस्परांकडे चाल करीत असतांना संरक्षक प्रदेश पुढें पुढें ठेवून आणि नाक्याच्या जागा हस्तगत करून एकमेकांविरुद्ध सारखीं राज्यकारस्थानें लढवीत आहेत, त्या अर्थी या उभयतांच्या छावणीच्या अगदीं मधोमध असलेला अफगाणिस्थान हा देश दोहोंपैकीं कोणाच्या तरी एकाच्या वर्चस्वाखालीं आलाच पाहिजे; आणि ब्रिटिश सरकारानें जर अफगाणिस्थानचें संरक्षण केलें नाहीं, तर तो देश निःसंशय रशियन सरकारचे संरक्षणाखालीं जाईल, हें पुष्कळ दिवसांपासून खात्रीनें ठरून चुकल्यासारखेंच होतें. कारण, रशियानें आक्सस उर्फ अमूदारिया नदीच्या अगदीं पलीकडील बुखारा हें शहर आपल्या अव्याहत संरक्षणाखालीं आणून ठेविलें आहे; शिवाय अफगाणिस्थानामधील पर्वतांचा हिंदुस्थान-च्या मैदानांतील प्रदेशास आश्रय असून तेथून आक्सस नदीपासून तों तहत सिंधू नदापर्यंतच्या मार्गाचें सम्यक् पर्यालोचन करतां येतें; आणि अशा निसर्गसिद्ध सामर्थ्यानें युक्त, पण कमकुवत व दोन बलाढ्य राष्ट्रांची सरहद्द ज्याला दोन्हीकडून भिडलेली आहे असा, प्रदेश राजकीय गुरुत्वा-कर्षणाच्या नियमाप्रमाणें ह्या किंवा त्या अशा कोणत्या तरी एका बाजूला निःसंशय आकर्षिला गेलाच पाहिजे, हें ठरीव तत्त्व आहे.

कदाचित् असाही एक प्रश्न विचारतां येण्यासारखा आहे कीं, असें कां व्हावें—आपल्या स्वतःच्या पायावर उभें राहण्याची यत्किंचित् सुद्धां धमक नसलेल्या आशियांतील देशाशीं व्यवहार करतांना ब्रिटिश सर-कारानें युरोपांतील व्यवहारपद्धतीचा कां अंगीकार करूं नये---बेलजम आणि स्वित्झर्लंड ह्यांना ज्याप्रमाणें तटस्थ वृत्ति धारण करण्यास लावि-लेलें आहे, त्याचप्रमाणें अफगाणिस्थान देशाशीं, त्याचें स्वातंत्र्य आणि

अभंगत्व मान्य करूं, असा सामायिक करार करून, ब्रिटिश सरकार त्याला तटस्थ वृत्ति धारण करण्यास कां भाग पाडीत नाहीं ? परंतु त्याचें उत्तर असें आहे कीं, तटस्थ वृत्तीचा अंगीकार करावयास लावणें हें मुत्सद्दी-पणाचें धोरण आशिया खंडांत टिकणें शक्य नाहीं; कारण, जेथें केंद्र-शाही चालू आहे, असा एखादा पौर्वात्य देश जर दोन युरोपियन राष्ट्रां-मध्यें तिऱ्हाइतासारखी वृत्ति धारण करून राहिला असेल, आणि जर दोघांपैकीं कोणालाही त्या देशाच्या अंत:स्थ राज्यकारभारामध्यें हात घालतां येत नसेल, तर तेथें हटकून झोटिंग पादशाही माजून तेथील राज्यरूपी इमारतही लवकरच ढांसळून पडण्याचा संभव असतो. तेथील एतद्देशीय राज्यकर्त्यांची दोन बलिष्ठ आणि मत्सरी शेजाऱ्यांच्या परस्परविरुद्ध माग-ण्यांनीं आणि सक्तीच्या सूचनांनीं तारांबळ उडेल, तो एकदां एकाचें आणि दुसऱ्यांदा दुसऱ्याचें ऐकत राहील, आणि उभयतांनाही दुखविण्याला तो नेहमीं कारणीभूत होत जाईल. जात्याच्या वरील व खालील दगडां-मध्यें सांपडल्याप्रमाणें आपली स्थिति झाली आहे, असें त्याला आढळून येईल, आणि पोलंड हा देश ज्याप्रमाणें कारस्थानें व बंदफितुरी यांचें केंद्र बनून त्याचे अखेरीस तुकडे तुकडे झाले, त्याचप्रमाणें त्या देशाचाही शेवट बहुधा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

ख्रिस्ती शकाच्या पहिल्या दोन शतकांत रोमन आणि पार्थिअन ह्या दोन राष्ट्रांमध्यें आर्मिनिया ह्या नांवाचा देश होता, व त्या देशाच्या तत्-कालीन स्थितीची हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य व आशिया खंडांतील रशियन साम्राज्य ह्यांच्यामध्यें असलेल्या अफगाणिस्थान ह्या देशाच्या वर्त-मान स्थितीशीं तुलना केली असतां, गतकालीन इतिहासांतील एक तंतो-तंत जुळणारें उदाहरण, स्थलाभाव नसेल तर, दाखवितां येण्यासारखें आहे. आर्मिनिया येथील राज्यकर्त्यांच्या ताब्यांत डोंगराळ प्रदेश व युरोप आणि आशिया ह्यांमधील जाण्यायेण्याचे मार्ग हीं होतीं. ह्या दोन बलाढ्य लष्करी राष्ट्रांच्या प्रदेशांमध्यें हा प्रांत आडकाठी म्हणून होता, आणि

तेथील राज्यकर्त्यांवर आपलें वजन ठेवावें, व तो प्रदेश आपल्या संरक्षणाखालीं आणावा, असा रोमच्या सरहद्दीवरील राजकीय धोरणाचा मुख्य उद्देश होता. आर्मिनिया येथील राज्यकर्ते एकदां रोमच्या धोरणाप्रमाणें वागत, तर दुसऱ्या वेळीं पार्थियाच्या मताचा अनुवाद करीत. सत्तेच्या दोन्हीही पारड्यांचें वजन समतोल राखून आपलें स्वातंत्र्य वांचविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; परंतु ज्याप्रमाणें इ. सन १८७९ मध्यें अफगाणिस्थानच्या अमिरानें रशियन सरकारशीं तह केल्याबरोबर ब्रिटिश सरकारनें त्यावर स्वारी केली, त्याचप्रमाणें ज्या ज्या वेळीं आर्मिनिया येथील राज्यकर्ते पार्थियाशीं सख्य करीत, त्या त्या वेळीं रोमन साम्राज्य सरकार त्यावर हल्ला करीत असे. अफगाणिस्थानाप्रमाणेंच आर्मिनियाला आलेलें महत्त्व हें त्या देशाच्या अंगच्या सामर्थ्यामुळें आलेलें नव्हतें; कारण, तो देशही कमकुवत व रानटी स्थितींत होता; परंतु त्या देशाला आलेलें महत्त्व हें केवळ तेथील नैसर्गिक परिस्थितीमुळेंच आलेलें होतें. अशा प्रकारें रोमन साम्राज्याशीं असलेला आर्मिनियाच्या संबंधाचा इतिहास—ह्मणजे रोमन साम्राज्य सरकार हे तेथील राज्यकर्त्यांना एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणें राज्यपदारूढ किंवा राज्यपदभ्रष्ट करीत, आणि तो प्रांत प्रत्यक्षपणें आपल्या ताब्यांत न घेतां तेथील राज्यकारभारावर अधिकार चालविण्याचा इतरव्यावृत्त हक्क मात्र ते सर्वथैव आपल्याच हातीं ठेवण्याचा प्रयत्न करीत, हा त्या देशासंबंधींचा इतिहास—पाहूं गेलें असतां, आपणास ब्रिटिश सरकारच्या अफगाणिस्थानाशीं असलेल्या संबंधाचें एकदम पूर्ण स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं.

तथापि अफगाणिस्थान आणि इंग्लंड यांचा संबंध पूर्वीं कधींही झाला नव्हता, इतका तो हल्लीं दृढ झालेला असून, हाच संबंध हें संरक्षक राज्यपद्धतींत घडून आलेल्या अपूर्व वाढीचें आणि विशेष व्यापक अशा स्थित्यंतराचें द्योतक आहे, आणि त्याची कार्यक्षमताही अल्पावकाशांतच पूर्णपणें कसोटीस लागणारी आहे. इंग्लंड आणि रशिया या दोन

राष्ट्रांचीं वर्चस्वक्षेत्रें पुष्कळ दिवसांपासून परस्परांसान्निध येत होतीं, व सरते शेवटीं तीं एकदाचीं परस्परांस येऊन भिडलीं; ह्या गोष्टीचा उघड उघड पुरावा म्हणजे, इ. सन १८८६ मध्यें इंग्लिश व रशियन यांनीं एक संयुक्त-विवेचक मंडळ नेमून अफगाणिस्थानची पश्चिम सरहद्द निर्णीत केली, हा होय. तथापि आधुनिक राजकारणरूपी यंत्र किती बेतानें वापरलें पाहिजे, रशिया आणि इंग्लंड यांच्या प्रथम संयोगानेंच आघात कसा उत्पन्न झाला, आणि त्या आघातापासून बसलेल्या धक्क्यामुळें युरोपांतील सर्व प्रधानमंडळांच्या सभा कशा हादरून गेल्या, ह्या गोष्टींचें हें एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून बरेंच संस्मरणीय होईल. हिंदूकुश पर्वताच्या पलीकडील उतरणीवर सरहद्द ठरवितांना उत्पन्न झालेल्या क्षुल्लक मतभेदानें इ. सन १८८५ मध्यें पेंजडे येथें अफगाण लोक व रशियन लोक यांच्यामध्यें चकमक उडाली, आणि त्यामुळें इंग्लंड व रशिया यांच्यामध्यें लढाई जुंपणार, अशी अफवा सर्व युरोपभर पसरली. लार्ड डफरिन हा त्या वेळीं हिंदुस्थानचा व्हाइसराय व गव्हर्नर जनरल असून तो अत्यंत चतुर, मोठा अनुभवी व राजकारणपटु मुत्सद्दी होता, आणि त्यानेंच आपसांत तडजोड करून ही भानगड मिटाविली. परंतु ज्याप्रमाणें अकल्पित लख्ख प्रकाश पडून अंधारांतील वस्तु एकदम दृग्गोचर व्हाव्या, त्याचप्रमाणें ह्या गोष्टीवरून ब्रिटिश सरकाराला आपली खरी सरहद्द कोठें आहे, व ती पक्की ठरविली असतां त्यापासून कोणकोणत्या गोष्टी घडून येतील, हें कळून चुकलें. कारण, ब्रिटिश सरकारच्या ताब्याखालील हिंदुस्थानची मर्यादा व वादविषयक सीमा यांच्यामधील पांचसातशें मैल लांबीचा प्रदेश जरी अफगाणिस्थानच्या अमिराच्या ताब्यांत होता, तरीही त्या गोष्टीला बिलकुल महत्त्व देण्यांत आलें नाहीं; ज्या प्रदेशांचें आम्ही संरक्षण करूं, अशी ब्रिटिश सरकारनें हमी घेतली आहे, ते प्रदेश आणि त्यांची वास्तविक सीमा ह्या नेहमीं पूर्णपणें एकच असतात.

ह्या कारणामुळें, संरक्षक राज्यपद्धतीच्या अमलबजावणीकडे ह्या दृष्टीनें पाहिलें, तर आशिया खंडांतील ब्रिटिश सरकारच्या सरहद्दीचा बाह्य परीघ जी त्रिज्या कल्पून काढिलेला आहे, तिच्या प्रचंड विस्ताराचें ह्या ठिकाणीं निरीक्षण करणें श्रेयस्कर आहे. कारण, कित्येकांना असें वाटण्याचा संभव आहे कीं, ही सरहद्द पुष्कळच पुढें आणि विशेषच जलदीनें रेटीत नेण्यांत आली आहे; परंतु आतां ती तशीच पुढें रेटीत नेली जाणार नाहीं, असें त्यांना खात्रीनें मानतां येईल, अशी स्थिति आहे. एक शतक होऊन गेलें, तरीही ती सतत एकसारखी वाढत असल्यामुळें, तिची गति तर आतां खुंटलीही पाहिजेच; कारण, सरते शेवटीं पश्चिमेकडे आणि पूर्वेकडे तिला एक एक मोठा खडक लागला आहे; म्हणजे दोन्हीही दिशांनीं एका एका सुव्यवस्थित राष्ट्राचा तिला भक्कम प्रतिकार झालेला आहे. ह्या ठिकाणीं येऊन पोहोंचल्याबरोबर चल व अस्थिर मर्यादारेषा अचल व स्थिर होण्यास सुरवात होते; संरक्षित राज्यांची परावलंबी संस्थानांत गणना होऊन तेथें स्थिरस्थावर होतें; तंटे बखेडे कायदेशीर राजकारणाच्या व्याप्तीखालीं मोडूं लागतात; आणि लढाई अथवा तह या बाबतींत सुधारलेल्या राष्ट्रांचा संबंध येऊं लागतो. वायव्येस आक्सस नदीपासून तों खालीं तहत आग्नेयेस मेक्यांग नदीपर्यंत जर एक रेषा काढली, तर त्या रेषेच्या आंतल्या बाजूस असलेला चीन आणि रशिया यांमधील आशियाचा सर्व दक्षिण भाग हा हिंदी साम्राज्य, तदंतर्गत मांडलिक संस्थानें. व नियंत्रित राज्यें, यांनींच आतां वास्तविक रीत्या व्यापून टाकिलेला आहे, असें आपणास आढळून येईल. वायव्येस रशियाच्या निकट सान्निध्यामुळें विशेष सावधगिरी ठेवणें ब्रिटिश सरकारला अत्यंत अगत्याचें झालेलें आहे, व त्या दिशेनें मध्य आशियांतून हिंदुस्थानावर चाल करून येण्याचा मार्ग असल्यामुळें बलुचिस्थान, अफगाणिस्थान व काश्मीर, ह्या संरक्षित राज्यांचा आणि काश्मीर पलीकडे हिंदूकुश पर्वताच्या पायथ्यापर्यंत पसरलेल्या लहान लहान संस्थानांचा एक कोट बांधून तो

मार्ग त्यांनीं अडवून टाकिलेला आहे. हिमालय पर्वताच्या उत्तरेकडील मुख्य सरहद्दीवर ब्रिटिश सरकारच्या संरक्षणाखालीं असलेलीं अशीं राज्यें तुरळक तुरळकच आहेत; कारण, त्यांना त्या ठिकाणीं संरक्षित राज्यांची अवश्यकता नाहीं. शिवाय, तेथें ओलांडण्यास जवळ जवळ अशक्य अशी पर्वतांची एक तिहेरी सांखळी त्यांच्या ताब्यांत असून, त्यालगतच मध्य आशियांतील उंच डोंगराळ सपाटीचा प्रदेश आहे, व दुसऱ्या बाजूस मोंगोलियाचा रुक्ष प्रदेश आहे. परंतु ब्रिटिश सरकारच्या बाह्य रेषेच्या फक्त ह्याच भागावर—ह्मणजे काश्मीर आणि नेपाळ ह्यांमधीलच फक्त भागावर—हिमालय पर्वताच्या जगडव्याळ आडकाठीनें त्यांचें समाधान झालें आहे. उत्तरेकडून कोणत्याही राष्ट्रानें नेपाळांत ढवळाढवळ केल्यास ती ब्रिटिश सरकार कधींही सहन करणार नाहीं,—आणि पूर्वेकडे बऱ्याच पुढें असलेल्या सिकीमच्या संरक्षित राज्यांत ब्रिटिश सरकार कोणालाही ढवळाढवळ करूं देणार नसून, नुकताच दोन वर्षांमागें त्या संस्थानांत तिबेटनें आपले पाय पसरण्यास प्रारंभ केल्यामुळें, त्यांची तिबेट सरकाराशीं एक लहानशी लढाईही झालेली आहे. ज्याप्रमाणें वायव्य सरहद्दीवर रशियाच्या सान्निध्यामुळें ब्रिटिश सरकाराला वचक वाटतो, त्याचप्रमाणें ब्रह्मदेशाच्या ईशान्येस, पर्वत व मनुष्यांचो अद्याप जेथें गति नाहीं असा डोंगराळ प्रदेश, यांच्यापलीकडे एका सुव्यवस्थित व बलाढ्य राष्ट्राच्या अस्तित्वाचाही त्यांना वचक वाटत आहे. हें राष्ट्र म्हटलें म्हणजे भूतलावरील एक अत्यंत प्राचीन आणि पूर्व आशियांत अद्यापपर्यंत ज्याचें वर्चस्व अबाधित आहे, असें—चिनी साम्राज्य होय. वायव्य दिशेप्रमाणेंच त्याही ठिकाणीं ब्रिटिश सरकार हे नकाशावरील मोकळी राहिलेली जागा भरून काढीत आहेत, आपला राज्यविस्तार करीत आहेत, आपल्या सरहद्दीच्या खुणा पुढें पुढें वाढवीत आहेत, आणि ह्याही ठिकाणीं आपल्या प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या सरहद्दीपुढें संरक्षित प्रदेश ठेवणें हीच त्यांच्या राजकीय शोधाची आणि टेहळणीची पद्धत चालू आहे. सात

वर्षांपूर्वी इंग्लिशांनीं पूर्वेकडे एक मोठें आणि महत्त्वाचें कृत्य केलें; ह्मणजे त्यांना ब्रह्मदेश खालसा करून आपल्या राज्यास जोडणें भाग पडलें. कारण, तेथील राज्यकर्त्यानें त्यांच्याविरुद्ध वैरभावाचीं उघड उघड चिन्हेंच फक्त दाखविलीं नव्हतीं, तर फ्रान्सशीं आश्रय मिळविण्याकरितां त्यानें बोलणेंही लाविलें होतें. ह्या ठिकाणींही पुन्हां तें राज्य ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत आल्यामुळें त्यांना ब्रह्मदेशाच्या सरहद्दीच्या पुष्कळच पुढें जावें लागलें; कारण, एकदम दुहेरी सरहद्द बनण्यास सुरवात झाली, व त्यामुळें त्यांची खरी सरहद्द पूर्वेकडे कांबोडिया नदीपर्यंत पुढें ढकलली गेली. या सरहद्दींत निम-स्वतंत्र संस्थानांच्या ओळीचा अंतर्भाव होत असून त्यांचा ब्रह्मदेश व चीन यांमधील आघात-प्रतिबंधकासारखा उपयोग होतो. ह्या वेळीं ब्रिटिश सरकार त्या सरहद्दीवरील संस्थानिकांबरोबर आपले संबंध जुळविण्यांत आणि सीमेवरील जातींवर आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यांत गढून गेलें होतें; ह्मणजे वास्तविक रीत्या वर सांगितल्याप्रमाणें ते या वेळीं आपल्या प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेशाची सीमा, व ज्या प्रदेशाचें संरक्षण करण्याची आणि परकीयांच्या हल्ल्यापासून बचाव करण्याची हमी घेतली त्या प्रदेशाची मर्यादा, यांमध्यें राहिलेला कटिबंध सुनिश्चित करून त्याचें दृढीकरण करीत होते.

अशा रीतीनें पश्चिमेप्रमाणेंच पूर्वेकडेही ब्रिटिश सरकाराचा एका प्रतिस्पर्धी राष्ट्राबरोबर हळुहळु संबंध जडत चालला आहे, आणि त्याचें राजकीय दृष्ट्या असलेलें महत्त्वही इंग्लिशांच्या तोडीचेंच आहे. ब्रिटिश सरकारच्या सरहद्दीची अगदीं शेवटची सीमा थेट चीन आणि सयामपर्यंत भिडलेली आहे, आणि एका बाजूला ब्रह्मदेशांतून राजकीय हेतूनें टेहळणी करण्याचीं इंग्लिशांचीं ठाणीं व दुसऱ्या बाजूला टांकिनपासून फ्रेंच मार्गशोधकांच्या चौक्या, हीं असून तीं दोन्हीही बहुतेक एका हांकेच्या टप्प्यांतच आहेत. ह्या सर्व सरहद्दी ज्या वेळीं अखेरीस सुधारलेल्या राजनीतीच्या नियमानुरोधनानें निश्चित व मुक्रर होतील, त्या वेळीं

आशिया खंडाच्या भावी राजकीय सुव्यवस्थेच्या नकाशाचा पाया रेखाटला जाईल, इतकेंच नव्हे,तर चिनी राष्ट्राच्या पलीकडील सर्व आशिया खंड शेवटीं एखाद्या युरोपस्थ राष्ट्राच्या संरक्षणाखालीं अथवा प्रत्यक्ष ताब्यांतही कदाचित् जाईल, असें म्हणणें फारसें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

ब्रिटिश सरकारच्या हिंदी साम्राज्याचा विस्तार व त्याची संघटना कशा रीतीनें झाली, ह्याचा त्रोटक इतिहास चित्तवेधक होईल, असें मानण्यास हरकत नाहीं. कारण, अशा तऱ्हेची पद्धत पश्चिम युरोपांत सांप्रत दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. तथापि रोमन राष्ट्राच्या हळुहळु होत गेलेल्या वाढीमध्यें आणि मुख्यत्वेंकरून त्या राष्ट्राच्या राजकीय व लष्करी सरहद्दीच्या रचनेमध्यें तींच तत्त्वें आणि तेच स्वाभाविक परिणाम उघड उघड ओळखतां येण्यासारखे आहेत. बऱ्याच प्राचीन काळापासून युरोप खंडांत लहान लहान राष्ट्र-संघ बनल्यामुळें, संरक्षक राज्यपद्धति लागू करण्यास तेथें मुळींच वाव नाहीं. म्हणून त्या ठिकाणीं राजकीय दृष्ट्या ठेविलेली सरहद्द व प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेशाची सरहद्द, ही नेहमीं एकच असते; आणि बेलजम व स्वित्झर्लंड ह्या दोन देशांप्रमाणें जेव्हां एखादा लहानसा देश, शेजारीं असलेल्या बलिष्ठ राष्ट्रांच्या मजबुत सरहद्दींना त्याची सरहद्द लागलेली असल्यामुळें, राजकारणरूपी बुद्धिबळाच्या पटावर महत्त्वस्थानीं असतो, तेव्हां संरक्षक-राज्यपद्धतीच्या धोरणामुळें नव्हे, तर तटस्थ वृत्तीच्या राजकारणानें, तो परकीय अतिक्रमणापासून मोकळा ठेवण्यांत येतो.

आशिया खंडांतील संरक्षित राज्यांच्या भावी परिस्थितीचें अवलोकन केलें असतां, एक गोष्ट अगदीं उघड उघड दृग्गोचर होते, ती ही कीं, संरक्षक-राज्यपद्धति—म्हणजे प्रतिस्पर्धी राष्ट्राला ढवळाढवळ करतां येऊं नये, म्हणून एखाद्या व्यापक अनिश्चित प्रदेशाच्या सभोंवती सरहद्द-रेषा राखण्याची राज्यपद्धति—इंग्लिशांनीं अर्वाचीन काळीं आशिया खंडांतील आपली ब्रिटिश साम्राज्यरूपी इमारत बांधण्याकरितांच विशेषत: शोधून काढली होती; तथापि ह्या पद्धतीच्या अंमलबजावणीचा विशिष्ट

मक्ता इतःपर सर्वस्वी त्यांच्याकडेसच आहे, असें मात्र बिलकुल म्हणतां येत नाहीं. पूर्वकालीन रोमन साम्राज्याप्रमाणें जोंपर्यंत ब्रिटिश राष्ट्राची अशी स्थिति होती कीं, साम्राज्यरूपी वृक्षाचें बीं सर्व आशिया खंडांत कोठेंही इच्छेनुरूप पेरण्यास त्यांना प्रत्यवाय नव्हता—आणि जोंपर्यंत दुसऱ्या कोणत्याही बलाढ्य प्रतिस्पर्धी राष्ट्राबरोबर संबंध येण्याचा त्यांना प्रसंग आला नव्हता—तोंपर्यंत त्यांच्या साम्राज्याची वाढ आशियांतील रोमन सामाज्याप्रमाणेंच सावकाश व सहज रीत्या होत गेली. रोमन राष्ट्र देखील पार्थियन राष्ट्राशीं त्याचा संबंध येऊन पोहोंचेपर्यंत आपला राज्यविस्तार पूर्वेकडे झपाट्यानें करीत चाललें होतें; परंतु त्यानंतर पार्थियन राष्ट्रानें त्यांचा मोठ्या चिकाटीनें प्रतिकार केला, व त्यांना अखेरीस मागें पिटाळून लाविलें. ब्रिटिश सरकारचें आरमारी सामर्थ्य जबरदस्त असलया कारणानें दूरदूरच्या समुद्रावरील शत्रूंचा पाडाव करण्याची शक्ति त्यांच्या अंगीं आलेली असून, जमिनीवर निव्वळ अव्यवस्थित अशा एतद्देशीय राजेरजवाड्यांबरोबरच त्यांना दोन हात करावयाचे होते; परंतु एकोणिसाव्या शतकाच्या द्वितीयार्धांत व विशेषेंकरून गेल्या वीस वर्षांत पश्चिम युरोपांत अव्याहत शांतता नांदत असल्यामुळें आशिया आणि आफ्रिका या खंडांतील व्यापार व वसाहती ह्यांसंबंधानें युरोपियन राष्ट्रांत भयंकर चुरस माजलेली आहे, आणि त्यामुळें ब्रिटिश-संरक्षक-पद्धतीच्या धोरणाचें प्रत्यक्ष, किंवा सनदशीर मंडळ्यांच्या द्वारें, हुबेहुब सर्वत्र अनुकरण करण्यांत येत आहे.

फ्रान्स, इताली, जर्मनी आणि रशिया, यांच्या दाबामुळें व स्पर्धेमुळें जुन्या जगाच्या—म्हणजे ट्यूनिस, ईजिप्त, अबिसीनिया, झांझीबार, आणि आफ्रिका खंडाच्या अंतर्प्रदेशामधील असंख्य जाती व संस्थानें, आणि आशिया खंडांतील कोचीन-चीन, आनामचें राज्य, टाँकिन व अर्धवट शोध लागलेले बरेचसे सरहद्दीवरील प्रांत यांच्या—सर्व बाह्य सरहद्दीवरील संरक्षित राज्यांची झपाट्यानें वाढ होत चालली आहे.

आशिया खंडांत युरोपियन राष्ट्रांच्या ह्या पुनरागमनाचा दृश्य आणि मुख्य परिणाम काय झाला आहे? ह्याचा परिणाम हा झाला आहे कीं, युरोप आणि आशिया यांमधील राजकारणाच्या दृढ संबंधाचें पुनरुज्जीवन आजपर्यंत कधींही झालें नाहीं, इतकें अधिक स्पष्टपणें तें दृग्गोचर होऊं लागलें आहे. निकटचा संबंध दृढ करणाऱ्या बाबती, निरनिराळ्या दृष्टीनें आणि राष्ट्रांराष्ट्रांमधील भावना व प्रतिस्पर्धा यांच्या पुनरुज्जीवनानें, वाढत्या प्रमाणावर आहेत. राजकीय आणि व्यापारविषयक हितसंबंधांची क्रियाप्रतिक्रिया पुन्हां परस्परांवर होऊं लागली आहे; भूमध्य समुद्रापासून कास्पियन समुद्रापर्यंत आणि इराणी आखातापासून चीनच्या समुद्र किनाऱ्यापर्यंत जमीन व समुद्र ह्या दोन्हीही बाजूंनीं युरोपियन राष्ट्रांचा विस्तार आशिया खंडांत मोठ्या जारीनें होत आहे; आणि प्राचीन राज्यें व मंडळया युरोपियन राष्ट्रांचें युद्धकौशल्य व धाडस यांच्या अतुल सामर्थ्यापुढें अत्यंत कष्टानेंच जीव धरून राहिल्या आहेत. आशिया खंडांतील जुन्या दिग्विजयी जाति, कान्स्टांटिनोपल व तेहरान येथील तुर्की घराणीं, बुखारा येथील युझबेग, काबूलचे अफगाण, आणि आनाम व सयाम येथील राज्यकर्ते, यांनीं निरनिराळ्या प्रकारांनीं व कार्यपरत्वें कमजास्त प्रमाणानें पाश्चिमात्य राष्ट्रांचें श्रेष्ठ वर्चस्व कबूल केलेलें आहे. आणि ज्या अर्थी राजकारणरूपी ह्या विस्तीर्ण रंगभूमीवर ब्रिटिश राष्ट्रानें मुख्य भूमिका घेतली आहे, व हिंदुस्थान देश हा त्यांच्या साम्राज्याचा मुकुटमणि बनलेला आहे, त्या अर्थी हेंही उघड आहे कीं, युरोपियन राष्ट्रांच्या राजकीय वातावरणापासून व राजकारणरूपी प्रचंड प्रवाहापासून त्याला दूर ठेवणें हें सर्वस्वी व कायमचें बंद झालें पाहिजे. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या राजकारणाच्या सर्वमान्य क्षेत्रांत हिंदुस्थानचा आतां झपाट्यानें शिरकाव होत चालला आहे, हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या विस्ताराचा संबंध आतां युरोपियन राष्ट्रांच्या सरहद्दींशीं येऊन पोहोंचला आहे, आणि त्यामुळें इत:पर हिंदुस्थानचें परराष्ट्रीय धोरण व लष्करी व्यवस्था हीं आशिया खंडांतील

राजकारणाच्या अनुसंधानानें न ठरवितां युरोपांतील राजकारणाचा रागरंग पाहूनच तीं नियमित केलीं पाहिजेत, अशी वेळ आली आहे. व्यापारी मंडळ्यांत आपसांत लागलेली चुरस, परस्परांशीं स्पर्धा करण्यास उद्युक्त झालेले वसाहतवाले अथवा एतद्देशीय राजेरजवाडे यांच्याशीं झालेल्या अव्यवस्थित लढाया, यांच्या ऐवजीं ब्रिटिश सरकाराला आतां सर्व जगांतील अत्यंत दांडग्या लष्करी शक्तीच्या राष्ट्रांशीं—ह्मणजे रशिया आणि फ्रान्स ह्या राष्ट्रांशीं—तोंड द्यावें लागत आहे; कारण, अफाट मैदानें, दुर्लंघ्य पर्वतांच्या ओळी, ब्रिटिश राष्ट्राच्या उत्तरेस आक्सस नदी आणि आग्नेयेस बऱ्याच दूरवर असलेली मेक्यांग नदी, यांच्या आसमंतांतील वादग्रस्त प्रदेश, यांच्या पलीकडे हीं राष्ट्रें—रशिया, फ्रान्स आणि इंग्लंड हीं राष्ट्रें—एकमेकांस वचकून आहेत. आशिया खंडांत प्रांतसीमा चिरस्थायी असाव्या, अशी ज्यांची खरोखर मागणी असेल, त्यांनीं पूर्वी वर्णन केलेल्या गोष्टी व परस्पर व्यवहार यांचें, आणि हिंदुस्थान सरकारानें अचल व युद्धशास्त्रदृष्ट्या सुसंरक्षणीय स्थलसीमेच्या शोधार्थ केलेले अचाट प्रयत्न यांचें, सम्यक् पर्यालोचन करणें अत्यंत श्रेयस्कर आहे. नेहमींच्या प्रचारास अनुसरून, ब्रिटिश सरकारांनीं राजकीय धोरणानें ठेविलेली एक मर्यादा-रेषा आंखून, ह्मणजे प्रत्यक्ष ताब्यांतील प्रदेश व जें राष्ट्र आपल्या प्रदेशाजवळ येऊन पोहोंचलें असतां आपला शांतताभंग होण्याचा संभव आहे, अशा राष्ट्राचा प्रदेश, यांमध्यें एक संरक्षित आघात-प्रतिबंधक राज्य ठेवून, त्यांनीं आपल्या राज्यविस्ताराचा "ओ, ना, मा" घातला; परंतु या हिकमतीचा परिणाम बहुतेक नेहमीं असाच होत गेला कीं, त्यामुळें त्यांच्या राज्यविस्ताराला अधिक अधिक गति मात्र मिळत गेली आहे. कारण, आपल्या प्रतिस्पर्ध्याला पुढें पाऊलही टाकण्याला संधि मिळूं नये, ह्मणून कोणत्याही सरहद्दीपर्यंत थेट पुढें चालून जाणें अत्यंत अगत्याचें आहे, असेंच त्यांना नेहमीं आढळून आलें आहे. सांप्रत काळींही ब्रिटिश मुत्सद्दी आपल्या भावी सरहद्दीवरील प्रदेश कोठें असावा, याच्याच शोधांत आहेत; कारण, जसजसा त्यांच्या साम्राज्याचा

विस्तार होत आहे, तसतशा पूर्वींच्या मर्यादा-रेषाही नाहींशा होत चालल्या आहेत; आणि आशिया खंडांतील प्रांतिक व राजकीय वसाहतींचें निसर्गसिद्ध व हाडींमासीं मुरलेलें चांचल्य, व त्या सरहद्दींचें तात्पुरतें आणि लवचिक स्वरूप, यांचें स्पष्टीकरण करणारें ह्यासारखें दुसरें कोणतेंही ढोबळ उदाहरण आढळून येणें शक्य नाहीं.

उपसंहार.

हिंदुस्थानांत ब्रिटिश-साम्राज्य वैभवाच्या शिखरास जाऊन पोंचण्यास ज्या ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या, त्या सर्वांचे या ग्रंथांत त्रोटक व थोडक्यांत परीक्षण केलें आहे; याचें कारण—आशियांतील हिंदी-राष्ट्र ब्रिटिश सरकारच्या हस्तगत होण्याला युरोप आणि आशिया खंडांत कोणकोणत्या गोष्टी योगायोगानें कसकशा घडून आल्या, व त्यास काय काय कारणें झालीं, याचें विवेचन करावें, हें आहे. प्रस्तुत ग्रंथलेखकाच्या मताप्रमाणें याचा खुलासा करणें कठिण नाहीं. गेल्या तीन शतकांतील युरोप आणि आशिया यांमधील इतिहासक्रमाचें तुलनात्मक व लक्षपूर्वक निरीक्षण केलें असतां, हें कोडें सहज उलगडतां येण्यासारखें आहे. इंग्लंड देशासंबंधानें प्राधान्येंकरून ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं,—हें बेट समुद्रवलयांकित असल्या कारणानें परचक्र, परराष्ट्रांबरोबरील लढाया, व राज्यक्रांत्या, ह्या गोष्टींपासून त्याचा बचाव झाला; परंतु युरोप खंडांतील इतर राष्ट्रांविषयीं पाहूं गेलें असतां, वर सांगितलेल्या गोष्टींनीच त्यांच्या व्यापारासंबंधींच्या व वसाहती स्थापन करण्यासंबंधींच्या धाडसी कृत्यांना आळा बसला; व ह्याच कारणानें इंग्लंड देशाला आपल्या व्यापाराला सर्वव्यापकत्व आणितां आलें, व समुद्रावरही आपलें वर्चस्व अप्रतिहत रीतीनें कायम राखितां आलें. तथापि जरी अशा रीतीनें घडून आलेल्या गोष्टी व अशा प्रकारानें प्रस्थापित केलेलें वर्चस्व यांची पूर्वपीठिका आपणास शोधून काढतां येण्यासारखी आहे, तरीही त्याचा परिणाम पूर्वीपेक्षां

कोणत्याही रीतीनें कमी पायरीचा झाला आहे, असें मात्र बिलकुल म्हणतां येत नाहीं. आशिया खंडांतील ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासासंबंधीं विशेषत: लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, त्यांत उच्च प्रतीच्या साम्राज्याचा उदय, वृद्धि आणि विकास, ह्या गोष्टी पूर्ण व सुसंबद्धपणें दृष्टोत्पत्तीस येतात. जुन्या जगानें ब्रिटिश लोकांस रोमन-राष्ट्रपुरुषाच्या आयुष्यक्रमाचा—ह्मणजे त्याचा जन्म, तारुण्य व पूर्णावस्था, यांचा—सुसंगत इतिहास मागें ठेविलेला आहे; परंतु एखाद्या राष्ट्राच्या पूर्ण उत्क्रांतीचे चमत्कार आधुनिक काळीं क्वचितच घडतात; आणि त्यामुळें असेंही ह्मणतां येण्यासारखें आहे कीं, हल्लींच्या काळीं अस्तित्वांत असलेलें उदारहण ह्मणजे " हिंदुस्थान " हेंच फक्त काय तें होय. कोलंबसानें हिस्पानिओला हा प्रांत जिंकल्यामुळें अमेरिकेंत स्पेनच्या राज्याचा पुष्कळच व्यापक विस्तार झाला होता; परंतु ह्या शतकामध्यें त्याचे निरनिराळे तुकडे होऊन आतां तर पूर्वी ताब्यांत असलेल्या प्रदेशांपैकीं एकच तुकडा काय तो स्पेनच्या हुकमतीखालीं राहिलेला आहे. या कारणामुळें ब्रिटिश सरकारच्या हिंदी साम्राज्याची स्थिति पुष्कळच प्रकारें अद्वितीय आहे. आणि आधुनिक साम्राज्यांच्या इतिहासांत तर ह्याच्या तोडीचें दुसरें एकही राष्ट्र नाहीं. तथापि याचा भावी परिणाम चांगला होईल किंवा वाईट होईल, याबद्दल अजूनही जनसमाज साशंक आहे. जेव्हां सर जेम्स मॅकिन्टॉश यानें अशी टीका केली कीं, " इ. सन १७८३ मध्यें इंग्लंडनें उत्तर अमेरिकेमधील आपलें एक मोठें राष्ट्र गमविलें, आणि इ. सन १८०५ मध्यें हिंदुस्थानांत आपणाकरितां दुसरें एक मोठें राष्ट्र मिळविलें, " तेव्हां त्यानें आणखी असेंही लिहिलें आहे कीं, " पहिली गोष्ट हा खरा तोटा, व दुसरी गोष्ट हा कायमचा फायदा, आहे कीं काय, हें अजूनही अनिश्चितच आहे. " त्यानंतरचा आंग्लेतिहासपंडित व बराच आधुनिक ग्रंथकार, मिस्तर स्पेन्सर वालपोल, याच्या ह्मणण्याचा रोख असा आहे कीं, सरते शेवटीं कांहींही फायदा झाला, असें ह्मणतां येणार नाहीं. तो

ह्मणतो: —" पुष्कळ शतकांनंतर एखादा तत्त्वज्ञानी इतिहासकार....हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासाचें वर्णन एखाद्या अद्भुतरसपरिप्लुत कथानकाप्रमाणें करील; कारण, तो ह्मणेल कीं, त्या साम्राज्याचा मानव जातीच्या प्रगतीवर त्यामुळें कोणताही दृश्य परिणाम झालेला नाहीं." यावर असें ह्मणतां येण्यासारखें आहे कीं, हिंदुस्थानचें साम्राज्य ताब्यांत आल्यापासून इंग्लंडला भविष्य काळीं कोणताही फायदा होण्यासारखा असला, (कारण, तात्पुरता फायदा आहे, याबद्दल तर शंकाच नाहीं,) तरी हें मात्र उघड उघड दिसत आहे कीं, मानव जातीच्या सर्वसाधारण प्रगतीवर त्याचा फारच महत्त्वाचा परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. पश्चिम युरोपांतील एका प्रमुख राष्ट्रानें—स्वयंप्रकाश आणि स्वातंत्र्य यांत अग्रगामी ह्मणून प्रमुख असलेल्या ग्रेट ब्रिटनच्या राष्ट्रानें—आशिया खंडामध्यें एक अबाढव्य राष्ट्र स्थापन केलें, ही गोष्ट आतां अगदीं पूर्णपणें ठरून चुकल्या सारखीच असून त्यामुळें त्या खंडाच्या सुधारणेला अगदीं नवीन दिशा व अत्यंत जोम हीं निःसंशय आलींच पाहिजेत; शिवाय हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, रोमन राष्ट्राचा ऱ्हास होण्याला सुरवात झाल्यापासून पौर्वात्य देशांत सुधारणेचा प्रकाश पडण्याचें बंद झालें होतें. इतकेंच नव्हे, तर उलट आशियामध्यें तिची उघड उघड पूर्ण पिच्छेहाटही झाली होती. तुर्कस्थानच्या सुलतानांनीं तिला अर्धचंद्र दिला, आणि तिचें इतकें समूळ उच्चाटन केलें कीं, ईजिप्त, सीरिया, आणि आशिया मायनर, ह्या देशांत रोमन लोकांचें नांव आणि नाशावशेष ह्यांखेरीज कांहींही शिल्लक राहिलें नाहीं. उलट पक्षीं, नवीन विचार आणि सामाजिक सुधारणा, यांचें पाऊल पौर्वात्य जातींत फारच मंद रीतीनें पडत असल्यानें त्यावरून असें सिद्ध होतें कीं, आशिया खंडांतील जनसमाजाच्या पुराणाभिमानाच्या मुळाशींच अजूनही रानटीपणा दडून राहिलेला आहे;

१. मिस्तर स्पेन्सर वालपोलकृत *History of England*, भाग पांचवा, पान ४१२ पहा.

तथापि आशियाखंडांतील हिंदुस्थान ह्या फक्त एकट्याच महत्त्वाच्या देशांत कित्येक शतकें सारखी सुधारणा होत जाऊन तो पूर्व स्थितीप्रत येऊन पोंचला असून तोच देश ब्रिटिश लोकांनीं जिंकून मिळविलेला आहे.

परंतु जरी आशिया खंडांत सुधारणेचें पाऊल अद्यापपर्यंत फार सावकाश रीतीनेंच पडत आहे, तरीही युरोपियन सत्तेचा प्रसार झाल्यापासून सुधारणेची झपाट्यानें व विस्तृत प्रमाणावर लागवड करण्यास हिंदुस्थानरूपी क्षेत्राची मशागत चांगली होत चालली आहे. सर्व प्रकारचे अडथळे आणि धोके यांना तोंड देऊनही राजकीय संबंधाच्या, युद्धविषयक, व व्यापारी बाबतींच्या, कारणांकरितां, संरक्षक पद्धतीनें, नवीन सरहद्दींच्या रेषेंत विस्तृत प्रदेश ओढण्याचा क्रम ब्रिटिश सरकारांनीं सतत चालू ठेविला आहे; आणि ते मुख्यत्वेंकरून आपल्या साम्राज्याच्या मानववंशसमूहांत प्रतिवर्षीं बहुतेक नवीन भर घालीत आहेत. ज्या देशाचा राज्यकारभार शिरावर घ्यावा लागतो, अशा देशाची दिवसेंदिवस वढत्या वाढानें वृद्धिंगत होणारी मर्यादा-रेषा पाहून सर्व कालीं कोणत्याही देशांतील समंजस लोकांना निःसंशय मोठा विचार हा तर पडलाच पाहिजे; सेंट आगस्टाईन ह्यानें आपल्या प्रभूच्या निवासस्थानांतून तत्कालीन वाढत्या जगडव्याळ रोमन साम्राज्यावर नजर फेंकली; व जरी लढाया अकारण झाल्या असल्या, किंवा सकारण करण्यांत आल्या असल्या, आणि जरी जेते हे जितांपेक्षां अधिक सुधारलेले असले, तरीसुद्धां साम्राज्याचा विस्तार करण्यांत सुज्ञ मनुष्यास आनंद वाटावा कीं काय, ह्या प्रश्नाची त्यानें चर्चा केली आहे[1]. त्यानें असें अनुमान बांधलें आहे कीं, जित राष्ट्रांबरोबर लढाई चालविणें आणि त्यांत राज्यविस्तार करणें हें दुर्जनाला आनंदकारक होतें, परंतु तेंच सज्जनाला मात्र अवश्यक आहे असें वाटतें.

---

१ आपल्या साम्राज्याचा विस्तार व्हावा, अशी इच्छा सुज्ञ मनुष्यानें करणें हें योग्य आहे कीं काय ?

De Civitate Dei, Lib. IV 15.

ब्रिटिश लोकांना याहून अधिक योग्य अनुमान बांधतां येईल कीं काय, याबद्दल शंका वाटते. राज्याचा अप्रतिहत विस्तार करीत राहणें ह्याचें ब्रिटिश लोकांना बाळकडू मिळालेलें असून राज्यविस्तार हा तर इंग्लंडच्या राष्ट्राचा एक विशिष्ट गुणधर्मच बनून गेलेला आहे. चांगल्याकरितां म्हणा अगर वाइटाकरितां म्हणा, पण ब्रिटिश लोक आपल्या साहस-प्रधान अग्रगामीपणामुळें, आपलें नशीब काढण्याकरितां पृथ्वीवरील दूरस्थ देशांत पर्यटन केल्यामुळें, किंवा अक्षय युद्धकलहांत मोठ्या उल्हासानें भाग घेत राहिल्यामुळें, सांप्रतच उच्चतम स्थितीप्रत येऊन पोहोंचले आहेत; कारण, ज्याप्रमाणें परस्परविरोधी नैसर्गिक तत्त्वांपासून भौतिक जगाची उत्पत्ति झाली आहे, त्याचप्रमाणें ह्या सततच्या युद्धकलहामधून राजकीय जग उत्पन्न झालें आहे. नवीन व्यापारी पेठांची सतत चालू असलेली स्थापना, पुढील प्रदेशाचा शोध, नव्या नव्या धाडसी कृत्यांची घटना, डळमळीत राज्यकर्त्यांबरोबर आणि रानटी जमावांबरोबर होत असणाऱ्या लढाया आणि समेट, आपल्या ताब्यांतील प्रदेशाच्या संरक्षणा-ची व प्रतिस्पर्ध्यांना दूर ठेवण्याची अवश्यकता, हींच सर्व कारणें ब्रिटिश साम्राज्याच्या सरहद्दीच्या क्रमाक्रमानें होणाऱ्या वाढीला पूर्वींही कारणीभूत झालेलीं असून अद्यापिही होत आहेत.

वर सांगितल्याप्रमाणें इंग्लिशांची प्रगति फार जोरानें व विस्तृत प्रमाणावर होत असल्यामुळें तिचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य सांप्रत आशियांतील कोणत्याही राष्ट्रामध्यें उरलेलें नाहीं. ज्या प्रबळ शक्तींमुळें पूर्वकाळीं सु-राज्यव्यवस्था शतशः विदीर्ण झाली, व ज्यांनीं उदात्त धर्म-तत्त्वास धाब्यावर बसविलें, त्या प्रबळ शक्ती ही सांप्रत काळीं अस्तित्वांत नाहींत; आणि आशियांतील युद्धप्रिय राष्ट्रें अगर तेथील धर्मवेडाचें बंड, ह्यांच्यापासून आतां युरोपला बिलकुल भीति बाळगण्याचें कारण राहिलें नाहीं. आशियाचें जीवित्व आतां युरोपांतील यंत्रसामग्री आणि लष्करी सत्ता, ह्यांवरच फक्त अवलंबून आहे, इतकेंच नव्हे, तर विचारसरणी आणि

कृति ह्यांच्या सर्व बाबतींत तो अजूनही पुष्कळच मागसलेला आहे. अशा परिस्थितीमध्यें पौर्वात्य प्रतिक्रियेमुळें पाश्चिमात्यांच्या प्रगतीला दुसरा मोठा धक्का सहन करावा लागेल, हें केव्हांही संभवनीय नाहीं; व आशियामध्यें एकदां भक्कम रोंविलें गेलेलें ब्रिटिश साम्राज्य एखाद्या बलिष्ठ युरोपस्थ प्रतिस्पर्ध्याशिवाय दुसऱ्या कोणाच्यानेंही उखडून काढविलें जाणार नाहीं. इतःपर होणाऱ्या झटापटी ह्या पौर्वात्य आणि पाश्चिमात्य जातींमध्यें होणार नाहींत, तर त्या पश्चिमेकडीलच मोठाल्या व्यापारी आणि दिग्विजयी राष्ट्रांमध्यें आशिया खंडांत वर्चस्व मिळविण्याकरितां होतील. ह्या झटापटीपासून वास्तविक रीत्या ब्रिटिश सरकाराला आतां फारशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. दरम्यान हिंदुस्थानांतील जनसमाजाच्या बुद्धिवैभवाचा विकास करण्याची जबाबदारी त्यांनीं आपल्या अंगावर घेतली आहे, आणि सर्व हिंदुस्थान देशाची विचारसरणी, धार्मिक कल्पना व नैतिक उन्नति, ह्यांस वळण देण्याची त्यांनीं सुरवात केली आहे. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या परस्परविरुद्ध ओघामध्यें हिंदुस्थानचें चौकस आणि धूर्त मन आपल्याकरितां कोणता मार्ग शोधून काढील, ह्याबद्दल भविष्य कथन करण्याचें ह्या वेळेपर्यंत कोणीही धाडस केलेलें नाहीं; परंतु ज्ञानाचा प्रसार व भौतिक परिस्थितीचा बदल ह्या गोष्टींचा सावकाश रीतीनें मानसिक विचारसरणीवर परिणाम होत आहे, आणि जी शक्ति एखाद्या बलाढ्य व सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या राष्ट्रांतील कोट्यावधि जनसमूहाचें शील बनवूं शकते, आणि त्यांच्या भविष्यकालीन कार्यक्रमास सुव्यवस्थित असें मूर्त स्वरूपही देऊं शकते, त्या शक्तीचें भावी इतिहासकारास हें एक दुसरें संस्मरणीय उदाहरण आहे, असें खात्रीनें

१. हा लेख इ. सन १८९४ मध्यें लिहिला गेला आहे. परंतु त्यानंतर रुसो-जपानी युद्धामुळें—ह्मणजे युरोपांतील रशिया व आशियांतील जपान यांचेमध्यें युद्ध होऊन त्यांत जपान हें पौर्वात्य राष्ट्र पूर्ण विजयी झाल्यामुळें—आशियांतील भविष्यकालीन आकांक्षा व राजकीय परिस्थिति यांचेमध्यें त्या वेळेपासून महत्त्वाचा फेरफार झालेला आहे.

म्हणण्यास कांहींही हरकत नाहीं. आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचें अखेरीस कसेंही पर्यवसान होवो, परंतु ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानवासी जनांचे मोठमोठाले आणि कायमचे फायदे केलेले आहेत, व आपल्या स्वतःचीही इतिहासांत अजरामर कीर्ति करून ठेविली आहे, यांत बिलकुल संशय नाहीं.

---

१. "मी कबूल करतों कीं, रोमन साम्राज्याच्या अद्भुततेंत दिसून येणारें अननुभूत नैतिक प्रावल्य आणि आधिभौतिक सत्ता, यांच्या निकट संबंधामुळें माझ्या कल्पनाशक्तीस 'न भूतो न भविष्यति' असें चैतन्य मिळालेलें आहे."

Merivale's *History of the Romans under the Empire*, *Vol.* VII, मधील प्रस्तावना पहा.

हा भाग एकोणिसावें शतक संपण्याच्या पूर्वी लिहिलेला आहे, असें समजावें. त्यानंतर विसाव्या शतकाच्या प्रारंभाला राजकीय कामाकाजाची स्थिति आणि त्यांचा रोख यांत फेरबदल झालेला असून त्यामुळें आशियांतील सर्वसाधारण राजकीय परिस्थितीवर आणि मुख्यतः हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय संबंधांवर महत्त्वाचा परिणाम झाला आहे. एकोणिसाव्या भागाच्या पहिल्या परिच्छेदामध्यें इ. सन १९०७ पर्यंतचा हिंदुस्थानच्या बाह्य राजकारणाचा तपशील त्रोटक रीतीनें दिलेला आहे; परंतु तो भाग प्रसिद्ध झाल्यानंतर आशिया खंडांतील राजकीय प्रश्नांची स्नेहभावानें तडजोड करण्याबद्दलचा ग्रेट ब्रिटन व रशिया यांच्यामधील करार पूर्ण होऊन त्यामुळें हिंदुस्थानच्या अफगाणिस्थानाकडील सरहद्दीसंबंधींची आणि इराणच्या कामाकाजाच्या बाबतींची ब्रिटिश सरकारची स्थिति पुष्कळच सुधारलेली आहे.

(आ॰ का॰ ला॰)

भाग एकोणिसावा.

राणीसरकारच्या अमलाखालील हिंदुस्थान.

(इ. सन १८५८–१९०७)

परिच्छेद पहिला—बाह्य राजकारण.

मागील भागांत मोंगल साम्राज्याचे झपाट्यानें तुकडे पडल्यामुळें सर्व प्रदेशभर राजकीय अंदाधुंदी सुरू झाल्यापासून त्या साम्राज्याच्या ऱ्हासावर ब्रिटिश सत्तेची पूर्ण स्थापना होई पावेतों हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या ताब्यांतील प्रदेशाची हळूहळू कशी वाढ होत गेली, याबद्दल संक्षेपानें वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. अठराव्या शतकाच्या मध्यापासून सुमारें एक शतकपर्यंत हिंदुस्थानांत इंग्लिश सरकार सत्ता मिळवूं पाहणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करण्यांत, आणि आपल्या सार्वभौमत्वाखालील विस्कळित प्रदेशांची स्थिरस्थावर आणि एकीकरण करण्यांत, गढून गेलें होतें. पाश्चिमात्य देशांमध्यें प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासाची योग्य विभागणी कशीही केली जात असो, तथापि हिंदुस्थानामध्यें ज्या ज्या मितीस एखादा प्रांत अगर राज्य इंग्लिशांच्या सत्तेखालीं आलें, ती ती मिति सर्वत्र प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासाला विभागणारी रेषा आहे, असें ह्मणणें वावगें होणार नाहीं. परंतु जर सर्व हिंदुस्थानची एकच रेषा रेखाटणें अवश्यक असेल, तर सर्वसाधारणतः इ. सन १८५८ मध्यें, ह्मणजे ज्या वेळीं हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें "चक्रवर्तिनी" म्हणून महाराणी व्हिक्टोरिया हिनें प्रत्यक्ष आपल्या हातांत घेतलीं, तो काळ होय, असें



हिंदुस्तान
इ. स. १८५७
अफगाणिस्तान
काश्मीर
पंजाब
तिबेट
नेपाळ
भूतान
हिंदुस्तान
माळवा
गुजराथ
वऱ्हाड
म्हैसूर
आसाम
ब्रह्मदेश
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
मुंबई
पुणें
सातारा
गोवें
मंगळूर
कालिकत
कोचीन
मद्रास
पांदिचेरी
कलकत्ता
दिल्ली
आग्रा
लाहोर
कराची
हैदराबाद
नागपूर
कटक
सिलोन
लखदीव बेटें
मिनिकोय बेट
अंदमान
निकोबार बेटें
कार निकोबार
रंगांचा तपशील.
ब्रिटिश,............ गुलाबी.
फ्रेंच,............ निळा.
डच,............ पिंगट.
पोर्तुगीज,............ हिरवा.
इंग्लिश मैलांचें प्रमाण.
१०० ० १०० २०० ३००
७० ग्रीनिच पासून पूर्व रेखांश

गृहीत धरितां येईल. बंगालच्या शिपायांनीं केलेल्या बंडाच्या धक्क्यामुळें उत्पन्न झालेलें आंदोलन इ. सन १८६० पूर्वी पूर्णपणें बंद पडलें नव्हतें; परंतु त्या भयंकर आगीच्या भडक्याच्या उष्णतेनें भावी अप्रीतीचीं सर्व बीजें पार वितळून गेलीं, आणि राज्याचे निरनिराळे अवयव एकत्र करण्यांत येऊन त्यांचें एक आटोपसर राष्ट्र बनविण्यांत आलें. तो भयंकर वणवा शांत झाल्याबरोबर हिंदुस्थानांतील लढायांची लांबलचक मालिका बंद पडली, व पुढील पन्नास वर्षांत हिंदुस्थानामध्यें अंतःस्थ शांतता राहिली.

राणी सरकारच्या जाहिरनाम्याच्या द्वारें असें प्रसिद्ध करण्यांत आलें कीं, हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें ईस्ट इंडिया कंपनीच्या हातांतून काढून राणी-साहेबांनीं प्रत्यक्ष आपणाकडे घेतलेलीं आहेत; एतद्देशीय राजेरजवाड्यां-बरोबर कंपनी सरकारनें केलेले सर्व तह आणि करारमदार पाळले जातील; राणीच्या हिंदुस्थानांतील प्रजेच्या धार्मिक श्रद्धा समजुतींत ढवळाढवळ केली जाणार नाहीं; आणि शक्य तेथपर्यंत सर्व हिंदी प्रजाजनांना बिन-हरकत आणि निःपक्षपातपणानें सरकारी नौकरींत अधिकाराच्या जागा देण्यांत याव्या, अशी त्यांची इच्छा आहे. अशा शुभ चिन्हांनीं शांतता स्थापन करण्याचें आणि सुधारणा घडवून आणण्याचें कार्य झपाट्यानें सुरू झालें. इ. सन १८५६ मध्यें औधचें राज्य खालसा झालें, आणि दोन वर्षांच्या धामधुमीनंतर त्या प्रांतांत शांतता प्रस्थापित झाली. त्यांतील मोठमोठ्या जमिनदारांना निःशस्त्र करण्यांत आलें, आणि त्यांच्याशीं फायदेशीर जमाबंदीचे करार केल्यामुळें ते अनुकूलही झाले. पंजाबमध्यें—ह्मणजे ज्या ठिकाणीं शीख लोकांच्या झुंडीच्या झुंडी इंग्लिशांच्या सैन्यांत नौकरी धरून बंडवाल्यांविरुद्ध मोठ्या शौर्यानें लढल्या, तेथें—सर जान लॉरेन्स याच्या उत्साही आणि शहाणपणाच्या राज्यकारभारामुळें सर्व वर्गांचा नवीन राज्यकर्त्यांशीं समेट झाला. जुन्या राजघराण्यांतील शेवटचा नाम-धारी प्रतिनिधि दिल्ली येथील आपल्या राजवाड्यामधून नाहींसा झाला न झाला, तोंच एका नवीन राजसत्तेची, ह्मणजे ब्रिटिश साम्राज्याची,

संस्थापना करण्यांत आली; आणि जाहिरनामे व कायदे यांच्या परंपरेनें मोंगल राष्ट्राच्या अवयवांची राजकीय पुनर्घटना करण्यांत आली. ब्रिटिश हिंदुस्थान---ह्मणजे इंग्लिशांच्या प्रत्यक्ष राज्यकारभाराखालील प्रदेश---याविषयींच ह्मणावयाचें, तर ह्या काळचा इतिहास म्हणण्यासारखा महत्त्वाचा नाहीं; कारण, त्या काळांत अंतःस्थ राजकारण आणि राज्यव्यवस्थेमध्यें सुधारणा एवढ्याच गोष्टी काय त्या घडलेल्या आहेत. तथापि बाह्य राजकारणासंबंधीं थोडीशी माहिती देणें अगत्याचें आहे. म्हणजे ज्यांचा मुलूख इंग्लिशांच्या प्रत्यक्ष अमलाखालीं नसूनही इंग्लिश राज्यानें वेष्टिलेला आहे, अशा एतद्देशीय संस्थानांविषयीं प्रथम थोडिशी माहिती देऊन, नंतर इंग्लिशांच्या प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या मुलखाच्या सरहद्दीस भिडलेल्या देशांत घडलेल्या अनेक गोष्टी व राजव्यवहार, यांपैकीं जे विशेष महत्त्वाचे आहेत, त्यांचें थोडक्यांत वर्णन करणें अवश्यक आहे.

ब्रिटिश सरकारच्या सार्वभौमत्वाखालीं मांडलिक या नात्यानें हिंदुस्थानांतील सर्व एतद्देशीय संस्थानें आणण्याची जी पद्धति तैनाती तहाच्या द्वारें लार्ड वेलस्ली यानें सुरू केली, आणि जी त्याचेमागून आलेल्या गव्हर्नर जनरलांनीं पुढें चालू ठेविली, तिचें पूर्वीं थोडक्यांत वर्णन करण्यांत आलेलेंच आहे. या पद्धतीला अनुसरून सार्वभौम सरकारानें त्यांचें परशत्रूपासून संरक्षण करण्याची आणि त्यांच्या राज्याची मजबुती राखण्याची हमी आपणाकडे घेतलेली आहे. तेंच ब्रिटिश सरकार त्यांच्या आपआपसांतील भांडणांमध्यें मध्यस्थी करतें; संस्थानांच्या वारसाईबद्दलच्या बाबतींतील सर्व हक्क ठरवितें; फंदफितुरीविरुद्ध मांडलिक राज्यकर्त्यांच्या कायदेशीर अधिकाराचें संरक्षण करतें; आणि गंभीर स्वरूपाची अव्यवस्था अगर सत्तेचा अतिशय दुरुपयोग या बाबतींत त्यांच्या अंतःस्थ कारभारामध्येंही हात घालतें. इ. सन १८६० मध्यें लार्ड क्यानिंग यानें या सर्व राजेरजवाड्यांना राणी सरकारची अशी इच्छा असल्याबद्दल हमी दिली कीं, त्यांचीं संस्थानें सतत चालू ठेवण्यांत येतील, आणि त्याच-

प्रमाणें आपापल्या घराण्यांच्या चालीरीती व नियमनिबंध यांना अनुसरून मागाहून गादीवर बसणाऱ्याचें केलेलें दत्तविधान मान्य आणि मंजूर करण्यांत येईल. ह्या हमीचा परिणाम असा झाला कीं, राजकीय धोरणाचें एक विशिष्ट तत्त्व ठरलें, व त्यामुळें वारसपणाचा हक्क नियंत्रित व निश्चित झाला, आणि औरस संततीच्या अभावीं आपलीं राज्यें खालसा होतील, अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं, अशीही त्यांची विशेषतः खातरजमा करण्यांत आली.

ह्या संस्थानांच्या अमलाखालीं असलेला प्रदेश ढोबळ मानानें पाहतां ६,५०,००० चौरस मैल असून लोकसंख्या अजमासें ६ कोटि ६० लक्ष आहे. आणि तीं—हैद्राबादसारख्या एक कोटि पंधरा लक्ष लोकसंख्येच्या संस्थानापासून तों तहत एक हजार लोकवस्तीहूनही कमी असलेल्या संस्थानांपर्यंत--लहानमोठ्या आकारमानाचीं आहेत. मागें सांगितल्याप्रमाणें हीं संस्थानें ह्मणजे मोंगल राष्ट्राच्या ऱ्हासानंतर लढाईमध्यें जय मिळवून किंवा मनगटाच्या जोरावर संपादन करून घेतलेले प्रांत अगर मिळकती होत, किंवा सार्वत्रिक अंदाधुंदीच्या काळांतून बचावलेल्या व इंग्लिशांच्या सार्वभौम सत्तेच्या स्थापनेमुळें संरक्षण झालेल्या संस्थानिकांच्या वंशपरंपरा चालत आलेल्या जहागिरीच होत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

इ. सन १८६० पासून आज तागाईत पावेतों ह्या संस्थानांच्या अंतःस्थ शांततेमुळें नोंद करण्यालायक अशा फारच थोड्या गोष्टी घडलेल्या आहेत. तथापि कांहीं राज्यकर्त्यांच्या व्यक्तिविषयक अक्षम्य दुर्वर्तनांबद्दल अगर भयंकर गुन्ह्यांबद्दल त्यांना शिक्षा देण्याकरितां अगर गादीच्या वारसाई हक्काच्या भांडणाचा आपल्या अधिकारानें निर्णय करण्याकरितां ब्रिटिश सरकारला कित्येक प्रसंगीं मध्यें पडणें खरोखर भाग झालेलें आहे. मोठमोठ्या संरक्षित संस्थानांच्या राजधानींत तैनाती इंग्लिश सैन्य ठेवण्यांत आलें आहे, व त्यामुळें तेथील राज्यकर्त्यांच्या हक्काचीच केवळ नव्हे, पण आपल्या प्रजेसंबंधींच्या त्याच्या कर्तव्याचीही हमी रहात

आहे. शिवाय जेथें गादीवर बसण्याबद्दल वारसाईचा वाद अगर संशय असेल, त्या ठिकाणीं वादग्रस्त हक्काच्या बाबतींत नेहमीं मध्यस्थी करणें, प्रसंगविशेषीं बंड मोडणें, किंवा क्वचित् प्रसंगीं एखाद्या राज्यकर्त्यानें अगर त्याच्या प्रधानानें केलेल्या गर्हणीय अपराधाबद्दल अगर गंभीर स्वरूपाच्या गैरवर्तणुकीच्या कृत्याबद्दल त्यांना शिक्षा देणें,इत्यादि गोष्टी करणें ब्रिटिश सरकारास भाग पडलेलें आहे. अशा रीतीनें मध्यस्थीच्या हक्काचा उपयोग केल्याचीं ह्मणून दोन असाधारण गंभीर स्वरूपाचीं उदाहरणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. इ. सन १८७६ मध्यें बडोद्याच्या मल्हारराव गायकवाडाचा—तो तेथील इंग्लिश रेसिडेंट, कर्नल फेअर, याचा जीव घेण्याच्या प्रयत्नांत सामील होता, ह्मणून—एक कामिशन नेमून त्यामार्फत चौकशी करण्यांत आली; आणि तींत त्यानें राज्यकारभार अत्यंत अयोग्य रीतीनें चालविल्याबद्दल तो दोषी ठरल्यामुळें त्याला कायदेशीर रीतीनें गादीवरून पदच्युत करून मद्रास येथें राजकीय कैदी ह्मणून अटकेंत ठेवण्यांत आलें. त्यानंतर इ. सन १८९१ मध्यें बंगालच्या पूर्व सरहद्दीवर असलेल्या मणिपूर ह्या नांवाच्या एका लहानशा संस्थानाच्या महाराजानें, त्याच्या भावाच्या धुरीणत्वाखालीं लष्करी बंड सुरू झाल्यामुळें पळून येऊन, ब्रिटिश अमलाखालील हिंदुस्थानचा आश्रय घेतला. असामचा चीफ कमिशनर, मिस्तर क्विंटन, हा या बाबतींत चौकशी करण्याकरितां आणि बंडावा मोडून टाकण्याचे इलाज योजण्याकरितां मणिपूर येथें गेला; परंतु त्याचा आणि त्याच्याबरोबर असलेल्या कांहीं अधिकाऱ्यांचा, मसलतीचें मिष दाखवून, खुद्द मणिपूर येथेंच विश्वासघातानें खून करण्यांत आला. त्यामुळें इंग्लिश सैन्य तिकडे पाठविण्यांत आलें, आणि या खुनामध्यें संबंध असलेल्यांना शिक्षा होईपर्यंत त्या सैन्यानें तात्पुरतें तें संस्थान आपल्या ताब्यांत घेतलें. राज्यकर्त्या महाराजानें गादीवरील आपला हक्क सोडून दिला; आणि त्याची राज्य चालविण्यासंबंधींची अपात्रता निःसंशयपणें

शावीत झाल्यामुळें राज्यकर्त्या घराण्यांतील दुसऱ्या कायदेशीर वारसास त्याच्या ऐवजीं तेथील गादीवर बसविण्यांत आलें.

ब्रिटिश सरकारानें दक्षिण हिंदुस्थानांतील म्हैसूर संस्थानाचें पुनरुज्जीवन केल्यामुळें या स्वसत्तात्मक संस्थानांच्या मालिकेंत एक महत्त्वाची भर पडली आहे. आणि मागील एका भागांत ह्या संस्थानाच्या पूर्व इतिहासासंबंधीं त्रोटक उल्लेखही करण्यांत आलेला आहे. हा प्रदेश हैदर अल्ली यानें बळकाविलेला होता, आणि जेव्हां लार्ड मार्निंगटन ह्यानें टिपू सुलतानापासून तो पुन्हां जिंकून परत घेतला, तेव्हां त्यांतील कांहीं भाग जुन्या हिंदू राजघराण्याकडे पुन्हां सोंपविण्यांत आला होता. परंतु इ. सन १८३१ मध्यें त्या संस्थानचा राज्यकारभार हिंदुस्थान सरकारास आपणाकडे घ्यावा लागून तो तसाच पुढें पन्नास वर्षेपर्यंत स्वतःकडेच चालू ठेवणें त्यांना भाग पडलें. म्हैसूर येथील जुन्या हिंदू राजघराण्याकडून हें संस्थान सुमारें एक शतकापूर्वीं काढून घेण्यांत आलें होतें; तथापि इ. सन १८८१ मध्यें त्या घराण्याच्या वंशजाच्याच अमलाखालीं इंग्लिशांचें सार्वभौमत्व मान्य करावें, व म्हैसूरच्या प्रजाजनाचें कल्याण करावें, या शर्तीवर त्याची पुनर्घटना करण्यांत आली. म्हैसूर संस्थानाकडून ह्या शर्ती आजपर्यंत इमानानें पाळण्यांत आलेल्या आहेत, आणि संस्थानिकांचें प्रांतिक स्वातंत्र्य कायम राखावयाचें, असा जो हेतु ब्रिटिश सरकारानें जाहीर केला होता, त्या हेतूपासून तें ढळलें नाहीं, याबद्दल हिंदुस्थानभर सर्व एतद्देशीय राज्यकर्त्यांकडून त्यांच्या ह्या न्यायी आणि राजनीतिहेतुक कृत्याची वाहवा झालेली आहे.

परंतु हिंदुस्थानच्या बाह्य सरहद्दीच्या आंत असलेल्या लहान लहान संस्थानांबरोबरील इंग्लिशांचे संबंध यशस्वीपणानें राखण्यांत व बळकट करण्यांत येत असतांना, त्यांच्या सरहद्दीपलीकडील कारभाराचा ओघ महत्त्वाच्या घडामोडींमुळें आणि त्यांच्या परिणामांमुळें गुंतागुंतीचा झाला

१. भाग १४ पान ३१७ पहा. २. मागाहून मार्किस ऑफ वेलस्ली.

आहे. इ. सन १८४९ मध्यें इंग्लिशांनीं पंजाब प्रांत खालसा केल्यामुळें त्यांचें राज्य थेट अफगाणी पर्वतांच्या पायथ्यापर्यंत जाऊन भिडलें, आणि त्यामुळें लढवय्या जातीनें वस्ती केलेल्या डोंगराळ प्रदेशांशीं त्यांच्या सरहद्दीचें अगदीं निकट सान्निध्य झालें. ह्या लढवय्या लोकांना कित्येक शतकांपासून खालील सपाट प्रदेशांवर लुटालुटीच्या स्वाऱ्या करण्याची संवय झालेली होती. त्यामुळें आपल्या प्रदेशाचें संरक्षण करण्याकरितां आणि असह्य लूटफाटीबद्दल शिक्षा करण्याकरितां ह्या डोंगराळ प्रदेशांवर इंग्लिशांनीं पुष्कळ स्वाऱ्या केल्या; परंतु तेथील अनिवार रानटी लोकांवर त्याचा कायमचा असा फारच थोडा परिणाम झाला; किंबहुना, झालाच नाहीं, असें ह्मटलें, तरी चालेल. इ. सन १८६३ मध्यें पेशावरच्या दरीवरील टेकड्यांत धर्मवेड्या मुसलमानांच्या एका वसाहतीवर एक बळकट सैन्याची तुकडी पाठविणें ब्रिटिश सरकारास अवश्यक झालें; कारण, त्यांच्या लुटालुटीच्या स्वाऱ्यांमुळें सर्व सरहद्दीची बाजू नेहमीं धोक्यांत राही, आणि त्यामुळें आसपासच्या जातींनाही त्यांच्या उदारहणानें त्यांना सामील होण्यास उत्तेजन मिळत असे. अंबेयला नांवाच्या खिंडींत इंग्लिश सेनापतीला—आसपासच्या सर्व जातींच्या जमावानें आपल्या बरोबरील सामन्याला तोंड दिलें आहे,—असें आढळून आलें, व त्यामुळें त्याला आत्मसंरक्षणासाठीं बंदोबस्ताच्या ठिकाणाचा आश्रय घेणें भाग पडलें. ह्या ठिकाणीं त्याच्यावर निकरानें हल्ला करण्यांत आला, आणि त्या सैन्यावर कांहीं काळपर्यंत भयंकर संकटही ओढवलें. हा प्रसंग बिकट होता; कारण, इंग्लिश सैन्य जर पराभूत झालें असतें, तर सरहद्दीवरून ब्रिटिश सरकारच्या प्रदेशांत घुसण्याकरितां एकसहा सर्व जातींनीं उचल केली असती. कुमक येईपर्यंत कांहीं निकराच्या चकमकी सुरू होत्या; त्यानंतर शत्रूचें भयंकर नुकसान झाल्यामुळें त्याचे पुढारी तह करण्यास तयार झाले. त्या धर्मवेड्या लोकांचा किल्ला जमिनदोस्त करण्यांत आला, आणि त्यांच्या जमावाची पूर्णपणें पांगापांग करण्यांत आली. ह्या मोहिमेला "अंबेयला मोहीम" असें नांव असून

ब्रिटिश हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील जातींकडून आजपर्यंत जे जे
हल्ले आणि लहान लहान लढाया यांची उठावणी करण्यांत आली, त्या
सर्वांत ही अत्यंत धोक्याची आणि संकटाची होती. या मोहिमेसंबंधीं
येथें दिलेली ही त्रोटक हकीकत, ब्रिटिश सरकारानीं आपल्या प्रदेशाच्या
वाढीस मर्यादा ठरवून तेथेंच एकदम थांबण्याचा, आणि हद्दीची एक रेषा
आंखून त्यापलीकडील प्रदेशाच्या कारभारांत ढवळाढवळ न करण्याचा,
जेव्हां जेव्हां निश्चय केला, तेव्हां तेव्हां अस्वस्थता व असुरक्षितता यांचें
प्राबल्य कसें माजलें, हें दाखविण्यास उपयोगी पडेल. ज्याप्रमाणें आशिया-
च्या पुष्कळ भागांत कृत्रिम पाण्याच्या पाटानें लागवड केलेली जमीन
एकदम संपून त्यापलीकडे ओसाड प्रदेश दृष्टीस पडतो, त्याचप्रमाणें
स्थिर सुधारणेच्या सीमेबाहेर लगतच मूळचा रानटीपणाही राहूं शकतो.
आणि त्यामुळें सामाजिक व राजकीय स्थितींमधील हा विरोध हिंदुस्थान-
च्या वायव्य सरहद्दीवरील परिस्थितीवरून तंतोतंत दृग्गोचर होतो. या
रानटी जातींच्या प्रदेशांत राज्यव्यवस्थेचें नियंत्रण सुरू करणें हें अतिशय
खर्चाचें आणि संकटाचें काम आहे; परंतु सतत राहणारी अव्यवस्था नाहींशी
करण्याकरितां दुसरे कोणतेही परिणामावह असे उपाय अद्याप सांपडले
नसून, त्यामुळें हें कोडें अजूनही उलगडावयाचें बाकी राहिलेलें आहे.

अशाच कारणांमुळें आणि परिस्थितीमुळें इ. सन १८६४ मध्यें
ब्रिटिश सरकारास भूतानबरोबर युद्ध करणें नाइलाजानें भाग झालें. भूतान
हें हिमालय पर्वताच्या बाहेरील ओळींत नेपाळच्या पूर्वेस एक लहानसें संस्थान
असून तेथील लोक गरीब आणि अडाणी आहेत. हे भूतानी लोक बंगालच्या
प्रदेशावर लुटीसाठीं स्वाऱ्या करीत. ह्या स्वाऱ्यांपैकीं एकांत त्यांनीं ब्रिटिश
सत्तेखालील कांहीं प्रजाजन बंदिवान करून नेले; ह्मणून त्या लोकांची
सुटका करावी, अशी मागणी करण्याकरितां एक वकीलमंडळ त्या संस्थानच्या
राजधानीच्या ठिकाणीं पाठविण्यांत आलें. परंतु भूतानी लोकांनीं त्यांची
विनंति धिक्कारयुक्त रीतीनें नाकारली, आणि त्यांना अतिशय उर्मट रीतीनें

वागविलें, आणि शरीरदंड भोगावा लागेल अशी धमकीही दिली. त्यामुळें ह्या कृत्याची भरपाई आणि बंदीजनांची मुक्तता करून घेण्याकरितां त्या देशांत ब्रिटिश सरकारास हत्यारी सैन्य पाठविणें भाग पडलें. परंतु डोंगराळ आणि जंगली प्रदेशामध्यें त्या सैन्याची प्रथमपासूनच शिस्तवार व्यवस्था न ठेविली गेल्यामुळें त्याला हार खावी लागली, आणि त्यामुळें कांहींशा अव्यवस्थेनें त्यांना परत फिरणें भाग पडलें. परंतु भूतिया लोकांची, पुन्हां आपल्यावर इंग्लिशांचें नवीन सैन्य अधिक जोरानें चाल करून येईल, अशी अटकळ झाल्यामुळें, ते तह करण्यास तयार झाले; आणि या तहाअन्वयें हिमालयाच्या पायथ्याजवळील जमिनीचा पट्टा इंग्लिशांना कायमचा दंडादाखल देणें त्यांना भाग पडलें. त्यानंतर त्यांनीं चीड उत्पन्न करण्यासारखीं कृत्यें केलीं नाहींत. शिवाय, भूतान हें संस्थान ज्या राज्यकर्त्याच्या ताब्यांत आहे, त्याचा ह्या मर्यादित प्रदेशावर सर्वत्र कांहींसा जारी अंमल चालतो; त्यामुळें वायव्येकडील अनियंत्रित जातींबरोबर केलेल्या व्यवस्थेपेक्षां जास्त कायमची व्यवस्था त्याजबरोबर करणें सोपें झालें.

बलुची जातींचा प्रदेश, ह्मणजे बलुचिस्थान, हा पंजाब आणि सिंध यांच्या पश्चिम सरहद्दीवर असून तो अरबी समुद्रापर्यंत पसरलेला आहे. बलुचिस्थान हें एका राज्यकर्त्याच्या नामधारी सत्तेखालीं अगर धुरीणत्वाखालीं असून त्याच्या राजधानीचें शहर खिलात हें आहे. तेथील राज्यकर्त्याविरुद्ध प्रतिपक्षीय टोळ्यांचे बंडखोर पुढारी नेहमीं पुंडाई माजवीत; परंतु त्यांना दाबांत ठेवण्यास त्यास पुरेसें सामर्थ्य नव्हतें. ह्मणून त्यांच्या लुटारूपणामुळें इंग्लिशांच्या सरहद्दीस नेहमीं त्रास पोहोंचत असे. इ. सन १८७६ मध्यें लार्ड लिटन हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल असतांना मेजर सॉंडमन ह्यास खान आणि इतर पुढारी यांचेमध्यें मध्यस्थी करण्याकरितां, व्यापारी रस्ते खुले करण्याची तजवीज करण्याकरितां, आणि सरहद्दीवर सर्वत्र शांतता ठेवण्याची खटपट करण्याकरितां, पाठविण्यांत आलें. तेथील खानाबरोबर तहाची वाटाघाट करण्यांत आली, आणि तींत

त्यास यश आलें. त्याजबरोबर झालेल्या तहाअन्वयें खानानें बलुचिस्थानामध्यें ब्रिटिश सरकारचें वर्चस्व आणि त्यांची श्रेष्ठ नियामक सत्ता हीं कबूल केलीं, व त्याऐवजीं इंग्लिशांनीं त्याचें संरक्षण करण्याचें व त्यास आधार देण्याचें कबूल केलें. दुसऱ्या लहान लहान सरदारांनींही इंग्लिशांनीं घातलेल्या तहाच्या अटी मान्य केल्या; त्यामुळें सतत चालणारे आपआपसांतील कलह, फाटाफुटीमुळें होणाऱ्या लढाया, आणि अव्यवस्थित राज्यकारभार, यांना आळा बसला; आणि त्या वेळेपासून ह्या प्रदेशांत शांतता इतक्या झपाट्यानें होत गेली कीं, या क्षणीं इंग्लिश प्रतिनिधीची सत्ता बलुचिस्थानांत पश्चिमेस थेट इराणच्या सरहद्दीपर्यंत चालत असून तेथील राज्यकारभारही त्याच्याच देखरेखीखालीं व तंत्रानें चालविण्यांत येत आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांतून पलीकडे जाण्याचे खिंडीचे रस्ते खुले करण्यांत आले, तेथें पहारे ठेवण्यांत आले, आणि बलूची प्रदेशास दक्षिण अफगाणिस्थानापासून विभक्त करणाऱ्या सरहद्दीजवळच कंदाहारच्या रस्त्यावर केटा येथें एक एतद्देशीय सैन्याची तुकडी ठेवण्यांत आली. आणि ह्या पुरोगामी लष्करी छावणीचें व तिच्या मागील बाजूस बोलन घाटामधून हिंदुस्थानांत दळणवळण सुरू करण्याचें महत्त्व त्यानंतर घडलेल्या गोष्टींवरून पुढें बहुतेक लवकरच सिद्ध झालें.

या लहानशा भागांत इ. सन १८७८ ते १८८१ मधील अफगाण युद्धाच्या पूर्वी घडलेल्या व त्यास कारणीभूत झालेल्या गोष्टी व व्यवहार, यांबद्दल सविस्तर रीतीनें वर्णन देणें अशक्य आहे. तथापि युरोपांतील युद्ध आणि राजकारण या जास्त व्यापक गोष्टींशीं व मध्य आशियांतील रशियाच्या धोरणाशीं त्यांचा अतिशय निकट संबंध होता, ही गोष्ट येथें नमूद करण्यास हरकत नाहीं.

जेव्हां इंग्लिशांच्या ताब्यांतील हिंदुस्थानची त्याच्या भूगोलविषयक सीमेपर्यंत, ह्मणजे समुद्र किनाऱ्यापासून तों थेट पर्वतापर्यंत, वाढ झाली, त्या वेळीं आशियांत यापुढें इंग्लिशांच्या युद्धपुराणाची समाप्ति

झाली, असें वाटणें स्वाभाविक होतें. समुद्रावरील त्यांचें वर्चस्व अबाधित होतें, व खुष्कीच्या बाजूनें दुसऱ्या कोणत्याही देशाला अशा प्रकारची विशेष मजबुत नैसर्गिक तटबंदी नव्हती. परंतु एकोणिसाव्या शतकांतील दुसऱ्या अर्धभागांतील आशिया खंडाच्या इतिहासांत प्रधान विषय ह्मटला, ह्मणजे युरोपियन वर्चस्वाची वाढ हा असून त्यामुळें सर्वसाधारण राजकीय वातावरणांत अस्थिरता उत्पन्न होईल, असें भासूं लागलें होतें. कारण, आशियांतील सर्व राज्यांना आपल्या बलिष्ठ शेजाऱ्यांचा वाढता दाब जाणवूं लागला असून उलट युरोपियन राष्ट्रें एकमेकांना दूर ठेवण्याकरितां धडपड करीत होतीं, आणि त्यांच्या सरहद्दी हळूहळू जवळ येत चालल्यामुळें तीं मत्सरानें व साशंक होत्सातीं परस्परांच्या सरहद्दींच्या विस्ताराकडे भीतिपुरःसर लक्ष देऊन पहातही होतीं. आशिया खंडामध्यें इंग्लिशांचें राज्य एकदाचें अफगाण पर्वतांच्या पायथ्याशीं स्वाभाविक अखेरच्या ठरीव हद्दीपर्यंत जाऊन पोहोंचलें, असें वाटण्याचा संभव होता; परंतु रशियाच्या मध्य आशियांतील वाढत्या दिग्विजयाबरोबरच त्याच्या पुरोगामी गतीलाही तितकाच वाढता वेग मिळाला, व त्यामुळें त्यानें आपला राज्यविस्तार करण्यासही झपाट्यानें सुरवात केली. राजकारण आणि लष्करी धोरण ह्या उघड उघड दिसणाऱ्या कारणांकरितां इतर युरोपियन राष्ट्रांना लांब ठेवण्याची इंग्लिशांची इच्छा असून आपल्या प्रदेशाच्या सरहद्दीलगत असलेल्या देशांमध्यें आपलें श्रेष्ठ वर्चस्व राखून ठेवण्याचा व त्या देशांत इतर परकीय राष्ट्रांना ढवळाढवळ न करूं देण्याचा त्यांचा मुख्यतः आग्रह असतो; आणि ह्याच कारणामुळें एकोणिसावें शतक संपण्याच्या सुमारास अफगाण राज्याचा वायव्येकडील प्रदेश आणि आक्सस नदीजवळचा प्रांत यांच्या रोखानें चाललेल्या रशियाच्या हालचालींचें इंग्लिश सरकार अत्यंत दक्षतेनें निरीक्षण करीत होतें.

रशियानें खिवा आपल्या अमलाखालीं आणल्यानें त्याचीं बाह्य लष्करी ठाणीं अफगाण सरहद्दीच्या पुष्कळच जवळ येऊन ठेपलीं, आणि

तहाची वाटाघाट करून ही हालचाल बंद पाडण्याबद्दल इंग्लंडमधील
प्रधानमंडळानें केलेल्या प्रयत्नांचा सेंटपिटर्सबर्ग येथून "गुळमुळीत अभि-
वचन" मिळण्यापलीकडे अधिक कांहींही उपयोग झाला नाहीं. तथापि
रशियाच्या बादशहानें इ. सन १८७३ मध्यें, अफगाणिस्थान हा आपल्या
वर्चस्वक्षेत्राच्या पूर्ण बाहेरील प्रदेश आहे, असें जाहीर केलें, आणि त्या
राष्ट्राबरोबर केलेल्या राजनीतिहेतुक करारानें अफगाण सरहद्दीची रेषा
कांहीं अंशीं निश्चित करण्यांत आली. या कारणामुळें इंग्लिश मुत्सद्दी त्या
काळीं अफगाणिस्थानचें स्वातंत्र्य कायम राखणें आणि त्याचे तुकडे न
पडूं देणें, हेच दोन उद्देश मनांत ठेवून आपलें राजकीय धोरण चालवीत
होते; या वेळीं आपण ज्या काळासंबंधीं विवेचन करीत आहोंत, त्या काळा-
च्या हिंदुस्थानसरकारच्या परराष्ट्रीय व्यवहारासंबंधीं माहिती वाचली
असतां, बराच वादविवाद आणि शुष्क वाटाघाटी यांची परंपरा आपणास
आढळून येते; आणि पुढें सरते शेवटीं राजकीय वातावरणांत गैरसमजुती
आणि कांहीं अनिवार्य गोष्टी एतद्रूपी ढग उत्पन्न होऊन त्यांतूनच अफगाणि-
स्थानची इ. सन १८७८ मधील लढाई हीच कोणी एक जोराची सर एकदम
कोसळली. इ. सन १८६८ मध्यें अफगाणिस्थानचा अमीर, शेरअल्ली, यानें
गादीवर बसण्याकरितां पुष्कळ दिवस निकरानें लढाया केल्यावर अफगाणि-
स्थान आपल्या ताब्याखालीं आणलें, त्या वेळीं, आपलें राज्य दोन बलिष्ठ
युरोपियन प्रतिस्पर्ध्यांच्या कातरींत आहे, ही परिस्थिति पाहून त्याला काळजी
उत्पन्न झाली, आणि तो इंग्लिश सरकाराशीं सख्यत्व जोडण्याकरितां,
आणि त्यांचा खंबीर आश्रय मिळावा म्हणून, हिंदुस्थानाकडे वळला. इ.
सन १८६९ मध्यें त्या वेळचा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल, लार्ड मेयो,
यानें त्याची अंबाला येथें भेट घेतली, आणि त्या ठिकाणीं त्याला अत्यंत
सन्मानपूर्वक वागविण्यांत येऊन पुष्कळ शस्त्रें आणि संपत्ति हींही त्यास
भेटीदाखल देण्यांत आलीं, व मैत्री असल्याबद्दल त्यास अनेकदां आश्वा-
सन देण्यांत आलें. अमिराची, इंग्लिशांनीं आपणाशीं कायदेशीर तह करावा,

आणि ठराविक रक्कम कुमक ह्मणून देत जावी, अशी इच्छा होती. परंतु लार्ड मेयो याला त्याचें ह्मणणें मान्य करण्याचा अधिकार नव्हता. यामुळें भक्कम पायावर मैत्री करण्याचा ठराव झाल्याशिवायच त्यांच्या या वाटाघाटीचा शेवट झाला. इ. सन १८७३ मध्यें पुन्हां तहाची वाटाघाट सुरू झाली, त्या वेळीं लार्ड नार्थब्रुक यानें, परकीय जुलमापासून संरक्षण करण्याची शेरअल्ली यास आपण हमी द्यावी, अशी योजना इंग्लंडमधील प्रधानमंडळापुढें मांडली; परंतु त्यांनीं त्या योजनेला मंजुरी देण्याचें नाकारलें; यामुळें इंग्लिश सरकाराबरोबरील त्यानंतरच्या आपल्या व्यवहारांत शेरअल्ली यानें जो अविश्वास आणि तिरस्कार प्रदर्शित केला, त्याचीं कारणें, अमिराची या सबंधांत झालेली निराशा व इतर असंतोष उत्पन्न होण्यासारख्या घडलेल्या गोष्टी, हींच होत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तथापि इ. सन १८७६ मध्यें इंग्लंडमधील प्रधानमंडळाची, अमिराबरोबरील संबंध अधिक निकट व निश्चित करणें अवश्यक आहे, अशी खात्री झाली; त्यामुळें लार्ड लिटन याची हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल या नात्यानें नेमणूक होऊन तो हिंदुस्थानांत येण्याला निघाला, त्या वेळीं हें राजकारण घडवून आणण्याविषयीं त्याला सूचना देण्यांत आली. तो हिंदुस्थानांत आल्यावर त्यानें प्रथम काबूल येथें एक वकीलमंडळ पाठविण्याची योजना केली; परंतु त्यानें केलेल्या ह्या प्रस्तावाला अमिराकडून इतकी प्रतिकूलता दर्शविण्यांत आली कीं, कांहींशा निष्फळ वाटाघाटींनंतर उभयतांत मतभेद आणि मनोविकल्प उत्पन्न होऊन सरते शेवटीं त्याला तो मार्ग सोडून द्यावा लागला. इ. सन १८७७ मध्यें रशिया आणि तुर्कस्थान यांच्यामध्यें लढाई झाली; आणि इ. सन १८७८ मध्यें रशियन सैन्य कान्स्टांटिनोपलसमोर येऊन ठाकलें असतां इंग्लिश सरकारानें माल्टा येथें हिंदुस्थानांतील सैन्य पाठवून सशस्त्र प्रतिकाराची तयारी केली. रशियानेंही यावर उलट तोड काढून मध्य आशियांतील आपल्या सैन्यापैकीं एक तुकडी

अफगाण सरहद्दीकडे पाठविली, काबूल येथें एक रशियन वकील येऊन धडकला, आणि त्यानें अमिराबरोबर दोस्तीच्या तहाचा खरडाही तयार केला. हिंदुस्थानच्या व्हाइसरायनेंही, इंग्लिशांच्या वकिलाला काबूल येथें ताबडतोब जाण्याची परवानगी असावी, अशी हक्कानें मागणी करून "तोडीस तोड" केली, व सर नेव्हिली चेंबरलेन याच्या धुरीणत्वाखालील वकील मंडळाची तिकडे रवानगी केली. परंतु त्यांना अफगाणिस्थानच्या सरहद्दीजवळच्या ठाण्यांपासूनच सक्तीनें परतवून लावण्यांत आलें. या कारणामुळें इंग्लिश वकिलास राजधानींत येण्याची परवानगी देऊन तेथें त्याचा आदरसत्कार व्हावा, असा निर्वाणीचा खलिता अमिरास पाठविण्यांत आला, आणि त्याचें उत्तर ठरीव तारखेच्या आंत पाठवावें, असें त्यास कळविण्यांत आलें. परंतु ठरीव मुदतींत अमिराकडून जबाब आला नाहीं, ह्मणून इ. सन १८७८ च्या नोव्हेंबर महिन्यांत लढाई जाहीर करण्यांत आली, व निरनिराळ्या ठिकाणांहून ब्रिटिश सैन्याच्या तीन तुकड्यांनीं अफगाणिस्थानांत प्रवेश केला. दक्षिणेकडून केट्याच्या बाजूनें चाल करून गेलेल्या सैन्याच्या तुकडीनें बहुतेक प्रतिकाराशिवायच कंदाहार आपल्या ताब्यांत घेतलें, आणि उत्तरेकडून चाल करून गेलेल्या सैन्याच्या दोन्ही तुकड्यांनीं कुर्रम व जलालाबाद येथून काबूलला शह दिला. त्या-नंतर जनरल राबर्टस यानें अफगाण सैन्याची पियावर कोटाळ येथें दाणा-दाण करून टाकिली, तेव्हां अमिरानें काबुलांतून आपला पाय काढून आक्सस नदीच्या जवळील आपल्या उत्तरेकडील प्रदेशाचा आश्रय घेतला; आणि तेथून ट्रान्सकास्पेशिया येथील रशियन अधिकाऱ्याकडे मदत देण्या-बद्दल विनंति केली. परंतु बर्लिन येथील तहावर सही झाल्याबरोबरच अमिराच्या राजकारणांतून रशियानें आपलें चित्त काढून घेतल्यामुळें इंग्लिश सरकाराबरोबर सलोखा करण्याबद्दल त्याला सल्ला देण्यांत आली. इ. सन १८७९ मध्यें तो अत्यंत हालअपेष्टेमध्यें मृत्यु पावला, आणि त्याचा मुलगा याकूबखान यानें, अमिराच्या गादीचा वारसदार म्हणून आपणास इंग्लिश

सरकारनें कबूल करावें, आणि त्यांनींच मदत करून आपणाला अफगाणिस्थानच्या गादीवरही बसवावें, या अटीवर युद्ध बंद करण्याबद्दल वाटाघाट सुरू केली. पुष्कळ वादविवादानंतर गंडामक येथील तह निश्चित करण्यांत आला; त्या तहाअन्वयें अफगाणिस्थानामधील दळणवळणाच्या मार्गांवर आपली सत्ता ठेवण्याला इंग्लिशांना अधिक सोयीस्कर होईल, अशी कांहीं बाह्य प्रदेशाची पट्टी त्यानें आपला स्वामित्वहक्क सोडून कायमची इंग्लिशांना दिली, काबूल येथें इंग्लिश वकील ठेवण्याचें कबूल केलें, आणि इ. सन १८७९ च्या जुलई महिन्यामध्यें सर लुई क्याव्हग्नारी यास अफगाणिस्थानामध्यें इंग्लिशांतर्फे वकील म्हणून पाठविण्यांत आलें.

परंतु ह्या झालेल्या लढाईमुळें सर्व अफगाणिस्थानभर अंदाधुंदी सुरू झाली होती, आणि अमीर शेरअल्ली याच्या मृत्यूमुळें राजगादी रिकामी पडली होती. अशा परिस्थितींतून निभावून आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याला अवश्य लागणारा अनुभव अगर करारी स्वभाव यांचा याकूबखानाच्या ठिकाणीं अभाव होता, त्याच्या सैन्याला तनखा मिळालेला नव्हता, आणि तें बंडखोर झालेलें होतें. तेथील कडव्या आणि अनियंत्रित लोकांवर त्याचें फारसें वजनही नव्हतें, आणि परकीयांबद्दल त्या लोकांच्या हाडींमासीं खिळलेला द्वेषभाव काबूल येथें इंग्लिश अधिकारी राहूं लागल्यानें तर अधिकच वाढलेला होता. इंग्लिशांनीं अफगाणिस्थानाबरोबर केलेल्या ह्या सर्व व्यवस्थेची इमारत गंडामक येथील तहावर उभारलेली होती. आणि तिचा सर्व आधार इंग्लिश वकिलाच्या प्रत्यक्ष सुरक्षितपणावरच काय तो अवलंबून होता. परंतु तीन महिन्यांच्या आंतच सर क्याव्हग्नारी याचा खून होऊन ती इमारत भयंकर रीतीनें कडाडून खालीं कोसळली, आणि अशा रीतीनें युद्धाच्या पूर्व भागांत जर ब्रिटिश सरकारला अमीर शेरअल्ली याचेबरोबर युद्ध करणें भाग झालें, तर ह्या उत्तर भागांत सर्व अफगाण जनतेबरोबर युद्ध करण्याच्या त्याहूनही अधिक जिकिरीच्या कार्यांत आपण स्वतः गुरफटले गेलों आहोंत, असें त्यांना आढळून आलें.

क्याव्हग्नारी हा आपल्याबरोबरील रक्षणाकरितां दिलेल्या सर्व पहारेकऱ्यांसह मारला गेला, अशी खबर मिळाल्याबरोबर लागलीच पुन्हां लढाईला सुरवात करण्यांत आली. सर फ्रेडरिक राबर्टस यानें झपाट्यानें आणि साहसानें अफगाणिस्थानची राजधानी, काबूल, या शहरावर चाल करून तें कबजांत घेतलें, आणि सर डोनाल्ड स्टुअर्ट यानें नुकतेंच खालीं केलेलें कंदाहार पुन्हां ताब्यांत घेण्यांत आलें. परंतु इंग्लिशांनीं जरी ह्या दोन्ही महत्त्वाच्या ठाण्यांवर आपला मजबूत लष्करी ताबा ठेवण्याची तजवीज केली, तरीही हिंदुस्थान सरकारची या वेळीं 'इकडे आड व तिकडे विहीर' अशी स्थिति झाली होती. सर्व अफगाणिस्थान देश जिंकणें आणि शांत करणें ही गोष्ट इंग्लिशांच्या आटोक्याबाहेरची होती, आणि आपण सुरू केलेल्या धोरणानें ती साध्य होईल, अशी त्यांची मुळींच अटकळही नव्हती. तथापि जर इंग्लिशांनीं आपलें सैन्य परत नेलें असतें, तर सर्व देशभर कोणीही शास्ता नसल्यामुळें ' झोटिंग बादशाही ' सुरू झाली असती, आणि सुरू केलेली लढाईही निरर्थक सुरू केली, असें झालें असतें. इंग्लिशांचा अफगाणिस्थान आपल्या ताब्याखालीं आणण्याचा इरादा आहे, अशी त्यांतील लढवय्या जातींची समजूत झाल्यामुळें त्यांनीं काबूलसभोंवती बंडाळी माजविण्यास सुरवात केली, आणि इ. सन १८७९ च्या दिजंबरमध्यें काबूल शहराबाहेरील इंग्लिशांच्या तटबंदीवर निग्रहाचा हल्ला करण्याकरितां त्या सर्व जाती एकत्र झाल्या. कांहीं अति निकराच्या लढायांनंतर त्यांचा पराभव झाला. आणि त्यामुळें तात्पुरती सभोंवतालच्या प्रदेशांत पुन्हां शांतता झाली, व हिंदुस्थानाबरोबरील दळणवळणाचा मार्ग पुन्हां मोकळा करण्यांत आला. परंतु अफगाणिस्थान हें एखाद्या कर्तृत्ववान आणि मित्रभावानें वागणाऱ्या राज्यकर्त्याच्या हवालीं सोंपवावें, यांतच इंग्लिश सरकारचा उघड उघड हितसंबंध असून वास्तविक रीत्या हें युद्धही याच विशिष्ट उद्देशानें सुरू करण्यांत आलें होतें.

याच वेळीं अमीर शेरअल्ली याचे पूर्वीं गादीवर असलेल्या राज्यकर्त्याचा पुतण्या, अबदुल रहिमान, हा अफगाणिस्थानच्या उत्तरेकडील प्रदेशांत येऊन दाखल झाल्यानें इंग्लिश सरकार वर दर्शविलेल्या दुहेरी पेंचांतून मोकळें झालें. गादीवर बसण्यासंबंधींच्या आपसांत चाललेल्या यादवीमध्यें शेर अल्ली हा यशस्वी झाल्यावर अबदुल रहिमान याला अफगाणिस्थानाबाहेर हांकलून लावण्यांत आलें असून तो ह्या वेळेपर्यंत आक्सस नदीपलीकडे रशियाच्या आश्रयानें रहात होता. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलनें (लार्ड लिटन) त्याच्या बरोबर सलोख्याचीं बोलणीं सुरू केलीं, रिकाम्या झालेल्या गादीवर बसण्यास हिंदुस्थान सरकाराकडून प्रतिरोध होणार नाहीं, असें त्याला अभिवचन दिलें, कांहीं विवक्षित शर्तींवर त्यास अफगाणिस्थानचा अमीर म्हणून मान्य करण्यांत येईल, आणि सर्व राज्याचीं सूत्रें त्याच्या स्वाधीन करण्यांत येतील, असें कळवून, त्या शर्तींबद्दल वाटाघाट करण्याच्या उद्देशानें काबूल येथील इंग्लिश सदर ठाण्याच्या ठिकाणीं येण्याविषयीं त्याला निमंत्रण करण्यांत आलें. इ. सन १८८० च्या जून महिन्यांत लार्ड लिटन यानें गव्हर्नर जनरलीचीं अधिकारसूत्रें लार्ड रिपन याच्या हवालीं केलीं, आणि त्यानंतर त्यानें बऱ्याच प्रयासानें ही व्यवस्था घडवून आणली. काबूल येथील इंग्लिशांच्या छावणींत अबदुल रहिमान यास अफगाणिस्थानमधील अमिराच्या गादीवर बसविण्यांत आल्याबद्दलची द्वाही फिरविण्यांत आली; देणगीच्या रूपानें शस्त्रें आणि संपत्ति हीं त्यास पुरविण्यांत आलीं; व परराष्ट्रांनीं कोणत्याही प्रकारचा त्रास दिल्यास आम्ही मदत करूं, असें रीतीप्रमाणें त्यास आश्वासन देऊन अशा रीतीनें अबदुल रहिमान याच्या 'अमीर' या पदास बळकटी आणली. अशी व्यवस्था करून इंग्लिश सैन्य हिंदुस्थानाकडे माघारें परत फिरण्याच्या बेतांत आहे, तोंच शेरअल्ली याचा धाकटा मुलगा, आयुबखान, हा हिरात येथून सैन्यासह कंदाहारवर चाल करून येण्याला निघालेला आहे, अशी बातमी येऊन धडकली. जुलई महिन्यांतच

कंदाहारजवळ मेवंद येथें त्यानें इंग्लिश सैन्याची दाणादाण उडविली, व
त्या शहराच्या कोटाच्या आंत इंग्लिश सैन्याचा कोंडमारा केला. सर फ्रेड-
रिक राबर्टस् याच्या धुरीणत्वाखालीं काबूल येथून लागलीच एक जोर-
दार सैन्याची तुकडी पाठविण्यांत आली. तो आपल्या सैन्यासह झपाट्यानें
कूच करीत आगष्ट महिन्याच्या अखेरीस कंदाहार येथें पोहोंचला. त्या-
नंतर त्यानें आयुबखानावर हल्ला करून त्याचा पूर्ण पराजय केला, कोंड-
मारा झालेल्या सैन्याची मुक्तता केली, आणि बोलन खिंडीच्या रस्त्यानें
तो आपल्या सैन्यासह हिंदुस्थानांत माघारा परत आला. काबूल येथें अस-
लेलें इंग्लिश सैन्यही त्याच वेळीं थेट उत्तरेकडील रस्त्यानें अफगाणिस्थान-
मधून परत फिरलें, आणि इ. सन १८८१ मध्यें इंग्लिशांनीं कंदाहारही
पुन्हां खालीं करून दिलें. त्यामुळें दक्षिणेकडील प्रदेशावर आपली हुक-
मत कायम करण्याला अमिराला मोकळीक झाली. अशा रीतीनें अबदुल
रहिमान यास स्वतःच्या पायावर उभें राहण्यास मोकळें सोडल्यानें त्यानें
आयुबखानाला (तो परत आलेला होता) अफगाणिस्थानच्या बाहेर
हांकलून लाविलें, आणि चोहोंकडे झपाट्यानें आपल्या सत्तेचा इतका वि-
स्तार केला कीं, थोडक्याच वर्षांत त्या देशांतील इतिहासांत अगदीं पहि-
ल्यानेंच अफगाणिस्थान हें एका अलौकिक कर्तृत्वाच्या, पण कठोर मनाच्या
व कडव्या स्वभावाच्या, राज्यकर्त्याच्या अमलाखालीं लहान लहान राज्यें
मोडून त्यांचें एक बळकट स्वतंत्र राष्ट्र बनलें. त्यानंतरच्या पुढील कांहीं
वर्षांत त्या राज्याच्या सरहद्दी निश्चित करण्यांत आल्या. आणि त्यांपैकीं
आक्सस नदीपासून इराणच्या सरहद्दीपर्यंतची अफगाणिस्थानच्या वायव्ये-
कडील सरहद्दीची सीमा रशियन व इंग्लिश या उभयतांच्या अधिकाऱ्यां-
च्या सामायिक पंचमंडळाकडून ठरविण्यांत आली. परंतु ह्या सरहद्दीपैकीं
एका भागासंबंधीं भांडण उपस्थित झालें, व त्यामुळें पेंजडे येथें रशियन
आणि अफगाण सैन्यामध्यें चकमक उडाली; आणि या वेळीं, ह्मणजे
इ. सन १८८५ मध्यें उत्तर हिंदुस्थानांत रावळपिंडी येथें गव्हर्नर जनरल-

(लार्ड डफरिन) च्या छावणींत अमीर हा " पाहुणा " म्हणून येऊन राहिलेला असतांनाच, वरील कारणामुळें इंग्लिश व रशियन या उभयतांमध्यें स्नेहभंग होण्याची वेळ आली होती. परंतु हें संकट कसेंबसें टळल्यानंतर रशियाच्या ताब्यांतील प्रदेशालगतची सर्व वायव्येकडील सरहद्द राष्ट्राराष्ट्रांमध्यें मध्यस्थी करणाऱ्या सभेमार्फत ठरविण्यांत आली. शिवाय दुसरी योजना ह्मटली ह्मणजे, इंग्लिशांच्या ताब्यांतील हिंदुस्थान आणि अमिराच्या ताब्यांतील प्रदेश यांच्यामध्यें रानटी लोकांच्या डोंगराळ प्रदेशाची जी पट्टी आहे, त्या बाजूकडील अफगाणिस्थानच्या पूर्वेच्या सरहद्दीची मर्यादा ठरविण्यांत आली; आणि अशा रीतीनें अफगाण राज्यकर्त्याबरोबर झालेल्या कराराअन्वयें ह्या वादग्रस्त प्रदेशामधील बंडखोर जातींना त्या सरहद्दीवर असलेल्या इंग्लिश अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं ठेवण्यांत आलें.

ह्या एकंदर योजनेचा सर्वसाधारण परिणाम हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याला अत्यंत हितकारक असाच घडून आला. एकोणिसाव्या शतकामध्यें अफगाणिस्थान हें परकीय राज्य होतें, आणि जरी तें ताब्यांत घ्यावें, अशी इंग्लिशांची इच्छा नाहीं, तरीही नाइलाजानें त्यांना त्याचें संरक्षण करणें भाग असून कोणतींही संकटें आलीं, व कितीही संपात्ति ओतावी लागली, तरी इंग्लिश वर्चस्वाच्या कक्षेच्या आंतच तें निःसंशय राखून ठेवण्यांत आलें पाहिजे; कारण, हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रकारच्या राज्यव्यवस्थेला अथवा राजघराण्यांच्या सुरक्षिततेला अफगाणिस्थानचें स्वातंत्र्य कायम राखणें ही गोष्ट अगदीं अवश्यक आहे. मोंगल बादशाहीच्या वेळीं हा प्रदेश त्यांच्याच अमलाखालील एक प्रांत ह्मणून होता; इंग्लिश राज्यपद्धतीखालीं तें एक संरक्षणाची हमी घेतलेलें राज्य ह्मणून आहे; आणि अफगाणिस्थानांतील पर्वत हे हिंदुस्थानांतील सपाट प्रदेशावर बाहेरून होणाऱ्या धाडींना अजूनही अवश्यक अशा प्रतिबंधक अडकाठ्याच आहेत. इ. सन १८८० सालीं परराष्ट्रांकडून होणाऱ्या स्वाऱ्यांपासून अफगाणिस्थानचें संरक्षण करण्याचें जेव्हां अमिराला कायदे-

शीर वचन देण्यांत आलें, त्या वेळेपासून त्याच्या राज्याची स्थिति झपाट्या-नें सुधारत गेली; सतत चालू असलेलीं आपसांतील राज्यविषयक युद्धें आणि अंतःस्थ बंडाळी, यांचा त्यानंतर बीमोड झाला; आणि गेल्या सत्तावीस वर्षांपासून त्या राज्यांत एकसारखी शांतता नांदत असून त्याची भरभराटही होत गेलेली आहे; आणि विशेषतः हल्लींचा राजकर्ता अमीर हा आपल्या बापाच्या मृत्यूनंतर कांहींही अडथळा झाल्याशिवाय तेथील गादीवर बसलेला आहे; पण मागील सर्व गादीवर बसणारांच्या वेळीं युद्ध-कलह झाले होते, अगर गादीवर बसल्यानंतर बंडाळी माजली होती. अफ-गाणिस्थानच्या अंतःस्थ स्थितीचें हें जें रूपांतर घडून आलें, त्याचें मुख्य कारण इंग्लिश सरकाराकडून तेथील राजकर्त्याला मिळालेली मदत आणि पाठबळ हें एक असून, शिवाय दुसरें कारण अफगाणिस्थानची सरहद्द नक्की ठरून तिला दोन युरोपियन राष्ट्रांमधलि करारामुळें कायमपणा आला, हें होय. इ. सन १९०७ मध्यें ग्रेट ब्रिटन आणि रशिया यांनीं ज्या अगदीं अलीकडील एका करारावर सह्या केल्या, त्या कराराअन्वयें तर ह्या सरहद्दीवरील परिस्थिति पुष्कळच जास्त पालटली व सुधारली आहे. व हा करार जोंपर्यंत अमलांत राहील, तोंपर्यंत अमिराचें आपल्या प्रदेशा-वरील अभंग स्वामित्व आणि अंतःस्थ राज्यकारभारांतील त्याचें पूर्ण स्वातंत्र्य यांचें उभयतां राष्ट्रांनीं घेतलेल्या हमीमुळें संरक्षण होईल. अशा रीतीनें, सुमारें एक शतकभर दीर्घकालीन प्रतिस्पर्धा, भांडणें आणि साशंकता, इत्यादि ज्या कारणांमुळें आशियामधील रशिया व इंग्लंड या दोन युरोपस्थ राष्ट्रांचीं मनें अस्वस्थ झालीं होतीं, तीं सर्व कारणें आतां नाहींशीं झालीं आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

हिंदुस्थानच्या उत्तरेकडील सरहद्दीवर घडलेल्या गोष्टींसंबंधाची तात्विक हकीकत पूर्ण करण्याकरितां इ. सन १८९६-९७ या सालीं काश्मीरच्या पलीकडे हिंदूकुश पर्वताच्या दक्षिण भागावरील उतरणीवर असलेल्या लहान लहान संस्थानांचा इंग्लिशांच्या संरक्षित राज्याच्या कक्षेंत

समावेश करण्यांत आला, ही गोष्ट ह्या ठिकाणीं नमूद करण्यास हरकत नाहीं. इंग्लिशांच्या राजकीय नियंत्रणाची ही वाढ त्या रानटी आणि आजपर्यंत अगम्य असलेल्या प्रदेशांतील जातींनीं कांहींसा प्रतिकार केल्यानंतरच पूर्णतेस गेलेली आहे. त्यांनीं चित्राळ येथें इंग्लिश सैन्याचा कोंडमारा केला, आणि त्यांना इतकें पेचांत आणलें कीं, त्यांच्या मदतीसाठीं पुन्हां सैन्य पाठविणें भाग पडलें, व त्या सैन्यानें मोठ्या कष्टानें आणि साहसानें चाल करून जाऊन सरते शेवटीं त्यांची मुक्तता केली. व अशा रीतीनें काशगर येथें चिनी राष्ट्राच्या हद्दीपर्यंत इंग्लिशांच्या वर्चस्वाचें क्षेत्र वाढलें, आणि त्याच्या हद्दीच्या निशाण्याही त्या लांबच्या डोंगराळ प्रदेशामध्यें कायमच्या आंखून काढण्यांत आल्या. ह्या एकंदर लष्करी व राजकारणाच्या कृत्यांचा सर्वसाधारण परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानच्या वायव्येकडील आणि उत्तरेकडील सरहद्दीच्या बाजूनें इंग्लिशांच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असलेल्या प्रदेशांपासून, चीन, रशिया आणि इराण, या देशांना विभक्त करणाऱ्या संरक्षित संस्थानांचा एक मोठा थोरला पट्टाच निर्माण करण्यांत आला.

तथापि उत्तर हिंदुस्थानच्या पलीकडे इंग्लिश लोक आपलीं नाक्याचीं ठाणीं निर्भय आणि बळकट करण्यांत गढून गेले असतांना, मध्यंतरींच त्यांच्या आग्नेयेकडील सरहद्दीवर नव्या आणि गंभीर स्वरूपाच्या भानगडी उपस्थित झाल्या. इ. सन १८५३ मध्यें इंग्लिशांनीं खालील ब्रह्मदेश काबीज आणि खालसा केला, त्या वेळेपासून तेथील राज्यकर्त्याच्या मनांत इंग्लिश सरकाराविरुद्ध तिरस्काराची आणि सूड घेण्याची भावना उत्पन्न झालेली होती. इ. सन १८८५ मध्यें, इंग्लिश प्रजाजनांला भोगाव्या लागलेल्या अपकाराच्या नुकसानीची भरपाई करून द्यावी, अशी ब्रिटिश सरकारानें ब्रह्मी राजाकडे मागणी केली. परंतु तेथील राज्यकर्ता, थिबा, यानें तिचा हट्टानें अनादर केला; आणि त्याहूनही गंभीर स्वरूपाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, ज्या तहाअन्वयें आपल्या देशामध्यें फ्रेंचांच्या

हितसंबंधांना प्रधान वजन मिळेल, असा तह घडविण्याविषयीं त्यानें गुप्त
रीतीनें फ्रान्सबरोबर बोलणें चालविलें होतें, असें आढळून आलें, ही होय.
त्यामुळें त्याची बरीच कानउघाडणी करण्यांत आली, व त्यास बऱ्याच वेळां
ताकिदीही देण्यांत आल्या; परंतु त्या सर्व निष्फळ झाल्यामुळें त्याच्याकडे
हिंदुस्थान सरकाराकडून एक निर्वाणीचा खलिता पाठविण्यांत आला,
व या कृत्याच्या समर्थनार्थ त्याच्या सरहद्दीवर सैन्यही जमविण्यांत आलें.
ब्रह्मी राज्यकर्त्यानेंही उलट वैरभावद्योतक जाहिरनामा काढला, आणि
त्यामुळें इ. सन १८८५ च्या नोव्हेंबर महिन्यामध्यें मंडाले शहरावर
इंग्लिश सैन्य चाल करून गेलें. ब्रह्मी सैन्यानें ह्मणण्यासारखा विरोध केला
नाहीं, ब्रह्मदेशची राजधानी मंडाले हें शहर ताब्यांत घेण्यांत आलें, आणि
तेथील राजा, थिबा, यास बंदिवान करून रत्नागिरी येथें आणून ठेवण्यांत
आलें. उत्तर ब्रह्मदेश खालसा केल्याबद्दल राणी सरकाराकडून जाहिरनामा
काढण्यांत आला. जिंकलेल्या प्रदेशांना लुटालूट करणाऱ्या टोळ्या आणि
सैन्यांतून काढून टाकलेले शिपाई यांचेकडून उपद्रव पोहोंचला असल्या-
मुळें जवळ जवळ दोन वर्षें अंतःस्थ अव्यवस्था चालू होती; परंतु
त्यानंतर पूर्णपणें शांतता प्रस्थापित होऊन मुलकी राज्यकारभाराची
घटनाही करण्यांत आली. उत्तर ब्रह्मदेशाच्या ईशान्येकडील प्रदेशापलीकडे
मेक्यांग नदीपर्यंतच्या रानटी प्रदेशांतील लहान लहान संस्थानें इंग्लिशांना
खंडणी देऊं लागलीं, आणि अर्धवट माहीत झालेल्या उत्तरेकडील टेकड्यां-
तील जातीही अंशतः ब्रिटिश अमलाच्या आधीन झाल्या. सयामचें राज्य हें
कोचीन चीनमधील फ्रेंचांच्या ताब्यांतील प्रदेशापासून ब्रह्मदेशाला विभक्त
करतें. हें राज्य त्या देशाच्या पूर्वेस असून तेथील राज्यकर्ता फ्रेंच अधि-
काऱ्यांबरोबरील भांडणांत गुरफटला गेला होता; आणि सयामच्या नैस-
र्गिक स्थितीमुळें त्याचें स्वातंत्र्य हिंदुस्थानच्या हितसंबंधाला अत्यंत
अवश्यक असल्यानें, तें राज्य अभंग राखण्याकरितां आणि आपल्या स्वतः-
च्या सरहद्दीशीं निकट असलेल्या सयामच्या प्रदेशावर संरक्षणाचा हक्क

मिळविण्याकरितां इ. सन १८९६ मध्यें ब्रिटिश सरकारनें मध्यस्थी केली, आणि हें महत्त्वाचें राजकारण साध्य करून घेतलें.

उत्तर ब्रह्मदेश खालसा करून इंग्लिशांनीं आपल्या राज्यास जोडल्यामुळें ह्या शेवटीं शेवटीं झालेल्या राज्याच्या वाढीनें त्यांच्यावरील राजकीय जबाबदारीमध्यें पुष्कळच अधिक भर पडली आहे. हिंदुस्थान आणि इंडो-चायना म्हणून प्रसिद्ध असलेला देश, या उभयतांमधील लोकवस्तीमध्यें मुळींही सादृश्य नाहीं, अगर असल्यास तें फारच थोडें आहे. ह्या ठिकाणीं इंग्लिशांनीं आशियांतील एका नवीन क्षेत्रांत शिरकाव केला असून राज्यमर्यादा विस्तृत झाल्यामुळें निरनिराळ्या जाती आणि भाषा असलेल्या जनसमाजाबरोबर त्यांचा संबंध जडला आहे. युरोपियन लोकांना आजपर्यंत बहुतेक अज्ञात असलेल्या प्रदेशाचा इंग्लिश लोक शोध लावीत आहेत, आणि ह्या एकसारख्या वाढत्या प्रदेशाच्या बाह्य मर्यादा अद्यापि ठरावयाच्या असून त्याविषयींच्या बारीकसारीक गोष्टीही त्या प्रदेशाच्या नकाशांत भरावयाच्या अजून बाकी आहेत. ब्रिटिश सरकारनें आपल्या राजनीतीचें धोरण, अफगाण सरहद्दीप्रमाणेंच, ह्याही बाजूला ठेविलेलें आहे; तें धोरण ह्मणजे, आपल्या कारभारासंबंधीं फारच साशंक असलेल्या चिनी अधिकाऱ्यांशीं मित्रत्वाचें नातें राखावें, दोन राष्ट्रांच्या दरम्यानच्या प्रदेशामध्यें असणाऱ्या रानटी लोकांना बंडखोर वर्तनापासून क्रमाक्रमानें परावृत्त करण्यास समर्थ असणारें असें एक संरक्षणाची हमी घेतलेलें संस्थान अस्तित्वांत आणावें, त्याचे सरहद्दीवरील लुटारू लोकांस सरहद्दीचे संरक्षक बनवावें, आणि त्यांत परराष्ट्राचें वजन राहूं देऊं नये, अगर त्यांच्या अतिक्रमणाचा प्रतिकार करावा, हें आहे.

ब्रह्मदेश ब्रिटिश राज्यांत सामील केला, याशिवाय इंग्लिश सरकारच्या प्रत्यक्ष आणि कायदेशीर राज्यव्यवस्थेखालील प्रदेशांत इ.सन १८५६ पासून फारच थोडा फरक झाला आहे; उलट पक्षीं इंग्लिश राष्ट्राची बाह्य सरहद्द ब्रिटिश वर्चस्वाच्या अथवा बलिष्ठ राजसत्तेच्या कक्षेखालीं आणलेले

प्रदेश जमेस धरतां येतील, अशी एक रेषा जशी काढावयास पाहिजे, तशी जर रेखाटली,तर गेल्या पन्नास वर्षांच्या अवधींत ती बरीच म्हणण्या- सारखी व्यापक झालेली आहे. ही सरहद्द हल्लीं वायव्येकडे मध्य आशियांतील रशियाच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशाला भिडलेली असून ती कित्येक हजार मैलपर्यंत चीनच्या राज्याच्या सरहद्दीला लागून सारखी चालू आहे; आणि आग्नेयेकडे ती फ्रान्सच्या आशियांतील वसाहतींना लागलेली आहे. तिबेटची राजधानी ल्हासा येथें इंग्लिशांनीं नुकतीच मोहिम पाठविली होती, आणि तिजमुळें हिमालयापासून उत्तरेकडे मोंगोलियाच्या सीमेपर्यंत पसरलेल्या पर्वतांच्या आणि ओसाड प्रदेशांच्या व्यापक पट्ट्यावर दुसऱ्या कोणत्याही युरोपस्थ सत्तेला अतिक्रमण न करूं देण्याचा त्यांचा निश्चय असल्याचें ठरून चुकलें आहे. हिंदुस्थानावर कोणत्याही बाजूनें अतिक्रमण झाल्यास त्यापासून त्या देशाचें संरक्षण करणें, आणि आपल्या स्वतःच्या हातांतच हिंदुस्थानच्या सर्व दरवाज्यांच्या किल्लया ठेवणें, हें इंग्लिशांच्या राजनीतीचें धोरण असून ह्याच पद्धतीस अनुसरून त्यांना आपलीं सरहद्दीवरील लष्करी ठाणीं वाढवावीं लागलीं आहेत, व तीं पुढें पुढें सरकावीतही न्यावीं लागलीं आहेत; आणि नाना प्रकारच्या किरकोळ राजकीय जबाबदारीचा वाढता बोजा आपल्या शिरावर घेणें त्यांना भाग पडलेलें आहे. शिवाय राजकीय धोरणामुळें ब्रिटिश राज्याच्या बाह्य सीमेचें संरक्षण करणें इंग्लिशांना अवश्यक असल्यामुळें तर ही सीमा फारच विस्तृत झालेली आहे; ह्मणजे त्यांच्या सरहद्दीचें आग्नेयेकडील टोंक सयामच्या आखाताला भिडलेलें असून तेथून ती सरहद्द उत्तरेकडे तिबेटला वळसा घालून पुढें आक्सस नदी व हिंदुकूश पर्वताची ओळ यांना भिडलेली आहे, आणि त्यानंतर वायव्येकडे तिनें अफगाणिस्थान आणि बलुचिस्थान हीं आपल्या पोटांत घेऊन शेवटीं ती पश्चिमेच्या टोका- कडे अरबी समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत जाऊन धडकली आहे. इंग्लिशांच्या प्रत्यक्ष राज्याच्या क्षेत्राबाहेर पुष्कळच दूरपर्यंत राजकीय क्षेत्राची अशा रीतीनें

वाढ झाल्यामुळें इंग्लिश राष्ट्राच्या सरहद्दीच्या स्थितींत नेहमीं बदल होत चालला आहे. खुद्द हिंदुस्थानच्या सरहद्दी तीन बाजूनें पर्वतांच्या बहुतेक सळंग भिंती आणि ओसाड प्रदेशांची पट्टी, व चवथ्या बाजूनें समुद्र, अशा नैसर्गिक रीतीनें ठरलेल्या आहेत. परंतु इंग्लिशांच्या बाह्य सरहद्दीच्या राजकीय मर्यादा आतां देखील कृत्रिम रीतीनें आंखल्या गेल्या आहेत, आणि मध्य आशियांतील डोंगराळ प्रदेशांच्या दऱ्या व उतरणी यांच्या पलीकडे, आणि ओसाड सपाट प्रदेश, अगर उंच सखल अर्धवट शोध लागलेला डोंगराळ प्रदेश, यांच्यापलीकडे, त्या राष्ट्रांराष्ट्रांमधील करारानें निश्चित झाल्या आहेत. इंग्लिशांच्या सरहद्दीच्या ह्या निश्चित झालेल्या रेषा राजकीय दृष्ट्या त्यांच्या महत्त्वाच्या ठाण्यांचे बाह्य कोटच असून त्या वायव्य दिशेपासून आग्नेय दिशेपर्यंत इतर दोन मोठमोठ्या आशियांतील राष्ट्रांच्या, ह्मणजे रशिया आणि चीन यांच्या, प्रदेशाला भिडलेल्या आहेत. आशियांतील राजकीय परिस्थिति ही आतां सर्व जगभर पसरलेल्या राष्ट्रांराष्ट्रांमधलि संबंधांच्या जाळ्याच्या प्रत्येक गुंतागुंतीवर अगदीं निकट रीतीनें अवलंबून आहे, आणि त्यामुळें त्यास कोणत्याही प्रकारचा विशेष जोराचा ताण बसल्यास, अथवा ते संबंध एकाएकीं तुटल्यास, त्यांची जाणीव फक्त हिंदुस्थानालाच होईल, असें नाहीं, तर युरोपियन वर्चस्वाखालीं असलेल्या सर्व लगतच्या प्रदेशांनाही ती झाल्याशिवाय राहणार नाहीं; इतकेंच नाहीं, तर आशियांतील बहुतेक भागाचें भवितव्यही युरोपांतील मोठमोठ्या राष्ट्रांमधील परस्परविषयक सत्तेचा समतोलपणा आणि त्यांच्या सामर्थ्याची कालवशात् झालेली संघटना, यांवरच अवलंबून आहे, असें ह्मटल्यास तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

परिच्छेद दुसरा—अंतःस्थ राज्यव्यवस्था.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या येथपर्यंत लिहिलेल्या इतिहासांत अंतःस्थ राज्यव्यवस्थेचा, त्रोटक किंवा मुळींच, उल्लेख करण्यांत आला नाहीं. आणि त्यांत फक्त स्वामित्व-हक्क-त्यागानें इंग्लिशांस दिलेल्या आणि

दिग्विजयानें सर करून त्यांनीं मिळविलेल्या प्रदेशामुळें त्यांच्या साम्राज्याचा झालेला अभ्युदय व वृद्धि, हिंदुस्थानांतील सर्व प्रतिस्पर्धी सत्ताधाऱ्यांवर ब्रिटिश राष्ट्राच्या सार्वभौमत्त्वाची हळु हळु होत गेलेली वाढ, आणि त्यांच्या ताब्यांतील प्रदेशाचें संरक्षण व मजबुती करण्याकरितां त्यांनीं स्वीकारलेलें परराष्ट्रीय राजकीय धोरण, यांबद्दलच ठोकळ मानानें वर्णन केलेलें आहे. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धभागांत मोठमोठ्या अंतःस्थ घडामोडी झाल्या असून प्रदेशाच्या वाढीबरोबरच लोकवस्तीचें प्रमाण आणि विविधता हींही वाढलीं आहेत, आणि जनसमाजाच्या नैतिक व ऐहिक स्थितींतही महत्त्वाची प्रगति झालेली आहे. या कारणामुळें मुलकी राज्यकारभाराच्या प्रगतीच्या, आणि ज्या काळासंबंधानें हा परिच्छेद लिहिला आहे, त्या काळीं वेळोवेळीं सुधारणेविषयीं ज्या ज्या योजना करण्यांत आल्या, त्यांच्या; त्रोटक वृत्तांताची ह्या ग्रंथांत भर घालून तो पूर्ण करणें इष्ट होईल, असें वाटल्यावरून ती हकीकत ह्या परिच्छेदांत देऊन हा ग्रंथ पूर्ण करण्यांत आला आहे.

इ. सन १८५७ सालच्या बंडाचीं कारणें प्रारंभीं प्रतिकारक होतीं; पण तींच परिणामीं क्रांतिकारक झालीं. ह्या बंडामुळें निमिषमात्र हिंदुस्थानांतील इंग्लिश राष्ट्राचा पाया हदरल्यासारखा झाला; परंतु त्यामुळेंच हिंदुस्थानांत पुनर्घटना आणि सुधारणा घडवून आणण्याला सर्व क्षेत्र मोकळें झालें. इ. सन १८३७—५७ या दरम्यानच्या वीस वर्षांच्या काळांत सतत युद्धें चालत असल्यामुळें फार थोड्या काळपर्यंतच शांतता राहिली होती, व लागोपाठ राज्यें खालसा केल्यामुळें इंग्लिशांच्या प्रदेशाची पुष्कळच वाढ झाली होती, हें मागील एका भागांत सांगण्यांत आलेलेंच आहे. इ. सन १८४९ मध्यें इंग्लिशांच्या शीख लोकांबरोबर दोन निकराच्या लढाया झाल्या, व त्यानंतर पंजाब जिंकण्यांत आणि शांत करण्यांत आला; त्याचप्रमाणें इ. सन १८५६ मध्यें उत्तर हिंदुस्थानांतील शेवटचें व सर्वांत मोठें औधचें राज्य लार्ड डलहौसी

यानें खालसा करून इंग्लिश राज्यास जोडलें, तेव्हां क्षुब्धतेच्या युद्ध-कालाचा शेवट झाला, आणि आतां ब्रिटिश साम्राज्याच्या छत्राखालीं सर्व देश शांत व स्थिर होईल, असें स्वाभाविक रीत्याच अनुमान करण्यास हरकत नव्हती.

वास्तविक पाहतां इंग्लिश लोक हे आतां एका नवीनच कामास प्रारंभ करणार होते; परंतु तें काम हातीं घेण्याच्या ऐन वेळींच एका मोठ्या आपसांतील भयंकर युद्धाचा उद्भव झाला. राजकीय वातावरण निरभ्र होऊन आतां शांततेचें साम्राज्य नांदेल, व अवश्य ती विश्रांतिहीं मिळेल, अशी आशा डोळ्यासमोर दिसूं लागते न लागते, तोंच बंडरूपी गाजत्या वादळानें विजांचा कडकडाट व मुसळधार पाऊस यांना सुरवात झाली; ज्या एतद्देशीय सैन्यानें एक शतकपर्यंतच्या लढायांत इंग्लिशांच्या तर्फे जयापजयांत बरोबरीनें भाग घेतलेला होता, तेंच एतद्देशीय सैन्य ह्या वेळीं त्यांच्यावर उलटून पडलें, आणि त्यांच्याशीं त्यांनीं निकराच्या लढाया केल्यानंतरच तें हतवीर्य झालें. औधमधील मोठमोठ्या जमिन-दारांनीं इंग्लिशांविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें, आणि सर्व उत्तरेकडील प्रदेशभर इंग्लिश सत्ता कांहीं काळपर्यंत एक तर समूळ नाहींशी झाली होती, अगर ज्यांनीं ह्या आणीबाणीच्या प्रसंगाला मोठ्या धैर्यानें आणि उत्साहानें तोंड दिलें, त्यांच्या हत्यारांच्या जोरावर व निश्चयावरच ती निव्वळ टिकून राहिली होती. अशा रीतीनें इ. सन १८६० मध्यें सरते शेवटीं पुन्हां शांतता प्रस्थापित झाली, त्या वेळीं जुने प्रदेश भयंकर बंडाळीमधून नुकतेच सांवरूं लागले होते, व त्यामुळें आसपासच्या एत-द्देशीय राज्यांना तर पराकाष्ठेचाच त्रास पोहोंचलेला होता. इंग्लिशांनीं नुकत्याच मिळविलेल्या प्रदेशांमधील राज्यव्यवस्थेची इमारत ही निव्वळ काम-चलाऊ असून ते प्रदेश नुकतेच ताब्यांत आलेले असल्यामुळें ती अगदीं निकडीच्या व तात्कालिक गरजा भागविण्या पुरतीच काय ती फक्त होती. परंतु सर्व देशभर पुन्हां शांतता नांदूं लागल्यानंतर, विशिष्ट घटना करण्यास,

निरनिराळ्या स्थानिक सरकारांच्या अंमलबजावणीचा अधिकार मर्यादित
पायावर स्थापन करण्यास, आणि राज्य चालविण्याची अव्यवस्थित पद्धत व
ऐच्छिक कायदे यांच्या ऐवजीं योग्य रीतीनें घडविलेले कायदे चालू कर-
ण्यास, वेळ मिळाला. आणि हाच काळ हें कार्य हातीं घेण्याला अगदीं
योग्य होता. कारण, हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेमध्यें निरनिराळीं स्थित्यं-
तरें घडून गेल्यानंतर आतां तिला अशी स्थिति प्राप्त झाली होती कीं, तिजमुळें
बदलत जाणाऱ्या समाजाच्या गरजा आणि सुधारलेले रीतरिवाज यांना
साजतील असे तींत अतिशय जरूर आणि व्यापक फेरबदल करणें त्यांना
अवश्यक झालें होतें. मोंगल राष्ट्राची राज्यव्यवस्था ही कांहीं अंशीं पद्धत-
शीर होती; आणि परगणे व प्रांत यांची वांटणी करण्याची त्यांची योजना
व स्थानिक जमाबंदी ठरविण्याची त्यांची पद्धत, ह्या ढोबळ मानानें पाहतां
अजूनही कायम राहिल्या आहेत. परंतु इंग्लिश राज्यापूर्वीं नुकत्याच होऊन
गेलेल्या एतद्देशीय राज्यांना शिस्त अगर स्थैर्य हीं नव्हतीं; कारण, अठ-
राव्या शतकांत राज्यें मिळविण्याकरितां सतत लढाया आणि झटापटी
चालत असल्यामुळें कर्तृत्ववान राज्यकर्त्यांना सुद्धां राज्यव्यवस्थेची घडी
बसविण्याला संधि अगर साधनें मिळालीं नाहींत. मोंगल बादशहांची
सत्ता पूर्णत्वास पोहोंचली असतांना सुद्धां, युरोपियन लोक दिवाणी व
फौजदारी कायदे यांचा जो अर्थ समजतात, तशा अर्थाचे कायदे बाद-
शहाच्या मंजुरीनें कधींही प्रसिद्ध करण्यांत आले नव्हते; किंवा जनसमाजा-
चे वरगुती संबंध आणि चालीरीती यांचें नियमन हुकमतीच्या जोरा-
वर करण्याचा त्यांनीं केव्हांही आव आणला नव्हता. बादशहा अगर त्याचे
दुय्यम कामगार हे आपल्या लहरीप्रमाणें अजमासाचा इनसाफ देणें आणि
कराची वसुली करणें एवढ्यावरच संतुष्ट असत. हिंदुस्थानची जनता
भिन्न भिन्न प्रकारच्या समूहांची बनलेली असून ती मुख्यत्वेंकरून धार्मिक
स्वरूपाच्या आपल्या स्वतःच्या संस्था आणि वागणुकीचे नियम यांच्या
अनुशासनाखालींच आजपर्यंत रहात आली आहे; कारण, आशियामध्यें

कायदा आणि धर्म हीं बहुतेक साधारणतः एकाच विषयाचीं दोन अंगें आहेत, असें मानण्यांत येतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ईस्ट इंडिया कंपनीच्या पहिल्या पाहिल्या अमदानींत तर जुन्या पद्धतीच्या वळणावरच घडविलेले प्रांतिक कायदे प्रसिद्ध करण्याची वहिवाट असे. ते निरनिराळ्या काळाच्या आणि भिन्न भिन्न स्थळाच्या परिस्थितीला व गरजांना जुळतील, अशा तऱ्हेनें बनविण्यांत आलेले असून त्यांच्या शब्दांची मांडणीही नीटनेटकी नसे; आणि त्यांत खुलासे व सूचना यांचाही समावेश करण्यांत येत असे; शिवाय स्थानिक न्यायाच्या अदालतींनीं अनुभवा-शिवाय दिलेले निवाडेही त्यांतच गोंविलेले असत; त्यामुळें तर ते फारच घोटाळ्याचे होऊन गेलेले होते. त्यानंतर पुढें वरिष्ठ कायदे करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सभेनें मंजूर केलेल्या कांहीं महत्त्वाच्या आणि अत्युपयोगी कायद्यांचा सर्व जुन्या प्रदेशभर प्रचार सुरू करण्यांत आला. परंतु हे नवीन प्रदेश जसजसे इंग्लिश राज्याला जोडले गेले, तसतसे गव्हर्नर जनरलांनीं ते तात्पुरते " नानरेग्युलेटेड सिस्टिम " या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीप्रमाणें आपल्या प्रत्यक्ष ताब्याखालीं ठेविले; तथापि पद्धतशीर रीतीनें बनविलेले कायदे व त्यांची योग्य अंमलबारी ही जरूर वाटेल तेव्हां त्या प्रदेशांस लागू करण्याचा अधिकार त्यांनीं आपल्या हातीं राखून ठेविला; आणि जेव्हां ते लागू केले जातील, तेव्हां त्यांतील शब्दां-कडेसच निव्वळ दृष्टि न देतां त्यांच्या हेतूंकडे लक्ष पुरवून, जेथें संशय उत्पन्न होईल, तेथें न्यायाचा व सदसद्विवेकबुद्धीचा आश्रय घेऊन राहिलेल्या उणीवांची पूर्तता करून घ्यावी, अशी प्रांतिक सरकारांना सूचना दिली.

या कारणामुळें, बंडाचा अगदीं बीमोड झाल्यावर, आणि त्यापासून उद्भवलेली व सर्व हिंदुस्थानभर माजलेली धामधूम पूर्णपणें दाबून टाकण्यांत आल्यावर, जेव्हां राज्यकारभाराची कायमची पुनर्घटना करणें सोईचें व जरूरीचें झालें, त्या वेळीं अव्यवस्था मोडून सुव्यवस्था प्रस्थापित करणें

व नवीन आणि एकसारख्या राज्यव्यवस्थेचा पाया घालणें, हें इंग्लिश अधिकाऱ्यांच्या पुढें एक मोठेंच बिकट काम येऊन पडलें. सर्व राष्ट्रांच्या इतिहासामध्यें आजपर्यंत कदाचित् कधींही घडून आलें नसेल, अशा प्रकारच्या अतिशय झपाट्याच्या आणि आकस्मिक राजकीय व औद्योगिक स्थित्यंतराचें हिंदुस्थान हें एक क्षेत्र बनलें होतें. कारण, आशियांतील जनसमूहावर युरोपियन विचारांचा पगडा बसल्यामुळेंच फक्त हिंदुस्थाना-मध्यें सुधारणेच्या जुन्या आणि नव्या प्रचारांची सळभेसळ झाली होती, असें नाहीं; तर भौतिक आणि मानसिक प्रगतीच्या निरनिराळ्या स्थितींत ह्या देशांतील असंख्य जनसमूह वावरत असल्यामुळेंही ती झालेली होती. इंग्लिशांनीं हिंदुस्थानचें राष्ट्र जेव्हां पहिल्यानें आपल्या ताब्यांत घेतलें, तेव्हां त्याचा राजकीय ऱ्हास होत चाललेला होता, आणि त्यांना आतां नानाविध जाति आणि धर्म यांच्या जुनाट व दुराग्रही मतांनाही आतुर-तेनें मान देऊन व शास्त्रीय पद्धतीचें अवलंबन करून त्या राष्ट्राची राज्य-व्यवस्था पूर्णतेस न्यावयाची होती. इ. सन १८५७ च्या बंडाच्या पूर्वीं सुधारणेचा हा क्रम हळू हळू चाललेला होता; परंतु त्या वेळेपासून पुढें त्याला झपाट्याची गति मिळाली. इ. सन १८५८ सालीं पार्लमेंटनें एक कायदा मंजूर केला, आणि त्याअन्वयें हिंदुस्थानांतील राज्यकारभारा-वर नियंत्रण करण्याची ह्या वेळेपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीचें इंग्लंडमधील व्यवस्थापकमंडळ आणि इंग्लंडच्या राजाचें प्रधानमंडळ यांच्यामध्यें विभागली गेलेली मुख्य सत्ता "सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सिल फॉर इंडिया" याचेकडे सोंपविण्यांत आली; आणि कंपनीचें आरमारी व लष्करी सैन्य इंग्लंडच्या बादशाही नोकरींत सामील करण्यांत आलें. त्या-नंतर इ. सन १८६१ सालीं इंडिया कौन्सिल ॲक्ट ह्या नांवाचा दुसरा कायदा मंजूर झाला, व त्याअन्वयें हिंदुस्थानांतील गव्हर्नर जन-रलच्या राज्यसूत्रें चालविणाऱ्या कौन्सिलच्या घटनेचें स्वरूप बदलण्यांत आलें, आणि सर्व हिंदुस्थानाकरितां कायदे करण्यासाठीं गव्हर्नर जनरल

हा अध्यक्ष असलेल्या कायदे वडविणाऱ्या वरिष्ठ कौन्सिलाची आणि मद्रास, मुंबई व कलकत्ता, येथें कायदे करणाऱ्या दुय्यम कौन्सिलांची स्थापना करून कायदेकानू करणाऱ्या मंडळांची पुनर्घटना करण्यांत आली. दुसऱ्या एका कायद्यानें ह्या तिन्हींही राजधान्यांच्या ठिकाणीं बादशाही सनदेअन्वयें न्याय करण्याचा अधिकार दिलेलें असें एक एक हायकोर्ट स्थापन करण्यांत आलें. इ. सन १८६०–६१ मध्यें फौजदारी अपराध्यास शिक्षा देण्याचा आणि फौजदारी काम चालविण्याच्या रीतीचा कायदा अमलांत आला. व त्यामुळें फौजदारी कायद्याची साधारणतः सर्व देशभर एकसारखी ठरीव पद्धत सुरू झाली. ह्या तजविजीमुळें न्यायाच्या आणि अंमलबजावणीच्या राज्यव्यवस्थेची पुनर्घटना करण्यांत आली, आणि त्यामुळें सहा वर्षांपूर्वीं लार्ड डलहौसी यानें ज्या घटनेचा व स्वरूपाचा राज्यकारभार राणीच्या अमलाखालील पहिला गव्हर्नर जनरल, लार्ड क्यानिंग, याचे हवालीं केला होता, त्याहून फार निराळ्या घटनेचा व स्वरूपाचा राज्यकारभार लॉर्ड क्यानिंग यानें इ. स. १८६२ मध्यें कलकत्ता सोडण्यापूर्वीं आपल्या मागाहून राज्यकारभार चालविणाऱ्या लॉर्ड एलगीन ह्या गव्हर्नर जनरलच्या हवालीं सोंपविला. हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्यांत बऱ्याच मोठ्या प्रदेशाची भर पडत चालली होती, अशा वेळीं, इ. सन १८५८ मध्यें, जाहिरनाम्याच्या द्वारें इंग्लिशांनीं हिंदुस्थानावर आपलें सार्वभौमत्व प्रस्थापित केलें, ही गोष्ट, हिंदुस्थान देश हा जगांतील सर्व भागांत पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्याचा एक महत्त्वाचा घटक झाला आहे, याचें प्रत्यक्ष व दृश्य असें एक चिन्हच होय; उलट, राणीसरकारनें हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें प्रत्यक्ष आपल्या हातांत घेतल्यामुळें ऐक्यभावना उत्पन्न होऊन पूर्ववत् भरंवसा बसला, आणि हिंदुस्थानांतील जनसमाजाच्या नैतिक आणि आधिभौतिक प्रगतीला जोराची प्रेरणा मिळाली.

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचा पुढील पन्नास वर्षांचा इतिहास ह्मटला ह्मणजे, ह्या मूलभूत अंमलबजावणीच्या आणि कायद्याच्या सुधारणा यांच्या

धर्तीवरच केलेली अधिक वाढ होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या इतिहासांत एका आधुनिक राष्ट्राचें राजनीतीचें यंत्र एका अतिशय भिन्न जातींतील जनसमूहाच्या चालीरीति आणि परिस्थिति यांच्याशीं विरोध न होतां कसें सुरळीत चालविलेलें आहे, याचें वर्णन केलेलें आहे. एक पक्षीं, व्यक्तिविषयक कायदे, जातीचे आणि धर्माचे नियम, व प्रचलित वहिवाटीचे हक्क, ह्या गोष्टी विचारांत घेणें भाग होतें; आणि दुसऱ्या पक्षीं, एका भक्कम आणि पद्धतशीर राज्यव्यवस्थेच्या सुरवातीमुळें ह्यांपैकीं बरेच नियम आणि वहिवाटी शिथिल होत चालल्या होत्या, व बदलतही जात होत्या. कारण, हे नियम आणि ह्या वहिवाटी प्रचारांत येण्याला अवश्यक झालेला काळ आणि परिस्थिति हीं आतां नाहींशीं झालीं होतीं; त्यामुळें अशा रीतीनें आद्यकालीन समाजाच्या निराधार व लवचिक निर्बंधांचा स्वाभाविक रीत्याच लोप होत चालला असून ते नामशेष होण्याच्या पंथास लागलेले होते. परंतु पहिल्यानें जिंकलेल्या प्रदेशामध्यें स्थापन केलेल्या इंग्लिशांच्या न्यायाच्या अदालतींवर ह्या आपोआप होत चाललेल्या ऱ्हासाला आळा घालण्याची जबाबदारी येऊन पडली होती; व त्यामुळें ह्या न्यायाच्या अदालतींकडे हक्कासंबंधीं प्रत्येक प्रश्न, व त्याचप्रमाणें वारसदारी, जिंदगी, आणि वहिवाटीचा सर्वसाधारण कायदा, या बाबतींत उपस्थित झालेला प्रत्येक तंटा निकालाकरितां नेणें साहजिकपणेंच भाग पडत असे; व त्याचा शेवटीं सामान्यतः असा परिणाम झाला कीं, ह्या न्यायाच्या अदालतींतील निवाड्यांनीं त्या वेळच्या वस्तुस्थितीला साधारणपणें स्थिरता आणून तिला याप्रमाणें कायम ठशासारखें स्थैर्य आणिलें. कारण, ही वस्तुस्थिति स्वभावतःच लवचिक असल्यामुळें तिला त्या बेबंदशाहीच्या काळास अगदीं उचित अशा अर्धवट रानटी परिस्थितीमुळें जें स्वरूप प्राप्त झालें होतें, त्या योगानें ती नवीन सामाजिक व औद्योगिक वातावरणाशीं, शांततेशीं, संपत्तीच्या वाढीशीं, मालमत्तेच्या सुरक्षितपणाशीं, आणि विद्येच्या प्रसाराशीं विसंगत होत चालली होती. त्यामुळें या सर्वांचा असा परिणाम

झाला कीं, चालू असलेल्या शिथिल व अव्यवस्थित चालीरीतींना एक तऱ्हेचा ताठरपणा, निश्चितता, टापटीप व कडकपणा प्राप्त झाला. याचें कारण हें उघडच आहे कीं, जरी स्वनियामक असलेल्या एखाद्या स्वतंत्र समाजाला गैरसोईचा असलेला एखादा जातीचा किंवा धर्माचा निर्बंध दुरुस्त करतां अगर टाकतां आला, तरी इंग्लिश न्यायाधीशाच्या हातांतला कायदा अगदीं न ढळणारा असतो, आणि त्याच्या शृंखला सैल न होतां त्या उलट अधिक अधिक घट्ट होत जातात. परंतु ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनें सर्व वर्गाच्या जनसमाजांच्या जीवनस्थितीवर इतका खोल आणि दृढ परिणाम झालेला होता कीं, त्यांच्या निश्चित आणि अढळ अशा कायद्याखेरीज कशानेंही ह्या जुनाट कल्पना आणि संस्था ह्यांमध्यें होत असलेला फेरफार बंद होणें शक्य नव्हतें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानांतील सर्वसाधारण दिवाणी कायदा निरनिराळ्या प्रांतांत भिन्न भिन्न प्रकारचा असून त्यांत स्थानिक परंपरेमुळें व धार्मिक वैचित्र्यामुळें नाना प्रकार व अपवाद उत्पन्न झाल्या कारणानें, तो बऱ्याच अंशीं घोटाळ्याचा आणि अनिश्चयात्मक असा झालेला होता; व त्यामधील गुंतागुंत विदेशीय कायद्याच्या व्यवहारपद्धतीमुळें तर अधिकच वाढली गेली होती. तथापि जनसमाजाच्या परिस्थितीला साजणाऱ्या आणि अधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्राची मर्यादा ठरविणाऱ्या अशा स्पष्ट आणि पद्धतशीर कायद्याच्या साह्यानें राजशकट चालविणें ही एकच गोष्ट देशाच्या भरभराटीची आणि सुरक्षिततेची खरी हमी असते; ह्मणून भिन्न भिन्न कलमांच्या आणि ठरावांच्या अस्ताव्यस्त मसुदा-समूहाला व्यवस्थित आणि सुबोध असें स्वरूप देणें अवश्यक झालें होतें; आणि हिंदुस्थानांतील लोकांच्या सामाजिक संस्था, भ्रामक समजुती आणि चालू रूढि, यांत शक्य तितकी कमी ढवळाढवळ करून दिवाणी कायदा व दिवाणी काम चालविण्याच्या रीतीचा कायदा सुबोध करणें आणि त्याला सर्व साधारण स्वरूप आणणें व न्यायाच्या आणि नीतीच्या ढोबळ तत्त्वा-

बद्दल निर्बंध ठरविणें हें कोडें अजूनही हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारास सोडवावयाचें बाकी राहिलेलें होतें.

सर हेनरी मेन हा मोठा कायदेपंडित असून प्राचीन सुधारणांच्या पद्धतीचा व कल्पनांचा तो पुष्कळच वाकबगार असल्यामुळें वरील कोडें उलगडण्यास विशेष पात्र होता; ह्मणून त्याच्याच देखरेखीखालीं ह्या कार्यास सुरवात करण्यांत आली. इ सन १८६२ मध्यें हिंदुस्थान सरकारच्या कायदेकानू घडविण्याच्या खात्याचीं मुख्य अधिकारसूत्रें त्यानें आपल्या हातीं घेतलीं, त्या वेळीं हिंदुस्थानच्या गुन्हेगारास शिक्षा करण्यासंबंधींचा कायदा आणि फौजदारी काम चालविण्याच्या पद्धतीचा कायदा हे दोन्हीही मोठाले कायदे मंजूर होऊन ग्रंथामध्यें संगृहीत झालेले होते; परंतु दिवाणी अथवा कौटुंबिक बाबतींसंबंधाच्या कायद्याचा विषय फार गुंतागुंतीचा होता. कारण, उदाहरणार्थ, ही गोष्ट अगदीं उघडच आहे कीं, विवाह व वारसा यांचा मानवजातीच्या मूळभूत हितांशीं व अत्यंत नाजुक मनोविकारांशीं जिव्हाळयाचा संबंध असल्यामुळें त्या बाबतींत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवरच प्रत्येक समाजाचा पाया उभारलेला असतो; ह्मणून परदेशस्थ कायदेपंडितांनीं त्यामध्यें हात घालणें झाल्यास तो अत्यंत खबरदारीनेंच घातला पाहिजे. आणि हिंदुस्थानामध्यें तर कुटुंबव्यवस्था व संपत्तिविभाग यांना लागू पडणारे नियम हे धर्मकृत्यें, पूजाविधि आणि सांप्रदायिक मतें, यांच्यामध्यें मिसळून गेलेले आहेत, किंवा त्यांच्यावर अवलंबून राहिलेले असून, ते इतके नानाविध व असंख्य आहेत कीं, यांचा एकत्र संग्रह करून सर्वांस लागू पडणाऱ्या दिवाणी कायद्याचा ग्रंथ बनविणें दुरापास्त आहे. या कारणामुळें, न्यायाच्या ठळक ठळक तत्त्वांचा ज्यांत समावेश केलेला आहे,—ह्मणजे, दुसऱ्या तऱ्हेनें म्हणावयाचें असल्यास, समाजाच्या वाढीला मदत कोणत्या दिशांनीं झाली पाहिजे, याचा ज्यांत निर्देश केलेला आहे,—असे कायदे बनविणें, एवढाच काय तो मार्ग शक्य होता. या जुन्या बंधनांतून समाजाची मुक्तता करणाऱ्या कायद्यांची तंतोतंत व्यापकता

व अंमलबजावणी किती प्रमाणाची आहे, याचें या ठिकाणीं स्पष्टीकरण करणें अशक्य आहे; तथापि ही कायद्याची क्रिया कशा प्रकारें घडत आहे, याचें हिंदुस्थानांतील वारसाईचा कायदा हें एक उदाहरण आहे, असें ह्मणतां येईल. या कायद्यामध्यें, जिंदगीच्या वारसदारीवर व मृत्युपत्रानें देऊं केलेल्या संपत्तीवर मृत्यु अगर विवाह यांचा काय परिणाम होत असतो, याबद्दल बनविलेल्या कानूंचा समावेश केलेला आहे; परंतु हा कायदा हिंदू, अगर मुसलमान, किंवा त्याप्रमाणेंच आपापल्या धर्मशास्त्राच्या आज्ञेप्रमाणें चालणाऱ्या दुसऱ्या लोकांना, बिलकूल लागू पडत नाहीं; तथापि एवढी गोष्ट मात्र अगदीं निःसंशय आहे कीं, कर्मठ हिंदू धर्माला एकसारखीं विस्कळित करणारीं विशिष्ट मतें व विलक्षण आचार, अथवा बौद्धिक उन्नति व आचारशैथिल्य, यांच्यामुळें आपल्या मूळच्या धार्मिक सांप्रदायांतून अथवा जात-गंगेतून जे लोक बाहेर निघालेले असतात, त्यांना या कायद्यानें एक प्रकारचें विशेष सामाजिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे. तसेंच, धर्मांतर करून ख्रिस्तधर्मी बनलेल्या लोकांसंबंधीं फिरून लग्न करण्याबद्दलच्या कायद्यासारख्या दुसऱ्या कायद्यामध्यें तर धर्मांतर केल्यामुळें साधारण सामाजिक हक्क नष्ट होत नाहींत, हें तत्त्व नमूद करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें पुराव्याचा कायदा व कराराचा कायदा यांमध्यें पूर्वीं न्यायाच्या अदालतींनीं तद्विषयक मुख्य ग्रंथांतून, अहवालींतून आणि विरोधी निवाड्यांतून ज्या ज्या कानूंचे जरूरीमुळें उतारे घेतलेले होते, व ज्यांचें एक मोठें भारुडच बनून गेलें होतें, त्या सर्वांचा संक्षिप्त व स्पष्टी-करण देऊन एकत्र संग्रह करण्यांत आला. आणि सर्व अदालतींची दिवाणी अधिकार चालविण्याची पद्धतिही--सर्व पद्धतींचा ज्यांत समा-वेश होईल, अशा तऱ्हेचे ठराव करून--निश्चित करण्यांत आली. सारांश, ह्या काळांत केलेल्या कायद्यांचा उद्देश आणि परिणाम ह्मटला म्हणजे, न्याय-बजावणीच्या पद्धति सुलभ व संकलित करणें, हळू हळू कायदे करून लोकांच्या व्यावहारिक आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या सामान्य तत्त्वा-

ची उन्नति करणें, जसजशी त्यांची उपयुक्तता आणि नैतिक महत्त्व हळू हळू जनसमाजास पटत जाईल, त्याप्रमाणें अधिक अधिकार चालवून त्या योजनांचा विस्तार करणें, व क्रमाक्रमानें कायद्यांनीं बद्ध असलेल्या राज्य-पद्धतीच्या कल्पनेची त्यांना संवय लावणें, हाच होता.

या कालामध्यें अंमलबजावणीच्या एका मोठ्या खात्यांत सुधारणा करण्याची व त्यास स्थिर स्वरूप देण्याची जी पद्धति ब्रिटिश सरकारनें सुरू केली, ती इतक्या महत्त्वाची व तुलनात्मक न्यायपद्धतीच्या दृष्टीनें कांहीं अंशीं इतक्या सार्वजनिक हिताची आहे कीं, ह्या ठिकाणीं तिचें थोडेंसें स्पष्टीकरण करणें अस्थानीं होणार नाहीं. हिंदुस्थानामध्यें जमिनी-पासून उत्पन्न झालेला महसूल हाच नेहमीं राज्याच्या जमाबंदीचा मुख्य आधारस्तंभ असल्यामुळें, व तेथील जनसमाज हा शेतकीवरच बहु-तेक उदरनिर्वाह करणारा असल्यामुळें, त्या राष्ट्राच्या ह्या महसुलाच्या बाबीची न्यायानें व कुशलतेनें व्यवस्था करणें, ही गोष्ट त्या देशावर राज्य करणाऱ्या कोणत्याही सरकारच्या आणि त्यांतील प्रजेच्या हितसंबंधाला अत्यंत महत्त्वाची आहे. ब्रिटिश अमलाच्या प्रारंभापासून, जमिनीची मालकी व ताबा यांबद्दल उपस्थित झालेल्या प्रश्नांचा निकाल करण्या-मध्यें, प्रत्येक वतनापासून किंवा कधीं कधीं तर प्रत्येक शेतापासून खाजि-न्यांत साऱ्यादाखल भरपाई करण्याच्या रकमा निश्चित करण्यामध्यें, अगो-दर चालू असलेल्या कर घेण्याच्या पद्धतींत दुरुस्ती करण्यामध्यें, आणि वादग्रस्त मालकीचे हक्क ठरविण्याकरितां व शेतकऱ्यांच्या आपत्तीचें तज-विजी योजून निवारण करण्याकरितां नियम ठरवून त्यांची अंमलबजावणी करण्यामध्यें, इलाख्यांतील अधिकारी नेहमीं गुतलेले असतात. अगदीं पुरातन काळापासून राज्यकर्ते हे शेतकीच्या उत्पन्नांतील अवशिष्ट भागाचा हिस्सा नियमानें घेत आलेले आहेत, ही गोष्टच हिंदु-स्थानांतील प्रत्येक बलाढ्य सरकाराला खऱ्या वहितदाराचें संरक्षण करण्याकरितां बळकट व प्रत्यक्ष कारण म्हणून होऊन बसलेली आहे;

आणि या देशावर वारंवार अवर्षणाचे जे प्रसंग उद्भवतात, त्यांमुळें तर शेतकऱ्यांच्या हिताविषयींचें सरकारच्या शिरावरील ओझें पुष्कळच जड झालेलें आहे. परंतु ब्रिटिश अमलाखालीं हिंदुस्थान आलें, त्या वेळीं त्यांतील पुष्कळ प्रांतांची—सैन्यांच्या हालचालींपासून, दरवडेखोरांच्या टोळ्यांपासून, शेतकरी वर्गाच्या पांगापांगीपासून अथवा दारिद्र्यापासून, व लढाईच्या सर्व तऱ्हेच्या आपत्तींपासून,—पुष्कळच नासाडी होऊन गेलेली होती. तसेंच, प्रांत काबीज करण्यासाठीं व वसूल उत्पन्न करण्यासाठीं घोर संग्राम करावे लागत, जमिनीच्या मालकीसंबंधानें व वसुलासंबंधानें भयंकर तंटे होऊन जमिनी जबरीनें ताब्यांत घेतल्या जात, आणि यामुळें त्यांच्या जुन्या व नव्या मालकांमध्यें नेहमीं कडाक्याचे तंटे माजत. ब्रिटिश अमलाखालील प्रदेशाच्या सरहद्दीवर असलेल्या भागांमध्यें जेव्हां घोटाळा माजे, तेव्हां तर जमीनमहसुली व सरकारी उत्पन्न यांबाबत, एका बाजूनें जितकी रक्कम जबरदस्तीनें अधिक उकळतां येईल तितकी झोडून घ्यावी म्हणून, व दुसऱ्या बाजूनें एक फुटकी कपर्दिकही देऊं नये ह्मणून, जमिनीचे मालक, कुळें, व कर वसूल करणारे सरकारी अधिकारी, यांच्यामध्यें नेहमीं तंटेबखेडे चालत असल्यामुळें, नियमितपणानें जमिनीचा महसूल अगर सरकारी उत्पन्न वसूल होणें अगदीं अशक्य होत असे. ब्रिटिश सत्तेखालीं निरनिराळ्या काळीं जे जे निरनिराळे प्रांत आले, त्यांमध्यें जमीन महसुलाच्या बाबतींत जो इतका अनियमितपणा व जो इतका चलबिचलपणा इंग्लिशांना दिसून येत आहे, व जमिनीवरील मालकीच्या आणि रयताव्याच्या ताब्यावरच जी इतकी गुंतागुंतीची भिन्नता दृग्गोचर होत आहे, त्या सर्वांचें कारण ह्मटलें ह्मणजे, वास्तविक पाहतां, वर नमूद केलेल्या झगड्याच्या लंबकाचें इकडून तिकडे झालेलें आंदोलन, स्थानिक अकल्पित कारणें, व वारंवार घडून येणाऱ्या राज्यक्रांत्या, यांतच आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एका बाजूनें ठार बुडून जाईल इतका जुलूम, व दुसऱ्या बाजूनें बेकायदेशीर प्रतिकार, असे प्रकार दृष्टोत्पत्तीस येत असल्यामुळें

जमिनदाराच्या व कुळाच्या हक्काची स्थिति इतकी अनिश्चित झाली होती कीं, मालक व कुळ यांच्यामधील संबंध, किंवा हे दोघे व सरकार यांच्यामधील संबंध, कायमचा अगर तात्पुरता तरी, कोणत्या पायावर ठरविला पाहिजे, हें शास्त्रीय पद्धतीनें निश्चित करण्यास जागा होती. स्थानिक चालीरीति व वहिवाटीचे हक्क ह्मणजे काय, व तीं कायद्यानें कितपत कबूल करावींत, रयताव्यावर लादलेल्या करारांचा कडकपणा कमी करण्यासाठीं कायद्याला कितपत हात घालतां येईल, सरकारी मागणी वाढवावी कीं कमी करावी, जमिनीवरील दुहेरी ताबा कायद्याच्या व्याख्येंत कोठपर्यंत आणत येण्यासारखा आहे, ह्या सर्व प्रश्नांची चांगली बारकाईनें चौकशी करून त्यांचा निकाल न्याय व उपयुक्तता या तत्त्वांवर करणें भाग होतें. शिवाय शेतकीबाबत मालकीचे हितसंबंध व रयताव्याचे हितसंबंध हे इतके नाजूक आहेत कीं, त्यांच्यावर सांपत्तिक घडामोडीचा परिणाम त्वरित झाल्याशिवाय रहात नसल्यामुळें त्या दोहोंची नियमबद्ध विभागणी करण्याचे, व परस्परांच्या अशा प्रकारच्या संबंधांमुळें उद्भवणाऱ्या सर्व गोष्टीं-संबंधानें शक्य तितके लवचिक कायदे करण्याचे, मोठ्या कुशलतेनें केलेले सर्व प्रयत्न, दोन्ही वर्गांच्या हितसंबंधांची वारंवार होणारी ओढाताण बंद न झाल्यामुळें, व्यर्थ गेले; ह्मणून या दोघांच्या हितसंबंधांविषयीं उभयतांनाही अनुकूल असा मध्यस्थ तडजोडीचा मार्ग काढणें अगत्याचें झालें होतें.

ह्या वादग्रस्त मुद्दयाबद्दल सरकारी अधिकाऱ्यांमध्यें जे जे वादविवाद व ज्या ज्या वाटाघाटी झाल्या आहेत, त्यांचा खुलासा करणें अगर त्यांचा निकाल निरनिराळ्या प्रांतांमधून ज्या कायद्याच्या आणि अंमलबजावणीच्या उपायांनीं होत असे, त्यांची समजण्याजोगी त्रोटक हकीकत देखील ह्या भागांत देणें दुरापास्त आहे. तेव्हां या बाबतींत इतकें सांगितलें असतां पुरेसें होईल कीं, उत्तर हिंदुस्थानांत आणि मुख्यत्वेंकरून पंजाब व औध या प्रांतांत ह्या प्रश्नांचा निकाल करण्यामध्यें इंग्लिश सरकार कित्येक वर्षें सारखें गढून गेलेलें होतें. आणि या काळाच्या राज्य-

कारभाराच्या इतिहासांत ह्या विषयाला अग्रस्थान प्राप्त झालेलें आहे; कारण, पुष्कळ दिवसपर्यंत आणि फार बारकाईनें तपास केल्यानंतर कायम करण्यांत आलेल्या शेतकीबाबत सुधारणा व जमाबंदीचे नियम या दोहों-मुळेंच मुख्यत्वेंकरून इंग्लिश सत्ता जितकी भक्कम व लोकप्रिय झालेली आहे, तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टींनीं ती झालेली नाहीं.

हिंदुस्थानामध्यें ज्या ज्या साधनांनीं सुधारणा होत गेलेली आहे, त्या त्या सर्व साधनांमध्यें अतिशय बलाढ्य साधन म्हटलें म्हणजे, " आग-गाडीचे रस्ते " हें होय. सुमारें इ. सन १८५० पर्यंत मुख्य मुख्य रस्त्यांवर देखील खडी टाकून ते पक्के केलेले नव्हते; आणि त्यानंतर कांहीं वर्षांनीं आगगाडीच्या रस्त्याचा प्रथमच कोठें प्रारंभ होत चालला होता. परंतु त्या वेळेनंतर सर्व देशभर त्यांच्या शाखा पसरत गेल्या, आणि त्यामुळें सर्व ठिकाणीं जलद दळणवळणाचे व व्यापारी घडामोडीचे फायदे मिळत जाऊन इंग्लिशांच्या लष्करी हालचालींना तर फारच सोय झाली आहे. समुद्रालगत बंदराचे मार्ग जसजसे वाढत गेले, तसतसा हिंदुस्थानचा बाह्य देशांशीं होणारा व्यापारही वाढत गेला; व त्याचप्रमाणें कृत्रिम पाटबंधाऱ्यांचीं कामें वाढल्यामुळें शेतीचें क्षेत्रफळ विस्तृत होऊन जमिनीचीं पिकें उत्पन्न करण्याची शक्तिही वृद्धिंगत झाली. तसेंच मोठ-मोठ्या नद्यांतील पाणी कालव्यांतून सोडल्यामुळें आणि पुष्कळ तलावां-तून पाणी सांठवून ठेविल्यामुळें हिंदुस्थानामध्यें जगांतील दुसऱ्या कोण-त्याही भागांत आढळून येणार नाहीं, इतकें मोठें कालव्यांचें जाळें सर्व देशभर पसरलेलें असून ह्या पाण्याची लांबी एकत्र केल्यास ती शेकडों मैलपर्यंत होईल इतकी आहे. ह्या अवाढव्य उत्पन्नाच्या कामामुळें राष्ट्रां-तील संपत्ति वाढून व विभागली जाऊन देशाच्या स्वरूपामध्यें आणि लोकांच्या संवयींमध्यें दृष्टोत्पत्तीस येण्याइतका ढोबळ फरक झाला आहे. ह्या कामांत सरकारानें घातलेलें भांडवल हें बहुतांशीं कर्जाऊ घेतलेलें आहे, आणि ह्या रकमा ब्रिटिश सरकारच्या पतीवर कमी व्याजाच्या

दरानें काढण्यांत आलेल्या आहेत; तरीही हिंदुस्थाननें इंग्लंडला द्यावयाचें हें सार्वजनिक कर्ज ह्मणजे, हा एक निव्वळ असह्य बोजाच आहे, असें मानण्यांत येतें. तथापि ही गोष्ट मात्र निःसंशय आहे कीं, हिंदुस्थानांतील स्वभावसिद्ध साधनांची वृद्धि करण्याकरितां हा जो कोट्यावधि रुपयांचा खर्च करण्यांत आला, त्याच्यापासून हिंदुस्थानला जितका फायदा झाला आहे, तितका फायदा हिंदुस्थानचा इंग्लंडशीं झालेल्या संबंधामुळें घडून आलेल्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें झालेला नाहीं.[1]

इ. सन १८७७[2] मध्यें दिल्ली येथें राजेरजवाडे व अमीर उमराव यांच्या प्रचंड जमावासमक्ष, व्हिक्टोरिया राणीनें "हिंदुस्थानची बादशाहीण" ह्मणून किताब धारण केल्याचें, त्या वेळचा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल, लार्ड लिटन, यानें जाहीर केलें; आणि त्या योगानें ब्रिटिश सार्वभौम सत्ता स्थापित झाली, ही गोष्ट सार्वजनिक रीतीनें लोकांपुढें मांडण्यांत येऊन, तीच—इंग्लंडचें वर्चस्व हिंदुस्थानला कबूल झालें,—याची साक्ष देत आहे.

या कारणाकरितां, गेलीं पन्नास वर्षें ह्मणजे, हिंदुस्थानला प्राधान्येंकरून कायद्यांनीं ब्रिटिश राज्य बद्धमूल करण्याचा व राज्यकारभारामध्यें सुधारणा घडवून आणण्याचा काल होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ब्रिटिश सरकार हें आतां अत्यंत सुघटित असें एक यंत्रच बनलें आहे, असें या वेळीं ह्मणतां येण्यासारखें असून, तेंही आतां इतकें बळकट व चलनक्रियेंतही इतकें गुंतागुंतीचें झालेलें आहे कीं, शास्त्रीय रीत्या त्याच्या चलन-

---

१. ह्या कर्जावरील दरवर्षी द्यावें लागणारें जें व्याज इंग्लंडमध्यें पाठविलें जातें, त्या व्याजाचें "हिंदुस्थानापासून उकळलेली खंडणी" ह्या लबाडीच्या अयथार्थ नांवानें नेहमीं वर्णन करण्यांत येतें; तथापि आस्त्रेलियाला कर्जाऊ रकमांबद्दल याच प्रकारच्या व्याजाच्या निमित्तानें जी वार्षिक "खंडणी" द्यावी लागते, ती ह्या दोन्ही देशांच्या उत्पन्नाच्या मानानें पाहतां बरीच अधिक आहे.

ग्रं क.

२. मूळ ग्रंथांत इ. सन १८९७ असें चुकून पडलेलें आहे.

भा. क.

क्रियेवर देखरेख ठेवणें आणि ताबा चालविणें ही गोष्ट अत्यंत अगत्याची झालेली आहे; व ह्मणूनच आजपर्यंत त्याच्यावरील वरिष्ठ प्रकाराचें देखरेखीचें काम इंग्लिश अधिकाऱ्यांच्याच हातीं ठेवण्यांत आलेलें आहे. परकीय राज्य ह्मणजे, तें मिळविल्यापासून कांहीं काळपर्यंत कमी अधिक प्रमाणानें स्वैर हें असलेंच पाहिजे; आणि ज्या अर्थी राज्यकर्त्यांना प्रथम तें टिकावें ह्मणून आपल्या देशबांधवांच्या बळावर आणि विश्वासूपणावर बहुतेक भिस्त टाकणें भाग पडतें, त्या अर्थी दिवाणी आणि लष्करी खात्यांतील वरिष्ठ अधिकारी बहुतेक सतत परदेशांतूनच आणावे लागतात. मोंगल बादशहा हे लष्करी अधिकारावर व बहुतेक सर्व वरिष्ठ दर्ज्याच्या दिवाणी कामांवर फक्त आपल्या धर्माच्या किंवा आपल्या जातीच्याच लोकांना नेमीत असत; आणि त्याचप्रमाणें ब्रिटिश राष्ट्राचीही त्यांच्या सारखीच राजकीय स्थिति असल्यामुळें हिंदुस्थानांतील राज्यकारभारांतील वरिष्ठ दर्ज्याच्या जागा इंग्लिश लोकांकरितांच राखून ठेवणें ब्रिटिश सरकारास भाग पडत आहे. परंतु मोंगल बादशाही ही, वास्तविक पाहूं गेलें असतां, जात्याच एकतंत्री व स्वनिष्ठ अशी होती; आणि खरें ह्मणावयाचें ह्मणजे, आशिया खंडांतील देशांमधून अशा राज्य चालविण्याच्या प्रकाराशिवायची अन्य पद्धति स्थापन करण्याचा प्रयत्न कधींही झालेला नाहीं. शिवाय आशिया खंडांतील प्रजाजनांना तर हा एकतंत्री अधिकार जोरदार आहे का कमकुवत आहे, व सह्य आहे कीं असह्य आहे, एवढ्याच फक्त प्रश्नापुरता विचार करण्याची संवय लागून गेलेली आहे. कारण, राज्यकारभार चालविण्याच्या पद्धतींत फरक करून ती सुधारणें ह्या उपायाचा आशिया खंडांतील राज्यांना अजूनही शोध लागलेला नसून, जर जुलूम बेसुमार होऊन वस्तुस्थिति असह्य झाली, तर ज्या व्यक्तीच्या करणीमुळें ती स्थिति प्राप्त झालेली असेल, ती व्यक्ति बदलून त्या ठिकाणीं दुसऱ्या व्यक्तीची स्थापना करावी, एवढाच काय तो उपाय योजला जात असे व आहे, असें दिसून येतें. या कारणामुळें हिंदुस्थानांत

इंग्लिशांचें राज्य सुरू झालें, त्या वेळीं तेथील बादशाहतीचें स्वरूप वर लिहिलेल्या प्रकारचें होतें; व हें राज्य ह्मणजे नुकतेच निरनिराळे इलाखे एकत्र करून बनविलेलें असून त्यावर एक मध्यवर्ती सरकारचा अंमल आहे, आणि त्यांतील प्रजाजनांमध्यें सर्व मानवी जातीच्या निरनिराळ्या भेदांचें अव्यवस्थित रीतीनें मिश्रण झाल्याचें दृष्टोत्पत्तीस येत आहे. परंतु एवढें मात्र खास कीं, या योगानें हिंदुस्थानांतील रहिवासी हे—जें राष्ट्र, अगदींच भिन्न वातावरणांत, म्हणजे जेथें परचक्राचें वारेंही शिरणार नाहीं अशा बेटांत, स्वराज्याच्या उत्क्रांतीला विशेषच अनुकूल अशा परिस्थितींत, आणि सर्वसाधारण हितसंबंधांनीं व राष्ट्रीयत्वाच्या भावनांनीं एकत्र गोंविल्या गेलेल्या एकजातीय समाजांत, कैक शतकेंपर्यंत सार्वजनिक संस्था चालवीत आहे, अशा एका युरोपियन राष्ट्राचे, ह्मणजे ग्रेट ब्रिटनचे,—राष्ट्रबांधव बनलेले आहेत. उलट पक्षीं हिंदुस्थान देश हा तर—परचक्रानें कित्येक शतकें अत्यंत गांजून गेलेला, त्यांतील अफाट प्रदेश परकीय विजयी लोकांनीं आणि आपआपसांत भांडणाऱ्या राजघराण्यांनीं सतत तुकडे करून वांटून घेतलेला, व त्यांतील जनसमाज ह्मणजे भिन्न भिन्न जाति व नाना तऱ्हेचे धर्म यांनीं उपस्थित झालेल्या हाडवैरानें व आशिया खंडांत देखील अन्य ठिकाणीं ज्यास साम्य मिळणार नाहीं अशा तऱ्हेनें आपापसांत विभाग झालेला,—असा आहे. परंतु हिंदुस्थानच्या इतिहासांत गेल्या पन्नास वर्षांमध्यें पूर्व कालांत कधींही झालेली नसेल इतक्या अधिक प्रमाणानें जनसमाजाची नैतिक व सांपत्तिक उन्नति झालेली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि संपत्ति आणि ज्ञान यांमधील भेद, युरोप खंडाशीं वारंवार होणारें वाढतें दळणवळण, पाश्चात्य कल्पना आणि राजकीय मूलतत्त्वें यांच्याशीं सुशिक्षित वर्गांचा झालेला पूर्ण परिचय, या कारणांनीं हिंदुस्थान देशांतील लोकमताच्या पुढाऱ्यांमध्यें, आपल्या देशांतील राज्यकारभारांत आपणाला अधिक हिस्सा मिळावा, अशी इच्छा प्रज्वलित होणें हा अपरिहार्य परिणाम झालेला आहे. त्यामुळें सुव्यवस्थित राज्यकारभारानें

देखील त्यांचें समाधान होत नाहींसें झालेलें आहे; इतकेंच नाहीं, तर उलट भावी आशा व महत्त्वाकांक्षा यांचाही त्यांच्या ठिकाणीं उद्भव झालेला आहे. इंग्लिशांनीं पहिल्यानें पोलिस व तुरुंग या खात्यांची सुधारणा करणें, कायद्याचे ग्रंथ तयार करणें, न्यायासनांचा पवित्र अधिकार प्रस्थापित करणें, व मुद्दाम शिकवून तयार केलेले सनदी अधिकारी नेमणें, वगैरे राज्यकारभारास अंगभूत अशा महत्त्वाच्या सुधारणा, व तसेंच आधुनिक राज्यकारभाराला अवश्य असलेलीं सर्व साधनें, यांच्या योगानें सुरवात केली; त्यानंतर सर्व महत्त्वाच्या प्रांतांत कायदेकौन्सिलें आणि प्रत्येक महत्त्वाच्या शहरांत स्थानिक स्वराज्य वगैरे लोकानियुक्त संस्थांची हळूहळू उभारणी करण्याचें कार्य त्यांनीं हातीं घेतलें; आणि आतां स्थानिक व प्रांतिक स्वराज्य ओघाओघानें हिंदुस्थानांतील लोकांच्या हवालीं करण्याच्या तयारीला ते वस्तुतः लागलेले आहेत.

परंतु हिंदुस्थानामध्यें सनदशीर राज्यकारभाराची भक्कम इमारत उभारण्याचें काम कोणत्याही प्रकारें बिलकूल सोपें नाहीं; कारण, त्याच्या अफाट विस्तारामुळें व विशेषतः प्रचंड आणि भिन्न भिन्न जातींच्या जन-समाजाच्या वस्तीमुळें जे जे व्यापक व एक स्वरूपाचे सुधारणेचे उपाय ह्मणून योजण्यांत येतात, त्यांच्यामध्यें कांहीं ना कांहीं तरी विघ्नें हीं येतातच; शिवाय, ह्या प्रयोगामध्यें इंग्लिशांना मार्गदर्शक असे मागील दाखले नाहींत; त्यामुळें तर हें काम निःसंशयच असामान्य अडचणीचें होऊन बसलें आहे. आतां ज्याप्रमाणें आगगाडीच्या इंजिनाला लोखंडी रूळ हा पाया व कायमचा मार्ग असून त्यावरच त्याची पुढील गति अवलंबून असते, त्याचप्रमाणें ब्रिटिश सार्वभौमत्वाची इमारत हा हिंदुस्थानच्या राष्ट्ररूपी यंत्राचा पाया व कायमचा मार्ग असून त्यावरच तेथील सर्व तऱ्हेनें प्रगति होणें अवश्य आहे. ह्मणून ह्या इमारतीला कोणत्याही तऱ्हेनें धक्का पोहोंचूं नये, व तो पाया अबाधितपणें कायम रहावा, याकरितां जी मर्यादा अवश्य आहे, त्या मर्यादेंतच हें वर निर्दिष्ट केलेलें सनदशीर राज्यकारभाराची

भक्कम इमारत उभारण्याचें काम चालविणें भाग आहे. तथापि ह्या अडचणीचा कांहीं तरी उलगडा होणें अवश्यक आहे. कारण, ज्या अर्थी आतां ब्रिटिश लोकांनीं, रोमन लोकांच्या उच्च तऱ्हेचें अनुकरण करून, एक अवाढव्य नानाविध भाषा बोलणाऱ्या लोकांनीं भरून गेलेल्या अशा राष्ट्राची इमारत बांधण्याच्या कामाची पूर्तता केली आहे, त्या अर्थी तिच्या बांधकामाची शाश्वती तिच्यावरील वजनाची कुशलतेनें विभागणी करण्यावरच अवलंबून राहणार, हेंही उघडच आहे. कारण, जर त्या भारांचा बोजा एकाच ठिकाणीं अतिशय झाला, तर त्या इमारतीच्या मुळालाच अपाय होत असतो; आणि मूळच्या बांधकामांतच भार सहन करण्याची शक्ति असल्याशिवाय भार सहन करण्याकरितां दिलेल्या आगंतुक आधारांनीं काम भागत नसतें. याकरितां या प्रश्नाचा यथासांग उलगडा करण्यास सहानुभूतिपूर्वक अंतःस्थ स्थितीचें निरीक्षण आणि तसेंच राजकार्यधुरीणत्वाच्या शास्त्रीय तजविजी, ह्यांची अवश्यकता असून या दोहोंला हिंदुस्थानांतील जनसमूहाची वाढती बुद्धि व त्यांची सदिच्छा यांचें पुष्टीकरण, या गोष्टींचीच अवश्यकता आहे.

पूर्वीं तर पुष्कळच खात्रीपूर्वक अशी अटकळ बांधण्यांत आली होती कीं, झपाट्यानें होणारी सामाजिक प्रगति व व्यापारी घडामोड यांच्या कालांत, अनुभव नसल्यानें, अविचारानें व अयोग्य त्वरा केल्यानें ज्या चुका होतात, त्यांवर खात्रीचा रामबाण उपाय ह्मटला ह्मणजे, " विद्यादानाची तजवीज करणें " हा होय. परंतु जेव्हां आधुनिक सार्वजनिक विद्यादानाला सरकारनें एकदम सुरवात केली, व तें वृद्धिंगत करण्याचें काम झपाट्यानें चालविलें, तेव्हां त्याचा परिणाम कांहीं वर्गांच्या लोकांवर एखाद्या तीव्र क्षाराप्रमाणें क्षोभक झाला; आणि या देशांतील जुन्या अप्रागतिक समाजरूपी गोळ्यांना तें शिक्षण द्रवीभूत केल्याशिवाय रहात नाहीं. तथापि याच विद्यादानानें बुद्धिवैभवाची अज्ञानतिमिरापासून होणारी मुक्तता, शास्त्रीय विषयांमध्यें व वाङ्मयामध्यें होणारी प्रगति,

सार्वजनिक कामांशीं होणारा अधिक परिचय, आणि व्यावहारिक राजनीतीच्या स्वाभाविक परिस्थितीचें व्यापक ज्ञान, यांच्या योगानें सनदशीर सुधारणेच्या अग्रगण्य पुढाऱ्यांना अंगभूत अडचणींचें अधिक स्पष्ट ज्ञान होऊन त्यांचीं मतें व मागण्या जास्त नेमस्तपणाच्या झाल्याशिवाय राहणार नाहींत, अशी आशा बाळगण्यास जागा आहे. कसेंही असो, इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांचीं नैतिक व सांपत्तिक हितसंबंधांमध्यें समान हक्काची भागीदारी जमलेली आहे; ही त्यांची भागीदारी बहुतेक सर्व साम्राज्यभर पुष्कळ पिढ्या चालत आलेली आहे; ह्या भागीचा यूरोप आणि आशिया या दोन्हीही खंडांमध्यें परस्पर देशांच्या जनतेच्या इतिहासावर बलवत्तर परिणाम झालेला आहे; व त्यांच्या भावी भवितव्यतेवरही पुष्कळच परिणाम झाल्यावांचून राहणें अगदीं अशक्य आहे. आणि ह्मणूनच हा त्यांचा संबंध उभयतांही राष्ट्रांचें अपरिमित नुकसान झाल्याशिवाय आतां शिथिल होणें किंवा तुटणें अगदींच अशक्य आहे, असें बिनदिक्कत ह्मणण्यास कांहींही हरकत नाहीं.

सूचिपत्र.

***

शुद्धिपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८	७	देशाशीं व्यापार	देशाशीं त्यांचा व्यापार
१९	२५	आखातां । आणि	आखातांत असणाऱ्या आणि
२२	२६	जावा येथून	फावा येथून
४२	१७	इ.सन १७७४	इ. सन १६७३
४५	२६	त्यांचा	त्याचा
४७	१६	पापला	पावला
५४	१	वायव्येकडली	वायव्येकडील
७८	२४	मुलांमुलींतिल	मुलांमुलांतील
११६	२१	अपरिहार्य	अप्रतिहार्य
१४३	२५	लिहिले	लिहिलेलें
१५७	११	होती आणि	होती ही होय; आणि
१५९	१	भाग पांचवा	भाग सहावा
१६७	२	सुभेदाराचें	सुभेदारीचें
१६८	२६	इ. सन १७५६	इ. सन १७५६ जून
१७७	१८	मराठे इंग्लिशांशीं	मराठे हे इंग्लिशांशीं
१७९	६	वंद पडल्यासुळें	बंद पाडल्यामुळें
१८२	२२	मनांत कशा	मनांत त्या वेळीं कशा
१९१	५	तेव्हां	त्या वेळीं
२१३	४	आणि	अथवा
२२४	१९	तिनें उसनी	तिनें पुन्हां उसनी
२६७	१७	आणि चिकाटीनें	आणि इकडे हिंदुस्थानामध्यें पुष्कळ दिवस व चिकाटीनें
३१४	१२	सदारांचे	सरदारांचे
३१६	२६	मिळालेल्या	नेमलेल्या
३७१	२५	होईल अशा	होईल अगर धोका येईल अशा
३९०	३	युद्ध झाल्यामुळें	युद्ध सुरू झाल्यामुळें
४०५	२१	हिंदुस्थानांतील सरकारची	हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारची
४५३	२१	दोन शिला	दोन जंगी शिला

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४५५	१५	बंदाफितूरी	फंदाफितूरी
४७७	२६	पान ३१७	पान ३२०
४६४	२२	त्यांचा	त्याचा
५१३	१०	कैक शतकेंपर्यंत	कैक शतकें सारख्या.

टीप:— उपरिनिर्दिष्ट अशुद्ध पत्राशिवाय आणखीही कांहीं ठिकाणीं काना, मात्रा, अनुस्वार, वेलांटी, वगैरेंचीं अशुद्धें राहिलेलीं आहेत, परंतु तीं सहज लक्षांत येण्यासारखीं असल्यानें त्यांचा वरील यादींत समावेश केला नाहीं.